सचिन तेंडुलकर

प्लेइंग इट माय वे

माझं आत्मचरित्र



मेहता पब्लिशिंग हाउस



सचिन तेंडुलकर

जन्मानं मुंबईकर असलेल्या सचिन तेंडुलकरनं १९८९मध्ये, वयाच्या सोळाव्या वर्षी पाकिस्तानविरुद्ध कसोटीत पदार्पण केलं. प्रतिभेचे नैसर्गिक वरदान लाभलेल्या सचिनने प्रदीर्घ काळ आंतरराष्ट्रीय स्तरावर क्रिकेट खेळत प्रेक्षकांचं भरपूर मनोरंजन केलं. कसोटी आणि एकदिवसीय क्रिकेट सामन्यांमध्ये सर्वाधिक धावा काढण्याचा आणि सर्वांत जास्त शतक झळकवण्याचा विक्रम सचिननं प्रस्थापित केला. सतराव्या वर्षी त्याने पहिलं कसोटी शतक काढलं, छत्तिसाव्या वर्षी एकदिवसीय क्रिकेटमध्ये द्विशतक काढणारा तो पहिला फलंदाज ठरला आणि २०१२मध्ये त्यानं आपल्या आंतरराष्ट्रीय क्रिकेट कारकिर्दीतील १००वे शतक झळकवलं. २००९मध्ये कसोटी क्रिकेटच्या जागतिक क्रमवारीत भारताने मिळवलेलं अव्वल स्थान आणि २०११मध्ये भारतीय संघाने जिंकलेला विश्वचषक हे त्याच्या देदीप्यमान कारकिर्दीतील दोन महत्त्वाचे मानबिंदू. मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर आपल्या घरच्या प्रेक्षकांसमोर २००वा कसोटी सामना खेळून २०१३मध्ये त्यानं क्रिकेटमधून निवृत्ती घेतली.

बोरिआ मजुमदार

बोरिआ मजुमदार यांना होड्सची शिष्यवृत्ती मिळाली आहे. सेंट जॉन्स कॉलेज, ऑक्स्फर्ड विद्यापीठातून त्यांनी ‘भारतीय क्रिकेटचा सामाजिक इतिहास' या विषयावर प्रबंध लिहून डॉक्टरेट मिळवली. सेंट्रल लँकेशायर विद्यापीठात ज्येष्ठ संशोधक,

मेलबोर्नच्या मोनाश विद्यापीठात साहाय्यक प्राध्यापक आणि 'इंडिया टुडे' गटाच्या क्रीडा विभागात सल्लागार संपादक म्हणून त्यांनी काम केलेलं आहे. *Twenty Two Yards to Freedom: A Social History of Indian Cricket (2004) आणि the Illustrated History of Indian Cricket (2006)* ही त्यांनी लिहिलेली दोन पुस्तकं वाचकांच्या विशेष पसंतीस उतरली आहेत.

आपल्या २४ वर्षांच्या विस्मयकारक कारकिर्दीमध्ये सातत्याने सर्वोच्च पदावर राज्य करत, क्रिकेटच्या इतिहासात सर्वाधिक धावा काढण्याचा विक्रम प्रस्थापित करून महान क्रिकेटपटू सचिन तेंडुलकरने २०१३मध्ये निवृत्ती घेतली.

भारतीय क्रिकेटजगताचं दैवत असलेल्या सचिन तेंडुलकरला त्याच्या निवृत्तीच्याच दिवशी 'भारतरत्न' या भारताच्या सर्वोच्च नागरी पुरस्काराने गौरवण्यात आलं. अवघ्या सोळाव्या वर्षी कसोटी क्रिकेटमध्ये केलेल्या पदार्पणापासून आंतरराष्ट्रीय स्तरावरचं त्याचं १००वं शतक आणि त्यानंतर संपूर्ण देशाचे लक्ष खिळवून ठेवणारी त्याची भावपूर्ण निवृत्ती, या विलक्षण प्रवासाची कहाणी खुद्द सचिन तेंडुलकर आता त्याच्याच शब्दांत सांगत आहे.

मुंबईच्या एका खोडकर आणि दंगामस्ती करणाच्या मुलाचा उतू जाणारा उत्साह जेव्हा क्रिकेटकडे वळवला गेला, तेव्हा जन्म झाला विक्रमामागून विक्रम करणाच्या एका महान फलंदाजाचा! शालेय क्रिकेटमध्येच आपल्या असामान्य प्रतिभेची चुणूक दाखवत सचिनने आपल्या देदीप्यमान कारकिर्दीला प्रारंभ केला. लवकरच सचिन तेंडुलकर हा भारतीय फलंदाजीचा एक प्रमुख आधारस्तंभ बनला. क्रिकेटवेड्या भारतातील त्याचे निष्ठावंत चाहते त्याची प्रत्येक हालचाल टिपू लागले.

आजपर्यंत कोणत्याही क्रिकेटपटूला अपेक्षांचं एवढं प्रचंड ओझं पेलावं लागलं नव्हतं, आणि आजपर्यंत कोणताही क्रिकेटपटू कसोटी व एकदिवसीय सामन्यांत सर्वाधिक धावा व सर्वांत जास्त शतकं झळकवत इतका दीर्घकाळ खेळत राहिला नव्हता. मुंबईवरील अतिरेक्यांनी केलेल्या भयंकर हल्ल्यामुळे जेव्हा देश हादरला होता, तेव्हा निधड्या छातीने कसोटी शतक झळकवत देशामध्ये पुन्हा एकजूट निर्माण करणारा सचिन हा एकमेव क्रिकेटपटू ठरला.

भारतीय संघाने जिंकलेला विश्वचषक आणि कसोटी क्रिकेटच्या जागतिक क्रमवारीत भारताने मिळवलेलं अव्वल स्थान हे सचिनच्या क्रिकेट कारकिर्दीतील दोन महत्त्वाचे मानबिंदू. मात्र सतत उद्भवणाच्या दुखापती, २००७ सालच्या विश्वचषक स्पर्धेतून पहिल्या फेरीतच बाहेर पडण्याची नामुष्की, कर्णधार असताना प्रसिद्धिमाध्यमांनी केलेली झोंबणारी टीका अशा प्रकारचे अपयशी आणि वैफल्यग्रस्त करणारे अनुभवही त्याच्या वाट्याला आले. सतत प्रसिद्धीच्या झोतात राहूनही, कुटुंबवत्सल आणि देशभक्त असलेल्या सचिन तेंडुलकरने आपल्या वैयक्तिक जीवनाबद्दलही या पुस्तकातून बरंच काही सांगितले आहे. स्वत:च्या क्रीडाजीवनाचे अंतरंग इतक्या स्पष्ट आणि प्रामाणिकपणे यापूर्वी कोणत्याच खेळाडूने उघड केलं नव्हतं.

आणखी काही दशकांनंतर आपल्या इतर स्मृती जरी पुसट होत गेल्या तरी एक गोष्ट मात्र आपण नक्कीच आपल्या नातवंडांना सांगणार आहोत; ती म्हणजे, 'मी सचिनला खेळताना पाहिलंय.' हे शब्द उच्चारताच क्षणभर आपल्याही आवाजात पुन्हा एकदा तारुण्याचा जोश निर्माण होईल. सचिनबद्दल आपल्याला वाटणारा जिव्हाळा आणि सचिनच्या व्यक्तिमत्त्वाचा आणि त्याच्या खेळाचा आपल्यावर असलेला प्रभाव ओसरणं कदापि शक्य नाही.

– के. सी. विजया कुमार

असं म्हणतात की, एखाद्या अलौकिक व्यक्तीमधील महानतेच्या खुणा त्याच्या बालपणातच दिसून येतात. नेमक्या याच बाबतीत हे आत्मचरित्र कमालीचं यशस्वी ठरतं. एका मध्यमवर्गीय कुटुंबात वाढलेल्या, परंतु अभ्यास आणि शिस्त याऐवजी खेळण्यात आणि खोड्या काढण्यात दंग असलेल्या सचिनशी वाचक चट्कन एकरूप होऊन त्याच्या पुढे येणाऱ्या उत्तुंग कर्तृत्वाचा उत्सुकतेने मागोवा घेऊ लागतो.

– बिब्लिओ : नोव्हेंबर-डिसेंबर, २०१४

२०११चा विश्वचषक भारताने जिंकला, तेव्हाच सचिनने स्वप्नपूर्तीच्या सुवर्णमयी आनंदासह निवृत्ती पत्करावी, असं सर्वांना वाटत होतं. परंतु इतरांना वाटत असलेला पूर्णविराम सचिनच्या दृष्टीने स्वल्पविराम होता. आपलं क्रिकेट अद्यापही बाकी आहे, याची त्याला शाश्वती होती.

ग्रेग चॅपेल यांनी सचिनपुढे ठेवलेला 'कर्णधारपदाचा आणि भारतीय क्रिकेटवर आपण दोघं राज्य करू' हा प्रस्ताव हे या आत्मचरित्रातील सर्वांत संवेदनशील प्रकरण आहे. दोन्ही चॅपेल बंधू भारतीय क्रिकेटसाठी कशा प्रकारे खलनायक होते, हे यातून स्पष्ट होते.

– प्रशांत केणी, लोकप्रभा

शतकांचा शतकवीर तेंडुलकरच्या वाटचालीची प्रांजळ कहाणी.

– प्रभात, २८ जून, २०१५

सचिन तेंडुलकरच्या दोन दशकांच्या प्रदीर्घ दैदिप्यमान वाटचालीचा आढावा.

– कोल्हापूर टाईम्स संवाद, १३ सप्टेंबर, २०१५

मास्टरब्लास्टर सचिन तेंडुलकरच्या क्रीडा जीवनाच्या अंतरंगाचं प्रामाणिक आलेखन म्हणजे हे पुस्तक.

– देशदूत, ९ सप्टेंबर, २०१५

सचिन तेंडुलकर

प्लेइंग इट माय वे

माझं आत्मचरित्र

सहलेखक

बोरिआ मजुमदार

अनुवाद

दीपक कुळकर्णी

hachette INDIA

मेहता पब्लिशिंग हाऊस

Email :

info@mehtapublishinghouse.com

production@mehtapublishinghouse.com

sales@mehtapublishinghouse.com

Website : www.mehtapublishinghouse.com

PLAYING IT MY WAY : MY AUTOBIOGRAPHY by SACHIN TENDULKAR

Translated into Marathi Language by Deepak Kulkarni

Translated into Marathi Language by Leena Sohoni

प्लेइंग इट माय वे / अनुवादित आत्मचरित्र

अनुवाद : दीपक कुळकर्णी

१ निशिगंधा पार्क हौ. सो., प्लॉट नं ३२, आयडिअल कॉलनी, कोथरूड, पुणे – २९.

Email : deepak.kulkarni1409@gmail.com

प्रकाशक :

सुनील अनिल मेहता, मेहता पब्लिशिंग हाऊस,

१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे – ४११ ०३०.

✆ : +९१-२०-२४४७६९२४ / २४४६०३१३

Website : www.mehtapublishinghouse.com
हॅचेट बुक पब्लिशिंग इंडिया प्रा. लि.,
४ था व ५ वा मजला, कॉर्पोरेट सेंटर, प्लॉट नं. ९४,
सेक्टर ४४, गुरगांव – १२२ ००३. ✆ : +९१-१२४-४१९५०००
Website : www.hachetteindia.com

ई-बुक :
विनोद आमले, बुलडाणा.
✆ +९१ ९४२११५५७९३

मुखपृष्ठ :
एस. सुकुमार

मलपृष्ठ :
सुमन चट्टोपाध्याय / संगबाद प्रतिदिन

आतील छायाचित्रे :
हॅचेट इंडिया यांच्या सौजन्याने

P Book ISBN 9788184987164
E Book ISBN 9789386454553

E Books available on :
play.google.com/store/books
m.dailyhunt.in/Ebooks/marathi
www.amazon.in

माझ्या सर्व भारतवासीयांना

आभार

सर्वप्रथम मी कोणाचे आभार मानू आणि माझ्या संपूर्ण कारकिर्दीत कायम माझ्या पाठीशी उभे राहिलेल्या माझ्या लक्षावधी चाहत्यांचे मी आभार तरी कसे मानू? या प्रश्नाचं माझ्याकडे सोपं उत्तर आहे. मला खंबीरपणे पाठिंबा आणि प्रोत्साहन देणाऱ्या माझ्या असंख्य चाहत्यांनाच मी हे पुस्तक अर्पण करतोय.

चाहत्यांव्यतिरिक्त इतरांचे आभार मानताना सुरुवात अर्थातच मला सदैव साथ देणाऱ्या आणि सर्वार्थाने माझी जोडीदार असलेल्या अंजलीपासून करायला हवी. मी माझी कहाणी पुढच्या पिढ्यांसाठी शब्दबद्ध करायला हवी आणि मी ती करू शकेन, असा विश्वास तिला वाटला. तिच्याच आग्रहामुळे मी हे पुस्तक पूर्ण करू शकलो. माझा उद्देश कितपत सफल झाला हे अखेर माझ्या वाचकांनीच ठरवायचं आहे.

पुढील व्यक्तींचेही मला प्रामाणिकपणे आभार मानावेसे वाटतात :

अजित आणि मी एकत्र मोठे झालो. अजितने मला क्रिकेटपटू म्हणून घडवलं. माझी कहाणी लोकांपर्यंत पोहोचावी याची माझ्याइतकीच त्यालाही ओढ होती. या पुस्तकाचे कच्चे मसुदे वाचून त्याने वेळोवेळी सूचना केल्या. त्याचे आभार.

अपर्णा संथानम ही आमची केवळ मैत्रीणच नव्हे, तर त्याहूनही तिचं आमच्याशी खूप जवळचं नात आहे. या पुस्तकाच्या लिखाणामागे तिचीही प्रेरणा होती. पुस्तकाचं प्रत्येक प्रकरण अतिशय बारकाईने वाचून तिने उपयुक्त सूचना केल्या.

विनोद नायडू हा माझा व्यवस्थापक आणि अतिशय चांगला मित्र आहे. हे पुस्तक लिहिण्याची कल्पना त्यानेच प्रथम माझ्या गळी उतरवली. व्यावहारिक आणि व्यावसायिक बाबींमध्ये विनोदचा सल्ला मला खूपच मोलाचा ठरला आहे.

ठरलेल्या वेळेत हे पुस्तक लिहून पूर्ण करण्यासाठी मला सौम्य शब्दांत, पण सतत चिकाटीने आठवण करून देणाऱ्या अमित भांगरचेही मी मन:पूर्वक आभार मानतो.

माझा प्रकाशक, रॉडी ब्लूमफिल्डने या पुस्तकावर प्रचंड मेहनत घेतली आहे. पुस्तकलेखनाच्या काळात तो सुरुवातीपासून शेवटपर्यंत माझ्यासोबत राहिला. त्याने घेतलेल्या प्रत्येक निर्णयावर माझा पूर्ण भरवसा होता. त्याचे आभार. मदतीसाठी सदैव तत्पर असलेल्या ‘हॉडर’मधील साहाय्यक संपादिका फिओना रोझचेही आभार. विशेष संपादक टिम वॉलरने मूळ हस्तलिखितात योग्य त्या सुधारणा करत त्याला आकर्षक अंतिम स्वरूप दिलं. त्याचेही आभार.

शेवटचे आणि महत्त्वाचे आभार अर्थातच बोरिआ मजुमदारचे. बोरिआ माझा मित्र आणि या पुस्तकाचा सहलेखक आहे. माझ्या जीवनातील बारीकसारीक छटा पुस्तकात उमटाव्यात म्हणून त्याने माझ्याशी जाणकारीने आणि चिकाटीने अगणित वेळा चर्चा केली. माझे विचार नीट समजून घेतले. गेली तीन वर्षं तो अथकपणे या पुस्तकावर काम करतो आहे. त्याच्या उत्साहाची लागण मलाही होत असे. त्याच्या मार्मिक आणि हुशारीने विचारलेल्या प्रश्नांमुळे मीसुद्धा त्या चर्चेत सहज ओढला जाई. मग आमच्या त्या आवेशपूर्ण चर्चांना अनेकदा वैचारिक वादाचे रूप येत असे. या पुस्तकाच्या मूळ उद्देशावर बोरिआने आपलं लक्ष पूर्णपणे केंद्रित केलं होतं. त्यामुळेच तो माझ्या जीवनाची कथा अत्यंत समर्पकपणे माझ्याच शब्दांत मांडू शकला.

छायाचित्रांबद्दल विशेष आभार

सदर पुस्तकासाठी छायाचित्र उपलब्ध आणि पुनर्मुद्रित करू दिल्याबद्दल लेखक आणि प्रकाशक खालील व्यक्ती आणि संस्थाचे आभार मानत आहेत :

अरिफ अली/एएफपी/गेटी इमेजेस, टोनी ॲशबी/एएफपी/गेटी इमेजेस, बॅरी बॅचलर/प्रेस असोसिएशन, टेड ब्लॅकब्रो/डेली मेल/रेक्स फीचर्स, हमिश ब्लेअर/गेटी इमेजेस, फिलिप ब्राउन, सुमन चट्टोपाध्याय/आजकल आणि संगबाद प्रतिदिन, व्हिक्टर क्रॉशॉ/मिररपिक्स, आर्को दत्त/रॉयटर्स/ॲक्शन इमेजेस, पॅट्रिक ईगर/गेटी इमेजेस, जॉन जाइल्स/प्रेस असोसिएशन, डेव्हिड ग्रे/रॉयटर्स/ॲक्शन इमेजेस, रॉब ग्रिफिथ/एपी/प्रेस असोसिएशन, फिओना हॅन्सन/प्रेस असोसिएशन, ज्युलियन हर्बर्ट/गेटी इमेजेस, सज्जाद हुसेन/एएफपी/गेटी इमेजेस, मॅथ्यू इम्पे/पॅट्रिक ईगर फोटोग्राफी, कमल जुल्का, अतुल कसबेकर, कमल किशोर/रॉयटर्स/ॲक्शन इमेजेस, नरेंदरकुमार, सुनील मल्होत्रा/रॉयटर्स/ॲक्शन इमेजेस, रफिक मकबूल/एपी/प्रेस असोसिएशन, क्लाइव्ह मेसन/गेटी इमेजेस, ग्रॅहॅम मॉरीस/क्रिकेटपिक्स, इंद्रनील मुखर्जी/एएफपी/गेटी इमेजेस, डेव्हिड मंडन/पॉपरफोटो/गेटी इमेजेस, रेबेका नेडन/प्रेस असोसिएशन, प्रकाश पार्सेकर/एएफपी/गेटी इमेजेस, पॅल पिल्लई/एएफपी/गेटी इमेजेस, बेन रॅडफोर्ड/गेटी इमेजेस, टॉम शॉ/गेटी इमेजेस, मिलिंद शेलते/इंडिया टुडे ग्रुप/गेटी इमेजेस, प्रकाश सिंग/एएफपी/गेटी इमेजेस, प्रकाश सिंग/एपी/प्रेस असोसिएशन, स्काय टॉवर ऑफिशियल फोटोग्राफर, दिव्यकांत सोलंकी/ईपीए/कॉर्बिस, डॅरैन स्टेपल्स/रॉयटर्स/ॲक्शन इमेजेस, मायकेल स्टील/गेटी इमेजेस, मनन वात्सायन/एएफपी/गेटी इमेजेस, विलियम वेस्ट/एएफपी/गेटी इमेजेस

इतर छायाचित्रं खाजगी संग्रहातून घेतलेली आहेत.

अनुक्रमणिका

उपोद्घात

१६ नोव्हेंबर, २०१३ रोजी वानखेडे स्टेडियमवर माझ्या प्रदीर्घ क्रिकेटप्रवासाची सांगता झाली. माझ्या जीवनातील तो अतिशय हळवा आणि नाजूक प्रसंग होता. निरोपाचं भाषण करताना मी क्षणोक्षणी गहिवरून जात होतो. मनावर आलेला ताण हलका करण्यासाठी मी अंजलीशी बोलत असताना विराट कोहली तिथे आला आणि म्हणाला, ''पाजी आपने कहा था आपको याद दिलाने के लिए कि आपको पिच पें जाना है।'' खरं सांगायचं तर ती गोष्ट मी मुळीच विसरलो नव्हतो. तो क्षण मी शक्य तितक्या पुढे ढकलण्याचा प्रयत्न करत होतो. २२ यार्डांच्या त्या खेळपट्टीने गेली कित्येक वर्षं मला मायेने सांभाळलं होतं. मला आज क्रिकेटबरोबर तिलाही अखेरचा निरोप द्यावा लागणार होता.

माझ्या ओळखीच्या मैदानातून चालताना माझं मन निर्विकार झालं होतं. खेळपट्टीसमोर नतमस्तक होताना माझ्या गळ्यात हुंदका दाटून आला. फक्त १५ सेकंद मी तिथे उभा होतो. 'माझी काळजी घेतल्याबद्दल मी अतिशय कृतज्ञ आहे', एवढं बोलून मी तिचा निरोप घेतला. पॅव्हिलियनमध्ये अखेरचं परतताना माझ्या मनात असंख्य आठवणींची गर्दी उसळली होती. रमाकांत आचरेकरसरांच्या मार्गदर्शनाखाली नेटमध्ये केलेल्या पहिल्या सरावापासून माझ्या अखेरच्या कसोटी सामन्यात ७४ धावांवर बाद होत असतानाच्या शेवटच्या क्षणापर्यंतचा सारा प्रवास त्या थोड्या अवधीत माझ्या डोळ्यांसमोरून सरकत गेला.

कोणताही लेखक आत्मचरित्र लिहीत असताना त्याच्या जीवनातील सर्व बारीकसारीक तपशील सांगू शकेल, असं मला वाटत नाही. माझ्या मते ते अशक्य आहे. त्याच्या आयुष्यात घडलेले काही प्रसंग त्याला या ना त्या कारणाने वगळावेच लागतात. कारण ते त्याच्या आयुष्यातील अत्यंत खाजगी आणि अतिशय संवेदनशील प्रसंग असतात. तरीही मी माझी कहाणी वाचकांसमोर ठेवताना फार काही हातचं राखून ठेवलेलं नाही. या पुस्तकातील अनेक प्रसंग माझ्या चाहत्यांना आधीच ठाऊक असतील. मात्र आजपर्यंत ज्याबद्दल मी कधीही जाहीर बोललेलो नाही अशा काही घटना मी इथे सविस्तरपणे सांगितल्या आहेत. वाचकांना ज्याबद्दल उत्सुकता आहे, असं बरंच काही त्यांना या पुस्तकात वाचायला मिळेल.

आत्मचरित्र लिहिण्याचा निर्णय घेणं सोपं नव्हतं. मी आत्मचरित्र लिहिणं योग्य ठरेल की नाही, यावर मला बराच विचार करावा लागला. उगाचच काहीतरी खळबळ उडवून देण्याची किंवा निष्कारण एखाद्याला डिवचण्याची मला कधीच सवय नव्हती. तो माझा पिंडच नव्हे. मात्र जेव्हा मी पुस्तक लिहायचं ठरवलं, तेव्हा एक गोष्ट माझ्या मनात पक्की ठरलेली होती. ज्या प्रामाणिकपणे मी क्रिकेट खेळलो होतो, त्याच प्रामाणिकपणे मी पुस्तक लिहिणार होतो.

तर अशा रीतीने मी आता तुमच्यासमोर आलो आहे. माझी शेवटची इनिंग्ज संपवून मी कायमचा पॅव्हिलियनमध्ये परतलो आहे. मला माझा आवडता खेळ माझ्या पद्धतीने खेळता आला हेच मी माझं भाग्य समजतो. आता माझ्या क्रिकेट कारकिर्दीतील आठवतील तितक्या गोष्टी सांगत मी तुमच्यासमोर माझा जीवनपट उलगडणार आहे.

१
बालपण

''बाळा, जीवन हा जणू एक ग्रंथ आहे. त्यामध्ये जशी असंख्य प्रकरणं आहेत, तसंच त्यातून शिकण्यासारखंही खूप आहे. नाना वैविध्यपूर्ण अनुभवांनी खच्चून भरलेलं हे जीवन घड्याळाच्या लंबकाप्रमाणे सतत या टोकापासून त्या टोकापर्यंत हेलकावत असतं. यश व अपयश, सुख व दु:ख म्हणजे खऱ्या जीवनाच्या केवळ परिसीमा. यश आणि अपयश या दोन्हींमधून मिळणारे धडे सारखेच महत्त्वाचे असतात. अनेकदा तर अपयश व दु:ख हे यश आणि सुखापेक्षा महान शिक्षक ठरतात. तू एक क्रिकेटपटू व खेळाडू आहेस. देशाचं प्रतिनिधित्व करायचं भाग्य तुला लाभलं, हा तर तुला मिळालेला फार मोठा सन्मान आहे. परंतु हेसुद्धा जीवनरूपी ग्रंथातल्या इतर प्रकरणांसारखं केवळ एक प्रकरण आहे, हे कधीही विसरू नकोस. माणूस साधारणत: ७० ते ८० वर्षं जगतो. त्यातील किती वर्षं तू क्रिकेट खेळू शकशील? २० वर्षं... तू अतिशय उत्तम खेळाडू असलास, तर फार फार तर २५ वर्षं. म्हणजे तरीही जीवनातील बराच मोठा काळ हा तुला व्यावसायिक क्रिकेट क्षेत्राच्या बाहेर व्यतीत करावा लागणार आहे. याचा साधा अर्थ असा, की आयुष्य हे क्रिकेटपेक्षा खूप मोठं आहे. बाळ सचिन, दोनच गोष्टी अंगी बाणवण्याचा मी तुला सल्ला देईन. समाधानी वृत्ती व समतोल स्वभाव. यशाची हवा कधीही डोक्यात जाऊ देऊ नकोस. जर तू नम्र राहिलास तर खेळातून निवृत्त झाल्यावरही तुला लोकांकडून प्रेम व सन्मान मिळत राहील. 'सचिन हा महान क्रिकेटर आहे' यापेक्षा 'सचिन हा चांगला माणूस आहे' असं लोकांकडून ऐकायला एक वडील म्हणून मला केव्हाही आवडेल.''

वाढत्या वयात कानावर कायम पडत गेलेल्या, वडिलांच्या या शब्दांमध्येच माझ्या जीवनाचं तत्त्वज्ञान सामावलेलं आहे.

बांद्रा पूर्व या मुंबईच्या उपनगरातील 'साहित्य सहवास' या खास लेखकांसाठी बांधलेल्या कॉलनीत राहणाऱ्या एका प्रेमळ मराठी कुटुंबात माझा जन्म झाला. चार भावंडांमधला मी सर्वांत धाकटा. नितीन व अजित हे दोन भाऊ आणि बहीण सविता. मी केवळ सर्वांत लहानच नव्हतो, सर्वांत व्रात्य आणि खोडकरही होतो.

माझे वडील, रमेश तेंडुलकर हे मराठीतील ख्यातनाम कवी, समीक्षक व प्राध्यापक होते, तर माझी आई, रजनी, ही 'एलआयसी'मध्ये नोकरी करत असे. साधेपणा आणि नम्रता ही त्यांच्या स्वभावाची ठळक वैशिष्ट्यं. माझ्या जडणघडणीमध्ये त्यांच्या याच संस्कारांचा फार मोठा प्रभाव पडला. माझ्या अवखळ स्वभावामुळे व मी केलेल्या अजब कारनाम्यांमुळे मी त्यांना कित्येकदा अडचणीतही आणलं होतं; पण तरीही त्यांचा माझ्यावरचा विश्वास कधीही कमी झाला नाही. माझ्यासारख्या खोडकर मुलाला त्यांनी कसं सांभाळून घेतलं, याचं मात्र मला कायम आश्चर्य वाटत आलं आहे. काही वेळा माझ्या या कृत्यामुळे मी माझ्या वडिलांना अगदी जेरीसही आणलं होतं; पण तरीही ते माझ्यावर कधीच रागावले नाहीत. प्रत्येक वेळी अतिशय शांतपणे त्यांनी माझ्या चुका पोटात घातल्या. याचमुळे मी जसजसा मोठा होत गेलो, तसातसा माझ्या मनात त्यांच्याबद्दल असलेला आदर अधिकच वाढत गेला. इंग्लंडमधील १९९९च्या विश्वचषक स्पर्धेदरम्यान झालेला त्यांचा आकस्मिक मृत्यू माझ्या काळजावर खोल घाव घालून गेला. आज माणूस म्हणून माझी जी काही ओळख आहे ती फक्त माझ्या वडिलांमुळेच. त्याबद्दल मी त्यांचा सदैव ऋणी राहीन.

माझी आई ही माझ्यासाठी जगातील सर्वोत्तम सुगरण आहे. मला खूश ठेवण्यासाठी तिची काहीही करायची तयारी असे. घरात ती आमच्यासाठी अनेक खमंग व स्वादिष्ट पदार्थ बनवायची. तिच्या हातचं माशांचं कालवण, कोळंबीची आमटी, वांग्याचं भरीत तर अप्रतिमच असायचं; पण तिने केलेल्या साध्या

वरण-भाताची चवही मी कधीच विसरू शकणार नाही. माझ्या खवय्येपणाचं मूळ हे तिने मला खाऊ घातलेल्या एकाहून

एक सरस आणि रुचकर पदार्थांमध्ये दडलेलं आहे. मला अजूनही आठवतं, त्या स्वादिष्ट जेवणानंतर ती मला मांडीवर घेऊन खूप मायेने अंगाईगीतं म्हणायची. झोपताना तिच्या गोड गळ्यातून ऐकलेल्या त्या विलक्षण स्वरांमुळे माझ्या मनात संगीताबद्दल जे प्रेम निर्माण झालं ते आजतागायत टिकून आहे.

माझ्या आजपर्यंतच्या सर्व धडपडींना, नितीन व अजित यांचा मला नेहमीच भक्कम पाठिंबा मिळत आला आहे आणि क्रिकेटच्या बाबतीत तर मी अजितचं प्रचंड देणं लागतो. अजित हा माझ्यापेक्षा १० वर्षांनी मोठा. क्लबमध्ये उत्तम क्रिकेट खेळायचा; पण केवळ माझ्यातल्या सुप्त गुणांना साकार करण्यासाठी त्याने स्वत:च्या क्रिकेट कारकिर्दीवर स्वखुशीने पाणी सोडलं. माझ्या शेवटच्या कसोटी सामन्यानंतर झालेल्या निरोप-समारंभात मी म्हटल्याप्रमाणे, अजित व मी आम्ही दोघांनी मिळून एकच स्वप्न नुसतं रंगवलं नाही, तर ते प्रत्यक्षात एकत्रितपणे जगलो. तो कायमच माझा परखड टीकाकार व सक्रिय श्रोता राहिलेला आहे. मैदानावर काढलेल्या धावा भलेही मी फटकावल्या असतील, पण तिथेही, प्रत्येक क्षणी तो मनाने माझ्याच सोबत असे, आणि मी केलेली चूक मलाच सुधारायला लावत असे. इतकंच काय, माझ्या शेवटच्या टेस्ट इनिंग्जमध्येही मी का बाद झालो यावर आम्ही दोघांनी सविस्तर चर्चा केली होती. त्यानंतर मी पुन्हा कधीही भारतासाठी खेळणार नव्हतो हे माहीत असूनही! अजित हा माझा फक्त सख्खा भाऊच नव्हे; तर सख्खा मित्रही आहे. माझ्या प्रत्येक गरजेच्या क्षणी तो माझ्या खांद्याला खांदा भिडवून उभा राहिला आहे आणि स्वत:च्या वैयक्तिक कामापेक्षा त्याने माझ्या क्रिकेटलाच कायम प्राधान्य दिलं आहे.

माझा सर्वांत मोठा भाऊ, नितीन, म्हणजे आम्हा भावंडांमधलं सर्जनशील, तर तेंडुलकर कुटुंबामधलं अत्यंत शिस्तप्रिय व्यक्तिमत्त्व. माझ्या त्या भयंकर ऊत येण्याच्या आणि उंडारण्याच्या काळात जेव्हा माझ्या आईने माझ्या भवितव्याच्या आशा सोडून दिल्या होत्या, तेव्हा नितीनने माझ्या बेलगाम वागण्याला शांतपणे आवर घातला होता. तो चित्र तर उत्तम काढतोच, पण त्याचबरोबर तो सिद्धहस्त लेखक व कवीही आहे. अलीकडेच एका चित्रपटासाठी त्याने गीतंही लिहिली आहेत. नितीनने सुरुवातीला शिक्षकाचा पेशा निवडला होता. तो रसायनशास्त्र शिकवत असे; पण नंतर तो 'एअर इंडिया'त काम करू लागला. एक प्रसंग मला आठवतो आहे. तेव्हा मी १० वर्षांचा होतो. फ्लाइटला अचानक विलंब झाल्यामुळे नितीनला मुंबईच्या 'सेंटॉर हॉटेल'मध्ये (आजचं सहारा स्टार) मुक्काम करायला लागला होता. ती संधी साधून अजित व मी त्याच्या हॉटेलमधल्या रूमवर जेवायला गेलो होतो आणि त्या दिवशी मी माझ्या आयुष्यात तंदुरी चिकनची चव प्रथमच चाखली. त्या क्षणापासून तंदुरी चिकन हा पदार्थ माझ्या आवडत्या पदार्थांपैकी एक बनला.

माझ्या आयुष्यातील पहिली क्रिकेटची बॅट मला सविताने, माझ्या बहिणीने दिली आहे. त्या वेळी मी पाच वर्षांचा होतो. सुट्टीमध्ये सविता काश्मीर पाहायला गेली होती आणि येताना ती माझ्यासाठी 'काश्मिरी विलो' (वाळुंजाच्या लाकडाची) बॅट घेऊन आली. आम्हा भावंडांत तिचा स्वभाव सर्वांत शांत, संयमी व काहीसा भिडस्त आहे. अत्यंत बिकट प्रसंगातही तिचा तोल जराही ढळत नाही. आमच्या त्या वाढत्या वयात जेव्हा जेव्हा एखादं गंभीर प्रकरण उद्भवत असे, तेव्हा सल्ल्यासाठी आम्ही तिच्याकडेच धाव घेत असू. तिचं लग्न झालं तेव्हा मी लहान होतो. लग्नानंतरच्या रीतीरिवाजाची मला काहीच कल्पना नव्हती. सविताने सासरी जाण्याऐवजी माझ्या मेव्हण्यांनीच आमच्या घरी राहायला यावं म्हणून मी खूप हट्ट केला होता. सविताला मी माझ्यापासून दूर जाऊ द्यायला मुळीच तयार नव्हतो. ती सासरी गेल्यावर तिची उणीव मला प्रकर्षाने भासत राहिली.

कायम अशांत!

माझं बालपण अतिशय भन्नाट होतं, यात तिळमात्रही शंका नाही. त्या वेळचा एकही दिवस मला कधी रटाळ किंवा कंटाळवाणा वाटला नाही. आज जेव्हा मी क्रिकेट कारकिर्दीतल्या माझ्या स्टॅमिनाचा आणि माझ्यात असलेल्या आंतरिक शक्तीचा शोध घेऊ लागतो, तेव्हा त्याचं मूळ मला लहानपणीच्या त्या मस्तीभरल्या दिवसांत सापडतं.

१९७१मध्ये आम्ही साहित्य सहवासमध्ये राहायला आलो. त्या वेळी तिथे बऱ्याच इमारतींचं बांधकाम सुरू होतं.

त्यामुळे मला व माझ्या मित्रांना आमच्या शेजाऱ्यापाजाऱ्यांच्या खोड्या काढायची आयतीच संधी मिळाली होती. आम्ही जरी कधीच कोणाला शारीरिक इजा केली नसली, तरी आज मला हे सांगताना थोडीशी लाज वाटते की, लोकांना मामा बनवून आम्ही मजा बघत मस्त हसत राहायचो. अर्थात, त्या वेळी आमच्यासाठी ती केवळ मजा-मस्करीच असायची; पण आज मागे वळून पाहताना जाणवतं, की त्यातल्या काही चुका फारच लाजिरवाण्या होत्या.

लोकांना गंडवण्याच्या आमच्या काही खास क्लृप्त्या असायच्या. आमच्या कॉलनीत सतत बांधकाम चालू असल्यामुळे ठिकठिकाणी वाळूचे ढिगारे पडलेले असायचे. आम्ही त्या वाळूमध्ये खोल खड्डा खणायचो आणि तो खड्डा दिसू नये म्हणून त्यावर वर्तमानपत्र झाकून ठेवायचो. एवढं करून झाल्यावर आम्ही तिथून जाणाऱ्या-येणाऱ्या लोकांना मुद्दाम त्या खड्ड्यावरून जायला भाग पाडायचो आणि एकदा का ते त्या खड्ड्यात पडले, की आम्ही खो-खो हसत सुटायचो. दुसरी धमाल म्हणजे, चौथ्या मजल्यावरच्या आमच्या गॅलरीत लपून, खाली चालणाऱ्या लोकांच्या अंगावर पाणी ओतायचं आणि त्यांची झालेली फजिती पाहत बसायचं. वेळ घालवायचा आणखी एक आवडता उद्योग म्हणजे, मालकाची परवानगी न घेता त्याच्या झाडावरचे आंबे चोरून त्यावर सगळ्यांनी मिळून ताव मारायचा. एखाद्या गोष्टीवर बंदी घातलेली असली, की ती मुद्दाम करायची आम्हाला फारच सुरसुरी यायची आणि मग त्यावरून कितीही तक्रारी आल्या तरी आमचे उद्योग कधीच थांबायचे नाहीत. शेवटची एकच मजा सांगतो; आता हे सांगताना खूपच शरम वाटतेय... आम्ही दरवाजांना बाहेरून कड्या लावून लोकांना घरात कोंडून ठेवायचो. त्यामुळे त्या बिचाऱ्यांच्या वेळेचं किती नुकसान झालं असेल आणि ते किती चिडले असतील कोणास ठाऊक, पण आम्हाला त्याची कुठे पर्वा असायची! आम्ही आमच्याच मस्तीत दंग असायचो.

'इंडियन एज्युकेशन सोसायटी'च्या 'न्यू इंग्लिश स्कूल, बांद्रा' या शाळेत माझं नाव घातलं गेलं. अभ्यासात मी एक बऱ्यापैकी विद्यार्थी गणला जायचो. मी वर्गातल्या पहिल्या पाचात कधी नसलो तरी शेवटच्या दहातही कधी नसायचो. मला शाळा कधी कंटाळवाणी वाटली नाही; पण तरीही उन्हाळ्याच्या दोन महिन्यांच्या लांबलचक सुट्टीची मजा काही औरच असायची. सुट्टी पडली की, सकाळी नऊ वाजता मी जो घराबाहेर पडायचो, तो उरलेला दिवसभर उन्हामध्ये फक्त खेळत राहायचो. आमच्या घरातल्या कामवाल्या लक्ष्मीबाईंना (आई-वडील नोकरी करत असल्यामुळे घरोघरी एक तरी 'लक्ष्मीबाई' असायचीच.) माझा दुधाचा ग्लास घेऊन खाली यायला लागायचं. कधीकधी तर त्या माझं जेवणही घेऊन मैदानात यायच्या. कारण मी पुन्हा वर घरी जायला तयारच नसायचो.

कडक उन्हामुळे थकून जायचा कधी प्रश्नच उद्भवत नव्हता. संध्याकाळी उशिरापर्यंत मी खेळत राहायचो. खरंतर, माझे सगळे मित्र आपापल्या घरी परत गेल्यावरही मी एकटाच स्वत:च्या जिवाची करमणूक करत असायचो. कॉलनीमध्ये सात-आठ इमारती होत्या. मी त्या इमारतींभोवती पार दमेपर्यंत गरागरा धावत राहायचो. त्या सर्व इमारतींभोवती मी एका दमात सात-आठ फेऱ्या तरी मारायचोच आणि तेही अनवाणी पायांनी. 'घरी परत ये' म्हणून जेव्हा नितीनची धमकीवजा हाक कानी पडायची, तेव्हाच अस्मादिकांची पावलं नाइलाजाने घराकडे वळायची. मी फक्त नितीनलाच थोडासा घाबरायचो. तो तसा फारसा बोलत नसे, पण एकदा का त्याच्या तोंडून एखादा शब्द बाहेर पडला, की मात्र तो अंतिम शब्द ठरे. मला हाका मारून दमल्यावर, मला घरी बोलवायचं काम आई नितीनवर सोपवत असे.

आमच्या दोन बेडरूमच्या फ्लॅटमधल्या एका बेडरूममध्ये आम्ही सर्व मुलं एकत्र झोपत असू. झोपण्याच्या बाबतीत सर्वांत शेवटचा नंबर माझा असे. बाकीच्यांचा डोळा लागेपर्यंत मी या कुशीवरून त्या कुशीवर वळत, सारखा चुळबुळ करत राही. त्यानंतर सर्व जण जर दक्षिण-उत्तर झोपलेले असले तर मी मुद्दाम पूर्व-पश्चिमेला स्वत:ला पसरून देत असे. मग सकाळी उठल्यावर मी सर्वांच्या वाटेत आडवा झोपलेलो असल्याने त्यांची भरपूर बोलणीही खात असे. त्यांची ही बोलणी कधीच माझ्या जिव्हारी लागत नसत; उलट, अशा चिडण्या-रागावण्यातूनच आम्ही एकमेकांच्या अधिक जवळ येत गेलो.

चायनीज पदार्थांची पहिली चव

लहानपणी मला खाण्याची खूपच आवड होती. माझ्या आईच्या हातच्या स्वादिष्ट महाराष्ट्रीय पद्धतीच्या जेवणाचा

आस्वाद घेत मी मोठा होत होतो. त्यामुळे वयाच्या नवव्या वर्षापर्यंत मी चायनीज पदार्थांची लज्जत कधीच चाखली नव्हती. १९८०च्या दशकाच्या सुरुवातीला मुंबईत चायनीज पदार्थ भलतेच लोकप्रिय होऊ लागले होते. चायनीज जेवणाची इतकी प्रशंसा कानी पडल्यामुळे आम्ही कॉलनीतल्या सर्व मित्रांनी एका चायनीज हॉटेलमध्ये जायचं ठरवलं. प्रत्येक जण घरून १० रुपये घेऊन आला होता. त्या काळी माझ्यासाठी १० रुपये म्हणजे खूप मोठी रक्कम होती; नवीन, काहीतरी चमचमीत खायला मिळणार या कल्पनेने मी भलताच हुरळून गेलो होतो. पण ती संध्याकाळ माझ्या जीवनातील एक भीषण संध्याकाळ ठरली. आमच्या ग्रुपमध्ये सर्वांत छोटा असल्याची किंमत त्या संध्याकाळी मला चुकवायला लागली.

हॉटेलात गेल्यावर स्टार्टर म्हणून आम्ही चिकन व स्वीटकॉर्न सूप मागवलं. एका लांबलचक टेबलावर आम्ही सर्व जण बसलो होतो. मी टेबलाच्या शेवटच्या टोकाला बसलो होतो. माझ्यापाशी पोचेपर्यंत पातेल्यात अगदी थोडंसंच सूप उरलं होतं. आमच्या कंपूतल्या मोठ्या मुलांनी यथेच्छ सूप ओरपल्यामुळे आम्हा लहानांच्या वाट्याला फारच कमी सूप आलं होतं. फ्राइड राइस आणि चाउमिनच्या बाबतीतही तीच गोष्ट घडली. मला फक्त दोन चमचे चाउमिन आणि दोन चमचे फ्राइड राइस मिळाला. आम्हाला गंडवून मोठ्या मुलांनी मात्र पोटभर खाल्लं होतं. त्या संध्याकाळी भुकेने आणि तहानेने त्रस्त होऊन मी निराश मनाने घरी परतलो होतो.

सायकलचं स्वप्न

लहानपणी मी खूप हट्टीही होतो. माझ्या बहुतेक मित्रांपाशी सायकल होती; पण माझ्याकडे मात्र नव्हती. म्हणून मी काहीही करून सायकल मिळवण्याचा चंगच बांधला होता. मी मागितलेल्या कोणत्याही गोष्टीला वडील कधीच नकार देत नसत. या वेळीही ‘काही आठवड्यांतच तुला नवीकोरी सायकल घेऊन देतो’ असं म्हणत त्यांनी माझी तात्पुरती समजूत काढण्याचा प्रयत्न केला होता. आर्थिकदृष्ट्या पाहिलं तर त्या काळी मुंबईत चार मुलांना वाढवणं ही तशी सोपी गोष्ट नव्हती; मात्र आमच्या आई-वडिलांनी त्या गोष्टीची झळ आम्हा मुलांना कधीच लागू दिली नाही. संसार करताना, त्यांना किती अडचणींतून जावं लागत असेल याची काहीच कल्पना नसल्यामुळे, ‘मला सायकल हवी’ या माझ्या मागणीवर मी ठाम अडून राहिलो होतो. घरी नवीन सायकल येईपर्यंत मी खेळायलाच काय, पण घराबाहेर पडायलाही स्पष्ट नकार दिला. आज कदाचित माझं वागणं थोडं अतिरेकी वाटेल, पण मी एक अख्खा आठवडा खेळायला घराबाहेर पडलो नव्हतो. मी फुरंगटून दिवसभर एकटाच गॅलरीत उभा राही. हेतू हा की, मला सायकल देता न आल्यामुळे आई-वडिलांच्या मनात अपराधाची भावना निर्माण होऊन अखेर ते मला सायकल विकत आणून द्यायला राजी होतील.

त्या दिवशी मात्र मी आई-वडिलांची भीतीने चांगलीच गाळण उडवून दिली. आमचा फ्लॅट चौथ्या मजल्यावर होता आणि फ्लॅटला ग्रिल लावलेली एक छोटी बाल्कनी होती. लहान असल्यामुळे मला बाल्कनीतून खाली चाललेलं काही पाहता येत नसे; पण पाहायची उत्सुकता फार असल्यामुळे मी ग्रिलमध्ये डोकं घालून खाली पाहायचा प्रयत्न करत असे. या खेपेस मात्र माझ्याकडून कहरच झाला. ग्रिलमधून डोकं सरकवण्यात जरी मी यशस्वी झालो होतो, तरी मला माझं डोकं त्या ग्रिलमधून पुन्हा सोडवता येईना. त्यामुळे ग्रिलमध्ये डोकं अडकलेल्या स्थितीत मला तब्बल अर्धा तास काढावा लागला होता. माझी ती अवस्था पाहून

आई-वडील चांगलेच गांगरून गेले. माझ्या डोक्यावर भरपूर तेल ओतल्यानंतर ग्रिलमध्ये अडकलेलं माझं डोकं सोडवण्यात, एकदाचं माझ्या आईला यश आलं.

माझी ही हाराकिरी पाहून आणि यानंतर आपले चिरंजीव आणखी कोणता प्रताप करून दाखवतील याचा धसका घेऊन, माझ्या वडिलांनी कसेबसे पैसे जमा केले आणि माझ्यासाठी एक नवीकोरी सायकल विकत आणली. पैसे जमा करण्यासाठी त्यांना त्या वेळी काय कसरत करावी लागली असेल, याचा मला आजतागायत पत्ता लागलेला नाही. अर्थात त्या वेळी ते जाणून घेण्यात मला रसही नव्हताच म्हणा; मला फक्त सायकल हवी होती. सायकल हातात पडताच मी दुसऱ्याच क्षणी सायकलवर टांग मारून ती मित्रांना दाखवायला पसारही झालो होतो; पण माझा तो आनंद अगदी क्षणभंगुर ठरला होता.

सायकल मिळाल्यानंतर काही तासांतच मला एक जबरदस्त अपघात झाला. मी सायकल चालवत असताना आपली गाडी ढकलत एक फळभाजी विक्रेता कॉलनीत आला होता. एका क्षणी त्याची गाडी आणि माझी सायकल अगदी आमने-सामने आली. मी भन्नाट वेगात सायकल चालवत होतो आणि ऐनवेळेस सायकलचा वेग कमी करणं मला जमलं नाही. नव्यानेच सायकल चालवत असल्यामुळे मी नेमका चुकीचा ब्रेक दाबला आणि त्यानंतर एकच धूमधडाम आवाज झाला! भाजीवाल्याच्या गाडीला मी समोरून धडकल्यामुळे सायकलवरचं माझं नियंत्रण सुटून मी हवेत तीन ताड उडालो. त्या वेळेसही माझी नजर जेव्हा खाली गेली, तेव्हा माझ्या नव्याकोऱ्या सायकलचं आता काय होणार हा एकच विचार माझ्या मनात आला. खाली कोसळताना सायकलचा एक तुटलेला स्पोक माझ्या उजव्या डोळ्याच्या वरच्या भागात घुसला. झालेली जखम चांगलीच खोल होती आणि जखमेमधून भळाभळा रक्त वाहत होतं; पण त्यापेक्षा जास्त महत्त्वाचं म्हणजे माझ्या सायकलची पार दारुण अवस्था झाली होती.

सायकलचा अपघात होऊन मला भरपूर मार लागला आहे, ही बातमी लगेचच घरी पोचली. ते ऐकून माझ्या आई-वडिलांच्या काळजाचं पाणी झालं. मी मात्र, जखम किरकोळ आहे असं सांगत त्यांच्यापुढे शूरवीर बनण्याचा प्रयत्न करत होतो. पण जखम किरकोळ नव्हती. माझे वडील मला घेऊन त्यांच्या प्लॅस्टिक सर्जन मित्राकडे आले. डॉक्टरांनी माझ्या उजव्या डोळ्यावर आठ टाके घातले आणि मला दोन-तीन इंजेक्शनंही टोचली. अखेर मी स्वत:च्याच नशिबाची कीव करत अत्यंत हताश मनाने घरी परतलो. दरवाजाबाहेर बिचारी माझी सायकल छिन्नविच्छिन्न अवस्थेत उभी होती. जखम पूर्ण भरेपर्यंत सायकलच्या आसपासही फिरकायचं नाही, अशी वडिलांनी मला तंबी दिली. मधल्या काळात सायकल पूर्ववत दुरुस्त करण्याचं आश्वासन मात्र त्यांनी मला दिलं. या खेपेस मी त्यांचं म्हणणं मुकाट्याने ऐकलं. कारण सायकल परत मिळवण्याचा तोच एक मार्ग माझ्यापाशी होता.

पूर्ण बरा झाल्यावर मात्र मी ताबडतोब सायकल चालवायला सुरुवात केली. काही महिन्यांतच मी एक उत्तम व कुशल सायकलस्वार बनलो. माझ्या इतर मित्रांपेक्षा मी स्लो सायकलिंगमध्ये वाकबगार झालो आणि कॉलनीत आयोजित केलेली स्लो सायकलिंगची स्पर्धाही जिंकलो. मी अतिशय उत्कटपणे अगदी मनापासून, वेड लागल्यासारखा सायकल चालवत राहायचो. काही महिन्यांतच एक चाक हवेत उचलून मला सायकल चालवताना पाहून माझे मित्र आश्चर्याने थक्क झाले. कॉलनीतल्या काँक्रीटवर जिथे वाळू पसरलेली असेल, तिथे माझं शरीर ४५ अंशात वाकवून, मी सायकलचं एक चाक १० ते १५ फूट हवेत उचलून दाखवत असे. अर्थात अशा कसरती करत असताना त्याचा सायकलच्या टायरवर काय परिणाम होईल याची मला जराही फिकीर नसे. जास्तीत जास्त दूरवर सायकल दौडवण्यातच मला धन्यता वाटे. सायकल चालवण्यातलं माझं कसब सर्वांना दाखवण्यातच मला जबरदस्त 'थ्रिल' वाटत असे; शिवाय या सगळ्या करामती चटकन शिकलो असल्याने मी स्वत:वरच खूश असे.

तरीसुद्धा अनेकदा माझ्या हातून चुकीच्या गोष्टी घडत आणि मी वारंवार स्वत:ला अडचणीच्या स्थितीत आणून ठेवत असे. जखमा आणि वेदना तर माझ्या पाचवीला पुजलेल्या होत्या. मला वाटतं, लहानपणी मी केलेल्या त्या धाडसी कृत्यांनीच, पुढे मोठेपणी क्रिकेट खेळताना झालेल्या जखमा आणि वेदना सहन करायची ताकद मला मिळवून दिली होती. बऱ्याचदा मला कुठेतरी खरचटायचं किंवा लहानशी खोक पडायची; पण घरातल्या कुणालाही मी त्या जखमांचा कधीचा सुगावा लागून दिला नाही. मात्र त्याचा परिणाम असा झाला की, मी रोज रात्री झोपल्यावर मला दिवसभरात खेळताना कुठे लागलंय का, हे तपासून पाहायची माझ्या वडिलांना सवयच लागली. झोपेत मी विव्हळू लागलो, तर मी कुठेतरी धडपडलो आहे, हे लगेच त्यांच्या ध्यानात यायचं आणि दुसऱ्याच दिवशी ते मला डॉक्टरकडे घेऊन जायचे.

मी कितीही चुका केल्या तरी माझे वडील मात्र कधीच माझ्यावर चिडले किंवा ओरडले नाहीत. उलट मी एखादी गोष्ट का करावी किंवा का करू नये, याचं कारण ते मला नीट पटवून देत. त्यांच्या त्या विश्लेषणाचा माझ्या मनावर खूप काळपर्यंत परिणाम होई. एखाद्या गोष्टीची नीट कारणमीमांसा करण्याची विवेकबुद्धी हा माझ्या वडिलांमधला सर्वांत मोठा गुण होता आणि आज मी माझ्या मुलांशीही त्याच पद्धतीने वागण्याचा प्रयत्न करतो.

पुन्हा एकदा 'युद्धाचा प्रसंग'

लहानपणी मी अनेक साहसं केली, पण ज्या मैदानाने मुंबईचे अनेक महान क्रिकेटपटू घडवले अशा शिवाजी पार्क मैदानावर खेळताना माझ्या डोळ्याखाली झालेली जखम मी कधीच विसरू शकणार नाही. रक्तबंबाळ अवस्थेत मला घरी परतावं लागलं होतं. त्या वेळी मी १२ वर्षांचा होतो आणि शिवाजी पार्कवरच्या त्या सामन्यामध्ये आमच्या टीमचा कॅप्टन होतो. आमचा यष्टिरक्षक अचानक जखमी झाल्यावर, त्याच्या जागी कोण उभं राहायला तयार आहे असं मी माझ्या सहकाऱ्यांना विचारलं; पण कोणीच तयार होत नाही असं दिसल्यावर काहीशा नाराजीनेच मी ते आव्हान स्वीकारलं. त्यापूर्वी मी कधीच यष्टीमागे उभा राहिलो नव्हतो. त्या अपरिचित जागी प्रथमच उभा राहिल्याने मी काहीसा अस्वस्थ होतो. त्याचा परिणाम लगेचच दिसून आला. पुढच्याच चेंडूवर बॅटची कड लागून आलेला झेल मला पकडता आला नाही. चेंडू अतिशय वेगाने माझ्याजवळ आला आणि मी काही हालचाल करण्याआधीच तो माझ्या चेहऱ्यावर दाणकन आदळला. माझा डोळा थोडक्यात बचावला; पण झालेली जखम खूप खोल होती. बरंच रक्तही वाहू लागलं होतं.

टॅक्सीने घरी जाण्याएवढे पैसे माझ्या खिशात नव्हते आणि रक्ताने माखलेल्या चेहऱ्याने बसमध्ये चढायची मला लाज वाटत होती. मी माझ्या एका मित्राला पटवलं. तो त्याच्या सायकलवर बसवून मला घरी घेऊन जायला तयार झाला. क्रिकेटची अवजड किटबॅग घेऊन सायकलवरून जाणं किती अवघड आहे, हे मुंबईत राहिलेल्या कुणाच्याही सहज लक्षात येईल. पूर्व व पश्चिम बांद्र्याला जोडणाऱ्या फ्लायओव्हरवर वाहनांची आधीच गर्दी होती. त्या चढावावर माझ्यासकट एवढं वजन पेलवत सायकल चालवणं, माझ्या मित्राला अशक्य झालं. मी खाली उतरून हळूहळू चालायला सुरुवात केली. आजूबाजूची माणसं माझ्याकडे चकित होऊन टकामका पाहू लागली. रक्तबंबाळ चेहरा आणि रक्ताने माखलेला शर्ट अशा अवस्थेत एक मुलगा त्याचं क्रिकेटचं किट कसंबसं सांभाळत फ्लायओव्हर चढतो आहे, हे काही नेहमीचं दृश्य नव्हतं.

त्यानंतरही क्रिकेट खेळत असताना मला अनेकदा शारीरिक इजा झाल्या हे काही वेगळं सांगायला नकोच. अर्धवट तयार केलेल्या आणि अतिवापर झालेल्या खेळपट्ट्यांवर आम्ही सतत क्रिकेट खेळत असल्यामुळे इजा होण्याचं प्रमाण खूप असे. शिवाय, बाहेर जाणारा चेंडू, मान एका बाजूला झुकवत सोडून देण्याचा सराव करण्यासाठी बॅटिंग करताना हेल्मेट घालू नये, असा आमच्या प्रशिक्षकांचा आग्रह असे. त्यामुळे जरी अशा खेळपट्ट्यांवर इजा होण्याची शक्यता अधिक असली, तरी भविष्यात कराव्या लागणाऱ्या खडतर कष्टांसाठी आम्ही आधीच तावून-सुलाखून तयार झालेलो होतो. त्याचा परिणाम असा झाला की, जखमी होण्याची भीती मला पुढे कधीच वाटली नाही. व्यावसायिक खेळाडूच्या तयारीचा तो एक भागच होता. माझी सहनशक्ती चांगली असली तरी त्याचा अर्थ असा नव्हे; की त्याबाबतीत मी योग्य ती काळजी घेत नव्हतो किंवा उगाचच बेफिकिरीने इजा ओढवून घेत होतो. पण चौदाव्या वर्षी मी वानखेडे स्टेडियमवर एक मॅच खेळत असताना नेमका हाच प्रश्न विचारून एकाने मला चकित केलं होतं.

मुंबईचा रणजी संघ निवडण्यासाठी तो सामना खेळवलेला होता. सकाळी लवकरच मॅचला सुरुवात झाली होती. प्लॅन असा होता की, दोन जलद गोलंदाजांनी नवीन चेंडू घेऊन पाच किंवा सहा षटकं टाकायची. त्यानंतर त्या जोडीला विश्रांती देऊन दुसऱ्या दोन जलद गोलंदाजांनी पुन्हा एक नवीन चेंडू घेऊन गोलंदाजी करायची. फलंदाजांना स्विंग होणारा वेगवान चेंडू खेळायचा सराव व्हावा हा त्यामागचा हेतू होता. खेळपट्टीवर भरपूर गवत ठेवल्यामुळे फलंदाजांसाठी परिस्थिती अधिकच बिकट बनली होती. मी सलामीलाच खेळायला उतरलो. त्या वेळी माझ्यापाशी हेल्मेट नसल्यामुळे माझ्याजवळ असणारी 'अंडर-१५' कॅप घातली होती. समोर राजू कुलकर्णी हा त्या वेळेस नावाजलेला कसोटीपटू गोलंदाजी करत होता. मी केवळ कॅप घालून बॅटिंग गार्ड घेतो आहे, हे पाहून तो चांगलाच खवळला. बाकीचे सर्व ज्येष्ठ खेळाडू हेल्मेट घालून खेळताहेत आणि हा १४ वर्षांचा चिमुरडा केवळ कॅप घालून माझ्यासमोर खेळायचं धाडस करतो म्हणजे काय? मला सुरुवातीला कळेना तो एवढा का चिडला आहे ते! त्याने माझ्यावर बाउन्सर्सची सरबत्ती केली. त्यानंतर माझ्या लक्षात आलं की, मला इजा करण्यापेक्षा मला चांगला धडा शिकवावा हा त्याचा उद्देश आहे. मी त्याचे सर्व चेंडू शांतपणे मान झुकवत सोडून दिले. तो का

चिडला आहे, हे मला समजलं होतं. पण, 'आचरेकर सर आम्हाला स्कूल क्रिकेट खेळताना हेल्मेट घालायची परवानगी देत नाहीत आणि मी उगाचंच खोटं धाडस दाखवण्याचा प्रयत्न करत नाहीये' हे त्याला कसं समजावून सांगावं, हे मात्र मला कळत नव्हतं. त्यानंतर मुंबई संघात माझी निवड होऊन जेव्हा राजूशी माझी चांगली ओळख झाली तेव्हा हेल्मेट न घालण्यामागचं कारण मी त्याला पटवून देऊ शकलो.

संगीत : माझं दुसरं प्रेम

तेंडुलकर कुटुंबात संगीताचं अस्तित्व कायम असायचं. माझी सर्व भावंडं नियमितपणे रेडिओ ऐकत. त्या काळी सुप्रसिद्ध रेडिओ निवेदक अमीन सयानी दर आठवड्याला 'बिनाका गीतमाला' हा हिंदी चित्रपट गीतांचा कार्यक्रम सादर करत. आमच्या घरातले सर्व जण तो आवर्जून ऐकत. मी लहान असल्यामुळे मला त्या संगीतातलं फारसं काही कळत नसलं, तरी माझा संगीताशी संबंध त्या वेळेपासूनच आला. माझ्या वडिलांनी घरात कॅसेट प्लेअर आणल्यावर संगीताची आवड अधिकच वाढली. कॅसेट प्लेअरमुळे प्रत्येकाला आपापल्या आवडीचं संगीत ऐकायची संधी मिळाली होती. माझे दोन्ही भाऊ प्रसिद्ध गायक पंकज उधास यांचे मोठे चाहते होते. मला त्यातलं काही समजत नसे. पण ज्या ज्या वेळी माझे भाऊ त्या गझला ऐकत व त्यानंतर गझलसम्राटांच्या गायनातल्या वेगवेगळ्या छटा आणि बारकावे यांवर सविस्तर चर्चा करत, तेव्हा मीही तिथे हजर असायचो. मला आठवतं, एकदा नितीन दुबईला गेला होता. येताना पंकज उधास यांचा नुकताच प्रसिद्ध झालेला अल्बम बरोबर घेऊन येतो आहे, असं त्याने आम्हाला कळवलं. त्याला घरी पोचायला मध्यरात्र झाली, पण आम्ही सर्व जण त्याची वाट पाहत जागे होतो. तो आल्या आल्या आधी आम्ही ती कॅसेट लावली आणि रात्री एक वाजता आजीने केलेल्या चहाचे घुटके घेत ती पूर्ण ऐकली.

घरातील अशा वातावरणामुळे क्रिकेटनंतर संगीत हे माझं दुसरं प्रेम असणार हे स्वाभाविकच होतं आणि आजपर्यंत ते प्रेम तसूभरही कमी झालेलं नाही. मला चित्रपट संगीतापासून शास्त्रीय संगीतापर्यंतचे सर्व भारतीय संगीत प्रकार ऐकायला अतिशय आवडतात. हेडफोन लावले की माझं मन अगदी शांत होऊन जातं. पुढे परदेश दौऱ्यावर जाऊ लागल्यापासून मला पाश्चिमात्य संगीताचीही गोडी लागली. 'पिंक फ्लॉइड', 'यु२', 'डायर स्ट्रेट्स' हे माझे आवडते बँड्स आहेत. अजितलाही माझ्यामुळे पाश्चिमात्य संगीताची आवड लागली. आता पाश्चिमात्य संगीत हा तेंडुलकर कुटुंबाचा अविभाज्य घटक बनला आहे.

क्रिकेटकडे वळताना

क्रिकेट आणि संगीत सोडून मी लहानपणापासून टेनिस या खेळाचाही प्रचंड चाहता होतो. अमेरिकेचा महान खेळाडू जॉन मॅकन्रो हा माझा सर्वांत लाडका टेनिसपटू होता. १० वर्षांचा असताना मी मॅकेन्रोच्या दिसण्याची आणि त्याच्या विदुषकी चाळयांची हुबेहूब नक्कल करायचो. मॅकेन्रोसारखे कुरळे केस वाढवून व डोक्याला हेडबँड लावून त्याच्याच स्टाइलने चालण्यापर्यंत माझी मजल गेली होती. बिआँ बोर्ग आणि मॅकेन्रोमधल्या झंझावती मॅचेस मी अगदी भारावून पाहत असे. काही काळ तर क्रिकेटऐवजी टेनिस खेळण्याचा मी गंभीरपणे विचार केला होता.

टेनिसने मी पछाडलो गेलो आहे हे अजितला ठाऊक होतं; पण माझ्या कॉलनीतल्या मित्रांबरोबर मला क्रिकेट खेळताना त्याने पाहिलं होतं. माझी बॅट फिरवण्याची नैसर्गिक पद्धत पाहून, मला जर क्रिकेटचं व्यवस्थित प्रशिक्षण मिळालं तर मी एक चांगला फलंदाज होऊ शकेन, हे त्याने जोखलं होतं. तरीही त्याने माझ्यावर कधीच कोणत्याही गोष्टीची सक्ती केली नाही.

तो माझ्या हातात टेनिस रॅकेट आणि क्रिकेटची बॅट देऊन मला गच्चीवर घेऊन जायचा आणि माझ्याकडून टेनिसचे चेंडू जोरात फटकवण्याचा सराव करून घ्यायचा. त्याने फेकलेले चेंडू मी कधी टेनिस रॅकेटने तर कधी क्रिकेट बॅटने टोलवायचो. आमच्यापाशी फारसे टेनिस चेंडू नसायचे आणि मी मारलेला चेंडू जर गच्चीच्या भिंतीवरून खाली पडला, तर मी चार मजले झरझर उतरून ते चेंडू घेऊन परत वर यायचो. (त्या वेळी लिफ्ट नव्हत्या, कदाचित माझ्या बळकट पायांचं रहस्य त्या जिने चढ-उतारात लपलेलं असेल.) क्रिकेट खेळण्यात मी जास्त आनंद घेतो आहे, हे तोपर्यंत अजितला स्पष्टपणे कळून चुकलं होतं.

परंतु माझ्या वयाच्या अकराव्या वर्षी ज्या घटनेमुळे त्याने ताबडतोब मला रमाकांत आचरेकर सरांच्या उन्हाळी क्रिकेट शिबिरात नेऊन दाखल केलं, त्या घटनेचा आणि क्रिकेटचा काहीही संबंध नव्हता.

मला क्रिकेटकडे वळवायला एका अर्थी आमचा कंपू, म्हणजे मी, माझा दोस्त सुनील हर्षे व अविनाश गोवारीकर कारणीभूत ठरला. एका प्रसंगामुळे आम्ही तिघेही चांगलेच गोत्यात आलो. त्या काळी दूरदर्शनवर दर रविवारी संध्याकाळी एखादा जुना दर्जेदार हिंदी चित्रपट दाखवला जायचा. त्या दुर्दैवी दिवशी देव आनंदचा गाजलेला 'गाइड' चित्रपट सुरू होता. आमच्या कॉलनीतले सगळे रहिवासी 'गाइड' बघण्यात दंग झाले होते. ही सुवर्णसंधी साधून आम्ही तिघे आंबे काढायला हळूच झाडावर चढलो. सुनील व मी एकाच फांदीवर बसलो होतो. सुनील अंगाने चांगलाच भरभक्कम होता. आम्ही बसलेली फांदी नेमकी तुटली आणि आम्ही बऱ्यापैकी उंचावरून खाली आदळलो. उठून धूम ठोकायच्या आतच आम्ही पकडलो गेलो. आमची चांगलीच कानउघाडणी करण्यात आली. माझ्या जोश आणि उत्साहाला चांगलं वळण लावण्याची गरज भासू लागली. विशेषत: उन्हाळ्याच्या सुट्टीत तर ही गोष्ट घरच्यांना जास्तच जाणवत असे. रमाकांत आचरेकरांचं उन्हाळी क्रिकेट शिबिर हा अजितचा त्यावरचा तोडगा होता. मुंबईतील बरेचसे नावाजलेले खेळाडू त्यांच्याकडेच तयार झाले होते.

२
खेळ शिकताना

खूप लहान असल्यापासून मी कॉलनीतल्या मित्रांबरोबर टेनिस बॉलने क्रिकेट खेळत असे. टीव्हीवर दाखवल्या जाणाऱ्या क्रिकेट मॅचेस पाहायचं तर मला वेडच लागलं होतं. सुनील गावसकर व वेस्ट इंडीजचा महान फलंदाज विव्ह रिचर्ड्स हे माझे दोन अत्यंत लाडके खेळाडू होते. खेळतानाच्या त्यांच्या खास लकबींची मी अगदी सहीसही नक्कल करत असे. मात्र, मला केवळ फलंदाजीचंच आकर्षण नव्हतं, गोलंदाजी करायलाही मला तितकीच आवडायची. मध्यमगती, ऑफ स्पिन, लेग स्पिन असे गोलंदाजीतले अनेक प्रकार मी हाताळायचो. अर्थात, त्या वेळी आम्ही फक्त टेनिस बॉलनेच क्रिकेट खेळायचो. गोलंदाजी करताना मी मुद्दाम एखादा स्लो बॉल टाकणं किंवा क्रीजच्या बाहेरून गोलंदाजी करणं असे काही प्रयोगही करून पाहत असे. माझ्या एकूण कारकिर्दीत नेट्समध्ये मी गोलंदाजीचा खूप सराव केला आहे. फलंदाजी करून झाली की, मी लगेच चेंडू उचलून गोलंदाजी करायला सुरुवात करायचो.

'शारदाश्रम विद्यामंदिर'चे त्या वेळचे क्रिकेट प्रशिक्षक रमाकांत आचरेकर यांच्या अत्यंत सजग मार्गदर्शनाखाली मी टेनिस बॉल सोडून प्रथमच सीझन बॉलने खेळायला सुरुवात केली. त्यांना आजपर्यंत मी फक्त 'सर' म्हणत आलो आहे. सरांनी १९४३मध्ये म्हणजे त्यांच्या वयाच्या अकराव्या वर्षी क्रिकेट खेळायला सुरुवात केली होती. योगायोग असा की, मी सरांना जेव्हा प्रथम भेटलो तेव्हा मीही ११ वर्षांचाच होतो. सर मुंबईतल्या 'गुलमोहर मिल्स', 'मुंबई पोर्ट' अशा नामांकित क्लबमधून खेळले होते आणि १९६३मध्ये ते 'स्टेट बँक ऑफ इंडिया'तर्फे हैदराबाद संघाविरुद्ध प्रथम दर्जाचा सामनाही खेळले होते. मुंबईतल्या उत्तम प्रशिक्षकांमध्ये सरांची गणना केली जायची.

माझा भाऊ अजित हा स्वत: 'बालमोहन विद्यामंदिर'चा विद्यार्थी होता. मात्र मुंबईतल्या सर्व शाळांमध्ये फक्त शारदाश्रम शाळाच आपल्या विद्यार्थ्यांना सुनियोजितरीत्या क्रिकेटचं प्रशिक्षण देते हे त्याला पक्क ठाऊक होतं. त्यामुळे तो मला शिवाजी पार्क मैदानावर सुरू असलेल्या सरांच्या उन्हाळी क्रिकेट शिबिराला घेऊन गेला.

त्या शिबिरात चाचणी द्यायला कुणालाही मुक्त-प्रवेश होता; पण एखाद्याला शिबिरात दाखल करून घ्यायचं की नाही; हा निर्णय फक्त सरांचा असे. १७ वर्षांखाली ज्युनिअर गट व १५ वर्षांखालील सबज्युनिअर गट अशा दोन गटांमध्ये मुलांची विभागणी केलेली होती. मी ११ वर्षांचा असल्यामुळे माझी चाचणी सबज्युनिअर गटामध्ये घेतली गेली. 'मुंबई क्रिकेट असोसिएशन'ची त्या वेळी 'अंडर-१५'ची टीम होती. त्या संघात प्रवेश मिळवण्यासाठी सरांच्या सबज्युनिअर गटात खूपच चढाओढ असायची.

मी नेट्समध्ये पूर्वी कधीच सराव केला नव्हता. त्यात अवतीभवती एवढी माणसं पाहून मला खूपच दडपण आलं होतं. मला जेव्हा बॅटिंग अर्थात फलंदाजी करायला सांगितलं गेलं, तेव्हा मी चांगलाच गांगरून गेलो. सर बाजूलाच उभे असल्यामुळे मी फारच अडखळत खेळलो. एकूणच त्या चाचणीत मी स्वत:चा काहीच ठसा उमटवू शकलो नाही. माझी बॅटिंग करून झाल्यावर सरांनी अजितला एका बाजूला बोलावून घेतलं. ते अजितला म्हणाले की, ''शिबिरात खेळण्यासाठी सचिन अजून खूपच लहान आहे. थोडा मोठा झाल्यावर तू त्याला पुन्हा घेऊन ये.'' मी जरा लांब उभा असल्यामुळे त्या दोघांत काय बोलणं चाललं आहे याची मला काहीच कल्पना नव्हती; पण त्या क्षणी अजितने जर सरांपाशी आग्रह धरला नसता, तर मुंबई क्रिकेट वर्तुळातल्या त्या पहिल्या प्रवेशपरीक्षेत मी सपशेल नापास झालो असतो.

अजितने मला कॉलनीत खेळताना पाहिलेलं असल्यामुळे मी सरांसमोर केलेल्या फलंदाजीपेक्षा प्रत्यक्षात खूप चांगला

खेळू शकतो, याची त्याला खातरी होती. माझी बावरलेली मन:स्थिती त्याने सरांना नीट समजावून सांगितली आणि मला आणखी एक संधी देण्याची विनंती केली. तसंच सरांनी तिथून निघून जात असल्याचं नाटक करून लांबून माझा खेळ बघावा, असंही त्याने सरांना सुचवलं. सरांनी ते मान्य केलं. मी पुन्हा बॅट हातात घेतली आणि या खेपेस सरांच्या रोखलेल्या नजरेतून सुटका झाल्यामुळे किंवा माझा तसा समज झाल्यामुळे, मी काही वेळातच अगदी नेहमीसारखा सफाईने फलंदाजी करू लागलो. सर खूश झाले असावेत. त्यांनी मला शिबिरात प्रवेश दिला. मला खूप आनंद झाला. माझ्यासाठी ती सुवर्णसंधीच ठरली. त्या क्षणापासून माझं आयुष्य पार बदलून गेलं.

सरांनी निवडलेल्या मुलांना ६५ रुपये प्रवेश फी व १० रुपये मासिक फी द्यावी लागत असे. मला मात्र पहिल्या काही महिन्यांनंतर मासिक फी भरल्याचं आठवत नाही. शिवाजी पार्कच्या त्या मैदानात सकाळ आणि संध्याकाळ अशा दोन सत्रांमध्ये आमचा सराव घेतला जाई. मी रोज सकाळी ७.३० ते १०.३० पर्यंत सराव करायचो. मग घरी जेवायला जाऊन दुपारी परत यायचो, ते थेट संध्याकाळी उशिरापर्यंत सराव करत राहायचो. शिबिरात सर सर्वांकडूनच अगदी कसून सराव करून घ्यायचे. दिवसाच्या अखेरीला मी पार थकून गेलेलो असायचो. बांद्र्याच्या माझ्या घरापासून ते शिवाजी पार्क हा ४० मिनिटांचा प्रवास होता. त्यामुळे मैदानावर वेळेत पोचण्यासाठी मला सकाळी लवकर बस पकडावी लागायची.

सुरुवातीला काही दिवस अजित माझ्यासोबत यायचा. मग प्रवासाची नीट सवय झाल्यावर मी एकटाच बसने येऊ-जाऊ लागलो. बसच्या त्या प्रवासात फलंदाजीमधले अनेक बारकावे अजित मला छान समजावून सांगत असे. अजितचं ते बोलणं ऐकायला मला खूप आवडत असे. एकदा तर त्याने बॅटिंगवरचे त्याचे विचार एका कागदावर नीट लिहून मला दिले होते. तो कागद आजही मी अगदी जपून ठेवला आहे. माझ्यासाठी ती वैयक्तिक मार्गदर्शिका आहे.

त्या वेळी क्रिकेटसाठी लागणाऱ्या सफेद पँट-शर्टची फक्त एकच जोडी माझ्यापाशी होती. सकाळच्या सत्रात खेळून घरी आल्यावर मी लगेच ते कपडे धुऊन वाळत घालायचो. माझं जेवण होईपर्यंत दोन्ही कपडे उन्हात सुकलेले असायचे. मग ते अंगावर चढवून मी पुन्हा घराबाहेर पडायचो. संध्याकाळी आल्यावर तेच काम. कपडे धुणं. वाळत घालणं. दुसऱ्या दिवशी सकाळी तोच पँट-शर्ट घालून खेळायला जाणं. कपड्यांची एकच जोडी वापरण्याची ती पद्धत मला छान जमून गेली होती. फक्त पँटच्या खिशांनी मात्र मला खूप त्रास दिला. कारण पँट सुकली तरी पँटचे खिसे सुकलेले नसायचे. ओल्या खिशांची पँट घालूनच मला शिबिर संपेपर्यंत रोज खेळावं लागलं होतं.

शाळा बदलली

शिबिर सुरू झाल्यानंतर महिनाभरातच सरांनी माझ्या बॅटिंगमध्ये विशेष रस घ्यायला सुरुवात केली. दोन महिन्यांनंतर त्यांनी अजितला सांगितलं की, माझ्याकडे एक चांगला क्रिकेटपटू होण्याची शक्यता व क्षमता आहे; मात्र, त्यासाठी मी वर्षभर अखंड, नियमितपणे सराव करायला हवा. माझ्या बॅटिंगच्या पद्धतीत त्यांनी मला काही बदल करायला लावले. त्याचा परिणाम लगेचच दिसून आला. मी त्यानंतर माझ्यापेक्षा मोठ्या वयाच्या म्हणजे ज्युनिअर गटातील मुलांबरोबर सराव करू लागलो. मी शिकत असलेल्या न्यू इंग्लिश स्कूल, बांद्रा शाळेत क्रिकेट खेळण्याच्या काहीच सुविधा नव्हत्या. जर मी क्रिकेट गांभीर्याने खेळायचं पक्कं ठरवलं असेन, तर मी शाळा बदलायला हवी, असा सरांचा आग्रहच होता.

एका संध्याकाळी सरांचा माझ्या वडिलांना फोन आला. ''शाळा बदलण्याबाबत तुम्ही सचिनशी नीट चर्चा कराल का,'' असं त्यांनी वडिलांना विचारलं. त्या वेळी अजितही वडिलांबरोबर होता. मी जर क्रिकेटला खरोखरच प्राधान्य द्यायचं ठरवलं असेल, तर मी शाळा बदलायला हवी यावर दोघांचंही एकमत झालं; पण दोघांनीही माझ्यावर कधीच, कुठलीही जबरदस्ती केली नव्हती. मी घरी आल्यावर त्यांनी मला सरांच्या सूचनेवरचं माझं मत विचारलं. एव्हाना क्रिकेट खेळण्यात मला खरोखरच खूप मजा येऊ लागली होती. सतत क्रिकेटच खेळत राहावसं वाटू लागलं होतं. क्षणाचाही विलंब न करता, ''सरांचा प्रस्ताव मला मान्य आहे,'' असं मी दोघांना सांगून टाकलं. वडिलांनी मला समोर बसवलं. ते एवढंच म्हणाले, ''तू शाळा बदलण्याला माझा मुळीच आक्षेप नाही. फक्त तू क्रिकेट खेळण्यात अगदी मनापासून रस घ्यायला हवा.'' मी त्यांची तशी

खातरी पटवून देताच मला आचरेकरसर प्रशिक्षक असलेल्या शारदाश्रम विद्यामंदिरात पाठवायचं ठरलं.

शाळा बदलल्यामुळे न्यू इंग्लिशमधल्या माझ्या दोस्तांपासून मी लांब गेलो; पण लवकरच शारदाश्रममधल्या अनेकांशी क्रिकेटमुळे माझी चटकन मैत्री जुळली. शाळेमधून क्रिकेट खेळणाऱ्या सगळ्यांचीच एकमेकांशी दोस्ती होती. त्या दोस्तीमध्ये कोण कुठल्या इयत्तेतला वा कुठल्या तुकडीतला हा प्रश्न अगदीच गौण होता. आम्ही मधल्या सुट्टीतही क्रिकेट खेळायचो, कायम क्रिकेटवरच गप्पा मारायचो आणि शाळा सुटल्यावर आचरेकरसरांच्या मार्गदर्शनाखाली पुन्हा क्रिकेटचेच धडे घ्यायचो. क्रिकेट ही वेगाने माझी सर्वाधिक प्रिय गोष्ट बनू लागली होती. क्रिकेट माझ्यासाठी जणू एखाद्या संरक्षक झडपेसारखं (सेफ्टी व्हॉल्व्ह) काम करू लागलं होतं. माझी उतू जाणारी ऊर्जा आता क्रिकेट खेळण्यात वापरली जाऊ लागली होती. क्रिकेट खेळण्याबद्दल घरातल्या प्रत्येकाचाच मला पूर्ण पाठिंबा होता. माझे वडील कायम मला एवढंच म्हणायचे की, ''तू वैयक्तिक कामगिरीकडे जराही लक्ष न देता स्वत:ला झोकून देऊन व जास्तीत जास्त प्रयत्न करून खेळाचा आनंद लुटला पाहिजे.''

शारदाश्रम शाळेत आल्यामुळे क्रिकेटच्या बाबतीत माझा खूपच फायदा झाला. मुख्य म्हणजे वेगवेगळ्या संघांविरुद्ध प्रत्यक्ष सामने खेळायला मिळाल्यामुळे माझ्या खेळात वेगाने सुधारणा होत गेली. मॅच खेळताना आपोआपच चुरस वाढत जाते. प्रतिस्पर्धी संघाला हरवण्यासाठी तुम्ही वेगवेगळे डावपेच लढवू लागता आणि त्यासाठी नवनवीन प्रयोग करू लागता. त्यामुळे खेळात सुधारणा होण्यासाठी तुम्ही जास्तीत जास्त सामनेच खेळायला हवेत. नेट प्रॅक्टिस हा त्यासाठी कधीच पर्याय होऊ शकत नाही. आचरेकरसरांचंही हेच ठाम मत होतं.

आचरेकरसरांच्या 'कामथ मेमोरियल क्लब'तर्फे मी माझी पहिली क्लब मॅच खेळलो; पण त्यात पूर्ण अपयशी ठरलो. मी आमच्या कॉलनीच्या टीमचा 'स्टार बॅट्समन' होतो. साहजिकच माझी पहिली मोठी मॅच पाहायला माझे सगळे मित्र आले आणि मी शून्यावर बाद झालो. पहिल्याच चेंडूवर माझा चक्क त्रिफळा उडाला. तोंड कुठे लपवावं, मला समजत नव्हतं. 'खेळपट्टी फारच खराब होती', 'चेंडू अचानक खाली राहिला' – अशी कारणं देत मी मित्रांसमोर स्वत:चा खोटा बचाव करण्याचा प्रयत्न केला. दुसऱ्या सामन्यातही मी पुन्हा शून्यावरच बाद झालो. तिसऱ्या सामन्यात पहिले सात चेंडू खेळल्यानंतर जेव्हा मी पहिली धाव काढली तेव्हा सुटकेचा नि:श्वास सोडला. त्या वेळी प्रत्येक सामन्याची सविस्तर नोंद करण्यासाठी मी डायरी लिहीत असे. दुर्दैवाने आज त्यातली एकही डायरी माझ्यापाशी नाही.

शाळेतर्फे खेळलेल्या पहिल्या मॅचमधली माझी कामगिरी मात्र तितकीशी वाईट नव्हती. त्या सामन्यात मी २४ धावा काढल्या. ती मॅच आम्ही आरामात जिंकलो होतो. एका वेगळ्याच कारणासाठी ती मॅच माझ्या कायमची स्मरणात राहिली आहे. त्या दिवशी मी एक नवा आणि फार महत्त्वाचा धडा शिकलो. तो म्हणजे, कोणत्याही अनैतिक वा अवैध मार्गाचा अवलंब न करता खेळ हा नेहमी अतिशय प्रामाणिकपणे व निष्ठेने खेळला पाहिजे. दुसऱ्या दिवशी वर्तमानपत्रात माझं नाव छापून आलं होतं. वर्तमानपत्रात पहिल्यांदाच नाव छापून येणं, ही खरंतर आनंदाची गोष्ट होती. त्या काळी मुंबईत असा अलिखित नियम होता की, एखाद्या फलंदाजाने ३०पेक्षा जास्त धावा काढल्या, तर त्याचं नाव वर्तमानपत्रात येत असे. खरंतर मी फक्त २४ धावा काढल्या होत्या. सामन्यात एकूण अवांतर धावा खूप निघाल्या असल्यामुळे स्कोअररने त्यातल्या सहा धावा माझ्या नावावर चढवून माझी धावसंख्या ३०वर नेऊन ठेवली. संघाच्या एकूण धावसंख्येत काहीच बदल होणार नसल्यामुळे माझी वैयक्तिक धावसंख्या थोडीशी वाढवल्याने काय मोठं बिघडणार आहे, असा त्याने विचार केला होता. त्याचे नक्की काय परिणाम होणार आहेत, हे न जाणवल्यामुळे मीही त्या गोष्टीला मान्यता दिली होती. वर्तमानपत्रात माझं नाव आलेलं पाहून आचरेकरसर चांगलेच संतापले. न काढलेल्या धावा स्वत:च्या नावावर वाढवू दिल्याबद्दल त्यांनी माझी चांगलीच खरडपट्टी काढली. मलाही माझ्या चुकीचा पश्चात्ताप होत होता. मी माझी चूक कबूल केली आणि माझ्या हातून अशी चूक पुन्हा कधीही होणार नाही, असं वचनही सरांना दिलं.

त्या वेळी प्रत्येक पातळीवर मी खेळलेल्या पहिल्या सामन्यात काही ना काही अपशकुन होतच असायचा. १९८५मध्ये मुंबईच्या 'अंडर-१५' टीमतर्फे पुण्यात खेळलेल्या पहिल्या मॅचमध्येही पुन्हा दुर्दैव माझ्याआड आलं. त्या वेळी मी १२ वर्षांचा होतो. मुंबईहून पुण्याला येताना माझ्या खिशात फक्त ९५ रुपये होते. दौऱ्यासाठी मिळणाऱ्या मामुली भत्त्यातून जेमतेम

आठवड्याचा खर्च भागत असे. मुंबईतर्फे मी फक्त एकच सामना खेळलो आणि त्यातही धावबाद झालो. माझ्याच शाळेतल्या, पण माझ्यापेक्षा वयाने मोठ्या असलेल्या मुलाबरोबर मी बॅटिंग करत होतो. त्याचा धावण्याचा वेग माझ्यापेक्षा जास्त असल्यामुळे त्याने पहिल्या दोन धावा जलद धावून काढल्या आणि तिसरी धाव मिळण्याची जराही शक्यता नसताना त्याने मला ती घेण्यास भाग पाडलं. परिणामी मी धावबाद होऊन साश्रू नयनांनी पॅव्हिलियनमध्ये परतलो. मिलिंद रेगे व वासू परांजपे हे मुंबईचे जुनेजाणते खेळाडू तिथे होते. ''धावबाद होण्यात तुझी काहीच चूक नव्हती,'' या त्यांच्या सांत्वनपर शब्दांमुळे माझ्या मनाला थोडासा तरी दिलासा मिळाला.

त्यानंतर पुढचे काही दिवस पुण्यात खूप पाऊस पडला. त्यामुळे पुढचे सगळे सामने रद्द झाले. पूर्ण दौऱ्यात मी एकच इनिंग्ज खेळलो होतो आणि त्यात अपयशी ठरलो होतो. त्यामुळे पश्चिम विभागाच्या 'अंडर-१५' टीममध्ये माझी निवड झाली नाही. मला वाईट वाटायचं दुसरं कारण असं होतं की, त्या संघात ज्या माझ्या सहकाऱ्यांची निवड झाली होती, ते तर संपूर्ण दौऱ्यात एकही चेंडू खेळले नव्हते. निराशेत आणखी भर म्हणजे, किरकोळ खाण्यापिण्यात माझ्या जवळचे पैसेही संपून गेले होते. दादर स्टेशनवर जेव्हा मी उतरलो, तेव्हा बसने घरी जाण्याएवढेही पैसे माझ्या खिशात शिल्लक उरले नव्हते. खांद्यावर दोन मोठ्या बॅगा अडकवून मी चालत चालत शिवाजी पार्कमधील माझ्या काकांच्या घरी पोचलो. त्या वेळी रस्त्यावरून चालताना मी अक्षरश: रडत होतो. माझा रडवेला चेहरा पाहून माझी काकू घाबरली. मी असा का दिसतो आहे, ते तिला समजेना. पश्चिम विभागाच्या संघात माझी निवड झाली नाही, ही गोष्ट मात्र मी तिच्यापासून लपवून ठेवली. ''बरं वाटत नाहीये,'' असं सांगून मी कशीतरी वेळ मारून नेली.

क्रिकेटमधून मिळालेली माझी पहिली कमाई

शाळेतर्फे नियमितपणे खेळल्यामुळे मोठी धावसंख्या उभारण्याची आणि जास्तीत जास्त वेळ बॅटिंग करण्याची कला मला आत्मसात करता आली. सुट्टी लागल्यावर तर मी माझ्या क्लबसाठी अगदी रोज एक सराव सामना खेळत असे. शारदाश्रममध्ये आल्यानंतर पहिल्याच वर्षी ६० दिवसांच्या सुट्टीत मी ५५ सराव सामने खेळलो होतो. उन्हाळ्याच्या सुट्टीत माझं क्रिकेट खेळण्याचं पहिलं सत्र सकाळी साडेसात वाजता सुरू होई. एकूण पाच नेट सेशन्स मिळून मी दोन तास बॅटिंगचा सराव करत असे. प्रत्येक सराव हा अतिशय कडक शिस्तीत व कसून घेतला जाई. लक्ष पूर्ण एकाग्र केल्याशिवाय तो सराव करणं अशक्य असे. सकाळच्या त्या सत्रानंतर मी सराव सामना खेळायला जाई. हा सामना दुपारी साधारण ४.३०च्या सुमारास संपत असे. त्यानंतर फक्त ३० मिनिटांची विश्रांती मिळे. संध्याकाळचं सत्र पुन्हा ५.०० वाजता सुरू होई. त्या अर्धा तासाच्या विश्रांतीमध्ये सर मला प्रेमाने वडापाव खायला किंवा एखादं थंड पेय प्यायला देत असत.

संध्याकाळी ५ ते ७ या वेळेत आणखी पाच नेट सेशन्स होत व त्यानंतर १५ मिनिटांचं एक अखेरचं सत्र असे. त्या सत्रात सर स्टम्पवर एक रुपयाचं नाणं ठेवत. जर त्या १५ मिनिटांच्या काळात मी नाबाद राहिलो, तर ते नाणं माझ्या मालकीचं होत असे. त्या सत्रात शिबिरातला प्रत्येक गोलंदाज मला एक-दोन चेंडू तरी टाकत असे व क्षेत्ररक्षण करण्यासाठी मैदानात ६० ते ७० मुलं असत. ९० यार्डांवर म्हणजे भारतातल्या कुठल्याही शाळेच्या मैदानावर आखलेल्या सीमारेषेपेक्षा कितीतरी दूर अंतरावर जरी कुणी माझा झेल पकडला, तरी मला बाद ठरवलं जाई. याचा अर्थ त्या अटीतटीच्या १५ मिनिटांत खेळपट्टीवर टिच्चून उभं राहण्यासाठी मला प्रत्येक चेंडू अगदी जमिनीलगत तटवावा लागे. खरंच, ते आव्हान जबरदस्त असायचं. हळूहळू त्याच सत्रात खेळायला मला सर्वांत जास्त मजा येऊ लागली. एक रुपयाचं नाणं जिंकल्यावर मला कमालीचं समाधान मिळायचं. त्याचबरोबर पूर्ण थकलेल्या अवस्थेतही मनाची एकाग्रता कशी साधायची, याचा आपोआप परिपाठही व्हायचा.

एवढं सर्व झाल्यावर सर मला पॅड्स व ग्लोव्हज घालून शिवाजी पार्कच्या मैदानाला धावत दोन फेऱ्या मारायला सांगत. माझ्या प्रशिक्षणातला तो शेवटचा भाग असे. त्यानंतर मात्र माझ्या अंगात जराही त्राण उरलेले नसे. उन्हाळ्याच्या संपूर्ण सुट्टीभर माझा हाच दिनक्रम असायचा. त्यामुळे मला शारीरिक व मानसिक ताकद मिळवायला खूप मदत झाली.

कधीकधी मला घरी घेऊन जाण्यासाठी माझे वडील तिथे येत. ते दिसताच क्लबजवळच्या ज्यूस सेंटरमधून मला फ्रूट

कॉकटेल हवं आहे, असा मी त्यांच्यापाशी हट्ट करे. खरंतर, दरवेळची माझी ही मागणी अवाजवी असायची. माझ्या आणखी तीन भावंडांची जबाबदारीही माझ्या आई-वडिलांवर आहे, याची त्या वेळी मला काहीच जाणीव नसे. मात्र केवळ माझ्या आनंदासाठी वडील न चुकता माझा हट्ट पुरवत.

इतर दिवशी मी बसमधून घरी जायचो. बसमध्ये सुदैवाने जागा मिळाली तर मी बसल्या बसल्या झोपून जात असे. अर्थात बसमध्ये जागा मिळवणं ही गोष्ट किती अवघड असतं, हे मुंबईतल्या बसमधून प्रवास केलेल्या कोणालाही वेगळं सांगण्याची गरज नाही. ज्या दिवशी मला उभ्याने प्रवास करावा लागे, त्या दिवशी मात्र कंडक्टरच्या टीकेचा धनी होण्याखेरीज माझ्यापाशी पर्याय नसे. खांद्यावर लटकणाऱ्या किटबॅगेमुळे मी आणखी एका प्रवाशाची जागा अडवतो आहे, अशी त्याची तक्रार असे. बहुतेक कंडक्टर्स उद्धट असत व ते मला दोन तिकिटं घ्यायला सांगत. माझ्याकडे दुसऱ्या तिकिटाचे पैसे नसल्याने मला कंडक्टरचं बोलणं मुकाट ऐकून घ्यावं लागे. मळलेल्या कपड्यांमुळे माझी अवस्था अधिकच केविलवाणी व्हायची. शिवाय दिवसभर खेळल्यामुळे कपड्यांना घामाचा वास येई. अशा बिकट अवस्थेतून तो बसप्रवास करणं म्हणजे माझ्यासाठी एक दिव्यच असे, पण हळूहळू किटबॅग स्वत:भोवती नीट लपेटून कशी घ्यायची, याची अभिनव पद्धत मी शोधून काढली. ज्याप्रमाणे बॅटिंग करताना हेल्मेट व पॅड्स हे माझ्या शरीराचाच एक भाग होऊन जात त्याचप्रमाणे किटबॅग हादेखील माझ्या शरीराचा एक विस्तारित भाग बनला होता.

आजकाल लोक जेव्हा मला विचारतात, ''का हो, तुम्ही कधी सार्वजनिक वाहनांमधून प्रवास केलाय?'' त्यावर शारदाश्रमच्या पहिल्या वर्षी मी दिवसातून चार वेळा गर्दीने खच्चून भरलेल्या बस किंवा लोकलमधून प्रवास केल्याचं मी त्यांना आवर्जुन सांगतो. शिवाय हा प्रवास अतिशय लहान वयात मी एकट्याने करू लागलो होतो. अनेकदा मी बांद्र्याहून बस किंवा लोकलने चर्चगेटला जात असे. त्या सर्व प्रवासात मी खूप काही शिकलो आहे. त्यानंतर काही महिन्यांतच माझी अनेक जणांशी मैत्री झाली. आम्ही सर्व मित्र धमाल करत मॅचेस खेळायला जात असू.

शिवाजी पार्कला स्थलांतर

बांद्रा ते माझी शाळा असा वर्षभर प्रवास केल्यानंतर तो तसाच रोज करत राहणं मला झेपण्यासारखा नाही, हे माझ्या घरच्यांच्या लक्षात आलं. त्या प्रवासात मध्येच मला एक बसही बदलावी लागे, आणि ती बस चुकली, तर शाळेत जायला मला उशीर होत असे. शिवाय दीड तासाच्या त्या प्रवासामुळे मी शिणून जात असे. त्याचा परिणाम माझ्या क्रिकेटच्या सरावावर होऊ लागला. त्याहून काळजीची गोष्ट म्हणजे त्या वर्षभरात मी दोनदा आजारी पडलो आणि मला कावीळही झाली.

अखेर मला शिवाजी पार्कजवळच्या इंद्रवन सोसायटीत राहणाऱ्या सुरेश व मंगला या माझ्या काका-काकूंच्या घरी राहायला पाठवायचं ठरलं. मी त्यांच्याकडे एकूण चार वर्षं राहिलो. त्या वेळच्या माझ्या सर्व धडपडींना त्या दोघांची अतिशय मोलाची साथ लाभली. माझ्या त्या वाढत्या वयात त्यांनी माझ्यावर केलेले संस्कार, माझ्यासाठी खूप महत्त्वाचे ठरले. अनेकदा दिवाणखान्यात हातात बॅट घेऊन मी काकूला बॉल टाकायला सांगायचो. मी काही गोल्फ बॉल्स विकत आणले होते व ते ब्लेडने तासून त्याचा आकार अंडाकृती केला होता. हा आकार मी मुद्दामहून बदलला होता. कारण त्यामुळे काकूने माझ्याकडे बॉल फेकला की, तो जमिनीवर आपटल्यानंतर अचानक दिशा बदलून एक तर आतल्या बाजूला तरी येत असे किंवा वळून बाहेरच्या बाजूला जात असे. त्यामागची कल्पना अशी होती की, घरातला वेळ मजेत जावा आणि खोलीतल्या एकाही वस्तूची तोडफोड न करता, अगदी हलक्या हाताने बॅटिंग करण्याचा सराव मला मिळावा. सरावाच्या दरम्यान काकू सगळा वेळ खुर्चीत बसलेली असायची. बॉल मारल्यानंतर मीच तो बॉल उचलून तिच्या हातात द्यायचो. जेव्हा काकू घरात नसायची, तेव्हा मी दरवाजाला एक पायमोजा टांगून त्यात बॉल ठेवायचो व मुद्दाम बॅटच्या कडेने तो बॉल मारायचो. कारण सरळ बॅटने तो बॉल जोरात टोलावणं अगदी सोपं असायचं. बॉल मारताना बॅटची कड बॉलच्या बरोबर मध्यभागी बसेल, असा माझा प्रयत्न असायचा व बऱ्याचदा तो सफलही होई. परंतु ज्या ज्या वेळी माझा फटका मध्यभागी लागत नसे, तेव्हा तो बॉल

माझ्याकडे वेगवेगळ्या दिशेतून परत अंगावर येत असे. (कधी तो आउटस्विंगर होई, तर कधी इनस्विंगर) आणि अशा वेळी ते अचानक अंगावर आलेलं आव्हान नीट परतवून लावण्यात मोठी मौज येई. माझी बॉलवरची नजर व हाताची हालचाल यांचा अचूक मेळ कसा साधावा, हे शिकण्यासाठी या सरावाची मला खूप मदत झाली. त्याचप्रमाणे बॅट बॉलकडे कशी आणावी, याचीही मला नीट जाण येऊ लागली.

माझ्या काका-काकूंच्या घरापासून चालत शाळेत पोचायला फक्त अर्धा तास लागत असे. त्यामुळे पूर्वीपेक्षा मला सकाळी जरा अधिक आराम करता येई. दुपारी एक वाजेपर्यंत जेवायला घरी परत येऊन क्लबमध्ये खेळण्यासाठी मी पुन्हा दुपारी लवकर बाहेर पडत असे. सरांनी माझ्यासाठी खास वेळापत्रक ठरवलं होतं. माझा फलंदाजीचा क्रमांकही त्यांनीच ठरवला होता. त्यानुसार दर आठवड्याला मी तीन सराव सामने खेळायचो आणि प्रत्येक वेळी माझ्या आवडत्या चौथ्या क्रमांकावर बॅटिंग करायचो. मी जर लवकर बाद झालो, तर चटकन पॅड-ग्लोव्हज काढून मला पुन्हा क्षेत्ररक्षणासाठी यावं लागे. मला बॅटिंगची जेवढी आवड होती, तेवढी फिल्डिंगची मुळीच नव्हती. त्यामुळे बाद न होता जास्तीत जास्त वेळ बॅटिंग करत राहायचा माझा प्रयत्न असे. मॅच संपल्यावर पुन्हा माझा वैयक्तिक सराव सुरू व्हायचा, तो संध्याकाळी ७.३० वाजेपर्यंत चालायचा. त्यानंतर माझी पावलं घराकडे वळायची.

ज्या ज्या दिवशी आमची शाळेची मॅच असेल, त्या त्या वेळी ती मॅच दुसऱ्या दिवसापर्यंत कशी लांबवता येईल याचा आम्ही सर्व जण जास्तीत जास्त प्रयत्न करत असू. म्हणजे समजा जर आम्हाला मॅच जिंकायला ३०० धावा हव्या असतील, तर त्या दिवसाचा खेळ संपेपर्यंत आम्ही २६०-२७० धावा काढायचो व उरलेल्या धावा दुसऱ्या दिवसासाठी राखून ठेवायचो. मग दुसऱ्या दिवशी पहिल्या अर्धा तासातच मॅच गुंडाळून आमची टीम समुद्रकिनाऱ्यावर क्रिकेट खेळायला जायची. 'बीच क्रिकेट' खेळण्याची मजा काही औरच असे.

माझे आई-वडील रोज संध्याकाळी मला भेटायला काका-काकूंच्या घरी येत. माझ्या आईचं ऑफिस सांताक्रूझला होतं. संध्याकाळच्या त्या ऐन गर्दीच्या वेळी लोकल किंवा बसमधून प्रवास करणं हे त्या वेळी खूप जिकिरीचं होतं, पण आई-वडिलांचं आपल्याकडे दुर्लक्ष होतं आहे असं मला वाटू नये, म्हणून दिवसभराच्या कामाने थकलेले असतानाही ते मुद्दाम माझ्यासाठी वेळ काढत, या गोष्टीचा मला खास उल्लेख करावासा वाटतो.

१९८६-८७च्या मोसमात मी प्रत्येक सामन्यात धावा काढू लागलो. मी पहिलं शतक ठोकलं तेही त्याच मोसमात. आम्ही शिवाजी पार्कला डॉन बॉस्कोविरुद्ध मॅच खेळत होतो. पहिल्या दिवसाच्या अखेरीस मी ९४ धावा काढून नाबाद होतो. त्याच्या काही दिवस आधी मी सरांना घरी जेवायचं आमंत्रण दिलं होतं. पण, ''तू जेव्हा शाळेसाठी पहिलं शतक काढशील, तेव्हाच मी तुझ्याकडे जेवायला येईन,'' असं तेव्हा सरांनी मला सांगितलं होतं. शतकासाठी मी इतका अधीर झालो होतो की, त्या रात्री मी वडिलांच्या शेजारी झोपायचं ठरवलं; रात्री उशिरापर्यंत मी अस्वस्थपणे एकसारखी कूस बदलत टक्क जागाच होतो. ''दिवसभर बॅटिंग करून दमलायस, आता लवकर झोप,'' असं वडील मला पुन्हा पुन्हा सांगत होते; पण माझे डोळे मिटायलाच तयार नव्हते. नंतर दोन-तीन तास कशीबशी झोप लागली असावी. पुन्हा सकाळी लवकर जाग आली.

माझी चाललेली ती घालमेल पाहून वडील मला बांद्र्याला गणपतीच्या देवळात घेऊन गेले आणि गणपतीचं दर्शन घेऊन मगच मी शिवाजी पार्कला निघालो. वाटेत मी गणपतीच्या आणखी एका देवळात गेलो. प्रत्येक मॅचपूर्वी मी त्या देवळात जात असे. देवळात पाण्याची एक तोटी होती. त्या तोटीतलं पाणी पिऊन मी रोज मैदानावर जात असे. त्या दिवशीही मी तसंच पाणी पिऊन मॅच खेळायला गेलो आणि पहिल्याच षटकात दोन चौकार मारत माझं पहिलंवहिलं शतक पूर्ण केलं. सरांनी दिलेला शब्द पाळला. रात्री ते माझ्या घरी जेवायला आले. माझ्यासाठी तो खूप खूप समाधानाचा क्षण होता!

माझ्या सुरुवातीच्या काही चांगल्या मोसमांमधला १९८६-८७चा क्रिकेट मोसम हा सर्वोत्तम ठरला. त्या एकाच वर्षी मी गाइल्स शिल्ड व हॅरिस शिल्ड अशा दोन्ही स्पर्धांमधून खेळलो. मुंबईमधल्या क्रिकेटच्या गुंतागुंतीशी जे परिचित नसतील त्यांच्यासाठी स्पष्ट करायला हवं की, 'गाइल्स शिल्ड' ही १४ वर्षांखालील मुलांसाठी, तर 'हॅरिस शिल्ड' ही १६ वर्षांखालील मुलांसाठी असते. त्या दोन्ही स्पर्धांमध्ये एकाच वेळी खेळायला मिळणं ही किती कौतुकास्पद गोष्ट होती हे आज मागे वळून

पाहताना प्रकर्षाने जाणवत असलं, तरी त्या वेळी हा विचारही माझ्या मनात आला नव्हता. 'मुंबईतल्या अनेक होतकरू क्रिकेटपटूंचं कौशल्य जोपासणाऱ्या स्पर्धा' अशी या दोन्ही स्पर्धांची ओळख होती. या स्पर्धेतल्या उत्तम कामगिरीची मुंबई क्रिकेट वर्तुळात आवर्जून दखल घेतली जायची.

त्या वर्षी हॅरिस शिल्डमध्ये मी पाच सामन्यांत मिळून विक्रमी १०२५ धावा फटकावल्या होत्या. शिवाय केवळ एकदाच बाद झालो होतो. आजसुद्धा कुणालाही ती असामान्य कामगिरी वाटेल. शेवटच्या तीन म्हणजे उप-उपांत्य, उपांत्य व अंतिम सामन्यात माझी धावसंख्या नाबाद २०७, नाबाद ३२६ व नाबाद ३४६ अशी होती. विशेष म्हणजे हॅरिस शिल्डच्या उपांत्य सामन्यात नाबाद ३२६ धावा काढून मी चालत समोरच्या आझाद मैदानात जाऊन गाइल्स शिल्डची मॅच खेळलो होतो आणि त्या सामन्यातही नाबाद १७८ धावा काढून आमच्या संघाला विजय मिळवून दिला होता.

त्या मोसमामधील पहिल्याच सामन्यात मी शतक काढलं होतं. १२५ धावा काढून मी बाद झालो तो क्षण; मी कधीच विसरू शकणार नाही. मी यष्टिचीत झालो होतो. मला बाद करणारा गोलंदाज हा पूर्ण बहिरा होता. त्याने फसवी दिशा दिलेला (फ्लायटेड) तो चेंडू खेळण्यासाठी मी क्रीज सोडून बाहेर आलो; पण माझा अंदाज सपशेल चुकला. मी चकलेला पाहून त्याच्या चेहऱ्यावर उमटलेले ते विजयी भाव आजही मला स्पष्ट आठवतात. मात्र, त्या चेंडूने यष्टिरक्षकालाही गंडवलं आणि त्याला बॉल पकडता आला नाही. यष्टिचीत करण्याची संधी हुकलेली दिसताच बिचाऱ्या बोलरच्या चेहऱ्यावरचा अत्यानंद क्षणार्धात पुसला गेला व निराशेने त्याचा चेहरा काळवंडून गेला. शक्य असूनही मी मात्र क्रीजमध्ये परत आलो नाही. यष्टिरक्षकाला यष्टिचीत करायची आणखी एक संधी देत मी पॅव्हिलियनकडे चालू लागलो. संपूर्ण स्पर्धेत मी बाद होण्याची ती एकच वेळ होती. त्या अपंग गोलंदाजाला सहानुभूती दाखवण्यासाठी मी असा वागलो असेन असं आजही मला वाटत नाही. काही क्षणांचा आपल्याला कधीच अर्थबोध होत नाही हेच खरं. मी फार मोठं औदार्य दाखवलं असंही म्हणता येणार नाही. कारण त्याने टाकलेला चेंडू अप्रतिमच होता व त्या चेंडूवर मी साफ फसलो होतो. यष्टिरक्षकाने मात्र हातची संधी गमावल्यामुळे बोलर पुरता हताश झाला होता. त्याने विकेट मिळवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले होते. त्याला ती विकेट मिळणंच न्यायाचं ठरलं असतं.

फेब्रुवारी, १९८८मध्ये हॅरिस शिल्डच्या उपांत्य सामन्यात आमची गाठ सेंट झेवियर्सशी पडली होती. सामना तीन दिवसांचा होता. मी चौथ्या क्रमांकावर फलंदाजी करण्यासाठी उतरलो तेव्हा आमची स्थिती २ बाद ८४ अशी होती. त्या वेळी मुंबई क्रिकेट वर्तुळात गाजत असलेला प्रतिभावान तरुण फलंदाज विनोद कांबळी माझ्याबरोबर बॅटिंग करत होता. तो नेहमी तिसऱ्या क्रमांकावर येत असे. आम्ही सेंट झेवियर्सची गोलंदाजी अक्षरश: धुऊन काढायला सुरुवात केली. प्रतिस्पर्ध्याला एकही संधी न देता चौफेर टोलेबाजी करत आम्ही त्या सामन्यात विक्रमी भागीदारी नोंदवली. आझाद मैदान हे खुलं व प्रचंड मोठं मैदान आहे. जोरदार मारलेला फटका सीमारेषा पार करत खूप लांबवर जाई. तो चेंडू क्षेत्ररक्षकाकडून परत येईपर्यंत आम्ही दोघे पिचच्या मध्यभागी उभे राहून मस्त मजेत गाणी म्हणत राहायचो. मोठी भागीदारी रचत असताना क्षणभर विरंगुळा मिळवण्याची ती आमची खास पद्धत असायची. दिवसअखेरीस विनोद १८२ धावांवर व मी १९२ धावांवर नाबाद होतो. शारदाश्रमचं त्या सामन्यावर वर्चस्व होतं हे वेगळं सांगायला नकोच.

दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही दोघांनीही द्विशतकं फटकावली. त्यानंतर आम्ही आमचा डाव घोषित करावा अशी आचरेकरसरांची इच्छा असतानाही आम्ही तसेच खेळत राहिलो. काही वेळाने आम्हाला डाव घोषित करण्याची सूचना देण्यासाठी सरांनी आमच्या साहाय्यक प्रशिक्षकाला सीमारेषेपाशी पाठवलं. आमच्या नावांचा जोरजोरात पुकारा करत तो आम्हाला डाव घोषित करायची सूचना अक्षरश: किंचाळत देऊ लागला. आम्ही त्याला नजर देण्याचं टाळत, त्याचं बोलणं ऐकून न ऐकल्यासारखं करत होतो. जवळजवळ १० मिनिटं तो ओरडत राहिला आणि शेवटी कंटाळून ड्रेसिंग रूममध्ये परत निघून गेला. खेळपट्टीवर उभं राहून मनसोक्त बॅटिंग करायचा आमचा इरादा होता.

उपाहाराच्या वेळी आमची धावसंख्या होती २ बाद ७४८. त्यामध्ये माझ्या धावा होत्या ३२६. मैदान सोडून आम्ही बाहेर येताच साहाय्यक प्रशिक्षकाने मला गाठलं आणि मला म्हणाला, ''तू स्वत:वर मोठं संकट ओढवून घेतलंयस.'' मी विचारलं,

''काय झालं?'' त्यावर तो म्हणाला की, ''तुम्ही सकाळी लवकर डाव घोषित करावा अशी आचरेकरसरांची इच्छा होती; पण त्यांची आज्ञा न पाळता तुम्ही खेळतच राहिलात.'' सरांच्या मते आपल्या टीमच्या भरपूर धावा झाल्या होत्या. जर आपण सेंट झेवियर्स टीमला कमी धावांत बाद करू शकलो नाही, तर अंतिम सामन्यात खेळायला आपण खऱ्या अर्थाने लायक ठरणार नाही. संध्याकाळी सरांचा होऊ शकणारा रोष टाळण्यासाठी मी लगेचच डाव घोषित करायचं ठरवलं, पण विनोद मला तसं करू देईना. कारण त्या वेळी तो ३४९ धावांवर नाबाद होता. ''एक बॉल मला खेळायला दे, म्हणजे माझ्या ३५० धावा होतील,'' असं तो मला पुन्हा पुन्हा सांगू लागला. मी त्याला म्हटलं की, ''हा निर्णय आता मी घेऊ शकत नाही. आपल्याला अजून खेळायचं असेल तर त्यासाठी सरांची परवानगी घ्यावी लागेल.'' मी मैदानाजवळ असलेल्या एका पब्लिक बूथमधून सरांना फोन लावला. सरांनी मला पहिला प्रश्न विचारला की, ''लंचपूर्वी आपण झेवियर्सच्या किती विकेट घेतल्या आहेत?'' सरांची ती खास स्टाइल होती. खरं म्हणजे आम्ही अजून डाव घोषित केलेला नव्हता, त्यामुळे झेवियर्सच्या विकेट घेण्याचा प्रश्नच येत नव्हता. हे सर्व सरांना ठाऊक होतं, पण आपल्याला काहीच माहीत नसल्याचं ते भासवत होते. आम्ही लंचपर्यंत बॅटिंग केली आणि आता मी डाव घोषित करतो आहे, असं मी त्यांना सांगितलं. विनोद शेजारी उभा राहून मला खुणावत होता. सरांना मी चटकन म्हटलं की, ''विनोदला तुमच्याशी बोलायचं आहे.'' आणि लगेच फोन त्याच्या हातात दिला. विनोद सरांना घाबरून असायचा. अजून एखादी ओव्हर आपल्याला बॅटिंग करावीशी वाटते आहे, हे सरांना सांगायचं धैर्य त्याला झालं नाही.

मी लगेच डाव घोषित केला. दीड दिवस बॅटिंग करूनसुद्धा नवीन चेंडू हातात घेऊन मीच गोलंदाजीला सुरुवात केली. त्या डावात मी भरपूर षटकं टाकली. सुरुवातीला मध्यमगती, मग चेंडू थोडासा जुना झाल्यावर ऑफ स्पिन आणि चेंडूची पूर्ण लकाकी गेल्यावर लेग स्पिन अशी सर्व प्रकारची गोलंदाजी केली. विनोदनेही सुरेख गोलंदाजी करत सहा विकेट्स घेतल्या. सेंट झेवियर्सचा डाव १५४ धावांत गुंडाळून आम्ही अंतिम फेरी गाठली.

आमची ती ६६४ धावांची भागीदारी हा सर्व प्रकारच्या क्रिकेटमधला त्या वेळचा विश्वविक्रम ठरला. तोही हॅरिस शिल्डच्या उपांत्य सामन्यात झाल्याने स्थानिक क्रिकेट वर्तुळात त्याला आगळंच महत्त्व मिळालं. आम्हा दोघांचंही भरपूर नाव झालं. आमची जोडी मस्त जमली होती. विनोदबरोबर खेळताना जास्त धमाल यायची. कारण कोणत्या क्षणी तो काय करणार आहे आणि कसा वागणार आहे, याचा मला कधीच पत्ता लागायचा नाही. याच मोसमात एका सामन्यात आम्ही दोघे बॅटिंग करत असताना अचानक विनोद गायब झाला. काही क्षण मला तो दिसलाच नाही. नंतर दिसला तेव्हा तो पिचपासून २० मीटर लांब उभा राहून चक्क पतंग उडवत होता. मजा करत खेळायची त्याची ती खास पद्धत होती; पण या खेपेस मात्र सरांकडून त्याला चांगलीच तंबी मिळणार, हे मी आधीच ओळखलं होतं.

सरांना त्या दिवशी कुणीच पाहिलं नव्हतं. त्यामुळे आपण सरांच्या तडाख्यातून सुटणार याची विनोदला खातरी वाटत होती. मी मात्र थोडा साशंक होतो. सर कुठूनतरी दुरून मॅच पाहत असणार आणि त्यांच्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणे संध्याकाळी ते विनोदला फैलावर घेणार, असं मला वाटत होतं. कारण सर सहसा आमची मॅच चुकवत नसत. अनेकदा ते एखाद्या झाडामागे लपून आमचा खेळ बघत आणि मग संध्याकाळी त्यांचं 'प्रात्यक्षिक' सत्र सुरू होई. आम्ही दिवसभरात केलेल्या चुका ते आमच्या नजरेस आणून देत. खेळतानाचा आमचा पवित्रा (स्टान्स), पदलालित्य (फुटवर्क), आम्ही केलेल्या स्ट्रोक्सची निवड कुठे चुकली व कशी असायला हवी होती हे हातात बॅट घेऊन ते आम्हाला प्रत्यक्ष करून दाखवत. त्या दिवशी नेमकं मला वाटत होतं तेच घडलं. संध्याकाळच्या 'प्रात्यक्षिक' सत्रात सरांनी माझ्या हातात एक चिठ्ठी देऊन मला मोठ्याने वाचायला सांगितलं. 'विनोदचा पतंग' हा त्या चिठ्ठीतला पहिलाच मुद्दा होता. विनोदचं वागणं त्यांना मुळीच आवडलं नव्हतं. ''बॅटिंग करत असताना तू पतंग उडवतोस म्हणजे काय? पुन्हा असं करायची कधीही हिंमत करू नकोस,'' असा त्यांनी विनोदला सज्जड दम दिला. विनोदने सरांची माफी मागितली; पण तो पुन्हा तसा वागणारच नाही याची खातरी कोणीच देऊ शकलं नसतं. विनोदला गृहीत धरणं अशक्य होतं.

सेंट झेवियर्सचा दणदणीत पराभव केल्यामुळे अंजुमन इस्लाम विरुद्धच्या अंतिम सामन्यात आमच्याकडेच संभाव्य विजेते

म्हणून पाहिलं जात होतं. अंतिम सामना 'क्रिकेट क्लब ऑफ इंडिया'च्या मैदानावर खेळला जाणार होता. १९९३मध्ये स्थापन झालेल्या 'सीसीआय'ची तुलना नेहमी 'एमसीसी'शी केली जायची. 'सीसीआय'च्या मैदानावर मी प्रथमच इतका महत्त्वाचा सामना खेळणार होतो. मुंबईचे अनेक ख्यातनाम खेळाडू आमचा खेळ पाहण्यासाठी अंतिम सामन्याला हजेरी लावणार होते. त्यांनीही आमच्या विश्वविक्रमी भागीदारीबद्दल ऐकलं होतं. आम्हाला क्रिकेटमध्ये खरोखरच भवितव्य आहे का, हे ते जोखणार होते. दिलीप वेंगसरकर, सुनील गावसकर व 'सीसीआय'चे अध्यक्ष राजसिंग डुंगरपूर हे तिघेही सामना पाहायला आले होते. त्यामुळे ही संधी मला दवडायची नव्हती.

अंतिम सामन्यात आदल्या दिवशी सुनील गावसकर यांचा भाचा, हेमंत केंकरे यांनी मला दिलेल्या एका खास भेटवस्तूमुळे माझा खेळायचा हुरूप अधिकच वाढला. त्या वेळी माझ्यापाशी चांगले पॅड्स नव्हते आणि ही गोष्ट सरांनी हेमंतच्या कानावर घातली होती. हेमंतकडे सुनील गावसकरांनी वापरलेले पॅड्स होते. आतून निळं पॅडिंग असलेले ते पॅड्स खूपच हलके होते. हेमंतने ते मला द्यायचे ठरल्यावर मला झालेला आनंद अवर्णनीय होता. अजितबरोबर हेमंतच्या घरी जाऊन जेव्हा मी ते पॅड्स हातात घेतले तेव्हा मी अक्षरश: भारावून गेलो होतो.

सुनील गावसकरांनी वापरलेले पॅड्स घालून खेळताना मला स्वत:चा खूपच अभिमान वाटत होता. सामन्याच्या पहिल्या दिवशी उपाहाराच्या अर्धा तास आधी मी फलंदाजी करायला उतरलो. त्यानंतर जवळजवळ दोन दिवस मी बॅटिंग करत होतो. तिसऱ्या दिवशी चहापानापूर्वी जेव्हा आमचे सर्व गडी बाद झाले तेव्हा मी ३४६ धावा काढून नाबाद होतो. ती इनिंग्ज माझ्या क्रिकेट कारकिर्दीच्या दृष्टीने फारच महत्त्वाची ठरली. त्यानंतर थोड्याच दिवसांत मुंबई रणजी संघातील संभाव्य खेळाडूंची यादी जाहीर झाली. त्यात माझं नाव होतं.

क्रिकेटच्या त्या सुरुवातीच्या काळात मला विशेष मदत करणारी आणखी एक व्यक्ती म्हणजे हेमंत वायंगणकर. हेमंत हा माझ्या वडिलांचा विद्यार्थी आणि माझ्या क्रिकेट कारकिर्दीचा सुरुवातीपासून शेवटपर्यंतचा साक्षीदार. तो मला लहानपणापासून ओळखत होता. हेमंतच्या पुढाकारामुळे 'सनग्रेस मफतलाल' या नामांकित भारतीय कंपनीने विनोदला व मला क्रिकेटचं संपूर्ण अद्ययावत किट भेट दिलं होतं. त्यासाठी 'सनग्रेस'च्या अनिल जोशी, विजय शिर्के व संजू खामकर यांची खूपच मदत झाली. हेमंतची व माझी तीन दशकांची मैत्री आजही अबाधित आहे. ★

★ *पुस्तक छापण्याच्या काळात हेमंत वायंगणकरांचे निधन झाले.*

माझे सर

क्रिकेटच्या त्या सुरुवातीच्या वर्षांकडे वळून पाहताना एका गोष्टीचा मी आवर्जून उल्लेख करेन की, माझ्यावर माझे प्रशिक्षक रमाकांत आचरेकरसर, तसंच त्यांचे साहाय्यक दास शिवलकर व लक्ष्मण चव्हाण यांचे खूप मोठे ऋण आहे. सर नसते तर तुम्हाला आज जसा दिसतो आहे, त्या दर्जाचा क्रिकेटर मी होऊच शकलो नसतो. सरांची शिस्त अत्यंत कडक असायची; माझ्यासाठी जे जे करणं शक्य होतं, ते सर्व सरांनी केलं आहे.

मी मॅचला वेळेवर पोचावं म्हणून सर मला स्कूटरवरून मुंबईच्या वेगवेगळया मैदानांवर अनेकदा घेऊन गेले आहेत. क्रिकेटवर माझं जिवापाड प्रेम होतं; पण कधीकधी कॉलनीतल्या मित्रांबरोबर खेळता खेळता मला नेट प्रॅक्टिसला जायचं आहे, हे मी विसरून जायचो. मी जर प्रॅक्टिसला आलो नाही, तर सर स्कूटरवरून मला शोधत साहित्य सहवासला यायचे. मी मित्रांबरोबर कुठल्यातरी खेळात मशगूल झालेलो असायचो. सर मला त्या मित्रांच्या घोळक्यातून बरोबर हुडकून काढून अक्षरश: ओढत, बाहेर काढत घरी न्यायचे. प्रॅक्टिस टाळण्यासाठी मी काहीतरी कारणं सांगायचो, पण सर काहीही ऐकायला तयार नसायचे. ते मला कपडे व बूट बदलायला लावत आणि मग मला स्कूटरवर मागे बसवून शिवाजी पार्कच्या दिशेने आमचा प्रवास सुरू होई. वाटेत सर मला सांगत, ''अरे, या मुलांबरोबर उगाचच मूर्खासारखं काहीतरी खेळ खेळत वेळ वाया दवडू नकोस. तिकडे नेट्समध्ये क्रिकेट तुझी वाट पाहतंय. फक्त कसून सराव करत रहा, आणि मग बघ त्यातून काय चमत्कार

घडतो ते!'' त्या वेळी सर मला असं मनाविरुद्ध ओढून घेऊन जाताहेत याचा खूप राग यायचा; पण आज मला माझं ते वागणं आठवून खूप ओशाळल्यासारखं वाटतं आणि सरांच्या दूरदृष्टीला मी आदराने सलाम करतो.

सरांनी मला फक्त एकदाच शिक्षा केली होती; पण त्यातून कायम लक्षात राहील असा एक फार महत्त्वाचा धडा मी शिकलो होतो. त्या वर्षी हॅरिस शिल्डचा अंतिम सामना, शारदाश्रम इंग्लिश माध्यम विरुद्ध शारदाश्रम मराठी माध्यम यांच्यात होणार होता. त्या वेळी मी फक्त गाइल्स शिल्डमध्ये खेळायचो. हॅरिस शिल्डशी माझा काहीच संबंध नव्हता; तरीही मी तो अंतिम सामना पाहायला नक्की जाणार हे सरांना ठाऊक होतं. म्हणून त्याच दिवशी त्यांनी माझ्यासाठी एक सराव सामना ठेवला होता. ''काही झालं तरी मी माझी मॅच चुकवून वानखेडेला फिरकायचंदेखील नाही,'' असं त्यांनी मला बजावून सांगितलं होतं. पण तरीही सरांची आज्ञा न पाळता मी वानखेडेला गेलोच. सर काही तिथे येणार नाहीत असं मला वाटलं होतं, पण सर मला शोधत आले. सरांना एवढं चिडलेलं मी त्यापूर्वी कधीच पाहिलं नव्हतं. ते मला म्हणाले, ''तू इथे येऊन इतरांचा खेळ कसला बघतोयस? अरे, तू जर कसून सराव केलास तर जगभरातील माणसं तुझा खेळ पाहायला येतील.''

मुंबई व भारतीय क्रिकेटसाठी आचरेकरसरांनी दिलेलं योगदान हे खूपच महत्त्वाचं आहे. भारतासाठी खेळलेला मी काही त्यांचा एकमेव विद्यार्थी नव्हे. आपल्या देशाचं प्रतिनिधित्व केलेले लालचंद राजपूत, विनोद कांबळी, प्रवीण आमरे, अजित आगरकर, संजय बांगर, बलविंदर संधू, चंद्रकांत पंडित, पारस म्हांब्रे, समीर दिघे व रमेश पोवार हे सर्व सरांचेच विद्यार्थी होते. क्रिकेटमधून पैसा कमवावा हा विचार सरांच्या मनात एकाही क्षणी आला नाही. उलट त्यांनी अनेकांना स्वत:हून मदत केली आहे. काही गरीब पण होतकरू विद्यार्थ्यांना सरांच्या उन्हाळी शिबिराची फीसुद्धा भरणं शक्य नसे, तेव्हा सर कधीही त्यांच्याकडून पैसे घेत नसत.

माझ्या क्रिकेट कारकिर्दीत, प्रत्येक दौऱ्याला व प्रत्येक मालिकेला सुरुवात करण्याआधी चार ठिकाणी मी न चुकता व न विसरता जात असे. ही चारही ठिकाणं माझी श्रद्धास्थानं आहेत. ती म्हणजे – शिवाजी पार्कचा गणपती, प्रभादेवीचं सिद्धिविनायक मंदिर, माझे काका-काकू आणि आचरेकरसर.

मध्यमगती गोलंदाजीची माझी छोटीशी कारकीर्द

शारदाश्रममधील माझ्या पहिल्या यशस्वी मोसमानंतर १९८७मध्ये चेन्नई येथील 'एमआरएफ पेस फाउंडेशन'मध्ये माझी चाचणीसाठी निवड झाली. ऑस्ट्रेलियन द्रुतगती गोलंदाज डेनिस लिली हे तिथे प्रमुख प्रशिक्षक होते. भारतात गोलंदाजांची कायमच वानवा होती. त्यामुळे होतकरू व हुशार तरुण मुलांना खास तालीम व प्रशिक्षण देऊन त्यांच्यामधून उत्तम द्रुतगती गोलंदाज घडवणं या एकमेव उद्देशासाठी एमआरएफ पेस फाउंडेशनची स्थापना झाली होती. देशभरातील प्रशिक्षकांनी तरुण व कुशल क्रिकेटपटूंची नावं सुचवली. मुंबईचे जुने-जाणते क्रिकेटपटू व भारतातील एक निष्णात प्रशिक्षक वासू परांजपे यांनी माझं नाव सुचवलं. मी काहीही केलं तरी वासूसर कायम माझ्या पाठीशी असत. ते एक प्रकारे माझे मार्गदर्शक-सल्लागार होते. केवळ द्रुतगती गोलंदाजांच्या चाचणीसाठी शिबिर असलं तरी मी माझं संपूर्ण किट घेऊन चेन्नईला जावं, असं अजितने मला सुचवलं. त्याच्या मते गोलंदाज म्हणून माझी निवड झाली नाही, तरी तिथे नेट्समध्ये फलंदाजीचा सराव करायला मिळाला तर त्याचा मला नक्कीच फायदा होईल. द्रुतगती गोलंदाजाला लागणारा बांधा व उंची माझ्यापाशी नव्हती. त्यामुळे त्या शिबिरात माझी निवड झाली नाही यात काहीच आश्चर्य नव्हतं. ''गोलंदाजीपेक्षा फलंदाजीवर अधिक लक्ष दे,'' असं डेनिस लिली मला थट्टेने म्हणालेही आणि तसंच झालं. मी फलंदाज झालो, पण वेगवान गोलंदाजीची कला शिकण्याची इच्छा कायम माझ्या मनात राहिली.

पहिली संधी

सरांच्या सजग देखरेखीखाली केलेल्या कसून सरावाला अखेरीस फळ आलं. १४ नोव्हेंबर, १९८७ रोजी जाहीर झालेल्या मुंबई रणजी संघात माझी निवड झाली. के.एस. रणजितसिंहजी या आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या भारतीय क्रिकेटपटूच्या

नावे स्थानिक स्तरावर खेळली जाणारी ‘रणजी करंडक स्पर्धा’ ही १९३३-३४मध्ये सुरू झाली. रणजितसिंहजी हे १८९६मध्ये आस्ट्रेलियाविरुद्ध इंग्लंडतर्फे खेळले होते. भारतीय क्रिकेटमध्ये रणजी करंडक स्पर्धेला खूपच महत्त्व आहे. या स्पर्धेत सातत्याने चमकणाऱ्या खेळाडूंची भारतीय संघात निवड होते. १९८०च्या दशकात ही स्पर्धा विभागवार खेळली जात असे. पश्चिम, उत्तर, दक्षिण, पूर्व व मध्य असे पाच विभाग असत. प्रत्येक विभागातील प्रथम दर्जाचे संघ सुरुवातीला आपापसात खेळत व त्यात सर्वाधिक गुण मिळवणारे संघ बाद फेरीमध्ये दाखल होत.

मुंबई संघात माझी निवड झाली असली, तरी त्या वर्षीच्या एकाही सामन्यातील अंतिम ११ खेळाडूंत माझी निवड होऊ शकली नाही. त्यामुळे सुनील गावसकर यांच्याबरोबर खेळण्याची माझी संधी थोडक्यात, पण कायमची हुकली. १९८७च्या विश्वकरंडक स्पर्धेनंतर गावसकर सर्व प्रकारच्या स्पर्धात्मक क्रिकेटमधून निवृत्त झाले. भारतीय संघाकडून खेळताना सुनील गावसकरांनी काढलेली ३४ शतकं ही माझ्यासारख्या होतकरू तरुण क्रिकेटरसाठी फारच प्रेरणादायी गोष्ट होती. कोणत्याही फलंदाजासाठी ते सर्वोच्च उद्दिष्ट होतं. अशा या महान खेळाडूसोबत मात्र मला कधीच खेळता आलं नाही. ते दु:ख मला कायम बोचत आलं आहे. परंतु त्या मोसमातील दोन मोठ्या सामन्यांत बदली क्षेत्ररक्षक म्हणून मला खेळात प्रत्यक्ष सहभागी होता आलं होतं. एकदा रणजी सामन्यात व दुसऱ्या वेळी तर एका आंतरराष्ट्रीय सामन्यात. ब्रेबॉर्न स्टेडियमवर झालेल्या त्या आंतरराष्ट्रीय सामन्यात मी चक्क पाकिस्तानच्या बाजूने भारताविरुद्ध क्षेत्ररक्षण केलं होतं.

तो महोत्सवी सामना होता. जावेद मियांदाद आणि लेग स्पिनर अब्दुल कादीर हे दोन खेळाडू उपाहाराआधी मैदान सोडून आत आले होते. त्यांच्याजागी मी क्षेत्ररक्षणासाठी मैदानात उतरलो. कर्णधार इम्रान खानच्या सूचनेनुसार वाइड लाँग ऑनला उभा राहिलो. काही मिनिटांतच कपिल देव यांनी एक उंच फटका मारला व १५ मीटर्स धावूनही मी चेंडूपर्यंत पोचू शकलो नाही. मी त्या वेळी जर मिड ऑनला उभा असतो, तर तो झेल मी नक्की पकडू शकलो असतो असं संध्याकाळी लोकलने घरी परतताना मी माझा मित्र मार्कस कुटो याला कुरबुरत सांगितल्याचं मला आजही स्मरतं. पाकिस्तानी संघासाठी मी एकदा क्षेत्ररक्षण केलं आहे ही गोष्ट आता इम्रान खान यांना आठवत असेल की नाही, कोणास ठाऊक!

माझ्या त्या पहिल्या रणजी मोसमातील आणखी एक प्रसंगही मला अजून आठवतो. त्या वेळेस आम्ही बडोद्याविरुद्ध मॅच खेळत होतो. मी १४ वर्षांचा होतो. भारतातर्फे आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळलेल्या सुरु नायक यांचा मी रूम-पार्टनर होतो. सामन्याच्या काही दिवस आधीच आम्ही बडोद्याला पोचलो होतो. एक दिवस आमचं रात्रीचं जेवण नेहमीपेक्षा जरा लवकर झालं. सुरु नायक यांनी, आपण इतर काही खेळाडूंसोबत देवळात पूजा करण्यासाठी जातो आहे असं सांगून मला खोलीत झोपायला पिटाळलं. त्यात विश्वास न ठेवण्यासारखं मला काहीच वाटलं नाही. मी शांतपणे झोपी गेलो. काही दिवसांनी मला समजलं, की मी खूप लहान असल्यामुळे मला वगळून सर्व जण रात्री पार्टीसाठी बाहेर पडले होते.

मीसुद्धा अनेकदा व्रात्यपणा केला आहे. १९८७मध्ये मी मुंबई ‘अंडर-१५’ टीमसाठी पूर्व भारतातल्या कटक येथे सामना खेळत होतो. आमची राहण्याची व्यवस्था एका कॉलेजच्या डॉर्मिटरीत केली होती. एका मोठ्या खोलीत ओळीने १५ जणांचे बिछाने घातले होते. डॉर्मिटरीला लागून एक बाल्कनी होती व त्यापुढे खेळायचं मोठं मैदान होतं. टीममध्ये माझे दोन मित्र विनोद कांबळी व जतीन परांजपे (जो पुढे भारतासाठी एकदिवसीय आंतरराष्ट्रीय सामने खेळला.) माझ्यासोबत होते. दिवे विझल्यावर खोलीतून हळूच बाहेर पडत सर्वांचे बूट स्पाइकसकट गोळा करायचं आम्ही तिघांनी ठरवलं. खोलीतल्या त्या मिट्ट काळोखात आम्ही गरीब बिचाऱ्या केदार गोडबोले या आमच्या मित्रावर स्पाइक्सचा मारा करायला सुरुवात केली. हळूहळू आम्ही इतरांवरही बूट व स्पाइक्स भिरकावू लागलो. काही कळायच्या आत सर्वांवर बुटांच्या क्षेपणास्त्रांचा वर्षाव होऊ लागला. जेव्हा आतून बाकीच्यांनीही आमच्यावर बूट फेकायला सुरुवात केली, तेव्हा आम्ही मात्र त्यांचा मारा चुकवू लागलो. त्यामुळे बूट बाल्कनीमधून मैदानात पडू लागले. अखेर रात्री दोन वाजता अख्खी टीम आपापले बूट व चपला शोधण्यासाठी मैदानात उतरली होती!

रणजी करंडकमध्ये पदार्पण

१९८८मध्ये पाहुण्या न्यूझीलंडविरुद्ध सामना खेळण्यासाठी भारतीय संघ सीसीआयवर उतरला असताना मुंबईचे कर्णधार दिलीप वेंगसरकर यांनी माझा नेट्समधला सराव अतिशय बारकाईने पाहिला. विशेषत: मी कपिल देव यांची गोलंदाजी ज्या पद्धतीने खेळलो ते पाहून वेंगसरकर प्रभावित झाले असावेत. रणजी खेळायची माझी तयारी झाल्याची त्यांना खातरी पटली होती. निवडसमितीला त्यांनी तसं कळवलं, आणि १० डिसेंबर, १९८८ रोजी मी १५ वर्षांचा असताना त्यांनी मला मुंबई-गुजरात सामन्यात रणजी पदार्पणाची संधी दिली. वेंगसरकर स्वत: भारतीय संघातून खेळणार असल्याने त्यांच्या जागी मी खेळू लागलो. पहिल्याच सामन्यात मी नाबाद १०० धावा काढल्या. प्रथम दर्जाच्या पहिल्याच सामन्यात शतक झळकवणारा मी सर्वांत तरुण भारतीय क्रिकेटपटू ठरलो. १९८८-८९च्या मोसमात मी मुंबईतर्फे सर्वांत जास्त धावा करत सातपैकी सहा सामन्यांत अर्धशतकं फटकावली. दिल्लीविरुद्धचा उपांत्य सामना अटीतटीचा झाला; पण त्यात आम्ही हरलो. मोसमाच्या अखेरीस माझ्या धावांची सरासरी होती ६४.७७. उपांत्य सामन्यात दिल्लीतर्फे भारताचे भूतपूर्व मध्यमगती गोलंदाज व त्यानंतर भारतीय संघाचे प्रशिक्षक असलेले मदनलाल खेळत होते. त्यांच्या गोलंदाजीवर मी मारलेला एक स्ट्रेट ड्राइव्ह हा त्या संध्याकाळी खूप कौतुकाचा विषय ठरला होता. त्या अप्रतिम फटक्यामुळे सर्वांचं माझ्याकडे लक्ष वेधलं गेलं व माझ्याही भात्यात आणखी एका शॉटची भर पडली. एकूणच तो शॉट छान जमून आला होता. माझा तोल, मस्तकाची स्थिती (हेड पोझिशन) व फटक्याचा नेमका क्षण (टायमिंग) सारंकाही अचूक जुळून आलं आणि चेंडू वेगाने सीमापार झाला.

मुंबई संघातील माझ्या कामगिरीमुळे नोव्हेंबर, १९८९मध्ये खेळल्या जाणाऱ्या इराणी करंडक सामन्यासाठी माझी निवड झाली. इराणी करंडक सामन्याने नेहमी मोसमाची सुरुवात होई. रणजी करंडक विजेते व शेष भारत संघ यांच्यात इराणी करंडकसाठी खेळल्या जाणाऱ्या सामन्याला स्थानिक भारतीय क्रिकेटमध्ये खूप महत्त्व असे. या सामन्यातील चमकदार कामगिरीची राष्ट्रीय पातळीवर विशेष दखल घेतली जाई. रणजी करंडक विजेत्या दिल्लीविरुद्ध शेष भारततर्फे खेळताना मी माझ्या त्या पहिल्या इराणी करंडक सामन्यात शतक झळकवले. या सामन्यादरम्यानच नोव्हेंबर-डिसेंबर १९८९च्या बहुचर्चित भारत-पाकिस्तान दौऱ्यासाठी जाणाऱ्या भारतीय संघाची घोषणा करण्यात आली.

ध्यानीमनी नसताना सोळाव्या वर्षी माझी भारततर्फे खेळण्यासाठी निवड झाली होती!

३.
माझा पहिला दौरा

भारतासाठी क्रिकेट खेळण्याचं स्वप्न मी कायम पाहिलं होतं. ते स्वप्न पूर्ण होण्याची संधी मला इतक्या लहान वयात मिळणं हे माझं परमभाग्य होतं. माझ्या त्या पदार्पणाला आणखीही एक आगळं-वेगळं महत्त्व होतं. आम्ही पाकिस्तानशी पाकिस्तानमध्ये जाऊन खेळणार होतो. पाकिस्तानकडे गोलंदाजांचा जबरदस्त ताफा होता. कसलेला लेग स्पिनर अब्दुल कादीर, नवोदित मुश्ताक अहमद, भेदक द्रुतगती गोलंदाज इम्रान खान, वासिम अक्रम, वकार युनूस व अकिब जावेद यांच्या तोफखान्याला पहिल्याच मालिकेत सामोरं जाणं हे कुणाही तरुण क्रिकेटरसाठी एक फार मोठं आव्हान होतं.

सुरुवातच अग्निपरीक्षेने होणार होती आणि अगदी तसंच घडलं. पहिल्या कसोटीतील पहिल्याच डावात वासिम व वकारविरुद्ध खेळताना मी इतका गोंधळून गेलो की, माझ्यामध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळण्याची क्षमता खरोखरच आहे की नाही, याची माझी मलाच शंका वाटू लागली.

पण माझ्या पहिल्या मालिकेबद्दल बोलण्याआधी मला शेष भारत विरुद्ध दिल्लीच्या त्या इराणी करंडक सामन्याविषयी जरा विस्ताराने सांगायचं आहे. सामन्याच्या पहिल्या डावात मी ३९ धावांवर असताना त्या वेळच्या भारतीय संघातील हुकमी, डावखुरा फिरकी गोलंदाज मणिंदर सिंगने माझा त्रिफळा उडवला; पण त्याचं शल्य मला फारसं बोचलं नव्हतं. कारण त्याच संध्याकाळी पाकिस्तान दौऱ्यासाठी जाहीर झालेल्या भारतीय संघात माझी निवड झाली होती. त्या निवडीमुळे मी अक्षरश: हर्षभरित झालो होतो. आता दुसऱ्या डावात एक चांगली खेळी खेळून मला माझी निवड सार्थ ठरवायची होती.

माझा खेळ पाहण्यासाठी खास माझा भाऊही आला होता. त्याची उपस्थिती, माझ्यासाठी विशेष महत्त्वाची होती. तो येण्याचं आणखीही एक कारण होतं. मी तेव्हा कायद्याने सज्ञान झालो नसल्यामुळे माझ्या करारावर माझ्या वतीने अजितला सही करावी लागणार होती. दुसऱ्या डावात मी शतक काढणार याची वासूसरांना खातरी होती. त्यांनी माझ्या वडिलांना सकाळी फोन करून सामना पाहायला बोलावलं. माझे वडील मॅच बघायला आले आणि वासूसरांचं भविष्य तंतोतंत खरं ठरलं. मात्र पंजाबचा फलंदाज गुरशरण सिंग याची जिगरबाज साथ जर मला मिळाली नसती, तर हे शतक पुरं झालं नसतं. गुरशरण पुढे १९९०मध्ये न्यूझीलंडविरुद्ध भारतासाठी एक कसोटीही खेळला.

दिल्लीचा द्रुतगती गोलंदाज अतुल वासनविरुद्ध फलंदाजी करताना गुरशरणचं बोट फ्रॅक्चर झालं होतं. अतुलनेही नंतर १९९०मध्ये न्यूझीलंडविरुद्धच कसोटी क्रिकेटमध्ये पदार्पण केलं होतं. गुरशरण जखमी होऊन ड्रेसिंग रूममध्ये बसला होता. तो आता सामन्यात भाग घेऊ शकणार नव्हता. मी छान बॅटिंग करत होतो. आमचा नववा खेळाडू बाद झाला तेव्हा मी ८६ धावांवर नाबाद होतो. गुरशरण बॅटिंगला येऊ शकणार नाही, हे मला माहीत होतं, त्यामुळे आमचा डाव आटोपला आहे असं गृहीत धरून मी पॅव्हिलियनकडे चालायला सुरुवात केली. इतक्यात माझं लक्ष समोर गेलं. एका हाताने बॅटिंग करायची जिद्द दाखवत गुरशरण माझ्या दिशेने येत होता.

नंतर मला समजलं की, त्या वेळचे राष्ट्रीय निवडसमितीचे अध्यक्ष राजसिंग डुंगरपूर यांनी माझं शतक पूर्ण होण्यासाठी गुरशरणला ''तू खेळू शकशील का?'' असं विचारलं होतं. पंजाबच्या त्या पठ्ठ्याने असाधारण धैर्य दाखवत त्यांची विनंती मान्य केली होती. खरंतर तो जेव्हा माझ्याजवळ आला, तेव्हा त्याच्या चेहऱ्यावरच्या वेदना पाहून मीच संकोचून गेलो. आपण डाव घोषित करायला काहीच हरकत नाही, असं मी त्याला सुचवलंही; पण त्यावर तो म्हणाला, ''अब तो तेरा हंड्रेड करकेही जाएंगे!'' ज्या तडफेने तो बोलला त्याच जिद्दीने तो खेळपट्टीवर टिच्चून उभा राहिला. त्याची ती जिगर बघून दिल्लीच्या

गोलंदाजांनी त्याला एकही बाउन्सर न टाकता त्याचा मान राखला.

त्याने केलेली ती विलक्षण मदत मी कधीही विसरणार नाही. गुरशरणने दाखवलेला कणखरपणा खरोखरच वाखाणण्यासारखा होता. एप्रिल, २००५मध्ये दिल्लीला झालेल्या गुरशरणसाठीच्या गौरव सामन्यात भाग घेऊन मी त्याच्या उपकाराची थोडीफार परतफेड करू शकलो. ''तू जर काही दिवस मला आधी कळवलंस, तर मी कुठेही असलो तरी गौरव सामना खेळायला नक्की येईन,'' असं मी त्याला सांगितलं होतं. मी माझं वचन पाळू शकलो याचं मला खूप समाधान आहे.

भारत-पाकिस्तान दौरा, नोव्हेंबर-डिसेंबर १९८९

इराणी करंडक सामन्यात शतक झळकवल्यामुळे माझा उत्साह वाढला होता. त्यामुळे पाकिस्तानच्या दौऱ्यावर निघताना मला बऱ्यापैकी आत्मविश्वास वाटत होता. कदाचित मी तसा पोरसवदा असल्यामुळे पाकिस्तानविरुद्ध खेळताना येणारं विशेष दडपण मला जाणवलं नव्हतं. भारत-पाकिस्तानमधील क्रिकेटला असलेल्या राजकीय पार्श्वभूमीशी मला काहीच देणं-घेणं नव्हतं. मी माझी पहिली आंतरराष्ट्रीय कसोटी मालिका खेळतो आहे, हेच माझ्यासाठी पुरेसं आव्हान होतं. शिवाय इतक्या लहान वयात भारतीय कसोटी संघातील अंतिम ११ खेळाडूंमध्ये मला संधी मिळेल, असं कोणालाच वाटत नव्हतं. संघाची एकूण कामगिरी पाहून फार तर एकदिवसीय सामन्यात माझी वर्णी लागू शकेल, असा काहींचा होरा होता; तर केवळ आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या वातावरणाचा अनुभव मिळण्यासाठी माझी निवड झाली आहे, असं बहुतेकांचं मत होतं.

प्रामाणिकपणे सांगाचयं तर या सर्व चर्चेकडे माझं लक्षही जात नव्हतं. भारतासाठी खेळून भरपूर धावा काढायच्या एवढंच माझ्या मनात होतं. इतर सर्व मला फिजूल वाटत होतं. तसं वाटणं साहजिकही होतं. कारण आजपर्यंत प्रत्येक गोष्ट मला खूपच लवकर मिळत गेली होती. स्पर्धात्मक क्रिकेट खेळायला सुरुवात केल्यापासून मी अवघ्या पाच वर्षांत चक्क भारतीय संघात येऊन दाखल झालो होतो. स्थानिक क्रिकेट ते आंतरराष्ट्रीय क्रिकेट हा माझा प्रवास कमालीच्या वेगात झाला होता.

पाकिस्तानात आल्यावरही मला कसलंच दडपण जाणवत नव्हतं. मी माझ्या इतर सहकाऱ्यांबरोबर रोज संध्याकाळी जेवायला बाहेर पडत असे. सर्वांच्या मनमोकळ्या स्वभावामुळे मीही निश्चिंत झालो होतो. लाहोरला गेल्यावर मात्र पहिला तडाखा बसला. तिथे पुकारलेल्या कर्फ्यूमुळे आम्ही संध्याकाळी बाहेर पडू शकलो नव्हतो. आजपर्यंत भारतात प्रवास करताना प्रत्येक वेळी मी माझ्या आई, काकूसाठी साड्या, बाबा आणि काकांसाठी शर्ट अशा भेटवस्तू खरेदी करत असे. या खेपेस मी त्यांच्यासाठी पाकिस्तानी बूट व चपला विकत घेतल्या.

पाकिस्तान दौऱ्याआधी भारतीय संघाने वेस्ट इंडीजचा दौरा केला होता. त्या दौऱ्यावरून येत असताना भारतीय संघाने काही अनधिकृत सामने खेळले होते. त्यावरून भारतीय क्रिकेट नियामक मंडळ (बीसीसीआय) व खेळाडू यांच्यात मोठा वाद उफाळला होता. त्यामुळे संघातील वातावरण गढूळ झालं होतं. प्रकरण सुप्रीम कोर्टापर्यंत गेलं. 'बीसीसीआय'ने खेळाडूंवर लादलेली बंदी सुप्रीम कोर्टाने उठवल्यानंतर अखेर ते प्रकरण मिटलं होतं. त्यानंतर खेळाडूंना दर सामन्यागणीक मिळणाऱ्या मानधनावरूनही वादंग माजला होता. सर्व खेळाडूंनी निषेध म्हणून मानधनच न स्वीकारण्याचा निर्णय घेतल्यामुळे तेही प्रकरण चिघळलं होतं. सुदैवाने कर्णधार कृष्णम्माचारी श्रीकांत यांनी आम्हा काही नवोदित खेळाडूंना या सर्व वादापासून दूर राहायला सांगून इम्रान, वासिम, वकार व कादीर यांची गोलंदाजी कशी खेळून काढता येईल, यावर अधिक विचार करायला सांगितलं.

माझी दौऱ्याची सुरुवात चांगली झाली होती. पहिल्या कसोटीच्या आधी दोन सराव सामने खेळले गेले होते. त्यापैकी रावळपिंडीला झालेल्या दुसऱ्या सामन्यात मी पाकिस्तान अध्यक्षीय संघाविरुद्ध खेळताना ४७ धावा काढल्या होत्या. त्यानंतर पाकिस्तानतर्फे ५० कसोटी सामने खेळलेल्या डावखुऱ्या इक्बाल कासिमने मला बाद केलं. माझी फलंदाजी छान होत होती. त्याबद्दल प्रेक्षकांनी मला उभं राहून अभिवादन केलं होतं. त्यामुळे भारतीय कसोटी संघात आपला समावेश होऊ शकेल याची किंचित शक्यता मला वाटू लागली होती. एवढंच काय, मी पहिली कसोटी कॅप मिळाल्याचं स्वप्न पाहायलाही सुरुवात केली होती. कराचीच्या पहिल्या कसोटी सामन्याच्या आदल्या रात्री माझा अंतिम ११ खेळाडूंच्या संघात समावेश असल्याची सुवार्ता स्वत: कर्णधार श्रीकांत यांच्याकडून मला समजली.

त्या वेळच्या भावना मला शब्दांतून व्यक्त करणं खरंच अवघड आहे. आजपर्यंत प्रत्येक भारतीय संघ जवळजवळ एक अब्ज भारतीयांचं प्रतिनिधित्व करत आला आहे. अशा भाग्यवान ११ जणांच्या चमूमध्ये आज माझी निवड झाली होती. अर्थात अशा वेळी सन्मानासोबत तेवढीच मोठी जबाबदारीही अंगावर येते. यापुढे करोडो भारतीय क्रिकेटप्रेमी माझ्याकडून जास्तीत जास्त चांगल्या कामगिरीची अपेक्षा करणार होते. त्यांची अपेक्षा पूर्ण करण्याची जबाबदारी आता माझ्यावर होती. माझ्याही मनात तेच होतं. भारतीय संघाला व तमाम भारतीय क्रिकेटशौकिनांना अभिमान वाटेल अशी नेत्रदीपक कामगिरी माझ्या हातून घडावी याव्यतिरिक्त माझ्या मनात दुसरी कोणतीही इच्छा नव्हती.

सलील अंकोला हा त्या वेळी माझा रूम-पार्टनर होता. सलील द्रुतगती गोलंदाज होता व पुढे चित्रपट अभिनेताही बनला. सलील तेव्हा उत्कृष्ट गोलंदाजी करत होता. तोही माझ्याबरोबरच कसोटीत पदार्पण करणार होता. सामन्याच्या आदल्या रात्री आम्ही दोघंही झोपू शकलो नाही. आम्हा दोघांच्याही जीवनात उद्यापासून एक नवीन पर्व सुरू होणार होतं. आयुष्य बदलून टाकणारी संधी आपल्याला लाभली आहे, याची आम्हा दोघांनाही पुरेपूर जाणीव होती.

पहिली कसोटी. कराची – १५ ते २० नोव्हेंबर, १९८९

पाकिस्तानने नाणेफेक जिंकून हिरवट खेळपट्टीवर प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे एक भारतीय खेळाडू म्हणून प्रत्यक्ष मैदानावर उतरण्यासाठी मला फारशी वाट पाहावी लागली नाही. मी एक मोठी झेप घेतली होती. तो क्षण माझ्यासाठी चिरस्मरणीय होऊन राहिला आहे.

त्या सामन्याला आणखी एक विशेष महत्त्व होतं. कपिल देव यांचा तो शंभरावा कसोटी सामना होता. त्यामुळे आम्ही सर्व जण अधिकच उत्साहात होतो. यापूर्वी फक्त सुनील गावसकर व दिलीप वेंगसरकर यांनाच हा सन्मान प्राप्त झाला होता.

आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील माझा पहिला दिवस नाट्यमय ठरला. विशेषत: त्या दिवशी घडलेल्या एका विचित्र प्रसंगामुळे सर्वांचंच मन विषण्ण होऊन गेलं. उपाहारानंतरच्या सत्रात सलवार-कमीज घातलेला एक दाढीवाला गृहस्थ अचानक मैदानात घुसला. गोलंदाजीचा पवित्रा घेऊन उभ्या असणाऱ्या कपिल देवांपाशी जाऊन त्यांना पाकिस्तानात आल्याबद्दल तो अपशब्द वापरू लागला. त्यावर, ‘तुम्ही ताबडतोब इथून निघून जा, आम्हाला आमचा खेळ खेळू दे,’ असं आपण त्या व्यक्तीला सुनावल्याचं कपिल देव यांनी नंतर आमच्याशी बोलताना आम्हाला सांगितलं होतं. तो घुसखोर त्यानंतर मिड ऑफला उभ्या असलेल्या आमचे अव्वल गोलंदाज मनोज प्रभाकर यांच्यापाशी गेला. त्यांना शिवीगाळ करून त्याने आपला मोर्चा कर्णधार श्रीकांतकडे वळवला. श्रीकांतवर तर त्याने शारीरिक हल्लाच चढवला. त्या काळी क्रिकेटमध्ये आजच्याइतकी व्यावसायिकता आली नव्हती. प्रत्येक खेळाडू आपल्याला हवे ते किट, कपडे वापरत असे. बहुतेक जण टी-शर्ट घालणं पसंत करत, पण श्रीकांतना बटण असलेला शर्ट घालायला आवडत असे. त्या झटापटीत त्यांचा शर्ट उभा फाटला होता.

मी पॉइंटला उभा होतो. आता तो घुसखोर आपल्याकडे येणार या भीतीने मी ड्रेसिंग रूमच्या दिशेने धूम ठोकायचं ठरवलं होतं. आश्चर्य म्हणजे, त्या क्षणापर्यंत तिथल्या सुरक्षाव्यवस्थेकडून त्या घुसखोराला थोपवण्याचा कोणताही प्रयत्न झाला नव्हता. भारतीय कर्णधाराला धक्काबुक्की झाल्यावर सुरक्षारक्षक मैदानात आले. त्यांनी त्या घुसखोराला खेचत बाहेर नेलं. सुरक्षाव्यवस्थेकडून घडलेला तो अक्षम्य प्रमाद होता; पण संयोजकांनी त्यावर कोणत्याही प्रकारे संताप व्यक्त केला नव्हता. खरं म्हणजे दोन देशांत खेळल्या जाणाऱ्या एखाद्या कसोटी सामन्यापेक्षाही त्या खेळाला खूप अधिक महत्त्व होतं. भारत-पाकिस्तानमधील क्रिकेट सामन्यांवर फाळणीच्या राजकीय इतिहासाचं सावट कायमच पसरलेलं असतं. त्या दुर्दैवी कटू सत्याला मी मात्र प्रथमच सामोरा जात होतो. दुसऱ्या दिवशी पाकिस्तानच्या प्रसारमाध्यमांनी तर कहरच केला. कपिल देव यांनी कसोटीचं शतक पूर्ण केल्याबद्दल त्यांचं अभिनंदन करायला तो घुसखोर आल्याचं वर्तमानपत्रात छापून आलेलं पाहून आम्ही चकित झालो होतो. श्रीकांत यांच्या फाडलेल्या शर्टाचा मात्र साधा उल्लेखही करण्यात आला नव्हता!

गोंधळच गोंधळ

दुसऱ्या दिवशी पाकिस्तान संघाने सर्वबाद ४०९ धावा केल्या. कर्णधार इम्रान खानने नाबाद १०९ धावा फटकावल्या. आता फलंदाजीची पाळी आमची होती. खेळपट्टी अजूनही गोलंदाजांना साथ देणारी होती. त्यामुळे आमच्या डावाची सुरुवात फारच खराब झाली. काही वेळातच आमची ४ बाद ४१ अशी स्थिती झाली. श्रीकांत, नवज्योत सिद्धू, संजय मांजरेकर व मनोज प्रभाकर फारशा धावा न काढता तंबूत परतले होते. वासिम व वकार तुफानी गोलंदाजी करत होते. त्यांच्यासमोर फलंदाजी करणं प्रत्येकालाच मुश्कील होऊन गेलं होतं. मी सहाव्या क्रमांकावर फलंदाजीला उतरलो तेव्हा कोणत्या परिस्थितीला तोंड द्यावं लागणार आहे, याची मला सुतराम कल्पना नव्हती. कसोटी सामन्यातील माझ्या त्या पहिल्याच डावात वासिम व वकारसमोर मी पूर्ण गोंधळून गेलो होतो, हे कबूल करताना मला कसलाही संकोच वाटत नाही. प्रत्येक चेंडू मी आक्रमकपणे खेळण्याचा प्रयत्न करत होतो, कारण आजपर्यंत मी त्याच पद्धतीने खेळत आलो होतो. मी गोलंदाजांवर वर्चस्व गाजवण्याचा प्रयत्न करत होतो; पण प्रत्येक वेळी चेंडू मला चकवून जात होता. इतकी वेगवान गोलंदाजी मी त्यापूर्वी कधीही खेळलो नव्हतो. दोन्ही गोलंदाजांच्या गोलंदाजीतलं कसब व कौशल्य हे अव्वल दर्जाचं होतं. दोघांच्या फसव्या गोलंदाजीने मी पुरता गोंधळून गेलो होतो.

वासिमच्या पहिल्या षटकाचं वर्णन वाचल्यानंतर माझ्या त्या वेळच्या कठीण अवस्थेची तुम्हाला काहीशी कल्पना येऊ शकेल. वासिमच्या त्या षटकातील तिसऱ्या चेंडूवर मी खेळायला आलो. तो चेंडू भलताच उसळला. मी वासिमच्या गोलंदाजीचा नीट अभ्यास केला होता. बाउन्सरनंतर तो यॉर्कर टाकणार याची मला खातरी होती. त्याप्रमाणे यॉर्कर खेळण्याची मी मानसिक तयारीही केली होती, परंतु पुढचा चेंडूही बाउन्सर निघाला. मी तो न खेळता सोडून दिला. त्यापुढील प्रत्येक चेंडू यॉर्कर असण्याची मी अपेक्षा करत होतो, पण शेवटचे दोन चेंडूही बाउन्सरच पडले. षटक संपल्यावर मी स्वत:शीच पुटपुटलो, ''सचिन, कसोटी क्रिकेटमध्ये तुझं स्वागत असो!'' आता माझ्या लक्षात आलं होतं, क्रिकेटच्या सर्व प्रकारांत सर्वांत अवघड अशी जी कसोटी क्रिकेटची ख्याती आहे, ती उगाचच नव्हे.

मी फारच थोडा वेळ खेळपट्टीवर होतो. तोही काळ फारसा सुखावह नव्हता. मी एकूण २४ चेंडू खेळलो. त्यातल्या निम्म्या चेंडूंवर साफ फसलो. दरम्यान मी दोन चौकार मारले असले, तरी माझ्या बॅटिंगमध्ये जराही आत्मविश्वास नव्हता. अखेर लवकरच मी बाद झालो. मी १५ धावा काढू शकलो हे मी माझं सुदैवच म्हणायला हवं. माझ्याबरोबरच कसोटी पदार्पण करणाऱ्या वकार युनूसने माझा त्रिफळा उडवला. पॅव्हिलियनमध्ये परतताना मनाचा एकच गोंधळ उडाला होता. स्वत:वरच्या अविश्वासाने मन ग्रासून गेलं होतं.

माझ्या कारकिर्दीतला तो फार महत्त्वाचा क्षण होता. स्थानिक क्रिकेटमध्ये चमकदार कामगिरी करत मी आंतरराष्ट्रीय स्तरावर येऊन पोचलो होतो. रणजी व इराणी करंडकच्या पहिल्या सामन्यांत मी शतकं झळकवली होती, पण आज आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळताना मी बॉलला साधी बॅटही लावू शकलो नव्हतो. बॅटिंग करताना मी झगडत होतो हे अगदी सरळ व स्वच्छ दिसत होतं. स्थानिक व आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या दर्जामधली प्रचंड तफावत मला कळून चुकली होती.

ती कसोटी अखेर अनिर्णित अवस्थेत संपली. त्या कसोटीत मला फक्त एकदाच बॅटिंग करायची संधी मिळाली. पुढच्या काही दिवसांत मी संघाचे प्रशिक्षक चंदू बोर्डे व माझ्या काही इतर ज्येष्ठ सहकाऱ्यांना भेटलो. फलंदाजीत सुधारणा करण्यासाठी मी नेमकं काय करायला हवं, याबद्दल मला त्यांचा सल्ला हवा होता. रवी शास्त्रींबरोबर माझी सविस्तर चर्चा झाली. त्यांनी मला फलंदाजीला आल्यावर पहिली १५ ते २० मिनिटं मनावर अतिशय संयम ठेवण्यास सांगितलं. कोणत्याही फलंदाजासाठी तो सुरुवातीचा काळ अवघडच असतो. एकदा का मी पाकिस्तानी गोलंदाजांच्या त्या सुरुवातीच्या भडिमाराला शांतपणे तोंड देऊ शकलो, की त्यानंतर मला बॅटिंग करणं खूपच सोपं जाऊ शकेल, असं त्यांना वाटत होतं. खेळपट्टीवर काही वेळ टिकून राहणं हीच खरी गुरुकिल्ली होती, पण प्रश्न होता की मला आणखी एक संधी दिली जाणार आहे का? कारण मला दुसऱ्या कसोटीतच डच्चू मिळण्याची शक्यता होती. पहिल्या डावात मी अतिशय कमी धावा केल्या होत्या. त्याहीपेक्षा ती

इनिंग्ज मी फारच वाईट पद्धतीने खेळलो होतो.

पण फैसलाबादच्या दुसऱ्या कसोटीसाठी निवडलेल्या खेळाडूंमध्ये माझं नाव पाहून माझ्या मनावरचा सगळा ताण निघून गेला.

दुसरी कसोटी. फैसलाबाद – २३ ते २८ नोव्हेंबर, १९८९

आता मात्र ही संधी दवडून चालणार नाही हे मला पक्कं ठाऊक होतं. माझ्या क्षमतेची व मनोनिग्रहाची ती फार मोठी कसोटी ठरणार होती. हिरव्यागार खेळपट्टीवर नाणेफेक जिंकून पाकिस्तानने जेव्हा भारताला फलंदाजीसाठी आमंत्रित केलं, तेव्हा आमच्यासमोरील आव्हान अधिकच बिकट झालं होतं. माझ्या आजपर्यंतच्या कारकिर्दीत अशा प्रतिकूल परिस्थितीला सामोरे गेलेले क्षणच मला सतत आठवत राहिले आहेत. दुबळ्या संघाविरुद्ध निर्जीव खेळपट्टीवर कोणीही भरपूर धावा काढू शकतो, पण उत्कृष्ट गोलंदाजीविरुद्ध प्रतिकूल परिस्थितीत चांगली कामगिरी केल्यानंतरच क्रिकेटपटूला खरं समाधान मिळतं.

पुन्हा एकदा आम्ही अल्पावधीतच विकेट्स गमावल्या. वरची फळी कोसळल्यावर ४ बाद १०१ अशा स्थितीत मी फलंदाजीला उतरलो. या वेळेस मात्र मी माझ्या बॅटिंगच्या स्वाभाविक शैलीला मुरड घातली. फटकेबाजी करण्यापूर्वी वातावरणाचा नीट अंदाज घ्यायचा असं मी ठरवलं होतं. पहिली १५ मिनिटं मी स्वत:ला 'शांतपणे खेळ' असं बजावत खेळपट्टीवर टिकून राहिलो. तो १५ मिनिटांचा काळ माझ्यासाठी खूपच कठीण होता; पण त्यानंतर गोष्टी अनुकूल होत गेल्या. खेळपट्टीच्या बाउन्स व वेगाशी स्वत:ला नीट जुळवून घेतल्यावर हळूहळू माझा आत्मविश्वास वाढू लागला.

१७२ चेंडू खेळून मी माझं पहिलं कसोटी अर्धशतक झळकवलं. त्यानंतर इम्रान खानने मला ५९ धावांवर बाद केलं. तोपर्यंत संजय मांजरेकरबरोबर मी १४३ धावांची भागीदारी केली होती. त्या डावात जरी मी चारच चौकार मारले असले, तरी ती खेळी मला खूप मोठं समाधान देऊन गेली. त्यातून मी एक महत्त्वाचा धडाही शिकलो होतो. तो म्हणजे, प्रत्येक वेळी धडाकेबाज सुरुवात करायला हवी असा हट्ट करणं चुकीचं आहे. त्याहून महत्त्वाचं म्हणजे आंतरराष्ट्रीय क्रिकेट आता मला पेलवता येऊ शकेल, हा आत्मविश्वास त्या इनिंग्जमुळे माझ्यात निर्माण झाला. अर्थात मला शिकण्यासारखं अजून खूप काही होतं. दुसऱ्या डावात मी आठ धावा काढून धावबाद झालो. शतकाजवळ आलेल्या अझरुद्दीनला वाचवण्यासाठी मी स्वत:ची विकेट फेकली. अखेर पाकिस्तानला विजय न मिळवू देण्यात आम्ही यशस्वी झालो. पहिल्या दोन्ही कसोटी अनिर्णित राहिल्यामुळे आता पाकिस्तानी खेळाडूंवर चांगलंच दडपण आलं होतं. कारण मालिकेला सुरुवात होण्याआधी पाकिस्तान ४-० असा विजय मिळवणार, असं अनेकांनी भाकीत केलं होतं. तीच गोष्ट आता पाकिस्तानी खेळाडूंना अस्वस्थ करत होती.

तिसरी कसोटी. लाहोर – १ ते ६ डिसेंबर, १९८९

तिसऱ्या कसोटीसाठी आम्ही फैसलाबादवरून कराचीला पोचलो. संध्याकाळी हॉटेलबाहेर पडायची जोखीम घ्यायला कुणीच तयार नसे. त्यामुळे खेळाडू आणि दौऱ्यावर आलेल्या भारतीय पत्रकार व छायाचित्रकारांमध्ये एक प्रकारची मरगळ व बेचैनी आली होती; पण त्यामधूनच एक अभिनव कल्पना पुढे आली. माझ्या कारकिर्दीत घडलेला तो पहिला व अखेरचा प्रयोग होता. खेळाडू व पत्रकारांनी एकत्र येऊन 'संडे क्लब' सुरू करायचं ठरवलं. संडे क्लबच्या संध्याकाळी गप्पा, संगीत व खाण्यापिण्याची रेलचेल असायची. आम्ही सर्व जण खूप धमाल करायचो. प्रत्येकावर भडक व रंगीबेरंगी कपडे घालायची सक्ती होती. एकूण तो प्रयोग भलताच यशस्वी ठरला. दुर्दैवाने त्या प्रयोगाची कधीच पुनरावृत्ती होऊ शकली नाही. त्या दौऱ्यात खेळाडू आणि पत्रकारांमध्ये एक अनोखं बंधन व एकजूट निर्माण झाली होती. देशाबाहेरील खडतर दौऱ्यात अशा जिव्हाळ्याच्या मैत्रीची नितांत आवश्यकता असते.

एकदा संडे क्लबमध्ये मी निळा पुलओव्हर घातला होता. आस्ट्रेलियन तेज गोलंदाज मर्व्ह ह्यूजसारख्या दाट मिशा वाढवलेला माझा फोटो, जो नंतर अनेकदा छापून आला, तो संडे क्लबमध्ये काढला होता. त्या संध्याकाळचा 'खाना' लाजवाब होता. लाहोरमध्ये माझ्यासारख्या खवय्यांची चंगळ असते. त्या दिवशी समोर ठेवलेले सगळे चमचमीत कबाब मी

अधाशासारखे फस्त केले. त्यानंतर माझ्या आवडत्या ‘हलीम’वर (मांस व मसूर एकत्रितपणे मंदाग्नीवर शिजवून बनवलेला पदार्थ) तर मी तुटून पडलो. त्या पूर्ण दौऱ्यात मी यथेच्छ खाऊन घेतलं. वाढतं वय असल्यामुळे त्या वेळी माझं खाण्याचं प्रमाणही खूप असायचं. मॅच नसलेल्या दिवशी मी ब्रेकफास्टला खिमा पराठे व लस्सी घ्यायचो. भारतात परतेपर्यंत माझं वजनही वाढलं होतं. मी चांगलाच दणकट झालो होतो.

आधीच्या, कराची व फैसलाबाद इथल्या खेळपट्ट्यांपेक्षा लाहोरची खेळपट्टी ही खूपच वेगळी होती. त्याला कारणही तसच होतं. जावेद मियांदादची ती शंभरावी कसोटी होती. जावेद हा लाहोरचा लाडका हिरो होता. साहजिकच जावेदला शतक काढायची संधी मिळावी म्हणून खेळपट्टी अगदी ‘फ्लॅट’ ठेवण्यात आली होती. जावेदने अपेक्षेप्रमाणे शतक ठोकलं; पण त्या निर्जीव खेळपट्टीमुळे त्या कसोटीत दोन्ही संघाचा एकेक डावही पुरा होऊ शकला नाही.

लाहोरला, माझ्या इनिंग्जच्या सुरुवातीलाच इम्रानच्या एका सरळ उसळत्या चेंडूचा मला अंदाज आला नाही. चेंडू माझ्या दंडावर आदळला. अशा निर्जीव खेळपट्टीवरही स्वत:चा बचाव करता न आल्यामुळे मी माझ्यावरच चिडलो होतो. दंडाचे स्नायू बधिर झाले होते. एरवी अशा वेळी मी माझ्या सहजप्रवृत्तीप्रमाणे त्यानंतरचा चेंडू क्रीजबाहेर येऊन सीमारेषापार फटकवला असता, परंतु फैसलाबादला शिकलेला धडा माझ्या उपयोगी आला. मी स्वत:वर नियंत्रण ठेवलं.

माझा डाव शांतपणे रचत मी ९० चेंडूंत ४१ धावा काढल्या, परंतु अब्दुल कादीरला ऑन ड्राइव्ह मारण्याच्या नादात माझा त्रिफळा उडाला. मी फार छान खेळत होतो आणि सहज एक मोठी इनिंग्ज खेळू शकलो असतो. एक चांगली संधी हुकवल्याचं मला दु:ख झालं. अशा प्रकारचा रटाळ अनिर्णित सामना खेळला जाणं हे कसोटी सामन्याच्या आधीच घटत जाणाऱ्या लोकप्रियतेसाठी अधिकच घातक आहे, असंच खेदाने म्हणावं लागेल.

गोड स्वप्न

चौथी व अखेरची कसोटी सियालकोटला होती. तिथे हिरव्यागार खेळपट्टीवर खेळावं लागणार याची आम्हाला खातरीच होती. मालिका जिंकण्यासाठी पाकिस्तानला तीच एकमेव संधी होती. एव्हाना ते, सामना जिंकण्यासाठी अगदी आतुर झाले होते. सियालकोटची कसोटी जर अनिर्णित ठरली असती, तर इम्रान व त्याच्या टीमसाठी ती एक प्रकारची हारच ठरली असती. सियालकोटला आल्यावर मला ‘एमबी मलिक बॅट मॅन्युफॅक्चरिंग’ या कंपनीकडून भेटीचं आमंत्रण आलं. सियालकोट हे पाकिस्तानमधील बॅट निर्मितीचं प्रमुख केंद्र आहे. त्या वेळी माझा कोणत्याही कंपनीशी करार झाला नव्हता. त्यामुळे मनात येईल ती बॅट उचलून मी खेळू शकत होतो. इतर काही खेळाडूंसोबत त्या कंपनीत जाऊन मी माझ्यासाठी दोन-तीन बॅट्स निवडल्या.

माझ्या नवीन बॅट्सनी खेळायला मी खूप अधीर झालो होतो. इतका की, एका रात्री मला त्यावरूनच स्वप्न पडलं. मध्यरात्रीच्या सुमारास ‘माझ्या बॅट्स कुठे आहेत,’ असं जोरजोरात ओरडत मी खोलीबाहेर जाऊ लागलो. मी व्हरांड्यातून जात असताना मला मणिंदर सिंग व रमण लांबा या दोघांनी पाहिलं. ते म्हणाले, *‘‘तेरी बॅट्स तो तेरे पास ही है।’’* (तुझ्या बॅट्स तर तुझ्याचपाशी आहेत.) पण जेव्हा मी त्यावर काहीच न बोलता तसाच पुढे चालत राहिलो, तेव्हा मी झोपेत चालतोय हे त्यांच्या लक्षात आलं. दोघांनी मला खोलीत आणून बिछान्यावर निजवलं. दौरा सुरू होऊन बरेच दिवस झाले होते. एव्हाना रमण व मी चांगले दोस्त बनलो होतो. बॅटिंगच्या बारकाव्यांसंबंधी आम्ही तासन्तास एकमेकांशी बोलत बसायचो. त्याच्या सहवासात खूप मजा येत असे. १९९८मध्ये ढाक्यात तो एक प्रथम दर्जाचा सामना खेळत होता. त्यामध्ये क्षेत्ररक्षण करत असताना डोक्याला चेंडूचा मार लागून त्याचा अकाली मृत्यू झाला. त्याचा दुर्दैवी मृत्यू सर्वांनाच चटका लावून गेला.

चौथी कसोटी. सियालकोट – ९ ते १४ डिसेंबर, १९८९

माझा खेळ पाहण्यासाठी माझा भाऊ अजित, खास सियालकोटला येऊन पोचला. त्यामुळे त्या कसोटीला माझ्या लेखी विशेष महत्त्व प्राप्त झालं. चांगली कामगिरी करण्यासाठी जणू मला प्रेरणाच मिळाली. अजित भारतातून केवळ मॅच

बघण्यासाठी आला आहे हे समजल्यावर, तिथल्या लोकांनी दिलेली प्रेमळ वागणूक व त्याचं केलंलं आदरातिथ्य आजही आम्हा दोघांच्या स्मरणात आहे.

अपेक्षेप्रमाणे सियालकोटची खेळपट्टी हिरवीगार निघाली. परंतु डिसेंबरमधल्या कडाक्याच्या थंडीमुळे सकाळी उशिरापर्यंत धुकं पडलेलं असायचं, त्यामुळे खेळ उशिरा सुरू होऊन वेळेआधी संपायचा. अशा वातावरणाचा फायदा उठवत चारही पाकिस्तानी गोलंदाज आम्हाला भुईसपाट करण्याच्या उद्दिष्टाने दिवसभर आमच्यावर तुफानी मारा करत होते. पहिल्या डावात ३५ धावांवर वासिमने मला पायचीत केलं. तोपर्यंत मी छान खेळत होतो. खेळताना मला मजाही येत होती. या खेपेस मी सुरुवातीपासून जराही न अडखळता खेळलो होतो. प्रत्येक वेळी येणारं दडपणही या वेळी जाणवलं नव्हतं. मी काही सुरेख फटके मारले व ५१ चेंडूत ३५ धावा काढताना धावांची गतीही चांगली राखली.

आम्हाला पहिल्या डावात ७४ धावांची आघाडी मिळाली. भारतातर्फे दोन कसोटी सामने खेळलेल्या द्रुतगती गोलंदाज विवेक राझदान याने भेदक गोलंदाजी करत पाकिस्तानचे पाच खेळाडू ७९ धावांच्या मोबदल्यात बाद केले. त्यामुळे पाकिस्तानचा पहिला डाव २५० धावांत गुंडाळला गेला. साहजिकच पाकिस्तानी गोलंदाजांनी चवताळून दुसऱ्या डावाच्या सुरुवातीला त्वेषाने मारा सुरू केला आणि त्यात आमचे चार गडी लागोपाठ बाद झाले. मी बॅटिंगला सुरुवात केली तेव्हा ४ गडी बाद ३८ धावा, अशी आमची स्थिती होती. सामन्याचा अजून दीड दिवस बाकी होता.

एका बाजूने वकार गोलंदाजी करत होता. त्याच्या सुरुवातीच्या धडाक्यातून प्रथम स्वत:चा बचाव करणं ही माझ्यासाठी अत्यंत आवश्यक गोष्ट होती. माझी फक्त एकच धाव झालेली असताना वकारने मला एक आखूड टप्प्याचा चेंडू टाकला. चेंडू हनुवटीच्या उंचीपर्यंत उडेल अशी माझी अपेक्षा होती, पण माझा अंदाज चुकला. माझ्या अपेक्षेपेक्षा तो सहा इंच अधिक उसळून प्रथम माझ्या हेल्मेटच्या कडेवर आपटला आणि मग दिशा बदलत माझ्या नाकावर आदळला. त्या वेळेस फक्त श्रीकांत व मी, ग्रिल (लोखंड जाळी) असलेले हेल्मेट वापरत नव्हतो. अर्थात ती काही फुशारकी मारण्याची गोष्ट नव्हती, पण तसलं हेल्मेट वापरायची मला सवयच नव्हती. अजित आमच्या ड्रेसिंग रूमसमोर बसला होता. हेल्मेटवर बॉल आपटल्याचा आवाज बसल्याजागीही आपल्याला स्पष्टपणे ऐकू आल्याचं त्याने मला नंतर सांगितलं.

माझ्या नजरेसमोर काळोखी आली होती. डोकंही चांगलंच जड झालं होतं. बॉल नाकावर आदळून स्लिपच्या दिशेने गेला होता. त्या बधिर अवस्थेतच बॉल कुठे गेला आहे, हे पाहायला मी नेहमीप्रमाणे वळलो व रक्ताने माखलेल्या शर्टाकडे माझं लक्ष गेलं. त्याही अवस्थेत जावेद मियांदादने मारलेल्या टोमण्याची मला गंमत वाटली. मला खच्ची करण्यासाठी तो मुद्दाम म्हणत होता, *''अरे तुझे तो अभी हॉस्पिटल जाना पडेगा; तेरा नाक टूट गया है।''* स्टेडियममध्ये फडकणाऱ्या एका घोषणाफलकामुळे मी अधिकच अस्वस्थ झालो. त्यावर लिहिलं होतं – *'बच्चे घर जा के दूध पीके आ।'*

या सर्वांकडे मी जाणीवपूर्वक दुर्लक्ष केलं. तोपर्यंत आमच्या टीमचे डॉक्टर, विश्वास राऊत मैदानावर आले होते. त्यांनी माझी जखम नीट तपासली, त्यावर बर्फ लावला. ड्रेसिंग रूममध्ये परतणार का, असं त्यांनी मला विचारलं; पण मी नकार दिला. माझ्या दृष्टीने तो खरा आव्हानाला सामोरं जाण्याचा क्षण होता. मी जर पॅव्हिलियनमध्ये परतलो असतो, तर मी घाबरलो आहे असा त्याचा अर्थ झाला असता आणि खरंच मी घाबरलेलो नव्हतो. मैदानावर इजा होण्याची ती काही माझी पहिलीच वेळ नव्हती. मात्र एवढा जोरदार आघात मी प्रथमच अनुभवत होतो. पण मी माघार घ्यायला तयार नव्हतो. *'मैं खेलेगा।'* (मी खेळणार) असं मी मनातल्या मनात म्हटलं. माझ्या आत्मसन्मानासाठी ते फार महत्त्वाचं होतं. खेळपट्टीवर न डगमगता उभं राहायचं ठरवून, माझ्या मते, मी प्रतिस्पर्ध्यांना माझा इरादा दाखवून दिला होता.

मी खेळण्याचा निर्णय घेतलेला पाहून इम्रानने जावेदला माझ्यापासून दूर जाण्यास सांगितलं. पाकिस्तानचे सर्व खेळाडूही आपापल्या जागांवर परतले. खेळ पुन्हा सुरू झाल्यावर वकारने माझ्या पायावर येणारा खोल टप्प्याचा चेंडू टाकला. तो फ्लिक करत मी चौकार मारला. त्यानंतर मी ऑफ साइडला ड्राइव्ह करत आणखी एक चौकार मारला. त्या दोन चौकारांमुळे माझ्या मनावरचा ताण निघून गेला. केवळ अपमानाचा बदला घेण्यासाठी उगाचच आक्रमक न होता मी प्रत्येक चेंडू नीट पारखून खेळत होतो. लवकरच चहापानाची वेळ झाली व नीट सावरण्यासाठी मला पुरेशी उसंत मिळाली.

चहापानानंतर मी उत्तम बॅटिंग करू लागलो. मला आत्मविश्वास वाटू लागला होता. काही झालं तरी बाद व्हायचं नाही, असा मी निर्धार केला होता. तो पूर्ण दिवस मी खेळून काढला. सामना अनिर्णित राखण्याची शक्यता आता अधिक वाढली होती. हॉटेलवर पोचल्यावर मला पुन्हा डोकं जड झाल्यासारखं वाटू लागलं. संध्याकाळी आम्हाला एका कार्यक्रमाचं निमंत्रण होतं, पण व्यवस्थापक चंदू बोर्डेंची परवानगी घेऊन मी त्या कार्यक्रमाला जायचं टाळलं. काही वेदनाशामक गोळ्या घेऊन, मी अजित व नवज्योत सिद्धूबरोबर जेवण केलं. त्यामुळे मन शांत होऊन मी निश्चिंतपणे झोपी गेलो. रात्रीच्या गाढ झोपेनंतर जेव्हा मी सकाळी उठलो, तेव्हा मी अखेरच्या दिवसाच्या आव्हानासाठी सज्ज झालो होतो. आदल्या दिवशी खेळ संपला तेव्हा आमच्या ४ बाद १०२ धावा झाल्या होत्या. पाकिस्तानला कसोटी जिंकण्याची संधी न देण्यासाठी आम्हाला अजून किमान दोन तास तरी खेळपट्टीवर टिकून राहावं लागणार होतं.

मी आणि नवज्योत सिद्धूने चिवटपणे फलंदाजी केली. इम्रानने मला ५७ धावांवर बाद केलं. कसोटी क्रिकेटमधलं ते माझं दुसरं अर्धशतक होतं. पाकिस्तानला त्यांच्या घरच्या मैदानावर विजय न मिळवून देणं ही भारतीय संघाने केलेली खूप मोठी कामगिरी होती. विशेषत: त्यांच्यापाशी इतके जबरदस्त गोलंदाज असताना त्यांना जिंकू न देणं, ही खूप अवघड गोष्ट होती. त्यामुळे आमच्या संघाचं मनोधैर्य कमालीचं उंचावलं. आमच्या कामगिरीमुळे आम्ही भलतेच खूश झालो होतो.

अब्दुल कादीरचं षटक

कसोटी सामन्यानंतर आम्ही पाच एकदिवसीय सामन्यांची मालिका खेळलो. त्यातल्या एकही सामन्यात निर्धारित ५० षटकांचा खेळ पूर्ण होऊ शकला नाही. काही सामन्यांत पावसामुळे व्यत्यय आला. तिसरा सामना प्रेक्षकांच्या हुल्लडबाजीमुळे अर्धवट सोडून द्यावा लागला. त्या सामन्यात मनोज प्रभाकरांच्या अप्रतिम स्विंग गोलंदाजीमुळे पाकिस्ताची २९-३ अशी दयनीय स्थिती झाली होती. पहिला सामना पेशावरला १६ डिसेंबर, १९८९ रोजी खेळला जाणार होता; पण पावसामुळे तो रद्द करावा लागला होता. प्रेक्षक मात्र त्या पावसातही शेवटपर्यंत स्टेडियममध्ये बसून राहिले होते. अखेर प्रेक्षकांसाठी दोन्ही संघाने २०-२० षटकांचा एक प्रदर्शनीय सामना खेळण्याचं मान्य केलं. क्रिकेटच्या इतिहासातला तो कदाचित पहिलाच टी-२० सामना असावा. प्रेक्षकांना पैसे वसूल झाल्याचं समाधान मिळवून द्यायची ती एक नामी कल्पना होती. क्रिकेटचं एकूण स्वास्थ्य व भवितव्य अखेर प्रेक्षकांच्याच हातात असतं.

भारत व पाकिस्तान या दोन संघांत खेळला जाणारा एखादा प्रदर्शनीय सामनाही अतिशय गंभीरपणे व हिरिरीने खेळला जातो. मला वाटतं, माझ्या या मताशी बहुतेक जण सहमत होतील. पेशावरच्या त्या सामन्यात पाकिस्तानने पहिल्या इनिंग्जमध्ये १५७ धावा केल्या. मी खेळायला उतरलो तेव्हा तीन गडी बाद झाले होते. जिंकण्यासाठी षटकामागे ११हून जास्त धावगतीची (रन रेट) गरज होती. माझ्याबरोबर कर्णधार श्रीकांत फलंदाजी करत होते. सामना जिंकणं अशक्य वाटत होतं. आपण खेळपट्टीवर टिकून राहून पुढच्या सामन्यासाठी थोडा सराव करू असं श्रीकांतनी मला सुचवलं. मी मात्र गोलंदाजांवर जोरदार हल्ला करण्याच्या मन:स्थितीत होतो. चांगली फटकेबाजी केली तर मॅच जिंकता येणं शक्य होतं. माझं हे मत मी श्रीकांतना सांगितलं. ते ऐकून त्यांना खूपच आश्चर्य वाटलेलं दिसलं; पण त्यांनी मला मोकळेपणाने फलंदाजी करायची परवानगी दिली. पाकिस्तानचा त्या वेळचा नवोदित व होतकरू गोलंदाज मुश्ताक अहमद बोलिंग करत होता. मी त्याच्या पहिल्याच षटकात दोन षटकार व एक चौकार ठोकले. दोन्ही षटकार मी लाँग ऑनवरून मारले होते, पण दुसऱ्या षटकाराच्या वेळी चेंडू ड्रेसिंग रूमची खिडकी फोडून आत घुसला होता. मी इतकी जोरदार टोलेबाजी करेन, अशी पाकिस्तानी खेळाडूंची अपेक्षा नव्हती. अब्दुल कादीर हा त्यांचा त्या वेळी अनुभवी व हुकमी गोलंदाज होता. तो माझ्याजवळ आला व म्हणाला, *''बच्चेको क्यूँ मार रहे हो; दम है तो मुझे मारके दिखाओ।''* मी त्याला म्हटलं की, तू एक महान गोलंदाज आहेस. तू मला इतकं सहज मारायला देणार नाहीस.

दोन षटकं बाकी होती व आम्हाला ४०हून अधिक धावा हव्या होत्या. एकोणिसावं षटक टाकायला अब्दुल कादीर आला. आक्रमण हाच आमच्यापाशी एकमेव मार्ग होता. चेंडू जर माझ्या टप्प्यात आला तर तो तडकावायचा असं मी मनाशी

ठरवलं होतं. तसंच झालं. चेंडू मला हवे तसे पडले व मी त्या षटकात तब्बल २८ धावा ठोकल्या. पहिल्या चेंडूवर मी लाँग ऑनवरून षटकार खेचला. तिसऱ्या चेंडूवर चौकार. चौथ्या चेंडूवर दुसरा षटकार. तो षटकार मी गोलंदाजाच्या डोक्यावरून सरळ रेषेत मारला होता. मी सरळ मारतो आहे असं पाहून कादीरने पाचवा चेंडू मुद्दाम ऑफ स्टम्पच्या खूप बाहेर टाकला. मला तो यष्टिचीत करू पाहत होता; पण तो असं करणार हे मी आधीच ताडलं होतं. त्या चेंडूवर मी लाँग ऑफवरून षटकार मारला. त्या ओव्हरमधला तो तिसरा षटकार होता. शेवटचा चेंडू तर त्याने ऑफ स्टम्पच्या आणखीनच बाहेर टाकला. मी शरीर ताणून देत त्या चेंडूवरही लाँग ऑफवरून चौथा षटकार ठोकला.

आदल्या षटकापर्यंत पाकिस्तानी प्रेक्षकांना त्यांच्या विजयाची खातरी वाटत होती. त्यामुळे ते निश्चिंत होते. एकोणिसाव्या षटकात सामन्याला अचानक मिळालेल्या कलाटणीमुळे ते बिथरले व गोंधळ घालू लागले. खेळामध्येही अचानक वेगळंच चैतन्य आलं. सामना आता जिद्दीने खेळला जाऊ लागला. कोण जिंकणार याचा अंदाज बांधणं अवघड झालं होतं. विसावं षटक वासिम आक्रम टाकणार होता. आम्हाला जिंकण्यासाठी १४ धावा हव्या होत्या. अखेर आम्हाला तीन धावा कमी पडल्या. मॅच संपल्यानंतर अब्दुल कादीर खिलाडूवृत्तीने माझ्यापाशी येऊन म्हणाला, *''बहुत अच्छा बॅटिंग!''*

पेशावरच्या त्या डावात मी १८ चेंडूत ५३ धावा काढल्या. माझ्या एकूण क्रिकेट कारकिर्दीवर त्या इनिंग्जचा लक्षणीय परिणाम झाला. त्या धुवांधार खेळीमुळे लोक माझी सियालकोटची इनिंग्ज विसरले. सियालकोटमध्ये प्रतिकूल परिस्थितीत जिद्दीने केलेली बॅटिंग मला जास्त महत्त्वाची वाटत होती. सियालकोटच्या त्या इनिंग्जमुळे आम्ही सामना व मालिका वाचवण्यास यशस्वी ठरलो होतो, पण पेशावरला मी केलेली तडाखेबाज फलंदाजी हाच प्रत्येकाच्या तोंडी चर्चेचा विषय झाला होता. त्याच इनिंग्जमुळे मी भारतातल्या घराघरात जाऊन पोचलो. पहिल्यांदाच लोक माझी स्वाक्षरी मागू लागले होते. स्वाक्षरी देताना मात्र मी खूपच अवघडून जायचो. पाकिस्तानला जाण्याआधी मी माझ्या मित्रांबरोबर भेळ खायला सहज बाहेर पडू शकत होतो. त्यानंतर जेव्हा मी मित्रांबरोबर बाहेर जाऊ लागलो, तेव्हा 'तूच का तो सचिन तेंडुलकर?' असं लोक मला अडवून विचारू लागले. पेशावरच्या एका इनिंग्जमुळे हे सारं घडलं होतं. मी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये तेव्हा स्थिरावलो होतो, असं म्हणणं थोडं अपरिपक्वपणाचं ठरलं असतं, तरी त्या इनिंग्जमुळे मी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये माझा पाय घट्ट रोवला होता.

मी घरी आलो तेव्हा माझ्या आई-वडिलांना साहजिकच माझ्या कर्तृत्वाचा अभिमान वाटत होता. पण यश अवास्तव पद्धतीने साजरं करायची आमच्या घरात सवय नव्हती. माझ्या वडिलांना खूप आनंद झाला आहे व मनातून समाधान वाटत आहे हे मला समजत होतं, पण काही झालं तरी ते आक्रस्ताळेपणाने आपल्या भावना व्यक्त करणार नाहीत हेही मला तितकंच ठाऊक होतं. माझ्या हातून काही चांगली कामगिरी झाली, तर माझी आई फक्त देवासमोर दिवा लावून मिठाई ठेवत असे. त्यापलीकडे काही नाही. अनेकदा लोक माझ्या मैदानावरील कामगिरीपेक्षा माझ्या मैदानाबाहेरील वागणुकीचं अधिक कौतुक करतात. माझे पाय जमिनीवर आहेत, असं ते म्हणतात. ते जर खरं असेल, तर त्याचं श्रेय माझ्या कुटुंबाला आहे, हे मी न संकोचता सांगेन.

अजित पाकिस्तानला आल्यामुळे मला त्याची खूपच मदत झाली. रोज संध्याकाळी मी कसा खेळलो व आणखी काय सुधारणा करता येईल यावर आम्ही बोलत असू. खरंतर संघातील अनेक ज्येष्ठ खेळाडूंशी मी याविषयी चर्चा करू शकत होतो, पण अजितशी मी अगदी मनमोकळेपणाने बोलू शकायचो. अजितला माझी खेळण्याची पद्धत पूर्ण ठाऊक होती. त्याच्याच नजरेखाली मी क्रिकेटर म्हणून घडलो होतो. साहजिकच त्याने नोंदवलेली निरीक्षणं माझ्यासाठी फार मोलाची होती.

पाकिस्तानमधून परतल्यावर क्रिकेटर म्हणून माझा स्वत:वरचा विश्वास अधिक वाढला होता. मला आता १९९०च्या सुरुवातीला ठरलेल्या न्यूझीलंड दौऱ्याचे वेध लागले होते. माझी निवड होईल याची मला खातरी होती, तरीही दौऱ्यासाठी निवड झालेल्या भारतीय संघात प्रत्यक्षात माझं नाव बघून मला झालेला आनंद मात्र अवर्णनीय होता.

भारत-पाकिस्तान मालिका १९८९

पहिली कसोटी. कराची – १५ ते २० नोव्हेंबर, १९८९

पाकिस्तान ४०९ (इम्रान खान १०९*, जे मियांदाद ७८, एस महम्मद ६७; एम प्रभाकर ५-१०४, कपिल देव ४-६९) व ३०५-५ घोषित (एस मलिक १०२*, एस महम्मद ९५; कपिल देव ३-८२)

भारत २६२ (केएस मोरे ५८*, कपिल देव ५५, **एसआर तेंडुलकर** १५; डब्ल्यू अक्रम ४-८३, डब्ल्यू युनूस ४-८०) व ३०३-३ (एसव्ही मांजरेकर ११३*, एनएस सिद्धू ८५)

सामना अनिर्णित

दुसरी कसोटी. फैसलाबाद – २३ ते २८ नोव्हेंबर, १९८९

भारत २८८ (एसव्ही मांजरेकर ७६, **एसआर तेंडुलकर** ५९; इम्रान खान ४-४५) व ३९८-७ (एम अझरुद्दीन १०९, एसव्ही मांजरेकर ८३, एनएस सिद्धू ५१, **एसआर तेंडुलकर** ८)

पाकिस्तान ४२३-९ घोषित (ए मलिक ११७, एस मलिक ६३, आर राजा ५८*, एम प्रभाकर ६-१३२)

सामना अनिर्णित

तिसरी कसोटी. लाहोर – १ ते ६ डिसेंबर, १९८९

भारत ५०९ (एसव्ही मांजरेकर २१८, एम अझरुद्दीन ७७, आरजे शास्त्री ६१, **एसआर तेंडुलकर** ४१; ए कादीर ३-९७)

पाकिस्तान ६९९-५ (एस महम्मद २०३, जे मियांदाद १४५, ए मलिक ११३)

सामना अनिर्णित

चौथी कसोटी. सियालकोट – ९ ते १४ डिसेंबर, १९८९

भारत ३२४ (एसव्ही मांजरेकर ७२, एम अझरुद्दीन ५२, **एसआर तेंडुलकर** ३५; डब्ल्यू अक्रम ५-१०१) व २३४-७ (एनएस सिद्धू ९७, **एसआर तेंडुलकर** ५७; इम्रान खान ३-६८)

पाकिस्तान २५० (आर राजा ५६; व्ही राझदान ५-७९)

सामना अनिर्णित

मालिका अनिर्णित ०-०

४.
परदेशातील वातावरण

कोणाही भारतीय क्रिकेटरसाठी न्यूझीलंडचा दौरा हा सर्वांत कठीण आणि आव्हानात्मक असतो. आपल्या व तिथल्या हवामानात खूपच फरक आहे. तिथे तुम्हाला बोचरे वारे व कडाक्याची थंडी अशा प्रतिकूल हवामानाचा सतत सामना करावा लागतो. शिवाय अडचणीत आणखी भर म्हणजे, तिथल्या मैदानांवरच्या सीमारेषाही आपल्यापेक्षा खूपच कमी अंतरावर असतात. १९९० सालच्या दौऱ्यात भारतीय संघाला हवामानाइतकीच रिचर्ड हॅडली ह्यांचीही दहशत वाटत होती. त्यामुळे त्या दौऱ्याचं आव्हान दुप्पट कठीण होतं. रिचर्ड हॅडली हे जगातील सर्वोत्कृष्ट स्विंग गोलंदाजांपैकी एक समजले जातात. १९९०मध्ये ते आपल्या कारकिर्दीच्या जवळजवळ सर्वोच्च शिखरावर होते. १७ वर्षांच्या कोवळ्या वयात मी प्रथमच उपखंडाबाहेरचा परदेश दौरा करत होतो. मला मिळालेल्या त्या संधीने मी अगदी हरखून गेलो होतो.

भारत-न्यूझीलंड मालिका, फेब्रुवारी-मार्च, १९९०

न्यूझीलंडमध्ये रुळताना सुरुवातीला खूपच त्रास झाला. स्थानिक लोकांचे शब्दोच्चार ऐकायला व समजायलाही अवघड होते. तिथलं जेवण पचनी पडायला तर बरेच दिवस जावे लागले. दौऱ्याच्या सुरुवातीला शब्दोच्चारांच्या गोंधळामुळे मनोज प्रभाकर यांच्यावर एक विचित्र प्रसंग ओढवला होता. मनोज प्रभाकरना आपली गॅजेट्स चार्ज करण्यासाठी ॲडॅप्टर हवा होता. त्यांनी हॉटेलच्या व्यवस्थापन विभागाला फोन केला. फोनवर त्यांनी अचानक न्यूझीलंडच्या 'ॲक्सेन्ट'मध्ये बोलायला सुरुवात केली. 'आपल्याला ॲडॅप्टर हवा आहे,' असं सांगताना त्यांनी 'ॲ' हे अक्षर मुद्दाम गाळून, आपल्याला 'डॅप्टर' हवा आहे असं सांगितलं. व्यवस्थापन विभागातला कर्मचारी गोंधळला. प्रभाकरना नक्की काय हवंय ते त्याला समजेना. त्यावर प्रभाकर संतापले. मला ताबडतोब 'डॅप्टर' हवा आहे असं जोरात सांगून त्यांनी फोन ठेवला. काही मिनिटांतच रूमची बेल वाजली. प्रभाकरनी दरवाजा उघडला तर समोर एक डॉक्टर उभे होते. त्या कर्मचाऱ्याने 'डॅप्टर'ऐवजी 'डॉक्टर' असं ऐकलं होतं. (किंवा तिथे 'डॉक्टर'चा उच्चार 'डॅक्टर' असा करतात म्हणूनही गैरसमज झाला असावा.) त्यामुळे त्या बिचाऱ्याने तिथल्या निवासी डॉक्टरला तातडीने प्रभाकर यांच्या रूमवर पाठवलं होतं.

दौऱ्यातील पहिला सामना न्यू प्लायमाउथला होता. मैदानाच्या चारही बाजूला उंच टेकड्या होत्या. मैदान जणू डोंगरामध्ये पेरल्यासारखं वाटत होतं. जागतिक दर्जाचे डावखुरे फिरकी गोलंदाज बिशन सिंग बेदी हे आमचे व्यवस्थापक होते. बेदी शिस्तीला अतिशय कडक होते. आमचा फिटनेस वाढवण्यासाठी ते आम्हाला दूरवर धावायला लावत. न्यू प्लायमाउथला तर आम्हाला धावत डोंगर चढावा लागे. त्यामुळे सराव सत्राच्या अखेरीस आमच्या अंगात त्राणही उरलेलं नसे.

पाकिस्तानप्रमाणे इथेही माझ्या दौऱ्याची सुरुवात फारशी चांगली झाली नाही. २ फेब्रुवारीला ख्राइस्टचर्च येथे सुरू झालेल्या पहिल्या कसोटीत डॅनिस मॉरिसनने मला भोपळाही फोडू दिला नाही. मॉरिसनने टाकलेला चेंडू अप्रतिमच होता; पण बाद झाल्यावर न्यूझीलंडच्या क्षेत्ररक्षकांनी मला दिलेला 'सेंड ऑफ' जास्त मनोरंजक होता. बहुतेक खेळाडू मला 'शाळकरी मुलगा' म्हणून संबोधत होते. f या अक्षरापासून तयार होणाऱ्या शब्दांची तर सर्वांकडून लयलूट होत होती. 'तुझ्यापाशी आंतरराष्ट्रीय दर्जाही नाही आणि तेवढी तुझी लायकीही नाही. तू आपल्या तुझ्या शाळेतल्या मित्रांबरोबर जाऊन खेळ,' असंही काही जण मला सुचवत होते. मी एकही शब्द बोललो नाही.

दुसऱ्या डावात माझी बॅटिंग थोडी सुधारली. ४४ चेंडू खेळताना मी तासभर खेळपट्टीवर उभा होतो. मी फक्त २४ धावा काढल्या; पण यातून इतक्या प्रतिकूल वातावरणातही मी बराच वेळ एकटा किल्ला लढवू शकतो, हा विश्वास मला मिळाला. जॉन ब्रेसवेलच्या गोलंदाजीवर अंगाजवळ आलेला चेंडू कट करण्याच्या प्रयत्नात मी बाद झालो; पण मी रिचर्ड हॅडलींना समर्थपणे तोंड देऊ शकलो हा मला माझा पराक्रमच वाटला. हॅडलींचे पहिले दोन्ही चेंडू बाउन्सर होते. परंतु दोन्ही चेंडू कमालीचे वेगळे होते. पहिला आउट स्विंगिंग बाउन्सर होता. खेळपट्टीवर आपटून बाहेरच्या दिशेने निघून गेला; दुसरा चेंडूही अगदी त्याच जागेवर पडला; परंतु मला शेवटपर्यंत चेंडूवर नजर ठेवून अखेरच्या क्षणी चेंडूच्या रेषेपासून डोकं बाजूला न्यावं लागलं होतं. इतकी विलक्षण क्षमता त्यांच्यापाशी होती. त्यांना रोखण्यासाठी तुमच्यापाशी बॅटिंगचं सर्वोत्तम तंत्र असणं गरजेचं होतं.

न्यूझीलंडने पहिली कसोटी १० गडी राखून जिंकली. दुसरी कसोटी त्यानंतर काही दिवसांनी, म्हणजे ९ फेब्रुवारीला नेपियरला सुरू झाली. नाणेफेक जिंकून आम्ही फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. पहिल्या दिवसाचा खेळ पावसामुळे वाया गेला. मॅच दुसऱ्या दिवशी सुरू झाली. तिसऱ्या दिवसाचा खेळ संपताना मी ८० धावांवर नाबाद होतो. चेंडू कमालीचा स्विंग होत होता. बॅटिंग करणं खरोखरच अवघड होतं. घरच्या मैदानांवर मी जसा खेळायचो, तसा इथे मी गोलंदाजांवर आक्रमण करण्याचा एकदाही प्रयत्न केला नाही.

मी चौथ्या दिवशी जेव्हा खेळायला सुरुवात केली, तेव्हा माझं पहिलं कसोटी शतक मला खुणावत होतं. शतकाला फक्त २० धावा कमी होत्या. ही संधी सोडायची नाही, असं मी मनात पक्कं ठरवलं होतं. माझी सुरुवातही चांगली झाली. डॅनी मॉरिसनच्या पहिल्याच चेंडूवर मी चौकार मारला. त्या षटकातले उरलेले सर्व चेंडू त्याने आखूड टप्प्याचे टाकले. मी पाचही चेंडू शांतपणे सोडून दिले. त्याच्या पुढच्या षटकातल्या पहिल्याच चेंडूवर मी पुन्हा चौकार मारला. पुढचा चेंडूही बॅटच्या टप्प्यात होता. चेंडू ड्राइव्ह करायचा असं मी आधीच ठरवलं होतं; परंतु मी शॉट नीट मारू शकलो नाही. चेंडू हवेत उडाला. न्यूझीलंडचे कर्णधार जॉन राइट यांनी ८८ धावांवर माझा झेल घेतला.

मला खूप वाईट वाटलं. पॅव्हिलियनमध्ये परतताना मी अश्रू आवरू शकलो नाही. शतकाला फक्त १२ धावा असताना असा शॉट मी का मारला? मी स्वत:ला दूषणं देत होतो. सीमारेषेवर पोचलो तेव्हा माझ्या गालांवरून अश्रू ओघळत होते. सुदैवाने त्या वेळी फारसे कॅमेरे नव्हते. आजच्या काळात एखाद्या छायाचित्रकाराने माझा रडका फोटो टिपून त्याला नको तेवढी प्रसिद्धी दिली असती. ड्रेसिंग रूममध्ये गेल्यावर मी तडक बाथरूम गाठलं. बाथरूममध्ये जाऊन मी मनसोक्त रडलो. पहिलं शतक १२ धावांनी हुकणं ही गोष्ट मनाला खूपच क्लेश देणारी होती. मला नंतर समजलं की, माझं शतक झालं असतं तर जगातला मी सर्वांत तरुण शतकवीर ठरलो असतो. मी सोन्यासारखी संधी वाया घालवली होती. २००५मध्ये जॉन राइट भारतीय संघाचे प्रशिक्षक होते. ''तुम्ही त्या वेळी माझा झेल घ्यायला नको होता,'' असं मी तेव्हा जॉन राइटना थट्टेने म्हटलं होतं.

आम्ही ती कसोटी मालिका अखेर ०-१ अशी हरलो. त्यानंतर आम्ही तीन देशांचा सहभाग असलेली 'रॉथमन्स कप' एकदिवसीय क्रिकेट मालिका खेळलो. तिसरा संघ आस्ट्रेलियाचा होता. १ मार्चला ड्यूनेडिनला न्यूझीलंडविरुद्ध पहिला सामना होता. त्या सामन्यातही पहिल्या कसोटीप्रमाणे मी शून्यावर बाद झालो. मध्यमगती गोलंदाज शेन थॉम्सनने स्वत:च्याच गोलंदाजीवर माझा झेल घेतला. फरक इतकाच होता की, या वेळेस मी पहिल्याऐवजी दुसऱ्या चेंडूवर बाद झालो होतो. शेवटी, तो सामना आम्ही १०८ धावांनी हरलो.

६ मार्च, १९९०ला पुढची मॅच होती. त्यात मी चांगली कामगिरी करू शकलो. तो सामना स्पर्धेच्या दृष्टीने महत्त्वाचा होता. आम्ही आस्ट्रेलियाविरुद्धची दुसरी मॅच हरलो होतो. स्पर्धेत टिकून राहण्यासाठी न्यूझीलंडला हरवणं आवश्यक होतं. मी ३९ चेंडूत ३६ धावा काढल्या. त्या इनिंग्जमध्ये मी द्रुतगती गोलंदाजांवर जोरदार हल्ला चढवत बरेच चौकार मारले. आम्ही तो सामना एका धावेने जिंकलो. मार्टिन स्टेडनला धावबाद करून कपिल देवनी आपल्या शेवटच्या षटकात रिचर्ड हॅडलींचा त्रिफळा उडवला. चौफेर कामगिरीमुळे कपिल देव सामनावीर ठरले. अधिकृत एकदिवसीय सामन्यात पहिल्यांदाच मी केलेली

खेळी संघासाठी उपयोगी ठरली होती; पण त्या खेळीचा आनंद मी साजरा करू शकत नव्हतो. सामना खेळताना माझ्या उजव्या मांडीचा स्नायू दुखावला गेला. मला मैदानावरून उचलून ड्रेसिंग रूममध्ये आणावं लागलं. संध्याकाळपर्यंत मला चालता येईनासं झालं. पुढचे काही दिवस हालचाल करण्यासाठी मला कुबड्यांचा आधार घ्यावा लागला. माझ्या कारकिर्दीत मला झालेली ती पहिलीच मोठी इजा होती. माझ्यासाठी ती मालिका संपली होती.

आम्ही न्यूझीलंडमध्ये असताना भारताच्या ख्यातनाम गायिका आशा भोसले यांच्या गाण्याचा कार्यक्रम वेलिंग्डनला आयोजित केला होता. आम्ही सर्वांनी त्या कार्यक्रमाला जायचं ठरवलं. आशाजींना मी जाहीर कार्यक्रमात गाताना प्रथमच ऐकलं. तो अनुभव अविस्मरणीय होता. स्वरसम्राज्ञी आशा भोसले व गानकोकिळा लता मंगेशकर या भारताच्या दोन महान गायिका आहेत. त्यांचं प्रत्यक्ष गाणं ऐकणं हा प्रत्येक वेळी माझ्यासाठी आनंदाचा ठेवा असतो.

मी भारतात परतल्यावर माझ्या बाबांनी मला फार महत्त्वाचा सल्ला दिला. ते म्हणाले की, ''तुझ्यामधील क्रिकेटक्षमता ही देवाने तुला दिलेली देणगी आहे. या क्षमता तू आता अधिक धारदार करायला हव्यास.'' त्यांचं म्हणणं मला पटलं. वेगवान स्विंग गोलंदाजी खेळण्याच्या कलेवर मी प्रभुत्व मिळवणं आवश्यक होतं. मी सबंध दिवस स्वत:ला नेट्समध्ये जुंपून घ्यायचं ठरवलं.

भारत-इंग्लंड मालिका, जुलै-ऑगस्ट, १९९०

न्यूझीलंड मालिकेनंतर काही महिन्यांनी भारतीय संघ इंग्लंडच्या दौऱ्यावर गेला. त्या वर्षातील ती सर्वांत महत्त्वाची मालिका होती. त्याआधीची इंग्लंडमधील १९८६ सालची मालिका भारताने जिंकली होती. आम्हाला इतिहासाची पुनरावृत्ती करायची होती. मालिका सुरू होण्याआधी खेळाडूंच्या सरावासाठी बंगळुरूला एक शिबिर आयोजित केलं होतं. तिथेही बिशन सिंग बेदींनी आम्हाला दर दिवशी मैलोन्मैल धावायला लावण्याचं धोरण सुरूच ठेवलं होतं. चिन्नास्वामी स्टेडियमसमोर असलेल्या क्यूबन पार्कमध्ये आम्ही धावण्याचा व्यायाम करत असू. सर्वांना एका रांगेत धावायला सांगितलं जाई. रांगेतल्या शेवटच्या खेळाडूला जोराने धावत ओळीच्या अग्रभागी जाऊन पोचावं लागे. सर्व खेळाडूंसाठी हाच व्यायाम प्रकार असे. त्या रोजच्या धावण्यामुळे सर्वांची दमछाक होत असे. त्यावरून मनोज प्रभाकर एकदा थट्टेने म्हणाले होते की, ''मी आता एवढ्या वेगाने धावू लागलोय की मॅचमध्ये गोलंदाजी करताना चेंडूच्या आधी मीच फलंदाजापाशी पोचलेला असेन.''

मी त्यापूर्वी १९८७-८८ आणि १९८८-८९मध्ये इंग्लंडला गेलो होतो. कैलाश गट्टानीच्या (भारतातील स्थानिक स्पर्धेत राजस्थानतर्फे प्रथम दर्जाचे सामने खेळलेला द्रुतगती गोलंदाज) 'स्टार क्रिकेट क्लब'तर्फे मी ते दोन्ही दौरे केले होते. कोलकात्याच्या 'यंग क्रिकेटर्स ऑर्गनायझेशन'ने त्या वेळी माझ्या विमानप्रवासाच्या खर्चाची सोय केली होती. इतर गोष्टींबरोबर त्या दौऱ्यातील जेवण माझ्या विशेष लक्षात राहिलं आहे. आम्ही तिथल्या शाळा-कॉलेजच्या डॉर्मिटरीत राहायचो व त्यांच्या भोजनकक्षामध्ये ब्रेकफास्ट करायचो. त्या वेळी ब्रेकफास्टला 'कोल्ड मीट' या पदार्थाचा मी पहिल्यांदाच आस्वाद घेतला. थंड असलेलं मांससुद्धा खाल्लं जातं, ही माझ्यासाठी खरोखरच आश्चर्याचीच गोष्ट होती!

तिथल्या अनेक प्रकारच्या गाड्या पाहूनही मी थक्क झालो होतो. आमच्याकडे तेव्हा स्वत:ची गाडी नसली तरी मला गाड्यांमध्ये खूपच रस होता. कैलाश गट्टानीने एक भलीमोठी आरामशीर 'सेदान' गाडी भाड्यावर घेतली होती. मला अशा गाड्यांमधल्या इंजिनांची, त्यातल्या वेगवेगळया भागांची तांत्रिक माहिती व त्यासंबंधीचे बारीकसारीक तपशील जाणून घ्यायची खूप आवड होती. क्रिकेटव्यतिरिक्त अशा गोष्टींमध्ये माझं मन रमत असे. परदेशातल्या विविध भागात जाऊन असे शोध घेण्यात मला मोठी मौज वाटे. 'क्रिकेट विश्वाची मक्का' समजल्या जाणाऱ्या लॉर्ड्स मैदानावर पोचल्यानंतर लहानपणापासून पाहिलेलं स्वप्न साकार झाल्याचा प्रत्यय मला आला. एक भारतीय खेळाडू म्हणून अशा ऐतिहासिक मैदानांवर खेळताना माझ्या महत्त्वाकांक्षेला धुमारे फुटत.

१९९०च्या दौऱ्याला काही प्रथम दर्जाच्या सामन्यांनी आरंभ झाला. त्यानंतर दोन एकदिवसीय आंतरराष्ट्रीय सामने

खेळले गेले. सुरुवातीच्या मॅचेसमध्ये माझी बॅटिंग छान झाली होती; पण १८ जुलैला झालेल्या पहिल्या एकदिवसीय सामन्यामध्ये मी फक्त १९ धावा काढल्या. आम्ही ती मॅच जिंकल्यामुळे मी फारसा निराश झालो नाही. त्या सामन्यात मांजरेकर व अझरुद्दीनने अप्रतिम फलंदाजी केली. २० तारखेला नॉटिंगहॅमला होणाऱ्या दुसऱ्या सामन्यात विजय मिळाला, तर मालिका जिंकण्याची संधी आम्हाला मिळणार होती.

दुसऱ्या मॅचमध्ये इंग्लंडने खूपच चांगली कामगिरी केली. जन्माने दक्षिण आफ्रिकन असलेल्या रॉबिन स्मिथने चांगली फलंदाजी केली. इंग्लंडच्या एकूण २८१ धावांमध्ये त्याचा १०३ धावांचा वाटा होता. मालिका जिंकण्यासाठी आम्हाला दमदार फलंदाजी करण्याची आवश्यकता होती. मी सहाव्या क्रमांकावर फलंदाजीला गेलो. त्या वेळेस आम्हाला २० षटकांत १४५ धावांची आवश्यकता होती. त्या काळी असे लक्ष्य अवघड समजले जाई. मी २६ चेंडूत झटपट ३१ धावा काढल्या. मी बाद झालो तेव्हा आमची धावसंख्या २४९ होती. जिंकायला अजून ३३ धावा हव्या होत्या. आम्ही ती मॅच जिंकून २-० अशी मालिकाही जिंकलो. त्या सामन्यात अझरने नाबाद ६३ धावा काढल्या. दौऱ्याची सुरुवात मनाजोगती झाली होती. कसोटीत खेळण्यासाठी आम्हाला आत्मविश्वास आला होता.

पहिली कसोटी. लॉर्ड्स – २६ ते ३१ जुलै, १९९०

लॉर्ड्सची पहिली कसोटी ही ग्रॅहॅम गूचच्या विक्रमी कामगिरीसाठी कायम लक्षात राहील. ३३ धावांवर मिळालेल्या जीवदानाचा फायदा उठवत त्याने त्रिशतक झळकवलं. तो अखेर ३३३ धावा काढून बाद झाला. पाठोपाठ दुसऱ्या डावातही त्याने आणखी एक शतक काढलं. भारताने दिलेल्या प्रत्युत्तरात अझरुद्दीनचं शतक महत्त्वाचं ठरलं. कपिल देवनी ऑफ स्पिनर एडी हेमिंग्जला मारलेल्या लागोपाठ चार षटकारांमुळे भारताला फॉलो-ऑनची नामुश्की टाळता आली.

त्या सामन्याच्या दुसऱ्या डावात आमच्या लेग स्पिनर नरेंद्र हिरवाणीच्या गोलंदाजीवर मी इंग्लंडचा प्रमुख फलंदाज ॲलन लॅंबचा झेल पकडला होता. त्या मॅचमधील माझी ती एकमेव लक्षणीय कामगिरी होती. माझ्या कारकिर्दीतला मी घेतलेला तो झेल संस्मरणीय ठरला. हिरवाणीने फसवी दिशा देत टाकलेला तो चेंडू सरळ मैदानाबाहेर भिरकावून देण्यासाठी लॅंब क्रीजच्या बाहेर आला, परंतु त्याला चेंडूच्या टप्प्याचा नीट अंदाज आला नाही. तरीही त्याने तसाच तो शॉट मारण्याचा प्रयत्न केला. त्या प्रयत्नात चेंडू हवेत इतका उंच उडाला की, तो गोलंदाजाच्या मागे २५ यार्डांवर जाऊन पडेल असं मला वाटलं.

मी लॉंग ऑफला उभा होतो. लॅंबने शॉट मारल्या मारल्या मी धावायला सुरुवात केली. लॉंग ऑफच्या नेहमीच्या जागेपासून मी काही यार्ड दूर उभा होतो. त्यामुळे मला तो झेल पकडणं खूपच अवघड होतं; पण मी तो झेल कदाचित पकडू शकेन हे मला धावतानाच्या अखेरच्या टप्प्यावर जाणवलं. मी जवळजवळ २५ यार्ड धावलो होतो, पण तरीही चेंडू माझ्यापासून अजूनही थोडा दूर होता. मी पुढे झेपावू शकत होतो, पण हवेत झेपावल्यामुळे झेल पकडताना मी स्वत:चा तोल सावरू शकणार नाही, हे मला ठाऊक होतं. दुसरा पर्याय होता की, अजून थोडं धावून हात लांब ताणत झेल पकडण्याचा प्रयत्न करणं. मी दुसरा पर्याय निवडला आणि आश्चर्य म्हणजे, ठरल्याप्रमाणे हात ताणत गुडघ्याच्या उंचीवर मी तो झेल पकडला.

झेल पकडल्यावर अत्यानंदाने मी तो चेंडू हवेत भिरकावून दिला. सर्वांनाच आनंद झाला होता. मी तो अशक्यप्राय झेल घेतलेला पाहून हिरवाणी तर अक्षरश: थरारून गेला होता. धावत येऊन त्याने मला मिठी मारली. प्रेक्षकांनीही माझ्या प्रयत्नांना दाद दिली. झेल पकडून मी जेव्हा माझ्या जागी क्षेत्ररक्षण करायला परतलो तेव्हा प्रेक्षकांनी टाळ्या वाजवत माझं स्वागत केलं. असे झेल पकडण्यामागचं एक वैशिष्ट्यपूर्ण तंत्र असतं. झेल सुरुवातीला कितीही अवघड वाटत असला, तरी झेल पकडायचाच असं ठरवून फलंदाजाने शॉट मारल्या मारल्या धावायला सुरुवात करायची व त्यानंतर धावता धावता हवेत हेलकावणाऱ्या चेंडूवर सतत नजर ठेवायची.

आम्ही लॉर्ड्सची कसोटी २४७ धावांच्या मोठ्या फरकाने हरलो. आठवड्यानंतर ओल्ड ट्रॅफर्डला दुसऱ्या कसोटीला

सुरुवात होणार होती. मालिकेतलं आव्हान टिकवण्यासाठी आम्हाला आमचा खेळ सुधारणं गरजेचं होतं.

दुसरी कसोटी. ओल्ड ट्रॅफर्ड – ९ ते १४ ऑगस्ट, १९९०

ओल्ड ट्रॅफर्डला इंग्लंडने पहिल्या डावात पुन्हा ५००हून अधिक धावा केल्या. गूच व माइक ॲथर्टननी शतकं काढली होती. त्या धावसंख्येच्या जास्तीत जास्त जवळ पोचणं आमच्यासाठी आवश्यक होतं. कारण चौथा डाव आम्हाला खेळायचा होता. चौथ्या डावात २५०हून अधिक धावसंख्येचा पाठलाग करणं खराब होत जाणाऱ्या त्या खेळपट्टीवर जवळजवळ अशक्य होतं. अझरने पुन्हा एकदा शतक ठोकलं. वरच्या फळीतले फलंदाजही पहिल्या डावात चांगले खेळले. तळाची मधली फळी थोडी चांगली खेळली असती तर आम्ही इंग्लंडच्या धावसंख्येच्या जवळपास पोचलो असतो. कदाचित आम्हाला आघाडीही मिळाली असती; पण सर्व जण एकापाठोपाठ बाद होत गेल्याने माझ्या साथीला कोणीच उरलं नाही. मी सहाव्या क्रमांकावर खेळायला गेलो तेव्हा आमच्या २४६ धावा झाल्या होत्या. एडी हेमिंग्जला उंचावरून फटका मारण्याच्या प्रयत्नात मी ६८ धावांवर बाद झालो. बाद होणारा मी शेवटचा खेळाडू होतो. हिरवाणी काही चांगल्या दर्जाचा फलंदाज नव्हता, हे तो स्वत:देखील मान्य करेल. त्यामुळे मला फटकेबाजी करून जास्तीत जास्त धावा काढण्यावाचून पर्याय नव्हता. त्याच नादात मी डीप मिड विकेटला उभ्या असलेल्या क्रिस लेविसच्या हाती झेल देऊन बाद झालो.

हिरवाणीबरोबर खेळताना मजा येत असे. खेळपट्टीवर आल्याआल्याच तो मला म्हणाला की, बॅटच्या टप्प्यात जर चेंडू आला तरच मी खेळू शकतो. बाउन्सर खेळताना आपली गाळण उडते. तुझ्यासारख्या तळाच्या फलंदाजाला इंग्लिश गोलंदाज बाउन्सर्स टाकणार नाहीत, असं म्हणत मी त्याला धीर दिला. तो काही वेळ खेळपट्टीवर तग धरू शकला. त्यामुळे हळूहळू त्याला आत्मविश्वास येत गेला. त्या नादात त्याने पुढे येत क्रिस लेविसला एक जोरदार शॉट मारला. क्रिस लेविस चवताळला. अकराव्या फलंदाजाने आपल्याला चोपावं हे त्याला मुळीच रुचलं नव्हतं. तो आता बाउन्सर टाकणार ही काळ्या दगडावरची रेघ होती, पण सुदैवाने लेविसचा चेंडू फटकावताना हिरवाणीची बॅट तुटली होती. बॅट बदलून घेण्यात बराच अवधी गेला. मधल्या काळात लेविसचा राग निवळल्याने हिरवाणी बाउन्सरपासून बचावला.

अखेर ४३२ धावांवर आमचा डाव आटोपला. इंग्लंडला पहिल्या डावात ८७ धावांची आघाडी मिळाली. इंग्लिश खेळाडू आता भराभर धावा काढून डाव घोषित करणार हे अपेक्षितच होतं. ॲलन लँबने दुसऱ्या डावात शतक ठोकलं. अखेरच्या दिवशी ३२०-४ या धावसंख्येवर इंग्लंडने डाव घोषित केला. आम्हाला एकूण ९२ षटकं खेळावी लागणार होती. अँगस फ्रेझर, क्रिस लेविस, डेव्हन माल्कम व एडी हेमिंग्ज अशा दमदार गोलंदाजांचा इंग्लंडकडे ताफा होता. द्रुतगती गोलंदाजांनी ढगाळ हवेचा फायदा उठवला. पाचव्या दिवशीच्या खेळपट्टीवर हेमिंग्जचे चेंडू जबरदस्त वळत होते. इंग्लंडच्या बोलर्सनी टिच्चून मारा केला व आमची अवस्था १०९-४ अशी झाली. त्यानंतर १२७ धावसंख्येवर अझर बाद झाला. एडी हेमिंग्जने कपिल देवना एका अप्रतिम यॉर्करवर बाद केलं, तेव्हा ६ बाद १८३ अशी आमची अवस्था होती.

माझं पहिलं कसोटी शतक

मनोज प्रभाकर जेव्हा माझ्या साथीला आले, तेव्हा सामना वाचवण्यासाठी आम्हाला एका चांगल्या भागीदारीची नितांत आवश्यकता होती. माझ्या इनिंग्जच्या सुरुवातीलाच मी सुदैवी ठरलो होतो. हेमिंग्जच्या गोलंदाजीवर मी ऑन ड्राइव्ह मारण्याचा प्रयत्न केला होता. पण चेंडू बॅटच्या बाहेरील कडेला लागून हवेत उंच उडाला. हेमिंग्जला मात्र तो झेल पकडता आला नाही. मला माझी चूक समजली होती. पुन्हा असे उचलून फटके न मारण्याचा मी निर्णय घेतला. तरीसुद्धा मी माझा आक्रमक पवित्रा कायम ठेवणार होतो. मला जखडून जायचं नव्हतं. जर मी फारच बचावात्मक पवित्रा घेतला असता, तर इंग्लिश गोलंदाजांनी माझ्या अवतीभोवती क्षेत्ररक्षक उभे करून माझ्यावर दडपण आणलं असतं. पण मी जर आक्रमण केलं तर मी इंग्लिश खेळाडूंना माझ्यापासून दूर ठेवू शकलो असतो. जेव्हा जेव्हा मला संधी मिळाली तेव्हा तेव्हा मी धावा वसूल केल्या. कमीत कमी जोखीम उचलून मी जोरदार फटके मारले. आक्रमण व बचाव यांतला समतोल साधणं फार महत्त्वाचं होतं.

मी प्रत्येक चेंडू नीट जोखून खेळत होतो. माझ्या ५० धावा झाल्या तरी मला फारसा आनंद झाला नव्हता. सामना वाचवण्याचं उद्दिष्ट अजून खूप दूर होतं.

दुसऱ्या बाजूला मनोज प्रभाकर छान फलंदाजी करत होते. काही वेळाने इंग्लिश गोलंदाजांना निष्प्रभ करण्यात आम्ही यशस्वी झालो. पहिला टप्पा आम्ही पूर्ण केला होता. मॅच वाचवताना छोटी छोटी उद्दिष्टं समोर ठेवणं खूप आवश्यक असतं. प्रथम फक्त पुढची पाच षटकं खेळून काढायचं उद्दिष्ट ठेवायचं. त्यानंतर एक तास बॅटिंग करण्याचं किंवा एकेक सत्र खेळून काढायचं असं ठरवून आपलं 'लक्ष्य' हळूहळू वाढवत न्यायचं. त्या सत्रात जर आपण एकही विकेट गमावली नाही, तर प्रतिस्पर्ध्याच्या नियंत्रणातून सामना निसटू लागतो व त्यांच्यावरील दडपण वाढू लागतं. इंग्लंडच्या बाबतीत तेच झालं. वेळ झपाट्याने निघून चालला होता. इंग्लंडच्या संघातला अस्वस्थपणा वाढू लागला होता.

माझ्या ९० धावा झाल्यावर शतकाच्या विचाराने मी थोडा बेचैन झालो. काही झालं तरी ते माझं पहिलं शतक होतं. प्रेक्षकांच्याही अपेक्षा आता वाढल्या होत्या. न्यूझीलंडला हुकलेलं शतक मला आठवलं. तीच चूक मला पुन्हा करायची नव्हती. सामना संपायला अजूनही काही वेळ शिल्लक उरला होता. मी बाद झालो असतो तर इंग्लंडने विजय मिळवण्याची शर्थ केली असती.

मी शतकाच्या जवळ आलो असताना अँगस फ्रेझरच्या गोलंदाजीवर पुन्हा एकदा सुदैवी ठरलो. त्याने टाकलेल्या बाउन्सरवर मी खाली वाकलो; पण माझी बॅट मात्र वरच्या दिशेला एखाद्या परिदर्शकासारखी (पेरीस्कोपसारखी) सरळ राहिली होती. चेंडू बॅटच्या मागच्या बाजूला लागून घरंगळत फाइन लेगला गेला. खरंतर तो जवळच्या क्षेत्ररक्षकांकडे किंवा यष्टिरक्षकाकडे सहज जाऊ शकला असता, पण तसं झालं नाही. मी देवाचे आभार मानले.

ओल्ड ट्रॅफर्डला दैव माझ्या बाजूला होतं. त्यानंतर मी अतिशय संयमाने खेळलो. अखेर ९८ धावांवर असताना अँगस फ्रेझरला मिड ऑफच्या दिशेने मी एक खणखणीत शॉट मारला. क्रिस लेविसने चेंडूचा पाठलाग केला, पण चेंडू गोलंदाजाकडे परत येईपर्यंत मी तीन धावा काढल्या होत्या. माझं शतक पूर्ण झालं होतं. प्रेक्षक टाळ्या वाजवून माझं अभिनंदन करत होते. अभिनंदन स्वीकारताना मात्र मी कमालीचा संकोचून गेलो होतो. तो क्षण मी पूर्वी कधीच अनुभवला नव्हता. बॅट उंच धरून प्रेक्षकांना अभिवादन करतानाही मी खूपच अवघडलो होतो. जेव्हा जेव्हा मी माझ्या पहिल्या शतकाची चित्रफीत पाहतो, तेव्हा प्रत्येक वेळेस माझ्या लक्षात येतं की, आनंद मुक्तपणे साजरा करणं ही माझी सहजप्रवृत्ती नाही; पण काही वर्षांच्या अनुभवानंतर मी त्या वातावरणात हळूहळू रुळू लागलो.

आपण खेळत असतो त्या 'वातावरणाचा एक भाग बनून जाणं' हे आंतरराष्ट्रीय खेळात खूप महत्त्वाचं आहे. नुसतं खेळपट्टीवर राहणं ही एक गोष्ट आहे; पण तुमचं अस्तित्व इतरांना जाणवू देणं ही दुसरी. तुमची देहबोली व तुमचा झळाळणारा आत्मविश्वास यांतून तुमचं अस्तित्व प्रकट व्हायला हवं. वेस्ट इंडियन महान फलंदाज व्हिव्ह रिचर्ड्स हे त्याचं उत्तम उदाहरण आहे. माझ्या बाबतीत ती गोष्ट घडायला वेळ लागला. ते वातावरण जसजसं माझ्यामध्ये भिनत गेलं तसतसा माझा स्वत:वरचा विश्वास वाढू लागला. मग शतक झळकवल्यावर मी उस्फूर्तपणे ड्रेसिंग रूमच्या दिशेने माझी बॅट उंचावू लागलो. तीच पुढे माझी खास स्टाइल ठरली. अनेक क्रिकेटर्सनी अशी आपापली एखादी खास स्टाइल बनवली आहे. इनिंग्जमध्ये पाच बळी मिळवल्यानंतर ग्लेन मॅक्ग्रा व शेन वॉर्न तो चेंडू हातात धरून प्रेक्षकांना दाखवत असत.

ओल्ड ट्रॅफर्डला माझं शतक झाल्यावरही मी पुढे तसाच संयम ठेवून खेळत राहिलो. संपणाऱ्या प्रत्येक षटकागणीक सामना अनिर्णित राहणार हे स्पष्ट होत होतं. शेवटच्या २० निर्धारित षटकांपैकी दोन षटकं बाकी असताना मॅच थांबवण्यात आली. त्या वेळी आमची धावसंख्या ३४३-६ अशी होती. प्रभाकर व मी मिळून आठव्या विकेटसाठी नाबाद १६० धावांची भागीदारी रचली होती.

मी पॅव्हिलियनमध्ये जात असताना प्रेक्षकांनी मला उभं राहून अभिवादन केलं. जॉन हॅम्पशायर व जॉन होल्डर या दोन्ही पंचांनी मी काढलेल्या पहिल्या शतकाबद्दल माझं अभिनंदन केलं. इंग्लिश खेळाडूंनीही माझं कौतुक केलं. ड्रेसिंग रूममध्येही माझ्या सर्व सहकाऱ्यांनी माझ्यावर दिलखुलासपणे अभिनंदनाचा वर्षाव केला. मी केवळ शतक झळकवलं नव्हतं, तर

दिवसभर खेळून सामनाही वाचवला होता, याचा त्यांना अभिमान वाटत होता. त्यामुळे तिसरी कसोटी जिंकून आम्ही अजूनही मालिका अनिर्णित ठेवू शकत होतो. माझ्या हातून दुसऱ्यांदा अशी कामगिरी झाली होती. या वेळी मात्र मला अधिक समाधान मिळालं होतं. पाकिस्तानमधील चौथी कसोटी अनिर्णित राखताना मी दुय्यम भूमिका बजावली होती. ओल्ड ट्रॅफर्डमधील सांघिक कामगिरीत माझा मुख्य वाटा होता. दिवसभराच्या समाधानकारक कामगिरीनंतर मी थोडी विश्रांती घेण्याच्या विचारात होतो. इतक्यात मला प्रसारमाध्यमांसमोर जाण्यास सांगण्यात आलं. पत्रकार परिषदेत मी प्रथमच बोलणार होतो.

मी आमचे व्यवस्थापक माधव मंत्री यांना जाऊन भेटलो. माधव मंत्री हे भारताचे जुने कसोटी खेळाडू होते. १९५०च्या इंग्लंड दौऱ्यात ते भारतातर्फे खेळले होते. मी त्यांना विचारलं की, ''पत्रकार परिषदेला जाणं सक्तीचं आहे की मी ते टाळू शकतो?'' मंत्रींनी मला धीर दिला. ''पत्रकार तुला फक्त तुझ्या बॅटिंगबद्दल व एकूण मॅचबद्दल प्रश्न विचारतील,'' असं ते मला म्हणाले. टीममधल्या मित्रांनी मात्र माझी मस्करी करायला सुरुवात केली. 'पत्रकार तुला भंडावून सोडणार', 'त्यांच्या एकाही प्रश्नाचं उत्तर तुला देता येणार नाही' असं म्हणत ते मला मुद्दाम घाबरवू लागले. त्या पहिल्या पत्रकार परिषदेत मला मात्र खूप मजा आली. सुरुवातीला मी जरा अवघडलो होतो; पण त्यांनी विचारलेले प्रश्न अगदी साधे व सरळ होते. मला फक्त माझे विचार त्यांच्यासमोर मोकळेपणाने मांडायचे होते आणि ते काही फार अवघड काम नव्हतं. त्यांनी विचारलेल्या अनेक प्रश्नांमध्ये माझं कौतुक दडलेलं होतं. इंग्लंडच्या नामांकित क्रिकेट समीक्षकांनी केलेली प्रशंसा ऐकून धन्य झाल्यासारखं वाटलं.

मला 'सामनावीर' घोषित करण्यात आलं. ते बक्षीस स्वीकारतानाही मी पुन्हा संकोचलो. मला एक शॅम्पेनची बाटली मिळाली. पण १८ वर्षांचा नसल्यामुळे त्या वेळी मी ती शॅम्पेन पिऊ शकलो नाही. मला, कधी एकदा तो समारंभ संपून ड्रेसिंग रूममध्ये जातो आहे असं झालं होतं. मी ती शॅम्पेनची बाटली अखेर माझ्या मुंबईच्या घरी घेऊन गेलो. १९९८ साली शॅम्पेनची ती बाटली उघडून साराचा, माझ्या मुलीचा पहिला वाढदिवस मी साजरा केला.

मॅच संपवून मी हॉटेलवर पोचतो तोच मला घरून फोन आला. फोनवर ३० ते ४० जणांशी मला बोलावं लागलं! माझ्या कॉलनीतले माझे मित्र, माझं शतक साजरं करण्यासाठी उत्स्फूर्तपणे एकत्र जमले होते. त्यांना माझा वाटणारा अभिमान व जिव्हाळा पाहून माझं मन भरून आलं. 'तू अजून ड्रिंक्स घेण्याएवढा मोठा झाला नाहीयेस,' असं ते थट्टेने मला म्हणत होते. त्या सर्वांनी मात्र माझ्या वतीने प्यायला सुरुवातही केली होती. माझ्या आई-बाबांचा ऊर अभिमानाने भरून आला होता. माझी योग्यता मी सिद्ध केल्याचं समाधान अजित व नितीनला झालं होतं.

ऑगस्ट अखेरीस ओव्हलला झालेली तिसरी कसोटीही अनिर्णित अवस्थेत संपली. मालिकेत आमचा ०-१ असा पराजय झाला. मात्र, इंग्लंडमधील माझ्या वैयक्तिक कामगिरीवर मी खूश होतो. प्रगतीच्या दृष्टीने मी काही महत्त्वाचे टप्पे गाठले असं मला मनातून वाटत होतं. इंग्लंडमधून परतताना, कसोटी क्रिकेटपटू म्हणून माझ्यात निश्चितच सुधारणा झाली होती. यापुढेही मी उत्तम कामगिरी करू शकेन असा माझ्यात विश्वास निर्माण झाला होता. पुढच्या दोन मोठ्या आव्हानांना सामोरं जाण्यासाठी मी तयार झालो होतो. पुढील वर्षाच्या अखेरीस आस्ट्रेलिया मालिका होती. त्यानंतर पाठोपाठच आस्ट्रेलिया व न्यूझीलंड या दोन देशांनी संयुक्तपणे आयोजित केलेली विश्वकरंडक स्पर्धाही होती.

इंग्लंड विरुद्ध भारत
(दुसरी कसोटी)

ओल्ड ट्रॅफर्ड, मँचेस्टर येथे ९ ते १४ ऑगस्ट, १९९० यादरम्यान खेळली गेली
पंच : जेएस हॅम्पशायर व जेडब्ल्यू होल्डर
नाणेफेक : इंग्लंड

इंग्लंड

जीए गुच	झे मोरे गो प्रभाकर	११६		झे मोरे गो प्रभाकर	७
एमए आथर्टन	झे मोरे गो हिरवाणी	१३१		पायचीत गो कपिल देव	७४
डीआय गोव्हर	झे तेंडुलकर गो कपिल देव	३८		त्रिफळा गो हिरवाणी	१६
एजे लॅम्ब	झे मांजरेकर गो कुंबळे	३८		त्रिफळा गो कपिल देव	१०९
आरसी रसेल	झे मोरे गो हिरवाणी	८	(७)	नाबाद	१६
आरए स्मिथ	नाबाद	१२१	(५)	नाबाद	६१
जेइ मॉरिस	त्रि गो कुंबळे	१३	(६)	जखमी निवृत्त	१५
सीसी लेविस	त्रि गो हिरवाणी	३			
ई हेमिंग्ज	पायचीत गो हिरवाणी	१९			
एआरसी फ्रेझर	झे तेंडुलकर गो कुंबळे	१			
डीई माल्कम	त्रि गो शास्त्री	१३			
अवांतर	(बाइज २, लेग बाइज ९, वाइड १, नोबॉल ६)	१८		(लेगबाइज १५, नोबॉल ७)	२२
एकूण	(१६०.५ षटकं)	**५१९**		(चार बाद घोषित) (८१ षटकं)	**३२०**

भारत

आरजे शास्त्री	झे गुच गो फ्रेझर	२५		त्रि गो माल्कम	१२
एनएस सिद्धू	झे गुच गो फ्रेझर	१३		झे बदली (सीजे ॲडम्स) गो फ्रेझर	५०
एसव्ही मांजरेकर	झे स्मिथ गो हेमिंग्ज	९३		झे बदली (सीजे ॲडम्स) गो हेमिंग्ज	५०
डीबी वेंगसरकर	झे रसेल गो फ्रेझर	६		त्रिफळा गो लेविस	३२
एम अझरुद्दिन	झे आथर्टन गो फ्रेझर	१७९		झे लेविस गो हेमिंग्ज	११
एसआर तेंडुलकर	झे लेविस गो हेमिंग्ज	६८		नाबाद	११९
एम प्रभाकर	झे रसेल गो माल्कम	४	(८)	नाबाद	६७
कपिल देव	पायचीत गो लेविस	०	(७)	त्रि गो हेमिंग्ज	२६
केएस मोरे	त्रि गो फ्रेझर	६			
ए कुंबळे	धावबाद (मॉरिस)	२			
एनडी हिरवाणी	नाबाद	१५			
अवांतर	(बाइज ५, लेगबाइज ४, नोबॉल १२)	२१		(बाइज १७, लेगबाइज ३, नोबॉल ६)	२६
एकूण	(११९.२ षटकं)	**४३२**		(६ बाद) (९० षटकं)	**३४३**

भारत	ष.	नि.	धा.	बळी	ष.	नि.	धा.	बळी
कपिल देव	१३	२	६७	१	२२	४	६९	२
प्रभाकर	२५	२	११२	१	१८	१	८०	१
कुंबळे	४३	७	१०५	३ (४)	१७	३	६५	०
हिरवाणी	६२	१०	१७४	४ (३)	१५	०	५२	१
शास्त्री	१७.५	२	५०	१	९	०	३९	०

इंग्लंड	ष.	नि.	धा.	बळी	ष.	नि.	धा.	बळी
माल्कम	२६	३	९६	१	१४	५	५९	१
फ्रेझर	३५	५	१२४	५	२१	३	८१	१
हेमिंग्ज	२९.२	८	७४	२	३१	१०	७५	३
लेविस	१३	१	६१	१ (५)	२०	३	८६	१
आथर्टन	१६	३	६८	० (४)	४	०	२२	०

गडी बाद होण्याचा क्रम	इंग्लंड	भारत	इंग्लंड	भारत
पहिला	२२५	२६	१५	४
दुसरा	२९२	४८	४६	३५
तिसरा	३१२	५७	१८०	१०९
चौथा	३२४	२४६	२४८	१०९
पाचवा	३६६	३५८	–	१२७
सहावा	३९२	३६४	–	१८३
सातवा	४०४	३६५	–	–
आठवा	४३४	३९६	–	–
नववा	४५९	४०१	–	–
दहावा	५१९	४३२	–	–

दिवसअखेर धावसंख्या

दिवस १ इंग्लंड (१) ३२२-३ (लॅम्ब २०*, रसेल ७*, ९२ षटकं)

दिवस २ भारत (१) ७७-३ (मांजरेकर २१*, अझरुद्दिन ४*, २७ षटकं)

दिवस ३ भारत (१) ४३२

दिवस ४ इंग्लंड (२) २९०-४ (स्मिथ ४०*, मॉरिस १५*, ७६ षटकं)

सामनावीर : **एसआर तेंडुलकर**

सामना अनिर्णित

भारत-आस्ट्रेलिया दौरा, नोव्हेंबर १९९१ ते फेब्रुवारी १९९२

नोव्हेंबर, १९९१मध्ये पर्थ येथे दोन एकदिवसीय सराव सामने खेळून आम्ही ऑस्ट्रेलियन दौऱ्याला सुरुवात केली. पहिला सामना लिलॅक हिलला खेळला गेला. दुसरा वाकाला होता. वाकाची खेळपट्टी ही जगातील सर्वांत वेगवान खेळपट्टी समजली जाते. त्या सामन्यात आमचा संघ केवळ ६४ धावांत गडगडला. आमच्यासाठी तो धोक्याचा इशारा होता. मालिकेत आस्ट्रेलियाला टक्कर द्यायची असेल तर तिथल्या वातावरणाशी लवकरात लवकर जुळवून घेणं आवश्यक होतं.

२३ ते २५ नोव्हेंबर दरम्यान आम्ही तीन दिवसांचा पहिला सामना खेळलो. तो सामना लिस्मोरला न्यू साउथ वेल्स संघाविरुद्ध झाला. न्यू साउथ वेल्स संघात अनेक नावाजलेले क्रिकेटर्स होते. त्या मॅचमध्ये मी आक्रमक आस्ट्रेलियन वृत्तीचा पहिल्यांदा अनुभव घेतला. खेळपट्टी अतिशय वेगवान होती. त्यामुळे न्यू साउथ वेल्सचा कर्णधार जिऑफ लॉसनने नाणेफेक जिंकताच जराही विचार न करता आम्हाला फलंदाजीस पाचारण केलं. स्वत: लॉसन सोडून त्यांच्यापाशी माइक व्हिटनी, स्टीव्ह व मार्क वॉ, ग्रेग मॅथ्यूस आणि वेन होल्ड्सवर्थ हे गोलंदाज होते. आमच्यासाठी ती कठीण परीक्षा होती. आस्ट्रेलिया संघासाठी खेळलेले सहा खेळाडू मार्क टेलर, व्हिटनी, लॉसन, स्टीव्ह वॉ, मार्क वॉ आणि मॅथ्यूस त्या संघात होते.

मी फलंदाजीला आल्यापासून आक्रमक पवित्रा घेतला. पॉइंट आणि गलीमधून मी अनेक जमिनीलगत फटके मारले. याच सामन्यात स्टीव्ह वॉबरोबर माझी पहिल्यांदाच बाचाबाची झाली. एका १८ वर्षांच्या मुलाने त्यांच्या गोलंदाजीचा असा समाचार घ्यावा हे त्याला रुचलं नसावं. मला अनेक प्रकारे खिजवण्यात आलं. ही तर सुरुवात होती. आस्ट्रेलियाच्या त्यानंतरच्या प्रत्येक दौऱ्यात मला याहूनही अधिक विचित्र अनुभव येत गेले.

या सामन्याच्या दरम्यान ब्रिस्बेनच्या पहिल्या कसोटीसाठी आस्ट्रेलियन संघाची घोषणा झाली. स्टीव्ह वॉचं नाव यात नव्हतं. मी त्याला म्हटलं की, ''माझ्याशी दोन हात करायचे असतील तर आधी तू तुमच्या टीममध्ये येऊन दाखव.'' असे खटकेबाज संवाद अर्थातच चांगल्या वातावरणात व निष्कपटपणे सुरू होते. आमच्या दोघांच्याही कारकिर्दीत आम्हाला एकमेकांबद्दल अतीव आदर वाटत असे. त्यामुळेच आम्ही परस्परांची इतक्या मोकळेपणे थट्टामस्करी करत असू. स्टीव्ह वॉची विकेट ही आमच्यासाठी सर्वांत महत्त्वाची असायची. त्यामुळे आम्ही नाना युक्त्या वापरून त्याला बेचैन व अस्थिर करण्याचा प्रयत्न करायचो. स्टीव्ह वॉ बॅटिंगला आला की सगळे चिडीचूप होऊन जात असत. कारण त्याला चिडवलं तर तो अधिक चेव येऊन बॅटिंग करतो, असं आम्हाला समजलं होतं.

अवघड सुरुवात

२९ नोव्हेंबर, १९९१ला सुरू झालेल्या ब्रिस्बेनच्या पहिल्या कसोटीत आस्ट्रेलियाने आमचा दणदणीत पराभव केला. विजयाचं सारं श्रेय क्रेग मॅकडरमॉट व मर्व्ह ह्यूजच्या भेदक गोलंदाजीला होतं. आमच्या संघातील इतर खेळांडूप्रमाणेच मीही त्या सामन्यात फारशी चमक दाखवू शकलो नाही. बॉक्सिंग डेच्या मेलबोर्न कसोटीत जोरदार प्रतिकार केल्याशिवाय आमचा टिकाव लागणार नाही हे आम्हाला ठाऊक होतं. 'एमसीजी'ला तिसऱ्या दिवसाच्या मध्यापर्यंत आम्ही आस्ट्रेलियाला वर्चस्व मिळवू दिलं नव्हतं. पहिल्या डावात किरण मोरे आमच्या मदतीला आला. त्याने ६७ धावा काढल्या. कपिल देव व प्रभाकर या दोघांनीही सुरेख गोलंदाजी केली. दुसऱ्या डावात आमची फलंदाजी कोसळल्यामुळे आमच्या सर्व आशा संपुष्टात आल्या. मी त्या डावात बराच वेळ खेळपट्टीवर होतो. १०७ चेंडूंत मी ४० धावा काढल्या. ऑफ स्पिनर पीटर टेलरच्या गोलंदाजीवर मी बाद झालो. उंचावरून फटका मारण्याच्या नादात मी ॲलन बॉर्डरच्या हाती झेल देऊन माझी विकेट गमावली. मी स्वत:वर इतका चिडलो होतो की, त्या दिवशी दुपारी मी जेवलोही नाही, पूर्ण दिवस मी त्या तणावाखालीच होतो.

मेलबोर्नला त्या दिवशी आणखी एक गोष्ट घडली. सुदैवाने माझ्या आयुष्यात तशी गोष्ट पुन्हा कधीही घडली नाही. बाद होऊन मी ड्रेसिंग रूममध्ये गेलो तेव्हा माझ्या लक्षात आलं की, मी घातलेल्या ॲब्डॉमिनल प्रोटेक्टरचे तीन तुकडे झाले होते. ब्रूस रीडच्या एका वेगवान चेंडूचा मला त्या भागावर मार बसला होता. रीड हा उंच डावखुरा वेगवान गोलंदाज होता. त्या

मालिकेत त्याने बऱ्याच विकेट्स मिळवल्या होत्या. सुदैवाने त्या अपघातात मला फार मोठी इजा झाली नाही.

कडवा प्रतिकार

२ जानेवारी, १९९२च्या पुढच्या कसोटीसाठी जेव्हा आम्ही सिडनीला पोचलो तेव्हा आम्ही ०-२ अशा पिछाडीवर होतो. मालिकेत आव्हान राखण्यासाठी ही शेवटची संधी आहे हे आम्हाला ठाऊक होतं. सिडनी क्रिकेट ग्राउंडची खेळपट्टी ही तिच्या नेहमीच्या लौकिकाला सार्थ करणारीच होती. सुरुवातीला ती नेहमीच फलंदाजीला साथ देते. आस्ट्रेलियाला पहिल्या डावात ३१३ धावांत रोखताना आमच्या गोलंदाजांनी सुरेख कामगिरी केली असं मला वाटलं. आता आम्हाला मोठी आघाडी घेणं आवश्यक होतं. तरच आस्ट्रेलियाचा दुसरा डाव झटपट गुंडाळण्याची संधी आम्ही आमच्या गोलंदाजांना देऊ शकणार होतो. ज्या दिवशी मला बॅटिंग करायची होती त्याच्या आदल्या रात्री मी नीट झोपू शकलो नाही. सौरव गांगुली माझा रूम-पार्टनर होता. त्या रात्री सौरवला मध्येच जाग आली. मी रूममध्ये हातात बॅट घेऊन एकटाच काल्पनिक सराव करत होतो. सौरव दचकून माझ्याकडे पाहतच राहिला. सौरव त्या मॅचमध्ये खेळत नव्हता. मी काय करतोय हे त्याला कळेना. ''मॅकडरमॉट व इतर गोलंदाजांना उद्या कसं खेळायचं याचं मी नीट प्लॅनिंग करतो आहे,'' असं मी सौरवला म्हणालो.

रात्रीच्या जागरणामुळे दुसऱ्या दिवशी मला थोडासा थकवा जाणवत होता. भारतीय संघाची फलंदाजी सुरू होती. मी सहाव्या क्रमांकावर बॅटिंग करणार होतो. मी थोडा वेळ ड्रेसिंग रूममधल्याच डायनिंग टेबलावर डोकं ठेवून छोटीशी डुलकी घ्यायचं ठरवलं. 'पुढची विकेट पडल्यावर मला उठव,' असं सौरवला सांगून मी झोपी गेलो. अझर बाद झाल्यावर सौरवने मला उठवलं. तेवढ्याशा झोपेमुळेही मला तरतरी आली होती. मी बॅटिंग करण्यासाठी सज्ज झालो.

मालिकेत प्रथमच आमच्या वरच्या फळीने आपली खरी ताकद दाखवून दिली होती. मी फलंदाजीला उतरलो तेव्हा २०१-४ अशी आमची भक्कम स्थिती होती. वेंगसरकर अर्धशतक काढून बाद झाले होते. आम्हाला आघाडी मिळवण्यासाठी आणखी एका चांगल्या भागीदारीची आवश्यकता होती. समोरच्या बाजूने रवी शास्त्री छान फलंदाजी करत होते. आमची जोडी जमली. एक मोठी भागीदारी करण्यात आम्ही यशस्वी ठरलो. मेलबोर्नमधील दुसऱ्या डावातील फलंदाजीचा मला खूपच फायदा झाला होता. सिडनीला फलंदाजीला आल्या आल्याच मी बॅटच्या अगदी मध्यावरून चेंडू फटकावायला सुरुवात केली. त्या डावातल्या मधल्या एका सत्रात माझं लक्ष थोडं विचलित होऊ लागलं होतं. मी किंचित बेचैनही झालो होतो; पण मी स्वत:ला छान सावरलं. मला पुन्हा पहिली लय सापडली.

अर्धशतक झळकवल्यावर मी अगदी मोकळेपणाने फटकेबाजी करू लागलो. थोड्याच वेळात मी माझ्या दुसऱ्या कसोटी शतकाच्या जवळ पोचलो होतो. फाइन लेगला मारलेल्या ज्या ग्लान्सने माझं शतक पूर्ण झालं, तो शॉट आजही मला स्पष्ट आठवतो. त्या फटक्यावर मी दोन धावा काढल्या. ती दुसरी धाव तर आजपर्यंत मी काढलेली सर्वांत वेगवान धाव ठरली. रवी शास्त्रीने त्या डावात सुंदर द्विशतक केलं. भारतातर्फे आस्ट्रेलियात द्विशतक झळकवणारा तो पहिलाच खेळाडू ठरला. आम्ही पाचव्या विकेटसाठी १९६ धावांची भागीदारी केली. भारताबाहेरच्या मैदानांपैकी सिडनीचं क्रिकेट मैदान हे माझं फार लाडकं मैदान आहे. सिडनीला आस्ट्रेलियाविरुद्ध काढलेल्या त्या पहिल्या शतकाला माझ्या मनात खूपच वरचं स्थान आहे. आजपर्यंत आस्ट्रेलियामधले सामने मी टीव्हीच्या पडद्यावरून पाहत आलो होतो. १९८५ सालची 'व्हिक्टोरिया कप' स्पर्धा पाहण्यासाठी तर मी भल्या पहाटे उठून टीव्हीसमोर बसत असे. आज मी त्या मैदानांवर प्रत्यक्ष खेळत होतो.

सिडनीची ती कसोटी आणखीही एका कारणासाठी माझ्या लक्षात राहिली आहे. दाट सोनेरी केसांच्या एका गुबगुबीत आस्ट्रेलियन लेग स्पिनरने त्या सामन्यात कसोटी पदार्पण केलं होतं. त्याचं नाव होतं, शेन वॉर्न. शेन वॉर्नने त्या मॅचमध्ये फक्त एकच विकेट घेतली; पण तो चेंडू अतिशय झटक्यात वळवू शकतो हे त्याच वेळी सिद्ध झालं होतं. आपल्या कारकिर्दीत तो ७०८ विकेट्स घेईल याचा अंदाज कदाचित तेव्हा कुणालाच आला नसेल; पण त्याच्यामधली प्रतिभा मात्र पहिल्या दिवसापासूनच जाणवली होती.

त्या कसोटीत आम्ही फक्त एकदाच बॅटिंग करू शकणार हे उघडच होतं. पाऊस व अंधूक प्रकाशामुळे तिसऱ्या आणि

चौथ्या दिवसाचा खूपच वेळ वाया गेला होता. अखेरच्या दिवशी आम्ही तासभर बॅटिंग केली. १७० धावांची आघाडी घेऊन आम्ही डाव घोषित केला. खेळपट्टी आता आपले रंग दाखवू लागली होती. चेंडू अचानक उसळत होता. उरलेल्या वेळात आस्ट्रेलियाला गुंडाळायची आम्हाला संधी होती. शास्त्रीच्या फिरकीवर जेव्हा आस्ट्रेलियाची ११४-६ अशी स्थिती झाली तेव्हा आम्हाला विजय मिळणार हे सर्वांनी गृहीतच धरलं होतं. पण ॲलन बॉर्डर व मर्व्ह ह्यूजने आमच्या प्रयत्नांवर पाणी फिरवलं. डावाच्या अखेरीस दोघांनी टिच्चून फलंदाजी केल्याने आस्ट्रेलियाला पराभव टाळता आला.

त्या सामन्यात मी टाकलेल्या फक्त एकाच षटकात मर्व्ह ह्यूजला मी बाद केलं. माझ्यासाठी तो खूपच आनंदाचा क्षण होता. ती माझी पहिली कसोटी विकेट होती. प्रभाकरनी स्लिपमध्ये त्याचा झेल घेतला. ह्यूजची विकेट थोडी आधी मिळाली असती, तर कदाचित आम्ही मॅचही जिंकली असती.

महत्त्वाचे धडे

चौथी कसोटी ॲडलेडला २५ जानेवारी, १९९२ रोजी सुरू झाली. आस्ट्रेलियाचे महान फलंदाज सर डॉन ब्रॅडमन यांच्या 'होम ग्राउंड'वर मी प्रथमच बॅटिंग करणार होतो. सर ब्रॅडमन म्हणजे क्रिकेटचे बादशहा. ॲडलेड, ओव्हलच्या सामन्यात मी फारशी चमक दाखवू शकलो नाही. आमचा संघ मात्र चांगला खेळला. पहिले दोन दिवस आम्ही चांगला मुकाबला केला. पण अखेर आम्ही ती मॅच ३८ धावांनी हरलो. कपिल देवनी गोलंदाजीप्रमाणे फलंदाजीतही चांगली कामगिरी केली. अझरनेही कर्णधाराला साजेशी बॅटिंग करत शतक काढलं. त्याच्या १०६ धावा झाल्या. प्रभाकरांबरोबर त्याने केलेल्या ६४ धावांच्या भागीदारीमुळे विजय अगदी आमच्या हातात आला होता; पण ३७१ धावांचा पाठलाग करताना आम्ही अखेर ३३३ धावाच करू शकलो. नशिबाची थोडी साथ मिळाली असती, तर आम्ही ॲडलेडला मालिकेत २-२ अशी बरोबरी करू शकलो असतो, परंतु अखेरच्या कसोटीसाठी पर्थला जाताना आम्ही ०-३ अशा पिछाडीवर होतो.

१ फेब्रुवारीला सुरू झालेल्या पाचव्या कसोटी सामन्यात मी माझं त्या दौऱ्यातलं दुसरं शतक झळकवलं. माझ्या सर्वोत्कृष्ट शतकांपैकी ते एक आहे असं मी मानतो. पर्थची खेळपट्टी खूपच वेगवान होती. विशेष म्हणजे मी कसोटी सामन्यात प्रथमच चौथ्या क्रमांकावर फलंदाजी करणार होतो. मी सुरुवातीपासूनच त्या संधीचा पुरेपूर लाभ उठवत मनसोक्त बॅटिंग केली. त्या डावात ११४ धावा काढताना मी १६ चौकार मारले होते. त्या दौऱ्यात तोपर्यंत मी एका नव्या शॉटवर प्रभुत्व मिळवलं होतं – 'बॅकफूट पंच'. पर्थमध्ये चेंडू खूपच उसळी घेतो. त्यामुळे बहुतेक फलंदाज पर्थवर कट शॉटचा जास्त वापर करत, पण त्या डावात बॅकफूट पंच मारायची मी एकही संधी सोडली नाही. गुड लेंग्थ चेंडूवरही मी तो पंच मारू लागल्यामुळे गोलंदाज हैराण झाले. त्या फटक्यामुळे मला कमीत कमी दोन तरी धावा मिळायच्याच. पंच जर अचूक बसला तर चेंडू सीमापारही जायचा.

सामना सुरू होण्याआधी आस्ट्रेलियन प्रसारमाध्यमं वेगवान व चेंडू उसळवणाऱ्या वाका खेळपट्टीबद्दल बरंच काही बोलली होती. 'पर्थवर आस्ट्रेलियन द्रुतगती गोलंदाजांना खेळताना भारतीय फलंदाजांची भंबेरी उडेल,' असंही तिथल्या पत्रकारांनी म्हटलं होतं. परंतु वाकावर बॅटिंग करणं मला कधीच कठीण गेलं नाही. याचं कारण मी तिथल्या बाउन्सशी चटकन जुळवून घेतलं. ज्या ज्या वेळी चेंडू वर उसळत असे, त्या त्या वेळी बचावात्मक स्ट्रोक खेळण्याऐवजी टाचांवर उभं राहून मी तो चेंडू खेळत असे. शिवाय अखेरच्या क्षणी हलक्या हाताने खेळल्यामुळे चेंडू जमिनीलगत जात असे.

वाकावर घडलेल्या एका प्रसंगाने आस्ट्रेलियन खेळाडू किती जोशात व इर्षेने क्रिकेट खेळतात याचा मला प्रत्यय आला. मी एक बॉल अगदी बचावात्मक खेळलो होतो. धाव होण्याची शक्यताच नव्हती. मी सहजपणे तो बॉल उचलून बॉर्डरकडे फेकणार होतो. आस्ट्रेलियन कर्णधार ॲलन बॉर्डर गलीमध्ये उभा होता. मी चेंडू उचलायला वाकतो आहे हे पाहताच तो ओरडला, ''चेंडूला हात लावायची हिंमत करू नकोस.'' त्या प्रसंगानंतर आजतागायत मी बॅटिंग करताना कधीही चेंडूला स्पर्श केला नाही. आंतरराष्ट्रीय क्रिकेट किती गंभीरपणे खेळायचं असतं याचा वस्तुपाठच मला त्या प्रसंगातून मिळाला. माझ्या कारकिर्दीच्या अखेरच्या दिवसापर्यंत तो धडा माझ्या पक्का स्मरणात राहिला.

हिरोची भेट

आस्ट्रेलियाच्या त्या दौऱ्यात क्रिकेटमधल्या माझ्या हिरोशी माझी भेट झाली. माझ्यासाठी तो महानायक होता. माझा आदर्श होता. त्याची बॅटिंग बघत मी क्रिकेट शिकलो होतो. पण ती भेट क्रिकेटच्या मैदानावर झाली नाही. ॲडलेडला मी आमच्या हॉटेलच्या स्वागतकक्षात उभा होतो. संजय मांजरेकर माझ्या सोबत होता. हॉटेलसमोर एक टॅक्सी थांबली. कॅप घातलेली एक व्यक्ती टॅक्सीतून उतरली. त्याच क्षणी मी संजयला म्हणालो, ''अरे, या माणसाला मी कुठेतरी पाहिलंय.'' ती व्यक्ती जवळ आली आणि मी ओरडलोच, ''हे तर व्हिव्ह रिचर्ड्स! माझा विश्वासच बसत नाहीये.''

ते आमच्या बाजूने चालत त्यांच्या रूममध्ये निघून गेले. मी संजयला म्हटलं, ''मला माझ्या हिरोला भेटलचं पाहिजे.'' आम्ही स्वागतकक्षातल्या कर्मचाऱ्याला त्यांच्या रूमचा नंबर विचारला. मी संजयला त्यांना फोन करायला लावला. संजय १९८९मध्ये वेस्ट इंडीजला त्यांच्याविरुद्ध एक मालिका खेळला होता. थोड्याच वेळात आम्ही त्यांच्या रूममध्ये पोचलो. मी त्या रूममध्ये केवळ तीन मिनिटं होतो. 'हॅलो' हे दोनच शब्द मी उच्चारले; पण त्या क्षणी माझ्या अंगावर रोमांच उभे राहिले होते.

१९९२ विश्वचषक स्पर्धा, आस्ट्रेलिया व न्यूझीलंड

कसोटी मालिकेनंतर आम्ही आस्ट्रेलियातच थांबलो. दोन आठवड्याने विश्वचषक स्पर्धा सुरू होणार होती. त्या स्पर्धेत मी प्रथमच खेळणार होतो. एवढ्या मोठ्या स्पर्धेआधी तिथल्या वातावरणाशी नीट जुळवून घेण्यासाठी आम्हाला आस्ट्रेलियातच राहायला सांगितलं होतं. खरं म्हणजे तशी काही गरज नव्हती. आम्ही आस्ट्रेलियात येऊन आता तीन महिने झाले होते. त्यामुळे काही आठवडे आम्ही मोकळे होतो. विनोद कांबळी आता माझ्या साथीला आल्यामुळे वेळ जाण्याचा प्रश्नच नव्हता. विनोद व मी एकाच रूममध्ये राहत होतो. विनोदचं वैशिष्ट्य म्हणजे त्याच्या अंगावरचे कपडे. विनोद अतिशय भडक व रंगीबेरंगी कपडे घालत असे. आमचे मॅनेजर रणबीर सिंग महिंद्र तर एकदा त्याला म्हणाले, ''अरे, तू भारतासाठी खेळतोस आणि असे विदूषकासारखे कपडे का घालतोस? जरा चांगले कपडे घालत जा.'' विनोदवर त्यांच्या बोलण्याचा परिणाम होणं शक्यच नव्हतं.

ते दोन आठवडे अगदी निवांत होते. एकमेकांच्या सहवासात तो काळ आम्ही मजेत घालवला. एकदा लेग स्पिनर नरेंद्र हिरवाणी व मी, आमच्या संघाचे फिजिओ, डॉक्टर अली इराणी यांच्या रूममध्ये बसून चहा पीत होतो. डॉक्टर अली आमच्यासाठी एक वेगळ्या प्रकारची साखर घालून खास चहा बनवत असत. आम्ही चहा पीत असताना रणबीर सिंग महिंद्रांचा त्यांना फोन आला. ते शाकाहारी होते. ''माझ्यासाठी एक गार्लिक ब्रेड मागव,'' असं ते डॉक्टर अलींना म्हणाले. त्या फोननंतर डॉक्टर अली एकदम भावनाविवश झाले. आम्हाला म्हणाले, ''अशी एक वेळ येईल की तुम्हाला म्हाताऱ्या अली इराणीची खूप आठवण येईल. तो आपली किती काळजी घ्यायचा, आपल्याला प्रेमाने चहा पाजायचा हे तुम्हाला आठवेल.''

ते अचानक असं का बोलतायत हे हिरवाणी आणि मला समजेना. हिरवाणीने त्यांना मघाचंच वाक्य पुन्हा बोलायला सांगितलं. अली तयार होत नव्हते; पण हिरवाणीच्या आग्रहास्तव ते वाक्य त्यांनी पुन्हा उच्चारलं. डॉक्टर अली, रणबीर सिंग महिंद्रांना खूश ठेवतात हे हिरवाणीने त्या दोघांच्या नुकत्याच झालेल्या संभाषणावरून ताडलं होतं. त्यावरून हिरवाणी त्यांना मस्करीत म्हणाला, ''तुम्ही तर रोज डबल सेंच्युरी मारून मॅनेजरच्या मर्जीत राहण्याचा प्रयत्न करता! तुमचं नाव भारतीय संघात पहिलं घेतलं जाणार. त्यानंतर आमची नावं येणार!''

विश्वचषक स्पर्धेत आम्ही बऱ्याच सामन्यांत चांगले खेळलो, पण तरीही आम्हाला उपांत्य फेरी गाठता आली नाही. इंग्लंड व आस्ट्रेलियाशी तर आम्ही जिंकता जिंकता हरलो. इंग्लंडशी नऊ धावांनी व आस्ट्रेलियाशी फक्त एका धावेने आमचा पराभव झाला. २८ फेब्रुवारीला आमचा दुसरा सामना श्रीलंकेविरुद्ध मॅकेला होता. पावसामुळे तो सामना रद्द करावा लागला. पाकिस्तानबरोबरच्या सामन्यात मात्र आम्ही सर्व कसर भरून काढली. स्पर्धेतील ती आमची सर्वोत्कृष्ट कामगिरी ठरली. ती

मॅच ४ मार्च, १९९२ला सिडनीच्या मैदानावर खेळली गेली. लागोपाठच्या दोन पराभवानंतर आम्ही पाकिस्तानला हरवायचंच या इराद्याने पेटलो होतो. पहिली बॅटिंग करताना आम्ही वासिम अक्रमची भेदक गोलंदाजी समर्थपणे खेळून काढली. विनोद कांबळीवर त्याने आक्रमक हल्ला चढवला होता. ''तू फक्त चेंडू हळूच खेळून धावायला सुरुवात कर,'' असं मी विनोदला सांगितलं होतं. आम्ही चांगली भागीदारी केली. त्यानंतर कपिल देवबरोबरही मी आणखी एक भागीदारी केली. कपिल देवनी २६ चेंडूत केलेल्या ३५ धावा मोलाच्या ठरल्या. डावाच्या अखेरीस मी नाबाद ५४ धावा काढल्या.

आमच्या २१६ धावा झाल्या. पाकिस्तानसाठी ते काही फार मोठं आव्हान नव्हतं, पण दुसऱ्या डावात आमची सुरुवात चांगली झाली. कपिल देव व प्रभाकर यांनी पाकिस्तानचे सुरुवातीलाच दोन गडी बाद केले. टीममध्ये आता वेगळाच उत्साह संचारला होता. मैदानात आमची अखंड बडबड सुरू होती. एकमेकांना शाबासकी देत आम्ही पाकिस्तानी फलंदाजांना हैराण करून सोडलं होतं.

यष्टिरक्षक किरण मोरे व जावेद मियांदाद यांच्यात झालेल्या जोरदार झटापटीमुळे तो सामना सर्वांच्याच लक्षात राहिला आहे. माझ्या आठवणीप्रमाणे, जावेदच्या पाठीत उसण भरली होती. तो नेहमीसारखा फटकेबाजी करू शकत नव्हता. बॅटिंग करणं त्याला खूप अवघड जात होतं. तरीही तो आपल्या संघासाठी एक महत्त्वाची भूमिका बजावत होता. खेळपट्टीवर टिकून राहून एका बाजूने शांतपणे किल्ला लढवत राहायचं त्याने ठरवलं होतं. यष्टीमागे किरण मोरेची अखंड टकळी सुरू होती. जावेदला शॉट्स मारता येत नाहीयेत, हे तो पुन्हा पुन्हा जोरजोरात सांगत होता. जावेद चिडला. त्याने किरणची नक्कल करत मैदानावरच बेडकासारख्या उड्या मारल्या. जावेदच्या नकलेमुळे सर्वांचीच करमणूक झाली असली तरी क्षणभर आम्ही थक्क झालो होतो. किरण व जावेद यांच्या त्या झटापटीमुळे आमच्या विजयाची गंमत आणखीनच वाढली.

त्या सामन्यात मी १० षटकं टाकून ३७ धावा दिल्या आणि आमिर सोहेलची विकेट मिळवली. त्या विजयाचं समाधान काही वेगळंच होतं. मॅचमध्ये केलेल्या आरडाओरडीमुळे संध्याकाळी माझा घसा बसला होता. १९७५मध्ये विश्वचषक स्पर्धा सुरू झाल्यापासून भारत पाकिस्तानशी प्रथमच सामना खेळला होता. विश्वचषक स्पर्धेत त्यानंतर दरखेपेस पाकिस्तानवर विजय मिळवण्याच्या शृंखलेची ती सुरुवात होती. १९९२च्या विश्वकरंडक स्पर्धेत पाकिस्तानविरुद्ध मिळवलेल्या विजयाला माझ्या दृष्टीने खास महत्त्व आहे. त्या सामन्यात मी सर्वोत्कृष्ट खेळाडू ठरलो होतो.

साडेचार महिन्यांच्या दौऱ्यानंतर आम्ही जेव्हा भारतात परतलो तेव्हा एक क्रिकेटर म्हणून मी आरपार बदलून गेलो होतो. माझा कायापालट झाला होता. १९९१-९२च्या आस्ट्रेलियन दौऱ्याने माझ्या कारकिर्दीवर जबरदस्त परिणाम केला होता, हे नि:संशय!

धाडसी माणूस

एक किस्सा सांगितल्याशिवाय आस्ट्रेलियन दौऱ्याची हकिकत संपू शकत नाही. तो प्रसंग आजही मी विसरू शकत नाही. आमचा डावखुरा फिरकी गोलंदाज वेंकटपथी राजू व मर्व्ह ह्यूज ह्यांच्यात घडलेला तो किस्सा आहे. ते दोघेही एकमेकांचे चांगले मित्र होते. आम्ही पर्थवरून विमानाने सिडनीला निघालो होतो. चार तासांचा प्रवास होता. आम्ही राजूला थोडंसं चिथावलं. राजू हा टीममधला सर्वांत बारीक व सडपातळ खेळाडू होता. हिंमत असेल तर ह्यूजच्या मिशा खेचून दाखव, असं आम्ही त्याला सांगितलं. ह्यूज धिप्पाड होता. त्याचा स्वभावही तापट होता. तो राजूला बुकलून काढणार याची आम्हाला खातरी होती; पण राजू न घाबरता मर्व्हसमोर गेला आणि त्याने त्याच्या मिशा जोरजोरात ओढल्या. राजूने दाखवलेलं धाडस विलक्षण होतं किंवा तद्दन मूर्खपणाचं तरी होतं. मर्व्हने मात्र ती गोष्ट खिलाडू वृत्तीने घेतली. राजूचं सर्वांनी टाळ्या वाजवून कौतुक केलं. राजू अचानक हिरो ठरला होता.

भारताचा न्यूझीलंड दौरा, १९९०

पहिली कसोटी. ख्राइस्टचर्च – २ ते ५ फेब्रुवारी, १९९०

न्यूझीलंड ४५९ (जेजी राइट १८५, केआर रुदरफोर्ड ६९, एएच जोन्स ५२) व २-०

भारत १६४ (एमएस सिद्धू ५१, एम अझरुद्दीन ४८, **एसआर तेंडुलकर ०;** डीके मॉरिसन ५-७५) व २९६ (फॉलो-ऑन) (डब्ल्यूव्ही रमण ९६, **एसआर तेंडुलकर २४;** आरजे हॅडली ४-६९)

न्यूझीलंड १० गडी राखून विजयी

दुसरी कसोटी. नेपियर्स – ९ ते १३ फेब्रुवारी, १९९०

भारत ३५८-९ घोषित (एम प्रभाकर ९५, **एसआर तेंडुलकर** ८८, केएस मोरे ७३; डीके मॉरिसन ५-९८)

न्यूझीलंड १७८-१ (जेजी राइट ११३*, टीजे फ्रँकलिन ५०)

सामना अनिर्णित

तिसरी कसोटी. ऑकलंड – २२ ते २६ फेब्रुवारी, १९९०

न्यूझीलंड ३९१ (आयडीएस स्मिथ १७३, आरजे हॅडली ८७; एएस वासन ४-१०८) व ४८३-५ घोषित (एएच जोन्स १७०*, एमडी क्रो ११३, जेजी राइट ७४)

भारत ४८२ (एम अझरुद्दीन १९२, एएस वासन ५३, केएस मोरे ५०,**एसआर तेंडुलकर** ५; डीके मॉरिसन ५-१४५) व १४९-० (एम प्रभाकर ६३* डब्ल्यूव्ही रमण ७२)*

सामना अनिर्णित

न्यूझीलंडचा मालिकेत १-० विजय

भारताचा इंग्लंड दौरा, १९९०

पहिली कसोटी. लॉर्डस् – २६ ते ३१ जुलै, १९९०

इंग्लंड ६५३-४ घोषित (जीए गुच ३३३, एजे लॅम्ब १३९, आरए स्मिथ १००)* व २७२-४ घोषित (जीए गुच १२३, एमएम आथर्टन ७२)

भारत ४५४ (एम अझरुद्दीन १२१, आरजे शास्त्री १००, कपिल देव ७७, **एसआर तेंडुलकर** १०; एआरसी फ्रेझर ५-१०४) व २२४ (एसके शर्मा ३८, **एसआर तेंडुलकर** २७)

इंग्लंड २४७ धावांनी विजयी

दुसरी कसोटी. ओल्ड ट्रॅफर्ड, मँचेस्टर – ९ ते १४ ऑगस्ट, १९९०

इंग्लंड ५१९ (एमए आथर्टन १३१, आरए स्मिथ १२१*, जीए गुच ११६; एनडी हिरवाणी ४-१७४) व ३२०-४ घोषित (एजे लॅम्ब १०९, एमए आथर्टन ७४, आरए स्मिथ ६१)*

भारत ४३२ (एम अझरुद्दीन १७९, एसव्ही मांजरेकर ६८; एआरसी फ्रेझर ५-१२४) व ३४३-६ (**एसआर तेंडुलकर** ११९*, एम प्रभाकर ६७*, एसव्ही मांजरेकर ५०)

सामना अनिर्णित

तिसरी कसोटी. द ओव्हल – २३ ते २८ ऑगस्ट, १९९०

भारत ६०६-९ घोषित (आरजे शास्त्री १८७, कपिल देव ११०, एम अझरुद्दीन ७८, केएस मोरे ६१*, **एसआर तेंडुलकर** २१)

इंग्लंड ३४० (जीए गुच ८५, आरए स्मिथ ५७, ई हेमिंग्ज ५१; एम प्रभाकर ४-७४) व ४७७-४ घोषित (फॉलो-ऑन) (डीआय गोवर १५७*, जीए गुच ८८, एमए आथर्टन ८६, एजे लॅम्ब ५२)

सामना अनिर्णित

इंग्लंडचा मालिकेत १-० विजय

भारताचा आस्ट्रेलिया दौरा, १९९१-९२

पहिली कसोटी. ब्रिस्बेन – २९ नोव्हेंबर ते २ डिसेंबर, १९९१

भारत २३९ (एम प्रभाकर ५४*, **एसआर तेंडुलकर १६;** सीजेमॅकडरमॉट ५-५४) व १५६ (आरजे शास्त्री ४१, **एसआर तेंडुलकर ७;** सीजे मॅकडरमॉट ४-४७, एमजी ह्यूज ४-५०)

आस्ट्रेलिया ३४० (एमए टेलर ९४, डीसी बून ६६; कपिल देव ४-८०) व ५८-०

आस्ट्रेलिया १० गडी राखून विजयी

दुसरी कसोटी. मेलबोर्न – २६ ते २९ डिसेंबर, १९९१

भारत २६३ (केएस मोरे ६७*, **एसआर तेंडुलकर १५;** बीए रीड ६-६६) व २१३ (डीबी वेंगसरकर ५४, **एसआर तेंडुलकर ४०;** बीए रीड ६-६६)

आस्ट्रेलिया ३४९ (जीआर मार्श ८६, आयए हिली ६०, डीएम जोन्स ५९; कपिल देव ५-९७, एम प्रभाकर ४-८४) व १२८-२ (एमए टेलर ६०, डीसी बून ४४)*

आस्ट्रेलिया ८ गडी राखून विजयी

तिसरी कसोटी. सिडनी – २ ते ६ जानेवारी, १९९२

आस्ट्रेलिया ३१३ (डीसी बून १२९*, एमए टेलर ५६) व १७३-८ (एआर बॉर्डर ५३*;आरजे शास्त्री ४-४५, **एसआर तेंडुलकर १-२)**

भारत ४८३ (आरजे शास्त्री २०६, **एसआर तेंडुलकर १४८*,** डीबी वेंगसरकर ५४; सीजे मॅकडरमॉट ४-१४७)

सामना अनिर्णित

चौथी कसोटी. ॲडलेड – २५ ते २९ जानेवारी, १९९२

आस्ट्रेलिया १४५ (डीएम जोन्स ४१, एसएलव्ही राजू ३-११, **एसआर तेंडुलकर २-१०)** व ४५१ (डीसी बून १३५*, एमए टेलर १००, एआर बॉर्डर ९१*; कपिल देव ५-१३०)

भारत २२५ (कपिल देव ५६, **एसआर तेंडुलकर ६;** सीजे मॅकडरमॉट ५-७६) व ३३३ (एम अझरुद्दीन १०६, एम प्रभाकर ६४, **एसआर तेंडुलकर १७;** सीजे मॅकडरमॉट ५-९२)

आस्ट्रेलिया ३८ धावांनी विजयी

पाचवी कसोटी. पर्थ — १ ते ५ फेब्रुवारी, १९९२

आस्ट्रेलिया ३४६ (डीसी बून १०७, एआर बॉर्डर ५९, टीएम मूडी ५०; एम प्रभाकर ५-१०१) व ३६७-६ घोषित (डीएम जोन्स १०५*, टीएम मूडी १०१)

भारत २७२ **(एसआर तेंडुलकर ११४,** केएस मोरे ४३; एमआर व्हिटनी ४-६८, एमजी ह्यूज ४-८२) व १४१ (के श्रीकांत ३८, **एसआर तेंडुलकर ५;** एमआर व्हिटनी ७-२७)

आस्ट्रेलिया ३०० धावांनी विजयी

आस्ट्रेलिया मालिकेत ४-० विजयी

विश्वचषक स्पर्धा १९९२ मधील भारताची कामगिरी

दुसरा सामना. इंग्लंड वि भारत. पर्थ. २२ फेब्रुवारी, १९९२
इंग्लंड २३६-९ (५०/५० षटकं) भारत २२७ (४९.२/५० षटकं)
इंग्लंड ९ धावांनी विजयी

नववा सामना. भारत वि श्रीलंका. मॅके. २८ फेब्रुवारी, १९९२
भारत १-० (०.२/२० षटकं)
निकाल नाही

बारावा सामना. आस्ट्रेलिया वि भारत. ब्रिस्बेन. १ मार्च, १९९२
आस्ट्रेलिया २३७-९ (५०/५० षटकं) भारत २३४ (४७/४७ षटकं, लक्ष्य २३६)
आस्ट्रेलिया १ धावेने विजयी (सुधारित लक्ष्यानुसार)

सोळावा सामना. भारत वि पाकिस्तान. सिडनी. ४ मार्च, १९९२
भारत २१६-७ (४९/४९ षटकं) पाकिस्तान १७३ (४८.१/४९ षटकं)
भारत ४३ धावांनी विजयी

एकोणिसावा सामना. भारत वि झिंबाब्वे. हॅमिल्टन. ७ मार्च, १९९२
भारत २०३-७ (३२/३२ षटकं); झिंबाब्वे १०४-१ (१९.१/१९ षटकं. लक्ष्य १५९)
भारत ५५ धावांनी विजयी (सुधारित लक्ष्यानुसार)

चोविसावा सामना. भारत वि वेस्ट इंडीज. वेलिंग्टन. १० मार्च, १९९२
भारत १९७ (४९.४/५० षटकं) वेस्ट इंडीज १९५-५ (४०.२/४६ षटकं. लक्ष्य १९५)
वेस्ट इंडीज ५ गडी राखून विजयी (३४ चेंडू बाकी) (सुधारित लक्ष्य)

सत्ताविसावा सामना. न्यूझीलंड वि भारत. ड्यूनेडिन. १२ मार्च, १९९२
भारत २३०-६ (५०-५० षटकं) न्यूझीलंड २३१-६ (४७.१/५० षटकं)
न्यूझीलंड ४ गडी राखून विजयी (१७ चेंडू बाकी)

बत्तिसावा सामना. भारत वि दक्षिण आफ्रिका. ॲडलेड. १५ मार्च, १९९२
भारत १८०-६ (३०/३० षटकं) दक्षिण आफ्रिका १८१-४ (२९.१/३० षटकं)
दक्षिण आफ्रिका ६ गडी राखून विजयी (५ चेंडू बाकी)

अंतिम सामना. इंग्लंड विरुद्ध पाकिस्तान. मेलबोर्न. २५ मार्च, १९९२
पाकिस्तान २४९-६ (५०/५० षटकं); इंग्लंड २२७ (४९.२/५० षटकं)
पाकिस्तान २२ धावांनी विजयी

५.
अंजली

मी क्रिकेट खेळण्यात गुंतलो होतो. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पाय घट्ट रोवण्याचा प्रयत्न करत होतो. पण त्याच वेळी ऑगस्ट, १९९०मध्ये माझ्या वैयक्तिक जीवनाला मात्र अचानक एक नाट्यमय वळण मिळालं. मला अंजली भेटली. माझी होणारी जीवनसाथी. आज तिच्याच साथीने मी माझ्या आयुष्यातील सर्वोत्कृष्ट भागीदारी रचू शकलो आहे! अंजलीची विमानतळावरची भेट ही त्या भागीदारीची सुरुवात होती.

१९९० सालचा इंग्लंड दौरा संपवून मी मुंबईच्या विमानतळावर उतरलो होतो. बॅग्ज ताब्यात येण्याची वाट पाहत उभा असताना अचानक माझं लक्ष एका सुंदर, आकर्षक तरुणीकडे गेलं. बाहेरच्या गॅलरीत ती उभी होती. तीही माझ्याकडेच पाहत होती. हीच माझ्या जीवनाची जोडीदार होणार आहे, याचा मात्र त्या क्षणी मला पत्ताही नव्हता. तिच्या मैत्रिणीबरोबर – डॉक्टर अपर्णा संथानमबरोबर – ती आली होती. अपर्णा ही आज मुंबईतील प्रसिद्ध त्वचारोगतज्ज्ञ आहे. अंजलीची व माझी क्षणभरच नजरानजर झाली. त्यानंतर ती दिसेनाशी झाली.

मी विमानतळावरून बाहेर पडत असताना त्या दोघी मला पुन्हा दिसल्या. मी अंजलीला चटकन ओळखलं. तिने नारिंगी रंगाचा टीशर्ट व निळी जीन्स असा पोशाख केला होता. दरवाजाच्या बाहेरून ती माझ्या मागोमाग पळत होती. ती माझाच पाठलाग करते आहे हे तर उघडच होतं, पण तेवढ्यावरच ती थांबली नाही. आता ती मोठ्याने ओरडू लागली होती. ''तो बघ... कित्ती गोऽऽऽड आहे!'' मी लाजेने चूर झालो. काय करावं ते मला सुचेना. बाहेर अजित व नितीन माझी वाट बघत उभे असणार हे मला ठाऊक होतं. माझा बालमित्र सुनील हर्षे माझ्यासोबत होता. तो माझ्या कानात पुटपुटला, ''ती बघ, एक चिकनी मुलगी तुला हाका मारतेय. तुला भेटायला मॅड झालीय.'' मी तिला आधीच पाहिलं होतं. पहिल्याच नजरेत ती माझ्या मनात भरली होती. मी सुनीलला म्हटलं, ''बाहेर नितीन आणि अजित उभे असणार. त्यांच्यासमोर तिच्याशी बोलायची माझी तरी हिंमत होणार नाही.''

प्रेमात पडण्याचा काळ

अंजली व मी हळूहळू एकमेकांच्या प्रेमात पडलो. जवळजवळ पाच वर्षं आम्ही एकमेकांना भेटत होतो. प्रेमाचं रूपांतर गाढ श्रद्धेत झालं. त्यानंतर आमचा वाङ्निश्चय झाला व मग विवाह. आम्हा दोघांच्या घरातलं कौटुंबिक वातावरण पूर्णपणे भिन्न होतं. अंजली ही अर्धी गुजराती व अर्धी इंग्लिश आहे. लग्नापूर्वी दक्षिण मुंबईतल्या एका सुखवस्तू कुटुंबात ती राहत होती. सेंट झेवियर्स कॉलेजची ती विद्यार्थिनी होती. नंतर जे.जे. हॉस्पिटलमधून तिने वैद्यकशास्त्राचा अभ्यास केला. तिचं बोलणं छान, मनमोकळं असायचं. माझ्यापेक्षा खूपच वेगळ्या संस्कारात ती वाढली होती. घरात किंवा बाहेर वावरताना ती सर्रास पाश्चिमात्य पद्धतीचा पेहराव करत असे. माझी वागण्याची पद्धत अगदीच वेगळी होती. मी आमच्या कॉलनीबाहेर फारसा कधी पडलो नव्हतो. क्रिकेट व क्रिकेटपटू दोस्त हेच माझं विश्व होतं. एखाद्या मुलीबरोबर मी कधीच बाहेर फिरायला गेलो नव्हतो. तिला घरी घेऊन जायची तर दूरचीच बात! माझ्या वयाच्या मुलांची कॉलेजात मुलींशी मैत्री होत असे. मी सोळाव्या वर्षापासून भारतासाठी खेळायला लागलो होतो. त्यामुळे ती संधी माझ्या वाट्याला येणं शक्य नव्हतं.

मी अंजलीला मुंबईच्या विमानतळावर पहिल्यांदा पाहिलं असलं तरी अंजलीने मला त्याआधीही पाहिलं होतं. १४ ऑगस्टला. त्या दिवशी ओल्ड ट्रॅफर्डला मी माझं पहिलं शतक झळकवलं होतं. अंजली तेव्हा आई-वडिलांबरोबर इंग्लंडमध्ये

होती. तिचे वडील आनंद मेहता उत्तम ब्रिज खेळत. ब्रिज स्पर्धेत त्यांनी राष्ट्रीय विजेतेपद मिळवलं होतं. शिवाय क्रिकेटवर त्यांचं अतोनात प्रेम होतं. अंजलीला हाक मारून त्यांनी तिला टीव्हीवर माझ्या बॅटिंगची झलक बघायला बोलावलं. अंजलीला क्रिकेटमध्ये काडीचाही रस नव्हता. तिने काही ती मॅच पाहिली नाही. नंतर ती लगेच भारतात परतली होती. मी इंग्लंडहून आलो त्याच दिवशी अंजलीची आई, ॲनाबेलही भारतात येत होत्या. गेली तीन दशकं त्या भारतात अथक सामाजिक कार्य करत आहेत. आईला घेऊन जाण्यासाठी अंजली विमानतळावर आली होती. आमच्या भेटीचा योग असा जुळून आला.

आमच्या पहिल्या भेटीबद्दल अंजली मला नंतर काय म्हणाली, हेही सांगायला हवं. विमानतळावरून घरी आल्यावर, 'आज मला माझा भावी नवरा भेटला', असं तिने थट्टेत आपल्या आई-वडिलांना म्हणे सांगूनही टाकलं होतं! विमानतळावर मला पाहिल्यापासून ती मला प्रत्यक्ष भेटायला फार उत्सुक होती. तिला माझ्या घरचा फोन नंबर हवा होता. त्यासाठी तिने तिच्या मित्राला, मुफी मुझफ्फल लकडावालाला गाठलं. मुफी क्लब क्रिकेट खेळला होता. आज तो नामांकित सर्जन आहे.

मुफीने माझा फोन नंबर मिळवून तिला दिला. योगायोग असा की, तिने केलेला कॉल नेमका मीच उचलला. त्या काळी मोबाइल फोन्स नव्हते. मी कायम घराबाहेरच असल्यामुळे मी फोन उचलण्याचा प्रसंगच येत नसे. अंजलीने केलेला फोन मी उचलावा याचा अर्थ आमच्या दोघांच्याही पत्रिकेतले ग्रह नक्कीच जुळलेले असणार! 'विमानतळावर भेटलेली ती मुलगी मीच' अशी सुरुवात करून, 'आपण बाहेर भेटू शकतो का?' असं तिने मला सरळ विचारलं. मी सावध पवित्रा घेतला. मी फारसा उत्सुक आहे असं तिला भासू दिलं नाही. पण 'मला तू आठवतेस' असं मी तिला म्हटलं. 'क्रिकेट क्लब ऑफ इंडियावर सध्या मी सराव करतो. तिथे आपण भेटू शकतो,' असं मी तिला सुचवलं. प्रथम तिचा माझ्या बोलण्यावर विश्वास बसला नाही. 'त्या दिवशी मी कोणता ड्रेस घातला होता', असं तिने मला विचारलं. मी म्हटलं, 'नारिंगी टीशर्ट आणि निळी जीन्स.' हे ऐकून ती कमालीची खूश झाली.

ठरल्याप्रमाणे ती सीसीआयवर आली, पण आजूबाजूला खूप लोक असल्यामुळे आम्हाला नीट भेटता किंवा बोलता आलं नाही. आम्ही फक्त एकमेकांचे फोन नंबर घेतले. त्यानंतर आम्ही बऱ्याचदा एकमेकांना फोन करू लागलो. आमच्या दोघांत काहीतरी शिजत आहे, याचा सर्वांत आधी मीनाला, माझ्या वहिनीला संशय आला. 'ही कोण मुलगी तुला सारखी फोन करते आहे?' असं ती मला विचारायची. मी मात्र उत्तर द्यायचं टाळायचो. खाजगी गोष्टी घरात बोलायची मला सवय नव्हती. कधी सांगायची वेळ आली, तर मी खूप अवघडून जायचो.

आमची पहिली व्यवस्थित भेट झाली ती आमच्याच घरी. त्यासाठी आम्हाला मोठी शक्कल लढवायला लागली होती. एक क्रीडापत्रकार म्हणून तिने माझी मुलाखत घ्यायला घरी यायचं असं आम्ही ठरवलं. पत्रकारितेशी तिचा आलेला तो पहिला व शेवटचा संबंध. त्याआधी एकही महिला पत्रकार माझी मुलाखत घेण्यासाठी कधीही घरी आली नव्हती. सतत चाललेल्या आमच्या फोन कॉल्समुळे वहिनीला आधीच शंका आली होती. आता ही खास वार्ताहर घरी येणार हे कळताच तिचा संशय अधिकच बळावला.

त्या पहिल्या भेटीत अंजलीला काहीतरी विशेष खायला द्यावं, असं माझ्या मनात फार होतं. मी इंग्लंडहून खास चॉकलेट्स आणली होती, पण ती संपलेली पाहून मी चिंतेत पडलो. दोन चॉकलेट्स उरली होती. त्याचे मी नीट छोटे तुकडे कापून प्लेटभर चॉकलेट्स तिच्यासमोर ठेवली. अंजली त्या दिवशी फार वेळ घरी थांबू शकली नाही. मी खूप काही बोलायचं ठरवलं होतं. पण भेट मनाजोगती होऊ शकली नाही.

भेट निसटती झाली असली तरी त्या भेटीचा माझ्या मनावर खूप खोल ठसा उमटला होता. अंजली मला आधीच आवडली होती. आता तिचा सहवासही मला आवडला. तिच्यातलं मला नेमकं काय आवडलं हे मला नाही सांगता येणार; पण पहिल्या भेटीतही मला तिच्याशी बोलताना काहीच परकेपणा जाणवला नाही. जुनी ओळख असल्यासारखे आम्ही भेटलो, पण जास्त बोलायचं मी मुद्दामच टाळलं. काहीतरी मूर्खासारखं बोलून मी स्वत:चं हसं करून घेईन, अशी मला भीती वाटत होती. अंजलीच जास्त वेळ बोलली. मलाही तेच हवं होतं. शिवाय आमचं बोलणं इंग्लिशमध्ये सुरू होतं. त्या वेळी मी

सफाईदारपणे इंग्लिश बोलू शकत नसे. जास्त न बोलण्यामागे तेही एक कारण होतं. अंजलीने मात्र माझी ती उणीव मला कधीही जाणवू दिली नाही. तिच्यासारखी जिवाभावाची सखी लाभणं हे माझं भाग्य होतं.

त्या भेटीनंतर आम्ही फोनवर तासन्तास बोलू लागलो. प्रत्यक्ष भेटीचा मात्र पुन्हा योग येत नव्हता. एकदा आम्ही रात्री साडेआठला भेटून लाँग ड्राइव्हला जायचं ठरवलं. आम्ही एकमेकांत गुंतत चाललो आहे, याची तेव्हा अंजलीच्या आई-वडिलांना काहीच कल्पना नव्हती. ते नेहमीप्रमाणे टीव्ही बघत होते. अंजलीला मनातून मला भेटायचं होतं, पण इतक्या उशिरा घरातून अचानक बाहेर पडायचं धाडस तिला होईना. आई-वडिलांना संशय येईल म्हणून ती घाबरून घरातच बसून राहिली. मी बांद्र्याहून ४० मिनिटं गाडी चालवत वॉर्डन रोडला तिच्या घराखाली येऊन थांबलो होतो. शेवटी नाइलाजाने कंटाळून मला परत फिरावं लागलं. लोक मला ओळखणार या भीतीमुळे मी पब्लिक बूथवरून तिला फोनही करू शकत नव्हतो. (त्या काळी मोबाइल नव्हते.) बांद्र्याला घरी येऊन मी तिला फोन केला तेव्हा तिच्या न येण्याचं कारण मला समजलं. मी तिला पुन्हा एकदा बाहेर पडायचा प्रयत्न करायला सांगितलं आणि पुन्हा वॉर्डन रोडला जाऊन पोचलो. त्या दिवसापासून मी मोबाइल फोनचा कट्टर पुरस्कर्ता झालो आहे!

त्यानंतर थोड्याच दिवसांत आम्ही पुन्हा भेटलो. अंजलीने तिच्या घरापाशी मला बोलावलं. त्या वेळी अंजलीपाशी मारुती-८०० गाडी होती. नव्वदच्या दशकात सर्वांना परवडणारी ती एकच गाडी होती. अंजलीच्या गाडीतून आम्ही मरीन ड्राइव्हला गेलो. तिला तिथलं शहाळ्याचं पाणी प्यायचं होतं. एअर इंडिया ऑफिसच्या समोरच्या कट्ट्यावर बसून शहाळ्याचं पाणी प्यायची ती आमची शेवटची वेळ ठरली. खरं म्हणजे त्याही वेळी कोणीतरी मला ओळखण्याची शक्यता होती; पण अंजलीला खूश करण्याच्या नादात मी तिला चटकन 'हो' म्हणून बसलो होतो. इंग्लंडमध्ये मारलेल्या शतकामुळे मी घराघरांत जाऊन पोचलो होतो. मी जाईन तिथे लोक माझी स्वाक्षरी मागू लागले होते. मी हे अंजलीपाशी बोललो नव्हतो. मी खोटी फुशारकी मारतो आहे, असा तिचा समज झाला असता. कारण अंजलीला त्या वेळी क्रिकेटमधलं काहीच समजत नव्हतं. मला लोक ओळखत असतील ही कल्पनाही तिच्या मनाला शिवली नव्हती. भारतात एखाद्या क्रिकेटरचं आयुष्य किती सार्वजनिक होऊन जातं याची त्या बिचारीला तेव्हा काहीच कल्पना नव्हती. खरंच आम्हाला खाजगी आयुष्य उरलं नव्हतं. थिएटरमध्ये जाऊन चित्रपट पाहणं, रस्त्याच्या कडेला असलेल्या धाब्यावर खाणं, समुद्रकिनाऱ्यावर फेरफटका मारणं या गोष्टी कोणतंही तरुण जोडपं सहज करू शकतं. आम्हाला ती मजा कधीच चाखता आली नाही. अंजलीला व मला ही तडजोड अगदी सुरुवातीपासून करावी लागली. एकदाच आम्ही थोडी बंडखोरी करण्याचा प्रयत्न केला. अंजली, तिचे वडील आणि माझे काही मित्र मिळून आम्ही वरळीला 'रोजा' चित्रपट पाहायला गेलो. आम्ही काळजीपूर्वक आखणी केली होती. कोणी ओळखू नये म्हणून मी केसांचा टोप, खोट्या मिशा आणि चश्मा लावला होता. मध्यंतरापर्यंत आमची योजना सुरळीत पार पडली. पण अचानक माझा चश्मा खाली पडला. चश्म्याची एक काच फुटली. डोळ्याला इजा होईल या भीतीने मित्रांनी मला चश्मा लावू दिला नाही. त्या गडबडीत मिशाही सुटून लोंबकळू लागल्या. लोकांनी लगेच मला ओळखलं. आमची पंचाईत झाली. इतका गोंगाट आणि गोंधळ उडाला की, आम्हाला चित्रपट अर्धवट सोडून धूम ठोकावी लागली.

असाच एक प्रसंग काही वर्षांपूर्वी स्वित्झर्लंडला घडला होता. सुट्टीसाठी आम्ही तिथे गेलो होतो. 'हॉटेलऐवजी एखाद्या बंगलीत राहून घरीच स्वयंपाक करू या', असं मी सुचवलं होतं. सर्व काही ठरल्याप्रमाणे सुरळीत चाललं होतं. मात्र एक दिवस आम्ही इंटरलेकनला जायचं ठरवलं. 'दिलवाले दुल्हनिया ले जाएंगे' या चित्रपटाचं चित्रीकरण झाल्यापासून इंटरलेकन पर्यटकांचं आकर्षण ठरू लागलं होतं. पहाटे लवकर उठून तिथे चालत जायचं आम्ही ठरवलं. 'वाटेत लोक तुम्हाला नक्की ओळखतील', असा माझ्या काही मित्रांनी मला धोक्याचा इशारा दिला. म्हणून आम्ही घोडागाडी ठरवली. आम्ही बाहेर पडत असतानाच काही भारतीय पर्यटकांनी मला ओळखलं. ते आमचा पाठलाग करू लागले. मी गाडीवानाला वेग वाढवायला सांगितला तरी ते गाडीच्या मागे धावत येऊ लागले. अखेर आम्हाला गाठणं शक्य नाही हे लक्षात आल्यावर त्यांनी प्रयत्न सोडून दिला.

लोकांच्या अशा आगंतुकपणामुळे अंजलीला व मला बाहेर मोकळेपणाने भेटणं शक्यच नव्हतं. त्या दुसऱ्या भेटीनंतर

आमच्यात फारसा संपर्कही उरला नव्हता. मी दौऱ्यावर निघून गेलो होतो. अंजली मेडिकलच्या अंतिम परीक्षेचा अभ्यास करण्यात मग्न झाली होती. ती किती जीव तोडून अभ्यास करायची हे मला ठाऊक होतं. परीक्षेत ती चांगलं यश मिळवणार याची मला खातरी होती. परीक्षेच्या दिवशी शुभेच्छा देण्यासाठी मी आस्ट्रेलियाहून तिला भल्या पहाटे फोन केला. बऱ्याच दिवसांनंतर फोनवर तिचा आवाज ऐकून मी खूश झालो. ती फारच धास्तावलेली होती. आपण परीक्षेत नापास होणार, अशी तिला भीती वाटत होती. ती नापास होणं अशक्य आहे हे मला पक्कं ठाऊक होतं. ''तू जर नापास झालीस तर मुंबईतले सर्व विद्यार्थी नापास होतील,'' असं मी तिला म्हणालो. त्या पूर्वी प्रत्येक परीक्षेत ती पहिली आली होती. या खेपेसही तसंच घडणार याची मला खातरी होती. ''तू दिवसाला जितके तास अभ्यास केलास तेवढा मी महिनाभरातही कधी केला नव्हता,'' असंही मी तिला म्हटलं. त्यानंतर बऱ्याच दिवसांनी ती एकदा मला म्हणाली की, ''त्या दिवशीच्या तुझ्या फोन कॉलमुळे माझ्या मनावरचा सगळा ताण एकदम निघून गेला.'' मी आता तिची फक्त काळजीच करत नव्हतो; ती आता माझ्या काळजाचा तुकडा झाली होती.

अपेक्षेप्रमाणे ती परीक्षेत पहिली आली. त्यानंतर बालरोगचिकित्सेमध्ये एम.डी. करायची तिची इच्छा होती. तिच्या कर्तृत्वाचा मला अभिमान वाटायचा. मी तिला प्रोत्साहन दिलं. पालघरच्या एका इस्पितळात ती इंटर्न म्हणून रुजू झाली. पालघर हे मुंबईच्या हद्दीबाहेर असलेलं एक छोटंसं गाव आहे. त्या काळात, मला फोन करण्यासाठी अंजलीला आगगाडीने २० मिनिटांचा प्रवास करत बोईसरला यावं लागे. या प्रवासात मुफी तिच्याबरोबर असे.

एम.डी.चा अभ्यास करू लागल्यावर ती क्रिकेटमध्ये जास्त रस घेऊ लागली. आम्ही फोनवर क्रिकेटबद्दल बोलायला लागलो होतो. गंमत म्हणजे तिने क्रिकेटच्या नियमावलींचं पुस्तकही विकत घेतलं होतं. 'काउ कॉर्नर मैदानात नक्की कुठे असतो?' किंवा 'यष्टिरक्षक हा उजवा किंवा डावरा असू शकतो का?' असे काहीही प्रश्न ती अचानक मला विचारायची. अल्पावधीतच तिला क्रिकेट चांगल्यापैकी समजू लागलं. तिची क्रिकेटची आवड वाढावी म्हणून मीही तिला अधूनमधून क्रिकेटबद्दल प्रश्न विचारत राहायचो. १९९२ सालची विश्वचषक स्पर्धा तिने प्रथमच टीव्हीवर अगदी आवडीने पाहिली. वेस्ट इंडीजविरुद्ध खेळताना मी कर्टली अँब्रोजच्या गोलंदाजीवर स्लिपमध्ये झेल देऊन बाद झालो. मी इतक्या लवकर बाद झालेला पाहून ती रडायलाच लागली. मुफी तिच्याबरोबर होता. मुफीने कशीबशी तिची समजूत काढली. तो तिला म्हणाला, ''अगं, तो बॉल इतका जबरदस्त पडला की दुसरा कोणी फलंदाज त्या जागी असता, तर तो त्या चेंडूच्या जवळपासही जाऊ शकला नसता. सचिनसारखा तरबेज बॅट्समन होता, म्हणून तो निदान बॉलला बॅट तरी लावू शकला.'' मुफीची थाप पचली गेली.

मोबाइल फोन्स व टेक्ट मेसेजेस पाठवायची त्या वेळी सोय नसल्यामुळे अंजलीने व मी एकमेकांना पत्रांवर पत्रं लिहिली. दौऱ्यावर असताना माझा कधीच एखाद्या शहरात फार दिवस मुक्काम नसायचा. दोन किंवा तीन आठवड्यांनी मी कुठे असेन याचा नीट हिशोब करून त्या पत्त्यावर अंजली पत्र पाठवत असे. अंजलीची पत्रं हा माझ्यासाठी एक अनमोल ठेवा बनला आहे. आजही मी जेव्हा तिची पत्र पुन्हा वाचतो, तेव्हा सर्वप्रथम तिचं वळणदार हस्ताक्षर माझ्या डोळ्यांत भरतं. माझ्यापेक्षा तिचं हस्ताक्षर खूपच चांगलं आहे. लिखाणाची मला उपजत आवड नव्हती. त्यामुळे अंजलीला पत्र लिहिताना मी एकेका शब्दावर खूप वेळ विचार करत असे.

विश्वचषक स्पर्धा संपवून आल्यावर मार्च, १९९२मध्ये मी अंजलीच्या घरी पहिल्यांदा गेलो. त्या वेळीही मुफीनेच पुढाकार घेतला होता. अंजलीला मी प्रथमच भेटतो आहे, असं अंजलीच्या आई-वडिलांना भासवण्यात आलं. केवळ मुफीच्या आग्रहास्तव मी यायला होकार दिला आहे, असाही त्यांचा समज करून दिलेला होता. मुफीने काळजीपूर्वक नाटक रचलं व आम्ही ते हुबेहूब वठवलं. आमचा वाङ्‌निश्चय ठरल्यानंतर आम्ही खरी गोष्ट अंजलीच्या आई-वडिलांना सांगितली. त्या सर्व मदतीबद्दल मुफीचे आभार मानावेत तेवढे कमीच आहेत.

आम्हाला अजूनही लपूनछपूनच भेटावं लागत आहे, ही गोष्ट आम्हा दोघांनाही खटकत होती. आम्ही लग्न करायचं ठरवलं. मी सुनील हर्षेला गाठलं. अजित-अंजलीची भेट घडवायची जबाबदारी मी त्याच्यावर सोपवली. त्याप्रमाणे ते तिघे दक्षिण मुंबईतल्या वेलिंग्डन क्लबमध्ये भेटले. वेलिंग्डन क्लबमध्ये तिघांच्या गप्पा सुरू असताना मी मात्र घरी अस्वस्थपणे

येरझाऱ्या घालत होतो. मला काही अजितकडून केवळ होकार मिळवायचा नव्हता. अंजली मला जितकी आवडते, तितकीच ती माझ्या मित्रांना व घरातल्या प्रत्येकाला आवडावी अशी माझी मनापासून इच्छा होती. अखेर मी सुनील व अजितला घरी परत येताना पाहिलं. सुनील अजितच्या मागे चालत होता. त्याने हळूच अंगठा उंचावून काम यशस्वी झाल्याची मला खूण केली. अंजली माझ्यासाठी अगदी योग्य मुलगी आहे, असं अजितने सांगताच माझ्या आनंदाला पारावार राहिला नाही.

या मधल्या काळात अंजलीला आता क्रिकेट खूपच आवडू लागलं होतं. १९९४मध्ये मी जेव्हा न्यूझीलंडच्या दौऱ्यावर गेलो तोपर्यंत तिला क्रिकेटमधला प्रत्येक बारकावा समजू लागला होता. त्या दौऱ्यात मी प्रथमच एकदिवसीय सामन्यात आघाडीला येऊन फलंदाजी करू लागलो होतो. मी माझ्या नव्या भूमिकेवर खूश होतो. न्यूझीलंडमधून फोन करून मी अतिशय आनंदाने मनातल्या भावना अंजलीपाशी मोकळ्या केल्या.

न्यूझीलंडचा दौरा संपत आला होता. अंजलीबद्दलची ओढ वाढतच होती. आमच्या प्रेमाला आता चार वर्षं पूर्ण होणार होती. प्रेमाचा पुढचा टप्पा गाठणं जरुरीचं होतं. अंजलीनेच त्या विषयाला प्रथम तोंड फोडलं. न्यूझीलंडमध्ये आम्ही बरेचदा एकमेकांना फोन करायचो. एकदा फोनवर बोलताना तिने आमच्या साखरपुड्याचा विषय काढला. मी लगेच तो विषय उचलून धरला. साखरपुड्यासाठी मी कधीही तयार आहे, असं तिला सांगितलं. पण ''माझ्या वतीने तू दोघांच्याही घरी याबद्दल बोललीस तर ते जरा बरं होईल,'' असं मी तिला म्हणालो. बोलण्याच्या बाबतीत मी तसा दुबळाच होतो. ती सुरुवातीला तयार नव्हती; पण अखेर नाराजीने तिने माझा प्रस्ताव मान्य केला. मी सुटकेचा नि:श्वास सोडला. इतक्या नाजूक विषयावर मला माझ्या वडिलांशी बोलणं शक्य झालं नसतं. माझ्या वडिलांच्या नकाराची मला भीती वाटत नव्हती. उलट ते 'हो' म्हणणार याची मला पूर्ण खातरी होती; पण वडिलांबरोबर माझ्या भावी पत्नीविषयी चर्चा करण्याची कल्पनाही मी करू शकत नव्हतो.

अंजली मला नंतर म्हणाली की, तिलाही माझ्या घरी बोलताना सुरुवातीला खूपच अवघडल्यासारखं झालं होतं. 'तुमच्या मुलाला माझ्याशी साखरपुडा करायचाय' हे माझ्याच आई-वडिलांना कसं सांगायचं, ते तिला समजेना. पण माझ्या आई-वडिलांना माझा संकोची स्वभाव पुरता ठाऊक होता. अंजलीमार्फत ही गोष्ट मी त्यांना का सांगायला लावली असेन याचा अर्थ त्यांच्या चटकन ध्यानात आला असणार. आम्हा दोघांचीही साखरपुडा करायची इच्छा आहे ना, एवढंच फक्त त्यांना जाणून घ्यायचं होतं. आम्ही घेतलेल्या निर्णयाने त्यांना आनंदच झाला होता. एक वर्षानंतर आम्ही लग्न करायचं ठरवलं. त्या वेळीही अंजलीच पुन्हा दोघांशी एकट्याने जाऊन बोलली. तेव्हाही माझ्या आई-वडिलांनी आनंदाने आमच्या लग्नाला होकार दिला. याबाबतीत अंजलीला मी खूप मानतो. कोणालाही सहज आपलंसं करण्याचं कसब तिच्यामध्ये आहे. तिने आणखी एक कठीण जबाबदारी पार पाडलेली पाहून माझ्या मनावरचं ओझं हलकं झालं. एवढं मोठं काम केल्याबद्दल तिचं कौतुक करावं तेवढं थोडंच होतं.

वाङ्‌निश्चय व विवाह

२४ एप्रिल, १९९४ रोजी आमचा साखरपुडा झाला. त्याच दिवशी माझा एकविसावा वाढदिवसही होता. ब्रीच कँडीला अंजलीच्या घरी झालेला समारंभ अगदी छोटेखानी व फक्त दोन कुटुंबांपुरता मर्यादित होता. काही निवडक मित्रांनाही मी बोलावलं होतं. आमच्या आयुष्यातला तो खूप महत्त्वाचा दिवस होता. त्या दिवशी अनुभवलेलं सुख व समाधान आम्ही कधीच विसरू शकणार नाही. दोन कुटुंबं एकत्र जोडली गेली होती. माझ्यासाठी ती एक नवी सुरुवात होती. २५ मे, १९९५ रोजी आमचं लग्न झालं. अंजली मेहता आता अंजली तेंडुलकर झाली. माझ्या जीवनात एक नवं पर्व सुरू झालं.

''तू क्रिकेट खेळत राहून तुझं स्वप्न पूर्ण कर, मी आपल्या कुटुंबासाठी माझं काम सोडायला तयार आहे.'' साखरपुड्याआधीच अंजलीने ही गोष्ट मला आपणहून सांगितली होती. हा खरंच खूप मोठा त्याग होता. आम्हा दोघांना एकाच वेळी आपापल्या क्षेत्रात काम करत राहणं अशक्य आहे, याची जाणीव दोघांनाही होती. घर व कुटुंब सांभाळण्यासाठी कुणीतरी एकाने घरी राहणं आवश्यक होतं. अंजलीने ती जबाबदारी उचलली म्हणून मी क्रिकेट खेळू शकलो. आमच्या

वैवाहिक जीवनाच्या सुरुवातीलाच तिने हा कठीण निर्णय अगदी सहजपणे घेतला याचं कौतुक मला कायम वाटत आलं आहे.

आमचं लग्न पारंपरिक पद्धतीने झालं. महाराष्ट्रीय कुटुंबातील रीतीनुसार माझ्या आईने अंजलीला मंगळसूत्र, कुंकवाचा करंडा, हिरव्या बांगड्या, जोडवी व पैंजण भेट म्हणून दिलं. ''आईने दिलेल्या भेटीतलं मी रोज काय काय घातलं पाहिजे?'' अंजलीने नंतर मला विचारलं होतं. मी तिला रोज फक्त मंगळसूत्र गळ्यात घालायला सांगितलं. आजपर्यंत एकदाही तिने गळ्यातून मंगळसूत्र काढलेलं नाही.

खाजगी किंवा व्यावसायिक जीवनात अशा तडजोडी करणं तिला सोपं गेलेलं नसणार, पण एका शब्दानेही तिने कधी नाराजी प्रकट केलेली मला आठवत नाही. यामुळे पूर्ण विश्वास टाकून जिवापलीकडे प्रेम करावं अशी जिवाभावाची सखी मला मिळाली होती. मी माझ्या मनातल्या भावना सहसा व्यक्त करत नाही. हा माझ्या स्वभावातला दोष आहे, ही गोष्ट मला कबूल करायलाच हवी; पण मी अंजलीचं खूप काही देणं लागतो यात काही शंकाच नाही. एक गमतीची गोष्ट सांगायची म्हणजे, अंजलीला मी आजपर्यंत तिच्या नावाने कधी हाक मारलेली नाही. तिच्याशी बोलताना तिला मी कधी 'अंजली' किंवा 'अंजू' असं म्हटलेलं नाही. तिला नक्की कोणत्या नावाने हाक मारावी हे अजूनही मला कळलेलं नाही; पण त्यामुळे काय फरक पडतो? मी आहे हा असा आहे आणि मी असा असूनही प्रत्येक क्षणी मला माझ्या पत्नीची भक्कम साथ मिळाली आहे.

लग्नानंतर मिळालेल्या अतीव सुखाचा एक छोटा दुष्परिणाम मला भोगावा लागला. लग्न झाल्यावर मी खूपच सैलावलो. परिणाम म्हणजे माझं वजन फारच वाढलं. हनिमूनच्या काळात माझं जिभेवरचं नियंत्रण साफ सुटलं होतं. त्याच वेळी माझे काही मित्र गोव्यात होते. गोव्यात सुरू असलेली डबल विकेट स्पर्धाही मी खेळत होतो. एकूण धमाल सुरू होती. माझ्या आवडत्या पदार्थांवर व मिष्टान्नांवर मी आडवा हात मारत होतो. क्रिकेट खेळत असताना मी या सर्व गोष्टी जाणीवपूर्वक टाळल्या होत्या. चॉकलेट्स व आइसक्रीम खाण्याला तर काही सुमारच नव्हता. या सर्व लाडकौतुकाची अखेर मला किंमत मोजावी लागली.

मुंबईला आल्यावर माझ्या लक्षात आलं की, रोजच्या वापरातले कपडेही आता मला घट्ट होऊ लागले आहेत. कंबरेभोवतीचा भागही काही इंचाने सुटला आहे. जिभेवर संयम ठेवणं अतिशय जरुरीचं होतं. १९९५मध्ये आम्हाला फारसं क्रिकेट खेळावं लागणार नव्हतं. माझा संयम सुटायचं तेही एक कारण होतं. मुंबईला आल्यानंतर २० दिवस मी ठरवून पथ्य पाळलं. बिनसारखेचा चहा, उकडलेले हरभरे, संत्र व लिंबाचं सरबत एवढाच माझा आहार होता. मी जोरदार व्यायाम करायला सुरुवात केली होती. सकाळी तासभर धावायचो. मग वजन उचलण्याचा व्यायाम. त्यानंतर संध्याकाळी दोन-तीन तास टेबल टेनिस. टेबल टेनिस खेळतानाही बॉल जिथे जाईल तिथे मी स्वत: जाऊन तो बॉल घेऊन येत असे. मी मारलेल्या स्मॅशमुळे बॉल जर माझ्या प्रतिस्पर्ध्याच्या मागे जाऊन पडला असेल, तर तिथे जाऊन मी तो घेऊन यायचो. २० दिवसांत माझं वजन १० किलोंनी घटलं; पण त्यामुळे मला थोडं भोवळ आल्यासारखं वाटू लागलं. अशक्तपणाही जाणवू लागला. त्या दिवसापासून मी माझं पथ्य बंद केलं. तीन आठवड्यानंतर मी प्रथमच जेवलो. पण ते जेवण होतं, उकडलेला पालक व उकडलेला कोबी. त्यानंतर मात्र मी नियमित जेवू लागलो.

योग्य जोडीदार

अंजलीची कौटुंबिक पार्श्वभूमी आमच्यापेक्षा खूपच वेगळी होती. तरीही ती पारंपरिक तेंडुलकर कुटुंबामध्ये सहज रुळून गेली. यातूनच अंजलीचा प्रेमळ स्वभाव व कौटुंबिक निष्ठा दिसून येते. त्याबद्दल तिला द्यावं तितकं श्रेय कमीच आहे. ती बुद्धिमान विद्यार्थिनी होती. स्वत:च्या क्षेत्रात ती अलौकिक कामगिरी करू शकली असती; पण तिने फक्त मला साथ द्यायचं ठरवलं. गेली दोन दशकं तिने प्रत्येक क्षणी मला सोबत केली आहे. अनेकदा मी घरापासून खूप दूर असायचो. माझ्या मुलांचा – सारा व अर्जुनचा – चेहराही मी कित्येक महिने पाहू शकत नसे. उदाहरणच द्यायचं तर २०११च्या विश्वचषक स्पर्धेनंतर मला अचानक जाणवलं की, अर्जुन माझ्याएवढा उंच झाला आहे! (आता तर तो माझ्याहून उंच झाला आहे.) सांगायची गोष्ट म्हणजे, घरापासून दूर असल्यामुळे घरात घडणाऱ्या काही सुंदर क्षणांना मी पारखा झालो होतो. व्यावसायिक खेळाडूच्या

जीवनातला तो एक अपरिहार्य भाग असतो हे जरी सत्य असलं, तरी ते सत्य स्वीकारणंही खूप कठीण जातं. मुलांसोबत अंजली आहे, या एकाच भरवशावर मी ते सत्य पचवू शकलो.

क्रिकेट हा माझा श्वास व ध्यास आहे ही गोष्ट अंजलीनेही मनापासून समजून घेतली होती. माझ्या कर्तृत्वाचा तिला सार्थ अभिमान होता. अंजलीमुळे मी निर्धास्त होतो. प्रसंगी मी तिच्या खांद्यावर डोकं ठेवून विसावू शकत होतो. मी यशस्वी व्हावं यासाठीच तिची अखंड धडपड सुरू होती. प्रत्येक निर्णायक क्षणी तिने मला मोलाचा सल्ला दिला होता. ती फक्त माझ्याच नव्हे, घरातल्या प्रत्येकाच्याच मागे खंबीरपणे उभी राहत होती. माझी मुलं, माझी आई, आमचं विस्तारित कुटुंब, आर्थिक गुंतवणूक... ती प्रत्येक गोष्टीची तितकीच काळजी घेत होती. अंजलीवर घर सोपवून मी शांतपणे क्रिकेट खेळू शकत होतो. तिचाच मला भक्कम आधार होता. माझ्या मनाच्या गोंधळलेल्या अवस्थेत तिनेच मला अनेकदा सावरलं आहे. 'घरी लवकर परत ये' हे शब्द तिने कधीही उच्चारले नाहीत. उलट 'काम मनासारखं झाल्याखेरीज घरी परतू नकोस', असा तिचा आग्रह असायचा. तिला व माझ्या मुलांना मी पुरेसा वेळ देऊ शकलो नाही, याचं शल्य माझ्या मनाला कायम लागून राहणार आहे. पण तिचा व माझ्या मुलांचा मला मिळालेला आधारही मी कधीच विसरू शकत नाही. शेवटी आणखी एका गोष्टीचा उल्लेख मला केलाच पाहिजे. डॉक्टर पत्नी मिळाल्यामुळे मला त्याचा वेगळाच फायदा झाला आहे. अंजलीने माझ्या जखमेवर केवळ फुंकर न घालता वेळोवेळी त्या जखमेवर मलमपट्टीही केली आहे!

६.

जडणघडणीचा काळ

ऑस्ट्रेलियन दौरा व विश्वचषक स्पर्धा संपवून आम्ही मार्च, १९९२मध्ये भारतात परतलो. त्या खडतर दौऱ्यात चांगलीच दमछाक झाली होती. काही आठवडे तरी मला विश्रांतीची गरज वाटत होती. यानंतर वर्षअखेरीस दक्षिण आफ्रिकेचा दौरा होता. तोपर्यंत सात-आठ महिने मी मोकळाच होतो. सुदैवाने सुरुवातीचे काही दिवस मला शांतपणे घरी राहता आलं. बऱ्याच दिवसांनी मी कॉलनीतल्या मित्रांबरोबर पूर्वीसारखा टेनिस बॉलने क्रिकेट खेळलो. त्या ओळखीच्या वातावरणात निवांतपणे वेळ घालवताना खूप मजा येत होती.

एक दिवस मी असाच खाली मित्रांबरोबर खेळत असताना अजितने आमच्या गॅलरीतून मला हाक मारली. 'यॉर्कशायर कौंटी क्रिकेट क्लब'मधून घरी फोन आला होता. यॉर्कशायरतर्फे कौंटी क्रिकेट खेळण्यासाठी ते मला निमंत्रित करत होते. मी फोन घेतला. यॉर्कशायरसारख्या नामांकित क्लबकडून प्रस्ताव आल्यामुळे मी मनातून खूश झालो होतो. करार किंवा अन्य तपशिलांबद्दल मी त्यांना काही विचारलंही नाही. इंग्लंडमधल्या कौंटी चँपियनशिपमध्ये खेळायची संधी मिळते आहे, याचाच मला खूप आनंद झाला होता. त्या संधीचं सोनं करण्याचा मी निश्चय केला. खरंतर इंग्लंडला गेल्यावर मला स्वत:च स्वयंपाक करावा लागणार होता, कपड्यांना इस्त्री करावी लागणार होती, तसंच एकट्याने गाडी चालवणं आणि अनेक घरगुती छोटी-मोठी कामं अशी विविध प्रकारची जबाबदारी माझ्या अंगावर पडणार होती; पण हा विचारही त्या क्षणी माझ्या मनात आला नव्हता. त्यानंतर काही दिवसांनी सर्व तांत्रिक बाबींची पूर्तता करण्यासाठी यॉर्कशायर क्लबचे सीईओ ख्रिस हॅस्सेल भारतात आले. त्या वेळी मी ठाणे शहरात एक सामना खेळत होतो. त्या मैदानातच मी करारावर सही केली. यॉर्कशायरने त्यापूर्वी कोणत्याही परदेशी खेळाडूबरोबर करार केला नव्हता. यॉर्कशायर क्लबच्या १२८ वर्षांच्या इतिहासात क्लबतर्फे खेळणारा मी पहिला परदेशी खेळाडू ठरलो होतो. या गोष्टीचा आजही मला अभिमान वाटतो.

यॉर्कशायरचा बच्चा

एकोणिसावा वाढदिवस साजरा करून मी एप्रिल, १९९२च्या अखेरीस इंग्लंडला रवाना झालो. यॉर्कशायरला मी एकूण साडेतीन महिने राहिलो. एकट्याने घरापासून इतके दिवस दूर राहण्याची ती माझी पहिलीच वेळ होती. दोन्ही देशांच्या सांस्कृतिक वातावरणातला फरक मी प्रथमच अनुभवत होतो. तो अनुभव नक्कीच सोपा नव्हता. परंतु, क्लबच्या व्यवस्थापनाने मात्र मला अगदी घरच्यासारखं सांभाळून घेतलं. यॉर्कशायरमधील माझा वास्तव्याचा काळ मला खूप काही शिकवून गेला.

तिथले रस्ते समजून घेणं हा माझ्यासमोरचा सर्वांत मोठा प्रश्न होता. माझा संघ-सहकारी रिचर्ड ब्लेकीच्या गाडीमागून माझी गाडी चालवत मी मैदानावर पोचत असे. इंग्लंडमध्ये गाडी चालवायची मला सवय नव्हती. मैदानावर लवकर पोचण्यासाठी मी बरेचदा 'फास्टेस्ट लेन' मधून गाडी चालवायचो. पण वेगात गाडी चालवताना मला बाहेर पडण्याचा मार्ग सापडत नसे व दरम्यानच्या काळात मी ब्लेकीलाही हरवून बसत असे. अशा वेळी गाडी पुन्हा मागे वळवणंही अशक्य होऊन जाई. गाडी 'स्लो लेन' मध्ये न ठेवल्याबद्दल मग मी स्वत:लाच दोष देत असे. त्या वेळी मोबाइल फोन्स नसल्यामुळे कुणाशीही चटकन संपर्क साधता येत नसे. त्यामुळे ज्या गोष्टीची मला मनस्वी चीड होती तेच नेमकं घडत असे. सकाळच्या सरावाला पोचण्यास मला उशीर होई.

१९९१मध्ये मी लीग क्रिकेटचे काही सामने खेळायला इंग्लंडमध्ये आलो होतो. त्या वेळी मी थोडीफार गाडी चालवली होती. भारताचा द्रुतगती गोलंदाज अतुल वासनबरोबर मी तेव्हा राहत होतो. अतुल अतिशय उदार मनाने त्याची गाडी मला चालवायला द्यायचा. पूर्वी कधी मी गाडी चालवली आहे का, एवढाच प्रश्न अतुलने मला विचारला होता. ``माझ्याकडे आंतरराष्ट्रीय लायसन्स आहे आणि कुठेही गाडी चालवण्याइतका मला आत्मविश्वास आहे," असं मी त्याला म्हटलं होतं. अतुलने मला सांगितलं की, ''इंग्लंडमध्ये गाडी चालवताना नेहमी दोन गोष्टी लक्षात ठेवायच्या. ब्रेक्सचा वापर कमी करायचा आणि गाडी नेहमी एकाच लेनमधून चालवायची.'' पण पहिल्याच दिवशी माझ्यावर एक वाईट प्रसंग ओढवला. मी फास्ट लेनमधून गाडी चालवत होतो. एका क्षणी गाडी अचानक थांबली. सगळे प्रयत्न करूनही गाडी पुन्हा सुरू होईना. माझ्या मागे गाड्यांच्या रांगा लागल्या. मी अतुलला म्हटलं, *'गाडी स्टार्ट नहीं हो रही है यार!''* (गाडी चालूच होत नाहीये रे!)

अतुलला वाटलं, मी मस्करी करतो आहे. तो म्हणाला, ''ॲक्सिलेटर दाब.'' मी म्हटलं, ''तेही करून झालं. गाडीची पॉवरच गेली आहे.'' त्याच क्षणी आमच्या दोघांच्याही लक्षात आलं की, गाडीतलं डिझेल संपलं आहे. अतुलने मला ताबडतोब पिवळे दिवे (हॅजार्ड लाइट्स) चालू करायला सांगितलं. पण मला दिवे चालू करायचा स्विच सापडेना. ते कामही अखेर अतुलनेच केलं. आम्ही महत्प्रयासाने गाडी बाजूला घेतली व ऑटोमोबाइल असोसिएशनला फोन करून मदत मागितली.

इंग्लंडच्या भौगोलिक माहितीचं अज्ञान ही माझी दुसरी समस्या होती. त्यामुळे यॉर्कशायरच्या वास्तव्यात माझ्या हातून अनेक घोडचुका झाल्या. आता त्या आठवताना मात्र गंमत वाटते. इंग्लंडच्या दोन विरुद्ध टोकांना वसलेल्या शहरात सलग लागोपाठच्या दिवशी मॅच खेळायला मी असाच अजाणता होकार दिला होता. आदल्या दिवशी मी लंडनमध्ये भारत-पाकिस्तान महोत्सवी सामन्यात खेळणार होतो व त्याच्या दुसऱ्या दिवशी न्यू कॅसल येथे इंग्लंड विरुद्ध शेष विश्व संघाचा सामना खेळायचंही मी कबूल केलं होतं. अडचणीत भर म्हणजे भारत-पाक सामना संध्याकाळी सहा वाजता सुरू होऊन मध्यरात्रीच्या सुमारास संपला. त्या मॅचसाठी मी भर दुपारी यॉर्कशायरहून गाडी चालवत लंडनला पोचलो होतो. मॅच संपल्यावर मी पुरता थकून गेलो होतो.

सगळे खेळाडू लंडनमधल्या हॉटेलमध्ये विश्रांती घ्यायला निघाले होते. त्यांनी मलाही हॉटेलवर बोलावलं. ''उद्या सकाळी मला न्यू कॅसलला मॅच खेळायला जायचं आहे,'' असं मी म्हटल्यावर सगळे जण माझ्याकडे आश्चर्याने पाहतच राहिले. इंग्लंडमधल्या कुठल्याही भागात पोचायला जास्तीत जास्त दोन-तीन तास लागत असतील असा माझा गोड गैरसमज होता. 'न्यू कॅसलला पोचायला तुला कमीत कमी सहा तास लागतील,' असं त्यांनी सांगितल्यावर माझे डोळे खाड्कन उघडले. 'ताबडतोब न्यू कॅसलला जायला नीघ' – असा सर्वांनीच मला सल्ला दिला. मी चक्रावून गेलो. दुपारी एक वाजता मी यॉर्कशायवरून लंडनला पोचलो होतो. आणि आता मला मध्यरात्री सहा तास गाडी चालवत न्यू कॅसलला जायचं होतं. मला हसावं की रडावं, समजेना.

जतीन परांजपे माझ्याबरोबर होता. त्याच्या जोडीने मी प्रवास सुरू केला. दुर्दैवाने आम्हाला दोघांनाही तिथल्या रस्त्यांची काहीच माहिती नव्हती. रस्त्यावरच्या दिशादर्शक खुणा पाहत आम्हाला मार्ग शोधायचा होता. त्यातच एका वळणावर आम्ही चुकीच्या दिशेला वळलो. उत्तरेऐवजी दक्षिणेला वळून आम्ही ३५ मिनिटं तसेच पुढे गाडी चालवत राहिलो.

बराच वेळ गाडी चालवल्यानंतर माझ्या डोळ्यांवर झापड येऊ लागली. जतीनच्या हाती गाडी देऊन मी एक छोटीशी डुलकी काढली. त्यानंतर पुन्हा मी गाडी चालवू लागलो. मधे कॉफी प्यायल्यामुळे थोडी तरतरी आली होती. अखेर आम्ही सकाळी ८.१५ वाजता हॉटेलवर पोचलो. आम्ही पोचलो तेव्हा टीमची बस मैदानावर जायला निघाली होती. आम्हाला काहीच सुधरत नव्हतं. डोळे जड झाले होते. मी आमच्या व्यवस्थापकाला सर्व परिस्थिती समजावून सांगितली. फक्त २५ मिनिटांची झोप घेऊन तासाभरात मैदानावर परतायचं मी त्याला वचन दिलं. त्याने माझं म्हणणं कबूल केलं. २५ मिनिटांनंतरचा अलार्म लावून मी झोपी गेलो.

जाग आली तेव्हा माझी फारच वाईट अवस्था झाली होती. हॉटेलमधून बाहेर पडून मी कसाबसा मैदानावर पोचलो.

डोळ्यांवर झोप होती आणि अंगात थकवा. खेळण्यासाठी शारीरिक बळच उरलं नव्हतं. तरीही त्या दिवशी मी शतक काढू शकलो, यावर अजूनही माझा विश्वास बसत नाही. उपाहारानंतर तर मला डोळे उघडे ठेवणंही अशक्य झालं. दोन षटकांमध्ये मी १० सेकंदांची डुलकी काढत होतो. क्षेत्ररक्षण करतानाही डोळ्यांवर पेंग होती. तो सामना मी कसा खेळून काढला ते मलाही कळलं नाही.

सामना संपल्यावर जतीन व मी धावत हॉटेलात गेलो. दोन तास झोप काढून रात्रीच्या जेवणाला सगळ्यांना भेटायचं असा आम्ही विचार केला. पण जाग आली तेव्हा दुसऱ्या दिवशीची पहाट उजाडली होती. `अरेरे, रात्रीचं जेवण हुकलं,' जाग आल्यावर हाच विचार माझ्या मनात पहिला आला. आम्हाला भूक लागली होती. पण इतक्या पहाटे खाण्याची सोय होऊ शकणार नाही असं आम्हाला सांगण्यात आलं. नाष्ट्याला खूप वेळ होता. आम्ही घटाघटा तीन ग्लास पाणी प्यायलो आणि सातचा अलार्म लावून पुन्हा झोपी गेलो. सुदैवाने सात वाजता जाग आली. पोटभर नाष्टा करून आम्ही मैदानावर खेळायला गेलो. इतकी दमछाक होऊनही मी त्या सामन्यात चांगल्या धावा काढू शकलो. त्या सर्व गोंधळात एकच गोष्ट माझ्या मनासारखी होत होती, ती म्हणजे माझी बॅटिंग.

मॅच संपल्यावर जतीन व मी, संध्याकाळी यॉर्कशायरला जायला परत निघालो. दुसऱ्या दिवशी कौंटी क्लबसाठी मला खेळायचं होतं. तो प्रवासही लक्षात राहण्यासारखाच झाला. न्यू कॅसलमधून आम्ही बाहेर पडलो, तर सगळीकडे रस्ता दुरुस्तीची कामं सुरू होती. गाडीचा वेग ताशी ७० मैलांऐवजी ताशी ५५ मैल ठेवण्याची सूचना मिळाली होती. या वेगाने यॉर्कशायरला पोचायला उशीर होणार होता. आम्ही समोर चाललेल्या एका पोलीस कारच्या मागे सुरक्षित अंतर ठेवून जायचं ठरवलं. त्यात आमचीही सुरक्षितता होती.

थोड्या वेळाने माझ्या लक्षात आलं की, पोलीस कारमधून एक जण हातवारे करून आम्हाला काहीतरी सूचना देतो आहे. मी नीट पाहिलं. ड्रायव्हरने खिडकीतून हात बाहेर काढून हाताची पाचही बोटं ताणून धरली होती. मग त्याने मूठ बंद केली. हाताची मूठ पुन्हा उघडून त्याने तशीच बोटं परत एकदा पसरवली. मला वाटलं, तो गाडीचे दिवे लावायला सांगतो आहे. मी दिवे सुरू केले. पुढच्या मिनिटाला पोलिसांनी आपल्या गाडीचे पिवळे दिवे मिचकावत आम्हाला गाडी थांबवण्याचा इशारा केला.

मी गोंधळून गेलो. पण पोलिसांच्या सूचनेनुसार गाडी थांबवली. ‘`मी आधी केलेला इशारा तू पाहिला नाहीस का?'' पोलिसाने मला विचारलं. मी म्हटलं, ‘`तू खूण केल्यावर मी लगेच गाडीचे दिवे लावले.'' त्यावर पोलिसाने सांगितलं की, दिवे लावण्यासाठी त्याने खूण केली नव्हती. माझ्या गाडीचा वाढलेला वेग कमी करण्यासाठी तो इशारा होता. पोलीस कार ताशी ६५ मैल वेगाने चालली असली तरी मी गाडीचा वेग ५५ मैलच ठेवायला हवा होता. पण मी गेले दीड तास पोलिसांच्या गाडीमागे एक ठरावीक अंतर कायम ठेवून गाडी चालवत होतो. त्यामुळे माझ्याही गाडीचा वेग वाढला होता. पोलिसाने जेव्हा दोन वेळा आपली पाचही बोटं मला ताणून दाखवली होती तेव्हा त्याचा अर्थ गाडीचा वेग ताशी ५५ मैल ठेवायला तो मला सांगत होता.

पोलिसाचं बोलणं ऐकून मी चाट पडलो. झालेली चूक मी लगेच कबूल केली. पोलिसांच्या गाडीमागे जाणं हा मला सुरक्षित पर्याय वाटला होता. त्यामुळे गाडी चालवताना माझं गाडीच्या वेगाकडे लक्ष गेलं नाही. पण नियम तोडण्याचा मात्र माझा मुळीच हेतू नव्हता, असं मी त्याला सांगितलं. दरम्यान त्याचं लक्ष माझ्या गाडीवर रंगवलेल्या पांढऱ्या गुलाबाकडे गेलं. त्याखाली छापलेली `यॉर्कशायर सीसीसी' ही अक्षरं त्याने वाचली. ही गाडी तुला कशी मिळाली असं त्याने मला विचारताच, मी यॉर्कशायरतर्फे क्रिकेट खेळतो. ही गाडीही क्लबनेच मला दिली आहे, असं त्याला मी सांगितलं. त्यावर त्याने माझं नाव विचारलं. यॉर्कशायरतर्फे खेळणारा मी पहिला परदेशी खेळाडू आहे, हे समजल्यावर त्याचा माझ्याकडे पाहायचा दृष्टिकोन बदलला असावा. ‘`गाडीच्या वेगाकडे नेहमी लक्ष देत जा,'' एवढंच मला बजावून त्याने मला जाऊ दिलं. यॉर्कशायरचा खेळाडू असल्यामुळे त्या दिवशी मी तरलो होतो.

जगण्याचे धडे

यॉर्कशायरला असताना आम्ही अनेकदा लागोपाठ सामने खेळायचो. त्यामुळे माझी बॅटिंग सुधारायला मला खूपच मदत झाली. भारतापेक्षा तिथलं हवामान व वातावरण खूपच वेगळं होतं. इंग्लंडमध्ये कौंटी क्रिकेट खेळत असताना क्रिकेटर म्हणून माझ्यात एक प्रकारची प्रगल्भता आली. तिथल्या वातावरणात चेंडू कमालीचा स्विंग होत असे. स्विंग गोलंदाजी खेळताना माझ्या बॅटिंगच्या तंत्रात चांगलीच सुधारणा झाली. शिवाय वेगवेगळ्या वातावरणाशी मी चटकन स्वत:ला जुळवून घ्यायलाही शिकलो. त्यानंतर जेव्हा जेव्हा मी भारतातर्फे इंग्लंडचा दौरा केला त्या वेळी यॉर्कशायरचा अनुभव मला कायम उपयोगी पडला.

त्याच वेळी चारचौघांत कसं वावरावं याचेही धडे मला मिळत होते. यॉर्कशायर क्लबचे सर्व पदाधिकारी मला छान सांभाळून घेत. क्लबचे अध्यक्ष, सर लॉरेन्स बायफोर्ड यांचा स्वभाव तर खूपच मनमिळावू होता. सगळ्या टीमचा वेळ मजेत जाई. विशेषत: संडे क्लबमध्ये आम्ही धमाल करत असू. संघात एकजूट व बांधिलकी निर्माण व्हावी म्हणून गमतीशीर क्लृप्त्या वापरल्या जात. एकदा असं ठरलं की, कोणीही पँट-शर्ट न घालता फक्त कमरेभोवती टॉवेल गुंडाळून व गळयात टाय घालून हॉटेलच्या व्हरांड्यात जमायचं. आधी मला वाटलं की, माझे मित्र मुद्दाम माझी मस्करी करताहेत. बाकीच्यांना त्या वेषात पाहिल्याशिवाय मी तसं करायला तयार नव्हतो. मी हॉटेलच्या लॉबीकडे बारीक लक्ष ठेवून होतो. अखेर बऱ्याच जणांना त्या वेषात आलेलं पाहिल्यावर मीही टॉवेल गुंडाळून व टाय घालून खोलीबाहेर पडलो. ती कल्पना विक्षिप्त वाटत असली तरी त्या संध्याकाळी आम्ही हसून हसून बेजार झालो होतो.

मी फक्त १९ वर्षांचा आहे हे यॉर्कशायर क्लबमधल्या प्रत्येकाला ठाऊक होतं. त्यामुळे सर्व जण मला मदत करायला तयार असत. त्यांच्या मदतीशिवाय मलाही तिथे राहणं मुश्कील झालं असतं. माझ्या मुंबईच्या सवयी तिथे उपयोगाच्या नव्हत्या. मी त्यापूर्वीही १९९०मध्ये इंग्लंडचा दौरा केला होता. पण त्या वेळी मी भारतीय संघाबरोबर होतो. त्या वेळी आमची सर्व सोय करण्यात आली होती. या वेळेस मात्र स्वत:च्या जेवणापासून ते कपड्यांच्या इस्त्रीपर्यंत प्रत्येक गोष्ट माझी मलाच करावी लागत होती.

स्वत:ची कामं आटपत असताना अनेकदा माझ्यावर अवघड परिस्थिती ओढवत असे. वॉशिंग मशीन अगदी प्रथमच वापरतानाचा प्रसंग माझ्या आजही लक्षात आहे. कपडे धुण्यासाठी नक्की किती वॉशिंग पावडर लागते याचा मला काहीच अंदाज नव्हता. मी पावडरचं पॅकेट फोडून त्यातली निम्मी पावडर मशीनमध्ये ओतली. नंतर मशीन चालू करून मी घराबाहेर पडलो. परत आल्यावर दाराखालून पाणी वाहत असल्याचं माझ्या लक्षात आलं. आधी मला धक्काच बसला. वॉशिंग मशीन चालू ठेवून आपण बाहेर पडलो हे मला नंतर आठवलं. जास्त पावडर घातल्यामुळे मशीनमधून पाणी उतू जाऊन त्याचा फेस घरभर पसरला होता.

कपडे धुण्याची माझी ती पहिली व शेवटची वेळ ठरली. त्यानंतर प्रत्येक वेळेस सोलीभाईचं कुटुंब माझ्या मदतीला धावून येत असे. सोली ॲडम्स हे त्याचं खरं नाव. मी त्याला प्रेमाने 'सोलीभाई' म्हणत असे. सोलीभाई हा पश्चिम यॉर्कशायरमधल्या ड्यूसबरीचा रहिवासी होता. सोली व त्याची पत्नी मरीयमला मी १९९०च्या दौऱ्यात पहिल्यांदा भेटलो. दिलीप वेंगसरकरांनी माझी त्या दोघांशी ओळख करून दिली होती. इंग्लंडमध्ये लीग क्रिकेट खेळलेल्या मुंबईच्या प्रत्येक क्रिकेटरने सोलीभाईच्या आदरातिथ्याचं माझ्यापाशी रसभरीत वर्णन केलं होतं. त्यामुळे मी यॉर्कशायरला आल्या आल्याच सोलीभाईच्या घरी भेट दिली होती. त्या भागात खेळणाऱ्या भारतीय क्रिकेटपटूंसाठी सोलीभाईचं घर हा मोठाच आसरा होता. बिर्याणी, तंदुरी चिकन, रायता आणि मँगो लस्सी ही त्याच्या घरच्या जेवणातली खासियत होती. यॉर्कशायरमध्ये असताना मी आठवड्यातून तीन वेळा न चुकता सोलीभाईच्या घरी जात असे.

सोलीभाईचा भाऊ युनूस व त्याची पत्नी रुकसाना हेदेखील तितकंच आतिथ्यशील जोडपं होतं. बाउलमध्ये जास्तीत जास्त सॅलड कसं भरायचं ही कला मी त्यांच्याकडून शिकलो. जतीन परांजपे, मुफी व विनोद कांबळी हे माझे तीन मित्र एकदा

यॉर्कशायरला माझ्याकडे राहायला आले होते. त्या वेळी स्वस्तात मिळेल तिथे जाऊन खाण्याचा आमचा प्रयत्न असे. चौघांमध्ये मीच एकटा कमावणारा होतो. सर्व खर्च मलाच करावा लागे. त्यामुळे 'केएफसी', 'बर्गर किंग' वगैरे ठिकाणी मिळणारं फास्ट फूड फक्त आम्हाला परवडत असे. 'पिझ्झा हट'मध्ये मिळणाऱ्या अमर्यादित बुफेवर आम्ही ताव मारत असू. एका ठरावीक किमतीत आम्ही पाहिजे तेवढे पिझ्झा खाऊ शकायचो. सॅलड मात्र एकदाच मिळायचं. त्या वेळी युनूस-रुकसानाकडून घेतलेलं शिक्षण मला उपयोगी पडलं. बाउलची उंची साधारण दोन-तीन इंच असायची. त्यात लेट्यूसच्या पानांची उभी भिंत रचून आम्ही त्या बाउलची उंची पाच ते सहा इंच करायचो आणि मग त्यात हवं तेवढं सॅलड भरायचो.

ऑगस्टच्या मध्यावर मी यॉर्कशायर सोडलं. भारतात येऊन मला दुलिप ट्रॉफी स्पर्धेत खेळायचं होतं. रणजीतसिंहजींचे पुतणे दुलिपसिंहजी यांच्या स्मरणार्थ ही स्पर्धा खेळवली जाते. दुलिपसिंहजी १९३०च्या दशकात इंग्लंडकडून कसोटी सामने खेळले होते. भारतातल्या पाच विभागातले : पश्चिम, उत्तर, दक्षिण, पूर्व व मध्य विभागाचे संघ यात सहभागी होतात. ऑक्टोबरच्या आव्हानात्मक दक्षिण आफ्रिकेच्या दौऱ्याआधी मी या स्पर्धेत खेळावं असं सुचवलं गेलं होतं. यॉर्कशायर व्यवस्थापनाने मला कोणतेही आढेवेढे न घेता भारतात परत जाण्याची परवानगी दिली. सर्वच बाबतीत माझ्या ज्ञानात व कौशल्यात भर घालणाऱ्या यॉर्कशायर दौऱ्याची अशा रीतीने सांगता झाली होती.

भारताचा दक्षिण आफ्रिका दौरा – नोव्हेंबर, १९९२ ते जानेवारी, १९९३

आमचा तो दौरा ऐतिहासिक होता. कारण १९९१मध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये परतल्यानंतर दक्षिण आफ्रिकेचा संघ प्रथमच मायदेशात कसोटी मालिका खेळत होता. २१ वर्षं आंतरराष्ट्रीय क्रिकेटपासून दूर राहिल्यानंतर दक्षिण आफ्रिकेने १९९१मध्ये भारताचा दौरा केला होता. त्या दौऱ्यात खेळलेल्या तीन एकदिवसीय सामन्यांत त्यांनी आपल्या संघाची गुणवत्ता सिद्ध केली होती. ॲलन डोनाल्ड हा त्यांचा आघाडीचा द्रुतगती गोलंदाज होता. त्याच्या साथीला रिचर्ड स्नेल, ब्रायन मॅक्मिलन, क्रेग मॅथ्यूस, मेरिक प्रिंगल, ब्रेट शूल्ट्ज असे अनेक गोलंदाज त्यांच्यापाशी होते. दक्षिण आफ्रिकेतील हवामानात त्यांच्या द्रुतगती गोलंदाजांना समर्थपणे तोंड देणं हे मोठंच आव्हान होतं.

निकी ओप्पेनहायमर संघाच्या रँडजेस्फाँटाइन या खासगी मैदानावर आम्ही दौऱ्यातला पहिला सामना खेळलो. सामना सुरू होण्याआधी प्रचंड पाऊस कोसळत होता. मॅच सुरू होणं अशक्य आहे असं वाटत होतं. पण मी यजमानांना कमी लेखण्याची चूक केली होती. मैदान सुकवण्यासाठी त्यांनी योजलेला उपाय पाहून तर मी थक्क झालो. मैदान जलद सुकण्यासाठी त्यांनी मैदानात पेट्रोल ओतून जाळलं होतं. मी तर अशा प्रकाराची कधी कल्पनाही केली नव्हती. उपाय एवढ्यावरच थांबले नव्हते. दोन हेलिकॉप्टर्सही मैदानावर जोरजोरात घिरट्या घालत जवळजवळ ४५ मिनिटं मैदान सुकवण्याचं काम करत होती. क्लबच्या प्रयत्नांना यश आलं. अखेरीस मॅच सुरू झाली. मी त्या सामन्यात शतक झळकवलं. सामनाही आम्ही सहज खिशात टाकला. 'दक्षिण आफ्रिकेला आपण आरामात हरवू.' असंच प्रत्येक जण त्या दिवशी ड्रेसिंग रूममध्ये म्हणत होता. त्या अतिआत्मविश्वासानेच आम्ही दुसरा सामना खेळलो. संयुक्त बोल संघाविरुद्धच्या त्या सामन्यात आम्ही ५००हून अधिक धावा काढल्या. प्रतिस्पर्ध्यांना २३० धावांत गुंडाळून तीही मॅच आम्ही मोठ्या फरकाने जिंकली. दौरा आम्ही हसत हसत जिंकून जाणार अशी चिन्हं दिसू लागली होती.

६ नोव्हेंबर, १९९२ रोजी दक्षिण आफ्रिका अध्यक्षीय संघाविरुद्ध सेंच्युरियन येथे झालेल्या सामन्यात मात्र आम्हाला अचानक धक्कादायक अनुभव आला. त्या सामन्यात आम्ही पहिली गोलंदाजी केली. मी स्लिपमध्ये उभा होतो. गोलंदाजांनी टाकलेला चेंडू यष्टिरक्षकापर्यंत थेट पोचत नव्हता. संघात सुब्रतो बॅनर्जी हा नवा आघाडीचा द्रुतगती गोलंदाज होता. स्वभावाने तो खूपच मिश्कील होता. मनोज प्रभाकर व सुब्रतो बॅनर्जी यांनी गोलंदाजीला सुरुवात केली. परंतु संथ खेळपट्टीवरून चेंडू वेगाने येतच नव्हता. श्रीनाथ सोडल्यास एकाही गोलंदाजाचा चेंडू यष्टिरक्षकाच्या हातात येत नव्हता. तरीही आम्ही अध्यक्षीय संघाला २६८ धावांत बाद करू शकलो हीच आमच्यासाठी समाधानाची गोष्ट होती.

याही सामन्यात धावांचा डोंगर रचू, या आत्मविश्वासाने आम्ही डाव सुरू केला. पण पाहता पाहता आमचा आत्मविश्वास

डळमळू लागला. ब्रेट शूल्ट्जने टाकलेलं दुसरं षटक कमालीचं वेगवान होतं. इतक्या वेगाने येणारा चेंडू मी त्यापूर्वी कधी पाहिला नव्हता. आजपर्यंत मी पाहिलेलं ते सर्वांत वेगवान षटक होतं. अशा वेगाची आम्ही कधी अपेक्षाही केली नव्हती. ड्रेसिंग रूममधलं वातावरण एकदम शांत, गंभीर होऊन गेलं. खेळपट्टी अचानक जिवंत झाली होती. फलंदाजी करणं मुश्कील होऊन गेलं होतं. कसोटी मालिकाही अशीच अवघड असणार हे आम्हाला त्याच क्षणी समजून चुकलं होतं.

सामन्यात नंतर थोडा पाऊस पडला. त्यामुळे मैदान थोडं निसरडं झालं होतं. वयाच्या एकोणिसाव्या वर्षी माझ्या अंगात त्या वेळी चांगलाच जोश होता. पावसाचा फायदा उठवत मी मैदानाच्या एका टोकाला जाऊन स्लायिंडग करत चेंडू पकडण्याचा सराव करायचं ठरवलं. त्या वेळी चामुंडेश्वर आमच्याकडून क्षेत्ररक्षणाचा सराव करून घ्यायचा. चामुंडेश्वर हा मूळचा दक्षिण विभागाचा खेळाडू होता. इंग्लंडमध्ये तो क्लब क्रिकेट खेळत होता. चामुंडेश्वरबरोबर मी सराव करायला सुरुवात केली. एरवी मी तीन-चार यार्ड स्लाइड करत चेंडू अडवू शकायचो. पावसाने निसरड्या झालेल्या मैदानात मला स्लायिंडग करायला अधिकच मजा येऊ लागली. प्रत्येक वेळी चेंडू अडवताना मी नेहमीपेक्षा जास्त अंतर स्लाइड करू शकत होतो. पण मजा करता करता मला सजा मिळाली. स्लायिंडग करताना माझ्या पायाचा घोटा मुरगळला. मला मैदानावरून उचलून न्यावं लागलं. हॉस्पिटलमध्ये पोचल्यावर समजलं की, दुखापत बरी व्हायला चार ते पाच आठवडे लागतील.

पहिल्या कसोटीला अजून आठवडाभर अवकाश होता. मला कसोटी चुकवायची नव्हती. तंदुरुस्त होण्यासाठी मी जोरदार प्रयत्न सुरू केले. काही दिवसांतच मला चालता येऊ लागलं; पण मी धावू शकत नव्हतो. पहिल्या कसोटीत मला खेळवण्यासाठी संघ-व्यवस्थापन खूप उत्सुक होतं. कारण आधीच्या सामन्यात मी चांगली फलंदाजी केली होती. कसोटीत खेळण्याचा एकच मार्ग होता. क्षेत्ररक्षणासाठी मी फक्त स्लिपमध्ये उभा राहू शकत होतो. त्यामुळे मला फारसं धावावं लागणार नव्हतं. त्या कसोटीत प्रत्यक्ष खेळताना मात्र मी संकोचून गेलो. कपिल देव यांच्यासारख्या ज्येष्ठ खेळाडूला क्षेत्ररक्षणासाठी धावावं लागत होतं आणि संघातला सर्वांत तरुण खेळाडू मात्र स्लिपमध्ये उभा होता.

१३ नोव्हेंबरला पहिली कसोटी सुरू झाली. आम्ही सुरेख फलंदाजी केली. दोन्ही संघात झालेली ती संघर्षपूर्ण लढत अखेर अनिर्णित अवस्थेत संपली. प्रवीण आमरेने पदार्पणातच शतक झळकवलं. त्याने तडफदार फलंदाजी केली. क्रिकेटच्या इतिहासात माझ्या नावाची नोंद त्या कसोटीत झाली; पण ती वेगळ्याच कारणासाठी. तिसऱ्या पंचाने बाद ठरवलेला मी कसोटी इतिहासातला पहिला खेळाडू ठरलो. टीव्ही रिप्लेचा वापर करण्याची पद्धत नव्यानेच सुरू झाली होती. मी पॉइंटच्या दिशेने चेंडू मारला होता. जाँटी ऱ्होड्स त्या जागेवर क्षेत्ररक्षणासाठी उभा होता. विजेच्या वेगाने त्याने चेंडू पकडून यष्टिरक्षकाकडे फेकला. पायाच्या दुखापतीतून मी पूर्ण बरा झालो नव्हतो. क्रीजमध्ये परतायला मी थोडा अधिक वेळ घेतला. यष्टिरक्षकाने बेल्स उडवल्या तेव्हा माझी बॅट क्रीजपासून दोन-तीन इंच दूर होती. सिरील मिचले या पंचाने खातरी करून घेण्यासाठी तिसरे पंच कार्ल लिबेनबर्ग यांच्यावर निर्णय सोपवला. तिसऱ्या पंचाने मला धावबाद घोषित केलं.

जाँटी ऱ्होड्सच्या चपळ क्षेत्ररक्षणाची ती पहिली झलक होती. त्या दौऱ्यात जाँटीने आम्हाला चांगलंच सतवलं. एकदिवसीय सामन्यात त्याची फिल्डिंग अतिशय प्रभावी ठरायची. जाँटी हा माझ्या काळातला सर्वोत्तम क्षेत्ररक्षक होता. त्याला चेंडू कुठे जाईल याचा आधीच अंदाज यायचा. चेंडूवर झडप घालून, दुसऱ्या क्षणाला तो परत यष्टिरक्षकाकडे फेकण्याची त्याची चपळाई विलक्षण होती. पॉइंट, कव्हर पॉइंट व थर्ड मॅनपर्यंतचा भाग तो एकटा सांभाळायचा. जाँटी असताना तिथे एकेरी धाव मिळणं अशक्य असायचं. अवघड खेळपट्टीवर धावा काढणं आधीच कठीण असायचं; त्यात जाँटीच्या क्षेत्ररक्षणातील चपळाईमुळे ऑफ साइडला एकही धाव मिळू शकायची नाही. त्याने अनेक भारतीय खेळाडूंना बाद केलं. प्रत्येक सामन्यात त्याने बऱ्याच धावाही वाचवल्या. मालिकेच्या एकूण परिणामात जाँटीमुळे मोठाच फरक पडला.

जाँटीचं आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे, फलंदाजी करताना तो खेळपट्टीवरही तितक्याच जलद गतीने धावत असे. एकदिवसीय मालिकेतील तिसऱ्या सामन्यात जाँटीने रवी शास्त्रीच्या गोलंदाजीवर स्वीपचा फटका मारला. डीप स्क्वेअर लेगला उभ्या असलेल्या कपिल देवना तो झेल घेता आला नाही. दरम्यानच्या काळात जाँटीने वेगात धावून पहिली धाव पूर्ण केली होती. तो दुसरी धाव घेत समोरच्या क्रीजपर्यंत पोचलाही होता; पण त्याचा साथीदार असलेल्या अँड्र्यू हडसनने दुसरी

धाव घेण्याचा प्रयत्नही केला नव्हता. जाँटी पुन्हा वळून धावत जवळजवळ दुसऱ्या टोकापर्यंत आला. तितक्यात यष्टिरक्षकाने बेल्स उडवून त्याला धावबाद केलं. ज्या वेळात जाँटीच्या जवळपास तीन धावा पूर्ण झाल्या होत्या, तेवढ्या वेळात हडसन फक्त एकच धाव काढू शकला होता.

२६ नोव्हेंबरला दुसरी कसोटी जोहान्सबर्गला सुरू झाली. त्या कसोटीतही आम्ही चांगली कामगिरी केली. त्या सामन्यात माझं शतक झालं. ते माझं चौथं कसोटी शतक होतं. ती इंनिग्ज मला खूपच समाधान देऊन गेली. दुसऱ्या दिवसाच्या अखेरीस मी ७५ धावांवर नाबाद होतो. तिसऱ्या दिवशी सकाळी फलंदाजी करताना मला झगडावं लागलं. ॲलन डोनाल्ड फारच हुशारीने गोलंदाजी करत होता. त्याच्या भेदक माऱ्यापासून बचाव करण्यासाठी संयमाने फलंदाजी करणं आवश्यक होतं. ऑफ स्टम्पच्या बाहेर पडणारे त्याचे सर्व चेंडू मी शांतपणे सोडून देत होतो. डोनाल्डच्या गोलंदाजीचं ते सत्र संपेपर्यंत फटकेबाजी करण्याचा मोह मी टाळला होता. उपाहारापर्यंत मी फक्त एकच कव्हर ड्राइव्ह मारला होता. आम्ही दोघेही एकमेकांना थकवू पाहत होतो. त्याच वेळी एकमेकांच्या संयमाची परीक्षाही आम्ही घेत होतो. ॲलन डोनाल्डला त्या दिवशी मी दिलेली लढत माझ्या कायमची लक्षात राहिली. क्रिकेटच्या सर्व प्रकारांमध्ये कसोटी क्रिकेटला उच्च स्थान का दिलं आहे, याचा खरा अर्थ त्या दिवशी मला कळून चुकला. एक द्रुतगती गोलंदाज ताशी १५० किलोमीटर वेगाने चेंडू उसळवत होता. वातावरण गोलंदाजीसाठी पूर्ण अनुकूल होतं. अशा प्रतिकूल परिस्थितीत तिखट व वेगवान माऱ्याला समर्थपणे तोंड देणं हेच कोणाही फलंदाजासाठी खरं आव्हान असतं. फलंदाजाचा खरा दर्जा तिथे सिद्ध होतो. स्थानिक क्रिकेटमध्ये अशी कसोटीची वेळ कधीच येत नाही.

अखेर जोहान्सबर्गला उपाहारानंतर माझं शतक पूर्ण झालं. त्या डावात मी एकूण २७० चेंडू खेळलो. साडेसहा तास मी खेळपट्टीवर उभा होतो. कुंबळेने दुसऱ्या डावात सहा गडी बाद केल्यामुळे आम्ही ती कसोटी अनिर्णित ठेवू शकलो. त्यामुळे तिसऱ्या कसोटीची रंगत वाढली होती. दुसऱ्या कसोटीत क्रेग मॅथ्यूनेही सुरेख गोलंदाजी केली. त्याच्या गोलंदाजीत अचूकता होती. सातत्याने तो ऑफ स्टम्पच्या किंचित बाहेर अतिशय कौशल्याने मारा करत होता. त्या टप्प्यावरून टाकलेले त्याचे चेंडू स्विंग होऊन बाहेरच्या दिशेने जात. परंतु अधूनमधून त्याचा एखादा चेंडू झर्रकन आत यायचा. तो आत येणारा चेंडू खेळणं अवघड जायचं. मॅथ्यूकडून मार बसल्यामुळे आमच्या संघातील सर्व खेळाडूंच्या मांडीवर काळे चट्टे उमटले होते. ड्रेसिंग रूममध्ये आम्ही थट्टेने म्हणत होतो, ''अरे इसको भी 'मेडल' मिला है देख!''

दुर्दैवाने पोर्ट एलिझाबेथला खेळलेल्या तिसऱ्या कसोटीत आम्हाला पराभव पत्करावा लागला. आपल्या फसव्या व वेगवान गोलंदाजीने डोनाल्डने त्या सामन्यात १२ बळी मिळवले. त्या कसोटीच्या पहिल्या डावात आम्ही चांगली लढत दिली होती. दुसऱ्या डावातही कपिल देवनी शतक काढलं. पण इतर फलंदाज मात्र ॲलन डोनाल्डसमोर टिकाव धरू शकले नाहीत. ३१ धावांत पहिले सहा फलंदाज तंबूत परतले होते. मला पंचांच्या चुकीच्या निर्णयाचा फटका बसला. ब्रेट शूल्ट्झच्या गोलंदाजीवर मला यष्टिरक्षकाकरवी बाद ठरवलं गेलं. खरं म्हणजे चेंडू माझ्या बॅटला नव्हे, तर मांडीला लागून उडाला होता. दिवसअखेरीस त्या पंचांनी मला भेटून चुकीच्या निर्णयाबद्दल दिलगिरी व्यक्त केली. पंचांचं काम हे नेहमीच खूप अवघड असतं. हे काम करत असताना चुका होणंही तितकंच स्वाभाविक असतं.

२ जानेवारी, १९९३ रोजी चौथी कसोटी केप टाउनला सुरू झाली. मालिकेतला तो शेवटचा कसोटी सामना होता. तो सामना जिंकून आम्ही मालिका बरोबरीत सोडवायचा निश्चय केला होता. त्या कसोटीत आमची कामगिरी चांगली झाली. पण आमचा निश्चय मात्र सफल झाला नाही. जवागल श्रीनाथने उत्कृष्ट गोलंदाजी करत सहा बळी टिपले. या वेळी ॲलन डोनाल्डने अनेक षटकं माझ्यावर राउंड द विकेटने मारा केला. तो आखूड टप्प्यावर गोलंदाजी करत होता. `स्पंजी बाउन्स'साठी केप टाउनची खेळपट्टी प्रसिद्ध आहे. डोनाल्डने त्याचा पुरेपूर फायदा उठवला. या सामन्यात मी एक नवा प्रयोग करून पाहिला. डोनाल्ड आखूड टप्प्यावर गोलंदाजी करून माझ्या अंगावर चेंडू उसळवत होता. त्याला पुरतं हताश करणं हाच त्याच्या गोलंदाजीला चोख उत्तर देण्याचा एकमेव मार्ग आहे हे मी ओळखलं. मी केलेला विचार अगदी साधा व सोपा होता. चांगली उंची लाभलेले फलंदाज उसळलेला चेंडू खेळताना टाचा उंचावून चेंडूच्या वर राहण्याचा प्रयत्न करतात.

त्याउलट बुटक्या खेळाडूंनाही आपल्या कमी उंचीचा फायदा उठवून उसळलेल्या चेंडूच्या खाली राहणं सहज शक्य असतं. त्यासाठी मी या सामन्यापुरता माझ्या फलंदाजीचा पवित्रा बदलला. मी नेहमी दोन पायांत १० इंच ते एक फूट एवढं अंतर ठेवून फलंदाजी करायचो. ते अंतर मी या वेळी अडीच फूट केलं. माझी उंची आणखीनच कमी झाली. त्यामुळे डोनाल्डच्या उसळणाऱ्या चेंडूच्या मी सहज खाली राहू शकलो. अखेर डोनाल्डला गोलंदाजीचा टप्पा बदलण्यावाचून पर्याय उरला नाही. त्या डावात ७३ धावा काढण्यासाठी मी २०८ चेंडू खेळलो. साडेचार तास बॅटिंग केली. मॅच अनिर्णित राखण्यासाठी माझे प्रयत्न उपयोगी ठरले, याचं मला समाधान वाटलं.

त्या दौऱ्यात काही कारणांमुळे दुसऱ्या व तिसऱ्या कसोटी सामन्यांदरम्यान एकदिवसीय मालिका खेळवली गेली. त्या मालिकेत प्रथमच एक अभिनव प्रयोग केला गेला. गोलंदाजीसाठी दोन्ही बाजूंना दोन निराळे नवीन चेंडू वापरण्यात आले. त्या मालिकेत आम्ही चांगला खेळ केला. पण आम्ही मालिका अखेर

२-५ अशा फरकाने हरलो. बहुतेक सामने कमी धावसंख्येचे झाले. एखाद्या सामन्यात २००पेक्षा जास्त धावा झाल्या तर ती फारच चांगली धावसंख्या समजली जाई. आज मात्र ती मामुली धावसंख्या समजली जाईल.

दक्षिण आफ्रिकेत आम्ही क्रिकेटच्या दोन्ही प्रकारांत हरलो. पण जागतिक दर्जाच्या गोलंदाजीचं आव्हान मी समर्थपणे पेलू शकलो, याचं समाधान मला त्या दौऱ्यात मिळालं. मायदेशापासून दूर गेल्यावर प्रत्येक संघालाच अडचणींना तोंड द्यावं लागतं. यानंतर फेब्रुवारी-मार्च, १९९३मध्ये इंग्लंडचा संघ भारताच्या दौऱ्यावर येणार होता. ग्रॅहम गूचच्या इंग्लंड संघासमोर काही अवघड आव्हानं उभी करायचा आमचा मानस होता. महत्त्वाचं म्हणजे ती माझी मायदेशातील पहिलीच मालिका होती.

इंग्लंडचा भारत दौरा, जानेवारी ते मार्च, १९९३

मायदेशातल्या प्रेक्षकांसमोर घरच्या वातावरणात खेळायची मजा काही औरच असते. २९ जानेवारी, १९९३ रोजी कोलकात्याच्या ईडन गार्डन्सवर पहिली कसोटी सुरू झाली. प्रेक्षकांचा प्रचंड उत्साह आमच्यासाठी स्फूर्तिदायक ठरला होता. ईडन गार्डन्स हे कर्णधार महम्मद अझरुद्दीनचं लाडकं मैदान होतं. त्याच्या तडफदार १८२ धावांमुळे सामन्याला योग्य ती दिशा मिळाली होती. मी त्या सामन्यात अर्धशतक काढलं. पाचव्या दिवशी मॅच जिंकण्यासाठी आम्हाला फक्त ३४ धावांची गरज होती. त्या दिवशीही ७० हजार प्रेक्षक आलेले पाहून मला कमालीचं आश्चर्य वाटलं. आपल्या देशाचा विजय त्यांना प्रत्यक्ष अनुभवायचा होता. कोलकाता कसोटीत विजयी धाव काढायचा मान मला मिळाला. पॉल जार्विसच्या आखूड टप्प्याच्या चेंडूवर मी स्क्वेअर लेगला चौकार मारून भारताचा विजय साकारला.

ड्रेसिंग रूममध्ये उत्साहाला उधाण आलं होतं. दक्षिण आफ्रिकेच्या निराशाजनक दौऱ्यानंतर प्रत्येक जण विजयासाठी आसुसला होता. योग्य तशी खेळपट्टी व वातावरण मिळताच फिरकी गोलंदाजांनी केलेली कमाल लक्षणीय होती. १९९०मध्ये इंग्लंडमध्ये खेळताना इंग्लिश फलंदाजांना आपल्या फिरकीची फारशी भीती वाटत नव्हती. चेंडू सरळ रेषेत येणार ही खातरी असल्याने ते बिनधास्त टोलेबाजी करत. कोलकात्यात वळणाऱ्या चेंडूसमोर त्यांची त्रेधा उडाली होती. चक्रं आता फिरली होती. आम्ही प्रत्येक क्षणाचा आनंद लुटत होतो. भारतीय उपखंडामध्ये फिरकी गोलंदाजी खेळणं हे फार मोठं आव्हान असतं. इंग्लंडसमोर अडचणींचा डोंगर उभा राहिला होता. अनिल कुंबळे, राजेश चौहान आणि वेंकटपथी राजू हे आमचं फिरकी गोलंदाजांचं त्रिकूट इंग्लंडसाठी कर्दनकाळ ठरत होतं. द्रुतगती गोलंदाज कपिल देव व मनोज प्रभाकर हे उत्तम फलंदाजही होते. त्यामुळे आम्ही प्रसंगी पाच गोलंदाज खेळवायची चैन करू शकत होतो. एकूण आमच्या गोलंदाजीचा ताफा प्रभावी ठरला होता.

दुसरी कसोटी ११ फेब्रुवारीला चेन्नईला सुरू झाली. या सामन्यात मी मायदेशातलं पहिलं कसोटी शतक झळकवलं. खेळपट्टी टणक होती. चेंडू थोडासा उसळत होता. मी १६५ धावा काढल्या. मी सहज द्विशतक काढू शकलो असतो. पण लेग स्पिनर इयान सॅलिसबरीच्या एका चेंडूवर मी खराब शॉट मारून बाद झालो. मला तो चेंडू मिड विकेटवरून टोलवायचा होता. पण चेंडू बॅटच्या वरच्या कडेला लागला. गोलंदाजाच्याच हाती झेल देऊन मी तंबूत परतलो.

नवज्योत सिद्धूनेही त्या सामन्यात शतक ठोकलं. पहिल्या डावात आमच्या ५६० धावा झाल्या. इंग्लंडच्या पहिल्या इनिंग्जमध्ये नील फेअरब्रदरने थोडाफार प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला. तरीही आम्ही त्यांना फॉलो-ऑन दिला. दुसऱ्या डावात क्रिस लेविसने छान फलंदाजी करत आपलं पहिलं शतक साजरं केलं. पण कुंबळेने काढलेल्या सात विकेट्समुळे आम्ही आरामात मॅच जिंकलो. चार दिवसांनी तिसरी कसोटी खेळण्यासाठी मुंबईला पोचलो. मालिकेत आम्ही २-० अशी भक्कम आघाडी घेतली होती.

वानखेडे स्टेडियमवरचा तो माझा पहिला आंतरराष्ट्रीय कसोटी सामना होता. याच मैदानावर क्रिकेट खेळत मी लहानाचा मोठा झालो होतो. बऱ्याच काळानंतर जणू मी स्वगृही परतत होतो. विनोद कांबळीच्या भावनाही माझ्याहून वेगळ्या नव्हत्या. त्याने या कसोटीत द्विशतक काढलं. इंग्लंडचा संघ प्रथमच चांगला खेळला. पहिल्या डावात त्यांनी ३४७ धावा काढल्या. या सामन्यात ग्रॅहम हिकने, त्याची कसोटीतील १७८ ही सर्वोच्च धावसंख्या नोंदवली. आम्ही ५९१ धावा काढून त्यांना चोख उत्तर दिलं. त्यात माझा वाटा ७८ धावांचा होता. दुसऱ्या डावात मनोज प्रभाकरांनी सुरुवातीला इंग्लंडचे तीन झटपट बळी मिळवले. उरलेला संघ फिरकी गोलंदाजांनी गुंडाळला. इंग्लंडवर आम्ही एका डावाने विजय मिळवला. दक्षिण आफ्रिकेच्या दारुण पराभवानंतर संघावर निराशेचं सावट पसरलं होतं. त्या निराशेतून बाहेर पडायला इंग्लंड मालिकेची खूप मदत झाली.

अनिल कुंबळेने तीनही कसोट्यांमध्ये अप्रतिम गोलंदाजी केली. त्यालाच मालिकेतील सर्वोत्तम खेळाडूचा पुरस्कार मिळाला. आम्हाला मॅच जिंकून देणारा हुकमी गोलंदाज हवा होता. अनिलच्या रूपाने तो आम्हाला मिळाला होता. शिस्त व कठोर मेहनतीच्या जोरावर त्याने ही कला साध्य केली होती. तो चेंडू जास्त वळवत नसे. पण तासन्तास चिवटपणे अचूक टप्प्यावर गोलंदाजी करत तो स्वत:मधली ही उणीव भरून काढत असे. मला कायमच त्याच्याबद्दल नितांत आदर वाटत आला आहे. भारतातर्फे खेळलेला तो एक महान खेळाडू होता.

एकदिवसीय मालिका मात्र अटीतटीने खेळली गेली. ५ मार्च, १९९३ रोजी शेवटचा सामना ग्वाल्हेरला होता. त्या सामन्यातल्या विजयामुळे आम्ही मालिका बरोबरीत सोडवू शकणार होतो. आधीच्या सामन्यांमध्ये मी पाचव्या-सहाव्या क्रमांकावर फलंदाजीला आलो होतो. बॅटिंगमध्ये फारशी चमकही दाखवू शकलो नव्हतो. ग्वाल्हेरला मात्र मी ३० चेंडूत झटपट ३४ धावा काढल्या. अवघड प्रसंगी मी अझरबरोबर केलेली भागीदारी महत्त्वपूर्ण ठरली. अझरने नाबाद ९५ धावा काढत संघाला विजय मिळवून दिला.

इंग्लंड मालिकेपासून भारतीय क्रिकेटच्या एका यशस्वी कालखंडाला सुरुवात झाली. त्यानंतर झिंबाब्वेबरोबर खेळलेल्या एका कसोटीतही आम्हाला विजय मिळाला होता. घरच्या मैदानावर हमखास यशस्वी होण्याची चांगली सवय आता आम्हाला जडली होती. एकदिवसीय सामन्यामध्ये आम्ही अटीतटीच्या क्षणी विजय खेचून आणू लागलो होतो. लवकरच 'हिरो कप'ला सुरुवात होणार होती. हिरो कप ही महत्त्वाची एकदिवसीय क्रिकेट स्पर्धा समजली जाते. या स्पर्धेत दक्षिण आफ्रिका, श्रीलंका, वेस्ट इंडीज आणि झिंबाब्वे हे संघ सहभागी होणार होते. भारतीय संघाकडे संभाव्य विजेते म्हणून पाहिलं जात होतं.

गोलंदाजी : अनोखा अनुभव

हिरो कपच्या काही दिवस आधी मी बंगळुरूला एक महोत्सवी सामना खेळलो. एरवी यष्टिरक्षण करणाऱ्या किरण मोरेने त्यात मला गोलंदाजी केली. त्याने टाकलेल्या एका फुल टॉसवर मी षटकार मारण्याचा प्रयत्न केला. पण तो फटका मारताना माझा हात पिळवटला गेला. दुखापत थोडी विचित्र होती. मी बॅटिंग करू शकत होतो. पण खूप वेदनाही होत होत्या. त्यानंतर काही दिवस उलटले तरी दुखापत बरी होण्याचं चिन्ह दिसेना. अखेर मला एक खास इंजेक्शन द्यायचं ठरलं. डॉक्टर अनंत जोशी कॉर्टिझनचं इंजेक्शन देण्यासाठी मुंबईहून दिल्लीला आले. हाताच्या पंजाच्या अगदी जवळ असलेल्या मनगटाच्या भागात हे इंजेक्शन दिलं जाणार होतं. हिरो कप स्पर्धा सुरू व्हायला फारच थोडे दिवस उरले होते. दुखापतीतून बरा होण्यासाठी मी अतिशय आतुर होतो. इंजेक्शन घेताना खूपच वेदना सहन कराव्या लागल्या. कॉर्टिझनचं इंजेक्शन घेण्याचा तो माझा

पहिलाच प्रसंग होता. त्यानंतर मात्र शेकडो वेळा ती इंजेक्शन्स मला टोचून घ्यावी लागली.

हिरो कपमधली एक आठवण मी कधीही विसरू शकणार नाही. तो उपांत्य फेरीचा सामना होता. दक्षिण आफ्रिका हा प्रतिस्पर्धी संघ होता. पहिली फलंदाजी करताना आमच्या फक्त १९५ धावा झाल्या होत्या. धावसंख्या अपुरी होती. दक्षिण आफ्रिकेला रोखायचं तर उत्कृष्ट गोलंदाजी व उत्तम क्षेत्ररक्षणाची गरज होती. अनिलसह सर्वांनीच चांगली बोलिंग केली. ४९ षटकं संपली. शेवटच्या षटकात दक्षिण आफ्रिकेला विजयासाठी सहा धावा हव्या होत्या. कमी धावसंख्या होऊनही आम्ही निकराची लढत दिली होती. आता प्रश्न होता ५०व्या षटकाचा. इतक्या महत्त्वपूर्ण षटकाची जबाबदारी कोणावर सोपवणार?

ती जबाबदारी मी स्वेच्छेने स्वीकारली. सामन्यात मी त्याआधी गोलंदाजी केली नव्हती. मी गोलंदाजी करण्यामागे धक्कातंत्राचाही भाग होता. शिवाय खेळपट्टी संथगती गोलंदाजीला साथ देत होती. कपिल देव यांची गोलंदाजी खेळणं त्यांना सोपं गेलं असतं. मी चेंडू हातात घेतला व माझ्या लक्षात आलं की, शरीर थोडं कडक झालं आहे; हातही बधिर झाले आहेत. चटकन वॉर्म-अप होणं जरुरीचं होतं. दुसरी संधी मिळणार नव्हती. एक बॉल जरी वाइड पडला असता, तरी मॅच हातातून निसटणार होती.

ब्रायन मॅकमिलनला पहिला चेंडू मी गुड लेंग्थ टाकला. त्यावर त्याने एक धाव काढली. पण त्यात दक्षिण आफ्रिकेला फॅनी डि'व्हिलियर्सला गमवावं लागलं. फॅनी दुसरी धाव काढून मॅकमिलनला फलंदाजी द्यायचा प्रयत्न करत होता. सलील अंकोलाच्या अचूक फेकीमुळे तो धावबाद झाला. त्यामुळे फायदा असा झाला की, मॅकमिलन दुसऱ्या बाजूलाच राहिला. नवीन आलेला ॲलन डोनाल्ड आता माझ्यासमोर होता. माझ्यासाठी तीच संधी होती. ॲलनची बॅटिंग फारशी चांगली नव्हती. त्याला जर मी क्रीजमध्येच खिळवून ठेवू शकलो, तर आम्हाला जिंकण्याची नक्कीच शक्यता होती. फटकेबाजी करणाऱ्या मॅकमिलनला फलंदाजीपासून दूर ठेवणं महत्त्वाचं होतं.

डोनाल्डच्या मनावर आलेला ताण मला स्पष्ट जाणवत होता. मला फक्त आता डोकं शांत ठेवून गोलंदाजी करायची होती. मी चेंडूचा वेग आणखी कमी केला. चेंडूला उंची देत किंचित वळवले. ॲलनला संथ खेळपट्टीशी जुळवून घेता आलं नाही. पुढच्या तीनही चेंडूवर त्याला एकही धाव काढता आली नाही. त्याने स्वत:बरोबर टीमलाही अडचणीत आणलं. पाचव्या चेंडूवर त्याने एक धाव काढली. शेवटच्या चेंडूवर चौकार बसला तरच दक्षिण आफ्रिकेला विजय मिळणार होता. आम्हाला फक्त तो चौकार रोखायचा होता.

स्थिर मन, स्पष्ट विचार व अंत:प्रेरणेवर विश्वास या तीन गोष्टी अशा समरप्रसंगात फार उपयोगी ठरतात. माझा अनुभव असा होता की, अशा वेळी अनेकदा फलंदाज जोरदार फटका मारायला जातो. चेंडू बॅटच्या आतल्या कडेला लागतो. यष्टिरक्षक स्टम्प्सजवळ उभा राहिल्याने चेंडू त्याला चकवून सीमापार जाऊ शकतो. मी आमच्या यष्टिरक्षक विजय यादवला स्टम्प्सपासून खूप मागे उभं राहायला सांगितलं.

मला वाटलं होतं तसंच नेमकं घडलं. मॅकमिलनने उंचावरून फटका मारायचा प्रयत्न केला. चेंडू त्याच्या बॅटच्या आतल्या कडेला लागला. मागे उभा राहिल्यामुळे, यादव तो चेंडू सहज पकडू शकला. दक्षिण आफ्रिकेला फक्त एक धाव मिळाली. मॅचचा शेवट कमालीचा नाट्यमय झाला. सामना जिंकून आम्ही अंतिम फेरीत पोचलो होतो. त्या षटकात मी फक्त तीन धावा दिल्या. आम्ही दोन धावांनी विजय मिळवला होता. ईडन गार्डन्सवर जमलेल्या प्रेक्षकांनी एकच जल्लोश केला. ते बेभान होऊन नाचू लागले. वर्तमानपत्रांच्या मशाली पेटवल्या गेल्या. स्टेडियममध्ये एक वेगळंच वातावरण निर्माण झालं. मीही आतून थरारून गेलो होतो. सर्व सहकाऱ्यांनी मला आनंदाने वेढा घातला. मी खेळलेली ती एक चिरस्मरणीय मॅच ठरली.

आमच्या विजयात एका मुंगुसाचाही अनपेक्षित सहभाग होता. सामन्याच्या दुसऱ्या सत्रात ते मधून मधून मैदानावर यायचं. आश्चर्य म्हणजे मुंगूस आलं की, दक्षिण आफ्रिकेचा खेळाडू त्याच वेळी बाद होत असे. खरं म्हणजे तो एक योगायोग होता. पण आमच्यासाठी तो सुदैवी योगायोग ठरला.

अटीतटीच्या उपांत्य सामन्यानंतर वेस्ट इंडीजबरोबर अंतिम सामना होता. ती मॅच मात्र एकतर्फी झाली. अनिलने एकहाती वेस्ट इंडीजला गुंडाळलं. ती त्याच्या कारकिर्दीतील सर्वोत्कृष्ट कामगिरी होती. त्याने १२ धावांत ६ गडी बाद केले.

ईडन गार्डन्सला जमलेल्या हजारो प्रेक्षकांच्या साक्षीने आम्ही हिरो कप जिंकला. विशेष म्हणजे त्या सामन्यात मी ब्रायन लाराला बाद केलं होतं. लाराच्या विकेटमुळे विजयाची खुमारी अधिक वाढली. अजित तो सामना पाहण्यासाठी कोलकात्याला आला होता. गंमत म्हणजे सामन्याच्या आदल्या दिवशी अजित मला म्हणाला होता की, ''संधी मिळाल्यास लाराची विकेट घेण्याचा प्रयत्न कर. त्यासाठी तुला स्टम्प-टु-स्टम्प बोलिंग करावी लागेल.'' सुदैवाने लाराला गोलंदाजी करायची मला संधी मिळाली. त्या मॅचमध्ये लारा आघाडीला आला होता. सुरुवातीला त्याने माझ्या चेंडूवर काही धावा काढल्या. त्यानंतर मी त्याला एक ऑफ स्टम्पच्या बाहेर चेंडू टाकला. तो किंचित आत वळला आणि लाराचा त्रिफळा उडाला. विकेट मिळवल्याचा आनंद साजरा करत असताना मला आदल्या दिवशी अजितबरोबर झालेलं बोलणं आठवत होतं.

भारत-न्यूझीलंड, मार्च-एप्रिल, १९९४

२७ मार्च, १९९४ची सकाळ मी कधीच विसरू शकत नाही. आम्ही न्यूझीलंडविरुद्ध चार सामन्यांची एकदिवसीय मालिका खेळत होतो. त्या दिवशी ऑकलंडला दुसरा सामना होता. आमचा आघाडीवीर नवज्योत सिद्धूची मान सकाळीच अवघडली होती. त्यामुळे तो खेळू शकत नव्हता. माझ्या मनात एक वेगळाच विचार आला. दौऱ्यावर भारताचे माजी कर्णधार अजित वाडेकर आमचे व्यवस्थापक होते. मी अझर व वाडेकर सरांकडे गेलो. ''सिद्धूऐवजी मला आघाडीला बॅटिंग करायची संधी द्या,'' अशी मी त्यांना विनंती केली. बरेच दिवस तो विचार माझ्या मनात होता. सुरुवातीपासूनच फटकेबाजी करून गोलंदाजांवर वर्चस्व मिळवायची क्षमता माझ्यात होती. एकदिवसीय सामन्यात पहिल्या १५ षटकांमध्ये क्षेत्ररक्षणासाठी मर्यादा घातलेल्या असतात. त्या मर्यादांचा फायदा उठवून सुरुवातीलाच भक्कम पाया रचणं महत्त्वाचं असतं. स्वत:ला सिद्ध करायची मला फक्त एक संधी हवी होती. 'आज जर मी धावा करू शकलो नाही, तर मी तुम्हाला पुन्हा कधीही विनंती करणार नाही,' असंही मी वाडेकरसरांना म्हणालो. शिवाय सिद्धूच्या जागी आमच्यापाशी राखीव आघाडीवीरही नव्हता. मी डावाची सुरुवात केल्याने मधल्या फळीत आणखी एकाला संधी मिळणार होती. बऱ्याच चर्चेनंतर अखेर ते दोघंही कबूल झाले.

न्यूझीलंडच्या पहिल्या डावात फक्त १४२ धावा झाल्या होत्या, पण तरीही आम्ही चांगली सुरुवात करणं आवश्यक होतं. त्या क्षणी माझ्या अंगात वेगळाच उत्साह संचारला होता. देशासाठी आघाडीला बॅटिंग करायची सुवर्णसंधी मला मिळाली होती. अझर व वाडेकरसरांनी माझ्यावर टाकलेला विश्वास मला सार्थ करून दाखवायचा होता. मनातला सारा गोंधळ बाजूला ठेवून मी बॅटिंग करायला सुरुवात केली. काही झालं तरी आज जोरदार फटकेबाजी करायची हे मी ठरवलं होतं. एखादा दिवस खरंच फक्त तुमचा असतो. त्या दिवशी सारं काही तुमच्या मनासारखं घडतं. मी ४८ चेंडूंत ८२ धावा काढल्या. डावखुरा फिरकी गोलंदाज मॅथ्यू हार्टने अखेर मला बाद केलं. त्या इनिंगमध्ये मी १५ चौकार व २ षटकार ठोकले.

त्यानंतर वाडेकरसरांना पुन्हा विनंती करायची माझ्यावर वेळ आली नाही. उरलेल्या दोन सामन्यांतही मी डावाची सुरुवात केली. मालिका आम्ही २-२ अशी बरोबरीत सोडवली. न्यूझीलंडमध्ये न्यूझीलंडला हरवणं ही सोपी गोष्ट नव्हती. त्यामुळे मालिका बरोबरीत सोडवणं ही गोष्टही आम्हाला समाधान देऊन गेली. गोलंदाजांवर पूर्ण वर्चस्व ठेवून मी मनासारखी बॅटिंग करत होतो. गॅव्हिन लार्सन हा `कंजूष' गोलंदाज समजला जाई. तो फारसा धावा देत नसे. तो नेहमी स्टम्प-टु-स्टम्प गोलंदाजी करत असे. मी क्रीजपासून पुढे येत त्याला खेळू लागलो. त्यामुळे चेंडूचा टप्पा बदलण्याखेरीज त्याला पर्याय उरला नाही. मला चकवण्यासाठी त्याने आखूड टप्प्यावर चेंडू टाकला. पुढे सरसावत मी त्यावरही षटकार खेचला.

माझा एक हेतू सफल झाला होता. आता दुसरंही उद्दिष्ट गाठायचा मी निश्चय केला. एकदिवसीय सामन्यात मी अजूनही शतक काढलं नव्हतं. या गोष्टीचा मलाच खूप त्रास होत होता. एव्हाना मी सत्तरहून अधिक सामने खेळलो होतो. शतक करण्याची वेळ जवळ येऊन ठेपली होती. सप्टेंबर, १९९४मध्ये श्रीलंकेत सिंगर स्पर्धा सुरू झाली. स्पर्धेतल्या ऑस्ट्रेलिया विरुद्धच्या सामन्यात मी पहिलं शतक काढलं. त्या शतकाने मनावरचा ताण निघून गेला. पहिलं शतक काढण्याचं ओझं प्रत्येक फलंदाजाच्या मनावर असतं. एकदा पहिलं शतक झालं की, दुसरं शतक काढणं तसं सोपं जातं. स्वत:च्या क्षमतेबद्दलच्या सर्व

शंका त्यानंतर मिटलेल्या असतात. एकदिवसीय क्रिकेटमधील पहिल्या शतकानंतर माझंही मन शांत झालं होतं. माझ्या कारकिर्दीतला तो एक महत्त्वाचा टप्पा ठरला.

ब्रायन लाराविरुद्ध खेळताना

भारतीय संघात आता मी स्थिरावलो होतो. भारतातर्फे खेळायला सुरुवात करून पाच वर्षं झाली होती. आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळणाऱ्या इतर फलंदाजांबरोबर लोक आता माझी तुलना करू लागले होते. पत्रकारांचा तर तो आवडता उद्योग होता. १९९४च्या शेवटी वेस्ट इंडीज संघ भारताच्या दौऱ्यावर आला. प्रसारमाध्यमांनी त्या मालिकेचं 'सचिन विरुद्ध लारा' असं वर्णन करायला सुरुवात केली.

ब्रायन लारा हा क्रिकेटविश्वामधला एक महान फलंदाज आहे, यात काही शंकाच नाही. नोव्हेंबर, १९९०ला टोरांटोमध्ये वेस्ट इंडीज विरुद्ध शेषविश्व संघात एक महोत्सवी सामना खेळला गेला. त्या सामन्यात मी ब्रायनला प्रथम भेटलो होतो. ब्रायनशी अगदी पहिल्या क्षणापासून माझे छान सूर जुळले. त्याच्याशी गप्पा मारताना खूपच मजा आली. क्रिकेट खेळण्याबरोबर त्याने क्रिकेटवर सखोल चिंतनही केलं होतं. त्याचे विचार नेहमी स्पष्ट असायचे. क्रिकेटच्या सर्व बारकाव्यांची त्याला विलक्षण जाण होती. क्रिकेटविश्वात तो आजही अजातशत्रू म्हणून ओळखला जातो. मनगटातलं कौशल्य व उत्तम पदलालित्य यांमुळे तो त्याच्या काळातला सर्वोत्कृष्ट फलंदाज ठरला. एकाच चेंडूवर वेगवेगळ्या प्रकारचे शॉट्स मारायची असामान्य प्रतिभा त्याच्यापाशी होती. खेळताना अगदी शेवटच्या क्षणी तो आपला पवित्रा बदलू शकत असे. यातच त्याने स्वत:चं वेगळेपण सिद्ध केलं होतं. त्याच्यापाशी बॅटिंगमधलं पारंपरिक तंत्र नव्हतं; परंतु उत्तम पदलालित्य व असामान्य कौशल्य या गुणांवर त्यांनी ती उणीव भरून काढली होती.

वेस्ट इंडीजचा संघ नोव्हेंबर-डिसेंबर, १९९४ला भारताच्या दौऱ्यावर आला. त्या वेळी ब्रायन हा संघाचा प्रमुख आधारस्तंभ होता. वेस्ट इंडीजला हरवण्यासाठी ब्रायनला लवकर बाद करणं आवश्यक आहे हे सर्वांनाच ठाऊक होतं. पण ब्रायनची विकेट मिळवणं ही सोपी गोष्ट नव्हती. मोहालीला खेळलेल्या तिसऱ्या व अखेरच्या कसोटीत ब्रायनने महत्त्वाची भूमिका बजावली. त्याने काढलेल्या ९१ धावांमुळे वेस्ट इंडीजची भक्कम सुरुवात झाली. जिमी ॲडम्सने काढलेल्या २५२ धावा निर्णायक ठरल्या. वेस्ट इंडीजने ती कसोटी जिंकून मालिका बरोबरीत सोडवली.

त्या मालिकेत मी छान बॅटिंग केली. मुंबईच्या कसोटीतील माझी इनिंग्ज मलाच खूप समाधान देऊन गेली. ३ बाद ११ अशा अवघड परिस्थितीत मी खेळायला आलो होतो. मी ८५ धावा काढल्या. आम्ही ती कसोटी ९६ धावांनी जिंकलो. त्या मॅचमध्ये आम्ही ब्रायनला दोन्ही डावांत लवकर बाद करू शकलो होतो. दुसरी कसोटी नागपूरच्या व्हीएसीए स्टेडियमवर खेळली गेली. पहिल्या डावात मी १७९ धावा काढल्या. मला आठवतं, शतक झाल्यावर मी भावनेच्या भरात थोडा बेभान होऊन आनंद व्यक्त केला होता. एरवी शतक साजरं करायची माझी ती पद्धत नव्हती. त्या किंचित विक्षिप्त वागण्यामागे कदाचित बरीच कारणं असावीत. आदल्या दिवशी मी ८१ धावांवर नाबाद होतो. त्या दिवशी सकाळीच मला नव्या चेंडूवर खेळावं लागलं. पहिल्या काही षटकातच मी केनेथ बेंजामिनला चार चौकार मारून ९७ धावांवार पोचलो होतो. दुसऱ्या बाजूने कर्टनी वॉल्श गोलंदाजी करत होता. मी त्याच्या गोलंदाजीचा अंदाज घेत होतो. मला बाद करण्याचा विचार जर त्याच्या मनात असेल, तर तो मला ऑफ स्टम्पच्या बाहेर खोल टप्प्यावर चेंडू टाकेल. मला जर केवळ जखडून ठेवायचा त्याचा हेतू असेल, तर तो मला बाउन्सर टाकेल. त्याच्या मनात शिरण्याचा मी प्रयत्न करत होतो. वॉल्शने मला एक आखूड टप्प्याचा चेंडू टाकला. त्याच क्षणी तो दुसरा चेंडूही त्याच टप्प्यावर टाकणार हे मी ओळखलं. मी पवित्रा घेऊन तयार झालो. त्या चेंडूवर मी हुकचा अप्रतिम फटका मारला. चेंडू प्रेक्षकात जाऊन पडला. षटकार मारून शतक साजरं करण्यात एक वेगळाच थरार होता. मी भावनांवर नियंत्रण ठेवू शकलो नाही. मुठी जोरजोरात आवळून मी आनंदाने जोरात ओरडलो. वॉल्शला खिजवायचा माझा मुळीच हेतू नव्हता. माझा अंदाज खरा ठरल्याचा मला आनंद झाला होता.

कडक टीकेचा अनुभव

वेस्ट इंडीजशी कसोटी मालिका खेळण्याआधी आम्ही त्यांच्याविरुद्ध पाच सामन्यांची एकदिवसीय मालिका खेळलो होतो. त्या मालिकेतल्या काही आठवणी आवर्जून सांगाव्याशा वाटतात. ती मालिका दोन भागांत खेळली गेली. वेस्ट इंडीजबरोबर आम्ही दोन सामने खेळलो. त्यानंतर तिरंगी मालिका खेळण्यासाठी न्यूझीलंडचा संघ भारतात दाखल झाला. त्या मालिकेनंतर आम्ही पुन्हा वेस्ट इंडीजशी उरलेले तीन सामने खेळलो.

१७ आणि २० ऑक्टोबरला वेस्ट इंडीजविरुद्ध झालेल्या पहिल्या दोन सामन्यांत मी शून्यावर बाद झालो होतो. तिरंगी मालिकेच्या पहिल्या मॅचमध्येही माझ्या केवळ आठ धावा झाल्या. आश्चर्य म्हणजे त्या तीन सामन्यांतील अपयशानंतर लोकांनी लगेच माझ्या फलंदाजीतले दोष काढायला सुरुवात केली. मला भेटणारा प्रत्येक माजी भारतीय क्रिकेटपटूही मला काहीतरी सल्ला देऊ पाहत होता. त्यामागे त्यांचा हेतू कदाचित चांगलाही असेल; पण सर्वांचा एकच सूर पाहून मी चक्रावून गेलो.

पहिल्या दोन सामन्यांत मी भोपळाही फोडू शकलो नव्हतो, हे सत्य होतं; पण त्यावरची इतकी अनाठायी प्रतिक्रिया मात्र अचंबित करणारी होती. प्रत्येक जण अशा प्रतिकूल परिस्थितीतून गेलेला असतो. मी आतून शांत होतो. पुढच्या एखाद्या सामन्यात जरी मी चांगल्या धावा करू शकलो तरी मला माझा फॉर्म पुन्हा गवसेल हे मला ठाऊक होतं. ईडन गार्डन्सवर तिरंगी मालिकेचा शेवटचा सामना होता. त्यात मी ६६ धावा काढल्या. त्यानंतर झालेल्या मालिकेत मी लागोपाठ तीन अर्धशतकं झळकवली. जयपूरला ११ नोव्हेंबरला झालेल्या शेवटच्या सामन्यात तर मी शतक काढलं. मालिकेतील सर्वोत्कृष्ट खेळाडूचा पुरस्कार मला मिळाला.

दोन्ही मालिका जिंकल्यामुळे भारतीय प्रेक्षकांच्या आनंदाला पारावार उरला नव्हता. त्याआधी वर्षभर आम्ही हिरो कपही जिंकला होता. भारतामध्ये एकदिवसीय क्रिकेटची लोकप्रियता वाढू लागली होती. १९९६ची विश्वचषक स्पर्धा जवळ आली होती. भारत, पाकिस्तान व श्रीलंका या तीन देशांनी मिळून ती स्पर्धा आयोजित केली होती. त्या स्पर्धेला खूपच मोठं महत्त्व होतं.

भारताचा दक्षिण आफ्रिका दौरा, १९९२-९३

पहिली कसोटी. डर्बन – १३ ते १७ नोव्हेंबर, १९९२

दक्षिण आफिक्रा २५४ (केसी वेसल्स ११८, जेएन ऱ्होड्स ४१; कपिल देव ३-४३) व १७६-३ (एसी हडसन ५५)

भारत २७७ (पीके आमरे १०३, केएस मोरे ५५, **एसआर तेंडुलकर** ११; बीएम मॅकमिलन ३-७२)

सामना अनिर्णित

दुसरी कसोटी. जोहान्सबर्ग – २६ ते ३० नोव्हेंबर, १९९२

दक्षिण आफ्रिका २९२ (बीएम मॅकमिलन ९८, जेएन ऱ्होड्स ९१; एम प्रभाकर ४-९०) व २५२ (एसी हडसन ५३, डीजे रिचर्डसन ५०; ए कुंबळे ६-५३)

भारत २२७ (**एसआर तेंडुलकर** १११; बीएम मॅकमिलन ४-७४) व १४१-४ (ए जडेजा ४३, **एसआर तेंडुलकर** १; सीआर मॅथ्यूस २-२३, एए डोनाल्ड २-४३)

सामना अनिर्णित

तिसरी कसोटी. पोर्ट एलिझाबेथ – २६ ते २९ डिसेंबर, १९९२

भारत २१२ (एम अझरुद्दीन ६०, **एसआर तेंडुलकर** ६, एए डोनाल्ड ५-५५) व २१५ (कपिल देव १२९, **एसआर तेंडुलकर** ०; एए डोनाल्ड ७-८४, बीएन शूल्ट्झ २-३७)

दक्षिण आफ्रिका २७५ (डब्ल्यूजे क्रोनिए १३५, एसी हडसन ५२) व १५५-१ (केसी वेसल्स ९५; **एसआर तेंडुलकर** १-९)

दक्षिण आफ्रिका ९ गडी राखून विजयी

चौथी कसोटी. केप टाउन – २ ते ६ जानेवारी, १९९३

दक्षिण आफ्रिका ३६०-९ घोषित (जेएन ऱ्होड्स ८६, बीएम मॅकमिलन ५२; ए कुंबळे ३-१०१) व १३०-६ घोषित (केसी वेसल्स ३४; जे श्रीनाथ ४-३३)

भारत २७६ (**एसआर तेंडुलकर** ७३, एम प्रभाकर ६२; सीआर मॅथ्यूस ३-३२) व २९-१

सामना अनिर्णित

दक्षिण आफ्रिका मालिकेत १-० विजयी

इंग्लंडचा भारत दौरा, १९९३

पहिली कसोटी. कोलकता – २९ जानेवारी ते २ फेब्रुवारी, १९९३

भारत ३७१ (एम अझरुद्दीन १८२, **एसआर तेंडुलकर** ५०; जीए हिक ३-१९, डीई माल्कम ३-६७) व ८२-२(एनएस सिद्धू ३७, **एसआर तेंडुलकर** ९*, जीए हिक २-९)

इंग्लंड १६३ (एमडब्ल्यू गॅटिंग ३३; आरके चौहान ३-३०, एसएलव्ही राजू ३-३९, ए कुंबळे ३-५०) व २८६ (फॉलो-आन) (एमडब्ल्यू गॅटिंग ८१, एजे स्ट्युअर्ट ४९; ए कुंबळे ३-७६, एसएलव्ही राजू ३-८०)

भारत ८ गडी राखून विजयी

दुसरी कसोटी. चेन्नई – ११ ते १५ फेब्रुवारी, १९९३

भारत ५६०-६ घोषित (**एसआर तेंडुलकर** १६५, एनएस सिद्धू १०६, पीके आमरे ७८, कपिल देव ६६, व्हीजी कांबळी ५९)

इंग्लंड २८६ (एनएच फेअरब्रदर ८३, एजे स्ट्युअर्ट ७४, जीए हिक ६४; एसएलव्ही राजू ४-१०३)

व २५२ (फॉलो-आन) (सीसी लेविस ११७, आरए स्मिथ ५६; ए कुंबळे ६-६४)

भारत एक डाव व २२ धावांनी विजयी

तिसरी कसोटी. मुंबई – १९ ते २३ फेब्रुवारी, १९९३

इंग्लंड ३४७ (जीए हिक १७८, सीसी लेविस ४९; कपिल देव ३-३५, ए कुंबळे ३-९५) व २२९ (आरए स्मिथ ६२, एमडब्ल्यू गॅटिंग ६१, जीए हिक ४७; ए कुंबळे ४-७०)

भारत ५९१ (व्हीजी कांबळी २२४, एनएस सिद्धू ७९, **एसआर तेंडुलकर** ७८, पीके आमरे ५७; पीसीआर टफनेल ४-१४२)

भारत एक डाव व १५ धावांनी विजयी

भारत मालिकेत ३-० विजयी

वेस्ट इंडीजचा भारत दौरा, १९९४

पहिली कसोटी. मुंबई – १८ ते २२ नोव्हेंबर, १९९४

भारत २७२ (एन मोंगिया ८०, एसव्ही मांजरेकर ५१, **एसआर तेंडुलकर** ३४; सीए वॉल्श ६-७९) व ३३३ (**एसआर तेंडुलकर** ८५, एसव्ही मांजरेकर ६६, जे श्रीनाथ ६०; केसीजी बेंजामिन ४-८२)

वेस्ट इंडीज २४३ (एससी विलियम्स ४९; एसएलव्ही राजू ५-६०) व २६६ (जेआर मरे ८५, जेसी ॲडम्स ८१; जे

श्रीनाथ ४-४८, एसएलव्ही राजू ३-८५)

भारत ९६ धावांनी विजयी

दुसरी कसोटी. नागपूर – १ ते ५ डिसेंबर, १९९४

भारत ५४६-९ घोषित (**एसआर तेंडुलकर** १७९, एनएस सिद्धू १०७, एम अझरुद्दीन ९७, ए कुंबळे ५२)* व २०८-७ घोषित (एनएस सिद्धू ७६, **एसआर तेंडुलकर** ५४)

वेस्ट इंडीज ४२८ (जेसी ॲडम्स १२५*, सीएल हुपर ८१, जेआर मरे ५४, बीसी लारा ५०, पीव्ही सिमन्स ५०; एसएलव्ही राजू ५-१२७) व १३२-५ (सीएल हुपर ६७, एकुंबळे ३-४५)

सामना अनिर्णित

तिसरी कसोटी. मोहाली – १० ते १४ डिसेंबर, १९९४

वेस्ट इंडीज ४४३ (जेसी ॲडम्स १८४, एसी कमिन्स ५०; ए कुंबळे ४-९०, एसएलव्ही राजू ३-७३) व ३०१-३ घोषित (बी लारा ९१, जेसी ॲडम्स ७८*, केएलटी आथर्टन ७०)*

भारत ३८७ (एम प्रभाकर १२०, जे श्रीनाथ ५२*, **एसआर तेंडुलकर** ४०) व ११४ (जे श्रीनाथ १७*, एस मांजरेकर १७, **एसआर तेंडुलकर** १०; केसीजी बेंजामिन ५-५६, सीए वॉल्श ३-३४)

वेस्ट इंडीज २४३ धावांनी विजयी

मालिका १-१ अनिर्णित

७.
विश्वचषक १९९६

आम्ही जानेवारी, १९९६मध्ये विश्वचषक स्पर्धेची तयारी सुरू केली. भारतीय संघासाठी बंगळुरूला एक खास शिबिर आयोजित केलं होतं. त्या शिबिरात रोज सकाळी सर्व खेळाडूंना हॉटेलपासून चिन्नास्वामी स्टेडियमपर्यंत धावावं लागे. व्यवस्थापनाने हा अजब निर्णय का घेतला, हे समजणं अवघड होतं. आम्ही धावत असताना संघाची बस व सुरक्षारक्षकांच्या गाड्या आमच्या पाठून येत असत. ही अचाट कल्पना मुळात कोणाला, कशी सुचली, हे आजही मला पडलेलं कोडं आहे. या कल्पनेमागे नक्की कोणतं तार्किक कारण होतं हेही माझ्या अजून लक्षात आलेलं नाही. आमच्यापैकी कोणालाच रस्त्यावरून धावायची सवय नव्हती. रस्त्यावरून धावताना इजा व दुखापती होण्याची शक्यता खूपच होती. पहिल्याच दिवशी माझ्या पायाची नडगी दुखावली गेली. इतरांनाही पाठीच्या व हॅमस्ट्रिंगच्या (गुडघ्याच्या मागची धोंडशीर) दुखापती झाल्या.

त्या धावण्यावरून ड्रेसिंग रूममध्ये बरीच थट्टा चाले. `आपण रस्त्यावर क्षेत्ररक्षण करणार आहोत की मैदानात?' हा त्या वेळी गाजलेला विनोद होता. मैदानावरच्या गवतावरून आमची पहिजे तितका वेळ धावायची तयारी होती. विश्वचषक स्पर्धा जवळ येऊन ठेपली होती. अशा वेळी टणक आणि खडबडीत रस्त्यांवरून धावण्याचा धोका पत्करण्यात काय अर्थ होता? काही खेळाडूंनी हॉटेल व स्टेडियमपर्यंतचं अंतर मोजून मैदानावर तितकंच अंतर धावायची तयारी दाखवली. अखेर व्यवस्थापनाने आमचं म्हणणं ऐकलं. रस्त्यावरचं धावणं त्वरित थांबवलं गेलं. त्याच्या दुसऱ्या दिवसापासून आम्हीही झटून तयारीला लागलो.

शिबिराच्या काळात आम्ही सकाळी सात वाजता मैदानावर पोचत असू. दुपारी दोन वाजेपर्यंत आमचा सराव सुरू असे. सराव चांगलाच थकवणारा होता. स्वत:ला उत्साही व कार्यक्षम ठेवण्यासाठी मी रोज चांगला नाष्टा केल्याशिवाय हॉटेलबाहेर पडत नसे. १९९६मध्ये मी २३ वर्षांचा होतो. खाल्लेलं सगळं पचवायचं ते वय होतं. दोन सँडविचेसमध्ये चार उकडलेली अंडी, जोडीला केचअप आणि टबॅस्को सॉस – हा माझा त्या वेळचा आवडता नाष्टा होता. नाष्ट्यामुळे योग्य तो परिणाम साधला जाई. मी न दमता मजेत सराव करू शकत असे. संध्याकाळी सर्व जण स्विमिंग पूल किंवा जिममध्ये जात. सर्वांचे डोळे आता स्पर्धेकडे लागले होते. आजपर्यंत कोणताही देश आपल्या घरच्या मैदानावर विश्वचषक जिंकू शकलेला नव्हता. तो इतिहास घडवण्याची संधी आम्हाला मिळाली होती.

गटवार सामने : फेब्रुवारी-मार्च, १९९६

आमची पहिली लढत केनियाविरुद्ध होती. १८ फेब्रुवारीला तो सामना ओरिसामधल्या कटक येथे खेळला गेला. ती मॅच आम्ही आरामात जिंकलो. मी शतक काढलं. 'मॅन ऑफ द मॅच'ही मीच होतो. तीन दिवसांनी दुसरा सामना खेळण्यासाठी आम्ही पश्चिमेला ग्वाल्हेरला पोचलो. तो सामना वेस्ट इंडीजविरुद्ध होता. पहिली मॅच जिंकल्याने यापुढेही जिंकत राहू असा विश्वास आम्हाला होता. भारताच्या पूर्वेला फेब्रुवारीत झोंबणारे वारे वाहत असतात. त्याच वेळी पश्चिमेला मात्र दिवसा ३० अंश तापमान असतं. वेस्ट इंडीजच्या मॅचच्या आदल्या दिवशी माझ्या अंगात ताप होता, पण तरीही मी सामना खेळलो. सामन्याच्या विजयात माझा ७० धावांचा वाटा होता. त्याआधी प्रभाकर व कुंबळे यांच्या गोलंदाजीमुळे आमच्यासमोर फार मोठं लक्ष्य नव्हतं. इनिंगजच्या सुरुवातीला वेस्ट इंडीजचा यष्टिरक्षक कर्टनी ब्राउनने शॉर्ट स्क्वेअर लेगला माझा उंच उडालेला झेल सोडला होता. मिळालेल्या या जीवदानाचा मी त्यानंतर पुरेपूर फायदा उठवला.

दोन सामने जिंकून आम्ही २७ फेब्रुवारीला मुंबईत आलो. तिसरी मॅच ऑस्ट्रेलियाविरुद्ध होती. आमच्याकडे संभाव्य विजेते म्हणून पाहिलं जात होतं. त्या दृष्टीने आणखी एक पाऊल पुढे टाकण्याचा आमचा निर्धार होता. ऑस्ट्रेलियाने चांगली फलंदाजी केली. मार्क वॉने १२६ धावा काढल्या. मार्क हा जुळ्या वॉ बंधूमधला धाकटा होता. ऑस्ट्रेलियाच्या एकूण २५८ धावा झाल्या. आमची सुरुवात खराब झाली. आम्ही दोन विकेट्स फारच लवकर गमावल्या. दोन्ही फलंदाजांना डॅमियन फ्लेमिंगने बाद केलं होतं. डॅमियनने संपूर्ण स्पर्धेत छान कामगिरी केली. त्याच मॅचमध्ये मी मॅक्ग्रा व फ्लेमिंगवर आक्रमक हल्ला चढवला.

गोलंदाजांवर वर्चस्व मिळवून मी छान बॅटिंग करत होतो. अचानक गोलंदाजीत बदल करून मार्क वॉच्या हाती चेंडू देण्यात आला. मार्क ऑफ स्पिनर होता. त्याच्या चेंडूंवरही मी स्क्वेअर लेगला फटके मारून धावा केल्या. नंतर स्वीपवर चौकार मारला. अपेक्षेप्रमाणे क्षेत्ररक्षणात बदल केला गेला. डीप मिड विकेटला उभ्या असलेल्या क्षेत्ररक्षकाला किंचित स्क्वेअर लेगच्या दिशेला हलवलं. त्यामुळे मिड विकेटचा पट्टा रिकामा झाला. मी आता तिथून उंचावरून चौकार मारू शकत होतो. मला पुढे सरसावलेलं पाहून मार्क वॉने वाइड बॉल टाकला. मी चेंडूपर्यंत पोचू शकलो नाही. ९० धावांवर यष्टिचीत होऊन मी तंबूत परतलो. मार्क शेरास सव्वाशेर ठरला होता. माझ्या मनातला विचार त्याने आधीच ओळखला होता. सामन्यातला तो निर्णायक क्षण ठरला. त्यानंतर आम्ही भराभर विकेट्स गमावल्या. हातात आलेली मॅच थोडक्यात हरल्यामुळे ड्रेसिग रूममधलं वातावरण उदास होऊन गेलं.

आर्थिक हितसंबंध

ऑस्ट्रेलिया विरुद्धच्या सामन्यात विश्रांतीच्या दरम्यान एक विचित्र गोष्ट घडली. त्या वेळी बॅटसाठी प्रायोजक नसलेला मी एकच भारतीय खेळाडू होतो. बहुतेक खेळाडूंच्या बॅटवर `फोर स्क्वेअर' किंवा `विल्स'चे शिक्के होते. कोणत्याही तंबाखू उत्पादकाबरोबर करार न करण्याचा मी निश्चय केला होता. त्यामुळे स्टिकरशिवाय बॅट वापरणारा मी एकमेव खेळाडू होतो. स्पर्धा सुरू होण्याआधी काही महिने एका बहुराष्ट्रीय कंपनीने माझ्याशी संपर्क साधला होता. त्या कंपनीने भारतात नुकताच शिरकाव केला होता. परंतु आमच्या चर्चेमध्ये विशेष प्रगती झाली नव्हती. मी सांगितलेली रक्कम त्यांना मान्य नव्हती. मॅच चालू असताना त्या कंपनीचा मॅनेजर अचानक उगवल्यामुळे मी चकित झालो होतो. त्यांचा प्रस्तावही बुचकळ्यात टाकणारा होता. त्यांच्या कंपनीचा स्टिकर जर मी तत्काळ बॅटवर लावू दिला, तर मी मागेन तेवढी रक्कम द्यायची त्यांची तयारी होती.

मी तो प्रस्ताव नाकारला. स्पर्धा ऐन भरात आलेली असताना मला माझं मन विचलित होऊ द्यायचं नव्हतं. मला स्टिकर न लावलेल्या बॅटने खेळायची सवय होती. अचानक त्यावर आलेल्या स्टिकरने माझी एकाग्रता भंग पावली असती. त्यामुळे माझ्या बॅटिंगमधली लय बिघडली असती. `'मला स्वत:ला जेव्हा वाटेल तेव्हाच मी बॅटवर स्टिकर लावेन, तुम्हाला वाटेल तेव्हा नव्हे,'' असं मी कंपनीच्या मॅनेजरला स्पष्ट शब्दांत सांगितलं. स्टिकरशिवाय माझी बॅटिंग चांगली होत होती. त्याबाबतीत मी थोडा अंधश्रद्धाळू होतो. बहुतेक खेळाडू तसेच असतात. (मात्र ते मान्य करत नाहीत.) स्टिकर नसलेल्या बॅटमधून धावा होत असताना मला कोणताही धोका पत्करायचा नव्हता. बॅटवर स्टिकर लावण्यात मला धोका वाटत होता.

स्पर्धा अंतिम टप्प्यावर आलेली असताना मार्क मस्कारेन्हासने माझ्यासमोर एक नवीन प्रस्ताव आणला. मार्क 'वर्ल्डटेल' कंपनीच्या क्रीडा व्यवस्थापनाचा प्रमुख होता. तो माझा खास मित्र व माझा मॅनेजरही होता. 'एमआरएफ' कंपनीने माझ्या बॅटची प्रायोजक होण्याची इच्छा दाखवली होती. करार मात्र स्पर्धा संपल्यानंतरच अमलात येणार होता. मार्क हा मूळचा कनेक्टिकटचा. विश्वचषक १९९६ स्पर्धेचे टीव्ही प्रसारणाचे हक्क मिळवल्यामुळे त्याने सर्वांचं लक्ष वेधून घेतलं होतं. काही बाबतीत मी ठाम व आग्रही असतो हे तो ओळखून होता. मला मनाविरुद्ध वागण्याचं दडपण त्याने कधीही येऊ दिलं नाही. माझ्या आवडी-निवडी त्याने अचूक ओळखल्यामुळे आमच्यात खूपच सख्य निर्माण झालं होतं. मार्कला मी मॅनेजरपेक्षाही माझा जवळचा मित्र मानत होतो. मी स्वत:ला त्याच्यावर सोपवून निश्चिंत झालो होतो. खेळाडूंना चांगल्या जाहिराती मिळवून द्यायचं श्रेय मार्ककडे जातं. मोठमोठ्या कंपन्या आपल्या उत्पादनांची जाहिरात करण्यासाठी क्रिकेटर्सबरोबर करार करू

लागल्या होत्या. मार्कनेच सर्वप्रथम ही कल्पना त्यांच्यासमोर मांडली होती. पण कोणत्याही एका विशिष्ट कंपनीची जाहिरात स्वीकारण्याची त्याने माझ्यावर कधीही जबरदस्ती केली नाही.

१९९५मध्ये श्रीलंकेत माझी व मार्कची पहिली भेट झाली. रवी शास्त्रीने ती भेट घडवून आणली. ''काहीतरी निराळं करून दाखवण्याची क्षमता मार्ककडे आहे,'' असं रवी मला म्हणाला होता. रवीच्या मते माझ्यासाठी मार्ककडे एक विशेष प्रस्ताव होता. पहिल्याच भेटीत मला मार्क आवडला. त्याच्यात मुरलेली व्यावसायिकता व कोणत्याही विषयाचा खोलात जाऊन अभ्यास करण्याची त्याची वृत्ती मला प्रभावित करून गेली. मार्क कोणतीही गोष्ट कधी गृहीत धरून चालत नसे. आम्ही अगदी जानी दोस्त झालो होतो. दोन-तीन वेळा एकत्र कौटुंबिक सहलींनाही गेलो होतो. एकदा आम्ही दक्षिण भारतातल्या कुन्नूर येथे सर्व जण गेलो होतो. तिथे गोल्फ खेळताना व तिथल्या मिष्टान्नावर मनसोक्त ताव मारताना खूप धमाल आली होती. मार्कही माझ्यासारखाच खवय्या होता. कनेक्टिकटला त्याच्या घरी केलेल्या चमचमीत जेवणाची चव अजूनही माझ्या जिभेवर आहे. २००२मध्ये नागपूरजवळ खारबी येथे झालेल्या दुर्दैवी अपघातात तो दगावला. ती बातमी ऐकून मी हादरून गेलो होतो. अत्यंत जवळचा मित्र व विश्वासू साथीदार मी गमावून बसलो होतो. त्याच्या आकस्मिक मृत्यूने माझ्या जीवनात खूप मोठी पोकळी निर्माण झाली होती.

मार्कनंतर माझे आर्थिक व्यवहार सांभाळण्याची अनेकांनी तयारी दर्शवली, पण मार्कबरोबर माझे अतिशय घट्ट व जिव्हाळ्याचे संबंध निर्माण झाले होते. वर्ल्डटेलशी संबंध तोडण्याची कल्पनाही मी करू शकत नव्हतो. माझा निर्णय योग्यच होता. मार्कनंतर तितक्याच तोलामोलाचा विनोद नायडू हा मला मॅनेजर व मित्र म्हणून लाभला. विनोद आधी वर्ल्डटेलमध्ये काम करायचा. आता तो 'डब्ल्यूएसजी' (वर्ल्ड स्पोर्टग्रुप) तर्फे काम करतो. विनोदला मी प्रथम १९९८मध्ये शारजामध्ये भेटलो होतो. त्यानंतर लंडनमधल्या माझ्या आवडत्या 'पटारा' या थाई रेस्टॉरंटमध्ये मार्कने माझी त्याच्याशी ओळख करून दिली होती. मार्कच्या अकाली मृत्यूनंतर विनोद व मी एकत्र काम करू लागलो. आमच्यात वारंवार चर्चा होऊ लागली. मार्कप्रमाणेच विनोदनेही माझी मतं आणि विचार नीट समजून घेतले आणि त्यांचा कायम आदरही राखला. 'माझ्या जीवनात नेहमी क्रिकेटलाच सर्वाधिक प्राधान्य असणार,' ही गोष्ट त्याला स्पष्टपणे उमगली होती. मार्क व विनोदसारखे दोन सर्वोत्तम साथीदार मला लाभले हे मी माझं भाग्य समजतो. गेल्या १०-१५ वर्षांत आमच्या या व्यावसायिक क्षेत्रात माझी विनोदइतकी जवळीक अन्य कुणाबरोबरही होऊ शकली नाही. विनोदच्या सहवासातला प्रत्येक क्षण अतिशय आनंददायी होता. विनोद मला अंतर्बाह्य ओळखतो. त्याने आजपर्यंत माझी प्रत्येक गरज पूर्ण केली आहे. माझे हितसंबंध जपण्यासाठी त्याने केलेल्या प्रयत्नांना खरोखरच तोड नाही. स्वत:च्या कुटुंबाला बाजूला ठेवून त्याने माझ्यासाठी अक्षरश: स्वत:ला वाहून घेतलं आहे. मार्कनंतर तोही माझा जिगरी दोस्त झाला.

पुन्हा पाकिस्तान

९ मार्च, १९९६ला भारताचा पाकिस्तानविरुद्ध उपउपांत्य फेरीचा सामना होता. विश्वचषक स्पर्धेतला तो सर्वांत मोठा व महत्त्वाचा सामना होता. टीमच्या हॉटेलभोवती कडक सुरक्षा ठेवण्यात आली होती. साऱ्या देशाचं लक्ष त्या मॅचकडे लागलं होतं. भारत-पाकिस्तान सामन्याला नेहमीच राष्ट्रीय महत्त्व प्राप्त झालेलं असतं. त्यात विश्वचषक स्पर्धेमुळे सामन्याची रंगत अधिकच वाढली होती. त्याहून महत्त्वाचं म्हणजे हरणारा संघ स्पर्धेतून बाद होणार होता. मॅचच्या दिवशी आम्ही सकाळी लवकर मैदानावर पोचलो. स्टेडियममधलं वातावरण भारून टाकणारं होतं. मॅच सुरू व्हायच्या कित्येक तास आधीच स्टेडियम प्रेक्षकांनी खचाखच भरून गेलं होतं. प्रेक्षकांच्या उत्साहाला उधाण आलं होतं.

पहिली बॅटिंग आमची होती. पहिला बाद होणारा खेळाडूही मीच होतो. मी ३१ धावा केल्या. अत्-उर-रहमानचा चेंडू थर्ड मॅनला तटवण्याच्या नादात मी बाद झालो. माझ्याबरोबर नवज्योत सिद्धू सलामीला आला होता. त्याने सुरेख फलंदाजी करत ९३ धावा काढल्या. डावाच्या अखेरीस अजय जडेजाने तुफानी फटकेबाजी करत २५ चेंडूत ४७ धावा केल्या. ५० षटकांत आमच्या २८७ धावा झाल्या.

पाकिस्तानची सुरुवात दमदार झाली. पहिल्या १० षटकांत त्यांनी ८० धावा काढल्या. धावांचा वेग रोखण्यासाठी लवकरात लवकर एक विकेट मिळवणं आवश्यक होतं. त्याच वेळी आमिर सोहेल व वेंकटेश प्रसाद यांच्यामधला तो प्रसिद्ध किस्सा घडला. आमिर सोहेल पाकिस्तानचा सलामीवीर होता. वेंकटेश प्रसाद आमचा आघाडीचा गोलंदाज होता. आमिरने वेंकीला पॉइंटवरून एक चौकार मारला. ''दिवसभर मी तुला याच जागेवरून चौकार मारत राहू शकतो,'' आमिरने पॉइंटच्या दिशेने बॅट दाखवत वेंकीला चिडवलं. आमिरच्या वागण्यात अहंकार व उद्धटपणा होता. वेंकीला उद्देशून त्याने आणखीही काही अपशब्द वापरले. वेंकीनेही चिडून पुढचा चेंडू टाकला. त्या चेंडूवर आमिरचा त्रिफळा उडवला. वेंकीने अपमानाचा बदला घेतला होता. चिडवण्याची वेळ आता वेंकाची होती. पॅव्हिलियनकडे बोट दाखवून 'गपचूप तंबूचा रस्ता धर' असं खुणावत त्याने आमिरला डिवचलं.

त्या प्रसंगानंतर भारतीय संघात एक वेगळाच जोश निर्माण झाला. पाहता पाहता सामन्याची सारी सूत्रं आमच्या हातात आली. प्रसादने आणखी दोन महत्त्वाचे बळी मिळवले. मधल्या काळात मी व अजय जडेजाने आपापली १० षटकं फारशा धाव न देता टाकली. कुंबळेने तीन विकेट्स घेतल्या. जावेद मियांदादच्या देदीप्यमान कारकिर्दीतला तो अखेरचा सामना ठरला. तो ३८ धावांवर धावबाद झाला. रशिद लतिफने मात्र डावाच्या शेवटी जबरदस्त फटकेबाजी करून काही काळ आमच्या तोंडचं पाणी पळवलं होतं. पण अखेरीस आम्ही ३९ धावांनी सामना जिंकलो. देशभर जल्लोष सुरू झाला होता.

आम्ही हॉटेलमध्ये परतत असताना रस्त्यावर लोकांनी एकच गर्दी केली होती. आमच्या बसवर हारांचा व फुलांचा वर्षाव होत होता. हॉटेलातही आमचं नेहमीपेक्षा वेगळंच आदरातिथ्य केलं गेलं. ठरल्यापेक्षा आम्ही बंगळुरूला एक दिवस जास्त राहिलो. दुसऱ्या दिवशी बराच वेळ आम्ही निवांतपणे स्विमिंग पूलमध्ये डुंबत होतो. सर्वांची आमच्याकडे पाहायची दृष्टी बदलली होती. हॉटेलातले कर्मचारी आमची उत्तम बडदास्त ठेवत होते. आमच्यातील एकाने जर कोळंबीची एखादी डिश मागवली तर कोळंबीचे तीन प्रकार समोर येत होते. तेही हॉटेलच्या सौजन्याने. आम्हाला राजेशाही वागणूक मिळत होती. सगळं वातावरण चैतन्याने भारून गेलं होतं. देशातील जनतेचा ऊर आनंदाने व अभिमानाने भरून आला होता.

मनसुबे उधळले

१३ मार्चला आमचा उपांत्य फेरीचा सामना ईडन गार्डन्सला होता. श्रीलंकेचा संघ आमचा प्रतिस्पर्धी होता. मॅचच्या दोन दिवस आधीच आम्ही कोलकात्याला आलो. विमानतळावर उतरताच नजरेला भिडलेली पहिली गोष्ट म्हणजे कडक सुरक्षाव्यवस्था. सर्व बाजूला कमांडोज उभे होते. क्रिकेटशौकिनांना हॉटेलच्या आसपासही फिरकू दिलं जात नव्हतं. तो सामनाही तितकाच महत्त्वाचा होता.

आम्हाला कुणीतरी सांगितलं की, खास ऑस्ट्रेलियाहून मागवलेली माती वापरून ईडन गार्डन्सची खेळपट्टी नव्याने तयार केली आहे. खेळपट्टी पाहून आमचंही मत तसंच झालं होतं. खेळपट्टी चांगलीच कडक व टणक दिसत होती. खरंतर ती हुबेहूब ऑस्ट्रेलियन खेळपट्टीच वाटत होती. त्यामुळे नाणेफेक जिंकलो तर प्रथम क्षेत्ररक्षण स्वीकारायचं यावर सर्वांचं एकमत झालं होतं. शिवाय त्या स्पर्धेत श्रीलंकेने धावांचा पाठलाग करताना बहुतेक सामने जिंकले होते. त्यांची सलामीची जोडी – सनथ जयसूर्या व रोमेश कालुवितरणा – ही त्या वेळी ऐन भरात होती. पहिल्या १५ षटकांत ते तुफान फटकेबाजी करून संघाला भक्कम सुरुवात मिळवून देत. बादफेरी सुरू होण्याआधी श्रीलंका आमच्या गटात होती. गटामधल्या सामन्यात त्यांनी आम्हाला हरवलं होतं. सुरुवातीला त्यांच्या विकेट्स घेऊन त्यांच्यावर दडपण आणणं महत्त्वाचं होतं.

आम्ही नाणेफेक जिंकून श्रीलंकेला फलंदाजी दिली. मॅचची सुरुवात तर आमच्यासाठी स्वप्नवत होती. सनथ एकावर व कालु शून्यावर बाद झाला. दोघांनीही थर्ड मॅनला कट मारण्याच्या नादात आपापल्या विकेट्स गमावल्या होत्या. खेळपट्टी टणक व मजबूत होती या विधानाला त्यामुळे पुष्टी मिळाली होती. पण जेव्हा मी गोलंदाजीला आलो तेव्हा मात्र हादरलोच. आमचा खेळपट्टीबद्दलचा अंदाज साफ चुकला आहे, हे त्याच क्षणी माझ्या लक्षात आलं. चेंडू फलंदाजाच्या अंदाजापेक्षा उशिराने बॅटवर येत होता. तो थांबून आल्यासारखा वाटत होता. खेळपट्टीचा वरचा थर पुरेसा कडक होता. पण त्याखालचा थर

मात्र भुसभुशीत होता. ती खेळपट्टी १०० षटकं टिकू शकेल याचीही खातरी वाटत नव्हती. श्रीलंकेला कमीत कमी धावांत रोखणं आवश्यक होतं. श्रीलंकेने २५१ धावा केल्या. आम्ही त्या धावसंख्येच्या आसपासही पोचू शकलो नाही.

आमची फलंदाजी सुरू झाली तेव्हा खेळपट्टीने आपली करामत दाखवायला सुरुवात केली होती. चेंडू नको तितका वळत होता व थांबून बॅटवर येत होता. बॅटिंग करणं फारच अवघड होऊन गेलं होतं. सलामीला येऊन मी ६५ धावा केल्या. पण मी सनथच्या गोलंदाजीवर अतिशय विचित्र रीतीने बाद झालो. सनथ डावखुरा फिरकी गोलंदाज होता. सनथचा तो चेंडू माझ्या पॅडवर आदळून उजवीकडे घरंगळत गेला. चटकन एकेरी धाव काढता येईल, या विचाराने मी क्रीजच्या बाहेर आलो. पण तो चेंडू यष्टिरक्षक कालुवितरणाच्या पायाशी गेला आहे, हे माझ्या फार उशिरा लक्षात आलं. मी क्रीजमध्ये परतू शकलो नाही. त्याआधीच कालुने बेल्स उडवल्या होत्या. मी बाद झालो आहे, याची मला खातरी होती. तिसऱ्या पंचाच्या निर्णयाची वाट न बघता मी चालू लागलो. पॅव्हिलियनकडे चालताना मी खूपच निराश व खिन्न झालो होतो. पुढे काय होणार याची मला स्पष्ट कल्पना आली होती. माझ्या नंतर येणाऱ्या फलंदाजांना त्या खेळपट्टीवर टिकाव धरणं अवघड जाणार होतं.

माझा अंदाज खरा ठरला. आम्ही भराभर विकेट्स गमावून श्रीलंकेला सामना बहाल केला. भारतीय संघाच्या विजयाच्या अपेक्षेने आलेले प्रेक्षक बिथरले. हाती सापडतील त्या वस्तू फेकून त्यांनी सामन्यात अडथळा आणण्यास सुरुवात केली. पण तोपर्यंत मॅच संपल्यातच जमा होती. विश्वचषक जिंकण्याच्या आमच्या स्वप्नाचा चुराडा झाला होता. ड्रेसिंग रूममध्ये भयाण शांतता पसरली होती.

मैदानावरून हॉटेलपर्यंतचा या वेळचा प्रवास अत्यंत क्लेशदायक होता. हॉटेलवर पोचल्यानंतर सारंच बदलून गेल्याची जाणीव आम्हाला झाली. आमच्या हातून फार मोठा अपराध घडला आहे, असाच भाव सर्वांच्या नजरेत दिसत होता. आम्ही आमच्या चाहत्यांची दारुण निराशा केली होती यात शंकाच नव्हती. पण तो पराभव आम्हाला तर त्यांच्याहून अधिक बोचत होता. ती रात्र सरता सरत नव्हती. पराभवाचा सल काही केल्या मनातून जात नव्हता.

दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही मिळेल त्या विमानाने कोलकात्याच्या बाहेर पडलो. अंतिम सामना पाकिस्तानात खेळला जाणार होता. ऑस्ट्रेलियाने आधीच अंतिम सामन्यात प्रवेश केला होता. आमच्याऐवजी श्रीलंकेचा संघ अंतिम सामना खेळायला पाकिस्तानमध्ये चालला आहे, ही कल्पनाही मनाला सहन होत नव्हती. उपउपांत्य सामन्यात पाकिस्तानला हरवून आम्ही स्पर्धेतला कळस गाठला होता. स्पर्धेमध्ये माझी वैयक्तिक कामगिरी उत्तम झाली होती. स्पर्धेत मी सर्वाधिक ५२३ धावा केल्या होत्या. त्यात दोन शतकं आणि तीन अर्धशतकं होती. पण तो दिलासा पुरेसा नव्हता. ईडन गार्डन्स खेळपट्टीचा आमचा फसलेला अंदाज आम्हाला चांगलाच भोवला होता. केवळ त्या एका कारणामुळे आम्हाला सामना गमवावा लागला होता.

भारतीय क्रिकेटसाठी तो काही चांगला काळ नव्हता. विश्वचषकाचं स्वप्न भंग पावलं होतं. संघाचं मनोधैर्य खूपच खालावलेलं होतं. त्यातून सावरायलाही आमच्यापाशी फारसा वेळ नव्हता. मेअखेरीस इंग्लंडच्या अवघड दौऱ्याला सुरुवात होणार होती. अखेर त्या मालिकेतही आमचा १-० पराभव झाला. पण त्या दौऱ्याने भारतीय क्रिकेटला सौरव गांगुली व राहुल द्रविड हे दोन प्रतिभाशाली खेळाडू मिळवून दिले. त्या मालिकेत मी एजबस्टन व ट्रेंट ब्रिजला शतकं काढली. सौरवने तर पदार्पणातच लॉर्ड्स व ट्रेंट ब्रिजला शतकं झळकवली. पण आमची कामगिरी अपुरी ठरली. पहिलाच सामना गमावल्यानंतर आम्ही पुन्हा त्या मालिकेत पकड मिळवू शकलो नाही. क्रिस लेविस, डॉमिनिक कॉर्क व ॲलन मुलाली या इंग्लंडच्या तीन गोलंदाजांसमोर खेळणं भारतीय फलंदाजांना अवघड गेलं. इंग्लंडचा कर्णधार नासीर हुसेनने अप्रतिम फलंदाजी करून संघाचं उत्तम नेतृत्व केलं.

त्या दौऱ्यातला एक प्रसंग मात्र कायमचा माझ्या लक्षात राहिला आहे. सौरव गांगुली व नवज्योत सिद्धू इंग्लंडमध्ये (भुयारी) ट्यूब रेल्वेने प्रवास करत होते. अचानक एक तरुण मुलांचा घोळका त्यांच्या डब्यात शिरला. ते सर्व जण मद्याच्या नशेत होते. एकाएकी ते सौरव व नवज्योतकडे पाहून विचित्र हावभाव करू लागले. एकाने तर नवज्योतच्या अंगावर बिअरचा कॅन फेकला. नवज्योत भडकला. प्रकरण मारामारीपर्यंत गेलं. सुदैवाने पुढच्या स्टेशनला सर्व जण झोकांड्या देत उतरले. पण

त्यातला एक जण अचानक पुन्हा डब्यात शिरला. त्याने खिशातून पिस्तूल काढून नवज्योतवर रोखलं. सौरवही त्या प्रकाराने घाबरून गेला. सर्वप्रथम त्याने स्वत:चा बचाव करण्याचा प्रयत्न केला. जमिनीवर पालथा पडून त्याने स्वत:चा चेहरा झाकून घेतला; पण नंतर तो उठला. नवज्योतच्या वतीने तो तरुणाची विनवणी करू लागला. त्याच वेळी शिताफीने त्याने सिद्धूला खेचत त्या तरुणापासून दूर नेलं. आज तो प्रसंग आठवला तरी हसू येतं. त्या वेळी मात्र दोघांची काय परिस्थिती झाली असेल, याची कल्पनाही करवत नाही.

इंग्लंडचा निराशाजनक दौरा संपवून आम्ही भारतात परतलो. त्यानंतर भारतीय संघाचं नेतृत्व माझ्यावर सोपवण्यात आलं. तेविसाव्या वर्षी मी भारतीय संघाचा कर्णधार झालो. १९९०पासून नेतृत्वाची धुरा सांभाळणाऱ्या अझरला कर्णधारपद गमवावं लागलं होतं. भारतीय संघाला आता पुन्हा नव्या उमेदीची गरज होती. संघाला लवकरात लवकर विजयपथावर नेण्याची आता माझ्यावर जबाबदारी होती.

विश्वचषक १९९६मधील भारताने खेळलेले सामने

सहावा सामना. कटक. भारत वि केनिया. १८ फेब्रुवारी, १९९६
केनिया १९९-६ (५०/५० षटकं); भारत २०३-३ (४१.५/५० षटकं)
भारत ७ गडी राखून विजयी (४९ चेंडू बाकी)

दहावा सामना. ग्वाल्हेर. भारत वि वेस्ट इंडीज, २१ फेब्रुवारी, १९९६
वेस्ट इंडीज १७३ (५०/५० षटकं); भारत १७४-५ (३९.४/५० षटकं)
भारत ५ गडी राखून विजयी (६२ चेंडू बाकी)

एकोणिसावा सामना. मुंबई. भारत वि ऑस्ट्रेलिया, २७ फेब्रुवारी, १९९६
ऑस्ट्रेलिया २५८ (५०/५० षटकं); भारत २४२ (४८/५० षटकं)
ऑस्ट्रेलिया १६ धावांनी विजयी

चोविसावा सामना. दिल्ली. भारत वि श्रीलंका, २ मार्च, १९९६
भारत २७१-३ (५०/५० षटकं); श्रीलंका २७२-४ (४८/५० षटकं)
श्रीलंका ६ गडी राखून विजयी (८ चेंडू बाकी)

एकोणतिसावा सामना. कानपूर. भारत वि झिंबाब्वे, ६ मार्च, १९९६
भारत २४७-५ (५०/५० षटकं); झिंबाब्वे २०७ (४९.४/५० षटकं)
भारत ४० धावांनी विजयी

दुसरा उपउपांत्य फेरीचा सामना. बंगळुरू. भारत वि पाकिस्तान, ९ मार्च, १९९६
भारत २८७-८ (५०/५० षटकं); पाकिस्तान २४८-९ (४९/४९ षटकं)
भारत ३९ धावांनी विजयी

पहिला उपांत्य फेरीचा सामना. कोलकाता. भारत वि श्रीलंका, १३ मार्च, १९९६
श्रीलंका २५१-८ (५०/५० षटकं); भारत १२०-८ (३४.१/५० षटकं)
श्रीलंका विजयी घोषित

अंतिम सामना. लाहोर. ऑस्ट्रेलिया वि श्रीलंका. १७ मार्च, १९९६
ऑस्ट्रेलिया २४१-७ (५०/५० षटकं); श्रीलंका २४५-३ (४६.२/५० षटकं)

श्रीलंका ७ गडी राखून विजयी (२२ चेंडू बाकी)

भारत-इंग्लंड दौरा १९९६

पहिली कसोटी. बा\मगहॅम – ६ ते ९ जून, १९९६

भारत २१४ (जे श्रीनाथ ५२, **एसआर तेंडुलकर** २४; डी.जी. कॉर्क ४-६१) व २१९ (**एसआर तेंडुलकर** १२२; सीसी लिवस ५-७२)

इंग्लंड ३१३ (एन हुसेन १२८; बीकेव्ही प्रसाद ४-७१, जे श्रीनाथ ४-१०३) व १२१-२ (एमए आथर्टन ५३)*

इंग्लंड ८ गडी राखून विजयी

दुसरी कसोटी. लॉर्ड्स – २० ते २४ जून, १९९६

इंग्लंड ३४४ (आरसी रसेल १२४, जीपी थॉर्प ८९; बीकेव्ही प्रसाद ५-७६) व २७८-९ घोषित (एजे स्ट्युअर्ट ६६; ए कुंबळे ३-९०)

भारत ४२९ (एससी गांगुली १३१, आर द्रविड ९५, **एसआर तेंडुलकर** ३१; एडी मुलाली ३-७१)

सामना अनिर्णित

तिसरी कसोटी. नॉटिंगहॅम – ४ ते ९ जुलै, १९९६

भारत ५२१ (**एसआर तेंडुलकर** १७७, एससी गांगुली १३६, आर द्रविड ८४; सीसीलेविस ३-८९) व २११ (**एसआर तेंडुलकर** ७४, एससी गांगुली ४८, एनआर मोंगिया ४५; एमए इलहॅम ४-२१)

इंग्लंड ५६४ (एमए आथर्टन १६०, एन हुसेन १०७, एमए इलहॅम ५१, एजे स्ट्युअर्ट ५०; एससी गांगुली ३-७१)

सामना अनिर्णित

इंग्लंड मालिकेत १-० विजयी

८.
कर्णधारपदाची पहिली वेळ

भारतीय संघाचं नेतृत्व करण्याची संधी मिळणं हा फार मोठा सन्मान आहे, यात शंकाच नाही. माझ्या क्रिकेटप्रवासाच्या त्या टप्प्यावर कर्णधारपदाची जबाबदारी स्वीकारायला मीही मनापासून तयार होतो. मी मुंबई संघाचं नेतृत्व केलं होतं. मी कर्णधार असताना मुंबईने १९९५-९६मध्ये रणजी करंडक जिंकला होता. एकूण ३८ रणजी करंडक सामने मी खेळलो; त्यापैकी १६ सामन्यांत मी कप्तान होतो. त्या १६ सामन्यांत मी ९९.५३च्या सरासरीने धावा काढल्या होत्या. याचा अर्थ कप्तानपदाच्या जबाबदारीचा माझ्या बॅटिंगवर विपरीत परिणाम झाला नव्हता. दुलिप करंडक स्पर्धेतही मी पश्चिम विभागाचं नेतृत्व केलं होतं. एकूणच, कर्णधारपद हा काही माझ्यासाठी नवा अनुभव नव्हता; पण भारतीय संघाचं कर्णधारपद भूषवण्यात मात्र खूप मोठा व मूलभूत फरक होता. आजपर्यंत कधीही न अनुभवलेल्या आव्हानांना मला सामोरं जावं लागणार होतं.

प्रसारमाध्यमं हे माझ्या समोरचं पहिलं आव्हान होतं. प्रसारमाध्यमांच्या अखंड व अवास्तव मागण्यांशी जुळवून घेणं ही फारच कठीण गोष्ट असते. भारतीय कर्णधाराने उचललेलं प्रत्येक पाऊल ही माध्यमांसाठी महत्त्वाची बातमी असते. त्यामुळे माध्यमांच्या प्रकाशझोतापासून स्वत:चा बचाव करणं हे माझ्यासाठी सोपं काम नव्हतं. कप्तानासमोर दुसरं आव्हान असतं ते निवडसमितीचं. निवडसमितीशी नेमके कसे संबंध राखावेत, हाही कर्णधारासाठी एक शिकण्याचा भाग असतो. कारण भारतीय संघाच्या निवडीत विभागीय प्रतिनिधित्व हा कळीचा मुद्दा असतो.

आपल्या निवडसमितीत एकूण पाच सदस्य असतात. प्रत्येक सदस्य हा भारतातील एकेका विभागाचं प्रतिनिधित्व करत असतो. पश्चिम, उत्तर, दक्षिण, पूर्व व मध्य असे हे पाच विभाग आहेत. आपल्या विभागातील खेळाडूची निवड व्हावी म्हणून प्रत्येक सदस्य नेटाने प्रयत्न करत असतो. माझ्या कर्णधारपदाच्या कारकिर्दीत हा विभागीय समतोल राखताना संघाचं मात्र अतोनात नुकसान झालं. मी निवडलेला संघ मला अनेकदा दिला जात नसे. मला हव्या असलेल्या खेळाडूंना डावललं जायचं. मला विभागवार निवडीमध्ये कधीच स्वारस्य नव्हतं. उत्कृष्ट भारतीय संघ निवडणं हाच माझा एकमेव उद्देश असायचा; पण निवडसमितीतल्या काही सदस्यांचे विचार मात्र माझ्यापेक्षा वेगळे होते. भारतीय संघ निवडताना निराळेच निकष लावले व लादले जात आहेत, असं माझ्या लक्षात येऊ लागलं. निवडसमितीची बैठक आटोपल्यावर काही वेळा मी अत्यंत निराश मनाने तिथून बाहेर पडल्याचं मला आठवतं.

आशादायक सुरुवात

ऑक्टोबर, १९९६मध्ये आस्ट्रेलियाविरुद्ध मी कर्णधार म्हणून पहिली कसोटी खेळलो. दिल्लीच्या कोटला मैदानावर तो सामना होता. इंग्लंड मालिकेतल्या पराभवानंतर आमची क्षमता पुन्हा सिद्ध करण्यासाठी आम्ही उत्सुक होतो. घरच्या मैदानावर आजपर्यंत आम्ही कौतुकास्पद कामगिरी केली होती. दिल्लीचा कसोटी सामना जिंकून आम्हाला ती यशस्वी परंपरा कायम ठेवायची होती. आमचं उद्दिष्ट सफल झालं. कोटलावरील विजयात यष्टिरक्षक नयन मोंगियाच्या १५२ धावांचा महत्त्वाचा वाटा होता. प्रसंगी तो सलामीला येऊनही बॅटिंग करत असे. पहिलीच कसोटी जिंकून माझ्या कर्णधारपदाच्या कारकिर्दीची सुरुवात झकास झाली होती.

आस्ट्रेलियन संघ ती एकमेव कसोटी खेळण्यासाठी भारतात आला होता. सहसा असं घडत नाही; पण त्या सामन्याला विशेष महत्त्व होतं. 'बॉर्डर-गावसकर करंडक' मालिकेच्या शुभारंभाचा तो सामना होता. ॲलन बॉर्डर व सुनील गावसकर या

दोन महान खेळाडूंची नावं या करंडकाला दिली होती. यापुढील भारत-आस्ट्रेलियामधील सर्व कसोटी मालिका याच नावाने ओळखल्या जाणार होत्या. ती एका कसोटीची मालिका खेळण्यामागे निदान सबळ कारण तरी होतं; पण अनेकदा आम्ही केलेल्या छोट्या परदेश दौऱ्यामागची कारणं आम्हाला कधी कळली नाहीत. एकदा केवळ एक कसोटी सामना व चार एकदिवसीय सामने खेळण्यासाठी आम्ही न्यूझीलंडला गेलो होतो. एकही सराव सामना नव्हता. त्याला दौरा का म्हणायचं, हा प्रश्नच होता. माझ्या कारकिर्दीत मी दोन कसोटी सामन्यांच्या मालिकाही बऱ्याचदा खेळलो. त्या मालिकेतून हाती काहीच यायचं नाही. काही कळायच्या आत त्या मालिका संपलेल्याही असायच्या.

पुढची कसोटी मालिका दक्षिण आफ्रिकेविरुद्ध होती. त्याआधी आम्हाला ‘टायटन कप’ स्पर्धेत खेळायचं होतं. स्पर्धेत भारत, आस्ट्रेलिया व दक्षिण आफ्रिका असे तीन संघ होते. आस्ट्रेलिया व दक्षिण आफ्रिका या दोन मातब्बर संघांना हरवून आम्ही त्या स्पर्धेचं विजेतेपद पटकावलं. ती निश्चितच गौरवास्पद कामगिरी होती. अंतिम सामना ६ नोव्हेंबरला दक्षिण आफ्रिकेविरुद्ध मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर होता. आमचा पहिला डाव २२० धावांत आटोपला. त्यात मी ६७ व अजय जडेजाने ४३ धावा केल्या. अनिल कुंबळेने चार गडी बाद करत दक्षिण आफ्रिकेला १८५ धावांत गुंडाळलं. आम्ही ३५ धावांनी सामना जिंकलो. विश्वचषक स्पर्धेत श्रीलंकेविरुद्ध झालेला मानहानीकारक पराभव अजूनही मनाला झोंबत होता. त्या पार्श्वभूमीवर टायटन स्पर्धेचं विजेतेपद निश्चितच सुखावणारं होतं. कर्णधार म्हणून मी त्या स्पर्धेत खूपच नवनवीन प्रयोग केले होते. त्यामुळे माझा आनंद द्विगुणित झाला होता.

त्या सामन्यात मी नेहमीप्रमाणे प्रथम श्रीनाथ व वेंकटेश प्रसादला सलामीची गोलंदाजी दिली. त्यानंतर अनिल कुंबळेने झटपट दोन गडी बाद केले. मग मी रॉबिन सिंगच्या हातात चेंडू सोपवला. रॉबिन अष्टपैलू खेळाडू होता. तो पाचव्या गोलंदाजाची उणीव भरून काढत असे. रॉबिन मध्यमगती गोलंदाज होता. शिवाय तो अगदी अचूक टप्प्यावर गोलंदाजी करत असे. रॉबिनसाठी मी ऑफ साइडला चार व ऑन साइडला पाच क्षेत्ररक्षक ठेवले. एकदिवसीय सामन्यात क्षेत्ररचनेचा तो मी केलेला नवा प्रयोग होता. मी डीप पॉइंटची जागा मोकळी ठेवली होती. त्याऐवजी शॉर्ट पॉइंट, लाँग ऑफ व थर्ड मॅनला क्षेत्ररक्षक ठेवले होते. ऑन साइडला मी फाइन लेग, शॉर्ट स्क्वेअर लेग, शॉर्ट मिड विकेट, डीप स्क्वेअर लेग व लाँग ऑनला पाच जण ठेवले होते. रॉबिनला मी अगदी सरळ रेषेत बोलिंग करायला सांगितली. ऑफ स्टम्पच्या बाहेर चेंडू टाकू नकोस, असंही त्याला बजावलं. नाहीतर दक्षिण आफ्रिकेच्या फलंदाजांनी थर्ड मॅनला चेंडू खेळून एकेरी धावा काढल्या असत्या. दक्षिण आफ्रिकेसमोर फार मोठं लक्ष्य नव्हतं. प्रत्येक षटकात त्यांना तीन-चार एकेरी धावा मिळाल्या असत्या तरी त्यांच्यावरचं दडपण कमी झालं असतं. रॉबिनने लेग स्टम्पवर गोलंदाजी केली असती तरी मला चालण्यासारखी होती. फक्त काही झालं तरी चेंडू ऑफ स्टम्पच्या बाहेर पडायला नको होता. दक्षिण आफ्रिका या डावपेचांमुळे गोंधळून जाणार याची मला खातरी होती. रॉबिनने छान गोलंदाजी केली. १० षटकांत त्याने फक्त ४० धावा दिल्या. शिवाय हॅन्सी क्रोनिए व डॅरिल कलिननचे महत्त्वपूर्ण बळीही त्याने मिळवले.

टायटन कपनंतर दक्षिण आफ्रिकेविरुद्ध होणारी कसोटी मालिका चुरशीने खेळली जाणार, याची सर्वांनाच खातरी होती. त्या वेळी दक्षिण आफ्रिकेच्या संघाने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये आपला दबदबा निर्माण केला होता. ॲलन डोनाल्ड, फॅनी डिव्हिलियर्ससारखे तुफानी गोलंदाज आणि क्रोनिए, गॅरी कर्स्टन, डॅरिल कलिनन व जाँटी ऱ्होड्ससारखे खंदे फलंदाज त्यांच्यापाशी होते. २० नोव्हेंबरला पहिली कसोटी अहमदाबादला सुरू झाली. तो सामना चांगलाच रंगला. सामन्याचा नूर क्षणाक्षणाला पालटत होता. आम्ही पहिल्या डावात २२३ धावा काढल्या. त्यानंतर दक्षिण आफ्रिकेने फलंदाजी करून २१ धावांची आघाडी घेतली. ती छोटीशी आघीडीही महत्त्वाची ठरणार होती. कारण अहमदाबादच्या खेळपट्टीवर फारशा धावा होत नव्हत्या. आमचा दुसरा डावही कोसळला. दक्षिण आफ्रिकेपुढे आम्ही केवळ १७० धावांचं लक्ष्य ठेवू शकलो.

पण आम्ही निराश झालो नव्हतो. सामन्याला अजूनही कलाटणी मिळण्याची आम्हाला आशा होती. तीन दिवसांच्या वापरानंतर खेळपट्टी खराब होऊ लागली होती. दक्षिण आफ्रिकेला १७० धावा काढणं अवघड जाणार आहे, असा आमचा अंदाज होता. सुनील जोशी हा ऑफ स्पिनर आणि अनिल कुंबळे व नरेंद्र हिरवाणी हे दोन लेग स्पिनर्स आमच्याकडे होते.

वेगाने खराब होत चाललेल्या त्या खेळपट्टीवर मी तिघांच्या फिरकीचा मारा करेन, असं दक्षिण आफ्रिकेला वाटलं होतं. पण मी श्रीनाथच्या हाती चेंडू देऊन त्यांना धक्का दिला. श्रीनाथच्या वेगामुळे चेंडू रिव्हर्सस्विंग होण्याची शक्यता मला वाटत होती. वेगाने स्विंग होणारा चेंडू खेळणं नेहमीच अवघड असतं. श्रीनाथने कमाल केली. त्याने आम्हाला स्वप्नवत सुरुवात करून दिली. दक्षिण आफ्रिकेचे पहिले दोन गडी शून्यावर बाद झाले होते.

श्रीनाथला थोडीशी विश्रांती देऊन मी पुन्हा थोड्या वेळाने त्याच्याकडे चेंडू सोपवला. त्याच्याशी सतत बोलून तो दमलेला नाही ना, याची मी पुन्हा पुन्हा खातरी करून घेत होतो. श्रीनाथच्या तुफानी बोलिंगसमोर दक्षिण आफ्रिकेच्या फलंदाजांना उभं राहणं मुश्कील झालं. दुसऱ्या बाजूने मी सुनील जोशीला गोलंदाजीसाठी बोलावलं. त्यामागे धावा रोखण्याचा माझा मुख्य हेतू होता. डावखुऱ्या फलंदाजांच्या ऑफ स्टम्प बाहेरचा भाग खूपच खराब झाला होता. सुनीलला मी त्या टप्प्यावर बोलिंग करायला सांगितलं. सुनीलने डावखुऱ्या फलंदाजांना एका बाजूने जखडून ठेवलं. त्यामुळे श्रीनाथला उजव्या हाताने खेळणाऱ्या फलंदाजांवर रिव्हर्स स्विंगचा मारा करता आला. उजव्या हाताने खेळणाऱ्या फलंदाजांना रिव्हर्सस्विंग खेळणं नेहमीच कठीण जातं. हा डावपेच कमालीचा यशस्वी ठरला. एका बाजूने सुनीलने धावा रोखल्या. दुसऱ्या बाजूने श्रीनाथ ठरावीक अंतराने विकेट्स मिळवत होता.

दक्षिण आफ्रिकेला १७० धावांचा पाठलाग करताना एकदाही सामन्यावर वर्चस्व मिळवता आलं नाही. उलट आम्हीच त्यांना सतत दडपणाखाली ठेवलं. केवळ ३९ षटकांत त्यांचे सर्व खेळाडू १०५ धावा काढून बाद झाले. आम्ही सनसनाटी विजय मिळवला. माझ्या कर्णधारपदाच्या कारकिर्दीतील तो सर्वोच्च क्षण होता. एका बाजूने सतत श्रीनाथला गोलंदाजी द्यायची माझी योजना यशस्वी ठरली होती. 'आम्हाला तू बेसावध पकडलंस', अशी क्रोनिएने नंतर माझ्यापाशी कबुलीही दिली. मी स्पिनर्सचा मारा करेन, असा त्यांचा अंदाज होता. श्रीनाथच्या रिव्हर्स स्विगंचा त्याने काहीच विचार केला नव्हता. श्रीनाथच्या गोलंदाजीचा अंदाज येईपर्यंत त्यांच्या हातून मॅच गेली होती.

त्या सामन्यात मी आणखीही एक प्रयोग केला. त्या प्रयोगाचा भारताला त्यानंतर किमान १५ वर्षं तरी फायदा झाला. त्या मॅचमध्ये मी राहुल द्रविडला तिसऱ्या क्रमांकावर व सौरव गांगुलीला पाचव्या क्रमांकावर फलंदाजीला पाठवलं. मी अचानक असा का निर्णय घेतला, याचं त्या वेळी अनेकांना आश्चर्य वाटलं होतं. कारण राहुल व सौरवने आपल्या कारकिर्दीची सुरुवात नेमकी उलटी केली होती. सौरव तिसऱ्या क्रमांकावर यायचा तर राहुल पाचव्या क्रमांकावर खेळायचा. सौरवने पदार्पणातच इंग्लंडमध्ये तिसऱ्या क्रमांकावर खेळून लागोपाठ दोन शतकं ठोकली होती. दिल्लीलाही तो आस्ट्रेलियाविरुद्ध पुन्हा त्याच क्रमांकावर खेळला होता. त्याचा तो तिसरा कसोटी सामना होता व कर्णधार म्हणून माझा पहिला. त्या सामन्यातही सौरवने पहिल्या डावात ६६ तर दुसऱ्या डावात नाबाद २१ धावा काढल्या होत्या. साहजिकच, तोही तिसऱ्या क्रमांकावरच खेळायला उत्सुक होता. राहुलनेही पाचव्या क्रमांकावर येऊन इंग्लंडमधल्या त्याच्या पहिल्या दोन कसोटी सामन्यांत अर्धशतकं काढली होती. असे असूनही मी दोघांचे क्रमांक बदलायचं ठरवलं. मी खूप विचार करून तो निर्णय घेतला होता. दोघांच्याही क्षमता मी निरखल्या होत्या. त्या क्षमतांचा अधिक चांगला वापर करून घेण्यासाठी मी तो निर्णय घेतला होता. आनंदाची गोष्ट म्हणजे दोघांनाही त्या निर्णयाचा दीर्घकालीन फायदा झाला.

सौरवच्या खेळात नेहमीच चौकारांची बरसात असायची. डावाच्या सुरुवातीपासूनच त्याला आक्रमक फटके मारायला आवडत. त्याची फलंदाजी आकर्षक व आक्रमक असायची. माझ्या मते त्याची ही शैली पाचव्या क्रमांकावर येणाऱ्या फलंदाजासाठी अधिक योग्य होती. याविरुद्ध राहुल मात्र डावाच्या सुरुवातीला स्वत:च्या मर्यादेत राहून खेळायचा. ऑफ स्टम्पच्या बाहेर पडणारे अनेक चेंडू शांतपणे सोडून द्यायचा संयम त्याच्यापाशी होता. तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजी करणाऱ्यापाशी हा गुण असणं आवश्यक होतं. दोघंही प्रतिभाशाली खेळाडू होते. दोघांची बलस्थानं वेगवेगळी होती; पण ते दोघंही भारतासाठी बरीच वर्षं खेळू शकतील याची मला खातरी होती. राहुलला तिसऱ्या क्रमांकावर व सौरवला पाचव्या क्रमांकावर पाठवल्याने संघाचा समतोलही राखला जाईल असं माझं मत होतं. परदेशी वातावरणात तर हा निर्णय अधिक योग्य ठरला असता. त्या मालिकेतल्या तिसऱ्या कसोटीत व त्यानंतर दक्षिण आफ्रिकेत झालेल्या पहिल्या दोन कसोटी सामन्यांमध्ये

मात्र मी माझा निर्णय फिरवला. त्या तीनही सामन्यांमध्ये मी सौरवला तिसऱ्या व राहुलला पाचव्या क्रमांकावर फलंदाजीसाठी पाठवलं. मात्र जानेवारी, १९९७मध्ये जोहान्सबर्गला झालेल्या तिसऱ्या कसोटीत मी माझा प्रयोग पुन्हा केला. तो प्रयोग चांगलाच यशस्वी ठरला. दोघांनीही भारतासाठी त्याच क्रमांकावर कित्येक वर्षं फलंदाजी केली.

अहमदाबादनंतरची दुसरी कसोटी नोव्हेंबर, १९९६मध्ये ईडन गार्डन्सवर झाली. त्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेने आमचा सहज पराभव केला. लान्स क्लुसनरने पदार्पणात आठ विकेट्स घेतल्या. गॅरी कर्स्टनने दोन्ही डावांत शतकं काढली. गॅरी दक्षिण आफ्रिकेचा यशस्वी सलामीचा फलंदाज होता. तो सातत्याने भरपूर धावा काढत असे. एकेरी धावा घेण्यात त्याच्याइतका पटाईत असलेला दुसरा फलंदाज मी पाहिलेला नाही. मिड विकेट व स्क्वेअर लेग यांमधल्या मोकळ्या जागेत हळूच चेंडू तटवून तो हवी तेव्हा एक धाव घेत असे. त्यामुळे गॅरीला रोखणं अवघड जाई. तो कट्टर लढवय्या होता. एक तुल्यबळ प्रतिस्पर्धी म्हणून गॅरीबद्दल मला कायम आदर वाटत आला आहे.

तिसरी कसोटी कानपूरला होती. मालिकेत १-१ बरोबरी झाली होती. सामन्याच्या दुसऱ्या डावात अझरची फलंदाजी बहरली. त्याने नाबाद १६३ धावा काढल्या. दक्षिण आफ्रिकेला विजयासाठी ४६० धावांची गरज होती; पण ते फक्त १८० धावा करू शकले. आम्ही २८० धावांनी त्यांचा दणदणीत पराभव केला. माझ्या नेतृत्वाखाली भारतीय संघाने आस्ट्रेलिया व दक्षिण आफ्रिकेसारख्या बलाढ्य देशांना हरवलं. माझ्या कर्णधारपदाच्या कारकिर्दीची सुरुवात स्वप्नवत झाली होती. डिसेंबर, १९९६मध्ये आम्ही पुन्हा दक्षिण आफ्रिकेच्या दौऱ्यावर गेलो, तेव्हा आमचा आत्मविश्वास चांगलाच उंचावला होता.

भारताचा दक्षिण आफ्रिका दौरा, डिसेंबर १९९६ ते फेब्रुवारी १९९७

आमच्या या दौऱ्याची आखणी ढिसाळपणे करण्यात आली होती.

१९ डिसेंबरला आम्ही दक्षिण आफ्रिकेत पोचलो. आम्हाला जेमतेम एक सराव सामना खेळायला मिळाला. त्यानंतर लगेच बॉक्सिंग डेला म्हणजे २६ डिसेंबरला पहिली कसोटी होती. अशा कठीण दौऱ्यात किमान दोन किंवा तीन सराव सामन्यांची आवश्यकता असते. नवीन वातावरणाशी जुळवून घेण्यासाठी दोन आठवडे तरी जावे लागतात. भारतातल्या व तिथल्या हवामानात कमालीचा फरक आहे. चेंडूच्या 'सीम मूव्हमेंट'चा अंदाज यायलाही खेळाडूंना तेवढाच वेळ लागतो. भारतात खेळताना गोलंदाजांचे जे चेंडू बॅटच्या खालच्या भागावर येतात, त्याच टप्प्यावर टाकलेले चेंडू दक्षिण आफ्रिकेत उसळून बॅटच्या हँडलच्या उंचीपर्यंत येतात.

डर्बनच्या पहिल्या कसोटीत आमचा दारुण पराभव झाला. दक्षिण आफ्रिकेच्या तुफानी गोलंदाजीसमोर दुसऱ्या डावात आम्ही फक्त ३४ षटकं खेळू शकलो. त्यांनी आम्हाला ६६ धावांत गुंडाळलं. इतका लाजिरवाणा पराभव मी त्यापूर्वी कधीही अनुभवला नव्हता. गोलंदाजी, फलंदाजी व क्षेत्ररक्षण अशा तिन्ही बाबतीत दक्षिण आफ्रिकेचा संघ आमच्यापेक्षा सरस ठरला होता. दुसरी कसोटी केप टाउनला होती. आम्हाला खूप मेहनत घ्यावी लागणार होती.

माझ्यासमोर अनेक अडचणी होत्या. मी स्वत: जायबंदी झाल्यामुळे माझ्या अडचणीत आणखी भर पडली होती. डर्बन कसोटीत गोलंदाजी करताना मला दुखापत झाली होती. पहिल्याच दिवशी उपाहाराच्या आधीचं षटक मी टाकायचं ठरवलं. अँड्र्यू हडसनला चकवण्याचा माझा बेत होता. संथ गतीने धावत येऊन मी त्याला अनपेक्षितपणे एक बाउन्सर टाकणार होतो. चेंडू बॅटच्या वरच्या कडेला लागून झेल उडेल अशी माझी अपेक्षा होती; पण बाउन्सर टाकताना माझ्या पायाचा स्नायू दुखावला. वेदना इतक्या तीव्र होत्या की, मला हॉस्पिटलमध्ये जाऊन तीन कॉर्टिझोन इंजेक्शन्स घ्यावी लागली. मी मैदानात परतलो; पण पायाचा दुखरेपणा कमी झाला नव्हता. मी पळू किंवा वाकू शकत नव्हतो.

दुसरी कसोटी २ जानेवारी, १९९७ला सुरू होणार होती. आमच्यापाशी फारच कमी अवधी होता. संघाला सावरणं जेवढं गरजेचं होतं, तेवढीच संघाची पुनर्बांधणी करणंही आवश्यक होतं. नामुश्कीच्या पराभवानंतर दक्षिण आफ्रिकेच्या संघाला पुन्हा सामोरं जाणं सोपं नव्हतं. ॲलन डोनाल्ड व शॉन पोलॉक हे जगातील दोन सर्वोत्कृष्ट गोलंदाज त्यांच्यापाशी होते. दोघंही वातावरणाचा पुरेपूर फायदा उठवत. दोघांची गोलंदाजी परस्परपूरक होती. डोनाल्ड वेगावर जास्त भर देत असे. पोलॉकने चेंडू

स्विंग करण्याच्या कलेत प्रभुत्व मिळवलं होतं. तो दोन्ही बाजूंनी अतिशय लीलया चेंडू स्विंग करू शकत असे. केप टाउनच्या कसोटीत आम्ही दोघांचा थोडा तरी प्रतिकार करण्यात यशस्वी ठरलो. पहिल्या डावात अझरने व मी शतकं झळकवली.

दुसऱ्या दिवसाचा खेळ संपण्याच्या थोडा वेळ आधी मी फलंदाजीला उतरलो व नाबाद राहिलो. दिवसअखेर आमच्या ३ बाद २९ धावा झाल्या होत्या. दुसऱ्या दिवशी सकाळी खेळ सुरू होण्याआधी मी नेट्समध्ये आपटून टाकलेले चेंडू (थ्रो-डाउन्स) खेळण्याचा सराव करत होतो. त्यातले काही चेंडू मी 'बॅक अँड अॅक्रॉस' (आधी थोडं मागे जाऊन, मग उजवा पाय ऑफ स्टम्पच्या समोर आणत) जात खेळलो. तसं खेळताना मला खूप सोपं गेलं. चेंडूही बॅटवर चांगला बसत होता. अचानक वाटलं की, आज दिवसभर खेळताना हेच तंत्र वापरावं. मी तेच केलं. खेळताना माझ्या लक्षात आलं की, ताशी १५० कि.मी. वेगाने टाकलेला चेंडू खेळण्यासाठीही माझ्यापाशी भरपूर वेळ राहतो आहे.

मी बॅटिंग करताना नेहमी लेग स्टम्पच्या किंचित बाहेर उभा राहायचो. केप टाउनला मी लेग स्टम्पच्या आणखी बराच बाहेर उभा राहिलो. त्यामुळे चेंडू खेळताना मला हवी तशी हालचाल करणं सोपं गेलं. त्या डावात मी १६९ धावा काढल्या. माझं असं निरीक्षण आहे की, क्रिकेटचं एखादं तंत्र आत्मसात करण्यापूर्वी, आधी ते माझ्या बुद्धीला नीट पटावं लागतं. तंत्राबद्दल स्वत:चीच जर खातरी पटली नाही, तर तंत्र जमत नाही म्हणून उगाच हताश होण्यात काही अर्थ नसतो.

केप टाउन कसोटीत घडलेला आणखी एक प्रसंग मला आठवतो. अॅलन डोनाल्ड व आमचा द्रुतगती गोलंदाज डोड्डा गणेश यांच्यात तो मजेशीर प्रसंग घडला होता. त्या मालिकेत डोनाल्ड भलताच फॉर्ममध्ये होता; पण तळाच्या फलंदाजांना झटपट बाद करता आलं नाही तर त्याची खूप चिडचिड होत असे. डोड्डा गणेशच्या बाबतीत नेमकं तेच घडलं. डोनाल्डच्या तुफानी माऱ्याला डोड्डाने न घाबरता तोंड दिलं. डोनाल्ड चिडून त्याला वाट्टेल तसं बोलू लागला. डोनाल्डचे नंतरचे तीन चेंडू खेळताना डोड्डाची गाळण उडाली; पण सुदैवाने तो बचावला. षटक संपल्यावर डोनाल्ड त्याच्यापाशी गेला. डोड्डावर त्याने पुन्हा भरपूर तोंडसुख घेतलं. डोड्डाचा चेहरा मात्र निर्विकार होता.

दुसऱ्या बाजूने मी हे सर्व पाहत होतो. अॅलन आपली कॅप घ्यायला पंचाजवळ आला. मी त्याला म्हटलं, ''अॅलन, डोड्डाला फक्त एकच भाषा कळते. ती म्हणजे कन्नड भाषा. भारताच्या एका प्रांतात ती बोलली जाते. मलाच डोड्डाशी नीट बोलता येत नाही. तू इंग्लिशमध्ये दिलेल्या शिव्या त्याला कशा समजणार? तुला जर त्याचा अपमान करायचा असेल, तर त्याच्याशी कन्नडमध्ये बोल.'' माझ्या बोलण्यामुळे अॅलन आणखीनच भडकला. पंचांच्या हातून त्याने कॅप हिसकावून घेतली. विचित्र हातवारे करत तो आपल्या क्षेत्ररक्षणाच्या जागी वैतागत निघून गेला.

दोन कसोटी सामने संपले होते. खेळाडूही आता तिथल्या वातावरणात छान रुळले होते. संघासाठी ते नक्कीच एक सुचिन्ह होतं. तिसरी कसोटी जोहान्सबर्गला होती. मालिका आम्ही आधीच हरलो होतो; पण तरीही तिसऱ्या कसोटीमध्ये आम्हाला दक्षिण आफ्रिकेला नमवायचं होतं. त्या सामन्यात आम्ही सुरुवातीपासूनच दर्जेदार खेळ केला. मालिकेत प्रथमच तिसऱ्या क्रमांकावर येऊन राहुल द्रविडने शानदार शतक ठोकलं. त्याने द्रुतगती गोलंदाजी छान खेळून काढली. शेवटपर्यंत चेंडूवर नजर ठेवून तो अखेरच्या क्षणी शॉट्स मारत असे. त्याच्या शतकामुळे आमची स्थिती बळकट झाली. सौरवनेही पाचव्या क्रमांकावर अतिशय सुरेख बॅटिंग केली. पहिल्या डावात आमच्या ४१० धावा झाल्या. मालिकेत प्रथमच आम्ही दक्षिण आफ्रिकेवर दडपण आणण्यात यशस्वी झालो होतो. नंतर गोलंदाजांनीही चांगली कामगिरी बजावत आम्हाला आघाडी मिळवून दिली.

दुसऱ्या डावातही राहुल व सौरव चांगले खेळले. विजयाच्या अंधूक आशा निर्माण झाल्या. संघात चैतन्याचं वातावरण पसरलं. आमच्या गोलंदाजांसमोर दक्षिण आफ्रिकेची आघाडीची फळी कोसळली. त्यानंतर आठव्या विकेटसाठी डॅरिल कलिनन आणि लान्स क्लुसनर यांची जोडी जमली; पण विजय आमच्या आवाक्यात आला होता. दोघांपैकी फक्त एकाची विकेट मिळवायचा प्रश्न होता.

अखेर आम्हाला क्लुसनरचा बळी मिळाला. जिंकण्यासाठी आता फक्त दोन विकेट्स हव्या होत्या. पण दैवाच्या मनात काही वेगळच होतं. अचानक आकाश भरून आलं. पाहता पाहता मुसळधार पाऊस कोसळू लागला. मॅच हातातून निसटली

आहे, हे आम्हाला कळून चुकलं होतं. दक्षिण आफ्रिकेला त्यांच्याच देशात हरवण्याची सुवर्णसंधी आम्हाला गमवावी लागली.

मी सुन्न होऊन गेलो. जिंकण्यासाठी आम्ही शर्थ केली होती, पण पावसाबरोबर आमचं स्वप्नही वाहून गेलं होतं. निसर्ग आमची क्रूर थट्टा करतो आहे, असं त्या क्षणी मला वाटलं. पाऊस थांबल्या थांबल्या मी पंचांपाशी गेलो. मैदान थोडं ओलं असलं तरी मी खेळायची तयारी दर्शवली; पण खेळ सुरू करण्याचा निर्णय त्यांच्या हातात होता. पंचांनी नकार दिला. दक्षिण आफ्रिकेने मालिका २-० जिंकली. खरा निकाल २-१ असा हवा होता. मी हताश झालो होतो. निराशेच्या भरात मी बाथरूममध्ये स्वत:ला बंद करून भरपूर रडून घेतलं.

त्या सामन्यात निराशेचा आणखी एक क्षण मी अनुभवला. व्हीव्हीएस लक्ष्मणच्या हाताचं बोट फ्रॅक्चर झालं होतं. लक्ष्मण त्या वेळी नवोदित खेळाडू होता. ड्रेसिंग रूमच्या एका कोपऱ्यात तो मान खाली घालून बसला होता. त्याला भारतात परतावं लागणार होतं. मी त्याच्याजवळ गेलो. त्याचे डोळे पाण्याने भरले होते. मी त्याचं सांत्वन करण्याचा प्रयत्न केला. त्याला म्हटलं, ''खेळताना दुखापती तर होणारच, पण तू मुळीच चिंता करू नकोस. भारताकडून तू बरीच वर्षं खेळणार आहेस.'' मी सहज बोलून गेलो, पण ती भविष्यवाणी खरी ठरली.

भारताचा वेस्ट इंडीज दौरा, मार्च-एप्रिल, १९९७

भारताने १९७१ सालानंतर कॅरिबियनमध्ये कसोटी मालिका जिंकली नव्हती. माझ्यासाठी ती एक मोठी संधी होती. दक्षिण आफ्रिकेतलं अपयश मला पुसून टाकायचं होतं. दक्षिण आफ्रिकेपेक्षा इथलं हवामान पुन्हा आणखीनच वेगळं होतं. या वातावरणाशी आम्हाला लवकरात लवकर जुळवून घेणं भाग होतं. पण आमची तयारी सुरू असताना आम्हाला एक मोठा धक्का बसला. श्रीनाथला दौरा सोडून परत जावं लागणार होतं. लवकरात लवकर त्याच्या खांद्यावर शस्त्रक्रिया करणं गरजेचं होतं. श्रीनाथच्या बदली मुंबईचा उंच द्रुतगती गोलंदाज ॲबी कुरुविल्लाची निवड झाली. ॲबीने दौऱ्यात छान कामगिरी करत आपली निवड सार्थ ठरवली; पण मला मात्र आधी दक्षिण आफ्रिकेत व नंतर वेस्ट इंडीजमध्ये गोलंदाजांच्या बाबतीत अतिशय गंभीर समस्यांना तोंड द्यावं लागलं.

अशा दौऱ्यांमध्ये तीन दर्जेदार द्रुतगती गोलंदाजांची अत्यंत गरज असते, पण दोन्ही दौऱ्यांत माझ्यापाशी फक्त दोनच द्रुतगती गोलंदाज होते. दक्षिण आफ्रिकेच्या दौऱ्यात ॲबी कुरुविल्लाची भारतीय संघातच निवड झाली नव्हती. मी ॲबीसाठी आग्रह धरला होता, पण निवडसमितीने त्याला वगळलं होतं. ॲबीने १९९१मध्ये रणजीमध्ये पदार्पण केलं. पाच वर्षं तो सातत्याने प्रथम दर्जाचे सामने खेळला होता. दक्षिण आफ्रिकेत तो खूपच उपयुक्त ठरला असता. कारण त्या दौऱ्यात श्रीनाथ व प्रसाद हे नेहमी सुरुवातीला सुंदर गोलंदाजी करून प्रतिस्पर्धी फलंदाजांना दडपणाखाली ठेवत. परंतु तिसऱ्या चांगल्या गोलंदाजाच्या अभावी मिळवलेली पकड अधिक घट्ट करण्यात आम्हाला अपयश येई. वेस्ट इंडीजमध्येही श्रीनाथ नसल्यामुळे आम्हाला तिसऱ्या दर्जेदार द्रुतगती गोलंदाजाची उणवी प्रकर्षाने भासणार होती.

सबीना पार्क व पोर्ट ऑफ स्पेनला मार्च, १९९७मध्ये पहिले दोन कसोटी सामने खेळले गेले. श्रीनाथच्या अनुपस्थितीतही आम्ही चांगला खेळ केला. दोन्ही सामने अनिर्णित राहिले असले तरी दोन्ही लढती अटीतटीच्या झाल्या. आम्ही तिथल्या वातावरणाशी छान रुळलो होतो. त्या वेळी वेस्ट इंडीजकडे कर्टली ॲम्ब्रोज, मर्व्हिन डिलाँ, इयान बिशप व फ्रँकलिन रोझ अशी द्रुतगती गोलंदाजांची चौकडी होती. त्यांच्या तिखट माऱ्यासमोरही आम्ही भक्कम फलंदाजी केली. मालिका पाच कसोटी सामन्यांची होती. तिसरी कसोटी २७ मार्चपासून बार्बाडोसला सुरू होणार होती. माझा आत्मविश्वास वाढला होता. त्या कसोटीत आम्ही काहीतरी खास कामगिरी करून दाखवू याची मला खातरी वाटत होती.

किंग्जटन ओव्हल मैदानावर आमची सुरुवात छान झाली. वेस्ट इंडीजला आम्ही ३०० धावांच्या आत रोखलं. वेंकटेश प्रसादची गोलंदाजी प्रभावी ठरली. त्याने ८२ धावा देऊन ५ गडी बाद केले. त्यांच्या शिवनारायण चंदरपॉलने मात्र शतक ठोकलं. आनंदाची गोष्ट म्हणजे चंदरपॉल अजूनही त्याच उमेदीने खेळतो आहे. तो आता १५०हून अधिक कसोटी सामने

खेळला आहे. गेली दोन दशकं त्याने वेस्ट इंडीजतर्फे सातत्याने धावा केल्या आहेत. त्याची ही कामगिरी खरोखरच कौतुकास्पद आहे. चांगल्या गोलंदाजीच्या पाठोपाठ आम्ही फलंदाजीही चांगली केली. पहिल्या डावात आम्ही वेस्ट इंडीजवर छोटी आघाडी मिळवली. मी ९२ धावा काढल्या. पंचांच्या चुकीच्या निर्णयाचा मला फटका बसला. पंच लॉइड बार्कर यांनी मला इयान बिशपच्या एका चेंडूवर बाद ठरवलं. तो चेंडू नो-बॉल होता. चेंडू टाकताना बिशपचं पाऊल क्रीजपुढे किमान चार इंच पडलं होतं. रिप्लेमध्ये हे स्पष्ट दिसत होतं. त्यानंतर लॉइड बार्कर मात्र त्या सामन्यात फार वेळ उभे राहू शकले नाहीत. असह्य डोकेदुखीमुळे त्यांना हॉस्पिटलमध्ये जावं लागल्याचं बदली पंचांनी मला नंतर सांगितलं.

दुसऱ्या डावात तर आमच्या गोलंदाजांनी वेस्ट इंडीजला १४० धावांत गुंडाळलं. सामन्याचा तो तिसरा दिवस होता. या वेळी ॲबी कुरुविल्लाने ६८ धावांत ५ गडी बाद केले. विजयासाठी आम्हाला फक्त १२० धावांची गरज होती. तीन दिवसांच्या वापरानंतर खेळपट्टी मात्र खूपच खराब झाली होती. वेस्ट इंडीजचे द्रुतगती गोलंदाज तिचा फायदा उठवणार हे तर उघडच होतं. दिवसअखेर आमच्या बिनबाद दोन धावा झाल्या होत्या. दुसऱ्या दिवशी त्या खेळपट्टीवर धावा काढणं अधिकच मुश्कील होणार आहे हे आम्ही जाणून होतो; पण विजयासाठी फक्त एका चांगल्या भागीदारीची आम्हाला आवश्यकता होती.

लाजिरवाणी पडझड

३१ मार्च, १९९७ – सोमवारचा तो दिवस हा भारतीय क्रिकेट इतिहासातील सर्वांत काळाकुट्ट दिवस ठरला. माझ्या कर्णधारपदाच्या कारकिर्दीतलीही ती अत्यंत नामुश्कीची घटना होती. खरं सांगायचं तर, मला मात्र त्या दिवशी विजयाच्या खूपच अपेक्षा होत्या. रविवारी रात्री आम्ही बार्बाडोसमधल्या सेंट लॉरेन्स गॅप रेस्टॉरंटमध्ये जेवायला गेलो होतो. तिथल्या वेटरसोबत मी थोडी थट्टा-मस्करीही केली होती. वेस्ट इंडीज जिंकणार असं तो म्हणत होता. दुसऱ्या दिवशी कर्टली ॲम्ब्रोज भारताची दाणादाण उडवणार असं त्याचं भाकीत होतं. पहिल्या डावात फ्रँकलिन रोझने मला एक बाउन्सर टाकला होता. त्या चेंडूवर मी षटकार मारला होता. मी वेटरला त्या गोष्टीची आठवण करून दिली. ''ॲम्ब्रोजने जर उद्या मला बाउन्सर टाकला, तर तो चेंडू मी अँटिग्वामध्ये भिरकावून देईन,'' असं मी त्याला थट्टेत म्हणालो. त्या क्षणी विजयाची मला पक्की खातरी वाटत होती. फ्रिजकडे बोट दाखवत मी त्याला म्हटलं की, ''आत्ताच शॅम्पेनची एक बाटली तू त्यात ठेवून दे. उद्या मॅच जिंकल्यावर मी स्वत: तुझ्यासाठी एक ग्लास भरेन.''

पण दुर्दैवाने आमचा संघ फक्त ८१ धावांत पत्त्यासारखा कोसळला. आम्ही ३८ धावांनी सामना हरलो होतो. खराब खेळपट्टी हे पराभवाचं समर्थन होऊ शकत नाही. पराभवाबद्दल कुणाकडेतरी बोट दाखवून मी स्वत:चा बचाव करणार नाही. ती माझी वृत्ती नाही. हरलेल्या संघाचा मीही एक सदस्य होतो. कर्णधार म्हणून विजय मिळवून देण्याची मुख्य जबाबदारी माझ्यावर होती. अतिआत्मविश्वासाने आमचा घात झाला, असंही मी म्हणणार नाही, परंतु माझ्यासह सर्वांनीच फार वाईट फलंदाजी केली. लक्ष्मणचा अपवाद वगळता कुणालाही दोन अंकी धावसंख्या उभारता आली नाही.

मी स्वत: फक्त चार धावा काढून बाद झालो. स्वत:च्या चुकीमुळे मी माझी विकेट गमावली होती. एकतर तो चेंडू मी सोडून द्यायला हवा होता किंवा त्यावर सणसणीत फटका मारायला पाहिजे होता; पण मी चाचपडत खेळलो. चेंडू बॅटची कड घेऊन क्षेत्ररक्षकाच्या हातात गेला. तो पराभव पचवणं मला खूप जड गेलं. मी मनातून पार उद्ध्वस्त झालो होतो. दोन तास मी स्वत:ला एका खोलीत कोंडून घेतलं होतं. त्या पराभवाचे ओरखडे अजूनही मनातून पुसले गेलेले नाहीत.

अधोगतीच्या गर्तेत

वेस्ट इंडीजमधील ती कसोटी मालिका अखेर आम्ही १-० अशा फरकाने हरलो. त्यानंतर झालेल्या एकदिवसीय मालिकेतही आमचा पराभव झाला. दौऱ्याची सुरुवात फार छान झाली होती; पण दौऱ्याचा शेवट मात्र मनाला खूपच यातना देऊन गेला. सातत्य व एकाग्रता यांत आम्ही कमी पडलो. याचं उत्तम उदाहरण म्हणजे सेंट व्हिन्सेंटला झालेला तिसरा सामना. त्या सामन्यात आम्हाला जिंकण्यासाठी शेवटच्या १० षटकांत फक्त ४७ धावांची गरज होती. त्या वेळी आमचे फक्त चार गडी

बाद झाले होते. सौरव व राहुलने विजयाचा मार्ग सुकर केला होता. मॅच अगदी आमच्या हातात होती. 'फटकेबाजीचा मोह आवरा,' असं मी प्रत्येकाला बजावून सांगत होतो. धोका पत्करण्याची काहीच गरज नव्हती. प्रत्येक षटकांत चार-पाच धावा मिळाल्या तरी पुरेशा होत्या. परंतु मधल्या फळीतले व त्यानंतरचे सर्व फलंदाज हवेत फटका मारण्याच्या नादात बाद झाले. दोन-तीन विकेट्स झटपट गेल्यामुळे संघात घबराट पसरली. बिथरलेल्या अवस्थेत काही जण निष्कारण धावबाद झाले. ऐनवेळी हाराकिरी केल्यामुळे हातातोंडाशी आलेली विजयाची संधी अखेर गमवावी लागली.

सामना संपल्यानंतर मी सर्व खेळाडूंना एकत्र बोलावलं. त्या वेळी बोलताना मात्र माझा संयम तुटला. मी पोटतिडकीने बोलत होतो. इतक्या खराब खेळाला मी कधीही क्षमा करू शकत नाही, हे मी त्यांना स्पष्टपणे सुनावलं. प्रतिस्पर्धी संघ उत्तम दर्जाचा खेळ खेळून जेव्हा विजय मिळवतो, तेव्हा नाइलाज असतो. तसे पराभव स्वीकारण्यावाचून पर्यायही नसतो. पण आजचा विजय अगदी आवाक्यातला होता. इतका सोपा विजयही जेव्हा आपण मिळवू शकत नाही, तेव्हा त्याचा अर्थ असा की, आपल्या संघात दखल घेण्याजोग्या गंभीर उणिवा आहेत.

मी अतिशय उद्विग्न मन:स्थितीत होतो. संध्याकाळी अनिल व श्रीनाथ मला शांत करण्यासाठी माझ्या खोलीत आले. ''पराभवासाठी तू स्वत:ला दोषी ठरवू नकोस,'' असं अनिल मला म्हणाला. दक्षिण आफ्रिका व वेस्ट इंडीजमध्ये आपल्या हातून अनेक अक्षम्य चुका घडल्या; पण या चुकांपासून आपण बोध घ्यायला हवा, असं दोघांचंही म्हणणं होतं. मात्र, या सर्व गोष्टी आता मला असह्य होऊ लागल्या होत्या. हार स्वीकारणं मला कधीही आवडत नसे. आमचा सातत्याने पराभव होत होता. माझ्या मते कर्णधार म्हणून पराभवाला मी जबाबदार होतो. त्याहूनही चिंतेची बाब म्हणजे ही परिस्थिती कशी बदलायची या प्रश्नाचं उत्तर माझ्यापाशी नव्हतं. मी प्रयत्न करण्यात कोणतीच कसूर केली नव्हती.

दौरा संपल्यावर मी माझ्या मनातली व्यथा अंजलीपाशी बोलून दाखवली. पराभवाचे व्रण मनाला डागण्या देत होते. मी प्रयत्नांची पराकाष्ठा केली होती. आता आणखी ०.१ टक्काही करण्यासारखं माझ्यापाशी काही उरलं नव्हतं. विजयासाठी आम्हाला १२० धावाही करता येऊ नयेत, याची मनाला खूपच बोच लागून राहिली होती. आमच्यामध्ये जिंकण्याची क्षमता नक्कीच होती; पण त्या दिवशी आम्ही गचाळ फलंदाजी केली. तो पराभव मला खूपच सलत होता. ते अपयश पचवण्यासाठी बराच काळ जावा लागणार होता. एकही गोष्ट माझ्या मनासारखी होत नव्हती. एका क्षणी तर क्रिकेट सोडण्याचाही विचार माझ्या मनात आला होता. अशा प्रसंगी मला कसं सावरायचं हे अंजलीला पक्कं ठाऊक होतं. तिने माझा दृष्टिकोन बदलला. येणाऱ्या काळात नक्की चांगल्या घटना घडतील, असं सांगत तिने मला धीर दिला. आज त्या घटनांकडे वळून पाहताना लक्षात येतं की, त्या वेळी वैफल्याने मी पुरता ग्रासलो होतो.

कर्णधारपदाचे अखेरचे काही महिने

ऑगस्ट, १९९७मध्ये श्रीलंकेत झालेली दोन कसोटी सामन्यांची मालिका आम्ही अनिर्णित राखली. पराभवाची मालिका तात्पुरती खंडित झाली. त्यानंतर सप्टेंबरमध्ये टोरांटोत 'सहारा करंडक' स्पर्धा होती. त्यात आम्ही पाकिस्तानवर

४-१ असा विजय मिळवला. स्पर्धा अतिशय संस्मरणीय ठरली. करंडकाला स्वत:चं नाव देण्यास सहारा ग्रुप तयार झाला होता. त्याहून महत्त्वाचं म्हणजे स्पर्धेच्या व खेळाडूंच्या व्यवस्थेत किंचितही कसर राहू नये, यासाठी अभिजित सरकार यांच्यासारखी अनुभवी वरिष्ठ मंडळी जातीने उपस्थित होती. त्या स्पर्धेत आम्ही श्रीनाथ, प्रसाद व अनिल कुंबळे यांच्याशिवाय खेळत होतो. आमच्यापाशी सर्व तरुण गोलंदाज होते. त्यामुळे तो विजय अधिक समाधान देऊन गेला. सौरव गांगुली भलताच फॉर्मात होता. लागोपाठ चार सामन्यांत त्याला 'मॅन ऑफ द मॅच' हा किताब मिळाला होता.

स्पर्धेतल्या दुसऱ्या सामन्यात इंझमाम-उल-हकच्या संदर्भात एक विचित्र घटना घडली होती. आज ती गोष्ट आठवताना हसू येतं; पण त्या वेळी आमच्यासाठी तो एक धक्काच होता. पाकिस्तानचा डाव ११६ धावांत आटोपला होता. आमची बॅटिंग सुरू होती आणि ड्रिंक्स ब्रेक झाला होता. इतक्यात पाकिस्तान संघातील एक राखीव खेळाडू इंझमामसाठी एक बॅट घेऊन आला. ते पाहून ड्रेसिंग रूममधलेही सर्व जण थक्क झाले होते. सुरुवातीला आम्हाला वाटलं की, कुणालातरी त्या

बॅटवर इंझमामची स्वाक्षरी हवी असावी; पण ती बॅट इंझमामनेच मुद्दामहून मागवली होती. स्टेडियममधले काही प्रेक्षक त्याची त्याच्या शरीरयष्टीवरून चेष्टा करत होते. इंझमाम त्यांच्यावर हल्ला चढवण्याच्या तयारीत होता.

आम्ही टोरांटोहून मध्यरात्री दीडच्या सुमारास दिल्लीला पोचलो. इतक्या रात्रीही पाच हजार चाहते आमच्या स्वागतासाठी उत्साहाने विमानतळावर हजर होते. जमावाला काबूत ठेवणं पोलिसांना जड जात होतं; पण चाहत्यांच्या मान राखायला हवा यासाठी मीच आग्रही होतो. सर्व खेळाडूंनी हात उंचावून प्रेक्षकांच्या अभिवादनाचा स्वीकार केला. त्यानंतर आम्ही विमानतळाबाहेर पडलो. देशवासीयांनी केलेल्या त्या स्वागतामुळे आम्ही भारावून गेलो होतो. मात्र, पाकिस्तानला हरवण्याचं समाधान अल्पकाळच टिकलं. त्यानंतर काही आठवड्यांत आम्ही पाकिस्तानला गेलो. तिथे खेळलेल्या तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेत पाकिस्तानने आम्हाला पराभूत केलं.

मालिकेतला दुसरा सामना आम्ही जिंकलो होतो. मला आठवतं की, त्या सामन्यात सकलेनचा 'दुसरा' चेंडू कसा खेळायचा हे मी राजेश चौहानला शिकवत होतो. मी त्याचं पाच मिनिटांचं छोटं बौद्धिकही घेतलं होतं. रॉबिन सिंग त्या वेळी एका बाजूने छान फलंदाजी करत होता. 'रॉबिनला जास्तीत जास्त स्ट्राइक दे,' असं मी त्याला बजावलं होतं. राजेशने मात्र मला आश्चर्याचा सुखद धक्का दिला. अखेरच्या षटकात त्याने षटकार मारला आणि आम्ही ती मॅच जिंकलो. विजयाचा आनंद मात्र आम्हाला साजरा करता आला नाही. आमच्या हॉटेल रूम्सबाहेर सशस्त्र सुरक्षारक्षक उभे होते. त्यामुळे आमच्या उत्साहावर पाणी पडलं. एजाज अहमद हा मालिकेच्या निर्णायक सामन्याचा मानकरी ठरला. त्याने पाकिस्तानला एकहाती विजय मिळवून दिला. चौफेर फटकेबाजी करत त्याने १३९ धावा काढल्या.

आम्ही ती मालिका १-२ अशी हरलो. याखेपेस जेव्हा आम्ही दिल्लीच्या विमानतळावर उतरलो तेव्हा आमचं स्वागत करायला तिथे चिटपाखरूही नव्हतं. मला हेही आठवतं की, पुढे मुंबईला जाणाऱ्या खेळाडूंना जास्त सामानाबद्दल अधिक आकार लावण्यात आला. मी सर्वांना वाद न घालता पैसे भरण्यास सांगितलं.

पाकिस्तानमधल्या पराभवामुळे माझ्यावरचं दडपण आणखीनच वाढलं होतं. त्यानंतर नोव्हेंबर-डिसेंबर, १९९७मध्ये कसोटी मालिका खेळण्यासाठी श्रीलंकेचा संघ भारतात आला होता. त्या दौऱ्यादरम्यान घडलेला एक किस्सा मला सांगावासा वाटतो. त्या वेळी मी कोणत्या मानसिक अवस्थेतून जात होतो याची त्यावरून कल्पना येऊ शकेल. ती मालिका जिंकण्यासाठी माझ्याकडून, एक कर्णधार म्हणून विशेष कामगिरीची अपेक्षा केली जात होती. पहिल्या दोन कसोटी सामन्यांत मी फारशा धावा काढू शकलो नव्हतो. दोन्ही सामने अनिर्णित राहिले होते. नागपूरचा दुसरा सामना तर पावसामुळे वाहून गेला होता. ३ डिसेंबर, १९९७ रोजी तिसरी कसोटी मुंबईला सुरू होणार होती. सामन्याच्या आदल्या दिवशी पत्रकार परिषद झाली. त्यात काही पत्रकारांनी माझ्यावर टीकेचा भडिमार केला. माझ्या खराब फॉर्मबद्दल वर्तमानपत्रांमधूनही बरंच काही लिहून आलं होतं. माझ्यासाठी परिस्थिती आणीबाणीची होती. कर्णधार म्हणून व एक फलंदाज म्हणूनही सर्वोत्तम कामगिरी करण्याचं माझ्यासमोर आव्हान होतं.

सामन्याच्या पहिल्या दिवशी खेळ संपायला एक तास बाकी असताना मी फलंदाजीसाठी उतरलो. खेळ संपला तेव्हा मी आठ धावांवर नाबाद होतो. माझ्या बॅटिंगमध्ये नेहमीची सहजता नव्हती; पण मी टिकून राहिलो होतो. खरं म्हणजे त्या रात्री मी पूर्ण विश्रांती घेणं आवश्यक होतं. दुसऱ्या दिवशी जास्तीत जास्त वेळ बॅटिंग करायची होती. अनेकदा अशा प्रसंगी मला रात्री झोप येत नाही. त्या रात्रीही साडेदहाच्या सुमारास मला आतून खूपच अस्वस्थ वाटू लागलं. हॉटेलच्या कोंडलेल्या वातावरणातून मी बाहेर पडायचं ठरवलं. मी माझा मित्र अतुल रानडे याला फोन केला. त्याला हॉटेलवर यायला सांगितलं. तो आल्यावर आम्ही गाडीतून बाहेर पडलो. अतुलला म्हटलं, ''मला शिवाजी पार्कच्या गणपतीच्या देवळात जायचंय.''

मध्यरात्री गणपतीचं दर्शन घेऊन मनोभावे प्रार्थना केल्यावर मला खूप बरं वाटलं. मनावरचा सगळा ताण जाऊन मन हलकं झालं. मुख्य म्हणजे, त्या क्षणी मनात क्रिकेटचा विचार नव्हता. नंतर आम्ही सिद्धिविनायक मंदिरात गेलो. हॉटेलवर परतत असताना आम्ही हाजी अलीला जाऊन मिल्कशेक प्यायचं ठरवलं. रात्री एक वाजता अतुल व मी चक्क रस्त्याच्या कडेला बसून मस्त गप्पा मारत मिल्कशेक प्यायलो. क्रिकेट सोडून आम्ही सर्व विषयांवर बोलत होतो. मी उत्साहात हॉटेलवर

परतलो. रात्री नंतर झोपही छान लागली. दुसऱ्या दिवशी मी १४८ धावा काढल्या!

दुर्दैवाने मला हवा असणारा विजय मात्र आमच्या हातून निसटला. एक वेळ अशी होती की, सामना अगदी आमच्या हातात आला होता. पण मोक्याच्या क्षणी आम्ही एक झेल सोडला. तो झेल पकडला असता तर सामन्याला नक्कीच वेगळं वळण मिळालं असतं. त्यात अचानक पाऊस सुरू झाल्याने आमच्या निराशेत अधिकच भर पडली. माझ्या मते ती दवडलेली संधी व खराब नशीब या दोन गोष्टींमुळे आम्ही विजयाला मुकलो होतो.

श्रीलंकेच्या मालिकेनंतर डिसेंबर १९९७मध्ये आम्ही चौरंगी मालिका खेळण्यासाठी शारजात पोचलो. स्पर्धेत चार देश सहभागी झाले होते. आम्ही फारच वाईट खेळलो. इंग्लंड, पाकिस्तान व वेस्ट इंडीज या तीनही देशांबरोबर झालेले सर्व सामने आम्ही हरलो. दैव मला साथ देत नव्हतं. कोणत्याच गोष्टीत मला यश मिळत नव्हतं. १४ डिसेंबरला पाकिस्तानबरोबर झालेल्या सामन्यातही नेमकं असंच घडलं. निवडसमितीच्या विनंतीनुसार मी चौथ्या क्रमांकावर फलंदाजी करत होतो. सौरव व नवज्योत सिंग सिद्धू यांनी आम्हाला चांगली सुरुवात करून दिली. सिद्धू बाद झाला तेव्हा धावसंख्या होती, १४३ व दोन गडी बाद. मी अष्टपैलू रॉबिन सिंगला माझ्याऐवजी मैदानावर पाठवलं. मला धावगती वाढवायची होती. रॉबिनला चौथ्या क्रमांकावर पाठवायची योजना मी अगदी विचारपूर्वक आखली होती. पाकिस्तानचा लेग स्पिनर मंझूर अख्तर एका बाजूने गोलंदाजी करत होता. उजव्या हाताच्या फलंदाजांसाठी तो राउंड द विकेट मारा करत होता. रॉबिन डावखुरा असल्यामुळे तो लेग स्पिनरला सफाईने खेळून सहज मोठे फटके मारू शकेल असा माझा अंदाज होता. पण रॉबिन मध्यमगती गोलंदाज अझर महमूदचे फक्त तीन चेंडू खेळून शून्यावर बाद झाला. माझा प्रयोग साफ फसला होता.

माझ्याआधी रॉबिनला पाठवल्यामुळे आम्ही सामना हरलो, अशी पत्रकारांनी त्यानंतर माझ्यावर टीका केली. बरोबर एक महिन्याने जानेवारी, १९९८मध्ये ढाक्यात 'सिल्व्हर ज्युबिली इंडिपेन्डन्स कप' स्पर्धा खेळवण्यात आली. अझरला पुन्हा कर्णधारपद मिळालं होतं. पाकिस्तानबरोबरच्या सामन्यात अझर नेमकी तीच खेळी खेळला. मी व सौरवने मिळून फारच छान सुरुवात करून दिली होती. धावसंख्येचा वेग कायम ठेवण्यासाठी रॉबिनला तिसऱ्या क्रमांकावर पाठवण्यात आलं. या खेपेस रॉबिनने तडाखेबाज फलंदाजी करून ८२ धावा काढल्या. त्यामुळे पाकिस्तानची धावसंख्या आम्ही सहज पार करू शकलो. रॉबिनला तिसऱ्या क्रमांकावर पाठवणं हा एक प्रकारे मोठा जुगार होता. ऑफ स्पिनर्सना तोंड देणं डावखुऱ्या फलंदाजांना नेहमीच कठीण जातं. सकलेन मुश्ताक तर त्या वेळी ऐन फॉर्मात होता; पण रॉबिनने केलेल्या फटकेबाजीमुळे त्याच प्रयोगाचं भरभरून कौतुक केलं गेलं. म्हणतात ना, यशाचं श्रेय घेण्यास बरेच जण पुढे येतात, पण अपयशाची जबाबदारी मात्र कुणीच उचलत नाही.

शारजाच्या पराभवानंतर आम्ही श्रीलंकेबरोबर मायदेशात तीन सामन्यांची एकदिवसीय सामन्यांची मालिका खेळलो. पहिला सामना जिंकून आम्ही १-० आघाडी मिळवली होती. दुसरा सामना पावसामुळे रद्द झाला. गोव्यातल्या तिसऱ्या मॅचमध्ये मात्र श्रीलंकेने आम्हाला हरवलं. मालिकेनंतर मला अत्यंत अशिष्टपणे कर्णधारपदावरून दूर करण्यात आलं. माझ्या बडतर्फीबद्दल बीसीसीआयच्या एकाही सदस्याने मला फोन केला नाही किंवा ही बातमी कळवण्याची तसदीही घेतली नाही. प्रसारमाध्यमातील एका प्रतिनिधीने ती बातमी मला फोन करून सांगितली. त्या वेळी मी साहित्य सहवासमधील माझ्या मित्रांसोबत होतो. मला तो एकूणच प्रकार अत्यंत अपमानास्पद वाटला. त्याच क्षणी मी एक अधिक चांगला क्रिकेटर होण्याचा निश्चय केला. झालेल्या अपमानातूनच मला निश्चयाचं बळ मिळालं होतं. मी मनात म्हटलं की, 'बीसीसीआयच्या बड्या मंडळींना भलेही माझं कप्तानपद काढून घ्यायचा अधिकार असेल; पण माझं क्रिकेट मात्र माझ्यापासून कुणीही हिरावून घेऊ शकणार नाही.' मात्र तरीही झालेली नामुष्की व अपमान यांचा सल मनाला बराच काळ बोचत राहिला. भारतीय संघ त्यानंतर ढाक्याला गेला. मी कर्णधार असताना काही खेळाडू मला 'स्किपर' म्हणायचे. ढाक्याला झालेल्या सामन्यात एका खेळाडूने अचानक 'स्किपर' अशी जोरात हाक मारली. हाकेला उत्तर देण्यासाठी मी अनवधानाने त्याच्याकडे वळलो आणि त्या क्षणी प्रथमच मला मी भारतीय संघाचा कर्णधार नसल्याची खरीखुरी जाणीव झाली. माझ्या लक्षात आलं की, आता मला फक्त माझ्या बॅटिंगवर लक्ष केंद्रित करून माझ्या संघाला विजयी करायचंय आणि तेच मी केलं. पण मन एकाग्र करण्याच्या

प्रयत्नात मी पुढे माझा चांगला मित्र झालेल्या एका व्यक्तीला मात्र दुखावलं. १९९८मध्ये ढाक्यात झालेल्या सिल्व्हर ज्युबिली इंडिपेन्डन्स कप स्पर्धेत ती घटना घडली. अंतिम फेरीतील दुसरा सामना सुरू होता. मी बॅटिंग करत असताना साइड स्क्रीनच्या समोर व आजूबाजूला खूपच हालचाल होत होती. मी अनेकदा तक्रार करूनही त्यात काहीच फरक पडत नव्हता. माझं लक्ष विचलित झालं व मी लवकरच बाद झालो. पॅव्हिलियनकडे परतत असताना मी संतापाने खदखदत होतो. इतक्यात माझी माफी मागण्यासाठी एक व्यक्ती पुढे आली. मी त्यांच्या अंगावर अक्षरश: खेकसलो. मी त्यांना म्हटलं, ''साध्या साध्या गोष्टींची जर तुम्हाला काळजी घेता येत नसेल, तर आंतरराष्ट्रीय स्पर्धा भरवण्याचा बांगलादेशला हक्कच पोचत नाही.'' नंतर मला समजलं की, ती व्यक्ती म्हणजे अश्रफ-उल-हक. त्या वेळी ते बांगलादेश क्रिकेट बोर्डाचे अध्यक्ष होते. आज ते आशिया क्रिकेट कौन्सिलचे कार्यकारी अध्यक्ष आहेत. आजही जेव्हा जेव्हा आम्ही भेटतो, तेव्हा दरवेळी त्या प्रसंगाची आठवण काढून आम्ही न चुकता एकमेकांची माफी मागतो.

आस्ट्रेलियाचा भारत दौरा, १९९६ – बॉर्डर-गावसकर करंडक

एकमेव कसोटी. दिल्ली – १० ते १३ ऑक्टोबर, १९९६

आस्ट्रेलिया १८२ (एमजे स्लेटर ४४; ए कुंबळे ४-६३, एआर कपूर २-३०, एसबी जोशी २-३६) व २३४ (एसआर वॉ ६७*; ए कुंबळे ५-६७, बीकेव्ही प्रसाद ३-१८)

भारत ३६१ (एनआर मोंगिया १५२, एससी गांगुली ६६, **एसआर तेंडुलकर** १०; पी.आर. रफेल ३-३५) व ५८-३ (एससी गांगुली २१, एम अझरुद्दीन २१, **एसआर तेंडुलकर** ०)

भारत ७ गडी राखून विजयी

भारताने मालिका १-० अशी जिंकली

दक्षिण आफ्रिकेचा भारत दौरा, १९९६

पहिली कसोटी. अहमदाबाद – २० ते २३ नोव्हेंबर, १९९६

भारत २२३ (**एसआर तेंडुलकर** ४२; एए डोनाल्ड ४-३७) व १९० (व्हीव्हीएस लक्ष्मण ५१, **एसआर तेंडुलकर** ७; एए डोनाल्ड ३-३२)

दक्षिण आफ्रिका २४४ (पीएस डिव्हिलिअर्स ६७*; एसबी जोशी ४-४३) व १०५ (डब्ल्यूजे क्रोनिए ४८*; जे श्रीनाथ ६-२१, ए कुंबळे ३-३४)

भारत ६४ धावांनी विजयी

दुसरी कसोटी. कोलकाता – २७ नोव्हेंबर ते १ डिसेंबर, १९९६

दक्षिण आफ्रिका ४२८ (एसी हडसन १४३, जी कर्स्टन १०२; बीकेव्ही प्रसाद ६-१०४) व ३६७-३ घोषित (डीजे कलिनन १५३*, जी कर्स्टन १३३)

भारत ३२९ (एम अझरुद्दीन १०९, ए कुंबळे ८८, **एसआर तेंडुलकर** १८; एए डोनाल्ड ३-७२) व १३७ (एम अझरुद्दीन ५२, **एसआर तेंडुलकर** २; एल क्लुसनर ८-६४)

दक्षिण आफ्रिका ३२९ धावांनी विजयी

तिसरी कसोटी. कानपूर – ८ ते १२ डिसेंबर, १९९६

भारत २३७ (**एसआर तेंडुलकर** ६१, डब्ल्यूव्ही रमण ५७; पीआर ॲडम्स ६-५५) व ४००-७ घोषित (एम अझरुद्दीन १६३*, आर द्रविड ५६, **एसआर तेंडुलकर** ३६)

दक्षिण आफ्रिका १७७, (जी कर्स्टन ४३, ए कुंबळे ४-७१, जे श्रीनाथ ३-४२) व १८० (डब्ल्यूजे क्रोनिए ५०; जे श्रीनाथ

३-३८, एसबी जोशी ३-६६)

भारत २८० धावांनी विजयी

भारताने मालिका २-१ जिंकली

भारताचा दक्षिण आफ्रिका दौरा, १९९६-९७

पहिली कसोटी. डर्बन – २६ ते ३० डिसेंबर, १९९६

दक्षिण आफ्रिका २३५, (एसी हडसन ८०, बीकेव्ही प्रसाद ५-६०) व २५९ (एएम बाकर ५५, एसी हडसन ५२, बीएम मॅकमिलन ५१*; बीकेव्ही प्रसाद ५-९३)

भारत १०० (एससी गांगुली १६, **एसआर तेंडुलकर** १५; एए डोनाल्ड ५-४०, एसएम पोलॉक २-१८, बीएम मॅकमिलन २-२७) व ६६ (आर द्रविड २७*, **एसआर तेंडुलकर** ४; एए डोनाल्ड ४-१४, एसएम पोलॉक ३-२५, एल क्लुसनर २-१६)

दक्षिण आफ्रिका ३२८ धावांनी विजयी

दुसरी कसोटी. केप टाउन – २ ते ६ जानेवारी, १९९७

दक्षिण आफ्रिका ५२९-७ घोषित (जी कर्स्टन १०३, बीएम मॅकमिलन १०३*, एल क्लुसनर १०२*, डीजे कलिनन ७७; बीकेव्ही प्रसाद ३-११४, जे श्रीनाथ ३-१३०) व २५६-६ घोषित (बीएम मॅकमिलन ५९*, एसी हडसन ५५, डीजे कलिनन ५५; जे श्रीनाथ ३-७८)

भारत ३५९ (**एसआर तेंडुलकर** १६९, एम अझरुद्दीन ११५) व १४४ (व्हीव्हीएस लक्ष्मण ३५*, **एसआर तेंडुलकर** ९; एए डोनाल्ड ३-४०)

दक्षिण आफ्रिका २८२ धावांनी विजयी

तिसरी कसोटी. जोहान्सबर्ग – १६ ते २० जानेवारी, १९९७

भारत ४१० (आर द्रविड १४८, एससी गांगुली ७३, **एसआर तेंडुलकर** ३५; एल क्लुसनर ३-७५, एए डोनाल्ड ३-८८) व २६६-८ घोषित (आर द्रविड ८१, एससी गांगुली ६०, एनआर मोंगिया ५०, **एसआर तेंडुलकर** ९; एए डोनाल्ड ३-३८, पीआर ॲडम्स ३-८०)

दक्षिण आफ्रिका ३२१ (एसएम पोलॉक ७९, बीएम मॅकमिलन ४७; जे श्रीनाथ ५-१०४) व २२८-८ (डीजे कलिनन १२२*, एल क्लुसनर ४९; ए कुंबळे ३-४०)

सामना अनिर्णित

दक्षिण आफ्रिकेने मालिका २-० जिंकली

भारताचा वेस्ट इंडीज दौरा, १९९७

पहिली कसोटी. किंग्जटन – ६ ते १० मार्च, १९९७

वेस्ट इंडीज ४२७ (सीएल हुपर १२९, बीसी लारा ८३, एस चंदरपॉल ५२; ए कुंबळे ५-१२०) व २४१-४ घोषित (बीसी लारा ७८, एस चंदरपॉल ४८; ए कुंबळे ३-७६)

भारत ३४६ (एनआर मोंगिया ७८, व्हीव्हीएस लक्ष्मण ६४, **एसआर तेंडुलकर** ७; एफए रोझ ६-१००) व ९९-२ (आर द्रविड ५१*, **एसआर तेंडुलकर** १५)*

सामना अनिर्णित

दुसरी कसोटी. पोर्ट ऑफ स्पेन – १४ ते १८ मार्च, १९९७

वेस्ट इंडीज २९६ (आरआयसी होल्डर ९१, एस चंदरपॉल ४२; ए कुंबळे ५-१०४) व २९९-६ (एनसी विलियम्स १२८, एस चंदरपॉल ७९; एसबी जोशी ३-५७)

भारत ४३६ (एनएस सिद्धू २०१, **एसआर तेंडुलकर** ८८, आर द्रविड ५७; सीइएल ॲम्ब्रोज ५-८७)

सामना अनिर्णित

तिसरी कसोटी. ब्रिज टाउन – २७ ते ३१ मार्च, १९९७

वेस्ट इंडीज २९८ (एस चंदरपॉल १३७, सीइएल ॲम्ब्रोज ३७; बीकेव्ही प्रसाद ५-८२) व १४० (बीसी लारा ४५, ए कुरुविल्ला ५-६८; बीकेव्ही प्रसाद ३-३९)

भारत ३१९ (**एसआर तेंडुलकर** ९२, आर द्रविड ७८; एफए रोझ ४-७७, आयआर बिशप ३-७०) व ८१ (व्हीव्हीएस लक्ष्मण १९, **एसआर तेंडुलकर** ४; आयआर बिशप ४-२२, एफए रोझ ३-१९, सीइएल ॲम्ब्रोज ३-३६)

वेस्ट इंडीज ३८ धावांनी विजयी

चौथी कसोटी. सेंट जॉन्स – ४ ते ८ एप्रिल, १९९७

वेस्ट इंडीज ३३३ (बीसी लारा १०३, आरआयसी होल्डर ५६; एसबी जोशी ३-७६)

भारत २१२-२ (ए जडेजा ९६, व्हीव्हीएस लक्ष्मण ५६)

सामना अनिर्णित

पाचवी कसोटी. जॉर्ज टाउन – १७ ते २१ एप्रिल, १९९७

भारत ३५५(आर द्रविड ९२, **एसआर तेंडुलकर** ८३; सीएल हुपर ३-३४, एफए रोझ ३-९०)

वेस्ट इंडीज १४५-३ (एस चंदरपॉल ५८*, एससी विलियम्स ४४)

सामना अनिर्णित

वेस्ट इंडीजने मालिका १-० जिंकली

भारताचा श्रीलंका दौरा, १९९७

पहिली कसोटी. कोलंबो (आर.पी.एस.) – २ ते ६ ऑगस्ट, १९९७

भारत ५३७-८, घोषित (**एसआर तेंडुलकर** १४३, एम अझरुद्दीन १३६, एनएस सिद्धू १११, आर द्रविड ६९; एसटी जयसूर्या ३-४५)

श्रीलंका ९५२-६ घोषित (एसटी जयसूर्या ३४०, आरएस महानामा २२५, पीए डिसिल्व्हा १२६, ए रणतुंगा ८६, डीपी जयवर्धने ६६; एससी गांगुली २-५३)

सामना अनिर्णित

दुसरी कसोटी. कोलंबो (एसएससी) – ९ ते १३ ऑगस्ट, १९९७

श्रीलंका ३३२, (पीए डिसिल्व्हा १४६, एम मुरलीधरन ३९; डीएस मोहंती ४-७८) व ४१५-७ घोषित (एसटी जयसूर्या १९९, पीए डिसिल्व्हा १२०; ए कुंबळे ३-१५६, व ए कुरुविल्ला २-९०)

भारत ३७५ (एससी गांगुली १४७, **एसआर तेंडुलकर** १३०; एम मुरलीधरन ४-९९) व २८१-५ (एम अझरुद्दीन १०८*, एससी गांगुली ४५, **एसआर तेंडुलकर** ८; एम मुरलीधरन ३-९६)

सामना अनिर्णित

मालिका अनिर्णित ०-०

श्रीलंकेचा भारत दौरा, १९९७

पहिली कसोटी. मोहाली – १९ ते २३ नोव्हेंबर, १९९७

श्रीलंका ३६९ (एमएस अट्टापट्टू १०८, एसटी जयसूर्या ५३, ए कुरुविल्ला ४-८८; जे श्रीनाथ ४-९२) व २५१-६ (पीए डिसिल्हा ११०*; जे श्रीनाथ ३-७५)

भारत ५१५-९ घोषित (एनएस सिद्धू १३१, एससी गांगुली १०९, एम अझरुद्दीन ५३, **एसआर तेंडुलकर** २३; एम मुरलीधरन ३-१७४, एसटी जयसूर्या २-५९)

सामना अनिर्णित

दुसरी कसोटी. नागपूर – २६ ते ३० नोव्हेंबर, १९९७

भारत ४८५ (एससी गांगुली ९९, आर द्रविड ९२, एनएस सिद्धू ७९, ए कुंबळे ७८, **एसआर तेंडुलकर** १५; केआर पुष्पकुमार ५-१२२)

सामना अनिर्णित

तिसरी कसोटी. मुंबई – ३ ते ७ डिसेंबर, १९९७

भारत ५१२ (एससी गांगुली १७३, **एसआर तेंडुलकर** १४८, आर द्रविड ९३; केआर पुष्पकुमार ३-१०८, एचडीपीके धर्मसेना ३-१४४) व १८१-९ घोषित (आर द्रविड ८७, एनएस सिद्धू ४३, **एसआर तेंडुलकर** १३; एचडीपीके धर्मसेना ५-५७)

श्रीलंका ३६१ (एमएस अट्टापट्टू ९८, पीए डिसिल्व्हा ६६, एसटी जयसूर्या ५०; आरके चौहान ४-४८) व १६६-७ (एसटी जयसूर्या ३७, आरएस महानामा ३५; ए कुंबळे ३-५६, आरके चौहान ३-५९)

सामना अनिर्णित

मालिका ०-० अनिर्णित

९.
बहराचे चार महिने

मार्च १९९८मध्ये आस्ट्रेलियाचा संघ तीन कसोटी सामन्यांची मालिका खेळण्यासाठी भारतात आला. मी आस्ट्रेलियाविरुद्ध प्रथमच मायदेशात पूर्ण मालिका खेळणार होतो. मालिकेबद्दल आधीपासूनच भरपूर गाजावाजा सुरू झाला होता. 'शेन वॉर्न विरुद्ध सचिन' हीच खरी लढत असल्याची चर्चा सर्वत्र ऐकू येत होती. अनेकदा एखाद्या मालिकेत प्रसिद्धीचा झोत दोन संघांऐवजी दोन खेळाडूंवर पडतो. उदाहरणार्थ, 'ब्रायन लारा विरुद्ध ग्लेन मॅक्ग्रा', 'रिकी पाँटिंग विरुद्ध वॉल्श' किंवा १९९४मध्ये 'तेंडुलकर विरुद्ध लारा' असं चित्र रंगवलं गेलं होतं. कोणतीही क्रिकेट मालिका ही कधीही दोन खेळाडूंमध्ये नव्हे; तर कायम दोन संघांविरुद्ध लढली जाते, असं मी नेहमी म्हणत आलो आहे. असं असलं तरीही आपल्याला शेन वॉर्नबरोबर तोडीस तोड मुकाबला करावा लागणार आहे, हे मी मनातल्या मनात जाणून होतो. त्या वेळी शेन ऐन बहरात होता. भारतात येण्याआधी आस्ट्रेलियन संघ मायदेशात दक्षिण आफ्रिकेविरुद्ध कसोटी मालिका खेळला होता. त्या मालिकेत शेन वॉर्नने तीन कसोटी सामन्यांमध्ये २० बळी मिळवले होते.

त्या मालिकेच्या वेळी मी वॉर्नच्या गोलंदाजीचा अगदी बारकाईने अभ्यास केला होता. शेनपाशी चेंडूची दिशा हवेत अलगद बदलण्याची (ड्रिफ्ट) विलक्षण क्षमता होती. माझ्या मते ही क्षमता हेच त्याच्या गोलंदाजीचं खरं सामर्थ्य होतं. फलंदाज जर नेहमीचा साइड ऑनचा पवित्रा घेऊन उभा असेल तर शेनचा चेंडू खेळताना त्याची अवस्था आंधळ्यासारखी होऊन जाई. जास्त ड्रिफ्ट झालेला चेंडू त्याच्या नजरेच्या टप्प्याबाहेर जात असे. त्यामुळे फिरकीचा अंदाज घेऊन खेळणं त्याला कठीण होऊन बसे. शेनसमोर खेळताना मी माझा उभं राहण्याचा पवित्रा (स्टान्स) बदलला. मी उजव्या यष्टीच्या म्हणजे लेग स्टम्पच्या किंचित बाहेर उभा राहू लागलो. आणखीही एक-दोन गोष्टी मी ठरवल्या. पहिली म्हणजे शेनची गोलंदाजी क्रीजमध्येच राहून खेळणं. दुसरी म्हणजे शेनचा प्रत्येक चेंडू जास्तीत जास्त वेळ निरखून शेवटच्या क्षणी खेळणं. मी संपूर्ण मालिकेत त्याच्याविरुद्ध एकदाही क्रीज सोडून बाहेर आलो नाही. शिवाय ज्या ज्या वेळी त्याने उजव्या यष्टीबाहेरून चेंडू वळवण्याचा प्रयत्न केला, तेव्हा मी त्याला सतत मिड विकेटच्या दिशेने जमिनीलगत फटके मारले. मी आणखीही एक पर्याय शोधून काढला होता. शेनने जर आखूड टप्प्याचा चेंडू टाकला तर मी तो ऑफ साइडला कट करण्याचं ठरवलं होतं. तसं करताना चेंडू बॅटच्या वरच्या कडेला लागण्याचा धोका होता. पण वॉर्नला चकित करण्यासाठी मी तो धोका पत्करणार होतो. शेन हा अखेर आस्ट्रेलियाचा सर्वांत प्रभावी गोलंदाज होता. त्याच्यासमोर मला योजनाबद्ध खेळणं आवश्यक होतं.

अभ्यास पूर्ण झाला होता. आता प्रात्यक्षिकाची गरज होती. समोरचा संघ दडपणाखाली असताना वॉर्न कशा प्रकारे गोलंदाजी करतो, याचा मला अंदाज आला होता. अशा गोलंदाजीचा मी जास्तीत जास्त सराव करायचं ठरवलं. मी जानेवारीच्या शेवटच्या आठवड्यात सराव करायला सुरुवात केली. मालिकेला अजून एक महिना बाकी होता. माझ्याबरोबर सरावासाठी मी मुंबईतले सर्वोत्तम फिरकी गोलंदाज निवडले. त्यांना मी उजव्या यष्टीच्या बाहेर खराब झालेल्या भागावर राउंड द विकेट बोलिंग करायला सांगितलं. वॉर्नच्या ओव्हर द विकेट गोलंदाजीवर जर मी हल्ला चढवण्यात यशस्वी ठरलो तर तो हाच मार्ग स्वीकारणार याची मला खातरी होती. मुंबईमध्ये साईराज बहुतुले व नीलेश कुलकर्णी यांच्या गोलंदाजीवर मी सराव केला. दोघेही २००१मध्ये आस्ट्रेलियाविरुद्ध भारतासाठी कसोटी खेळले. चेन्नईत मी लक्ष्मण शिवरामकृष्णनला माझ्याबरोबर सरावासाठी विनंती केली. आज तो क्रिकेट समालोचक आहे. १९८०च्या दशकात तोही भारतातर्फे खेळला होता. या सर्वांसोबत केलेला सराव मला फारच उपयुक्त ठरला. फेब्रुवारी, १९९८मध्ये आस्ट्रेलियन संघ भारतात पोचला, तोपर्यंत

वॉर्नसमोर खेळायला मी सज्ज झालो होतो.

आरंभीची चकमक

२४ फेब्रुवारीला आस्ट्रेलियन संघ मुंबईविरुद्ध पहिला सराव सामना खेळला. मी मुंबई संघाचा कर्णधार होतो. दौऱ्याच्या सुरुवातीलाच पाहुण्यांवर मानसिक दबाव आणणं खूप फायद्याचं ठरेल हे मी जाणून होतो. त्यातही वॉर्नसमोर आक्रमक फलंदाजी करणं जास्त महत्त्वाचं होतं. वॉर्न जेव्हा जेव्हा गोलंदाजीला येईल तेव्हा तुम्ही त्याच्यावर हल्ला चढवा अशा मी आमच्या सर्व फलंदाजांना सूचना दिल्या होत्या. फटके मारण्याच्या नादात काही विकेट्स गमवाव्या लागल्या तरी त्याची मला पर्वा नव्हती; पण मला वॉर्नला स्थिरावून आमच्यावर वर्चस्व गाजवू द्यायचं नव्हतं.

आमचा डाव सुरू झाल्यावर सलामीचा फलंदाज अमित पागनीसने अगदी मी सांगितल्याप्रमाणे बॅटिंग केली. सुलक्षण कुलकर्णी लवकर बाद झाला. त्यानंतर मी व पागनीसने मिळून वॉर्नच्या गोलंदाजीचा चांगलाच समाचार घेतला. पागनीसने त्याला दोन षटकांत चार चौकार मारले. मी तर त्याच्या पहिल्याच षटकात एक षटकार ठोकला. त्यानंतरही शेनला फटके मारण्याची मी एकही संधी सोडली नाही. मी १९२ चेंडूंत द्विशतक झळकवलं; पण त्याहीपेक्षा महत्त्वाचं म्हणजे वॉर्नच्या १६ षटकांत आम्ही १११ धावा वसूल केल्या होत्या. ती खेळी मला खूपच समाधान देऊन गेली. मी जाणीवपूर्वक घेतलेला आक्रमक पवित्रा यशस्वी ठरला होता. दुसरी आनंदाची गोष्ट म्हणजे प्रथम दर्जाच्या सामन्यातलं ते माझं पहिलं द्विशतक होतं. पहिल्या डावात आम्ही १००हून जास्त धावांची आघाडी घेतली. ऑस्ट्रलियाचा दुसरा डाव तर साफ कोसळला. नीलेश कुलकर्णीने त्यांचा निम्मा संघ गारद करत त्यांना केवळ १३५ धावांत गुंडाळलं. नीलेशने १९९६मध्ये भारतीय संघात पदार्पण केलं होतं. दुसऱ्या डावात आम्ही एकही गडी बाद न होऊ देता सामना जिंकला. आस्ट्रेलियाला आम्ही १० गडी राखून पराभूत केलं.

जगातील सर्वोत्कृष्ट संघाला आम्ही पहिल्याच सामन्यात धूळ चारली. नामुश्कीच्या पराभवामुळे आस्ट्रेलियासाठी दौऱ्याची सुरुवात फारच वाईट झाली. आम्हाला मात्र अपेक्षेपलीकडचं यश मिळालं होतं. आस्ट्रेलियावर मिळवलेली पकड आता आम्हाला सुटू द्यायची नव्हती. लवकरच चेन्नईला पहिली कसोटी सुरू होणार होती. आस्ट्रेलियाने मुंबईविरुद्ध खेळताना आपली सर्व शक्ती व युक्ती पणाला लावली नव्हती, हे मी ओळखून होतो. शेन वॉर्नवर आम्ही तुटून पडलो होतो; पण त्याने एकदाही राउंड द विकेट येत उजव्या यष्टीबाहेरील खडबडीत भागावर गोलंदाजी केली नव्हती. चेन्नईला मात्र पहिली संधी मिळताच तो आपलं हे शस्त्र वापरणार याची मला खातरी होती. मुंबईच्या सामन्यानंतर झालेल्या पत्रकार परिषदेत ही गोष्ट मी जाहीरपणे सांगितली होती. मालिकेची सुरुवात चांगली होण्याची चिन्हं दिसू लागली होती.

पहिली कसोटी. चेन्नई – ६ ते १० मार्च, १९९८

चेन्नईमध्ये मी खूप क्रिकेट खेळलो होतो. इतर ठिकाणांपेक्षा चेन्नईला शारीरिक तंदुरुस्ती राखताना फार वेगळी काळजी घ्यावी लागते. तिथल्या उष्ण व दमट हवामानाची स्वत:च्या शरीराला सवय होण्यासाठी तुम्हाला खूप आधीपासून तयारी करावी लागते. मी सामना सुरू होण्याच्या ३६ तास आधीच नेहमीपेक्षा जास्त प्रमाणात पाणी प्यायला सुरुवात केली होती. चिदंबरम स्टेडियममध्ये मॅच खेळताना तुम्ही डिहायड्रेट होण्याचा खूप धोका असतो. त्यामुळे तिथे सतत पाणी पीत राहणं महत्त्वाचं ठरतं.

१९८०-९०च्या दशकात खेळाडूंनी कोणता योग्य आहार घ्यावा व शरीराची तंदुरुस्ती राखण्यासाठी नेमका कोणत्या प्रकारचा व्यायाम करावा, याबाबतीत फारसं संशोधन झालं नव्हतं. आजची परिस्थिती वेगळी आहे. प्रत्येक लहानसहान बाबतीत आता क्रिकेटमध्ये अत्याधुनिकता व सजगता आली आहे. खेळाडूंनी काय खावं किंवा काय खाऊ नये याचे आता तक्ते बनवले जातात. त्यासाठी आहारतज्ज्ञ नेमलेले असतात. बराच वेळ फलंदाजी करून आलेला थकवा घालवण्यासाठी फलंदाज आइसबाथ घेतात. शरीर रिहायड्रेट करण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारचे शेक्स तयार केले जातात. २०१०मध्ये पॅडी

अप्टन हा आमच्याकडून उत्तम कामगिरी करून घेण्यासाठी नेमलेला खास ट्रेनर होता. ग्वाल्हेरच्या सामन्यात मी एक मोठी इनिंग्ज खेळलो होतो. पॅव्हिलियनमध्ये परतल्यावर पॅडीने मला क्रश्ड ड्रायफ्रूटचा दोन ग्लास शेक प्यायला लावला होता.

चेन्नईमध्ये नाणेफेक जिंकून आम्ही प्रथम फलंदाजी स्वीकारली. नाणेफेक जिंकणं खूप महत्त्वाचं होतं. चौथ्या इनिंग्जमध्ये चेंडू खूपच वळणार असा सर्वांचाच अंदाज होता. त्याच दृष्टीने आम्ही अनिल कुंबळे, राजेश चौहान व वेंकटपथी राजू हे तीन फिरकी गोलंदाज संघात घेतले होते. आम्ही सुरुवात छान केली. मोंगिया, सिद्धू व द्रविडनी अर्धशतकं काढली. परंतु त्यानंतर मधली फळी कोसळल्यामुळे आम्ही फक्त २५७ धावसंख्या उभारू शकलो. मी चौथ्या क्रमांकावर येऊन केवळ चार धावांवर बाद झालो. वॉर्ननेच माझी विकेट घेतली होती. आल्या आल्या त्याच्या गोलंदाजीवर मी एक चौकार मारला होता. तसाच शॉट पुन्हा मारण्याच्या नादात चेंडू बॅटेच्या कडेला लागून स्लिपमध्ये मार्क टेलरच्या हातात गेला. नीट जम बसण्याआधीच असा शॉट खेळल्याबद्धल मी स्वत:वरच चिडलो होतो. दुसऱ्या इनिंग्जमध्ये मात्र या चुकीची भरपाई करण्याचा मी निश्चय केला.

कुंबळे व राजूने अप्रतिम गोलंदाजी करत २०१ धावांत आस्ट्रेलियाचे आठ गडी तंबूत पाठवले. आठ विकेट्स इतक्या लवकर पडल्यामुळे आम्हाला आघाडी मिळण्याची शक्यता निर्माण झाली. परंतु नवव्या विकेटसाठी यष्टिरक्षक इयान हिली व त्याच सामन्यात कसोटी पदार्पण केलेला ऑफ स्पिनर गॅविन रॉबर्टसन यांची जोडी जमली. आम्ही ती जोडी चटकन फोडू शकलो नाही. दोघांनी ९६ धावांची भागीदारी करून आस्ट्रेलियाला ७१ धावांची महत्त्वाची आघाडी मिळवून दिली. त्या रात्री बीसीसीआयचे अध्यक्ष ए.सी. मुथय्या यांनी खेळाडूंसाठी मेजवानीचं आयोजन केलं होतं. पार्टीला भारताचे माजी कप्तान आणि प्रख्यात ऑफ स्पिनर श्रीनिवास व्यंकटराघवन उपस्थित होते. ते मला म्हणाले की, ''भारत आता मॅचमध्ये वर्चस्व मिळवू शकणार नाही. तुम्हाला आधी ऑस्ट्रेलियाची आघाडी भरून काढून त्यांच्यासमोर मोठ्या धावसंख्येचं लक्ष्य ठेवावं लागेल. त्यानंतर आस्ट्रेलियाचा डाव झटपट गुंडाळावा लागेल. एवढा वेळ तुमच्यापाशी नाही.'' मला त्यांचं म्हणणं पटलं नाही. मी त्यांना म्हणालो की, ''सामन्यात अजूनही पुरेसा वेळ आहे आणि सामन्याचं चित्र पालटवण्याची आमच्यात क्षमता आहे.''

दुसरा डाव सुरू होण्याआधी मी ड्रेसिंग रूममध्ये माझ्या सहकाऱ्यांना उद्देशून एक छोटंसं आवाहन केलं. प्रत्येक फलंदाजाने या डावात किमान ७५ धावा काढण्याचं लक्ष्य आपल्या डोळ्यांसमोर ठेवलं पाहिजे, असं मी त्यांना सांगितलं. माझ्या मते दरवेळी प्रत्येक फलंदाजाकडून शतकाची अपेक्षा ठेवणं चुकीचं असतं. त्या दिवशी प्रत्येकाने ७५ धावा काढल्या असत्या, तरी चेन्नईची कसोटी आमच्या बाजूने झुकली असती.

सिद्धूने डावाच्या सुरुवातीलाच ६४ धावांचं महत्त्वाचं योगदान दिलं. तो बाद झाल्यावर मी फलंदाजीसाठी उतरलो. त्या वेळी धावसंख्या होती ११५ धावा २ गडी बाद. याचा अर्थ आस्ट्रेलियाची आघाडी वजा जाता खरी धावसंख्या होती ४४-२. माझ्या साथीला राहुल द्रविड होता. मी सुरुवातीला काळजीपूर्वक खेळलो, पण थोड्याच वेळात मी स्थिरावलो. माझ्या अपेक्षेप्रमाणे शेन वॉर्नने राउंड द विकेट गोलंदाजीला सुरुवात केली. मी तत्काळ त्याच्यावर आक्रमण करत मिड विकेटवरून चौकार मारला. माझ्या मते तोच सामन्याला नवी दिशा देणारा क्षण होता. कारण त्या वेळी परिस्थिती नाजूक होती. आम्ही आणखी एकही विकेट गमावू शकत नव्हतो; पण त्याचबरोबर आम्ही खूप बचावात्मक पवित्रा घेणंही चुकीचं ठरलं असतं.

राहुलने व मी मिळून शंभराहून अधिक धावांची भागीदारी केली. राहुल अर्धशतक काढून बाद झाला तोपर्यंत मला सूर गवसला होता. मी नियमितपणे चौकार व षटकार मारायला सुरुवात केली. माझी व अझरची जोडली जमली. आम्ही दोघांनी आणखी एक शतकी भागीदारी रचली. त्यातही आम्ही षटकामागे पाच धावांची गती राखली होती. त्याच भागीदारीमुळे आम्ही विजय मिळवू शकलो.

आम्ही डाव घोषित केला तेव्हा मी १५५ धावांवर नाबाद होतो. आस्ट्रेलियाच्या पहिल्या डावाची आघाडी भरून काढून आम्ही त्यांच्यासमोर ३४८ धावांचं लक्ष्य ठेवलं. सामना जिंकण्याची आता खूपच शक्यता निर्माण झाली होती. आम्ही ती शक्यता प्रत्यक्षात आणली. दुसऱ्या डावात आस्ट्रेलियाचे सर्व गडी केवळ १६८ धावांत बाद करून आम्ही १७९ धावांनी

सनसनाटी विजय मिळवला. अनिल कुंबळेने चार विकेट्स घेतल्या. चेन्नईमध्ये काढलेलं ते शतक मला आजही आठवतं. मी काढलेल्या काही चांगल्या शतकांपैकी ते एक होतं. मॅच जिंकल्यामुळे त्या शतकाची गोडी अधिकच वाढली होती. आनंदाची गोष्ट म्हणजे, मी सामनावीर ठरलो होतो. पहिल्या डावात वॉर्नशी खेळताना केलेल्या चुकीची मी पुरेपूर भरपाई केली होती. दौऱ्याची सुरुवात मनासारखी झाली होती.

त्या मॅचमध्ये आम्ही संघ म्हणून एकदिलाने खेळलो होतो. टीममधील सर्व ज्येष्ठ खेळाडूंनी आपापली भूमिका नीट वठवली होती. अनिलने सामन्यात एकूण आठ बळी घेतले. नवज्योत सिद्धूने दोन्ही डावांत संघाला उत्तम सलामी मिळवून दिली. त्यामुळेच दुसऱ्या डावात आम्ही वॉर्नला सुरुवातीपासूनच फटकेबाजी करू शकलो. राहुलही प्रत्येक इनिंग्जमध्ये छान खेळला. शिवाय स्लिप्समध्ये त्याने काही अप्रतिम झेल टिपले. आम्ही जिद्दीने तो सामना जिंकलो. ईडन गार्डन्सवर सुरू होणाऱ्या दुसऱ्या कसोटीसाठी आम्ही आमच्या संघाला जणू आधीच शुभसंकेत दिले होते.

दुसरी कसोटी. कोलकाता – १८ ते २१ मार्च, १९९८

चेन्नईची कसोटी क्षणोक्षणी होणाऱ्या चढउतारांमुळे गाजली. कोलकात्याच्या दुसऱ्या कसोटीत मात्र आम्ही सुरुवातीपासूनच मॅचवर ताबा मिळवला. आस्ट्रेलियाने नाणेफेक जिंकली. पण त्याचा त्यांना फायदा उठवता आला नाही. पहिल्याच तासात त्यांनी आपले आघाडीचे चार फलंदाज गमावले. श्रीनाथने सुरेख गोलंदाजी करत तीन विकेट्स काढल्या, तर सौरवने मार्क टेलरला बाद केलं. स्टीव्ह वॉ आणि रिकी पॉंटिंग या जोडीने थोडा प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला; पण आम्ही आस्ट्रेलियाला २३३ धावांत रोखलं.

आमच्या फलंदाजांनी त्यानंतर कमाल केली. पहिल्या पाचही जणांनी ७५हून अधिक धावा काढल्या. कसोटी क्रिकेटच्या इतिहासात ही अपवादाने घडणारी घटना होती. अझरने आपल्या लाडक्या मैदानावर शतक ठोकलं. मी शेन वॉर्नची पुन्हा पिटाई करत ७९ धावा काढल्या. वॉर्नच्या गोलंदाजीवर आक्रमण करण्याची आमची योजना यशस्वी ठरली होती. शेन वॉर्नने ४२ षटकांत १४७ धावा दिल्या. त्याला एकही विकेट मिळाली नाही. वॉर्नच्या अपयशामुळे आस्ट्रेलियन संघ अडचणीत आला. सामन्याच्या दुसऱ्या दिवशी मी वॉर्नला मारलेला एक शॉट मला अजूनही आठवतो. वॉर्न समोर आला की त्याच्यावर हल्ला करायचा, हे मी आधीच ठरवलं होतं. वॉर्नचं ते चहापानाआधीचं शेवटचं षटक होतं; पण ही गोष्ट माझ्या लक्षात आली नव्हती. माझं लक्ष फक्त वॉर्नकडे होतं. मी त्याला लाँग ऑनवरून षटकार मारला. एरवी मी कोणत्याही ब्रेकच्या आधी सहसा असा धोका पत्करत नाही. वॉर्नसमोर तुम्हाला किती एकाग्र होऊन खेळावं लागतं, याचंच ते बोलकं उदाहरण होतं.

आस्ट्रेलियन संघाने जरी त्या क्षणी बचावात्मक धोरण स्वीकारलं असलं, तरी त्यांच्यापाशी डाव उलटवू शकणारे अनेक खेळाडू आहेत याची आम्हाला जाणीव होती. त्यामुळे त्यांना सतत दडपणाखाली ठेवणं आवश्यक होतं. कोणत्याही सर्वोत्कृष्ट संघाला समोरच्या टीमवर प्रतिहल्ला चढवण्यासाठी फक्त एका छोट्या संधीची आवश्यकता असते. इतक्या वर्षांच्या अनुभवानंतर ही गोष्ट माझ्या मनात पक्की रुजली होती. आस्ट्रेलियाला जरी तात्पुरती माघार घ्यावी लागली असली, तरी त्यांना सावरण्याची एकही संधी मिळवू न देण्याचं भान तुम्हाला सतत बाळगावं लागतं. अशा वेळी तुम्हाला निर्दयपणे वागावं लागतं आणि आम्ही तसेच वागलो. पहिल्या डावात आम्ही ६३३ धावांचा डोंगर रचल्यावर आम्ही सामन्यावरची पकड ढिली होऊ दिली नाही. खेळपट्टीवर चेंडू अचानक व अनियमितपणे उसळत होते. त्याचा फायदा श्रीनाथ व कुंबळेने उठवला. आस्ट्रेलियाचा संघ दुसऱ्या डावात १८१ धावांत गडगडला. आम्ही ती कसोटी फार मोठ्या फरकाने जिंकली. त्याहूनही महत्त्वाचं म्हणजे जगातील सर्वोत्कृष्ट संघाविरुद्ध आम्ही तीन सामन्यांच्या मालिकेत २-० अशी विजयी आघाडी घेतली होती. आम्हाला आमच्या कामगिरीचा सार्थ अभिमान वाटत होता.

तिसरी कसोटी. बंगळुरू – २५ ते २८ मार्च, १९९८

मालिकेतला अंतिम सामना बंगळुरूला होता. कोवळा तरुण ऑफ स्पिनर हरभजन सिंगने त्या सामन्यात कसोटी पदार्पण

केलं. पहिल्या डावात मी १७७ धावा काढल्या. आम्ही त्याही डावात आस्ट्रेलियन गोलंदाजाना दडपणाखाली ठेवलं. वॉनने जरी तीन बळी मिळवले असले तरी त्या बदल्यात त्याला भरपूर धावाही मोजाव्या लागल्या. त्या सामन्यात त्याच्यावर आक्रमण होऊनही वॉर्नने स्वत:चं अस्तित्व दाखवून दिलं होतं. पहिल्या दिवसाचं अखेरचं षटक टाकण्यासाठी वॉर्नच्या हातात चेंडू सोपवला गेला. ते षटक मी अतिशय सावधपणे खेळलो. शेवटच्या चेंडूपर्यंत लक्ष जराही विचलित न होऊ देण्यासाठी मी माझ्याच मनाला सतत बजावत होतो. वॉर्न खरोखरच महान खेळाडू होता. तुम्हाला तो क्षणाचीही फुरसत मिळवून देत नसे. फलंदाजाला बेसावध क्षणी पकडण्याची किमया त्याच्यापाशी होती.

आस्ट्रेलियाच्या पहिल्या डावात मार्क वॉने तडफदार फलंदाजी करत नाबाद १५३ धावा काढल्या. द्रुतगती गोलंदाज मार्क कास्परोविझने आमचे पाच गडी बाद करून आस्ट्रेलियाला विजयाच्या जवळ नेऊन ठेवलं. दुसऱ्या डावात मी ३१ धावा केल्या. कास्परोविझचा चेंडू किंचित लवकर खेळल्यामुळे मी त्याच्याच हातात झेल देऊन बाद झालो. आम्ही केवळ १६९ धावा करू शकलो. आस्ट्रेलियाने त्या सामन्यात आपला खरा दर्जा दाखवून दिला यात शंकाच नव्हती. मालिकेच्या शेवटी विजय साकारता न आल्याने आम्ही मात्र निराश झालो.

'माझ्या कारकिर्दीतील एक अत्यंत अटीतटीने लढली गेलेली मालिका' असं मी त्या मालिकेचं वर्णन करेन. वैयक्तिकदृष्ट्या ती मालिका माझ्यासाठी फारच यशस्वी ठरली. त्या मालिकेत मी १११च्या सरासरीने जवळजवळ ४५० धावा काढल्या. अनेक आठवड्यांच्या कठोर परिश्रमाचं फळ मला मिळालं होतं. त्या यशाने माझं मन सुखावून गेलं.

पेप्सी तिरंगी मालिका, एप्रिल १९९८

कसोटी मालिकेनंतर पेप्सी तिरंगी मालिकेला सुरुवात झाली. झिंबाब्वे हा मालिकेतला तिसरा संघ होता. पहिला सामना १ एप्रिलला आस्ट्रेलियाविरुद्ध कोचीला होता. आजही माझ्या मनात त्या सामन्याच्या काही सुखद आठवणी आहेत. एकदिवसीय सामन्यात मी पुन्हा सलामीला फलंदाजी करू लागलो होतो. त्या मॅचमध्ये मी लवकर बाद झालो; पण सुदैवाने संघाच्या धावसंख्येवर त्याचा काहीच परिणाम झाला नाही. मधल्या फळीत अजय जडेजाने काढलेल्या शतकामुळे आम्ही ३०० धावांचा टप्पा ओलांडला होता.

आस्ट्रेलियाची सुरुवात थक्क करणारी होती. अ‍ॅडम गिलख्रिस्ट हा आमच्या पिढीतील सर्वोत्कृष्ट यष्टिरक्षक-फलंदाज त्यांच्यापाशी होता. त्यांच्या १२ षटकांत १०० धावा झाल्या होत्या. त्या गतीने ते ५० षटकांत सहज मॅच जिंकू शकत होते. २५ षटकांनंतर चेंडू माझ्या हातात सोपवला गेला. मी उजव्या हाताच्या फलंदाजांना लेग स्पिन, तर डावखुऱ्या फलंदाजांना ऑफ स्पिन गोलंदाजी करू लागलो.

क्रिकेटमध्ये काही अतर्क्य व विचित्र गोष्टी घडू शकतात. एखाद्या फलंदाजाला काही कारणास्तव एका विशिष्ट गोलंदाजाला सामोरं जायला आवडत नाही. हॅन्सी क्रोनिएसमोर खेळताना मी कायम अस्वस्थ असायचो. त्याने आपल्या मध्यमगती गोलंदाजीने मला अनेकदा बाद केलं आहे. एकीकडे ॲलन डोनाल्डसारख्याची गोलंदाजी मी सहजतेने खेळत असताना अचानक हॅन्सी क्रोनिए येऊन माझी विकेट काढत असे. मी अत्यंत अनपेक्षित पद्धतीने माझी विकेट गमवायचो. त्यामुळे एखाद्या विशिष्ट फलंदाजाला बाद करण्यासाठी तुम्ही स्वत: निष्णात गोलंदाज असण्याची आवश्यकता नसते. स्टीव्ह वॉच्या बाबतीत नेमकं हेच घडलं. माझी लेग स्पिन गोलंदाजी खेळताना स्टीव्ह वॉ अतिशय बेचैन असतो, हे मला कायम जाणवत आलं आहे. कोचीला मी त्याला एक सुरेख लेग स्पिन चेंडू टाकला. माझ्या हातात सोपा झेल देऊन स्टीव्ह बाद झाला.

ती विकेट मिळाल्यावर मी प्रचंड खूश झालो होतो. सामन्यातला तो निर्णायक क्षण ठरला. आस्ट्रेलियावर पुन्हा दडपण मिळवण्याची संधी त्या क्षणी आम्हाला मिळाली. त्यानंतर तितकेच समाधान मिळवून देणारी मायकेल बेव्हनचीही विकेट मला मिळाली. बेव्हन एकदिवसीय सामन्यात प्रभावी फलंदाज ठरला होता. मी टाकलेला चेंडू वळण्याआधीच तो पुढे सरसावत फटकावत होता. बेव्हन जर मला आधीच पुढे येताना दिसला तर मी चेंडू वेगाने लेग स्टम्पच्या खूप बाहेर टाकेन,

असं मी यष्टिरक्षक मोंगियाला आधीच बजावलं होतं. आमच्या सापळयात बेव्हन अडकला व मोंगियाने त्याला सफाईने यष्टिचीत केलं.

त्या मॅचमध्ये प्रत्येक चेंडू अगदी माझ्या मनासारखा पडत होता. असं फारच क्वचित वेळा घडतं. तिसाव्या षटकानंतरही मी स्लिपमध्ये क्षेत्ररक्षक ठेऊन गोलंदाजी करत होतो. माझ्या कारकिर्दीत मी एक विचित्र गोष्ट अनुभवली आहे. ज्या-ज्या वेळी मी लेग स्पिन गोलंदाजीचा अत्यंत कठोरपणे सराव केला होता, त्या वेळी मी कधीही चेंडू हव्या त्या टप्प्यावर टाकू शकत नव्हतो. पण अनेकदा कित्येक महिने सराव केलेला नसतानाही मॅचमध्ये ऐनवेळी मी नेमक्या टप्प्यावर चेंडू टाकू शकत असे. अखेर मी तांत्रिक बाबींचा फारसा बाऊ न करता, इच्छा होईल तेव्हा नेट्समध्ये लेग स्पिन गोलंदाजीचा सराव करू लागलो. अनिल कुंबळेने मला लेग स्पिन गोलंदाजीतील तांत्रिक बाजू समजावून सांगितली होती. तो मला म्हणाला की, सातत्याने उत्कृष्ट लेग स्पिन गोलंदाजी करण्यासाठी तुला तुझा खांदा स्थिर ठेवायला हवा. त्याच्या म्हणण्याचा अर्थ असा होता की, मी माझी बोटं, दंड व खांदा बराच वेळ एका सरळ रेषेत ठेवण्याचा सराव करायला हवा. तेवढा संयम माझ्यापाशी नव्हता. मी माझ्या नैसर्गिक क्षमतेवर विसंबून राहायचं ठरवलं. सहसा मी मॅचमध्ये एका वेळी जास्तीत जास्त तीन षटकं टाकायचो. त्यामुळे तेवढ्या अवधीत गोलंदाजीमध्ये वेगवेगळे प्रयोग करायचा मला परवानाच मिळालेला असायचा. चेंडू अधिक वळावा म्हणून मी कधीकधी चेंडूला जोरदार झटकाही देत असे. कोचीत माझा तो प्रयोग भलताच यशस्वी ठरला. मी ३२ धावांत पाच गडी बाद केले. आस्ट्रेलियाचा डाव २६८ धावांत आटोपला. आम्ही ४१ धावांनी विजय मिळवला.

आस्ट्रेलियाविरुद्धच्या दुसऱ्या सामन्यातही आम्ही आमचा चांगला फॉर्म कायम ठेवला. कानपूरच्या ग्रीन पार्क स्टेडियमवर ७ एप्रिलला तो सामना खेळला गेला. त्या खेळपट्टीवर फारशा धावा निघत नव्हत्या. आस्ट्रेलियाने आमच्यासमोर २२२ धावांचं माफक लक्ष्य ठेवलं. खेळपट्टीवर चेंडू अगदी खाली राहत होता. सुरुवातीपासूनच आक्रमक पवित्रा घेणं हाच अशा वेळी उत्तम पर्याय असतो, हे मला ठाऊक होतं. या मॅचमध्येही मी आणखी एक शतक काढलं. टॉम मूडीला मारलेला एक शॉट मला अजूनही आठवतो. टॉमने चेंडू टाकण्याआधीच मी क्रीज सोडून पुढे आलो होतो. त्याने लगेच चेंडूची दिशा बदलली. चेंडू लेग स्टम्पच्या बाहेर होता. मी पुढे आल्यामुळे चेंडू नीट फटकावणं मला अवघड गेलं. चेंडू मारताना माझा तोलही गेला, पण तरीही टप्पा पडू न देता मी चेंडू तडकावला होता. आश्चर्य म्हणजे बॉल स्टेडियममध्ये जाऊन पडला होता. त्याच इनिंग्जमध्ये वॉर्नचा एक चेंडू खेळताना मी पुन्हा पुढे सरसावलो. त्या वेळी चेंडू बॅटच्या खूप खाली लागला, 'झेल पकड' असं वॉर्न जोरात ओरडलाही; पण या वेळीही चेंडू लाँग ऑनला उभ्या असलेल्या क्षेत्ररक्षकाच्या डोक्यावरून जाऊन सीमारेषेपलीकडे पडला. त्या डावात मी एकूण सहा षटकार मारले. आम्ही ती मॅच सहज जिंकून अंतिम फेरीत प्रवेश मिळवला; पण दुर्दैवाने आस्ट्रेलियाने अंतिम सामन्यात आमचा पराभव केला. साखळीतले सर्व सामने जिंकल्यानंतर झालेल्या पराभवामुळे आम्ही खूप निराश झालो. दौऱ्याचा शेवट मनासारखा झाला नव्हता.

कोका-कोला कप, एप्रिल, १९९८

त्यानंतर लगेच आणखी एक तिरंगी मालिका खेळण्यासाठी आम्ही शारजाला गेलो. आस्ट्रेलिया व न्यूझीलंड हे मालिकेतील इतर दोन संघ होते. ती स्पर्धा दोन कारणांसाठी माझ्या कायमची स्मरणात राहिली आहे. एक म्हणजे, त्या स्पर्धेत मी माझ्या कारकिर्दीतली सर्वोत्कृष्ट फलंदाजी केली. दुसरं कारण म्हणजे, आम्ही शारजाला जात असताना विमानप्रवासात एक मजेशीर प्रसंग घडला. त्या वेळी भारतीय संघात दोन नवोदित खेळाडू होते. हरभजन सिंग आणि हरविंदर सिंग. हरविंदर सिंग हा मध्यमगती गोलंदाज होता. विमानातल्या सेविकेने दोघांना सूप घेणार का, असं विचारलं. दोघांनाही त्या वेळी इंग्लिश फारसं समजायचं नाही. हरविंदरला बहुधा तिचा प्रश्न समजला नसावा. समोर येईल ते गुपचूप घेण्यातच शहाणपणा आहे, असं हरविंदर हरभजनला म्हणाल्याचं मी अर्धवट ऐकलं. त्यानंतर सूपमध्ये काय मिक्स करावं हे हरविंदरला समजेना. त्याने सुपामध्ये मिठाऐवजी साखर टाकली. हरभजन हा जात्याच मिश्कील स्वभावाचा आहे. हरविंदरने केलेला गोंधळ त्याच्या पुरता लक्षात आलेला होता. तरीही तो हरविंदरला पुन्हा पुन्हा 'सूप कसं लागतंय, सूप आवडतंय ना' असं मुद्दाम विचारत

राहिला. हरविंदर बिचारा संकोचून गेला होता. झालेली चूक कबूल करण्याचं धैर्य त्याच्यापाशी नव्हतं. सूप आवडलं आहे, असं म्हणण्यावाचून त्याच्यासमोर पर्यायही नव्हता.

एप्रिलमध्ये शारजात प्रचंड उकाडा असतो. अंगाची लाही होत असते. अशा हवेत खेळताना तुमचा स्टॅमिना खऱ्या अर्थाने कसाला लागतो. मला तर माझ्या बुटांमधून उष्णता जाणवायची. पायाची सतत जळजळ होत असल्यामुळे मी बेचैन होऊन जात असे. तासन्तास खेळताना शरीराची दमछाक होई. दोन सामन्यांमध्ये फारशी विश्रांतीही मिळत नव्हती. खेळाडूच्या शारीरिक व मानसिक क्षमतेची आणि कौशल्याची ती सत्त्वपरीक्षाच होती.

२२ व २४ एप्रिल, १९९८ रोजी आस्ट्रेलियाविरुद्ध झालेले दोन्ही सामने सर्वांच्याच चांगले स्मरणात आहेत. त्यातली पहिली मॅच हा साखळीतला शेवटचा सामना होता. ती मॅच केवळ जिंकणंच महत्त्वाचं नव्हतं, तर अंतिम फेरीत प्रवेश करण्यासाठी त्या सामन्यात काही विशिष्ट धावांनी विजय मिळवणं आवश्यक होतं. प्राथमिक फेरीतील सर्व मॅचेस जिंकून आस्ट्रेलियाने आधीच अंतिम फेरी गाठली होती.

त्या दोनपैकी पहिल्या सामन्यात आस्ट्रेलियाने पहिली बॅटिंग करून भक्कम २८४ धावा केल्या होत्या. धावांचा पाठलाग करण्यासाठी आम्हाला उत्तम सलामी हवी होती. दुर्दैवाने पहिल्या २९ षटकांत आम्ही १३८ धावांच्या बदल्यात ४ गडी गमावले. त्यानंतर सामना थांबवावा लागला. माझ्या आयुष्यात मी प्रथमच वाळूचं वादळ पाहत होतो. मैदानाच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत वाळूच्या लाटा वेगाने वाहत होत्या. माझी पाच फूट पाच इंचाची बटू मूर्ती त्या हवेत पाहता पाहता विरून जाईल अशी क्षणभर मला भीती वाटून गेली. वाऱ्याचा आवाजही थरकाप उडवणारा होता. आम्ही फारच थोड्या अंतरापर्यंतचं पाहू शकत होतो. खेळाडूंना व पंचांना डोळ्यांत वाळू जायची भीती वाटली. सर्व जण तत्काळ जमिनीवर पालथे पडून राहिले. मी चटकन ॲडम गिलख्रिस्टच्या शेजारी जाऊन पालथा पडलो. मी आपला साधा विचार केला होता – वाऱ्यामुळे उडायची पाळी आली असती, तर मी गिलख्रिस्टला घट्ट पकडून राहणार होतो! आज मलाच माझ्या त्या विचाराची गंमत वाटत असली, तरी तो अनुभव खरोखरच चित्तथरारक होता.

एकूण ४५ मिनिटांहून जास्त वेळ व्यत्यय आल्यामुळे सामना ४६ षटकांचा करण्यात आला. परंतु आम्हाला सुरुवातीला मिळालेलं लक्ष्य फक्त आठच धावांनी कमी झालं होतं. जिंकण्यासाठी आता आम्हाला १७ षटकांत १३८ धावांची गरज होती. आजच्या टी-२०च्या जमान्यात कोणालाही हे लक्ष्य अतिशय मामुली वाटेल; पण १९९८मध्ये मात्र ते अत्यंत कठीण व कष्टसाध्य होतं. चार षटकांच्या बदल्यात केवळ आठ धावा कमी होणं हे आमच्या तर्काच्या पलीकडे होतं. आमचं आव्हान अधिकच अवघड झालं आहे हे आम्ही समजून चुकलो होतो. अर्थात अंतिम फेरीत प्रवेश मिळवण्यासाठी आम्हाला फक्त १०० धावा हव्या होत्या.

भारताचे भूतपूर्व कसोटी फलंदाज अंशुमन गायकवाड हे त्या वेळी आमच्या संघाचे मॅनेजर होते. त्यांच्यापाशी नेहमी सर्व आकडेमोड तयार असायची. बॅटिंगला पुन्हा जाण्यापूर्वी मी त्यांना लक्ष्य नेमकं किती धावांचं आहे, हे विचारून घेतलं. अंतिम फेरीसाठी आवश्यक असणाऱ्या १०० धावांवर आपण फक्त लक्ष केंद्रित करावं अशी माझ्या अनेक सहकाऱ्यांची धारणा होती. जिंकण्याच्या नादात अंतिम फेरीतील प्रवेश हुकण्याचा धोका त्यांना वाटत होता; पण मॅच जिंकूनच अंतिम फेरीत प्रवेश मिळवायचा मी मनोमन निर्धार केला होता. कारण मी छान बॅटिंग करत होतो. मी सहज व अचूकपणे शॉट्स मारत होतो. शिवाय आस्ट्रेलियाला हरवल्यामुळे अंतिम सामन्यात आम्ही त्यांच्यापेक्षा वरचढ ठरलो असतो.

आस्ट्रेलियन गोलंदाजांना स्थिरावू न देणं फार महत्त्वाचं होतं. खेळ सुरू झाल्या झाल्याच मी टॉम मूडीला षटकार मारून माझा इरादा स्पष्ट केला. त्यानंतर मी वॉर्नला दुसरा छक्का मारला. समोर येणाऱ्या प्रत्येक गोलंदाजावर मी जोरदार हल्ला चढवत होतो. मला स्ट्राइकपासून दूर ठेवण्यासाठी आस्ट्रेलियन खेळाडू जिवापाड प्रयत्न करत होते; पण माझा साथीदार व्हीव्हीएस लक्ष्मण मात्र अतिशय कौशल्याने मलाच जास्तीत जास्त फलंदाजी करण्याची संधी मिळवून देत होता. आज त्या मॅचकडे वळून बघताना मला लक्ष्मणची मनापासून माफी मागावीशी वाटते. त्या वेळी एका क्षणी मला हवी असलेली दुसरी धाव घ्यायला नकार दिल्याने मी त्याच्यावर खूपच चिडलो होतो. खरं म्हणजे, मी धावबाद होण्याचा धोका जाणवल्याने त्याने

नकार दिला होता; पण मी त्या वेळी क्षणभरही स्ट्राइक सोडायला तयार नव्हतो.

आम्ही २०० धावांचा टप्पा ओलांडला. ऑस्ट्रेलियाची धावसंख्या आता मला नजरेच्या टप्प्यात दिसू लागली होती. मला शेवटपर्यंत बॅटिंग करून सामना जिंकायचा होता; पण शेवटची तीन षटकं बाकी असताना पंचांनी मला बाद ठरवलं. मी बाद झालो नसतो तर आम्ही नक्कीच आस्ट्रेलियाची धावसंख्या ओलांडली असती. मी १४३ धावांवर असताना डॅनियल फ्लेमिंगच्या गोलंदाजीवर गिलख्रिस्टने झेल घेतल्यामुळे मला बाद ठरवलं गेलं. वस्तुत: तो चेंडू माझ्या खांद्याच्या उंचीवरून गेला होता. क्रिकेटच्या नियमांप्रमाणे तो नो-बॉल ठरला असता; पण क्रिकेटमध्ये अशा गोष्टी घडतच असतात. अखेर आम्ही सामना हरूनही अंतिम फेरीत प्रवेश मिळवला होता. बदला घेण्याची आमच्यापाशी आणखी एक संधी होती.

त्या सामन्याच्या आठवणींना उजाळा देत असताना मला अंशुमन गायकवाड यांच्या बाबतीत घडलेला एक किस्साही सांगावासा वाटतो. अंशुभाई आमचे मॅनेजर असतानाच्या काळात, त्यांच्याबद्दलच्या अनेक आठवणी माझ्या मनात अजून ताज्या आहेत. मी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाने प्रभावित झालो होतो. त्यांनीही मला अनेक प्रकारे मदत केली आहे; पण अंशुभाईंची एक वेगळीच खासियत होती. जिभेची आग होऊ शकेल इतका कोणताही तिखट पदार्थ ते अगदी सहज खाऊ शकत. आम्ही १९९९मध्ये न्यूझीलंडच्या दौऱ्यावर गेलो होतो. त्या वेळी त्यांनी आमच्या हॉटेलच्या शेफला त्यांच्यासाठी खास हिरव्या मिरच्यांचा ठेचा बनवायला सांगितला. शेफने त्यांचं आव्हान स्वीकारलं. थोड्याच वेळात तो बाउलभर ठेचा घेऊन आला. ‘ठेचा अतिशय तिखट आहे. तुम्ही जास्त खाऊ नका’, असंही तो नम्रपणे म्हणाला. अंशुभाईंनी त्याचे आभार मानत तो बाउल हातात घेतला. बाउलमधला सगळा ठेचा काही मिनिटांतच संपवून त्यांनी रिकामा बाउल पुन्हा शेफच्या हातात दिला. इतका तिखट ठेचा खाऊनही त्यांना जराही घाम आलेला नव्हता. अंशुभाईंनी शांतपणे त्या शेफला आणखी ठेचा बनवण्याची ऑर्डर दिली. शेफ थक्क होऊन त्यांच्याकडे पाहतच राहिला. खरं सांगायचं तर अंशुभाईंच्या जागी दुसरा कुणीही असता, तर त्याने अर्धा चमचा ठेचा खाण्याचीही हिंमत दाखवली नसती.

संस्मरणीय अंतिम लढत

आधीच्या सामन्यानंतर आम्ही जेव्हा हॉटेलवर पोचलो तेव्हा मी अतिशय दमलो होतो. खूप थकल्यामुळे मला रात्री झोपच येईना. रात्री दोन नंतर मला झोप लागली. अंतिम सामन्याला फक्त एक दिवस बाकी होता. शारीरिक तंदुरुस्तीच्या दृष्टीने ते काही चांगलं चिन्ह नव्हतं. अति उन्हाळयामुळे मला अगदी गळून गेल्यासारखं झालं होतं. शारीरिक व मानसिक थकवा घालवण्यासाठी मला काही अवधी हवा होता.

दुसऱ्या दिवशी मी उठलो, तेव्हा शरीर ताठ व अवघडून गेलं होतं. मी बाथरूमपर्यंतही चालू शकत नव्हतो. डिहायड्रेशनचा हा परिणाम होता. मी लगेच भरपूर पाणी प्यायलो. यापूर्वीही अनेकदा मी मॅचच्या दुसऱ्या दिवशी झोपून उठल्यावर नीट उठून उभाही राहू शकलेलो नव्हतो. कधीकधी अक्षरश: स्वत:ला खेचत मला बिछान्यावरून खाली उतरावं लागे. काही वेळा तर फिजिओ व मालीशवाल्याचा हात पकडून मी उभा राहत असे. आदल्या दिवशी जर मी शतक ठोकलं असलं किंवा माझ्या बॅटिंगमुळे संघाला विजय मिळवून दिला असला, तर अशा शारीरिक वेदनाही मला सुखावह वाटत असत. मात्र, जर सतत दोन दिवस क्षेत्ररक्षण केल्यामुळे माझी अशी अवस्था झाली असेल, तर ती मी सहन करू शकत नसे. शारजाच्या वेळी तक्रारीला जागाच नव्हती. इतक्या चांगल्या इनिंग्जच्या बदल्यात मी फारच छोटी किंमत मोजत होतो. दुपारच्या जेवणासाठी मार्क मस्कारेन्हासने मला त्याच्या हॉटेलवर बोलावलं होतं. आमच्याबरोबर रवी शास्त्री, शेन वॉर्न व रिची बेनॉही होते. रिची बेनॉ हे विश्वविख्यात क्रिकेटपटू होते. आस्ट्रेलियाचं कर्णधारपदही त्यांनी भूषवलं होतं. सर्वांबरोबर क्रिकेटव्यतिरिक्त इतर गप्पा मारून मी हॉटेलवर परतलो. मला माझ्या शारीरिक तंदुरुस्तीची फारशी फिकीर वाटत नव्हती. स्वत:चं शरीर योग्य वेळेत ताळयावर आणण्याएवढी आंतरिक क्षमता माझ्यापाशी होती. कालच्या अटीतटीच्या संघर्षानंतर लगेच उद्याच्या लढाईसाठी मला पुन्हा नव्या जोमाने मैदानावर उतरायचं होतं. मला माझ्या मानसिक तंदुरुस्तीची जास्त काळजी वाटत होती.

संध्याकाळी माझी मार्कबरोबर एका महत्त्वाच्या विषयावर छान चर्चा झाली. आम्ही कोका-कोला कप स्पर्धेत खेळत होतो. कोका-कोला कंपनी स्पर्धेची प्रायोजक होती. कंपनीने मी आदल्या रात्री खेळलेल्या इनिंग्जबद्दल मला २५ हजार पौंडांचं विशेष पारितोषिक द्यायचं ठरवलं होतं. रक्कम खूप मोठी होती. 'त्या रकमेचं तू काय करणार,' असं मार्कने मला विचारलं. मी म्हटलं की, ''माझ्या संघातील सर्व सहकाऱ्यांबरोबर मी ती रक्कम विभागून घेणार.'' प्रत्येक बक्षीस सर्वांमध्ये विभागून घेण्याची पद्धत होती. त्यामुळे माझ्या मनात काही वेगळा विचार येण्याचा प्रश्नच नव्हता. त्यानंतर तो विषय पुन्हा आमच्या चर्चेत निघाला नाही. रात्री झोपताना माझ्याही मनातून तो विचार निघून गेला होता.

अंतिम सामन्यात पुन्हा आस्ट्रेलियानेच पहिली फलंदाजी केली. या वेळी त्यांनी २७२ धावा केल्या. अंतिम सामन्याच्या दृष्टीने ती धावसंख्या चांगलीच आव्हानात्मक होती. सुरुवातीला एकही विकेट गमावणं, आम्हाला परवडणारं नव्हतं. आधी शांतपणे खेळून नीट जम बसवायचा असं मी ठरवलं. मी पहिल्या चेंडूपासून आस्ट्रेलियन गोलंदाजीवर आक्रमण करावं अशी प्रेक्षकांची इच्छा होती. ते अर्थातच शक्य नव्हतं. माझी आधीची इनिंग्ज प्रेक्षकांच्या मनात अजूनही ताजी होती. आजही मी त्याच मूडमध्ये सुरुवात करावी असं त्यांना वाटत होतं; पण परिस्थिती खूप वेगळी होती. हा एक नवा सामना होता आणि मी पुन्हा एक नवी इनिंग्ज खेळत होतो. मला पुन्हा एकदा शून्यापासून सुरुवात करायची होती. प्रेक्षकांना वाटत होतं, तेवढी गोष्ट सोपी नव्हती.

या वेळी ऑस्ट्रेलियन गोलंदाजांनी अगदी सरळ रेषेत मारा केल्यामुळे परिस्थिती अधिकच अवघड बनली होती. विकेट शाबूत ठेवण्यासाठी मला शर्थीचे प्रयत्न करावे लागले. डॅमियन फ्लेमिंगने मला टाकलेलं पहिलं षटक जबरदस्त होतं. त्या षटकातील पहिल्या पाच चेंडूंवर एकही धाव निघाली नाही. सहावा चेंडू बॅटच्या आतल्या कडेला लागून सीमारेषापार गेला होता. मी अगदी थोडक्यात वाचलो होतो. चेंडू यष्टींपासून फक्त दोन इंच दुरून गेला होता. मी स्वत:लाच सावध केलं. थकवा अजून पूर्णपणे गेला नव्हता. वातावरणाशी पुन्हा नव्याने जुळवून घेण्यासाठी मला काही वेळ खेळपट्टीवर शांतपणे उभं राहणं आवश्यक होतं. शॉट्स खेळण्याचा आत्मविश्वास येईपर्यंत संयम राखणं जरुरीचं होतं.

आस्ट्रेलियन गोलंदाज ऑफ स्टम्पची रेषा पकडून टिच्चून गोलंदाजी करत होते. पहिल्या पाच षटकांत आमच्या फक्त १२ धावा झाल्या होत्या. फटका मारण्याजोगा चेंडूच मिळत नव्हता. मी आतून अस्वस्थ झालो होतो. दडपण भलतच वाढू लागलं होतं. त्यातून बाहेर पडण्यासाठी काहीतरी वेगळं करण्याची गरज होती. धावगती वाढवण्यासाठी आता धोका पत्करणं भाग होतं. मायकेल कास्परोविझने टाकलेल्या सहाव्या षटकात मी प्रथमच क्रीज सोडून पुढे आलो. बॉल बॅटच्या अगदी मध्यावर लागला आणि चेंडू सीमारेषेवरून पलीकडे पोचला. प्रेक्षकांमध्ये उत्साहाची लाट पसरली. मी अचानक घेतलेल्या आक्रमक पवित्र्यामुळे गोलंदाज चकित झाला होता. तो पुढचा बॉल बाउन्सर टाकणार हे मी आधीच ओळखलं होतं. षटकार मारल्यानंतर द्रुतगती गोलंदाजाची ती स्वाभाविक प्रतिक्रिया असते. मी बाउन्सर खेळण्यासाठी तयार होतो. कास्परोविझने आखूड टप्प्याचा चेंडू टाकला. या वेळी मी क्रीजमध्येच उभा राहून तोही चेंडू स्टेडियममध्ये टोलवला. कास्परोविझसह सगळा आस्ट्रेलियन संघच एकदम गडबडून गेला. धोका स्वीकारल्याचा नक्कीच फायदा झाला होता. मला माझी लय पुन्हा गवसली होती. आता आणखी धोका पत्करण्याची काहीच गरज उरली नव्हती. धावांचा पाठलाग योग्य दिशेने सुरू झाला होता.

सुरुवातीला नयन मोंगियासोबत व नंतर अझरच्या मदतीने मी माझी इनिंग्ज मला हवी तशी नियंत्रित करू शकलो. त्यानंतर आम्ही आस्ट्रेलियन गोलंदाजांना पुन्हा तोंड वर करू दिलं नाही. सामन्याचं चित्र हळूहळू आमच्या बाजूने पालटू लागलं. शेन वॉर्नने राउंड द विकेट गोलंदाजी सुरू केली. मी पुन्हा एकदा त्याला मिड विकेट व स्क्वेअर लेगवरून चौकार मारले. त्या मॅचमध्ये वॉर्न प्रभावी ठरू शकला नाही. त्याने षटकामागे सहापेक्षा अधिक धावा दिल्या. त्यामुळे टॉम मूडीला पाचारण करण्याखेरीज कर्णधारासमोर पर्याय नव्हता. आम्ही टॉम मूडीवर सुरुवातीपासून शेवटपर्यंत हल्ला चढवला. त्यानंतर गोलंदाजीसाठी आलेल्या मार्क व स्टीव्ह वॉचीही आम्ही तीच गत केली.

अखेर मी जेव्हा १३४ धावा काढून बाद झालो तेव्हा विजयाचा फक्त उपचार शिल्लक उरला होता. सहा षटकांत आम्हाला केवळ २४ धावा हव्या होत्या. मी पॅव्हिलियनकडे परतत होतो. अचानक माझं लक्ष साइड स्क्रीनजवळ उभ्या

असलेल्या मार्क मस्कारेन्हासकडे गेलं. माझं अभिनंदन करण्यासाठीच तो तिथे उभा होता. मी घामाने चिंब भिजलो होतो. आता तो मला घट्ट आलिंगन देणार, हे माझ्या लक्षात आलं. ''मला मिठी मारलीस तर तुझे कपडे खराब होतील,'' असं मी त्याला बजावलं; पण मार्कला त्याची पर्वा नव्हती. त्याने हसत हसत मला हवेत उंच उचललं.

सामन्यानंतर झालेला बक्षीस समारंभ माझ्यासाठी खास सन्मानाचा ठरला. 'केवळ सचिनमुळे सामना हरलो,' अशी स्टीव्ह वॉने जाहीर कबुली दिली. आस्ट्रेलियन कर्णधाराकडून अशी कौतुकाची पावती मिळणं ही माझ्यासाठी विशेष गोष्ट होती. त्या दिवशी माझा वाढदिवसही होता. वाढदिवसाला यापूर्वी इतकी सुंदर भेट मला कधीच मिळाली नव्हती.

त्याच समारंभात कोका-कोला कंपनीने एक विशेष घोषणा केली. मला मर्सिडीज एस.एल.६०० ही गाडी भेट देत असल्याचं त्या वेळी त्यांनी जाहीर केलं. गाड्यांची तर मला पहिल्यापासूनच खूप आवड होती. १९८८मध्ये मी स्टार क्रिकेट क्लबबरोबर प्रथमच इंग्लंडला गेलो होतो. तिथे मला बीएमडब्ल्यूसारख्या आलिशान गाड्यांचं पहिल्यांदाच दर्शन झालं होतं.

परतीचा आनंद

आम्ही मुंबईला परतलो तेव्हा आमच्या स्वागतासाठी अलोट जनसागर उसळला होता. चाहत्यांचा तो अभूतपूर्व प्रेमवर्षाव पाहून सारे खेळाडू भारावून गेले होते. आम्ही सर्व खेळाडू अखेर क्रिकेटवर निरतिशय प्रेम करणाऱ्या आमच्या चाहत्यांसाठीच खेळत असतो. त्यांना खेळाचा जास्तीत जास्त आनंद लुटता यावा हाच आमचा अंतिम हेतू असतो.

पण कधीकधी मात्र गोष्टी नियंत्रणाच्या पलीकडे जाऊ शकतात. शारजाहून आल्यानंतर मुंबईच्या शिवाजी पार्कवर डबल विकेट स्पर्धेचं आयोजन केलं होतं. संयोजकांच्या वतीने प्रवीण आमरेने मला त्या स्पर्धेत खेळण्याचं आमंत्रण दिलं. नवोदित क्रिकेटपटूंना प्रोत्साहन मिळावं अशी संयोजकांची त्यामागची भूमिका होती. माझ्या मनात शिवाजी पार्क जिमखान्याबद्दल अतिशय आदराचं स्थान आहे. मी अंजलीला बरोबर घेऊन तिथे जायचं ठरवलं. शिवाजी पार्कला पोचल्यावर लक्षात आलं की, मला पाहण्यासाठी खूपच गर्दी झाली आहे. माझ्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला होता. त्या गोंधळामधून बाहेर पडणंही मुश्कील होऊन गेलं होतं. आम्ही कसेबसे घरी पोचलो; पण पुन्हा एकदा मला लोकांच्या प्रेमासमोर नतमस्तक होऊन जावसं वाटलं. क्रिकेटशौकीन जेव्हा माझी स्वाक्षरी मागायला येतात तेव्हा मी मनातून सुखावतो. जमलेल्या प्रत्येकाला मी आवर्जून स्वाक्षरी देतो. आमचा खेळ पाहण्यासाठी हेच सर्व जण स्टेडियमवर तासन्तास थांबलेले असतात. या चाहत्यांमुळेच आज भारतात क्रिकेटला एवढी लोकप्रियता लाभलेली आहे. क्रिकेटचं अफाट वेड असलेले असे कोट्यवधी चाहते मिळणं हे खरोखरच खेळाचं व खेळाडूंचं भाग्यच म्हणायला हवं.

१९९८ सालातले जानेवारी ते एप्रिल – हे चार महिने माझ्यासाठी खरंच बहराचे गेले. त्या चार महिन्यांनी मला खूप समाधान मिळवून दिलं. आस्ट्रेलियावर आक्रमण करण्यात मी आघाडीवर होतो. शेन वॉर्नविरुद्धच्या वैयक्तिक लढतीचा मी पुरेपूर आनंद लुटला होता. माझ्या फलंदाजीला आलेला बहर पुढेही तसाच बहरत राहिला. नोव्हेंबरला आम्ही पुन्हा शारजात गेलो. श्रीलंका व झिंबाब्वेविरुद्ध झालेल्या चँपियन ट्रॉफीचंही विजेतेपद आम्ही पटकावलं.

त्या स्पर्धेतील एक आठवण अजून ताजी आहे. साखळीतला अखेरचा सामना झिंबाब्वेविरुद्ध होता. त्या सामन्यात द्रुतगती गोलंदाज हेन्री ओलोंगाच्या एका आखूड टप्प्याच्या चेंडूवर मी विचित्र प्रकारे बाद झालो होतो. अशा प्रकारे बाद होणं मला खूपच अपमानास्पद वाटलं होतं. अंतिम सामन्यापर्यंत तो सल माझ्या मनातून गेला नव्हता. इतका की, त्याचा बदला घेण्यासाठी मी इरेला पेटलो होतो. जणूकाही मुष्टियुद्धातील मारेन किंवा मरेन अशी जिद्द माझ्यात निर्माण झाली होती. अंतिम सामन्यात मी ९२ चेंडूत १२४ धावा काढल्या. एक गोष्ट मात्र मला कबूल करायला हवी की, त्या मॅचमध्ये मी मारलेले काही शॉट्स हे क्रिकेटच्या पुस्तकातले आदर्श शॉट्स नक्कीच नव्हते. मी त्या सामन्यात मनाला येईल तसा चेंडू फटकावत होतो. क्रिकेटमध्ये अनेकदा असं घडतं. जेव्हा तुमची फलंदाजी ऐन बहरात आलेली असते, तेव्हा तुम्ही मारलेले अनेक वेडेवाकडे फटकेही तुम्हाला चौकार मिळवून देतात. परंतु जेव्हा तुमची बॅट तुमच्यावर रुसलेली असते, तेव्हा एखाद्या खराब चेंडूवरही तुम्ही विकेट गमावून बसता.

अविस्मरणीय आमंत्रणं

चँपियन ट्रॉफी स्पर्धेनंतर जुलै व ऑगस्ट, १९९८मध्ये घडलेल्या दोन विशेष घटना माझ्या कायमच्या स्मरणात राहिल्या आहेत. पहिली घटना जुलैमध्ये घडली. १८ जुलैला लॉर्ड्स मैदानावर प्रिन्सेस डायनाच्या स्मरणार्थ एक क्रिकेट सामना आयोजित केला होता. त्या मॅचमध्ये खेळण्यासाठी मला आमंत्रित केलं होतं. माझ्या प्रतिस्पर्धी संघात ग्लेन मॅक्ग्रा, जवागल श्रीनाथ, ॲलन डोनाल्ड आणि अनिल कुंबळे असे तगडे गोलंदाज होते. त्या सामन्यात सलामीला येऊन मी १२५ धावा काढल्या. मी लॉर्ड्सवर कसोटी शतक काढू शकलो नाही; पण चार दर्जेदार गोलंदाजांविरुद्ध काढलेलं ते शतक मला खूप समाधान देऊन गेलं.

ऑगस्टमध्ये दुसरा अविस्मरणीय प्रसंग घडला. सर डॉन ब्रॅडमनना त्यांच्या ॲडलेडच्या घरी भेटण्यासाठी मला व शेन वॉर्नला आमंत्रण दिलं गेलं. सर डॉन यांच्या नव्वदाव्या वाढदिवसानिमित्त ते खास निमंत्रण होतं. माझ्यासाठी तो मोठा सन्मानच होता. एवढ्या महान माणसाची भेट होणार म्हणून आम्ही थरारून गेलो होतो व काहीसे अस्वस्थही झालो होतो. मला आठवतं की, सर डॉन यांच्याबरोबर प्रथम कोणी बोलायचं यावरून टॅक्सीमध्ये शेन व माझ्यात छोटासा वादही झाला होता. मी म्हटलं की, ''शेन, तूच आधी बोलायला हवंस. कारण तू आस्ट्रेलियन आहेस.'' शेन मला म्हणाला की, ''तू सर डॉनसारखा बॅट्समन आहेस. आधी तूच बोललं पाहिजेस.'' पण सर डॉननी केलेल्या प्रेमळ स्वागतामुळे आमच्यातला बुजरेपणा निघून गेला. थोड्याच वेळात आम्ही तिघंही मोकळेपणाने गप्पा मारू लागलो. सर डॉन मला प्रेमाने 'बोन्झर' म्हणत होते.

मी त्यांना विचारलं की, ''आजच्या काळात तुम्ही कसे खेळले असता?'' ते म्हणाले की, त्यांच्या वेळी त्यांनी जेवढ्या धावा काढल्या, तितक्या त्यांना आजच्या काळात काढता आल्या नसत्या. कारण आता खूपच बचावात्मक क्षेत्ररचना केली जाते. त्यांच्या काळात क्षेत्ररचनेत फारसा फरक केला जात नसे. एखादा फलंदाज जरी भरपूर धावा काढत असला, तरी १९३०च्या काळात डीप पॉइंटला क्षेत्ररक्षक ठेवण्याची पद्धत अस्तित्वातच नव्हती. ते असंही म्हणाले की, त्या वेळेपेक्षा आजचा क्षेत्ररक्षणाचा दर्जा खूपच सुधारलेला आहे.

आम्ही त्यांना शेवटचा प्रश्न विचारला की, ''आज ते खेळत असते, तर त्यांच्या फलंदाजीची सरासरी किती झाली असती?''

''सत्तरच्या आसपास,'' त्यांनी उत्तर दिलं. त्या उत्तराने आम्ही चकित झालो. सर डॉन यांची ९९.९४ ही प्रसिद्ध सरासरी आमच्या पक्की लक्षात होती. आम्ही पुन्हा त्यांना विचारलं की, आपली सरासरी इतकी कमी झाली असती असं खरंच तुम्हाला वाटतं? त्यावर ते मिश्कीलपणे म्हणाले होते, ''नव्वदाव्या वर्षी सत्तरच्या सरासरीने खेळणं ही काही कमी मानाची गोष्ट नव्हे!''

एकूणच १९९८ हे माझ्या कारकिर्दीतलं विशेष वर्ष ठरलं.

आस्ट्रेलियाचा भारत दौरा, १९९८ – बॉर्डर-गावसकर करंडक

पहिली कसोटी. चेन्नई – ६ ते १० मार्च, १९९८

भारत २५७ (एनएस सिद्धू ६२, एनआर मोंगिया ५८, आर द्रविड ५२, **एसआर तेंडुलकर** ४; जीआर रॉबर्टसन ४-७२, एसके वॉर्न ४-८५) व ४१८-४ घोषित (**एसआर तेंडुलकर** १५५*, एनएस सिद्धू ६४, एम अझरुद्दीन ६४, आर द्रविड ५६)

आस्ट्रेलिया ३२८ (आयए हिली ९०, एमई वॉ ६६, जीआर रॉबर्टसन ५७; ए कुंबळे ४-१०३, एसएलव्ही राजू ३-५४) व १६८ (एसके वॉर्न ३५, आयए हिली ३२*; ए कुंबळे ४-४६)

भारत १७९ धावांनी विजयी

दुसरी कसोटी. कोलकाता – १८ ते २१ मार्च, १९९८

आस्ट्रेलिया २३३ (एसआर वॉ ८०, आरटी पाँटिंग ६०; एससी गांगुली ३-२८, ए कुंबळे ३-४४, जे श्रीनाथ ३-८०) व १८१ (एमए टेलर ४५; ए कुंबळे ५-६२, जे श्रीनाथ ३-४४)

भारत ६३३-५ घोषित (एम अझरुद्दीन १६३*, एनएस सिद्धू ९७, व्हीव्हीएस लक्ष्मण ९५, आर द्रविड ८६, **एसआर तेंडुलकर** ७९, एससी गांगुली ६५)

भारत एक डाव व २१९ धावांनी विजयी

तिसरी कसोटी. बंगळुरू – २५ ते २८ मार्च, १९९८

भारत ४२४ (**एसआर तेंडुलकर** १७७, एनएस सिद्धू ७४, एम अझरुद्दीन ४०; एसी डेल ३-७१, एसके वॉर्न ३-१०६) व १६९ (एनएस सिद्धू ४४, **एसआर तेंडुलकर** ३१; एमएस कास्परोविझ ५-२८, जीआर रॉबर्टसन ३-२८, एसके वॉर्न २-८०)

आस्ट्रेलिया ४०० (एमई वॉ १५३*, एमजे स्लेटर ९१, डीएस लेहमन ५२; ए कुंबळे ६-९८, व १९५-२ (एमए टेलर १०२*, एमजे स्लेटर ४२; **एसआर तेंडुलकर** १-४१)

आस्ट्रेलिया ८ गडी राखून विजयी

भारत मालिकेत २-१ विजयी

१०.
उलथापालथ

मैदानावर मी चमकदार कामगिरी करत असताना माझं घरगुती जीवन पूर्णपणे बदलून गेलं होतं. १२ ऑक्टोबर, १९९७ रोजी अंजलीने मला एक मौल्यवान भेट दिली. आमच्या घरात बाळपावलं उमटली. फेब्रुवारी, १९९७मध्ये भारतीय संघ झिंबाब्वेच्या दौऱ्यावर होता. आम्हाला मूल होणार असल्याची सुवार्ता त्याच वेळी मी संघातल्या माझ्या सहकाऱ्यांना सांगितली होती. त्याबद्दल सर्वांना उत्स्फूर्तपणे जंगी पार्टीही दिली होती. मी वडील होणार या कल्पनेनेच मी रोमांचित झालो होतो.

ती रात्र मी कधी विसरू शकत नाही. अंजलीला हॉस्पिटलमध्ये नेलं होतं. ब्रीच कँडीच्या तिच्या वडिलांच्या घरापासून हॉस्पिटल फक्त दोन मिनिटांवर होतं. मी त्यांच्या घराच्या गच्चीमध्ये अस्वस्थपणे बसलो होतो. माझ्याबरोबर माझा मित्र सुनील हर्षे होता. हॉस्पिटलचे बालरोगचिकित्सक डॉक्टर अजित गजेंद्रगडकर हे अंजलीचे मित्र होते. 'अंजलीला डिलिव्हरी रूममधून बाहेर आणल्याक्षणी मी तुला फोन करतो,' असं त्यांनी मला सांगितलं होतं. मी हॉस्पिटलमध्ये थांबलो असतो, तर लोकांनी गर्दी केली असती. हॉस्पिटलच्या व्यवस्थापनाला ते अडचणीचं ठरलं असतं. त्यामुळे डॉक्टरांच्या फोनची वाट पाहत मी घरीच थांबायचं ठरवलं. मला आठवतं, आकाशाकडे पाहत मी गच्चीवर पडून राहिलो होतो. क्षणाक्षणाला माझी अस्वस्थता व बेचैनी वाढत होती. मी सुनीलला म्हटलं, ''अरे, मी काही तासांतच बाप होणार आहे. माझ्या आयुष्याला एक नवीन वळण मिळणार आहे.'' अंजली व बाळ सुखरूप आणि निरोगी राहो, एवढीच मी मनातल्या मनात परमेश्वराकडे प्रार्थना करत होतो.

दुसऱ्या दिवशी डॉक्टर गजेंद्रगडकरांचा फोन आला. माझ्या आनंदाला पारावार राहिला नाही. काही मिनिटांतच मी हॉस्पिटलमध्ये पोचलो. माझ्या हातात व्हिडिओ कॅमेरा होता. मी वॉर्डजवळ पोचत असतानाच समोरून बाळाला हातात घेऊन डॉक्टर येत होते. मुलगी झाल्याचं डॉक्टरांनी मला सांगितलं. मी परमेश्वराचे आभार मानले. माझ्या मुलीला डॉक्टर बाहेर घेऊन येत असतानाचा प्रत्येक क्षण मी कॅमेऱ्यात टिपला.

स्वत:चं मूल पहिल्यांदाच डोळे भरून पाहण्याचा क्षण विलक्षण असतो. त्या भावनेचं वर्णन करता येणं अशक्य आहे. मी अंजलीला जाऊन भेटलो. तिला म्हटलं, ''आपल्या मुलीचं नाव 'सारा' ठेवायचं.'' सारा हे नाव अजितने सुचवलं होतं. आम्हाला दोघांनाही ते नाव खूप आवडलं होतं. डॉक्टरांनी मला जेव्हा साराला घ्यायला सांगितलं, तेव्हा मात्र मी गडबडून गेलो. तिला कुशीत घ्यायची माझी फार इच्छा होती, पण अजूनपर्यंत एवढ्या कोवळ्या बाळाला मी कधीच उचलून घेतलं नव्हतं.

मी हॉस्पिटलच्या व्यवस्थापकांकडे त्या रात्री अंजलीच्या खोलीत राहायची परवानगी मागितली. दोघींना एकटं सोडून मी राहूच शकत नव्हतो. हॉस्पिटलमध्ये दोघीही सुखरूप व सुरक्षित होत्या, याबद्दल माझ्या मनात शंका नव्हती. पण मलाच पूर्ण वेळ दोघींबरोबर राहायचं होतं. त्यांनी मला एका अटीवर परवानगी दिली. मला फरशीवर गादी टाकून झोपावं लागणार होतं. मी त्यांची अट आनंदाने मान्य केली.

सारा हुबेहूब माझ्यासारखी दिसते, असं सर्वांचं मत होतं. तिला हाताचा पाळणा करून निजवायला मला फार आवडायचं. थोडा वेळ डोलावलं की, ती चटकन झोपून जायची. त्या वेळी मी दाढी राखली होती. ती काही महिन्यांची झाल्यावर मी तिला मांडीवर घ्यायचो. मग हलकेच तिच्या केसांवर माझी दाढी घासायचो. साराला ते खूप आवडायचं.

आमचा बाप-लेकीचा हा खेळ दिवसातून अनेक वेळा सुरू असे.

वर्षभर सतत मॅचेस आणि दौरे असल्यामुळे मी घरात नसायचोच. त्यामुळे साराला वाढवण्याचा सगळा भार एकट्या अंजलीवर पडत असे; पण त्याबद्दल तिने कधीही माझ्यापाशी तक्रार केली नाही. 'जास्त वेळ घरी रहा,' असा हट्ट कधी धरला नाही. मलाच माझ्या तान्ह्या मुलीला सोडून जाणं जिवावर येत असे. बऱ्याच दिवसांनी जेव्हा मी घरी परतायचो, तेव्हा सारामध्ये झालेला बदल मला दिसायचा. मी साराच्या सहवासातल्या मौल्यवान क्षणांना मुकतो आहे, हे त्या वेळी मला प्रकर्षाने जाणवायचं.

साराचा पहिला परदेशप्रवास डिसेंबर, १९९८मध्ये न्यूझीलंडला झाला. सुरुवातीला आमचा मुक्काम नेपियरला होता. आरामदायक सर्व्हिस अपार्टमेंट्समध्ये टीमची सोय करण्यात आली होती. मला चार खोल्यांचा फ्लॅट दिला होता. अंजली व साराने एका बेडरूममध्ये राहायचं आणि मी दुसरी बेडरूम वापरायची असं ठरलं. सारा नुकतीच एक वर्षाची झाली होती. दोन देशांमधल्या वेळेतल्या फरकाशी जुळवून घेणं तिला अवघड गेलं. ती रात्रभर जागी असायची. अंजलीने रात्रभर आपल्याबरोबर खेळावं, अशीही तिची अपेक्षा असायची. मी तिला जबरदस्तीने झोपवायचो. पण तासाभरातच उठून ती चारही खोल्यांतून हिंडत राहायची. दुसऱ्या दिवशी मॅच किंवा सराव असल्यामुळे रात्रभर जागणं मला शक्य नसायचं. त्यामुळे ती जबाबदारी अंजलीवर यायची.

एक वेळ अशी आली की, परिस्थिती आमच्या दोघांच्याही आटोक्याबाहेर गेली. अंजलीने नाइलाजाने भारतात परतायचं ठरवलं. एवढ्या छोट्या मुलीला एकटीने सांभाळणं अशक्य होतं. सारासाठी वेगळं जेवण बनवणं, तिचे कपडे धुणं सगळंच अंजलीला करावं लागत होतं. एवढं करून रात्रीची झोपही तिला मिळत नव्हती. कारण सारा त्या वेळी खेळायच्या मूडमध्ये असायची. त्याच वेळी एकदा आम्ही तिला बागेत घेऊन गेलो. बागेतल्या तळ्यात बदकांना खाणं भरवण्यात ती एकदम रमून गेली. तिला झालेला आनंद बघून आम्ही दोघं इतके खूश झालो की, अंजलीने भारतात जायचा विचार रद्द करून टाकला.

न्यूझीलंडमध्ये साराच्या बाबतीत घडलेला आणखी एक प्रसंग मी कधीच विसरू शकत नाही. माझ्या बेडरूमचा दरवाजा मी कायम उघडा ठेवायचो. त्यामुळे सारा तिथे कधीही येऊ शकायची. एकदा सकाळी भज्जी (हरभन सिंग) माझ्याकडे आला होता. साराकडे पाहून तो म्हणाला, ''साराच्या तोंडात काहीतरी असावं असं मला वाटतंय, जरा नीट बघ.'' मला आश्चर्य वाटलं. आम्ही तर तिला काहीच खायला दिलं नव्हतं. बऱ्याच विनवण्या केल्यानंतर साराने तोंड उघडलं. तिच्या तोंडात चार-पाच चेरी स्टोन्स होते. क्षणभर माझ्या काळजाचा ठोका चुकला. काही वेळ तरी ते तिच्या तोंडात असावेत. भज्जीमुळे एक फार मोठा गंभीर प्रसंग टळला होता.

भारतीय संघाने त्या वर्षी नाताळ व नववर्ष न्यूझीलंडमध्ये साजरं केलं. पण खरी गोष्ट अशी घडली होती की, ख्रिसमस साजरा करण्याऐवजी त्या दिवशी आमच्यावर उपाशी राहायची वेळ आली होती; पण वेलिंग्टनमध्ये राहणाऱ्या दोन भारतीयांमुळे आम्ही बचावलो. वेलिंग्टनमध्ये २४ तारखेच्या रात्रीपासून २६ डिसेंबरच्या सकाळपर्यंत दुकानं, हॉटेलं सारं काही बंद असतं, याची आमच्यापैकी कोणालाच काही कल्पना नव्हती. भारतात त्या दिवशी रात्रीपर्यंत जल्लोष सुरू असतो. पण वेलिंग्टनमध्ये आम्ही राहत असलेल्या हॉटेलातही आम्हाला काही मिळणार नव्हतं. जेवणाची सोय आमची आम्हाला करावी लागणार होती. आम्ही हवालदिल झालो. त्याच वेळी मोरी पटेल, इलेश पटेल आणि नानूभाई देवासारखे आमच्या मदतीला आले.

मोरीभाई, इलेशभाई व नानूभाई ह्यांनी आता वेलिंग्टनचं नागरिकत्व स्वीकारलं आहे. नाताळच्या दिवशी ते आमच्यासाठी एकाहून एक चमचमीत पदार्थ घेऊन आले. बऱ्याच दिवसांनी अस्सल भारतीय जेवण मिळाल्यामुळे आम्ही सर्व जण खूश झालो होतो. काही वेळापूर्वी आमच्यावर उपाशी राहण्याची पाळी आली होती. आता घरच्या जेवणावर आम्ही ताव मारत होतो. माझ्या त्यानंतरच्या प्रत्येक न्यूझीलंड दौऱ्यात पटेल कुटुंब मला भेटत राहिलं. कधीकधी तर आमची मॅच पाहायला ते आस्ट्रेलियातही येत. येताना प्रत्येक वेळी ते आमच्यासाठी जेवण व चहा घेऊन यायचे. इलेशभाईने बनवलेला

देशी चहा तर आमच्या टीममध्ये हिट झाला होता. तो लांबून दिसताच मी पहिला प्रश्न विचारायचो, ''इलेशभाई, एक कप चहा पाजणार ना?''

न्यूझीलंडमध्ये सारा पहिल्यांदाच बोलायला लागली. दौऱ्यामध्ये तिने पहिलं बालगीत म्हटलं. तिच्या तोंडून उमटणाऱ्या प्रत्येक बोबड्या बोलाबरोबर माझं मन व कान तृप्त होत गेले.

वेदनादायक मालिका

पितृत्वाच्या जबाबदारीशी हळूहळू जुळवून घेत असताना अचानक उद्भवलेल्या पाठदुखीमुळे मी हडबडून गेलो. त्या दुखण्यातून बरं होण्यासाठी आठ महिने जावे लागले. जानेवारी, १९९९च्या अखेरीस पाकिस्तानबरोबर पहिली कसोटी होती. त्या सामन्यात मला पाठदुखीचा त्रास सुरू झाला.

पाकिस्तान संघ १३ वर्षांनंतर भारतात आला होता. पाकिस्तानबरोबर दोन कसोटी सामन्यांची मालिका आणि त्यानंतर भारत, पाकिस्तान व श्रीलंका संघ यांमध्ये होणाऱ्या 'आशिया कसोटी चँपियनशिप स्पर्धे'कडे सर्वांचं लक्ष लागलेलं होतं. पाकिस्तानकडे प्रभावी व प्रतिभावान गोलंदाज होते. वासिम अक्रम, वकार युनूस, ऑफ स्पिनर सकलेन मुश्ताक, लेग स्पिनर शाहिद आफ्रिदी आणि डावखुरा फिरकी गोलंदाज नदीम खान असा मोठा ताफा त्यांच्याकडे होता. मालिका जिद्दीने लढली जाणार यात शंकाच नव्हती.

चेन्नईचा कसोटी सामना अपेक्षेप्रमाणे दिवसागणीक रंगत गेला. दोन्ही संघांनी केलेल्या अप्रतिम खेळाने प्रेक्षकांना खिळवून ठेवलं होतं. तिसऱ्या दिवसअखेर विजयासाठी भारतासमोर २७१ धावाचं लक्ष्य होतं. धावसंख्येचा पाठलाग करणं सोपं नव्हतं. वासिम व वकारने पाकिस्तानला छान सुरुवात करून दिली. चौथ्या डावाची सुरुवात झाल्यानंतर थोड्याच वेळात आमची ६ धावा आणि २ गडी बाद, अशी स्थिती झाली. मी बॅटिंग करायला आलो तेव्हा खेळ संपायला एक तास शिल्लक होता. वासिम व वकार अजूनही ताज्या दमाने आक्रमक गोलंदाजी करत होते. राहुल माझ्या आधीपासून बॅटिंग करत होता. दिवसअखेरीस नाबाद राहून पुन्हा दुसऱ्या दिवशी लढायला तयार राहायचं होतं. अशी छोटी सत्रं खेळायला खूपच अवघड असतात. फलंदाज नाबाद राहिले तर दुसऱ्या दिवशी नव्या उत्साहाने बॅटिंगला सुरुवात करणार हे गोलंदाजांना ठाऊक असतं. त्यामुळे त्या छोट्याशा सत्रात आणखी एखादी बोनस विकेट मिळावी म्हणून ते जिवाचं रान करतात. तर अशा वेळी फलंदाजांसमोर फक्त आपली विकेट शाबूत ठेवणं एवढंच उद्दिष्ट असतं.

मी क्रीजवर आल्या आल्या वकारने दोन-तीन बाउन्सर्स टाकून माझं स्वागत केलं. एकदा तर तो माझ्याजवळ येऊन मला म्हणाला, ''बॉल नजर आयी?'' मी काहीच बोललो नाही, पण रोखलेल्या नजरेतून मी त्याला त्याच्या प्रश्नाचं उत्तर दिलं. मी जागेवरून हललोही नाही. नाइलाजाने तो गोलंदाजीसाठी परत वळला. मी स्वत:शीच पुटपुटलो, ''मित्रा, तुझे चेंडू काही फार वेगाने येत नाहीयेत.'' त्या छोट्याशा चकमकीमुळे मी केलेल्या निर्धाराला अधिकच बळकटी आली. तिसऱ्या दिवसअखेर मी २० धावांवर नाबाद होतो. 'चौथ्या दिवशी विजय मिळवायचाच,' असा निश्चय करून मी पॅव्हिलियनमध्ये परतलो.

दुसऱ्या बाजूला राहुलही नाबाद होता. अशा बिकट प्रसंगी राहुलसारखा साथीदार असल्यावर तुमच्या मनावर आलेलं बरंचसं दडपण दूर झालेलं असतं. राहुल नेहमीच एक बाजू भक्कमपणे लढवत आला आहे; पण दुसऱ्या दिवशी मात्र अपेक्षेप्रमाणे गोष्टी घडल्या नाहीत. वासिमच्या एका सुरेख चेंडूवर राहुलचा त्रिफळा उडाला. अझरही लवकर बाद झाला. त्यानंतर अचानक सौरवची विकेट गमावल्यामुळे आमची स्थिती ८२ धावा आणि ५ गडी बाद, अशी झाली. एका चांगल्या भागीदारीशिवाय तरणं अशक्य होतं.

नयन मोंगिया माझ्या जोडीला आला. मी त्याला संयमाने खेळायला सांगितलं. आमचे सगळे खंदे फलंदाज तंबूत परतल्याने आता मला आक्रमक पवित्रा घ्यावा लागणार होता. खेळावर मी पूर्ण लक्ष केंद्रित केलं होतं. संघाच्या यशाची जबाबदारी माझ्या एकट्यावर होती. मी अशा मन:स्थितीत होतो की, प्रत्येक चेंडू पडण्यापूर्वी मी मनोमन प्रार्थना करत होतो. नयन मोंगिया फलंदाजी करत असतानाही त्याला टाकलेला चेंडू मी कसा खेळलो असतो, याची मी मनातल्या मनात तालीम

करत होतो; इतका मी खेळात एकाग्र झालो होतो. आजूबाजूचं भानच मी विसरून गेलो होतो. डाव संपेपर्यंत मला बॅटिंग करायची आहे ही एकच गोष्ट माझ्या मनात भिनलेली होती.

आणि त्याच वेळी पाठीतून जीवघेणी कळ आली. चहापानाला पाऊण तास असताना माझ्या पाठीमध्ये भयंकर वेदना सुरू झाल्या. तोपर्यंत नयनची व माझी छान भागीदारी झाली होती. सामना भारताच्या बाजूने किंचित झुकू लागला होता, पण पाकिस्तानने अजून नवा चेंडू घेतला नव्हता. त्यामुळे खरं आव्हान अजून बाकी आहे, याची मला जाणीव होती. हातात नवा चेंडू आल्यावर वासिम व वकार सर्वस्व पणाला लावणार होते. चेन्नईतील उष्ण व दमट हवामान तापदायक ठरत होतं. पायांमधून पेटके यायला सुरुवात झाली होती. प्रत्येक चेंडू खेळणं ही सत्त्वपरीक्षाच होऊन बसली. पाठीतल्या कळा असह्य होऊ लागल्या. चहापानाची वेळ झाली आणि मी नि:श्वास सोडला. चहापानाच्या दरम्यान मी ड्रेसिंग रूममध्ये उताणा पडून राहिलो होतो. शरीरातील उष्णतला कमी करण्यासाठी माझ्या अंगावर ओले टॉवेल्स टाकले होते. माझं सर्व शरीर आखडून गेलं होतं. हालचाल करताना वेदना होत होत्या. आणखी दोन तास खेळणं अवघड जाणार होतं.

चहापानानंतर पाकिस्तानच्या गोलंदाजीवर आक्रमण करण्याखेरीज माझ्यापाशी पर्याय नव्हता. पाठीतून येणाऱ्या कळा मी फार वेळ सहन करू शकणार नाही हे मला समजत होतं. मी माझा बदललेला पवित्रा नयनला सांगितला. पुढच्या काही षटकात खणखणीत चौकार मारले. लक्ष्य हळूहळू आवाक्यात येऊ लागलं होतं. पाकिस्तानने घेतलेला दुसरा नवीन चेंडू नीट खेळून काढणं फक्त आवश्यक होतं. सहाव्या विकेटसाठी आम्ही १३६ धावांची भागीदारी केली. पाकिस्तानच्या हातून सामना निसटू लागला. आमची योग्य दिशेने वाटचाल सुरू असताना अचानक एक खराब फटका खेळून नयन बाद झाला. वासिमचा एक चेंडू टोलवत असताना चेंडू बॅटच्या कडेला लागून उंच उडाला. वास्तविक तो शॉट खेळण्याची काहीच गरज नव्हती. एका चुकीच्या शॉटमुळे नयनच्या चांगल्या इनिंग्जचा दुर्दैवी शेवट झाला. पाकिस्तान संघाच्या आशा पुन्हा जिवंत झाल्या.

नंतर आलेला सुनील जोशी चटकन स्थिरावला. त्याने सकलेनला एक षटकारही मारला. आम्ही दोघांनी सहा षटकांत ३६ धावा काढल्या. विजयासाठी फक्त १७ धावांची गरज होती; पण एव्हाना पाठदुखी असह्य झाली होती. मी सरळ उभा राहू शकत नव्हतो. छोटीशी हालचाल केली तरी मरणप्राय कळा येत होत्या. अशा अवस्थेत मी सकलेनचा 'दुसरा' मारायचा प्रयत्न केला. 'दुसरा' हे सकलेनचं मुख्य अस्त्र होतं. त्यावर त्याने चांगली हुकमत मिळवली होती. ऑफ स्पिनरने टाकलेला तो चेंडू टप्पा पडल्यावर नेहमीपेक्षा उलट बाजूला वळत असे. माझ्या अपेक्षेपेक्षा चेंडू जास्त उसळला व बॅटची वरची कड घेत हवेत उंच उडाला. मिड ऑफला उभा असलेला वासिम झेल पकडत असताना मला दिसत होता. त्याच्या हातून झेल सुटावा, अशी मी कळकळीने प्रार्थना करत होतो. पण अखेर मी १३६ धावा काढून बाद झालो. मी मनातून उद्ध्वस्त झालो होतो.

पॅव्हिलियनकडे चालत असताना शरीराला व मनाला खूप क्लेश होत होते. मला शेवटपर्यंत बॅटिंग करून विजय मिळवून द्यायचा होता. त्या वेळी आम्ही सामना हरू, असा विचारही माझ्या मनात आला नव्हता. जिंकण्यासाठी फक्त १७ धावा हव्या होत्या. अजून आमच्या तीन विकेट शिल्लक होत्या. श्रीनाथ व कुंबळे चांगली फलंदाजी करू शकायचे; पण समोर आमचा डाव कोसळताना पाहून माझा डोळ्यांवर विश्वास बसला नाही. २५८ धावांत आमचे सर्व गडी बाद झाले आणि १२ धावांनी आम्ही सामना हरलो. माझ्या साऱ्या आशाअपेक्षांचा चुराडा झाला. मी अश्रू आवरू शकलो नाही. पाठीची अवस्था तर अतिशय वाईट झाली होती आणि मनानेही मी कोलमडून गेलो होतो.

आयुष्यात प्रथमच त्या दिवशी मला मिळालेलं 'मॅन ऑफ द मॅच' पारितोषिक स्वीकारायला मी जाऊ शकलो नाही. राजसिंग डुंगरपुर माझं मन वळवण्याचा प्रयत्न करत होते; पण मी शरीराने व मनानेही पार थकून गेलो होतो. ''मी ड्रेसिंग रूम सोडून बाहेर जाण्याच्या मन:स्थितीत नाही,'' असं मी त्यांना सांगितलं. राजभाईंना माझं म्हणणं पटलं. मला अधिक आग्रह न करता ते निघून गेले. दुसऱ्या दिवशी आम्ही जेव्हा दिल्लीला निघालो, तेव्हा मी हातात छोटी बॅगही पकडू शकत नव्हतो. कुणीतरी माझ्या पाठीत सुया खुपसतं आहे, असं मला वाटत होतं. मी एका स्थितीत दोन मिनिटांपेक्षा जास्त उभा राहू शकत नव्हतो.

खरं म्हणजे मी त्यानंतरचे दिल्ली व कोलकात्याचे कसोटी सामने खेळायला नको होते; पण केवळ पाकिस्तानविरुद्ध

खेळायच्या जिद्दीमुळे मी ते सामने हट्टाने खेळलो. मी माझ्या शारीरिक स्थितीबद्दल बीसीसीआयला पूर्ण कल्पना दिली होती. कसोटीत खेळायचं की नाही, याचा निर्णय त्यांनी माझ्यावर सोपवला. मी मॅच खेळू शकेन, असं मला वाटलं.

४ फेब्रुवारी, १९९९ रोजी दिल्लीला सुरू झालेल्या दुसऱ्या कसोटीवर अनिल कुंबळेचं नाव कोरलं गेलं आहे. दुसऱ्या डावात त्याने ७४ धावांत सर्व १० गडी बाद करून विश्वविक्रमाची बरोबरी केली. त्याच्या या अद्वितीय कामगिरीमुळे आम्ही मालिकेत पाकिस्तानशी बरोबरी साधली. अनिलने भारताला अनेक विजय मिळवून दिले आहेत. दिल्लीच्या कोटला मैदानावर अनिलसमोर एकही पाकिस्तानी फलंदाज टिकू शकला नाही. जिम लेकरने १९५६मध्ये एका डावात १० गडी बाद केले होते. तशीच कामगिरी करणारा अनिल हा क्रिकेटच्या इतिहासात दुसरा गोलंदाज ठरला. पाकिस्तानच्या दुसऱ्या डावात प्रत्येक षटक टाकण्यापूर्वी मी अनिलची कॅप व स्वेटर पंच अरणी जयप्रकाश यांच्या हातात नेऊन देत होतो. तो प्रकार आम्हाला लाभदायक ठरत होता. मीही शेवटपर्यंत तसंच करत राहिलो. अनिलने आम्हाला पाकिस्तानविरुद्ध एकहाती विजय मिळवून दिला, यावर कुणाचा कदाचित विश्वास बसणार नाही; पण तसं घडलं होतं खरं!

दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेनंतर आशिया कसोटी चँपियनशिप स्पर्धा सुरू झाली. स्पर्धेचा पहिला सामना १६ फेब्रुवारीला कोलकात्याच्या ईडन गार्डन्सवर पुन्हा पाकिस्तानविरुद्धच खेळला गेला. अनेकांना तो आधीच्या मालिकेतला तिसरा अंतिम सामना वाटला. ती मॅच एका वेगळ्याच कारणामुळे माझ्या लक्षात राहिली आहे. त्या सामन्याच्या दुसऱ्या डावात मी विचित्ररीत्या धावबाद झालो होतो. मॅच जिंकण्यासाठी आम्हाला २७९ धावा करायच्या होत्या. मी फलंदाजीसाठी उतरलो तेव्हा १३४-२ अशी आमची भक्कम स्थिती होती. मी हळूहळू स्थिरावत होतो. वासिमच्या एका चेंडूवर मी वाइड मिड ऑनच्या दिशेने शॉट मारला. पाकिस्तानच्या राखीव खेळाडूने, नदीम खानने तो चेंडू सीमारेषेलगत अडवला. त्या शॉटवर तीन धावा अगदी आरामात निघू शकत होत्या. मी तिसरी धाव घेत असताना नदीमने फेकलेला चेंडू थेट स्टम्प्सवर आदळला. खरंतर चेंडू स्टम्प्सवर येण्यापूर्वीच मी सहज क्रीजमध्ये पोचू शकत होतो; पण मी धावता धावता शोएब अख्तरच्या अंगावर धडकलो होतो. शोएब मिड ऑफला उभा होता. नदीमने फेकलेला चेंडू पकडण्यासाठी तो स्टम्प्सच्या पुढे, माझ्या धावण्याच्या रेषेत येऊन उभा राहिला. स्टम्प्सच्या मागे उभं राहण्याऐवजी तो पुढे का उभा राहिला, हे मी समजू शकलो नाही. माझं लक्ष चेंडूवर असल्यामुळे अखेरच्या क्षणी शोएबबरोबर माझी टक्कर झाली. त्या धडकेमुळे चेंडू स्टम्प्सवर आदळत असताना माझी बॅट हवेत राहिली.

शोएबच्या हेतूबद्दल मला कोणताही आरोप करायचा नाही. मला आश्चर्य वाटलं ते पाकिस्तान संघाने रन-आउटसाठी केलेल्या अपिलाचं. झालेला अन्याय प्रेक्षकांनाही सहन झाला नाही. प्रक्षुब्ध होऊन ते मैदानावर निरनिराळ्या वस्तू फेकू लागले. मीही चिडलोच होतो. रिप्ले पाहण्यासाठी मी तिसऱ्या पंचांच्या खोलीत गेलो. रिप्ले पाहून मी अधिकच निराश झालो.

प्रेक्षकांच्या गोंधळामुळे जवळजवळ २० मिनिटं खेळ थांबलेला होता. अखेर जगमोहन दालमिया ड्रेसिंग रूममध्ये आले. दालमिया हे आयसीसीचे अध्यक्ष व अनेक भारतीय क्रिकेट संघटनांचे मानद अधिकारी व व्यवस्थापक होते. मी मैदानात जाऊन प्रेक्षकांना शांत करावं, अशी त्यांनी मला विनंती केली. तसं करण्याची माझी मुळीच इच्छा नव्हती. झाल्या प्रकारात मला फसवलं गेल्यासारखं वाटत होतं; पण अखेर मी तयार झालो. ईडन गार्डन्सवर मला जाळपोळ होऊ द्यायची नव्हती. मी व दालमिया मैदानावर गेलो. आम्ही आवाहन केल्यानंतर प्रेक्षक शांत झाले. त्यानंतर थोड्या वेळातच पुन्हा खेळ सुरू झाला.

परंतु प्रेक्षकांच्या मनात अजूनही संताप खदखदत होता. दुसऱ्या दिवशी सकाळी प्रेक्षक पुन्हा खवळले. सामना संपत आलेला असताना स्टेडियममधली परिस्थिती आटोक्याबाहेर गेली. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी एक अभूतपूर्व निर्णय घेण्यात आला. जमलेल्या ६५ हजार प्रेक्षकांना बाहेर काढून स्टेडियम रिकामं करण्यात आलं. मॅच संपली तेव्हा स्टेडियममध्ये एकही प्रेक्षक नव्हता. शोएब जर माझ्या वाटेत उभा राहिला नसता किंवा वासिमने वेळीच अपील परत घेतलं असतं, तर ही परिस्थिती उद्भवलीच नसती.

भारत ४६ धावांनी सामना हरला होता. सामन्याचा शेवट आम्हा सर्वांच्या मनात कटुता निर्माण करून गेला होता.

पितृछत्र हरपले

पाठदुखीची पर्वा न करता खेळत राहिल्यामुळे समस्या अधिकच चिघळली होती. मे-जून, १९९९मध्ये इंग्लंडला विश्वचषक स्पर्धा खेळली गेली. त्या स्पर्धेत खेळताना मी शारीरिक दुखण्यामुळे बेजार झालो होतो; पण विश्वचषक स्पर्धा मी चुकवूच शकत नव्हतो. तंदुरुस्त राहण्याचा माझ्यापरीने मी पूर्ण प्रयत्न केला. प्रत्येक वेळी सराव केल्यानंतर किंवा व्यायामानंतर माझी पाठ अवघडून जाई. ती पूर्ववत होण्यासाठी मला काही काळ विश्रांती घ्यावी लागे. इंग्लंडमधल्या अस्थिर हवामानामुळे माझ्या अडचणीत भर पडली होती. हॉटेलच्या रूममध्ये गुडघ्याखाली उशी ठेवून मला फरशीवर झोपायचा सल्ला दिला होता. त्यामुळे रात्रभर माझ्या पाठीला जमिनीचा आधार मिळणार होता. हळूहळू मी बहुतेक हॉटेल रूम्समध्ये पलंग व कपाट यांच्या मधल्या चिंचोळया जागेत झोपायला शिकलो. अरुंद जागेत झोपल्यामुळे मी रात्री कुशीवरही वळू शकत नव्हतो.

विश्वचषक स्पर्धा सुरू होण्याआधी अजित, अंजली आणि सारा इंग्लंडमध्ये आले होते. त्यामुळे मी खूश होतो. रोज रात्री एखाद्या हॉटेलमध्ये आम्ही एकत्र जेवत असू. असेच एकदा आम्ही चाजनीज हॉटेलमध्ये गेलेलो असताना, मी 'क्रिस्पी अरोमॅटिक डक'ची ऑर्डर दिली. पातळ पॅनकेक्स आणि कापलेल्या काकडीसह येणारी ती डिश मला खूप आवडत असे. ती डिश जवळजवळ मी एकटा संपवू शकत असे. मी ऑर्डर दिल्या दिल्या, अजितने मला ती रद्द करायला लावली. ''विश्वचषक स्पर्धा संपेपर्यंत मी तुला 'डक' खाऊ देणार नाही,'' असं तो मला म्हणाला. सुरुवातीला तो मस्करी करतो आहे, असं मला वाटलं; पण तो चेष्टा करत नव्हता. मी त्याला त्यामागचं कारण विचारलं. अजितने मला पेपरात वाचलेली एक हकिकत सांगितली. काही इंग्लिश खेळाडू एकदा एका महत्त्वाच्या मॅचआधी जेवायला रेस्टॉरंटमध्ये गेले होते. सर्वांनी 'डक'ची ऑर्डर दिली. डक खाल्ल्यावर दुसऱ्या दिवशी त्यातला प्रत्येक जण शून्यावर बाद झाला! क्रिकेटमध्ये 'डक'चा अर्थ फलंदाज शून्यावर बाद होणं. एखादा फलंदाज जेव्हा एकही धाव न काढता बाद होतो तेव्हा आस्ट्रेलियन टीव्हीवर एक मजेशीर दृश्य दिसतं. फलंदाज पॅव्हिलियनमध्ये परतत असताना त्याच्यासोबत एक बदकही चालताना दाखवलं जातं. ''विश्वचषक स्पर्धा संपल्यावर तू हवी तेवढी 'डक' खा,'' असं अजित मला म्हणाला!

माझं लक्ष पूर्णपणे क्रिकेटवर केंद्रित राहावं म्हणून स्पर्धा सुरू होण्यापूर्वी अंजली साराला घेऊन लंडनला निघून गेली. अंजली पुन्हा गरोदर होती. अशा अवस्थेत दीड वर्षाच्या साराला व स्वत:ला सांभाळताना तिला किती अवघड जात असेल, याची मला कल्पना होती. तिच्यासोबत राहून तिचा भार हलका करावा असं मला वाटत होतं, पण मी काहीही करू शकत नव्हतो. माझ्यासाठी व आमच्या कुटुंबासाठी तिची चाललेली धडपड पाहून मला तिचं खूपच कौतुक वाटत होतं.

या गडबडीतच मला अचानक माझ्या वडिलांच्या निधनाची वार्ता समजली. अजित भारतात परतला होता. त्यानेच अंजलीला फोन करून ती धक्कादायक बातमी सांगितली. मला मात्र ती गोष्ट प्रत्यक्ष भेटूनच सांगण्याबद्दल त्याने अंजलीला बजावलं. अंजलीने अजय जडेजा व रॉबिन सिंगला फोन करून माझ्या रूमबाहेर थांबायला सांगितलं. फोन केल्यावर अंजली एकटीच गाडी चालवत लंडनवरून लिसेस्टरच्या आमच्या हॉटेलवर पोचली. १८ मेची ती रात्र होती. दुसऱ्या दिवशी आमची झिंबाब्वेबरोबर मॅच होती. निघण्यापूर्वी अंजलीने आमच्या हॉटेल मॅनेजरलाही फोन केला होता. कुणाचाही फोन आल्यास तो मला न देण्याची सूचना तिने मॅनेजरला केली.

मध्यरात्री मी जेव्हा माझ्या रूमचा दरवाजा उघडला तेव्हा दारात अजय, रॉबिनसह अंजली उभी होती. अंजलीला अशी अवेळी आलेली पाहून काहीतरी अशुभ घडल्याची मला शंका आली. माझा जिवलग मित्र अतुल रानडे माझ्याबरोबर रूममध्ये होता. मी अतुलला बाहेर जायला सांगितलं. अंजलीच्या बोलण्यावर माझा विश्वासच बसत नव्हता. मी अंतर्बाह्य हादरून गेलो होतो. माझे वडील मला सोडून जातील, असा विचारही माझ्या मनात कधी डोकावला नव्हता. मी सुन्न झालो होतो. माझ्या तोंडून एक शब्दही उमटत नव्हता. वडील म्हणजे माझं सर्वस्व होतं. मला काहीही सुचेनासं झालं होतं. अंजलीला घट्ट पकडून मी ढसाढसा रडू लागलो. त्या क्षणी मला अतिशय पोरकं झाल्यासारखं वाटलं. तो धक्का सहन करणं माझ्या

सहनशक्तीपलीकडचं होतं.

मी लवकरात लवकर भारतात परतण्याचा निर्णय घेतला. मला वडिलांचं अंत्यदर्शन घ्यायचं होतं. आईला भेटल्याशिवायही मला चैन पडणार नव्हती. मार्क मस्कारेन्हासने आमची दुसऱ्या दिवशी भारतात जाण्याची सर्व व्यवस्था केली. मार्कने आम्हाला त्याच्या गाडीतून पहाटे हिथ्रो विमानतळावर सोडलं. पूर्ण प्रवासात मनामध्ये फक्त वडिलांच्याच आठवणी येत होत्या. ते जिवंत नाहीत, यावर मन विश्वास ठेवायला तयार नव्हतं. मी घरी पोचल्यावर ते डोळे उघडून माझ्याकडे पाहतील, असा भाबडा विचार माझ्या मनात पुन्हा पुन्हा येत होता. मी इंग्लंडला निघताना त्यांची तब्येत बऱ्यापैकी चांगली होती. काही महिन्यांपूर्वी त्यांची अँजिओप्लॅस्टी झाली होती. त्यानंतर ते माझ्याकडे येऊन राहिले होते. अंजली बरोबर असल्याने ते निर्धास्त होते. मी विश्वचषक स्पर्धेसाठी निघालो तेव्हा त्यांची तब्येत पूर्ववत झाली होती. ते जिना चढून तिसऱ्या मजल्यावर चालत येत होते. डॉक्टरांनी त्यांना रोज संध्याकाळी एक 'ड्रिंक' घ्यायला सांगितलं होतं. त्यांना सोबत करण्यासाठी त्या काळात रोज संध्याकाळी लवकर येऊन मी त्यांच्याबरोबर ड्रिंक घेत असे. मी माझ्या वडिलांबरोबर ड्रिंक घेईन, अशी स्वप्नातही कल्पना करण्याची त्या पूर्वी माझी कधी हिंमत झाली नव्हती. 'त्यांना मी आता पुन्हा कधीच भेटू शकणार नाही,' हा विचार मनाला पटतही नव्हता आणि पचतही नव्हता. माझे भाऊ व मित्र मला घेऊन जाण्यासाठी विमानतळावर आले होते. फार विचित्र परिस्थितीत माझ्यावर घरी जायची वेळ आली होती. घरी पोचल्यावर मी क्षणभर आईला ओळखूच शकलो नाही. तिच्यामध्ये कमालीचा फरक पडला होता. चेहऱ्यावरची सारी रया जाऊन ती अचानक वृद्ध दिसू लागली होती. भिंतीकडे तोंड करून ती बसली होती. तिला इतका जबरदस्त धक्का बसला होता की, गेल्या दोन दिवसांत ती कुणाशी अक्षरही बोलली नव्हती. आईची ती अवस्था मला पाहवत नव्हती. वडील गेल्यापासून ती बसल्या जागेवरून उठलीही नव्हती. आजीला भेटताना तर माझ्या पायातलं त्राणच गेलं. तिने स्वत:चा मुलगा गमावला होता. ''मला तुझ्याबरोबर काही वेळ शांतपणे बसायचंय,'' असं ती मला म्हणाली. मी तिथे असलेल्या सर्वांना बाहेर जाण्याची विनंती केली. वडिलांचं शव ठेवलं होतं त्या खोलीत मी आजीला घेऊन गेलो. मुलाच्या मृत्यूचा मूकपणे शोक करण्यासाठी मी तिला हवा असलेला एकांत दिला व तिच्यापासून काही पावलं दूर जाऊन उभा राहिलो.

मी माझ्या जीवनाची प्रेरणाच हरवून बसलो होतो. त्यानंतर कित्येक रात्री मी शांतपणे झोपू शकलो नाही. त्यांच्या अंत्ययात्रेला वॉचमन, पोस्टमनही आले होते. माझ्या वडिलांनी प्रेमाने व आपुलकीने सर्वांना आपलंसं केलं होतं. वडिलांवर अग्निसंस्कार करण्यापूर्वी मी माझी छबी असलेलं एक सोन्याचं नाणं त्यांच्या खिशात ठेवून दिलं. मला कायम त्यांच्याबरोबर राहायचं होतं.

वडिलांशिवाय सारं आयुष्यच नीरस होऊन गेल्यासारखं वाटत होतं.

अत्यंत अवघड स्पर्धा

भारतात चार दिवस राहून मी पुन्हा इंग्लंडमध्ये आमच्या संघात परतलो. दुसऱ्या दिवशी केनियाविरुद्ध मॅच होती. न खेळता मी दु:खी मनाने घरी बसलेलं माझ्या वडिलांना मुळीच आवडलं नसतं. केवळ त्याच हेतूने मी विश्वचषक स्पर्धेतले उर्वरित सामने खेळायचं ठरवलं; पण स्पर्धेत पुन्हा खेळताना मी मनाने मात्र फारसा सावरलेलो नव्हतो. अनेकदा अश्रू आवरणं मला कठीण होऊन जायचं. मी गॉगल लावून सराव करत असे. मी केनियाविरुद्ध शतक काढलं. माझ्यासाठी त्या शतकाचं मोल खूप मोठं होतं. ते शतक मी माझ्या वडिलांच्या स्मृतीला अर्पण केलं. मी जिद्दीने स्पर्धेत खेळलो; पण माझं मन मात्र ताळ्यावर नव्हतं.

माझ्या पाठदुखीतही काही सुधारणा झाली नव्हती. विश्वचषक स्पर्धेतले उर्वरित सामने खेळताना पाठीच्या दुखण्यामुळे मी हैराण झालो होतो. ती माझ्यासाठी माझ्या कारकिर्दीतली सर्वांत अवघड स्पर्धा ठरली. स्पर्धेतील सुपर सिक्स फेरीपर्यंत आम्ही पोचलो. त्या फेरीतही इंग्लंड व श्रीलंकेविरुद्ध आम्ही मिळवलेले विजय संस्मरणीय ठरले; पण अखेर भारतीय संघ त्या फेरीतच गारद झाला.

२६ मे, १९९९ रोजी श्रीलंकेविरुद्ध टाँटनला सामना होता. त्या मॅचमध्ये सौरव व राहुलने विश्वचषक स्पर्धेतील एक अजरामर खेळी खेळली. सौरवने नजाकतदार बॅटिंग करत १८३ धावा काढल्या. राहुलच्या १४५ धावांमध्ये त्याची नेहमीची सफाई होती. त्यानंतर २९ मेला झालेल्या इंग्लंडविरुद्धच्या सामन्यातही सौरवने अष्टपैलू कामगिरी केली. त्या स्पर्धेत राहुलनेही आपल्या फलंदाजीत सातत्य राखलं.

पाकिस्तानविरुद्ध मिळवलेला विजय ही सुपर सिक्स फेरीतली सर्वांत दिलासा देणारी गोष्ट ठरली. त्याच वेळी काश्मीरमध्ये कारगील युद्ध सुरू होतं. दोन्ही देशांतल्या राजकीय संबंधांत तणाव निर्माण झाला होता. त्यामुळे त्या सामन्याला विशेष महत्त्व आलं होतं. वेंकटेश प्रसादने घेतलेल्या पाच विकेट्समुळे ती जोशपूर्ण लढत भारताने ४७ धावांनी जिंकली.

अनपेक्षित नियुक्ती

विश्वचषक स्पर्धेनंतरही पाठदुखी कमी झालेली नव्हती. ऑगस्ट-सप्टेंबर, १९९९मध्ये श्रीलंका व सिंगापूरला झालेल्या जोडस्पर्धेत माझं पाठीचं दुखणं विकोपाला गेलं. अखेर मी आस्ट्रेलियाला जाऊन नीट तपासणी करायचं ठरवलं. त्यापूर्वी मी ॲक्युपंक्चर व ॲक्युप्रेशरचेही उपचार केले होते. सिंगापूरमधल्या एका तज्ज्ञाने माझी जीभ टोचण्याचा प्रयोग केला होता. त्यामुळे प्रेशर पॉइंट्स शोधून योग्य ते उपचार करणं सोयीचं होणार होतं. एकूण पाठदुखीमुळे मी इतका त्रस्त झालो होतो की, त्यातून सुटका मिळवण्यासाठी कोणताही उपचार करून घ्यायची माझी तयारी होती.

भारतातील निष्णात डॉक्टर अनंत जोशी ह्यांनी माझ्या क्रिकेट कारकिर्दीत माझी कायम काळजी घेतलेली आहे. सप्टेंबर, १९९९मध्ये आस्ट्रेलियातील डॉक्टरांशी माझ्या पाठदुखीबद्दल चर्चा करण्यासाठी ते माझ्याबरोबर ॲडलेडला आले होते. अनेक प्रकारच्या तपासण्या केल्या गेल्या. अखेर मला चार इंजेक्शन्स देण्यात आली. इंजेक्शन्स देताना मला काहीच कल्पना देण्यात आली नव्हती. पण नंतर मला इंजेक्शन्ससाठी वापरलेल्या सुया दाखवण्यात आल्या. इतक्या मोठ्या सुया मी त्यापूर्वी कधीच पाहिल्या नव्हत्या. त्या सुया मी नंतर घरच्यांना व मित्रांना दाखवण्यासाठी मुद्दाम भारतात घेऊन गेलो होतो. सुयांचा आकार पाहून सारे थक्क झाले; पण त्या इंजेक्शन्सनी योग्य परिणाम साधला. आठ महिने छळणारी पाठदुखी गायब झाली होती. वेदनेतून मुक्ती मिळाल्याने मी सुटकेचा नि:श्वास सोडला.

मी पुन्हा नव्या जोमाने क्रिकेट खेळण्याचा निश्चय केला. त्याला आणखीही एक कारण होतं. मी पुन्हा भारताचा कर्णधार झालो होतो. खरंतर दुसऱ्यांदा ती जबाबदारी स्वीकारायला मी मुळीच उत्सुक नव्हतो. 'मी भारतीय संघाचा कप्तान व्हायला तयार आहे का,' अशी विचारणा करण्यासाठी अजित वाडेकर माझ्या घरी आले होते. त्या वेळी मी त्यांना नकार दिला होता; पण ऑगस्टमधील श्रीलंकेतील तिरंगी मालिकेला सुरुवात होण्याआधीच माझ्या कर्णधारपदाची घोषणा करण्यात आली. अजित वाडेकर हे बीसीसीआयच्या वतीने माझ्या घरी आले होते, ही गोष्ट मला नंतर समजली. बीसीसीआयने वाडेकरांबरोबर सल्लामसलत करून माझी संमती नसतानाही माझी परस्पर कर्णधारपदी नेमणूक केली होती. नेमणूक जाहीर झाल्यानंतर ती नाकारणं मला अवघड होतं. आजपर्यंत मी आव्हानांसमोर कधीच पाठ फिरवली नव्हती. मी कर्णधारपद स्वीकारलं. माझ्यावर सोपवलेली जबाबदारी यशस्वीपणे पार पाडण्याचा निश्चय केला. वर्षअखेरीला आम्ही आस्ट्रेलियाच्या दौऱ्यावर जाणार होतो. तो दौरा अत्यंत खडतर असणार, याची मला पूर्ण कल्पना होती.

नवा पाहुणा

योगायोगाने याच दरम्यान आमच्या घरात एका नव्या पाहुण्याचं आगमन झालं. २४ सप्टेंबर, १९९९ रोजी आम्हाला मुलगा झाला. मी त्याचं नाव 'अर्जुन' ठेवायचं ठरवलं. मुलाला पाहिल्या-पाहिल्याच मी ही गोष्ट अंजलीला सांगून टाकली. तिच्या मनात काही वेगळी नावं होती. पण अर्जुन हेच नाव ठेवायचा माझा आग्रह पाहून तिने त्या नावाला मान्यता दिली. अर्थात ही गोष्ट तिने मला खूप नंतर सांगितली. साराप्रमाणेच मी अर्जुनच्या पहिल्या दर्शनाचं आणि त्याच्या जन्मदिवसाचं संपूर्ण चित्रीकरण केलं.

मुलांची वाढ होताना पाहणं हा खरोखरच विलक्षण अनुभव असतो. घरापासून दूर राहावं लागल्यामुळे मला मात्र बरेचदा त्या अनुभवाला मुकावं लागे. अर्जुनला सोडून राहणं अधिकच अवघड जायचं. मी घराबाहेर राहिलेलं त्याला मुळीच आवडत नसे. मी दौऱ्यावर असताना तो फोनवर माझ्याशी एक शब्दही बोलत नसे. त्याचा आवाज ऐकण्यासाठी मी अधीर होऊन जायचो. त्याला निदान 'हॅलो' तरी म्हणायला लाव, असा मी अंजलीला आग्रह करत असे; पण अर्जुन ठाम नकार देत असे. मी घरी परतल्यावर मात्र रागाची भरपाई करण्यासाठी तो तीन दिवस मला घट्ट बिलगून बसे.

मी दौऱ्यावर जाण्याबद्दल साराची मात्र फारशी तक्रार नसायची; पण मी घरी परत आल्यावर ती चटकन माझ्याजवळ येत नसे. सारा काही महिन्यांची असताना मी श्रीलंकेच्या दौऱ्यावर गेलो होतो. कोलंबोच्या गरम हवेत खेळून माझा चेहरा तांबूस-काळा झाला होता. मी घरी आल्यावर साराने मला ओळखलंच नाही. हा कुणी भलताच इसम आपल्या घरी आला आहे, असा समज झाल्याने ती बराच वेळ माझ्याजवळ आली नव्हती.

२०००मध्ये जग आजच्या इतकं अत्याधुनिक झालं नव्हतं. 'फेसटाइम' किंवा 'स्काइप' त्या वेळी अस्तित्वात आलेलं नव्हतं. त्या वेळेस जर या सोयी असत्या, तर मला मुलांचा इतका विरह सहन करावा लागला नसता. अंजलीला सांगून मी दोन्ही मुलांना वेबकॅमेऱ्यासमोर बोलावलं असतं. त्यांच्याशी भरपूर गप्पा मारल्या असत्या. त्यांच्यात होणारे बदल लांबून का होईना, पण मला पाहता आले असते.

न्यूझीलंडचा भारत दौरा, ऑक्टोबर-नोव्हेंबर, १९९९

अर्जुनच्या जन्मानंतर काही आठवड्यांतच मी १० ऑक्टोबरला मोहालीच्या मैदानात होतो. न्यूझीलंडबरोबर नवी मालिका सुरू झाली होती. कर्णधारपदाच्या माझ्या दुसऱ्या कारकिर्दीतला तो पहिलाच कसोटी सामना होता. पहिल्या वेळेप्रमाणेच या कारकिर्दीचीही सुरुवात यशस्वी झाली. न्यूझीलंडचा पराभव करून आम्ही ती मालिका जिंकली; पण मोहाली कसोटीतील पहिल्या डावात मात्र आम्ही स्वत:वर अवघड परिस्थिती ओढवून घेतली होती. डिऑन नॅशने घेतलेल्या सहा विकेट्समुळे आमचा डाव ८३ धावांत आटोपला होता. त्या दिवशी काहीच मनासारखं घडत नव्हतं. भारतीय संघाने मायदेशात नोंदवलेली ती एक नीचांकी धावसंख्या होती. जणू बार्बाडोसचं भूत पुन्हा एकदा आमच्या मानगुटीवर बसलं होतं. पण आमच्या गोलंदाजांनीही चांगली कामगिरी करत न्यूझीलंडला २१५ धावांत रोखलं. दुसऱ्या डावात आम्ही फलंदाजीतही शिस्त व संयम दाखवला. ३ बाद ५०५ अशा भक्कम धावसंख्येवर आम्ही डाव घोषित केला. राहुलने व मी शतकं झळकवली. मॅच अखेर अनिर्णित अवस्थेत संपली.

दुसऱ्या डावात एक मजेशीर किस्सा घडला होता. न्यूझीलंडचा अष्टपैलू खेळाडू ख्रिस केर्न्स अप्रतिम गोलंदाजी करत होता. सुरुवातीला त्याची गोलंदाजी खेळताना राहुल व मी थोडेसे गोंधळून गेलो होतो. गोलंदाजी करताना तो चेंडूची लकाकी आमच्यापासून लपवत होता. त्यामुळे त्याचा चेंडू कोणत्या बाजूला स्विंग होईल याचा अंदाज बांधणं आम्हाला अवघड होऊन गेलं. त्यावर मी एक उपाय शोधून काढला. मी राहुलला म्हटलं, ''बॅटिंग करत असताना केर्न्सच्या हातातला चेंडू दिसणं अवघड आहे, पण नॉन-स्ट्रायकरवर असताना मला तो सहज दिसेल. जर चकाकणारी बाजू त्याने चेंडूच्या बाहेर ठेवली असेल, तर मी डाव्या हातात बॅट धरेन. याचा अर्थ चेंडू बाहेरच्या दिशेने स्विंग होणार आहे. चेंडूची लकाकी आतल्या बाजूला असेल, तर मी बॅट उजव्या हातात धरेन. म्हणजे तू समज की, चेंडू आत येणार आहे. मला जर चेंडू नीट दिसला नाही, तर मी बॅट मधोमध धरेन.''

आमची योजना कमालीची यशस्वी ठरली. आम्ही केर्न्सची पिटाई करू शकलो. त्याच्या २४ षटकांत ७६ धावा निघाल्या. त्याला एकही विकेट घेता आली नाही. आम्ही नेमकं काय करतो आहे, हे त्याच्या लक्षात येईना. आम्हाला बेसावध पकडण्यासाठी त्याने मुद्दाम एक क्रॉस-सीम चेंडू टाकला. मी बॅट मधोमध धरली. राहुलला माझा इशारा समजला. चेंडू टाकल्यावर मी कोणती खूण करतो आहे, हे पाहण्यासाठी केर्न्सने चटकन वळून माझ्याकडे बघितलं. तो खूपच वैतागला होता. क्रॉस-सीम चेंडू टाकताना मी नेमकं काय करत होतो हे त्याला शोधून काढायचं होतं. केर्न्सबरोबरची छोटीशी लढाई

जिंकल्यामुळे आम्ही तो सामना वाचवू शकलो.

कानपूरच्या दुसऱ्या कसोटीत आम्ही न्यूझीलंडचा दणदणीत पराभव केला. कुंबळेने त्या मॅचमध्ये दोन्ही डावांत मिळून १० गडी बाद केले. त्यानंतर अहमदाबादच्या अंतिम कसोटीत मी द्विशतक झळकवलं. ती कसोटी अनिर्णित अवस्थेत संपली. आम्ही धावांचा डोंगर रचला. आमच्या ५८३ धावसंख्येसमोर न्यूझीलंडचा पहिला डाव ३०८ धावांत आटोपला, पण आम्ही न्यूझीलंडला पुन्हा खेळायला बोलावलं नाही. गोलंदाजांशी सल्लामसलत करून आम्ही एकत्रितपणे फॉलो-ऑन न देण्याचा निर्णय घेतला होता. पहिल्या इनिंग्जमध्ये अथक गोलंदाजी केल्यानंतर त्यांना काही काळ विश्रांती मिळणं आवश्यक होतं. आम्ही ती मालिका १-० जिंकलो. त्यानंतर झालेल्या एकदिवसीय मालिकेतही आम्ही न्यूझीलंडचा ३-२ असा पराभव केला. त्याच महिनाअखेरीला आस्ट्रेलियन दौरा सुरू होणार होता. न्यूझीलंडवर मिळवलेला विजय आस्ट्रेलियन दौऱ्यासाठी फारसा उपकारक ठरणार नव्हता; पण कोणतीही कसोटी मालिका जिंकण्याचा आनंद काही वेगळाच असतो.

भारताचा आस्ट्रेलिया दौरा, नोव्हेंबर १९९९ ते २०००

कप्तानपदाच्या माझ्या दुसऱ्या कारकिर्दीत कपिल देव हे आमच्या संघाचे प्रशिक्षक व व्यवस्थापक होते. भारतातर्फे खेळलेले ते एक महान खेळाडू होते. त्यांच्या काळात कपिल देव यांची गणना जगातील सर्वोत्कृष्ट अष्टपैलू खेळांडूमध्ये होत असे. आस्ट्रेलियाच्या दौऱ्यात मी त्यांच्याकडून खूप अपेक्षा ठेवून होतो. त्यांचा सल्ला मला मोलाचा ठरणार होता. मी नेहमीच म्हणत आलो आहे की, प्रशिक्षकाचं काम अतिशय महत्त्वाचं असतं. संघाची रणनीती ठरवण्यामध्ये त्याची भूमिका कर्णधाराइतकीच तोलामोलाची ठरते. परंतु कपिल देव यांची पद्धत वेगळी होती. ते फारसे कशात गुंतत नसत. संघाकडून कामगिरी करून घेण्याची जबाबदारी ते पूर्णपणे कर्णधारावर सोपवत. त्यामुळे आम्हाला प्रत्यक्ष मैदानात उपयोगी पडतील असे डावपेच ठरवण्यात त्यांनी कधीही सहभाग घेतला नाही.

आस्ट्रेलियाच्या दौऱ्याची सुरुवात फारशी वाईट झाली नाही. १९९६-९७च्या दक्षिण आफ्रिकेच्या दौऱ्यासारखा प्रकार या वेळी घडला नाही. मालिका सुरू होण्यापूर्वी दोन आठवडे आमचा संघ आस्ट्रेलियात दाखल झाला होता. पहिल्या कसोटीच्या आधी आम्ही तीन सराव सामने खेळलो होतो. १० डिसेंबर, १९९९ रोजी जेव्हा आम्ही ॲडलेडच्या मैदानात प्रथम क्षेत्ररक्षण करायला उतरलो तेव्हा आस्ट्रेलियाशी सामना करायची आमची चांगलीच तयारी झाली होती. पहिल्या दिवसाच्या सकाळच्या कामगिरीमुळे तर जगातील सर्वोत्कृष्ट संघाला टक्कर देण्याचा आमचा हुरूप अधिकच वाढला होता.

जवागल श्रीनाथ व वेंकटेश प्रसाद यांच्या भेदक माऱ्यासमोर पहिल्या दिवशी उपाहारालाच आस्ट्रेलियाची ५२ धावा आणि ४ गडी बाद, अशी स्थिती झाली. आम्हाला आणखी एक विकेट मिळाल्यावर त्यांचे फक्त तळाचे फलंदाज उरणार होते. ती विकेट आम्ही जवळजवळ मिळवलीही होती; पण नेहमीच धोकादायक ठरणारा पाँटिंग या वेळी मात्र नशीबवान ठरला होता. आम्ही त्याच्याविरुद्ध केलेलं पायचीतचं अपील पंचांनी फेटाळलं. त्यानंतरही अजित आगरकरचा एक चेंडू पाँटिंगच्या बॅटची खालची कड घेऊन यष्टिरक्षक एमएसके प्रसादच्या हातात गेला. पण पंचांनी पुन्हा त्याला नाबाद ठरवलं. त्या वेळी आस्ट्रेलियाची स्थिती नाजूकच होती. ती विकेट मिळाली असती तर आस्ट्रेलियन फलंदाजीला आम्ही खिंडार पाडू शकलो असतो. मात्र, दैव पाँटिंगच्या बाजूला होतं. त्यानंतर त्याने व स्टीव्ह वॉने शतकं झळकवली.

मी फलंदाजीला उतरलो तेव्हा ग्लेन मॅक्ग्राने माझ्या संयमाची कसोटी पाहिली. त्या दिवशीचा खेळ संपायला फारसा वेळ उरला नव्हता. मी मॅक्ग्राची पाच किंवा सहा षटकं निर्धाव खेळून काढली. मी माझा नैसर्गिक खेळ न खेळता मॅक्ग्राला निर्धाव षटकं का टाकून दिली, याचं त्या वेळी अनेक जणांना आश्चर्य वाटलं असेल. परंतु प्रतिस्पर्धी संघाचे डावपेच ओळखून त्याप्रमाणे आपला खेळ बदलणं, हीच तर कसोटी क्रिकेटची खुबी असते. त्या दिवशी थोड्या वेळाने आस्ट्रेलियालाही आपल्या योजनेत बदल करावा लागला. शेन वॉर्न मला नंतर म्हणाला की, माझ्यामुळे त्यांना बदल करणं भाग पडलं. प्रत्येक इनिंग्जमध्ये मला ७० टक्के चेंडू सोडून द्यायला भाग पडावेत, अशा प्रकारची गोलंदाजी मला करण्याचा घाट आस्ट्रेलियन संघाने घातला होता. परंतु मी अनेक षटकं शांतपणे निर्धाव खेळून काढल्यामुळे मला हताश करण्याचा त्यांचा डाव फसला.

दुसऱ्या दिवशी मीसुद्धा माझी रणनीती बदलली. पहिल्याच षटकात मी मॅक्ग्राला दोन चौकार ठोकले.

या सामन्यात डॅरेल हार्पर यांच्या हातून झालेल्या ढोबळ चुकांचा आम्हाला चांगलाच तडाखा बसला. सौरवने व मी मिळून आस्ट्रेलियन गोलंदाजांवर यशस्वी प्रतिहल्ला चढवला होता. आमच्या ४ बाद २१५ धावा झाल्या होत्या. मी ६१ धावांवर खेळत होतो. आमच्या आणखी १०० धावा झाल्या असत्या तर कसोटीला रंगत आली असती; पण शेन वॉर्नच्या एका चेंडूवर डॅरेल हार्परनी मला झेलबाद ठरवलं. तो चेंडू माझ्या बॅटला लागला नव्हता याबद्दल माझी खातरी होती. वॉर्नने टाकलेला चेंडू माझ्या पायाजवळ पडला आणि फक्त पॅड्सना लागून फॉर्वर्ड शॉर्ट लेगला उभ्या असलेल्या जस्टिन लँगरच्या हातात गेला. दुसऱ्या डावातही मी पुन्हा कमनशिबी ठरलो. ग्लेन मॅक्ग्राने मला एका बाउन्सर टाकण्याचा प्रयत्न केला; पण चेंडू हवा तेवढा उसळला नाही. मी खाली वाकून चेंडू सोडून देत असताना, चेंडू माझ्या खांद्याला लागला. आश्चर्य म्हणजे डॅरेल हार्परनी मला पायचीत बाद ठरवलं. तो फारच विचित्र निर्णय होता. चेंडू स्टम्प्सवर आदळणं शक्यच नव्हतं.

मला आमच्या कमी दर्जाच्या कामगिरीचं समर्थन करायचं नाही; पण अशा अटीतटीच्या सामन्यात त्या चुकीच्या निर्णयांमुळे फार मोठा फरक पडला, असं मी नक्कीच म्हणेन. आस्ट्रेलियाने मिळालेल्या संधीचा लाभ घेत १-० अशी बढत घेतली. दुसऱ्या व तिसऱ्या कसोटी सामन्यांत मात्र आमचा दारुण पराभव झाला. सिडनीच्या तिसऱ्या कसोटीत व्हीव्हीएस लक्ष्मणने चमकदार खेळी करत १६७ धावा काढल्या. त्याच्या त्या इनिंग्जमुळे प्रभावित होऊन त्याला एकदिवसीय मालिकेतही खेळवण्याची विनंती मी निवडसमितीला केली. परंतु आस्ट्रेलियाचा संघ आमच्यापेक्षा सर्वच बाबतींत वरचढ ठरला. मॅक्ग्रा आणि त्या मालिकेत पदार्पण केलेल्या ब्रेट लीने अप्रतिम गोलंदाजी केली. दोघांना डॅमियन फ्लेमिंग व शेन वॉर्न यांची उत्तम साथ मिळाली. पूर्ण मालिकेत आस्ट्रेलियाने आम्हाला एकदाही आक्रमक पवित्रा घेऊ दिला नाही. १९९९मध्ये स्टीव्ह वॉच्या नेतृत्वाखाली खेळलेला आस्ट्रेलियन संघ हा माझ्या मते त्या काळातील सर्वोत्तम संघ होता.

त्या मालिकेत माझी वैयक्तिक कामगिरी चांगली झाली. बॉक्सिंग डेच्या कसोटीत मी मेलबोर्नला शतक काढलं; पण त्या शतकाला काहीच मोल नव्हतं. मी आमच्या संघाचं नशीब पालटवू शकलो नाही. हरलेल्या मॅचमध्ये काढलेल्या शतकाची चव एखाद्या कडू गोळीप्रमाणे असते. दुसऱ्या डावात मी ५२ धावा काढून वैयक्तिक विक्रम नोंदवला; पण माझ्या त्याही प्रयत्नाने मी सामना वाचवू शकलो नाही.

कसोटी मालिकेतल्या ३-० पराभवानंतर झालेल्या एकदिवसीय मालिकेतही आम्हाला अपयश आलं. त्या मालिकेत आस्ट्रेलियाबरोबर पाकिस्तानचाही समावेश होता. आम्ही त्या स्पर्धेची अंतिम फेरीही गाठू शकलो नाही. दौऱ्यामध्ये आमची कामगिरी अधिकाधिक खराब होत गेली. मी अगदी निराश व हताश होऊन गेलो होतो. भारतात परतताना माझ्या मनात विचारांचं वादळ उठलं होतं. मला विश्रांती घेणंही अवघड झालं होतं. पूर्वी मी क्रिकेटमधलं अपयश व निराशा मैदानावरच सोडून येऊ शकत असे; पण या खेपेस मला ते शक्य होत नव्हतं. मी मुलांबरोबर असतानाही माझ्या मनात मालिकेतल्या अपयशाचाच विचार सुरू असायचा. माझं काय चुकत होतं, हेच मला नेमकं समजत नव्हतं. आमच्या संघाकडून त्यांच्या क्षमतेनुसार कामगिरी करून घेणं मला अवघड जात होतं. त्याच गोष्टीचा माझ्या मनावर परिणाम होऊ लागला होता.

एक फलंदाज म्हणून माझ्या चुकांना मी नक्कीच जबाबदार होतो. त्या चुका दुरुस्त करून पुन्हा चांगली फलंदाजी करणं माझ्या हातात होतं. कर्णधार म्हणून मात्र सर्व गोष्टी माझ्या हातात नव्हत्या. माझ्या संघ सहकाऱ्यांच्या कामगिरीला कप्तान या नात्याने मीच जबाबदार होतो; पण ते करत असलेली प्रत्येक गोष्ट मी नियंत्रित करू शकत नव्हतो. उदाहरणार्थ, कधीकधी मी मनात एक सुरेख योजना आखायचो; पण त्या योजनेची नीट अंमलबजावणी होऊ शकत नसे. ती गोष्ट मात्र मला सहन होत नसे.

१० जानेवारी, २००० रोजी ब्रिस्बेनमध्ये पाकिस्तानविरुद्ध झालेल्या सामन्यात नेमकं असंच घडलं होतं. त्या खेळपट्टीवर फारशा धावा होत नव्हत्या. प्रथम फलंदाजी करत आम्ही ५० षटकांत १९५ धावा केल्या. षटकांची गती योग्य न राखल्याने पाकिस्तानला ४९ षटकांत ते लक्ष्य पूर्ण करायचं होतं. त्यानंतर पकिस्तानची ७१ धावा आणि ६ गडी बाद, अशी स्थिती झाली. खरं म्हणजे आम्ही तो सामना सहज जिंकायला हवा होता; पण शेवटच्या चेंडूवर पाकिस्तानने तो सामना जिंकला.

सकलेन मुश्ताक व वकार युनूसने नवव्या विकेटसाठी ४३ धावांची भागीदारी केली.

त्या पराभवामुळे मी खूप दुखावला गेलो. इनिंग्जच्या अखेरीस पाकिस्तानचे फलंदाज कसे खेळतील याचा मी अचूक अंदाज केला होता. त्यासाठी मी मुद्दाम मिड ऑफला उभा राहून आमच्या द्रुतगती गोलंदाजांना सतत सूचना देत होतो. मला आधी सांगितल्याशिवाय स्लो बॉल टाकू नका, असं मी त्यांना बजावलं होत. तरीही एका गोलंदाजाने स्लो बॉल टाकला. मी त्यासाठी योग्य ती क्षेत्ररचना लावलेली नसल्यामुळे त्यावर चौकार मारला गेला. अशा प्रसंगांमुळे मी अधिकाधिक हताश होत गेलो. मी ते प्रसंग विसरूही शकत नव्हतो.

सौरवकडे धुरा सोपवली

सौरवला संघाचा उपकप्तान करण्याबद्दल मी आस्ट्रेलियाच्या दौऱ्याआधीच निवडसमितीशी चर्चा केली होती. माझ्या अनुपस्थितीत संघाचं नेतृत्व करण्याची क्षमता सौरवमध्ये आहे, याची मला खातरी वाटत होती. जर मला आस्ट्रेलियामध्ये दुखापत झाली किंवा काही कारणास्तव मैदान सोडावं लागलं, तर संघाचा ताबा मला सौरवकडे सोपवायचा होता.

आस्ट्रेलियाच्या दौऱ्यावरून आल्यानंतर काही आठवड्यांतच मला यापुढे कर्णधारपदी राहायचं नसल्याचं मी बीसीसीआयचे अध्यक्ष ए.सी. मुथय्या व निवडसमितीला कळवलं. संघाच्या हितासाठी नेतृत्वाची धुरा सौरवकडे सोपवून स्वत:च्या बॅटिंगवर पूर्ण लक्ष केंद्रित करावं असं मला वाटलं. त्याच वेळी आम्हाला सौरववर कर्णधारपदाची जबाबदारी अचानक लादायचीही नव्हती. त्यामुळे तो काहीसा गडबडून जाण्याचीही शक्यता होती. कप्तानपदाच्या ताणतणावाशी जुळवून घेण्यासाठी त्याला थोडा वेळ देणं आवश्यक होतं. त्या मधल्या काळात त्याला आत्मविश्वास मिळवून द्यायची जबाबदारी माझी होती. त्या हेतूने फेब्रुवारी, २०००मध्ये दक्षिण आफ्रिकेविरुद्ध मायदेशात होणाऱ्या कसोटी मालिकेपर्यंत कर्णधारपदी राहायची मी तयारी दर्शवली. त्यानंतर होणाऱ्या पाच सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेपासून सौरवकडे नेतृत्व सोपवायचं ठरलं.

आम्ही सुट्टीसाठी लोणावळ्याला गेलो असताना माझा हा निर्णय मी आमच्या कुटुंबीयांना सांगितला. त्यांनाही तो पटला. माझ्या संघाकडून मी चांगली कामगिरी करून घेऊ शकत नव्हतो. त्यामुळे मला होणारा त्रास त्यांनाही जाणवत होता. अंजलीला तर माझी मन:स्थिती पूर्ण ठाऊक होती. अजितपाशीही मी माझं मन मोकळं केलं.

कायमचा नकार

फेब्रुवारी, २०००मध्ये कर्णधारपद सोडल्यानंतर मी पुन्हा कधीही भारतीय संघाचं नेतृत्व स्वीकारलं नाही. याचा अर्थ त्यानंतर कप्तानपदाचा प्रस्ताव माझ्याकडे कधीच आला नव्हता असं नाही. काही वेळा पुन्हा मला कर्णधार होण्याची गळ घातली गेली; पण प्रत्येक वेळेस मी माझ्या नकारावर ठाम राहिलो. सप्टेंबर, २००७मध्ये इंग्लंडच्या दौऱ्यानंतर राहुल द्रविडने संघाचं नेतृत्व सोडलं. त्या वेळी मला कप्तानपद स्वीकारण्याची विनंती करण्यात आली होती.

२००८च्या अखेरीस अनिल कुंबळेने कर्णधारपद सोडल्यानंतर भारतीय संघाचं नेतृत्व करण्याचा अखेरचा प्रस्ताव माझ्यासमोर आला. आस्ट्रेलियाविरुद्धची मालिका मध्यावर आली होती. अनिलने घेतलेल्या निवृत्तीमुळे फार मोठी पोकळी निर्माण झाली होती. या वेळी मी एमएस धोनीच्या नावाची शिफारस केली. टी-२० विश्वचषक स्पर्धेच्या वेळीही मी त्याचं नाव सुचवलं होतं. कसोटीसाठीही त्यालाच कर्णधारपद मिळणं स्वाभाविक ठरणार होतं.

धोनी कर्णधार झाल्यानंतर भारतीय संघाने टी-२० क्रिकेटमध्ये कमालीचं यश मिळवलं होतं. एकदिवसीय सामन्यातही कप्तान म्हणून त्याची कामगिरी चांगली झाली होती. धोनीकडे तिन्ही प्रकारच्या क्रिकेटमध्ये खेळण्याची क्षमता होती. त्याला खेळाची उत्तम जाण होती. ऐन मोक्याच्या क्षणी त्याने केलेला अंदाज अचूक ठरत असे. स्लिपमध्ये क्षेत्ररक्षण करत असताना अनेकदा आमची चर्चा होत असे. त्यामुळे धोनीच्या क्षमतेबद्दलचं माझं मत अधिकच पक्क झालं होतं. धोनीच्या नावाची शिफारस करताना माझ्या मनात कोणतीही शंका नव्हती. तो तरुण होता. बरीच वर्षं तो भारतीय संघाचं सारथ्य करू शकेल,

असा मला विश्वास वाटत होता.

सौरव गांगुली, राहुल द्रविड, अनिल कुंबळे व एमएस धोनी हे चौघे माझ्यानंतर कप्तान झाले. त्यांची नावं मी सुचवली होती व त्यांच्या नेतृत्वाखालीही मी भारतीय संघात खेळलो. चौघांशीही माझे संबंध अतिशय सलोख्याचे व मित्रत्वाचे होते. आवश्यक वाटेल तेव्हा मी माझं मत त्यांच्यापाशी व्यक्त करायचो; पण अंतिम निर्णय मात्र त्यांच्यावर सोपवत असे. एक ज्येष्ठ खेळाडू म्हणून कर्णधाराला आणखी काही पर्याय सुचवणं मला माझं कर्तव्य वाटे. कारण कप्तानाला एकाच वेळी अनेक गोष्टींचं भान ठेवावं लागतं. अशा वेळी काही गोष्टी त्याच्या नजरेतून निसटणं सहज शक्य असतं. मला खेळामध्ये गुंतून राहायला फार आवडत असे. चौघांनीही मी केलेल्या सूचनांचं वेळोवेळी स्वागतच केलं. अंतिम निर्णय हा नेहमी कप्तानानेच घ्यायचा असतो; पण संघाच्या हिताच्या दृष्टीने माझ्या मनात आलेला विचार त्यांच्यापर्यंत पोचवणं मला महत्त्वाचं वाटे.

ज्या ज्या कर्णधाराच्या नेतृत्वाखाली मी खेळलो, त्या प्रत्येकाची काही विशिष्ट बलस्थानं होती. सौरवला खेळाची जाण उत्तम होती. तो मुत्सद्दीपणे डावपेच लढवायचा. त्याचं नेतृत्व आक्रमक असायचं. कठीण प्रसंगीही तो नवीन प्रयोग करायला डगमगायचा नाही. सौरवच्या नेतृत्वाखालीच आम्ही परदेशात सातत्याने विजय मिळवायला सुरुवात केली.

अनिल कुंबळेकडे उत्तम संवादकौशल्य होतं. प्रत्येक खेळाडूकडून त्याला काय अपेक्षित आहे, हे तो त्या खेळाडूला नीट समजावून सांगू शकायचा. तोही आक्रमक होता. स्वत:च्या अंत:प्रेरणेवर त्याचा अधिक विश्वास असायचा. सौरव व अनिल हे खेळाडू म्हणून जितके महान होते, तितकेच कप्तान म्हणूनही सक्षम होते.

त्याउलट राहुलचा दृष्टिकोन पारंपरिक असायचा. तो खेळाला एका ठरावीक पद्धतीने सामोरा जायचा. कणखरपणा हा त्याचा विशेष गुण होता. क्रिकेटबद्दलची त्याची बांधिलकी वादातीत होती; पण नवनवीन प्रयोग करण्यापासून तो नेहमीच दूर राहायचा. धोनी मात्र स्वयंस्फूर्तीने व स्वत:च्या आतल्या आवाजावर पूर्ण विश्वास ठेऊन घेतलेला निर्णय अमलात आणून पाहायला मुळीच कचरत नसे. अवघड प्रसंगीही न गांगरता तो अतिशय संयमाने परिस्थिती हाताळत असे. या सर्वांच्या नेतृत्वाखाली भारताने काही मोठ्या मालिका जिंकल्या. त्यांच्याबरोबर खेळताना मलाही खूप मजा आली.

काही परदेशी कप्तानांचाही मला आवर्जून उल्लेख करावासा वाटतो. नासीर हुसेन हा माझ्या काळातला सर्वोत्तम कर्णधार होता असं मला वाटतं. रणनीती आखण्यात तो तरबेज होता. अनेकदा त्याचे डावपेच नकारात्मकही असायचे. एकदा त्याने ॲशले जाइल्सला माझ्याविरुद्ध ओव्हर द विकेट मारा करत सतत उजव्या यष्टीच्या बाहेर गोलंदाजी करायला लावलं होतं. त्याने खेळावर खूप सखोल विचार केलेला होता. तो स्वत:च्या योजना अमलात आणत असे. प्रतिस्पर्धी फलंदाजाने एखाद्या ठिकाणी शॉट मारल्यानंतर तो त्या जागी कधीही क्षेत्ररक्षक ठेवत नसे. त्यापेक्षा फलंदाज कुठे शॉट मारू शकेल, याचा आधी अंदाज घेऊन त्या ठिकाणी क्षेत्ररक्षक ठेवणं तो अधिक पसंत करे. त्याच्या नेतृत्वाखाली इंग्लंड संघाच्या कामगिरीत खूपच फरक पडला होता.

आस्ट्रेलियन कर्णधारांमध्ये मला मायकेल क्लार्क सर्वोत्कृष्ट वाटला होता. १९९२मध्ये ॲलन बॉर्डर कप्तान असताना मी खूपच तरुण होतो, पण माझ्या मते जगातील सर्वोत्तम खेळाडू संघात असण्याचा फायदा मार्क टेलर, स्टीव्ह वॉ व रिकी पाँटिंग या आस्ट्रेलियन कर्णधारांना निश्चितच झाला होता. एकहाती विजय मिळवून देणारे खेळाडू संघात असले की, कर्णधाराचं काम खूपच सोपं होऊन जातं. क्लार्कची गोष्ट मात्र वेगळी होती. त्याला जवळजवळ शून्यातून पुन्हा संघ निर्माण करायचा होता. अल्पावधीत त्याने पुन्हा दर्जेदार संघ तयार करून स्वत:ची क्षमता सिद्ध केली.

दक्षिण आफ्रिकेचा कर्णधार ग्रॅमी स्मिथबद्दलही माझ्या मनात खूप आदर आहे. वयाच्या अवघ्या बाविसाव्या वर्षी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत त्याच्यावर नेतृत्व सोपवलं गेलं. आपल्या कल्पक व चमकदार नेतृत्वाने त्याने दक्षिण आफ्रिकेला जागतिक कसोटीमध्ये सर्वोच्च मानांकन मिळवून दिलं.

माझ्या कर्णधारपदाच्या कारकिर्दीचा मी जेव्हा विचार करतो तेव्हा योग्य साथ मिळाली असती, तर पहिल्या खेपेस मी संघाला अधिक विजय मिळवून देऊ शकलो असतो असं मला वाटतं. निवडसमितीशी मी फारसं पटवून घेऊ शकलो नाही. मला हवा असलेला संघ मला कधीच मिळाला नाही. त्या कालखंडात प्रत्येक मालिका ही मला माझीच वैयक्तिक कसोटी

वाटत असे. एखाद्या मालिकेत पराभव पत्करावा लागला तरी माझं आसन डळमळीत होत असे. तुमची कामगिरी सतत कुणीतरी आजमावत आहे जे जाणवलं की, तुमच्यावरचं दडपण अधिक वाढतं. त्या वाढलेल्या दडपणामुळे तुम्ही सर्वोत्तम कामगिरी करू शकत नाही. प्रत्येक कप्तानाला विजयच मिळवायचा असतो; पण आंतरराष्ट्रीय खेळात प्रत्येक वेळेस विजय मिळवणं शक्य नसतं. प्रतिस्पर्धी संघही जिंकण्यासाठीच खेळत असतो. अनेकदा तो आपल्यापेक्षा चांगला खेळ खेळतो. १९९९मध्ये आस्ट्रेलियात तेच घडलं.

जे होऊन गेलं त्याबद्दल पश्चात्ताप करण्यात काहीच अर्थ नव्हता. कर्णधारपदाच्या पलीकडे जाऊन संघासाठी मी जास्तीत जास्त काय करू शकतो याचा अधिक विचार करणं आवश्यक होतं. फेब्रुवारी, २०००मध्ये कप्तानपद सोडल्यानंतर १३ वर्षं मी भारतीय संघासाठी चांगलं योगदान देऊ शकलो, याचं मला समाधान वाटतं.

'तेंडुलकर' असल्याचे तोटे

क्रिकेटर्सच्या कुटुंबीयांची मोठी मौज असते, असा एक सार्वत्रिक गैरसमज असतो; उलट मी नसताना मुलांच्या पालकत्वाची जबाबदारी एकट्या अंजलीला उचलावी लागत होती. दोन मुलांना एकटीने वाढवणं ही फारच अवघड गोष्ट होती. मी सतत घरापासून दूर असल्यामुळे मुलंही वडिलांच्या प्रेमाला पारखी होत. इतर मुलांप्रमाणे त्यांना नेहमीची मजा करायलाही मिळत नसे. त्याची अनेक उदारहणं देता येतील.

अर्जुन नऊ महिन्यांचा असताना 'अदिदास' फॅक्टरीला भेट देण्यासाठी मला जर्मनीला जावं लागणार होतं. अंजलीलाही मी बरोबर न्यायचं ठरवलं. मला फक्त पाच दिवस राहावं लागणार होतं. अंजलीही अर्जुनच्या जन्मानंतर नऊ महिन्यांत घराबाहेर पडली नव्हती. आम्ही अंजलीच्या आई-वडिलांकडे मुलांना सोडून जर्मनीला निघून गेलो आणि तिसऱ्या दिवशी एक आपत्ती कोसळली. अदिदास फॅक्टरीतलं काम संपवून आम्ही एका छोट्या गावात मुक्कामाला आलो होतो. त्या संध्याकाळी डॉक्टर अजित गजेंद्रगडकरांचा अंजलीला फोन आला. आम्हाला ताबडतोब भारतात परतावं लागणार होतं. अंजलीची आई बेशुद्धावस्थेत हॉस्पिटलमध्ये होती. तिला मेंदूमध्ये रक्तस्राव झाला होता. (त्यानंतर ती पूर्ण बरी झाली.) अर्जुनही आजारी पडला होता.

रात्र झाली होती. भारतात जाण्यासाठी दुसऱ्या दिवशी सकाळपर्यंत वाट पाहावी लागणार होती. प्रवासातही आम्ही अस्वस्थ होतो. नऊ महिन्यांच्या अर्जुनला कोणी सांभाळलं असेल, या काळजीने आम्ही धास्तावून गेलो होतो. घरी पोचल्यावर अर्जुनला पाहताच आमच्या डोळ्यांत पाणी आलं. त्याचं वजन घटलं होतं. तो केविलवाण्या नजरेने आमच्याकडे बघत होता. आम्हाला पाहून त्याला बरं वाटलं होतं; पण तो मनातून दुखावला गेला होता. आपल्याला एकटं सोडून आपले आई-वडील दूर गेल्याचा त्याला राग आला होता. अंजली त्यानंतर मुलांना एकटं घरी ठेवून माझ्याबरोबर कधीही परदेशी आली नाही.

असाच एक वेगळा प्रसंग मार्च, २००७मध्ये घडला. आम्ही विश्वचषक स्पर्धेतून बाहेर फेकले गेलो होतो. आम्ही अतिशय खराब खेळलो होतो. त्यामुळे देशाची खूपच बदनामी झाली होती. याचा परिणाम मुलांवर होऊ शकेल, याची जाणीव माझ्या घरातल्यांना होती. अंजलीने अर्जुनला नीट समजावून सांगण्याचा प्रयत्न केला होता की, 'शाळेत जर तुझ्या डॅडविरुद्ध कुणी काही बोललं तर तू त्याकडे दुर्लक्ष कर. तू त्यांना सांग की, आम्हालाही त्या गोष्टीचं खूप वाईट वाटलं आहे. पुढच्या खेपेस आपण अधिक चांगलं क्रिकेट खेळू.' त्यानंतर अर्जुनचा एक मित्र त्याला म्हणाला की, ''तुझे बाबा शून्यावर आउट झाल्यामुळे आपण वर्ल्ड कप हरलो.'' अर्जुनला त्याच्या बोलण्याचा खूप राग आला. अंजलीने दिलेला सल्ला तो विसरला. त्याने त्या मुलाला एक जोरदार गुद्दा हाणला. ''माझ्या डॅडीविरुद्ध काही बोलशील तर खबरदार!'' असा त्याला दमही दिला.

मुलं आता मोठी झाली आहेत. साराला विज्ञानशाखेची आवड आहे. आत्तापर्यंत फुटबॉलमध्ये रस असलेल्या अर्जुनला आता क्रिकेट खेळावंसं वाटू लागलं आहे. दोघंही आपापल्या आवडीच्या गोष्टींत रमले आहेत, याचा मला आनंद आहे. गेल्या काही वर्षांत सारामध्ये लक्षणीय फरक पडला आहे. ती स्वत:हून अनेक जबाबदाऱ्या उचलत आहे. तिच्या मनासारखं

वेळापत्रक तिला आखता यावं यासाठी अंजलीने तिला पूर्ण स्वातंत्र्य दिलं आहे. साराचीही समज खूपच वाढली आहे. २०१२च्या उन्हाळ्यात ती खास शिक्षणासाठी ऑक्सफर्ड समर स्कूलमध्ये गेली होती. तिला आता डॉक्टर व्हायचं आहे. तिची प्रगती पाहून मी खूश आहे. प्रत्येक मुलाने आपलं भवितव्य स्वत: ठरवायला हवं आणि प्रत्येक पालकाने त्यासाठी मुलांना प्रोत्साहन द्यायला हवं, या मताचा मी आहे. मी नेमका तसाच वागलो. माझ्या मुलांनीही पुढे तसंच वागावं, अशी माझी इच्छा आहे.

अर्जुनला मात्र आता क्रिकेटचा खूपच ध्यास लागला आहे. तुम्हाला खोटं वाटेल, पण तो सात वर्षांचा होईपर्यंत मी त्याच्याशी क्रिकेटबद्दल काहीही बोललो नव्हतो. क्रिकेट सोडून मी सर्व विषयांवर त्याच्याशी गप्पा मारायचो. मला माझं व्यावसायिक जग जाणीवपूर्वक त्याच्यापासून दूर ठेवायचं होतं. ही दोन्ही विश्वं नेहमीच एकमेकांपासून वेगळी असावीत, असं माझं म्हणणं होतं. मी मुलांना क्रिकेटपासून इतकं दूर ठेवलं होतं की, माझी बॅटिंग दाखवण्यासाठी अंजली एकदाही त्यांना घेऊन कधी स्टेडियमवर आली नाही. अंजली स्वत:ही फार कमी वेळा स्टेडियमवर आली आहे. १९९६मध्ये मी एजबॅस्टनला जेव्हा शतक काढलं तेव्हा तिने मला पहिल्यांदा खेळताना पाहिलं. दुसऱ्यांदा ती २००४मध्ये मेलबोर्नला आली होती. त्या डावात मी शून्यावर बाद झालो. त्यानंतर ती स्टेडियमवर फिरकलीच नाही. नोव्हेंबर, २०१३मध्ये ईडन गार्डन्सवरच्या माझ्या १९९व्या कसोटी सामन्यासाठी ती बऱ्याच वर्षांनी स्टेडियमवर आली; पण एरवी घरी असताना टीव्हीवर मात्र ती माझी प्रत्येक मॅच पाहत असे. ती तिच्या खास जागेवर बसत असे. मी बॅटिंग करत असताना ती कुणाशी एक शब्दही बोलत नसे किंवा आलेला फोनही उचलत नसे. मी खेळत असताना माझ्याबरोबर सतत राहण्याची तिची ती अनोखी पद्धत होती.

'अर्जुनने क्रिकेट खेळायचं ठरवल्यावर तुझ्यावरचं दडपण वाढलं आहे का,' असं मला आता अनेक जण विचारतात. मला तसं मुळीच वाटत नाही. आपल्या आवडीच्या गोष्टीत तो रस घेतो आहे, याचं मला समाधान आहे. त्यालाही ते करण्यातच खरा आनंद मिळणार आहे. शिवाय एखादा खेळ मनापासून खेळण्यात काहीच गैर नसतं. प्रत्येक वेळेस तुम्ही चांगले खेळू शकाल याची कधीच खातरी देता येत नाही, पण मी प्रयत्नांत जराही कसूर केली नाही हे मात्र दरवेळेस तुम्ही खातरीने सांगू शकता. अर्जुन मनापासून प्रयत्न करतो आहे याबद्दल माझ्या मनात शंका नाही. तो क्रिकेटमध्ये किती प्रगती करू शकेल याची मला मुळीच काळजी वाटत नाही. ज्या गोष्टीवर त्याचं प्रेम आहे त्यावर तो प्रभुत्व मिळवू पाहतो आहे, याचाच मला मनापासून आनंद आहे. जर तुम्ही क्रिकेटच्या प्रेमात वेडे झाला असाल, तरच तुम्ही क्रिकेटमध्ये स्वत:ला झोकून देऊ शकता. गेल्या काही वर्षांत अर्जुनही क्रिकेटने पछाडला गेला आहे. तो खेळत असताना त्याच्यावर दडपण असणार हे नक्कीच. त्याने स्वत:हून क्रिकेटची निवड केली आहे. त्यामुळे त्याबरोबर येणारं दडपणही शांतपणे हाताळण्याची सवय त्यानेच करून घ्यायला हवी.

भारताचा न्यूझीलंड दौरा – १९९८-१९९९

पहिली कसोटी. ड्युनेडिन – १८ ते २२ डिसेंबर, १९९८

एकही चेंडू न टाकता मॅच रद्द करण्यात आली

दुसरी कसोटी. वेलिंग्टन – २६ ते ३० डिसेंबर, १९९८

भारत २०८ (एम अझरुद्दीन १०३, **एसआर तेंडुलकर** ४७; एसबी डूल ७-३५) व ३५६ (**एसआर तेंडुलकर** ११३, एससी गांगुली ४८, एम अझरुद्दीन ४८; डीजे नॅश ३-२०, एसबी डूल २-४९)

न्यूझीलंड ३५२ (डीजे नॅश ८९*, डीएल व्हेटोरी ५७, एनजे ॲसल ५६; ए कुंबळे ४-८३, **एसआर तेंडुलकर** २-७) व २१५-६ (सीडी मॅकमिलन ७४*, सीएल केर्न्स ६१; जे श्रीनाथ ३-८२, ए कुंबळे २-७०)

न्यूझीलंड ४ गडी राखून विजयी

तिसरी कसोटी. हॅमिल्टन – २ ते ६ जानेवारी, १९९९

न्यूझीलंड ३६६ (सीडी मॅकमिलन ९२, आरजी स्वाउस ८७, एमजे हॉर्न ६३; जे श्रीनाथ ५-९५) व ४६४-८ घोषित (सीएल केर्न्स १२६, सीडी मॅकमिलन ८४, डीजे नॅश ६३, एसी परोरे ५०; **एसआर तेंडुलकर** २-३०)

भारत ४१६ (आर द्रविड १९०, जे श्रीनाथ ७६, **एसआर तेंडुलकर** ६७; सीएल केर्न्स ४-१०७, एसबी डूल ३-६४) व २४९-२ (आर द्रविड १०३*, एससी गांगुली १०१*, एसबी डूल २-३०)

सामना अनिर्णित

न्यूझीलंड मालिकेत १-० विजयी

पाकिस्तानचा भारत दौरा, १९९९

पहिली कसोटी. चेन्नई – २८ ते ३१ जानेवारी, १९९९

पाकिस्तान २३८ (एम खान ६०, वाय योहाना ५३; ए कुंबळे ६-७०, जे श्रीनाथ ३-६३, **एसआर तेंडुलकर** १-१०) व २८६ (एस आफ्रिदी १४-१, इंझमाम-उल-हक ५१; बीकेव्ही प्रसाद ६-३३, **एसआर तेंडुलकर** २-३५)

भारत २५४ (एससी गांगुली ५४, आर द्रविड ५३, **एसआर तेंडुलकर** ०; एस मुश्ताक ५-९४, एस आफ्रिदी ३-३१) व २५८ (**एसआर तेंडुलकर** १३६, एनआर मोंगिया ५२; एस मुश्ताक ५-९३, डब्ल्यू अक्रम ३-८०)

पाकिस्तान १२ धावांनी विजयी

दुसरी कसोटी. दिल्ली – ४ ते ७ फेब्रुवारी, १९९९

भारत २५२ (एम अझरुद्दीन ६७, एस रमेश ६०, **एसआर तेंडुलकर** ६; एस मुश्ताक ५-९४) व ३३९ (एस रमेश ९६, एससी गांगुली ६२*, **एसआर तेंडुलकर** २९; एस मुश्ताक ५-१२२, डब्ल्यू अक्रम ३-४३)

पाकिस्तान १७२ (एस आफ्रिदी ३२, एस मलिक ३१; ए कुंबळे ४-५५, एच सिंग ३-३०) व २०७ (एस अन्वर ६९, एस आफ्रिदी ४१; ए कुंबळे १०-७४)

भारत २१२ धावांनी विजयी

मालिका १-१ अनिर्णित

आशिया कसोटी चँपियनशिप, १९९९

पहिला सामना. भारत विरुद्ध पाकिस्तान, कोलकाता – १६ ते २०, फेब्रुवारी १९९९

पाकिस्तान १८५ (एम खान ७०; जे श्रीनाथ ५-४६, बीकेव्ही प्रसाद २-२७, **एसआर तेंडुलकर** १-८) व ३१६ (एस अन्वर १८८, वाय योहाना ५६; जे श्रीनाथ ८-८६)

भारत २२३ (एस रमेश ७९, **एसआर तेंडुलकर** ०; एस अख्तर ४-७१, डब्ल्यू अक्रम ३-६५) व २३२ (व्हीव्हीएस लक्ष्मण ६७, एस रमेश ४०, **एसआर तेंडुलकर** ९; एस अख्तर ४-४७, एस मुश्ताक ३-६९)

पाकिस्तान ४६ धावांनी विजयी

दुसरा सामना. श्रीलंका विरुद्ध भारत, कोलंबो (एसएससी) – २४ ते २८ फेब्रुवारी, १९९९

भारत ५१८-७ घोषित (एस रमेश १४३, आर द्रविड १०७, एम अझरुद्दीन ८७, एससी गांगुली ५६, **एसआर तेंडुलकर** ५३) व ३०६-५ (**एसआर तेंडुलकर** १२४*, एससी गांगुली ७८; केईए उपशांथा २-४१, पीए डिसिल्व्हा २-५९)

श्रीलंका ४८५ (डीपीएमडी जयवर्धने २४२, ए रणतुंगा ६६; ए कुंबळे ४-१३४, एच सिंग ३-१२७)

सामना अनिर्णित

अंतिम सामन्यात पाकिस्तान विजयी विरुद्ध श्रीलंका

विश्वचषक स्पर्धा १९९९ – भारताचे सामने

दुसरा सामना. भारत विरुद्ध दक्षिण आफ्रिका. होव्ह. १५ मे, १९९९
भारत २५३-५ (५०/५० षटकं) दक्षिण आफ्रिका २५४-६ (४७.२/५०षटकं)
दक्षिण आफ्रिका ४ गडी राखून विजयी (१६ चेंडू बाकी)

आठवा सामना. भारत विरुद्ध झिंबाब्वे. लेसिस्टर. १९ मे, १९९९
झिंबाब्वे २५२-९ (५०/५० षटकं) भारत २४९ (४५/४६ षटकं)
झिंबाब्वे ३ धावांनी विजयी

पंधरावा सामना. भारत विरुद्ध केनिया. ब्रिस्टॉल. २३ मे, १९९९
भारत ३२९-२ (५०/५० षटकं) केनिया २३५-७ (५०/५० षटकं)
भारत ९४ धावांनी विजयी

एकविसावा सामना. भारत विरुद्ध श्रीलंका. टाँटन. २६ मे, १९९९
भारत ३७३-६ (५०/५० षटकं) श्रीलंका २१६ (४२.३/५० षटकं)
भारत १५७ धावांनी विजयी

पंचविसावा सामना. इंग्लंड विरुद्ध भारत. बर्मिंगहॅम. २९-३० मे, १९९९
भारत २३२-८ (५०/५०षटकं) इंग्लंड १६९ (४५.२/५० षटकं)
भारत ६३ धावांनी विजयी

पहिली सुपर लीग. आस्ट्रेलिया विरुद्ध भारत. द ओव्हल. ४ जून, १९९९
आस्ट्रेलिया २८२-६ (५०/५०षटकं) भारत २०५ (४८.२/५० षटकं)
आस्ट्रेलिया ७७ धावांनी विजयी

चौथी सुपर लीग. भारत विरुद्ध पाकिस्तान. मँचेस्टर. ८ जून, १९९९
भारत २२७-६ (५०/५०षटकं) पाकिस्तानी १८० (४५.३/५० षटकं)
भारत ४७ धावांनी विजयी

आठवी सुपर लीग. भारत विरुद्ध न्यूझीलंड. नॉटिंगहॅम. १२ जून, १९९९
भारत २५१-६ (५०/५० षटकं) न्यूझीलंड २५३-५ (४८.२/५० षटकं)
न्यूझीलंड ५ गडी राखून विजयी (१० चेंडू बाकी)

अंतिम सामना. आस्ट्रेलिया विरुद्ध पाकिस्तान. लॉर्ड्स. २० जून, १९९९
पाकिस्तान १३२ (३९/५० षटकं) आस्ट्रेलिया १३३-२ (२०.१/५०षटकं)

आस्ट्रेलिया ८ गडी राखून विजयी (१७९ चेंडू बाकी)

न्यूझीलंडचा भारत दौरा, १९९९

पहिली कसोटी. मोहाली – १० ते १४ ऑक्टोबर, १९९९

भारत ८३ (जे श्रीनाथ २०, **एसआर तेंडुलकर** १८, एमएसके प्रसाद १६*; डीजे नॅश ६-२७, सीएल केर्न्स २-२३, एसबी ओकनर २-२०) व ५०५-३ घोषित (आर द्रविड १४४, **एसआर तेंडुलकर** १२६*, डीजे गांधी ७५, एस रमेश ७३,

एससी गांगुली ६४)*

न्यूझीलंड २१५ (सीएम स्पिअरमन ५१, एनजे ॲसल ४५, एसपी फ्लेमिंग ४३; जे श्रीनाथ ६-४५) व २५१-७ (एसपी फ्लेमिंग ७३; ए कुंबळे ३-४२, एसबी जोशी २-३८)

सामना अनिर्णित

दुसरी कसोटी. कानपूर –२२ ते २५ ऑक्टोबर, १९९९

न्यूझीलंड २५६ (सीएल केर्न्स ५३, डीजे नॅश ४१; ए कुंबळे ४-६७, जे श्रीनाथ ३-६२) व १५५ (एससी परोरे ४८; ए कुंबळे ६-६७, एच सिंग ३-३३)

भारत ३३० (डीजे गांधी ८८, एस रमेश ८३, आर द्रविड ४८, **एसआर तेंडुलकर** १५; डीएल व्हेटोरी ६-१२७) व ८३-२ (**एसआर तेंडुलकर** ४४*, डीजे गांधी ३१)

भारत ८ गडी राखून विजयी

तिसरी कसोटी. अहमदाबाद –२९ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर, १९९९

भारत ५८३-७ घोषित (**एसआर तेंडुलकर** २१७, एससी गांगुली १२५, एस रमेश ११०; डीएल व्हेटोरी ४-२००) व १४८-५ घोषित (एससी गांगुली ५३, **एसआर तेंडुलकर** १५)

न्यूझीलंड ३०८ (एमजे ॲसल ७४, सीएल केर्न्स ७२, एसपी फ्लेमिंग ४८; ए कुंबळे ५-८२) व २५२-२ (जीआर स्टेड ७८, एसपी फ्लेमिंग ६४*, सीएम स्पिअरमन ५४)*

सामना अनिर्णित

भारत मालिकेत १-० विजयी

भारताचा आस्ट्रेलिया दौरा १९९९-२०००, बॉर्डर-गावसकर करंडक

पहिली कसोटी. ॲडलेड – १० ते १४ डिसेंबर, १९९९

आस्ट्रेलिया ४४१ (एसआर वॉ १५०, आरई पॉंटिंग १२५, एसके वॉर्न ८६; बीकेव्ही प्रसाद ३-८३) व २३९-८ घोषित (जीए ब्लुवेट ८८, एसी गिलख्रिस्ट ४३; एबी आगरकर ३-४३, जे श्रीनाथ ३-६४,

भारत २८५ (**एसआर तेंडुलकर** ६१, एससी गांगुली ६०, व्हीव्हीएस लक्ष्मण ४१; एसके वॉर्न ४-९२, डीडब्ल्यू फ्लेमिंग ३-७०) व ११० (एससी गांगुली ४३, **एसआर तेंडुलकर** ०; डीडब्ल्यू फ्लेमिंग ५-३०, जीडी मॅक्ग्रा ३-३५)

आस्ट्रेलिया २८५ धावांनी विजयी

दुसरी कसोटी. मेलबोर्न – २६ ते ३० डिसेंबर, १९९९

आस्ट्रेलिया ४०५ (एमजे स्लेटर ९१, एसी गिलख्रिस्ट ७८, आरटी पॉंटिंग ६७; जे श्रीनाथ ४-१३०, एबी आगरकर ३-७६) व २०८-५ घोषित (एससी गिलख्रिस्ट ५५, एमई वॉ ५१*; एबी आगरकर ३-५१, ए कुंबळे २-७२)

भारत २३८ (**एसआर तेंडुलकर** ११६, एससी गांगुली ३१; ब्रेट ली ५-४७, जीडी मॅक्ग्रा ३-३९) व १९५ (**एसआर तेंडुलकर** ५२, एचएच कानिटकर ४५; एमई वॉ २-१२, ब्रेट ली २-३१, डीडब्ल्यू फ्लेमिंग २-४६)

आस्ट्रेलिया १८० धावांनी विजयी

तिसरी कसोटी. सिडनी – २ ते ४ जानेवारी, २०००

भारत १५० (**एसआर तेंडुलकर** ४५, आर द्रविड २९; जीडी मॅक्ग्रा ५-४८, ब्रेट ली ४-२९) व २६१ (व्हीव्हीएस लक्ष्मण १६७, **एसआर तेंडुलकर** ४; जीडी मॅक्ग्रा ५-५५, ब्रेट ली २-६७)

आस्ट्रेलिया ५५२-५ घोषित (जे लॅंगर २२३, आरटी पॉंटिंग १४१*, एसआर वॉ ५७; जे श्रीनाथ २-१०५, **एसआर**

तेंडुलकर १-३४)

आस्ट्रेलिया एक डाव आणि १४१ धावांनी विजयी

ऑस्ट्रेलिया मालिकेत ३-० विजयी

दक्षिण आफ्रिकेचा भारत दौरा, २०००

पहिली कसोटी. मुंबई – २४ ते २६ फेब्रुवारी, २०००

भारत २२५ (**एसआर तेंडुलकर** ९७, एबी आगरकर ४१*; जेएच कॅलिस ३-३०, एए डोनाल्ड २-२३, एसएम पोलॉक २-४३) व ११३ (आर द्रविड ३७, **एसआर तेंडुलकर** ८; एसएम पोलॉक ४-२४, डब्ल्यूजे क्रोनिए ३-२३)

दक्षिण आफ्रिका १७६ (जी कर्स्टन ५०, एचएच गिब्ज ४७; **एसआर तेंडुलकर** ३-१०, जे श्रीनाथ ३-४५, व १६४-६ (एचएच गिब्ज ४६, जेएस कॅलिस ३६*; ए कुंबळे ४-५६)

दक्षिण आफ्रिका ४ गडी राखून विजयी

दुसरी कसोटी. बंगळुरू – २ ते ६ मार्च, २०००

भारत १५८ (ए कुंबळे ३६*, **एसआर तेंडुलकर** २१; एन बोइए २-१०, एसएम पोलॉक २-२६, एम हेवर्ड २-४०) व २५० (एम अझरुद्दीन १०२, ए कुंबळे २८, **एसआर तेंडुलकर** २०; एम बोइए ५-८३, एए डोनाल्ड २-५६)

दक्षिण आफ्रिका ४७९ (एल क्लुसनर ९७, जेएस कॅलिस ९५, एन बोईए ८५, जी कर्स्टन ७०, डीजे कलिनन ५३; ए कुंबळे ६-१४३, एम कार्तिक ३-१२३)

दक्षिण आफ्रिका एक डाव व ७१ धावांनी विजयी

दक्षिण आफ्रिका मालिकेत २-० विजयी

११.
अभूतपूर्व मालिका

सौरवच्या नेतृत्वाखाली एकदिवसीय मालिकेत दक्षिण आफ्रिकेचा ३-२ असा पराभव करून भारताने झकास सुरुवात केली. पण त्यानंतर मॅच फिक्सिंग प्रकरण उद्भवलं. त्या खळबळजनक प्रकरणामुळे खेळाची विश्वासार्हता धोक्यात आली. पैशांकरता सामने ठरवून हरण्याच्या गोष्टी उघडकीला येत होत्या. सामन्याचा निकाल आधीच पक्का करण्याच्या प्रकारांमुळे क्रिकेटची प्रतिष्ठा रसातळाला गेली. हे सर्वच प्रकरण अतिशय क्लेशकारक व किळसवाणं होतं. या घृणास्पद प्रकारामुळे क्रिकेटशौकिनांचा खेळावरचा विश्वास उडत चालला होता. खेळाडूंच्या प्रामाणिकतेबद्दल लोकांच्या मनात संशय निर्माण झाला होता. क्रिकेटची ढासळलेली प्रतिष्ठा आणि विश्वासार्हता आम्हाला लवकरात लवकर पुनर्प्रस्थापित करायची होती. त्यासाठी आम्ही फेब्रुवारी-मार्चमध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध सुरू होणाऱ्या मालिकेची वाट पाहत होतो. भारत-ऑस्ट्रेलिया मालिका नेहमीच अटीतटीने खेळली जाते. ही मालिका सुरू झाल्यावर क्रिकेटचाहत्यांचं लक्ष गलिच्छ भ्रष्टाचारांच्या गोष्टींवरून उडून अस्सल क्रिकेटवर केंद्रित होईल, अशी आम्हाला आशा होती.

त्या वेळी ऑस्ट्रेलियन संघ मायदेशात व परदेशात सर्व प्रतिस्पर्धी संघांचा धुव्वा उडवत होता. भारतात पाऊल ठेवण्यापूर्वी त्यांनी सलग १५ कसोटी सामने जिंकले होते. त्यांच्यापाशी ग्लेन मॅक्ग्रा, जेसन गिलेस्पी, डॅमियन फ्लेिमग, मायकेल कास्परोविझ आणि शेन वॉर्न असे तगडे गोलंदाज होते. कोणत्याही देशात आणि प्रतिकूल वातावरणातही विकेट्स मिळवण्याची त्यांच्यात क्षमता होती. गोलंदाजांप्रमाणेच त्यांच्याकडे सर्वोत्कृष्ट फलंदाज होते. मॅथ्यू हेडन, मायकेल स्लेटर, जस्टिन लँगर, स्टीव्ह आणि मार्क वॉ हे जुळे बंधू, रिकी पाँटिंग व ॲडम गिलख्रिस्ट. त्यांचा प्रत्येक फलंदाज ऐन भरात होता.

ऑस्ट्रेलियाची मालिका सुरू होण्याआधी मी माझ्या कुटुंबासमवेत स्थलांतरण केलं होतं. 'साहित्य सहवास' सोडून आम्ही पश्चिम बांद्र्याच्या 'ला मेर्' रेसिडेन्सीमधील एका अपार्टमेंटमध्ये राहायला गेलो. या जागाबदलामध्ये माझा काहीच हातभार लागला नव्हता. अंजलीनेच सर्व काही योजनाबद्धपणे ठरवलं होतं. नवीन घरात माझ्या सर्व चीजवस्तू अतिशय सुरेखपणे मांडून ठेवल्या होत्या. आमच्या नव्या आलिशान घरात फक्त प्रवेश करणं एवढंच काम मी केलं.

आम्ही नव्या जागेत राहायला जाऊन १० महिने झाले होते. २६ जानेवारी, २००१ रोजी सकाळी अंजलीचा घाबरलेला आवाज अचानक माझ्या कानावर आला. ``भूकंप!'' ती जोरजोरात ओरडत होती. त्याच वेळी माझ्या मनात पहिला विचार आला की, बिल्डरने बांधकाम करताना काहीतरी घोटाळा केला आहे; पण दुसऱ्याच क्षणी मला भोवतालच्या भीषण परिस्थितीची पूर्ण कल्पना आली. आजूबाजूच्या इमारतींमधलेही लोक ``भागो भागो'' असं जिवाच्या आकांताने ओरडत होते. आम्ही अकराव्या मजल्यावर राहत होतो. दोन मुलांना घेऊन खाली उतरण्यासाठी आम्हाला बराच वेळ लागला असता. मी घरातच थांबण्याचा निर्णय घेतला. आम्ही सर्व जण ड्रॉइंग रूमच्या मध्यभागी एकमेकांना धीर देत घट्ट बिलगून उभे राहिलो. धरणीकंप लवकरात लवकर थांबावा, अशी मी मनोमन प्रार्थना करत होतो.

मिनिटभर झालेल्या त्या भूकंपाने सारा पश्चिम महाराष्ट्र हादरून गेला. गुजरातमधलं भूज गाव उद्ध्वस्त झालं. आम्हा मुंबईकरांचीही त्या धक्क्यातून सुखरूप सुटका झाली नव्हती. ला मच्या बेडरूममधून मला एकाच वेळी दोन प्रार्थनास्थळं दिसतात. एका बाजूला माऊंट मेरी चर्च आहे. दुसऱ्या बाजूला सिद्धिविनायक मंदिर आहे. त्या घटनेनंतर रोज रात्री मी त्या दोन परमशक्तींसमोर हात जोडून `परमेश्वरा, पुन्हा आमच्यावर असा प्रकोप करू नकोस,' अशी कळकळीची प्रार्थना करायचो.

फेब्रुवारीच्या सुरुवातीला मी दुलिप करंडक स्पर्धेतला सामना खेळायला पुण्यात गेलो होतो. पश्चिम विभाग विरुद्ध पूर्व

विभाग अशी मॅच होती. भूकंपाचा प्रसंग अजूनही मनात ताजा होता. त्यामुळे मला रात्री झोप यायची नाही. आम्ही एका साध्या हॉटेलमध्ये राहत होतो. मला कोणत्याही गोष्टीची कमतरता भासू नये, म्हणून हॉटेलचे कर्मचारी माझी खूपच काळजी घेत होते. पण कधीकधी जरा जास्तच काळजी घेण्याच्या नादात ते स्वत:च बिचारे अडचणीत येत होते. आम्हा सर्व खेळाडूंना अंघोळीसाठी गरम पाणी मिळावं म्हणून एक दिवस एका सेवकाने भल्या पहाटेच बॉयलर चालू केला. खूप वेळ चालू राहिल्याने बॉयलर जास्तच तापला. नळातून गढूळ पाणी यायला सुरुवात झाली. पंचतारांकित हॉटेलमध्ये राहायची सवय झाल्यामुळे ते गढूळ पाणी पाहून सुरुवातीला माझी खूपच चिडचिड झाली. पण नंतर लक्षात आलं की, माझीच सरबराई करण्यासाठी त्या सर्वांची मनापासून धडपड चालली होती. त्यांच्या त्या प्रामाणिक प्रयत्नांमुळे मी खूपच भारावून गेलो. अजूनही तो प्रसंग मी विसरलेलो नाही.

दुलिप ट्रॉफीच्या त्या मॅचमध्ये आम्हाला एकदाच बॅटिंग मिळाली. त्या डावात मी ११९ धावा काढल्या. ऑस्ट्रेलियाविरुद्ध आपल्याला जिंकण्याची संधी आहे का, असं सामन्यानंतर मला पत्रकारांनी विचारलं. मी म्हणालो, ''नक्कीच संधी आहे.'' आम्ही ऑस्ट्रेलियाचा पराभव करू शकू, असा मला आत्मविश्वास वाटत होता. फक्त त्यासाठी ऑस्ट्रेलियाच्या संघावर खूप दडपण आणण्याची गरज होती. माझ्या मते त्यांना दडपणाखाली खेळायची सवय नव्हती. जर आम्ही त्यांच्यावर वर्चस्व गाजवू शकलो, तर ते त्या परिस्थितीला कसे सामोरे जातील हे पाहण्याची मला उत्सुकता होती.

पहिली कसोटी. मुंबई – २७ फेब्रुवारी ते १ मार्च, २००१

मुंबईची पहिली कसोटी आम्ही तीन दिवसांत हरलो. पण त्या दारुण पराभवातही आम्ही काही चमकदार क्षण अनुभवले. पहिल्या इनिंग्जमध्ये मी ७६ धावा काढल्या. मॅक्ग्राने ऑफ स्टम्पच्या खूप बाहेर टाकलेल्या चेंडूवर महत्त्वाकांक्षी फटका मारण्याच्या नादात मी बाद झालो. ऑस्ट्रेलियाच्या पहिल्या डावात एका टप्प्यावर ९९ धावांवर ५ गडी बाद. अशी त्यांची स्थिती झाली होती. हरभजनने झटपट तीन बळी मिळवले होते. पण त्यानंतर हेडन व गिलख्रिस्टने आक्रमक फलंदाजी करत सामना आमच्या हातातून हिरावून घेतला. त्यादरम्यान आम्ही काही झेलही सोडले. दोघांनीही शतकं झळकवत ऑस्ट्रेलियाला मोठी आघाडी मिळवून दिली.

दुसऱ्या दिवशी ३० षटकांचा खेळ बाकी असताना आम्ही दुसरा डाव सुरू केला. दिवसाच्या शेवटच्या षटकांच्या वेळी आमचे दोन गडी बाद झाले होते. नयन मोंगियाला नाइट वॉचमन म्हणून पाठवण्यात आलं. गिलेस्पीचा पहिलाच चेंडू मोंगियाच्या बोटावर बसला. तो निवृत्त होऊन माघारी परतला. मला जाऊन शेवटचे पाच चेंडू खेळणं भाग होतं. कोणाही फलंदाजासाठी ते कसोटीचे क्षण असतात. त्यात गिलेस्पीसारख्या गोलंदाजाला खेळणं जास्तच अवघड होतं. त्या वेळी तो फारच सुरेख गोलंदाजी करत होता. दुसऱ्या दिवशी मी राहुल द्रविडच्या साथीने पुन्हा सुरुवात केली. त्या दिवशी आमच्या कणखर वृत्तीचा कस लागणार होता. मॅक्ग्रा व गिलेस्पी एकमेकांना उत्तम साथ देत होते. एका बाजूला राहुल गिलेस्पीची गोलंदाजी खेळत होता. मी मॅक्ग्राला तोंड देत होतो. आम्ही कटाक्षाने एकेरी धावा काढणं टाळत होतो. या दोघांचा सुरुवातीचा हल्ला थोपवल्यावर बॅटिंग करणं सोपं जाणार आहे, हे आम्हाला ठाऊक होतं.

मी अर्धशतक काढून बाद झालो. त्या डावात मी अतिशय दुर्दैवीरीत्या बाद झालो, ही गोष्ट माझे कडवे टीकाकारही कबूल करतील. मार्क वॉच्या चेंडूवर मी खणखणीत शॉट मारला होता. त्या शॉटवर खरंतर चौकार मिळायला हवा होता, पण फॉर्वर्ड शॉट लेगला उभ्या असलेल्या जस्टिन लँगरच्या पाठीला लागून तो चेंडू उडाला. रिकी पाँटिगने मिड विकेटवरून १५ यार्ड धावत पुढे उडी मारून अप्रतिम झेल घेतला. त्याच क्षणी पारडं ऑस्ट्रेलियाच्या बाजूने झुकलं. ऑस्ट्रेलियाने संधीचा फायदा उठवत आमचा डाव गुंडाळला. ऑस्ट्रेलियाचा तो सलग सोळावा विजय होता. विश्वविक्रम करण्यासाठी त्यांना अजून फक्त एक सामना जिंकणं आवश्यक होतं.

दुसरी कसोटी. कोलकाता – ११ ते १५ मार्च, २००१

मी खेळलेल्या उत्कृष्ट सामन्यांमध्ये मी कोलकाता कसोटीची गणना करेन. त्या कसोटीची सुरुवात आमच्यासाठी काही

फारशी चांगली झाली नव्हती. ऑस्ट्रेलियाने पहिल्या डावात ४४५ धावा केल्या. स्टीव्ह वॉने ११० तर मॅथ्यू हेडनने ९७ धावा काढल्या. दुसऱ्या दिवसअखेर आमची १२८ धावांवर ८ गडी बाद, अशी केविलवाणी स्थिती झाली होती. मॅक्ग्रा, गिलेस्पी, कास्परोविझ व वॉर्न या चौघांनाही विकेट्स मिळाल्या. त्या वेळेस आम्ही ती मॅच वाचवू शकू असं आमच्या चाहत्यांनाही वाटलं नसेल. पहिल्या इंनिग्जमध्ये मी फक्त १० धावा काढू शकलो. आमच्या दयनीय कामगिरीमुळे सगळेच निराश झाले होते. आमचे प्रशिक्षक जॉन राइट तर इतके चिडले होते की, त्यांनी आपला राग ड्रेसिंग रूममध्ये पडलेल्या प्लॅस्टिकच्या बाटल्यांवर काढला.

त्या खराब कामगिरीचं शल्य अधिक बोचण्याचं कारण म्हणजे, त्याआधीच भारतातर्फे कसोटी क्रिकेटमधली पहिली हॅटट्रिक नोंदवली गेली होती. पहिल्याच दिवशी हरभजनने पॉंटिंग, गिलख्रिस्ट व वॉर्नला सलग तीन चेंडूत बाद केलं. त्या वेळेस ऑस्ट्रेलिया २५२ धावांवर ४ गडी बाद, अशा मजबूत स्थितीत होता. हरभजनच्या हॅटट्रिकमुळे सामन्याचं रूप पालटलं होतं. भज्जीने या मालिकेत अतिशय हुशारीने गोलंदाजी केली. त्या सामन्यातली त्याची गोलंदाजी तर मी पाहिलेली सर्वोत्कृष्ट होती. प्रथम त्याने पॉंटिंगला पायचीत बाद केलं. त्यानंतर त्याने ॲडम गिलख्रिस्टची विकेट काढली. साहजिकच हॅटट्रिक बॉल टाकण्याआधी खेळाडूंमध्ये भरपूर चर्चा झाली. नवीन आलेला फलंदाज शेन वॉर्न होता. वॉर्नला त्याने कसा चेंडू टाकावा हे त्याला सांगण्याची मला प्रबळ इच्छा झाली होती, पण मी तो मोह आवरला. मी त्याला एवढंच म्हणालो की, ''तुझ्या मनात असेल तसा तू चेंडू टाक.'' त्याने लो फुल टॉस टाकला. वॉर्नने फॉरवर्ड शॉर्ट लेगला झेल दिला.

तिसऱ्या दिवशी सकाळी आमचा पहिला डाव आटोपला. आम्हाला फॉलो-ऑन मिळाला. समाधानाची गोष्ट एवढीच होती की, सहाव्या क्रमांकावर आलेल्या लक्ष्मणने तळाच्या फलंदाजांना सोबतीला घेऊन धावसंख्येत महत्त्वाची भर घातली. लक्ष्मणने ५९ धावा काढल्या. बाद होणारा तो शेवटचा खेळाडू होता. त्यानंतर ड्रेसिंग रूममध्ये थोडीशी चर्चा झाली. लक्ष्मण छान खेळत होता. दुसऱ्या डावात त्याला तिसऱ्या क्रमांकावर पाठवायचं ठरलं. राहुल सहाव्या क्रमांकावर जाणार होता. या अदलाबदलीमुळे एक फार मोठा इतिहास रचला जाणार आहे, याची मात्र त्या वेळी कुणालाच कल्पना नव्हती.

लक्ष्मण व राहुलने दुसरा डाव गाजवला. त्यांच्या बॅटिंगमध्ये विलक्षण प्रभुत्व होतं. दोघांच्याही त्या अजरामर खेळीचा मी पुरेपूर आनंद लुटला. दिवसभरात भारताने एकही विकेट न गमावता ३३५ धावा काढल्या. दिवसभरात एकही गडी बाद न होणं हीच मुळात अविश्वसनीय गोष्ट वाटते. जगातल्या सर्वोत्तम संघाविरुद्ध अशी कामगिरी करणं ही तर थक्क करणारी गोष्ट होती. वॉर्नच्या गोलंदाजीवर लक्ष्मणने काही चकित करणारे शॉट्स मारले. कोलकात्याची हवा त्या वेळी गरम व दमट होती. अशा थकवणाऱ्या हवेत दोघांनी दिलेली झुंज कौतुकास्पद होती. त्या डावात लक्ष्मणने २८१ तर राहुलने १८० धावा काढल्या. आम्ही मॅच हरू शकणार नाही, हे चौथ्या दिवशी स्पष्ट झालं. उलट आमच्या मनात विजयाच्या अंधूक आशा निर्माण झाल्या होत्या. शेवटच्या दिवशी जर आमची गोलंदाजी चांगली झाली, तर आम्ही मॅच जिंकू शकत होतो. सामन्याला नाट्यमय कलाटणी मिळाली होती. मालिकेत आम्ही प्रथमच ऑस्ट्रेलियावर दडपण आणू शकलो होतो. मला हेच अपेक्षित होतं.

३८३ धावांची आघाडी घेऊन आम्ही पाचव्या दिवशी सकाळीच आमचा डाव घोषित केला. सुरुवातीलाच ऑस्ट्रेलियाच्या काही झटपट विकेट्स काढल्या, तर आम्हाला मॅच जिंकण्याची संधी होती. हरभजन सुरेख गोलंदाजी करत होता. पण दुसऱ्या बाजूने त्याला साथ मिळणं आवश्यक होतं. उपाहारानंतरच्या सत्रात आमची निराशा झाली. अपेक्षेप्रमाणे आम्हाला विकेट्स मिळाल्या नाहीत. चहापानाच्या वेळी ऑस्ट्रेलियाने फक्त तीनच गडी गमावले होते. मॅच अनिर्णित अवस्थेकडे झुकू लागली होती. सामना निकाली होण्यासाठी एका नाट्यमय वळणाची गरज होती.

सौरवला काहीतरी वेगळं करावंसं वाटलं. त्याने माझ्या हातात चेंडू दिला. मी एक-दोन विकेट्स काढल्या तर कोंडी फुटू शकेल, अशी त्याला आशा वाटत होती. विजयाची संधी दिसू लागताच कोलकात्याचे प्रेक्षक भारतीय संघाच्या बाजूने उभे राहतील, हेही त्याला ठाऊक होतं. प्रतिस्पर्धी संघाने एखादी मोठी भागीदारी रचली की, मी दोन-तीन षटकं टाकत असे. नियमित गोलंदाज नसल्यामुळे मी गोलंदाजी करताना मनात येईल ते प्रयोग करून पाहत असे. पाचव्या दिवसाच्या खेळपट्टीवर मी लेग स्पिन गोलंदाजी सुरू केली. समोर दोन डावखुरे फलंदाज खेळत होते. मी यष्टीजवळच्या खराब भागात चेंडू टाकून

वळवू लागलो. तो दिवस माझा होता. मला हव्या त्या टप्प्यावर चेंडू पडत होते. ५ षटकांत मी ३ विकेट्स काढल्या. त्यात मॅथ्यू हेडन आणि धोकादायक ॲडम गिलख्रिस्टचा समावेश होता.

पण शेन वॉर्नची विकेट मिळाल्यावर मी जास्त खूश झालो. मी गुगली टाकण्याचा प्रयत्न केला. चेंडूचा टप्पा खेळपट्टीच्या मधोमध पडला. चेंडू झपकन वळला आणि वॉर्नच्या पॅडवर मधल्या यष्टीसमोर आदळला. वॉर्नला तो चेंडू समजलाच नाही. आधी त्याने चेंडू कट करण्याचा प्रयत्न केला. मग गोंधळून त्याला पुलचा फटका मारावासा वाटला. सर्वोत्कृष्ट फिरकी गोलंदाजाची मी हातोहात फिरकी घेतली होती!

ऑस्ट्रेलियन फलंदाजीला भगदाड पडलं. उरलेली कामगिरी भज्जीने पार पाडली. दिवसाची तीन षटकं बाकी असताना आम्ही ग्लेन मॅक्ग्राची शेवटची विकेट काढली. प्रेक्षकांनी एकच जल्लोष करत स्टेडियम डोक्यावर घेतलं. ईडन गार्डन्सवर जमलेल्या एक लाख प्रेक्षकांचा स्वत:च्या डोळ्यांवर विश्वास बसत नव्हता. ते आनंदाने वेडे झाले होते. फॉलो-ऑन मिळाल्यावरही एखाद्या संघाने सामना जिंकल्याचा तो कसोटी क्रिकेटच्या इतिहासातला फक्त तिसरा प्रसंग होता.

सामना संपल्यानंतर बरेच तास आम्ही विजय साजरा करत होतो. त्या अविश्वसनीय विजयानंतर ड्रेसिंग रूममधलं वातावरण पूर्ण बदलून गेलं होतं. प्रत्येकामध्ये उत्साह आणि आत्मविश्वास आला होता. आपण मालिका जिंकू शकू, अशी आता आम्हाला खातरी वाटू लागली होती. दडपणाखाली ऑस्ट्रेलियन संघ कोसळला होता. त्यांच्याभोवतीचं अजिंक्यपणाचं वलय आता भंगलं होतं. मालिकेत १-१ अशी बरोबरी झाली होती. तिसरा व अंतिम कसोटी सामना चेन्नईला सुरू होणार होता. त्या कसोटीत सर्व काही पणाला लावून खेळण्याची वेळ आली होती.

देशभर त्या विजयाचा कसा परिणाम झाला होता, हे एका उदाहरणावरून कुणालाही समजू शकेल. त्या कसोटी सामन्यात एस.के. बन्सल हे पंच म्हणून काम पाहत होते. मॅच संपल्यानंतर ते जेवायला बाहेर निघाले होते. त्यांच्या ड्रायव्हरने गाडी चुकीच्या दिशेला वळवली. गाडी नो-एंट्री लेनमध्ये शिरल्यामुळे पोलिसांनी ती अडवली. ड्रायव्हरच्या वतीने माफी मागण्यासाठी बन्सल गाडीतून खाली उतरले. पोलीस कॉन्स्टेबल क्रिकेटशौकीन होता. त्याने बन्सलना ओळखलं आणि ड्रायव्हरला दंड न करता सोडून दिलं.

तिसरी कसोटी. चेन्नई – १८ ते २२ मार्च, २००१

तिसऱ्या कसोटीतही ऑस्ट्रेलियाने दमदार सुरुवात केली. पुन्हा एकदा फलंदाजीचा भार मॅथ्यू हेडनने उचलला. पूर्ण मालिकेत त्याने झकास फलंदाजी केली. हरभजनच्या समोर तोच एकटा आत्मविश्वासाने खेळला. त्याने द्विशतक झळकवलं. ऑस्ट्रेलियाने पहिल्या डावात ३९१ धावा काढल्या. पहिल्या दिवशी मी चांगली गोलंदाजी केली. कोलकात्यात गवसलेला सूर अजूनही हरवलेला नव्हता. मला विकेट्स मिळाल्या नाहीत. पण माझे चेंडू खूपच वळत होते. गोलंदाजी करताना माझ्या लक्षात आलं की, माझ्या बोटांवरची त्वचा सोलली गेली होती. त्यामुळे मला चेंडू नीट पकडता येत नव्हता.

पहिल्या दिवसअखेर ३२६ धावा आणि ३ गडी बाद, अशी मजबूत स्थिती असलेला ऑस्ट्रेलियन संघ दुसऱ्या दिवशी सकाळी ३९१ धावांत कोसळला. त्यांचा डाव गडगडण्याची सुरुवात विचित्र रीतीने झाली. कर्णधार स्टीव्ह वॉला आम्ही जास्तीत जास्त जखडून ठेवण्याचा प्रयत्न केला होता. एकदा त्याने शॉर्ट कव्हरला चेंडू मारला. त्याला एक धाव काढायची होती. पण मी ती धाव वाचवली. `दुसऱ्या बाजूला कशाला पळतोस? बॅटिंग करायची भीती वाटते का?' अशा आशयाचं काहीतरी बोलत मी त्याला डिवचलं. लेग स्लिपला राहुल उभा होता. त्यानेही स्टीव्हला चिडवलं. हळूहळू आम्ही त्याला बोलून बेजार करू लागलो. अखेर हरभजनच्या एका ऑफ स्पिन चेंडूने त्याला चकवलं. आम्ही पायचीतचं जोरदार अपील केलं. वॉचं लक्ष किंचित विचलित झालं असावं. त्याने अभावितपणे चेंडू हाताने बाजूला केला. आम्ही लगेच त्याच्याविरुद्ध `चेंडू हाताळल्याचं' अपील केलं. ऑस्ट्रेलियन कर्णधाराला पॅव्हिलियनमध्ये परतावं लागलं. कामगिरी फत्ते झाली होती. स्टीव्ह बाद झाल्यावर मात्र आम्ही त्याला काहीही बोललो नाही.

कोलकाता कसोटीत मी फलंदाजीमध्ये अपयशी ठरलो होतो. मला त्याची भरपाई करायची होती. दोन कसोटींमधल्या

विश्रांतीच्या काळात मी `रिव्हर्स स्विंग' चेंडू खेळण्याचा बराच सराव केला. गोलंदाजाने टाकलेल्या चेंडूचं शेवटपर्यंत निरीक्षण करायचं मी ठरवलं. मी चेंडूवरून क्षणभरही नजर काढून घेत नव्हतो. रिव्हर्सस्विंग खेळताना चेंडूवर अखेरपर्यंत लक्ष ठेवणं आवश्यक असतं. मॅचमध्ये दिवसभर मी तेच केलं. चेंडू यष्टिरक्षकाकडून स्लिपमधून वेगवेगळ्या क्षेत्ररक्षकांच्या हातातून पुन्हा गोलंदाजाकडे जाईपर्यंत मी चेंडूवरून जराही नजर हटवत नव्हतो. फक्त समोरच्या माझ्या साथीदाराबरोबर बोलत असताना माझं लक्ष चेंडूवर नसायचं. गोलंदाज धावत येत असताना मी पूर्ण लक्ष त्याच्या हातातल्या चेंडूवर केंद्रित करून तो त्याच्या हातातून सुटेपर्यंत त्यावर बारकाईने लक्ष ठेवायचो. गोलंदाजाच्या हाताची स्थिती आणि चेंडू कुठून सोडला जातो आहे, याचं निरीक्षण केल्यामुळे मला चेंडूचा बरोबर अंदाज येत होता. त्यानंतर मी तो चेंडू जास्तीत जास्त उशिरा खेळत होतो.

हा प्रकार थकवणारा होता. दिवसअखेरीस माझा मेंदूही शिणून गेला होता. पण मी माझ्या संघाच्या अपेक्षा पूर्ण केल्या होत्या. मी शतक काढलं. राहुलबरोबर महत्त्वपूर्ण भागीदारी केली. त्याहून मुख्य म्हणजे आम्ही दोघांनी गिलेस्पीला जराही विचलित न होता शांतपणे तोंड दिलं. दुसरा नवीन चेंडू घेतल्यावर गिलेस्पीने भन्नाट गोलंदाजी केली होती. दिवसभर बोलिंग करून गिलेस्पी खरंतर थकला होता. दुसरा नवीन चेंडू घेतल्यावर तो त्याच्या नेहमीच्या गतीने गोलंदाजी करत नव्हता. पण त्याला एका अनोळखी ठिकाणाहून अचानक प्रेरणा मिळाली. साइड स्क्रीनच्या वर एक ऑस्ट्रेलियन बसला होता. त्याच्या हातात खेळण्यातला कांगारू होता. गिलेस्पी आपल्या रनअपच्या शेवटी जाऊन पोचला की, दरखेपेस तो ऑस्ट्रेलियन माणूस `कम ऑन ऑसी' असं जोरात ओरडत त्याला प्रोत्साहन द्यायचा. त्याच्या प्रोत्साहनामुळे गिलेस्पीलाही स्फुरण चढलं. तो पुन्हा आग ओकू लागला. गिलेस्पीमध्ये अचानक इतका फरक का पडलाय, हे सुरुवातीला मला व राहुलला समजेना. यावरून एक गोष्ट लक्षात येते की, तुम्हाला प्रेरणा मिळण्यासाठी कायम हजारो चाहत्यांची मुळीच गरज नसते.

आमच्या १६९ धावांच्या भागीदारीमुळे भारताला ऑस्ट्रेलियावर ११० धावांची महत्त्वपूर्ण आघाडी मिळाली. त्या आघाडीमुळे आमच्या गोलंदाजांचा फायदा झाला होता. विकेट्स मिळवण्यासाठी ते आता वेगवेगळे डावपेच लढवू शकत होते. सामना आता बराचसा आमच्या बाजूला झुकला होता. त्यामुळे आम्हाला मालिका जिंकण्याची संधी मिळाली होती. हेडनची विकेट सर्वांत महत्त्वाची होती. नीलेश कुलकर्णीने त्याला ३५ धावांवर बाद केलं. गिलख्रिस्ट हा आणखी एक धोकादायक फलंदाज होता. झटपट धावा काढून तो आमच्यावरच दडपण आणू शकला असता. परंतु भज्जीने गिलख्रिस्ट व पाँटिंगला त्या मालिकेत बऱ्याचदा बाद केलं होतं. हरभजनने त्या डावात अप्रतिम गोलंदाजी केली. त्या डावात त्याने आपल्या कारकिर्दीतली सर्वोत्तम कामगिरी बजावली. त्याने ८४ धावांत ८ गडी बाद केले. मालिका जिंकण्यासाठी आम्हाला १५५ धावा हव्या होत्या.

आम्ही उत्तम पाठलाग करत होतो; पण अचानक मार्क वॉने मिड विकेटला एक अफलातून झेल घेतला. व्हीव्हीएस लक्ष्मणने पूर्ण ताकद लावून पुल शॉट मारला होता. मार्क वॉने स्वत:ला हवेत झोकून दिलं आणि एक आश्चर्यकारक झेल पकडला. लक्ष्मण अतिशय हुशारीने बॅटिंग करत होता. तो बाद झाल्यामुळे आमची १३५ धावा आणि ६ गडी बाद, अशी स्थिती झाली. सामन्याचं चित्र पुन्हा एकदा पालटलं. मॅचमध्ये चुरस निर्माण झाली.

त्या वेळेपर्यंत आम्ही सर्व जण चेंजिग रूमच्या बाहेर धास्तावून बसलो होतो. कोणीही जागेवरून उठायचं नाही अशा सूचना सर्वांना मिळाल्या होत्या. सर्वांच्याच चेहऱ्यावर तणाव दिसत होता. तशी फारच कमी धावांची गरज होती. पण जगातील सर्वोत्कृष्ट संघाविरुद्ध मालिका जिंकण्या-हरण्याचा प्रश्न होता. एक धाव निघाली तरी प्रेक्षक जयघोष करत होते. सामना याहून रंगतदार होऊ शकला नसता.

त्या निर्णायक क्षणी आमचा यष्टिरक्षक व माझा जिवलग दोस्त समीर दिघे आणि हरभजन सिंग यांची जोडी जमली. त्यांनी केलेली भागीदारी फार मोठी नव्हती. पण मालिकेतील ती सर्वांत महत्त्वाची भागीदारी ठरली. प्रचंड दडपणाला धैर्याने तोंड देऊन त्यांनी भारताचा विजय साकारला. आम्ही सर्व आनंदाने बेहोष होऊन गेलो. विजयी धाव घेण्यासाठी दोघेही ज्या पद्धतीने धावले तो प्रकार दिसायला फारच गमतीशीर होता. पण ती धाव घेतल्यानंतर आपण मॅच व मालिका जिंकलो आहे, हे समोर दिसत असूनही त्यावर क्षणभर विश्वास बसत नव्हता. आम्ही जोरजोरात ओरडत होतो, टाळ्या देत एकमेकांना घट्ट

आलिंगन देत होतो. जगातील सर्वोत्तम संघाचा आम्ही पराभव केला होता. मालिकेच्या सुरुवातीला मी केलेलं भाकीत अचूक ठरलं होतं. आम्ही ऑस्ट्रेलियावर दडपण आणण्यात यशस्वी ठरलो होतो. त्या प्रयत्नांमुळेच आम्ही विजय मिळवू शकलो होतो. पहिली कसोटी हरल्यानंतरही सर्व खेळाडूंनी संघातील एकजूट कायम राखली होती. माझ्या कारकिर्दीत मी खेळलेली ती एक सर्वोत्कृष्ट मालिका होती, याबद्दल माझ्या मनात जराही शंका नाही.

ही मालिका सुरू झाली, तेव्हा क्रिकेटसाठी तो अत्यंत कठीण काळ होता. लोकांच्या मनातून क्रिकेटबद्दलचा विश्वास हरवत चालला होता. पण या मालिकेनेच लोकांना तो विश्वास पुन्हा मिळवून दिला. विजय अखेर क्रिकेटचाच झाला. दोन्ही संघ अतिशय कसून क्रिकेट खेळले. दोघांच्याही खेळात ईर्षा आणि जोष होता. हजारो प्रेक्षकांच्या साक्षीने व साथीने प्रत्येक सामना खेळला गेला. कसोटी क्रिकेटला पुन्हा एकदा लोकप्रियता लाभली. त्या मालिकेने प्रेक्षकांना स्टेडियममध्ये खेचून आणलं. ऑस्ट्रेलियन संघ हा नेहमीच 'कडवी लढत देणारा संघ' म्हणून ओळखला जातो. चेन्नईमध्ये दुसऱ्या डावात भारताच्या आठ विकेट्स काढून त्यांनी आमच्या तोंडचं पाणी पळवलं होतं.

त्या रात्री विजय साजरा करताना एका गोष्टीचं मला विशेष कौतुक वाटलं. जखमी झाल्यामुळे अनिल त्या मालिकेत खेळू शकला नव्हता. पण मालिका सुरू होण्यापूर्वी झालेल्या शिबिरात त्याने भाग घेतला होता. तिसऱ्या आणि निर्णायक कसोटीत भारतीय संघाला प्रोत्साहन देण्यासाठी तो खास चेन्नईला आला होता.

त्यानंतर झालेली एकदिवसीय सामन्यांची मालिका आम्ही २-३ अशी हरलो. इंदूरला झालेल्या तिसऱ्या मॅचमध्ये मी एकदिवसीय सामन्यातील १० हजार धावांचा टप्पा ओलांडला. गोव्यात झालेला शेवटचा सामना माझ्या चांगलाच लक्षात आहे. आयुष्यात कधीही केली नव्हती अशी एक गोष्ट मी त्या मॅचमध्ये केली. माझ्या अंगठ्याजवळच्या बोटाला दुखापत झाली होती. पण तरीही मी त्या सामन्यात मधल्या बोटाचा वापर करत १० षटकं ऑफ स्पिन गोलंदाजी केली. गंमत म्हणजे मी फक्त ३५ धावा देऊन तीन विकेट्स काढल्या. त्यात स्टीव्ह वॉचीही विकेट होती. वॉ खेळायला येताच मी मिड विकेटला उभ्या असलेल्या क्षेत्ररक्षकाकडे पाहून मुद्दाम हातवारे करायला सुरुवात केली. 'मी तुला त्याच ठिकाणी झेल द्यायला लावणार आहे' असं मी त्याला सुचवत होतो. आम्ही नेहमीच एकमेकांची थट्टामस्करी करायचो. ''स्वत:च्या बागेत खेळतोय असं तुला वाटलं का?'' स्टीव्हनेही मला प्रत्युत्तर दिलं. पण त्या दिवशी नशीब माझ्या बाजूला होतं. स्टीव्ह स्वीपचा फटका मारताना चुकला. मिड विकेटला उभ्या असलेल्या अजित आगरकरच्या हाती त्याने झेल दिला!

ऑस्ट्रेलियाचा भारत दौरा, २००१ – बॉर्डर-गावसकर करंडक

पहिली कसोटी. मुंबई – २७ फेब्रुवारी ते १ मार्च, २००१

भारत १७६ (**एसआर तेंडुलकर** ७६; एसके वॉर्न ४-४७, जीडी मॅक्ग्रा ३-१९) व २१९ (**एसआर तेंडुलकर** ६५, एस रमेश ४४; एमई वॉ ३-४०, जेएन गिलेस्पी ३-४५)

ऑस्ट्रेलिया ३४९ (एसी गिलख्रिस्ट १२२, एमएल हेडन ११९, एसके वॉर्न ३९; एच सिंग ४-१२१) व ४७-०

ऑस्ट्रेलिया १० गडी राखून विजयी

दुसरी कसोटी. कोलकाता – ११ ते १५ मार्च, २००१

ऑस्ट्रेलिया ४४५ (एसआर वॉ ११०, एमएल हेडन ९७, जेएल लँगर ५८; एच सिंग ७-१२३) व २१२ (एमएल हेडन ६७, एमजे स्लेटर ४३; एच सिंग ६-७३, **एसआर तेंडुलकर** ३-३१)

भारत १७१ (व्हीव्हीएस लक्ष्मण ५९, **एसआर तेंडुलकर** १०, जीडी मॅक्ग्रा ४-१८) व ६५७-७ घोषित (फॉलो-ऑननंतर) (व्हीव्हीएस लक्ष्मण २८१, आर द्रविड १८०, एससी गांगुली ४८, **एसआर तेंडुलकर** १०; जीडी मॅक्ग्रा ३-१०३)

भारत १७१ धावांनी विजयी

तिसरी कसोटी. चेन्नई – १८ ते २२ मार्च, २००१

ऑस्ट्रेलिया ३९१ (एमएल हेडन २०३, एमई वॉ ७०, एसआर वॉ ४७; एच सिंग ७-१३३) व २६४ (एमई वॉ ५७, एमजे स्लेटर ४८, एसआर वॉ ४७; एच. सिंग ८-८४)

भारत ५०१ (**एसआर तेंडुलकर** १२६, एसएस दास ८४, आर द्रविड ८१, व्हीव्हीएस लक्ष्मण ६५, एस रमेश ६१; जीडी मॅक्ग्रा ३-७५) व १५५-८ (व्हीव्हीएस लक्ष्मण ६६, **एसआर तेंडुलकर** १७; सीआर मिलर ३-४१, जीडी मॅक्ग्रा २-२१)

भारत २ गडी राखून विजयी

भारत मालिकेत २-१ विजयी

१२.

लढा : आत्मसन्मानासाठी

आस्ट्रेलियाच्या मालिकेनंतर दोन महिन्यांनी जुलै, २००१मध्ये आम्ही हरारेला तिरंगी मालिका खेळायला गेलो. आमच्याविरुद्ध वेस्ट इंडीज व झिंबाब्वे हे दोन संघ होते. दोन महिन्यांच्या मोकळ्या काळात मी कसून व्यायाम केला होता. त्यामुळे मालिकेच्या आधी माझी उत्तम तयारी झाली होती. ऑगस्ट, १९९९ ते जुलै, २००१ हा दोन वर्षांचा काळ माझ्यासाठी कोणत्याही मोठ्या दुखापतीविना गेला. क्रिकेटचा हंगाम नसताना मी केलेल्या नियमित व्यायामामुळे माझ्या फिटनेसमध्ये चांगलीच सुधारणा झाली होती. मी माझ्या आहारावरही नियंत्रण ठेवलं होतं. हा सगळा शिस्त पाळल्याचा फायदा होता. १९९९मध्ये पाठीला झालेली दुखापत हे आता केवळ एक दु:स्वप्न वाटत होतं.

स्पर्धेच्या सुरुवातीपासूनच मी सुरेख बॅटिंग करत होतो. पहिल्या फेरीच्या चार सामन्यांत मी फक्त एकदा बाद झालो होतो. मी एक शतक आणि दोन अर्धशतकं काढली होती. मला अंतिम सामन्याचे वेध लागले होते. एवढ्यात अतिशय अनपेक्षितपणे मला एक दुखापत झाली. माझ्या कारकिर्दीत मला झालेली ती दुसरी मोठी दुखापत होती.

४ जुलै, २००१ रोजी साखळी फेरीतला आमचा शेवटचा सामना वेस्ट इंडीजविरुद्ध होता. राहुल व मी बॅटिंग करत होतो. विजय आमच्या आवाक्यात आला होता. मॅच जिंकण्यासाठी फक्त २० धावा हव्या होत्या. मी एक चेंडू मिड विकेटच्या दिशेने मारून धावायला सुरुवात केली. इतक्यात माझ्या पायाच्या अंगठ्यात काहीतरी कडकन वाजल्याचं मला जाणवलं. दुसरी धाव पूर्ण करताना मला खूपच त्रास झाला. पुढचा चेंडू टाकण्याआधी मी राहुलला म्हणालो की, ''माझ्या पायाचा अंगठा दुखावला गेला आहे.'' माझं पाऊलही अचानक गरम झालं होतं; पण जिंकायला फारच थोड्या धावांची गरज होती. सामना लवकरात लवकर संपवायचा असं मनाशी ठरवून मी तसाच खेळत राहिलो. सामना जिंकलो, तेव्हा माझ्या १२२ धावा झाल्या होत्या.

सामना संपल्यावर मी आमचा फिजिओथेरेपिस्ट अँड्रयू लीपसला माझा दुखावलेला अंगठा दाखवला. दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही एक्स-रे काढायला गेलो. तोपर्यंत पावलातल्या वेदना खूपच वाढल्या होत्या. मी नीट चालूही शकत नव्हतो. हॉस्पिटलमध्ये जाताना मी अँड्रयूला म्हणालो, ''एक्स-रेचा रिपोर्ट तू मला दाखवू नकोस. काही झालं तरी मला अंतिम सामन्यात खेळायचं आहे.'' एक्स-रे काढल्यावर अँड्रयूचा चेहरा पडला होता. तो मला फक्त एवढंच म्हणाला, ''तुझ्यासारखा वेडा मी पाहिला नाही.''

सामन्याच्या आधी अँड्रयूने माझा अंगठा दुमडून त्याभोवती करकचून पट्टी बांधली. त्यामुळे अंगठ्याची हालचाल होऊ शकणार नव्हती. वेस्ट इंडीजविरुद्ध जेव्हा मी क्षेत्ररक्षणाला उतरलो तेव्हा माझ्या पावलात असह्य वेदना होत होत्या; पण त्या स्पर्धेत मी भरपूर धावा काढत होतो. माझ्या गोलंदाजी व क्षेत्ररक्षणापेक्षा माझ्या संघाला माझ्या बॅटिंगची जास्त गरज आहे, असा विचार करून मी सामना खेळायचं ठरवलं होतं. तो अंतिम सामना असल्यामुळे त्याला विशेष महत्त्व होतं. शिवाय तो सामना मी शेवटपर्यंत खेळू शकेन, असा मला विश्वास वाटत होता. पण एवढी सगळी मेहनत घेऊन मी शून्यावर बाद झालो आणि आम्ही तो सामनाही हरलो. माझा अंगठा आणि पाऊल यांमधील सांध्याजवळच्या हाडाला (सेसामॉइड बोन) दुखापत झाल्याचं एक्स-रेमधून निष्पन्न झालं होतं.

भारतात आल्यावर मला पूर्ण विश्रांतीचा सल्ला देण्यात आला, पण त्यानंतर दोन महिने उलटले तरी दुखापत बरी होण्याचं चिन्ह दिसेना. चालताना होणाऱ्या वेदना जराही कमी झाल्या नव्हत्या. हताश होऊन मी एका तज्ज्ञ डॉक्टरकडे गेलो. त्यांनी मला शस्त्रक्रिया करण्यास सुचवलं. आम्ही ऑपरेशनची तारीखही निश्चित केली; पण अंजलीला ते पटलं नव्हतं. तिने

आणखी एका डॉक्टरांचं मत विचारात घ्यायचं ठरवलं. अगदीच नाइलाज असला तर शेवटचा उपाय म्हणून शस्त्रक्रिया करावी, असं अंजलीचं म्हणणं होतं.

आम्ही बॉम्बे हॉस्पिटलमध्ये गेलो. तिथले ज्येष्ठ डॉक्टर ढोलकिया यांची भेट घेतली. त्यांनी मला 'सेसामॉइड बोन्स'वर लिहिलेलं एक जाडजूड पुस्तक दाखवलं. पुस्तकाचा लेखक हा त्या विषयातला जागतिक तज्ज्ञ होता. शस्त्रक्रियेमुळे अशी दुखापत बरी होऊ शकेल याची त्यांनाही पूर्ण खातरी नव्हती. ''तू तुझ्या अंगठ्याला कुणाला हातदेखील लावायला देऊ नकोस,'' असं डॉक्टर ढोलकियांनी मला स्पष्टपणे सांगितलं. कारण शस्त्रक्रियेमुळे विपरित परिणाम होण्याची शक्यता होती. अंगठा कायमचा निकामी होण्याचा त्यात धोका होता. त्यामुळे मी पुन्हा कधीच क्रिकेट खेळू शकलो नसतो. क्रिकेट न खेळण्याची कल्पनाही मी सहन करू शकत नव्हतो. डॉक्टर ढोलकिया त्या विषयातील पारंगत डॉक्टरचा शोध घेऊ लागले.

काही दिवसांत मी जोहान्सबर्गच्या रोझबँक क्लिनिकमध्ये दाखल झालो होतो. तिथल्या डॉक्टर मार्क फर्ग्युसन यांनी 'सेसामॉइड बोन्स'च्या दुखापतीसाठी अनेक खेळाडूंवर उपचार केले होते. त्यांनी मला 'इनसोल्स' (बुटाच्या आत वापरायचा अतिरिक्त तळवा) वापरायचा सल्ला दिला. त्याचा खूपच फायदा झाला. सुरुवातीला मी १५ मिनिटं चालू शकायचो. एका आठवड्यात मी तासभर चालू लागलो. मुंबईला आल्यावरही मी तोच सराव सुरू ठेवला. आधी जॉगिंग करायचो. मग हळूहळू धावायला सुरुवात केली. क्रिकेटचे बूट घालून धावताना, बुटाखाली खिळे (स्पाइक्स) असल्यामुळे थोडा त्रास होऊ लागला. त्यानंतर मी अंगठ्याखाली स्पाइक्स नसलेले बूट घालून काही महिने सराव केला. हळूहळू दुखापत पूर्ण बरी झाली.

तीन महिने क्रिकेटपासून दूर राहिल्यानंतर योगायोगाने मी दक्षिण आफ्रिकेचाच पहिला क्रिकेटदौरा केला. ऑक्टोबर-नोव्हेंबर, २००१मध्ये केलेल्या दौऱ्यात प्रथम आम्ही एकदिवसीय तिरंगी मालिका खेळलो. तिसरा संघ केनियाचा होता. त्यानंतर दक्षिण आफ्रिकेबरोबर तीन कसोटी सामन्यांची मालिका खेळली गेली. दौऱ्यातला पहिला सराव सामना १ ऑक्टोबरला निकी ओप्पेनहायमर संघाविरुद्ध होता. पहिलीच मॅच खेळताना मला पायाच्या अंगठ्यात पुन्हा वेदना होऊ लागल्या. नाइलाजाने मला उपचारासाठी मैदान सोडून बाहेर पडावं लागलं.

सुदैवाने आम्ही रँडजेस्फाँटाइन शहरात होतो. तिथून जोहान्सबर्ग फारसं दूर नव्हतं. तीन महिन्यानंतर मी पुन्हा एकदा रोझबँक क्लिनिकमध्ये येऊन पोचलो. तिथल्या डॉक्टरांना भेटल्यानंतर मात्र माझ्या मनाला खूप मोठा दिलासा मिळाला. झालेला प्रकार मुळीच गंभीर नव्हता. डॉक्टरांच्या मते सेसामॉइड बोन्सच्या दुखण्यामध्ये अशा प्रकारच्या वेदना काही काळानंतर किंचित प्रमाणात पुन्हा जाणवण्याची शक्यता असते; पण त्यात काळजी करण्याची काहीच गरज नव्हती. माझ्या मनावरचं मोठं दडपण दूर झालं. मी पुन्हा क्रिकेट खेळायला सज्ज झालो.

तिरंगी मालिकेतला पहिला सामना ५ ऑक्टोबरला जोहान्सबर्गमध्ये होता. मी दक्षिण आफ्रिकेविरुद्ध त्या मॅचमध्ये शतक काढलं. तो अटीतटीचा सामना खेळताना मी माझी दुखापत साफ विसरून गेलो. फारशा वेदना न होता मी इतका वेळ बॅटिंग करू शकलो, या विचारानेच मनावरचा सगळा ताण नाहीसा झाला. जणूकाही मी नव्याने क्रिकेटला सुरुवात केली होती.

भारताचा दक्षिण आफ्रिका दौरा, नोव्हेंबर २००१

दक्षिण आफ्रिका संघाविरुद्ध त्यांच्याच देशात जाऊन खेळणं हेच मुळात आव्हानात्मक असतं. त्यात अंगठ्याची दुखापत नुकतीच बरी झालेली असताना त्यांच्याविरुद्ध खेळावं लागल्यामुळे माझ्यासमोरील आव्हान अधिकच बिकट झालं होतं; पण ब्लॉमफाँटेनमधील नेट प्रॅक्टिसनंतर मला माझ्या बँटिंगबद्दल आत्मविश्वास वाटू लागला. त्या सरावसत्रामध्ये प्रत्येक चेंडू बॅटच्या मधोमध येत होता. आपल्या हातून चूक होऊच शकणार नाही, असा विश्वास मला वाटू लागला.

पहिली कसोटी ३ नोव्हेंबरला सुरू झाली. पहिल्या इनिंग्जमध्ये मी त्याच सफाईने बॅटिंग केली. आमच्या एकूण ३७९ धावा झाल्या. त्यात माझा वाटा १५५ धावांचा होता. त्या डावात मी स्लिप्समधील क्षेत्ररक्षकांच्या डोक्यावरून पहिल्यांदाच अप्पर कट मारला. माझ्या कारकिर्दीच्या उत्तरार्धात त्या शॉटचा मी नियमितपणे वापर करू लागलो. दक्षिण आफ्रिकेचा द्रुतगती गोलंदाज मखाया एन्टिनीला शह देण्यासाठी प्रथम त्या शॉटची कल्पना माझ्या मनात आली. एन्टिनीच्या गोलंदाजीचं

वैशिष्ट्य म्हणजे तो आखूड टप्प्यावरूनसुद्धा चेंडू फलंदाजाच्या अंगावर आणू शके. मी विचार केला की, एन्टिनीच्या त्या चेंडूवर जर मी अप्पर कट मारला तर त्याच्या गोलंदाजीची लय बिघडेल. कारण एखादा फलंदाज अशाप्रकारे आपल्यावर प्रतिहल्ला चढवेल याची त्याला कल्पना नसणार. ब्लॉमफाँटेनच्या खेळपट्टीवर चेंडू चांगलाच उसळत होता. थर्ड मॅनला जर क्षेत्ररक्षक ठेवलेला नसेल तर अप्पर कट हा खेळायला अत्यंत सुरक्षित शॉट होता. एन्टिनीच्या चेंडूवर मी शेवटपर्यंत नजर ठेवली. शेवटच्या क्षणी चेंडूच्या वेगवान गतीचा फायदा घेत मी हलकेच तो सिल्प्समधील क्षेत्ररक्षकांच्या डोक्यावरून मारला.

वीरेंद्र सेहवागने त्या सामन्यात कसोटी पदार्पण केलं. पहिल्याच कसोटीत त्याने आक्रमक फलंदाजी केली. दुसऱ्या डावात आम्ही थोडी जरी चांगली बॅटिंग केली असती, तर आम्ही सहज पराभव टाळू शकलो असतो, पण दक्षिण आफ्रिकेने नऊ गडी राखून ती कसोटी जिंकली. शॉन पोलॉकने दुसऱ्या डावात ५६ धावा देऊन ६ गडी बाद केले. पहिल्या डावात मी सेहवागबरोबर केलेली भागीदारी हीच आमच्या दृष्टीने एकमेव समाधानाची गोष्ट होती. मला आठवतं, वीरू जेव्हा त्या कसोटी सामन्यात प्रथमच बॅटिंग करायला निघत होता तेव्हा 'तुला कसं वाटतंय' असं मी त्याला विचारलं होतं. 'आपल्या मनावर थोडासा ताण आला आहे,' हे त्याने माझ्यापाशी कबूल केलं. त्यावर लगेच मी त्याला धीर देत म्हटलं की, 'असा ताण येणं स्वाभाविक असतं. आजपर्यंत कसोटी खेळलेला प्रत्येक खेळाडू त्याच मन:स्थितीतून गेलेला आहे. तू तुझ्या नेहमीच्या शैलीत खेळ. खेळपट्टीवर थोडा वेळ टिकून राहिलास की, मनावरचा ताण आपोआप निघून जाईल.' सेहवागने नेमकं तेच केलं व पदार्पणात बहारदार शतक झळकवलं.

घरच्या सुखाची कमतरता

दुसरी कसोटी खेळण्यासाठी आम्ही पोर्ट एलिझाबेथला गेलो. सारा व अर्जुन माझ्यासोबत होते. 'रात्रीच्या जेवणासाठी आम्हाला एखाद्या चांगल्या रेस्टॉरंटचं नाव सुचव,' असं मी आमच्या हॉटेलच्या एका कर्मचाऱ्याला म्हटलं. दिवसभर क्रिकेट खेळल्यानंतर मुलांच्या सहवासात छान वेळ घालवायची तीच एक संधी असायची. त्याने शिफारस केलेलं रेस्टॉरंट खरोखरच चांगलं होतं. तिथे मुलांना खेळण्यासाठी भरपूर मोकळी जागा होती. आम्हाला ते रेस्टॉरंट इतकं आवडलं की, लागोपाठ तीन दिवस आम्ही तिथेच जात राहिलो. मी मुंबईत २००४मध्ये 'तेंडुलकर्स' नावाचं रेस्टॉरंट सुरू केलं. रेस्टॉरंटमध्ये मुलांना खास खेळण्यासाठी जागा ठेवण्याची कल्पना मला खूपच आवडली होती. माझ्या रेस्टॉरंटमध्येही मी तीच कल्पना वापरली.

दौऱ्यावर जेवण कसं मिळणार, हा आम्हा खेळाडूंसमोर महत्त्वाचा प्रश्न असायचा. झिंबाब्वेतील बुलावायोमध्ये किंवा दक्षिण आफ्रिकेतील काही शहरांत काय खावं हेच समजत नसे.

आमचा मुक्काम बुलावायोमध्ये असतानाचा एक प्रसंग मला आठवतो. घरच्या जेवणाच्या आठवणीने आम्ही सर्व जण व्याकूळ झालो होतो. हॉटेलमधला रोजचा एकच ब्रेकफास्ट आणि बेचव अन्न खाऊन आम्ही कंटाळलो होतो. गावातल्या रेस्टॉरंटचा दर्जाही सुमार होता. त्या दिवशी आमची मॅच बघायला एक भारतीय कुटुंब आलं होतं. समीर दिघे बेधडक त्यांच्यापाशी गेला. ''बऱ्याच दिवसांत आम्ही भारतीय अन्नाची चव चाखलेली नाही. तुम्ही आमची सोय करू शकाल का?'' असं समीरने त्यांना धिटाईने विचारलं.

समीरने ज्याला विचारलं त्या व्यक्तीचं नाव झनकभाई होतं. झनकभाई गुजराती होता व झिंबाब्वेमध्ये स्थायिक झाला होता. त्याने सर्व टीमला रात्री घरी भोजनाचं आमंत्रण दिलं. त्या रात्री झनकभाईच्या घरी सर्वांनी गुजराती पद्धतीचा डाळ, भात व घी यांवर यथेच्छ ताव मारला. प्रत्येकाने अधाशीपणाने भातावर तीन-तीन चमचे तूप ओतून घेतलं. त्यानंतर झनकभाई व त्यांच्या कुटुंबाने आमचा अनेकदा पाहुणचार केला. झिंबाब्वेच्या राज व चेस्टर नाईक आणि दक्षिण आफ्रिकेतील जयेश देसाईंकडेही आम्ही बरेच वेळा घरगुती भोजनाचा लाभ घेतला. ज्या-ज्या वेळी आम्ही त्यांच्या गावी मॅचेस खेळायला जायचो, त्या-त्या वेळी ते मोठ्या प्रेमाने व आपुलकीने आम्हाला घरी बोलावत असत. बऱ्याचदा रवी शास्त्री आमच्याबरोबर जेवायला असे. रवीचे ते फार जुने दोस्त होते. नंतर माझीही त्यांच्याशी मैत्री झाली. त्यांनी व त्यांच्या कुटुंबीयांनी केलेलं प्रेमळ आदरातिथ्य मी कधीच विसरू शकणार नाही.

अवास्तव आरोप

१६ नोव्हेंबर, २००१ रोजी सुरू झालेल्या पोर्ट एलिझाबेथ कसोटीत आम्ही चांगली बॅटिंग केली. अखेरच्या दिवशी राहुल द्रविड आणि यष्टिरक्षक दीप दासगुप्ता ह्यांनी केलेल्या भक्कम फलंदाजीमुळे आम्ही आरामात मॅच अनिर्णित ठेवू शकलो, पण तो सामना वेगळ्याच कारणांमुळे गाजला. मॅच रेफ्री माइक डेनिस यांनी माझ्यावर व आणखी पाच भारतीय खेळाडूंवर बेछूट आरोप केले होते.

मॅचच्या तिसऱ्या दिवशी तो प्रसंग घडला होता. त्या दिवशी मी चार षटकं टाकून हर्षल गिब्जची विकेट घेतली होती. मी चेंडूची शिवण वर ठेवून गोलंदाजी करत होतो. माझे चेंडू दोन्ही बाजूंनी स्विंग होत होते. गोलंदाजी करत असताना चेंडूच्या शिवणीवर चिकटलेलं गवत मी अंगठ्याने साफ करत होतो.

त्या दिवशी खेळ संपल्यावर मॅच रेफ्रीने सहा भारतीय खेळाडूंना चौकशीसाठी बोलावल्याचं आम्हाला सांगण्यात आलं. माझ्यावर चेंडूची स्थिती बदलण्याचा (बॉल टॅम्परिंग) आरोप करण्यात आला. मला प्रचंड धक्का बसला. मी आजपर्यंत अतिशय प्रामाणिकपणे व सचोटीने क्रिकेट खेळलो होतो. कोणत्याही प्रकारचं गैरकृत्य करण्याचा विचारही माझ्या मनात कधी आला नव्हता.

मी मॅच रेफ्रीला भेटून सांगितलं की, मी फक्त चेंडूवरची शिवण स्वच्छ करण्याचा प्रयत्न करत होतो. कायदा कलम ४२-३नुसार चेंडूची शिवण साफ करण्याआधी मी पंचांची परवानगी घेणं आवश्यक होतं. मी परवानगी घेतली नाही, ही माझी चूक होती. ती चूक कबूल करायला मी केव्हाही तयार होतो; पण खेळात खूप गुंतल्यामुळे ती गोष्टच माझ्या लक्षात आली नव्हती. मी माइक डेनिसना असंही म्हटलं की, तुम्ही मैदानावरच्या पंचांशी याबाबत बोलू शकता. दर दोन-तीन षटकानंतर ते चेंडू तपासत होते. चेंडूत झालेला बदल त्यांच्या लगेच लक्षात आला असता. डेनिस मला म्हणाले की, पंचांचा सल्ला घेण्याची त्यांना आवश्यकता वाटत नाही. चेंडूची शिवण साफ करणं याचा अर्थ चेंडूचा आकार बदलणं आणि चेंडूची शिवण स्वच्छ केल्याचं तू कबूल केलेलं आहेस.

मला डेनिस यांचं बोलणं फारच विचित्र वाटलं. मैदानापासून ८० यार्डांवरून डेनिस सामना पाहत होते. इतक्या दुरून मैदानावर काय चाललंय याचा नेमका अंदाज ते कसा करू शकतात हे मला समजेना. एकाही पंचाने माझ्याविरुद्ध तक्रार नोंदवली नव्हती. माझ्यावर फसवेगिरीचा आरोप करणं हा माझा अपमान होता. मी हे प्रकरण सहज सोडून द्यायला तयार नव्हतो. मी ते तडीस न्यायचं ठरवलं. 'तुम्ही केलेल्या आरोपाबद्दल मी बीसीसीआयकडे लेखी तक्रार करणार आहे,' असं मी डेनिसना स्पष्टपणे सांगितलं.

माझ्यावर केलेल्या आरोपाव्यतिरिक्त माइक डेनिस यांनी खेळांडूंवर नियंत्रण न ठेवल्याबद्दल सौरव गांगुलीला एका सामन्यासाठी निलंबित केलं होतं. अपील करण्याचा अतिरेक केल्याबद्दल वीरेंद्र सेहवागवर एका सामन्याची बंदी घातली होती. त्याच आरोपावरून दीपक दासगुप्ता, हरभजन सिंग व शिवसुंदर दास यांच्यावरही एका कसोटी सामन्याची बंदी आणि सामन्याच्या मानधनातून ७५ टक्के रक्कम कापण्याचा दंड ठोठावला होता. आम्हाला ही शिक्षा फारच कठोर व निर्दय वाटली होती. दक्षिण आफ्रिकेच्या खेळाडूंनी आमच्यापेक्षाही जास्त आक्रमकपणे अपील केली होती. पण त्यांच्या एकाही खेळाडूला शिक्षा करण्यात आली नव्हती. क्रिकेट हा खेळ नेहमीच अतिशय जिद्दीने खेळला जातो. त्यामुळे भावनेचा भडका उडण्याचे प्रसंग अनेकदा येत असतात; पण तरीही आम्हाला करण्यात आलेली शिक्षा अत्यंत अवाजवी व अन्यायकारक आहे असं आमचं म्हणणं होतं.

आमच्यावरील आरोप हे पक्षपाती, अनुचित व कोणत्याही पुराव्याशिवाय केलेले आहेत, असं आम्ही बीसीसीआयला कळवलं. आनंदाची गोष्ट म्हणजे बीसीसीआयच्या वतीने जगमोहन दालमिया खेळाडूंच्या बाजूने ठामपणे उभे राहिले. भारतीय संघाचा मॅच रेफ्रीवर विश्वास राहिला नसल्याचं त्यांनी आयसीसीला कळवलं. आम्हाला प्रसारमाध्यमांकडूनही एकमुखी पाठिंबा मिळाला. दौऱ्यावरील व मायदेशातीलही पत्रकारांनी आमची बाजू उचलून धरली. प्रसंगी दौरा अर्धवट सोडून

जायचीही आमची तयारी होती; पण काही झालं तरी आम्ही आमच्यावर फसवेगिरीचा शिक्का मारून घेणार नव्हतो. हा आमच्या अभिमानाचा आणि प्रतिष्ठेचा प्रश्न होता. एक मॅच रेफ्री आमच्यावर बेछूटपणे आरोप करून आमची निंदानालस्ती करतो, ही गोष्ट आम्ही कदापि सहन करू शकत नव्हतो.

गोष्टी इतक्या थरापर्यंत गेल्या की, दौरा नीट पार पडेल की नाही, याबद्दल सर्वांच्याच मनात शंका निर्माण झाली. परस्परविरोधी मतं व्यक्त होत होती. एकूण संशयाचं व गोंधळाचं वातावरण निर्माण झालं होतं. आयसीसी काहीच निर्णय द्यायला तयार नव्हती. अखेर तिसऱ्या कसोटीला २४ तास बाकी असताना दक्षिण आफ्रिका व भारतीय क्रिकेट बोर्डाच्या पदाधिकाऱ्यांनी एकत्र चर्चा केली. तिसऱ्या कसोटीसाठी माइक डेनिस यांना मॅच रेफ्री पदावरून दूर करण्याचा निर्णय घेण्यात आला. दक्षिण आफ्रिकेचे माजी यष्टिरक्षक डेनिस लिंडसे यांची त्या जागी नेमणूक करण्यात आली; पण आयसीसीने तो सामना अनधिकृत ठरवला.

जे काही घडलं ते योग्य नव्हतं; पण माझ्या मते इतका गदारोळ होण्याची काहीच आवश्यकता नव्हती. माइक डेनिस ह्यांनी घेतलेल्या निर्णयामुळे हा समरप्रसंग ओढवला होता. त्यामुळे अवघं क्रिकेट विश्व दुभंगून गेलं. सहज टाळता येऊ शकणारा प्रसंग अखेर सर्वांच्या मनात कटुता निर्माण करून गेला.

भारताचा दक्षिण आफ्रिका दौरा, २००१

पहिली कसोटी. ब्लॉमफाँटेन – ३ ते ६ नोव्हेंबर, २००१

भारत ३७९ (**एसआर तेंडुलकर** १५५, व्ही सेहवाग १०५; एसएम पोलॉक ४-९१, एम हेवर्ड ३-७०) व (एसएस दास ६२, व्ही सेहवाग ३१, **एसआर तेंडुलकर** १५, एसएम पोलॉक ६-५६)

दक्षिण आफ्रिका ५६३ (एल क्लुसनर १०८, एचएन गिब्ज १०७, जी कर्स्टन ७३, जे कॅलिस ६८, एनडी मॅकेन्झी ६८; जे श्रीनाथ ५-१४०, ए कुंबळे ३-१३२) व ५४-१

दक्षिण आफ्रिका ९ गडी राखून विजयी

दुसरी कसोटी. पोर्ट एलिझाबेथ – १६ ते २० नोव्हेंबर, २००१

दक्षिण आफ्रिका ३६२ (एचएच गिब्ज १९६, एमव्ही बाउचर ६८*; जे श्रीनाथ ६-७६, **एसआर तेंडुलकर** १-२२) व २३३-५ घोषित. (जेएच कॅलिस ८९*, एसएम पोलॉक ५५*; जे श्रीनाथ २-२८, एच सिंग २-७९)

भारत २०१ (व्हीव्हीएस लक्ष्मण ८९, एससी गांगुली ४२, **एसआर तेंडुलकर** १; एसएम पोलॉक ५-४०) व २०६-३ (आर द्रविड ८७, डी दासगुप्ता ६३, **एसआर तेंडुलकर** २२*; एम हेवर्ड २-५८)

सामना अनिर्णित

दक्षिण आफ्रिका मालिकेत १-० विजयी

१३.
इंग्लिश ग्रीष्मगौरव

दक्षिण आफ्रिकेवरून मायदेशी परतल्यावर आठवड्यातच नवी कसोटी मालिका सुरू झाली. डिसेंबर, २००१मध्ये आम्ही नासीर हुसेनच्या इंग्लिश संघाला सामोरे गेलो. नासीर हा आता टीव्ही समालोचक आहे. त्या मालिकेत नासीर अतिशय जिद्दीने व चिवटपणे खेळला. माझ्याविरुद्ध तर त्याने अतिबचावात्मक डावपेच रचले. डावखुरा फिरकी गोलंदाज ॲशली जाइल्सला त्याने माझ्याविरुद्ध नकारात्मक गोलंदाजी करायला सांगितली. जाइल्स ओव्हर द विकेट येऊन प्रत्येक चेंडू माझ्या उजव्या यष्टीच्या खूप बाहेर टाकायचा. दोघांनाही वाटत होतं की, अशा गोलंदाजीवर मला फारशा धावा काढायची संधी मिळणार नाही. मी अखेर कंटाळून एखादा चुकीचा शॉट मारेन; मला चिडवून किंवा डिवचून माझं लक्ष विचलित करण्याचा प्रयत्न त्यांनी आधी केला; पण नंतर बहुधा त्यांनी तो सोडून दिला होता.

जाइल्सच्या गोलंदाजीवर मी फक्त एकदाच चकलो. बंगळुरूच्या तिसऱ्या सामन्यात मी माझ्या कसोटी कारकिर्दीत प्रथमच यष्टिचीत झालो; पण नासीरच्या डावपेचांचा माझ्या फलंदाजीवर फारसा परिणाम झाला नाही. त्या मालिकेत मी भरपूर धावा काढल्या. मालिकेतला मी सर्वोत्कृष्ट खेळाडू ठरलो.

त्यानंतर काही वर्षांनी २००३मध्ये दक्षिण आफ्रिकेत झालेल्या विश्वचषक स्पर्धेच्या दरम्यान माझी नासीरशी भेट झाली. स्पर्धेचा उद्घाटन समारंभ संपला होता. आम्ही अचानक वॉशरूममध्ये समोरासमोर आलो. नासीर खट्याळपणे मला म्हणाला, ''अरे वा! मला महान तेंडुलकरला भेटण्याचा योग अखेर वॉशरूममध्ये आला!'' त्यानंतर एक मिनिटभर आमच्यात मजेशीर खटकेबाज संवाद झाला. दोघांनाही एकमेकांची टर उडवताना मजा आली. एकमेकांबद्दल अतिशय आदर असणाऱ्या दोन मित्रांमधील ती थट्टामस्करी होती. माझ्या आठवणीप्रमाणे ते संभाषण अशाप्रकारे झालं :

नासीर : सचिन, तुला आमचा २००१मधला दौरा आठवतो ना? त्या दौऱ्यामधली एक गोष्ट तुला कबूल करावीच लागेल. जाइल्सला ओव्हर द विकेट बोलिंग करायला सांगून मी तुझी नाकेबंदी केली होती.

सचिन : तू खूप प्रयत्न करून पाहिलास; पण माझ्यासमोर जाइल्सची डाळ शिजली नाही. तुला आठवतंय नासीर, त्या दौऱ्यात माझी धावांची सरासरी किती होती? ७६! तीन मॅचेसमध्ये मी ८८, १०३ आणि ९० अशा धावा कुटल्या होत्या. मालिकेतल्या सर्वोत्कृष्ट खेळाडूचं बक्षीसही मलाच मिळालं होतं. कायम तुझ्याविरुद्ध खेळत राहिलो असतो, तर आज माझ्या बॅटिंगची सरासरी ७६ झाली असती!

इंग्लंडविरुद्धची ती मालिका आम्ही १-० जिंकलो. त्या विजयामुळे आम्हाला खूपच आत्मविश्वास मिळाला. त्यानंतरच्या उन्हाळ्यात आम्ही पुन्हा इंग्लंडला भेट दिली. सुखद इंग्लिश ग्रीष्मामध्ये खेळल्या गेलेल्या त्या मालिकेने सर्वांनाच मंत्रमुग्ध केलं.

फलंदाजीविषयी मुक्तचिंतन

२००२ सालातील इंग्लंडच्या दौऱ्याची नुकतीच सुरुवात झाली होती. रोझ बोल येथे आम्ही हॅम्पशायरविरुद्ध सराव सामना खेळणार होतो. मी आयुष्यात पहिल्यांदाच तिथे एका निष्णात शिक्षकाची भूमिका बजावली. टेलिव्हिजनच्या 'चॅनल-४'साठी मार्क निकलसनने मला निमंत्रण दिलं. त्या दिवशी जमलेल्या तरुण क्रिकेटर्ससमवेत संवाद साधताना मला खूपच मजा आली. बॅट हातात कशी धरावी इथपासून फलंदाजीची तत्त्वं आणि तंत्रं अशा अनेक मूलभूत गोष्टींबद्दल मी

भरभरून बोललो.

माझी बॅटवरची पकड ही नेहमीच हँडलच्या खूप खाली असते; त्यावरून अनेकांनी माझ्यावर टीका केली आहे. ती सवय मला लहानपणीच लागली. मी अकराव्या वर्षी क्रिकेट खेळायला सुरुवात केली. माझा भाऊ अजित, माझ्यापेक्षा १० वर्षांनी मोठा आहे. माझ्याकडे स्वत:ची बॅट नव्हती. मी अजितच्या बॅटने खेळायचो. त्या बॅटचं वजन पेलवण्यासाठी मला हँडलच्या तळाशी हात पकडावा लागे. तीच सवय पुढे कायम राहिली. काही शिक्षकांनी मला माझी बॅटवरची पकड बदलण्याची सूचना केली. मी तोही प्रयोग करून पाहिला, पण मला ते योग्य वाटलं नाही. बॅटचं हँडल अगदी तळाशी धरल्यामुळे माझ्या हाताच्या कोपराखालच्या भागावर ते दाबलं जात असे; मी बॅटची पकड थोडी जरी वर सरकवली, तर तो दाब मला जाणवत नसे. त्यामुळे मी माझ्या नैसर्गिक शैलीने फलंदाजी करू शकत नसे.

याचा अर्थ मी फलंदाजीच्या तंत्रात कधी बदलच केला नाही, असं नव्हे. उलट वेगवेगळया परिस्थितीशी जुळवून घेताना आपल्या फलंदाजीत सुधारणा करून, नवं काहीतरी करण्याचा माझा सतत प्रयत्न असे. मधल्या काही वर्षांत माझ्या बॅक लिफ्टमध्ये खूपच फरक पडला होता. उदाहरणार्थ, मी नेहमीच अत्यंत जड बॅट वापरत असे. कधीकधी मला हलक्या वजनाची बॅट वापरण्याचा मोह होई; पण अशा बॅटने खेळताना मी नेहमीसारखा मुक्तपणे खेळू शकत नसे. कारण माझा संपूर्ण बॅट स्विंग हा त्या बॅटच्या वजनावर अवलंबून असायचा. मी जेव्हा ड्राइव्हचा फटका मारायचो तेव्हा बॅटच्या वजनामुळे मला फटका मारण्यासाठी लागणारी शक्ती मिळत असे. क्रिकेटमध्ये अचूक क्षण साधून (टायमिंग) शॉट मारणं खूप महत्त्वाचं असतं. माझ्या मते, बॅट हा तुमच्या हाताचाच एक विस्तारित भाग व्हायला हवा. खेळताना जेव्हा तुमची तशी अवस्था होते, तेव्हा बॅट बदलण्याची गरजच भासत नाही.

बॅटिंग करताना मन शांत असणं मला सर्वांत महत्त्वाचं वाटे. मी कुठे खेळतो आहे किंवा कुणाविरुद्ध खेळतो आहे याची मला कधीच फिकीर नसायची. केवळ वेगळया वातावरणाशी जुळवून घेण्यासाठी जर तंत्रात बदल म्हणून हलकी बॅट वापरून तुम्ही खेळू लागलात, तर तुमचं मन अस्वस्थ होण्याचा त्यात धोका असतो. कारण तुमचं लक्ष खेळण्यापेक्षा तंत्राकडे जास्त लागलेलं असतं. दुसरी गोष्ट म्हणजे बॅटिंग करताना तुम्ही तुमचं संपूर्ण लक्ष गोलंदाजावर केंद्रित करायला हवं. माझा अनुभव असा आहे की, जेव्हा माझं लक्ष माझ्या हातातल्या बॅटपेक्षा गोलंदाजाच्या हातातल्या चेंडूवर असायचं, त्या वेळी माझी बॅटिंग चांगली व्हायची. मी ठामपणे असं सांगू शकतो की, जेव्हा तुम्ही प्रतिपक्षाच्या भूमिकेत जाऊन बघता तेव्हा तुमचा खेळ उत्तम होतो. याउलट स्वत:च्या विचारात गुंतून पडल्यामुळे तुमच्या अडचणी वाढत जातात.

उदाहरणार्थ, एखादा गोलंदाज जर आपल्या हातून नो-बॉल्स पडतील का, याचाच जर सतत विचार करत असेल, तर तो त्याला हवी तशी गोलदांजी करू शकणार नाही. त्याने आपलं लक्ष फलंदाजावर केंद्रित केलं पाहिजे. आपल्याला कुठल्या टप्प्यावर चेंडू टाकायचा आहे, कुठल्या बाजूला स्विंग करायचा आहे एवढाच विचार त्याच्या मनात असायला हवा. फलंदाजाने नेमकं त्याउलट करायला हवं. प्रत्यक्ष खेळताना फलंदाजाने आपल्या पायांच्या हालचालींकडे, आपल्या बॅक लिफ्टकडे किंवा स्वत:च्या मनगटाच्या वापराकडे मुळीच लक्ष देता कामा नये. तरच तो उत्तम फलंदाजी करू शकेल. गोलंदाजाच्या मनात काय चाललं आहे हे त्याने शोधण्याचा प्रयत्न करायला हवा. तुम्ही एकाच वेळी दोन्ही बाजूंचा विचार करू शकत नाही. सांगायचा मुद्दा हा की, जेव्हा माझ्या हातात मला हवी असणारी बॅट असायची तेव्हा माझं मन निश्चिंत असायचं. मग मी गोलंदाजावर पूर्ण लक्ष ठेवू शकायचो आणि माझ्या हातून चांगली बॅटिंग व्हायची शक्यता अधिक असायची.

भारताचा इंग्लंड दौरा. कसोटी मालिका, जुलै ते सप्टेंबर, २००२

इंग्लंडमध्ये खेळायला मला नेहमीच आवडायचं. २००२च्या मालिकेत इंग्लिश वातावरणाशी जुळवून घ्यायला भारतीय संघाला मात्र बराच वेळ लागला. चार कसोटी सामन्यांची ती मालिका होती. पहिली कसोटी २५ जुलै, २००२ रोजी लॉर्ड्सवर सुरू झाली. इंग्लंडने आत्मविश्वासपूर्वक खेळत ती मॅच जिंकली. हुसेनने त्या सामन्यात त्याच्या पाच वर्षांच्या कारकिर्दीतील

सर्वोच्च धावसंख्या नोंदवली. मायकेल वॉननेही त्याला उत्तम साथ देत शतक झळकवलं. माझा मित्र अजित आगरकरने दुसऱ्या डावात काढलेलं जिगरबाज शतक ही आमच्या दृष्टीने अत्यंत अभिमानास्पद कामगिरी होती. लॉर्ड्स ड्रेसिंग रूममधील प्रसिद्ध फलकावर मान्यवरांच्या यादीत अजितचं नाव झळकलेलं पाहून माझा ऊर अभिमानाने भरून आला.

मालिकेतलं आव्हान जिवंत ठेवण्यासाठी पुढच्या कसोटीत दमदार खेळ करणं आवश्यक होतं. दुसरी कसोटी १० दिवसांनी ट्रेंट ब्रिजला सुरू झाली. इंग्लंडने पुन्हा एकदा मोठी धावसंख्या उभारली. मायकेल वॉन फलंदाजीच्या ऐन बहरात होता. कसोटी वाचवण्यासाठी शेवटचा दिवस पूर्ण खेळून काढायचा होता. खेळपट्टी गोलंदाजांना मदत करत होती. चेंडू मधेच जोरात उसळे तर एखादा चेंडू अचानक खूपच खाली राही; पण राहुलची व माझी जोडी जमली. त्या अवघड परिस्थितीत आम्ही दोघांनी एक महत्त्वाची भागीदारी केली. उसळणाऱ्या किंवा अचानक खाली राहणाऱ्या चेंडूवर आम्ही अधूनमधून चकत असू. अशा वेळी आम्ही एकमेकांकडे पाहून फक्त मंद स्मित करायचो. प्रत्येक षटकानंतर आम्ही एकमेकांशी बोलायचो; पण चुकलेल्या किंवा चकलेल्या चेंडूबद्दल आम्ही मुळीच चर्चा करायचो नाही. पाचव्या दिवसाच्या खेळपट्टीवर चेंडू खेळायला अवघड जाणार हे आम्ही गृहीतच धरलं होतं. इंग्लंडच्या आव्हानाला भिडताना दोघांनाही खूप मजा आली.

राहुलने शतक काढलं. सौरव व मी मात्र नव्वदीच्या घरात असताना बाद झालो. सौरव दुर्दैवाने ९९वर बाद झाला. कसोटी सामन्यात क्वचितच गोलंदाजी करणाऱ्या मायकेल वॉनने माझा ९२ धावांवर त्रिफळा उडवला. वॉनने त्याच्या कारकिर्दीत टाकलेला तो सर्वोत्तम चेंडू होता. डाव्या यष्टीच्या बाहेरील खराब भागात टप्पा पडून तो चेंडू कमालीचा आत वळला आणि माझ्या बॅट व पॅडच्या मधून यष्टींवर आदळला. त्या दिवशी आम्ही जिद्दीने खेळलो. सामना अनिर्णित ठेवण्यात नवोदित तरुण यष्टिरक्षक पार्थिव पटेलचाही मोलाचा वाटा होता. तिसऱ्या कसोटीत इंग्लंडवर केलेल्या प्रतिहल्ल्याचा आम्ही त्या दिवशी पाया रचला होता.

दुसऱ्या व तिसऱ्या कसोटीमध्ये बऱ्याच दिवसांचं अंतर होतं. त्याचा आम्हाला दुहेरी फायदा झाला. हवी असलेली विश्रांती मिळाली व खेळावर पुन्हा लक्ष केंद्रित करता आलं. एव्हाना सर्व खेळाडू इंग्लिश हवामानात रुळले होते. आम्ही सर्व जण मिळून वेगवेगळ्या रेस्टॉरंटमध्ये जेवायला जायचो व एकत्र धमाल करायचो. अशा अवघड दौऱ्यात सतत एकत्र राहिल्याने निर्माण होणारी एकजूट संघासाठी फार महत्त्वाची असते.

त्याच सुमारास आणखी एक मजेशीर किस्सा घडला. माझ्या एका मित्राने मला हॅरी रॅम्सडनच्या रेस्टॉरंटमध्ये आवर्जून जाण्यास सांगितलं. पश्चिम यॉर्कशायरच्या गायझलीमधील ते रेस्टॉरंट मासे आणि चिप्ससाठी प्रसिद्ध होतं. हॉटेलच्या मेन्यू कार्डमध्ये 'हॅरीज चॅलेंज' नावाने एक पदार्थ होता. तो पदार्थ म्हणजे कॉड किंवा हॅडॉकसारखा मोठा मासा होता. चिप्स, ब्रेड, बटर व अन्य दोन साइड डिशेसही त्याबरोबर होत्या. तो भलामोठा मासा कुणीही एकट्याने जास्तीत जास्त खाऊन संपवण्याचं आव्हान रेस्टॉरंटतर्फे करण्यात आलं होतं. आव्हान यशस्वीपणे पूर्ण करणाऱ्यास मुख्य शेफने स्वाक्षरी केलेलं प्रशंसापत्र दिलं जायचं. मी मुळातच खवय्या आहे. सॅलड व इतर डिशेससह तो मासा मी आरामात फस्त केला. माझ्या अचाट कामगिरीवर खूश होऊन मुख्य शेफने मला प्रशंसापत्र बहाल केलं!

तिसरी कसोटी. हेडिंग्ले – २२ ते २६ ऑगस्ट, २००२

२२ ऑगस्ट, २००२ रोजी तिसरी कसोटी हेडिंग्लेच्या मैदानावर सुरू झाली. खेळपट्टी खूपच ओलसर होती. तरीही नाणेफेक जिंकल्यावर आम्ही फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. मोठी धावसंख्या रचून इंग्लिश संघावर दडपण आणायचं असं आम्ही ठरवलं होतं. सेहवाग लवकर बाद झाला, पण त्यानंतर सलामीला आलेला संजय बांगर व राहुल द्रविड यांनी १७० धावांची मोठी भागीदारी रचून संघाला सुस्थितीत आणलं. त्या ओलसर खेळपट्टीवर पहिल्या सत्रात फलंदाजी करणं चांगलंच अवघड होतं. दोघांनीही ऑफ स्टम्प बाहेरचे चेंडू शांतपणे सोडून देत सुरेख फलंदाजी केली.

पहिल्या दिवसाच्या अखेरच्या सत्रात मी फलंदाजीसाठी उतरलो. मांडीला इजा होऊ नये म्हणून मी त्या दिवशी 'इनर थायगार्ड' घातलं होतं. तोपर्यंत मी सरावाच्या वेळीही ते कधी वापरलं नव्हतं. अँड्र्यू फ्लिंटॉफ त्या डावात जबरदस्त गोलंदाजी

करत होता. तो आपले चेंडू अतिशय झर्रकन फलंदाजाचा अंगावर आणायचा. त्याचसाठी मी मुद्दाम थायगार्ड घातलं होतं; पण काही वेळातच माझ्या लक्षात आलं की, माझा उभा राहण्याचा पवित्रा (स्टान्स) नेहमीपेक्षा खूपच बदलला आहे. नेहमी फलंदाजी करताना माझ्या उजव्या हाताच्या कोपराखालचा भाग मांडीवर टेकत असायचा. नव्या गार्डमुळे मला नीट उभं राहता येईना. खेळताना मी बेचैन होऊ लागलो. मी ताबडतोब ते गार्ड काढून टाकलं. त्यानंतर तो प्रयोग मी पुन्हा कधीच केला नाही.

मी दिवसाच्या अखेरच्या सत्रात फलंदाजीसाठी उतरलो. सावधपणे खेळून दिवसअखेर नाबाद राहायचं मी ठरवलं. फ्लिंटॉफच्या तुफानी गोलंदाजीसमोर मला अतिशय जपून बॅटिंग करावी लागली. त्याचे चेंडू एकाच वेळी उसळून स्विंग व्हायचे. बचावात्मक खेळण्याखेरीज माझ्याकडे पर्याय नव्हता. दुसऱ्या दिवशी सकाळी मॅथ्यू होगार्डनेही प्रभावी गोलंदाजी केली. तो आपले चेंडू दोन्ही बाजूंनी स्विंग करू शकत असे. कोणत्याही फलंदाजाला उत्तम दर्जाची आउटस्विंग गोलंदाजी खेळणं नेहमीच अवघड जातं. मॅथ्यूच्या उसळणाऱ्या चेंडूवर मला ड्राइव्हचा फटका मारताना खूप सावध राहावं लागत होतं. प्रत्येक चेंडूसाठी योग्य फटका निवडणं याचं भान सतत ठेवायला लागत होतं.

अँड्रयू फ्लिंटॉफ दुसऱ्या दिवशीही फलंदाजांची कसोटी पाहत होता. सौरवच्या तर तो मुद्दाम चेंडू अंगावर आणायचा. त्यावर मी व सौरवने छोटे डावपेच आखले. फ्लिंटॉफची गोलंदाजी जास्त करून मी खेळायची व सौरव डावखुरा असल्याने त्याने ॲशली जाइल्सच्या डावखुऱ्या फिरकीचा सामना करायचा, असं आम्ही ठरवलं. कारण जाइल्सने मला पुन्हा एकदा नकारात्मक म्हणजे उजव्या यष्टीच्या खूप बाहेर गोलंदाजी करायला सुरुवात केली होती. आम्ही ते सत्र छान खेळून काढलं. चहापानासाठी आम्ही ड्रेसिंग रूममध्ये आलो तेव्हा सौरव म्हणाला, ''वो फ्लिंटॉफका बीचवाला स्पेल हमने क्या झेला यार!'' यावर सौरवची मस्करी करण्याचा मोह मला आवरला नाही. मी म्हटलं, ''हमने झेला? साला मैंने झेला है।'' माझ्या बोलण्यावर ड्रेसिंग रूममध्ये एकच हशा उसळला.

चहापानानंतर मात्र आम्ही आक्रमक पवित्रा घेतला. थकलेल्या इंग्लिश गोलंदाजांवर आम्ही जोरदार हल्ला चढवला. प्रकाश अंधूक होत चालला होता; पण पंचांनी अनेकदा विचारूनही खेळ थांबवण्यास आम्ही नकार दिला. आम्ही तुफान फटकेबाजी करत होतो. आम्हाला जास्तीत जास्त वेळ खेळायचं होतं.

अखेर पंचांनीच स्वत:ला चेंडू दिसत नसल्याचं सांगून खेळ थांबवला. दिवसअखेरीस मी १८५ धावांवर नाबाद होतो. आम्ही मोठी धावसंख्या उभारली होती. सामना हरण्याचा आता प्रश्नच नव्हता. आमच्या गोलंदाजांचंही काम आम्ही सोपं करून टाकलं होतं. खरा प्रश्न आता इंग्लिश संघासमोर उभा राहणार होता. त्यांना फलंदाजी करणं खूपच अवघड जाणार होतं. खेळपट्टी वेगाने खराब होत चालली होती. मधेच एखादा चेंडू खाली राहत होता. दुसऱ्या दिवशी अशाच एका खाली राहिलेल्या चेंडूवर मी १९३ धावा काढून पायचीत झालो. ६२८-८ या धावसंख्येवर आम्ही डाव घोषित केला. इंग्लंडच्या भूमीवर भारताने नोंदवलेली ती सर्वोच्च धावसंख्या होती.

त्यानंतर गोलंदाजांनी सूत्रं आपल्या ताब्यात घेतली. इंग्लंड संघावर त्यांनी सुरुवातीपासूनच दडपण आणलं. फिरकी गोलंदाजीला फारसं पोषक वातावरण नव्हतं; पण तरीही कुंबळे व हरभजनने एकमेकांच्या साथीने सुरेख गोलंदाजी केली. दोघांनीही त्या डावात प्रत्येकी तीन विकेट्स घेतल्या. इंग्लिश फलंदाजांना मोठी भागीदारी करण्यात अपयश आलं. कारण आम्हाला ठरावीक अंतराने विकेट्स मिळत गेल्या. इंग्लंडचा पहिला डाव २७३ धावांत आटोपला. आम्ही त्यांना फॉलो-ऑन दिला. मोठ्या धावसंख्येचं पाठबळ असल्याचा आम्हाला खूपच फायदा झाला. त्यामुळे धावा जाण्याचा फारसा विचार न करता आम्ही झेल उडू शकेल अशा जागी क्षेत्ररक्षक ठेवले.

इंग्लंडचा दुसरा डाव सुरू होण्याआधीही आमच्यापाशी जवळपास ४०० धावांची आघाडी होती. दबावाचं धोरण आम्ही कायम ठेवलं. त्यांच्या प्रत्येक फलंदाजाला झगडायला लावलं. मैदानावर आमची सतत शेरेबाजी सुरू होती. नासीर हुसेनने त्या डावात शतक काढलं; पण आमच्या वाग्बाणांतून तोही सुटला नाही. आम्ही अक्षरश: पेटून उठलो होतो. एकाही इंग्लिश फलंदाजाला आम्ही खेळपट्टीवर स्थिरावू दिलं नाही. आमचे गोलंदाज नियमितपणे बळी मिळवत होते. प्रत्येक विकेट मिळाल्यावर आम्ही जल्लोष करत होतो. बाद झालेल्या फलंदाजाची हुर्यो उडवत त्याला निरोप दिला जात होता. नवीन

येणाऱ्या फलंदाजाचं उपरोधिक शब्दांत स्वागत करण्यात येत होतं. अँड्र्यू फ्लिंटॉफला दोन्ही डावांत भोपळाही फोडता आला नाही. झहीरच्या गोलंदाजीवर द्रविडच्या हातात झेल देऊन तो तंबूत परतला. फ्लिंटॉफ बाद झाल्यावर विजय अगदी जवळ आल्याचं आम्हाला जाणवलं. उरलेलं काम अनिलने केलं. चार विकेट्स घेत त्याने इंग्लंडचं शेपूट गुंडाळलं. इंग्लंडचा दुसरा डाव ३०९ धावांत संपला. आम्ही एक डाव आणि ४६ धावांनी सामना जिंकून एक ऐतिहासिक विजय नोंदवला होता.

ट्रेंट बिजच्या आदल्या कसोटीतही आम्ही चांगला खेळ करत तो सामना अनिर्णित राखला होता. हेडिंग्लेला आम्ही प्रत्येक संधीचा पूर्ण लाभ घेतला. खेळपट्टी फिरकीला अनुकूल नव्हती; पण अनिलने जीव ओतून गोलंदाजी करत सात बळी टिपले. झहीर, अजित आगरकर, संजय बांगर आणि हरभजन सर्वांनीच मोक्याच्या वेळी महत्त्वाच्या विकेट्स घेतल्या.

चौथी कसोटी. द ओव्हल – ५ ते ९ सप्टेंबर, २००२

ओव्हल मैदानावरही आम्ही पुन्हा एकदा चांगली कामगिरी केली. राहुलने काढलेल्या २१७ धावा हे त्या सामन्याचं वैशिष्ट्य होतं. त्यामुळे इतरांना त्याचा आधार घेत फलंदाजी करणं सोपं गेलं. त्या मॅचला माझ्या दृष्टीने विशेष महत्त्व होतं. तो माझा शंभरावा कसोटी सामना होता. क्रिकेट कारकिर्दीतला मी एक महत्त्वाचा टप्पा गाठला होता. मॅचच्या दिवशी सकाळी मी थोडा बेचैन व अधीर झालो होतो. 'सरे कौंटी क्लब'चे मुख्य अधिकारी पॉल शेल्डन यांनी गौरवपत्र देऊन माझा सत्कार केला. मी फलंदाजीसाठी उतरत असताना मी शंभरावा कसोटी सामना खेळत असल्याची घोषणा करण्यात आली. माझी हेडिंग्लेची इनिंग्ज प्रेक्षकांच्या मनात ताजी होती. त्याच इनिंग्जची मी पुनरावृत्ती करावी अशी त्यांची अपेक्षा होती. मी सुरुवात चांगली केली. छान फटकेबाजी करत मी अर्धशतक पूर्ण केलं; पण त्यानंतर एका चेंडूवर माझा अंदाज सपशेल चुकला व मी बाद झालो. कॅडिक गोलंदाजीसाठी येत असताना मी त्याच्या हातातला चेंडू नीट पाहिला होता. चेंडूचा चकाकणारा भाग उजव्या बाजूला होता. अशा स्थितीत चेंडू नेहमी आउटस्विंग होतो. त्या चेंडूवर ड्राइव्हचा फटका मारायची चांगली संधी आहे, असा माझ्या मनात विचार आला. मिड ऑफ आणि कव्हर यांच्यामधून चेंडू मारण्यासाठी मी तयारही झालो; पण आश्चर्य म्हणजे तो चेंडू कमालीचा आत येऊन माझ्या टाचेवर आपटला. त्यापूर्वी क्वचितच मी इतक्या बेसावधपणे चकलो असेन. चेंडू अचानक रिव्हर्सस्विंग झाला होता. चेंडू रिव्हर्सस्विंग होण्याची त्या कसोटीतील ती पहिली व शेवटची वेळ होती. कॅडिकही सहसा फार मोठे इनस्विंगर्स टाकत नसे; पण याखेपेस त्याचा चेंडू मैलभर रिव्हर्सस्विंग झाला होता. शिवाय चेंडू यॉर्कर लांबीचा असल्यामुळे तो खेळणं अधिकच कठीण होतं.

चेंडूच्या स्विंगचा अंदाज चुकणं ही माझ्याबाबतीत अपवादाने घडणारी गोष्ट असायची. गोलंदाजाच्या हातातील चेंडूकडे सतत लक्ष ठेवून त्याच्या मनात काय चाललं आहे, याचा शोध घेण्याची मला सवय होती. अनेक गोलंदाजांच्या लकबी मी हेरून ठेवल्या होत्या. आस्ट्रेलियन शीघ्रगती गोलंदाज बेन हायल्फेनहॉस जेव्हा हातात जुना चेंडू क्रॉस-सीम (शिवण बाजूला ठेवून) पकडायचा तेव्हा तो बाउन्सर टाकणार हे मी आधीच ओळखायचो. २०१० मधील आस्ट्रेलिया मालिकेत मला या डावपेचांचा खूपच उपयोग झाला. बंगळुरूच्या कसोटीत मी द्विशतक काढलं. पाकिस्तानचा वेगवान गोलंदाज शोएब अख्तर त्याचा 'खास' चेंडू टाकण्यापूर्वी दोन वेळा हात हवेत फिरवत असे. त्यामुळे नेहमीपेक्षा अधिक वेगाने त्याला तो चेंडू टाकणं शक्य होई; पण मला ते आधीच समजल्याने त्या चेंडूचा मला कधीच त्रास झाला नाही.

फिरकी गोलंदाजांच्या बाबतीत मी थोडी वेगळी पद्धत वापरत असे. ते कोणत्या प्रकारचा चेंडू टाकणार आहेत, याचा नेमका अंदाज येण्यासाठी मी ते चेंडू कसा सोडतात हे बारकाईने निरखत असे. श्रीलंकेचा महान खेळाडू मुथय्या मुरलीधरन हा 'दुसरा' टाकण्याआधी आपला अंगठा चेंडूच्या वर ठेवत असे. नेहमीचे ऑफ स्पिन चेंडू टाकताना त्याचा अंगठा चेंडूच्या खाली राहत असे. हे माझं वैयक्तिक निरीक्षण होतं. एकदा मुरलीचा 'दुसरा' कसा ओळखायचा, यावरून ड्रेसिंग रूममध्ये चर्चा सुरू होती. त्या वेळेस मुरलीच्या अंगठ्याकडे फक्त लक्ष ठेवा, असा सल्ला मी सर्वांना दिला होता. त्यानंतर एक गोष्ट घडली. आम्ही कोलंबोच्या एसएससी मैदानावर सराव करत असताना मुरली तिथे आला. भज्जीने त्याला बाजूला घेऊन 'दुसरा' कसा टाकायचा, असा प्रश्न केला. मुरलीने त्याला दुसरा टाकण्यासाठी चेंडूला वरून अंगठ्याचा आधार द्यायला सांगितलं. मला

वाटलं होतं तेच त्यामागचं गुपित होतं. त्या दोघांचं काय संभाषण चाललं आहे, याची तेव्हा काहीच कल्पना नव्हती. भज्जीनेच ती गोष्ट मला नंतर येऊन सांगितली. आपलं निरीक्षण अचूक ठरल्याचं मला समाधान मिळालं.

मी कोणत्याही गोलंदाजाने टाकलेला 'दुसरा' सहज ओळखायचो. त्याचा फायदा मला केवळ बॅटिंग करतानाच झाला असं नव्हे. मे, २०१३च्या आयपीएल सामन्यात मी थोडा वेळ समालोचन केलं होतं. त्या वेळी दक्षिण आफ्रिकेचा द्रुतगती गोलंदाज ख्रिस मॉरिस हा भज्जीने टाकलेल्या 'दुसऱ्या'वर बाद झाला आहे, असं मी चटकन बोलून गेलो. तो चेंडू ऑफ स्पिन आहे असं समजून मॉरिस खेळला; पण चेंडू विरुद्ध बाजूला वळला. मी इतक्या पटकन दुसरा ओळखला हे पाहून हर्षा भोगलेसह तिथे असलेले सगळे समालोचक चकित झाले होते. कारण तोपर्यंत रिप्लेही दाखवलेला नव्हता.

मला हेही सांगावसं वाटतं की, काही प्रसंगी मात्र एखादा गोलंदाज नेमका कोणत्या प्रकारचा चेंडू टाकणार आहे, हे समजणं मला अवघड होऊन जात असे. त्या दृष्टीने न्यूझीलंडचा द्रुतगती गोलंदाज डिऑन नॅशची बोलिंग खेळणं मला कठीण गेलं. त्याच्या ॲक्शनवरून तो इनस्विंगर टाकेल असं मला वाटायचं; पण तो इनस्विंगर नसायचा. मी अगदी साध्या सपाट खेळपट्टीवर त्याच्या त्या चेंडूवर बाद झालो होतो. कारण मला इनस्विंगर वाटलेला चेंडू आउटस्विंगर होता. नंतर मी त्याची खुबी शोधून काढली व त्याच्याविरुद्ध शतकही ठोकलं; मात्र त्यासाठी मला थोडा वेळ लागला.

आणखी एका गोलंदाजाविरुद्ध खेळताना मला चांगलाच त्रास झाला. तो म्हणजे वेस्ट इंडीजचा डावखुरा वेगवान गोलंदाज पेड्रो कॉलिन्स. आम्ही मे-जून, २००२मध्ये वेस्ट इंडीजच्या दौऱ्यावर गेलो होतो. त्या वेळी एका सराव सामन्यात त्याने आमच्या सलामीचा फलंदाज वासिम जाफरचा एका अप्रतिम इनस्विंगरवर त्रिफळा उडवला होता. हा गोलंदाज अगदी सुरुवातीलाच इनस्विंगरचा वापर करतो हे मी मनात टिपून ठेवलं होतं. त्याप्रमाणे मी पुढच्या काही इनिंग्जमध्ये त्याचा इनस्विंगर खेळण्याच्या तयारीत राहिलो; पण प्रत्येक खेपेस त्याचा चेंडू आत येण्याऐवजी बाहेर जायचा. मी इनस्विंगर खेळण्याच्या नादात यष्टिरक्षकाच्या हातात झेल देऊन लागोपाठ तीन वेळा बाद झालो. प्रत्येक इनिंग्जमध्ये मी पहिल्या तीन-चार चेंडूंतच बाद व्हायचो. दौऱ्याच्या मध्यावर मी अनेक वेस्ट इंडियन खेळाडूंशी त्याबाबत चर्चा केली. त्यांच्या मते कॉलिन्स हा क्वचितच इनस्विंगर टाकत असे. तो चेंडू तिरका टाकून उजव्या हाताच्या फलंदाजापासून दूर नेत असे. हे समजल्यावर जमैकाच्या शेवटच्या कसोटीत मी त्याच्याविरुद्ध आत्मविश्वासाने खेळून ८६ धावा काढल्या.

नोव्हेंबर, २००२मध्ये वेस्ट इंडीजचा संघ भारताच्या दौऱ्यावर आला. त्या वेळी मी कॉलिन्सला माझ्या नेहमीच्या सफाईने खेळलो. तोपर्यंत मी त्याच्या शैलीचा पूर्ण अभ्यास केला होता. त्याच्या हातातल्या चेंडूच्या चकाकत्या बाजूकडे लक्ष ठेवल्याने चेंडू कोणत्या बाजूला जाणार, हे मी आधीच ओळखू लागलो होतो. कारण तो चेंडू रिव्हर्सस्विंग करत होता. जर चेंडूवरची चकाकी बाहेरच्या बाजूला असेल, तर त्याचा मधल्या स्टम्पावर पडलेला चेंडूही मी सोडून देत होतो. टप्पा पडल्यावर तो चेंडू सहावा किंवा सातवा स्टम्प जिथे असू शकेल अशा ठिकाणी पोचलेला असायचा. माझ्या अशा खेळण्याने हताश होऊन कॉलिन्स राउंड द विकेट गोलंदाजी करू लागला. त्याच क्षणापासून आम्ही एकमेकांवर मानसिक दडपण आणायला सुरुवात केली. चेंडूची लकाकी मला पाहता येऊ नये यासाठी तो हरप्रकारे प्रयत्न करत होता. स्वत:ला माझ्यापासून लपवण्यासाठी तो मुद्दाम पंचांच्या मागून धावत येऊन गोलंदाजी करू लागला. त्याचे हे डावपेच मीही मोडून काढले. मीही मुद्दाम एक-दोन वेळा स्टम्प्सपासून दूर निघून जात त्याला गोलंदाजी करण्यापासून रोखलं. पंचांना वाकून उभं राहण्याचीही मी विनंती केली. मी पंचांना म्हटलं की, मला गोलंदाजच दिसत नसल्यामुळे तो चेंडू नेमका कधी टाकणार हेच मला कळत नाहीये.

त्यानंतर मी एक फारच विचित्र गोष्ट केली. कॉलिन्स गोलंदाजीला सुरुवात करेपर्यंत मी स्टान्स घेऊन उभं राहणं बंद केलं. त्याऐवजी मी डाव्या यष्टीच्या थोडा बाहेर जाऊन उभा राहिलो. तिथून कॉलिन्सच्या हातातला चेंडू मला दिसू शकत होता. एकदा धावायला सुरुवात केल्यावर तो चेंडूवरची पकड बदलू शकणार नाही हे मला ठाऊक होतं. त्याने धावायला सुरुवात केली की, मी जागेवर जाऊन माझा स्टान्स घेत असे. माझ्यापाशी तेवढा वेळ शिल्लक असायचा. पण एकंदरीत फलंदाज ऑफ स्टम्पच्या बाहेर उभा राहून मान उंचावत गोलंदाजाच्या हाताची पकड पाहण्याचा प्रयत्न करतो आहे, हे दृश्य दिसायला

मजेशीर होतं. अखेर माझे सर्व डावपेच यशस्वी ठरले. वेस्ट इंडीजमध्ये कॉलिन्सची गोलंदाजी खेळताना मी ज्या ढिसाळ चुका केल्या होत्या, त्यांची मी पुरेपूर भरपाई केली.

नॅटवेस्ट मालिका – जून-जुलै, २००२

हेडिंग्लेच्या विजयामुळे आम्ही कसोटी मालिका बरोबरीत सोडवू शकलो. त्यानंतर झालेली 'नॅटवेस्ट तिरंगी मालिका' जिंकून आम्ही दौऱ्याची यशस्वी सांगता केली. इंग्लंडमधला त्या वर्षीचा उन्हाळा आमच्यासाठी 'ग्रीष्मगौरव' ठरला. नॅटवेस्ट स्पर्धेत इंग्लंड, श्रीलंका व भारत असे तीन संघ होते. साखळी फेरीत प्रत्येकाशी तीन-तीन सामने खेळल्यानंतर आमची इंग्लंडविरुद्ध अंतिम लढत झाली. १३ जुलैला झालेला अंतिम सामना हा माझ्या कारकिर्दीतला एक अत्यंत चित्तथरारक सामना होता. आजही ती मॅच क्रिकेट चाहत्यांच्या चांगलीच लक्षात आहे.

नॅटवेस्ट स्पर्धेत माझी बॅटिंग फारच चांगली झाली. सहा साखळी सामन्यांत मी दोन शतकं झळकवली. काही सामन्यांत आम्ही मोठ्या धावसंख्येचा पाठलाग करून विजय मिळवले. त्यामुळे अंतिम सामन्यात इंग्लंडने केलेल्या ३२५ धावांमुळे आमच्यावर दबाव आला नव्हता. ते लक्ष्य आम्ही साध्य करू, असं आम्हाला वाटत होतं. आमची सुरुवातही चांगली झाली. सेहवाग व सौरवने मुक्तपणे फटकेबाजी करत डावाचा भक्कम पाया रचला. परंतु क्रिकेटमध्ये अनेकदा जे घडतं त्याचाच पुन्हा प्रत्यय आला. मोठ्या धावसंख्येचा पाठलाग करताना आम्ही भराभर विकेट्स गमावल्या. थोड्याच वेळात १४६-५ अशी आमची स्थिती झाली. ॲशले जाइल्सचा चेंडू कट करण्याच्या प्रयत्नात माझा त्रिफळा उडाला. सामना हातातून निसटू लागला. ड्रेसिंग रूममध्ये उदास वातावरण पसरलं. कुणीही एकमेकांशी बोलत नव्हतं; पण अचानक डावखुरा प्रतिभाशाली फलंदाज युवराज सिंग आणि उत्कृष्ट क्षेत्ररक्षक व मधल्या फळीतील फलंदाज महमद कैफ यांची जोडली जमली. अशक्यप्राय स्थितीतून त्यांनी सामना खेचून आणायला सुरुवात केली. दोघंही सहजपणे चौकार मारत होते. त्यामुळे धावगती आवाक्यात राहिली होती.

दोघांची भागीदारी बहरू लागली. सामन्याला अखेरच्या क्षणी कलाटणी मिळणार असं मला आतून वाटू लागलं. का, ते मी सांगू शकत नव्हतो. पण मॅच अजून हातातून गेलेली नाही, याची मला खातरी वाटत होती. हळूहळू प्रत्येकालाच विजयाची चाहूल लागली. वातावरणात पुन्हा चैतन्य निर्माण झालं. प्रत्येक शॉटचं ड्रेसिंग रूममध्ये जोरदार स्वागत होऊ लागलं. मी ड्रेसिंग रूममधल्या मोठ्या टेबलाच्या मध्यभागी बसलो होतो. बसल्या बसल्या एकामागोमाग एक एनर्जी बार फस्त करत होतो. मला भूक लागलेली नव्हती; पण त्या भारलेल्या वातावरणात नकळत बार संपवत होतो. मॅचमधील उत्कंठा शिगेला पोचली होती. सगळ्यांच्या नजरा दोघांवर खिळलेल्या होत्या. क्रिकेटर्स हे नेहमीच अंधश्रद्ध असतात. आहे त्याच जागी बसून राहायची धमकीवजा सूचना प्रत्येकाला दिली गेली होती. स्वच्छतागृहातही जायला मज्जाव होता. नाइलाज असल्यास षटक संपल्यावर उठून नवीन षटक सुरू व्हायच्या आत आपल्या जागेवर परतावं लागत होतं!

चाळिसावं षटक संपलं. युवराज व कैफला इंग्लंडच्या गोलंदाजीचा पूर्ण अंदाज आला होता. ते अधिकच आत्मविश्वासाने खेळू लागले. प्रत्येकालाच आता जिंकण्याची आशा वाटू लागली. पुढच्या फलंदाजांनाही स्फुरण चढलं होतं. हरण्याची भीती हळूहळू नाहीशी झाली. युवराज ६९ वर बाद झाला. पण कोणीही गडबडून गेलं नाही. अखेर झहीर व कैफने विजयी धाव घेतली आणि आम्ही आनंदाने बेभान झालो. जो तो एकमेकांना आलिंगन देत होता. सौरवने तर कहर केला. अंगातला शर्ट काढून त्याने तो जोरजोरात हवेत फिरवला. लॉर्ड्स बाल्कनीत तो उघड्या छातीने निर्धास्तपणे उभा होता. त्याची ती छबी आजही प्रत्येकाच्या डोळ्यांसमोर आहे. पण मजा म्हणजे जेव्हा जेव्हा मी सौरवला त्या प्रसंगावरून छेडतो, तेव्हा का कुणास ठाऊक, पण संकोचून तो गप्प बसतो.

त्यानंतर बरेच तास आम्ही ड्रेसिंग रूममध्ये बसून होतो. पुन्हा पुन्हा मॅचबद्दल भरभरून बोलत होतो. मधेच आमच्या कानावर आलं की, आमचा डाव कोसळत असताना इंग्लिश टीमने शॅम्पेनच्या बाटल्या मागवून बर्फात ठेवून दिल्या आहेत. भारताची १४६ धावा आणि ५ गडी बाद, अशी स्थिती असताना इंग्लंडला विजयाची खातरी वाटणं साहजिकच होतं. त्यानंतर

मजेशीर गोष्ट घडली. ती खरी की खोटी, मला ठाऊक नाही. आमच्या खेळाडूंनी म्हणे त्याच शॅम्पेनच्या बाटल्या इंग्लिश टीमकडून मागवल्या. त्या बाटल्यांची काळजी घ्यायला आम्ही आनंदाने तयार होतो! अनेक बाटल्या आमच्या ड्रेसिंग रूममध्ये आणल्या गेल्या. लॉर्ड्सचं मैदान सोडण्यापूर्वी त्यातली एकही बाटली शिल्लक उरली नव्हती.

भारतीय क्रिकेटशौकीन ठिकठिकाणी जल्लोष करताना दिसत होते. डब्ल्यू जी ग्रेस गेटपासून सेंट जॉन्स वूड ट्यूब स्टेशनपर्यंतचे रस्ते हातात तिरंगा फडकावणाऱ्या भारतीय चाहत्यांनी खच्चून भरलेले होते. आनंदाने बेहोष होऊन नाचणाऱ्या लोकांमुळे वाहतूक व्यवस्था ठप्प झाली होती. पोलीसही तो आनंदोत्सव संयमाने हाताळत होते. भारतीय संघ बसमधून बाहेर पडण्याची वाट पाहत मोठा प्रेक्षकवर्ग उशिरापर्यंत मैदानाबाहेर ठिय्या देऊन बसला होता. छातीशी ट्रॉफी धरून व चाहत्यांचा प्रेमळ निरोप घेत अखेर मी लॉर्ड्समधून बाहेर पडलो. तो दिवस आम्ही कधीच विसरू शकणार नाही.

त्या विजयातून युवराज व कैफसारख्या तरुण क्रिकेटर्सचा उदय झाला. नकळत २००३ विश्वचषक स्पर्धेची संघबांधणी सुरू झाली. परदेशातही विजय मिळवण्याची आमच्यात क्षमता आहे हे आम्ही सिद्ध केलं. झहीर, आशिष नेहरा, जवागल श्रीनाथ, अनिल कुंबळे आणि हरभजन सिंग असे सक्षम गोलंदाज तयार झाले. तर सेहवाग, सौरव, राहुल, युवराज, कैफ आणि मी असे भक्कम फलंदाज संघात होते. हव्या त्या क्षणी खेळ उंचावण्याची क्षमता प्रत्येकात होती. बरीच वर्षं हुलकावणी देणारं विश्वचषक स्पर्धेचं विजेतेपद आता आम्हाला खुणावू लागलं होतं.

इंग्लंडचा भारत दौरा, २००१

पहिली कसोटी. मोहाली – ३ ते ६ डिसेंबर, २००१

इंग्लंड २३८ (ए हुसेन ८५, एमई ट्रेस्कोथिक ६६; एच सिंग ५-५१) व २३५ (जीपी थॉर्प ६२, एमई ट्रेस्कोथिक ४६; ए कुंबळे ६-८१)

भारत ४६९ (डी दासगुप्ता १००, **एसआर तेंडुलकर** ८८, आर द्रविड ८६, एससी गांगुली ४७; आरकेजे डॉसन ४-१३४, एम होगार्ड ३-९८) व ५-०

भारत १० गडी राखून विजयी

दुसरी कसोटी. अहमदाबाद – ११ ते १५ डिसेंबर, २००१

इंग्लंड ४०७ (सी व्हाइट १२१, एमई ट्रेस्कोथिक ९९, एमए बुचर ५१; ए कुंबळे ७-११५, **एसआर तेंडुलकर** १-२७) व २५७ (एमए बुचर ९२, एन हुसेन ५०; एच सिंग ५-७१, ए कुंबळे ३-११८)

भारत २९२ (**एसआर तेंडुलकर** १०३, व्हीव्हीएस लक्ष्मण ७५; एएफ जाइल्स ५-६७) व १९८-३ (डी दासगुप्ता ६०, एसएस दास ५८, **एसआर तेंडुलकर** २६; आरकेजे डॉसन २-७२)

सामना अनिर्णित

तिसरी कसोटी. बंगळुरू – १९ ते २३ डिसेंबर, २००१

इंग्लंड ३३६ (एमपी वॉर्न ६४, एमआर रामप्रकाश ५८, जेएस फोस्टर ४८; जे श्रीनाथ ४-७३, एच सिंग ३-५४) व ३३-०

भारत २३८ (**एसआर तेंडुलकर** ९०, व्ही सेहवाग ६६; ए फ्लिंटॉफ ४-५०, एमजे होगार्ड ४-८०)

सामना अनिर्णित

भारत मालिकेत १-० विजयी

भारताचा इंग्लंड दौरा, २००२

पहिली कसोटी. लॉर्ड्स – २५-२९ जुलै, २००२

इंग्लंड ४८७ (एन हुसेन १५५, जेपी क्रॉली ६४, ए फ्लिंटॉफ ५९; झेड खान ३-९०, ए कुंबळे ३-१२८) व ३०१-६ घोषित

(जेपी क्रॉली १००*, एमपी वॉन १००; ए कुंबळे ३-८४)

भारत २२१ (व्ही सेहवाग ८४, आर द्रविड ४६, **एसआर तेंडुलकर** १६; एमजे होगार्ड ३-३३, ए फ्लिंटॉफ २-२२) व ३९७ (एबी आगरकर १०९*, व्हीव्हीएस लक्ष्मण ७४, आर द्रविड ६३, **एसआर तेंडुलकर** १२; डब्ल्यू जाफर ५३, एमजे होगार्ड ४-८७)

इंग्लंड १७० धावांनी विजयी

दुसरी कसोटी. नॉटिंगहॅम – ८ ते १२ ऑगस्ट, २००२

भारत ३५७ (व्ही सेहवाग १०६, एससी गांगुली ६८, एच सिंग ५४, **एसआर तेंडुलकर** ३४; एमजे होगार्ड ४-१०५, एसजे हार्मिसन ३-५७) व ४२४-८ घोषित (आर द्रविड ११५, एससी गांगुली ९९, **एसआर तेंडुलकर** ९२; डीसी कॉर्क २-५४, एसजे हार्मिसन २-६३, एमपी वॉन २-७१)

इंग्लंड ६१७ (एमपी वॉन १९७, सी व्हाइट ९४*, एजे स्ट्युअर्ट ८७, एमए बुचर ५३; झेड खान ३-११०, एच सिंग ३-१७५)

सामना अनिर्णित

तिसरी कसोटी. लॉर्ड्स – २२ ते २६ ऑगस्ट, २००२

भारत ६२८-८ घोषित (**एसआर तेंडुलकर** १९३, आर द्रविड १४८, एससी गांगुली १२८, एसबी बांगर ६८, एआर कॅडिक ३-१५०)

इंग्लंड २७३ (एजे स्ट्युअर्ट ७८*, एमपी वॉन ६१; एच सिंग ३-४०, ए कुंबळे ३-९३) व ३०९ (फॉलो-ऑन) (एन हुसेन ११०, एजे स्ट्युअर्ट ४७; ए कुंबळे ४-६६, एसबी बांगर २-५४)

भारत एक डाव आणि ४६ धावांनी विजयी

चौथी कसोटी. द ओव्हल – ५ ते ९ सप्टेंबर, २००२

इंग्लंड ५१५, (एमपी वॉन १९५, एमई ट्रेस्कोथिक ५७, एमए बुचर ५४; एच सिंग ५-११५, एसबी बांगर २-४८, झेड खान २-८३) व ११४-० (एमई ट्रेस्कोथिक ५८*, एमपी वॉन ४७)*

भारत ५०८ (आर द्रविड २१७, **एसआर तेंडुलकर** ५४, एससी गांगुली ५१; एआर कॅडिक ४-११४)

सामना अनिर्णित

मालिका १-१ अनिर्णित

१४.
विश्वचषक स्पर्धा २००३

दक्षिण आफ्रिका व झिंबाब्वे या दोन देशांनी २००३ सालातील विश्वचषक स्पर्धेचं आयोजन केलं होतं. आम्ही डिसेंबर, २००२मध्ये न्यूझीलंडचा दौरा केला. त्या दौऱ्यापासूनच आमची विश्वचषक स्पर्धेची तयारी सुरू झाली. त्या दौऱ्यात आम्ही पूर्ण अपयशी ठरलो. कसोटीत आणि एकदिवसीय मालिकेतही आमचा पराभव झाला. कोणताही पराभव हा नेहमीच मनोधैर्य खच्ची करणारा असतो, पण प्रत्येक अपयशातून तुम्ही काहीतरी नवीन शिकतही असता. विश्वचषक स्पर्धेला अवघा एक महिना उरला होता. त्या पराभवातून आम्हाला अधिक जिद्दीने व जोमाने खेळण्याची प्रेरणा मिळाली. अपयश विसरून आम्ही आमचं पूर्ण लक्ष विश्वचषक स्पर्धेवर केंद्रित केलं.

न्यूझीलंड दौऱ्यात आम्ही दोन कसोटी सामने खेळलो. ते दोन्ही सामने आम्ही हरलो. पहिला सामना १२ डिसेंबरला वेलिंग्टनमध्ये सुरू झाला. तीन दिवसांत संपलेल्या त्या सामन्यात न्यूझीलंडने आमच्यावर १० गडी राखून विजय मिळवला. वेलिंग्टनची खेळपट्टी वेगवान गोलंदाजांना उत्तम प्रतिसाद देत होती. आमचा यष्टिरक्षक पार्थिव पटेलही नेट्समध्ये चेंडू कमालीचे स्विंग करू शकत होता.

कसोटी सामन्याच्या आधी सराव करताना माझ्या बोटाला इजा झाली. बोटाची दुखापत बरी होण्याआधीच मला पहिली कसोटी खेळावी लागली. सामन्याच्या पहिल्या दिवशी सकाळी जेव्हा सर्व खेळाडू मॅच खेळण्याची तयारी करत होते, तेव्हा बोटाच्या तपासणीसाठी मी अँड्र्यू लीपसबरोबर हॉस्पिटलमध्ये आलो होतो. बोट चांगलंच ठणकू लागलं होतं. मी चेंडू झेलू शकत नव्हतो. एखाद्या खेळाडूने गोलंदाजाला देण्यासाठी माझ्याकडे हलकेच चेंडू टाकला, तरी तोही झेलताना हातातून कळ जात होती. बॅटिंग करण्याची मला चिंता वाटत नव्हती. मी नेहमीसारखी बॅट पकडू शकत होतो. क्षेत्ररक्षण कसं करायचं, हाच मुख्य प्रश्न होता. डॉक्टरांना मी बोट बधिर करायला सांगितलं. डॉक्टरांनी नकार दिला. ते म्हणाले, ''बोट बधिर केल्यास एखादा चेंडू तू जर नीट झेलू शकला नाहीस, तर बोट फ्रॅक्चर होऊ शकेल आणि ते तुला कळणारही नाही.'' बोटातली वेदना सहन करण्याखेरीज माझ्यासमोर पर्याय नव्हता.

मैदानावर पोचल्यानंतर मी कर्णधार सौरव गांगुलीपाशी गेलो. 'मला शॉर्ट लेगला उभं कर,' असं मी त्याला सुचवलं. शॉर्ट लेगला उभं राहणं मला खूपच सोयीस्कर होतं. शॉर्ट लेगला एक तर फलंदाजाने अगदी हळू मारलेला चेंडू माझ्यापाशी आला असता किंवा त्याने जर जोरदार फटका मारला, तर मी चेंडू झेलण्याऐवजी माझ्या अंगाने तो अडवण्याचा प्रयत्न केला असता. हे दोन्ही पर्याय त्या अवस्थेत मला चालण्यासारखे होते. फलंदाजाने ताकदीनिशी मारलेला फटका शॉर्ट लेगला उभं राहून हाताने अडवावा अशी कोणाचीही अपेक्षा नसते. माझ्या कारकिर्दीच्या उत्तरार्धात शॉर्ट लेगला उभं राहून क्षेत्ररक्षण करण्याची माझ्यावर फारच क्वचित वेळ आली होती.

दुसरी कसोटी हॅमिल्टनला होती. त्या सामन्यात दोन्ही संघांच्या एकूणच फार कमी धावा निघाल्या; मात्र सामना रंगतदार आणि चुरशीचा झाला. हॅमिल्टनला पोचल्यावर जेव्हा आम्ही खेळपट्टी पाहिली, तेव्हा आम्हाला चांगलाच धक्का बसला. खेळपट्टी तयार करताना पाणी इतकं वापरलं होतं की, मॅचच्या दोन दिवस आधीही ती खूपच ओलसर दिसत होती. त्यानंतर सतत पाऊस पडल्यामुळे खेळपट्टीवर टाकलेली कव्हर्स काढता आली नव्हती. त्यामुळे खेळपट्टी सुकायला वावच मिळाला नव्हता. आमचे प्रशिक्षक जॉन राइट यांनी खेळपट्टीत किल्ली खुपसण्याचा प्रयत्न केला. जराही ताकद न लावता किल्ली पार आतपर्यंत घुसली. कसोटी सामन्यासाठी ती खेळपट्टी मुळीच योग्य नव्हती.

पहिल्या दिवशी हॅमिल्टनमध्ये सूर्य चमकत होता; मात्र खेळपट्टी ओलसर असल्यामुळे मॅच चार तास उशिराने सुरू झाली. पंचांनी अतिशय योग्य निर्णय घेतला होता. इतक्या ओलसर खेळपट्टीवर कसोटी सामना खेळला जाऊ शकत नव्हता. प्रेक्षक अस्वस्थ होऊ लागले होते; पण पंचांचा आणि खेळाडूंचाही नाइलाज होता. अखेर मॅच जेव्हा सुरू झाली तेव्हा आम्ही नाणेफेक हरलो. फलंदाजीसाठी जवळजवळ अशक्य असणाऱ्या खेळपट्टीवर आम्हाला प्रथम बॅटिंग करावी लागली. आमचा डाव ९९ धावांत संपला. एकही फलंदाज त्या खेळपट्टीवर स्थिरावू शकला नाही.

हरभजन फलंदाजीसाठी मैदानात उतरत असताना मी जॉन राइट यांच्या शेजारी बसलो होतो. आमचे सहा गडी बाद झाले होते. ''खेळपट्टीवर थोडा वेळ टिकून रहा. काही वेळानंतर बॅटिंग करणं सोपं जाणार आहे,'' असं जॉन राइट प्रत्येकाला कळकळीने सांगत होते. मी जॉनना म्हटलं की, हरभजनला तुम्ही कोणताही सल्ला देऊ नका. त्याला मैदानावर जाऊन नेहमीप्रमाणे बॅट फिरवू द्या. काही झालं तरी मॅच पाच दिवस चालणार नव्हती. मी त्यांना म्हटलं की, भज्जी जितक्या धावा काढेल त्या अखेरीस आपल्याला उपयोगीच पडतील. हरभजन एकूण नऊ चेंडू खेळला. त्यात त्याने पाच चौकार मारून २० धावा काढल्या. नववा चेंडू तो बचावात्मक खेळायला गेला आणि बाद झाला. हरभजनच्या हरहुन्नरी खेळीमुळे खिन्न झालेल्या जॉन राइट यांच्या चेहऱ्यावरही हास्य उमटलं. ज्या फलंदाजांनी खेळपट्टीवर टिकून राहण्याचा प्रयत्न केला होता, त्यांना १० धावाही काढता आल्या नव्हत्या. हरभजनने मात्र झटपट २० धावा काढल्या होत्या.

न्यूझीलंडचा संघही पहिल्या डावात आमच्यासारखाच गडगडला. विशेष म्हणजे आम्हाला पहिल्या डावात पाच धावांची आघाडी मिळाली. दुसऱ्या डावात राहुलची व माझी जोडी जमली. आमची छान भागीदारी झाली; पण आमच्या दोघांपैकी कुणीच मोठी खेळी करू शकलो नाही. आमची जोडी फुटल्यावर डाव लवकरच कोसळला. न्यूझीलंडसमोर आम्ही १६० धावांचं लक्ष्य ठेवलं.

त्या सामन्यात आशिष नेहराने केलेल्या एका अजोड विक्रमाचा उल्लेख मला करायलाच हवा. कसोटी सामन्यात एकाच दिवशी दोन इनिंग्जमध्ये फलंदाजी व गोलंदाजी करणारा तो पहिला खेळाडू ठरला. पहिल्या दिवसअखेर आमची ९२-८ अशी स्थिती होती. त्या दिवशी आशिष नाबाद राहिला होता. दुसऱ्या दिवशी त्याने फलंदाजीला सुरुवात केली. काही मिनिटांतच आमचा डाव ९९ धावांत आटोपला. त्यानंतर न्यूझीलंडचा संघही टिकाव धरू शकला नाही. त्यांचे सर्व गडी ९४ धावांत बाद झाले. त्यामध्ये आशिषच्या गोलंदाजीचा महत्त्वाचा वाटा होता. आम्ही दुसऱ्या डावात १५४ धावा केल्या. त्यात अर्थातच आशिषच्या फलंदाजीचा सहभाग होता. त्यानंतर मॅचची चौथी इनिंग्ज सुरू झाली. दिवसाच्या अखेरच्या काही क्षणांमध्ये आशिषने पुन्हा गोलदांजी केली.

आशिषची अजब कामगिरी हाच त्या दिवशी ड्रेसिंग रूममधला चर्चेचा विषय होता. यापूर्वी अशा प्रकारची घटना घडल्याचं कुणाच्याच ऐकिवात नव्हतं. त्या दिवशी एकूण २२ विकेट्स पडल्या. त्या खेळपट्टीवर फलंदाजी करणं अशक्य होतं. पाच दिवसांचा सामना पाहायला आलेल्या प्रेक्षकांची घोर निराशा झाली. सामना अखेरीस अटीतटीचा झाला आणि त्यांच्या देशाचा संघ विजयी झाला एवढंच समाधान त्यांना लाभलं.

तंदुरुस्तीसाठी झुंज

दोन्ही कसोटी सामने लवकर संपल्यामुळे मी जास्तीत जास्त वेळ जिममध्ये जायचं ठरवलं. शारीरिक तंदुरुस्तीसाठी मला भरपूर मेहनत घ्यायची होती. सेहवाग माझा जिममध्ये साथीदार होता. आम्ही निरनिराळे वर्क-आउट करायचो. गंमत म्हणजे कोणी किती व कसा व्यायाम केला यावर आम्ही एकमेकांना गुण देत असू. 'मालिकेत एकूण काढलेल्या धावांपेक्षा आपण जिममध्ये जास्त गुण मिळवलेत,' असं आम्ही विनोदाने म्हणायचो; पण या मेहनतीचा आपल्याला नक्कीच फायदा होणार याचा आम्हाला दोघांना पूर्ण विश्वास होता.

कसोटी मालिका संपल्यावर आम्ही सात सामन्यांची एकदिवसीय मालिका खेळलो. त्यातही आमचा २-५ असा पराभव झाला. त्या मालिकेतही बहुतेक खेळपट्ट्या आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या दर्जाच्या नव्हत्या. पायाचा घोटा दुखावल्यामुळे मी

पहिल्या चार मॅचेसमध्ये खेळू शकलो नव्हतो. पहिल्या सामन्याच्या आदल्या दिवशी सराव करताना मला ती इजा झाली. माझ्या कारकिर्दीत मला झालेल्या काही विचित्र दुखापतींपैकी ती एक होती. आमच्या प्रत्येक बॅट्समनसाठी मी नेटमध्ये खूप वेळ गोलंदाजी केली होती. मी ड्रेसिंग रूममध्ये परत निघणार इतक्यात श्रीनाथ मजेत ओरडला – ''शेवटचा चेंडू. जिंकायला चार धावा पाहिजेत.'' मी शेवटचा चेंडू टाकायला सुरुवात केली. आम्ही सराव करत होतो त्या खेळपट्टीच्या कोपऱ्यात एक खड्डा पडला होता. दुर्दैवाने श्रीनाथने मारलेला फटका अडवताना माझा पाय त्या खड्ड्यात पडला. मी वेदनेने कळवळलो. काही आठवड्यांच्या कंटाळवाण्या विश्रांतीनंतर मी अखेर वेलिंग्टनच्या पाचव्या सामन्यात खेळलो आणि शून्यावर बाद झालो. पुढच्या दोन्ही मॅचेसमध्ये मी प्रत्येकी एक धाव काढू शकलो. त्या मालिकेत माझी धावसंख्या ०,१,१ अशी होती. ''अरे, हा तर भारतातल्या एका शहराचा डायलिंग कोड आहे!'' असं अंजली व मी थट्टेत म्हणायचो.

न्यूझीलंडचा कर्णधार स्टीफन फ्लेमिंग याने त्या दौऱ्याचं वर्णन अतिशय योग्य शब्दांत केलं होतं. दौऱ्याच्या अखेरीस फ्लेमिंग म्हणाला, ''या दौऱ्याने गोलंदाजांना फाजील आत्मविश्वास मिळवून दिला आहे. याउलट फलंदाज मात्र त्यांच्या तंत्रात नसलेल्या उणिवांबद्दल उगाचच चिंता करू लागले आहेत.'' एकूणच आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळण्यासाठी त्या खेळपट्ट्या अत्यंत अयोग्य होत्या. अशा मॅचेस खेळल्या गेल्या, तर प्रेक्षक स्टेडियममध्ये फिरकतील तरी का, असा मला प्रश्न पडला होता.

पूर्वतयारी

दक्षिण आफ्रिका व झिंबाब्वेमध्ये होणाऱ्या विश्वचषक स्पर्धेत सहभागी होण्यासाठी भारतीय संघ २००३च्या फेब्रुवारी महिन्यात रवाना झाला. त्या वेळी माझी शारीरिक अवस्था काही फारशी चांगली नव्हती. हाताचं बोट, पायाचा घोटा व धोंडशीर (हॅमस्ट्रिंग) अशा तीन दुखापतींनी मी बेजार झालो होतो. वेस्टर्न केपमधील पारी येथे आमचं सराव शिबिर होतं, पण त्या शिबिरात मी सर्वांबरोबर धावू शकत नव्हतो. त्याऐवजी मी सायकल चालवण्याचा व्यायाम करायचो. एकट्याने व्यायाम करणं कंटाळवाणं होतं, पण तिन्ही दुखापतींमधून लवकरात लवकर बरं होणं गरजेचं होतं. १२ फेब्रुवारीला नेदरलँड्सविरुद्ध विश्वचषक स्पर्धेतला आमचा पहिला सामना होता.

पायाच्या घोट्याला झालेल्या दुखापतीने मला सर्वांत जास्त त्रस्त केलं. ती पूर्ण बरी झाली नव्हती. सरावाच्या आणि सामन्याच्या वेळी त्याभोवती पट्टा गुंडाळून मला खेळावं लागे. रोज न चुकता पट्टा गुंडाळून खेळणं ही माझ्यासाठी एक कठोर परीक्षाच असायची. त्यामुळे मी मनातून खूपच हताश झालो होतो. मी इतका वैतागलो होतो की, एक दिवस सराव संपल्यानंतर मी जरा निष्काळजीपणे पट्टा जोरात खेचून काढला. त्याच क्षणी माझ्या हाताला काहीतरी विचित्र जाणवलं. बघतो तर पट्ट्याबरोबर माझ्या टाचेच्या त्वचेचा जाड थर निघून आला होता. मी चटकन तो कातडीचा थर होता तिथे पुन्हा घट्ट दाबून धरला. नाहीतर त्या ठिकाणी खोल जखम झाली असती. दिवसभराच्या मेहनतीनंतर रोज संध्याकाळी आम्ही शीण घालवण्यासाठी समुद्रावर पोहायला जायचो. समुद्राच्या खाऱ्या पाण्याचा स्पर्श होताच पायाची जखम खूपच झोंबत असे. दुखापत कितीही तापदायक असली, तरी ती हाताळताना अतिशय काळजी घ्यायला हवी, हा धडा मात्र मी त्या प्रसंगातून शिकलो.

आम्ही क्वाझुलु-नताल संघाविरुद्ध दोन सराव सामने खेळलो. ४ फेब्रुवारीला पीटरमॉरित्सबर्ग येथे झालेल्या पहिल्या सामन्यात आम्ही चांगले खेळलो. युवी व द्रविडने सुरेख बॅटिंग केली. दुसऱ्या सामन्यात आमचे सगळेच अंदाज चुकले. आम्ही त्यांचा डाव सहज लवकर गुंडाळू शकलो असतो; पण सौरवच्या मनात काही वेगळंच होतं. आम्हाला पूर्ण ५० षटकांचा बॅटिंगचा सराव मिळायला हवा असं त्याला वाटत होतं. आम्ही नताल संघाला मुद्दाम जास्त धावा द्यायला सुरुवात केली. सौरवने सर्व क्षेत्ररक्षक फलंदाजाच्या जवळपास ठेवले. त्यामुळे त्यांचे बॅट्समन स्वैर फटकेबाजी करू शकले. डावाच्या अखेरीस त्यांनी १९० धावा केल्या. आमचे फलंदाज मात्र ५० षटकंही तग धरू शकले नाहीत. १५८ धावांत आमचे सर्व गडी बाद झाले. आम्ही ३२ धावांनी मॅच हरलो.

दोन्ही सामन्यांत मी तिसऱ्या क्रमांकावर खेळलो. दक्षिण आफ्रिकेला गेल्यावर हा निर्णय घेण्यात आला होता. ज्येष्ठ खेळाडू व प्रशिक्षक ह्यांची एक बैठक झाली. त्यात राहुल, सौरव, श्रीनाथसह बहुतेक खेळाडूंनी मी तिसऱ्या क्रमांकावर खेळावं असं मत व्यक्त केलं. मी सलामीला यावं, असं फक्त अनिलला वाटत होतं. इनिंग्जच्या सुरुवातीलाच एखाद्या अतिशय चांगल्या चेंडूवर मी बाद होऊ शकेन आणि त्यामुळे टीमवर दडपण येईल, अशी त्यांना चिंता वाटत होती. दुसऱ्या सराव सामन्यानंतर जॉन राइट माझ्या खोलीत आले. मला तिसऱ्या क्रमांकावर खेळायला आवडतंय का, असं त्यांनी मला विचारलं. मी म्हटलं की, संघाच्या हितासाठी मी कोणत्याही क्रमांकावर खेळायला तयार आहे. त्यावर, एक खेळाडू म्हणून तुझं वैयक्तिक मत काय आहे असं जॉननी मला पुन्हा पुन्हा खोदून विचारलं. तेव्हा मी त्यांना सांगितलं की, नक्कीच, मला स्वत:ला डावाची सुरुवात करायला आवडेल. सुरुवातीला आल्यामुळे पूर्ण इनिंग्जवर नियंत्रण ठेवणं मला सोपं जातं. शिवाय विकेट गमावण्यासाठी फक्त एका चांगल्या चेंडूची गरज असते. तो केव्हाही पडू शकतो. त्यामुळे तिसऱ्या किंवा चौथ्या क्रमांकावर आल्यावरही मी लवकर बाद होऊ शकणार नाही, अशी खातरी कधीच देता येणार नाही, असंही मी त्यांना म्हटलं. सलामीला आलो तर डाव नीट उभारण्याची मला अधिक संधी मिळू शकेल, असं माझं मत होतं. जॉनना माझं म्हणणं पटलं. मी सलामीला जाणं हाच सर्वांत चांगला पर्याय आहे हे त्यांनी सौरव व इतर खेळाडूंना नीट पटवून सांगितलं.

साखळी सामने

सराव सामन्यात आमची कामगिरी खराब झाली. त्यामुळे १२ फेब्रुवारी, २००३ रोजी नेदरलँड्सविरुद्धच्या पहिल्या साखळी सामन्याला खूपच महत्त्व प्राप्त झालं. स्पर्धेत चांगली झुंज देण्यासाठी सुरुवात उत्तम व्हायला हवी होती. नेदरलँड्स हे जरी आमचे स्पर्धेतले मुख्य प्रतिस्पर्धी नसले, तरी त्यांच्या संघातील काही खेळाडूंना इंग्लिश कौंटी क्रिकेटचा अनुभव होता. मी फलंदाजीला उतरलो तेव्हा माझ्या मनावर खूपच ताण होता. माझ्या कामगिरीकडे तमाम भारतीयांच्या नजरा लागल्या होत्या. शिवाय सलामीला यायच्या माझ्या इच्छेला मान्यता दिल्याने माझ्या संघसहकाऱ्यांच्याही माझ्याबद्दलच्या अपेक्षा वाढल्या होत्या. त्यांची योजना बदलायला मी कारणीभूत झालो होतो. आता माझं म्हणणं मला सिद्ध करून दाखवावं लागणार होतं.

डावाच्या सुरुवातीला मी मुद्दामच बचावात्मक धोरण स्वीकारलं. आधी भक्कम पाया रचून मगच आक्रमक पवित्रा घ्यायचं मी ठरवलं. अलीकडे आमचा डाव १५० धावांच्या आतच आटपत होता. पूर्ण ५० षटकं खेळून मोठी धावसंख्या उभारणं आवश्यक होतं. मी अर्धशतक काढलं. नयन मोंगियाने तळाच्या फळीत खेळून ४२ धावा केल्या. आम्ही धावसंख्येचं जेमतेम द्विशतक ओलांडू शकलो. आमच्या २०४ धावा झाल्या. ती काही कौतुकास्पद कामगिरी नव्हती. नेदरलँड्सच्या एका फलंदाजाला जरी सूर गवसला असता, तरी तो सामना अटीतटीचा होऊ शकला असता. दुसरा डाव सुरू होण्याआधी ड्रेसिंग रूममध्ये आम्ही थोडी चर्चा केली. प्रतिस्पर्धी संघाला १५० धावांतच बाद करायचं उद्दिष्ट ठेऊन जिद्दीने खेळायचं असं आम्ही ठरवलं. श्रीनाथ व कुंबळेनी घेतलेल्या प्रत्येकी चार विकेट्समुळे आमची योजना यशस्वी ठरली. आम्ही त्यांना १३६ धावांतच गुंडाळलं. आम्ही फार चांगले खेळलो नव्हतो; तरीही आम्ही मॅच जिंकू शकलो.

त्यानंतर आमची गाठ गतविजेत्या आस्ट्रेलियाशी पडणार होती. तो सामना १५ फेब्रुवारीला सेंच्युरियनमध्ये होता. आस्ट्रेलियन संघ त्या वेळी उत्कृष्ट क्रिकेट खेळत होता. या स्पर्धेतही त्यांच्याचकडे संभाव्य विजेते म्हणून पाहिलं जात होतं. आम्ही सुरुवातीपासूनच अतिशय सुमार खेळ केला. मी ३६ धावा काढल्या. आमचा डाव १२५ धावांत आटोपला. आस्ट्रेलियाने ती मॅच नऊ गडी राखून जिंकली.

दक्षिण आफ्रिकेतल्या आमच्या खराब कामगिरीमुळे आमचे भारतीय पाठीराखे कमालीचे संतापले होते. उत्तर प्रदेशमधील महम्मद कैफच्या घरावर काही चिडलेल्या क्रिकेटचाहत्यांनी डांबर फेकल्याचं वृत्त आमच्या कानावर आलं. भारतात उमटलेली संतप्त प्रतिक्रिया ही खरोखरच धोक्याची सूचना होती. अखेरीस प्रसारमाध्यमातून मी जाहीर निवेदन करून आमच्या चाहत्यांना शांत करण्याचा प्रयत्न केला. 'आम्ही प्रयत्नांची शर्थ करत आहोत, आम्ही जबाबदारी निभावण्यात

किंचितही कसूर करणार नाहीयोत' असं मी त्या निवेदनात म्हटलं होतं. माझ्या आवाहनाने वातावरण थोडं निवळलं. आम्ही पुन्हा क्रिकेटवर लक्ष केंद्रित केलं.

घसरण थांबली

२००३मध्ये झिंबाब्वे संघाचा दर्जा अतिशय उत्तम होता. त्यांना मायदेशात हरवणं अवघड असायचं. त्यांच्या संघात काही प्रतिभावान खेळाडू होते. २००४-२००५मध्ये झालेल्या राजकीय गोंधळानंतर देशातील वातावरण अस्थिर झालं होतं. संघामधील अनेक खेळाडूंनी झिंबाब्वेसाठी खेळण्यास नकार दिला. हरारेमध्ये त्यांच्याविरुद्ध झालेल्या साखळी सामन्यात आम्ही सुरुवातीपासूनच चांगले खेळलो. ती मॅच आम्ही ८३ धावांनी जिंकलो. आम्हाला आमचा फॉर्म पुन्हा गवसू लागला होता. एका विजयामुळे संघाच्या आत्मविश्वासात किती फरक पडू शकतो, याचा आम्ही अनुभव घेतला. मी ९१ चेंडूत ८१ धावा काढल्या. भज्जीने झिंबाब्वेच्या सर्वोत्कृष्ट फलंदाजाची, म्हणजेच अँडी फ्लॉवरची विकेट काढली. आम्हाला यापुढेही सतत जिंकत राहायचं होतं. यानंतर लवकरच इंग्लंडबरोबर सामना होता. त्या सामन्यातला विजय आम्हाला सुपर सिक्समध्ये घेऊन जाणार होता.

इंग्लंडच्या आधी नामिबियाविरुद्ध आमची २३ फेब्रुवारीला मॅच होती. तो संघ दुबळा असला तरी त्यांना कमी लेखून चालणार नव्हतं. आम्ही त्यांना सतत दबावाखाली ठेवत त्या सामन्यात २ बाद ३११ धावा केल्या. सौरवने व मी शतक ठोकलं. आमच्या गोलंदाजांनी त्यांचा १३० धावांत धुव्वा उडवला. युवराजने सहा धावा देऊन चार बळी मिळवले. नामिबियाविरुद्धच्या विजयाला फार मोठं महत्त्व नसलं, तरी आमची गाडी योग्य दिशेने चालली होती याचं आम्हाला समाधान होतं.

२६ फेब्रुवारीला इंग्लंडबरोबर होणाऱ्या सामन्यात वेगळ्याच कारणामुळे रंग भरू लागला होता. इंग्लंड विरुद्ध भारत ही मॅच नेहमीच रंगते; पण ही मॅच विश्वचषक स्पर्धेतील होती. विजय मिळवणं दोन्ही संघांसाठी अपरिहार्य होतं. अँड्रयू कॅडिकने भारतीय संघाविरुद्ध शेरेबाजी केल्याचं वृत्तपत्रात छापून आलं होतं. ते वाचून आमच्या खेळाडूंमध्ये अधिक ईर्षा व जिद्द निर्माण झाली. मी ती बातमी वाचली नव्हती. कॅडिक काय म्हणाला ते आजतागायत मला ठाऊक नाही. मी आत्तापर्यंतच्या तीनही सामन्यांत चांगल्या धावा काढल्या होत्या. इंग्लंडविरुद्धही चांगली बॅटिंग करणं एवढंच माझं ध्येय होतं.

नाणेफेक जिंकणं फार महत्त्वाचं होतं. आम्ही ती जिंकलो व प्रथम फलंदाजी करायचं ठरवलं. डर्बनमध्ये प्रकाशझोतात बॅटिंग करणं अवघड असतं. वेगात धावा काढण्यावर भर देण्यापेक्षा सुरुवातीला विकेट्स न गमावण्याचं आम्ही ठरवलं. पहिली पाच-सहा षटकं संपल्यानंतर आम्ही पवित्रा बदलत फटकेबाजी सुरू केली. लवकरच आम्ही ५० धावांचा टप्पा ओलांडला. डर्बनची खेळपट्टी द्रुतगती गोलंदाजांसाठी पोषक होती. कॅडिक व इतर उंच इंग्लिश गोलंदाज आखूड टप्प्याचे चेंडू टाकून ते जास्त उसळवण्याचा प्रयत्न करणार, असा मी अंदाज बांधला होता. बराच वेळ मी त्या चेंडूची वाट पाहत होतो. अखेर नवव्या षटकात कॅडिकचा चेंडू माझ्या ऑफ स्टम्पपासून दीड फुटावर उसळला. मला तेच हवं होतं. मी गर्रकन फिरत त्या चेंडूवर मिड विकेटवरून षटकार मारला. माझ्या बॅटवर चेंडू बसल्याक्षणी त्याचं भवितव्य मला समजलं होतं.

त्याच्या पुढच्या षटकात मी त्या विश्वचषक स्पर्धेमधला माझा आवडता शॉट खेळलो. आपल्या चुकीची भरपाई करण्यासाठी कॅडिक खोल टप्प्याचा चेंडू टाकणार असा माझा कयास होता. त्याने नेमका तसाच बॉल टाकला. तो चेंडू खेळायला तितका सोपा नव्हता, पण मी त्यावर सुरेख ऑफ ड्राइव्ह मारला. गोलंदाज व मिड ऑफच्या क्षेत्ररक्षकांमधून चेंडू सीमापार गेला; अचूक क्षण साधत मारलेल्या त्या ड्राइव्हवर मीच खूश झालो. त्या षटकात मी आणखी दोन चौकार मारले. केवळ ११ षटकांत आमच्या ७५ धावा झाल्या.

त्या महत्त्वपूर्ण सामन्यात आमची अगदी स्वप्नवत सुरुवात झाली होती. अँड्रयू फ्लिंटॉफने त्यानंतर केलेल्या अप्रतिम गोलंदाजीमुळे इंग्लंडला त्या सामन्यावर पुन्हा पकड मिळवता आली. फ्लिंटॉफने १० षटकांत केवळ १५ धावा देत २ गडी टिपले. सेहवाग २३ धावांवर त्याच्याच हातात झेल देत बाद झाला. मी त्याच्या गोलंदाजीवर पॉइंटला उभ्या असलेल्या

कॉलिंगवुडकडे झेल देऊन बाद झालो. मी ५० धावा काढल्या. चांगली सुरुवात करूनही फ्लिंटॉफने आम्हाला अडचणीत आणलं. त्या वेळी युवराज ड्रेसिंग रूममध्ये खूपच बेचैन झालेला दिसत होता. आज तुझा दिवस आहे, असं मी त्याला म्हटल्याचं मला आठवतं. आता चमकदार फलंदाजी करून सामन्यावर पुन्हा पकड मिळवण्याची जबाबदारी त्याच्यावर होती. राहुलने व युवीने सुरेख बॅटिंग करत धावसंख्या २५०वर नेली. तरीही अपेक्षेपेक्षा २० धावा कमी निघाल्याची रुखरुख आम्हाला वाटत होती.

महम्मद कैफच्या चपळ क्षेत्ररक्षणामुळे इंग्लंडविरुद्ध पुन्हा एकदा आम्ही चांगली सुरुवात करू शकलो. सलामीचा डावखुरा फलंदाज निक नाइटने एक चेंडू बॅकफुटवर खेळत चोरटी धाव घ्यायचा प्रयत्न केला. कैफ कव्हरला उभा होता. त्याने क्षणार्धात त्या चेंडूवर झडप घातली आणि पुढे झेपावत यष्टी उडवल्या. इंग्लंडची ६ धावा आणि १ गडी बाद, अशी स्थिती झाली. इंग्लंडला सुरुवातीलाच धक्का देण्याचं आमचं उद्दिष्ट साध्य झालं.

इंग्लंडचा दुसरा सलामीवीर मार्क्स ट्रेस्कोथिकलाही आम्ही लवकरच बाद केलं. झहीरच्या गोलंदाजीवर त्याने मारलेला पुलचा फटका फसला. मी बॅकवर्ड स्क्वेअरला त्याचा झेल घेतला. त्यानंतर आशिष नेहराने सामन्याची सूत्रं आपल्या ताब्यात घेतली. मी पाहिलेली आशिषची ती सर्वोत्कृष्ट गोलंदाजी होती. डर्बनच्या त्या संध्याकाळी तो जणू झपाटून गेला होता. तो चेंडू दोन्ही बाजूला स्विंग करू शकत होता. शिवाय १४०-१४५ कि.मी.च्या भन्नाट वेगाने तो गोलंदाजी करत होता. त्यामुळे एकाच वेळी त्याच्या वेगाचा आणि स्विंगचा मुकाबला करणं इंग्लिश फलंदाजांना अतिशय अवघड जात होतं. भारतीय गोलंदाजांनी एकदिवसीय क्रिकेटमध्ये केलेली ती सर्वोत्तम गोलंदाजी होती. तिसाव्या षटकाअखेर इंग्लंडचे ८ गडी बाद झाले होते. मॅच जिंकण्यासाठी त्यांना अजून १४० धावांची आवश्यकता होती. राहुल त्या सामन्यात यष्टिरक्षक होता. त्याने व सेहवागने आशिषच्या बोलिंगवर अतिशय उत्कृष्ट झेल घेतले. सर्व टीम जिद्दीला पेटली. आम्हाला सुपर सिक्समधला प्रवेश खुणावू लागला होता.

भारताने अखेर तो सामना ८२ धावांनी जिंकला. आमच्यात निर्माण झालेली जिंकण्याची ईर्षा आता आम्हाला शेवटपर्यंत टिकवून धरायची होती. त्या क्षणी भारतात जल्लोष सुरू झाला होता. अचानक भारतीय संघ अजिंक्य वाटू लागला. डर्बनच्या विजयाने आमची गाडी पुन्हा रुळावर आली होती. त्यानंतर पाकिस्तानविरुद्ध झालेला सामना तर कहर होता. मॅच खेळत असताना माझ्यावर क्वचितच इतकं दडपण आलं असेल. त्या मॅचने सर्व भारतीय क्रिकेट चाहते झपाटून गेले. विश्वचषक स्पर्धेत खेळलेला तोच खरा अस्सल सामना होता.

सेंच्युरियनची रणभूमी

भारत-पाकिस्तान सामना सेंच्युरियनमध्ये १ मार्च, २००३ रोजी खेळला गेला. माझे काही मित्र त्या सामन्यावर एक वर्ष आधीपासूनच तावातावाने चर्चा करताना मी ऐकलं होतं. दोन्ही संघासाठी त्या सामन्याला विलक्षण महत्त्व होतं. मॅचचं दडपण इतकं जबदरस्त होतं की, मॅचच्या आधी तीन रात्री मी शांतपणे झोपू शकलो नव्हतो. आम्हाला काहीही करून ती मॅच जिंकायची होती. भारतीय चाहत्यांना पराभव सहनच होऊ शकला नसता. क्रिकेटशौकिनांसाठी तोच विश्वचषक स्पर्धेचा अंतिम सामना होता. जर सेंच्युरियनमध्ये आम्ही विजय मिळवू शकलो असतो, तर त्यानंतर स्पर्धेत कोण अंतिम विजयी ठरणार आहे याबद्दल कोणालाही फिकीर नव्हती. सेंच्युरियनवर पाकिस्तानचा पराभव करणं ही एकच गोष्ट महत्त्वाची होती.

मॅच सुरू होण्याआधीपासूनच मैदान गजबजून गेलं होतं. कोणत्याही खेळासाठी ते अतिशय सुंदर वातावरण होतं. याचसाठी मी क्रिकेटचा ध्यास धरला होता. जागतिक क्रिकेट स्तरावर भारताच्या कट्टर प्रतिस्पर्ध्याविरुद्ध मला खेळायचं होतं. राष्ट्रगीत ऐकताना आणि त्या गीतामधल्या एकेका शब्दाचा उच्चार करताना माझ्या अंगावर रोमांच येत होते.

नाणेफेक जिंकून पाकिस्तानने प्रथम फलंदाजी घेतली. सईद अन्वरने नेटाने एक बाजू धरून ठेवली. त्याने शतक काढलं. पाकिस्तानच्या २७३ धावा झाल्या. आमच्या अपेक्षेपेक्षा आम्ही त्यांना २० धावा जास्त करू दिल्या होत्या. आम्ही पॅव्हिलियनकडे परतत असताना सौरवने मला विचारलं, ''आपण सर्वांबरोबर थोडीशी चर्चा करू या का?'' मी म्हटलं, ''मला

तरी तशी गरज वाटत नाही. काय करायचं आहे, हे प्रत्येकाला चांगलंच ठाऊक आहे. आता फक्त मैदानावर जाऊन सर्वांनी आपली जबाबदारी पार पाडायची आहे.''

मधल्या विश्रांतीच्या काळात मी कुणाशीही बोललो नाही. फारसं खाल्लंही नाही. मी हेडफोन्स लावून संगीत ऐकत होतो. संगीत ऐकता ऐकता मला त्या योग्य मन:स्थितीत जाऊन पोचायचं होतं. मी फक्त एक केळं आणि बाउलभर आइसक्रीम एवढाच आहार घेतला. अंपायर्स मैदानावर जायला निघाले की मला खूण कर, असं मी एका खेळाडूला सांगून ठेवलं. काही वेळातच पंच मैदानात पोचले. मी बॅट उचलली आणि ड्रेसिंग रूमबाहेर पडलो.

इनिंग्जचा पहिला चेंडू नेहमी सेहवाग खेळतो; पण आजचा दिवस वेगळा होता. मैदानावर जात असताना सेहवागला म्हटलं की, ''आज मी स्ट्राइक घेतो.'' सुरुवातीची काही षटकं आपण जपून खेळू आणि मग फटकेबाजीला सुरुवात करू असंही मी त्याला सुचवलं. वासिम अक्रम, वकार युनूस व शोएब अख्तर या तिघांमध्ये कोणत्याही संघाला सुरुवातीलाच हादरे देण्याची क्षमता होती.

मी बोललो त्याच्या नेमकं उलट घडलं. वासिमच्या पहिल्याच षटकात मी कव्हरमधून चौकार मारला. पुढच्या चेंडूवर मी एक धाव घेतली. वासिमच्या शेवटच्या चेंडूवर सेहवानेही चौकार खेचला. शोएब अख्तरने दुसरं षटक टाकलं. त्याच षटकाने जणू मॅचची दिशा स्पष्ट झाली. त्याने मला टाकलेला पहिला चेंडू वाइड होता. पुढचा चेंडू मी जपून खेळलो. तिसऱ्या चेंडूवर एक धाव काढली. त्यानंतर त्याने सेहवागला आणखी एक वाइड बॉल टाकला. त्या चेंडूवर आम्हाला एक चोरटी धावही मिळाली. सहाव्या चेंडूवर मात्र मी शोएबवर तुटून पडलो. आखूड टप्प्याचा तो चेंडू माझ्यापासून काहीसा दूर उसळला होता. तो चेंडू किंचित आधीच माझ्या नजरेच्या टप्प्यात आला आणि दुसऱ्याच क्षणाला मी तो थर्ड मॅनवरून मारायचं ठरवलं. तो अप्पर कट नव्हता. खरंतर थर्ड मॅनच्या डोक्यावरून कसून लगावलेला तो एक तिरकस फटका होता. फटका इतका सुंदर जमला होता की, चेंडू थेट प्रेक्षकांत जाऊन पडला. पुढच्या चेंडूवर शोएब चुकीची भरपाई करण्याचा प्रयत्न करणार हे मला ठाऊक होतं. त्याने खोल टप्प्यावर चेंडू टाकला. मी किंचित बाजूला सरत त्यावर बॅकवर्ड स्क्वेअरला चौकार मारला.

सुरुवात छान झाली होती. सगळं दडपण निघून गेलं होतं. शोएबच्या आधीच्या दोन चेंडूंवर १० धावा निघाल्याने मी त्याचा शेवटचा चेंडू जपून खेळायचं ठरवलं. मी मिड ऑफच्या दिशेने हलकासा पंच मारला. पण त्या शॉटचं टायमिंग इतकं अचूक साधलं गेलं होतं की, लाँग ऑनवरून तो चेंडू सीमापार झाला. त्या षटकात आम्ही १८ धावा काढल्या.

चौथं षटक टाकायला वकार आला तेव्हाच पाकिस्तानवर दडपण आलं आहे, हे आम्ही ओळखलं. सेहवागने वकारच्या पहिल्याच बॉलवर थर्ड मॅनवरून षटकार खेचला. आम्ही त्याच्यावर सुरुवातीपासूनच हल्ला चढवला. आम्ही एकमेकांना प्रोत्साहन देत होतो. पाकिस्तानी खेळाडूंच्या कानावर जावं म्हणून आम्ही मुद्दाम एकमेकांशी जोरजोरात हिंदी भाषेत बोलत होतो. आमची देहबोली आक्रमक झाली होती. वकारच्या शेवटच्या चेंडूवर खणखणीत चौकार लगावत आमचं खेळावर पूर्ण नियंत्रण असल्याचं मी दाखवून दिलं. आम्ही एकाही गोलंदाजाला स्थिरावू दिलं नव्हतं. पाकिस्तानवर इतका जोरदार हल्ला करण्यात त्यापूर्वी माझा कधीच सहभाग नव्हता. विश्वचषक स्पर्धेतल्या सामन्यात आम्ही त्यांच्यावर आक्रमण करू शकलो होतो, याला विशेष महत्त्व होतं. आम्ही केवळ पाच षटकांत ५० धावा फटकावल्या. सुरुवातीला त्यांनी केलेल्या २७३ धावा डोंगराएवढ्या वाटत होत्या. आता त्याचं दडपण उरलं नव्हतं.

कोणत्याही भारत-पाकिस्तान सामन्याला मधेच कलाटणी मिळणार ही गोष्ट जणू ठरूनच गेलेली असते. वकारने त्याच्या पुढच्या षटकात झटपट आमच्या दोन विकेट्स काढल्या. प्रथम सेहवाग आणि त्याच्या पुढच्याच चेंडूवर सौरवला त्याने बाद केलं. पाकिस्तानने पुन्हा सामन्यावर कब्जा मिळवला होता. महम्मद कैफ फलंदाजीला आला. आम्हाला मोठी भागीदारी रचणं आवश्यक होतं, पण त्यासाठी अतिबचावात्मक धोरण स्वीकारूनही चालणार नव्हतं. कैफ छान खेळला. सातत्याने एकेक धाव काढत त्याने मला जास्तीत जास्त स्ट्राइक मिळवून द्यायचा प्रयत्न केला. धावांची गती खालावलेली नव्हती. मी १५०च्या धावगतीने माझं अर्धशतक पूर्ण केलं.

मी खेळलेली ती एक सर्वोत्तम इनिंग्ज होती. इतकं दडपण दुसऱ्या कुठल्याही मॅचमध्ये येऊ शकत नाही. प्रेक्षक माझ्या

प्रत्येक चौकाराचं उभं राहून स्वागत करत होते. त्या क्षणी माझाच मला हेवा वाटत होता. क्रिकेटमधली सर्वोच्च स्पर्धा सुरू होती. देशाच्या कट्टर प्रतिस्पर्ध्याविरुद्ध मी खेळत होतो. माझ्या हेल्मेटवर तिरंग्याचं चित्र होतं. १०० कोटी चाहत्यांच्या नजरा माझ्यावर खिळलेल्या होत्या. एका खेळाडूला यापेक्षा जास्त काय हवं असतं? माझं काम फक्त उत्तम फलंदाजी करून पाकिस्तानला नेस्तनाबूत करण्याचं होतं.

मी सत्तरीत असताना माझ्या पायात पेटके यायला सुरुवात झाली. मी थोडे उपचार करून घेतले; पण रनर घेण्यास मात्र मी नकार दिला. माझ्यासाठी दुसराच कुणीतरी धावतो आहे, ही कल्पनाच मला कधी सहन झाली नाही. माझं लक्ष थोडंसं विचलित झालं. प्रयत्न करूनही मला मनासारखं खेळता येईना. अखेर शोएब अख्तरच्या एका आखूड टप्प्याच्या चेंडूवर मी ९८ धावा काढून बाद झालो. माझ्या त्या शारीरिक अवस्थेत मी पाय उंचावून तो उसळलेला चेंडू खाली ठेवू शकलो नाही. प्रेक्षकांची मानवंदना स्वीकारत मी पॅव्हिलियनमध्ये परतलो.

मात्र अजून आम्ही ९६ धावांनी पिछाडीवर होतो. दोन-तीन विकेट्स झटपट पडल्या असत्या, तर माझ्या खेळीला काही महत्त्वच उरलं नसतं. पण तशी काहीच चिंता करावी लागली नाही. राहुल व युवराजने आकर्षक फलंदाजी करत पाच षटकं राखून संघाला विजय मिळवून दिला. दोघांनीही अर्धशतकं काढली. विश्वचषक स्पर्धेतील पाकिस्तानविरुद्धची विजयी परंपरा आम्ही कायम राखली होती.

मॅन ऑफ द मॅचचं पारितोषिक स्वीकारताना माझा ऊर अभिमानाने भरून आला होता. बक्षीस म्हणून मला एक सुंदर घड्याळ मिळालं. माझ्या सर्व भारतीय चाहत्यांच्या वतीने मी त्या पारितोषिकाचा स्वीकार केला. भारतातल्या माझ्या अनेक मित्रांना मी फोन केला. देशामध्ये सर्वत्र आनंदाचा जल्लोष उसळल्याचं मला सांगण्यात आलं. आपल्या देशवासीयांना आपण आनंदाचा क्षण मिळवून दिला, या समाधानाने आम्ही धन्य झालो!

ड्रेसिंग रूममधला आनंदोत्सव कधी संपूच नये, असं सर्वांना वाटत होतं. अखेर जठराग्नी शमवण्यासाठी आम्ही मध्यरात्रीच्या सुमारास बाहेर पडलो. माझे मित्र सुनिल हर्षे व संजय नारंग भारतीय संघाला खास प्रोत्साहन द्यायला दक्षिण आफ्रिकेला आले होते. रात्री ते दोघेही आमच्याबरोबर होते. रस्त्याच्या कडेला असलेल्या चायनीज स्टॉलमध्ये शिरून आम्ही मनसोक्त नूडल्स खाल्ले. त्याच वेळी बक्षीस मिळालेलं घड्याळ भारतात घेऊन जाण्यासाठी मी संजयच्या हातात दिलं.

जेवण संपवून आम्ही हॉटेलला परतत असताना संजय अचानक घाबरून गेल्याचं माझ्या लक्षात आलं. मी त्याला दिलेलं घड्याळ चायनीज स्टॉलवरच राहिलं आहे, असं तो म्हणाला. प्रथम मला वाटलं की, तो मस्करी करतो आहे; पण तो खरोखरच अस्वस्थ झाला होता. विश्वचषक स्पर्धेत मिळालेल्या एवढ्या मोठ्या बक्षिसाबद्दल मी कधीच मस्करी करू शकणार नाही, असंही तो म्हणाला. त्याने लगेच त्या स्टॉलच्या मालकाला फोन केला. आपण एक अदिदासची बॅग विसरल्याचं त्याने सांगितलं. बॅगेमध्ये बूट आहेत, असंही त्याने मुद्दाम खोटंच सांगितलं. आम्ही गाडी वळवून वेगाने स्टॉलवर पोचलो. एका वयस्कर महिलेने हसत हसत ती बॅग आमच्या हातात ठेवली आणि आम्ही सुटकेचा नि:श्वास सोडला.

अंतिम सामन्यापर्यंतचा प्रवास

पाकिस्तानच्या मॅचनंतर आम्हाला केनिया, श्रीलंका व न्यूझीलंडविरुद्ध सामने खेळायचे होते. तीनही सामने आम्ही सहज जिंकले. भारतीय संघ जबरदस्त क्रिकेट खेळत होता. अंतिम सामन्यात पोचलो तर आम्ही आस्ट्रेलियाला चांगली लढत देऊ, असं आम्हाला वाटू लागलं होतं. श्रीलंकेच्या मॅचच्या आदल्या दिवशी माझं पोट बिघडलं होतं. मी पूर्ण डिहायड्रेट झालो होतो. पाकिस्तानच्या मॅचच्या वेळी माझ्या पायात आलेल्या क्रॅम्प्समधून मी अजून पुरता बरा झालो नव्हतो. त्यासाठी उपयुक्त क्षार असलेली इलेक्ट्रॉलसारखी पेयं पिण्याचा मी सपाटा लावला होता. लवकर बरं वाटावं म्हणून मी त्यात चमचाभर मीठही टाकत होतो. या सर्वांचा माझ्या पोटावर परिणाम झाला होता. माझी अवस्था इतकी वाईट झाली होती की, अंडरवेअरमध्ये टिश्यू पेपर्स ठेऊन मला बॅटिंग करावी लागत होती. मला खूपच अस्वस्थ वाटत होतं. शीतपेयाच्या विश्रांतिकाळात मी चटकन ड्रेसिंग रूममध्येही जाऊन आलो होतो. त्या मॅचमध्ये माझ्या सहनशक्तीचा कस लागला. त्याही परिस्थितीत मी ९७ धावा

काढून बाद झालो. अखेरीस मॅच जिंकल्यामुळे माझे श्रम सत्कारणी लागले.

भारत आता उपांत्य फेरीत पोचला होता. आमची गाठ केनियाशी होती. त्या स्पर्धेत केनियाने अनेक मातब्बर संघांना हादरे दिले होते. केनिया विरुद्ध श्रीलंकेचा सामना आम्ही हॉटेलच्या रूममध्ये बसून पाहिला होता. त्या वेळी एक विचित्र योगायोग आम्ही अनुभवला. आम्ही दरवेळी जेव्हा एखाद्या श्रीलंकेच्या खेळाडूची स्तुती करायचो, तेव्हा तो पुढल्या चेंडूवर हमखास बाद व्हायचा. तो खरोखरच विचित्र प्रकार होता. त्या सामन्यात केनियाने श्रीलंकेला हरवून एकच खळबळ उडवली होती.

जवळ असूनही खूप दूर

आजपर्यंत आमच्या संघातील खेळाडूंनी फक्त दुसऱ्या देशाच्या संघांना विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात खेळताना पाहिलं होतं. आता आम्ही स्वत: अंतिम फेरीत दाखल झालो होतो. भारतीय चाहत्यांची उत्कंठा शिगेला पोचली होती. आम्हाला प्रोत्साहन देण्यासाठी अनेक भारतीय क्रिकेटशौकीन दक्षिण आफ्रिकेत आले होते. आम्ही योग्य वेळी आमचा खेळ उंचावला होता व त्यानंतर त्यात सातत्यही राखलं होतं. अंतिम सामन्यात आम्ही सर्वोत्तम खेळ करायचं ठरवलं होतं; पण आम्ही कदाचित फारच उत्सुक आणि उत्तेजित झालो होतो. अंतिम सामन्याच्या आदल्या दिवशी आम्ही संध्याकाळी पोहायला जायचं ठरवलं. स्विमिंग पूलमधलं पाणी बर्फासारखं थंडगार होतं; तरीही आम्ही मनसोक्त पोहलो. त्या रात्री मी शांतपणे झोपू शकलो नाही.

दुसऱ्या दिवशी सकाळी मैदानावर पोचताच आधी आम्ही खेळपट्टी निरखून पाहिली. ती ओलसर होती. सामना सकाळीच सुरू होणार होता. त्यामुळे द्रुतगती गोलंदाज त्या खेळपट्टीचा फायदा उठवू शकणार होते. नाणेफेक जिंकली तर क्षेत्ररक्षण स्वीकारणं अधिक योग्य ठरलं असतं. आम्ही तेच केलं. पण आमचा निर्णय आमच्याच अंगाशी आला. आस्ट्रेलियाने ५० षटकांत ३५९ धावा काढल्या. रिकी पाँटिंगच्या कारकिर्दीतील ती एक सर्वोत्कृष्ट इनिंग्ज ठरली. त्याने १४० धावा केल्या. आस्ट्रेलियाने आमच्यासमोर फारच कठीण आव्हान ठेवलं होतं.

मला वाटतं, आम्ही क्षेत्ररक्षण करण्याचा घेतलेला निर्णय फारसा चुकीचा नव्हता; पण आम्ही अंतिम सामना खेळायला नको तेवढे उतावीळ झालो होतो. तो उतावीळपणा वेळीच रोखता न आल्याने आम्ही आखलेल्या सर्व योजना मॅचच्या सुरुवातीलाच बारगळल्या. झहीरने पहिल्याच षटकात १५ धावा दिल्या. तरीही सामन्यावर पुन्हा पकड मिळवण्याची आम्हाला आशा होती; पण तसं घडलं नाही. त्या इनिंग्जच्या अखेरीस पाँटिंगच्या प्रत्येक तडाखेबाज फटक्याबरोबर आमचं काम अधिक अवघड होत गेलं. ३०० धावसंख्येनंतर होणाऱ्या प्रत्येक धावेची आम्हाला दुपटीने किंमत मोजावी लागणार होती. आस्ट्रेलियाच्या जबरदस्त गोलंदाजीसमोर ३५८ धावांचं लक्ष्य पार पाडण्याचं आव्हान निश्चितच आमच्या धैर्याची कसोटी पाहणारं होतं. आम्ही त्यावर ड्रेसिंग रूममध्ये चर्चा केली होती. प्रत्येक षटकात आम्हाला एक चौकार मारणं गरजेचं होतं. त्यानंतर उरलेल्या २५० चेंडूंत आम्हाला आणखी १६० धावा काढायच्या होत्या. आम्ही सकारात्मक दृष्टिकोनातून विचार करण्याचा प्रयत्न करत होतो. त्याशिवाय आमच्यासमोर दुसरा पर्यायही नव्हता.

त्या मॅचमध्येही मीच प्रथम स्ट्राइक घेतला. मॅक्ग्राच्या एका चेंडूवर माझा पुलचा फटका चुकला, पण तरीही त्यावर मला चौकार मिळाला. मी पुन्हा पुलचा शॉट मारण्याचा प्रयत्न केला. चेंडू बॅटच्या वरच्या कडेला लागून उंच उडाला. झेल घेण्यासाठी मॅक्ग्रा त्या चेंडूच्या खाली येत असल्याचं पाहून मी हताश झालो. अशा वेळेस झेल सुटावा किंवा तो चेंडू क्षेत्ररक्षक नसलेल्या जागी पडावा एवढीच प्रार्थना आपण करू शकतो, पण माझी प्रार्थना फोल ठरली. 'मला तो शॉट मारण्याची दुर्बुद्धी का झाली?' असा प्रश्न मी पॅव्हिलियनमध्ये जात असताना स्वत:लाच विचारत होतो. अजून दोन-तीन षटकं मी स्वत:ला स्थिरावू द्यायला हवं होतं, पण एवढ्या प्रचंड धावसंख्येचा पाठलाग करण्याचं दडपणच इतकं विलक्षण होतं की, आक्रमण करण्याखेरीज पर्याय नव्हता.

निम्मी षटकं संपलेली असताना अचानक पावसाच्या हलक्या सरी पडू लागल्या. काळोखही खूपच दाटून आला होता.

मला जानेवारी, १९९७ मधील दक्षिण आफ्रिकेत खेळलेल्या मालिकेची आठवण झाली. तेव्हा पावसाने आमचा विजय हिरावून घेतला होता. या वेळी मी पाऊस पडावा अशी प्रार्थना करत होतो. मॅच रद्द झाली असती, तर दुसऱ्या दिवशी पुन्हा नव्याने ती खेळवली जाणार होती, पण आम्ही तेवढे नशीबवान नव्हतो. अखेरीस २३४ धावांत आमचे सर्व गडी बाद झाले.

बक्षीस समारंभाच्या वेळी आस्ट्रेलियन खेळाडूंना विजय साजरा करत असल्याचं पाहत असताना मनाला खूपच क्लेश होत होते. आम्ही मात्र पराभवाच्या वेदना सोसत हताशपणे उभे होतो. स्पर्धेमध्ये मी ६७३ धावा काढल्या. मालिकेतील सर्वोत्तम खेळाडू म्हणून माझं नाव घोषित करण्यात आलं. मला फारसा आनंद झाला नाही. तो सन्मान मिळाल्याचा मला निश्चितच अभिमान वाटत होता, पण पराभवामुळे आनंद झाकोळला गेला होता. आता आम्हाला पुढच्या विश्वचषक स्पर्धेसाठी चार वर्षं वाट पाहावी लागणार होती.

त्या निराशेच्या भरात मला बक्षीस म्हणून सोन्याची बॅट मिळाली आहे, हेही माझ्या लक्षात आलं नाही. मी ती माझ्या किटबॅगमध्ये इतर सामानाबरोबर ठेवून दिली. मी मुंबईला पोचल्यावर सर्व जण मला त्या बॅटबद्दल विचारू लागले. तेव्हा ती बॅट सोन्याची आहे आणि पारितोषिक विजेत्यासाठी खास बनवून घेतली आहे, हे माझ्या लक्षात आलं. विमानप्रवासात मी पूर्ण वेळ झोपलो होतो. सर्वच खेळाडू अजून पराभवाच्या धक्क्यातून सावरलेले नव्हते. कुणीही एकमेकांशी बोलण्याच्या मन:स्थितीत नव्हतं. निराशेवर मात करण्यासाठी बराच वेळ जावा लागणार होता.

मागे वळून पाहताना, विश्वचषक २००३ स्पर्धेच्या बऱ्याच कडू-गोड आठवणी मनात उरल्या आहेत. त्या स्पर्धेत एक संघ म्हणून आम्ही अतिशय उत्तम क्रिकेट खेळलो. अंतिम सामना सोडल्यास मी प्रत्येक सामन्यात चांगली बॅटिंग केली होती. इंग्लंड आणि पाकिस्तानवर मिळवलेले विजय संस्मरणीय होते, पण विश्वचषक मात्र मला अजूनही हुलकावणी देत होता.

२००३ विश्वचषक स्पर्धेतील भारताचे सामने

सातवा सामना. भारत विरुद्ध नेदरलँड्स. पार्ल. १२ फेब्रुवारी, २००३
भारत २०४ (४८.५/५० षटकं) नेदरलँड्स १३६ (४८.१/५० षटकं)
भारत ६८ धावांनी विजयी

अकरावा सामना. आस्ट्रेलिया विरुद्ध भारत. सेंच्युरियन. १५ फेब्रुवारी, २००३
भारत १२५ (४१.४/५० षटकं) आस्ट्रेलिया १२८-१ (२२.५/५० षटकं)
आस्ट्रेलिया ९ गडी राखून विजयी (१६६ चेंडू बाकी)

सतरावा सामना. झिंबाब्वे विरुद्ध भारत. हरारे. १९ फेब्रुवारी, २००३
भारत २५५-७ (५०/५० षटकं) झिंबाब्वे १७२ (४४.४/५० षटकं)
भारत ८३ धावांनी विजयी

पंचविसावा सामना. भारत विरुद्ध नामिबिया. पीटरमॉरित्सबर्ग. २३ फेब्रुवारी, २००३
भारत ३११-२ (५०/५० षटकं) नामिबिया १३० (४२.३/५० षटकं)
भारत १८१ धावांनी विजयी

तिसावा सामना. इंग्लंड विरुद्ध भारत. डर्बन. २६ फेब्रुवारी, २००३
भारत २५०-९ (५०/५० षटके) इंग्लंड १६८ (४५.३/५० षटके)
भारत ८२ धावांनी विजयी

छत्तिसावा सामना. भारत विरुद्ध पाकिस्तान. सेंच्युरियन. १ मार्च, २००३
पाकिस्तान २७३-७ (५०/५० षटकं) भारत २७६-४ (४५.४/५० षटकं)

भारत ६ गडी राखून विजयी (२६ चेंडू बाकी)

दुसरा सुपर सामना. भारत विरुद्ध केनिया. केप टाउन. ७ मार्च, २००३
केनिया २२५-६ (५०/५० षटकं) भारत २२६-४ (४७.५/५० षटकं)
भारत ६ गडी राखून विजयी (१३ चेंडू बाकी)

चौथा सुपर सामना. भारत विरुद्ध श्रीलंका. जोहान्सबर्ग. १० मार्च, २००३
भारत २९२-६ (५०/५० षटकं) श्रीलंका १०९ (२३/५० षटकं)
भारत १८३ धावांनी विजयी

सातवा सुपर सामना. भारत विरुद्ध न्यूझीलंड. सेंच्युरियन. १४ मार्च, २००३
न्यूझीलंड १४६ (४५.१/५० षटकं) भारत १५०-३ (४०.४/५० षटकं)
भारत ७ गडी राखून विजयी (५६ चेंडू बाकी)

दुसरा उपांत्य सामना. भारत विरुद्ध केनिया. डर्बन. २० मार्च, २००३
भारत २७०-४ (५०/५० षटकं); केनिया १७९ (४६.२/५० षटकं)
भारत ९१ धावांनी विजयी

अंतिम सामना. आस्ट्रेलिया विरुद्ध भारत. जोहान्सबर्ग. २३ मार्च, २००३
आस्ट्रेलिया ३५९-२ (५०/५० षटकं) भारत २३४ (३९.२/५० षटकं)

आस्ट्रेलिया १२५ धावांनी विजयी



▲ अंजली मेहता, अंजली तेंडुलकर झाली तो दिवस.

▼ माझ्या जीवनातील सर्वोत्तम भागीदारी.






◂ क्रिकेटला खरी सुरुवात चौथ्याच वर्षी झाली.

▾ 'साहित्य सहवास'मधील आमच्या घरात, आईच्या सुरक्षित हातात.



▾ माझ्या वडिलांसोबत – आज माणूस म्हणून माझी जी काही ओळख आहे, ती केवळ माझ्या वडिलांमुळेच; सारं श्रेय त्यांचं आहे.





▲ वयाच्या चौदाव्या वर्षी, शिवाजी पार्कजवळील माझ्या काका-काकूंच्या घरी किटबॅग भरताना. मी त्यांचा सदैव ऋणी आहे.



▲ आचरेकरसरांबरोबर; सरांनी कौतुकाने नुसती मान हलवली तरी माझा दिवस सार्थकी लागायचा.

▼ माझी लाडकी बॅट वडिलांबरोबर नीट तपासून पाहताना; आईच्या डोळ्यांत कौतुक.





◂ १९८९, पाकिस्तान, माझी पहिली कसोटी मालिका – कारकिर्दीची सुरुवातच अग्निपरीक्षेने झाली.

▾ १९९०, ओल्ड ट्रॅफोर्ड – माझ्या पहिल्या कसोटी शतकानंतर अभिवादन करताना.
आपण अजून ९९ शतकं काढणार आहोत, याचा त्या वेळी मला पत्ताही नव्हता!



▾ नोव्हेंबर, १९९३. पाच देशांचा सहभाग असलेली 'हिरो कप' स्पर्धा जिंकल्यानंतर ईडन गार्डन्सवर विजयी फेरी मारताना.






▲ 'अरे तुझा शर्ट खराब होईल, मी घामाने निथळलोय!' पण मार्क मस्कारेन्हासला कुठे पर्वा होती. १९९८मध्ये शारजात ऑस्ट्रेलियाविरुद्ध शतक काढल्यानंतर त्याने धावत येऊन मला मिठी मारली.

▲ कर्णधारपद स्वीकारल्यानंतर दिल्लीमधील पहिल्याच कसोटीत ऑस्ट्रेलियाला हरवून बॉर्डर-गावसकर करंडकासह.

▼ १९९७, लॉर्ड्सवरील सुप्रसिद्ध 'लाँग रूम.' आयसीसी आयोजित एका बैठकीमध्ये सहभागी होण्यासाठी सर्व देशांचे कर्णधार उपस्थित होते. (डावीकडून) हॅन्सी क्रोनिए, मी, वासिम अक्रम, मार्क टेलर, ॲलिस्टर कॅम्पबेल, मायकेल ॲथर्टन, कर्टनी वॉल्श, अर्जुन रणतुंगा आणि स्टीफन फ्लेमिंग.





▲ 'स्वर्गातून तुम्ही पाहत असाल अशी मी आशा करतो.'–१९९९ सालच्या विश्वचषक स्पर्धेत केनियाविरुद्ध काढलेल्या शतकाला माझ्या आयुष्यात कायमच विशेष स्थान राहील. आठवडाभरापूर्वीच निधन झालेल्या माझ्या वडिलांना मी ते अर्पण केलं.



▲ कर्णधारपदाची माझी दुसरी इनिंग्ज, नोव्हेंबर, १९९९. एकदिवसीय मालिकेत न्यूझीलंडवर मिळवलेला विजय साजरा करताना.

▼ एप्रिल, २०११, वानखेडे स्टेडियम. विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात फलंदाजीसाठी जात असताना – विश्वचषक विजेतेपदाला माझ्या कारकिर्दीत कायमच सर्वोच्च स्थान असेल.



► १९९२, जोहान्सबर्गच्या मैदानावर नेल्सन मंडेलांशी हस्तांदोलन करताना. १९९७च्या केप टाउनमधील सामन्यालाही ते उपस्थित होते. योगायोग म्हणजे त्या दोन्ही वेळी मी शतकं झळकवली.



▼ ऑस्ट्रेलिया मालिका, २००१. मुंबईतील पहिल्या कसोटीच्या आदल्या दिवशी शेन वॉर्नबरोबर गप्पा मारताना.



▼ २००१. ईडन गार्डन्सवरील कसोटी सामन्यात हरभजनने ऑस्ट्रेलियाविरुद्ध हॅट-ट्रिक नोंदवली, तो क्षण. भारतातर्फे कसोटी सामन्यात हॅट-ट्रिक घेणारा तो पहिला गोलंदाज ठरला.





▲ त्या सामन्यात मीही लेग-स्पिन गोलंदाजी करत पाच षटकांत तीन बळी टिपून आमच्या विजयाला हातभार लावला. ॲडम गिलख्रिस्टला पायचीत केलं, तो क्षण.



► 'कि पाजी आप तो बहुत 'भारी' हो!' युवीने नंतर प्रांजळ कबुली दिली.

▼ अविस्मरणीय भागीदारी; २००१, ऑस्ट्रेलिया मालिका. ईडन गार्डन्सवर चौथ्या दिवशी केलेल्या ३३५ धावांच्या भागीदारीचा विक्रम आजही अबाधित आहे. त्या सामन्यात व्हीव्हीएस लक्ष्मणनं २८१ तर राहुल द्रविडनं १८० धावा फटकावल्या. त्या भागीदारीनं मालिकेचं चित्रच पालटलं.






◂ २००२, हेडिंग्ले, तिसरी कसोटी – अँड्र्यू फ्लिंटॉफचा बाउन्सर चुकवताना

▾ हेडिंग्ले कसोटीत एक आक्रमक फटका मारताना – त्या सामन्यात चमकदार विजय मिळवून आम्ही मालिकेत १-१ अशी बरोबरी साधली.



▾ २००२च्या मालिकेत ओव्हलवर गोलंदाजी करताना, इंग्लंडविरुद्धची ती मालिका फारच रंगतदार झाली.





▲ २००५, कोपरावरच्या शस्त्रक्रियेनंतर. माझ्या कारकिर्दीतील मला झालेली सर्वांत क्लेशकारक दुखापत.

▼ २००३, बंगळुरू. समाजातील दुर्बल व उपेक्षित घटकांना आधार देणाऱ्या एका संस्थेतील मुलांचं बोलणं लक्षपूर्वक ऐकताना.





▲ न्यूझीलंड, २००२. संघातील सर्वांनी अनुभवली छोट्या बोटीतील बहारदार सफर. बोट अगदी कड्याच्या टोकापर्यंत जाऊन शेवटच्या क्षणी वळायची.

▼ ऑकलंडच्या स्काय टॉवरवरील स्काय वॉक. आमच्या चेहऱ्यावरील हास्याने फसू नका! माझ्या आयुष्यातील तो एक धडकी भरवणारा अनुभव होता.





▲ गॅरी कर्स्टन – सर्वोत्कृष्ट प्रशिक्षक.



▲ २००४, सिडनी. जुना व कडवा प्रतिस्पर्धी, स्टीव्ह वॉशी हात मिळवताना. स्टीव्हच्या विलक्षण कारकिर्दीतील अखेरचा सामना.

▼ २००३, डिसेंबर. मेलबोर्न क्रिकेट ग्राउंडवर अंजली, सारा, अर्जुन आणि आनंद व ॲनाबेल मेहता यांच्यासह. सारा आणि अर्जुनने क्रिकेटच्या मैदानावर पहिल्यांदाच पाऊल ठेवलं.





▲ क्रिकेटच्या मैदानावर जीव ओतून जिद्दीने खेळणारा क्रिकेटपटू – अनिल कुंबळेसह.



► २००४, मुलतान. त्रिशतकाबद्दल वीरेंद्र सेहवागचं अभिनंदन करताना. सेहवागच्या जबरदस्त फलंदाजीने प्रेक्षकांच्या डोळ्याचं पारणं फिटलं.

▼ भारतीय व पाकिस्तानी सैनिकांबरोबर – वाघा सीमेवर, २००४.







▲ सुनील गावसकरांच्या ३४ कसोटी शतकांच्या विक्रमाशी बरोबरी केल्यावर त्यांनी स्वत: येऊन माझं अभिनंदन केलं. त्या क्षणी मला झालेला आनंद अवर्णनीय होता. ते माझे फलंदाजीतील आदर्श आहेत.

▲ ऑक्टोबर, २००८, मोहाली. ब्रायन लाराचा कसोटी सामन्यांतील सर्वोच्च धावांचा विक्रम मोडल्याबद्दल रिकी पाँटिंग माझं अभिनंदन करताना.

▼ क्रिकेटच्या इतिहासातील सर्वोत्कृष्ट फलंदाज आणि माझा अतिशय जवळचा मित्र, ब्रायन लारासमवेत.





◄ १९९९ सालच्या विश्वचषक स्पर्धेच्या दरम्यान इंग्लंडच्या राणीसमवेत, सोबत झिंबाब्वेचा हिथ स्ट्रीक व पाकिस्तानचा मोईन खान.

► 'डायर स्ट्रेट्स'च्या मार्क नॉफलरबरोबर मुंबईत. तो माझा सर्वांत आवडता बँड आहे. मार्कने मला त्याची गिटार भेट दिली.





◄ महान क्रिकेटपटू व्हिव्ह रिचर्ड्स यांच्याबरोबर श्रीलंकेत बुद्धिबळ खेळताना. माझ्या दैवतासारखी मला फलंदाजी करता आली असती तर...



▲ राहुल द्रविड, सौरव गांगुली व व्हीव्हीएस लक्ष्मण यांच्यासमवेत – अनेक संस्मरणीय वर्षांच्या आठवणी आमच्यापाशी आहेत.

▼ २०१३, 'मुंबई इंडियन्स' संघासमवेत आयपीएल विजेतेपदाचा आनंद साजरा करताना – आयपीएलच्या आपल्या अखेरच्या सामन्यातील अखेरच्या चेंडूवर षटकार ठोकणारा खेळाडू कोण ते सांगा पाहू? तो मीच नव्हे का!



▲ अर्जुन व सारा : माझ्या आयुष्यातील दोन अनमोल हिरे.

▼ २४ एप्रिल, २०१३. माझ्या चाळिसाव्या वाढदिवसानिमित्त अंजली मला केक भरवताना.





▲ माझे स्वप्न साकार झाले – युसुफ पठाण आणि हरभजन सिंग ह्यांच्या खांद्यावर बसून विश्वचषक विजयाचा आनंद साजरा करताना.



▲ विश्वचषक विजय मिळवल्यानंतर दुसऱ्या दिवशी आदरणीय तत्कालीन राष्ट्रपती, प्रतिभा पाटील ह्यांच्यासमवेत.

▼ अखेर करंडक मिळवलाच – मुंबईत गेटवे ऑफ इंडियासमोर.







▲ विम्बल्डन, २०११. महान टेनिसपटू रॉजर फेडररबरोबर.

▲ भारतीय चित्रपटसृष्टीचे शहेनशहा, अमिताभ बच्चन यांच्या समवेत.

▼ लता मंगेशकर आणि आशा भोसले : भारतीय संगीतक्षेत्रातील दोन महान व माझ्या अत्यंत आवडत्या गायिका. त्यांच्या गाण्यांनी मला भरभरून आनंद दिला.









▲ दुसऱ्या दिवशी प्रसार माध्यमातील मित्रांनी मला खास भेट दिलेला केक कापताना.

◄ अखेर प्रतीक्षा संपली. मार्च, २०१२, ढाका – आंतरराष्ट्रीय क्रिकेट कारकिर्दीत १००वं शतक झळकवलं, तो क्षण.

▼ कुटुंबाचं पाठबळ – २०१२मध्ये 'ऑर्डर ऑफ ऑस्ट्रेलिया' हा किताब स्वीकारल्यानंतर, अंजली, माझे भाऊ, वहिनी, बहीण व तिच्या यजमानांसमवेत.





◂ माझ्या अखेरच्या २००व्या कसोटीसाठी खास तिरंगी झेंड्यांच्या रंगसंगतीने सुशोभित केलेल्या माझ्या बॅट्स. बॅट्स पाहून मी इतका खूश झालो की, बॅट्सचा फोटो काढून अंजलीला तो पाठवण्याचा मोह मी आवरू शकलो नाही.



▲ नोव्हेंबर, २०१३, वानखेडे स्टेडियम. माझ्या अखेरच्या इनिंग्जमध्ये ७४ धावा काढून बाद झाल्यावर प्रेक्षकांचं अभिवादन करताना. सर्वांचे आभार मानण्याची पुन्हा संधी मिळू शकेल, ह्याची मला खातरी नव्हती.

▾ अखेरचे काही क्षण – बक्षीस समारंभाच्या दरम्यान अंजली, सारा व अर्जुनसोबत.






▲ 'आई, सावर स्वत:ला!' – माझ्या निरोपाच्या भाषणाच्या वेळी अंजलीला आपल्या भावना आवरता आल्या नाहीत. सारा व अर्जुन तिला धीर देताना.



▲ अखेरचा सलाम – मी आणि माझा खेळ, दीर्घकाळ तुमच्या स्मरणात राहील अशी मी आशा करतो.

▼ निरोपाच्या भाषणासाठी खास तयार केलेली यादी. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील अखेरच्या दिवशी हे टिपण मी माझ्या खिशात जपून ठेवलं होतं.



1) Journey is over
2) Father, mother – uncle, aunt
3) Nitin, Savita, Ajit
4) Anjali, Sara, Arjun
5) Anand Mehta, Anabel
6) Friends
7) Achrekar sir
8) MCA, BCCI
9) Players
10) Trainers, Physios, Doctors
11) Mark, WSG, Vinod
12) Media, Photographers
13) People for the Support.

▼ २२ यार्डांच्या खेळपट्टीला अखेरचा दंडवत.





▲ ४ फेब्रुवारी, २०१४, नवी दिल्ली. आदरणीय राष्ट्रपती प्रणब मुखर्जी ह्यांच्या हस्ते 'भारतरत्न' हा सर्वोच्च पुरस्कार स्वीकारताना.

▼ 'भारतरत्न' पुरस्कार आचरेकरसरांना दाखवताना – सर, तुमच्या ह्या लाडक्या शिष्याने तुम्हाला अभिमान वाटेल अशी कामगिरी करण्याचा मनापासून प्रयत्न केला.



१५.
परदेशातील विजय

विश्वचषक स्पर्धा संपताच मी अनेक तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घेतला. माझ्या डाव्या हाताच्या करंगळीशेजारील बोटावर शस्त्रक्रिया करणं आवश्यक आहे असं सर्वांचं मत पडलं. हाडामध्ये कॅल्शियमचे क्षार (कॅल्सिफिकेशन) जमा झाले होते. शस्त्रक्रियेला पर्याय नव्हता. शस्त्रक्रिया अमेरिकेत करायची ठरली. एप्रिल, २००३मध्ये मी माझ्या कुटुंबीयांसह बाल्टिमोरला पोचलो. डॉक्टर अनंत जोशी माझ्यासोबत असल्याने मी निर्धास्त होतो. माझे मित्र विनी देसाई आणि परेश भक्त हेही माझ्या प्रेमाखातर माझ्याबरोबर आले. अशा प्रसंगी त्या दोघांचा मला नेहमीच मोठा आधार वाटत असे.

प्रत्यक्ष शस्त्रक्रियेची प्रक्रिया मात्र नेहमीपेक्षा थोडी वेगळी झाली. त्याला कारणही मीच होतो. रुग्णाला आवश्यक असणारा आज्ञाधारकपणा माझ्यापाशी नव्हता. डॉक्टर माझ्या हाताच्या तळव्याचा छेद घेऊन बोटावर शस्त्रक्रिया करतील अशी मला धास्ती वाटत होती. कारण तळवा कापला गेला असता, तर मला माझी बॅटवरची पकड खूपच बदलावी लागली असती. मला तसं होऊ द्यायचं नव्हतं. त्यासाठी माझ्या दोन्ही सर्जन्सना मी क्रिकेटमधले बारकावे नीट समजावून सांगितले. तळव्याऐवजी तळव्याच्या मागच्या बाजूला छेद देऊन शस्त्रक्रिया करण्याची त्यांना विनंती केली. त्या भीतीमुळे मी इतका पछाडून गेलो होतो की, ऐन शस्त्रक्रिया सुरू असताना मला अचानक शुद्ध आली. ''तुम्ही माझ्या हाताला कुठे छेद दिला आहे हे मला पाहायचं आहे,'' मी शस्त्रक्रिया करण्यात गुंतलेल्या डॉक्टरांना म्हणालो. दोन्ही डॉक्टरांनी क्षणभर माझ्याकडे चमकून पाहिलं. त्यांनी मला माझा तळवा दाखवला. तळव्याला त्यांनी स्पर्शही केला नव्हता. ''तू शांत रहा. आम्हाला आमचं काम करू दे,'' ते मला म्हणाले. माझ्या मनाचं समाधान झालं होतं. दुसऱ्या क्षणी माझी शुद्ध पुन्हा हरपली. ॲनेस्थेशिया देऊनही मला मधेच जाग आली, याचं त्या डॉक्टरांना खूप आश्चर्य वाटल्याचं डॉक्टर जोशींनी मला नंतर सांगितलं.

बोटावरच्या शस्त्रक्रियेमुळे मला त्यानंतर चार महिने क्रिकेटपासून दूर राहावं लागलं. सुदैवाने त्या काळात क्रिकेटचा मोसमही नेहमीसारखा गजबजलेला नव्हता. माझा फक्त बांगलादेशचा दौरा हुकला; पण शस्त्रक्रियेनंतरचा काळ मात्र फारच वेदनादायक होता. हाताला अनेकदा नकळत धक्का बसायचा. त्यामुळे बोटात जोरदार कळ येऊन असह्य झिणझिण्या यायच्या. शस्त्रक्रियेनंतर जून, २००३मध्ये आम्ही सुट्टीसाठी लंडनला गेलो होतो. एकदा रात्री बाहेर जेवण करून अंजली व मी टॅक्सीने हॉटेलवर परतत होतो. टॅक्सीच्या ड्रायव्हरला पैसे देत असताना माझा हात टॅक्सीच्या काचेवर चिकटला. बोटातून जीवघेणी कळ उठली. मी विव्हळत जमिनीवर पडलो. टॅक्सी ड्रायव्हर घाबरून गेला. तुझी काहीच चूक नसल्याचं सांगत अंजलीने त्याला धीर दिला. अखेर काही वेळाने वेदना कमी झाल्यावर मी उठून हॉटेलपर्यंत चालू शकलो.

भारताचा आस्ट्रेलिया दौरा, नोव्हेंबर २००३ ते फेब्रुवारी २००४

२००३ हे वर्ष भारतीय क्रिकेटसाठी यशस्वी ठरलं होतं. विश्वचषक स्पर्धेची अंतिम फेरी गाठणं ही निश्चितच अभिमानास्पद गोष्ट होती; पण अजून बऱ्याच आव्हानांना सामोरं जायचं होतं. वर्षअखेर होणाऱ्या कसोटी मालिकेत आमची गाठ विश्वविजेत्या आस्ट्रेलियाशी पडणार होती. त्यानंतर २००४च्या सुरुवातीला पाकिस्तान दौरा होता.

आस्ट्रेलियाला जाण्यापूर्वी आम्ही मायदेशात एक तिरंगी मालिका खेळलो. ऑक्टोबर-नोव्हेंबर, २००३मध्ये झालेल्या या मालिकेत आमच्याबरोबर आस्ट्रेलिया व न्यूझीलंड हे देश सहभागी झाले होते. त्या मालिकेत मी छान बॅटिंग करत होतो. साखळी फेरीत मी दोन शतकंही झळकवली होती. आम्ही अंतिम फेरीत पोचलो; पण ईडन गार्डन्सवर झालेल्या अंतिम

सामन्यात आस्ट्रेलियाने आमचा पराभव केला. त्या पराभवातून मी लवकरच बाहेर पडलो. हजारो आस्ट्रेलियन प्रेक्षकांसमोर चांगली कामगिरी करण्याचा मला आत्मविश्वास वाटत होता.

४ डिसेंबर, २००३ रोजी गब्बाच्या मैदानावर पहिल्या कसोटीला आरंभ झाला. दुर्दैवाने माझ्यासाठी मात्र मालिकेची सुरुवात फारच निराशाजनक झाली. मी केवळ तीन चेंडू खेळलो. गिलेस्पीच्या गोलंदाजीवर मला पायचीत ठरवलं गेलं. खरंतर चेंडू माझ्या पॅडच्या वरच्या फ्लॅपवर लागला होता. माझ्या मते तो बॉल स्टम्प्सच्या किमान सहा इंच वरून गेला असता. पंचांनी बोट वर उचललेलं पाहून क्षणभर माझा विश्वासच बसला नाही. त्यानंतर सौरव व व्हीव्हीएस लक्ष्मण यांनी आमची नौका सावरली. त्या सामन्यात प्रथमच सौरव आस्ट्रेलियामध्ये भारताचं नेतृत्व करत होता. सौरवने शानदार १४४ धावा काढल्या. ब्रिस्बेनमधील सौरवच्या इनिंग्जने कसोटी मालिका रंगतदार होणार, याची जणू ग्वाहीच दिली. त्या दिवसाचा खेळ संपला तेव्हा तो अत्यंत हर्षभरित झाला होता. त्याने आनंदित होणं स्वाभाविकच होतं.

पहिली कसोटी अनिर्णित झाली. १२ डिसेंबरला होणाऱ्या दुसऱ्या कसोटी सामन्यासाठी आम्ही अॅडलेडला पोचलो. अॅडलेडची खेळपट्टी फलंदाजीसाठी पोषक होती. ऑस्ट्रेलियाने त्या संधीचा पुरेपूर फायदा उठवला. पहिल्याच दिवशी आस्ट्रेलियाने ४०० धावा केल्या. मला आठवतं, सर्व आस्ट्रेलियन खेळाडू ड्रेसिंग रूमच्या बाल्कनीत उभं राहून फलंदाजांना प्रोत्साहन देत होते. दुसऱ्या दिवसाची सुरुवात आमच्यासाठी चांगली झाली. अनिल कुंबळेच्या सुरेख गोलंदाजीमुळे आस्ट्रेलियाचा पहिला डाव आम्ही ५५६ धावांत रोखू शकलो. मॅचमध्ये अजून भरपूर वेळ शिल्लक होता. खेळपट्टी फलंदाजीसाठी पूरक होती. आम्ही अजूनही आस्ट्रेलियाला चांगली लढत देऊ शकत होतो. त्यासाठी आम्हाला उत्तम बॅटिंग करणं आवश्यक होतं.

त्या मॅचमध्ये राहुल जबरदस्त फॉर्ममध्ये होता. त्याच्या द्विशतकामुळे आम्ही ऑस्ट्रेलियाच्या धावसंख्येच्या जवळ पोचू शकलो. लक्ष्मणनेही दिमाखदार फलंदाजी केली. त्या दोघांचा सहजसुंदर खेळ पाहून २००१मध्ये ईडन गार्डन्सवर त्यांनी केलेल्या भन्नाट भागीदारीची मला आठवण झाली. फक्त या वेळी त्यांच्या भूमिका बदलल्या होत्या. या मॅचमध्ये राहुलने द्विशतक तर लक्ष्मणने शतक काढलं. मी त्या डावात फक्त सहा चेंडू खेळलो. अँडी बिकेलच्या गोलंदाजीवर मी गिलख्रिस्टच्या हातात झेल देऊन बाद झालो. इतक्या सहज मी माझी विकेट गमावली याचा मलाच खूप त्रास झाला.

आस्ट्रेलियन संघाचा दुसरा डाव गुंडाळण्याचं सारं श्रेय अजित आगरकरलाच द्यावं लागेल. अजित, माझा मुंबई संघातला मित्र होता. त्याच्या अप्रतिम गोलंदाजीमुळे सामन्याचं रूपच अचानक पालटून गेलं. त्याने ४१ धावांत घेतलेल्या सहा विकेट्समुळे आस्ट्रेलियाचा दुसरा डाव केवळ १९६ धावांत गडगडला. आम्हाला विजयासाठी २३० धावा हव्या होत्या. त्या डावात आम्ही कसून क्षेत्ररक्षण करत काही अप्रतिम झेल घेतले. अजितच्या गोलंदाजीवर आकाश चोप्राने पॉइंटवर पकडलेला झेल अफलातून होता. मी लेग स्पिन गोलंदाजी करत दोन महत्त्वाचे बळी मिळवले. स्टीव्ह वॉ आणि डॅमियन मार्टिनने चांगली भागीदारी रचली होती. दोघंही माझ्या गोलंदाजीवर स्लिप्समध्ये झेल देत बाद झाले. त्या दोन विकेट्स मला खूप समाधान देऊन गेल्या. आता सामना जिंकणं फलंदाजांच्या हातात होतं.

राहुलच आमच्या विजयाचा शिल्पकार ठरला. मी दुसऱ्या डावात ३७ धावा काढल्या. लेग स्पिनर स्टुअर्ट मॅक्गिलच्या गोलंदाजीवर मी पायचीत झालो. मॅचच्या अत्यंत बिकट क्षणी मी राहुलबरोबर ७० धावांची भागीदारी करू शकल्याचं मला खरोखरच समाधान वाटलं. राहुलने विजयी धाव घेतली आणि ड्रेसिंग रूममध्ये आनंदाची लाट पसरली. राहुलने नाबाद ७२ धावा काढल्या. मालिकेत १-० आघाडी घेतल्यामुळे आम्ही फारच हर्षभरित झालो होतो. रात्री उशिरापर्यंत विजय साजरा करत आम्ही ड्रेसिंग रूममध्येच बसलो होतो. भारताने कसोटी इतिहासात प्रथमच आस्ट्रेलियात जाऊन आस्ट्रेलियाविरुद्ध १-० आघाडी घेतली होती. गोलंदाजी, फलंदाजी व क्षेत्ररक्षण या तीनही बाबतींत आम्ही आस्ट्रेलियाला तुल्यबळ ठरलो होतो. उरलेल्या दोन कसोटी सामन्यांतही अशीच उत्तम कामगिरी केली तर आम्हाला मालिका जिंकण्याचीही सुवर्णसंधी होती. राहुल व लक्ष्मण ऐन बहरात होते. सेहवाग आणि सौरवने दोन्ही कसोटीत महत्त्वपूर्ण योगदान दिलं होतं. आमचा दुसरा सलामीवीर आकाश चोप्राही नव्या चेंडूला निर्धाराने सामोरा जात होता.

पुढची कसोटी मेलबोर्नमध्ये बॉक्सिंग डेला सुरू होणार होती. सामन्याच्या आदल्या दिवशी मी अंजली, सारा व अर्जुनला घेऊन प्रत्यक्ष मैदानात जायचं ठरवलं. स्टेडियमच्या आत असताना नेमकं कसं वाटतं हे मला त्यांना दाखवायचं होतं. स्टेडियममध्ये उपस्थित असणाऱ्या ८० हजारांपेक्षा जास्त प्रेक्षकांसमोर खेळताना आम्ही कोणत्या मन:स्थितीतून जात असतो याची त्या तिघांना थोडी तरी कल्पना यावी, असं मला वाटत होतं. अर्जुन त्या दिवशी प्रथमच मैदानात आला होता.

२६ डिसेंबरला सुरू झालेल्या त्या कसोटीत आम्ही प्रथम फलंदाजी केली. वीरेंद्र सेहवागने आपल्या आक्रमक फलंदाजीने मेलबोर्नच्या प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केलं. आस्ट्रेलियन गोलंदाजांवर त्याने तुफानी हल्ला चढवला. त्याने मारलेले काही शॉट्स पाहताना वाटत होतं की, अशा प्रकारचे शॉट्स फक्त तोच मारू शकतो. सेहवागसारखा सलामीचा फलंदाज मिळणं ही भारतीय क्रिकेटसाठी भाग्याची गोष्ट होती. २००९मध्ये जागतिक कसोटी संघात भारताला प्रथम मानांकन मिळालं. त्या यशात सेहवागचा सिंहाचा वाटा होता. एमसीजीला त्याचं द्विशतक व्हायला हवं होतं; पण १९५ धावा झाल्या असताना त्याने मॅक्गिलच्या फुलटॉसवर लाँग ऑनला झेल दिला.

सेहवाग व आकश चोप्राने भारताला भक्कम सुरुवात करून दिली; पण इतर फलंदाज त्याचा फायदा उठवू शकलो नाहीत. आमचा डाव ३६६ धावांत आटोपला. सामन्यावर कब्जा मिळवायची आम्हीच आस्ट्रेलियन संघाला संधी मिळवून दिली. मी फक्त एक चेंडू खेळलो. तो चेंडू माझ्या बॅटला हलकासा स्पर्श करून ग्रिलख्रिस्टच्या उजव्या बाजूला गेला. ब्रेट ली गोलंदाजी करत असताना गिलख्रिस्ट यष्टींपासून खूपच मागे उभा राहायचा. मी वळून पाहिलं. गिलख्रिस्ट चेंडूवर झेपावत होता. पॅव्हिलियनमध्ये परतावं लागणार हे मला कळून चुकलं होतं. फारच वाईट पद्धतीने बाद झाल्यामुळे मला अतिशय शरमल्यासारखं वाटत होतं. अंजली त्या दिवशी स्टेडियमवर आली होती हे मला नंतर समजलं. त्यामुळे मला अधिकच वाईट वाटलं. त्या दौऱ्यावर इतर काही खेळाडूंच्याही पत्नी आल्या होत्या. त्यांनीच अंजलीला एमसीजीवर यायचा आग्रह केला होता. मी बाद झाल्याक्षणी ती स्टेडियमच्या बाहेर पडली आणि हॉटेलपर्यंत चालत गेली. मला अत्यंत प्रिय असलेला माझा खेळ, क्वचितप्रसंगी माझ्याशी अतिशय निष्ठुर व बेभरवशाने वागताना पाहून मी थक्क होत असे.

आस्ट्रेलियाने उत्तरादाखल पहिल्या डावात प्रभावी फलंदाजी केली. पाँटिंगने २५७ तर हेडनने १३६ धावा काढत आमच्यावर वर्चस्व मिळवलं. जवळजवळ २०० धावांची पिछाडी भरून काढून ती कसोटी वाचवण्यासाठी आम्हाला चिकाटीने फलंदाजी करणं आवश्यक होतं; पण आम्ही तसं करू शकलो नाही. मालिकेत १-१ बरोबरी झाली. आता फक्त एक कसोटी सामना उरला होता.

एमसीजीवरच्या कसोटीत मी दुसऱ्या डावातही पुन्हा एकदा अपयशी ठरलो. थोडासा बदल करावा म्हणून मी त्या डावात, सौरवला माझ्या आधी बॅटिंगला जाशील का, असं विचारलं. सौरव त्या मालिकेत चांगली फलंदाजी करत होता. त्या वेळी दिवसाचं शेवटचं सत्र सुरू होतं. सौरव तयार झाला. त्यामुळे मी दुसऱ्या दिवशी सकाळी पाचव्या क्रमांकावर फलंदाजी करू शकलो. आमचा तो डाव खूपसा यशस्वी ठरत होता; पण मी अचानक द्रुतगती गोलंदाज ब्रॅड विलियम्सच्या एका चेंडूवर गिलख्रिस्टच्या हातात झेल देऊन बाद झालो. मी ४४ धावा केल्या. तो चुकीचा शॉट खेळेपर्यंत माझं माझ्या फलंदाजीवर पूर्ण नियंत्रण होतं. त्या मालिकेत मी प्रत्येक वेळी अशाच पद्धतीने स्वत:ची विकेट गमावत होतो. आक्रमक पवित्रा घ्यायचा विचार माझ्या मनात आला की, दुसऱ्या क्षणी मी बाद व्हायचो.

अखेर सिडनीत सूर गवसला

जानेवारी, २००४च्या सुरुवातीला चौथी व अखेरची कसोटी सिडनीमध्ये खेळली जाणार होती. मॅचच्या आदल्या दिवशी जॉन राइट माझ्या रूममध्ये आले. त्यांनी मला सकारात्मक दृष्टिकोन ठेवण्यास सांगून माझा आत्मविश्वास वाढवण्याचा प्रयत्न केला. जॉनच्या सल्ल्याचा मला खूपच फायदा झाला. अजितबरोबरही मी बराच वेळ सविस्तर चर्चा केली. दोन्ही डावांत नाबाद राहून दाखव, असं आव्हान त्याने माझ्यासमोर ठेवलं. त्याच्या मते मला बाद करण्यासाठी गोलंदाजांना विशेष प्रयत्न करावे लागत नव्हते. मीच माझी विकेट त्यांना बहाल करत होतो. मी जर स्वत:वर पूर्ण नियंत्रण ठेवू शकलो, तर कुणीही

गोलंदाज मला बाद करू शकणार नाही याची त्याला खातरी होती. मी अजितचं आव्हान स्वीकारलं. मी चिकाटीने फलंदाजी करायची ठरवलं. इनिंग्जच्या मध्यभागी माझी बॅटिंग संथ व रटाळ वाटू लागली; तरीही मी स्वत:च्या निर्णयाशी ठाम राहिलो. आक्रमक शॉट मारण्याच्या नादात मी त्या मालिकेत दोनदा बाद झालो होतो. मी एससीजीवर तसा विचारही मनात आणून देणार नव्हतो. शॉट्स मारण्याचा मोह मी आवरला. १० तास मी खेळपट्टीवर होतो. त्या इनिंग्जमध्ये मी एकही कव्हर ड्राइव्ह मारला नाही. माझ्या बचावात्मक शैलीची आस्ट्रेलियन गोलंदाज थट्टा उडवत होते; पण मी जराही लक्ष विचलित होऊ दिलं नाही. माझ्या संयमाची ती खरोखरीच कसोटी होती. ड्राइव्ह करता येऊ शकणारे चेंडूही मी सोडून देत होतो. माझ्या नैसर्गिक वृत्तीच्या ते सारंच विरुद्ध होतं. त्यामुळे मी बाहेरून जरी थकल्यासारखा दिसत असलो, तरी आतून पूर्ण समाधानी होतो. आमच्या पहिल्या डावाच्या अखेरीस मी २४१ धावांवर नाबाद होतो. संघाने ७०० धावांचा टप्पा ओलांडला होता.

सिडनीच्या त्या कसोटीशी एक गमतीदार आठवणही निगडित आहे. त्या कसोटीच्या दरम्यान मी थोडा अधिकच अंधश्रद्ध झालो होतो. मॅचच्या आदल्या दिवशी अंजली, तिचे आई-वडील, सारा व अर्जुन माझ्यासोबत होते. त्या रात्री एका मलेशियन रेस्टॉरंटमध्ये आम्ही जेवायला गेलो. तिथले पदार्थ अतिशय चविष्ट होते. आम्ही नूडल्स, चिकन आणि अनेक इतर डिशेस मागवल्या. कसोटीच्या पहिल्या दिवशी मी छान बॅटिंग केली. दिवसअखेर मी ७३ धावांवर नाबाद होतो. त्या संध्याकाळीही मी आदल्या दिवसाप्रमाणे पुन्हा त्याच मलेशियन रेस्टॉरंटला भेट दिली. या वेळेस माझ्याबरोबर अजित आगरकर आणि इतर काही जण होते. आदल्या दिवशी बसलेल्या टेबलावरच मी बसलो. पदार्थही तेच मागवले. त्यापुढचा दिवस तर मला आणखीनच चांगला गेला. त्या दिवशी खेळ संपला तेव्हा मी २२० धावांवर नाबाद होतो. त्या रात्रीही मी त्याच रेस्टॉरंटमध्ये गेलो. त्याच टेबलावर बसलो व पुन्हा त्याच पदार्थांची ऑर्डर दिली. मॅचच्या तिसऱ्या दिवशी आमच्या संघाची अगदी बळकट स्थिती होती. त्या दिवशी अखेरची मी त्या रेस्टॉरंटला भेट दिली. आमच्या रोज येण्यामुळे रेस्टॉरंटचा मॅनेजर नक्कीच चक्रावून गेला असणार; पण आपल्या रेस्टॉरंटच्या अन्नाची चव आवडल्यामुळे ही मंडळी पुन्हा पुन्हा येत आहेत, याचा त्याला निश्चितच आनंदही झाला असणार. आमच्या चार दिवसांच्या नियमित भेटीमागचं खरं रहस्य मात्र बिचाऱ्याला कधीच कळू शकणार नव्हतं.

द्विशतक काढल्यानंतर त्या संध्याकाळी प्रसारमाध्यमांशी संवाद साधण्यासाठी मला पाठवण्यात आलं. एक स्थानिक पत्रकार मला म्हणाला, ''अलीकडे प्रेसवाल्यांनी तुझ्यावर खूपच खरमरीत टीका केली आहे; पण आज तू नाबाद द्विशतक झळकवलं आहेस. आता उद्याचं वर्तमानपत्र वाचण्याचा तुला नक्कीच मोह होत असणार.'' मी म्हटलं, ''मालिका सुरू झाल्यापासून आत्तापर्यंत एकदाही मी वर्तमानपत्र वाचलेलं नाही. आजूबाजूला चालू असणाऱ्या गजबजाटापासून स्वत:ला अलिप्त ठेवण्याची ती माझी खास पद्धत आहे. मी चांगली कामगिरी न केल्याबद्दल कुणी माझ्यावर टीका केली, तर त्याचं मला काहीच वाटत नाही. माध्यमांचं अखेरीस तेच काम असतं; पण केवळ आज मी थोड्या अधिक धावा काढल्या म्हणून मी उद्या लगेच वर्तमानपत्र वाचणार नाही. मला माध्यमांकडून माझ्या कामाची पावती नको आहे.'' टीका आणि स्तुती या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. १५ वर्षं आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळल्यानंतर या दोन्ही गोष्टींना मी शांतपणे सामोरा जायला शिकलो होतो.

पहिल्या डावातील आमच्या फलंदाजीच्या कामगिरीला गोलंदाजांनीही चांगली साथ दिली. आम्ही आस्ट्रेलियाचे सर्व गडी ४७४ धावांत बाद केले. आम्हाला २३१ धावांची आघाडी मिळाली. अनिलने अप्रतिम गोलंदाजी करून १४१ धावांत ८ विकेट्स घेतल्या. आम्हाला झटपट धावा काढून आमच्या गोलंदाजांना मॅच जिंकण्याची संधी द्यायची होती. पुन्हा आम्ही चांगली बॅटिंग केली. राहुल आणि माझी जोडी चांगली जमली होती. सौरवने डाव कधी घोषित करायचा याबद्दल एक-दोनदा निरोप पाठवून विचारणा केली होती. राहुल संघाचा उपकप्तान होता. मी राहुलला म्हटलं की, सौरवइतकाच तुलाही निर्णय घ्यायचा अधिकार आहे. मी केव्हाही पॅव्हिलियनमध्ये परतायला तयार होतो. राहुलला अजून काही वेळ फलंदाजी करायची इच्छा होती. राहुल ९१ वर असताना ब्रेट लीचा एक बाउन्सर त्याच्या हेल्मेटवर आदळला. त्यानंतर लगेच आम्ही डाव घोषित केला. मी ६० धावा काढून नाबाद राहिलो. मला वाटतं की, आम्ही डाव घोषित करायला जरा जास्तच वेळ लावला. चेंडू

चांगलाच वळत व उसळत होता. चौथ्या दिवसअखेर आम्ही अनिल व इतर गोलंदाजांना थोडी अधिक षटकं टाकण्याची संधी द्यायला हवी होती.

आस्ट्रेलियासमोर विजयासाठी ४४३ धावांचं अशक्यप्राय लक्ष्य होत. दुसऱ्या डावात ते पूर्ण दबावाखाली खेळले. पाचव्या दिवशी अनिलने दीर्घकाळ गोलंदाजी केली. त्या दिवशी त्याने तब्बल ४२ षटकं टाकून आणखी चार गडी बाद केले. स्टीव्ह वॉची ती अखेरची कसोटी होती. त्याने टिच्चून फलंदाजी करत सामना व इभ्रत वाचवली. तो अखेर ८० धावा काढून बाद झाला. अनिलच्या गोलंदाजीवर मी डीप स्क्वेअर लेगला त्याचा झेल घेतला. स्टीव्हच्या शतकाची सर्व प्रेक्षक आतुरतेने वाट पाहत होते; पण तसं घडू शकलं नाही. झेल घेतल्यावर मी लगेच स्टीव्हपाशी गेलो. त्याच्या अद्वितीय कारकिर्दीबद्दल त्याचं अभिनंदन केलं. भविष्यात त्याने योजलेल्या कार्याबद्दलही त्याला शुभेच्छा दिल्या. प्रेक्षकांनी उभं राहून त्याला निरोप दिला.

आस्ट्रेलियाने सामना अनिर्णित राखला. अखेर मालिकेत १-१ बरोबरी झाली. वैयक्तिकदृष्ट्या तो सामना माझ्यासाठी फारच यशस्वी ठरला. मी दोन्ही इनिंग्जमध्ये नाबाद राहिलो. अजितला दिलेलं वचन पूर्ण केल्याचं समाधान मला लाभलं. माझ्या नैसर्गिक वृत्तीच्या विरुद्ध जाणं मला फारच अवघड गेलं. ती मालिका मात्र आम्ही जिंकायला हवी होती. मालिकेत आम्हीच आस्ट्रेलियापेक्षा सरस ठरलो होतो. काही काही वेळा तर आम्ही खेळ कमालीचा उंचावला होता. चौथ्या दिवशी जर आम्ही थोडा लवकर डाव घोषित केला असता व उडालेले सर्व झेल टिपले असते, तर आम्ही एक नवा इतिहास रचू शकलो असतो. मालिकेतला विजय जरी हुकला असला, तरी केलेल्या कामगिरीमुळे आम्ही नक्कीच आनंदित झालो होतो. त्यानंतर लवकरच होणाऱ्या पाकिस्तान दौऱ्याकडे आता आमच्या नजरा लागल्या होत्या.

भारताचा पाकिस्तान दौरा, मार्च-एप्रिल, २००४

पाकिस्तान दौऱ्यासाठी सर्व जण उत्सुक व अधीर झाले होते. पाकिस्तानविरुद्ध खेळणं ही कुणाही भारतीय क्रिकेटपटूच्या आयुष्यातली फार महत्त्वाची घटना असते. १९८९ मधील माझ्या पदार्पणाच्या मालिकेनंतर आम्ही प्रथमच पाकिस्तानचा दौरा करणार होतो. दौराही जणू अतिशय योग्य वेळी आयोजित केला होता. आम्ही आस्ट्रेलियाविरुद्ध उत्कृष्ट कामगिरी बजावली होती. आमच्या बऱ्याचशा खेळाडूंना उत्तम लय सापडली होती.

पाकिस्तानमध्ये पाऊल ठेवताच हा दौरा किती वेगळा असणार आहे, याची जाणीव झाली. पहिल्या दौऱ्याच्या वेळी मी १६ वर्षांचा होतो. पण आता २००४मध्ये, भारत-पाकिस्तान मालिकेमागचं खरं महत्त्व मला पूर्णपणे उमगलं होतं. विमानतळावर कडेकोट बंदोबस्त होता. आम्हाला इमिग्रेशनमधून झटकन बाहेर काढून बसमध्ये बसवण्यात आलं. हॉटेलमध्ये जात असताना आमच्या बसच्या पुढे एक सुरक्षा व्हॅन होती. बसच्या दोन्ही बाजूंनी सुरक्षारक्षक बाइक्स चालवत होते. त्याशिवाय बसवरून एक हेलिकॉप्टरही घिरट्या घालत होतं. हॉटेलमध्ये पोचल्यावर आमचं छान स्वागत झालं. सुरक्षेसंबंधी आम्ही पाळायचे नियम व सूचना आम्हाला समजावून देण्यात आल्या. आमच्या मजल्यावरची सुरुवातीची खोली ही सुरक्षा अधिकाऱ्यांसाठी राखून ठेवण्यात आल्याचं आम्हाला सांगण्यात आलं. आम्हाला भेटायला येणाऱ्या व्यक्तींची कसून तपासणी घेतली जाणार होती. आम्ही ज्या मजल्यावर राहत होतो त्याच्या वरच्या व खालच्या मजल्यांना सील ठोकण्यात आलं होतं. इतकी कडक सुरक्षाव्यवस्था मी त्याआधी कधीच अनुभवली नव्हती. आम्ही पाकिस्तानमध्ये केवळ क्रिकेट खेळण्यासाठी आलेले खेळाडू होतो. त्यामुळे तो सगळाच अनुभव विचित्र वाटत होता.

हॉटेल सोडून कुठे बाहेर जाणं शक्य नव्हतं. त्यामुळे आम्ही सर्व जण एकमेकांच्या रूम्समध्ये जाऊन पत्ते खेळणं, सिनेमा पाहणं व एकत्र जेवण करणं ह्यातच मजेत वेळ घालवत होतो. दौऱ्यामध्ये खेळाडूंनी जास्तीत जास्त वेळ एकत्र राहणं अतिशय महत्त्वाचं असतं. १३ मार्च, २००४ रोजी कराचीमध्ये पहिला एकदिवसीय सामना खेळला जाणार होता. त्यासाठी टीममध्ये फारच सुंदर वातावरण तयार झालं होतं.

मालिकेची सुरुवात अतिशय झकास झाली. शेवटच्या चेंडूपर्यंत उत्कंठा ताणली गेली होती. पहिली फलंदाजी करून

आम्ही ३४९ धावा केल्या. पाकिस्तानने त्यास तोडीस तोड उत्तर दिलं; पण अखेरीस ते ५० षटकांत ३४४ धावा करू शकले. दुर्दैवाने त्यानंतरचे दोन्ही सामने आम्ही हरलो; पण शेवटचे दोन्ही सामने जिंकून आम्ही मालिकेत ३-२ असा विजय मिळवला. शेवटचा सामना तर फारच रोमहर्षक झाला. त्या मॅचमध्ये आम्ही पाकिस्तानचा ४० धावांनी पराभव केला. त्या मॅचच्या काही चांगल्या आठवणी अजूनही माझ्या स्मरणात आहेत. मी त्या मॅचमध्ये पाकिस्तानचा कर्णधार इंझमाम-उल-हकचा अतिशय योजनाबद्ध झेल घेतला होता. त्या मालिकेत इंझमाम फिरकी गोलंदाजी खेळताना गोलंदाजांच्या डोक्यावरून सरळ शॉट्स मारत होता. पाचव्या सामन्याच्या आधी मुरली कार्तिक आणि मी मिळून एक योजना आखली. मी लाँग ऑनला नेहमीपेक्षा थोडं अधिक सरळ उभं राहायचं ठरवलं. इंझमाम स्ट्राइकवर आल्यानंतर मी साइड स्क्रीनच्या दिशेने चटकन जाण्यासाठी तयार राहिलो. इंझमामने कार्तिकचा चेंडू त्याच्या डोक्यावरून मारला. मी त्या संधीची वाटच पाहत होतो. सीमारेषेच्या अगदी जवळ काही इंचांवर मी तो झेल घेतला आणि आनंदाने माझ्या सहकाऱ्यांच्या दिशेने धावत सुटलो. पाकिस्तानची सर्वांत मौल्यवान विकेट आम्ही मिळवली होती. अखेर त्या रोमहर्षक सामन्याचा निकाल आमच्या बाजूने लागला. आम्ही आता आत्मविश्वासाने मुलतानच्या पहिल्या कसोटीला सामोरे जाणार होतो.

आस्ट्रेलिया विरुद्ध भारत

(चौथा कसोटी सामना)
सिडनी क्रिकेट मैदान, सिडनी. २ ते ६ जानेवारी, २००४

पंच : बीएफ बाउडन व एसए बकनर (टीव्ही : पीडी पार्कर)
रेफ्री : एमजे प्रॉक्टर
नाणेफेक : भारत

भारत

एएस चोप्रा	गो ली	४५	झे. मार्टिन गो. गिलेस्पी	२
व्ही सेहवाग	झे गिलख्रिस्ट गो गिलेस्पी	७२	झे. गिलेस्पी गो. मॅक्गिल	४७
आरएस द्रविड	पायचीत गो गिलेस्पी	३८	नाबाद	९१
एसआर तेंडुलकर	नाबाद	२४१	नाबाद	६०
व्हीव्हीएस लक्ष्मण	गो गिलेस्पी	१७८		
एससी गांगुली*	गो ली	१६		
पीए पटेल	झे गिलख्रिस्ट गो ली	६२		
एबी आगरकर	गो ली	२		
आयके पठाण	नाबाद	१३		
ए कुंबळे				
एम कार्तिक				
अवांतर	(बी ४,एलबी ५, डब्ल्यू ४,एनबी २५)	३८	(एलबी ३,डब्ल्यू १,एनबी ७)	११
एकूण	(७ बाद घोषित)	**७०५**	(२ बाद घोषित)(४३.२ षटकं)	**२११**

ऑस्ट्रेलिया

जेएल लँगर	झे पटेल गो कुंबळे	११७	झे सेहवाग गो.कार्तिक	४७
एमएल हेडन	झे गांगुली गो कुंबळे	६७	झे द्रविड गो कुंबळे	३०
आरटी पाँटिंग	पायचीत गो कुंबळे	२५	झे व गो पठाण	४७
डीआर मार्टिन	झे व गो कुंबळे	७	झे बदली (यु सिंग) गो कुंबळे	४०
एसआर वॉ	झे पटेल गो पठाण	४०	झे तेंडुलकर गो कुंबळे	८०
एसएम कॅटिच	झे सेहवाग गो कुंबळे	१२५	नाबाद	७७

एसी गिलख्रिस्ट	गो पठाण	६	यष्टिचीत पटेल गो कुंबळे	४
बी ली	झे चोप्रा गो कुंबळे	०		
जेएन गिलेस्पी	यष्टिचीत पटेल गो कुंबळे	४७	(८) नाबाद	४
एनडब्ल्यू ब्रॅकन	झे आगरकर गो कुंबळे	२		
एससीजी मॅक्गिल	नाबाद	०		
अवांतर	(बी६,एलबी ९, डब्ल्यू३,एनबी२०)	३८	(बी६,एलबी७,डब्ल्यू२,एनबी१३)	२८
एकूण	(११७.५ षटकं)	**४७४**	(६ बाद) (९४ षटकं)	**३५७**

ऑस्ट्रेलिया	षटकं	निर्धाव	धावा	बळी	षटकं	निर्धाव	धावा	बळी
ली	३९.३	५	२०१	४	१२.२	२	७५	०
गिलेस्पी	४७	११	१३५	३	७	२	३२	१
ब्रॅकन	३७	१३	९७	० (४)	८	०	३६	०
मॅक्गिल	३८	५	१४६	० (३)	१६	१	६५	१
वॉ	२	०	६	०				
कॅटिच	१७	१	८४	०				
मार्टिन	९	१	२७	०				

भारत	षटकं	निर्धाव	धावा	बळी	षटकं	निर्धाव	धावा	बळी
आगरकर	२५	३	११६	०	१०	२	४५	०
पठाण	२६	३	८०	२ (३)	८	१	२६	१
कंबळे	४६.५	७	१४१	८ (२)	४२	८	१३८	४

मुलतान कसोटी वीरेंद्र सेहवागने गाजवली. त्याची इनिंग्ज म्हणजे एक जबरदस्त झंझावात होता. आम्ही नाणेफेक जिंकून फलंदाजीला उतरलो. सेहवागने पहिल्या चेंडूपासूनच गोलंदाजांवर ताबा मिळवला. त्याने काही अविस्मरणीय शॉट्स मारले. मालिकेतल्या पहिल्या कसोटीत पहिल्याच दिवशी त्याने प्रतिस्पर्धी संघाला पुरतं खच्ची करून टाकलं. चौफेर फटकेबाजी करत तो पाकिस्तानी गोलंदाजांच्या चिंधड्या उडवत होता. मी त्याच्या साथीला मैदानात उतरलो तेव्हा त्याचं शतकही पूर्ण झालं होतं.

मला आठवतं, चहापानानंतर सेहवागचं लक्ष किंचित विचलित झालं होतं. मनासारखी बॅटिंग करता येत नसल्यामुळे त्याची थोडी चिडचिड झाली होती. प्रत्येक चेंडू तो उगीचच फटकवण्याचा प्रयत्न करत होता. त्याला शांत करण्यासाठी मी त्याच्यापाशी गेलो. त्याला म्हटलं, ''थोडा वेळ तू खेळपट्टीवर फक्त टिकून रहा. ही अवघड वेळ निघून जाऊ दे. मनावर जरा ताबा ठेव. आज तुला खूप मोठं यश मिळण्याची शक्यता मला दिसते आहे. अशी संधी फार क्वचित वेळा येत असते. ती निसटू देऊ नकोस.'' माझं म्हणणं त्याला पटलं असावं. त्यानंतर काही वेळ त्याने किंचित रटाळपणे; पण नेटाने खेळत

द्विशतक झळकवलं. तो महत्त्वाचा टप्पा ओलांडल्यावर त्याच्या बॅटमधून आकर्षक फटक्यांची पुन्हा बरसात होऊ लागली. आनंदाची गोष्ट म्हणजे दुसऱ्या दिवशी सकाळी त्याचं त्रिशतक पूर्ण झालं. त्या डावात त्याने खरोखरच अविश्वसनीय फलंदाजी केली. ती खेळी त्याने पाकिस्तानविरुद्ध केल्यामुळे तिला अधिकच महत्त्व प्राप्त झालं होतं.

एका बाजूला सेहवाग आपल्या कारकिर्दीतील अभूतपूर्व कामगिरी करत असताना, दुसऱ्या बाजूने मीही माझं शतक पूर्ण केलं होतं. सामन्यावर आता आम्ही पूर्ण नियंत्रण मिळवलं होतं. 'डाव घोषित करण्यासंबंधी तुम्ही काय विचार केला आहात?' असं चहापानाच्या वेळी मी, राहुल आणि जॉन राइट यांना विचारलं. पाठदुखीमुळे सौरव त्या सामन्यात खेळत नव्हता. त्यामुळे राहुल बदली कर्णधाराच्या भूमिकेत होता. पाकिस्तानला साधारण तासभर खेळायला द्यावं असा आमचा विचार असल्याचं त्यांनी मला सांगितलं. याचा अर्थ दुसऱ्या दिवसाच्या खेळाची १५ षटकं बाकी असताना डाव घोषित होणार होता.

माझ्या मते तो विचार योग्य होता. मी त्या दृष्टीने इनिंग्जची बांधणी सुरू केली. मी धावा काढण्याचा वेग वाढवला. दिलेल्या वेळात मला माझं द्विशतक पूर्ण करायचं होतं. त्याचबरोबर ठरल्याप्रमाणे पाकिस्तानला १५ षटकं फलंदाजी करण्याचा अवधीही मिळवून द्यायचा होता; पण चहापानानंतर जेमतेम अर्ध्या तासाचा खेळ झाला असताना रमेश पोवार मैदानावर आला. रमेश त्या सामन्यात राखीव खेळाडू होता. त्याने मला धावांचा वेग वाढवायला सांगितला. त्यावर मी त्याला हसत हसत म्हटलंही, ''अरे, भराभर धावा काढायच्या आहेत हे मलाही ठाऊक आहे, पण क्षेत्ररक्षक असे मैदानभर पसरलेले असताना आम्ही फार वेगाने धावा काढू शकत नाही.''

त्यानंतर थोड्याच वेळात रमेश परत मैदानावर आला. मी त्या वेळी १९४ धावांवर खेळत होतो. त्याने मला सांगितलं की, तू ह्याच षटकात द्विशतक पूर्ण करण्याचा प्रयत्न कर. षटक संपल्यानंतर राहुल डाव घोषित करणार आहे. रमेशचं बोलणं ऐकून मला धक्काच बसला. कारण माझ्या मते मला हव्या असलेल्या सहा धावा काढण्यासाठी अजून बारा चेंडू शिल्लक होते. त्यानंतरही पाकिस्तान संघ १५ षटकं फलंदाजी करू शकत होता. अखेर मला त्या षटकात एकही चेंडू खेळायला मिळाला नाही. ते षटक इम्रान फरहतने टाकलं. फरहत पाकिस्तानचा सलामीचा फलंदाज होता. क्वचित प्रसंगी तो लेग स्पिन गोलंदाजी करत असे. इम्रानसमोर युवराज स्ट्राइकवर होता. त्याच्या पहिल्या दोन चेंडूवर युवराजला एकही धाव घेता आली नाही. तिसऱ्या चेंडूवर त्याने दोन धावा काढल्या. चौथ्या चेंडूवर पुन्हा धाव निघाली नाही. पाचव्या चेंडूवर युवराज बाद झाला. त्यानंतर पुढचा फलंदाज पार्थिव पटेल मैदानात येत असताना माझं लक्ष पॅव्हिलियनकडे गेलं. राहुल खूण करून आम्हाला ड्रेसिंग रूममध्ये परत बोलवत होता. मी अवाक होऊन पाहतच राहिलो. अजून १६ षटकांचा खेळ बाकी होता. चहापानाला ठरल्यापेक्षा एक षटक जास्त शिल्लक होतं. मी द्विशतकाच्या उंबरठ्यावर होतो. मला अशा टांगत्या अवस्थेत ठेवून राहुलने डाव घोषित केला होता. मला त्या निर्णयामागचा अर्थच समजेना. सामन्याच्या दुसऱ्या दिवशी इतक्या घाईने निर्णय घ्यायची आवश्यकता का होती, हे मला कळत नव्हतं. महिन्याभरापूर्वी सिडनीमध्ये उद्भवलेली परिस्थिती वेगळी होती. तो सामन्याचा चौथा दिवस होता.

अत्यंत हताश मनाने मी ड्रेसिंग रूममध्ये शिरलो. त्या निर्णयाने सगळ्या टीमलाच धक्का बसल्याचं मला जाणवलं. मी ड्रेसिंग रूममध्ये आल्या आल्या बॅट-पॅड्स फेकून जोरजोरात आरडाओरडा करेन, असं काहींना अपेक्षित होतं; पण असा आक्रस्ताळेपणा करणं माझ्या रक्तातच नव्हतं. घडलेल्या गोष्टीबद्दल एक शब्दही न बोलायचं मी ठरवलं. मी शांतपणे माझे पॅड्स काढले. मी जॉन राइटना एवढच म्हणालो, ''बराच वेळ बॅटिंग केल्यामुळे अंग थोडं आखडून गेलं आहे. मी थोड्या वेळाने फिल्डिंगला जाईन.'' त्या वेळी खरंतर मी आतून संतापाने धुमसत होतो.

मी बाथरूममध्ये चेहऱ्यावर पाणी मारत असताना जॉन राइट तिथे आले. त्यांनी माझी माफी मागितली. जे घडलं त्याबद्दल आपल्याला वाईट वाटलंय, असं ते म्हणाले. पण त्या निर्णयात आपला सहभाग नव्हता, असं त्यांनी मला सांगितलं. मी त्यांच्या बोलण्याने चकित झालो. मी त्यांना म्हटलं, ''निर्णय घेण्याची जबाबदारी तुमच्यावरही होती. घेतलेल्या निर्णयावर जर तुमचा विश्वास असेल, तर तुम्हाला त्याबद्दल वाईट वाटण्याचं काहीच कारण नाही. शिवाय आता तो निर्णय फिरवताही

येणार नाही. त्यामुळे जे घडलं त्यावर आता जास्त विचार करण्यात अर्थ नाही.'' न राहवून मी फक्त आणखी एवढंच म्हणालो, ''चहापानाच्या वेळी मला दिलेला शब्द मात्र तुम्ही पाळला नाही. लवकरात लवकर द्विशतक पूर्ण कर असा मला निरोप पाठवलात, पण द्विशतक पूर्ण करण्यासाठी मला एकही चेंडू खेळायला मिळाला नाही.''

जॉन गेल्यावर सौरवनेही माझ्यापाशी येऊन दिलगिरी व्यक्त केली. डाव घोषित करण्याचा निर्णय त्याचा नव्हता, असंही त्याने मला सांगितलं. त्याच्या बोलण्याचं मला थोडं आश्चर्य वाटलं. निर्णय घेण्यात सौरवचा सहभाग असायलाच हवा होता. चहापानाच्या वेळी राहुल आणि जॉन यांच्याबरोबर झालेल्या चर्चेमध्ये तोही सामील होता. शिवाय डाव घोषित होत असताना सौरव ड्रेसिंग रूममध्येच होता. अखेर, जे झालं त्यावर आता चर्चा करण्यात अर्थ नाही, असं म्हणत मी तो विषय संपवला.

खेळ संपल्यावर पत्रकारांनी मला विचारलं की, 'डाव अचानक घोषित केल्यामुळे तू नाराज झाला आहेस का?' मी 'हो' म्हटलं. सत्य नाकारायचं मला काहीच कारण नव्हतं. पत्रकार परिषद संपल्यावर मी हेडफोन्स लावून संगीत ऐकत हॉटेलवर परतलो. नंतर मन शांत करण्यासाठी मी जिममध्ये गेलो. जिममध्ये पाकिस्तानचेही काही खेळाडू होते, पण कोणीही माझ्याशी बोलायला धजावलं नाही. तो विषय मनातून घालवण्यासाठी मी कसून व्यायाम करत राहिलो. त्यानंतर मी एकटाच माझ्या रूममध्ये परतलो.

संध्याकाळी आमचे मॅनेजर रत्नाकर शेट्टी गप्पा मारण्यासाठी माझ्या खोलीत आले. प्रोफेसर शेट्टींना मी बरीच वर्षं ओळखत होतो. त्यांनीही घडलेल्या प्रसंगाबद्दल खेद व्यक्त केला. डाव घोषित करण्याच्या निर्णयाबद्दल तेही सहमत नव्हते; पण त्यांच्या मते अखेर तो प्रत्यक्ष खेळासंबंधीचा निर्णय होता. अशा निर्णयामध्ये मॅनेजर म्हणून आजपर्यंत त्यांनी कधीही हस्तक्षेप केला नव्हता. मी त्यांना म्हटलं की, आता ती गोष्ट घडून गेलेली आहे; पण त्या गोष्टीचा माझ्या खेळावर किंवा संघभावनेवर जराही परिणाम होणार नाही याची खातरी बाळगा.

मी प्रोफेसर शेट्टींशी बोलत असताना संजय मांजरेकर तिथे आला. संजय समालोचक म्हणून त्या दौऱ्यावर आला होता. संजय म्हणाला, ''डाव घोषित करण्याचा निर्णय त्याला धाडसी वाटला. असा धाडसी निर्णय घेणं हे भारतीय क्रिकेटसाठी सुचिन्ह आहे.'' काही वेळ तो त्याच सुरात बोलत राहिला. अखेर मी संजयला म्हटलं, ''तू जे काही बोलतोयस त्याचा तुला तरी अर्थ कळतोय का? ड्रेसिंग रूममध्ये जे घडलं त्याबद्दल तुला काहीच माहीत नाही. सगळ्या गोष्टी नीट माहीत करून घेण्याआधीच तू तुझं मत कसं बनवलंस?'' मला तुझं मत मुळीच आवडलेलं नाही, असं मी त्याला स्पष्टपणे सांगितलं. माझ्या मते, आपण काहीतरी वेगळा विचार करतो आहे, हे दाखवण्याचा तो मुद्दाम प्रयत्न करत होता.

अखेर दुसऱ्या दिवशी सकाळी राहुल माझ्यापाशी आला. ''तू खूपच अस्वस्थ झाल्याचं मला कळलं आहे. म्हणून मी मुद्दाम तुझ्याशी बोलायला आलोय,'' असं तो म्हणाला. मी म्हटलं, ''हो, मी नक्कीच बैचेन झालोय आणि ती गोष्ट मला लपवावीशी वाटत नाही.'' मी त्याला विचारलं, ''त्या क्षणी डाव घोषित करण्यामागे तुझा नक्की काय विचार होता? विजय अगदी आपल्या जवळ आला होता, अशी परिस्थिती तर नक्कीच नव्हती. आणखी एक षटक टाकलं असतं, म्हणून काहीच फरक पडणार नव्हता. आपण डाव कधी घोषित करणार आहोत हे आपण चहापानाच्या वेळीच ठरवलं होतं. मी त्याच हिशोबाने खेळत होतो.''

राहुल त्यावर मला म्हणाला, ''संघाचं हित लक्षात घेऊन मी तो निर्णय घेतला. विजय मिळवणं हे संघाचं मुख्य उद्दिष्ट आहे आणि इतर कोणत्याही गोष्टीपेक्षा आम्ही आमच्या मुख्य उद्दिष्टाला जास्त महत्त्व देतो, हे मला पाकिस्तान संघाला दाखवून द्यायचं होतं.'' मला त्याचं बोलणं पटलं नाही. मी त्याला म्हटलं, ''तू एक गोष्ट लक्षात घे की, मीही संघासाठीच खेळत होतो. होय, माझ्या त्या वेळी १९४ धावा झाल्या होत्या. पण त्या १९४ धावा काढण्यामागे संघाला मदत व्हावी हाच माझा उद्देश होता. संघासाठी मी दिलेलं ते वैयक्तिक योगदान होतं. मीही संघाचाच एक भाग आहे. त्यामुळे तू संघाच्या हितासाठी तो निर्णय घेतलास, हे तुझं म्हणणं बरोबर ठरत नाही.''

मी त्याला सिडनी कसोटीची आठवण करून दिली. त्याला म्हटलं, ''त्या कसोटीत चौथ्या दिवशी संध्याकाळी आपण दोघं बॅटिंग करत होतो. त्या वेळी डाव कधी घोषित करायचा हे विचारण्यासाठी सौरवने दोन-तीनदा निरोप पाठवले, पण तरीही

तू बॅटिंग करत राहिलास. दोन्ही प्रसंग अगदी तुलना करण्यासारखे आहेत. सिडनीमध्ये आपण लवकर डाव घोषित केला असता, तर आपण ती मॅच आणि मालिकाही जिंकू शकलो असतो. काल जर तुला संघाच्या हितासाठी डाव घोषित करावासा वाटला, तर सिडनीलाही तुला तसंच वाटायला हवं होतं.''

राहुल त्यावर काहीच बोलला नाही. ''द्विशतक काढायला तुला पुन्हा नक्कीच संधी मिळेल,'' असं तो म्हणाला. मी म्हटलं, ''नाही. ती गोष्ट इतकी सोपी नाही. मला पुढच्या डावात १९४ धावांपासून पुढे सुरुवात करायला मिळणार नाही. मला पुन्हा शून्यापासून सुरुवात करून द्विशतक काढावं लागेल.'' अखेर मी तो विषय संपवला. शेवटी मी त्याला म्हटलं, ''त्या घटनेचा माझ्या प्रत्यक्ष मैदानातल्या खेळावर थोडाही परिणाम होणार नाही, पण मैदानाबाहेर मात्र मी एकटा असेन. जे घडलं, त्यातून बाहेर पडायला मला थोडा अवधी लागेल.''

एका गोष्टीचं मात्र मला खूप बरं वाटतं की, हा प्रसंग घडूनही राहुलची व माझी मैत्री अबाधित राहिली. प्रत्यक्ष खेळतानाही आमच्यातला जिव्हाळा आणि विश्वास अगदी आमच्या कारकिर्दीच्या अखेरपर्यंत कायम राहिला. त्यानंतरही आम्ही अनेक चांगल्या भागीदाऱ्या केल्या. आमच्या क्रिकेटवर आणि आमच्या मैत्रीवरही त्या घटनेचा कसलाही परिणाम झाला नाही.

इतिहासातून धडा

डिसेंबर, २००८मध्ये अगदी तशीच परिस्थिती पुन्हा निर्माण झाली होती. त्या वेळी आम्ही इंग्लंडविरुद्ध मोहालीला खेळत होतो. कसोटी सामन्याचा तो शेवटचा दिवस होता. गौतम गंभीर व युवराज बॅटिंग करत होते. दोघंही सत्तरीच्या घरात होते. त्या वेळी ड्रेसिंग रूममध्ये तशीच डाव घोषित करण्याची चर्चा सुरू झाली होती. काही जणांचं मत होतं की, आपण ताबडतोब डाव घोषित करून उरलेल्या ३० षटकांत मॅच जिंकण्याचा प्रयत्न करावा.

मी मात्र त्यात हस्तक्षेप करून डाव घोषित करू दिला नाही. त्या वेळी धोनी आमचा कर्णधार होता व गॅरी कर्स्टन प्रशिक्षक होते. मी म्हटलं, ''काही वर्षांपूर्वी मी स्वत: या परिस्थितीतून गेलोय. जे माझ्याबाबतीत घडलंय, त्याची मला पुनरावृत्ती होऊन द्यायची नाही. उपाहारानंतर इंग्लंडला बॅटिंग देऊन मॅच जिंकणं अशक्य आहे. तेवढा पुरेसा वेळ आपल्यापाशी नाही.'' त्या मॅचमध्ये अंधूक प्रकाशामुळे रोज खेळ लवकर थांबवावा लागत होता. शेवटच्या दिवशीही तोच प्रकार घडणार होता. अशा परिस्थितीत डाव घोषित करण्यात काय अर्थ होता? त्यामुळे आपल्या दोन फलंदाजांची शतक काढण्याची संधी मात्र हुकणार होती. गौतमने तर पहिल्या डावातही शतक काढलं होतं. त्याला दोन्ही डावांत शतक काढण्याचा मान मिळू शकणार होता. युवराजने चेन्नईतील पहिली कसोटी जिंकून देण्यात महत्त्वाचा वाटा उचलला होता. त्याला आता शतक काढण्याची संधी देणं उचित ठरणार होतं.

शेवटी मी म्हटलं, ''टीममधील प्रत्येक खेळाडूंचं हित जपणं हीदेखील आपलीच जबाबदारी आहे. प्रत्येक खेळाडू हा अखेर संघाचाच भाग असतो. प्रत्येक खेळाडू जर आनंदी व समाधानी असेल तर टीममध्येही आपोआपच आनंद व चैतन्य निर्माण होईल. संघापेक्षा खेळाडूच्या वैयक्तिक कामगिरीला प्राधान्य द्या, असं मी कधीही म्हणणार नाही; पण आज मॅच जिंकण्याची शक्यताच दिसत नसताना दोन्ही फलंदाजांना आपण शतक काढण्याची संधी द्यायला हवी.'' टीमच्या दृष्टीनेही ती गोष्ट महत्त्वाची आहे, हे मी गॅरीला पटवून द्यायचा प्रयत्न केला. सुदैवाने गॅरीने माझं म्हणणं मान्य केलं.

पण दुर्दैवाने युवराज व गंभीरची शतकं होऊ शकली नाहीत. युवराज ८६ धावांवर धावबाद झाला. गौतम ९७ धावा काढून बाद झाला. २५१-७ या धावसंख्येवर आम्ही डाव घोषित केला. त्यानंतर मी गौतम व युवराजला हसत हसत म्हटलं, ''तुमच्या दोघांसाठी मी डिक्लरेशन लांबवलं आणि तुम्हाला साधी शतकंही काढता आली नाहीत.'' युवराजची तर मी टर उडवली. त्याला म्हटलं, ''तुझ्या तर कंबरेत मी लाथ घालणार आहे. तुझ्यासाठी मी डिक्लरेशन थांबवलं आणि तू लेका ८६वर धावबाद झालास!''

संस्मरणीय मालिका

मुलतानची पहिली कसोटी गुंडाळायला अखेर आम्हाला शेवटच्या दिवसाचा फक्त पहिला अर्धा तास पुरला. त्या कसोटीत मी पाकिस्तानी यष्टिरक्षक मोईन खानची विकेट काढली होती. तो किस्सा सांगण्यासारखा आहे. कसोटी आधी झालेल्या काही प्रदर्शनीय सामन्यात मी मोईनला बाद केलं होतं. त्यामुळे मोईन बॅटिंगला येताच मी त्याच्यावर दबाव आणायला सुरुवात केली. मी आमच्या एका खेळाडूला मुद्दाम म्हटलं, ''मैं इसे पहलेभी आउट कर चुका हूँ, आज भी देख मैं इसको आउट करुँगा।'' मोईनने माझं बोलणं ऐकलं. तो हसत मिश्कीलपणे म्हणाला, ''आज तो मैं तुझे छक्का मारूँगा।'' मी त्याला म्हटलं, ''चलो मारके दिखाओ।'' मी पुढच्या चेंडूवर अब्दुल रझाकला मुद्दाम एक धाव देऊन मोईनला स्ट्राइक मिळवून दिला. दिवसाच्या खेळाचा तो शेवटचा चेंडू होता. मी मोईनला गुगली टाकायचा ठरवला. कारण तोपर्यंत मोईन प्रत्येक चेंडू आपल्या पॅडवर घेत होता. चेंडू ऑफ स्टम्पवर पडला आणि माझ्या अपेक्षेप्रमाणे वळला. मोईनला काही कळायच्या आत त्याच्या पायामधून तो चेंडू लेग स्टम्पवर आदळला होता. ती महत्त्वाची विकेट होती. त्यानंतर सामना आमच्या बाजूला झुकला. लाहोरच्या दुसऱ्या कसोटीत मात्र पाकिस्तान संघ वरचढ ठरला. युवीने त्या मॅचमध्ये शतक काढलं. पण आम्ही त्या सामन्यात पाकिस्तानला लढत देऊ शकलो नाही. पाकिस्तानने आम्हाला पूर्णपणे निष्प्रभ करून टाकलं.

१३ एप्रिलला तिसरा व निर्णायक सामना रावळपिंडीला सुरू झाला. सौरव पुन्हा संघात परतला होता. टीमचा तोल साधण्यासाठी आम्ही पार्थिवला सलामीला पाठवण्याचा निर्णय घेतला. लक्ष्मीपथी बालाजी आणि इरफान पठाण या आमच्या दोन्ही स्विंग गोलंदाजांनी पूर्ण मालिकेत अप्रतिम गोलंदाजी केली होती. रावळपिंडीतही दोघांनी पुन्हा एकदा कमाल केली. बालाजीने घेतलेल्या चार विकेट्समुळे आम्ही पाकिस्तानला पहिल्या डावात २२४ धावांत रोखू शकलो. त्यानंतर राहुलच्या द्विशतकामुळे आम्ही ६०० धावांचा टप्पा गाठला.

या वेळी सामन्यावर आमची हुकमत होती. आम्ही पाकिस्तानचा दुसरा डाव २४५ धावांत गुंडाळून चौथ्या दिवशीच सामना संपवला. अनिलने चार बळी घेतले. दुसऱ्या डावातली शेवटची विकेट मी लेग स्पिन गोलंदाजी करत मिळवली. त्या मॅचमध्येही नाट्यमय आणि निराशेचे प्रसंग आले. चौथ्या दिवशी सकाळी आम्ही लागोपाठ चार झेल सोडले. झेल काही फारसे कठीण नव्हते; पण कोणाच्याही हातात चेंडू बसतच नव्हता.

पाकिस्तानमध्ये ५० वर्षांनी भारतीय संघाने कसोटी मालिका जिंकली होती. त्या विजयाचा आनंद काही वेगळाच होता. त्याआधी आम्ही एकदिवसीय मालिकाही ३-२ अशी जिंकली होती. एकूणच तो दौरा कमालीचा यशस्वी ठरला होता.

भारताचा आस्ट्रेलिया दौरा २००३-०४, बॉर्डर-गावसकर करंडक

पहिली कसोटी. ब्रिस्बेन – ४ ते ८ डिसेंबर, २००३

आस्ट्रेलिया ३२३ (जेएल लँगर १२१, आरटी पाँटिंग ५४; झेड खान ५-९५, एबी आगरकर ३-९०) व २८४-३ घोषित (एमएल हेडन ९९, डीआर मार्टिन ६६*, एसआर वॉ ५६*, आरटी पाँटिंग ५०)

भारत ४०९ (एससी गांगुली १४४, व्हीव्हीएस लक्ष्मण ७५, **एसआर तेंडुलकर** ०; जेएन गिलेस्पी ४-६५, एससीजी मॅक्गिल ४-८६) व ७३-२ (आर द्रविड ४३*; एनडब्ल्यू ब्रॅकन २-१२)

सामना अनिर्णित

दुसरी कसोटी. ॲडलेड – १२ ते १३ डिसेंबर, २००३

आस्ट्रेलिया ५५६ (आरटी पाँटिंग २४२, एसएम कॅटिच ७५, जेएल लँगर ५८; ए कुंबळे ५-१५४) व १९६ (एसी गिलख्रिस्ट ४३, एसआर वॉ ४२; एबी आगरकर ६-४१, **एसआर तेंडुलकर** २-३६)

भारत ५२३ (आर द्रविड २३३, व्हीव्हीएस लक्ष्मण १४८, व्ही सेहवाग ४७, **एसआर तेंडुलकर** १; एजे बिकेल ४-११८) व २३३-६ (आर द्रविड ७२*, व्ही सेहवाग ४७, **एसआर तेंडुलकर** ३७; एससीजी मॅक्गिल २-१०१)

भारत ४ गडी राखून विजयी

तिसरी कसोटी. मेलबोर्न – २६ ते ३० डिसेंबर, २००३

भारत ३६६ (व्ही सेहवाग १९५, आर द्रविड ४९, ए चोप्रा ४८, **एसआर तेंडुलकर** ०; एससीजी मॅक्गिल ३-७०) व २८६ (आर द्रविड ९२, एससी गांगुली ७३, **एसआर तेंडुलकर** ४४; बीए विलियम्स ४-५३)

आस्ट्रेलिया ५५८ (आरटी पॉंटिंग २५७, एमएल हेडन १३६; ए कुंबळे ६-१७६, **एसआर तेंडुलकर** १-५७) व ९७-१ (एमएल हेडन ५३*, आरटी पॉंटिंग ३१)*

आस्ट्रेलिया ९ गडी राखून विजयी

चौथी कसोटी. सिडनी – २ ते ६ जानेवारी, २००४

भारत ७०५-७ घोषित. (**एसआर तेंडुलकर** २४१*, व्हीव्हीएस लक्ष्मण १७८, व्ही सेहवाग ७२, पीए पटेल ६२; बी ली ४-२०१, जेएन गिलेस्पी ३-१३५) व २११-२ घोषित (आर द्रविड ९१*, **एसआर तेंडुलकर** ६०*, व्ही सेहवाग ४७)

आस्ट्रेलिया ४७४ (एसएम कॅटिच १२५, जेएल लँगर ११७, एमएल हेडन ६७; ए कुंबळे ८-१४१) व ३५७-६ (एसआर वॉ ८०, एसएम कॅटिच ७७*; ए कुंबळे ४-१३८)

सामना अनिर्णित

मालिका १-१ बरोबरी

भारताचा पाकिस्तान दौरा २००४

पहिली कसोटी. मुलतान – २८ मार्च ते १ एप्रिल, २००४

भारत ६७५-५ घोषित (व्ही सेहवाग ३०९, **एसआर तेंडुलकर** १९४*, वाय सिंग ५९; एम सामी २-११०)

पाकिस्तान ४०७ (वाय हमीद ९१, इंझमाम-उल-हक ७७, ए रझाक ४७; आयके पठाण ४-१००, **एसआर तेंडुलकर** २-३६) व २१६ (फॉलो-ऑन) (वाय योहाना ११२; ए कुंबळे ६-७२, आयके पठाण २-२६)

भारत एक डाव व ५२ धावांनी विजयी

दुसरी कसोटी. लाहोर – ५ ते ८ एप्रिल, २००४

भारत २८७ (वाय सिंग ११२, आयके पठाण ४९, **एसआर तेंडुलकर** २; उमर गुल ५-३१) व २४१ (व्ही सेहवाग ९०, पीए पटेल ६२*, **एसआर तेंडुलकर** ८; डी कनेरिया ३-१४, एस अख्तर ३-६२)

पाकिस्तान ४८९ (इंझमाम-उल-हक ११८, आय फरहत १०१, ए कमाल ७३, वाय योहाना ७२; एल बालाजी ३-८१, आयके पठाण ३-१०७, **एसआर तेंडुलकर** १-३८) व ४०-१

पाकिस्तान ९ गडी राखून विजयी

तिसरी कसोटी. रावळपिंडी – १३ ते १६ एप्रिल, २००४

पाकिस्तान २२४ (एम सामी ४९; एल बालाजी ४-४६, आयके पठाण २-४९, ए नेहरा २-६०) व २४५ (ए कमाल ६०*, वाय योहाना ४८; ए कुंबळे ४-४७, एल बालाजी ३-१०८, **एसआर तेंडुलकर** १-१)

भारत ६०० (आर द्रविड २७०, एससी गांगुली ७७, व्हीव्हीएस लक्ष्मण ७१, पीए पटेल ६९, **एसआर तेंडुलकर** १, एस अख्तर ३-४७)

भारत एक डाव व १३१ धावांनी विजयी

भारताने मालिका २-१ जिंकली

१६.
शस्त्रक्रिया

ऑगस्ट, २००४मध्ये मला एक गंभीर दुखापत झाली. आश्चर्य म्हणजे त्या दुखण्याची सुरुवात ॲमस्टरडॅमला झाली. ॲमस्टरडॅमला सहसा आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामने खेळले जात नाहीत; पण त्यावर्षी 'व्हिडिओकॉन कप' तिरंगी मालिकेचं आयोजन तिथे करण्यात आलं होतं. आस्ट्रेलिया व पाकिस्तान हे इतर दोन संघ त्या मालिकेत खेळत होते. नेट्समध्ये सराव करताना अजित आगरकरने मला एक आखूड टप्प्याचा चेंडू टाकला. मला तो नीट खेळता आला नाही. तो चेंडू मी कसातरी एका हाताने टोलवण्याचा प्रयत्न केला; पण त्याच क्षणी काहीतरी गडबड झाल्याचं माझ्या लक्षात आलं. माझ्या हाताचं कोपर दुखावलं होतं. आमचा फिजिओ, अँड्र्यू लीपसने माझ्या हाताकडे नुसतं पाहिलं आणि त्याचा चेहरा गंभीर झाला. दुखापतीचं गांभीर्य त्याच्या लगेच लक्षात आलं होतं.

त्याच वेळी अंजलीचे आई-वडील माझा खेळ पाहण्यासाठी आपल्या मित्रमंडळींसह खास ॲमस्टरडॅमला आले होते. माझ्या अचानक उद्भवलेल्या दुखापतीमुळे त्या सर्वांचीच निराशा झाली. अडचणीत भर म्हणजे त्याच दरम्यान मला व्हायरल इन्फेक्शन झाल्यामुळे मी तीन दिवस खोलीबाहेर पाऊलही ठेवू शकलो नव्हतो. तपासणीअखेर ती दुखापत 'टेनिस एल्बो' असल्याचं निष्पन्न झालं. काहीही करून मला लवकरात लवकर बरं व्हायचं होतं. कारण सप्टेंबर मिहन्यात इंग्लंडमध्ये 'आयसीसी चँपियन्स ट्रॉफी' स्पर्धेला सुरुवात होणार होती. त्यानंतर ऑक्टोबरमध्ये चार कसोटींची मालिका खेळण्यासाठी आस्ट्रेलियन संघ भारतात येणार होता.

टेनिस एल्बोची दुखापत बरी होण्यासाठी मी शक्य होते तेवढे सर्व प्रयत्न करून पाहिले. ॲमस्टरडॅममधील एका तज्ज्ञाने माझं मनगट वेगवेगळ्या प्रकारे हलवून त्यावर उपचार करण्याचा प्रयत्न केला. त्याच्या मते माझं मनगट खूपच कडक झाल्यामुळे त्याचा सर्व ताण कोपरावर पडला होता. दुर्दैवाने त्या वेदनादायी उपचारांचा फारसा उपयोग झाला नाही. त्यानंतर मी 'शॉकवेव्ह' उपचारपद्धतीचा प्रयोग करून पाहिला. त्यात हेअर ड्रायरसारखं एक यंत्र माझ्या हातावर बसवलं जायचं. ते यंत्र सुरू झाल्यावर वाटायचं की, माझा हात फुग्यासारखा फुगत चाललाय आणि एका क्षणी त्या प्रचंड दाबामुळे माझं कोपर फुटून जाणार.

अंजली माझ्यासोबत राहण्यासाठी इंग्लंडहून येणार होती. मी तिला येताना व्हिडिओ कॅमेरा आणायला सांगितलं. अंजलीनेही मला इतक्या प्रचंड वेदना सहन करताना त्यापूर्वी कधी पाहिलं नव्हतं. मला तर ते शॉकवेव्हचे उपचार करून घेत असताना एका फार मोठ्या दिव्यातून जात असल्यासारखं वाटे. त्यातील एका सत्राचं आम्ही मुद्दाम व्हिडिओ चित्रीकरणही करून ठेवलं. शॉकवेव्हची एकूण तीन सत्रं करायची ठरली होती. अंजली सोबत असल्यामुळे मला खूपच धीर आला होता. मी डॉक्टरांना म्हटलं, ''तुम्हाला जर मी लवकर बरा होण्याची खातरी वाटत असेल, तर चौथ्या सत्रासाठीही माझी तयारी आहे.'' आस्ट्रेलियाविरुद्ध खेळण्यासाठी मी अगदी उतावीळ झालो होतो. माझी अस्वस्थता बघून एका डॉक्टरांनी मला विचारलं, ''त्या मालिकेत खेळण्यासाठी तू इतका का अधीर झाला आहेस?'' मी त्यांना म्हटलं, ''माझ्या स्वत:च्या लग्नाला हजर राहता आलं नाही तर माझी जी अवस्था होईल, तशीच अवस्था त्या मालिकेत खेळता आलं नाही तर माझी होणार आहे!'' काहीही करून त्या मालिकेत मला खेळायचं होतं.

पण इतके सारे प्रयत्न करूनही त्याचा काहीही उपयोग झाला नाही. मी चँपियन्स ट्रॉफी स्पर्धेत तर खेळू शकलोच नाही; पण आस्ट्रेलिया मालिकेतील पहिल्या दोन कसोटी सामन्यांनाही मला मुकावं लागलं. बंगळुरूच्या पहिल्या कसोटीत क्लार्क व

गिलख्रिस्टनी शतकं झळकावली. हरभजनने ११ बळी घेऊनही आस्ट्रेलियाने ती मॅच २१७ धावांनी जिंकली. आपल्या संघाचा पराभव केवळ बाहेर बसून पाहताना मनाला खूपच यातना झाल्या. चेन्नईच्या दुसऱ्या कसोटीआधी मी स्टेरॉइडची इंजेक्शनं घेतली; पण त्याचाही काही परिणाम झाला नाही. चेन्नईची कसोटी अनिर्णित अवस्थेत संपली. अखेर मी २६ ऑक्टोबर, २००४ला नागपूरच्या तिसऱ्या कसोटीत खेळू शकलो. दोन आठवड्यांच्या पूर्ण विश्रांतीनंतर वेदना खूपच कमी झाल्या होत्या; पण माझं पुनरागमन अपयशी ठरलं. सिम गोलंदाजीला अनुकूल असलेल्या नागपूरच्या खेळपट्टीवर गिलेस्पीने आमच्या नऊ विकेट्स घेतल्या. डॅमियन मार्टिनचा दोन्ही डावांत शतकं झळकावण्याचा मान थोडक्यात हुकला. आस्ट्रेलियाने आमचा ३४२ धावांनी पराभव केला. त्या सामन्यात मी फक्त १० धावा काढल्या.

त्यानंतर आठवड्याने वानखेडे स्टेडियमवर चौथ्या कसोटीला सुरुवात झाली. वानखेडेच्या संथ खेळपट्टीवर फारशा धावा होत नव्हत्या. दुसऱ्या डावात मी राहुलबरोबर बॅटिंग करत असताना अचानक कोपरामधून पुन्हा भाजल्यासारख्या दाहक वेदना होऊ लागल्या. वेदनेबरोबरच माझ्या मनात अपराधीपणाची जाणीव निर्माण झाली. सामन्यामध्ये खेळण्याचा निर्णय घाईने घेतल्यामुळे आता आपण संघाला अडचणीत आणणार, या विचाराने मी बेचैन झालो. सामना त्या वेळी निर्णायक स्थितीला आला होता. मी वेदनाशामक औषधं मागवली. वेदना त्वरित कमी होण्यासाठी मी गिळण्याऐवजी दोन गोळ्या चघळायचं ठरवलं. निर्धाराने वेदना सहन करून मी कडवी झुंज देत ५५ धावा काढल्या. लक्ष्मणनेही आकर्षक खेळी करत ६९ धावा केल्या. दुसऱ्या डावात आम्ही आस्ट्रेलियासमोर १०७ धावांचं लक्ष्य ठेवलं. त्या डावात हरभजन व मुरली कार्तिकच्या फिरकीने जादुई कमाल केली. हरभजनने पाच तर कार्तिकने तीन बळी घेत आस्ट्रेलियाचा डाव ९३ धावांत गुंडाळला. त्या विजयामुळे वेदना सहन करत दिलेली झुंज मला सार्थकी लागल्यासारखी वाटली. मुरली कार्तिक सामन्याचा मानकरी ठरला. दुर्दैवाने त्यानंतर कार्तिकला कसोटीत खेळण्याची संधी पुन्हा कधीही मिळू शकली नाही.

आस्ट्रेलिया मालिकेनंतर दक्षिण आफ्रिकेचा संघ दोन कसोटी सामने खेळण्यासाठी नोव्हेंबर, २००४मध्ये भारतात आला. कानपूरची पहिली कसोटी अनिर्णित अवस्थेत संपली. त्यानंतर २८ नोव्हेंबरला कोलकात्यामध्ये झालेल्या दुसऱ्या कसोटीत मात्र भारताने आठ गडी राखून दणदणीत विजय मिळवला. भज्जीच पुन्हा एकदा विजयाचा शिल्पकार ठरला. दक्षिण आफ्रिकेच्या दुसऱ्या डावात त्याने सात विकेट्स घेतल्या.

मी पूर्ण तंदुरुस्त झालो नव्हतो; पण माझ्या खेळण्यात हळूहळू प्रगती होत होती. डिसेंबरमध्ये आम्ही दोन कसोटी सामन्यांची मालिका खेळण्यासाठी बांगलादेशच्या दौऱ्यावर गेलो. ढाक्याच्या पहिल्या कसोटीत मी नाबाद २४८ धावांची खेळी केली. माझ्या कसोटी कारकिर्दीतील ती सर्वोच्च धावसंख्या ठरली. कसोटीतलं ते माझं चौतिसावं शतक होतं. त्या शतकामुळे मी सुनील गावसकरांच्या विश्वविक्रमाची बरोबरी केली. गावसकर त्या वेळी सामन्याचं समालोचन करण्यासाठी स्टेडियममध्ये उपस्थित होते. त्यांनी ३४ शॅम्पेनच्या बाटल्या माझ्या रूममध्ये पाठवल्या. त्या अपूर्व भेटीमुळे माझ्या कारकिर्दीतील तो दिवस खरोखरीच संस्मरणीय ठरला.

हाताच्या कोपरावर शस्त्रक्रिया

मार्च, २००५मध्ये पाकिस्तानचा संघ भारताच्या दौऱ्यावर आला. त्या दौऱ्यात ते तीन कसोटी व सात एकदिवसीय सामने खेळणार होते. पाकिस्तानविरुद्ध खेळण्याची संधी मी चुकवूच शकत नव्हतो. माझ्या दुखऱ्या कोपराकडे दुर्लक्ष करण्याचा प्रयत्न करत मी तसाच रेटत खेळत राहिलो; पण नंतर मला जाणवलं की, चांगला खेळ करण्यासाठी मला खूपच प्रयत्न करावे लागत होते. शिवाय माझ्या कोपरालाही हवी तशी विश्रांती मिळत नव्हती. अखेर जी गोष्ट मी टाळण्याचा प्रयत्न करत होतो, त्या शस्त्रक्रियेला सामोरं जाण्याखेरीज माझ्यापुढे पर्याय उरला नव्हता.

२५ मे, २००५ रोजी माझ्या हाताच्या कोपरावर शस्त्रक्रिया झाली. साडेचार महिने हातात बॅटही धरायची नाही, असं डॉक्टरांनी मला बजावून सांगितलं. साडेचार महिन्यांचा तो काळ फारच अवघड होता. मी आता पुन्हा कधीच क्रिकेट खेळू शकणार नाही की काय, अशी त्या काळात मला सतत काळजी वाटत राहायची. 'माझी कारकीर्द अशा प्रकारे अर्धवट संपवू

नकोस,' अशी मी परमेश्वरापाशी रोज प्रार्थना करायचो. मी खूपच कंटाळून गेलो होतो. एकदा तर मी टांगत्या पायमोजात चेंडू ठेवून तो प्लॅस्टिकच्या बॅटने मारण्याचा सराव करून पाहिला; पण त्या वेळीही मला असह्य वेदना झाल्या. शेवटच्या दोन महिन्यांत तर माझी फारच बिकट अवस्था झाली होती. रात्री मधेच मला जाग यायची. मग मी मन शांत करण्यासाठी माझा मित्र फैसल मोमेनसह गाडीतून मोठा फेरफटका मारायला बाहेर पडायचो.

शस्त्रक्रियेनंतर सर्वप्रथम मी एका स्थानिक स्पर्धेत खेळलो. ऑक्टोबर, २००५मध्ये मोहालीत सुरू असलेल्या 'चॅलेंजर कप' स्पर्धेत मी भाग घेतला. कोपराची दुखापत पूर्ण बरी झाली नव्हती; पण तरीही मी एक प्रयत्न करून पाहायचा ठरवलं. सरावाच्या पहिल्याच दिवशी चेंडू फेकताना माझ्या खांद्यातून जोरदार कळ आली. नुकताच कुठे मी डाव्या कोपरावरच्या शस्त्रक्रियेतून बरा झालो होतो; तोच हे उजव्या खांद्याचं नवीन दुखणं सुरू झालं. मी त्याकडे दुर्लक्ष करायचं ठरवलं. बरेच दिवस क्रिकेट न खेळल्यामुळे खांदा दुखत असावा असा विचार करून मी त्या स्पर्धेत खेळत राहिलो; पण दिवसागणीक माझ्या वेदना वाढतच गेल्या. नंतर तर माझ्या उजव्या हाताचं कोपरही दुखू लागलं.

त्याच वेळी माझे सर्जन डॉक्टर अँड्र्यू वॅलेस एका दिवसासाठी दिल्लीत आल्याचं मला समजलं. मला काहीही करून त्यांची भेट घ्यायची होती. त्या दिवशी मी बडोद्यात होतो. मी जिथे होतो तिथून दिल्लीला जाण्यासाठी विमान उपलब्ध नव्हतं. डॉक्टरांची कशी भेट घ्यावी, या विवंचनेत असताना माझा मित्र अमित भाटिया माझ्या मदतीला धावून आला. त्याच्या खाजगी जेटमधून त्याने माझ्या दिल्ली प्रवासाची सोय केली. डॉक्टर वॅलेसनी माझा खांदा तपासला. त्यांच्या मते, बरेच खेळाडू दुखापत झालेल्या इंद्रियाची उणीव भरून काढण्यासाठी, दुखापत न झालेल्या इंद्रियांवर जास्त भार टाकतात. माझ्या बाबतीत तेच घडलं असावं, असं त्यांचं म्हणणं पडलं. दुखपतीचं नेमकं स्वरूप जाणून घेण्यासाठी त्यांनी मला काही स्कॅन्स करायला सांगितलं. मला माझ्या नव्या दुखापतीची बातमी प्रसारमाध्यमांपर्यंत जाऊ द्यायची नव्हती. म्हणून मी अंगावर बुरखा चढवून स्कॅन काढायला गेलो. त्या वेळी मला किती अडचणींतून जावं लागत होतं, याची यावरून थोडी कल्पना येऊ शकेल. संघाचा नवा फिजिओ, जॉन ग्लॉस्टर हॉस्पिटलमध्ये माझ्यासोबत आला होता. मज्जातंतूजवळ एका छोट्याशा गळवासारखी गाठ (सिस्ट) आल्याचं निदान झालं. डॉक्टरांनी मला काही काळ खेळायची परवानगी दिली होती. मात्र ती गाठ लवकरात लवकर काढून टाकणं आवश्यक होतं.

अखेर २५ ऑक्टोबर, २००५ रोजी मी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पुनरागमन केलं. श्रीलंकेविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेतील पहिल्या सामन्यात खेळण्यासाठी मी बऱ्याच महिन्यांनी मैदानात उतरलो. तो माझ्यासाठी खरोखरीच भावस्पर्शी क्षण होता. सर्वप्रथम मी आकाशाकडे पाहून परमेश्वराचे आभार मानले. त्यानेच मला एक नवी संधी दिली होती. त्या मॅचमध्ये मी ९३ धावा काढल्या. मला अशीच थाटात पुनरागमन करायची इच्छा होती. मध्यमगती गोलंदाज परवेझ मशरुफला मारलेला कव्हर ड्राइव्ह हा मी मारलेला पहिला शॉट होता. त्याच्या पुढच्याच चेंडूवर फ्लिक करत मी स्क्वेअर लेगवरून आणखी एक चौकार ठोकला. परमेश्वराने दिलेल्या संधीचा पुरेपूर लाभ उठवायचा मी निर्धार केला होता. आम्ही ती मॅच १५२ धावांनी व नंतर ती मालिका ६-१ अशा फरकाने जिंकली.

डिसेंबर, २००५मध्ये श्रीलंकेविरुद्धच तीन कसोटी सामन्यांची मालिका खेळली गेली. त्या मालिकेत पस्तिसावं शतक झळकावून मी विश्वविक्रमावर स्वत:चं नाव नोंदवलं. त्या शतकाने मला बराच वेळ हुलकावणी दिली होती. चेन्नईच्या पहिल्या कसोटीत पावसामुळे बराचसा वेळ वाया गेला होता. माझ्या विक्रमी शतकासाठी मला अजून किती वेळ वाट पाहावी लागणार, असा विचार आता मनात येऊ लागला होता; पण चेन्नई कसोटीच्या दरम्यान असं काहीतरी घडलं की, माझं मन एकदम उल्हसित होऊन गेलं. दिल्लीच्या कसोटीत मी पस्तिसावं शतक झळकवत असल्याचं स्वप्न मला पडलं. दुसरी कसोटी दिल्लीलाच होती.

ते स्वप्न इतकं तंतोतंत खरं होईल असं मला वाटलं नव्हतं. १० डिसेंबरला दिल्लीच्या कसोटीला सुरुवात झाली. पहिल्याच दिवशी खेळ संपायच्या काही वेळ आधी मी शतकाच्या अगदी जवळ आलो होतो. प्रकाश झपाट्याने अंधूक होत चालला होता. खेळ थांबवायचा की सुरू ठेवायचा, यावर पंच एकमेकांशी चर्चा करत होते. खेळ आणखी काही मिनिटं तरी

चालू राहावा, अशी मी मनोमन प्रार्थना करत होतो. पंचांनी खेळ सुरू ठेवला. डावखुरा द्रुतगती गोलंदाज चामिंडा वासच्या हातात चेंडू सोपवला गेला. माझ्या ऑफ साइडला भरपूर क्षेत्ररक्षक ठेवले होते. वासही प्रत्येक चेंडू माझ्या ऑफ स्टम्पपासून खूप दूर टाकू लागला. मला काहीतरी वेगळी क्लृप्ती शोधावी लागणार होती. मी ऑफ स्टम्पच्या बाहेर येऊन यष्टीमागे चेंडू उलथून मारायचं ठरवलं. शतकाच्या इतक्या जवळ आलो असताना मी असा शॉट मारेन, अशी कोणीही अपेक्षा केली नव्हती. तो शॉट मात्र अचूक बसला आणि फारसा धोका न पत्करता मी ९७वर पोचलो.

वासचं षटक संपल्यावर पंचांनी पुन्हा एकदा चर्चा केली. त्यांनी खेळ सुरू ठेवायचा निर्णय घेतल्यावर मी सुटकेचा नि:श्वास सोडला. शतक पूर्ण करण्यासाठी मला आणखी वेळ मिळाला होता. त्यानंतर वासचं पुढचं षटक सुरू झालं. मधल्या काळात मी दोन एकेरी धावा घेऊन ९९वर पोचलो होतो. आधीच्या षटकात मारलेला शॉट मारण्याच्या मोहात न पडण्याचं मी स्वत:ला बजावलं होतं. पुढच्या चेंडूवर मी पॅडल स्वीप मारेन अशी वासने अपेक्षा केली असेल, असा मी अंदाज केला. मला चकवण्यासाठी तो सरळ रेषेत चेंडू टाकेल असं मला वाटलं. माझा अंदाज खरा ठरला. वासने मधल्या स्टम्पवर चेंडू टाकला. मी तो चेंडू स्क्वेअर लेगला खेळून एक धाव काढली.

शतक झाल्याचा मला इतका आनंद झाला होता की, त्या आनंदाच्या भरात मी माझ्या स्वभावाविरुद्ध वागलो. जोरजोरात ओरडत मी तो आनंद साजरा केला. माझ्या कारकिर्दीत मी असा क्वचितच वागलो असेन. माझ्यासाठी तो अत्यंत अभिमानाचा क्षण होता. त्यानंतर लवकरच खेळ थांबवण्यात आला. ड्रेसिंग रूममध्ये पोचल्यावर मात्र मी माझ्या भावनांवर नियंत्रण ठेवू शकलो नाही. माझ्या डोळ्यांमधून आनंदाश्रू वाहू लागले. मी चार फोन कॉल्स केले – अंजली, अजित, माझी आई व आचरेकरसर. माझ्यासाठी घेतलेल्या विशेष परिश्रमाबद्दल मी चौघांचेही मनापासून आभार मानले.

श्रीलंकेच्या मालिकेनंतर मी जानेवारी, २००६मध्ये पाकिस्तानच्या दौऱ्यात तीन कसोटी सामने खेळलो. मार्च, २००६मध्ये पुन्हा तीन कसोटी सामन्यांची मालिका खेळण्यासाठी इंग्लंडचा संघ भारतात आला. त्या सहाही सामन्यांत मी विशेष कामगिरी करू शकलो नाही. खांद्याची शस्त्रक्रिया मी आता टाळू शकणार नाही, ही गोष्ट मला कळून चुकली होती. त्याशिवाय मेमधील वेस्ट इंडीजच्या दौऱ्यावर जाण्याचा विचारही मी मनात आणू शकत नव्हतो. इंग्लंडविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेत भाग न घेण्याचा मी निर्णय घेतला. २७ मार्चला शस्त्रक्रिया करून घेण्यासाठी मी लंडनला रवाना झालो.

खांद्याची शस्त्रक्रिया

प्रत्यक्ष शस्त्रक्रियेच्या वेळी बरेच गोंधळ झाले. ऑपरेशन थिएटरमध्ये जाण्याआधी मला झोपेचं औषध दिलेलं होतं, पण मला अचानक जाग आली. 'ऑपरेशन झालं का?' असं मी बाजूला उभ्या असलेल्या नर्सला विचारलं. मी जागा झालेला पाहून ती चकित झाली. शस्त्रक्रियेला अजून सुरुवातही झाली नसल्याचं तिने मला सांगितलं. माझ्या आधीच्या ऑपरेशनमध्ये काही गुंतागुंत झाल्यामुळे मला अजून ऑपरेशन थिएटरमध्ये नेलं नव्हतं. हे समजताच मी पुन्हा झोपी गेलो. त्यानंतर मी पुन्हा एकदा जागा झालो. 'शस्त्रक्रिया संपली का?' हा प्रश्न मी परत एकदा डॉक्टरांना विचारला. आश्चर्य म्हणजे डॉक्टरांनीच मला या खेपेस जागं केलं होतं. माझ्या उजव्या बाहूंच्या स्नायूंमधला (बायसेप्स) एक स्नायूबंध (टेन्डन) तुटला असल्याचं त्यांच्या लक्षात आलं होतं. खांद्याच्या शस्त्रक्रियेच्या वेळी तो पुन्हा जोडण्यासाठी त्यांना माझी परवानगी हवी होती. मी त्याला मान्यता दिली. फक्त वेस्ट इंडीजच्या दौऱ्याआधी मला पूर्ण बरं करण्याचं आश्वासन मी त्यांच्याकडून घेतलं. मला आठवतं, शस्त्रक्रिया संपवून माझ्या रूममध्ये परतल्यावर मी ढसाढसा रडलो होतो. वेस्ट इंडीजचा दौरा हुकणार ही कल्पनाही मी सहन करू शकलो नव्हतो.

एकाच वेळी माझ्यावर दोन शस्त्रक्रिया केल्या होत्या. त्यानंतर पाच आठवड्यांनी मी हातात बॅट धरून टेनिसच्या चेंडूवर काही शॉट्स मारले. शस्त्रक्रियेनंतरच्या काळात अतुल रानडे आणि जगदीश चव्हाण हे माझे दोन मित्र सतत माझ्यासोबत होते. मी त्यांना १८ यार्डांवरून मला गोलंदाजी करायला सांगायचो. वेस्ट इंडीजमधील वेगवान खेळपट्ट्यांना सामोरं जाण्यासाठी मला तसा सराव करणं आवश्यक वाटलं. पण तो सराव करताना मी माझ्या हातांवर जास्तच ताण दिला होता. माझ्या डॉक्टर्स

व फिजिओने मला रोज फक्त ३० चेंडू खेळण्याची परवानगी दिली होती. मी ६० चेंडू खेळत होतो.

चार दिवस मी आखूड टप्प्याचे चेंडू खेळायचा सराव केला. त्यानंतर मी अतुलला २२ यार्डांवरून गोलंदाजी करायला सांगितलं. कारण मला स्विंग आणि सिमचा सराव करायचा होता; पण बॅटिंग करताना माझ्या खांद्याला अचानक एक जोरदार हिसडा बसला. माझं लक्ष माझ्या हाताकडे गेलं आणि मी हादरलोच. माझे बायसेप्स एखाद्या हिंदोळ्यासारखे लोंबकळत होते. ते पुन्हा तुटले असणार या कल्पनेने मी घाबरून गेलो. ही गोष्ट वेस्ट इंडीजमध्ये असलेल्या जॉन ग्लॉस्टरला मला ताबडतोब कळवायची होती; पण दोन देशांतील असलेल्या वेळेच्या फरकामुळे मला आठ-नऊ तास त्याच्याशी बोलता येऊ शकणार नव्हतं. त्या आठ तासांच्या काळात मी कमालीचा बेचैन झालो होतो. जॉनने मला पुढचे काही दिवस पूर्ण विश्रांती घ्यायला सांगितलं. त्या घटनेने मी हादरून गेलो होतो. एका आठवड्याने मी चेन्नईला जाऊन रामजी श्रीनिवासनला भेटलो. रामजी आमचा व्यायामाचा प्रशिक्षक होता. मला बॅटिंग करण्याची बंदी होती. म्हणून त्या मधल्या काळात मला शारीरिक तंदुरुस्तीवर भर द्यायचा होता. आठवडाभर मी कसून व्यायाम केला; पण त्याचा काही फायदा झाला नाही. मी आत्मविश्वास गमावून बसलो होतो. अखेर जून, २००६मध्ये वेस्ट इंडीज विरुद्ध होणाऱ्या कसोटी मालिकेत न खेळण्याचा मी निर्णय घेतला.

त्या मालिकेत सौरव गांगुलीच्या जागी राहुल द्रविडकडे नेतृत्वाची धुरा सोपवण्यात आली होती. भारतीय संघ त्या मालिकेत फारच छान खेळला. अत्यंत प्रतिकूल वातावरणात राहुलने उत्कृष्ट फलंदाजी केली. भारताने ती मालिका १-० जिंकली. ३५ वर्षांनंतर कॅरिबियन बेटांवर आपण कसोटी मालिकेत विजय मिळवला होता. त्या विजयात प्रत्यक्ष सहभागी होता न आल्याने मी हताश झालो होतो. माझ्या सर्व संघ सहकाऱ्यांना फोन करून त्यांनी मिळवलेल्या यशाबद्दल मी त्यांचं हार्दिक अभिनंदन केलं.

वेस्ट इंडीज मालिकेनंतर ऑगस्टमध्ये श्रीलंकेत तीन एकदिवसीय सामन्यांची मालिका होती. तोपर्यंत मी पूर्ण बरा होऊन संघात सामील झालो होतो. चेंडू फेकताना मात्र मला अजूनही थोडा त्रास होत होता; पण श्रीलंकेत पडलेल्या जोरदार पावसात ती मालिका अक्षरश: 'वाहून' गेली. पहिल्या मॅचमध्ये फक्त २२ चेंडू टाकण्यात आले. उरलेले दोन सामने एकही चेंडू न टाकता रद्द करावे लागले. दुखापतीतून बरा होण्यासाठी त्यामुळे मला थोडा जास्त अवधी मिळाला. अखंड पडणाऱ्या पावसामुळे आम्ही कंटाळून गेलो होतो. हॉटेलच्या बाल्कनीत बसून कॅरम खेळण्याखेरीज आमच्यासमोर दुसरा पर्याय नव्हता.

त्यानंतर सप्टेंबर, २००६मध्ये मलेशियात आस्ट्रेलिया, वेस्ट इंडीज व भारत यांच्यात तिरंगी मालिका झाली. स्पर्धेच्या पहिल्याच सामन्यात मी वेस्ट इंडीजविरुद्ध दणदणीत शतक ठोकलं. मी काढलेल्या १४१ धावांमुळे माझ्यासमोरील दुखापतीच्या समस्यांना पूर्णविराम मिळाला होता. दुर्दैवाने पावसामुळे त्या सामन्यातील षटकं कमी करावी लागली आणि डकवर्थ-लुईस पद्धतीनुसार आम्हाला पराभव स्वीकारावा लागला.

पुनरागमन यशस्वी ठरल्यामुळे मी मनातून सुखावलो होतो. त्या स्पर्धेत मी एका तरी खेळाडूला नक्की धावबाद करेन, असं मी माझ्या सहकाऱ्यांना मोठ्या आत्मविश्वासाने सांगितलं होतं. दुखापतीतून मी नुकताच बरा झालो होतो. मी चेंडू जोरात फेकू शकणार नाही असाच सर्वांचा समज झाला होता. त्यामुळे माझ्याकडे चेंडू आला असताना प्रतिस्पर्धी संघातले खेळाडू चोरट्या धावा काढण्याचा धोका पत्करतील असा माझा अंदाज होता. नेमकं तसंच घडलं. मी थर्ड मॅनला उभा होतो. मला चेंडू फेकायला वेळ लागेल या हिशेबाने डॅमियन मार्टिनने धाव घेण्याचा प्रयत्न केला; पण माझ्या अचूक फेकीमुळे तो धावबाद झाला. माझा अंदाज खरा ठरल्याच्या आनंदात मी माझ्या सहकाऱ्यांकडे धावलो. सर्वांनी माझं उत्स्फूर्त अभिनंदन केलं!

आस्ट्रेलियाचा भारत दौरा, २००४ – बॉर्डर-गावसकर करंडक

पहिली कसोटी. बंगळुरू – ६ ते १० ऑक्टोबर, २००४

ऑस्ट्रेलिया ४७४ (एमजे क्लार्क १५१, एसी गिलख्रिस्ट १०४, एसएम कॅटिच ८१, जेएल लँगर ५२; एच सिंग ५-१४६, ए कुंबळे ३-१५७) व २२८ (डीआर मार्टिन ४५, एसएम कॅटिच ३९; एच सिंग ६-७८)

भारत २४६ (पीए पटेल ४६, एससी गांगुली ४५; जीडी मॅक्ग्रा ४-५५) व २३९ (आर द्रविड ६०, आयके पठाण ५५;

जेएन गिलेस्पी ३-३३)

आस्ट्रेलिया २१७ धावांनी विजयी

दुसरी कसोटी. चेन्नई – १४ ते १८ ऑक्टोबर, २००४

आस्ट्रेलिया २३५ (जेएल लँगर ७१, एमएल हेडन ५८; ए कुंबळे ७-४८) व ३६९ (डीआर मार्टिन १०४, एसी गिलख्रिस्ट ४९; ए कुंबळे ६-१३३, एच सिंग ३-१०८)

भारत ३७६ (व्ही सेहवाग १५५, एम कैफ ६४, पीए पटेल ५४; एसके वॉर्न ६-१२५, जेएन गिलेस्पी २-७०) व १९-०

सामना अनिर्णित

तिसरी कसोटी. नागपूर — २६ ते २९ ऑक्टोबर, २००४

आस्ट्रेलिया ३९८ (डीआर मार्टिन ११४, एमजे क्लार्क ९१, डीएस लेहमन ७०; झेड खान ४-९५, एम कार्तिक ३-५७) व ३२९-५ घोषित (एसएम कॅटिच ९९, डीआर मार्टिन ९७, एमजे क्लार्क ७३; झेड खान २-६४, एम. कार्तिक २-७४)

भारत १८५ (एम. कैफ ५५, **एसआर तेंडुलकर** ८; जेएन गिलेस्पी ५-५६, जीडी मॅक्ग्रा ३-२७) व २०० (व्ही सेहवाग ५८, एबी आगरकर ४४*, **एसआर तेंडुलकर** २; जेएन गिलेस्पी ४-२४)

आस्ट्रेलिया ३४२ धावांनी विजयी

चौथी कसोटी. मुंबई – ३ ते ५ नोव्हेंबर, २००४

भारत १०४ (आर द्रविड ३१*, **एसआर तेंडुलकर** ५; जेएन गिलेस्पी ४-२९, एनएम हॉरित्झ ३-१६, एमएस कास्पोराविझ २-११) व २०५ (व्हीव्हीएस लक्ष्मण ६९, **एसआर तेंडुलकर** ५५; एमजे क्लार्क ६-९, जीडी मॅक्ग्रा २-२९)

आस्ट्रेलिया २०३ (डीआर मार्टिन ५५; ए कुंबळे ५-९०, एम कार्तिक ४-४४) व ९३ (एमएल हेडन २४; एम सिंग ५-२९, एम कार्तिक ३-३२)

भारत १३ धावांनी विजयी

आस्ट्रेलिया मालिकेत २-१ विजयी

दक्षिण आफ्रिकेचा भारत दौरा, २००४

पहिली कसोटी. कानपूर – २० ते २४ नोव्हेंबर, २००४

दक्षिण आफ्रिका ५१०-९ घोषित (एजे हॉल १६३, झेडडे बुरयन ८३, एचएच डिप्पेनार ४८; ए कुंबळे ६-१३१) व १६९-४ (जीसी स्मिथ ४७; एम. कार्तिक २-१७, एच सिंग २-३९)

भारत ४६६ (व्ही सेहवाग १६४, जी गंभीर ९६, एससी गांगुली ५७, आर द्रविड ५४, **एसआर तेंडुलकर** ३; एजे हॉल ३-९३, एम एन्टिनी ३-१३५)

सामना अनिर्णित

दुसरी कसोटी. कोलकाता – २८ नोव्हेंबर ते २ डिसेंबर, २००४

दक्षिण आफ्रिका ३०५ (जेएच कॅलिस १२१, जेए रुडॉल्फ ६१; झेड खान ३-६४, आयके पठाण ३-७२) व २२२ (जीसी पठाण ७१, जेएच कॅलिस ५५; एच सिंग ७-८७, ए कुंबळे ३-८२)

भारत ४७१ (व्ही सेहवाग ८८, आर द्रविड ८०, **एसआर तेंडुलकर** २०; एम एन्टिनी ४-११२) व १२०-२ (आर द्रविड ४७*, **एसआर तेंडुलकर** ३२)

भारत ८ गडी राखून विजयी

भारत मालिकेत १-० विजयी

भारताचा बांगलादेश दौरा, २००४

पहिली कसोटी. ढाका – १० ते १३ डिसेंबर, २००४

बांगलादेश १८४ (एम अश्रफूल ६०*, एम रफिक ४७; आयके पठाण ५-४५) व २०२ (एमआय राणा ६९, एन इक्बाल ५४; आयके पठाण ६-५१)

भारत ५२६ (**एसआर तेंडुलकर** २४८*, एससी गांगुली ७१, जी गंभीर ३५, व्हीव्हीएस लक्ष्मण ३२)

भारत एक डाव व १४० धावांनी विजयी

दुसरी कसोटी. चित्तगाँग – १७ ते २० डिसेंबर, २००४

भारत ५४० (आर द्रविड १६०, जी गंभीर १३९, एससी गांगुली ८८, एच सिंग ४७, **एसआर तेंडुलकर** ३६; एम रफिक ४-१५६, एम मोर्तझा ३-६०)

बांगलादेश ३३३ (एम अश्रफूल १५८*, ए अहमद ४३; ए कुंबळे ४-५५,) व १२४

(फॉलो-ऑन) (टी जुबैर ३१; आयके पठाण ५-३२, **एसआर तेंडुलकर** १-२७)

भारत एक डाव व ८३ धावांनी विजयी

भारत मालिकेत २-० विजयी

पाकिस्तानचा भारत दौरा, २००५

पहिली कसोटी. मोहाली – ८ ते १२ मार्च, २००५

पाकिस्तान ३१२ (ए कमाल ९१, इंझमाम-उल-हक ५७, टी उमर ४४; एल बालाजी ५-७६) व ४९६-९ घोषित (के अकमल १०९, इंझमाम-उल-हक ८६, ए रझाक ७१, वाय योहाना ६८; एल बालाजी ४-९५, ए कुंबळे ४-१६०)

भारत ५१६ (व्ही सेहवाग १७३, **एसआर तेंडुलकर** ९४, व्हीव्हीएस लक्ष्मण ५८, आर द्रविड ५०; डी कनेरिया ६-१५०) व ८५-१

सामना अनिर्णित

दुसरी कसोटी. कोलकाता – १६ ते २० मार्च, २००५

भारत ४०७ (आर द्रविड ११०, व्ही सेहवाग ८१, **एसआर तेंडुलकर** ५२; ए रझाक ३-६२, एस आफ्रिदी ३-८०, डी कनेरिया ३-१३६) व ४०७-९ घोषित (आर द्रविड १३५, केडी कार्तिक ९३, **एसआर तेंडुलकर** ५२; ए रझाक ३-८०, एम सामी ३-८२, डी कनेरिया ३-१२३)

पाकिस्तान ३९३ (वाय खान १४७, वाय योहाना १०४; ए कुंबळे ३-९८) व २२६ (एस आफ्रिदी ५९, ए कमाल ५०; ए कुंबळे ७-६३)

भारत १९५ धावांनी विजयी

तिसरी कसोटी. बंगळुरू – २४ ते २८ मार्च, २००५

पाकिस्तान ५७० (वाय खान २६७, इंझमाम-उल-हक १८४; एच सिंग ६-१५२) व २६१-२ घोषित (वाय खान ८४*, वाय हमीद ७६, एस आफ्रिदी ५८; **एसआर तेंडुलकर** १-६२)

भारत ४४९ (व्ही सेहवाग २०१, व्हीव्हीएस लक्ष्मण ७९*, **एसआर तेंडुलकर** ४१; डी कनेरिया ५-१२७) व २१४ (जी गंभीर ५२, **एसआर तेंडुलकर** १६; एस आफ्रिदी ३-१३, ए खान २-२१, डी कनेरिया २-४६)

पाकिस्तान १६८ धावांनी विजयी

मालिका १-१ बरोबरी

श्रीलंकेचा भारत दौरा, २००५

पहिली कसोटी. चेन्नई – २ ते ६ डिसेंबर, २००५

भारत १६७ (व्ही सेहवाग ३६, **एसआर तेंडुलकर** २२; डब्ल्यूपीयूजेसी वास ४-२०, ए मुरलीधरन २-६०)

श्रीलंका १६८-४ (डीपीएमडी जयवर्धने ७१; ए कुंबळे ३-४१)

सामना अनिर्णित

दुसरी कसोटी. दिल्ली – १० ते १४ डिसेंबर, २००५

भारत २९० (**एसआर तेंडुलकर** १०९, व्हीव्हीएस लक्ष्मण ६९; एम मुरलीधरन ७-१००) व ३७५-६ घोषित (आयके पठाण ९३, वाय सिंग ७७*, आर द्रविड ५३, एमएस धोनी ५१*, **एसआर तेंडुलकर** १६)

श्रीलंका २३० (एमएस अट्टापट्टू ८८, डीपीएमडी जयवर्धने ६०; ए कुंबळे ६-७२, आयके पठाण ३-३४) व २४७ (एमएस अट्टापट्टू ६७, डीपीएमडी जयवर्धने ६७; ए कुंबळे ४-८५, एच सिंग ३-७०)

भारत १८८ धावांनी विजयी

तिसरी कसोटी. अहमदाबाद – १८ ते २२ डिसेंबर, २००५

भारत ३९८ (व्हीव्हीएस लक्ष्मण १०४, आयके पठाण ८२, एमएस धोनी ४९, **एसआर तेंडुलकर** २३; एसएल मलिंगा ३-११३, एम मुरलीधरन ३-१२८) व ३१६-९ घोषित (वाय सिंग ७५, एबी आगरकर ४८, **एसआर तेंडुलकर** १९; एचएमसीएम बंदारा ३-८४, एम मुरलीधरन ३-९०)

श्रीलंका २०६ (टीएम दिलशान ६५, केसी संगकारा ४१; एच सिंग ७-६२, ए कुंबळे २-८७) व २४९ (टीएम दिलशान ६५, डीपीएमडी जयवर्धने ५७, डब्ल्यूयू थरंगा ४७; ए कुंबळे ५-८९, एच सिंग ३-७९)

भारत २५९ धावांनी विजयी

भारत मालिकेत २-० विजयी

भारताचा पाकिस्तान दौरा, २००६

पहिली कसोटी. लाहोर – १३ ते १७ जानेवारी, २००६

पाकिस्तान ६७९-७ घोषित (वाय खान १९९, एम युसुफ १७३, एस आफ्रिदी १०३, के अकमल १०२*, एस मलिक ५९; एबी आगरकर २-१२२)

भारत ४१०-१ (व्ही सेहवाग २५४, आर द्रविड १२८*, नावेद-उल-हसन १-९४)

सामना अनिर्णित

दुसरी कसोटी. फैसलाबाद – २१ ते २५ जानेवारी, २००६

पाकिस्तान ५८८ (एस आफ्रिदी १५६, इंझमाम-उल-हक ११९, वाय खान ८३, एम युसुफ ६५; झेड खान ३-१३५, ए कुंबळे ३-१५०) व ४९०-८ घोषित (वाय खान १९४, एम युसुफ १२६, के अकमल ७८, झेड खान ४-६१)

भारत ६०३ (एमएस धोनी १४८, आर द्रविड १०३, व्हीव्हीएस लक्ष्मण ९०, आयके पठाण ९०, **एसआर तेंडुलकर** १४; डी कनेरिया ३-१५) व २१-०

सामना अनिर्णित

तिसरी कसोटी. कराची – २९ जानेवारी ते 1 फेब्रुवारी, २००६

पाकिस्तान २४५ (के अकमल ११३, ए रझाक ४५, एस अख्तर ४५; आयके पठाण ५-६१, आरपी सिंग ३-६६) व ५९९-७ घोषित (एफ इक्बाल १३९, एम युसुफ ९७, ए रझाक ९०, वाय खान ७७, एस आफ्रिदी ६०, आय फरहत ५७, एस

बट्ट ५३; ए कुंबळे ३-१५१)

भारत २३८ (वाय सिंग ४५, आयके पठाण ४०, **एसआर तेंडुलकर** २३, एम असिफ ४-७८, ए रझाक ३-६७) व २६५ (वाय सिंग १२२, **एसआर तेंडुलकर** २६; ए रझाक ४-८८, एम आसिफ ३-४८)

पाकिस्तान ३४१ धावांनी विजयी

पाकिस्तान मालिकेत १-० विजयी

इंग्लंडचा भारत दौरा, २००६

पहिली कसोटी. नागपूर – १ ते ५ मार्च, २००६

इंग्लंड ३९३ (पीडी कॉलिंगवुड १३४*, एएन कुक ६०; एस श्रीशांत ४-९५, आयके पठाण ३-९२) व २९७-३ घोषित (एएन कुक १०४*, केपी पीटर्सन ८७, एजे स्ट्रॉस ४६; आयके पठाण २-४८)

भारत ३२३ (एम कैफ ९१, डब्ल्यू जाफर ८१, ए कुंबळे ५८, **एसआर तेंडुलकर** १६; एमजे होगॉर्ड ६-५७) व २६०-६ (डब्ल्यू जाफर १००, आर द्रविड ७१, **एसआर तेंडुलकर** २८*, एसजे हार्मिसन २-४८, ए फ्लिंटॉफ २-७९)

सामना अनिर्णित

दुसरी कसोटी. मोहाली – ९ ते १३ मार्च, २००६

इंग्लंड ३०० (ए फ्लिंटॉफ ७०, केपी पीटर्सन ६४, जीओ जोन्स ५२; ए कुंबळे ५-७६, एमएम पटेल ३-७२) व १८१ (आयआर बेल ५७, ए फ्लिंटॉफ ५१; एमएम पटेल ४-२५, ए कुंबळे ४-७०)

भारत ३३८ (आर द्रविड ९५, आयके पठाण ५२, **एसआर तेंडुलकर** ४; ए फ्लिंटॉफ ४-९६) व १४४-१ (व्ही सेहवाग ७६*, आर द्रविड ४२*, एमजे होगार्ड १-२४)

भारत ९ गडी राखून विजयी

तिसरी कसोटी. मुंबई – १८ ते २२ मार्च, २००६

इंग्लंड ४०० (एजे स्ट्रॉस १२८, ओए शाह ८८, ए फ्लिंटॉफ ५०; एस श्रीशांत ४-७०, एच सिंग ३-८९) व १९१ (ए फ्लिंटॉफ ५०, ओए शाह ३८; ए कुंबळे ४-४९, एच सिंग २-४०)

भारत २७९ (एमएस धोनी ६४, आर द्रविड ५२, **एसआर तेंडुलकर** १, जेएम अँडरसन ४-४०, एमजे होगॉर्ड २-५४) व १०० (**एसआर तेंडुलकर** ३४; एसडी उडाल ४-१४, ए फ्लिंटॉफ ३-१४, जेएम अँडरसन २-३९)

इंग्लंड २१२ धावांनी विजयी

मालिका १-१ बरोबरी

१७.

एन्डुलकर

कॅरिबियनमधील २००७ची विश्वकरंडक स्पर्धा जिंकणं, हे माझं मुख्य ध्येय होतं. चार वर्षांपूर्वी आम्ही अंतिम सामन्यापर्यंत धडक मारली होती. अखेरचा अडथळा मात्र त्या वेळी आम्ही पार पाडू शकलो नव्हतो. या खेपेस काहीही करून आम्हाला विश्वविजेतेपद मिळवायचं होतं. भारतीय चाहत्यांच्याही अपेक्षा खूपच वाढल्या होत्या.

मार्चच्या सुरुवातीला आम्ही जमैकामध्ये नेदरलँड्स आणि वेस्ट इंडीजविरुद्ध दोन सराव सामने खेळलो. दोन्ही सामन्यात आमची कामगिरी छान झाली. नेदरलँड्सविरुद्धच्या पहिल्या मॅचमध्ये आम्ही पहिली फलंदाजी करत ३०० धावा काढल्या. त्या सामन्यात आम्ही १८२ धावांनी दणदणीत विजय मिळवला. त्यापुढच्या सामन्यात आमच्या गोलंदाजांनी वेस्ट इंडीजला केवळ ८५ धावांत गुंडाळलं. नऊ गडी राखून आम्ही ती मॅच जिंकली. स्पर्धेमधला आमचा पहिला साखळी सामना १७ मार्चला बांगलादेशबरोबर होता. आम्हाला हळूहळू आमची लय सापडत होती; पण त्याच वेळी आत्मसंतुष्ट राहून किंवा प्रतिस्पर्ध्यांना कमी लेखूनही चालणार नव्हतं. यापूर्वी बांगलादेशने अनेक बलाढ्य संघांना धूळ चारली होती.

पहिल्या मॅचमध्ये बऱ्याच गोष्टी आमच्याविरुद्ध घडत गेल्या. आम्ही फलंदाजी करत होतो तेव्हा खेळपट्टी चांगलीच ओलसर होती. पहिल्या १० षटकांत फटके मारणं खूपच अवघड जात होतं. बांगलादेशचा मध्यमगती गोलंदाज मशरफ मूर्तझा सुरेख गोलंदाजी करत होता. पहिल्या दोन विकेट्स झटपट पडल्यानंतर मी फलंदाजीसाठी उतरलो. त्या स्पर्धेत मी चौथ्या क्रमांकावर बॅटिंग करत होतो. संघ व्यवस्थापनाने मला तशी विनंती केली होती. व्यवस्थापनाने असा निर्णय का घेतला, याचं मलाच जरा आश्चर्य वाटलं होतं. कारण यापूर्वी २००३ विश्वचषक स्पर्धेच्या आधीही असाच निर्णय घेतला गेला होता; पण मी सलामीला आल्यानेच संघाचा अधिक फायदा होईल यावर त्यानंतर सर्वांचं एकमत झालं होतं. या वेळी मात्र संघ व्यवस्थापनाचं असं म्हणणं पडलं की, वेस्ट इंडीजमधल्या खेळपट्ट्या संथ असल्यामुळे त्यावर चेंडू खाली राहण्याची शक्यता अधिक असेल. त्यामुळे डावाच्या मध्यभागी मी फिरकी गोलंदाजांना अधिक कौशल्याने हाताळू शकेन; पण स्पर्धा सुरू झाल्यावर आमच्या लक्षात आलं की, तिथल्या खेळपट्ट्यांवर चेंडू उसळत होते व स्विंगही होत होते. आमचा अंदाज साफ चुकला होता. त्यामुळे आमचे डावपेच आमच्याच अंगाशी आले.

नव्या चेंडूची लकाकी जाईपर्यंत द्रुतगती गोलंदाजांना सावधपणे खेळणं हे मी माझ्यासमोरचं पहिलं उद्दिष्ट ठेवलं होतं. त्यानंतर हळूहळू धावगती वाढवायचा माझा विचार होता. त्याप्रमाणे सौरवने व मी सुरुवातीची स्विंग गोलंदाजी संयमाने खेळून काढली. फिरकी गोलंदाज आल्यावर मी आक्रमण करायचं ठरवलं. डावखुरा फिरकी गोलंदाज अब्दुल रज्ञाकचा एक चेंडू मी उजव्या यष्टीपासून किंचित मागे जात एक्स्ट्रॉ कव्हरच्या वरून मारायचा (इनसाइड-आउट) प्रयत्न केला. दुर्दैवाने चेंडू बॅटच्या आतल्या कडेला लागून पॅडवर आला आणि पॅडवरून स्टम्पांवर आदळला. स्पर्धेची सुरुवात माझ्यासाठी फारच निराशाजनक झाली.

त्या दिवशी एकही गोष्ट आमच्या मनाप्रमाणे घडत नव्हती. फक्त सौरवने चांगली फलंदाजी करत ६६ धावा केल्या. कर्णधार राहुल द्रविड केवळ १४ धावा काढू शकला. धोनी कट शॉट मारण्याच्या नादात शॉर्ट थर्ड मॅनच्या हातात झेल देऊन शून्यावर बाद झाला. आम्ही फक्त १९१ धावा करू शकलो. बांगलादेशचा सलामीचा फलंदाज तमिम इक्बालने चमकदार फलंदाजी करत संघाला चांगली सुरुवात करून दिली. अखेर बांगलादेशने आपलं लक्ष्य पाच गडी राखून पूर्ण केलं.

पहिल्या पराभवामुळे आम्ही सर्व काही गमावलं नव्हतं. उरलेल्या दोन मॅचेस मोठ्या फरकाने जिंकून अजूनही आम्ही

पुढची फेरी गाठू शकत होतो. त्या वेळी धावगती फार महत्त्वाची ठरणार होती. बर्म्यूडाबरोबर झालेल्या दुसऱ्या सामन्यात आम्ही चौफेर फटकेबाजी करत तो सामना २५७ धावांनी जिंकला. आम्ही काढलेल्या ४१३ धावांमुळे आमची निव्वळ धावगती चांगलीच वाढली होती. त्यामुळे पुढच्या फेरीत पोचण्यासाठी आता आम्हाला फक्त श्रीलंकेला हरवायचं होतं.

२३ मार्चला श्रीलंकेविरुद्ध झालेल्या सामन्यात आमची सुरुवात चांगली झाली. आम्ही श्रीलंकेला २५४ धावांत रोखू शकलो. लक्ष्य आमच्या आवाक्यातलं होतं; पण कसून प्रयत्न करूनही आम्हाला तो सामना अखेर गमवावा लागला. शीघ्रगती गोलंदाज दिल्हारा फर्नांडोचा चेंडू माझ्या बॅटच्या आतल्या कडेला लागून स्टम्पवर आला. चेंडू स्टम्पवर आदळल्याचा आवाज ऐकून मी खचून गेलो. निराश मनाने मी पॅव्हिलियनमध्ये परतलो. आमचे सर्व गडी १८५ धावांत बाद झाल्यावर ड्रेसिंग रूममध्ये भयाण शांतता पसरली. अनेक खेळाडूंना अश्रू आवरणं अवघड गेलं. बहुतेक जण स्तब्ध व सुन्न अवस्थेत उभे होते. मी बराच वेळ त्या निराश अवस्थेमधून बाहेर पडू शकलो नाही. माझ्या क्रिकेट कारकिर्दीतला तो अतिशय निराशादायक क्षण होता.

घरचा अहेर

आम्ही भारतात परतल्यावर प्रसारमाध्यमांनी माझा पिच्छा पुरवला. आपलीच माणसं जेव्हा आपल्या खेळाडूंच्या प्रामाणिकपणाबद्दल आणि बांधिलकीबद्दल शंका घेऊ लागतात तेव्हा मनाला क्लेश होतात. आमच्या अपयशाबद्दल टीका करण्याचा प्रसारमाध्यमांना नक्कीच अधिकार आहे; पण आम्ही खेळाकडे दुर्लक्ष केलं किंवा आम्ही बेफिकिरीने खेळलो असा आरोप करणं मात्र चुकीचं व अन्यायकारक होतं. आम्ही आमच्या चाहत्यांच्या अपेक्षा पूर्ण करण्यात निश्चितच कमी पडलो होतो; पण म्हणून कोणी आम्हाला देशद्रोही ठरवू शकत नव्हतं. कधीकधी लोकांच्या प्रतिक्रिया इतक्या तीव्र असायच्या की, खेळाडूंना आपल्या सुरक्षिततेची चिंता वाटू लागायची.

वर्तमानपत्रात जेव्हा 'एन्डुलकर' (तेंडुलकर संपला) असा मथळा छापून आला, तेव्हा मात्र मी कमालीचा दुखावला गेलो. १८ वर्षं आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळल्यानंतरही जेव्हा तुमच्यावर अशी जहरी टीका होते, तेव्हा तुमच्या सहनशक्तीची ती कसोटीच असते. माझ्या मनात तर क्रिकेटमधून निवृत्ती घ्यायचे विचारही येऊ लागले होते. त्या निराशेच्या काळात माझे कुटुंबीय व संजय नायकसारखे माझे मित्र खंबीरपणे माझ्या पाठीशी उभे राहिले. त्यांच्यामुळेच माझ्या मनाला पुन्हा उभारी आली. मी नियमितपणे धावायला सुरुवात केली. विश्वचषक स्पर्धेचा विचार मला डोक्यातून काढून टाकायचा होता.

या सर्व गदारोळात आमचे प्रशिक्षक ग्रेग चॅपेल यांनी तर कहरच केला. 'झालं गेलं विसरून पुन्हा नव्याने सुरुवात करा,' असा धीराचा सल्ला देण्याऐवजी ते आमच्या क्रिकेटच्या निष्ठेवरच जाहीरपणे शंका घेऊ लागले. त्यामुळे त्यांनी परिस्थिती अधिकच बिकट करून टाकली. माझ्या मते भारतीय संघाच्या अपयशाची व अव्यवस्थेची मुख्य जबाबदारी ग्रेग चॅपेल यांनी आपणहून उचलायला हवी होती. चॅपेल यांच्या अखत्यारीत भारतीय संघ दिशा हरवून बसला होता. बहुतेक खेळाडूंचं हेच मत होतं असं जर मी म्हटलं, तर ते फारसं चुकीचं ठरणार नाही.

एप्रिल, २००७मध्ये भारतीय क्रिकेट कंट्रोल बोर्डाने चॅपेल यांना प्रशिक्षक पदावरून दूर करण्याचा निर्णय घेतला. माझ्या मते हा निर्णय भारतीय क्रिकेटसाठी अत्यंत लाभदायक होता. चॅपेल यांची गच्छंती झाल्यामुळे संघातील अनेक ज्येष्ठ खेळाडूंनी सुटकेचा नि:श्वास सोडला. त्यांना तसं वाटणं साहजिकच होतं. चॅपेलनी ज्येष्ठ खेळाडूंना कधीही न्यायाने व सन्मानाने वागवलं नाही. ते असं का वागले ही गोष्ट खरोखरच अनाकलनीय होती. सौरवबद्दलचा त्यांचा दृष्टिकोन तर चकित करणारा होता. चॅपेल असं म्हणाले होते, ''सौरवमुळे जरी मला भारतीय संघाचं प्रशिक्षकपद मिळालं असलं, तरी त्याचा अर्थ असा नव्हे; की आयुष्यभर मी त्याच्यावर मेहेरबानी दाखवावी.'' चॅपेल यांच्या या वक्तव्याची अधिकृत नोंद झालेली आहे. स्पष्ट सांगायचं तर सौरवची गणना सर्वोत्कृष्ट भारतीय क्रिकेटपटूंमध्येच कायम केली जाईल. भारतीय संघात समावेश होण्यासाठी त्याला चॅपेल यांच्या मेहेरबानीची कधीच आवश्यकता भासली नव्हती.

संघामधून सर्व ज्येष्ठ खेळाडूंना वगळावं, असा चॅपेल यांचा आग्रह होता. चॅपेल यांच्या अशा वागण्याचा परिणाम

संघाच्या एकजुटीवर होत होता. एकदा त्यांनी व्हीव्हीएस लक्ष्मणला ''तू सलामीला फलंदाजी करण्यासाठी तयार रहा,'' असं सांगितलं. लक्ष्मणने त्यांना नम्रपणे नकार दिला. तो त्यांना म्हणाला, ''कारकिर्दीच्या पूर्वार्धात मी सलामीला फलंदाजी करण्याचा प्रयत्न केला होता. कारण त्या वेळी मी थोड्याशा गोंधळलेल्या अवस्थेत होतो; पण आता मी मधल्या फळीत स्थिरावलो आहे. त्यामुळे तुम्ही मधल्या फळीतील फलंदाज म्हणूनच माझा विचार करा.'' त्यावर ग्रेगनी त्याला जे उत्तर दिलं ते ऐकून आम्ही सारेच थक्क होऊन गेलो. ते लक्ष्मणला म्हणाले, ''तू नीट विचार करून निर्णय घे. बत्तिसाव्या वर्षी तुला संघात पुनरागमन करणं फारच अवघड जाईल.''

ग्रेग यांच्या आधी जॉन राइट आणि ग्रेगनंतर गॅरी कर्स्टन हे भारतीय संघाचे प्रशिक्षक होते. खेळाडूंना आनंदी व खूश ठेवण्यावर त्या दोघांनी अधिक भर दिला. ग्रेगना खेळाडूंच्या मानसिक स्वास्थ्याबद्दल काहीही देणं-घेणं नसायचं. एखाद्या रिंगमास्टरप्रमाणे ते स्वत:च्या कल्पना व विचार खेळाडूंवर लादत असत. ग्रेग चॅपेल यांना भारतीय संघाला नवा चेहरा मिळवून द्यायचा होता. त्यासाठी सर्व ज्येष्ठ खेळाडूंना काढण्याची त्यांना गरज वाटत होती. त्यांनी आपला हा विचार बीसीसीआयच्या अधिकाऱ्यांपाशी बोलून दाखवल्याचं मला नंतर समजलं होतं.

मला हेही आठवतं की, भारतीय संघ जेव्हा जेव्हा विजय मिळवत असे तेव्हा बसमध्ये किंवा हॉटेलमध्ये परतत असताना ते आवर्जून संघाच्या अग्रभागी राहायचे. मात्र जेव्हा आमचा पराभव होई, तेव्हा ते स्वत: मागे राहून खेळाडूंना पुढे ढकलत असत. एकूण जॉन व गॅरी यांची नेहमीच पडद्यामागे राहण्याची वृत्ती होती. चॅपेलना मात्र प्रसारमाध्यमांसमोर स्वत:चा टेंभा मिरवण्याची फार आवड होती.

विश्वचषक स्पर्धा सुरू होण्याच्या काही महिने आधी मला भेटण्यासाठी चॅपेल माझ्या घरी आले होते. ''राहुल द्रविडऐवजी तू कर्णधार हो,'' असं त्यांनी सुचवताच मी अक्षरश: दिङ्मूढ झालो होतो. अंजली माझ्यासोबत होती. ग्रेगच्या बोलण्याने तिलाही धक्का बसला. ते पुढे मला म्हणाले, ''तुला कर्णधारपद मिळवून द्यायची जबाबदारी मी घेतो. आपण दोघं मिळून पुढे कित्येक वर्षं भारतीय क्रिकेटची सूत्रं आपल्या हातात ठेवू शकतो.'' मी त्यांच्याकडे पाहतच राहिलो. क्रिकेटमधील सर्वोच्च स्पर्धा काही महिन्यांवर येऊन ठेपली होती. अशा वेळी प्रशिक्षकाने कप्तानाला पूर्ण पाठिंबा देणं अपेक्षित असतं, पण ग्रेगना मात्र आपल्या संघाच्या कप्तानाबद्दल यत्किंचितही आदर नसलेला पाहून मी थक्क झालो होतो. त्यांची सूचना मी साफ धुडकावून लावली. माझं मन वळवण्याचे सारे प्रयत्न असफल झाल्यावर ते काही वेळाने निघून गेले.

ग्रेग घरी येऊन गेल्यावर काही दिवसांनी मी बीसीसीआयच्या सदस्यांशी संपर्क साधला होता. 'विश्वचषक स्पर्धेच्या वेळी चॅपेल यांना संघाबरोबर न पाठवता भारतातच राहू द्यावं,' असं मी त्यांना सुचवलं होतं. संघामध्ये एकोपा ठेवण्याची जबाबदारी ज्येष्ठ खेळाडूंवर सोपवावी असंही मी त्यांना म्हटलं होतं; पण तसं घडू शकलं नाही. विश्वचषक स्पर्धेत भारताचा फज्जा उडाला.

ग्रेगनी त्यानंतर भारतीय संघाविषयी अनेक उलटसुलट विधानं केली आहेत. आता मात्र खरं काय घडलं ते सर्वांसमोर आणण्याची वेळ आली आहे. त्या वेळी 'गुरू ग्रेग' नावाचा एक अनुबोधपट ग्रेग यांच्यावर चित्रित होत होता. त्या अनुबोधपटात ग्रेग यांनी पडद्यामागच्या अनेक हकिकती त्यात बिनदिक्कतपणे उघड केल्या होत्या. प्रशिक्षकपदाच्या त्यांच्या कारकिर्दीमधील अनेक गोष्टींवर त्यात भाष्य केलं होतं. खेळाडूंना मात्र याची काहीही कल्पना नव्हती. खेळाडूंना विश्वासात घेऊन हे सर्व का केलं गेलं नाही? अनुबोधपटाच्या चित्रीकरणापूर्वी त्यांनी बीसीसीआयची परवानगी तरी घेतली होती का, याबद्दल मला शंका आहे. खेळाडूंच्या वैयक्तिक आयुष्यात केलेली ती ढवळाढवळ ठरत नव्हती का?

अर्थात या प्रश्नांची उत्तरं आपल्याला कधीच मिळू शकणार नाहीत. ग्रेग यांची प्रशिक्षकपदाची कारकीर्द हा मी अनुभवलेला अत्यंत वाईट कालखंड होता. २००७मध्ये एक संघ म्हणून आम्ही अपयशी ठरलो यात शंकाच नाही; पण चॅपेल यांच्या जुलमी व अरेरावी स्वभावामुळे आम्ही अधिकच निराश झालो होतो. त्यामुळे विश्वचषक स्पर्धेच्या दारुण पराभवानंतर भारतीय क्रिकेटची खूपच हानी झाली होती.

कुत्सित टीका

विश्वचषक स्पर्धेतील मानहानीकारक पराभवानंतर भारतात संतप्त वातावरण निर्माण झालं होतं. त्यात खेळाचा काहीही अनुभव नसलेले टीकाकार कित्येक मैल दूर बसून भारतीय क्रिकेटवर निर्दयपणे कोरडे ओढत होते. 'मी आरशात एकदा स्वत:ला नीट निरखावं आणि निवृत्ती जाहीर करावी' असंही मला कुत्सितपणे सुचवण्यात आलं. भारतीय वृत्तपत्रात अशा प्रतिक्रिया छापून आल्यावर क्रिकेट शौकिनांच्या हातातही आयतंच कोलीत मिळालं. इयान चॅपेलसारख्या केवळ क्रिकेटवर नियमित स्तंभ लिहिणाऱ्या व्यक्तीच्या मताला भारतीय वृत्तपत्रांनी ठळक प्रसिद्धी द्यावी, याचं मला सखेद आश्चर्य वाटलं. आपल्या माजी खेळाडूंनी जर रिकी पाँटिंग किंवा मायकेल क्लार्क यांच्यावर अशी टीका केली असती, तर मेलबोर्न एज आणि सिडनी मॉर्निंग हेराल्ड यांसारख्या वृत्तपत्रांनी त्यांची साधी दखल तरी घेतली असती का, याची मला शंका वाटते. चॅपेल यांनी आपलं लक्ष फक्त आस्ट्रेलियन क्रिकेटवर केंद्रित करायला हवं होतं.

२०१०मध्ये डर्बनला 'चँपियन लीग ट्वेंटी-२०' स्पर्धा होती. त्या स्पर्धेच्या दरम्यान इयान चॅपेल यांच्याशी माझी भेट झाली. आमचं संभाषण चांगलंच रंगलं. माझा फिजिओ, नितीन पटेलसोबत जिममधून बाहेर पडत असताना इयान चॅपेल अचानक माझ्यासमोर आले. त्या सर्व संभाषणाला नितीन पटेल साक्षी होता. ''एवढ्या अफाट धावा काढण्यामागचं तुझं रहस्य मला आज समजलं,'' अशी थट्टेच्या सुरात त्यांनी संभाषणाला सुरुवात केली. मी म्हटलं की, ''तुम्ही सोयीस्करपणे तुमचं मत आता बदलत आहात. २००७मध्ये आरशात निरखण्याबद्दल आणि निवृत्ती घेण्याबद्दल तुम्ही मला अनाहूत सल्ला दिला होता; पण मी तुमच्या बोलण्याकडे पूर्ण दुर्लक्ष केलं होतं. कारण मी काय करावं आणि अजून किती वर्षं क्रिकेट खेळावं हे माझं मला समजत होतं.''

''तुमच्यासारखे टीकाकार हे वारा येईल तशी पाठ फिरवतात,'' हेही मी त्यांना स्पष्टपणे सुनावलं. ''एखाद्या खेळाडूची जेव्हा खेळामध्ये चलती सुरू असते तेव्हा तुम्ही त्याच्यावर स्तुतिसुमनं उधळता, पण जेव्हा त्याच्या हातून मनासारखा खेळ होत नसतो, तेव्हा तुम्ही त्याच्यावर जहरी टीका करता. तो खेळाडू कोणत्या शारीरिक व मानसिक अवस्थेतून जातो आहे, हे मात्र तुम्हाला समजूनही घ्यावंसं वाटत नाही.'' त्यावर विषय बदलत त्यांनी विचारलं की, ''तू आता हलक्या वजनाची बॅट वापरायला सुरुवात केली आहेस का?'' मी म्हटलं, ''माझ्यात तसूभरही बदल झालेला नाही. २० वर्षांपूर्वी मी जे करत होतो, तेच आजही करतोय. मधल्या दोन वर्षांत (२००८ ते २०१०) माझ्या बॅटमधून धावांची बरसात होऊ लागल्याबरोबर तुम्ही मात्र सोयीस्करपणे तुमचं मत बदललं आहे.''

अखेर संभाषणात ग्रेग यांचा विषय आला. 'आमचे सर्व खेळाडू ग्रेग यांच्यावर अतिशय नाराज होते आणि त्यांना आमच्या ड्रेसिंग रूममध्ये पुन्हा कधीही पाहण्याची माझी इच्छा नाही,' अशा कडक शब्दात मी त्यांच्यापाशी माझं मत व्यक्त केलं. इयाननी त्यावर वाद घालण्याचा प्रयत्न केला. ''ग्रेगला पराभव पचवणं कधीच जमलं नाही,'' असं ते म्हणाले. तो आस्ट्रेलियाचा कर्णधार असतानाही अनेक वादग्रस्त घटना घडल्या होत्या. मी म्हटलं, ''त्याच्याशी मला काहीच कर्तव्य नाही. भारतीय क्रिकेटला पुढच्या स्तरावर नेण्यात ते पूर्ण अयशस्वी ठरले, एवढंच मला म्हणायचं आहे.'' माझं बोलणं ऐकून इयान चकित झाले होते. नितीन पटेल मला नंतर म्हणाला, ''मी इतका सडेतोड बोलेन अशी त्यानेही कधी अपेक्षा केली नव्हती.''

सुखावणारा फोन कॉल

२००७च्या विश्वचषक स्पर्धेनंतर माझी एकूणच शारीरिक व मानसिक अवस्था फारशी चांगली नव्हती. क्रिकेट खेळण्यातला आनंद मी हरवून बसलो होतो. माझ्या मनात निवृत्तीचे विचार येत होते; पण व्हिव्ह रिचर्ड्स यांच्या आश्वासक शब्दांनी मला धीर आला. ध्यानीमनी नसताना त्यांनी वेस्ट इंडीजमधून मला फोन केला. जवळजवळ ४५ मिनिटं आम्ही एकमेकांशी बोलत होतो. ''तुला अजून खूप वर्षं क्रिकेट खेळायचं आहे,'' असं त्यांनी मला ठामपणे सांगितलं. निवृत्तीचा

विचारही तू मनात आणू नकोस, अशीही त्यांनी मला आग्रहाची विनंती केली.

माझ्या वाढत्या वयात व्हिव्ह हे माझे हिरो होते. मी क्रिकेटमध्ये कितीही यश मिळवलं तरी ते अखेरपर्यंत माझे हिरोच राहतील. मधल्या काही वर्षांत आम्ही एकमेकांच्या खूपच जवळ येत गेलो. ते धाकट्या भावासारखं माझ्यावर प्रेम करतात. मलाही मोठ्या भावाइतकाच त्यांच्याबद्दल आदर वाटतो. त्यांचा सल्ला मला नेहमीच मौल्यवान वाटत आला आहे. त्यांच्याशी पाऊण तास सविस्तर चर्चा केल्यावर माझ्या मनावरचं मळभ दूर होऊन मी पुन्हा उत्साहाने मैदानात परतलो. २००८च्या सुरुवातीला सिडनी कसोटीत शतक झळकवल्यावर मी तत्परतेने व्हिव्हना फोन केला. अत्यंत महत्त्वाच्या क्षणी मला साथ दिल्याबद्दल मी त्यांचे मन:पूर्वक आभार मानले.

२००७ विश्वचषक स्पर्धेतील भारताचे सामने

आठवा सामना, 'ब' विभाग. बांगलादेश विरुद्ध भारत. पोर्ट ऑफ स्पेन. १७ मार्च, २००७
भारत १९१ (४९.३/५० षटकं); बांगलादेश १९२-५ (४८.३/५० षटकं)
बांगलादेश ५ गडी राखून विजयी (९ चेंडू बाकी)

बारावा सामना, 'ब' विभाग. बर्म्युडा विरुद्ध भारत. पोर्ट ऑफ स्पेन. १९ मार्च, २००७
भारत ४१३-५ (५०/५० षटकं) ; बर्म्युडा १५६ (४३.१/५० षटकं)
भारत २५७ धावांनी विजयी

विसावा सामना, 'ब' विभाग. भारत विरुद्ध श्रीलंका. पोर्ट ऑफ स्पेन. २३ मार्च, २००७
श्रीलंका २५४-६ (५०/५० षटकं) ; भारत १८५ (४३.३/५० षटकं)
श्रीलंका ६९ धावांनी विजयी

अंतिम सामना. आस्ट्रेलिया विरुद्ध श्रीलंका. ब्रिज टाउन. २८ एप्रिल, २००७
आस्ट्रेलिया २८१-४ (३८/३८ षटकं); श्रीलंका २१५-८ (३६/३६ षटकं लक्ष्य २६९)
आस्ट्रेलिया ५३ धावांनी विजयी (डकवर्थ-लुईस पद्धत)

१८.
असभ्य भाषा

मे, २००७मध्ये आम्ही बांगलादेशात गेलो. त्या दौऱ्यात आम्ही दोन कसोटी सामने खेळलो. विश्वचषक स्पर्धेत भारतीय क्रिकेटची गाडी घसरली होती. त्या गाडीला पुन्हा रुळावर आणण्याचं काम बांगलादेश मालिकेने केलं. भारताने ती मालिका १-० जिंकली. रवी शास्त्रीची त्या दौऱ्यावर हंगामी प्रशिक्षक म्हणून नियुक्ती झाली. कॅरिबियनमधील पराभवानंतर सर्वच खेळाडू हताश झाले होते. त्या निराशेतून आम्हाला बाहेर काढण्याचं महत्त्वपूर्ण काम रवीने केलं. रवी आल्यामुळे व्यक्तिश: मला खूपच बरं वाटलं होतं. रवीची आणि माझी जुनी मैत्री होती. माझ्या सुरुवातीच्या काळात आम्ही एकत्र क्रिकेट खेळलो होतो. निवृत्तीनंतर तो क्रिकेट समालोचन करू लागला. त्यामुळे दौऱ्यावरही अनेकदा मी त्याच्याशी चर्चा करत असे. रवीपाशी क्रिकेटचा गाढा अनुभव व कुशाग्र बुद्धी होती. त्याचा स्पष्टवक्तेपणा व पारदर्शक वृत्ती वाखाणण्यासारखी होती. अखेर ज्याच्याशी मोकळेपणाने बोलता येईल असा प्रशिक्षक आम्हाला लाभला होता.

जूनमध्ये दक्षिण आफ्रिकेविरुद्ध मर्यादित षटकांची मालिका खेळण्यासाठी आम्ही आयर्लंडला गेलो. आयर्लंडला जाण्याची मला विशेष उत्सुकता होती. कारण माझा आवडता रॉक बँड 'यु २' हा आयर्लंडचा होता. त्या मालिकेत आम्हाला एका वेगळ्याच आव्हानाला सामोरं जावं लागलं. आयर्लंडमध्ये गोठवणारी थंडी होती. त्या वातावरणाशी जुळवून घ्यायला आम्हाला थोडा वेळ लागला; पण प्रतिकूल हवामानातही मी चांगली बॅटिंग करू शकलो. तीन सामन्यांच्या मालिकेत मी दोन वेळा नव्वदीच्या घरात असताना बाद झालो. आम्ही दक्षिण आफ्रिकेला २-१ असं हरवलं.

त्या दौऱ्यात युवराजच्या बाबतीत घडलेला एक मजेशीर किस्सा मला अजूनही आठवतो. आम्ही बेलफास्टला होतो. रात्री आपण जपानी पदार्थ खायला जाऊ या, असं मी झहीर, युवराज व इतर काही जणांना सुचवलं. बराच शोध घेतल्यानंतर अखेर आम्हाला थाय, चायनीय व जॅपनीज पदार्थ बनवणारं रेस्टॉरंट सापडलं. आम्ही सुशी, सशिमी असे बरेच स्टार्टर्स मागवले. त्यांनी सुशीबरोबर 'वसाबी'ही (पातळ चटणीसारखी डिश) दिली. शिवाय इतर स्टार्टर्ससोबत ब्रेड रोल्सही होते.

''तुला वसाबी आवडते का,'' असं मी युवीला विचारलं. त्याने मोठ्या तोऱ्यात ''हो, आवडते,'' असं म्हटलं; पण आश्चर्य म्हणजे पुढच्या क्षणाला तो वसाबी चटणी ब्रेडवर बटरसारखी पसरवू लागला. तो ब्रेड खायला सुरुवात करणार इतक्यात मी त्याला थांबवलं. समोर झहीर गालातल्या गालात हसत होता. ''युवीला ब्रेड खाऊ दे, आपण त्याची मजा बघू,'' असं टेबलाखालून पायाने ढोसत तो मला खुणावत होता. वसाबीचा वास उग्र असतो व चवीला ती चांगलीच झणझणीत असते. युवीने तो रोल खाल्ला असता, तर वसाबीचा जहाल तिखटपणा त्याला झेपला नसता.

नंतर वसाबीवरून आम्ही युवीची चांगलीच टर उडवली. 'यापूर्वी तू कधीही वसाबी खाल्ली नव्हतीस हे कबूल कर,' अशी आम्ही त्याच्यावर जबरदस्ती करू लागलो; पण तो मुळीच बधला नाही. उसनं अवसान आणत त्याने शेवटपर्यंत उत्तर देण्याचं टाळलं.

भारताचा इंग्लंड दौरा, जुलै-ऑगस्ट, २००७

आयर्लंडच्या दौऱ्यानंतर आम्ही कसोटी व एकदिवसीय मालिका खेळण्यासाठी इंग्लंडला गेलो. १९ जुलै, २००७ला पहिली कसोटी सुरू झाली. केवळ नशिबानेच आम्ही त्या कसोटीत पराभव टाळू शकलो असं मी म्हणेन. मायकेल वॉनचा इंग्लिश संघ त्या सामन्यात अगदी मजबूत स्थितीत होता. अँडरसन व साइड बॉटम या दोघांनी मिळून नऊ गडी बाद केले होते.

पहिल्या डावात आम्ही केवळ २०१ धावा करू शकलो. केव्हिन पीटरसनच्या शैलीदार १३४ धावांमुळे इंग्लंडने दुसऱ्या डावात आमच्यासमोर ३८० धावांचं लक्ष्य ठेवलं. कसोटीच्या अखेरच्या दिवशी आमचे नऊ गडी बाद झाले होते. पराभव टाळण्यासाठी आम्ही झगडत होतो. अशा वेळी पंच स्टीव्ह बकनर यांनी श्रीशांतला नाबाद ठरवलं. खरंतर तो मधल्या यष्टीसमोर उभा असताना त्याच्या पॅडवर चेंडू लागला होता. त्यानंतर पावसामुळे खेळ थांबला आणि नशिबाने आमचा पराभव टळला.

एका आठवड्यानंतर नॉटिंगहॅमला दुसरा कसोटी सामना सुरू झाला. त्या मॅचमध्ये आम्ही सुरुवातीपासूनच चांगले खेळलो. पहिल्या दिवशी पावसामुळे खेळ लवकर थांबवावा लागला; पण त्याआधीच आम्ही इंग्लंडचा पहिला डाव २०० धावांच्या आत गुंडाळला होता. झहीर खान आणि अनिल कुंबळे यांना आरपी सिंग व श्रीशांत यांची साथ मिळाली होती. त्यानंतर आमच्या ४८१ धावा झाल्या. पहिल्या सहा फलंदाजांनी अर्धशतक पूर्ण केलं; पण एकालाही शतक पूर्ण करता आलं नाही. मी ९१ धावांवर बाद झालो. सायमन टॉफेलनी मला पायचीत बाद ठरवलं. खेळ संपल्यानंतर टॉफेल माझ्यापाशी आले. तुला पायचीत ठरवण्यात माझी चूक झाली, अशी प्रांजळ कबुली त्यांनी दिली. त्यांनी रिप्ले पाहिला होता. चेंडू यष्टींपासून खूपच दूर जात होता. सायमन यांनी दाखवलेल्या नम्रतेमुळे मला त्यांच्याबद्दल अधिकच आदर वाटू लागला. आजही आमची मैत्री टिकून आहे.

आमच्या पहिल्या इनिंग्जला थोडसं वादाचं स्वरूप आलं. झहीर खान फलंदाजीसाठी आला तेव्हा त्याचं विचित्र स्वागत करण्यात आलं. क्रीझवर जेली बीन्स पसरवून ठेवल्या होत्या. इंग्लिश खेळाडूंपैकी कुणीतरी झहीरची मुद्दाम चेष्टा केली होती. झहीरने सर्व जेली बीन्स काढून टाकल्या, पण झहीर पुन्हा स्ट्राइकवर येताच जेली बीन्स क्रीझवर पुन्हा प्रकटल्या होत्या. गलीमध्ये उभ्या असलेल्या केव्हिन पीटरसनला झहीर काहीतरी चिडून बोलला. अर्थात नक्की कोणी खोडी काढली होती, हे शेवटपर्यंत स्पष्ट झालं नाही. झहीर पॅव्हिलियनमध्ये परतला तेव्हा खूपच संतापला होता. ''आपण आक्रमक क्रिकेट खेळून इंग्लंडचा दुसऱ्या डावात धुव्वा उडवू या,'' असं तो तावातावाने म्हणाला. झहीरचा स्वभाव अतिशय शांत आहे. तो क्वचितच चिडतो. झहीरचा तो उद्रेक भारतीय संघासाठी लाभदायक ठरला. झहीरने बोलल्याप्रमाणे तुफानी गोलंदाजी केली. इंग्लंडच्या पाच विकेट्स घेत त्याने भारताला अविस्मरणीय विजय मिळवून दिला. त्यानंतर आम्ही ती मालिकाही १-० अशी जिंकली. आमचा खालावलेला खेळ बांगलादेशमध्ये सुधारला होता. इंग्लंडच्या विजयानंतर आम्हाला आमचा आत्मविश्वास परत मिळाला होता.

राजीव शुक्लांमुळे आम्हाला विजयाचा आनंद मनसोक्त लुटता आला. शुक्लाजी आमचे मॅनेजर होते. ते दौऱ्यावरचं वातावरण नेहमी उत्साही व हलकंफुलकं ठेवत. राजीवजी मॅनेजर असतानाच भारताने २००२च्या नॅटवेस्ट तिरंगी मालिकेत सनसनाटी विजय मिळवला होता. परदेशात आम्ही मिळवलेल्या अनेक विजयाच्या प्रसंगी ते संघासोबत होते. या खेपेस विजय साजरा करण्यासाठी ते आम्हाला 'फोर सीझन्स' या प्रसिद्ध रेस्टॉरंटमध्ये घेऊन गेले. आमच्यासाठी त्यांनी 'बॉम्बे ड्रीम्स' या ऑर्केस्ट्राचंही खास आयोजन केलं होतं. त्या संध्याकाळी आम्ही संगीताच्या दुनियेत हरवून गेलो होतो.

ऑक्टोबर, २००७मध्ये एकदिवसीय मालिका खेळण्यासाठी आस्ट्रेलियन संघ भारतात येणार होता. त्यानंतर काही महिन्यांनी आम्ही एक प्रदीर्घ मालिका खेळण्यासाठी आस्ट्रेलियाच्या दौऱ्यावर जाणार होतो. मागच्या काही महिन्यांपासून आमचा खेळ बहरू लागल्यामुळे त्या दोन्ही मालिकेत खेळण्यास आम्ही उत्सुक होतो. मधल्या काळात भारतीय संघाला फार मोठी उत्तेजना देणारी घटना घडली. सप्टेंबरमध्ये दक्षिण आफ्रिकेत आयोजित केलेली पहिली 'विश्व टी-२० स्पर्धा' एमएस धोनीच्या नेतृत्वाखाली भारताने जिंकली. मी अर्थातच त्या टीममध्ये नव्हतो, पण प्रत्येक सामना अतिशय उत्सुकतेने मी टीव्हीवर पाहिला. टी-२० स्पर्धा जिंकल्यामुळे भारतात पुन्हा क्रिकेटबद्दल उत्साही वातावरण निर्माण झालं. मायदेशात परतलेल्या विजयी वीरांचं भारतीय जनतेने धुमधडाक्यात स्वागत केलं.

भारताचा आस्ट्रेलिया दौरा, डिसेंबर २००७ ते जानेवारी २००८

२००७-२००८चा आस्ट्रेलिया दौरा हा माझ्या कारकिर्दीतील सर्वांत नाट्यमय दौरा ठरला. २००३-२००४च्या दौऱ्याच्या

वेळी मालिका जिंकण्याची संधी आमच्या हातून थोडक्यात निसटली होती. त्या मालिकेत दोन्ही संघांनी प्रत्येकी एक सामना जिंकला होता. सिडनीच्या शेवटच्या सामन्यात शेवटपर्यंत आमचंच वर्चस्व होतं. २००७-०८मध्ये आम्ही कामगिरी अधिकच उंचावली. मात्र अँड्र्यू सायमंड्स आणि हरभजन सिंग यांच्यात सिडनी कसोटीत झालेल्या वादामुळेच ती मालिका सर्वांच्या अधिक लक्षात राहिली आहे. त्याबरोबरच आणखीही काही वादग्रस्त मुद्दे उपस्थित झाल्याने तो दोन महिन्यांचा कालावधी सर्वांसाठीच तणावग्रस्त ठरला.

आस्ट्रेलियाला येताना सर्वांच्याच मनात आत्मविश्वास ठासून भरला होता. ऑक्टोबरमध्ये भारतात खेळली गेलेली एकदिवसीय मालिका आस्ट्रेलियाने ४-२ अशी जिंकली होती. त्यानंतर नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये तीन कसोटी खेळण्यासाठी पाकिस्तानी संघ भारतात आला होता. ती मालिका आम्ही १-० अशी जिंकली होती. आमचे बहुतेक सारे फलंदाज अतिशय उत्तम फलंदाजी करत होते. त्यामुळे आस्ट्रेलियातल्या पहिल्यावहिल्या मालिका-विजयाची स्वप्नं आम्ही पाहत होतो. दुर्दैवाने एमसीजीवरील पहिल्या कसोटीच्या आधी आम्हाला फक्त एकच सराव सामना खेळायला मिळणार होता. फारसे सराव सामने खेळायला न मिळणं ही अलीकडे प्रत्येक दौऱ्यामधली नित्याची बाब झाली होती. तो एकमेव सराव सामनाही अखेर वादळामुळे रद्द करावा लागला. त्यामुळे आस्ट्रेलियातील वातावरणाशी जुळवून घेण्यासाठी आम्हाला थोडाही वेळ मिळू शकला नाही.

पहिली कसोटी. मेलबोर्न – २६ ते २९ डिसेंबर, २००७

एमसीजी कसोटीच्या पहिल्या दिवशी आम्ही बऱ्यापैकी चांगली कामगिरी केली. आम्ही आस्ट्रेलियाचे नऊ गडी बाद केले. दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही त्यांचा डाव ३४३ धावांत झटपट गुंडाळला. अनिल व झहीरने प्रभावी गोलंदाजी केली. त्यानंतर सर्व मदार फलंदाजांवर होती. मी फलंदाजीला उतरलो तेव्हा

३१-२ अशी धावसंख्या होती.

मालिकेतील पहिला डाव कसा खेळायचा, यावर मी खूप विचार केला होता. प्रत्येक गोलंदाजाविरुद्ध खेळण्यासाठी मी मनात विशिष्ट योजना आखली होती. मालिकेतील माझ्या धावांचा आलेख पाहिला, तर मी मैदानाच्या कुठल्या भागात अधिक शॉट्स मारले हे कुणाच्याही सहज लक्षात येईल. मी लाँग ऑन व मिड विकेट या भागावर अधिक लक्ष केंद्रित केलं होतं. काही महिन्यांपूर्वी भारतात झालेल्या मालिकेत मी आस्ट्रेलियन गोलंदाजांचं बारकाईने निरीक्षण केलं होतं. त्यावरूनच मी ही आखणी केली होती. त्या मालिकेत डावखुरा चायनामन गोलंदाज ब्रॅड हॉगसमोर सर्वच फलंदाज अडखळत खेळले होते. या खेपेस मी हॉगवर हल्ला चढवायचं ठरवलं होतं. कारण हॉग निष्प्रभ ठरला असता, तर आस्ट्रेलियाला आपले डावपेच बदलावे लागले असते. शीघ्रगती गोलंदाजांना अधिक वेळ गोलंदाजी देण्यावाचून त्यांच्यासमोर पर्याय उरला नसता. आस्ट्रेलियन गरम हवामानात जास्त वेळ गोलंदाजी केल्यामुळे द्रुतगती गोलंदाजांची दमछाक झाली असती आणि दमलेल्या गोलंदाजांचा आम्हाला योग्य समाचार घेता आला असता. त्यामुळे हॉगला एका विशिष्ट पद्धतीने खेळायचं ठरवून मी मेलबोर्नच्या मैदानावर फलंदाजीसाठी उतरलो. मात्र, थोड्याच वेळात माझ्या लक्षात आलं की, आधी ठरवल्यापेक्षा वेगळ्या प्रकारे मला बॅटिंग करावी लागणार आहे. मी मैदानातच माझी योजना बदलली. एकूण क्षेत्ररचना पाहिल्यावर डीप मिड विकेट व लाँग ऑनवरून मी उंच फटके मारायला सुरुवात केली. त्यामुळे आस्ट्रेलियन कर्णधाराला माझ्याभोवती ठेवलेलं क्षेत्ररक्षक काढणं भाग पडलं. माझे डावपेच यशस्वी ठरले. माझ्या उजव्या बाजूला जवळपास कुणीही नसल्यामुळे मी भरपूर एकेरी धावा घेऊ शकलो. इतर गोलंदाजांच्या बाबतीत मात्र मी आधी आखलेली योजनाच अमलात आणली.

ब्रेट लीने त्या मालिकेत सर्वोत्तम गोलंदाजी केली. १९९९ सालच्या त्याच्या गोलंदाजीत तुफान वेग असला तरी अपरिपक्वपणाही खूप होता. २००८मध्ये मात्र सर्वोत्कृष्ट गोलंदाजाला लागणारे सर्व गुण त्याच्यापाशी दिसत होते. धडकी भरवणारा वेग, धोकादायक बाउन्सर, वेगात स्विंग होणारा चेंडू, चकित करणारा यॉर्कर आणि चकवणारा स्लो बॉल अशी सर्व

हत्यारं आता त्याच्यापाशी होती. तो सातत्याने ताशी १४५ कि.मी.च्या वेगाने गोलंदाजी करत होता. त्याला टक्कर देताना मला खूपच मजा आली. मिशेल जॉन्सननेही भेदक गोलंदाजी केली. स्टुअर्ट क्लार्कच्या बोलिंगमध्ये अचूकता होती. त्याने काही महत्त्वाच्या विकेट्सही घेतल्या.

त्या डावात मी सुरुवातीपासूनच सर्व गोलंदाजांवर आक्रमक हल्ला चढवला. मला छान लय सापडली होती. मोठी इनिंग्ज उभारण्याच्या दिशेने माझी वाटचाल सुरू होती; पण केवळ तुम्हाला लय सापडली म्हणून प्रत्येक वेळेस तुमचं शतक होऊ शकत नाही. मी ६२ धावा काढून बाद झालो. त्यानंतर आमचा डावही १९६ धावांत गडगडला. ती धावसंख्या फारच अपुरी होती. आस्ट्रेलियाने पाहता पाहता त्या सामन्यात वर्चस्व मिळवलं आणि अवघ्या चार दिवसांत सामना जिंकला. दौऱ्याच्या सुरुवातीलाच आमचा अपेक्षाभंग झाला.

चेहरा लपवण्याची वेळ!

मेलबोर्न कसोटीच्या दरम्यान मला ॲलर्जीचा प्रचंड त्रास झाला. आस्ट्रेलियाला येताना, सिंगापूर विमानतळावर मी व हरभजनने एक क्रीम विकत घेतलं होतं. ते क्रीम नुकतंच बाजारात आलं होतं. पहिले काही दिवस ते क्रीम वापरूनही मला काहीच त्रास झाला नव्हता; पण सामन्याच्या दिवशी मात्र चेहऱ्याची जळजळ होऊ लागली. सुरुवातीला मला वाटलं की, मी घेत असलेल्या मसाजशी त्याचा संबंध असावा. मसाज संपल्यावर मला चेहऱ्याखाली टॉवेल ठेवून पडून राहावं लागे. मला वाटलं, टॉवेल धुताना वापरलेल्या डिटर्जंटची ती रिॲक्शन असावी. क्रीम वापरून हरभजनला मात्र काहीच त्रास झाला नव्हता.

मॅचच्या तिसऱ्या दिवशी त्रास अधिकच वाढला. वेदना कमी होण्याच्या आशेने त्या रात्री मी चेहऱ्यावर नेहमीपेक्षा जास्त क्रीम लावून झोपलो. दुसऱ्या दिवशी सकाळी मात्र भगभगणाऱ्या चेहऱ्यामुळेच मला जाग आली. कुणीतरी माझा चेहरा जणू तापत्या भट्टीत ढकलून दिला होता. संध्याकाळी तर परिस्थिती हाताबाहेर गेली. चेहरा सुजून लालबुंद झाला. मला बाहेर पडणंही मुश्कील होऊन गेलं. मोठ्या गॉगलमागे मला चेहरा लपवावा लागला.

दुसऱ्या दिवशी अंजली सिडनीला पोचणार होती. मेलबोर्नचा कसोटी सामना चौथ्या दिवशीच संपला. अंजलीला व मुलांना विमानतळावर भेटण्यासाठी मी सिडनीला आधीच जायची परवानगी घेतली होती. माझा चेहरा पाहून ते तिघंही अक्षरश: हादरून गेले. माझ्या चेहऱ्याची अशी अवस्था का झालीय, हे त्यांना समजेना. मी काही फारशा चांगल्या मूडमध्ये नव्हतो. सगळ्यांना घेऊन मला लवकरात लवकर हॉटेलमध्ये पोचायचं होतं. ट्रॅफिकमुळे हॉटेलात पोचायला तब्बल ४५ मिनिटं लागली. माझी चिडचिड आणखीनच वाढली. त्यात आम्हाला रूम्स द्यायला हॉटेलच्या कर्मचाऱ्यांनी खूपच वेळ लावला. मी हॉटेलच्या मॅनेजरवर सगळा राग काढला. रूममध्ये जाईपर्यंत माझ्या चेहऱ्याची आग आणखीनच वाढली होती. मी अंजलीला म्हटलं की, ''तू मुलांना घेऊन एका खोलीत थांब. मी दुसऱ्या खोलीत विश्रांती घेतो.'' मी असा का वागतोय, हे बिचाऱ्या मुलांना समजेना. तोपर्यंत माझा त्रास खूपच वाढला होता. आम्ही स्वागत कक्षात फोन करून हॉटेलच्या डॉक्टरांना ताबडतोब माझ्या खोलीत पाठवायची विनंती केली; पण डॉक्टर उपलब्ध नसल्याचं आम्हाला सांगण्यात आलं. मी जवळच्या हॉस्पिटलचा पत्ता विचारून लगेच तिथे पोचलो. थोड्याशा तपासणीनंतर तिथल्या डॉक्टरांनी मला रात्री चेहऱ्यावर लावण्यासाठी एक मलम दिलं आणि दुसऱ्या दिवशी सकाळी पुन्हा यायला सांगितलं.

हॉँस्पिटलमधून येताना आम्हाला टॅक्सी मिळाली. टॅक्सीत बसल्यावर काही मिनिटांनी ड्रायव्हरने मला हिंदीत विचारलं, ''आप वही हो जो मैं समझ रहा हूँ।'' (मला जे तुम्ही आहात असं वाटतंय, तेच आहात ना तुम्ही?) मी 'हो' म्हटलं. तो खूश झाला. मी तुम्हाला सिडनीमधली प्रेक्षणीय स्थळ दाखवतो, असं तो मला म्हणाला; पण मी त्या मन:स्थितीत नव्हतो. 'आम्हाला एखादं फास्ट फूड सेंटर दाखव,' एवढीच मी त्याला विनंती केली. टॅक्सी एका दुकानापाशी उभी राहताच अंजली बर्गर्स आणायला बाहेर पडली. मी टॅक्सीतच बसून राहिलो. टॅक्सी ड्रायव्हरही तिच्यासोबत गेला. परतल्यावर अंजली म्हणाली की, बर्गर्सचे पैसे त्यानेच चुकते केले. हॉटेलमध्ये पोचल्यावर त्याने टॅक्सी भाडं घ्यायलाही नकार दिला. 'सिडनीत असेपर्यंत

कधीही गरज लागली तर मला बोलवा,' असं सांगत आपला फोन नंबर त्याने मला दिला. त्याने दाखवलेल्या सौजन्याने मी भारावून गेलो होतो. ''तुझ्यासाठी मी हॉटेलच्या स्वागत कक्षात मॅचची तिकिटं ठेवून देतो,'' असं मी त्याला सांगितलं. नंतर कसोटी सामन्यात वापरायच्या माझ्या एका शर्टावर मी टीममधल्या माझ्या प्रत्येक सहकाऱ्याची स्वाक्षरी घेतली. मॅचच्या तिकिटांसोबत तो शर्टही मी त्या टॅक्सी ड्रायव्हरसाठी ठेवून दिला.

दुसऱ्या दिवशी सकाळी मी पुन्हा हॉस्पिटलमध्ये गेलो. डॉक्टरांना म्हटलं, ''तुम्ही काहीही करून माझ्या वेदना कमी करा. उद्या मला कसोटी सामना खेळायचा आहे.'' माझी एकूण स्थिती पाहून डॉक्टरांना माझ्या बोलण्याचं आश्चर्यच वाटलं, पण काही झालं तरी मॅच खेळण्याचा माझा निर्धार होता. त्या दिवशी दुपारी सर्व जण मैदानात सराव करत होते; पण मी उन्हात उभाच राहू शकत नव्हतो. त्या वेळी मला सुब्रतो बॅनर्जीची मदत झाली. सुब्रतो भारताचा माजी द्रुतगती गोलंदाज होता. तो सिडनीमध्ये स्थायिक झाला होता. त्याच्या गोलंदाजीवर मी इनडोअर नेट्समध्ये ४५ मिनिटं बॅटिंगचा सराव केला. दुसऱ्या दिवशी मी क्षेत्ररक्षणासाठी मैदानावर उतरू शकलो. त्या दिवशी मी प्रथमच पांढरी कापडी हॅट घातली. तेव्हापासून ती हॅट मैदानावरची माझी पक्की ओळख होऊन बसली. मैदानात उतरण्यापूर्वी मी कापडात बर्फ गुंडाळून तो चेहऱ्यावर हलक्या हाताने फिरवला. त्यानंतर त्यावर जस्ताच्या क्रीमचा (झिंक क्रीम) लेप लावला. क्रीम लावलेला माझा चेहरा फारच विचित्र दिसत होता. पण मला त्याची पर्वा नव्हती.

एक-दोन दिवसांत मला हळूहळू बरं वाटलं आणि माझा चेहरा पुन्हा माणसासारखा दिसू लागला.

दुसरी कसोटी. सिडनी – २ ते ६ जानेवारी, २००८

सिडनी कसोटीच्या आदल्या दिवशी आम्हाला मोठाच धक्का बसला. टाचेच्या दुखापतीमुळे झहीरला भारतात परतावं लागलं. एकाचा तोटा हा दुसऱ्याचा लाभ ठरतो. झहीरला जावं लागल्यामुळे तरुण इशांत शर्माला आस्ट्रेलियात प्रथमच खेळायची संधी मिळाली.

पहिल्या दिवशी आम्ही फारच छान सुरुवात केली. अवघ्या १३४ धावांत आम्ही आस्ट्रेलियाचे सहा गडी तंबूत पाठवले. त्यातल्या चार विकेट्स आरपी सिंगला मिळाल्या होत्या. आम्ही फलंदाजांवर पूर्ण नियंत्रण ठेवलेलं असताना अचानक पारडं आस्ट्रेलियाच्या बाजूने फिरलं. आमच्या मते पंच स्टीव्ह बकनर यांच्या हातून झालेली एक चूक त्याला कारणीभूत ठरली. इशांतच्या गोलंदाजीवर अँड्र्यू सायमंड्सच्या बॅटच्या कडेला लागलेला चेंडू धोनीच्या हातात गेला; पण बकनरनी सायमंड्सला नाबाद ठरवलं. चेंडू बॅटच्या कडेला लागल्याचा आवाज केवळ खेळाडूंनीच नव्हे; तर प्रेक्षकांनीही ऐकला होता. स्टेडियममध्ये बसलेल्या माझ्या मुलालाही तो आवाज स्पष्ट ऐकू आला होता. आजही जेव्हा सिडनी कसोटीचा विषय निघतो, तेव्हा ती गोष्ट तो दरवेळी ऐकवतो. सायमंड्सने मात्र नशिबाने मिळालेल्या त्या जीवदानाचा पुरेपूर फायदा उठवत शतक झळकवलं. त्याने काढलेल्या १६२ धावांमुळे सामन्याचं स्वरूपच पालटून गेलं. एका वेळी संकटात सापडलेला आस्ट्रेलियन संघ अखेर ४६३ धावसंख्येपर्यंत मजल मारू शकला. आस्ट्रेलिया त्या डावात फक्त एकदाच नशीबवान ठरली नव्हती. सायमंड्सला नशिबाची साथ मिळण्याआधी दुसरे पंच मार्क बेन्सन यांनी रिकी पाँटिंगलाही नाबाद ठरवलं होतं. खरंतर उजव्या यष्टीबाहेर पडलेला चेंडू पाँटिंगच्या बॅटेची कड घेऊन क्षेत्ररक्षकाच्या हातात गेला होता.

मोठी धावसंख्या उभारणं हे एकच उत्तर आम्ही त्यांना देऊ शकत होतो. मेलबोर्नला हुकलेलं शतक सिडनीला पूर्ण करत मी त्या डावात १५४ धावा काढल्या. लक्ष्मणने माझ्याबरोबरच दुसऱ्या बाजूने खेळत शतक झळकवलं. राहुल व सौरवनेही त्या डावात धावांचा पन्नाशीचा टप्पा ओलांडला. सामना पुन्हा आमच्या बाजूने फिरला होता. हरभजन माझ्या जोडीला आला. तोही छान बॅटिंग करत होता. एवढ्यात अँड्र्यू सायमंड्सने उगाचच हरभजनला छेडण्यास सुरुवात केली.

भज्जीच्या त्या वेळी ५० धावा झाल्या होत्या. अँड्र्यू सायमंड्स मला भडकवतोय, असं तो माझ्यापशी दोन-तीनदा बोलला. मी त्याला म्हटलं, ''तू अजिबात संयम सोडू नकोस आणि शांतपणे बॅटिंग करत रहा.'' कारण भज्जीला चिडवून ते त्याला बळीचा बकरा बनवू पाहातायत, हे मी ओळखून होतो. अशा वेळी प्रतिस्पर्ध्यांच्या चिथावणीकडे दुर्लक्ष करणंच

श्रेयस्कर असतं; पण ही गोष्ट बोलायला सोपी असली तरी अशा तणावाच्या क्षणी स्वत:च्या मनाचा तोल न ढळू देणं खूपच अवघड असतं.

भज्जी शांत राहण्याचा आटोकाट प्रयत्न करत होता. इतर आस्ट्रेलियन खेळाडूंशी तो अतिशय सभ्यपणे व खेळीमेळीने वागत होता, पण एका क्षणी मात्र त्याचाही संयम सुटला व शाब्दिक स्फोट झाला. एका चेंडूवर भज्जीने धाव पूर्ण केली व सहज गमतीने त्याने ब्रेट लीच्या पाठीवर चापट मारली. मिड ऑफला उभ्या असलेल्या सायमंड्सला भज्जीच्या त्या वागण्याचा खूपच राग आला. प्रतिस्पर्धी संघातील खेळाडूने लीची उगाचच केलेली मस्करी त्याला सहन झाली नाही. तो जोरजोरात भज्जीला वाट्टेल तसा बोलू लागला. भज्जी स्वभावाने अतिशय भावनाप्रधान व शीघ्रकोपी आहे. सायमंड्सवर तो कोणत्याही क्षणी प्रतिहल्ला करणार, हे मला अपेक्षितच होतं आणि त्याने तो तसा लगेच केलाही. सायमंड्स भज्जीच्या गाजलेल्या विवादाला तिथेच खरी सुरुवात झाली. त्यानंतर ते प्रकरण इतकं भडकलं की, त्यामुळे दौरा रद्द करण्याची वेळ आली.

इथे एक गोष्ट मला स्पष्टपणे नमूद करावीशी वाटते की, सायमंड्सने भज्जीला आधी बराच वेळ चिथावण्याचा प्रयत्न केल्यामुळेच तो प्रसंग उद्भवला. कारण त्यानंतर दोघांमध्ये बाचाबाची होणं स्वाभाविक होतं. भज्जीला शांत करण्यासाठी मी त्याच्यापाशी जात असताना त्याने सायमंड्सला उद्देशून 'तेरी माँ की...' हे शब्द उच्चारलेले मी ऐकले. भज्जी हा उत्तर भारतीय आहे. उत्तर भारतामधील कोणाही चिडलेल्या व्यक्तीच्या तोंडी हे शब्द अगदी सहजपणे येतात. खेळामध्येही असे प्रसंग अनेकदा घडतात. मला त्यात काही वावगं वाटलं नाही; पण इतक्यात पंच मार्क बेन्सन भज्जीला समज देताना पाहून मात्र मला आश्चर्य वाटलं. त्याच वेळी काही आस्ट्रेलियन खेळाडू भज्जीभोवती जमा झाले. 'तू बोललेले शब्द तुला महागात पडतील,' असं म्हणत ते त्याला धमकावू लागले. भज्जीला बिथरवून त्याचं लक्ष विचलित करावं, हाच त्यांचा हेतू असावा, असं मला वाटलं. त्यांचा डाव सफलही झाला. भज्जी त्यानंतर काही वेळातच ६३ धावा काढून बाद झाला.

भज्जी बाद झाल्यानंतर तो विषय संपला असेल असं मला वाटलं होतं; पण त्या दिवशी खेळ संपल्यावर आस्ट्रेलियाने भज्जीविरुद्ध अधिकृत तक्रार दाखल केल्याचं मला समजलं. भज्जी सायमंड्सला उद्देशून 'मंकी' (माकड) म्हणाला असं त्या लेखी तक्रारीत म्हटलं होतं. हा वंशभेदावरून केलेला अपमान आहे असं त्यांचं म्हणणं होतं. आस्ट्रेलियन संघाने इतक्या घाईघाईने तक्रार केल्याचं पाहून मला आश्चर्य वाटलं होतं. मला नंतर समजलं की, ऑक्टोबर, २००७च्या आस्ट्रेलियाच्या दौऱ्यात मुंबईमध्येही असाच एक प्रसंग घडला होता. त्या वेळी वंशभेदाच्या संदर्भात कोणीही वक्तव्य केल्यास ते प्रकरण मॅच रेफ्रीकडे सोपवावं असं दोन्ही देशांच्या पदाधिकाऱ्यांमध्ये ठरलं होतं; पण असं असूनही राईचा पर्वत करण्याची गरज नव्हती, असंच माझं मत होतं. पाँटिंगने लेखी तक्रार करण्याआधी कर्णधार अनिल कुंबळे, हरभजन सिंग व भारतीय संघ व्यवस्थापनाशी चर्चा केली असती, तर प्रकरण एवढं चिघळलं नसतं. माइक प्रॉक्टरनीही ते प्रकरण अधिक समजूतदारपणे हाताळायला हवं होतं, असंही मला वाटतं.

तिसऱ्या दिवसाचा खेळ संपल्यानंतर माइक प्रॉक्टरनी आम्हाला कळवलं की, आस्ट्रेलियाने केलेल्या लेखी तक्रारीची रीतसर सुनावणी चौथ्या दिवसाअखेर केली जाईल. अखेर सुनावणी मॅचच्या शेवटच्या दिवशी केली गेली. एकूणच त्या प्रकरणामुळे आम्ही विसकटलेल्या मन:स्थितीत तो सामना खेळलो. 'भज्जीने आपल्याला वांशिक भेदावरून अपशब्द वापरले' – हा सायमंड्सचा झालेला समज निश्चितच दु:खदायक होता. पण त्याच वेळी भज्जीला होणारा मानसिक त्रासही तितकाच क्लेशदायक होता. आमच्या मते भज्जीने केवळ जशास तसं उत्तर दिलं होतं. भारत-आस्ट्रेलिया क्रिकेट मॅचमध्ये असे प्रसंग नेहमीच घडत आले होते; मात्र काही झालं तरी दुसऱ्या क्रिकेटपटूचा वंशभेदावरून अपमान करण्याचा त्याचा नक्कीच हेतू नव्हता.

त्या वादामुळे कसोटी सामन्याचं सगळं वातावरण झाकोळून गेलं. मॅचच्या पाचव्या दिवशी आम्ही सावधपणे फलंदाजी करत सामना वाचवण्याचा प्रयत्न करत होतो. आम्ही ती मॅच अनिर्णितही ठेवू शकलो असतो; पण पंचांनी केलेल्या चुकांमुळे आणि काही आस्ट्रेलियन खेळाडूंच्या अखिलाडूवृत्तीमुळे आमचे बेत तडीस गेले नाहीत.

राहुल द्रविडच्या ३८ धावा झाल्या असताना पंच बकनरनी त्याला सायमंड्सच्या गोलंदाजीवर बाद ठरवलं. वास्तविक यष्टिरक्षकाने झेल घेतला, तेव्हा राहुलची बॅट चेंडूपासून खूपच दूर राहिली होती. ॲडम गिलख्रिस्ट त्या वेळी स्टम्प्सच्या अगदी जवळ उभा होता. चेंडूने बॅटला स्पर्श केलेला नाही, हे त्याला नक्कीच समजलं होतं. एरवी स्वत: बाद झालेला असताना पंचांच्या निर्णयाची वाट न पाहता पॅव्हिलियनमध्ये परतण्याची त्याची ख्याती होती; पण त्यानेही झेल घेतल्याचं अपील केलं. आश्चर्य म्हणजे पंचांचं बोट दुसऱ्याच क्षणी वर गेलं. तो अत्यंत धक्कादायक निर्णय होता. राहुलला कदाचित पायचीत बाद दिलं असावं, असाही आमच्यापैकी काही जणांचा समज झाला होता.

काही षटकांनंतर पंच बेन्सन यांनी सौरवला बाद ठरवलं. सौरवचा झेल घेतल्याचं मायकेल क्लार्क व रिकी पॉंटिंग यांनी जोरदार अपील केलं. खरंतर तो चेंडू आधी गवताला स्पर्श करून नंतर स्लिपमधील क्षेत्ररक्षकाच्या हातात गेला होता. बकनरनी त्यानंतर आणखी एक चूक केली. चेंडू स्टम्प्सवर जाण्याची शक्यता नसतानाही त्यांनी धोनीला पायचीत बाद दिलं. त्या दिवशी प्रत्येक निर्णय आमच्याविरुद्ध गेला.

अखेर पाचव्या दिवसाचा थोडाच खेळ बाकी असताना आस्ट्रेलियाने मॅच जिंकली. भज्जीच्या सुनावणीसाठी आम्हाला मैदानातच थांबण्याच्या सूचना देण्यात आल्या. त्याही परिस्थितीत मीच सर्वप्रथम जाऊन आस्ट्रेलियन खेळाडूंचं अभिनंदन केलं. एका महत्त्वाच्या घटनेबद्दल साक्ष देण्याआधी आम्हाला मैदानातच ताटकळत उभं राहावं लागणं ही काही योग्य गोष्ट नव्हती, एवढंच मी इथे नमूद करू इच्छितो.

सुनावणीची पद्धत मला फारच विचित्र वाटली. आस्ट्रेलियन व भारतीय खेळाडूंना साक्ष देण्यासाठी वेगवेगळ्या वेळी बोलावण्यात आलं. दोन्ही संघाच्या खेळाडूंना एकाच वेळी एकाच रूममध्ये बोलावलं गेलं नाही. त्यामुळे दोन्ही संघातील तेढ कमी करण्याचा प्रयत्नच झाला नाही. भज्जीबरोबर त्या वेळी मी बॅटिंग करत असल्यामुळे त्या घटनेचा मी मुख्य साक्षीदार होतो. मी घडलेला प्रसंग रेफ्रीला सविस्तरपणे सांगितला. भज्जीव्यतिरिक्त त्या दौऱ्यावरचे आमचे मॅनेजर चेतन चौहान, मीडिया मॅनेजर एम.व्ही. श्रीधर आणि कर्णधार अनिल कुंबळे यांचीही साक्ष घेण्यात आली.

माइक प्रॉक्टरना आमची बाजू पटली नसावी. आश्चर्य म्हणजे त्यांनी आम्हाला ड्रेसिंग रूममध्ये मध्यरात्रीपर्यंत ताटकळत ठेवलं. रात्री दोन वाजता आम्हाला हॉटेलात परतण्याची परवानगी देण्यात आली. मालिकेवर त्या विवादाचं हळूहळू सावट पडू लागलं. सुनावणीनंतर दोन्ही संघातील कटुता अधिकच वाढली. आमच्या मनात मात्र आमचा विश्वासघात झाल्याची भावना निर्माण झाली.

न्यायासाठी लढा

सिडनी कसोटीनंतर तिसऱ्या दिवशी आम्ही प्रथम दर्जाचा सामना खेळण्यासाठी कॅनबेराला निघण्याच्या तयारीत होतो. तेवढ्यात भज्जीला तीन सामन्यांसाठी निलंबित केल्याची बातमी आमच्या कानावर आली. आता मात्र आमची सहनशक्ती संपली होती. हा निर्णय आम्हाला पूर्णपणे अमान्य होता. आम्ही त्या निर्णयाविरुद्ध ठाम भूमिका घ्यायचं ठरवलं. रेफ्रीने सुनावलेल्या शिक्षेशी आम्ही सहमत नव्हतो. मॅचनंतर घेतलेली साक्ष व सुनावणी म्हणजे निव्वळ एक फार्स होता, असं आम्हाला वाटू लागलं. खेळाडूंच्या भावना आम्ही ताबडतोब बीसीसीआयला कळवल्या. या निर्णयाविरुद्ध नेमकी कशी पावलं उचलायची, हे ठरवण्यासाठी आम्ही लगेच एक बैठक घेतली.

मी व अनिल कुंबळेने याबाबतीत पुढाकार घेतला. भज्जीच्या निलंबनावर शिक्कामोर्तब झालं, तर दौऱ्यावर बहिष्कार घालण्याचा निर्णय एकमताने घेतला गेला. अनिल हा स्वभावाने अत्यंत नम्र व विनयशील असला तरी तो मनाने अतिशय खंबीर व करारी आहे. या विवादाच्या प्रसंगी त्याने घेतलेल्या कणखर भूमिकेमुळे मला त्याच्याबद्दल वाटणारा आदर अधिकच वाढला. भज्जीच्या निलंबनाविरुद्ध आम्ही रीतसर आव्हान देण्याचं ठरवलं. त्याचबरोबर कॅनबेराला न जाण्याचाही आम्ही निर्णय घेतला. तोपर्यंत खरंतर आमचं सामानही बसमध्ये चढवलेलं होतं, पण आता कडक शब्दांत सुनावण्याची आणि कठोर कृती करण्याची वेळ आली होती.

बीसीसीआय आमच्या पाठीशी भक्कमपणे उभी राहिली. भज्जीच्या निलंबनाविरुद्ध अधिकृतपणे दाद मागण्यात आली. भारताचे प्रख्यात कायदेतज्ज्ञ व्ही.आर. मनोहर हे आमची केस लढवत होते. आम्ही सतत त्यांच्या संपर्कात होतो आणि त्यांना हवे असलेले सारे तपशील पुरवत होतो. भज्जीवरील निलंबनाची कारवाई आम्ही फार गांभीर्याने घेतली होती, हे मुद्दाम मला पुन्हा सांगावंसं वाटतं. भज्जीच्या निलंबनावर शिक्कामोर्तब झालं असतं, तर आम्हाला आमच्यावरचा आरोप कबूल आहे असा त्याचा अर्थ झाला असता. म्हणजेच भज्जीने सायमंड्सला वंशभेदावरून अपशब्द वापरले हेही त्यामुळे सिद्ध झालं असतं; पण भज्जीने तसं काही केलंच नव्हतं. दौरा रद्द करण्याच्या परिणामांचीही आम्हाला जाणीव होती. आयसीसी भारतीय क्रिकेटसंघावर कायमची बंदी घालू शकत होती, पण प्रश्न आता भज्जीपुरताच मर्यादित राहिला नव्हता. वादाने खूपच गंभीर स्वरूप धारण केलं होतं. आपला अपमान आणि उपेक्षा झाल्याची भावना जगभर पसरलेल्या प्रत्येक भारतीय व्यक्तीच्या मनाला डसत होती. आता आम्ही गप्प बसू शकत नव्हतो. न्यायासाठी लढणं हे आमचं प्रथम कर्तव्य होतं.

इतका गंभीर निर्णय घेतल्यानंतर मनावरचा ताण हलका करणंही तितकंच आवश्यक होतं. आम्ही बाँडी बीचवर जाऊन व्हॉलीबॉल खेळलो. त्याचा सर्वांवर जादुई परिणाम झाला. आम्ही सर्व जण अधिकच जवळ आलो. अन्यायाविरुद्ध लढण्याच्या आमच्या निर्धारालाही त्यामुळे अधिक बळ मिळालं. प्रसारमाध्यमं आणि पत्रकार मंडळी तर सतत आमच्या व विशेषत: भज्जीच्या मागावर होती. मी तर भज्जीला गमतीने म्हणायचो की, ''मायकेल जॅक्सननंतर लोकप्रियतेत तुझाच दुसरा नंबर लागतो!'' सतत त्याच्याभोवती कॅमेरे लागलेले असायचे. त्या काळात मी त्याला 'एमजे' (मायकेल जॅक्सन) हेच टोपण नाव ठेवलं होतं.

तिसरी कसोटी. पर्थ – १६ ते १९ जानेवारी, २००८

भज्जीच्या निलंबनाला अधिकृत आव्हान दिल्यानंतर आम्ही पर्थची तिसरी कसोटी खेळण्याचं मान्य केलं. दोन्ही संघातील तंग वातावरण निवळवण्यासाठी आयसीसीने आपले ज्येष्ठ रेफ्री रंजन मदुगल्ले यांना खास पर्थला पाठवलं. रंजन यांच्या उपस्थितीत 'हयात हॉटेल'मध्ये दोन्ही कर्णधारांची बैठक घेण्यात आली. शेकडो कॅमेऱ्यांच्या झगमगाटात अनिल व रिकीने एकमेकांशी हस्तांदोलन केलं; पण त्यातून काहीही निष्पन्न झालं नाही. सिडनीमध्ये दोन संघांत आलेलं वितुष्ट इतकं सहज वितळणं शक्य नव्हतं. वाका खेळपट्टीवर आम्हाला अनेक हिशोब चुकते करायचे होते. मुख्य म्हणजे पर्थच्या मैदानावर भारताने अजून एकही कसोटी सामना जिंकला नव्हता.

पर्थचा तो कसोटी सामना माझ्या कारकिर्दीतील एक सर्वोत्कृष्ट सामना ठरला. भज्जीच्या विवादामुळे संघात अधिकच एकजूट आणि ईर्षा निर्माण झाली होती. सेहवाग संघात परतला होता. ब्रेट ली, मिशेल जॉन्सन, शॉन टेट व स्टुअर्ट क्लार्क या चौकडीविरुद्ध सेहवागने आम्हाला सनसनाटी सुरुवात करून दिली. त्याने फक्त २९ धावा काढल्या; पण मधल्या फळीसाठी त्याने चांगला पाया रचला. त्यानंतर राहुलने व मी मिळून १३९ धावांची महत्त्वपूर्ण भागीदारी केली.

त्या डावात ब्रेट लीला मी जोरदार टक्कर दिली. तो तुफानी वेगात गोलंदाजी करत होता. मी माझं कौशल्य पणाला लावलं. ब्रेट लीने मला एक वेगवान बाउन्सर टाकला तेव्हा मी नुकताच बॅटिंगला आलो होतो; पण त्या बाउन्सरवर मारलेल्या फटक्याने मी स्वत:वरच खूश झालो. खरंतर त्या चेंडूवर मला स्लिप्सवरून अप्पर कट मारायचा होता. त्यासाठी मी तयारही झालो होतो; पण अचानक चेंडू तुफान वेगाने माझ्या अंगावर येत असल्याचं मला जाणवलं. चेंडू माझ्या डोक्यापासून काही इंचांवर होता. मी चेंडूवरची नजर कायम ठेवली. क्षणार्धात मी जवळजवळ ४५ अंश मागे झुकलो आणि चेंडू माझ्या डोळ्यांसमोर येताच मी तो तडकावला. चेंडू यष्टिरक्षकाच्या डोक्यावरून सीमापार गेला. आजचा दिवस आपला आहे, असं त्या क्षणी मला वाटून गेलं. आमच्या ३३० धावसंख्येत माझा ७१ धावांचा वाटा होता. राहुल द्रविडने त्या डावात ९३ धावा काढल्या.

आस्ट्रेलियाच्या पहिल्या डावात अनिलच्या गोलंदाजीवर सायमंड्सचा झेल राहुलने स्लिप्समध्ये पकडला. अनिलचा कसोटी सामन्यातला तो ६००वा बळी होता. सायमंड्सची विकेट घेतल्यानंतर अनिलने आपला आनंद अतिशय उत्स्फूर्तपणे

व त्याच्या स्वभावाला न साजेल अशा पद्धतीने व्यक्त केला. सिडनी कसोटीनंतर सायमंड्सची विकेट मिळवणं किती महत्त्वाचं होतं, हेच अनिलने जणू आम्हा सर्वांना जाणवून दिलं. सायमंड्स व गिलख्रिस्टची जोडी फोडण्याचं महत्त्वाचं काम अनिलने केलं. त्यानंतर आम्ही आस्ट्रेलियाचा पहिला डाव २१२ धावांत गुंडाळला. आरपी सिंगने त्या डावात चार बळी घेतले. आम्हाला ११८ धावांची महत्त्वपूर्ण आघाडी मिळाली. दुसऱ्या डावाच्या अखेरीस आम्ही आस्ट्रेलियासमोर ४१३ धावांचं लक्ष्य ठेवलं. त्याच वेळी आम्हाला विजयाची चाहूल लागली होती; पण अजून मुख्य काम बाकी होतं. आम्हाला आत्मसंतुष्ट होऊन चालणार नव्हतं.

पाचवा दिवस फारच रंगतदार ठरला. कसोटी सामना कसा खेळला जावा, याचं आदर्श उदाहरणच जणू त्या दिवशी प्रेक्षकांना पाहता आलं. इशांत शर्माने त्या दिवशी कमाल केली. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये मी पाहिलेल्या अप्रतिम गोलंदाजीचा तो एक उत्कृष्ट नमुना होता. चौथ्या दिवशी संध्याकाळीच इरफान पठाणने आस्ट्रेलियाच्या दोन्ही सलामीवीरांना तंबूत पाठवलं होतं. पाँटिंग आणि मायकेल हसी पूर्ण दिवस किल्ला लढवायच्या इराद्याने पाचव्या दिवशी मैदानात उतरले होते. अनिलने दोघांसाठी अतिशय उत्तम क्षेत्ररचना लावली होती. त्याने इशांतच्या हातात चेंडू दिला. इशांत कमालीच्या वेगाने गोलंदाजी करू लागला. गुडलेंथ टप्प्यावरून त्याचे चेंडू फलंदाजांच्या आत आणि अंगावर येत होते. एक भारतीय तरुण गोलंदाज आपल्या अचूक व वेगवान गोलंदाजीने जगातील दोन दर्जेदार फलंदाजांना क्रीजमध्ये कसा खिळवून ठेवतो, हे दृश्य खरोखरच पाहण्यासारखं होतं.

इशांतला अचूक टप्पा सापडला होता. मी मिड ऑनला क्षेत्ररक्षण करत होतो. 'तू त्याच रेषेत आणि त्याच टप्प्यावर गोलंदाजी करत रहा,' असं मी सतत त्याला जाऊन सांगत होतो. अशा वेळी नवीन प्रयोग करून बघण्यात अर्थ नसतो. त्याने पाँटिंगला अनेकदा अडचणीत आणलं होतं. इशांतची लय बिघडवण्याकरता पाँटिंग मधूनच क्रीझ सोडून पुढे येत होता. बॅट आणि बॉलमधला अस्सल संघर्ष सुरू होता. इशांतला आपलं काम चोख निभावताना पाहून मी अतिशय प्रभावित झालो.

आठव्या षटकाअखेरीसही इशांतच्या वेगात जराही फरक पडला नव्हता. त्याने अनेकदा पाँटिंगला चकवलं होतं; पण तो सुदैवाने अजूनही खेळपट्टीवर टिकून होता. मॅचमधला तो फार महत्त्वाचा क्षण होता. पाँटिंगला फक्त इशांतचं दडपण येत होतं. इशांत थकल्यावर तो खेळपट्टीवर नक्कीच स्थिरावला असता व आम्हीही एक मोठी संधी गमावून बसलो असतो. इशांतला विश्रांती देण्याचा विचार अनिलच्या मनात आला होता; पण काही ज्येष्ठ खेळाडूंनी इशांतला आणखी एक ओव्हर द्यायचा अनिलला आग्रह केला.

तो जुगार यशस्वी ठरला. इशांतचे परिश्रम सार्थकी लागले. स्लिप्समध्ये राहुलच्या हातात झेल देऊन पाँटिंग पॅव्हिलियनमध्ये परतला. आमचं उद्दिष्ट साध्य झालं होतं. त्यानंतर आमच्या गोलंदाजांनी ठरावीक अंतराने आस्ट्रेलियन विकेट्स मिळवल्या. अखेर आरपी सिंगने स्टुअर्ट क्लार्कचा त्रिफळा उडवून भारताला चित्तथरारक विजय मिळवून दिला.

आनंदाचे क्षण

विजयानंतर ड्रेसिंग रूममध्ये शॅम्पेनची बरसात झाली. भारतीय पत्रकारांनाही शॅम्पेनची भेट देण्यात आली. सिडनी विवादाच्या वेळी त्यांनी खेळाडूंची बाजू उचलून धरली होती. ब्रेट ली आणि ॲडम गिलख्रिस्ट आमचं अभिनंदन करण्यासाठी खास आमच्या ड्रेसिंग रूममध्ये आले होते. त्यांनी दाखवलेली खिलाडू वृत्ती खरोखरच कौतुकास्पद होती.

आज मी जेव्हा पर्थच्या कसोटीकडे पाहतो तेव्हा त्या मॅचची काही वैशिष्ट्यं चटकन माझ्या नजरेत भरतात. आम्ही एका पक्क्या इराद्याने पर्थवर उतरलो होतो. सिडनीच्या घटनेमुळे आम्ही सर्वच कमालीचे दुखावलो गेलो होतो. आमच्या मनातला खदखदणारा राग व्यक्त करण्यासाठी क्रिकेटचं मैदान हाच एकमेव मार्ग आमच्यापाशी होता. आम्ही आस्ट्रेलियाला मैदानावरच खणखणीत उत्तर दिलं.

पर्थ कसोटीबद्दलची दुसरी आठवण म्हणजे भारतीय ड्रेसिंग रूममध्ये झालेलं गॅरी कर्स्टनचं आगमन. भारतीय क्रिकेट प्रशिक्षक म्हणून गॅरीची निवड झाली होती; पण अजून त्याने प्रशिक्षकपदाचा अधिकृत स्वीकार केलेला नव्हता. सुरुवातीला

गॅरी प्रत्येक खेळाडूचं शांतपणे निरीक्षण करत होता. आम्ही सायकलिंग करावं असं गॅरीनेच आम्हाला पर्थ कसोटीआधी सुचवलं होतं. काही काळ तरी आमचं लक्ष क्रिकेटपासून दुसऱ्या गोष्टीत गुंतावं, असा गॅरीचा त्यामागे हेतू होता. आम्हाला सायकलिंगचा खूपच फायदा झाला. अशा वेळेस नेट प्रॅक्टिसवर जास्त भर देण्यात काहीच अर्थ नसतो. दोन दिवसांच्या नेट प्रॅक्टिसमुळे कोणीही सुनील गावसकर किंवा कपिल देव होऊ शकत नाही. तुम्ही स्वत:च्या मानसिक स्वास्थ्याकडेही लक्ष देणं आवश्यक असतं. शिवाय मैदानाबाहेर आपल्या सहकाऱ्यांबरोबर काही वेळ एकत्र घालवण्याचा निश्चितच फायदा होऊ शकतो.

त्या कसोटीत चाहत्यांचा मिळालेला पाठिंबाही लक्षात राहण्यासारखा होता. पर्थला येण्याआधी आम्ही २-० असे पिछाडीवर होतो. आमच्यावर भरपूर टीका केली जात होती. वाकाच्या वेगवान आणि उसळत्या खेळपट्टीवर भारतीय संघाचा निभाव लागणं अशक्य आहे, असंही आमच्याविरुद्ध लिहिलं गेलं होतं, पण आमचे टीकाकार क्रिकेटशौकिनांना मैदानावर येण्यापासून रोखू शकले नाहीत. स्टेडियममध्ये भारताचा तिरंगा फडकताना पाहून माझं मन भरून आलं. जगभर पसरलेल्या भारतीयांच्या मनात क्रिकेटबद्दल किती निष्ठा आणि प्रेम आहे, याचा पुन्हा एकदा प्रत्यय आला. त्यांना अभिमान वाटेल असा विजय मिळवून दिल्याचं समाधान मला वाटलं.

भारतीय संघ मैदानावर आणि मैदानाबाहेरही तितक्याच जोषात खेळू शकतो हे आम्ही सिद्ध केलं होतं.

चौथी कसोटी. ॲडलेड – २४ ते २८ जानेवारी, २००८

ॲडलेडमधील अखेरच्या कसोटीसाठी आमची तयारी सुरू होती. ''तुला नेट्समध्ये बॅटिंगचा सराव करायचा आहे का,'' असं मला गॅरीने विचारलं. मी म्हटलं, ''मला आखूड टप्प्याच्या पण आपटून फेकलेल्या (थ्रो डाउन्स) चेंडूवर बॅटिंग करावीशी वाटतेय.'' त्यानंतर पुढची चार वर्षं तो सराव म्हणजे आमच्यासाठी नित्याचीच गोष्ट झाली. प्रत्येक सामन्याच्या आधी गॅरी मला तसे शेकडो चेंडू टाकत असे. त्याला थकलेला किंवा कंटाळलेला मी कधीच पाहिला नाही. स्वत:च्या कामाबद्दलची त्याची बांधिलकी थक्क करणारी होती.

गॅरीला मी त्यानंतर वेगवान; पण खोल टप्प्याचे चेंडू फेकायला सांगितले. पर्थला ब्रेट लीने मला अशाच एका चेंडूवर बाद केलं होतं. त्यामुळे ॲडलेडला मी बॅटिंगसाठी आलो की, तो मला पहिलाच चेंडू खोल टप्प्याचा टाकणार, असा माझा अंदाज होता. तसंच घडलं. ॲडलेड ओव्हलवर मी फलंदाजीला येताच त्याने पहिला चेंडू माझ्या पॅडवर टाकला. मी त्यासाठी तयारच होतो. मी चेंडू स्क्वेअर लेगला मारेन अशी ब्रेट लीची अपेक्षा होती; पण मी त्या चेंडूवर सरळ रेषेत पंचांच्या मागे चौकार मारला. तो शॉट मारल्यावर मी ड्रेसिंग रूममध्ये बसलेल्या गॅरीकडे मिश्कीलपणे पाहिलं.

त्या डावात मी १५३ धावा काढल्या. आमच्या एकूण ५२६ धावा झाल्या. सेहवाग व भज्जीने प्रत्येकी ६३ धावा फटकावल्या. कुंबळेनेही कर्णधाराला साजेशी इनिंग्ज खेळत ८७ धावा काढल्या. ऑस्ट्रेलियाने आम्हाला चोख उत्तर दिलं. हेडन, पाँटिंग व क्लार्क या तिघांनीही शतकं झळकावली. दुसऱ्या डावात सेहवागने चमकदार शतक काढत १५१ धावा केल्या. सामना अखेर अनिर्णित अवस्थेत संपला. आम्ही मालिका बरोबरीत सोडवू शकलो नाही; पण आम्ही आमच्या चाहत्यांचा विश्वास आणि आदर मात्र नक्कीच मिळवला.

अंतिम आदेश

सिडनीमधील सायमंड्स-भज्जी विवादाला पत्रकारांनी 'मंकीगेट प्रकरण' असं टोपण नाव दिलं होतं. मंकीगेट प्रकरणावर अखेरचा पडदा टाकण्यापूर्वी जस्टिस हॅन्सेन यांनी पुन्हा एकदा सर्व पुरावे तपासले व सर्वांची पुन्हा साक्ष घेतली. जे मी प्रत्यक्ष पाहिलं होतं व ऐकलं होतं, तेच मी पुन्हा एकदा सांगितलं. सामन्याचे रेफ्री माइक प्रॉक्टर यांच्या दोन विधानांवर मी जोरदार हरकत घेतली. प्रॉक्टरनी आमची 'खोटारडे' अशी संभावना केली होती. शिवाय 'दोघांपैकी फक्त एकच संघ खरं बोलतोय' हे त्याचं विधान अतिशय अन्यायकारक होतं. भज्जीला तीन कसोटी सामन्यांसाठी निलंबित करून कोणता संघ खोटं बोलतोय,

हे त्यांनी सरळ दाखवूनच दिलं होतं. आम्हाला ‘खोटारडे’ म्हटल्याची मला प्रचंड चीड आली होती.

अखेर सत्याचाच विजय झाला. भज्जीने वंशभेदावरून अपशब्द वापरल्याचा काहीही पुरावा न मिळाल्याचं निकालपत्रात नमूद करण्यात आलं. भज्जीवरील निलंबन उठवण्यात आलं. सायमंड्सविरुद्ध चिडून बोलल्याबद्दल मात्र भज्जीच्या मानधनातील निम्मी रक्कम कापण्यात आली. भज्जीने सुटकेचा नि:श्वास सोडला आणि भारतीय संघाचंही निर्दोषत्व शाबित झालं.

भारताचा बांगलादेश दौरा, २००७

पहिली कसोटी. चित्तगाँग – १८ ते २२ मार्च, २००७

भारत ३८७-८ घोषित (**एसआर तेंडुलकर** १०१, एससी गांगुली १००, आर द्रविड ६१, केडी कार्तिक ५६; एम मोर्तझा ४-९७, एस हुसेन ३-७६) व १००-६ घोषित (**एसआर तेंडुलकर** ३१; एम रफिक ३-२७, एस हुसेन २-३०)

बांगलादेश २३८ (एम मोर्तझा ७९, आर सालेह ४१; आरपी सिंग ३-४५, व्हीआरव्ही सिंग ३-४८, **एसआर तेंडुलकर** १-१५) व १०४-२ (जे ओमर ५२*, एच बशर ३७)

सामना अनिर्णित

दुसरी कसोटी. ढाका – २५ ते २७ मे, २००७

भारत ६१०-३ घोषित (डब्ल्यू जाफर १३८, केडी कार्तिक १२९, आर द्रविड १२९, **एसआर तेंडुलकर** १२२*, एमएस धोनी ५१*, एम रफिक २-१८१)

बांगलादेश ११८ (शकीब-अल-हसन ३०; झेड खान ५-३४, ए कुंबळे ३-३२) व २५३ (फॉलो-ऑन) (एम मोर्तझा ७०, एम अश्रफूल ६७; आरआर पोवार ३-३३, **एसआर तेंडुलकर** २-३५)

भारत एक डाव व २३९ धावांनी विजयी

भारत मालिकेत १-० विजयी

भारताचा इंग्लंड दौरा, २००७ – पतौडी करंडक

पहिली कसोटी. लॉर्ड्स – १९ ते २३ जुलै, २००७

इंग्लंड २९८ (एजे स्ट्रॉस ९६, एमपी वॉर्न ७९; एस श्रीशांत ३-६७) व २८२ (केपी पीटरसन १३४, एमजे प्रायर ४२; आरपी सिंग ५-५९, झेड खान ४-७९)

भारत २०१ (डब्ल्यू जाफर ५८, **एसआर तेंडुलकर** ३७; जेएम अँडरसन ५-४२, आरजे साइड बॉटम ४-६५) व २८२-९ (एमएस धोनी ७६*, केडी कार्तिक ६०, **एसआर तेंडुलकर** १६; सीटी ट्रेमलेट ३-५२, आरजे साइड बॉटम २-४२, एमएस पानेसर २-६३, जेएम अँडरसन २-८३)

सामना अनिर्णित

दुसरी कसोटी. नॉटिंगहॅम – २७ ते ३१ जुलै, २००७

इंग्लंड १९८ (एएन कुक ४३, झेड खान ४-५९, ए कुंबळे ३-३२) व ३५५ (एमपी वॉर्न १२४, पीडी कॉलिंगवुड ६३, एजे स्ट्रॉस ५५, झेड खान ५-७५, ए कुंबळे ३-१०४)

भारत ४८१ (**एसआर तेंडुलकर** ९१, एससी गांगुली ७९, केडी कार्तिक ७७, डब्ल्यू जाफर ६२, व्हीव्हीएस लक्ष्मण ५४; एमएस पानेसर ४-१०१, सीटी ट्रेमलेट ३-८०) व ७३-३ (केडी कार्तिक २२, डब्ल्यू जाफर २२, **एसआर तेंडुलकर** १; सीटी ट्रेमलेट ३-१२)

भारत ७ गडी राखून विजयी

तिसरी कसोटी. द ओव्हल – ९ ते १३ ऑगस्ट, २००७

भारत ६६४ (ए कुंबळे ११०*, एमएस धोनी ९२, केडी कार्तिक ९१, **एसआर तेंडुलकर** ८२, आर द्रविड ५५, व्हीव्हीएस लक्ष्मण ५१; जेएम अँडरसन ४-१८२) व १८०-६ घोषित (एससी गांगुली ५७, **एसआर तेंडुलकर** १; पीडी कॉलिंगवुड २-२४, जेएम अँडरसन २-३४, सीटी ट्रेमलेट २-५८)

इंग्लंड ३४५ (आयआर बेल ६३, पीडी कॉलिंगवुड ६२, एएन कुक ६१; झेड खान ३-३२, ए कुंबळे ३-९४, **एसआर तेंडुलकर** १-२६) व ३६९-६ (केपी पीटरसन १०१, आयआर बेल ६७, एस श्रीशांत ३-५३)

सामना अनिर्णित

भारत मालिकेत १-० विजयी

भारताचा आस्ट्रेलिया दौरा २००७-२००८, बॉर्डर-गावसकर करंडक

पहिली कसोटी. मेलबोर्न – २६ ते २९ डिसेंबर, २००७

आस्ट्रेलिया ३४३ (एमएल हेडन १२४, पीए जॅकस ६६; ए कुंबळे ५-८४, झेड खान ४-९४) व ३५१-७ घोषित (एमजे क्लार्क ७३, पीए जॅकस ५१; एच सिंग ३-१०१)

भारत १९६ (**एसआर तेंडुलकर** ६२, एससी गांगुली ४३; एसआर क्लार्क ४-२८, बी ली ४-४६) व १६१ (व्हीव्हीएस लक्ष्मण ४२, एससी गांगुली ४०, **एसआर तेंडुलकर** १५, एमजी जॉन्सन ३-२१, बी ली २-४३, जीबी हॉग २-५१)

आस्ट्रेलिया ३३७ धावांनी विजयी

दुसरी कसोटी. सिडनी – २ ते ६ जानेवारी, २००८

आस्ट्रेलिया ४६३ (ए सायमंड्स १६२, जीबी हॉग ७९, बी ली ५९, आरटी पॉंटिंग ५५; ए कुंबळे ४-१०६, आरपी सिंग ४-१२४) व ४०१-७ घोषित (एमइके हसी १४५*, एसएल हेडन १२३, ए सायमंड्स ६१; ए कुंबळे ४-१४८)

भारत ५३२ (**एसआर तेंडुलकर** १५४*, व्हीव्हीएस लक्ष्मण १०९, एससी गांगुली ६७, एच सिंग ६३, आर द्रविड ५३; बी ली ५-११९) व २१० (एससी गांगुली ५१, ए कुंबळे ४५*, **एसआर तेंडुलकर** १२; एमजे क्लार्क ३-५, ए सायमंड्स ३-५१)

आस्ट्रेलिया १२२ धावांनी विजयी

तिसरी कसोटी. पर्थ – १६ ते १९ जानेवारी, २००८

भारत ३३० (आर द्रविड ९३, **एसआर तेंडुलकर** ७१; एमजी जॉन्सन ४-८६, बी ली ३-७१) व २९४ (व्हीव्हीएस लक्ष्मण ७९, आयके पठाण ४६, **एसआर तेंडुलकर** १३; एसआर क्लार्क ४-६१, बी ली ३-५४)

आस्ट्रेलिया २१२ (ए सायमंड्स ६६, एसी गिलख्रिस्ट ५५; आरपी सिंग ४-६८, आय शर्मा २-३४, ए कुंबळे २-४२) व ३४० (एमजे क्लार्क ८१, एमजी जॉन्सन ५०*, एमइके हसी ४६; आयके पठाण ३-५४, व्ही सेहवाग २-२४)

भारत ७२ धावांनी विजयी

चौथी कसोटी. ॲडलेड – २४ ते २८ जानेवारी, २००८

भारत ५२६ (**एसआर तेंडुलकर** १५३, ए कुंबळे ८७, व्ही सेहवाग ६३, एच सिंग ६३, व्हीव्हीएस लक्ष्मण ५१; एमजी जॉन्सन ४-१२६, बी ली ३-१०१) व २६९-७ घोषित (व्ही सेहवाग १५१, **एसआर तेंडुलकर** २१३; एसजी जॉन्सन २-३३, बी ली २-७४)

आस्ट्रेलिया ५६३ (आरटी पॉंटिंग १४०, एमजे क्लार्क ११८, एमएल हेडन १०३, पीए जॅकस ६०; आयके पठाण ३-११२, आय शर्मा ३-११५, व्ही सेहवाग २-५१)

सामना अनिर्णित

आस्ट्रेलिया मालिकेत २-१ विजयी

१९.
जोरदार पुनरागमन

कसोटी मालिकेपाठोपाठ २००८मध्ये आस्ट्रेलियात खेळली गेलेली एकदिवसीय तिरंगी मालिकाही खूपच चुरशीची झाली. तिसरा संघ श्रीलंकेचा होता. आधीची कसोटी मालिका खूपच वादग्रस्त ठरली होती. खेळाडूंच्या मनातील ताण आणि तेढ जराही कमी झाली नव्हती. एमएस धोनी आता भारतीय संघाचा कर्णधार झाला होता. डिवचल्या गेलेल्या भारतीय संघाने 'कॉमनवेल्थ बँक ट्रॉफी' घेऊनच भारतात परतायचा निर्धार केला होता.

१० फेब्रुवारीला आस्ट्रेलियाविरुद्ध मेलबोर्नच्या मैदानावर सामना झाला. एमसीजीची खेळपट्टी कमालीची वेगवान होती. इतक्या वेगवान खेळपट्टीवर त्यापूर्वी मी क्वचितच खेळलो असेन. आम्ही प्रथम क्षेत्ररक्षण केलं. धोनी यष्टींच्या मागे खूपच दूर उभा होता. तरीही त्याला आपल्या छातीच्या उंचीवर चेंडू पकडावे लागत होते. मी स्लिपमध्ये, पण ३० यार्डांवरच्या वर्तुळाच्या कडेला उभा होतो. खेळपट्टीवर चेंडू किती वेगाने उसळत होता, याचा त्यावरून अंदाज येऊ शकेल. मॅथ्यू हेडनच्या बॅटची कड घेऊन आलेला एक चेंडू झपकन माझ्या बाजूने निघून गेला. मी धोनीला म्हटलं की, 'आज खेळपट्टी शेवटपर्यंत फास्ट बोलर्सना साथ देणार.' आस्ट्रेलियाची धावसंख्या कितीही कमी झाली असती तरी तिचा पाठलाग करणं अवघड जाणार होतं.

आमच्या गोलंदाजांनी परिस्थितीचा योग्य फायदा उठवत आस्ट्रेलियाचा डाव केवळ १५९ धावांत गुंडाळला. इशांतने पुन्हा एकदा सुरेख गोलंदाजी करत ३८ धावांत चार विकेट्स घेतल्या. श्रीशांतनेही त्याला चांगली साथ देत ३१ धावांत तीन गडी बाद केले. दोन इनिंग्जमधल्या विश्रांतीच्या काळात आमच्या ड्रेसिंग रूममधलं वातावरण एकदम उत्साही होतं. आस्ट्रेलियन गोलंदाजांनाही खेळपट्टीची तितकीच मदत मिळणार आहे, हेही आम्ही जाणून होतो. तिसऱ्याच षटकात ब्रेट लीने मला एक वेगवान आखूड टप्प्याचा चेंडू टाकला. तो चेंडू माझ्या बॅटच्या अगदी वरच्या भागाला लागून स्लिपवरून थर्ड मॅनला गेला. त्यावर मी एक धाव काढत असताना ली माझ्या जवळ येऊन म्हणाला, ''आज मला फारच मजा येतेय. फास्ट बोलिंग म्हणजे काय ते मी आज तुला दाखवणार आहे.'' ली माझा खूपच चांगला मित्र आहे. तो मला मुद्दाम कुत्सितपणे बोलला नव्हता; पण त्याच्या त्या शब्दांमुळे मी मात्र पेटून उठलो. मी स्वत:शीच पुटपुटलो, ''काय वाट्टेल ते होवो, आज मीही त्याला ठोकून काढणार.'' त्या दिवशीची आमची झुंज लक्षात राहण्यासारखी झाली.

पाचव्या षटकात मला हवी असलेली संधी मिळाली. सेहवाग नुकताच बाद झाला होता. डावखुरा शीघ्रगती गोलंदाज नॅथन ब्रॅकनने त्याला ११ धावांवर पायचीत केलं. लीने वेग आणखीनच वाढवला होता. त्याने टाकलेला दुसरा चेंडू ऑफ स्टम्पपासून दूर पडला होता; पण तरीही मी त्यावर कव्हर ड्राइव्ह मारायचा ठरवलं. शॉट माझ्या मनासारखा बसला नाही. तरीही तो चेंडू सीमापार गेला. ली माझ्याकडे येऊन पुन्हा एकदा हसला व गोलंदाजी करण्यासाठी निघून गेला. तो आता काय करणार हे मला चांगलच ठाऊक होतं. अपेक्षेप्रमाणे लीने वेगाने येऊन एक खोल टप्प्याचा चेंडू टाकला. मी पुढे सरसावत त्या चेंडूवर सरळ रेषेत खणखणीत शॉट मारला. इतक्या ताकदीने मी क्वचितच शॉट मारला असेन. चेंडू अडवण्यासाठी लीला खाली वाकताही आलं नाही. त्याने आपला फॉलो थ्रू संपवेपर्यंत चेंडू सीमेपर्यंत पोचलादेखील होता.

आता ली अधिकच त्वेषाने गोलंदाजी करू लागला. त्याने पुढचा चेंडू ताशी १५१ कि.मी. वेगाने टाकला. मी किंचित मागे जात तो बचावात्मक पद्धतीने खेळून काढला; पण मी आक्रमण करायचं ठरवलंच होतं. त्या षटकाच्या पाचव्या चेंडूवर मला आणखी एक संधी मिळाली. पुन्हा त्याने वेगात खोल टप्प्याचा चेंडू टाकला. मीही पुन्हा त्यावर सरळ रेषेतच चौकार

मारला. फरक फक्त एवढाच होता की, पहिल्या खेपेस चेंडू लीच्या डाव्या बाजूने गेला होता. या वेळेस त्याच्या उजव्या बाजूने तो गेला. त्या दोन ड्राइव्ह्जमुळे मला चांगलाच आत्मविश्वास आला. मी त्या डावात ४४ धावा काढल्या. मी बाद झालो तेव्हा जिंकायला ६४ धावा हव्या होत्या. रोहित शर्माने व धोनीने छान बॅटिंग करत ते काम संपवून टाकलं.

मॅच संपल्या संपल्याच माझ्या मांडीच्या सांध्याजवळील – जांघेतील स्नायू (ॲडक्टर्स) दुखू लागले. मी ती गोष्ट लगेच जॉन ग्लॉस्टरला सांगितली. आम्ही अनेक उपाय करून पाहिले; पण वेदना कमी होत नव्हत्या. २६ फेब्रुवारीला आमचा सामना श्रीलंकेविरुद्ध होबार्टला होता. त्याही सामन्यात मला वेदना जाणवतच होत्या. अंतिम फेरी गाठण्यासाठी तो सामना जिंकणं अपरिहार्य होतं. अंतिम फेरीत पोचणाऱ्या संघाला आस्ट्रेलियाविरुद्ध तीन सामने खेळावे लागणार होते. इशांत शर्मा आणि प्रवीण कुमारने प्रत्येकी चार विकेट्स घेतल्यामुळे श्रीलंकेचा डाव १७९ धावांत आटोपला होता. आमच्या डावात सुरुवातीपासून चेंडू माझ्या बॅटच्या मधोमध बसत होता. मी ६३ धावा काढल्या. ती मॅच आम्ही ३३ षटकांत जिंकली. त्या आधीच्या काही सामन्यांत मी जास्त धावा करू शकलो नव्हतो. त्यामुळे ती इनिंग्ज मला समाधान देऊन गेली. पहिल्या अंतिम सामन्यासाठी सिडनीला जाताना मला पुन्हा आत्मविश्वास वाटू लागला होता.

अंतिम फेरीसाठी आमची तयारी सुरू होती; पण प्रत्येक सराव सत्रानंतर ॲडक्टर्समधील असह्य वेदनांनी मी हैराण होऊन जात होतो. मला धावताना चटकन वळताना आणि खाली वाकून चेंडू उचलतानाही खूपच त्रास होत होता. क्षेत्ररक्षणाचा सराव करताना अखेरीस अशी वेळ आली की, मी फक्त स्टम्प्सच्या जवळ उभा राहायचो आणि इतर सर्व जण माझ्याकडे चेंडू फेकायचे. अंतिम सामना एका दिवसावर येऊन ठेपला होता. वेदनाशामक औषधं घेण्यावाचून दुसरा पर्याय नव्हता.

कॉमनवेल्थ बँक मालिका. पहिला अंतिम सामना, सिडनी, २ मार्च, २००८

अंतिम सामन्यांच्या आधी पुन्हा एकदा वातावरण तापलं. 'तीन सामन्यांपैकी आम्हाला फक्त दोनच सामने खेळावे लागणार आहेत. कारण भारताला माघारी पाठवण्यासाठी दोन सामने पुरेसे आहेत,' अशी प्रौढी रिकी पाँटिंगने जाहीरपणे व्यक्त केली होती. त्याच्या वक्तव्यामुळे स्पर्धा जिंकण्याचा आमचा निर्धार अधिकच पक्का झाला होता. सिडनीच्या मैदानावर नाणेफेक जिंकून आस्ट्रेलियाने प्रथम फलंदाजी स्वीकारली. अटीतटीच्या अंतिम सामन्यात पहिली बॅटिंग करणंच नेहमी फायदेशीर असतं. तुम्ही मध्यम धावसंख्या उभारलीत तरी तिचं प्रतिस्पर्धी संघावर दडपण आलेलं असतं. आस्ट्रेलियाने त्या डावात २३९ धावा केल्या. त्यात मॅथ्यू हेडनच्या ८२ धावांचा मुख्य वाटा होता. खेळपट्टी गोलंदाजांना साथ देत होती. त्यामुळे २४० धावांचं लक्ष्य आम्हाला फार छोटं वाटलं नाही.

रॉबिन उथप्पा माझा सलामीचा साथीदार होता. नवीन चेंडू खेळून काढणं हे आमचं पहिलं उद्दिष्ट होतं. आम्ही जर ५० षटकं टिकलो तर आम्ही ती मॅच नक्कीच जिंकणार, याची आम्हाला खातरी होती. इनिंग्जच्या सुरुवातीला फटकेबाजीचा मोह आवरून संयमाने खेळायचा सल्ला मी रॉबिनला दिला, पण रॉबिन हा मुळातच आक्रमक शैलीचा फलंदाज असल्यामुळे त्याला शॉट्स मारायची अनावर इच्छा व्हायची. एका क्षणी तर मी त्याच्यावर चिडलोही. आम्ही पहिल्या ११ षटकांपर्यंत आस्ट्रेलियाला विकेट मिळवू दिली नाही. अकराव्या षटकात रॉबिनने पुल शॉट मारण्याचा पहिल्यांदाच प्रयत्न केला व तो डीप स्क्वेअर लेगला उभ्या असलेल्या माइक हसीच्या हातात झेल देऊन बाद झाला. रॉबिनने फक्त १७ धावा केल्या असल्या, तरी नवीन चेंडू खेळून काढण्यात त्याची बहुमूल्य मदत झाली होती. पहिल्या विकेटसाठी आम्ही ५० धावांची भागीदारी केली होती.

आम्ही जर अशीच हिंमत ठेवली तर मॅच आमच्या नक्कीच हातात येईल हे मला जाणवलं होतं. दुर्दैवाने पुढच्या काही षटकांत आम्ही गौतम गंभीर आणि युवराजच्या विकेट्स गमावल्या. डावाची पुनर्बांधणी करण्यासाठी आम्हाला पुन्हा एका चांगल्या भागीदारीची आवश्यकता होती. रोहित शर्मा माझ्या साथीला आला होता. मी त्याला उगाचच दिखाऊ शॉट्स न मारता सरळ बॅटने खेळायला सांगितलं. रोहितने अप्रतिम फलंदाजी केली. आम्ही आस्ट्रेलियन गोलंदाजी अक्षरश: भरडून काढली. अष्टपैलू जेम्स होप्सने रोहितला ६६ धावांवर बाद केलं तेव्हा मी नुकतंच माझं शतक पूर्ण केलं होतं.

त्यानंतर धोनी फलंदाजीला आला. आम्ही दोघांनी उरलेल्या ३० धावा सहज फटकावत मॅच आरामात जिंकली. त्या

डावात मी फक्त एकदाच घाबरलो होतो. ब्रेट लीचा एक बीमर माझ्या डाव्या खांद्याच्या वर आणि हेल्मेटच्या ग्रिलच्या कडेवर आदळला होता. चेंडू त्याच्या हातातून चुकून निसटला होता; पण त्या चेंडूवर मला मोठी दुखापत होऊ शकली असती. मला थोडंसं भोवळ आल्यासारखं झालं. मी लीला थट्टेत म्हटलं, ''मुंबईत आलास की माझ्या मुलाला – अर्जुनला – तुला तोंड द्यावं लागणार आहे, हे मात्र लक्षात ठेव.'' ली अर्जुनला ओळखत होता. आम्ही दोघांनी 'बूस्ट' कंपनीच्या जाहिरातीसाठी एकत्र शूटिंग केलं होतं. त्या वेळी माझ्या कुटुंबीयांशी त्याचा चांगला परिचय झाला होता. त्याने माझी लगेच माफी मागितली आणि आम्ही ते प्रकरण तिथेच संपवलं. तो एक अपघात होता; पण माझा खांदा दुखू लागला होता. खांदा आणि कोपर यांमधला भाग काळपट झाला होता.

पूर्ण इनिंग्ज खेळून काढणं हा फारच समाधानकारक अनुभव होता. तो खरा मोठाच विजय होता; पण विजय मोठ्या प्रमाणात साजरा करण्याचा मोह आम्ही आवरला. तिसऱ्याच दिवशी ब्रिस्बेनला दुसरा अंतिम सामना होता. ब्रिस्बेनच्या अतिशय दमट हवेत मॅच खेळणं जिकिरीचं ठरणार आहे, याची आम्हाला कल्पना होती.

त्या रात्री मी एक मिनिटही झोपू शकलो नाही. जांघेतल्या असह्य वेदनांनी मी रात्रभर तळमळत होतो. आता मात्र त्या दुखण्याची मला खरंच भीती वाटू लागली. दुसऱ्या दिवशी सकाळी मला चालताही येत नव्हतं. विमानात चढणं ही माझ्यासाठी सत्त्वपरीक्षाच होती. ब्रिस्बेन विमानतळावरून हॉटेलमध्ये पोचताच मला खूप वेळ मसाज करण्यात आला. माझी ती अवस्था पाहून धोनी म्हणाला, ''हवं तर तू दुसऱ्या अंतिम सामन्यात खेळू नकोस. गरज भासल्यास तू तिसऱ्या सामन्यात खेळायचा विचार करू शकतोस.'' मी त्याला म्हटलं, ''शेर जब गिरा हुआ होता है उसे तभी मार दो।'' (वाघ जेव्हा थकून पडलेला असतो, तेव्हाच त्याला संपवायचं असतं.) शक्यतो ब्रिस्बेनलाच स्पर्धा संपवायला हवी, हे माझं म्हणणं त्याला पटलं.

कॉमनवेल्थ बँक सिरीज. दुसरा अंतिम सामना, ब्रिस्बेन, ४ मार्च, २००८

आम्ही गब्बाच्या मैदानावर पोचलो तेव्हा तिथली खेळपट्टी चांगलीच ओलसर होती. त्या खेळपट्टीवर सुरुवातीला फलंदाजी करणं खूपच अवघड होतं. त्यामुळे नाणेफेक जिंकल्यावर आम्ही स्वाभाविकपणे क्षेत्ररक्षण करण्याचाच विचार केला असता; पण असा निर्णय तू घेऊन नकोस अशी मी धोनीला गळ घातली. माझ्या मते आस्ट्रेलियाने त्या सामन्यात प्रथम फलंदाजी करणंच अधिक पसंत केलं असतं. कोणतंही लक्ष्य समोर नसताना त्यांना मुक्तपणे फलंदाजी करायला नक्कीच आवडलं असतं. खेळपट्टी ओलसर असल्यामुळे सुरुवातीला बॅटिंग करणं अवघड जाणार हे मला मान्य होतं; पण तो धोका पत्करून आस्ट्रेलियासमोर लक्ष्य ठेवणं मला जास्त महत्त्वाचं वाटत होतं.

धोनीला माझं म्हणणं पटलं. आम्ही प्रथम फलंदाजी केली. रॉबिनच माझ्या साथीला होता. पहिल्या १० षटकांत एकही शॉट उंचावरून मारायचा नाही, हे मी रॉबिनला अत्यंत कडक शब्दांत बजावलं. त्या खेळपट्टीवर धावांचा वेग वाढवण्यापेक्षा विकेट्स न गमावणं अधिक गरजेचं होतं. रॉबिनने संयम राखला. पहिली २० षटकं आमची जोडी टिकून होती. पाया मजबूत झाल्यानंतर मात्र आम्ही आस्ट्रेलियन गोलंदाजीवर हल्ला करायला सज्ज झालो. त्यानंतर आम्ही षटकामागे सहा धावा काढत आमची धावसंख्या २५८ पर्यंत नेली. हे नक्कीच आव्हानात्मक लक्ष्य होतं.

मी काढलेल्या ९१ धावांचं मला नक्कीच समाधान होतं; पण इनिंगजच्या अखेरीस मला खूपच त्रास होऊ लागला. ब्रिस्बेनची मॅच जिंकता आली नाही तर तिसरा अंतिम सामना मी खेळू शकणार नाही, हे मला कळून चुकलं होतं. आस्ट्रेलियाचा डाव सुरू झाल्यावर चौथ्याच षटकात मला मैदान सोडून जावं लागलं. श्रीशांतच्या गोलंदाजीवर हेडनचा उडालेला झेल घेण्यासाठी धोनीने झेप घेतली; पण चेंडू धोनीच्या हाताला अर्धवट लागून माझ्या अंगावर आला आणि ब्रेट लीचा बीमर ज्या ठिकाणी लागला होता, नेमका त्याच ठिकाणी त्याचा मला पुन्हा तडाखा बसला.

मधल्या काळात प्रवीण कुमारने भन्नाट गोलंदाजी करत आस्ट्रेलियाचे तीन खंदे फलंदाज बाद केले होते. हेडन व सायमंड्सची त्यानंतर जोडी जमली; पण आस्ट्रेलियन भूमीवर भज्जीला आपला शेवटचा ठसा उमटवायची संधी मिळाली. प्रथम त्याने हेडनला धावबाद केलं. त्यानंतर तिसऱ्याच चेंडूवर त्याने सायमंड्सला चकवलं. भज्जीचा चेंडू खूपच वळला आणि सायमंड्स पायचीत बाद झाला. भज्जीसाठी दौऱ्यातली ती सर्वांत मौल्यवान विकेट होती.

मॅच संपायला अजून बराच वेळ होता. जेम्स होप्सने त्यानंतर तडाखेबाज फलंदाजी केली. त्याने ६३ धावा काढल्या. आस्ट्रेलियन इनिंग्जमध्ये तो बाद होणारा शेवटचा खेळाडू होता. दुसऱ्या बाजूने नियमित विकेट्स घेत आम्ही त्याला सतत दबावाखाली ठेवलं होतं. अखेर अंदाजापेक्षा सामना चुरशीचा झाला. अखेरचा गडी बाद झाला तेव्हा आस्ट्रेलियाला विजयासाठी फक्त १० धावा हव्या होत्या.

त्या विजयाचं समाधान काही औरच होतं. मैदानावर सर्वत्र तिरंगी झेंडे फडकत होते. आम्ही आस्ट्रेलियाला ऑस्ट्रेलियातच हरवलं होतं. रिकी पाँटिंगचे शब्द आम्हीच खरे करून दाखवले. त्याने भाकीत केल्याप्रमाणे त्याला तिसरा सामना खेळावा लागला नाही.

दुखापतीवर धैर्याने मात

माझी शारीरिक स्थिती दिवसेंदिवस खालावत चालली होती. दुखापतीचं निदान न झाल्यामुळे माझ्या दुखण्याचं नेमकं स्वरूप काय आहे, हेच मला समजेनासं झालं होतं; पण त्याची चिंता करत बसायला माझ्यापाशी वेळच नव्हता. काही आठवड्यांतच कसोटी मालिका खेळण्यासाठी दक्षिण आफ्रिकेचा संघ भारतात येणार होता. २६ मार्च, २००८ला पहिली कसोटी चेन्नईला सुरू होणार होती.

मधल्या काळात जास्तीत जास्त विश्रांती घेऊन मी चेन्नईला पोचलो. सामन्याच्या आदल्या दिवशी मी जांघेत तीन इंजेक्शनं घेतली. मी दुसऱ्या दिवशी खेळू शकेन, असा डॉक्टरांना विश्वास होता. सामन्याच्या दिवशी सकाळी जाग आली तेव्हा वेदना खूपच कमी झाल्या होत्या. तरीही माझी फिटनेस टेस्ट करून घ्यायची जॉन ग्लॉस्टरने व मी ठरवलं. सरावाच्या वेळी मी वेगाने धावू शकलो. मॅचच्या आधी नेहमीप्रमाणे फुटबॉल खेळतानाही मला काही त्रास जाणवला नाही. जॉनने मी फिट असल्याचं जाहीर केलं.

माझ्या दुर्दैवाने दक्षिण आफ्रिकेने नाणेफेक जिंकली. पहिले दोन दिवस बॅटिंग करत त्यांनी ५४० धावांचा डोंगर रचला. त्यात अमलाच्या १५९ धावा होत्या. चेन्नईच्या कडक उन्हात सतत दोन दिवस क्षेत्ररक्षण केल्यावर मांडीतल्या वेदना पुन्हा सुरू झाल्या होत्या. चौथ्या दिवशी मी जेव्हा फलंदाजीला उतरलो तेव्हा माझ्या शरीरातला प्रत्येक स्नायू आखडून गेला होता. मखाय एन्टिनीच्या गोलंदाजीवर मी दुसऱ्या स्लिपमध्ये कॅलिसच्या हातात झेल देत शून्यावर बाद झालो. दोन्ही संघांनी भरपूर धावा केल्याने सामना अनिर्णित अवस्थेत संपला. शरीरावर यापेक्षा जास्त ताण देण्यात अर्थ नाही, हे मला कळून चुकलं होतं. अनिल कुंबळे आणि जॉन ग्लॉस्टरला मी तसं सांगून टाकलं.

मी मुंबईला परतलो. मला मांडीच्या दुखण्यातून लवकरात लवकर बरं व्हायचं होतं. पूर्ण तंदुरुस्त होण्यासाठी मी नितीन पटेलच्या निरीक्षणाखाली रीतसर व्यायाम व इतर उपचार करून घ्यायला सुरुवात केली. नितीन पटेल हा आमच्या 'मुंबई इंडियन्स' संघाचा फिजिओ होता. आयपीएलचा पहिला हंगाम लवकरच सुरू होणार होता. मुंबई इंडियन्सच्या कर्णधारपदाची जबाबदारी माझ्यावर सोपवण्यात आली होती. मला पहिली मॅच चुकवायची नव्हती; पण सर्व प्रयत्न करूनही त्याचा काहीच फायदा होऊ शकला नाही. आयपीएल स्पर्धेचे फक्त शेवटचे सात सामने मी खेळू शकलो. त्या वेळीही मी १०० टक्के तंदुरुस्त नव्हतोच.

दुखापतीचं योग्य निदान न झाल्याने अर्थशून्य तर्कवितर्कांना मात्र उगाचच वाव मिळू लागला होता. माझं दुखणं शारीरिक नसून मानसिक आहे, असं मुंबईतल्या एका डॉक्टरने म्हणे मुंबई इंडियन्सच्या संघ व्यवस्थापनाला सांगितलं. माझ्या कानावर ती गोष्ट अर्थातच आली नव्हती. पण एका रात्री अंजलीने मला एक विचित्र प्रश्न विचारला. ती मला म्हणाली, ''मॅच न खेळण्याएवढी तुझी दुखापत तुला गंभीर वाटतेय का?'' मी हबकलोच. अंजलीने मला हा प्रश्न विचारावा याचं मला आश्चर्यच नव्हे, तर दु:खही झालं. मी तिला म्हटलं, ''माझ्या हातापायांच्या बोटांची हाडं मोडलेली असतानाही मला खेळताना तू पाहिलं आहेस. वडिलांच्या मृत्यूचं दु:ख पचवून मी चौथ्या-पाचव्या दिवशी पुन्हा मैदानात उतरलो होतो.'' माझ्या सर्वांत जवळच्या व्यक्तीने माझ्या दुखापतीवर संशय घ्यावा, याचा अर्थ मला उमगेना. अखेर आयपीएल संपल्यानंतर अंजलीनेच

त्याचा उलगडा केला. मुंबईच्या डॉक्टरने केलेलं ते तर्कशून्य वक्तव्य तिने मला सांगितलं. मी त्या दुखण्यातून बरा होण्यासाठी किती कष्ट घेत होतो, याची अंजली साक्षीदार होती. स्पर्धा सुरू असताना ही गोष्ट मला समजली असती, तर त्याचा मला अधिकच त्रास झाला असता, हे माहीत असल्यामुळेच तिने ती माझ्यापासून लपवून ठेवली होती.

ॲडक्टर्सच्या दुखण्यातून बरं होण्यासाठी मी निरनिराळ्या प्रकारचे उपचार करून पाहिले. दुर्दैवाने मुंबईतल्या कोणालाही अचूक निदान करता आलं नाही. अखेर मी इंग्लंडला सुट्टीसाठी गेलो असताना माझे सर्जन अँड्रयू वॅलेस यांच्याशी माझी भेट झाली. त्यांना मी माझ्या दुखापतीची सविस्तर कल्पना दिली. त्यांनी मला प्रोफेसर कॅथी स्पीड यांचा सल्ला घ्यायची शिफारस केली. स्पीड यांनी मात्र माझ्या दुखापतीचं ताबडतोब निदान केलं. सर्व रेपोर्ट्स पाहिल्यानंतर मला 'गिलमोर्स ग्रॉइन' किंवा 'खेळाडूंना होणारा हर्निया' झाला असल्याचं त्यांनी सांगितलं. त्यावर उपचार करण्यासाठी त्यांनी जर्मनीतील डॉक्टर अल्रिक मुश्चावेक यांचं नाव सुचवलं. प्रोफेसर स्पीड यांनी मला काही औषधं लिहून दिली व थोडे व्यायामही करायला सांगितले. त्या उपचारांचा मला काही दिवसांतच गुण आला. जुलै-ऑगस्ट, २००८मध्ये तीन कसोटी सामने खेळण्यासाठी मी श्रीलंकेला जाऊ शकलो. ती मालिका आम्ही २-१ अशी हरलो. फारसा त्रास न होता मी तीनही मॅचेस खेळू शकलो, पण आता मात्र दुखापतीकडे आणखी दुर्लक्ष करणं योग्य नव्हतं. मी एकदिवसीय मालिकेत न खेळण्याचा निर्णय घेतला.

१३ ऑगस्ट, २००८ला मी मुंबईहून म्युनिकला जायला निघालो. डॉक्टर मुश्चावेक यांच्या 'म्युनिक हर्निया सेंटर'मध्ये दाखल होताना माझ्यासोबत कोणीच नव्हतं. त्या हॉस्पिटलमध्ये केवळ हर्नियावर उपचार केले जात. इतक्या अत्याधुनिक व सर्व सोयींनी युक्त अशा त्या सेंटरमधलं माझं चार दिवसांचं वास्तव्य हा माझ्यासाठी एक आगळावेगळा अनुभव होता. प्रोफेसर स्पीड यांनी डॉक्टर मुश्चावेक यांची खूपच प्रशंसा केली होती. मॅडम मुश्चावेक यांनी गेली दोन दशकं हर्निया व त्यावरील उपचारांबद्दल सखोल अध्ययन व संशोधन केलं होतं. त्यांनी अलीकडे शोधलेल्या काही नवीन तंत्रांमुळे रुग्ण अतिशय कमी वेळात पूर्वस्थितीला येऊ शकायचा. रुग्णाबरोबर संवाद साधण्याचीही त्यांची पद्धत खास होती. त्या चटकन रुग्णाला विश्वासात घेत. त्यामुळे पेशंट त्यांच्याशी मोकळेपणाने बोलू लागे. 'इथून गेल्यावर तुला पुन्हा कधीच हर्नियाचा त्रास होणार नाही,' हे त्यांनी मला पहिल्याच दिवशी सांगितलं. त्यांचा शब्द खरा ठरला.

१४ ऑगस्टला पहिली शस्त्रक्रिया झाली. समाधानाची गोष्ट म्हणजे शस्त्रक्रियेनंतर होणाऱ्या वेदना सुसह्य होत्या. दोन्ही जांघांवर एकाच वेळी शस्त्रक्रिया करता येईल का, असं मी मॅडमना विचारलं होतं; पण तसं करणं योग्य ठरणार नाही असं मॅडमचं म्हणणं होतं. त्यामुळे खूपच वेदना होण्याची शक्यता होती. साराची परीक्षा असल्यामुळे अंजली माझ्याबरोबर येऊ शकली नव्हती; पण १४ तारखेला रात्री ती म्युनिकला पोचली. १५ ऑगस्टला सकाळी माझ्यावर दुसरी शस्त्रक्रिया झाली. आस्ट्रेलियाच्या मालिकेआधी मला फिट व्हायचं होतं. फिट होण्यासाठी मला अधिक वेळ मिळावा म्हणून मी लागोपाठ दोन दिवस शस्त्रक्रिया करण्याची विनंती केली होती. दुसऱ्या शस्त्रक्रियेनंतर मला असह्य वेदना होऊ लागल्या. ओटीपोटात दुखत असल्यामुळे प्रातर्विधीचीही मोठी कठीण समस्या उभी राहिली. मी काही खाऊही शकत नव्हतो. मला रेचक दिलं गेलं. साखरेच्या पाकासारखी त्या सिरपची रुचकर चव हा त्या रात्री मला आलेला एकमेव सुखद अनुभव होता. पण वेदना जराही कमी होत नव्हत्या. रात्रभर मी तळमळत राहिलो. लवकरात लवकर घरी पोचावंसं मला वाटत होतं.

ती शस्त्रक्रिया खूपच महत्त्वाची ठरली. त्यामुळेच मी प्रदीर्घ काळ क्रिकेट खेळू शकलो. त्या काळी आपल्याकडे क्रीडाशास्त्र व क्रीडावैद्यकामध्ये सुसज्ज केंद्रांचा किती अभाव होता, ही गोष्टही यावरून दिसून येते. मी म्युनिकला जाऊन जगातील सर्वोत्कृष्ट तज्ज्ञांकडून उपचार घेऊ शकलो; पण इतर भारतीय खेळाडूंना हा खर्च कदाचित परवडू शकला नसता.

ती शस्त्रक्रिया किती गंभीर स्वरूपाची होती हे मला नंतर जाणवलं. १६ ऑगस्टला व्हीलचेअरमध्ये बसून मी त्या क्लिनिकमधून बाहेर पडलो. मी उभा राहू शकत नव्हतो. उभं राहण्याचा प्रयत्न केला तरी मला भोवळ येत होती. विमानतळावरच्या चेक-इन काउंटरवरही मला अंजलीच्या आधारानेच उभं राहता आलं. मुंबईला पोचल्यावर आम्हाला घरी घेऊन जाण्यासाठी माझा मित्र फैसल मोमेन आपली गाडी घेऊन आला होता. आयुष्यात प्रथमच मी त्याला गाडी अतिशय हळू चालवायला सांगितली. घरी पोचेपर्यंत माझं लक्ष समोरच्या रस्त्याकडे होतं. ओटीपोटाला थोडासा धक्का बसला तरी

मला प्रचंड वेदना व्हायच्या. समोर छोटासा स्पीड ब्रेकर दिसला, तरी हातांवर जोर देऊन मी सीटपासून स्वत:ला वर उचलून घ्यायचो.

घरी पोचताच 'बाबाला मिठी मारू नका' असं अंजलीने आधीच मुलांना बजावलं. त्या वेळी अर्जुनला माझ्याशी लुटपुटूची मारामारी खेळायला आवडत असे. मी खूप आजारी आहे, यावर त्याचा विश्वास बसेना. अखेर मला पोटाखाली बांधलेली बँडेजेस त्याला दाखवावी लागली. आम्हा सगळयांसाठीच तो फारच अवघड काळ होता. आत्तापर्यंत मुलांच्या बालपणाला, त्यांच्या सहवासाला महिनोन्महिने मुकावं लागत असल्याची मला खंत वाटायची. आता मी दिवसभर त्यांच्यासोबत घरी होतो; पण त्यांच्याशी खेळू शकत नव्हतो.

प्रवासाचा शीण संपल्यावर मी पुन्हा तंदुरुस्त होण्याच्या तयारीला लागलो. त्यासाठी पॉल क्लोझ व पॉल चॅपमन यांच्या खास मार्गदर्शनाखाली मी व्यायाम व इतर सराव करायला सुरुवात केली. त्या तीन आठवड्यांत मी कुठेही बाहेर पडलो नाही. सकाळी सात वाजता सुरू होणाऱ्या त्या सरावाने मी खूप थकून जायचो. दुसऱ्या आठवड्यात मी 'नॅशनल क्रिकेट ॲकॅडमी'त जाऊ लागलो. तिथे मी अनेक प्रकारचे व्यायाम करायचो. स्नायू मजबूत होण्यासाठीचे, हृदयाचे (कार्डिओ), पाण्यातील व्यायाम, सरळ रेषेत व आडव्या रेषेत पळणं, हातासाठीचे व्यायाम करण्याचा रबरी पट्टा (थेरा बँड) व इतर कवायतीचे व्यायाम असा मोठा कार्यक्रम असायचा. तो सर्व सराव आटपून मी दुपारी अडीचच्या सुमाराला थेट घरीच जायचो. मग जेवून दोन-तीन तास झोप घ्यायचो.

ऑक्टोबर, २००८मध्ये कसोटी मालिका खेळण्यासाठी आस्ट्रेलियाचा संघ भारतात येणार होता. ९ ऑक्टोबरला पहिला कसोटी सामना बंगळुरूला सुरू होणार होता. त्याआधी पूर्ण तंदुरुस्त होण्याचं उद्दिष्ट मी समोर ठेवलं होतं. उद्दिष्ट गाठण्यासाठी माझ्यापाशी फारच थोडा वेळ आहे याची मला जाणीव होती. मला खूपच मेहनत घ्यावी लागणार होती; पण मेहनत घेण्यात मी कधीच कसूर केली नाही. उलट कधीकधी मी दिवसभर इतका व्यायाम आणि सराव करायचो की, घरी आल्यावर माझ्या अंगात त्राणच उरलेलं नसायचं. मी सरळ बिछान्यात अंग झोकून देत असे. पुन्हा दुसऱ्या दिवशी सकाळी लवकर उठून मी सरावाला सुरुवात करायचो. त्या काळात माझ्या जिवलग दोस्तांची मला खूपच मदत झाली. अतुल रानडे, समीर दिघे, जगदीश चव्हाण दिवसभर मला सरावात मदत करत आणि माझा उत्साह वाढवत असत. त्यांचं ऋण मी कधीच विसरू शकरणार नाही.

आस्ट्रेलियाचा भारत दौरा, ऑक्टोबर-नोव्हेंबर, २००८

अखेर माझं उद्दिष्ट सफल झालं. ९ ऑक्टोबरला बंगळुरूच्या मैदानावर उतरताना मी मनातून खूपच आनंदी व समाधानी होतो. आस्ट्रेलियाने पहिल्या डावात ४३० धावा केल्या. पॉँटिंग व हसीने शतकं झळकावली. आम्हीही ३६० धावा काढत त्यांना चोख उत्तर दिलं. पहिल्या डावात मी फक्त १३ धावा काढू शकलो; पण दुसऱ्या इनिंग्जमध्ये मी छान बॅटिंग करत ४९ धावा काढल्या. महत्त्वाचं म्हणजे मला खेळताना काहीच त्रास झाला नाही. मी शंभरपेक्षा जास्त चेंडू खेळत तीन तास खेळपट्टीवर उभा होतो. सामना अनिर्णित अवस्थेत संपला. चार सामन्यांच्या मालिकेतला दुसरा सामना मोहालीला होता.

त्या कसोटी मालिकेला एक विशेष महत्त्व प्राप्त झालं होतं. नागपूरच्या चौथ्या कसोटीनंतर सौरवने क्रिकेटमधून निवृत्त होणार असल्याचं जाहीर केलं होतं. सौरव व माझ्यात खूपच छान जवळीक निर्माण झाली होती. आम्ही अनेक आनंदाचे क्षण एकत्र अनुभवले होते. किशोर वयात आम्ही १५ वर्षांखालील खेळाडूंसाठी आयोजित केलेल्या एका शिबिरात महिनाभर एकत्र होतो. त्यानंतर इंग्लंडमध्ये कैलाश गट्टाणीच्या संघातर्फे खेळतानाही तो माझ्या सोबत होता. भारतातर्फे आम्ही दशकाहून अधिक काळ एकत्र कसोटी सामने खेळलो. मर्यादित षटकांच्या अनेक सामन्यांत आम्ही सलामीचे जोडीदार होतो.

सौरवबरोबर बॅटिंग करताना मला एक मजेदार सवय लागली होती. सौरव जेव्हा तणावाखाली असे किंवा काही कारणांमुळे त्याची थोडी चिडचिड झालेली असे, त्या वेळेस त्याच्या मायबोलीत म्हणजे बंगालीत मी मुद्दाम एखादं

तोडकं-मोडकं वाक्य बोलत असे. त्या वाक्यात काहीही अर्थ नसला, तरी माझ्या मोडक्या-तोडक्या शब्दांमुळे त्याच्या

चेहऱ्यावर हसू फुटत असे. सौरवच्या सहवासाला मी आता मुकणार होतो. त्याला निवृत्तीपासून परावृत्त करायचा मी प्रयत्न करून पाहिला; पण तो आपल्या निर्णयावर ठाम होता.

१७ ऑक्टोबरपासून मोहालीला दुसरा कसोटी सामना सुरू झाला. आमच्या ४६९ धावसंख्येत माझा ८८ धावांचा वाटा होता. पीटर सिडलच्या गोलंदाजीवर मी स्लिपमध्ये झेल देऊन बाद झालो. मला माझी लय सापडू लागली होती. त्या डावात मी कसोटी सामन्यांत १२ हजार धावांचा टप्पा ओलांडत ब्रायन लाराचा विक्रम मोडला. मैदानावर जमलेल्या प्रेक्षकांनी उत्स्फूर्तपणे फटाक्यांची आतषबाजी करत माझा विक्रम जल्लोषात साजरा केला. सतत तीन मिनिटं फटाके वाजत राहिले. त्या प्रेमाने व कौतुकाने मी भारावून गेलो. त्या वेळी इंदरजित सिंग बिंद्रा मैदानावर उपस्थित होते. ब्रिंदासाहेब त्या वेळी 'पंजाब क्रिकेट असोसिएशन'चे अध्यक्ष होते व भारतीय क्रिकेट व्यवस्थापनामध्येही त्यांचा सक्रिय सहभाग असायचा. त्या दिवशीचा खेळ संपल्यानंतर ते मला म्हणाले, ''आज तू काढलेल्या धावांपेक्षा आम्ही जास्त फटाके वाजवले.'' माझा ऊर अभिमानाने भरून आला. पंजाब क्रिकेट असोसिएशनचं आदरातिथ्य नेहमीच अपूर्व असायचं. त्यामुळे पंजाबमध्ये खेळण्याचा आनंदही औरच असायचा.

आस्ट्रेलियाच्या पहिल्या डावाच्या सुरुवातीपासूनच आमच्या गोलंदाजांना अचूक टप्पा सापडला होता. त्यांनी आस्ट्रेलियन फलंदाजांना सतत दबावाखाली ठेवलं. चेंडू रिव्हर्स स्विंग होत होता. झहीर व इशांतने खेळपट्टीचा योग्य उपयोग करत सुरेख गोलंदाजी केली. त्याउलट आस्ट्रेलियन गोलंदाजांना मात्र दिशा व लय सापडली नाही. गंभीर, सेहवाग व धोनीने त्यांची गोलंदाजी चोपत भरपूर धावा काढल्या.

पहिल्या डावात सौरवने काढलेल्या शतकामुळे सर्वांनाच आनंद झाला. सौरवच्या त्या अप्रतिम खेळीमुळे मीही खूश झालो होतो. उडी मारून मूठ उंचावत सौरवने आपला आनंद व्यक्त केला. प्रेक्षकांनी टाळ्यांच्या गजरात त्याचं कौतुक केलं. सौरवचं ते अखेरचं कसोटी शतक ठरलं.

आस्ट्रेलियाच्या दुसऱ्या डावात मी घेतलेल्या एका झेलामुळे मोहालीची मॅच माझ्या लक्षात राहिली आहे. मी पॉइंटला उभा होतो. सायमन कॅटिचने भज्जीचा एक चेंडू माझ्या बाजूने कट करत चौकार मारण्याचा प्रयत्न केला. परंतु त्याचा शॉट नीट बसला नाही. चेंडू हवेत उडाला. चेंडू पकडण्यासाठी मी दोन्ही हात पसरून पुढे झेप घेतली. हाताला चामड्याचा स्पर्श होताच मला कमालीचा आनंद झाला होता. वेगात झालेल्या त्या चपळ हालचालीमुळे माझ्या जांघेवर चांगलाच ताण पडला होता; पण सुदैवाने मला जराही त्रास झाला नाही. कसून केलेल्या मेहनतीचा मला फायदा झाला होता.

मी पकडलेल्या झेलामुळे आम्हाला महत्त्वाचा बळी मिळाला. त्यानंतर आस्ट्रेलियाच्या मधल्या फळीला खिंडार पाडण्यात आमच्या गोलंदाजांनी यश मिळवलं. झहीर व इशांतने अप्रतिम गोलंदाजी केली. विशेषत: झहीरच्या उशिराने स्विंग होणाऱ्या चेंडूवर खेळताना आस्ट्रेलियन फलंदाज अक्षरश: चाचपडत होते. झहीर विलक्षण प्रतिभेचा गोलंदाज होता. दुर्दैवाने त्याला कारकिर्दीत अनेक दुखापतींना सामोरं जावं लागलं. नाहीतर त्याने भारताला आणखीही अनेक विजय मिळवून दिले असते. एकहाती मॅच जिंकून देण्याची त्याच्यापाशी क्षमता होती.

आम्ही मोहालीत आस्ट्रेलियाचा ३२० धावांनी दणदणीत पराभव केला. चार सामन्यांच्या कसोटी मालिकेत भारताने १-० अशी आघाडी मिळवली. त्यानंतर २९ ऑक्टोबरला दिल्लीच्या फिरोजशहा कोटला मैदानावर तिसऱ्या कसोटीला आरंभ झाला. दोन्ही संघांनी मोठी धावसंख्या उभारल्याने ती कसोटी अनिर्णित अवस्थेत संपली. पहिल्या डावात गौतम गंभीर व व्हीव्हीएस लक्ष्मण यांनी द्विशतकं काढली. त्या डावात ६८ धावा काढून मी बाद झालो. मी मनासारखी फलंदाजी करू लागलो होतो. आता मला एक मोठी खेळी खेळण्याचे वेध लागले होते. त्यासाठी मी संयमाने बॅटिंग करणं आवश्यक होतं.

दिल्ली कसोटी हा अनिल कुंबळेचा अखेरचा कसोटी सामना होता. सर्व भारतीय खेळाडूंसाठी तो एक भावपूर्ण क्षण होता. अनिल हा भारतीय संघाला हमखास विजय मिळवून देणारा हुकमी खेळाडू होता. अनिलबरोबर मी २० वर्षं क्रिकेट खेळलो. त्याने निवृत्त व्हायचं ठरवलं तेव्हा मला आश्चर्य वाटलं होतं. त्याच्या मते तो आता उत्तम गोलंदाजी करू शकत नव्हता. त्यामुळे त्याला संघासाठी १०० टक्के योगदान देता येत नव्हतं. त्यावर माझं म्हणणं अगदी साधं होतं. अनिलचं ८०

टक्के योगदानही समोरच्या फलंदाजांची भंबेरी उडवायला पुरेसं होतं. त्याने भारतासाठी अजून काही वर्षं खेळावं, अशी माझी प्रामाणिक इच्छा होती.

मी त्याला जवळजवळ पटवलंही होतं; पण मॅचच्या तिसऱ्या दिवशी त्याच्या उजव्या हाताच्या बोटाला इजा झाली. तो अखेरचा आघात ठरला. खांद्याच्या दुखापतीतून तो नुकताच बरा झाला होता. आता त्याच्या बोटावर ११ टाके घालावे लागले. त्याला गोलंदाजी करणं अशक्य झालं. मॅच संपल्यावर आम्ही त्याला कौतुकाने आमच्या खांद्यावर उचलत ड्रेसिंग रूममध्ये आणलं. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील एका महान खेळाडूच्या कारकिर्दीची ती अपूर्व सांगता होती.

अनिलने केलेलं अखेरचं भाषण आम्हा सर्वांसाठी अतिशय भावस्पर्शी होतं. सर्व प्रेक्षकांनी त्याला उभं राहून मानवंदना दिली. अनिलने नागपूरच्या अखेरच्या कसोटी सामन्यात आमच्याबरोबर ड्रेसिंग रूममध्ये राहावं, असा आम्ही सर्वांनी त्याला प्रेमळ आग्रह केला. अनिलनेही आमची विनंती मान्य केली. नागपूर कसोटीअखेर मालिका विजयाचा आनंद साजरा करताना आम्हाला अनिल आमच्यासोबत हवा होता. पहिल्या तीन कसोटी सामन्यांत तोच भारताचा कर्णधार होता. त्याआधी आस्ट्रेलियात झालेल्या मालिकेतही अनिलनेच भारताचं नेतृत्व केलं होतं.

६ नोव्हेंबरला नागपूरच्या मैदानावर चौथ्या कसोटीला सुरुवात झाली. सेहवाग व मुरली विजय या आमच्या सलामीवीरांनी पहिल्या विकेटसाठी १०० धावांची भागीदारी केली; पण त्यानंतर आम्ही दोन विकेट्स झटपट गमावल्या. लक्ष्मण व सौरवच्या साथीने मीही महत्त्वपूर्ण भागीदाऱ्या केल्या. त्या डावात दैव माझ्या बाजूने होतं. मला दोनदा जीवदान मिळालं. ऐंशी व नव्वदच्या घरात असताना आस्ट्रेलियन खेळाडूंनी दोन वेळा माझे झेल सोडले. मी सौरवला म्हटलं, ''मी शतक काढून तुला निरोप द्यावा अशी देवाची इच्छा असावी.''

सौरवने त्याच्या अखेरच्या मॅचमध्ये संघासाठी बहुमूल्य ८५ धावा काढल्या. त्या डावात आमच्या ४४१ धावा झाल्या, पण तरीही आम्ही १०० धावा अधिक काढायला हव्या होत्या असं मला वाटलं. खेळपट्टी फलंदाजांना साथ देत होती. दिवसअखेर आस्ट्रेलियाच्याही दोन गडी बाद १८९ धावा झाल्या होत्या. दुसऱ्या दिवशी आस्ट्रेलियन फलंदाजांना रोखणं आवश्यक होतं. आम्ही थोडा धोका पत्करून नवीन प्रयोग करायचे ठरवले. कारण मालिकेत बरोबरी साधण्यासाठी त्यांच्यावर दबाव असणं साहजिकच होतं. आपण प्रथम त्यांच्या धावांचा वेग कमी करू या, असं मी धोनीला सुचवलं. त्यासाठी आम्ही ८-१ अशी क्षेत्ररचना केली. ऑफ साइडला आठ तर ऑन साइडला फक्त एकच क्षेत्ररक्षक ठेवला. कसोटी सामन्यात असा प्रयोग त्यापूर्वी क्वचितच केला गेला असेल. झहीर व इशांतने क्षेत्ररचनेला योग्य अशी गोलंदाजी केली. सायमन कॅटिचला जीवदान मिळूनही तो व माइक हसी त्याचा फारसा लाभ उठवू शकले नाहीत.

उपाहारापूर्वी ते फक्त ४२ धावा काढू शकले. त्या दरम्यान इशांतने सायमन कॅटिचला बाद केलं होतं. त्या विकेटमुळे सामन्याचा रंग पालटला. उपाहार ते चहापानापर्यंत आम्ही आस्ट्रेलियाचे आणखी तीन गडी बाद केले. मॅचवर आता आम्ही कब्जा मिळवला होता. दुसऱ्या डावाअखेर आम्ही आस्ट्रेलियासमोर विजयासाठी ३८२ धावांचं लक्ष्य ठेवलं. अनिलऐवजी संघात आलेल्या लेग स्पिनर अमित मिश्रा व हरभजनने मिळून आस्ट्रेलियाचा दुसरा डाव दुसऱ्या सत्रातच गुंडाळला. आम्ही त्या मालिकेत आस्ट्रेलियावर २-० असा विजय मिळवला.

रात्री उशिरापर्यंत विजयाचा जल्लोष सुरू होता. त्या विजयात गॅरीचा महत्त्वाचा वाटा होता. पडद्यामागे राहून त्याने सर्व खेळाडूंकडून उत्तम कामगिरी करून घेतली होती. गॅरीनेच जमथा इथल्या 'व्हीसीए क्लब'मध्ये अनिल व सौरवचा खास निरोप-समारंभ आयोजित केला. अनिल व सौरवना आम्ही सर्वांनीच बोलण्याचा आग्रह केला.

त्या दिवसाच्या स्मृती आजही सर्व खेळाडूंच्या मनात नक्कीच ताज्या असतील. तो विशेष प्रसंग साजरा करण्यासाठी सर्वांनी त्या दिवशी नागपूरलाच मुक्काम केला. त्या दिवशी अंजलीचा चाळिसावा वाढदिवस असूनही मी सर्वांबरोबर नागपूरला राहिलो. अंजली नेहमीप्रमाणेच मला समजून घेईल व मोठ्या मनाने मला माफ करेल, याची मला खातरी होती.

भारताचा श्रीलंका दौरा, २००८

पहिली कसोटी. कोलंबो (एसएससी) – २३ ते २६ जुलै, २००८

श्रीलंका ६००-६ घोषित (डीपीएमडी जयवर्धने १३६, टीटी समरवीरा १२७, टीएम दिलशान १२५*, एसएम वर्णपुरा ११५; आय शर्मा २-१२४)

भारत २२३ (व्हीव्हीएस लक्ष्मण ५६, **एसआर तेंडुलकर** २७; एम मुरलीधरन ५-८४, बीएडब्ल्यू मेंडिस ४-७२) व १३८ (फॉलो-ऑन) (जी गंभीर ४३, **एसआर तेंडुलकर** १२; एम मुरलीधरन ६-२६, बीएडब्ल्यू मेंडिस ४-६०)

श्रीलंका एक डाव व २३९ धावांनी विजयी

दुसरी कसोटी. गॅले – ३१ जुलै ते ३ ऑगस्ट, २००८

भारत ३२९ (व्ही सेहवाग २०१*, जी गंभीर ५६, **एसआर तेंडुलकर** ५; बीएडब्ल्यू मेंडिस ६-११७) व २६९ (जी गंभीर ७४, व्ही सेहवाग ५०, **एसआर तेंडुलकर** ३१; बीएडब्ल्यू मेंडिस ४-९२, एम मुरलीधरन ३-१०७)

श्रीलंका २९२ (डीपीएमडी जयवर्धने ८६, केसी संगकारा ६८, एसएम वर्णपुरा ६६; एच सिंग ६-१०२, ए कुंबळे ३-८१) व १३६ (टीटी समरवीरा ६७*, टीएम दिलशान ३८; एच सिंग ४-५१, आय शर्मा ३-२०, ए कुंबळे २-४१)

भारत १७० धावांनी विजयी

तिसरी कसोटी. कोलंबो (पीएसएस) – ८ ते ११ ऑगस्ट, २००८

भारत २४९ (जी गंभीर ७२, एससी गांगुली, **एसआर तेंडुलकर** ६; बीएडब्ल्यू मेंडिस ५-५६, केटीजीडी प्रसाद ३-८२) व २६८ (आर द्रविड ६८, व्हीव्हीएस लक्ष्मण ६१*, **एसआर तेंडुलकर** १४, बीएडब्ल्यू मेंडिस ३-८१, एम मुरलीधरन ३-९९)

श्रीलंका ३९६ (केसी संगकारा १४४, एचएपीडब्ल्यू जयवर्धने ४९, डब्ल्यूपीयूजेसी वाझ ४७; एच सिंग ३-१०४, झेड खान ३-१०५, ए कुंबळे ३-१२३) व १२३-२ (एसएम वर्णपुरा ५४*, डीपीएमडी जयवर्धने ५०)*

श्रीलंका ८ गडी राखून विजयी

श्रीलंका मालिकेत २-१ विजयी

आस्ट्रेलियाचा भारत दौरा, २००८

पहिली कसोटी. बंगळुरू – ९ ते १३ ऑक्टोबर, २००८

आस्ट्रेलिया ४३० (एमइके हसी १४६, आरटी पाँटिंग १२३, एसएम कॅटिच ६६; झेड खान ५-९१, आय शर्मा ४-७७) व २२८-६ घोषित (एसआर वॅटसन ४१, बीजे हॅडिन ३५*, आय शर्मा ३-४०)

भारत ३६० (झेड खान ५७*, एच सिंग ५४, आर द्रविड ५१, **एसआर तेंडुलकर** १३; एमजी जॉन्सन ४-७०, एसआर वॅटसन ३-४५) व १७७-४ (**एसआर तेंडुलकर** ४९, व्हीव्हीएस लक्ष्मण ४२)*

सामना अनिर्णित

दुसरी कसोटी. मोहाली – १७ ते २१ ऑक्टोबर, २००८

भारत ४६९ (एससी गांगुली १०२, एमएस धोनी ९२, **एसआर तेंडुलकर** ८८, जी गंभीर ६७; एमजी जॉन्सन ३-८५, पीएम सिडल ३-११४) व ३१४-३ घोषित (जी गंभीर १०४, व्ही सेहवाग ९०, एमएस धोनी ६८*, **एसआर तेंडुलकर** १०)

आस्ट्रेलिया २६८ (एसआर वॅटसन ७८, एमइके हसी ५४; ए मिश्रा ५-७१) व १९५ (एमजे क्लार्क ६९; एच सिंग ३-३६, झेड खान ३-७१)

भारत ३२० धावांनी विजयी

तिसरी कसोटी. दिल्ली – २९ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर, २००८

भारत ६१३-७ घोषित (जी गंभीर २०६, व्हीव्हीएस लक्ष्मण २००*, **एसआर तेंडुलकर** ६८; एमजी जॉन्सन ३-१४२) व

२०८-५ घोषित (व्हीव्हीएस लक्ष्मण ५९; **एसआर तेंडुलकर** ४७; बी ली २-४८)

आस्ट्रेलिया ५७७ (एमजे क्लार्क ११२, आरटी पाँटिंग ८७, एमएल हेडन ८३, एसएम कॅटिच ६४, एमइके हसी ५३; व्ही सेहवाग ५-१०४, ए कुंबळे ३-११२) व ३१-०

सामना अनिर्णित

चौथी कसोटी. नागपूर – ६ ते १० नोव्हेंबर, २००८

भारत ४४१ (**एसआर तेंडुलकर** १०९, एससी गांगुली ८५, व्ही सेहवाग ६६, व्हीव्हीएस लक्ष्मण ६४, एमएस धोनी ५६; जेजे क्रेज्झा ८-२१५) व २९५ (व्ही सहवाग ९२, एमएस धोनी ५५, एच सिंग ५२, **एसआर तेंडुलकर** १२; एसआर वॅटसन ४-४२, जेजे क्रेझ्जा ४-१४३)

आस्ट्रेलिया ३५५ (एसएम कॅटिच १०२, एमइके हसी ९०, सीएल व्हाइट ४६; एच सिंग ३-९४) व २०९ (एमएल हेडन ७७; एच सिंग ४-६४, ए मिश्रा ३-२७)

भारत १७२ धावांनी विजयी

भारत मालिकेत २-० विजयी

२०.
आयपीएल स्पर्धा

एप्रिल, २००८मध्ये 'इंडियन प्रिमियर लीग' (आयपीएल) स्पर्धेला प्रारंभ झाला. या स्पर्धेत खाजगी मालकीचे संघ (फ्रँचाईझ) सहभागी झाले. स्पर्धा कमालीची यशस्वी व लोकप्रिय ठरली. 'आयपीएल'चा जागतिक क्रिकेटवर क्रांतिकारी प्रभाव पडला. या स्पर्धेने नव्या पिढीच्या क्रिकेटवेड्या रसिकांची मनं जिंकली. जगातील सर्वोत्तम क्रिकेटपटूंना 'आयपीएल'ने आकर्षित केलं. दरवर्षी एप्रिल-मेमध्ये होणारी ही स्पर्धा आता भारतातील घराघरात जिव्हाळ्याचा विषय बनली आहे. जागतिक क्रिकेटच्या वेळापत्रकाचाही ती महत्त्वाचा भाग बनेल, याची मला खातरी वाटते.

या स्पर्धेतले काही सामने काही वेळा प्रतिकूल हवामानात, तर क्वचित परदेशातही खेळवावे लागले; पण तरीही जवळजवळ प्रत्येक सामन्याला प्रेक्षकांची तुडुंब गर्दी होत असे. केवळ छोट्या शहरांतच प्रेक्षकांनी गर्दी केली असं नव्हे; तर प्रत्येक ठिकाणी झालेल्या सामन्यांना प्रेक्षकांचा प्रचंड प्रतिसाद मिळत गेला. मे, २०१३च्या स्पर्धेदरम्यान स्पॉट व मॅच फिक्सिंगच्या चर्चेला उधाण आलं होतं. तरीही दर्जेदार क्रिकेटला उत्स्फूर्त पाठिंबा देत हजारोंच्या संख्येने प्रेक्षक स्टेडियममध्ये येत राहिले. त्या वेळी जे काही घडत होतं त्याचा मला अतिशय धक्का बसला होता. घडलेल्या प्रकारामुळे मी अत्यंत निराश व उद्विग्न झालो होतो. वर्तमानपत्रात जाहीर निवेदन देऊन मी निषेधही व्यक्त केला होता. कोणत्याही प्रकारचा भ्रष्टाचार अजिबात खपवून न घेण्याचं धोरण असणं अतिशय आवश्यक होतं. तितकंच याबाबतीत खेळाडूंचं प्रबोधन करणंही गरजेचं होतं. क्रिकेट खेळावर अनिष्ट परिणाम करू शकणाऱ्या भ्रष्टाचाराविषयी खेळाडूंना नीट समजावून सांगणं खूप महत्त्वाचं होतं; मात्र काही मोजक्या खेळाडूंच्या गैरकृत्यामुळे पूर्ण स्पर्धेला बदनाम करणं चुकीचं होतं.

आयपीएलमुळे भारतीय क्रिकेटचा एक निराळाच पैलू समोर आला. देशांतर्गत क्रिकेटमध्ये लोक अधिक रुची घेऊ लागले. त्याचा परिणाम असा झाला की, स्थानिक क्रिकेटही अधिक जाणीवपूर्वक व जबाबदारीने खेळलं जाऊ लागलं. तिथल्या कामगिरीला खूपच महत्त्व प्राप्त झालं. स्थानिक स्पर्धेतील आपल्या चमकदार खेळामुळे आपल्याला आयपीएलसाठी करारबद्ध केलं जाईल, याची जाणीव खेळाडूंना होऊ लागली.

सुरुवातीची धास्ती

२००७च्या अखेरीस बीसीसीआयने आयपीएलची अधिकृत घोषणा केली. त्या वेळी या स्पर्धेबद्दल साहजिकच काळजीचं व तणावाचं वातावरण होतं. भारतीय क्रिकेट क्षेत्राला खाजगी मालकी असलेल्या संघ-संस्कृतीशी (क्लब कल्चर) जुळवून घेणं त्या वेळी अवघड जात होतं. खेळाडूंचा लिलाव होणं ही संकल्पनाच सामान्य भारतीय क्रिकेटचाहत्यासाठी अपरिचित व परकी होती. स्पर्धा किती गांभीर्याने खेळली जाईल किंवा स्पर्धेत क्रिकेटचा दर्जा कसा असेल, याबद्दल लोकांमध्ये दुमत होतं. शिवाय एप्रिल-मेमधील कडक उन्हाळ्यात प्रेक्षकांचा प्रतिसाद कितपत मिळेल, याविषयीही शंका व्यक्त केली जात होती.

या ठिकाणी मला स्वत:लाच एक कबुली द्यावीशी वाटते. आयपीएल लोकप्रिय ठरणार याबद्दल माझ्या मनात किंचितही शंका नव्हती, पण प्रेक्षकांचा इतक्या चटकन मिळालेला भरघोस प्रतिसाद पाहून मात्र मी थक्क झालो. दुसरं म्हणजे, स्पर्धेत एवढं अस्सल आणि दर्जेदार क्रिकेट खेळलं जाईल याची मीही अपेक्षा केली नव्हती. आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामने ज्या अटीतटीने लढले जातात तितकीच चुरस आयपीएलच्या मॅचेसमध्ये दिसून येते. प्रत्येक खेळाडू आपल्या संघासाठी स्वत:ची

गुणवत्ता पणाला लावून खेळत असतो. आपल्या लाडक्या स्थानिक खेळाडूंना जगातील सर्वोत्कृष्ट खेळाडूंसमवेत खेळताना पाहून चाहत्यांच्याही डोळ्याचं पारणं फिटतं.

आयपीएल व आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधला फरक

आयपीएल व आंतरराष्ट्रीय क्रिकेट यांत मूलभूत तफावत आहे. खाजगी मालकांचा सहभाग हे आयपीएलचं वेगळेपणं व वैशिष्ट्य आहे. त्यांच्या आस्थापूर्ण सहभागामुळे स्पर्धेला एक वेगळाच माहोल व स्वरूप प्राप्त होतं. प्रत्येक मालकाच्या काही विशिष्ट अंधश्रद्धा असतात. त्या नकळत संघावर लादल्या जातात. त्यामुळे विचित्र आणि गमतीशीर प्रकार झालेले पाहायला मिळाले आहेत. खेळाडूंनी नेमक्या कोणत्या वेळेला ड्रेसिंग रूममधून बाहेर पडायचं, हे एका संघमालकाचा गुरू ठरवत असे. त्या क्षणाला असेल त्या स्थितीत खेळाडूंना बाहेर जावं लागे.

दुसऱ्या एका संघमालकाचा वास्तुशास्त्रावर (फेंगशुईप्रमाणे एक शास्त्र) फारच विश्वास होता. त्यांच्या ड्रेसिंग रूममधील वस्तूंची रचना एका विशिष्ट प्रकारे केलेली असे. उदाहरणार्थ, रूममधील आरसे एका ठरावीक कोनात वळवून ठेवलेले असत. आमच्याशी झालेल्या एका मॅचच्या वेळी तर त्या संघाने कमालच केली. आमच्याही ड्रेसिंग रूममधील आरसे त्यांनी त्याच अंशात बदलून ठेवले. आम्हाला ते रुचलं नाही. आम्हीही रात्री उशिरा त्यांची सर्व रचना बदलली. त्यांना मुद्दाम बेचैन करण्यासाठी आम्ही टॉवेल पसरवून सर्व आरसे झाकून ठेवले.

दुसऱ्या एका संघाच्या बाबतीतही असाच एक मजेशीर प्रसंग घडला. त्या संघ व्यवस्थापनाने आम्हाला आमच्या एका विशिष्ट वॉशरूमचा वापर करण्यास मज्जाव केला. 'बाथरूम आउट ऑफ ऑर्डर' (बाथरूम नादुरुस्त आहे) अशी पाटीच वॉशरूमबाहेर टांगलेली होती. आमच्या एका खेळाडूला आतमध्ये जाण्याचा मोह आवरता आला नाही. आश्चर्य म्हणजे वॉशरूम वापरण्यास अगदी योग्य होती. मॅचच्या दरम्यान आम्ही मुद्दाम त्याच वॉशरूमचा वापर केला आणि मॅच जिंकलो!

आयपीएल व आंतरराष्ट्रीय क्रिकेट यांमधील दुसरा मुख्य फरक म्हणजे, आयपीएल संघात दिसून येणारी सांस्कृतिक विविधता. भारतीय संघातील सर्व खेळाडू जवळजवळ सारख्याच परिस्थितीमधून पुढे आलेले असतात. राष्ट्रीय संघात प्रवेश घेईपर्यंत ते भारतीय पद्धतीने क्रिकेट खेळण्यात पारंगत झालेले असतात. एखादा नवोदित भारतीय क्रिकेटपटू व एका बुजुर्ग आंतरराष्ट्रीय खेळाडूच्या दृष्टिकोनात फार मोठी सांस्कृतिक तफावत असू शकते. अशा वेळी संघातील खेळाडूंमध्ये सख्य व मित्रत्व निर्माण होणं फार आवश्यक असतं. कारण नवोदित खेळाडूला आपल्याच सहकाऱ्याबद्दल दरारा किंवा भीतियुक्त आदर वाटण्याची खूपच शक्यता असते. त्यामुळे तरुण खेळाडूंना नीट सांभाळून व विश्वासात घेण्याची जबाबदारी संघमालक, व्यवस्थापन व ज्येष्ठ खेळाडूंवर असते. 'मुंबई इंडियन्स' संघामधील तरुण प्रतिभाशाली खेळाडूंचा मित्र, सल्लागार आणि समुपदेशक होताना मला मोठी मौज आली. त्यामुळेच नवोदित व नावाजलेल्या खेळाडूंमधला मी एक दुवा होऊ शकलो.

'आयपीएल'चा भारतीय क्रिकेटवरचा प्रभाव

आयपीएलचा भारतीय क्रिकेटवर खूप खोलवर परिणाम झाला यात काहीच संशय नाही. त्यापासून मिळालेले फायदे कुणाच्याही दृष्टीस सहज पडू शकतात. येणाऱ्या काही वर्षांत जर आयपीएलला आपला पाया अधिक मजबूत करायचा असेल, तर काही गोष्टींबाबत मात्र अतिशय गांभीर्याने विचार करावा लागेल.

आंतरराष्ट्रीय खेळाडूंशी सुधारलेले संबंध व त्यांच्यात आणि भारतीय खेळाडूंमध्ये जुळून आलेलं मैत्र हा आयपीएलचा झालेला महत्त्वाचा फायदा म्हणावा लागेल. याचं उत्कृष्ट उदाहरण म्हणजे अँड्रयू सायमंड्स आणि हरभजन सिंग यांच्यात निर्माण झालेली जवळीक. २०११मध्ये आयपीएलच्या चौथ्या हंगामात सायमंड्स व भज्जी मुंबई इंडियन्स संघातून एकत्र खेळले. त्या वेळी अँड्रयूबरोबर झालेली पहिली भेट अजूनही मला आठवते. ''२००८मध्ये सिडनीला झालेला विवाद आता आमच्यासाठी इतिहासजमा झाला आहे,'' असं मी अँड्रयूला म्हणालो. ''तुझ्याशी बोलताना मी किंवा हरभजन त्या घटनेचा चुकूनही उल्लेख करणार नाही,'' असं मी त्याला खातरीपूर्वक सांगितलं. अँड्रयूनेही लगेच मैत्रीचा हात पुढे केला आणि

आम्ही त्याचे दोस्त बनलो. त्या हंगामात आम्ही एकमेकांच्या साथीने खेळलेल्या काही चांगल्या मॅचेस आजही माझ्या स्मरणात आहेत. आम्ही पुन्हा जेव्हा भेटू तेव्हा आमच्यातली मैत्री अबाधित राहिलेली असेल, याची मला खातरी आहे.

आयपीएल सुरू झाल्यापासून भारत-आस्ट्रेलिया मालिकेतील ताणतणावही निवळल्याचं चित्र दिसून आलं. २००८च्या दौऱ्यात निर्माण झालेली तेढ आणि कटुता आता आढळून येत नाही. उदाहरणार्थ, २०१३ सालामधील आयपीएलच्या सहाव्या हंगामात मला रिकी पाँटिंगसोबत खेळण्याची संधी मिळाली. आम्ही एकमेकांविरुद्ध अनेक वर्षं आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळलो होतो; पण क्वचित 'हॅलो' म्हणण्याखेरीज आमच्यात अधिक संवाद झाला नव्हता. आयपीएलमुळे मात्र आम्ही एकाच ड्रेसिंग रूममध्ये अचानक एकत्र आलो. रिकीला समजून घेण्याची मला संधी मिळाली. आयपीएलच्या मॅचेसमध्ये आम्ही सलामीला एकत्र फलंदाजी केली. रिकीचे क्रिकेटवरील विचार ऐकून माझ्या ज्ञानात निश्चितच भर पडली. आयपीएलच्या प्रत्येक हंगामात मला वेगवेगळ्या दर्जेदार फलंदाजांबरोबर सलामीला बॅटिंग करण्याचा आनंद लुटता आला. दुसऱ्या हंगामात सनथ जयसूर्या, तिसऱ्या हंगामात शिखर धवन, तर पाचव्या हंगामात ड्वेन स्मिथ माझे साथीदार होते.

आयपीएलमुळे दोन देशातील खेळाडूंमधील संबंध सुधारलेच; शिवाय त्याचा अप्रत्यक्ष पण चांगला परिणाम प्रेक्षकांवरही झाला. २००९मध्ये दक्षिण आफ्रिकेत, 'राजस्थान रॉयल्स' व 'कोलकाता नाइट रायडर्स'मधील सामना कमालीचा रंगला. सामन्याचा निकाल अखेर सुपर ओव्हरवरून ठरवण्यात आला. युसुफ पठाणने त्या सुपर ओव्हरमध्ये केलेल्या अफलातून कामगिरीने प्रभावित होऊन शेन वॉर्नने मैदानावर धावत जाऊन त्याला मिठी मारली. त्या वेळी मैदानावर विविध ठिकाणाहून आलेले अनेक भारतीय प्रेक्षक उपस्थित होते. वॉर्नने दाखवलेल्या मनमोकळ्या व खिलाडू वृत्तीवर फिदा होऊन त्यांनी टाळ्यांच्या गजरात वॉर्नचं कौतुक केलं.

माझ्या मते, स्थानिक भारतीय खेळाडूला जगातील सर्वोत्कृष्ट क्रिकेटपटूंसोबत खेळण्याची संधी मिळणं हा आयपीएल स्पर्धेचा झालेला सर्वांत महत्त्वाचा फायदा आहे. भारतात असे अनेक गुणी क्रिकेटपटू आहेत, ज्यांची देशातर्फे खेळण्याची संधी थोडक्यात हुकली आहे. अनेक खेळाडूंच्या वयाची तिशी उलटल्यामुळे भारताचं प्रतिनिधित्व करण्याच्या त्यांच्या आशा जवळजवळ संपुष्टात आल्या आहेत. अचानक आपलं नशीब उजळेल, अशी या खेळाडूंनी कधी कल्पनाही केली नसेल. आयपीएलने त्यांच्यापैकी अनेकांना योग्य तो सन्मान, आदर आणि उत्तम मानधन मिळवून दिलं. आंतरराष्ट्रीय क्रिकेटनंतर खेळाडूंना एवढा मोठा नावलौकिक प्राप्त झाला तो आयपीएलमुळेच. निरनिराळ्या देशातील उत्तमोत्तम खेळाडूंबरोबर खेळायला मिळाल्याने स्थानिक खेळाडूंना चटकन आंतरराष्ट्रीय ख्याती मिळाली. त्यामुळे देशांतर्गत क्रिकेटचा दर्जाही उंचावला गेला.

आयपीएलमधून पदार्पण करणाऱ्या नवोदित खेळाडूंनाही या स्पर्धेने भरपूर लाभ मिळवून दिला. आयपीएलमुळे त्यांचं स्वप्नच जणू साकार झालं. डेल स्टेन आणि मॉर्ने मॉर्केल यांसारख्या कसदार गोलंदाजांसमोर त्यांना नेट्समध्ये सराव करता आला. जॅक कॅलिस, ए.बी. डिव्हिलियर्स आणि केविन पीटरसन अशा बुजुर्ग खेळाडूंचा त्यांना ड्रेसिंग रूममध्ये सहवास मिळाला. ख्रिस गेल आणि मायकेल हसीसारख्या तगड्या फलंदाजांसमवेत त्यांना मॅचमध्ये प्रत्यक्ष खेळता आलं. आपल्या समकालीन महान क्रिकेटपटूंकडून इतक्या लहान वयात शिकण्याची संधी मिळणं हे त्यांचं खरोखरच भाग्य आहे. आमच्या मुंबई इंडियन्समधील तरुण क्रिकेटपटूंना टी-२०मधील सर्वोत्तम गोलंदाज लसिथ मलिंगाबरोबर नेट्समध्ये सराव करता आला. किरॉन पोलार्डसारख्या प्रसिद्ध अष्टपैलू खेळाडूसोबत खेळण्याची संधी मिळाली. संघाचा मार्गदर्शक अनिल कुंबळेसमवेत गोलंदाजांच्या तंत्राविषयी चर्चा करता आली. एका मॅचमध्ये मुंबईचा मध्यमगती गोलंदाज धवल कुलकर्णी याला महत्त्वाचा सल्ला देण्यासाठी जेव्हा लसिथ मलिंगा मिड ऑनवरून धावत त्याच्यापाशी आला, तेव्हा मला मलिंगाचं मनापासून कौतुक वाटलं. खेळाडूंना मिळालेले असे अनुभव मला आयपीएलमधून मिळालेल्या मानधनापेक्षा अधिक मौल्यवान वाटतात. भारतीय संघात प्रस्थापित झालेल्या ज्येष्ठ खेळाडूंनाही आयपीएलच्या अनुभवातून एक वेगळाच फायदा झाला. आयपीएल स्पर्धेत खेळल्यामुळे दुसऱ्या देशातील खेळाडूंच्या क्षमता व उणिवा त्यांना अधिक चांगल्या प्रकारे जोखता आल्या.

आयपीएलमुळे राष्ट्रीय संघात प्रवेश

आयपीएलमध्ये चमकदार कामगिरी केल्यामुळे अनेक भारतीय खेळाडूंसाठी राष्ट्रीय संघाचं प्रवेशद्वार खुलं झालं. निवडसमितीच्या नजरेत भरल्यामुळे त्यांची भारतीय संघात निवड झाली. त्याचप्रमाणे इतर अनेक खेळाडूंना आयपीएलमुळे पुन्हा प्रकाशझोतात यायची संधी मिळाली. आयपीएलच्या पहिल्याच हंगामात केलेल्या उत्कृष्ट कामगिरीमुळे युसुफ पठाण व रवींद्र जडेजा या दोन अष्टपैलू क्रिकेटपटूंना भारतीय संघात स्थान मिळू शकलं. आयपीएलच्या चौथ्या हंगामातील उत्तम खेळामुळे इरफान पठाण पुन्हा राष्ट्रीय संघात आला.

आयपीएलमुळे अनेक खेळाडूंना भारतीय संघात प्रवेश करण्याची संधी मिळाली, ही गोष्ट जरी मला मान्य असली; तरी इथे एक महत्त्वाची गोष्ट मला मुद्दाम सांगावीशी वाटते. आयपीएलमधील एखाद्या खेळाडूच्या कामगिरीचा निकष फक्त त्याच्या टी-२० किंवा अपवादात्मक परिस्थितीत एकदिवसीय सामन्याच्या निवडीकरता लावायला हवा. आयपीएलमध्ये चमकलेला खेळाडू हा कसोटी व एकदिवसीय सामन्यासाठी योग्य असेलच असं नाही. क्रिकेटचे हे दोन प्रकार टी-२०पेक्षा पूर्ण भिन्न आहेत. त्या प्रकारात खेळण्यासाठी निराळ्या प्रकारचं कौशल्य व क्षमता खेळाडूपाशी असाव्या लागतात. कसोटी व एकदिवसीय सामन्यातील निवडीसाठी निवडसमितीने खेळाडूंच्या रणजी, दुलिप व इराणी करंडकांच्या सामन्यांमधील कामगिऱ्यांचा निकष लावायला हवा.

माजी क्रिकेटपटूंचा सन्मान

आयपीएलमुळे बीसीसीआय भारताच्या माजी कसोटीपटूंचा योग्य व उचित सन्मान करू शकली. आयपीएलने माजी कसोटीपटूंना दिलेली ही अनोखी भेटच आहे. आयपीएलच्या पाचव्या हंगामानंतर मे, २०१२मध्ये बीसीसीआयने हा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला. भारताच्या माजी कसोटीपटूंना त्यांच्या काळात फारसं मानधन मिळत नसे. आज अशा अनेक क्रिकेटपटूंना म्हातारपणात हालअपेष्टा सोसाव्या लागत आहेत. आयपीएलच्या उत्पन्नामधून भारतातर्फे खेळलेल्या प्रत्येक क्रिकेटपटूला एक विशिष्ट रक्कम देऊन त्यांचा सन्मान करायचा बीसीसीआयने ठरवलं. कसोटी न खेळलेल्या, पण अनेक प्रथम दर्जाचे सामने खेळलेल्या क्रिकेटपटूंचाही नंतर या योजनेत समावेश करण्यात आला. क्रिकेटचा ध्यास घेतलेल्या अनेक खेळाडूंना यामुळे निश्चितच प्रोत्साहन मिळालं. राष्ट्रीय संघात आपली निवड झाली तर आपल्याला आर्थिक चिंता भेडसावणार नाही, हा मोठा दिलासा त्यांना मिळाला.

काळजी आणि भीती

‘आयपीएलमुळे क्रिकेटपटूंना तरुण वयातच भरपूर मानधन मिळू लागलं आहे. त्यामुळे भारतातर्फे खेळण्याला त्यांच्या लेखी फारसं महत्त्व उरणार नाही किंवा देशासाठी खेळण्याची महत्त्वाकांक्षा त्यांना वाटणार नाही,’ अशी भीती व्यक्त करण्यात येत आहे. ‘आयपीएलमधून मिळणाऱ्या अमाप पैशांतच तरुण क्रिकेटपटू समाधान मानू लागले आहेत,’ असं अनेकांचं मत आहे. माझं मत मात्र वेगळं आहे. भारतातर्फे खेळणं हेच माझं एकमेव ध्येय होतं. त्या महत्त्वाकांक्षेची तुलना मी दुसऱ्या कशाशीही करू शकत नाही; अर्थातच हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे. माझ्या देशासाठी खेळायला मिळावं म्हणून मी कितीही मेहनत घ्यायला तयार आहे, की वर्षातून फक्त दोन महिने मिळणाऱ्या प्रसिद्धीत मला समाधानी राहायचं आहे, याचा निर्णय ज्याच्या त्याने घ्यायला हवा. ज्याला देशाचं प्रतिनिधित्व करायची खरी तळमळ आहे, तो आपलं ध्येय साध्य करण्यासाठी नक्कीच संघर्ष करेल. ज्यांना ती आसच नाही त्यांची भारतीय संघाचा मानचिन्ह असलेला पोशाख अंगावर चढवायची लायकी नाही असं मी म्हणेन.

आयपीएल स्पर्धा खेळाडूंची पुरती दमछाक करते असंही काही जणांचं म्हणणं आहे. मला हे विधान मान्य नाही. दरवर्षी टी-२०चे किती सामने खेळले जावेत यावर नियंत्रण असायला हवं की नको, या वादात मला शिरायचं नाही; पण खेळाडूंच्या दुखापतींचं सर्व खापर आयपीएलवर फोडणं, मला चुकीचं वाटतं. आज प्रत्येक देशातले अनेक उत्तम क्रिकेटपटू

आयपीएलमध्ये खेळत आहेत. प्रत्येक देशाने क्रिकेटचं आखलेलं वार्षिक वेळापत्रकही भरगच्च आहे. वर्षभर सतत क्रिकेट खेळत असताना, खेळाडूंना दुखापती होणं अपरिहार्य आहे. आयपीएल न खेळलेल्या काही आस्ट्रेलियन क्रिकेटपटूंनाही दुखापतींमुळे क्रिकेटपासून बराच काळ दूर राहावं लागलं आहे. खरंतर दुखापतीच्या उपचारांची सर्वोत्तम यंत्रणा आज आस्ट्रेलियात आहे. अनेक क्रिकेटपटू हे छोट्या-मोठ्या दुखापतींसह अनेकदा खेळत असतात. प्रत्येक खेळाडूला आपल्या शरीराची उत्तम जाण असते. कधी खेळावं व कधी खेळू नये, याचा निर्णय त्याने समंजसपणाने व जबाबदारीने घ्यायला हवा.

मुंबई इंडियन्सतर्फे खेळताना

मुंबई इंडियन्सतर्फे खेळताना मला खूपच मजा आली. २००७मध्ये आयपीएलची घोषणा झाल्यानंतर मुंबई इंडियन्स संघाचे मालक मुकेश अंबानी मला भेटले. मी संघाचा कर्णधार व्हावं, अशी इच्छा त्यांनी व्यक्त केली. मी लगेच ती मान्य केली. प्रत्येकाच्या मनात संघाबद्दल निष्ठा आणि बांधिलकी हवी, एवढीच माझी अपेक्षा असल्याचं मी मुंबई इंडियन्सच्या खेळाडूंसमोर स्पष्ट केलं. आयपीएलचे गेले सहा हंगाम आम्ही याच वृत्तीने खेळलो आहोत.

खेळाडूंच्या लिलावाच्या पद्धतीशी रुळायला सर्वांनाच काही वेळ लागला. २००८ साली ही लिलाव पद्धत प्रथमच वापरली गेली. तेव्हा मी आस्ट्रेलियात होतो. प्रत्येक क्रमांकावर खेळण्यासाठी मला हव्या असलेल्या खेळाडूंची यादी मी व्यवस्थापनाला दिली होती. त्यासाठी मी वेगवेगळे पर्यायही दिले होते; पण अखेर आम्ही निवडलेल्या संघात मला अपेक्षित असलेला समतोल साधला गेला नव्हता. त्यामुळे आयपीएलचा पहिला हंगाम आमच्यासाठी यशस्वी ठरला नाही. दुखापतीमुळे मी पहिले सात सामने खेळू शकलो नव्हतो. आमच्या अडचणीत त्यामुळे आणखीनच भर पडली.

आमच्या संघात आम्हाला मनासारखा मिळालेला खेळाडू म्हणजे लसिथ मलिंगा. काहीही करून तो आमच्या संघात मला हवा होता. क्रिकेटच्या टी-२० प्रकारात त्याने आजपर्यंत अजोड कामगिरी केली होती. संघाला तो खूपच उपयोगी ठरणार होता. मलिंगासारखी गोलंदाजी कोणीच करू शकत नाही, हे माझं ठाम मत आहे. मलिंगाच्या गोफणफेकी (स्लिंगिंग) शैलीमुळे त्याचा हात पंचांसमोरून येत असे. त्यामुळे साइटस्क्रीनचा उपयोगच होत नसे. श्रीलंकेतील एका मॅचमध्ये मलिंगा मला सफेद चेंडूने गोलंदाजी करत होता. मला आठवतं की, त्या वेळेस समोर उभ्या असलेल्या पंचांना, मी त्यांच्या डोक्यावरची पांढरी हॅट काढण्याची विनंती केली होती. कारण त्यांच्या पांढऱ्या हॅटमुळे मला मलिंगाच्या हातातला चेंडू दिसत नव्हता. दुर्दैवाने गुडघ्याच्या दुखापतीमुळे मलिंगा पहिला हंगाम पूर्ण खेळू शकला नाही.

आयपीएलच्या पहिल्या दोन हंगामात मुंबई इंडियन्स उपांत्य फेरीही गाठू शकले नाहीत. २०१०मध्ये मात्र आम्ही चांगली कामगिरी करण्याचा पक्का निर्धार केला होता. नीता अंबानींनीही त्या हंगामाच्या आरंभापासूनच खेळाडूंच्या सर्व गरजांकडे वैयक्तिक लक्ष द्यायला सुरुवात केली. हंगाम सुरू होणाच्या खूप आधीपासून आम्ही तयारी सुरू केली. खेळाडूंमध्ये मैत्री आणि जवळीक निर्माण होण्यासाठी मुंबईच्या 'वॉटरस्टोन्स क्लब'मध्ये दोन दिवसांचं शिबिर घेण्यात आलं. दोन्ही दिवस श्रीमती अंबानी उपस्थित होत्या. त्यांच्याशी मुक्त चर्चा करताना खेळाडूंनाही खूप मजा आली. तरुण क्रिकेटपटू संघातील ज्येष्ठ खेळाडूंबरोबर मोकळेपणाने वावरू लागले. त्या शिबिरात नवोदित खेळाडूंनी झहीर खान, हरभजन व मला अनेक प्रश्न विचारले. आमच्या एकूण कारकिर्दीबद्दल व मुंबईतील आमच्या दैनंदिन जीवनाबद्दल सर्वांनाच खूपच उत्सुकता होती. झहीर आणि भज्जीबद्दल मलाही काही गोष्टी नव्याने कळल्या. अहमदनगरसारख्या छोट्या शहरातून आल्यामुळे झहीरला मुंबईतील जीवनशैलीशी जुळवून घेताना सुरुवातीला खूपच त्रास झाला होता. हरभजननेही पंजाबमधील आपल्या बालपणाच्या सुरस कथा सांगून सर्वांना मंत्रमुग्ध केलं. आम्ही टेबल टेनिस, स्क्वॅश, वॉटरपोलो असे अनेक खेळ खेळलो. क्रिकेट खेळायचं मात्र आम्ही टाळलं.

शिबिराचा सर्वांनाच खूप फायदा झाला. आमच्या क्षमतांना अखेर आम्ही न्याय देत त्या हंगामात जवळजवळ सर्व संघांचा पराभव केला. दुर्दैवाने स्लिपमध्ये झेल पकडताना मी उपांत्य सामन्यात जखमी झालो. माझ्या उजव्या हाताच्या बोटांच्या सांध्यामधली त्वचा फाटली. त्या ठिकाणी सहा टाके पडल्यामुळे मी हातात बॅटही धरू शकत नव्हतो. ती जखम

पाहिल्यानंतर मी चेन्नईविरुद्ध अंतिम सामन्यात खेळू शकेन, असं कोणालाच वाटलं नव्हतं. मला मात्र त्या मॅचमध्ये खेळायचंच होतं.

अंतिम सामन्याच्या दिवशी सकाळीच मी दुखापत झालेला भाग बधिर करण्यासाठी इंजेक्शन घेतलं. त्यामुळे मी नेहमीप्रमाणे हातात बॅट पकडू शकेन, असं मला वाटलं. शिवाय बोटांना विशेष संरक्षण मिळावं म्हणून मी खास वेगळ्या प्रकारचे हातमोजेही बनवून घेतले होते; पण त्या इंजेक्शनचा वेगळाच परिणाम झाला. बोटांमधली संवेदनाच नाहीशी झाल्याने मला बोटांचं अस्तित्वच जाणवत नव्हतं. मी पुन्हा हॉस्पिटलमध्ये गेलो. इतकं यातनादायक इंजेक्शन घेऊनही त्याचा हवा तसा परिणाम न झाल्यामुळे मी निराश झालो. अखेर असह्य वेदना होत असतानाही मी अंतिम सामना खेळलो. त्याआधी उपांत्य व अंतिम सामन्याच्या दरम्यान मी श्रीलंकेतील एका डॉक्टरांना भेटलो होतो. अंतिम सामन्याआधी माझी जखम पूर्ण बरी करण्याचं आश्वासन त्यांनी मला दिलं. त्यासाठी त्यांनी दिलेलं औषध मला दिवसातून दोन वेळा घ्यावं लागणार होतं. अडचण एवढीच होती की, डॉक्टरांच्या म्हणण्यानुसार औषध घेतल्यानंतर मी तीन दिवस नीट झोपू शकणार नव्हतो. औषधांचा नीट असर होऊ लागल्यावर मात्र मी झोप आवरूही शकणार नव्हतो. डॉक्टरांचे शब्द खरे ठरले. पहिल्या तीन रात्री मी झोपेविना घालवल्या. पुढचे तीन दिवस मात्र मी डोळेही उघडले नाहीत.

मॅचच्या आधी वॉर्म-अप करत असताना पंच माझ्यापाशी आले. स्पर्धेच्या नियमानुसार मॅचच्या दरम्यान माझ्याऐवजी एखाद्या राखीव खेळाडूला क्षेत्ररक्षण करता येणार नसल्याचं त्यांनी मला स्पष्टपणे सांगितलं; पण सर्व परिणामांचा विचार करूनच मी खेळायचं ठरवलं होतं. आयपीएल ट्रॉफी संघाला मिळवून द्यायची माझी तीव्र इच्छा होती.

मॅच खेळताना चेंडू दोन वेळा माझ्या जखमी हातावर लागला. पहिल्या वेळेस मी फाइन लेगला उभा होतो. दुसऱ्या खेपेस मी कव्हरमध्ये क्षेत्ररक्षण करत होतो. डावखुरा मधल्या फळीतील फलंदाज सुरेश रैनाने एका चेंडूवर खणखणीत कव्हर ड्राइव्ह मारला. चेंडू क्षणार्धात माझ्यापाशी आला. मीही तो चपळाईने अडवला; पण नंतर लक्षात आलं की, चेंडू अडवताना हाताचे टाके तुटले होते. इंनिग्ज संपल्यावर मी ड्रेसिंग रूममध्ये पोचलो तेव्हा माझ्या हातातून रक्त येत होतं. मी जखमेकडे दुर्लक्ष केलं. हातावर खास बनवलेले मोजे चढवून मैदानात उतरलो. हातमोज्यात मधलं बोट व अंगठ्याजवळचं बोट यांमध्ये फट ठेवलेली नव्हती. हातमोज्यांमुळे मी हातात बॅट तरी पकडू शकत होतो. त्या मॅचमध्ये मी ४८ धावा काढल्या. दुर्दैवाने आमचा डाव कोसळला व २२ धावांनी आमचा पराभव झाला.

२०१०च्या त्या अंतिम सामन्यात आम्ही किरॉन पोलार्डला आठव्या क्रमांकावर फलंदाजीसाठी पाठवलं. त्यावरून बरीच टीका करण्यात आली. माझ्या सूचनेनुसार संघ व्यवस्थापनाने तो निर्णय घेतला होता. त्याबद्दल मी आधी विचार केला होता. जोपर्यंत फिरकी गोलंदाज गोलंदाजी करत होते, तोपर्यंत मला अंबात्ती रायडू व सौरभ तिवारी यांसारखे फलंदाज मैदानावर हवे होते. फिरकी गोलंदाजी खेळण्यात ते निष्णात होते. पोलार्डने त्यानंतर येऊन द्रुतगती गोलंदाजांचा यथेच्छ समाचार घ्यायचा, अशी योजना होती. पोलार्डला वरच्या क्रमांकावर पाठवायला हवं होतं, असं मलाही नंतर वाटलं. माझ्या हातून नक्कीच चूक झाली होती. ती चूक कबूल करताना आज मला कसलाही संकोच वाटत नाही.

त्यानंतरच्या हंगामातही आम्ही चांगला खेळ केला. आम्ही दुसरी फेरी गाठली. 'कोची टस्कर्स' संघाविरुद्ध मी टी-२० स्पर्धेतील माझं पहिलं शतक झळकवलं. ते माझं एकमेव शतक ठरलं. त्या दोन्ही हंगामात मी सलामीला येऊन भरपूर धावा काढल्या. वेस्ट इंडीजमधील एप्रिल-मे, २०१०च्या टी-२० विश्वचषक स्पर्धेत मी खेळणार असल्याची चर्चाही त्यानंतर माझ्या कानावर आली होती. माझ्या मनात मात्र तसा विचारही आला नव्हता. टी-२० विश्वचषक स्पर्धेत उतरण्यासाठी भारतापाशी मजबूत संघ होता. आंतरराष्ट्रीय टी-२० स्पर्धेत भाग न घेण्याचा निर्णय मी आधीच जाहीर केला होता. केवळ एका स्पर्धेसाठी त्या निर्णयाचा फेरविचार करण्याची मुळीच गरज नव्हती.

मुंबई इंडियन्सबरोबर टी-२० मॅचेस खेळण्याचा आनंद मी पुरेपूर लुटला. टीममधल्या सर्व खेळाडूंच्या अमाप उत्साहाने व सकारात्मक वृत्तीमुळे त्यांच्याबरोबर खेळताना मला खूपच मजा आली. त्यानंतर स्वेच्छेने मी संघाचं नेतृत्व हरभजनकडे सोपवलं. त्या निर्णयामुळे बरीच खळबळ उडाली होती; पण तो निर्णय मी पूर्ण विचारांती घेतला होता. २०११-१२ हे माझ्या

क्रिकेट कारकिर्दीतील अत्यंत अवघड वर्ष ठरलं. ४ एप्रिल, २०१२ रोजी आयपीएलचा पाचवा हंगाम सुरू झाला. तोपर्यंत मी मानसिकदृष्ट्या पूर्णपणे थकून गेलो होतो. मला कर्णधारपदाचा ताण नकोसा वाटत होता. निव्वळ फलंदाज म्हणून खेळण्याची माझी इच्छा होती. त्यामुळेच मी संघाच्या मालकांना हरभजनचं नाव कप्तानपदासाठी सुचवलं. हरभजनला मैदानावर आणि मैदानाबाहेरही वेळोवेळी सल्ला देण्याची मी तयारी दर्शवली. भारतातर्फे अनेक वर्षं एकत्र खेळल्यामुळे आमच्यात छान सलगी निर्माण झाली होती.

हरभजनला मी १९९४ सालापासून ओळखत होतो. त्याने टाकलेल्या 'दुसरा'वर मी त्या वेळी चंदीगडमध्ये सराव केला होता. त्यानंतर १९९८मध्ये त्याने आस्ट्रेलियाविरुद्ध कसोटी पदार्पण केलं. तेव्हापासून आम्ही दोस्त बनलो होतो. भज्जीच्या नेतृत्वाखाली ऑक्टोबर, २०११मध्ये झालेल्या 'चँपियन्स लीग टी-२०' स्पर्धेचं विजेतेपद मुंबई इंडियन्सला मिळालं. दुखापतीमुळे मी त्या स्पर्धेत खेळू शकलो नव्हतो. हरभजनने अतिशय हुशारीने व कुशलपणे संघाचं नेतृत्व करत स्वत:मधील गुणवत्ता सिद्ध केली होती.

अखेरचा हंगाम

२०१३ हे आयपीएलचं माझं शेवटचं वर्ष असणार, हे मला आधीपासूनच ठाऊक होतं. एप्रिल, २०१३मध्ये मी माझा चाळिसावा वाढदिवस साजरा केला. त्या हंगामानंतर पुन्हा आयपीएल खेळण्याचा मी विचारही करू शकत नव्हतो. २०१०मध्ये विजेतेपदाने आम्हाला थोडक्यात हुलकावणी दिली होती. या वर्षी मात्र स्पर्धा जिंकण्यासाठी मी अधीर झालो होतो. आमचा संघही अतिशय सक्षम व समतोल होता. रिकी पाँटिंग कप्तान होता, जॉन राइट प्रशिक्षक होते आणि अनिल कुंबळे आमचा मागदर्शक होता. या तीन बुजुर्गांमुळे संघ अधिकच मजबूत बनला होता.

पहिल्याच सामन्यात मी धावबाद झालो; पण स्पर्धेच्या मध्यात मी चांगली बॅटिंग केली. रिकीच्या मात्र धावा होत नव्हत्या. रोहितकडे कप्तानपद सोपवून काही सामने न खेळण्याचा त्याने निर्णय घेतला. रोहित त्या हंगामात सुरेख फलंदाजी करत होता. रोहितने कर्णधाराची जबाबदारी छान निभावली. गोलंदाजांचीही त्याला उत्कृष्ट साथ मिळाली. मलिंगा, मिशेल जॉन्सन, हरभजन व प्रग्यान ओझा या चौघांनीही प्रभावी गोलंदाजी केली; पण माझी फलंदाजी बहरत असतानाच मला एक गंभीर दुखापत झाली. आयपीएल कारकिर्दीतला माझा तो अखेरचा सामना ठरला.

१३ मे, २०१३च्या त्या सामन्यात आम्ही 'सनरायझर्स हैदराबाद' संघाविरुद्ध खेळत होतो. पहिल्या १२ षटकांत एक बाद ९१ धावा काढल्यामुळे आम्ही सुस्थितीत होतो. उरलेल्या आठ षटकांत दहाच्या गतीने धावा काढायच्या होत्या; पण नऊ विकेट्स हातात असल्यामुळे सामना जिंकण्याचा आम्हाला विश्वास वाटत होता. मी धावांची गती वाढवायला सुरुवात केली. तेराव्या षटकाच्या पहिल्या चेंडूवर मी लाँग ऑनवरून षटकार ठोकला; पण तो शॉट मारत असतानाच माझ्या डाव्या हातातून किट् असा आवाज आला. त्यापाठोपाठ असह्य वेदना होऊ लागल्या. मी लगेच फिजिओला बोलावलं; पण मसाज करूनही काही उपयोग झाला नाही. हातात बॅट पकडणंही मला शक्य होत नव्हतं. सामन्यामधील ती महत्त्वाची वेळ होती. त्या अवस्थेत बॅटिंग करून चेंडू वाया घालवण्यात अर्थ नव्हता. निवृत्त होऊन पॅव्हिलियनमध्ये परतण्याचा मी निर्णय घेतला.

हाताचे अनेक स्कॅन्स काढण्यात आले. स्कॅन्समध्ये माझ्या हातांच्या स्नायूंवर सूज व हातात एक प्रकारचा द्रव पदार्थ जमा झाल्याचं दिसून आलं. दुखापत भरून येण्यासाठी कमीत कमी तीन आठवडे लागणार होते. त्यामुळे माझी आयपीएल मोहीम संपुष्टात आली. मी खेळू शकत नसलो, तरी मी संघासोबत राहायचं ठरवलं. नेट्समध्ये मी खूप वेळ गोलंदाजी केली. सर्वांना शक्य होईल तितकी मदत करण्याचा प्रयत्न केला. अंतिम सामन्याच्या वेळी मैदानाबाहेर बसणं खूपच त्रासदायक होतं; पण ईडन गार्डन्सवर जमलेल्या हजारो प्रेक्षकांच्या साक्षीने मुंबई इंडियन्सने आयपीएल ट्रॉफी जिंकली आणि माझ्या सर्व वेदना दूर पळाल्या. यावर कळस म्हणजे 'हा विजय ही आम्ही तुला दिलेली खास भेट आहे,' असं माझ्या संघातील सहकाऱ्यांनी मला सांगताच मी खूप भारावून गेलो.

आयपीएलच्या पुढच्या हंगामात तू वानखेडे स्टेडियमवर घरच्या प्रेक्षकांसमोर खेळणार का, असा प्रश्न मला अंतिम

सामन्याच्या वेळी विचारला गेला. त्यावर उत्स्फूर्तपणे मी ‘नाही’ असं उत्तर दिलं. खरंतर मी तोपर्यंत आयपीएलमधून निवृत्त होण्याचा पक्का निर्णय घेतलाही नव्हता; पण त्या क्षणी मी नकळत बोलून गेलो. अंजली त्या वेळी स्टेडियममध्ये होती. आयपीएलमधून निवृत्त होण्याच्या माझ्या निर्णयावर तिला प्रतिक्रिया विचारण्यात आली. मी अचानक असा निर्णय घेतल्यामुळे तीही चकित झाली; पण सहावा हंगाम हा माझा शेवटचा हंगाम असणार आहे याची तिलाही कल्पना होती.

स्पर्धेतील शेवटच्या पाच सामन्यांत खेळता न आल्यामुळे मी नक्कीच निराश झालो होतो. पण खेळलेल्या शेवटच्या चेंडूवर षटकार मारून मी माझ्या आयपीएल कारकिर्दीची सांगता केली याचा मात्र मला नेहमीच आनंद व अभिमान वाटेल.

२०१३ इंडियन प्रिमियर लीग स्पर्धेतील मुंबई इंडियन्सची कामगिरी

गुणतक्ता

	सामने	जीत	हार	बरोबरी	अनिर्णित	गुण	निव्वळ धावगती
चेन्नई सुपर किंग्ज	१६	११	०५	०	०	२२	+०.५३०
मुंबई इंडियन्स	१६	११	०५	०	०	२२	+०.४४१
राजस्थान रॉयल्स	१६	१०	०६	०	०	२०	+०.३२२
सनरायझर्स हैदराबाद	१६	१०	०६	०	०	२०	+०.००३
रॉयल चॅलेंजर्स बँगलोर	१६	०९	०७	०	०	१८	+०.४५७
किंग्ज इलेव्हन पंजाब	१६	०८	०८	०	०	१६	+०.२२६
कोलकाता नाइट रायडर्स	१६	०६	१०	०	०	१२	-०.०९५
पुणे वॉरियर्स	१६	०४	१२	०	०	०८	-१.००६
दिल्ली डेअरडेव्हिल्स	१६	०३	१३	०	०	०६	-०.८४८

प्ले-ऑफ फेरी

क्वालिफायर १. चेन्नई सुपर किंग्स विरुद्ध मुंबई इंडियन्स. (दिल्ली, २१ मे, २०१३)
चेन्नई सुपर किंग्ज १९२/१ (२०/२० षटकं); मुंबई इंडियन्स १४४ (१८.४/२० षटकं)
चेन्नई सुपर किंग्ज ४८ धावांनी विजयी

एलिमिनेटर. राजस्थान रॉयल्स विरुद्ध सनरायझर्स हैदराबाद. (दिल्ली, २२ मे, २०१३)
सनरायझर्स हैदराबाद १३२/७ (२०/२० षटकं); राजस्थान रॉयल्स १३५/६ (१९.२/२० षटकं)
राजस्थान रॉयल्स ४ गडी राखून विजयी (४ चेंडू बाकी)

क्वालिफायर २. मुंबई इंडियन्स विरुद्ध राजस्थान रॉयल्स. (कोलकाता, २४ मे, २०१३)
राजस्थान रॉयल्स १६५/६ (२०/२० षटकं); मुंबई इंडियन्स १६९/६ (१९.५/२० षटकं)
मुंबई इंडियन्स ४ गडी राखून विजयी (१ चेंडू बाकी)

अंतिम सामना. चेन्नई सुपर किंग्ज विरुद्ध मुंबई इंडियन्स. (कोलकाता, २६ मे, २०१३)
मुंबई इंडियन्स १४८/९ (२०/२० षटकं); चेन्नई सुपरकिंग्ज १२५/९ (२०/२० षटकं)

मुंबई इंडियन्स २३ धावांनी विजयी

२१.
सर्वोच्च स्थान

ऑक्टोबर-नोव्हेंबर, २००८मध्ये भारतात झालेल्या कसोटी मालिकेत आम्ही आस्ट्रेलियाला २-०च्या आघाडीने हरवलं होतं. त्यामुळे डिसेंबरमध्ये दौऱ्यावर येणाऱ्या इंग्लंड संघावरही विजय मिळवण्यासाठी आम्ही खूपच उत्सुक होतो. आपण जिंकू शकतो, असा विश्वास गॅरी कर्स्टनने आमच्यात जागवला होता. अनिल व सौरव या भारताच्या दोन सर्वोत्कृष्ट क्रिकेटपटूंच्या निवृत्तीमुळे संघात नक्कीच पोकळी निर्माण झाली होती. अशा वेळी संघातील जोष व ईर्षा टिकवून ठेवणं अतिशय महत्त्वाचं होतं.

इंग्लंडचा भारत दौरा, डिसेंबर, २००८

सात एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेने इंग्लंडच्या भारत दौऱ्याला सुरुवात झाली. पहिले तीन सामने मी खेळू शकलो नाही. माझ्या दुसऱ्या हाताचं कोपर दुखू लागलं होतं. तो त्रास त्यानंतर बराच काळ मला होत राहिला, पण तो तितका असह्य नसल्यामुळे मी कसोटी मालिकेत खेळू शकलो. माझ्या बॅटमधून हळूहळू धावांची बरसात होऊ लागली. माझ्या कसोटी कारकिर्दीतला तो एक सर्वोत्तम काळ ठरला. माझ्या फलंदाजीला आलेला बहर क्रिकेटच्या पुढच्या हंगामातही टिकून राहिला. २००९-१०मधील 'सर्वोत्तम क्रिकेटपटू' म्हणून आयसीसी पारितोषिकासाठी माझं नामांकन झालं.

बंगळुरूच्या एकदिवसीय सामन्यात मी पुनरागमन केलं. त्या मॅचमध्ये मी फक्त ११ धावा काढल्या. त्यानंतर २६ नोव्हेंबरला कटकच्या सामन्यात काढलेलं अर्धशतक मात्र मला नक्कीच समाधान देणारं होतं. कटकचा सामना जिंकत आम्ही मालिकेत ५-० आघाडी घेतली. सामना संपल्यानंतर काही वेळातच मुंबईला गँगवॉर सुरू झाल्याचं आमच्या कानावर आलं. ड्रेसिंग रूममधल्या टीव्हीवरचं दृश्य पाहून मात्र आम्ही हादरलोच. गँगवॉरपेक्षा खूपच क्रूर आणि भयानक नाट्य मुंबईत घडत होतं. त्या महासंकटात सापडलेल्या लोकांसाठी आम्ही सर्व जण प्रार्थना करू लागलो.

आम्ही सर्व जण रात्री उशिरापर्यंत टीव्हीसमोर बसून होतो. भारतावर हल्ला झाला आहे, ही गोष्ट एव्हाना स्पष्ट झाली होती. अत्यंत निर्घृण व निर्दयी हल्ला होता तो. मुंबईच्या ज्या भागात हे सर्व घडत होतं तो रस्ता आणि तो भाग माझ्या अतिपरिचयाचा होता. माझं दैनंदिन अस्तित्व त्या भागाशी निगडित होतं. भारताचं मानचिन्ह असलेल्या ताज हॉटेलमधून बाहेर येणारे आगीचे लोट पाहून मन उद्ध्वस्त झालं. घरच्यांची आणि मित्रमंडळींची मला खूपच काळजी वाटू लागली. मी अंजलीला फोन लावला. अंजलीशी बोलणं झाल्यानंतर मी अधिकच बेचैन झालो. हल्लेखोरांनी ज्या रेस्टॉरंटला प्रमुख लक्ष्य बनवलं होतं, त्या 'लिओपोल्ड'मध्ये अंजली आदल्याच दिवशी गेली होती. हल्लेखोरांचं आणखी एक लक्ष्य ठरलेल्या ओबेरॉयमध्येही ती त्याच्या आदल्या दिवशी गेली होती. एनसीपीएला नाटक पाहून मैत्रिणींसह तिने ओबेरॉयमध्ये डिनर घेतलं होतं. त्या धुमश्चक्रीत अंजलीही कदाचित अडकली असती, या विचाराने मी अस्वस्थ होऊन गेलो.

दहशतवादी हल्ला दुसऱ्या दिवशी सकाळपर्यंत सुरू होता. २७ नोव्हेंबरलाही दिवसभर तीच दृश्यं टीव्हीवरून दाखवली जात होती. तातडीने एक टीम मीटिंग घेण्यात आली. इंग्लंड संघाने दौरा रद्द करण्याचा निर्णय घेतल्याचं आम्हाला सांगण्यात आलं. इंग्लिश खेळाडू दुबईला रवानाही झाले होते. तो निर्णय योग्यच होता. आम्ही कोणीच खेळण्याच्या मन:स्थितीत नव्हतो. त्या संध्याकाळीच मी मुंबईला परतलो. विमानतळावर आलेल्या सुरक्षा अधिकाऱ्यांसोबत मी घरी पोचलो. माझ्या घरापासून इतक्या जवळ ते सारं घडावं हा विचारच मन सुन्न करणारा होता. झालेल्या प्रकाराने मला अतिशय चीड आणि उद्विग्नता आली होती. या दिव्यातून लवकरात लवकर सुटका व्हावी, अशी नुसती प्रार्थना करत बसण्याची माझ्यावर वेळ यावी, हीच

अतिशय क्लेशकारक गोष्ट होती.

दहशतवादी हल्ल्यानंतर आठवड्याने इंग्लिश संघ दोन कसोटी सामन्यांची मालिका खेळण्यासाठी येत असल्याचं जाहीर झालं. एवढ्या मोठ्या संहारानंतर केवळ दोन आठवड्यांतच भारतात परतायचं त्यांनी धाडस दाखवलं होतं. इंग्लंडने घेतलेल्या त्या निर्णयाचं सर्वांनीच कौतुक केलं. दहशतवाद्यांच्या हल्ल्यामुळे खोलवर झालेले घाव कशानेही भरून येणारे नव्हते; पण खेळ पुन्हा सुरू होणं हा आमच्यासाठी फार मोठा दिलासा होता.

शांततेसाठी क्रिकेट

पहिली कसोटी ११ डिसेंबरला सुरू होणार होती. त्याआधीच आम्ही चेन्नईला पोचलो. क्रिकेटवर लक्ष केंद्रित करणं सर्वांनाच कठीण जात होतं. हल्ल्यामध्ये नाहक बळी गेलेल्यांचा विचार मनातून जात नव्हता. तीन दिवसांच्या त्या धक्कादायक अनुभवातून कोणीच सावरू शकला नव्हता. प्रत्येकाच्या तोंडी तोच एक विषय होता; पण कसोटी सामना जवळ येऊन ठेपला होता. चेन्नईमध्ये आमच्या हातून चांगली कामगिरी व्हावी अशी आमच्या चाहत्यांची अपेक्षा होती.

इंग्लंडने त्या कसोटीला दणक्यात सुरुवात केली. कर्णधार अँड्रयू स्ट्रॉस हा उपखंडातील कसोटी सामन्याच्या दोन्ही डावांत शतक झळकवणारा पहिला इंग्लिश खेळाडू ठरला. पॉल कॉलिंगवुडनेही शतक ठोकलं. चौथ्या दिवशी सकाळी काहीतरी भन्नाट कामगिरी केल्याशिवाय आम्हाला सामना वाचवणं कठीण जाणार होतं. इंग्लंडच्या दुसऱ्या डावात झहीर व इशांतने फारच सुरेख गोलंदाजी केली. त्यातही झहीरने केवळ पाच षटकांत शतकवीर कॉलिंगवुडसह इंग्लंडचे तीन गडी बाद केले. तिथेच आम्ही मॅचवर कब्जा मिळवला. इंग्लिश संघ किंचित हडबडल्याचं आम्हाला जाणवलं. अखेर त्यांनी आमच्यासमोर ३८७ धावांचं लक्ष्य ठेवलं. हे लक्ष्य पूर्ण करण्याची जबाबदारी आता फलंदाजांवर होती. ते काम नक्कीच सोपं नव्हतं. भारतीय मैदानावर एवढ्या मोठ्या धावसंख्येचा यशस्वी पाठलाग आजपर्यंत कुठल्याही संघाने केला नव्हता. पण अशक्य असं काहीच नसतं, हा विचार गॅरीने आमच्या मनात खोल रुजवला होता.

चौथ्या दिवशी संध्याकाळी धडाकेबाज ८३ धावा काढून सेहवागने सामना रंगतदार अवस्थेत आणून ठेवला. ती इनिंग्ज म्हणजे सेहवागच्या अचाट क्षमतेचं प्रात्यक्षिक होतं. पाचव्या दिवशी सकाळी मी फलंदाजीला उतरलो. वातावरणातील तणावाला शांतपणे सामोरा जात मी तासभर खेळपट्टीवर टिच्चून उभा राहिलो. सुरुवातीचं वादळ शमल्यावर आम्ही जलद गतीने धावा काढायला सुरुवात केली. आम्ही मारलेल्या प्रत्येक खणखणीत शॉट्सबरोबर इंग्लंडच्या संघावरचं दडपण वाढू लागलं. हळूहळू पण अतिशय भक्कमपणे आम्ही सामन्याचं पारडं आमच्या बाजूने फिरवलं.

लक्ष्मणची व माझी चांगली भागीदारी झाली. लक्ष्मण बाद झाल्यावर युवराज माझ्या जोडीला आला. मॅच संपेपर्यंत बॅटिंग करायचा मी निर्धार केला होता. भारतीयांना क्रिकेटचं वेड आहे. नुकत्याच घडून गेलेल्या त्या भयाण प्रसंगानंतर चेन्नईतल्या विजयामुळे त्यांना आनंदाचे एक-दोन क्षण जरी अनुभवता आले असते, तरी माझा ऊर कृतज्ञतेने भरून गेला असता.

युवराजने दडपणाखालीही सुरेख बॅटिंग करत ८५ धावा काढल्या. मध्येच त्याने माँटी पानेसरला दोन-तीनदा रिव्हर्स स्वीप मारायचा प्रयत्न केला होता. मी त्याच्यापाशी गेलो. त्याला म्हटलं, ''शेवटपर्यंत नाबाद राहून तू मॅच संपवायला हवीस.'' १९९९मध्ये चेन्नईतच पाकिस्तानबरोबर झालेल्या सामन्याची मी त्याला आठवण करून दिली. मी अशा प्रसंगातून गेलो होतो. जिंकू शकणारा सामना जेव्हा हातातून निसटून तुम्हाला हार स्वीकारावी लागते, तेव्हा तो पराभव फारच यातनादायक असतो. युवराजने त्यानंतर संयमाने बॅटिंग केली. खेळ संपायला तासभर असताना आम्ही लक्ष्य साध्य करत भारताला विजय मिळवून दिला. त्या विजयाला आणखी एक वेगळंच महत्त्व प्राप्त झालं. नेहमी पडद्याच्या मागे राहणाऱ्या स्त्री-कर्मचाऱ्यांनीही प्रथमच मैदानावर येत मोठ्या उत्साहाने विजयाचा आनंद साजरा केला.

भारताचा न्यूझीलंड दौरा, एकदिवसीय मालिका, मार्च, २००९

चेन्नईतील विजयानंतर मोहालीलाही आम्ही चांगला खेळ करत सामना अनिर्णित राखला. त्यामुळे भारताने कसोटी मालिका १-० अशी जिंकली. मायदेशात पाठोपाठ झालेल्या दोन्ही मालिका जिंकल्याने वर्षाचा शेवट गोड झाला होता. आता आम्ही न्यूझीलंडच्या दौऱ्यावर जायला उत्सुक होतो.

न्यूझीलंडमध्ये 'ब्लॅक कॅप्स'ना हरवणं ही अवघड गोष्ट असते. पण या खेपेस मात्र जिंकण्याची उत्तम संधी आहे असं आम्हाला वाटत होतं. सर्वच खेळाडू ऐन भरात होते. शिवाय परिस्थिती कितीही अवघड बनली तरी त्यातून बाहेर पडण्याची कला आम्हाला अवगत झाली होती. एक जण अपयशी ठरला तर पुढचा लगेच सरसावत होता.

एकदिवसीय मालिका पाच सामन्यांची होती. पावसाचा अडथळा आलेला पहिला सामना आम्ही सहज जिंकला. त्याचं सर्व श्रेय सेहवाग व धोनीच्या बॅटिंगला होतं. दुसरा सामना पावसामुळे रद्द झाला. तिसरी मॅच ख्राइस्टचर्चला होती. तिथलं मैदान आकाराने खूप लहान आहे. सामन्यातल्या पंचेचाळिसाव्या षटकात पोटातील स्नायू दुखावल्यामुळे मला नाइलाजाने मैदान सोडावं लागलं. त्या वेळी माझ्या १६३ धावा झाल्या होत्या.

चांगला जम बसला असताना अचानक निवृत्त व्हावं लागल्याने मी हताश झालो होतो. शेवटपर्यंत बॅटिंग करता आली असती, तर द्विशतक झळकवण्याची मला संधी होती. हाच विचार माझ्या आणखीही एका सहकाऱ्याच्या मनात आला होता. मी ड्रेसिंग रूममध्ये शिरत असतानाच सेहवाग धावत माझ्यापाशी येऊन म्हणाला, *''पाजी, ये आपने क्या कर दिया! डबल हंड्रेड का चान्स था।''* त्याच्या बोलण्यावर मी हसलो व म्हणालो, *''अरे, मैं मार ही नहीं पा रहा हूँ, डबल हंड्रेड कैसे बनाऊंगा। पिच अच्छा है और हमें अभी रन्स चाहिये। डबल हंड्रेड कभी ना कभी हो जाएगा।''* सेहवाग गप्प बसायला तयार नव्हता. तो म्हणाला, *''अरे, वो तो दुसरा डबल हंड्रेड होगा, आज का तो आज करना चाहिये था।''*

त्या सामन्यात दोन्ही संघांच्या भरपूर धावा झाल्या. युवराज व धोनी यांनी अर्धशतकं काढल्यामुळे आम्ही न्यूझीलंडबरोबर ३९२ धावांचं लक्ष्य ठेवलं. न्यूझीलंडनेही ३३४ धावांपर्यंत मजल मारली. ब्रेंडन मॅकलम आणि जेस्सी रायडर यांनी १६६ धावांची दमदार भागीदारी केली. त्या सामन्यात दोन्ही इनिंग्ज मिळून ७२६ धावा काढल्या गेल्या. एकदिवसीय सामन्यांच्या इतिहासात त्यापूर्वी फक्त एकाच सामन्यात त्याहून जास्त धावा काढल्या गेल्या होत्या.

त्यानंतर हॅमिल्टनला झालेल्या सामन्यात मी खेळू शकलो नाही. तीही मॅच आम्ही जिंकलो. सेहवागने घणाघाती फलंदाजी करत त्या सामन्यात १२५ धावा काढल्या. मालिकेमध्ये आम्ही ३-० अशी निर्णायक आघाडी घेतली. मालिकेतला विजय साजरा करण्यासाठी युवी, मी व झहीरने भज्जीच्या रूममध्ये एकत्र डिनर घ्यायचं ठरवलं. भज्जीची रूम हॉटेलच्या हेल्थ क्लबला लागूनच होती. रूमच्या बाहेर एक झकास 'जॅकुझी' (पाण्याचे जोरदार फवारे असलेला बाथटब) होता. रिमझिम पावसालाही सुरुवात झाली होती. त्यामुळे रूमबाहेरचं दृश्य सुंदर दिसत होतं. सर्वांना जॅकुझीत डुंबायचं होतं, पण मला मात्र खोलीबाहेर पडायची इच्छा नव्हती. मी बाहेर जायला तयार होत नाही हे पाहून तिघांनीही डाव रचला.

जेवण यायची वाट बघत आम्ही गप्पा मारत बसलो होतो. इतक्यात तिघांनी मला मागून पकडत पाण्यात ढकलून दिलं! माझं घड्याळ खराब होईल म्हणून मी जोरजोरात आरडाओरडा करत राहिलो, पण तिघांवरही त्याचा काही परिणाम झाला नाही. मला जॅकुझीत घेऊन जायचा त्यांचा पक्का इरादा होता. माझ्या मागोमाग तेही पाण्यात उतरले. त्यानंतर मात्र आम्ही पाण्यात यथेच्छ धमाल केली. तोपर्यंत खोलीत जेवण आलेलं होतं, पण काही मिनिटांतच फ्रेंच फ्राइज, सँडविचेस व केचअप आपोआप जॅकुझीपर्यंत येऊन पोचलंही होतं. विजयाचा आनंद त्या दिवशी आम्ही अनोख्या पद्धतीने लुटला.

भारत-न्यूझीलंड, कसोटी मालिका, मार्च-एप्रिल, २००९

१८ मार्चला हॅमिल्टनमध्ये पहिल्या कसोटीला सुरुवात झाली. न्यूझीलंडने पहिली फलंदाजी करत २७९ धावा केल्या. डॅनियल व्हेटोरीने त्या डावात शतक काढलं. व्हेटोरीच्या शतकाबद्दल मी आमच्या गोलंदाजांना अजूनही कधी गमतीने म्हणतो, ''अरे, उसको कैसे हंड्रेड मारने दिया था तुम लोगोनें?'' व्हेटोरी त्या डावात चांगला खेळला होता. त्याने धूर्तपणे थोडं हिशेबी धाडस दाखवलं होतं. ते धाडसही त्याला फलदायी ठरलं होतं.

सामन्याच्या दुसऱ्या दिवशी दुपारी मी मैदानात उतरलो; पण बॉल माझ्या बॅटवर बसतच नव्हता. मी अस्वस्थ झालो. मी माझा स्टान्स बदलायचं ठरवलं. पूर्वीही अनेकदा मी असं केलं होतं आणि प्रत्येक वेळी माझी युक्ती सफल झाली होती. नेहमी मी साइड ऑन स्टान्स घेतो; पण हॅमिल्टनमध्ये मी गोलंदाजांकडे छाती किंचित वळवून (ओपन अप) उभा राहिलो. दोन पायांमध्येही जास्त जागा ठेवली. मी उभं राहण्याच्या पवित्र्यात केलेला बदल पंच सायमन टॉफेल यांच्या बरोबर लक्षात आला. ते मला संध्याकाळी म्हणाले, ''ड्रिंक्स ब्रेकनंतर तू वेगळाच बॅट्समन वाटू लागलास. तू नक्की काय बदल केला होतास?'' कधीकधी अशा छोट्या बदलांचा खूप मोठा फायदा होऊ शकतो.

मला आठवतं, त्या सामन्याच्या पहिल्या दिवशी, खेळ संपायच्या काही वेळ आधी प्रकाश खूपच अंधूक झाला होता. त्या वेळी एका बाजूने आयन ओब्रायन गोलंदाजी करत होता. ओब्रायन त्या मालिकेतला न्यूझीलंडचा सर्वोत्तम गोलंदाज होता. पंच खेळ थांबवायला तयार नव्हते. माझ्या मते तो फलंदाजांवर अन्याय होता. कारण प्रकाश पूर्ववत होण्याची शक्यताच नव्हती, पण एखादा फलंदाज मात्र नाहक बाद झाला असता. दुसऱ्या दिवशी मीही अंधूक प्रकाशात कसाबसा तग धरला. दुसऱ्या दिवसाचा खेळ संपला तेव्हा मी ७० धावांवर नाबाद होतो. तिसऱ्या दिवशी सकाळपासूनच मी आक्रमक पवित्रा घेतला. मी केलेल्या १६० धावांमुळे आम्ही न्यूझीलंडवर मोठी आघाडी घेतली. गंभीर, द्रविड आणि झहीरनेही त्या डावात अर्धशतकं काढली. त्यानंतर भज्जीने सहा विकेट्स घेत भारताला विजय मिळवून दिला.

न्यूझीलंडच्या दुसऱ्या डावात मी मैदानावर नव्हतोच. पहिल्याच षटकात मी जखमी होऊन पॅव्हिलियनमध्ये परतलो. झहीरचा चेंडू टिम मॅकिन्टॉशच्या बॅटची कड घेऊन जमिनीपासून किंचित वर उडाला. मी स्लिपमध्ये उभा होतो. झेल घेण्यासाठी मी पुढे झेपावलो. पण चेंडू पकडण्याच्या प्रयत्नात माझ्या डाव्या हाताच्या अंगठ्याजवळच्या बोटाला दुखापत झाली. तपासणीसाठी मला हॉस्पिटलमध्ये न्यावं लागलं. एक्स-रे रिपोर्टमध्ये बोट फ्रॅक्चर झाल्याचं निष्पन्न झालं.

२६ मार्चपासून नेपियरला दुसरी कसोटी सुरू होणार होती. दोन कसोटींमध्ये विश्रांतीसाठी फारसा वेळ नव्हता. पहिला कसोटी सामना लवकर संपल्यामुळे दुखापत बरी होण्यासाठी मला एक दिवस जास्त मिळाला होता. त्या मधल्या काळात मी बरेच उपाय करून पाहिले. एकावर एक अशा तीन छोट्या कॅप्स बोटावर चढवल्या. गरम पाण्यात फायबर प्लॅस्टर पातळ करून बोटावर थापलं. शिवाय बोटाला धक्का लागू नये म्हणून बोटाभोवती जाड कापडाची पट्टी गुंडाळली. एवढ्या साऱ्या संरक्षणामुळे मला बोटाचं अस्तित्वच जाणवेनासं झालं होतं; पण तरीही कसोटी सामना खेळण्याचा मी निर्णय घेतला. फलंदाजाच्या जवळपात्र क्षेत्ररक्षणासाठी उभा राहिलो तर पाच दिवस खेळू शकेन, असा मला विश्वास वाटला.

या खेपेस मी केलेल्या उपायांचा फायदा झाला. नेपियर कसोटीच्या दोन्ही डावांत मी चांगल्या धावा काढल्या. न्यूझीलंडने पहिल्या डावात ६१९ धावांचा डोंगर रचला. पहिल्या कसोटीतील शतकापाठोपाठ जेस्सी रायडरने नेपियरला द्विशतक झळकवलं. रॉस टेलर व ब्रेंडन मॅकलमनेही शतकं काढत त्याला चांगली साथ दिली. सामना वाचवण्यासाठी आम्हाला दोन दिवसांहून अधिक वेळ बॅटिंग करावी लागणार होती. दुसरा डाव सुरू होण्याआधी आम्ही ड्रेसिंग रूममध्ये थोडी चर्चा केली. मॅच वाचवू शकू, असा विश्वास प्रत्येकालाच वाटत होता. अशा प्रसंगी गॅरी महत्त्वाची भूमिका बजावत होता. त्यानेच संघामध्ये लढाऊ वृत्ती निर्माण केली. गॅरीच्या विचारसरणीचा आमच्यावर खूपच प्रभाव पडला.

गौतम गंभीरने दुसऱ्या डावात सुरेख व संयमी फलंदाजी केली. त्याच्या १३७ धावांमुळे आम्ही पराभव टाळू शकलो. ४३६ चेंडू खेळत तो साडेदहा तास खेळपट्टीवर टिकून होता. गंभीरच्या संयमी व कणखर वृत्तीचं ते उत्तम प्रदर्शन होतं. लक्ष्मणनेही त्या डावात शतक काढलं. संघाच्या निग्रही वृत्तीमुळेच सामना अनिर्णित राखता आला. त्या काळात आव्हानं स्वीकारण्यासाठी आम्ही अगदी उत्सुक असायचो.

वेलिंग्टनमधील तिसऱ्या कसोटीत पहिली फलंदाजी करत आम्ही ३७९ धावा केल्या. त्यानंतर झहीर खान व हरभजन सिंगने न्यूझीलंडचा पहिला डाव १९७ धावांत गुंडाळून संघाला १८२ धावांची आघाडी मिळवून दिली. दुसऱ्या डावात गंभीरने काढलेल्या चमकदार १६७ धावांमुळे आम्ही न्यूझीलंडसमोर ७१७ धावाचं अशक्यप्राय लक्ष्य ठेवलं.

चौथ्या दिवसअखेरीस आम्ही न्यूझीलंडचे चार गडी बाद केले. उरलेल्या सहा विकेट्स घेण्यासाठी आमच्यापाशी पाचवा

पूर्ण दिवस होता. त्या मालिकेत झहीर, इशांत व मुनाफ पटेलने उत्कृष्ट गोलंदाजी केली. अखेरच्या दिवशी सहा गडी बाद करून भारताला २-० असा मालिकेत विजय मिळवून द्यायची संधी आमच्यापाशी होती. न्यूझीलंडच्या फलंदाजांना बिथरवण्यासाठी आम्ही पाचव्या दिवशी वेगळी योजना आखली. तिघांनीही आखूड टप्प्याचे चेंडू टाकत फलंदाजांचा खांदा व बरगड्यांच्या दिशेने मारा केला. न्यूझीलंडच्या फलंदाजांना आमची गोलंदाजी खेळणं खूपच अवघड जात होतं.

वाऱ्याच्या वेगाचा फायदा उठवत इशांतने गोलंदाजी केली. अनेक वेळा त्याचे चेंडू खेळणं, न्यूझीलंडच्या फलंदाजांना अशक्य होत असे. मुनाफने तर वाऱ्याच्या विरुद्ध दिशेने गोलंदाजी करण्याचं आव्हान स्वीकारलं. अशी गोलंदाजी करणं किती अवघड असतं हे कदाचित अनेक जणांच्या लक्षात येणार नाही. वेलिंग्टनमध्ये सोसाट्याने वाहणारे वारे गोलंदाजांचा वेग ताशी १० कि.मी.ने कमी करू शकतात. अशा वातावरणाशी जुळवून घेण्यासाठी फलंदाजांनाही आपल्या तंत्रात किंचितसा बदल करावा लागतो. जोरात वाहणाऱ्या वाऱ्यामुळे तुम्ही सतत डोळे उघडे ठेवू शकत नाही. शिवाय चेंडू झटकन बॅटवर येत असल्यामुळे तुम्हाला नेहमीपेक्षा लवकर शॉट्स मारावे लागतात; पण त्याचप्रमाणे वाऱ्याची मदत मिळाल्यामुळे बॅट स्विंगचा वेगही आपोआपच वाढलेला असतो. त्यामुळे चांगला फलंदाज गोलंदाजांवर दबाव आणू शकतो.

दुसऱ्या कसोटीच्या अखेरच्या दिवशी मात्र आमच्या गोलंदाजांनी एकाही न्यूझीलंडच्या फलंदाजाला स्थिरावू दिलं नाही. रॉस टेलरने दुसऱ्या डावात शतक काढलं. पण तरीही खेळावर आमचंच कायम वर्चस्व होतं. जेस्सी रायडर हा त्या मालिकेतला न्यूझीलंडचा सर्वांत यशस्वी फलंदाज होता; पण वेलिंग्टनच्या कसोटीतील दोन्ही डावांत तो झटपट बाद झाल्याने आमचं काम सोपं झालं होतं. उपाहाराच्या थोडं आधी माझ्या हातात चेंडू दिला गेला. मी ब्रेंडन मॅकलमची महत्त्वाची विकेट मिळवली. स्लिपमध्ये झेल देत तो सहा धावा काढून बाद झाला. त्यानंतर आलेला जेम्स फ्रँकलिन माझ्या गुगलीवर सारखा चकत होता. चेंडू अधिक वळू नये म्हणून प्रत्येक चेंडूवर तो स्वीपचा फटका मारण्याचा प्रयत्न करत होता. मी धोनीला सांगून पॉइंटवरचा क्षेत्ररक्षक हलवला. त्याऐवजी मी शॉर्ट स्क्वेअर लेगला दोन क्षेत्ररक्षक ठेवले. फ्रँकलिन आता स्वीपचा फटका मारू शकत नव्हता. त्याला चेंडू कट करावा लागणार होता. माझा डाव यशस्वी ठरला. क्षेत्ररक्षणात बदल केल्यानंतर मी फ्रँकलिनला पायचीत बाद केलं.

आयन ओब्रायनने उंचावरून मारलेला चेंडू इशांत पकडू शकला असता, तर ती मॅच आम्ही नक्की जिंकली असती. ते जीवदान आम्हाला महागात पडलं. उपाहारानंतर थोड्याच वेळात पाऊस कोसळू लागल्याने सामना लवकर संपवावा लागला. मालिका मोठ्या फरकाने जिंकण्याची सुवर्णसंधी आम्ही गमावली.

त्या मालिकेत घडलेला एक प्रसंग मला मुद्दाम सांगावासा वाटतो. हवामान व वातावरणाचा सामन्याच्या निकालावर कसा परिणाम होऊ शकतो याचं ते उत्तम उदाहरण ठरू शकेल. ख्राइस्टचर्चच्या एकदिवसीय सामन्यात झहीर गोलंदाजी करत होता. त्याने टाकलेल्या एका गुडलेंथ चेंडूवर फलंदाजाने मिड विकेटवरून शॉट मारण्याचा प्रयत्न केला. चेंडू बॅटच्या वरच्या कडेला लागून उंच उडाला. ''झेल मी पकडणार!'' असं झहीर जोरात ओरडला. चेंडू पकडण्यासाठी तो काळजीपूर्वक योग्य जागी येऊन उभाही राहिला; पण अचानक वाऱ्याने वेग पकडला आणि चेंडू त्याच्यापासून १५ फूट दूर जाऊन पडला. नंतर सर्वांनी चेष्टेत त्याला विचारलं, ''अरे झॅक, तो झेल तू घेणार होतास ना?''

सर्वोच्च स्थानाचा ध्यास

२००७मध्ये इंग्लंडवर विजय मिळवल्यानंतर आयसीसी कसोटी मानांकनात भारत एकेक पायरी वर चढू लागला होता. नोव्हेंबर-डिसेंबर, २००९मध्ये कसोटी मालिका खेळण्यासाठी श्रीलंकेचा संघ भारतात येणार होता. न्यूझीलंडमधील यशानंतर आम्ही श्रीलंकेचा पराभव करू शकलो असतो, तर भारत प्रथम स्थानी पोचणार होता.

श्रीलंकेविरुद्ध होणाऱ्या मालिकेला माझ्या दृष्टीने आणखीही एक विशेष महत्त्व होतं. नोव्हेंबर, २००९मध्ये माझ्या क्रिकेट कारकिर्दीला २० वर्षं पूर्ण होणार होती. तो आनंदाचा प्रसंग मी वेगळ्या तऱ्हेने साजरा केला. प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींशी मी सात तासांहून अधिक वेळ संवाद साधला. त्या वेळात मी निरनिराळ्या ५० मुलाखती दिल्या. एवढं करूनही मी

पत्रकारांशी फारसा बोलत नाही, असं लोक म्हणतातच! १९९०मध्ये झालेली पहिली पत्रकार परिषद मला अजूनही आठवते. त्या वेळी मी फारच बुजरा होतो. गेल्या २० वर्षांत माझ्यामध्ये खूपच फरक पडला होता.

अगदी तरुण वयात मी कॅमेऱ्यासमोर प्रथम उभा राहिलो. टीव्ही जाहिरातींच्या चित्रीकरणाच्या प्रसंगी मी सुरुवातीला कॅमेऱ्यासमोर खूपच अवघडून जात असे. त्या वेळी मेकअप करण्याला माझा विरोध असायचा. चेहऱ्याला रंग न लावता व केशरचनेत काहीही फरक न करता शूटिंग करण्याबाबत मी आग्रही असे. नंतर माझ्या लक्षात येत गेलं की, कॅमेऱ्यासमोर काम करताना मेकअप करणं ही अतिशय साधी व नित्याची बाब आहे. जाहिरातींसाठी शूटिंग करताना हळूहळू मला मजा येऊ लागली. त्या वेळेचे काही प्रसंग तर मी कधीच विसरू शकणार नाही.

एकदा राजस्थानमधील जोधपूर शहरात, भारतीय चित्रपटसृष्टीचे महानायक अमिताभ बच्चन यांच्याबरोबर मी शूटिंग करत होतो. अंजली व अर्जुनही माझ्यासोबत जोधपूरला आले होते. अर्जुन त्या वेळी खूपच लहान होता. शूटिंगच्या दरम्यान आम्ही विश्रांती घेत होतो. सहज माझं लक्ष समोर गेलं आणि मी चपापलो. अर्जुन जेवण संपवून आपले हात बच्चनजींच्या चूडीदारला पुसत होता. ते पाहून अंजली व मी अगदी शरमून गेलो. पण बच्चनसाहेब शांत होते. ‘‘अर्जुनचं वागणं निरागस आहे. आपण काय करतोय हे या वयात मुलांना समजतं तरी का?’’ असं म्हणत त्यांनी आमचीच समजूत काढली. अर्जुनच्या वागण्याची अमिताभजींना जरी गंमत वाटत असली, तरी आम्ही दोघे मात्र अवघडून गेलो होतो. मी त्यांना म्हटलंदेखील, ‘‘अर्जुन जब बडा हो जाएगा, तो इस इन्सिडन्स को याद करके शरमाएगा।’’ बच्चनसाहेबांचा तो सौजन्यशील स्वभाव पाहून माझ्या मनात त्यांच्याविषयी असलेला आदर अधिकच वाढला.

भारतीय चित्रपटांचा बादशहा शाहरुख खानसंबंधीचाही असाच एक किस्सा माझ्या लक्षात आहे. १९९९ विश्वचषक स्पर्धेच्या आधी लॉर्ड्स मैदानावर मी पेप्सीच्या जाहिरातीसाठी शाहरुखबरोबर शूटिंग करत होतो. प्रसंग असा होता की, शाहरुख माझा मुखवटा चढवून हळूच ड्रेसिंग रूममध्ये शिरतो. तिथला रेफ्रिजरेटर उघडून चटकन एक पेप्सीची बाटली बाहेर काढतो. इतक्यात मी तिथे येऊन तोतयागिरी केल्याबद्दल शाहरुखवर चिडतो. शूटिंग करताना मला अचानक एक नवीन कल्पना सुचली. मी दिग्दर्शकाला म्हटलं की, आपण जाहिरातीचा शेवट थोडा बदलू या. मी शाहरुखच्या हातून पेप्सीची बाटली हिसकावून घेतो आणि शिक्षा म्हणून त्याला माझ्या जागी बॅटिंग करायला मैदानावर पाठवतो. डायरेक्टरला माझी कल्पना खूपच आवडली. त्याने लगेच जाहिरातीचा शेवट बदलला.

श्रीलंकेने दिलेली झुंज

तीन कसोटी सामन्यांच्या मालिकेला अहमदाबादमध्ये १६ नोव्हेंबरला सुरुवात होणार होती. त्याच वेळी माझ्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीला २० वर्षं पूर्ण होत होती. त्याबद्दल मला एक सुखद धक्का द्यायचा बेत अंजलीने आखला होता. माझ्या काही जिवलग मित्रांना सोबत घेऊन ती एका खाजगी जेटने सामन्याच्या दिवशी सकाळीच अहमदाबादला येऊन पोचली. मी एमएस धोनीबरोबर नाष्टा करत होतो. रेस्टॉरंटच्या दरवाजाला मी पाठमोरा बसलो होतो. इतक्यात माझ्या पाठीमागे काहीतरी हालचाल सुरू आहे, हे मला धोनीच्या डोळ्यांत दिसलं. पण मी मागे वळून पाहायच्या आत अंजली व माझ्या मित्रमंडळींनी मला घेरून टाकलं. माझं अभिनंदन करण्यासाठी ही सर्व मंडळी एवढ्या दुरून येतील, अशी मी अपेक्षाच केली नव्हती. सर्वांच्या प्रेमाने व जिव्हाळ्याने मी भारावून गेलो.

सामन्याच्या मध्यावर श्रीलंकेने आमच्यावर थोडा दबाव आणला होता. द्रविड आणि धोनीच्या शतकांमुळे आम्ही पहिल्या डावात ४२६ धावा केल्या होत्या. पण श्रीलंकेने ७६० धावा करत आम्हाला जोरदार प्रत्युत्तर दिलं. श्रीलंकेतर्फे दिलशान व प्रसन्ना जयवर्धनेने शतक तर महेला जयवर्धनेने द्विशतक काढलं होतं. सामना वाचवण्यासाठी आम्हाला दीड दिवस बॅटिंग करावी लागणार होती; पण आता आमच्यात कडवी लढत देण्याची जिद्द निर्माण झाली होती. गंभीरने ११४ धावा काढून छान पाया रचला. त्यानंतर आम्ही अप्रतिम फलंदाजी करत सामना अनिर्णित राखला.

अखेरच्या दिवशी मीही शतक काढलं. ते शतक नाट्यपूर्ण ठरलं. आपण मॅच जिंकू शकत नाही, हे लक्षात आल्यावर

श्रीलंकेने अतिबचावात्मक क्षेत्ररचना लावली. श्रीलंकेचा कर्णधार कुमार संगकाराने मधेच मला विचारलं, ''मॅच सुरू ठेवण्यात तुला खरंच रस वाटतोय का? कारण निकाल लागण्याची तर आता काहीच शक्यता उरलेली नाही.'' त्यावर मी त्याला स्पष्ट शब्दांत सुनावलं, ''कसोटी शतक हे अखेर कसोटी शतकच असतं. तू जर खिलाडूवृत्तीने क्षेत्ररचना लावली असतीस, तर मी केव्हाच शतक पूर्ण केलं असतं. मला मुद्दाम अडचणीत आणण्याची तुझी इच्छा असेल, तर त्याबद्दल माझं काहीच म्हणणं नाही; पण खेळ संपायला अजून खूप वेळ असताना मी सामना अर्धवट सोडणार नाही.''

त्यानंतर संगकाराने लगेच ७-२ अशी क्षेत्ररचना लावली. ऑफ साइडला सात तर ऑन साइडला दोन क्षेत्ररक्षक ठेवले. त्याने डावखुरा द्रुतगती गोलंदाज वेलेगेदरालाही काही सूचना केल्या. वेलेगेदराचे चेंडू माझ्या ऑफ स्टम्पपासून काही फूट दूर पडून त्यानंतर आणखी बाहेरच्या दिशेला जाऊ लागले. मी वेगळ्या पद्धतीने बॅटिंग करायची ठरवली. त्याच्या एका चेंडूवर मी ऑफ स्टम्पपासून दोन फूट बाहेर जाऊन स्क्वेअर लेगवरून चौकार मारला. त्या चौकाराने मी नव्वदीच्या घरात पोचलो. अखेर माझं शतक पूर्ण झालं. शतक झाल्यावर मी संगकाराला म्हटलं, ''अजूनही तुला मॅच सुरू ठेवायची असेल, तर माझी बॅटिंग करायची तयारी आहे.'' पण त्यानंतर आम्ही दोघांनी सामना थांबवण्याचा निर्णय घेतला.

२१ डिसेंबर, २००९ रोजी कटकमध्ये झालेल्या तिसऱ्या एकदिवसीय सामन्यातही असाच एक प्रसंग घडला होता. श्रीलंकेच्या २३९ धावसंख्येचा पाठलाग करताना त्याही वेळी मी नव्वदीच्या घरात पोचलो होतो. दिनेश कार्तिक माझ्या जोडीला खेळत होता. जिंकण्यासाठी आम्हाला फारच थोड्या धावांची गरज उरली होती. त्या वेळी मी फलंदाजी करायला आलो की, संगकारा सर्व क्षेत्ररक्षक मुद्दाम सीमारेषेवर ठेवायचा. दिनेशच्या वेळी मात्र तो क्षेत्ररक्षकांना जवळ बोलावयाचा. संगकाराचा बेत हाणून पाडण्यासाठी दिनेश चेंडू निर्धाव खेळून काढत होता. अखेरीस मीच जाऊन त्याला सामना संपवायला सांगितलं. ''माझ्या शतकापेक्षा संघाचा विजय मला अधिक महत्त्वाचा आहे,'' असं मी त्याला म्हणालो. दिनेशने ज्या वेळी विजयी धाव काढली तेव्हा मी ९६ धावांवर नाबाद होतो.

वीरेंद्र सेहवागच्या बाबतीतही श्रीलंकेच्या संघाने एकदा असंच वर्तन केलं होतं. १६ ऑगस्ट, २०१०ला दाम्बुलामध्ये एकदिवसीय सामना सुरू होता. वीरू त्या वेळी ९९ धावांवर खेळत होता. भारताला विजयासाठी फक्त एक धाव हवी होती. ऑफ स्पिनर सूरज रणदीवने मुद्दाम नो-बॉल टाकला. वीरूने त्या चेंडूवर षटकार मारला; पण त्याच्या खात्यात त्या धावा जमा झाल्या नाहीत. तांत्रिकदृष्ट्या नो-बॉल टाकल्याक्षणीच सामन्याचा निकाल लागला होता. वीरूचं शतक अवघ्या एका धावेने हुकलं. त्या प्रकरणाने प्रसारमाध्यमांमध्ये त्या वेळी एकच खळबळ उडाली होती.

अखेरीस प्रथम स्थानी

२४ नोव्हेंबर, २००९ रोजी दुसरा कसोटी सामना कानपूरला सुरू झाला. पहिल्या कसोटीत श्रीलंकेला कडवी लढत देऊन आम्ही सामना अनिर्णित राखला होता. दुसऱ्या कसोटीत मात्र आम्ही श्रीलंकेचा पार धुव्वा उडवला. गौतम गंभीर, वीरेंद्र सेहवाग व राहुल द्रविड या आमच्या पहिल्या तिन्ही फलंदाजांनी शतकं झळकावली. त्यानंतर चकमदार व शिस्तबद्ध गोलंदाजी करत गोलंदाजांनीही फलंदाजांचे श्रम सार्थकी लावले. आम्ही श्रीलंकेचा एक डाव व १४४ धावांनी पराभव केला. पुढच्याच आठवड्यात तिसरा सामना मुंबईच्या सीसीआय मैदानावर होता. तो सामना रंगतदार होण्याची चिन्हं आधीच दिसू लागली.

सीसीआयच्या मैदानावर वीरेंद्र सेहवागने केलेल्या नेत्रदीपक फलंदाजीने प्रेक्षकांच्या डोळ्याचं पारणं फिटलं. मी पाहिलेली वीरूची ती एक सर्वोत्कृष्ट इनिंग्ज होती. त्यांनी मारलेल्या काही शॉट्सच्या वेळी प्रेक्षकांना श्वास रोखून धरावा लागला. केवळ एका दिवसात त्याने नाबाद २८३ धावा काढल्या. दुसऱ्या दिवशी सकाळी तो २९३ धावा काढून बाद झाला. त्याचं तिसरं त्रिशतक थोडक्यात हुकल्याने प्रेक्षक हळहळले. कमालीच्या वेगात त्याने धावा काढल्या होत्या. त्यामुळे प्रतिस्पर्धी संघाला बाद करण्यासाठी गोलंदाजांना भरपूर वेळ मिळाला. वीरूचा झंझावात सुरू झाला की, त्याच्यासमोर जगातल्या कुठल्याही गोलंदाजाची डाळ शिजू शकत नाही. सलामीला कशी फलंदाजी करावी, याचं गणितच त्याने बदलून

टाकलं. झहीरने दुसऱ्या डावात श्रीलंकेचे पाच गडी बाद केले आणि भारताने एक डाव व २४ धावांनी विजय मिळवला. खरोखरच तो रोमहर्षक विजय होता. त्या विजयाने भारत, आयसीसी जागतिक कसोटी मानांकनात प्रथम स्थानी पोचला.

मीही त्या मॅचमध्ये एक छोटीशी, पण खास कामगिरी केली. श्रीलंकेच्या पहिल्या डावात मी एंजलो मॅथ्यूसला ९९ धावांवर चपळाईने धावबाद केलं. मॅथ्यूसने फाइन लेगला शॉट मारला आणि शतक पूर्ण करण्यासाठी दुसरी धाव घेण्याचा प्रयत्न केला. मी वेगाने चेंडूवर झेप घेत तो चटकन स्टम्प्सच्या दिशेने फेकला. चेंडू बरोबर स्टम्प्सवर गेला. धोनीला फक्त बेल्स उडवण्याचं काम करावं लागलं. त्या विकेटचा आनंद साजरा करताना मी माझ्या सहकाऱ्यांना गमतीत म्हटलं, ''पाहिलंत ना, २० वर्षं आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळूनसुद्धा या वयात मी अजूनही चांगली फिल्डिंग करू शकतो की नाही!''

आम्हाला मिळालेल्या यशासाठी आम्ही खूपच मेहनत घेतली होती. एक संघ म्हणून आम्ही उत्कृष्ट क्रिकेट खेळलो. प्रत्येक खेळाडूचं त्या यशात योगदान होतं. प्रशिक्षक गॅरी कर्स्टन, खास आमची कामगिरी उंचावण्यासाठी व आमची मानसिक तयारी करून घेण्यासाठी नेमलेला साहाय्यक प्रशिक्षक पॅडी अप्टन, फिटनेस ट्रेनर रामजी श्रीनिवासन, आमचा फिजिओ नितीन पटेल, खेळाडूंना मसाज करणारे रमेश साने आणि अमित शाह, संगणक विश्लेषक धनंजय या सर्वांनीच भारतीय संघाला सर्वोच्च स्थानी नेण्यात महत्त्वाच्या भूमिका निभावल्या. माझ्या मते, क्रिकेटच्या सर्व प्रकारात कसोटी क्रिकेटलाच सर्वांत जास्त महत्त्व आहे. त्या दिवशी मी माझ्या कारकिर्दीतील सर्वोच्च शिखर गाठलं. योगायोगाने मी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये २० वर्षं पूर्ण करत असतानाच ती घटना घडल्याने माझ्या यशाला अधिक झळाळी आली.

इंग्लंडचा भारत दौरा, २००८

पहिली कसोटी. चेन्नई – ११ ते १५ डिसेंबर, २००८

इंग्लंड ३१६ (एजे स्ट्रॉस १२३, एमजे प्रायर ५३*, एएन कुक ५२; एच सिंग ३-९६, ए मिश्रा ३-९९) व ३११-९ घोषित (एजे स्ट्रॉस १०८, पीडी कॉलिंगवुड १०८; झेड खान ३-४०, आय शर्मा ३-५७)

भारत २४१ (एमएस धोनी ५३, एच सिंग ४०, **एसआर तेंडुलकर** ३७, ए फ्लिंटॉफ ३-४९, एमएस पानेसर ३-६५) व ३८७-४ (**एसआर तेंडुलकर** १०३*, वाय सिंग ८५*, व्ही सेहवाग ८३, जी गंभीर ६६)

भारत ६ गडी राखून विजयी

दुसरी कसोटी. मोहाली – १९ ते २३ डिसेंबर, २००८

भारत ४५३ (जी गंभीर १७९, आर द्रविड १३६, **एसआर तेंडुलकर** ११; ए फ्लिंटॉफ ३-५४, जीपी स्वान ३-१२२) व २५१-७ घोषित (जी गंभीर ९७, वाय सिंग ८६, **एसआर तेंडुलकर** ५)

इंग्लंड ३०२ (केपी पीटरसन १४४, ए फ्लिंटॉफ ६२, एएन कुक ५०; एच सिंग ४-६८, झेड खान ३-७६) व ६४-१

सामना अनिर्णित

भारत मालिकेत १-० विजयी

भारताचा न्यूझीलंड दौरा, २००९

पहिली कसोटी. हॅमिल्टन – १८ ते २१ मार्च, २००९

न्यूझीलंड २७९ (डीएल व्हेटोरी ११८, जेडी रायडर १०२; आय शर्मा ४-७३, एमएम पटेल ३-६०) व २७९ (बीबी मॅकलम ८४, डीआर फ्लिन ६७, एमजे गुप्टिल ४८; जेईसी फ्रँकलिन ४९; एच सिंग ६-६३)

भारत ५२० (**एसआर तेंडुलकर** १६०, जी गंभीर ७२, आर द्रविड ६६, झेड खान ५१*, सीएस मार्टिन ३-९८, आयई ओब्रायन ३-१०३) व ३९-०

भारत १० गडी राखून विजयी

दुसरी कसोटी. नेपियर – २६ ते ३० मार्च, २००९

न्यूझीलंड ६१९-९ घोषित (जेडी रायडर २०१, एलआरपीएल टेलर १५१, बीबी मॅकलम ११५, डीएल व्हेटोरी ५५, जेईसी फ्रँकलिन ५२; आय शर्मा ३-९५, झेड खान ३-१२९)

भारत ३०५ (आर द्रविड ८३, व्हीव्हीएस लक्ष्मण ७६, **एसआर तेंडुलकर** ४९; सीएस मार्टिन ३-८९) व ४७६-४ (फॉलो-ऑन) जी गंभीर १३७, व्हीव्हीएस लक्ष्मण १२४*, **एसआर तेंडुलकर** ६४, आर द्रविड ६२, वाय सिंग ५४)*

सामना अनिर्णित

तिसरी कसोटी. वेलिंग्टन – ३ ते ७ एप्रिल, २००९

भारत ३७९ (**एसआर तेंडुलकर** ६२, एच सिंग ६०, एमएस धोनी ५२; सीएस मार्टिन ४-९८) व ४३४-७ घोषित (जी गंभीर १६७, व्हीव्हीएस लक्ष्मण ६१, आर द्रविड ६०, एमएस धोनी ५६*, **एसआर तेंडुलकर** ९; सीएस मार्टिन ३-७०)

न्यूझीलंड १९७ (एलआरपीएल टेलर ४२; झेड खान ५-६५, एच सिंग ३-४३) व २८१-८ (एलआरपीएल टेलर १०७, एमजे गुप्तिल ४९, जेईसी फ्रँकलिन ४९; एच सिंग ४-५९, **एसआर तेंडुलकर** २-४५, झेड खान २-५७)

सामना अनिर्णित

भारत मालिकेत १-० विजयी

श्रीलंकेचा भारत दौरा, २००९

पहिली कसोटी. अहमदाबाद – १६ ते २० नोव्हेंबर, २००९

भारत ४२६ (आर द्रविड १७७, एमएस धोनी ११०, वाय सिंग ६८, **एसआर तेंडुलकर** ४; युडब्ल्यूएमबीसीए वेलेगेदरा ४-८७, एम मुरलीधरन ३-९७) व ४१२-४ (जी. गंभीर ११४, **एसआर तेंडुलकर** १००*, व्ही सेहवाग ५१, व्हीव्हीएस लक्ष्मण ५१)*

श्रीलंका ७६०-७ घोषित (डीपीएमडी जयवर्धने २७५, एचएपीडब्ल्यू जयवर्धने १५४*, टीएम दिलशान ११२)

सामना अनिर्णित

दुसरी कसोटी. कानपूर – २४ ते २७ नोव्हेंबर, २००९

भारत ६४२ (जी गंभीर १६७, आर द्रविड १४४, व्ही सेहवाग १३१, वाय सिंग ६७, व्हीव्हीएस लक्ष्मण ६३, **एसआर तेंडुलकर** ४०; एचएमआरकेबी हेरथ ५-१२१)

श्रीलंका २२९ (डीपीएमडी जयवर्धने ४७, केसी संगकारा ४४; एस श्रीशांत ५-७५) व २६९ (फॉलो-ऑन) (टीटी समरवीरा ७८*, एच सिंग ३-९८, पीपी ओझा २-३६)

भारत एक डाव व १४४ धावांनी विजयी

तिसरी कसोटी. मुंबई (ब्रेबॉर्न स्टेडियम) – २ ते ६ डिसेंबर, २००९

श्रीलंका ३९३ (टीएम दिलशान १०९, एडी मॅथ्यूस ९९, एनटी परणविताना ५३; एच सिंग ४-११२, पीपी ओझा ३-१०१) व ३०९ (केसी संगकारा १३७, एनटी परणविताना ५४; झेड खान ५-७२)

भारत ७२६-९ घोषित (व्ही सेहवाग २९३, एमएस धोनी १००*, एम विजय ८७, आर द्रविड ७४, व्हीव्हीएस लक्ष्मण ६२, **एसआर तेंडुलकर** ५३, एम मुरलीधरन ४-१९५)

भारत एक डाव व २४ धावांनी विजयी

भारत मालिकेत २-० विजयी

२२.
शिखरावर राहताना

२०१०मध्ये तीन बलाढ्य संघांशी आम्हाला मुकाबला करावा लागणार होता. तिन्ही मालिका भारतात खेळल्या जाणार होत्या. भारताला मिळालेलं अव्वल स्थान टिकवण्याची महत्त्वाची जबाबदारी आमच्यावर होती. त्यासाठी तिन्ही मालिकेत उत्तम कामगिरी करणं गरजेचं होतं. वर्षाच्या सुरुवातीला फेब्रुवारी-मार्चमध्ये दक्षिण आफ्रिका, त्यानंतर ऑक्टोबरमध्ये आस्ट्रेलिया, तर नोव्हेंबरमध्ये न्यूझीलंडचा संघ भारतात येणार होता. वर्षअखेरीस डिसेंबरमध्ये आम्ही पुन्हा दक्षिण आफ्रिकेत जाणार होतो.

त्या तीन मालिका सुरू होण्याआधी जानेवारी २०१०मध्ये आम्ही बांगलादेशचा छोटा दौरा केला. दोन कसोटी सामन्यांची ती मालिका होती. बांगलादेशला हरवणं सोपं असतं, असा अनेकांचा गोड गैरसमज होता; पण यापूर्वी बांगलादेशच्या संघाने बरेच आश्चर्यकारक विजय मिळवले होते. बांगलादेशला कमी लेखणं म्हणजे संकटाला आमंत्रण देण्यासारखं होतं. याचा अनुभव १७ जानेवारीला चित्तगाँगमध्ये झालेल्या पहिल्या कसोटीतच आम्हाला आला. पहिल्या इनिंग्जमध्ये आमची २०९ धावांवर ८ गडी बाद, अशी केविलवाणी अवस्था झाली. प्रेक्षक आपल्या खेळाडूंना जोरदार प्रोत्साहन देत होते. चेतवलेल्या गोलंदाजांसमोर फलंदाजी करणं हे आमच्यासाठी मोठंच आव्हान होतं. विकेट पडली की, प्रेक्षक स्टेडियम डोक्यावर घेत; पण चौकार मारला की तेच प्रेक्षक एकदम शांत होऊन जात.

कट्टर देशाभिमानी प्रेक्षकांसमोर फलंदाजी करणं खूपच आव्हानात्मक होतं. मी नाबाद १०५ धावा केल्या. आम्ही कशीतरी २४३ धावांपर्यंत मजल मारू शकलो. आमच्या गोलंदाजांनी मात्र चांगली कामगिरी करत आम्हाला एका धावेची आघाडी मिळवून दिली. दुसऱ्या डावात गंभीरने काढलेल्या शतकामुळे आम्ही बांगलादेशसमोर ४१५ धावांचं लक्ष्य ठेवू शकलो. मुशफिकूर रेहमानचं शतकही त्यांना सावरू शकलं नाही. आम्ही ११३ धावांनी ती कसोटी जिंकली.

काही दिवसांनी ढाक्याला दुसऱ्या कसोटी सामन्याला सुरुवात झाली. चित्तगाँगच्या थंड व धूसर वातावरणातून आल्यानंतर ढाक्याच्या गरम आणि दमट हवामानाशी जुळवून घेताना गोलंदाजांची दमछाक झाली. तरीही दुसऱ्या डावात रिव्हर्सस्विंगचा फायदा उठवत झहीरने सात विकेट्स घेतल्या. त्या सामन्यात आम्ही एकदाच फलंदाजी केली. राहुलने व मी काढलेल्या शतकाच्या जोरावर आम्ही बांगलादेशसमोर ५४४ धावांचा डोंगर रचला आणि उरलेलं काम झहीरवर सोपवलं.

दक्षिण आफ्रिकेचा भारत दौरा, फेब्रुवारी २०१०

दोन कसोटी व तीन एकदिवसीय सामन्यांची मालिका खेळण्यासाठी दक्षिण आफ्रिकेचा संघ भारताच्या दौऱ्यावर आला. ६ फेब्रुवारीला सुरू होणाऱ्या कसोटीसाठी आम्ही सर्व खेळाडू नागपूरला पुन्हा एकत्र जमलो. मालिका अटीतटीची होणार होती. दोन्ही संघांच्या गुणसंख्येत फारसा फरक नव्हता. त्यामुळे मालिका जिंकणारा संघ हा अव्वल नंबरचा कसोटी संघ ठरणार होता.

पहिल्या कसोटीत डेल स्टेनच्या तुफानी गोलंदाजीमुळे आमचा दणदणीत पराभव झाला. स्टेनने एकूण १० विकेट्स घेतल्या. दक्षिण आफ्रिकेतर्फे हशिम अमलाने २५३ आणि जॅक कॅलिसने १५३ धावा काढल्या. अमलाने त्या मालिकेत सुरेख फलंदाजी केली. कॅलिसचं कर्तृत्व निर्विवाद होतं. आमच्या पिढीतला तो सर्वोत्कृष्ट अष्टपैलू खेळाडू होता. क्रिकेटच्या इतिहासात निश्चितच एक महान क्रिकेटपटू म्हणून त्याची नोंद होईल. अशा खेळाडूंसमोर अधिक जिद्दीने त्यांच्या तोडीस तोड

खेळण्याचा प्रयत्न करताना मला मोठी मजा येत असे.

तो सामना आम्ही हरलो असलो, तरी दुसऱ्या डावात मी शतक काढू शकलो होतो. डेल स्टेनविरुद्ध मी आखलेले डावपेच हळूहळू यशस्वी ठरत होते. स्टेन हा विलक्षण क्षमतेचा गोलंदाज आहे. दुसरी कसोटी जिंकण्यासाठी त्याची गोलंदाजी काळजीपूर्वक व हुशारीने खेळणं आवश्यक होतं. नागपूरच्या दुसऱ्या डावातील माझ्या शतकामुळे आमच्या संघातील सर्वांनाच प्रेरणा मिळाली होती. पहिल्या कसोटीत खराब खेळामुळे आम्हीच स्वत:ला अडचणीत आणलं होतं ही गोष्ट स्वीकारणं आम्हाला भाग होतं. आता पहिलं स्थान कायम राखण्यासाठी आम्हाला सर्व कौशल्य पणाला लावावं लागणार होतं.

ईडन गार्डन्सची हिरवीगार खेळपट्टी पाहून मात्र आम्हाला धक्काच बसला. त्यामुळे घरच्या वातावरणाचा आम्हाला मिळणारा फायदा जवळजवळ नाहीसा झाला होता; पण इतक्या उशिरा आम्ही खेळपट्टीबाबत काहीच करू शकत नव्हतो.

दक्षिण आफ्रिकेने त्याही सामन्यात उत्तम सुरुवात केली; पण दिवसाच्या अखेरी आम्ही अचानक सामना आमच्या बाजूने फिरवू शकलो. २१८ धावा आणि १ गडी बाद, अशा मजबूत स्थितीतून दक्षिण आफ्रिकेचा संघ २९६ धावांत कोसळला. झहीर व हरभजनच्या जबरदस्त गोलंदाजीचा तो प्रभाव होता. त्यानंतर आम्ही पहिल्या डावात मोठी धावसंख्या उभारली. सेहवाग, लक्ष्मण, धोनी व मी – आम्ही चौघांनी त्या डावात शतकं काढली. पहिले दोन गडी झटपट बाद झाल्यानंतर सेहवागने व मी मिळून २४९ धावांची मोठी भागीदारी केली. त्या धावाही आम्ही चांगल्याच वेगात काढल्यामुळे दक्षिण आफ्रिकेचे गोलंदाज गडबडून गेले. मधल्या व उजव्या यष्टीवरचे चेंडू आम्ही फ्लिक करत होतो, तर डाव्या यष्टीबाहेरच्या चेंडूवर आम्ही कट व ड्राइव्ह मारत होतो. आम्ही दोघांनीही गोलंदाजांवर पूर्ण वर्चस्व राखलं होतं. त्यामुळे सामना भारताच्या बाजूला झुकला.

त्यानंतर लक्ष्मण व धोनीच्या शतकांमुळे आम्ही ६४३-६ अशा प्रचंड धावसंख्येवर आमचा डाव घोषित केला. सामना वाचवण्यासाठी दक्षिण आफ्रिकेला पूर्ण दोन दिवस बॅटिंग करावी लागणार होती. दुर्दैवाने चौथ्या दिवशी खराब हवामानामुळे बरीच षटकं वाया गेली. चौथ्या दिवसअखेर दक्षिण आफ्रिकेचे फक्त तीनच फलंदाज बाद झाले होते. पाचव्या दिवशी आम्हाला जिंकण्यासाठी सात विकेट्स घ्याव्या लागणार होत्या. कसोटी सामना किती रंगतदार होऊ शकतो याचा अनुभव ईडन गार्डन्सवरील प्रेक्षकांनी पाचव्या दिवशी घेतला. भज्जीसाठी ते मैदान कायमच लाभदायक ठरलं आहे. त्याही सामन्यात त्याने सुरेख गोलंदाजी करत एकूण आठ बळी घेतले. खेळ संपायला काहीच षटकं बाकी असताना भज्जीने मॉर्ने मॉर्केलला पायचीत केलं आणि जमलेल्या प्रेक्षकांनी ईडन गार्डन्सचं स्टेडियम दुमदुमून टाकलं. आनंदाच्या भरात भज्जीने अर्धअधिक मैदान धावत पारसुद्धा केलं होतं. त्या विस्मयकारक विजयामुळे आम्ही अक्षरश: थरारून गेलो. आम्ही आमचं प्रथम स्थान अबाधित राखलं होतं. माझं पहिलं शतक मॅच वाचवू शकलं नसलं तरी माझ्या दुसऱ्या शतकाने आमच्या विजयाला हातभार लावला, याचं मला खूपच समाधान वाटलं.

त्यानंतर तीन एकदिवसीय सामन्यांची मालिका खेळली गेली. २१ फेब्रुवारीला जयपूरच्या पहिल्याच सामन्यात मी चार धावा काढून धावबाद झालो. त्यामुळे मी किंचित नाराज झालो होतो. पण सामन्यातील शेवटच्या षटकातील माझी कामगिरी मात्र मला निश्चितच समाधान देऊन गेली. दक्षिण आफ्रिकेला जिंकण्यासाठी १० धावा हव्या होत्या. २९९ धावांचा पाठलाग करताना एक वेळ त्यांची २२५ धावांवर ८ गडी बाद, अशी स्थिती झाली होती. त्यानंतर डेल स्टेन आणि वेन पार्नेल यांच्या भागीदारीने दक्षिण आफ्रिकेला पुन्हा लक्ष्याच्या जवळ आणलं. अखेरच्या षटकातील पहिल्याच चेंडूवर प्रवीण कुमारने स्टेनला बाद केलं. तिसऱ्या चेंडूवर चार्ल लँगवेल्टने शॉर्ट फाइन लेगवरून शॉट मारला. मी लाँग लेगला होतो. स्वत:ला पूर्ण झोकून देऊन मी तो चेंडू अडवला. नाहीतर तो चेंडू नक्कीच सीमारेषेपार गेला असता. मैदानावरील पंचांनी तिसऱ्या पंचांची मदत घेतली. सीमारेषेला स्पर्श न करता मी चेंडू अडवल्याचं रिप्लेमध्ये स्पष्ट झालं. मी अडवलेल्या चौकारामुळे सामन्याच्या निकालावर निश्चितच परिणाम झाला. आम्ही एका धावेने ती मॅच जिंकली!

२४ फेब्रुवारीला दुसरा सामना ग्वाल्हेरला होता. तोपर्यंत मला खूपच थकल्यासारखं वाटत होतं. त्या भरगच्च हंगामात

सतत क्रिकेट खेळल्यामुळे माझ्या शरीराने हळूहळू बंड करायला सुरुवात केली. शरीराचा प्रत्येक भाग दुखत होता. पाठ अवघडली होती, पायांचे घोटे आवळून गेले होते आणि गुडघ्यांना दुखापत झाली होती. सामन्याच्या दिवशी सकाळी फिजिओ नितीन पटेलने माझ्यावर दीड तास उपचार केले. मी त्याला म्हटलं, ''आजच मालिका जिंकून मला तिसऱ्या सामन्यात विश्रांती घ्यायची इच्छा आहे.''

मी मैदानात उतरल्यावर शरीरातल्या सगळ्या वेदना नाहीशा झाल्या होत्या. हा चमत्कार कसा घडला हे मलाच समजलं नाही; पण त्या दिवशी प्रत्येक गोष्ट माझ्या मनासारखी घडत गेली. आम्ही पहिली फलंदाजी केली. दुसऱ्याच षटकात मी वेन पार्नेलचा एक चेंडू बॅटने नुसता ढकलला आणि तो चेंडू सीमापार गेलेला पाहून मीच चकित झालो. त्यानंतर प्रत्येक चेंडू माझ्या बॅटच्या मध्यावर बसत गेला. इनिंग्ज पूर्ण होईपर्यंत आमच्या धावांचा वेग जराही कमी झाला नाही.

त्या डावात मी काही चांगल्या भागीदाऱ्याही केल्या. प्रथम दिनेश कार्तिकबरोबर, नंतर युसुफ पठाण व शेवटी धोनीच्या जोडीने केलेल्या भागीदारींमुळे आम्ही त्या इनिंग्जमध्ये ४०० धावांचा टप्पा ओलांडला. माझ्या १७५ धावा झाल्यानंतर द्विशतकाचा विचार प्रथम माझ्या मनात आला. तोपर्यंत मी थोडा थकलो होतो. त्यामुळे मोठे शॉट्स मारण्याची ताकद माझ्यात राहिली नव्हती. मी दोन क्षेत्ररक्षकांच्या मध्ये फटके मारून एकेरी व दुहेरी धावा काढण्यावर अधिक भर दिला. माझ्या १९० धावा झाल्यावरही मी जोरात धावू शकत होतो. धोनी दुसऱ्या बाजूने जोरदार फटकेबाजी करत होता.

अखेर पन्नासाव्या षटकात तो विक्रमी क्षण आला. पॉइंटच्या मागे शॉट मारून मी एक धाव घेतली आणि क्रिकेटच्या इतिहासात एकदिवसीय सामन्यात प्रथमच द्विशतक झळकवण्याचा मान मला मिळाला. मायदेशातल्या प्रेक्षकांसमोर हा विक्रम केल्याचा आनंद मला अधिक होता. आमच्या ४०१ धावा झाल्याने स्टेडियममध्ये उत्साहाचं वातावरण पसरलं होतं. मी ड्रेसिंग रूममध्ये शिरताच सेहवाग मला म्हणाला, *''आखिर आपने डबल हंड्रेड बना ही दिया!''*

अर्थात निम्मंच काम झालेलं होतं. २००६मध्ये आस्ट्रेलियाविरुद्ध दक्षिण आफ्रिकेने ४३४ धावांचं लक्ष्य पार केलं होतं. त्यामुळे आम्ही निश्चिंत राहू शकत नव्हतो. सुदैवाने ग्वाल्हेरमध्ये त्या इतिहासाची पुनरावृत्ती झाली नाही. आम्ही १५३ धावांनी दक्षिण आफ्रिकेचा दणदणीत पराभव केला.

भारत विरुद्ध दक्षिण आफ्रिका

(दुसरा एकदिवसीय सामना)

रूपसिंग स्टेडियम, ग्वाल्हेर, २४ फेब्रुवारी, २०१० (दिवस/रात्र)

पंच : आयजे गोल्ड व एसके तारापोर (टीव्ही पंच : एसएस हजारे)
निरीक्षक : एजे पायक्रॉफ्ट
नाणेफेक : भारत

भारत

भारत		धावा	खेळलेले चेंडू	धावा चेंडू	काढलेले चौकार	षटकार
व्ही सेहवाग	झे स्टेन गो पार्नेल	९	१५	११	१	०
एसआर तेंडुलकर	नाबाद	२००	२२६	१४७	२५	३
केडी कार्तिक	झे गिब्ज गो पार्नेल	७९	१२४	८५	४	३
वायके पठाण*	झे डिव्हिलियर्स गो व्हॅन डेर मर्व्ह	३६	४७	२३	४	२
एमएस धोनी	नाबाद	६८	३७	३५	७	४
व्ही कोहली						
एसके रैना						
आरए जडेजा						
पी कुमार						
ए नेहरा						
एस श्रीशांत						
अवांतर	(लेगबाइज ३, वाइड ५, नो बॉल १)	९				
एकूण	(३ गडी बाद) (५० षटकं)	**४०१**				

दक्षिण आफ्रिका

दक्षिण आफ्रिका		धावा	खेळलेले चेंडू	धावा चेंडू	काढलेले चौकार	षटकार
एचएम अमला	झे नेहरा गो श्रीशांत	३४	४१	२२	७	०
एचएम गिब्ज	गो कुमार	७	१२	८	१	०
आरई व्हॅन डेर मर्व्ह	झे रैना गो श्रीशांत	१२	१६	११	१	१
जेएस कॅलिस*	गो नेहरा	११	२८	१३	२	०
एबी डिव्हिलियर्स	नाबाद	११४	१५४	१०१	१३	२
एएम पीटरसन	गो जडेजा	९	१८	१६	१	०
जेपी ड्युमिना	पायचीत गो पठाण	०	२	१	०	०
एमव्ही बाउचर	पायचीत गो पठाण	१४	२९	३१	१	०
डब्ल्यूडी पार्नेल	गो नेहरा	१८	५३	४३	१	०
डीडब्ल्यू स्टेन	गो श्रीशांत	०	६	४	०	०
सीके लँगवेल्ट	झे नेहरा गो जडेजा	१२	२४	११	३	०
अवांतर	(लेगबाइज ५, वाइड ८, नोबॉल ४)	१७				
एकूण	(४२.५ षटकं)	**२४८**				

दक्षिण आफ्रिका

	षटकं	निर्धाव	धावा	बळी	
स्टेन	१०	०	८९	०	(१ नो बॉल)
पार्नेल	१०	०	९५	२	(२ वाइड)
व्हॅन डेर मर्व्ह	१०	०	६२	१	(१ वाइड)
लँगवेल्ट	१०	०	७०	०	(२ वाइड)
ड्युमिनी	५	०	३८	०	
कॅलिस	५	०	४४	०	(१ वाइड)

भारत

	षटकं	निर्धाव	धावा	बळी	
कुमार	५	०	३१	१	
नेहरा	८	०	६०	२	(४ वाइड)
श्रीशांत	७	०	४९	३	(३ नो बॉल)
जडेजा	८.५	०	४१	२	(१ नो बॉल, २ वाइड)
पठाण	९	१	३७	२	
सेहवाग	५	०	२५	०	(२ वाइड)

विकेट पडण्याचा क्रम

	भारत		दक्षिण आफ्रिका	
पहिली	२५	(१)	१७	(२)
दुसरी	२१९	(३)	४७	(३)
तिसरी	३००	(४)	६१	(१)
चौथी			८३	(४)
पाचवी			१०२	(६)
सहावी			१०३	(७)
सातवी			१३४	(८)
आठवी			२११	(९)
नववी			२१६	(१०)
दहावी			२४८	(११)

सामनावीर : एसआर तेंडुलकर

भारत १५३ धावांनी विजयी

हॉटेलमध्ये परतलो तेव्हा माझ्या गात्रात त्राणच शिल्लक राहिलेलं नव्हतं, पण आनंदाच्या त्या उत्कट अवस्थेत मला झोपही येईना. मी सहज मोबाइल हातात घेतला. त्यावर अभिनंदनाचे असंख्य संदेश आले होते. माझे पुढचे दोन तास उत्तरं पाठवण्यातच गेले. ते काम पुरं करायला मला त्यानंतर आणखी दोन दिवस लागले. तरीही दुसऱ्या दिवशी सकाळी मी लवकर उठलो. झोप अपूर्ण झाल्याची मला जराही खंत नव्हती. माझ्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील एका जबरदस्त हंगामानंतर मी तृप्त मनाने विश्रांती घेण्यासाठी घरी निघालो होतो.

ग्वाल्हेरमध्ये त्या रात्री मला झोप न येण्याचं आणखीही एक कारण होतं. त्याची कबुली मला द्यावीच लागेल. हॉटेलच्या व्यवस्थापकांनी धोनीला व मला राहण्यासाठी मोठ्या खोल्यांचा एकेक अतिप्रशस्त स्वीट दिला होता. आमचे दोन्ही स्वीट्स इतर खोल्यांपासून खूपच दूर होतं. माझा स्वीट तर खूपच मोठा होता. त्यात एक खाजगी स्विमिंग पूलही होता. बाथरूमचा आकार प्रचंड होता. मुख्य खोली व बाथरूम यांमध्ये एक काचेचा दरवाजा होता. स्वीटच्या बाहेर महाकाय वृक्ष होते. रात्री वाऱ्याच्या झुळकेबरोबर सिल्कचे पडदे विचित्र आवाज करत फडफडत राहायचे. त्या अतिभव्य स्वीटमध्ये मला मुळीच करमत नव्हतं. बाहेरचा मिट्ट काळोख, खोल्यांचा प्रचंड आकार, भोवतालची अपरिचित दृश्यं आणि अंगावर शहारे आणणाऱ्या आवाजांनी मी कमालीचा अस्वस्थ होऊन गेलो. अखेर रात्रभर मी बाथरूममधले दिवे जळत ठेवून झोपण्याचा प्रयत्न केला.

आस्ट्रेलियाचा भारत दौरा, ऑक्टोबर, २०१०

आस्ट्रेलियाविरुद्ध दोन कसोटी सामन्यांची मालिका खेळून आम्ही २०१०-२०११च्या हंगामाला सुरुवात केली. ऑक्टोबरच्या सुरुवातीला पहिली कसोटी मोहालीला होती. त्या कसोटीवर व्हीव्हीएस लक्ष्मणची पूर्ण छाप पडली. आपल्या संघासाठी लक्ष्मण एक सर्वोत्कृष्ट इनिंग्ज खेळला. जिंकण्यासाठी आमच्यासमोर २१६ धावांचं लक्ष्य होतं; पण आम्ही आठवी विकेट गमावली तेव्हा आम्हाला अजून ९२ धावांची गरज होती. पाठदुखीने त्रस्त असलेला लक्ष्मण हाच केवळ आमच्या आशेचा एकमेव किरण होता. त्यानेही सर्व कौशल्य पणाला लावून त्या डावात फलंदाजी केली. भारताला विजय मिळवून द्यायचा, या ध्यासाने तो जणू झपाटून गेला होता. इशांत शर्मानेही त्या डावात कमालीची हिंमत दाखवली. त्याने काढलेल्या जिगरबाज ३१ धावांची लक्ष्मणला मोलाची साथ मिळाली. विजयासाठी ११ धावा बाकी असताना इशांत शर्मा बाद झाला. परंतु लक्ष्मणने संयमाने फलंदाजी करत संघाला पैलतीरावर पोचवलं. भारताने तो सामना एक गडी राखून जिंकला. लक्ष्मणने त्याच्या कारकिर्दीत आस्ट्रेलियन गोलंदाजीचा कायमच यथेच्छ समाचार घेतलेला आहे. याही वेळी आस्ट्रेलियन गोलंदाजांनी त्याला बाद करण्याची शर्थ केली; पण त्यांचे सर्व प्रयत्न व्यर्थ ठरले. लक्ष्मणच्या फलंदाजीचं वैशिष्ट्य म्हणजे तो प्रत्येक चेंडूवर दोन वेगळ्या प्रकारचे शॉट्स मारू शकत असे. फारच मोजक्या फलंदाजांपाशी हे कौशल्य असतं. आपली लवचीक मनगटं हव्या त्या बाजूला फिरवत तो चौफेर फटकेबाजी करत असे. लक्ष्मणबरोबर फलंदाजी करताना त्याच्या त्या नेत्रदीपक फलंदाजीचा आनंद मी अनेकदा लुटला आहे.

मोहालीला आस्ट्रेलियावर विजय मिळवल्यामुळे आम्ही बॉर्डर-गावसकर करंडक आमच्याकडे राखला होता. ९ ऑक्टोबरला दुसरा व मालिकेतला अखेरचा कसोटी सामना खेळण्यासाठी आम्ही बंगळुरूमध्ये दाखल झालो. चिन्नास्वामी मैदानावर आस्ट्रेलियाने दमदार फलंदाजी करत पहिल्या डावात ४७८ धावा केल्या. कारकिर्दीतील सर्वोत्कृष्ट इनिंग्ज खेळत मार्कस नॉर्थने त्या डावात १२८ धावा काढल्या. आम्ही आस्ट्रेलियाला चोख उत्तर दिलं. सुरुवातीपासून माझ्या बॅटमधून सहज धावा निघत होत्या. दुसऱ्या दिवशीचा खेळ संपला तेव्हा मी ४४ धावांवर नाबाद होतो. तिसरा पूर्ण दिवस मी मैदानावर होतो. दिवसअखेर माझ्या नाबाद १९१ धावा झाल्या होत्या. नॅथन हॉरित्झला लागोपाठ दोन षटकार ठोकत मी माझं ४९वं कसोटी शतक पूर्ण केलं. त्या वर्षातलं ते माझं सहावं शतक होतं. त्याबरोबरच वर्षभरात माझ्या एक हजार धावाही झाल्या होत्या. असा विक्रम त्यापूर्वी मी पाच वेळा केला होता.

अखेर, मी २१४ धावा काढून बाद झालो. मुरली विजयने काढलेल्या १३९ धावांमुळे आम्ही आस्ट्रेलियावर सात

धावांची आघाडी घेतली. दुसऱ्या डावात आमच्या गोलंदाजांनी आस्ट्रेलियाला केवळ २२३ धावांत गुंडाळलं. २०७ धावांचं लक्ष्य पूर्ण करून मालिकेत २-० विजय मिळवण्याची आमच्यासमोर संधी होती. संघाला विजय मिळवून द्यायचा मान मला मिळाला. तरुण फलंदाज चेतेश्वर पुजाराच्या साथीने मी ते लक्ष्य पूर्ण केलं. पदार्पणाच्या कसोटीतच पुजारा आत्मविश्वासाने खेळला. तिसऱ्या क्रमांकावर येत त्याने ७२ धावा काढल्या. भारतीय संघातील तिसऱ्या क्रमांकाच्या जागेवर आता त्याने स्वत:चा हक्क प्रस्थापित केला आहे. कसोटी क्रिकेटमध्ये त्याला उज्ज्वल भवितव्य आहे, याची मला खातरी वाटते.

अनावश्यक गोंधळ

त्यानंतर नोव्हेंबर, २०१०मध्ये तीन कसोटी सामन्यांची मालिका खेळण्यासाठी न्यूझीलंडचा संघ भारतात आला. आम्ही ती मालिका १-० जिंकली. पण माझ्या बॅटमधून बरसणाऱ्या धावांचा ओघ मात्र आटू लागला. माझ्या ५०व्या कसोटी शतकाची चर्चा सर्वत्र सुरू झाली होती. मात्र त्याचमुळे मी फलंदाजीवर लक्ष एकाग्र करू शकत नव्हतो. प्रेक्षक मला नको तितकं प्रोत्साहन देत होते. हैदराबादच्या दुसऱ्या कसोटीत तर मी फलंदाजी करत असतानाही लोक हातवारे करत माझं लक्ष वेधून घेत होते. प्रत्येक चेंडू खेळून झाल्यावर स्क्वेअर लेग अंपायरच्या दिशेने थोडं चालत जाण्याची मला सवय होती; पण स्क्वेअर लेगला जाऊन माझं लक्ष सहज प्रेक्षकांकडे गेलं की ते उभे राहून जोरजोरात ओरडायला सुरुवात करत. त्यामुळे मी अस्वस्थ होऊ लागलो होतो. त्यांचा हेतू चांगला होता हे मलाही समजत होतं. पण मी मनातल्या मनात म्हणायचो, ''हे लोक मला शांतपणे बॅटिंग का करू देत नाहीत?'' त्यानंतर थोड्याच वेळात मी बाद झालो.

जेव्हा तुम्ही चांगली फलंदाजी करत असता, तेव्हा प्रेक्षकांच्या प्रोत्साहनाने तुम्हाला प्रेरणा मिळते; पण जेव्हा चांगल्या फलंदाजीसाठी तुमचा स्वत:शीच संघर्ष सुरू असतो, तेव्हा तेच प्रोत्साहन तुमच्या मार्गात अडथळा आणू लागतं. हैदराबादची कसोटी संपल्यावर मी गॅरी व पॅडीला म्हटलंही, ''मी दक्षिण आफ्रिकेच्या दौऱ्याची आतुरतेने वाट पाहतो आहे. कारण तिथले प्रेक्षक तरी मला असं भंडावून सोडणार नाहीत.''

२० नोव्हेंबरला नागपूरमध्ये तिसरी कसोटी सुरू झाली. ५०व्या शतकाचा अडथळा पार करायची त्या सामन्यात मला संधी होती. त्या कसोटीत आम्ही एकदाच फलंदाजी केली. दुसऱ्या दिवसाचा खेळ संपला तेव्हा मी नाबाद ५७ धावांवर खेळत होतो. तिसऱ्या दिवशी मी आत्मविश्वासाने मैदानावर उतरलो; पण फक्त चार धावा काढून मी बाद झालो. डावखुरा शीघ्रगती गोलंदाज अँडी मकायच्या एका चेंडूवर मी यष्टिरक्षकाच्या हातात झेल देत माझी विकेट गमावली. गुडलेंथ टप्प्यावर तो चेंडू अचानक वर उसळला होता. सकाळच्या सत्रात पडलेला तो एकमेव उत्कृष्ट चेंडू होता.

भारताचा दक्षिण आफ्रिका दौरा, डिसेंबर, २०१० ते जानेवारी, २०११

दक्षिण आफ्रिकेच्या संघाबरोबर दक्षिण आफ्रिकेत जाऊन खेळणं हे नेहमीच अवघड प्रकरण असतं. वेगवान खेळपट्ट्या, उत्कृष्ट गोलंदाज आणि दर्जेदार फलंदाज यांमुळे मजबूत व अभेद्य बनलेल्या दक्षिण आफ्रिकेच्या संघाला टक्कर देणं, मोठं कठीण काम असतं.

१६ डिसेंबरला सेंच्युरियन पार्कच्या मैदानावरच्या पहिल्या कसोटीत आमची सुरुवातच अत्यंत निराशाजनक झाली. अवघ्या १३६ धावांत आमचा पहिला डाव आटोपला. मॉर्ने मॉर्केलने पाच गडी बाद केले. त्या परिस्थितीतून सावरणं आम्हाला अशक्य होतं. मीच सर्वाधिक ३६ धावा काढल्या. माझा जम बसत असतानाच डेल स्टेनच्या अचानक वेगाने आत आलेल्या चेंडूवर मी पायचीत झालो. त्यानंतर दक्षिण आफ्रिकेने धावांचा डोंगर रचला. जॅक कॅलिसने द्विशतक झळकवलं. अमला व डिव्हिलियर्स या दोघांचीही शतकं झाली. पराभव टाळण्यासाठी आम्हाला अडीच दिवस मैदानावर तळ ठोकावा लागणार होता.

दुसऱ्या डावात आम्ही निदान बऱ्यापैकी लढत तरी देऊ शकलो. धोनीची व माझी जोडी जमली. आम्ही आक्रमक फलंदाजी करत १७२ धावांची भागीदारी केली. दरम्यान माझं ५०वं कसोटी शतक पूर्ण झाल्याने मी एकाच वेळी समाधानाचा

आणि सुटकेचा नि:श्वास सोडला. आमच्या भागीदारीमुळे दक्षिण आफ्रिकेचे गोलंदाज हताश होऊ लागले होते. चौथ्या दिवसाच्या अखेरीस स्टेन व माझ्यात थोडे खटकेबाज संवाद रंगले. प्रकाश अंधूक होऊ लागताच ग्रॅमी स्मिथने अखेरच्या झंझावातासाठी डेल स्टेनच्या हातात चेंडू सोपवला. स्टेनही तुफानी वेगात गोलंदाजी करू लागला. ताशी १५० कि.मी.पेक्षा अधिक वेगाने एक चेंडू टाकल्यावर तो मला खवचटपणे म्हणाला, ''मी काही फारशा वेगात तुला गोलंदाजी करत नाहीये!'' मीही त्यावर उत्तर देत त्याला म्हटलं, ''दुपारी सूर्य डोक्यावर असताना तू हे धैर्य का दाखवलं नाहीस?'' प्रामाणिकपणे सांगायचं तर अशा खेळकर थट्टामस्करीतून मला चांगली फलंदाजी करण्याची प्रेरणाच मिळत असते. शिवराळ शेरेबाजीला मी कायमच विरोध केला आहे; पण क्रिकेटच्या मैदानावर थोडी हलकीफुलकी मस्करी होणं, यात काहीच वाईट नाही. उलट अनेकदा तर मॅचमध्ये निर्माण झालेला तणाव त्यामुळे निवळू शकतो. फक्त मस्करीची कुस्करी होणार नाही, याची मात्र काळजी घ्यायला हवी.

चौथ्या दिवसअखेर आम्ही आठ विकेट्स गमावल्या होत्या. पाचव्या दिवशी दक्षिण आफ्रिकेने १० गडी राखून आमच्यावर आरामात विजय मिळवला. बॉक्सिग डेला सुरू होणाऱ्या कसोटीसाठी आम्ही डर्बनला पोचलो तेव्हा आमच्यासमोर उभ्या असलेल्या कठीण आव्हानाची आम्हाला पूर्ण कल्पना होती. मात्र सेंच्युरियनच्या दुसऱ्या डावात सुधारलेल्या फलंदाजीच्या कामगिरीमुळे आमचं मनोधैर्य उंचावलं होतं. डर्बनमध्ये पाऊल ठेवताना निदान तिथल्या वातावरणाशी जुळवून घेतल्याचा विश्वास आमच्या मनात नक्कीच निर्माण झाला होता.

बॉक्सिंग डे कसोटी सामन्याची सुरुवात काहीशा विचित्रपणे झाली, असंच खेदाने म्हणावं लागेल. पहिल्या दिवशी सकाळी रिमझिम पाऊस पडत होता. तरीही खेळपट्टी मात्र आच्छादलेली नव्हती. समालोचकांनी खेळपट्टीच्या अंदाजाचं भाष्यही पावसात उभं राहूनच केलं होतं. संघातील माझ्या एका सहकाऱ्याने ही गोष्ट माझ्या निदर्शनाला आणून दिली. दक्षिण आफ्रिकेचे गोलंदाज ओलसर खेळपट्टीचा नक्कीच फायदा उठवू शकणार होते. अशा गोष्टींमुळे लक्ष जराही विचलित होऊ देऊ नका, असं मी माझ्या सहकाऱ्यांना त्या वेळी बजावल्याचं मला आठवतं. माझ्या मते या गोष्टींचा अखेरीस दोन्ही संघांना समान फायदा-तोटा होतो.

भारत विरुद्ध ऑस्ट्रेलिया

(दुसरी कसोटी)

चिन्नास्वामी स्टेडियम, बंगळुरू, ९ ते १३ ऑक्टोबर, २०१०

पंच : बीएफ बाउडन व आयजे गोल्ड (टीव्ही पंच : एएम साहेबा)
निरिक्षक : बीसी ब्रॉड
नाणेफेक : ऑस्ट्रेलिया

ऑस्ट्रेलिया

एसआर वॅटसन	झे धोनी गो ओझा	५७	पायचीत गो ओझा	३२
एसएम कॅटिच	झे द्रविड गो हरभजन	४३	झे धोनी गो हरभजन	२४
आरटी पॉंटिंग*	पायचीत गो रैना	७७	पायचीत गो खान	७२
एमजे क्लार्क	झे रैना गो हरभजन	१४	यष्टिचीत धोनी गो ओझा	३
एमईके हसी	झे सेहवाग गो खान	३४	पायचीत गो ओझा	२०
एमजे नॉर्थ	झे श्रीशांत गो हरभजन	१२८	गो हरभजन	३
टीडी पेन	यष्टिचीत धोनी गो ओझा	५९	झे धोनी गो श्रीशांत	२३
एमजी जॉन्सन	पायचीत गो ओझा	०	गो खान	११
एनएम हॉरित्झ	धावबाद (पुजारा)	१७	नाबाद	२१
व्हीडब्ल्यू हायल्फेनहॉस	नाबाद	१६	गो श्रीशांत	०
पीआर जॉर्ज	यष्टिचीत धोनी गो हरभजन	२	झे धोनी गो खान	०
अवांतर	(बा९,लेबा१२,वा१,नोबॉल २)	३१	(बा१,लेबा५,वा३,नोबॉल५)	१४
एकूण	(१४१ षटकं)	**४७८**	(७५.२ षटकं)	**२३३**

भारत

एम विजय	झे पेन गो जॉन्सन	१३९	पायचीत गो वॅटसन	३७
व्ही सेहवाग	झे जॉन्सन गो हायल्फेनहॉस	३०	झे पेन गो हायल्फेनहॉस	७
आरएस द्रविड	झे नॉर्थ गो जॉन्सन	१	(५) नाबाद	२१
एसआर तेंडुलकर	गो जॉर्ज	२१४	नाबाद	५३
सीए पुजारा	पायचीत गो जॉन्सन	४	(३) गो हॉरित्झ	७२
एसके रैना	झे हायल्फेनहॉस गो क्लार्क	३२		
एमएस धोनी*	झे क्लार्क गो हॉरित्झ	३०		
हरभजन सिंग	झे पॉंटिंग गो वॅटसन	४		
झहीर खान	झे क्लार्क गोजॉर्ज	१		
पीपी ओझा	नाबाद	०		
एस श्रीशांत	पायचीत गो हॉरित्झ	०		
अवांतर	(बा६, लेबा२६, वाइड ८)	४०	(बा८, लेबा५, वाइड ४)	१७
एकूण	(१४४.५ षटकं)	**४९५**	(३ गडी बाद) (४५ षटकं)	**२०७**

भारत	षटकं	निर्धाव	धावा	बळी	षटकं	निर्धाव	धावा	बळी
खान	२३	५	८४	१	११.२	१	४१	३
श्रीशांत	२१	१	७९	०	१४	२	४८	२
ओझा	४२	७	१२०	३	२५	५	५७	३
हरभजन	४३	३	१४८	४	२१	२	६३	२
सेहवाग	४	१	७	०	४	०	८	०
रैना	८	१	१९	१				

ऑस्ट्रेलिया	षटकं	निर्धाव	धावा	बळी	षटकं	निर्धाव	धावा	बळी
हायल्फेनहॉस	३१	६	७७	१	७	०	२७	१
जॉन्सन	२८	२	१०५	३	१४	४	४२	०
जॉर्ज	२१	३	४८	२ (४)	७	०	२९	०
हॉरित्झ	३९.५	४	१५३	२ (३)	१२	०	७६	१
क्लार्क	८	०	२७	१				
वॅटसन	१२	२	३५	१ (५)	५	०	२०	१
कॅटिच	५	०	१८	०				

गडी बाद होण्याचा क्रम

	ऑस्ट्रेलिया	भारत	ऑस्ट्रेलिया	भारत
पहिला	९९	३७	५८	१७
दुसरा	११३	३८	५८	८९
तिसरा	१३२	३४६	६५	१४६
चवथा	१९८	३५०	१२६	-
पाचवा	२५६	४११	१३१	-
सहावा	४०५	४८६	१८१	-
सातवा	४१५	४९१	१८५	-
आठवा	४५८	४९४	२१७	-
नववा	४५९	४९५	२१८	-
दहावा	४७८	४९५	२२३	-

दिवसअखेर

दिवस १: ऑस्ट्रेलिया (१) २८५-५ (नॉर्थ ४३*, पेन ८*, ८५.५ षटकं)
दिवस २: भारत (१) १२८-२ (विजय ४२*, तेंडुलकर ४४*, ३४.२ षटकं)
दिवस ३: भारत (१) ४३५-५ (तेंडुलकर १९१*, धोनी ११*, १२२ षटकं)
दिवस ४: ऑस्ट्रेलिया (२) २०२-७ (जॉन्सन ७*, हॉरित्झ ८*, ६५ षटकं)

सामनावीर : एसआर तेंडुलकर

भारत ७ गडी राखून विजयी

२००३च्या डिसेंबरमध्ये मेलबोर्नला घडलेली एक घटना इथे मला सांगावीशी वाटते. कसोटी सामन्याच्या शेवटच्या दिवशी आस्ट्रेलियाला विजयासाठी ९७ धावांची गरज होती. त्या दिवशी हवामान अनुकूल असूनही खेळ सुरू व्हायला उशीर झाला होता. कारण मैदानाची निगा राखणाऱ्या कर्मचाऱ्यांनी नियमांचा भंग करत खेळपट्टीत फेरबदल केले होते. चौथ्या दिवशी संध्याकाळी खेळपट्टीवर एका ठिकाणी मोठी भेग पडली होती. त्या भेगेवर पडणारा चेंडू खेळताना फलंदाजांची नक्कीच तारांबळ उडणार होती. आश्चर्य म्हणजे पाचव्या दिवसाचा खेळ सुरू होण्याआधी ती भेग बुजवली गेली. पंचांच्या ती गोष्ट सहज ध्यानात आली. कारण भेग बुजवलेला भाग अजून पूर्ण सुकलेला नव्हता. शिवाय बाकीच्या खेळपट्टीपेक्षा तिथला वेगळा रंगही चटकन उठून दिसत होता. चिडलेल्या पंचांनी खेळपट्टी पूर्वस्थितीला आणण्याचा आदेश कर्मचाऱ्यांना दिला.

डर्बनमध्ये दोन्ही संघांच्या फारशा धावा होऊ शकल्या नाहीत; पण सामन्याची रंगत मात्र क्षणोक्षणी वाढतच गेली. पहिल्या डावात आम्ही फक्त २०५ धावा करू शकलो. त्यानंतर क्षेत्ररक्षकांनीही अवघड झेल टिपत गोलंदाजांना उत्तम साथ दिली. भज्जीच्या गोलंदाजीवर राहुलने एक अप्रतिम झेल घेतला. मी पाहिलेला राहुलचा तो एक सर्वोत्कृष्ट झेल होता. राहुलने आपल्या डाव्या बाजूला अंग झोकून देत यष्टिरक्षकाच्या मागे जाऊन झेल घेतला. राहुलचा तो २००वा झेल होता. सामन्याचं पारडं हळूहळू आमच्या बाजूला फिरतं आहे, हे आम्हाला जाणवत होतं. त्यामुळे विकेट मिळाल्याचा आनंद आम्ही अधिक उत्साहात साजरा केला.

आमच्या दुसऱ्या डावात पुन्हा व्हीव्हीएस लक्ष्मणच्या अप्रतिम फलंदाजीमुळेच आम्ही अडचणीच्या स्थितीतून बाहेर येऊ शकलो. त्या इनिंग्जमध्ये त्याने काढलेल्या ९६ धावा त्याच्या फलंदाजीच्या उच्च दर्जाची साक्ष देत होत्या. लक्ष्मणमुळेच आम्हाला ३००हून अधिक धावांची आघाडी मिळाली. त्याच्या कारकिर्दीच्या अखेरीस त्याने एका विशेष कौशल्यावर प्रभुत्व मिळवलं होतं. तळाच्या फलंदाजांना सोबत घेऊन तो प्रतिस्पर्धी संघाला पार जेरीस आणत असे. परिस्थिती कितीही आणीबाणीची असली, तरी तो न गोंधळता शांतपणे खेळत असे. त्यामुळे समोरच्या फलंदाजाचाही हुरूप वाढत असे.

सामना जिंकून मालिकेत बरोबरी साधण्याची जबाबदारी आता झहीर, इशांत, श्रीशांत व भज्जीवर होती. चौघांनीही ती जबाबदारी अतिशय झोकात पार पाडली. दक्षिण आफ्रिकेचा एकही फलंदाज स्थिरावू शकला नाही. काही काही चेंडूंवर तर त्यांना खेळणंच अशक्य होऊन गेलं. श्रीशांतचा एक आखूड टप्प्याचा चेंडू अचानक इतका उसळला की, कॅलिससारखा फलंदाजही त्याच्यासमोर हतबल झाला. माझ्या मते सामन्यातला तो सर्वोत्तम चेंडू होता. झहीरने त्या सामन्यात सहा बळी घेतले. संघाच्या गोलंदाजीची धुरा आपण समर्थपणे वाहू शकतो हे त्याने पुन्हा एकदा सिद्ध केलं. तो विजय नक्कीच थक्क करणारा होता. परदेशात भारतीय संघाने केलेली ती एक सर्वोत्कृष्ट कामगिरी होती.

शेवटच्या कसोटी सामन्याच्या आधी ३० डिसेंबरला अंजली, मुलं आणि माझे जिवलग मित्र विवेक व सोनिया पालकर केप टाउनला येऊन पोचल्याने मी अतिशय आनंदी मूडमध्ये होतो. डर्बनचा विजय आणि सरत्या वर्षाची शेवटून दुसरी रात्र आम्ही ‘कोस्तान्चा अतेसिक’ या अत्यंत नयनरम्य ठिकाणी साजरी केली. त्या विस्तीर्ण परिसरात भव्य क्रिकेटचं मैदान, एक उत्कृष्ट रेस्टॉरंट आणि प्रचंड मोठा द्राक्षांचा मळा होता. तिथे जाण्यासाठी मी खूपच उत्सुक होतो. १९९९च्या आस्ट्रेलिया भेटीनंतर मला रेड वाइनमध्ये खास रुची निर्माण झाली होती. त्याविषयी मला तिथे अधिक माहिती मिळवायची होती. ३१ डिसेंबरला टेबल माउंटनच्या पायथ्याशी असलेल्या एका आलिशान हॉटेलमध्ये भारतीय संघाचं आगमन झालं. आदल्या दिवशी सुरू झालेली पार्टी ३१ डिसेंबरच्या रात्रीपर्यंत रंगत गेली.

२ जानेवारी, २०११ला केप टाउनमध्ये तिसऱ्या व निर्णायक कसोटी सामन्याला सुरुवात झाली. दक्षिण आफ्रिकेची पहिली फलंदाजी होती. त्या सामन्यामध्ये सिम बोलर्सना खूपच मदत मिळत होती. चेंडू कसा येईल, याचा अंदाजच येत नसल्यामुळे फलंदाजी करणं खूपच अवघड जात होतं. डावखुऱ्या झहीरची स्विंग गोलंदाजी खेळताना दक्षिण आफ्रिकेचा कर्णधार ग्रॅमी स्मिथची तारांबळ उडते आहे, हे आमच्या लक्षात आलं होतं. झहीरचा एक चेंडू स्मिथने मिड विकेटला टोलवला. दोन धावा आरामात मिळू शकत असतानाही त्याने जेव्हा फक्त एकच धाव घेतली तेव्हा ती गोष्ट अधिकच स्पष्ट झाली. स्मिथने दुसरी धाव घ्यावी म्हणून भज्जीने चेंडू पकडायला मुद्दाम उशीरही लावला होता. झहीरची गोलंदाजी खेळायला

तो कचरतो आहे, हे समजताच आम्ही त्याच्यावर भरपूर दबाव आणायला सुरुवात केली. कॅलिसने मात्र पुन्हा एकदा सुरेख फलंदाजी करत १६१ धावा काढल्या. कॅलिसमुळेच दक्षिण आफ्रिका ३६२ धावसंख्येपर्यंत पोचू शकली.

दुसऱ्या दिवसाच्या अखेरच्या सत्रात मी फलंदाजीसाठी मैदानात उतरलो. खेळपट्टीवर स्थिरावायला मला फारसा वेळ लागला नाही. त्यानंतर डेल स्टेनचा मधल्या व उजव्या यष्टीवर येणारा एक चेंडू मी किंचित पुढे जात मिड विकेटच्या दिशेने टोलवला. तो शॉट मारताना, बॅट स्विंग, शॉटची लय, शरीराची स्थिती, पावलांची हालचाल सारंच इतकं जमून आलं, की तो चेंडू सहज सीमारेषेपार गेला. ही इनिंग्ज खेळायला मजा येणार, हे त्याचक्षणी मला जाणवलं होतं.

दुसऱ्या दिवशी सकाळी मी नाबाद ४९ धावांवरून फलंदाजी सुरू केली. सकाळच्या सत्रात फलंदाजी करणं थोडं अवघड जाणार याचा अंदाज मला होताच. माझ्या साथीला गौतम गंभीर होता. जगातील दोन सर्वोत्कृष्ट द्रुतगती गोलंदाज – डेल स्टेन व मॉर्ने मॉर्केल यांचा आम्हाला सामना करायचा होता. खेळपट्टी आणि हवामानही गोलंदाजांनाच साथ देत होतं. चेंडू अधिक स्विंग न होऊ देण्यासाठी मी मुद्दाम क्रीझच्या बाहेर उभा राहिलो. क्रीझच्या बाहेर उभं राहायचं मी विचारपूर्वक ठरवलं होतं. चेंडू खेळताना मी चकलो असतो तरी तो चेंडू नक्कीच स्टम्प्सच्या वरून गेला असता. खोल टप्प्याचा चेंडू खेळताना जर चेंडू हुकला असता तरच माझा त्रिफळा उडाला असता; पण तसं होण्याची शक्यता फारच कमी होती. दक्षिण आफ्रिकेच्या गोलंदाजांनी जर मला आखूड टप्प्याचे चेंडू टाकले असते, तर स्लिपमधील क्षेत्ररक्षकांच्या डोक्यावरून मी अप्पर कट मारणार होतो.

सुरुवातीचा एक तास मी डेल स्टेनची व गौतमने मॉर्ने मॉर्केलची गोलंदाजी खेळून काढली. पहिल्या १० षटकांत आम्ही बरेच चौकार मारले. ज्या ज्या वेळी चेंडू बॅटवर यायचा, त्या त्या वेळी आम्ही हमखास चौकार वसूल करायचो. दक्षिण आफ्रिकेने आक्रमक क्षेत्ररचना केल्यामुळे चेंडू सहज सीमापार जात होता. उपाहारासाठी खेळ थांबला तेव्हा मी ९४ धावांवर नाबाद होतो. मी जर शतक पूर्ण करू शकलो तर ते माझं एक उत्कृष्ट शतक ठरेल यात काही शंकाच नव्हती. नवीन चेंडू घेऊन फक्त दोनच षटकं झाली होती. त्यामुळे बॅटिंग करणं सोपं जाणार नाही, याचीही मला जाणीव होती.

क्रीझबाहेर उभं राहण्याचे माझे डावपेच यशस्वी ठरले होते. उपाहारानंतर मी एक चेंडू खेळताना मात्र क्रीझच्या आतमध्ये उभा राहिलो. मॉर्ने मॉर्केलच्या पहिल्या षटकातला तो पाचवा चेंडू होता. मॉर्केल आखूड टप्प्याचा चेंडू टाकणार याची माझ्या अंतर्मनाला जणू पूर्वसूचना मिळाली होती. म्हणूनच मी हुकचा शॉट खेळण्याच्या तयारीने क्रीझच्या आत येऊन थांबलो होतो. माझा अंदाज खरा ठरला. मॉर्केलचा चेंडू माझ्या छातीपर्यंत वर उसळला. चेंडू बॅटच्या वरच्या कडेला लागला तरी तो यष्टिरक्षकाच्या डोक्यावरून थेट प्रेक्षकात जाऊन पडला. त्या षटकाराने माझं ५१वं कसोटी शतक पूर्ण झालं. माझ्या कारकिर्दीतलं ते अखेरचं कसोटी शतक ठरलं.

आता मी जे काही सांगणार आहे, ते कदाचित कोणालाही विचित्र वाटण्याची शक्यता आहे; पण मॉर्केलने मला टाकलेला तो चेंडू पाच दिवसांपूर्वी मी स्वप्नात पहिला होता. मी स्वप्नात पाहिलेला चेंडूही बाउन्सरच होता आणि तो चेंडू हुक करून मी तसाच षटकारही मारला होता. मी शतक पूर्ण केलं तेव्हा माझ्या जोडीला धोनी होता. मी धोनीला म्हटलं, ''ये बॉल मेरे लाइफमें पहले भी आया है। मैं ये पहले देख चुका हूँ। आज ये दुसरी बार हो रहा है।'' मला नेमका तोच चेंडू खेळण्यासाठी क्रीझच्या आत उभं राहण्याची बुद्धी का व्हावी? कोण जाणे, त्या स्वप्नानेच मला तसं करण्यास उद्युक्त केलं असावं!

हरभजन माझ्या जोडीला आला तेव्हाही आमची स्थिती फारशी चांगली नव्हती. दक्षिण आफ्रिकेच्या धावसंख्येपेक्षा आम्ही १००हून अधिक धावांनी पिछाडीवर होतो. त्यांची धावसंख्या गाठण्यासाठी आम्हाला एका चांगल्या भागीदारीची गरज होती. हरभजनला स्टेनचे वेगात स्विंग होणारे चेंडू खेळणं अवघड जात होतं. भज्जीकडे फलंदाजी करण्याची क्षमता होती. त्याआधी न्यूझीलंडविरुद्ध झालेल्या मालिकेत त्याने लागोपाठ दोन सामन्यात शतकं ठोकली होती; पण दक्षिण आफ्रिकेतलं वातावरण त्याच्या फलंदाजीच्या पद्धतीला साजेसं नव्हतं.

'फलंदाजीचं तंत्र तात्पुरतं विसरून जा,' हे सांगण्यासाठी मी भज्जीच्या जवळ गेलो. त्याला म्हटलं, ''बॅट्समन की तरह बॅटिंग मत कर तू, टेक्निक भूल जा। अगर बॉल तेरे रेंजमें दिखी तो तू घुमा। क्यूँ की रन्स चाहिये हमें। कैसे भी हो, रन्स चाहिये।''

हरभजनने माझा सल्ला ऐकला आणि तो गोलंदाजीवर तुटून पडला. डावखुरा शीघ्रगती गोलंदाज लोन्वाबो सोत्सोबेला त्याने षटकार तर मॉर्ने मॉर्केलला चौकार मारला; पण डेल स्टेनला त्याने मारलेला शॉट सर्वोत्कृष्ट होता. स्टेनने टाकलेल्या खोल टप्प्याच्या चेंडूवर क्रीझमध्ये उभा राहूनच त्याने खणखणीत शॉट मारला. त्या फटक्यात ताकद इतकी होती की, चेंडू लाँग ऑनवरून स्टेडियममध्ये दहाव्या रांगेत बसलेल्या प्रेक्षकांपाशी जाऊन पडला. षटकार मारल्यावर भज्जी स्टेनकडे पाहून उपरोधिक हसला. त्यामुळे आधीच अपमानित झालेला स्टेन अधिकच चवताळला.

भज्जीच्या आक्रमक पवित्र्यामुळे ग्रॅमी स्मिथला क्षेत्ररक्षक मागे आणावे लागले. मी पुन्हा भज्जीपाशी गेलो. त्याला म्हणालो, ''आता तुला प्रत्येक चेंडूवर शॉट मारण्याची गरज नाही. चेंडू जवळपास ढकलून एकेरी धावा काढायला सुरुवात कर.'' आम्ही ७६ धावांची भागीदारी केली. भज्जी ४० धावा काढून बाद झाला तेव्हा आमची धावसंख्या ३२३ झाली होती. दक्षिण आफ्रिकेच्या धावसंख्येला आम्ही जवळजवळ गाठलंच होतं. अखेर आमचा डाव संपला तेव्हा आम्ही दोन धावांची आघाडी घेतली होती.

दक्षिण आफ्रिकेच्या दुसऱ्या डावातही आमच्या गोलंदाजांनी आम्हाला छान सुरुवात करून दिली. भज्जीने पहिले चार गडी बाद करत दक्षिण आफ्रिकेची ६४-४ अशी दाणादाण उडवून दिली. झहीरने एबी डिव्हिलियर्सला बाद केलं तेव्हा त्यांच्या संघाच्या फक्त ९८ धावा झाल्या होत्या. मालिकेत विजय मिळवण्याच्या आमच्या आशा आता खूपच वाढल्या होत्या. १३० धावसंख्येवर ॲशली प्रिन्स बाद झाला. अजून एक विकेट घेतल्यावर दक्षिण आफ्रिकेचे फक्त तळाचे फलंदाज उरणार होते; पण कॅलिस व बाउचरची जोडी जमली. चिवट भागीदारी करत त्यांनी सामना वाचवला. कॅलिसने तर बरगडी दुखावलेली असतानाही दमदार फलंदाजी करत मालिकेतलं दुसरं शतक झळकवलं. कॅलिसच्या शतकामुळे आमच्या हातून सामनाही निसटला आणि मालिका विजयाच्या आशाही संपुष्टात आल्या. सामना अनिर्णित राखण्यासाठी आम्हाला शेवटचा पूर्ण दिवस फलंदाजी करावी लागणार होती. आम्ही ते काम चोख पार पाडलं.

दक्षिण आफ्रिकेत मालिका जिंकण्याची सुवर्णसंधी आम्हाला मिळाली होती. ९८ धावांत निम्मा संघ गुंडाळल्यावर आम्हाला प्रतिस्पर्धी संघावर एक शेवटचा जोरदार हल्ला चढवणं आवश्यक होतं; पण त्याऐवजी आम्ही दक्षिण आफ्रिकेला आमच्या पकडीतून निसटू दिलं. भज्जीने सात विकेट्स घेतल्या, पण दुर्दैवाने त्याला द्रुतगती गोलंदाजांची हवी तशी साथ मिळू शकली नाही. दक्षिण आफ्रिकेत जाऊन मालिका बरोबरीत राखणं हीसुद्धा एरवी उत्तम कामगिरी म्हणून गणली गेली असती; पण आम्हाला केवळ उत्तम कामगिरी केल्याचा दिलासा नको होता. आम्हाला मालिकेत विजय मिळवल्याचा आनंद हवा होता.

वजनदार गोष्टी

कसोटी मालिकेनंतर एकदिवसीय सामन्यांची मालिका सुरू होणार होती. ती मालिका म्हणजे २०११ सालातल्या विश्वचषकाची पूर्वतयारीच होती. दुर्दैवाने मालिकेच्या सुरुवातीलाच मला हॅमस्ट्रिंगच्या दुखापतीमुळे निराश होऊन भारतात परतावं लागलं. परतण्यापूर्वी मी माझ्या सहकाऱ्यांना एक शपथ घ्यायला लावली. मी त्यांना म्हटलं, ''उपखंडात होणारी विश्वचषक स्पर्धा आता अगदी तोंडावर आली आहे. आपल्या सर्वांच्या आयुष्यातील ती अत्यंत महत्त्वाची स्पर्धा आहे. या स्पर्धेसाठी मी प्रत्येकाला एका गोष्टीचा त्याग करायला सांगणार आहे. प्रत्येकाने आपलं वजन कमीत कमी तीन किलोने घटवलं पाहिजे. आपला संघ हा स्पर्धेतला सर्वोत्तम तंदुरुस्त संघ दिसायला हवा.''

मी दिलेलं वचन पाळलं. माझं वजन ३.८ किलोंनी कमी झालं होतं. काही सहकाऱ्यांनीही प्रयत्नपूर्वक वजन घटवलं होतं. मी त्यासाठी भरपूर मेहनत घेतली होती. मी मुख्यत: माझ्या आहारावर नियंत्रण ठेवलं होतं. मुंबईला परतल्यावर मी फक्त सॅलड खाण्यावर पूर्ण भर दिला. मुंबई इंडियन्सचा फिजिओ पॅट्रिक फरहतच्या मार्गदर्शनाखाली मी प्रथम हॅमस्ट्रिंगच्या दुखापतीवर उपचार करून घेतले. शरीराचा वरचा भाग अधिक मजबूत बनवण्यासाठी मी नियमितपणे जिममध्ये जाऊ लागलो. विश्वचषक स्पर्धेला माझ्या जीवनात सर्वांत जास्त महत्त्व होतं. त्या एकाच चषकाने आजपर्यंत मला हुलकावणी दिली

होती; पण आता माझ्या स्वत:च्या देशात विश्वविजेता होण्याची अखेरची संधी मला लाभली होती. त्या संधीचं मला सोनं करायचं होतं.

भारताचा बांगलादेश दौरा, २०१०

पहिली कसोटी. चित्तगाँग – १७ ते २१ जानेवारी, २०१०

भारत २४३ (**एसआर तेंडुलकर** १०५*, व्ही सेहवाग ५२; एस अल-हसन ५-६२, एस हुसेन ५-७१) व ४१३ -८ घोषित (जी गंभीर ११६, व्हीव्हीएस लक्ष्मण ६९*, ए मिश्रा ५०, **एसआर तेंडुलकर** १६; महमुदल्ला २-५२)

बांगलादेश २४२ (महमदुल्ला ६९, एम रहीम ४४; झेड खान ३-५४, ए मिश्रा ३-६६) व ३०१ (एम रहीम १०१, टी इक्बाल ५२; ए मिश्रा ४-९२, आय शर्मा ३-४८)

भारत ११३ धावांनी विजयी

दुसरी कसोटी. ढाका – २४ ते २७ जानेवारी, २०१०

बांगलादेश २३३ (महमदुल्ला ९६*, एम अश्रफूल ३९; आय शर्मा ४-६६, झेड खान ३-६२) व ३१२ (टी इक्बाल १५१, जे सिद्दकी ५५, एस हुसेन ४०; झेड खान ७-८७)

भारत ५४४-८ घोषित (**एसआर तेंडुलकर** १४३, आर द्रविड १११, एमएस धोनी ८९, जी गंभीर ६८, व्ही सेहवाग ५६; एस इस्लाम ३-८६) व २-०

भारत १० गडी राखून विजयी

भारत मालिकेत २-० विजयी

दक्षिण आफ्रिकेचा भारत दौरा, २०१०

पहिली कसोटी. नागपूर – ६ ते ९ फेब्रुवारी, २०१०

दक्षिण आफ्रिका ५५८-६ घोषित (एचएम अमला २५३*, जेएस कॅलिस १७३, एबी डिव्हिलियर्स ५३; झेड खान ३-९६)

भारत २३३ (व्ही सेहवाग १०९, एस बद्रीनाथ ५६, **एसआर तेंडुलकर** ७; डीडब्ल्यू स्टेन ७-५१) व ३१९ (फॉलो-ऑन) (**एसआर तेंडुलकर** १००, एच सिंग ३९; डीडब्ल्यू स्टेन ३-५७, पीएल हॅरीस ३-७६)

दक्षिण आफ्रिका एक डाव व ६ धावांनी विजयी

दुसरी कसोटी. कोलकाता – १४ ते १८ फेब्रुवारी, २०१०

दक्षिण आफ्रिका २९६ (एचएम अमला ११४, एएन पीटरसन १००, झेड खान ४-९०, एच सिंग ३-६४) व २९० (एचएम अमला १२३*, एच सिंग ५-५९, ए मिश्रा ३-७८)

भारत ६४३-३ घोषित (व्ही सेहवाग १६५, व्हीव्हीएस लक्ष्मण १४३*, एमएस धोनी १३२*, **एसआर तेंडुलकर** १०६; एम मॉर्केल २-११५)

भारत एक डाव व ५७ धावांनी विजयी

मालिकेत १-१ बरोबरी

आस्ट्रेलियाचा भारत दौरा, २०१० – बॉर्डर-गावसकर करंडक

पहिली कसोटी. मोहाली – १ ते ५ ऑक्टोबर, २०१०

आस्ट्रेलिया ४२८ (एसआर वॅटसन १२६, टीडी पेन ९२, आरटी पाँटिंग ७१, एमजी जॉन्सन ४७; झेड खान ५-९४, एच

सिंग ३-११४) व १९२ (एसआर वॅटसन ५६; आय शर्मा ३-३४, झेड खान ३-४३)

भारत ४०५ (**एसआर तेंडुलकर** ९८, एसके रैना ८६, आर द्रविड ७७, व्ही सेहवाग ५९; एमजी जॉन्सन ५-६४) व २१६-९ (व्हीव्हीएस लक्ष्मण ७३*, **एसआर तेंडुलकर** ३८; बीडब्ल्यू हायल्फेनहॉस ४-५७, डीई बिोंलजर ३-३२)

भारत एक गडी राखून विजयी

दुसरी कसोटी. बंगळुरू – ९ ते १३ ऑक्टोबर, २०१०

आस्ट्रेलिया ४७८ (एमजे नॉर्थ १२८, आरटी पाँटिंग ७७, टीडी पेन ५९, एसआर वॅटसन ५७; एच सिंग ४-१४८, पीपी ओझा ३-१२०) व २२३ (आरटी पाँटिंग ७२; झेड खान ३-४१, पीपी ओझा ३-५७)

भारत ४९५ (**एसआर तेंडुलकर** २१४, एम विजय १३९; एमजी जॉन्सन ३-१०५) व २०७-३ (सीए पुजारा ७२, **एसआर तेंडुलकर** ५३)*

भारत ७ गडी राखून विजयी

भारत मालिकेत २-० विजयी

न्यूझीलंडचा भारत दौरा, २०१०

पहिली कसोटी. अहमदाबाद – ४ ते ८ नोव्हेंबर, २०१०

भारत ४८७ (व्ही सेहवाग १७३, आर द्रविड १०४, एच सिंग ६९, **एसआर तेंडुलकर** ४०; डीएल व्हेटोरी ४-११८, जेएस पटेल ३-१३५) व २६६ (एच सिंग ११५, व्हीव्हीएस लक्ष्मण ९१, **एसआर तेंडुलकर** १२; सीएस मार्टिन ५-६३, एलआरपीएल टेलर २-४)

न्यूझीलंड ४५९ (केएस विल्यमसन १३१, जेडी रायडर १०३, बीबी मॅकलम ६५, एलआरपीएल टेलर ५६; पीपी ओझा ४-१०७) व २२-१

सामना अनिर्णित

दुसरी कसोटी. हैदराबाद (डेक्कन) – १२ ते १६ नोव्हेंबर, २०१०

न्यूझीलंड ३५० (टीजी मॅकिंटॉश १०२, एमजे गुप्तिल ८५, जेडी रायडर ७०; झेड खान ४-६९, एच सिंग ४-७६) व ४४८-८ घोषित. (बीबी मॅकलम २२५, केएस विल्यमसन ६९, टीजी मॅकिंटॉश ४९; एस श्रीशांत ३-१२१) भारत ४७२ (एच सिंग १११*, व्ही सेहवाग ९६, व्हीव्हीएस लक्ष्मण ७४, जी गंभीर ५४, आर द्रविड ४५, **एसआर तेंडुलकर** १३; डीएल व्हेटोरी ५-१३५, टीजी साउथी ३-११९) व ६८-० (सेहवाग ५४)*

सामना अनिर्णित

तिसरी कसोटी. नागपूर – २० ते २३ नोव्हेंबर, २०१०

न्यूझीलंड १९३ (जेडी रायडर ५९, बीबी मॅकलम ४०; आय शर्मा ४-४३, पीपी ओझा ३-५७) व १७५ (टीजी साउथी ३१; आय शर्मा ३-१५, एच सिंग ३-५६)

भारत ५६६-८ घोषित (आर द्रविड १९१, एमएस धोनी ९८, जी गंभीर ७८, व्ही सेहवाग ७४, **एसआर तेंडुलकर** ६१; डीएल व्हेटोरी ३-१७८, सीएस मार्टिन २-८२)

भारत एक डाव व १९८ धावांनी विजयी

भारत मालिकेत १-० विजयी

भारताचा दक्षिण आफ्रिका दौरा, २०१०-११

पहिली कसोटी. सेंच्युरियन – १६ ते २० डिसेंबर, २०१०

भारत १३६ (**एसआर तेंडुलकर** ३६; एम मॉर्केल ५-२०, डीडब्ल्यू स्टेन ३-३४) व ४५९ (**एसआर तेंडुलकर** १११*, एमएस धोनी ९०, जी गंभीर ८०, व्ही सेहवाग ६३; डीडब्ल्यू स्टेन ४-१०५)

दक्षिण आफ्रिका ६२०-४ घोषित (जेएच कॅलिस २०१*, एचएम अमला १४०, एबी डिव्हिलियर्स १२९, एएन पीटरसन ७७, जीसी स्मिथ ६२; आय शर्मा २-१२०)

दक्षिण आफ्रिका एक डाव व २५ धावांनी विजयी

दुसरी कसोटी. डर्बन – २६ ते २९ डिसेंबर, २०१०

भारत २०५ (व्हीव्हीएस लक्ष्मण ३८, **एसआर तेंडुलकर** १३; डीडब्ल्यू स्टेन ६-५०, एलएल त्सोत्सोबे २-४०, एम मॉर्केल २-६८) व २२८ (व्हीव्हीएस लक्ष्मण ९६, **एसआर तेंडुलकर** ६; एलएल त्सोत्सोबे ३-४३, एम मॉर्केल ३-४७, डीडब्ल्यू स्टेन २-६०)

दक्षिण आफ्रिका १३१ (एचएम अमला ३३; एच सिंग ४-१०, झेड खान ३-३६) व २१५ (एजी प्रिन्स ३९*, एस श्रीशांत ३-४५, झेड खान ३-५७, एच सिंग २-७०)

भारत ८७ धावांनी विजयी

तिसरी कसोटी. केप टाउन – २ ते ६ जानेवारी, २०११

दक्षिण आफ्रिका ३६२ (जेएच कॅलिस १६१, एचएम अमला ५९, एजी प्रिन्स ४७; एस श्रीशांत ५-११४, झेड खान ३-८९) व ३४१ (जेएच कॅलिस १०९*, एमव्ही बाउचर ५५; एच सिंग ७-१२०)

भारत ३६४ (**एसआर तेंडुलकर** १४६, जी गंभीर ९३; डीडब्ल्यू स्टेन ५-७५) व १६६-३ (जी गंभीर ६४, **एसआर तेंडुलकर** १४)*

सामना अनिर्णित

मालिकेत १-१ बरोबरी

२३.
विश्वचषक स्पर्धा २०११

भारत, बांगलादेश व श्रीलंका या तीन देशांनी २०११च्या विश्वचषक स्पर्धेचं संयुक्त यजमानपद स्वीकारलं होतं. १६ फेब्रुवारीला ढाक्यामध्ये विश्वचषक स्पर्धेला सुरुवात झाली. स्पर्धेच्या पहिल्याच सामन्यात भारताची लढत बांगलादेशबरोबर होती. कॅरिबियनमधील २००७ सालच्या विश्वचषक स्पर्धेत बांगलादेशनेच आम्हाला हरवलं होतं. तो पराभव आम्ही कधीच विसरू शकत नव्हतो. एकदिवसीय सामन्यात बांगलादेशचा संघ हा नेहमीच 'एक धोकादायक संघ' म्हणून ओळखला जातो. मिरपूरच्या 'शेर-ए-बांगला नॅशनल स्टेडियम'मध्ये तर त्यांना घरच्या प्रेक्षकांचा अभूतपूर्व पाठिंबा मिळत होता. आरडाओरडा करणाऱ्या हजारो प्रेक्षकांचा कर्कश आवाज मैदानात घुमत होता.

बांगलादेशमध्ये पाऊल ठेवताच चटकन जाणवलेली गोष्ट म्हणजे तिथलं उत्साहाने आणि उत्कंठेने भरलेलं वातावरण. आम्ही सरावासाठी जेव्हा मैदानात पोचायचो तेव्हा स्टेडियमबाहेर साधारण ३० हजार लोक जमलेले असायचे. क्रिकेटपटूंचं ओझरतं दर्शन व्हावं एवढीच त्यांची माफक अपेक्षा असायची. त्यापैकी बहुतेकांना सामन्याचं तिकीटही मिळालेलं नसायचं; पण त्याची त्यांना फिकीर नसायची. ते स्वत:च्याच मस्तीत नाचत व गात असायचे. त्यांच्या उत्साहाला उधाण आलेलं असायचं. ढाक्याच्या त्या झपाटलेल्या क्रिकेटवेड्या जनसमूहामुळे स्पर्धेला एक वेगळीच रंगत आली होती.

मुख्य स्पर्धा सुरू होण्याआधी चेन्नईला आम्ही आस्ट्रेलिया व न्यूझीलंडविरुद्ध दोन सराव सामने खेळलो होतो. ते दोन्ही सामने जिंकल्यामुळे आमचा आत्मविश्वास वाढला होता. क्रिकेटमधील सर्वोच्च स्पर्धा जिंकण्याची या वेळेस आपल्याला नक्की संधी आहे, असं आम्हाला सर्वांनाच वाटत होतं. संपूर्ण स्पर्धेच्या दरम्यान तमाम भारतीय क्रिकेटचाहते एकदिलाने आमच्या पाठीशी होते. त्या एक-दीड महिन्याच्या काळात देशामध्ये विश्वचषक स्पर्धेशिवाय दुसरा कोणताही विषय चर्चेत नव्हता. त्या जोषपूर्ण वातावरणात आम्हाला मात्र मन शांत ठेवून सर्व लक्ष क्रिकेटवर केंद्रित करणं आवश्यक होतं. त्यासाठी गॅरी, पॅडी अप्टन, माइक हॉर्न व इतर साहाय्यक शिक्षकांचं बहुमोल मार्गदर्शन आम्हाला लाभत होतं. ही सर्व मंडळी आम्हाला तंदुरुस्त व ताजंतवानं ठेवण्याची सतत काळजी घेत. माइक हॉर्न हा एक विलक्षण शोधयात्री होता. अज्ञात प्रदेशांचा शोध घेत त्याने मैलोन्मैल प्रवास केला होता. आपल्या अनेक धाडसी मोहिमांच्या चित्तथरारक कथा तो आम्हाला रंगवून सांगत असे.

ढाक्यामध्ये मी एकदा रात्रीच्या जेवणासाठी युवराजला माझ्या रूममध्ये बोलावलं. युवराजबरोबर माझी खास दोस्ती होती. युवराजच्या अफाट क्रिकेटक्षमतेविषयी माझ्या मनात कधीच शंका नव्हती. माझ्या मते विश्वचषक स्पर्धेत युवराजची कामगिरी आमच्यासाठी खूप महत्त्वाची ठरणार होती. त्या वेळी तो काहीशा खिन्न मन:स्थितीत होता. त्याच्या मनासारखं काहीच घडत नव्हतं. मी त्याला धीर देत म्हटलं, ''सध्या तू छोटी उद्दिष्टं डोळ्यांसमोर ठेव आणि ती पूर्ण करण्याचा प्रयत्न कर. म्हणजे तुला तुझा आत्मविश्वास आपोआप परत मिळेल. इतर कोणत्याही गोष्टींचा विचार न करता तू स्वत:ला खेळामध्ये झोकून दे.'' त्यानंतर संपूर्ण स्पर्धेमध्ये एक वेगळाच युवराज सर्वांनी पाहिला. त्याने सर्वांच्या अपेक्षा पूर्ण केल्या. आपल्या चौफेर कामगिरीने त्याने विश्वचषक स्पर्धा गाजवली.

विश्वचषक स्पर्धेतील प्रत्येक सामन्याची सुरुवात दोन्ही संघांच्या राष्ट्रगीताने होत असते. आपल्या देशाचं प्रतिनिधित्व करत राष्ट्रगीतासाठी उभं राहणं हा प्रत्येक खेळाडूच्या जीवनातील एक अमूल्य व भावस्पर्शी क्षण असतो. आजपर्यंत जेव्हा जेव्हा मी माझ्या संघाबरोबर राष्ट्रगीतासाठी उभा राहिलो आहे, तेव्हा प्रत्येक वेळी माझ्या अंगावर रोमांच उभे राहिलेले आहेत. मिरपूरमध्ये 'जन गण मन'ची धून ऐकताना आम्ही आमच्या भावना रोखू शकलो नाही. आमच्याबरोबरच करोडो

भारतीयांच्या भावनाही या स्पर्धेत गुंतलेल्या आहेत, याची आम्हाला जाणीव होती. क्रिकेट हा आता केवळ एक खेळ उरला नव्हता. प्रत्येक भारतीयाचा तो श्वास आणि ध्यास बनला होता.

नाणेफेक जिंकून वीरेंद्र सेहवाग आणि मी मैदानात उतरलो. पहिल्याच चेंडूवर चौकार मारत वीरूने झोकात सुरुवात केली. त्यानंतर सुरुवातीचा तणाव पाहता पाहता विरून गेला आणि आम्ही फटकेबाजी सुरू केली. डावाच्या सुरुवातीपासूनच आम्ही चांगली धावगती राखली होती. मी २८ धावांवर धावबाद झालो. गौतम गंभीरने ३९ धावा काढल्या. वीरूची १७५ धावांची खेळी म्हणजे त्याच्या अचाट क्षमतेचा पुरावा होता. विराट कोहलीनेही शांतपणे आपल्या इनिंग्जला आकार देत भारतातर्फे आणखी एक शतक झळकवलं. ५० षटकांच्या अखेरीस आमच्या ४ बाद ३७० धावा झाल्या होत्या. तो सामना ८७ धावांच्या मोठ्या फरकाने जिंकत आम्ही २००७ सालच्या पराभवाची परतफेड केली. स्पर्धेची सुरुवात, आम्हाला हवी तशी झाली होती.

अविस्मरणीय सामना

२७ फेब्रुवारीला आमचा पुढचा सामना बंगळुरूमध्ये इंग्लंडविरुद्ध होता. घरच्या मैदानावरचा तो पहिलाच सामना असल्यामुळे सर्वांचीच उत्कंठा शिगेला पोचली होती.

इंग्लंडच्या सामन्याआधी, काही तास एक थोडीशी विचित्र गोष्ट घडली. स्पर्धेमध्ये तोपर्यंत मी माझ्या लाडक्या बॅटने खेळत होतो. मागच्या हंगामातही मी तीच बॅट वापरली होती. त्याच बॅटने मला वर्षातील आयसीसी सर्वोत्कृष्ट खेळाडूचं पारितोषिक मिळवून दिलं होतं. मात्र ती बॅट थोडी जुनी होत चालली होती. तरीही मला ती सोडवत नव्हती. मी वेळोवेळी ती दुरुस्त करायचो. तिला पूर्वस्थितीला आणण्यासाठी अनेकदा मी बॅटच्या कारखानदाराकडेही ती पाठवून दिली होती. त्या बॅटशी माझं भावनिक नातं जोडलं गेलं होतं. प्रत्येक वेळी ती कारखानदाराकडे नीट पोचेपर्यंत माझा जीव टांगणीला लागलेला असे. प्रवासात ती कुठेही हरवू नये म्हणून मी प्रार्थनाही करत असे. त्या सामन्याच्या आधी नेहमीप्रमाणे मी ती बॅट एका कोपऱ्यात ठेवली होती. त्यानंतर का कुणास ठाऊक; पण अचानक मी एक नवीन बॅट हातात घेतली. माझ्या नेहमीच्या पद्धतीने त्या नवीन बॅटचं वजन मी नीट आजमावू लागलो. खरंतर नवीन बॅटवर मी माझा वेळ का वाया दवडतोय, हे माझंच मला कळेना. कारण काही झालं तरी मी नवीन बॅट वापरणं शक्यच नव्हतं.

बंगळुरूच्या चिन्नास्वामी स्टेडियमवर, नाणेफेक जिंकून आम्ही प्रथम फलंदाजी स्वीकारली. मी माझ्या जुन्याच बॅटने खेळत सुरुवातीला काही चौकारही मारले, पण ते सर्व हलक्या हाताने स्टम्प्सच्या मागच्या बाजूला मारलेले शॉट्स होते. अजमल शहजादच्या गोलंदाजीवर जेव्हा मी प्रथमच स्क्वेअर कट मारला, तेव्हा मला काहीतरी खटकलं. मी पुऱ्या ताकदीनिशी तो शॉट मारला होता. परंतु चेंडू हव्या त्या वेगात क्षेत्ररक्षकापर्यंत पोचला नव्हता. जुन्या बॅटला निरोप देऊन मी मघाचीच ती नवीन बॅट मागवली. जुनी बॅट परत करताना मी थोडा भावनाविवश झालो. त्यानंतर नव्या बॅटने मी शतक काढलं. नवीन बॅट मात्र जास्त टिकली नाही. आस्ट्रेलियाविरुद्ध उपउपांत्य सामन्यात खेळतानाच तिचे दोन तुकडे झाले.

बंगळुरूमध्ये खेळायला मला नेहमीच आवडायचं. त्या सामन्यात मी सावधपणे सुरुवात केली. समोर वीरूची फटकेबाजी सुरू होती. मी एक बाजू नेटाने धरून ठेवायचं ठरवलं. वीरू ३५ धावा काढून बाद झाल्यावर मी धावांची गती वाढवायला सुरुवात केली. ग्रॅहम स्वान हा इंग्लंडचा आघाडीचा फिरकी गोलंदाज होता. त्याच्या गोलंदाजीच्या दुसऱ्या सत्रात मी सुरुवातीलाच त्याला लागोपाठ दोन षटकार ठोकले. सामन्याचा नूर तिथेच पालटला. मी १२० धावा काढून बाद झालो. गंभीर आणि युवराज दोघांनीही अर्धशतकं झळकवल्यामुळे ५० षटकांत आमच्या ३३८ धावा झाल्या.

आमच्या धावसंख्येला इंग्लंडने जोरदार प्रत्युत्तर दिलं. मैदानावर पडलेल्या दवाचाही त्यांना फायदा मिळाला. दव पडल्यामुळे आमचे फिरकी गोलंदाज निष्प्रभ ठरले. मैदानावर जेव्हा भरपूर दव पडलेलं असतं तेव्हा ओलसर झालेल्या खेळपट्टीमुळे चेंडू सटकन बॅटवर येतो. त्यामुळे फलंदाजी करणं सोपं जातं. इंग्लंडलाही आयर्लंडविरुद्ध बंगळुरूमध्ये झालेल्या सामन्यात याच गोष्टीचा प्रत्यय आला. (पाच विकेट्स गमावूनही केविन ओब्रायनच्या शतकामुळे आयर्लंडने इंग्लंडचा पराभव

केला होता.) आमच्याविरुद्ध अँड्रयू फ्लिंटॉफने जबरदस्त बॅटिंग करत १५८ धावा काढल्या. तो अजून काही काळ टिकला असता, तर त्याने इंग्लंडला नक्कीच विजय मिळवून दिला असता. मात्र आपल्या गोलंदाजीच्या दुसऱ्या सत्रात झहीरने ११ धावांत ३ बळी घेत सामन्याचं पारडं पुन्हा आमच्या बाजूने फिरवलं. अखेर त्या सामन्यात दोन्ही संघांची बरोबरी झाली. त्या मॅचमध्ये एकूण ६७६ धावा काढल्या. प्रेक्षकांसाठी ती एक पर्वणीच ठरली.

भारत विश्वचषक जिंकणार; अशी जोरदार चर्चा त्या सामन्यानंतर लगेचच इंटरनेटच्या माध्यमातून सुरू झाली. हळूहळू ते सर्व संदेश ड्रेसिंग रूममध्ये आमच्यापर्यंतही येऊन थडकू लागले. केवळ आमच्या मैदानातील कामगिरीवर तो निष्कर्ष काढलेला नव्हता. एका वेगळ्या तर्कावर तो अंदाज बांधलेला होता. धोनीच्या नेतृत्वाखाली ज्या ज्या वेळी एखाद्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेतील सामन्यात भारताने एखाद्या संघाविरुद्ध बरोबरी साधली होती, तेव्हा त्या स्पर्धेच्या विजेतेपदाची माळ भारताच्या गळ्यात पडली होती. २००७ सालातील पहिल्या ट्वेंटी-२०च्या विश्वकप स्पर्धेत हेच घडलं होतं. (भारताने विजेतेपद मिळवायच्या आधी पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यात भारताने बरोबरी साधली होती.) त्यानंतर आयपीएलमध्ये व २०१०च्या ट्वेंटी-२० चॅम्पियनशिप लीगमध्येही धोनीचा संघ अशाच प्रकारे जिंकला होता. त्यामुळे या वेळच्या विश्वचषक स्पर्धेमध्येही नक्कीच इतिहासाची पुनरावृत्ती होणार, असं अनेकांचं मत होतं.

मार्गातील अडचणी

साखळीतील त्यापुढचे आयर्लंड व नेदरलँड्स यांच्या विरुद्धचे सामने आम्ही आरामात जिंकले. त्यानंतर १२ मार्च, २०११ला नागपूरमध्ये आमची दक्षिण आफ्रिकेविरुद्ध गाठ पडली. त्या सामन्यामध्ये अचानक आमच्या घोडदौडीला लगाम बसला. त्या सामन्यात आम्ही सुरुवात झकास केली. थोड्याच वेळात आम्ही सामन्यावर पूर्ण नियंत्रणही मिळवलं होतं. सेहवागने व मी सुरुवातीलाच वेगाने धावा काढल्या. कारकिर्दीतील माझं ९९वं शतकही मी त्याच सामन्यामध्ये पूर्ण केलं. सर्वांच्या नजरा विश्वचषकावर खिळलेल्या असल्यामुळे माझ्या शतकाचा फारसा गाजावाजा झाला नाही. मात्र सामन्याच्या अखेरच्या १० षटकांत आम्ही पाठोपाठ नऊ गडी गमावल्यामुळे आमचा डाव अचानक कोसळला. डेल स्टेनने पाच विकेट्स घेतल्या. अखेर आम्ही दक्षिण आफ्रिकेसमोर २९७ धावाचं लक्ष्य ठेवलं. सामन्याचे दोन चेंडू शिल्लक असताना आम्ही तो सामना हरलो. तो पराभव मात्र आमच्या जिव्हारी चांगलाच झोंबला.

अपेक्षेप्रमाणे प्रसारमाध्यमांनी भारतीय संघाला धारेवर धरलं. चहूबाजूंनी आमच्यावर टीकेचा मारा होऊ लागला. आमच्या हातून एक मोठी चूक झाली होती. पुन्हा तशी चूक करणं आम्हाला परवडणारं नव्हतं. २० मार्चला चेन्नईमध्ये वेस्ट इंडीजविरुद्ध पुढचा सामना होता. त्यात आम्हाला गाडी पुन्हा रुळावर आणणं गरजेचं होतं. सुदैवाने आम्ही वेस्ट इंडीजला पराभूत करू शकलो. त्या विजयाचं मुख्य श्रेय युवराज व झहीरचं होतं. युवराजने जिगरबाज फलंदाजी करत त्या मॅचमध्ये शतक ठोकलं. झहीरने एक अप्रतिम स्लो बॉल टाकून फॉर्ममध्ये असलेल्या डेव्हॉन स्मिथला ८१ धावांवर बाद केलं. आता बाद फेरीला सुरुवात होणार होती. उपउपांत्य फेरीत आमची लढत गतविजेत्या आस्ट्रेलियाविरुद्ध होती.

थोडा वेगळा सराव

वेस्ट इंडीजविरुद्धच्या सामन्याआधी मी माझा फलंदाजीचा सराव थोड्या गमतीशीर पद्धतीने करायला सुरुवात केली. गॅरी कर्स्टनबरोबर मी नेहमीप्रमाणे थ्रो-डाउन्सचा सराव करत होतो. सराव संपवणार इतक्यात मला एक नवीन कल्पना सुचली. गोलंदाजाच्या हातून चेंडू सुटण्याच्या क्षणी मी माझे डोळे बंद करू लागलो. असे सहा चेंडू मी खेळून काढले. त्यानंतर मी गॅरीला विचारलं, ''माझ्या खेळण्यामध्ये तुला काही फरक जाणवला का?'' गॅरीला विशेष काही जाणवलं नव्हतं. फक्त चेंडू ड्राइव्ह करताना तुझं डोकं वर राहत होतं, एवढीच गोष्ट माझ्या लक्षात आल्याचं तो म्हणाला. त्याचं म्हणणं बरोबर होतं. डोळे मिटून फलंदाजी करताना तुमचं डोकं स्थिर असणं फारच आवश्यक असतं. डोकं किंचित जरी हललं तरी येणाऱ्या चेंडूचा मार्ग तुम्ही हरवून बसण्याची शक्यता जास्त असते. मी डोळे मिटून सहा चेंडू खेळलो हे त्याला सांगताच तो हादरला. मी त्याला

म्हटलं, ''चेंडू तुझ्या हातून सुटत असताना मी तुझ्या मनगटाची स्थिती नीट निरखून ठेवली. म्हणजे तू आउटस्विंगर टाकणार हे माझ्या लक्षात आल्यावर मी लगेच डोळे मिटले. त्यानंतर चेंडूचा हवेतील प्रवास मी डोळ्यांसमोर आणला व त्यानुसार शॉट मारला.'' मी लगेच आणखी एक प्रयोग केला. शॉट मारल्यानंतरही मी डोळे तसेच बंद ठेवून मी मारलेला चेंडू मैदानाच्या नेमक्या कोणत्या भागात गेला असेल, हेही अंदाजाने सांगितलं. माझ्या बॅटच्या कुठल्या भागावर व किती जोरात तो चेंडू बसला यावरून मी तो अंदाज वर्तवला होता. केवळ मजेखातर आणि फक्त एकदाच मी तसा सराव केला. मात्र त्यामुळे गोलंदाजाच्या हातातून चेंडू सुटण्याच्या क्षणावर मी प्रत्यक्ष सामन्यातही पूर्ण लक्ष केंद्रित करू शकलो. फलंदाजासाठी ते निरीक्षण फार महत्त्वाचं असतं.

सुरुवातीच्या काळात फलंदाजीचा सराव करताना मी याहूनही वेगवेगळे प्रयोग केले होते. मुंबईमध्ये जून-जुलै-ऑगस्ट या तीन महिन्यांत मुसळधार पाऊस पडतो. त्या वेळी नेहमीसारखं क्रिकेट खेळणं शक्यच नसायचं. तरीही मी मित्रांना गोळा करून त्या पावसात रबरी चेंडूने क्रिकेट खेळायचो. कधीकधी आमच्या नेहमीच्या खेळपट्टीवर कोणतंही आच्छादन न टाकता आम्ही खेळायचो. कधी सिमेंटच्या एखाद्या ओलसर खेळपट्टीवर आमचा खेळ रंगायचा, तर कधी त्याच सिमेंटच्या खेळपट्टीवर, परंतु त्यावर प्लॅस्टिकचं आच्छादन टाकून आम्ही खेळायचो. एकेकदा तर मी हेल्मेट, पॅड्स, ग्लोव्ह्ज घालून भर पावसात खेळल्याचं मला आठवतं. रबरी चेंडू खेळपट्टीवर आपटल्यानंतर जबरदस्त वेगात अंगावर येत असे. त्यामुळे वेगाने येणारा चेंडू खेळताना आपोआप झटकन होणाऱ्या हालचाली करण्याचा सराव अनायासे होत असे. पावसातल्या त्या सरावात मी मित्रांना १८ यार्डांवरून गोलंदाजी करायला सांगायचो. चेंडू जोरात फेकण्याचीही मी त्यांना मुभा द्यायचो. फक्त प्रत्येक चेंडू जोरात माझ्या अंगावर यायला हवा, एवढीच माझी अट असे.

त्या सर्व प्रकारांत खूप मजा येत असे. मात्र पावसात रबरी चेंडूने खेळताना गंभीर दुखापत होण्याचीही शक्यता असायची. त्या काळात इनडोअर क्रिकेटच्या सुविधा नव्हत्या आणि मला तर क्रिकेट खेळल्याशिवाय चैन पडत नसे. आता खूपच फरक पडला असला, तरीही त्या पूर्वीच्या मजेला मात्र मी नक्कीच मुकलो आहे. माझ्या मुलाबरोबरही तसंच पावसात खेळण्याचा विचार अनेकदा माझ्या मनात येत असतो. आजच्या तरुण क्रिकेटपटूंना अत्याधुनिक सुविधा उपलब्ध असतात. माझ्यासमोर मात्र क्रिकेट खेळण्यासाठी फक्त रस्ते आणि पाण्याचं तळं साचलेलं मैदान असायचं. क्रिकेट खेळताना अंगावर आधी चिखल उडायचा आणि त्यापाठोपाठ चेंडू यायचा. कधीकधी तो खेळ अंगाशीही यायचा. आम्हाला मात्र खेळताना खूप मजा यायची. माझ्या मुलाने एकदा तरी तो अनुभव घ्यावा, अशी माझी फार इच्छा आहे.

विजेत्यांना सामोरं जाताना

लागोपाठ चौथ्यांदा विश्वचषक स्पर्धेचं विजेतेपद मिळवण्याच्या इराद्याने आस्ट्रेलियन संघ मैदानावर उतरणार होता. २००३मध्ये दक्षिण आफ्रिकेत झालेल्या विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात आस्ट्रेलियाने आमचा दणदणीत पराभव केला होता. त्यानंतर विश्वचषक स्पर्धेत आस्ट्रेलियाशी आमची प्रथमच गाठ पडत होती. उपउपांत्य फेरीच्या त्या सामन्यासाठी तयारी करताना मी दोन गोष्टींवर विशेष लक्ष केंद्रित केलं होतं. अहमदाबादच्या कडक उन्हाळ्यात अंगाची लाही होते. त्यामुळे अहमदाबादमध्ये पाऊल ठेवल्यापासून मी मांसाहार पूर्णपणे वर्ज्य केला. मसालेदार पदार्थ खाण्याचंही मी जाणीवपूर्वक टाळलं. असं करण्याचा कोणीही मला सल्ला दिला नव्हता किंवा सक्तीही केली नव्हती. अहमदाबादच्या कडक उन्हाळ्यापासून स्वत:चा बचाव करण्यासाठी मलाच अंतर्मनातून प्रेरणा मिळाली होती. शरीर आतून थंड राखण्याकरता मी दही व सॅलड खाण्यावर अधिक भर दिला.

सामन्याच्या आदल्या रात्री मी नीट झोपू शकलो नव्हतो. सामन्यातील दडपणाचा माझ्या झोप न येण्याशी काहीही संबंध नव्हता. माझ्या खोलीतील पलंग त्यासाठी कारणीभूत होता. मी त्या रात्री फरशीवरही झोपण्याचा प्रयत्न केला. अखेर मी डोक्याचं मालिश करण्यासाठी अमित शहाला रूममध्ये बोलावलं. माझ्या खोलीतील पलंगाची एक बाजू काहीशी उंचावली गेली आहे, ही गोष्ट शहाच्या चटकन लक्षात आली. मात्र इतक्या रात्री पलंग बदलणंही शक्य नव्हतं.

आस्ट्रेलियाविरुद्ध खेळताना प्रत्येक वेळी मानसिक तणाव कमालीचा वाढलेला असतो. बाद फेरीतील सामना असेल तर ते आणखीनच कडव्या वृत्तीने खेळतात. २४ मार्चच्या त्या सामन्यात आस्ट्रेलियाने सुरुवात धडाक्यात केली. मात्र त्यानंतर आमच्या गोलंदाजांनी चांगली गोलंदाजी करत धावांचा वेग षटकामागे चारपेक्षा जास्त होऊ दिला नाही. अखेर आस्ट्रेलियाच्या २६० धावा झाल्या. त्यात पाँटिंगच्या १०४ धावांचा महत्त्वपूर्ण वाटा होता. प्रखर दिव्यांच्या प्रकाशात त्या धावसंख्येचा पाठलाग करणं सोपं जाणार नाही, याची आम्हाला कल्पना होती.

वीरू व मी फलंदाजीसाठी मैदानावर उतरताच सरदार पटेल स्टेडियमवर जमलेल्या प्रेक्षकांनी टाळ्यांचा कडकडाट केला. आमच्यावरील प्रचंड जबाबदारीची आम्हाला दोघांनाही पूर्ण जाणीव होती. सामना हरलो तर स्पर्धेबाहेर पडावं लागणार होतं. शेन वॅटसनला पुलचा फटका मारण्याच्या नादात वीरू १५ धावांवर बाद झाला. आमची धावसंख्या त्या वेळी ४४ होती. गौतम माझ्या जोडीला आला. आम्ही ५० धावांची भागीदारी केली. मी अर्धशतक काढून बाद झालो. त्यानंतर गौतम व धोनीही पाठोपाठ बाद झाले. युवराजच्या साथीला रैना आला. विश्वचषक स्पर्धेमधला सुरेश रैनाचा तो केवळ दुसरा सामना होता. जिंकण्यासाठी आम्हाला अजूनही ७४ धावांची गरज होती.

त्या वेळी ड्रेसिंग रूममधील मालिश करण्याच्या एका टेबलावर मी डोळे बंद करून झोपलो होतो. माझ्या शेजारच्या टेबलावर वीरू आडवा पडला होता. अमित शहा माझ्या मानेचं मालिश करत असताना मी निपचित पडून राहिलो होतो. खरंतर आम्हाला विजय मिळावा म्हणून मी परमेश्वरापाशी प्रार्थना करत होतो. वीरूला वाटलं की मला झोप लागली आहे. तो अमितला म्हणाला, *''तू अपना टाइम वेस्ट मत कर, वो सोया है। जा के मॅच देख ले।''* वीरूचा प्रत्येक शब्द माझ्या कानावर पडत होता. मी त्यावर काहीही प्रतिक्रिया दिली नाही. मी झोपलेलो नाही, हे अमित शहाला ठाऊक होतं. तो म्हणाला, *''वो सोया नही है, मुझे मालूम है।''*

युवराज व रैनाने संघाला संकटातून हळूहळू बाहेर काढलं होतं. ड्रेसिंग रूममध्ये पुन्हा उत्साहाचं वातावरण निर्माण होऊ लागलं. विजयाची चाहूल लागताच आरडओरडा सुरू झाला. *'अजून एक चौकार हवाय...',* 'आता फक्त दोनच धावा पाहिजेत.' आम्ही उपांत्य सामन्याच्या अगदी जवळ पोचलो होतो. तीन वेळा विश्वचषक पटकवणाऱ्या संघाला आम्ही स्पर्धेच्या बाहेर काढणार होतो. युवीने विजयी चौकार मारताच आम्ही आनंदाने बेहोष झालो. तो सामना मला कधीही विसरता येणार नाही.

हॉटेलमध्ये जाण्यासाठी आम्ही परत निघालो तेव्हा केवळ अहमदाबाद शहरच नव्हे; तर अख्खा देशच भारतीय संघाचा विजय साजरा करत होता. मध्यरात्रीच्या सुमारास आमची बस मैदानाबाहेर पडली. तोपर्यंत हजारो लोक आमचं अभिनंदन करण्यासाठी आमची वाट बघत थांबले होते. प्रत्येक रस्त्यावर आणि रस्त्याच्या प्रत्येक वळणावर क्रिकेटशौकीन वाद्य वाजवत, नाचत, भारताचा तिरंगा फडकावत होते. आम्ही अजून अंतिम फेरीत पोचलोही नव्हतो. त्याआधीच विजयोत्सवाला सुरुवात झाली होती.

मला आठवतं, रात्री उशिरापर्यंत माझ्या हॉटेलरूमच्या बाल्कनीत उभा राहून मी तो उत्सव डोळे भरून पाहत राहिलो होतो. त्या विजयोत्सवाचं वर्णन मी अंजलीला फोन करून सांगितलं. मी तिला म्हटलं, ''हा आनंदाचा प्रसंग प्रत्यक्ष पाहण्यासाठी आज तू इथे असायला हवी होतीस.'' विश्वचषक जिंकण्याच्या तीव्र इच्छेने प्रत्येक भारतीय किती आसुसलेला होता, त्याचा प्रत्यय मला त्या क्षणी आला. उपांत्य फेरीत आता आमची गाठ पाकिस्तानशी पडणार होती. त्या सामन्याकडे तर आता सर्वांचेच डोळे लागले होते.

शेजारी

मोहालीला पोचून आम्ही आमच्या हॉटेलच्या दिशेने निघालो होतो. अचानक मला एक हिंदी गाणं आठवलं. मी सर्वांना विचारलं की, ''तुमच्यापैकी कोणाच्या आयपॉडवर *'बडे अच्छे लगते है' हे गाणं आहे का?''* आम्हाला मालिश करणाऱ्या मानेकाकांनी ते गाणं आपल्यापाशी असल्याचं मला सांगितलं. मानेकाका हे अतिशय प्रेमळ गृहस्थ होते. कोणतीही अपेक्षा न

ठेवता ते आमच्या सेवेसाठी सदैव तत्पर असत. आमच्या संगणक विश्लेषकाला सांगून मी ते गाणं माझ्या आयपॉडवर डाउनलोड करून घेतलं. त्यानंतर पुढचे सात दिवस मी फक्त ते एकच गाणं ऐकत होतो.

३० मार्चला मोहालीत होणारा सामना अतिशय अटीतटीचा होणार, याची सर्वांनाच कल्पना होती. प्रत्यक्षात तो सामना अधिकच कडवेपणाने खेळला गेला. इतक्या मानसिक दडपणाखाली मी क्वचितच एखादा सामना खेळलो असेन. भारतीय भूमीवर पाकिस्तानी संघाबरोबर होणारा क्रिकेट सामना हा प्रत्येक वेळेस एक अभूतपूर्व प्रसंग असतो. त्याची तुलना इतर कशाशीही होऊ शकत नाही. सामन्याच्या आधी दोन्ही संघ एकाच मैदानावर शेजारी-शेजारी सराव करू लागले तेव्हाच वातावरणातील तणाव जाणवू लागला होता. दोन्ही संघ सामना जिंकण्यासाठी शर्थीचे प्रयत्न करणार होते. विश्वकप स्पर्धेत आजपर्यंत भारताने कायमच पाकिस्तानचा पराभव केला होता. आम्हाला तो विक्रम अबाधित राखायचा होता.

सामन्याची सुरुवातच नाट्यमय झाली. वीरेंद्र सेहवागने उमर गुलच्या गोलंदाजीवर हल्ला चढवला. उमर गुल हा त्या स्पर्धेतील पाकिस्तानचा अव्वल गोलंदाज होता. वीरूच्या आक्रमणाने आमच्या इनिंग्जची सुरुवात दणक्यात झाली. त्याने उमर गुलच्या दुसऱ्या षटकात चार चौकार मारले. सुदैवाने मला त्या डावात काही जीवदानं मिळाली. माझा मिड विकेटवर सोडलेला झेल तर फारच सोपा होता. मी काढलेल्या ८५ धावा संघाच्या दृष्टीने खूपच उपयोगी ठरल्या. इनिंग्जच्या मधल्या काळात आम्ही खूपच विकेट्स गमावल्या. वहाब रियाझने पाच बळी घेतले. रियाझने युवीला पहिल्याच चेंडूवर बाद करू मोठीच खळबळ उडवून दिली. क्षणाक्षणाला सामन्याचं रूप पालटत होतं. उत्कंठा शिगेला पोचलेल्या त्या सामन्यात अनेकदा माझ्या काळजाचा ठोका चुकला होता. सुरेश रैनाने काढलेल्या नाबाद ३६ धावांमुळे आमच्या २६० धावा झाल्या. आधीच्या सामन्यात आम्ही आस्ट्रेलियाविरुद्ध ह्याच धावसंख्येचा यशस्वी पाठलाग केला होता. आम्ही उभारलेली धावसंख्या निश्चितच चांगली होती. मात्र विजय मिळवण्यासाठी ती पुरेशी होती, असं म्हणणं धाडसाचं ठरलं असतं.

पाकिस्तान संघानेही आपल्या डावाची सुरुवात उत्तम केली. आमच्यावर किंचित दडपण येत असतानाच झहीरने त्यांची सलामीची जोडी फोडली. पाठोपाठ मुनाफनेही एक विकेट घेतली. पॉवर प्लेच्या षटकात युवराजने आणखी दोन बळी घेऊन आम्हाला सामन्यात वर्चस्व मिळवून दिलं. उमर अकमलने आमच्यावर प्रतिहल्ला चढवण्याचा प्रयत्न केला. परंतु त्याला बाद करण्यासाठी फक्त बळी घेणारा एक चेंडू पुरेसा होता. हरभजनने ते काम केलं. आपल्या दुसऱ्या सत्रात गोलंदाजी करताना त्याने पहिल्याच चेंडूवर त्याची विकेट काढली. भज्जीने तो चेंडू राउंड द विकेट टाकला. अकमलला त्या चेंडूचा अंदाज आला नाही.

आफ्रिदी व मिसबाह असेपर्यंत पाकिस्तानला आशा होत्या. मात्र हरभजनचा एक फुल टॉस चेंडू मैदानाबाहेर मारण्याच्या नादात आफ्रिदी बाद झाला. एरवी १० पैकी ९ वेळा त्याने तशा चेंडूवर षटकार मारला असता. तेव्हा मात्र कव्हरला उभ्या असलेल्या क्षेत्ररक्षकाच्या हातात त्याने सोपा झेल दिला. आफ्रिदी बाद झाल्यावर आमचा विजयाचा मार्ग मोकळा झाला. त्यानंतर लगेच मिसबाहने लाँग लेगला उभ्या असलेल्या विराट कोहलीकडे झेल दिला आणि आम्ही विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात प्रवेश केला. सामन्यातील सर्वोत्कृष्ट खेळाडूचे पारितोषिकही मलाच मिळाल्याने आनंदात अधिकच भर पडली. विश्वचषक स्पर्धेत पाकिस्तानविरुद्ध एकूण तीन वेळा मला ते पारितोषिक मिळालं.

विजयोत्सवाचं दृश्य पाहण्यासारखं होतं. मोहालीमध्ये हजारो क्रिकेटचाहते रस्त्यावर येऊन विजय साजरा करत होते. प्रत्येकाच्या हातात भारताचा तिरंगा फडकत होता. आम्हाला हॉटेलमध्ये परत पोचायला बराच वेळ लागला. प्रत्येक कोपऱ्यावर लोक बेहोषपणे नाचत होते. माझा मित्र व सुप्रसिद्ध चित्रपट अभिनेता आमिर खान मला भेटण्यासाठी माझ्या रूमवर आला. रात्री खूप उशिरापर्यंत आमच्या गप्पा रंगल्या होत्या. प्रत्येक भारतीय चाहत्याच्या मनात त्या रात्रीच्या आठवणी अजूनही ताज्या असतील. आम्ही तर त्या सामन्यात प्रत्यक्ष खेळलो होतो. आम्हाला ती रात्र कधी विसरावीशीच वाटणार नाही.

भारताचे तत्कालीन पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग, पाकिस्तानचे राष्ट्रप्रमुख युसुफ रझा गिलानी आणि अनेक उच्चपदस्थ, खास सामना पाहण्यासाठी मोहालीला आले होते. आम्हाला मात्र आता राजकीय किंवा इतर घडामोडींमध्ये काहीच कुतूहल

राहिलं नव्हतं. अंतिम फेरीचे डावपेच आखण्यात आम्ही इतके दंग झालो होतो की, सीमारेषेपलीकडे चाललेल्या गोष्टींमध्ये आम्हाला काहीच रस नव्हता. योग्य वेळी आम्ही आमचा खेळ उंचावण्यात यशस्वी झालो होतो. अंतिम फेरीतही त्याच आत्मविश्वासाने खेळण्याचा निर्धार करून आम्ही मुंबईच्या प्रवासाला सुरुवात केली.

शहरात उत्कंठा शिगेला

श्रीलंकेविरुद्ध अंतिम सामना खेळण्यासाठी आम्ही मुंबईत पोचलो. तेव्हा शहरातील पोलीस बंदोबस्तात लक्षणीय वाढ झाली होती. ही आपली नेहमीची मुंबई आहे, यावर माझा विश्वास बसत नव्हता. पोलीस कुमक वाढली असली तरी मुंबईकरांचा उत्साह तसूभरही कमी झाला नव्हता. आपल्या आवडत्या क्रिकेटपटूंना पाहण्यासाठी आणि त्यांना शुभेच्छा देण्यासाठी रस्त्यारस्त्यावर लोक उभे होते. अवघी मुंबई क्रिकेटमय होऊन गेली होती.

विमानतळावरून हॉटेलपर्यंत येताना आमच्या बसभोवती पोलिसांचा सख्त पहारा होता. मी मुंबईच्या सी-लिंकजवळ अंजलीला भेटलो. नवीन बांधलेला सी-लिंक पूल हे आता मुंबई शहराचं मोठं आकर्षण बनलं होतं. सी-लिंकमुळे आता मुंबईमधला प्रवास जलद व आरामदायी झाला होता. (एक काळ असा होता की, मुंबईमध्ये प्रथम दर्जाचा सामना खेळताना मी घरी न येता रात्री सीसीआयलाच राहणं पसंत करायचो. सीसीआयहून माझ्या घरी पोचायला दीड तास लागायचा. दिवसभर खेळून दमल्यावर संध्याकाळी एवढा वेळ गाडी चालवण्याचा उत्साह माझ्यात उरलेला नसायचा.) अंजली माझ्यासाठी थांबलेली आहे ही गोष्ट मी बसमध्ये असलेल्या सुरक्षा अधिकाऱ्यांना आधीच सांगितली होती. सी-लिंकपाशी मी बसमधून उतरून अंजलीबरोबर गाडीने हॉटेलवर जाणार होतो. स्वत:च्या गाडीतून हॉटेलपर्यंत गेल्याचा मात्र मला काहीच फायदा झाला नाही. माझ्या अपेक्षेप्रमाणे मी इतरांपेक्षा लवकर पोचू शकलो नाही. समोरची बस मला सतत नजरेच्या टप्प्यात ठेवावी लागत होती. ठिकठिकाणी लोकांनी गर्दी केली होती. ताशी ४० कि.मी.पेक्षा जास्त वेगाने मी गाडी चालवू शकलो नाही. मी अंजलीला गमतीत म्हटलं की, ''इतका हळू चालवणारा हा कोण नवीन ड्रायव्हर बसलाय; असं आपल्या गाडीला वाटत असेल!''

गाडी चालवताना अनेक विचार माझ्या मनात येत होते. विश्वचषक स्पर्धेचा अंतिम सामना मी माझ्या घरच्या प्रेक्षकांसमोर खेळणार, या कल्पनेनेच मी थरारून गेलो होतो. मला मार्च, २००७ सालच्या विश्वचषक स्पर्धेची आठवण झाली. स्पर्धेतल्या दारुण पराभवानंतर मी खिन्न मनाने मुंबई विमानतळावर पाऊल ठेवलं होतं. तो अत्यंत क्लेशकारक अनुभव होता. २०११मध्ये मात्र सगळं काही निराळं घडत होतं. भारताचं स्वप्न प्रत्यक्षात आणणारी एक अद्भुत कथाच जणू आम्ही लिहीत होतो. मी अंजलीला म्हटलं की, ''काही झालं तरी या वेळेस आम्ही मागे हटणार नाही.''

२०१० व २०११मध्ये आम्ही श्रीलंकेविरुद्ध अनेकदा खेळलो होतो. त्यांची बलस्थानं व त्यांच्या उणिवा आम्हाला ठाऊक होत्या. त्यांच्यापाशी उत्तम दर्जाचे खेळाडू असले तरी श्रीलंकेच्या संघाला हरवण्याचा आत्मविश्वास आम्हाला वाटत होता. अंतिम सामन्याआधी सर्व खेळाडूंबरोबर खूप मोठी चर्चा करावी, असं आम्हाला वाटलं नाही. रात्रीच्या जेवणासाठी आम्ही सर्व एकत्र जमलो. त्या वेळीही क्रिकेटचा विषय केवळ पाच मिनिटांतच संपला. त्यानंतर माइक हॉर्नचं अनुभवकथन सुरू झालं. शेवटचा आठवडाभर माइकने त्याच्या जगभरातील प्रवासाचे अनेक चित्तथरारक अनुभव आम्हाला सांगितले. विषुववृत्तावरून स्वत:च योग्य दिशा ठरवत त्याने संपूर्ण पृथ्वीगोलाचा प्रवास केला होता. त्या प्रवासात त्याच्यापाशी एकही स्वयंचलित वाहन नव्हतं. त्यानंतर तर त्याने आणखी धाडसी प्रयोग केला. सहा महिन्यांची रात्र असणाऱ्या कालखंडात तो उत्तर ध्रुवापर्यंत चालत गेला. त्या प्रवासात अनेक जिवावर बेतणारे प्रसंग त्याच्यावर ओढवले. एक छोटीशी चूकही त्याला मरणाच्या दारात नेऊ शकत होती. एवढा मानसिक ताण त्याने कसा सहन केला असेल, याची आम्ही कल्पनाही करू शकत नव्हतो. त्याचे अनुभव ऐकताना अंगावर काटा येत होता. आम्ही आजपर्यंत साधं-सरळ जीवन जगलो होतो. उद्याचा दिवस कसा उजाडेल, याची आम्हाला कधीच काळजी नसायची. माइकला मात्र त्या वेळी पुढच्या क्षणाचीही शाश्वती नसायची. माइकचे अनुभव ऐकून आमचा दृष्टिकोन बदलला. कुठल्याही संघर्षाबद्दल आणि तणावाबद्दल वाटणारी भीतीच आमच्या

मनातून नाहीशी झाली. विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्याला निर्भयपणे सामोरं जायला आम्ही सज्ज झालो.

अहमदाबाद आणि मोहालीला मी सामन्याच्या आदल्या रात्री झोपू शकलो नव्हतो. मुंबईला अंतिम सामन्याच्या आदल्या रात्री मात्र मला गाढ झोप लागली. दुसऱ्या दिवशी सकाळी लवकरच आम्ही मैदानावर जाण्यासाठी निघालो. बसमधून जात असताना आजूबाजूचे मोकळे रस्ते पाहून मी चकित झालो. सुरक्षाव्यवस्था इतकी कडक होती, की आमच्या बसच्या मार्गात कोणालाही उभं राहू दिलं नव्हतं. वानखेडेला पोचल्यावर मात्र वेगळंच चित्र पाहायला मिळालं. सामना सुरू होण्याआधी कित्येक तास वानखेडे स्टेडियम प्रेक्षकांनी खच्चून भरलं होतं.

आम्ही सरावाला सुरुवात केली तेव्हा स्टेडियममध्ये एखाद्या अॅंफिथिएटरसारखं चैतन्यमय वातावरण निर्माण झालं होतं. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर कमालीची उत्कंठा दिसत होती. भारताचा संघ मायभूमीवर सर्वांत महत्त्वाचा सामना खेळणार होता. आजपर्यंत घरच्या मैदानावर कोणत्याही देशाने विश्वचषक जिंकलेला नव्हता. आजचा दिवस आमचा ठरला, तर आमची 'विश्वविजेते' अशी कायमची ओळख होणार होती.

अंतिम सामना

सामन्याची सुरुवात आम्ही फारच छान केली. त्याचं श्रेय झहीरच्या सुरेख गोलंदाजीला आणि युवराज व रैनाच्या उत्कृष्ट क्षेत्ररक्षणाला जातं. झहीरची गोलंदाजी इतकी अचूक टप्प्यावर होती की, त्याच्या लागोपाठच्या तीन षटकांत एकही धाव निघाली नाही. श्रीलंकेच्या सलामीचा फलंदाज उपुल थरंगा दोन धावा काढून बाद झाला. झहीरच्या गोलंदाजीवर वीरूने स्लिपमध्ये त्याचा अप्रतिम झेल घेतला आणि आम्ही श्रीलंकेला पहिला धक्का दिला. एका बाजूने झहीर प्रभावी मारा करत होता. परंतु श्रीशांतला मात्र गोलंदाजीची दिशा सापडत नव्हती. हरभजन व मी – मिड ऑफ आणि मिड ऑनला उभे होतो. ''तुझा चेंडू जेव्हा योग्य टप्प्यावर पडेल तेव्हा तुला नक्की विकेट मिळेल,'' असं सांगत आम्ही दोघेही त्याला सतत प्रोत्साहन देत होतो. आपली तब्येत बरी नसल्याचं तो म्हणाला. मात्र मुंबईच्या त्या कडक उन्हामध्ये त्याही अवस्थेत त्याने आपल्या प्रयत्नात जराही कसूर केली नाही. विश्वचषक स्पर्धेत यशस्वी होण्यासाठी अनेकदा तुमच्या सहनशक्तीची कसोटी पाहिली जाते.

कुमार संगकारा व महेला जयवर्धने ह्या श्रीलंकेच्या दोन कसलेल्या फलंदाजांनी आम्हाला चांगली लढत देण्याचा प्रयत्न केला. अशा वेळी आम्हाला हवा असलेला बळी मिळवून द्यायचं काम युवराजने त्या स्पर्धेत सातत्याने केलं होतं. कुमार संगकाराचीही विकेट त्यानेच घेतली. संगकारा ४८ धावांवर धोनीच्या हाती झेल देऊन बाद झाला. जयवर्धनेने मात्र विश्वचषक स्पर्धेतील अंतिम सामन्यात संस्मरणीय शतक ठोकत आपल्या संघाला सुस्थितीत नेलं. श्रीलंकेने आमच्यासमोर २७४ धावांचं लक्ष्य ठेवलं.

ही धावसंख्या आमच्यावर दडपण येण्याएवढी नक्कीच मोठी नव्हती. तरीही सुरुवातीच्या षटकांत चांगली भागीदारी रचणं आवश्यक होतं. खेळपट्टी फलंदाजांना पोषक होती. सामन्याच्या उत्तरार्धात तर फलंदाजी करणं अधिकच सोपं जाणार होतं. मैदानावर दव पडलं होतं. माझ्या मते चेंडू मुद्दाम ओला करण्यासाठी आम्हाला उंचावरून ३० यार्डांपलीकडे फटके मारण्याची गरज होती. चेंडू ओला झाला तर तो स्विंगही होऊ शकत नाही. दुर्दैवाने पहिल्याच षटकात सेहवाग शून्यावर बाद झाला. त्यामुळे गंभीरला व मला संयमाने फलंदाजी करत डावाला आकार देणं भाग पडलं. दोन चौकार मारत मी चांगली सुरुवात केली. मात्र मलिंगाच्या एका चेंडूचा माझा अंदाज साफ चुकला. चेंडू आता स्विंग होऊ शकणार नाही, असा माझा समज झाला होता. त्यामुळे मलिंगाच्या त्या ऑफ स्टम्पबाहेरील चेंडूवर मी ड्राइव्ह मारण्याचा प्रयत्न केला. तो चेंडू मात्र स्विंग झाला. माझ्या बॅटच्या बाहेरच्या कडेला स्पर्श करत तो संगकाराच्या हातात गेला. मी १८ धावा काढून बाद झालो. पॅव्हिलियनमध्ये परतताना माझी झालेली निराश अवस्था मी कधीच विसरू शकणार नाही. विराट कोहली गंभीरच्या साथीला आला तेव्हा आमची परिस्थिती नाजूक झाली होती. अजून एक-दोन विकेट पडल्या असत्या तर आम्ही चांगलेच अडचणीत आलो असतो. विराटने पहिल्याच सामन्यात बांगलादेशविरुद्ध शतक झळकवलं होतं. अंतिम सामन्यातली त्याची खेळीही

संघासाठी खूपच उपयुक्त ठरली. त्याच्या योगदानाचं अनेकदा फारसं कौतुक केलं जात नाही. मात्र त्याने काढलेल्या ३५ धावांमुळे आमचा डाव स्थिरावण्यास खूपच मदत झाली. गंभीर व विराटने अतिशय जलदगतीने धावा काढल्या होत्या. त्यामुळे आवश्यक धावगती कधीच आमच्या आवाक्याबाहेर गेली नव्हती. विराट बाद झाल्यावर धोनी पाचव्या क्रमांकावर फलंदाजीला आला. श्रीलंकेचे ऑफ स्पिनर्स मुरलीधरन, रणदीव व दिलशान यांची गोलंदाजी व्यवस्थितपणे खेळून काढण्याची क्षमता धोनीपाशी निश्चितच होती. गंभीर व धोनीने केलेली १०९ धावांची भागीदारीच आम्हाला विजय मिळवून देण्यास कारणीभूत ठरली. प्रचंड दडपण असतानाही दोघांनी केलेली फलंदाजी खरोखरच असामान्य दर्जाची होती.

भारताचं विश्वविजेतेपदाचं स्वप्न प्रत्यक्ष साकार होतानाचा अनुभव त्या रात्री करोडो भारतीयांनी याचि देही याचि डोळा घेतला. मी मात्र त्या विजयाच्या क्षणाचा साक्षी नव्हतो, हे मला कबूल करावंच लागेल. खरं म्हणजे नोव्हेंबर, १९८९मध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळू लागल्यापासून ते एकच स्वप्न मी अहोरात्र पाहिलं होतं. वानखेडे स्टेडियममध्ये त्या रात्री धोनीने जेव्हा विजयी षटकार मारला तेव्हा मी ड्रेसिंग रूममध्ये वीरेंद्र सेहवागच्या शेजारी बसून प्रार्थना करत होतो. आम्हाला विजय मिळवून देण्यासाठी मदत कर, अशी मी परमेश्वरापाशी मुळीच प्रार्थना करत नव्हतो. आम्हाला – भारतीय क्रिकेटला व भारतीय क्रिकेट संघाला – सर्वोत्तम यश प्राप्त होऊ दे, एवढंच साकडं मी ईश्वराला घातलं होतं. त्या रात्री मी खूपच अंधश्रद्ध झालो होतो. वीरूलासुद्धा मी माझ्या शेजारी एकाच जागी बसायला लावलं होतं. धोनीने मारलेला शेवटचा शॉट सीमारेषेवरून जाईपर्यंत आम्ही दोघेही ड्रेसिंग रूमच्या बाहेर पडलो नव्हतो. भारताचा विजय अगदी जवळ येऊन ठेपल्यावर वीरूला बाहेर जावंसं वाटत होतं. मात्र प्रत्यक्ष विजय मिळेपर्यंत मी त्याला जागेवरून हलू दिलं नव्हतं. मी त्याला म्हटलं, ''विजयाचा क्षण तुला टीव्हीवर नंतर शेकडो वेळा पाहता येईल. आत्ता मात्र तू आहे तिथेच बसून शांतपणे प्रार्थना कर.'' धोनीने विजयी षटकार मारल्याचं समजल्यावर मात्र आम्ही मैदानात धावत सुटलो.

'विजयाच्या क्षणी तुझ्या मनात नेमक्या कोणत्या भावना होत्या,' असा प्रश्न त्यानंतर अनेकांनी मला विचारला. 'आम्ही विश्वचषक जिंकलाय', यावर विश्वास ठेवणंच मला सुरुवातीला काही वेळ कठीण गेलं. स्पर्धेमध्ये अजून एखादा सामना शिल्लक आहे, असंच काहीसं मला वाटत राहिलं. मात्र मी धावत जाऊन आनंदाने थरथरणाऱ्या युवीला जेव्हा घट्ट आलिंगन दिलं, तेव्हा मला भावना आवरणं शक्य झालं नाही. अवघं आयुष्य बदलून टाकणारा तो सोनेरी क्षण होता. तो क्षण कधी संपूच नये, असं मला वाटून गेलं. काही खेळाडू अत्यानंदाने ओरडत होते. काही जण अत्यानंदानेच ढसढसा रडत होते. प्रेक्षकांच्या आनंदाला तर पारावार राहिला नव्हता. स्टेडियममध्ये गोल फेरी मारून सर्व प्रेक्षकांना अभिवादन करायचं आम्ही ठरवलं.

विराट आणि युसुफ पठाणने आपल्या खांद्यावर मला उचलून घेतलं. कोणीतरी माझ्या हातात भारताचा तिरंगा दिला. तो स्वप्नपूर्तीचा क्षण होता. आम्ही विश्वचषक जिंकला होता. माझ्या सहकाऱ्यांनी मला कौतुकाने उचलून धरलं होतं. प्रत्येक भारतीयाला प्राणाहून प्यारा असणारा तिरंगा माझ्या हातात फडकत होता. मला याहून जास्त काय हवं होतं? प्रामाणिकपणे सांगायचं तर आयुष्य सर्वार्थाने पूर्ण झाल्यासारखं वाटत होतं. माझ्या क्रिकेट प्रवासातला तो कृतकृत्यतेचा क्षण होता. त्या जल्लोषातही मात्र 'मला खाली पाडू नकोस', असं युसुफ पठाणला मी सांगितल्याचं मला आठवतं. त्यावर तो म्हणाला, *''गिर जाएंगे पर आपको नीचे नही आने देंगे।''*

तो सगळाच चकित करणारा अनुभव होता. त्यापूर्वी मन इतकं शांत, समाधानी झाल्याचं मला तरी आठवत नाही. सारा व अर्जुन कुठे बसले असतील याचा मला साधारण अंदाज होता. मी त्या दिशेने जोरजोरात हात हलवला. त्या दोघांचं माझ्याकडे लक्ष जाऊन ते मैदानावर माझ्यासोबत यावेत, अशी माझी इच्छा होती. सुदैवाने त्यांचं माझ्याकडे लक्ष गेलं. दोघेही धावत मैदानात आले. घरच्यांबरोबर तो आनंदाचा क्षण उत्कटपणे अनुभवताना मी भारावून गेलो.

अंजली सामना पाहण्यासाठी स्टेडियमवर आली नव्हती. सामना प्रत्यक्ष न पाहण्याच्या तिच्या अंधश्रद्धेवर ती ठाम राहिली होती. भारताने विजय मिळवल्यानंतर ती वानखेडे स्टेडियमवर यायला निघाली. आमचं घर ते वानखेडे स्टेडियम या छोट्या प्रवासात तिला गमतीशीर अनुभव आले. त्या रात्री काहीही घडणं संभव होतं. रस्त्यावरून जाणाऱ्या गाड्यांवर स्त्री-पुरुष उड्या मारत बेहोषपणे नाचत होते. कुणीही त्यावर हरकत घेत नव्हतं. तोपर्यंत देशवासीयांनी तसा अनुभव पूर्वी कधीच

घेतला नव्हता. वानखेडेला जाण्यासाठी अंजलीने गाडी वळवली आणि काही जण गाडीवर चढून नाचायचा प्रयत्न करू लागले. अचानक तिथल्या काही मुलांनी अंजलीला ओळखलं. कुणीतरी म्हणाले, *''अरे, ये उनकी गाडी है, उनको जाने दो, उनके जाने के बाद हम लोग नाचेंगे।''* ते अगदी बोलल्यासारखं वागले. अंजली मुख्य दरवाजातून आत जाताच ते गाडीवर चढून नाचू लागले. गाडीला अनेक ठिकाणी पोचे आले. गाडीची ती अवस्था पाहताना प्रत्येक वेळी आम्हाला विश्वचषक विजयाची आठवण होत असे.

त्या विश्वचषक विजयाशी आणखीही एक आठवण निगडित आहे. भारतीय संघातील माझ्या सर्व सहकाऱ्यांनी तो विजय मला समर्पित केला. त्या क्षणी मी गहिवरून गेलो होतो. बक्षीस समारंभ संपल्यावर ड्रेसिंग रूममधला समारंभ सुरू झाला. पहिली शॅम्पेनची बाटली माझ्या हातात सोपवण्यात आली. संघातील प्रत्येकाची मी त्या बाटलीवर स्वाक्षरी घेतली. आजही ती बाटली माझ्या घरात डौलाने उभी आहे.

आम्ही अनेक प्रकारे तो विजय साजरा केला. त्या रात्रीचा प्रत्येक क्षण कॅमेऱ्यात टिपला जात होता. असंख्य फोटो काढले गेले. आधी खेळाडूंनी एकमेकांसोबत फोटो काढले. त्यानंतर गॅरीबरोबर फोटो काढण्यासाठी प्रत्येक जण उत्सुक होता. भारतीय संघाचा प्रशिक्षक म्हणून गॅरीचा तो अखेरचा सामना होता. पॅडी अप्टन आणि माइक हॉर्नचाही आमच्या विजयात महत्त्वाचा वाटा होता. ते दोघेही आम्हाला सामील होताच ड्रेसिंग रूममधल्या उत्साहाला अधिकच उधाण आलं. ती वेळ मोठ्यांनी लहान मुलांसारखी धमाल करण्याची होती.

संघातला प्रत्येक खेळाडू हातात विश्वचषक घेऊन मिरवत होता. मी ड्रेसिंग रूममधून बाहेर आलो. मला बाहेरच्या वातावरणाची मजा चाखायची होती. स्टेडियममधील गर्दी जराही कमी झाली नव्हती. प्रत्येक जण आपापल्या मोबाइलमधून मैदानातलं दृश्य टिपण्याचा प्रयत्न करत होता. अचानक माझं लक्ष सुधीर गौतमकडे गेलं. सुधीर गौतमला आता प्रत्येक जण ओळखू लागला होता. तो आपलं अंग भारतीय ध्वजाच्या तीन रंगांनी रंगवून घेत असे. त्यावर 'तेंडुलकर' ही अक्षरं व त्याखाली '१०'चा आकडाही ठळकपणे रंगवलेला असे. अखंड सुरू असलेल्या फटाक्यांच्या आतषबाजीने व सुधीरच्या हातातील शंखध्वनीने स्टेडियममध्ये एक अद्भुत चैतन्यमय वातावरण निर्माण झालं होतं.

मी सुधीरला खूण करून आमच्याबरोबर ड्रेसिंग रूममध्ये सामील व्हायला सांगितलं. आमच्या आनंदात मला सुधीरलाही सहभागी करून घ्यावंसं वाटलं. माझ्या अनपेक्षित आमंत्रणाने सुधीर एकदम बावचळून गेला. क्षणभर त्याचा विश्वासच बसेना. सुरक्षा अधिकाऱ्यांच्या मदतीने मी त्याला ड्रेसिंग रूममध्ये घेऊन आलो. मी त्याच्या हातात विश्वचषक देताच तो अंतर्बाह्य थरारून गेला. त्या क्षणाची त्याने कधी अपेक्षाही केली नव्हती. त्याच्या चेहऱ्यावरील आनंद पाहून मला खूप समाधान वाटलं. विश्वचषक स्पर्धेतल्या आमच्या प्रत्येक सामन्यात तो आवर्जून उपस्थित असायचा. चाहत्यांच्या मनात आमच्याबद्दल जितका आदर असतो, तितकाच आदर आम्हालाही त्यांच्याबद्दल वाटत असतो, हेच मला त्यातून सूचित करायचं होतं. मला तर स्टेडियममध्ये असलेल्या प्रत्येकाच्या हातात विश्वचषक द्यावा असं वाटत होतं.

प्रत्येक खेळाडूचे कुटुंबीयही आता ड्रेसिंग रूममध्ये दाखल झाली होते. मला आठवतं, सारा व अर्जुनला जवळ घेऊन मी त्यांना विश्वचषक विजयाचं महत्त्व समजावून सांगितलं होतं. मी त्यांना म्हटलं, ''हे आयुष्यातलं सर्वोच्च शिखर आज मी गाठलंय. यापलीकडे आता मला मिळवण्यासारखं काहीही राहिलेलं नाही.'' त्यानंतर जवळजवळ दोन तासांनी आम्ही हॉटेलमध्ये जाण्यासाठी निघालो. स्टेडियम ते हॉटेल हा खरंतर काही मिनिटांचाच प्रवास होता, पण त्या रात्री आम्हाला हॉटेलमध्ये पोचायला एक तास लागला. अतिशय मंदगतीने झालेला तो प्रवास मात्र माझ्या आयुष्यातील एक विलक्षण संस्मरणीय प्रवास होता. सकाळी वानखेडेला जाताना मला रस्त्यावर एक चिटपाखरूदेखील दिसलं नव्हतं. पण आता मात्र रस्त्यावर लोकांचा महासागर उसळला होता.

मरीन ड्राइव्हवरचं त्या रात्रीचं दृश्य खरोखरच पाहण्यासारखं होतं. १९८३मध्ये भारताने जेव्हा पहिल्यांदा विश्वचषक जिंकला होता तेव्हा मी १० वर्षांचा होतो. त्या वेळी रस्त्यावर येऊन नाचत आनंद साजरा केल्याचं मला अंधूक आठवत होतं. आजचा हा विजयी क्षण मात्र सर्वस्वी आमचा होता. आम्ही मुक्त झालो होतो. क्रिकेटमधलं एव्हरेस्ट आम्ही पादाक्रांत केलं

होतं. मुंबईच्या रस्त्यारस्त्यावर जमलेल्या प्रत्येकाचा चेहरा आनंदाने उजळून निघाला होता. आम्ही आमच्या चाहत्यांना खूश केलं होतं. आम्हा सर्व खेळाडूंसाठी तेच सर्वांत मोठं समाधान होतं.

संस्मरणीय रात्र

ताजमहाल पॅलेस हॉटेलच्या प्रवेशद्वारापाशी सुरक्षारक्षकांनी कडं केलं होतं. स्वागतकक्षामध्ये लोक दाटीवाटीने उभे होते. आम्ही हॉटेलात प्रवेश करताच शॅम्पेनची बाटली देऊन आमचं स्वागत करण्यात आलं. भारतीय संघाच्या सन्मानार्थ एक खास केक बनवला होता. केक कापण्याचा मान मला दिला गेला. केक कापून आम्ही सहाव्या मजल्यावर गेलो. सहाव्या मजल्यावरच्या सर्व खोल्या खेळाडूंसाठी खास राखून ठेवल्या होत्या. विजयोत्सवाच्या दुसऱ्या फेरीला आता आरंभ होणार होता.

रूममध्ये गेल्यावर अंजलीने व मी एकमेकांसाठी मद्याचे पेले भरत मुक्तपणे आनंद साजरा केला. खोलीत पुष्पगुच्छांचा खच पडला होता. त्यातील काही फुलं उचलून आम्ही ती आमच्या कानामागे अडकवली. खोलीत सुरू असलेल्या संगीतावर हळूहळू आमची पावलं थिरकू लागली. आम्हाला आता कुठल्याच बंधनात स्वत:ला अडकवून ठेवायचं नव्हतं. विश्वचषक विजयाची ती अविस्मरणीय रात्र होती. फार क्वचितच असं भाग्य कुणाच्या वाट्याला येतं! आम्ही भान विसरून नृत्य करू लागलो. तो साफल्याचा क्षण होता. सर्व मेहनत सार्थकी लागली होती. आजपर्यंत खेळासाठी अनेकदा कुटुंबाचा विरह सोसला होता. मुलांची वाढ होत असताना त्यांच्याजवळ राहता न आल्याचं शल्य उराशी बाळगलं होतं. आज मात्र मनावरचे ते सारे व्रण पुसले गेले होते. 'माझे वडील २०११च्या विश्वचषक विजेत्या भारतीय संघातून खेळले होते,' असं आता माझी मुलं सर्वांना अभिमानाने सांगू शकणार होती.

पहाटेपर्यंत पार्टी सुरू होती. सर्व खोल्यांमधून दणक्यात संगीत सुरू होतं. प्रत्येक रूमचा दरवाजा सताड उघडा होता. कोणीही कुठल्याही रूममध्ये शिरून ड्रिंक घेत मनमुराद मजा करत होते. विराट, भज्जी आणि युवीने मात्र काही वेळ मला चांगलंच अवघडून टाकलं. माझ्यासमोर तिघेही गुडघे टेकून बसले आणि त्यांनी 'रबने बना दी जोडी' या चित्रपटातील *'तुझ में रब दिखता है, यारा मै क्या करूँ'* हे गाणं जोरजोरात म्हणायला सुरुवात केली.

रात्री तीन वाजता सर्वांना वरच्या मजल्यावर बोलावण्यात आलं. संघ व्यवस्थापनाने आणखी एका खास पार्टीचं आयोजन केलं होतं. पाचच्या सुमारास मी थोडी झोप घेण्यासाठी रूममध्ये परतलो. या वेळी मात्र मी खोलीचा दरवाजा आतून बंद केला. कारण अजूनही पार्टी जोरात सुरू होती आणि कोणीतरी खोलीत शिरून माझी झोपमोड करण्याची शक्यता होती.

सकाळी सात वाजता झहीर खान आणि आशिष नेहरा माझ्या रूमचा दरवाजा जोरजोरात ठोठावू लागले. त्यांना काय हवंय, हे मला चांगलंच ठाऊक होतं. स्वत:शीच हसत मी पुन्हा झोपी गेलो.

भारत विरुद्ध श्रीलंका

विश्वचषक अंतिम सामना

वानखेडे स्टेडियम, मुंबई, २ एप्रिल, २०११ (दिवस/रात्र)

पंच : ए दार व एसजेए टॉफेल (टीव्ही पंच : आयजे गोल्ड)
निरीक्षक : जेजे क्रो
नाणेफेक : श्रीलंका

श्रीलंका

		धावा	एकूण चेंडू	खेळलेले चेंडू	चौकार	षटकार
डब्ल्यूयू थरंगा	झे सेहवाग गो खान	२	३०	२०	०	०
टीएम दिलशान	गो हरभजन सिंग	३३	८७	४९	३	०
केसी संगकारा*	झे धोनी गो युवराज सिंग	४८	१०२	६७	५	०
डीपीएमडी जयवर्धने	नाबाद	१०३	१५९	८८	१३	०
टीटी समरवीरा	पायचीत गो युवराज सिंग	२१	५३	३४	२	०
सीके कापुगेद्रा	झे रैना गो खान	१	६	५	०	०
केएमडीएन कुलसेखरा	धावबाद (धोनी)	३२	४१	३०	१	१
एनएलटीसी परेरा	नाबाद	२२	१०	९	३	१
एलएल मलिंगा						
एस रणदीव						
एम मुरलीधरन						
अवांतर	(बाइज १, लेग बाइज ३, वाइड ६, नोबॉल २)			१२		
एकूण	(६ गडी बाद) (५० षटकं) **२७४**					

भारत

		धावा	एकूण चेंडू	खेळलेले चेंडू	चौकार	षटकार
व्ही सेहवाग	पायचीत गो मलिंगा	०	२	२	०	०
एसआर तेंडुलकर	झे संगकारा गो मलिंगा	१८	२१	१४	२	०
जी गंभीर	गो परेरा	९७	१८७	१२२	९	०
व्ही कोहली	झे व गो दिलशान	३५	६९	४९	४	०
एमएस धोनी*	नाबाद	९१	१२८	७९	८	२
युवराज सिंग	नाबाद	२१	३९	२४	२	०
एसके रैना						
हरभजन सिंग						
झेड खान						
एमएम पटेल						
एस श्रीशांत						
अवांतर	(बाइज १, लेगबाइज ६, वाइड ८)				१५	
एकूण	(४ गडी बाद) (४८.२ षटकं) **२७७**					

भारत

	षटकं	निर्धाव	धावा	बळी	
खान	१०	३	६०	२	(१ वाइड)
श्रीशांत	८	०	५२	०	(२ नोबॉल)
पटेल	९	०	४१	०	(१ वाइड)
हरभजन	१०	०	५०	१	(१ वाइड)
युवराज	१०	०	४९	२	
तेंडुलकर	२	०	१२	०	(३ वाइड)
कोहली	१	०	६	०	

श्रीलंका

	षटकं	निर्धाव	धावा	बळी	
मलिंगा	९	०	४२	२	(२ वाइड)
कुलसेखरा	८.२	०	६४	०	
परेरा	९	०	५५	१	(२ वाइड)
रणदीव	९	०	४३	०	
दिलशान	५	०	२७	१	(१ वाइड)
मुरलीधरन	८	०	३९	०	(१ वाइड)

गडी बाद होण्याचा क्रम

	श्रीलंका		भारत	
पहिला	१७	(१)	०	(१)
दुसरा	६०	(२)	३१	(२)
तिसरा	१२२	(३)	११४	(४)
चौथा	१७९	(५)	२२३	(३)
पाचवा	१८२	(६)	-	
सहावा	२४८	(७)	-	
सातवा	-	-		
आठवा	-	-		
नववा	-	-		
दहावा	-	-		

सामन्यातील सर्वोत्कृष्ट खेळाडू : एमएस धोनी

भारत ६ गडी राखून विजयी

घरी आनंदीआनंद

अंतिम सामन्यानंतरचा दुसरा दिवस फारच गडबडीत गेला. विश्वविजेत्या संघाचे काही फोटो आयसीसीकडे पाठवणं आवश्यक असतं. सकाळचा काही वेळ ते फोटो काढण्यात गेला. त्यानंतर राजभवनात जाऊन आम्ही तत्कालीन राष्ट्रपती श्रीमती प्रतिभा पाटील ह्यांची भेट घेतली. सर्व कार्यक्रम आटपून अखेर संध्याकाळी मी घरी पोचलो. तो मात्र अतिशय भावपूर्ण प्रसंग होता. माझ्या जिवलग मित्रांनी आणि माझ्या जवळपास राहणाऱ्या लोकांनी ढोल वाजवत व फटाके उडवत माझं जंगी स्वागत केलं. ज्या ज्या वेळी मी काही विशेष कामगिरी करून घरी परतत असे, तेव्हा प्रत्येक वेळी ही सर्व मंडळी मोठ्या उत्साहात माझं स्वागत करत. त्या कौतुकाने मी मात्र खूप अवघडून जात असे. अंजलीला सांगून अनेकदा मी तो कौतुकसमारंभ टाळण्याचा प्रयत्न करत असे. आजचा प्रसंग मात्र वेगळा होता. विश्वचषक जिंकणं ही फार मोठी घटना होती!

आई जेव्हा मला टिळा लावून ओवाळत होती, तेव्हा तिला सार्थ अभिमान वाटावा असं कर्तृत्व माझ्या हातून झाल्याबद्दल मलाही मनातून खूप समाधान वाटत होतं. मुलाकडून असलेल्या तिच्या अपेक्षा मी पूर्ण केल्या होत्या. त्यामुळे तिच्याकडून कौतुक करून घेताना मला वेगळीच धन्यता वाटत होती. माझ्या घरच्यांना आनंद मिळवून दिल्याचा मला अभिमान वाटत होता.

हिंदी चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध अभिनेते अभिषेक बच्चन आणि ऐश्वर्या राय बच्चन खास माझं अभिनंदन करण्यासाठी माझ्या घरी आले. त्यांच्याशी गप्पा मारताना २ एप्रिलचा अंतिम सामना पुन्हा एकदा 'जिवंत' झाला.

आज, मागे वळून पाहताना जे घडलं ते सारं स्वप्नवत वाटू लागतं. घरच्या प्रेक्षकांसमोर एका आठवड्यात आस्ट्रेलिया, पाकिस्तान व श्रीलंकेला हरवून आम्ही विश्वचषक जिंकला, यावर विश्वास ठेवणं मलाच अनेकदा कठीण जातं. पाकिस्तानविरुद्धचा उपांत्य सामना टीव्हीच्या माध्यमातून करोडो प्रेक्षकांनी पाहिला. भारतीय क्रीडा-इतिहासात त्या दिवशी प्रेक्षकांनीही एक वेगळा उच्चांक प्रस्थापित केला, असं मला सांगण्यात आलं. आजही ज्या वेळी त्या बहारदार आठवड्याच्या आठवणी माझ्या मनात जाग्या होतात, तेव्हा प्रत्येक वेळी माझ्या अंगावर रोमांच उभे राहतात.

त्या स्पर्धेत माझी वैयक्तिक कामगिरीही अतिशय समाधानकारक झाली. भारतातर्फे मी त्या स्पर्धेत सर्वाधिक धावा काढल्या. एकूण स्पर्धेत माझा क्रमांक दुसरा होता. ५४च्या सरासरीने दोन शतकांसह माझ्या एकूण ४८२ धावा झाल्या. २२ वर्षांच्या कारकिर्दीनंतरही माझी धावा काढण्याची भूक जराही कमी झाली नव्हती. अजूनही माझ्या हातून सर्वोत्तम कामगिरी घडू शकत होती.

विश्वचषक जिंकल्यानंतर मी एकदिवसीय सामन्यातून निवृत्ती का घेतली नाही, हा प्रश्न माझ्या अनेक मित्रांनी मला विचारला. त्यांच्या मनात अशी शंका येणं रास्तच होतं. मी यशाचं सर्वोच्च शिखर गाठलं होतं. याहून अधिक यश मी मिळवू शकत नव्हतो. विश्वचषक विजयानंतर सर्व भारतीयांच्या भावनाही उचंबळून आल्या होत्या. निवृत्त होण्यासाठी ती अत्यंत योग्य वेळ होती. माझ्या मित्रांचं म्हणणं मला मान्य होतं; पण तसा विचारच माझ्या मनात त्या वेळी आला नव्हता. विश्वचषक जिंकल्याची आठवण मला कायमची माझ्या मनात जपून ठेवायची होती. त्याच वेळी जर मी निवृत्ती जाहीर केली असती, तर विश्वचषकाच्या विजयापेक्षा माझ्या निवृत्तीवर अधिक चर्चा झाली असती. मला तसं व्हायला नको होतं.

भारतीय क्रिकेट संघ अनेक कठीण प्रसंगांतून तावून सुलाखून निघाला होता. प्रत्येक खेळाडूला संघभावना जास्त महत्त्वाची वाटत होती. आपल्या संघासाठी त्याने अनेक गोष्टींचा त्याग केला होता. त्यामुळे विश्वचषक विजयामध्ये प्रत्येकाचाच महत्त्वाचा वाटा होता. क्रिकेट हा अखेर सांघिक खेळ आहे. विश्वविजेत्या भारतीय संघाचा सदस्य असल्याचा मला सार्थ अभिमान होता.

अखेरचं सांगायचं म्हणजे, मला आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून एकदाच कायमची निवृत्ती घ्यायची होती. अनेक निरोप समारंभ घडवून मला त्या प्रसंगातलं महत्त्व मिळमिळीत करायचं नव्हतं. क्रिकेटला माझ्या जीवनात अनन्यसाधारण महत्त्व आहे. क्रिकेटला निरोप देण्याचा दिवसही माझ्या आयुष्यातील अविस्मरणीय दिवस ठरावा, अशी माझी इच्छा होती.

२०११ विश्वचषक स्पर्धेतील भारताचे सामने

पहिला सामना, 'ब'गट. बांगलादेश विरुद्ध भारत. ढाका. १९ फेब्रुवारी, २०११
भारत ३७०-४ (५०/५० षटकं); बांगलादेश २८३-९ (५०/५० षटकं)
भारत ८७ धावांनी विजयी

अकरावा सामना, 'ब' गट. भारत विरुद्ध इंग्लंड. बंगळुरू. २७ फेब्रुवारी, २०११
भारत ३३८ (४९.५/५० षटकं); इंग्लंड ३३८-८ (५०/५० षटकं)
सामन्यात बरोबरी

बाविसावा सामना, 'ब' गट. भारत विरुद्ध आयर्लंड. बंगळुरू. ६ मार्च, २०११
आयर्लंड २०७ (४७.५/५०षटकं); भारत २१०-५ (४६/५० षटकं)
भारत ५ गडी राखून विजयी (२४ चेंडू बाकी)

पंचविसावा सामना, 'ब' गट. भारत विरुद्ध नेदरलँड्स. दिल्ली. ९ मार्च, २०११
नेदरलँड्स १८९ (४६.४/५० षटकं); भारत १९१-५ (३६.३/५० षटकं)
भारत ५ गडी राखून विजयी (८१ चेंडू बाकी)

एकोणतिसावा सामना, 'ब' गट. भारत विरुद्ध दक्षिण आफ्रिका. नागपूर. १२ मार्च, २०११
भारत २९६ (४८.४/५० षटकं); दक्षिण आफ्रिका ३००-७ (४९.४/५० षटकं)
दक्षिण आफ्रिका ३ गडी राखून विजयी (२ चेंडू बाकी)

बेचाळिसावा सामना, 'ब' गट. भारत विरुद्ध वेस्ट इंडीज. चेन्नई. २० मार्च, २०११
भारत २६८ (४९.१/५० षटकं); वेस्ट इंडीज १८८ (४३/५० षटकं)
भारत ८० धावांनी विजयी

दुसरा उपउपांत्य सामना. भारत विरुद्ध आस्ट्रेलिया. अहमदाबाद. २४ मार्च, २०११
आस्ट्रेलिया २६०-६ (५०/५० षटकं); भारत २६१-५ (४७.४/५० षटकं)
भारत ५ गडी राखून विजयी (१४ चेंडू बाकी)

दुसरा उपांत्य सामना. भारत विरुद्ध पाकिस्तान. मोहाली. ३० मार्च, २०११
भारत २६०-९ (५०/५० षटकं); पाकिस्तान २३१ (४९.५/५०षटकं)
भारत २९ धावांनी विजयी

अंतिम सामना. भारत विरुद्ध श्रीलंका. मुंबई. २ एप्रिल, २०११
श्रीलंका २७४-६ (५०/५० षटकं); भारत २७७-४ (४८.२/५० षटकं)
भारत ६ गडी राखून विजयी (१० चेंडू बाकी)

२४.
१००व्या शतकाचे लक्ष्य

विश्वचषक स्पर्धेनंतर भारतीय संघ जून, २०११मध्ये वेस्ट इंडीजच्या दौऱ्यावर जाणार होता. येणाऱ्या वर्षात भारतीय संघासाठी क्रिकेटचं भरगच्च वेळापत्रक आखलेलं होतं. त्या दौऱ्यावर न जाण्यासाठी मी परवानगी मिळवली. गेले आठ महिने मी सतत क्रिकेट खेळत होतो. बराच काळ घरच्यांचा सहवास न मिळाल्यामुळे मी बेचैन झालो होतो. मी जर वेस्ट इंडीजच्या दौऱ्यावर गेलो असतो, तर जवळजवळ सलग २० महिने मी अंजली व मुलांपासून दूर राहिलो असतो. दौऱ्यावर न जाण्याचं आणखी एक कारण म्हणजे त्याच वेळी मुलांचीही उन्हाळ्याची सुट्टी सुरू होणार होती. त्यामुळे मुलांबरोबर भरपूर वेळ राहण्याची मला संधी मिळणार होती. मलाही क्रिकेटपासून काही काळ विश्रांती हवी होती. त्या वेळी मी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ९९ शतकं काढली होती. मात्र १००वं शतक आपण लवकरात लवकर काढण्याचा प्रयत्न करावा, असा विचारही माझ्या मनात कधी डोकावला नव्हता; अर्थात १००वं शतक पूर्ण होण्यासाठी मला अजून एक वर्षाहून जास्त वेळ वाट पाहावी लागणार आहे, असंही मला मुळीच वाटलं नव्हतं.

भारताचा इंग्लंड दौरा, जुलै-ऑगस्ट, २०११

इंग्लंडच्या दौऱ्यावर जाण्यासाठी मी जुलै, २०११मध्ये भारतीय संघात पुन्हा दाखल झालो. इंग्लंडचा दौरा नेहमीच आव्हानात्मक असतो. या वेळी तर इंग्लिश संघामध्ये नवचैतन्य आलं होतं. अँड्र्यू स्ट्रॉसच्या नेतृत्वाखाली इंग्लंडने आस्ट्रेलियात जाऊन 'ॲशेस मालिका' जिंकली होती. आम्ही कसोटी क्रिकेटमध्ये पहिल्या स्थानावर होतो. इंग्लंडला आम्ही नक्कीच कडवी लढत देऊ, अशी सर्वांचीच अपेक्षा होती. भारतीय संघाचे नवे प्रशिक्षक म्हणून डंकन फ्लेचर यांची नियुक्ती झाली होती. काही वर्षांपूर्वी ते इंग्लिश संघाचे प्रशिक्षक होते. त्या वेळी इंग्लंडला त्यांनी यशाच्या शिखरावर नेलं होतं. आता फ्लेचर आमच्या बाजूने असल्यामुळे कसोटी मालिकेला एका वेगळीच खुमारी आली होती.

दौऱ्याची सुरुवात माझ्यासाठी फारशी चांगली झाली नाही. टाँटनला आम्ही सॉमरसेटविरुद्ध पहिला सराव सामना खेळत होतो. सामन्याच्या सुरुवातीलाच मला माझं पाऊल त्रास देऊ लागलं. आम्ही क्षेत्ररक्षण स्वीकारलं होतं. उपाहारापर्यंत पायाच्या बोटातल्या वेदना एवढ्या वाढल्या की, त्यावर उपचार करून घेण्यासाठी मला मैदान सोडावं लागलं. मी लंडनला काही स्कॅन्स करून घेतले. सेसामॉइड हाडांना पुन्हा सूज आल्याचं त्यात निष्पन्न झालं. सुदैवाने दुखापत फार गंभीर नव्हती. मी चारही कसोटी सामने खेळू शकलो.

२१ जुलै, २०११ला लॉर्ड्सच्या पहिल्या कसोटीत आम्ही चांगली सुरुवात केली. झहीरने पहिल्या काही षटकांतच अँड्र्यू स्ट्रॉसचा महत्त्वाचा बळी मिळवला. मात्र उपाहारानंतर थोड्याच वेळात हॅमस्ट्रिंग दुखावल्यामुळे झहीरला पॅव्हिलियनमध्ये परतावं लागलं. आमच्यासाठी तो फार मोठा धक्का होता. नशिबाला बोल लावण्याखेरीज अशा परिस्थितीत तुम्ही दुसरं काहीच करू शकत नाही. त्यानंतर उपचारासाठी झहीरला भारतात परतावं लागल्यामुळे आम्हाला मालिकेत त्याची उणीव प्रकर्षाने भासली.

मला आठवतं, झहीरने ज्या वेळी कसोटी सामन्यात पदार्पण केलं होतं, त्याच दिवशी मी त्याची देहयष्टी पाहून त्याला एक महत्त्वाचा सल्ला दिला होता. मी त्याला म्हटलं, ''तुला तुझ्या तंदुरुस्तीची खूपच काळजी घ्यावी लागणार आहे. त्यासाठी तुला सतत वर्षभर गोलंदाजीचा सराव करायला हवा.'' त्याच्या शरीराची ठेवणच अशी होती की, स्वत:ला फिट ठेवण्यासाठी

त्याला इतरांपेक्षा जास्त मेहनत घेणं आवश्यक होतं. २००५मध्ये मी त्याला कौंटी क्रिकेट खेळण्याचा आग्रह केला. इंग्लंड कौंटीचा पहिला हंगाम खेळल्यानंतर त्याच्यात लक्षणीय बदल झाला होता. तो एक परिपक्व गोलंदाज झाला. त्यानंतर त्याने भारताला अनेकदा एकहाती विजय मिळवून दिले.

झहीरच्या दुखापतीनंतर आमच्यासमोर अडचणींची मालिकाच सुरू झाली. दुसऱ्या कसोटीत हाताचं बोट फ्रॅक्चर झाल्यामुळे आम्हाला युवराजला गमवावं लागलं. त्यानंतर भज्जीच्या पोटातील स्नायूला दुखापत झाली. मैदानावर जोरात आपटल्यामुळे गंभीरच्या डोक्याला दुखापत होऊन त्याचं डोकं बधिर झालं होतं. त्यामुळे तो चौथ्या कसोटीत सलामीला येऊ शकला नव्हता. वीरूच्या खांद्यावर शस्त्रक्रिया झाली होती. पहिले दोन कसोटी सामने तो खेळू शकला नाही. आमच्या अडचणी सांगून मला इंग्लंडने मिळवलेल्या विजयाचं श्रेय हिरावून घ्यायचं नाही. ते दर्जेदार क्रिकेट खेळले, यात शंकाच नव्हती. परंतु एकाच वेळी अनेक महत्त्वाचे खेळाडू जायबंदी झाल्यामुळे भारतीय संघाला त्यातून सावरणं खूपच अवघड गेलं.

लॉर्ड्सच्या कसोटीत फलंदाजी करताना माझ्यासमोर एक नवीनच अडचण उभी राहिली. न्यू मीडिया सेंटरच्या बाजूने येणाऱ्या गोलंदाजाच्या हातातला चेंडू मला नीट दिसत नव्हता. इंग्लंड संघात ख्रिस ट्रेमलेट आणि स्टुअर्ट ब्रॉडसारखे खूपच उंच गोलंदाज होते. पांढऱ्या साइट स्क्रीनच्या वर काळ्या रंगाच्या पायऱ्या होत्या. गोलंदाजी करताना उंच गोलंदाजांचा हात साइट स्क्रीनच्या वर जात असे. पायऱ्यांच्या काळ्या रंगामुळे मला त्यांच्या हातातला चेंडू दिसत नसे. गोलंदाजाच्या मनगटाचं नीट निरीक्षण न करता आल्यामुळे चेंडूचा टप्पा पडल्यावरच मला त्याचा अंदाज घ्यावा लागे. त्यामुळे प्रत्यक्ष चेंडू खेळण्यासाठी माझ्यापाशी फारच कमी वेळ उरत असे. पॅव्हिलियनच्या बाजूने मात्र मला कोणतीच अडचण जाणवत नव्हती.

सामना संपल्यानंतर एमसीसी अध्यक्ष ख्रिस्तोफर मार्टिन-जेनकिन्सना मी माझी अडचण सांगितली. कसोटी मालिका संपल्यावर एकदिवसीय मालिकेतील एक सामना लॉर्ड्सवर खेळला जाणार होता. त्याआधी 'मी तुझी अडचण दूर करण्याचा प्रयत्न करतो' असं आश्वासनही त्यांनी मला दिलं. परंतु मी त्या सामन्यात खेळू शकलो नाही. अलीकडेच जुलै, २०१४मध्ये मला लॉर्ड्सवर खेळण्याचा योग आला. एमसीसी संघ विरुद्ध विश्व संघ यांच्यात महोत्सवी सामना होता. मी एमसीसी संघाचा कर्णधार होतो, तर शेष विश्व संघाचं नेतृत्व शेन वॉर्न करत होता. त्या सामन्यापूर्वी मी पुन्हा एकदा साइट स्क्रीनची अडचण बोलून दाखवली. साइट स्क्रीनची उंची ते वाढवू शकत नव्हते. मी त्यांना साइट स्क्रीनच्या वर असलेल्या पायऱ्यांना पांढरा रंग लावण्यास सुचवलं. त्यांनी माझी सूचना लगेच अमलात आणली. त्या सामन्यात मला पीटर सिडलची गोलंदाजी खेळावी लागली. सिडल हा ट्रेमलेट किंवा ब्रॉडएवढा उंच नसल्यामुळे मला साइट स्क्रीनची अडचण जाणवलीच नाही.

मला लॉर्ड्स मैदान खूप आवडतं. तरीही एक गोष्ट मात्र मला कबूल करावी लागेल की, लॉर्ड्सवर मी कधीही मुक्तपणे फलंदाजी करू शकलो नाही. लॉर्ड्स मैदानाच्या एका बाजूकडून दुसऱ्या बाजूपर्यंत असलेल्या उताराशी जमवून घेणं मला नेहमीच अवघड गेलं. त्यासाठी मी खूप प्रयत्न करून पाहिले, पण त्याचा फारसा उपयोग झाला नाही. मला आठवतं, एका मॅचमध्ये ख्रिस लेवीस पॅव्हिलियनच्या बाजूने गोलंदाजी करत होता. त्याचे चेंडू अधिकतर इनस्विंगर्स असायचे. मैदानाचा उतार लक्षात घेता त्याचा चेंडू नेहमीपेक्षा अधिक आत येईल अशी मी अपेक्षा केली. त्यामुळे मी चेंडूच्या रेषेच्या अलीकडे राहून खेळायला गेलो. माझा अंदाज चुकला. चेंडू बॅटच्या बाहेरून गेला आणि माझा त्रिफळा उडाला.

२०११च्या लॉर्ड्स कसोटीत खेळताना मी तिसऱ्या दिवशी संध्याकाळी व्हायरल इन्फेक्शनमुळे आजारी पडलो. त्या संध्याकाळी माझा मित्र आणि भारताचा माजी आंतरराष्ट्रीय खेळाडू अतुल बेदाडे मला भेटायला आला होता. अतुलने मला अनेकदा अडचणीच्या वेळी मदत केली आहे. आपल्याला बरं वाटत नाहीये, असं मला हॉटेलमध्ये पोचताच जाणवलं. मी लगेच पॅरासेटामॉलची गोळी घेतली. रात्रीचं जेवणही मी खोलीतच लवकर मागवलं. जेवण झाल्यावर मी अतुलला म्हटलं, ''तू आता गेलास तरी चालेल.'' परंतु अतुल मला त्या स्थितीत एकटा सोडून जायला तयार झाला नाही. त्या रात्री तो रूममधल्या सोफ्यावर झोपला.

मध्यरात्रीच्या सुमारास माझी तब्येत अधिकच बिघडली. दुसऱ्या दिवशी सकाळी तर मला बिछान्यातून उठणंही अशक्य झालं. अतुलने लगेच आमचा फिजिओ, आशिष कौशिकला बोलावलं. आशिषने मला सक्त विश्रांतीचा सल्ला दिला. सामना

सुरू असतानाच्या काळात एखाद्या दिवशी सकाळीच मी मैदानावर न जाऊ शकल्याची ती पहिलीच वेळ होती. त्या दिवशी दुपारी उशिरापर्यंत मी माझ्या रूममध्ये झोपलेलो होतो. टेलिव्हिजनवर मी धावफलक पाहिला आणि आमच्या मॅनेजरला फोन करून मी शेवटच्या सत्रात मैदानावर उतरलो. दुसऱ्या डावात मला फलंदाजी करावी लागणार, हे ठाऊक असल्यामुळेच मी मैदानात जायचा निर्णय घेतला.

संघाला मी फारशी मदत करू शकणार नाही हे समजत असूनही, मी इंग्लिश संघाचा डाव संपत असताना मुद्दाम क्षेत्ररक्षणासाठी मैदानात आलो. नाहीतर मला पाचव्या दिवशी फलंदाजी करण्याची संधी मिळाली नसती. त्या दिवशी संध्याकाळी माझी स्थिती खूपच वाईट होती. त्यात त्या रात्री माझ्या रूममधल्या एअरकंडिशनरमध्येही बिघाड झाला. त्यातून पाण्याची गळती सुरू झाल्याने खोलीतलं सामान ओलं झालं होतं. पाचव्या दिवशी मी फलंदाजीला उतरलो; पण माझ्या बॅटिंगमध्ये नेहमीसारखा जोम नव्हता. उभं राहतानाही माझा सतत तोल जात होता.

इंग्लंडने पहिली कसोटी अगदी सहज जिंकली. पीटरसन व प्रायरनी शतकं झळकवली. जेम्स अँडरसनने दुसऱ्या डावात आमचे पाच बळी घेतले. २९ जुलैला ट्रेंट ब्रिजमध्ये सुरू झालेल्या दुसऱ्या कसोटीत मात्र आमच्या गोलंदाजांनी इंग्लंडची चांगलीच त्रेधा उडवली. पहिल्या डावात एक वेळ इंग्लिश संघाची स्थिती १२४ धावांवर ८ गडी बाद, अशी झाली. स्वान आणि ब्रॉडच्या दमदार भागीदारीमुळे इंग्लंडने अखेर २२१ धावसंख्येपर्यंत मजल मारली. आम्ही ती धावसंख्या ओलांडली तेव्हा आमचे फक्त चार फलंदाज बाद झाले होते. उरलेले सहा गडी मात्र आम्ही केवळ २० धावांत गमावले. त्या डावात ब्रॉडने सहा विकेट्स घेतल्या. तिथेच आमच्या हातून सामना निसटला.

दुसऱ्या कसोटीत विजयाची संधी असतानाही पराभव पत्करावा लागल्यानंतर उरलेल्या सामन्यात आमची कामगिरी अधिकाधिक खालावत गेली. माझ्या पावलातल्या वेदना कमी होत नव्हत्या. तिसऱ्या कसोटीत तर इंग्लंडने आमचा एका डावाने पराभव केला. बर्मिंगहॅममध्ये अचानक उसळलेल्या दंगलीमुळे त्या कसोटीची सुरुवातच काहीशा तणावपूर्ण वातावरणात झाली होती. आमच्या हॉटेलच्या शेजारी असलेल्या दुकानांची नासधूस करण्यात आली. दौरा रद्द करण्याचीही शक्यता वर्तवली गेली. अखेर परिस्थिती पूर्ण नियंत्रणात असल्याचं दुसऱ्या दिवशी आम्हाला सांगण्यात आलं आणि खेळाला पुन्हा सुरुवात झाली.

दौऱ्यामध्ये आणखीही एकदा असंच भीतिदायक वातावरण निर्माण झालं होतं. एकदिवसीय मालिका सुरू होण्याआधी आम्ही कँटरबरीमध्ये केंटविरुद्ध सामना खेळत होतो. त्या दिवशी खेळ संपताना ड्रेसिंग रूमभोवती अधिकाऱ्यांचा गराडा पडला. आमच्या बसमध्ये एक संशयास्पद खोका सापडला होता. त्याची तपासणी करण्यासाठी पोलिसांच्या बॉम्बशोध पथकाला बोलावण्यात आलं. ड्रेसिंग रूममध्ये जाणं धोकादायक असल्यामुळे आम्हाला मैदानातच थांबण्याच्या सूचना दिल्या होत्या. बऱ्याच वेळानंतर आम्हाला मैदानाच्या मागच्या दाराने बाहेर जाण्याची परवानगी मिळाली. त्या रात्रीही आमच्या हॉटेलशेजारच्या शॉपिंग मॉलमध्ये बॉम्ब ठेवल्याची अफवा पसरली होती. वारंवार घडणाऱ्या त्या घटनांमुळे खेळाडूंच्या मनात असुरक्षिततेची भावना निर्माण होऊ लागली. दुसऱ्या दिवशी सकाळी मात्र परिस्थिती पूर्ण नियंत्रणात आली असल्याची आम्हाला हमी देण्यात आली. त्यामुळे दौरा रद्द होण्याचा धोका टळला.

एजबॅस्टनच्या तिसऱ्या कसोटीत इंग्लंडने पहिल्या डावात ७१० धावांचा डोंगर रचला. विजय मिळवण्यासाठी इंग्लंडला ती धावसंख्या पुरेशी होती. त्या सामन्यात ॲलिस्टर कुकने २९४ धावा काढून आपल्या कारकिर्दीतील सर्वोच्च धावसंख्या नोंदवली. इऑन मॉर्गननेही त्या डावात शतक काढलं. दुसऱ्या डावात मला सूर गवसत असतानाच मी अचानक ४० धावांवर अगदी दुर्दैवीरीत्या बाद झालो. एमएस धोनीने सरळ रेषेत एक ड्राइव्ह मारला. तो चेंडू स्वानच्या हाताला लागून स्टम्प्सवर आदळला. मला धावबाद होऊन पॅव्हिलियनमध्ये परतावं लागलं. त्या दौऱ्यात एकही गोष्ट आमच्या मनासारखी होत नव्हती. चौथ्या व अखेरच्या कसोटीसाठी आम्ही जेव्हा ओव्हल मैदानावर पोचलो तेव्हा आमचं मनोधैर्य कमालीचं खालावलेलं होतं. सर्वांत वाईट गोष्ट म्हणजे लागोपाठ तीन कसोटी सामने हरल्यामुळे आम्ही आमचं पहिलं स्थानही गमावलं होतं.

९९वर अडकलो

विश्वचषक स्पर्धेत इंग्लंडविरुद्ध खेळताना मी २७ फेब्रुवारी, २०११ला माझं ९८वं आंतरराष्ट्रीय शतक काढलं होतं. त्या वेळी माझ्या १००व्या शतकाचा कुठे उल्लेखदेखील झाला नव्हता. त्यानंतर दोनच आठवड्यांनी मी नागपूरला दक्षिण आफ्रिकेविरुद्ध ९९वं शतक झळकवलं होतं. त्या वेळीही माझ्या १००व्या शतकाची चर्चा झाली नव्हती. विश्वचषक स्पर्धेच्या उपांत्य सामन्यात पाकिस्तानविरुद्ध जेव्हा मी ८० धावांवर पोचलो तेव्हा तो विषय प्रथम चर्चेत आला. मात्र त्या वेळी त्याला फारसं महत्त्व दिलं गेलं नव्हतं. विश्वचषक स्पर्धेनंतर मात्र प्रसारमाध्यमांच्या हाती एकही सनसनाटी विषय उरला नव्हता. अशा वेळेस माझं १००वं शतक आयतंच त्यांच्या तावडीत सापडलं. एखाद्या खेळाडूने १०० शतकं झळकवणं ही आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या इतिहासातील एक अभूतपूर्व घटना होती. त्यापूर्वी असा पराक्रम कोणीही केला नव्हता. भारतीय क्रिकेटचाहत्यांना त्या घटनेचा नक्कीच अभिमान वाटेल ही गोष्ट धूर्तपणे हेरून टेलिव्हिजन व वृत्तपत्रांनी त्याचा जोरदार गवगवा करण्यास सुरुवात केली. त्या सगळ्याचा माझ्यावर काय परिणाम होईल याची मात्र कोणालाही पर्वा नव्हती.

जून, २०११मध्ये मी माझ्या कुटुंबीयांसमवेत सुट्टीसाठी इंग्लंडमध्ये आलो होतो. माझ्या १००व्या शतकावरून एवढा गहजब उडाला आहे, हे त्या वेळी प्रथम माझ्या ध्यानात आलं. 'तुला तुझं १००वं शतक लॉर्ड्सवर काढायचं होतं, म्हणून तू वेस्ट इंडीजच्या दौऱ्यावर जायचं टाळलंस का?' असा प्रश्न मला विचारला गेला. तोपर्यंत मी लॉर्ड्सवर शतक काढू शकलो नव्हतो. (आता हे होऊही शकणार नाही.) या प्रश्नाने मी चकित झालो. माझ्या मनातही तसा विचार आला नव्हता. लॉर्ड्सवर मी शतक झळकवू शकलो असतो, तर मला खूपच आनंद झाला असता. मात्र शतक काढणं ही कधीच इतकी सोपी गोष्ट नसते.

माझ्या १००व्या शतकाबद्दल हळूहळू सर्वच जण ताळतंत्र सोडून बोलू लागले. प्रत्येक वेळी मी फलंदाजीसाठी मैदानात उतरलो, की मी ते शतक काढावं एवढी एकच अपेक्षा माझ्याकडून केली जायची. मलाही तो विषय लवकरात लवकर संपवायचा होता. मी नेट्समध्ये कसून सराव करत होतो. फलंदाजीचा सराव करताना मला माझी नेहमीची लयही सापडत असे. मात्र हळूहळू १००व्या शतकाच्या विचाराने माझ्याही मनाचा ताबा घेतला.

१८ ऑगस्टला ओव्हल मैदानावर चौथ्या व अखेरच्या कसोटीला सुरुवात झाली. इंग्लंडच्या पहिल्या डावात ५९१ धावा झाल्या. इयान बेलने २३५ धावा काढल्या. पीटरसननेही आणखी एक शतक झळकवलं. आमचा पहिला डाव ३०० धावांत आटोपल्यावर आम्हाला फॉलो-ऑन दिला गेला. पहिल्या इनिंग्जमध्ये मी केवळ २३ धावा काढू शकलो. ग्रॅम स्वानला स्वीपचा फटका मारण्याच्या नादात मी बाद झालो. स्वानला इतक्या सहजपणे विकेट बहाल केल्याबद्दल मी स्वत:वर चिडलो होतो. त्याआधी स्टुअर्ट ब्रॉडचा एक चेंडू माझ्या डाव्या खांद्यावर आपटला होता. नंतर काढलेल्या स्कॅनमध्ये खांद्याचा स्नायू फाटल्याचं निष्पन्न झालं.

दुसऱ्या डावात मी अतिशय संयमाने फलंदाजी करण्याचा निर्धार केला होता. चौथ्या दिवसाचा खेळ संपण्याच्या तासभर आधी आमचा दुसरा गडी बाद झाला आणि मी मैदानात उतरलो. आर.पी. सिंगच्या डावखुऱ्या गोलंदाजीमुळे उजव्या हाताच्या फलंदाजांच्या ऑफ स्टम्पबाहेर खेळपट्टी खडबडीत झाली होती. त्या भागात टप्पा पडून चेंडू वेडावाकडा वळण्याची शक्यता होती. स्वानला त्याचा फायदा उठवता येऊ नये म्हणून मी त्याच्यासमोर खेळताना मुद्दाम ऑफ स्टम्पच्या रेषेत पवित्रा घ्यायचं ठरवलं. त्या डावपेचाचा मला फायदा झाला. चौथ्या दिवसअखेर मी ३५ धावांवर नाबाद राहिलो. पाचव्या दिवशी मी पूर्ण दिवस खेळण्याच्या इराद्यानेच फलंदाजीला सुरुवात केली.

डावखुरा गुगली गोलंदाज अमित मिश्रा माझ्या साथीला होता. सुरुवातीचा एक तास फलंदाजी करणं अवघड जाणार याची आम्हाला कल्पना होती. जेम्स अँडरसनची गोलंदाजी प्रभावी ठरत होती. नाइट वॉचमन असूनही अमित मिश्रा इंग्लिश गोलंदाजांसमोर टिच्चून फलंदाजी करत होता. प्रत्येक षटक संपल्यावर मी त्याला जाऊन सांगायचो, ''आपण शेवटच्या जोडीसाठी भागीदारी करतो आहे, असं समजून तू बॅटिंग कर.''

मधल्या काळात माझीही फलंदाजी मनासारखी होत असल्यामुळे दिवसभर खेळण्याचा मला विश्वास वाटू लागला. मी काही चौकारही मारले. आम्ही दोघांनीही इंग्लिश गोलंदाजांवर पूर्ण नियंत्रण मिळवलं होतं. अँडरसन, ब्रॉड आणि स्वानची गोलंदाजी संयमाने खेळून आम्ही उपाहारापर्यंत एकही विकेट गमावली नाही. सकाळच्या पहिल्या सत्रात आम्ही ८७ धावा काढल्या. उपाहारासाठी खेळ थांबला तेव्हा माझ्या नाबाद ७२ धावा झाल्या होत्या, तर अमित ५७ धावांवर नाबाद होता.

खेळ पुन्हा सुरू झाल्यावर मी अमितला म्हटलं, ''आपण आणखी ५० धावा काढण्याचं उद्दिष्ट समोर ठेवू.'' प्रत्येक धावेगणीक आम्ही इंग्लंडच्या धावसंख्येजवळ पोचत होतो. अमितचा ८४ धावांवर स्वानने त्रिफळा उडवला तेव्हा मी ९१ धावांवर होतो. चौथ्या विकेटसाठी आम्ही १४४ धावांची भागीदारी केली. इंग्लिश संघाची धावसंख्या गाठण्यासाठी आम्हाला केवळ २९ धावांची गरज होती. उपाहारानंतरचा एक तास आम्ही खेळून काढला होता. आता खेळ संपायला फक्त तीन तास उरले होते आणि त्याच वेळी मी ९१ धावांवर बाद झालो. टीम ब्रेन्सनची गोलंदाजी खेळताना मी क्रीझच्या बराच बाहेर उभा होतो. मी मिड विकेटला शॉट मारण्याचा प्रयत्न करत असताना ब्रेन्सनचा तो चेंडू खूपच आत वळून माझ्या पॅडवर आदळला. सहसा गोलंदाजाने चेंडू टाकताच मला त्याची दिशा आणि टप्पा लगेच समजत असे. त्यामुळे या वेळी चेंडूचा रोख लक्षात घेता तो लेग स्टम्पच्या खूप बाहेरून जाईल असं मला वाटलं. पंच रॉड टकर यांनी बोट वर उचलताच मात्र मी चकित झालो.

अत्यंत अगतिक मन:स्थितीत मी पॅव्हिलियनमध्ये परतलो. सकाळपासून केलेल्या सर्व मेहनतीवर एका क्षणात पाणी पडलं. अजून बरीच षटकं बाकी होती. आता पराभव टाळणं खूपच अवघड होतं. पंचांच्या चुकीच्या निर्णयावर टीव्ही रिप्लेने शिक्कामोर्तब केलं. नशिबाची साथ लाभणं हा क्रिकेटच्या खेळातला एक महत्त्वाचा घटक असतो. दैवाने मात्र त्या काळात माझ्याकडे पाठ फिरवली होती. संध्याकाळी पंच टकर यांच्याशी माझी भेट झाली. माझ्या निर्णयावर तुझे सगळे मित्र रुसले असल्याचं त्यांनी मला सांगितलं. मला चुकीने बाद ठरवल्याबद्दल माझ्या सहकाऱ्यांनी त्यांना हैराण केलं होतं. स्वत:ची चूक कबूल करून त्यांनी मनाचा मोठेपणा दाखवला. आम्ही ती गोष्ट तिथेच विसरून जायचं ठरवलं.

कसोटी मालिकेपाठोपाठ पाच सामन्यांची एकदिवसीय मालिका सुरू झाली. ओव्हल कसोटीत मला माझ्या फलंदाजीचा सूर सापडला होता. त्यामुळे एकदिवसीय मालिका खेळण्यासाठी मी खूपच उत्सुक होतो. त्याच वेळी माझ्या खांद्याच्या दुखापतीने पुन्हा एकदा डोकं वर काढलं. एकदिवसीय मालिकेआधी टी-२०चे दोन सामने होते. त्या दरम्यान पूर्ण विश्रांती घेऊनही माझी दुखापत बरी होण्याची चिन्ह दिसेना. अखेर अल्ट्रासाउंड मशीनच्या साहाय्याने खांद्यामध्ये इंजेक्शन घेण्याची वेळ माझ्यावर आली. पहिला एकदिवसीय सामना डरहॅमला होता. सामन्याच्या आदल्या दिवशी सराव करताना पायाच्या बोटामधून पुन्हा वेदना सुरू झाल्या. दुसऱ्या दिवशी बोट सुजू नये म्हणून त्या रात्री मी गोळ्या घेऊन झोपलो; पण त्याचा काही उपयोग झाला नाही. दुसऱ्या दिवशी सकाळी माझा त्रास अधिकच वाढला होता. हॉटेलमधून मैदानात जाण्यासाठी निघताना मी मनातून घाबरलो होतो. स्टेडियममध्ये पोचताच मी आशिष कौशिकला माझ्या पायाभोवती पट्टा गुंडाळायला सांगितलं. पट्टा बांधून मी फिजिओच्या टेबलावरून फरशीवर पाऊल ठेवलं आणि पुन्हा वेदना सुरू झाल्या. मी बूटही घालू शकलो नाही. आपण सामना खेळू शकणार नसल्याचं त्याच क्षणी माझ्या लक्षात आलं. कसोटीअखेर एखादा सामना चुकवण्याचा विचारही मला सहन होत नव्हता. आता मात्र वेदनेने मी इतका बेजार झालो होतो की, एखादा सामना खेळण्याचा विचारही मी करू शकत नव्हतो.

लंडनला जाऊन पुन्हा स्कॅन्स करण्याचं आम्ही ठरवलं. पायाच्या तळव्यात मला दोन अतिशय वेदनादायक इंजेक्शन्स दिली गेली. डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार माझ्या पावलाला पाच ते सहा आठवडे विश्रांती मिळणं आवश्यक होतं. अखेर नोव्हेंबर, २०११च्या वेस्ट इंडीज मालिकेआधी सराव शिबिरात मी भारतीय संघात दाखल झालो.

मी सरावाला सुरुवात करताच १००व्या शतकाचा गलबला पुन्हा एकदा सुरू झाला.

वेस्ट इंडीजचा भारत दौरा, नोव्हेंबर-डिसेंबर, २०११

नोव्हेंबर, २०११पर्यंत माझ्यावरचं दडपण खूपच वाढलं होतं. शतकाबद्दल शुभेच्छा देणारे आणि 'शतकाची मुळीच

काळजी करू नकोस', असा सल्ला देणारे शेकडो संदेश मला रोज येत होते. त्यामागची सदिच्छा मला समजत असली तरी त्या विक्रमी शतकाचा विचार आता एकही क्षण माझा पिच्छा सोडत नव्हता. जिथे जिथे मी जायचो तिथे फक्त हा एकच प्रश्न मला विचारला जायचा. हॉटेलात, रेस्टॉरंटमध्ये, विमानात, विमानतळावर... लोकांच्या तोंडी दुसरा विषयच नसायचा. एकाच वेळी, मी लोकांनी दाखवलेल्या जिव्हाळ्यामुळे भारावून जायचो आणि त्याच वेळी मला त्यांची आपुलकी असह्य होऊन जायची. लोकांच्या नजरेतील सहानुभूती आणि प्रत्येकाकडून मिळणारा धीराचा सल्ला मला पेलवणं अशक्य होऊ लागलं.

फिजिओ हर्षदा राजाध्यक्ष यांच्या देखरेखीखाली मी एकीकडे माझ्या बोटाच्या दुखापतीतून पूर्ण बरा होण्याचा प्रयत्न करत होतो. त्याच वेळी मी वेस्ट इंडीज संघाविरुद्ध खेळण्याची मानसिक तयारीही करत होतो. इंग्लंडमध्ये झालेला दारुण पराभव लवकरात लवकर विसरणं आवश्यक होतं. कारण वर्षअखेरीला भारतीय संघ पुन्हा आस्ट्रेलियाच्या दौऱ्यावर जाणार होता. वेस्ट इंडीज मालिका खेळणंही सोपं जाणार नव्हतं. त्यांच्यापाशी फिडेल एडवर्ड्स, रवी रामपॉल, केमार रोच आणि डॅरेन सॅमी असे एकाहून एक सरस गोलंदाज होते. ६ नोव्हेंबरला दिल्लीमध्ये सुरू झालेल्या पहिल्याच कसोटी सामन्यात त्याचा आम्हाला प्रत्यय आला.

वेस्ट इंडीजला आम्ही सहज हरवू, अशी तोपर्यंत सर्वांची धारणा होती. मात्र दिल्ली कसोटीतील पहिल्याच डावात वेस्ट इंडीजने आम्हाला २०९ धावांत गुंडाळून ९५ धावांची घसघशीत आघाडी घेतली. दुसऱ्या डावात मात्र अश्विनने घेतलेल्या ६ विकेट्समुळे आम्ही त्यांना १८० धावांत रोखलं. विजयासाठी आता आमच्यासमोर २७६ धावांचं लक्ष्य होतं. दुसऱ्या डावात मी फलंदाजीसाठी मैदानात उतरलो तेव्हा आमची ९५ धावांवर २ गडी बाद, अशी स्थिती होती. मी बाद झालो तेव्हा आम्हाला विजयासाठी केवळ ३० धावा हव्या होत्या. मी काढलेल्या ७६ धावांमुळे भारताच्या विजयाला मोठाच हातभार लागला.

माझे चाहते आणि टीकाकार मात्र माझ्या त्या कामगिरीवर फारसे खूश नव्हते. त्यांचं लक्ष फक्त शतकासाठी कमी पडलेल्या २४ धावांकडे होतं. 'सचिन पुन्हा अपयशी ठरला' असे मथळे दुसऱ्या दिवशीच्या वर्तमानपत्रात छापून आले. १०० या आकड्याने जणू सर्व जण झपाटून गेले होते. मी फलंदाजीला उतरलो की लोक १००पासून उलटे आकडे मोजायला सुरुवात करायचे. एखाद्या क्रिकेटपटूच्या बाबतीत हे प्रथमच घडत होते. मला मात्र त्या सर्वांचा मनातून खूपच त्रास होऊ लागला होता. शतक पूर्ण व्हायला जसजसा विलंब होऊ लागला, तसतशी प्रसारमाध्यमांतील एका विशिष्ट कंपूने माझ्यावर जहाल टीका करण्यास सुरुवात केली. 'मी संघहितासाठी नव्हे, तर केवळ वैयक्तिक कामगिरीसाठी खेळतो आहे', असा माझ्यावर आरोप करण्यात आला. हा मात्र दैवदुर्विलास होता. दिल्ली कसोटीत मी ७६ धावा काढून भारताला विजय मिळवून देण्यासाठी शर्थ केली होती, तरीही प्रसारमाध्यमांनी मला स्वार्थी ठरवलं.

१४ नोव्हेंबरला कोलकात्यात दुसरा कसोटी सामना सुरू झाला. त्यात आम्हाला फक्त एकदाच फलंदाजी करावी लागली. त्या डावात तीन फलंदाजांनी शतकं झळकवली. दुर्दैवाने त्या तिघांत माझं नाव नव्हतं. लक्ष्मणने नाबाद १७६, राहुलने ११९ तर धोनीने काढलेल्या १४४ धावांमुळे आम्ही ६३१ धावांचा डोंगर रचला. त्यानंतर वेस्ट इंडीज संघाला दोनदा बाद करून आमच्या गोलंदाजांनी भारताला एक डाव व १५ धावांनी विजय मिळवून दिला.

२२ नोव्हेंबरला मुंबईमध्ये तिसऱ्या कसोटीला सुरुवात झाली. वेस्ट इंडीजने पहिल्याच डावात ५९० अशी मोठी धावसंख्या उभारल्यामुळे मालिकेत ३-० असा विजय मिळवण्याच्या आमच्या आशा धुळीला मिळाल्या. पहिल्या सहाही फलंदाजांनी अर्धशतकं काढली, तर डॅरेन सॅमीच्या १६६ धावा झाल्या. तिसऱ्या दिवसाचा खेळ संपला तेव्हा मी ६७ धावांवर नाबाद होतो. इतके दिवस हुलकावणी देणारं शतक पूर्ण होण्याच्या आशा पुन्हा एकदा पल्लवित झाल्या. ते शतक घरच्या मैदानावर पूर्ण झालं असतं तर माझ्या आनंदात आणखीनच भर पडली असती.

चौथ्या दिवशी सकाळी बसमधून जात असताना माझं लक्ष स्टेडियमबाहेर रांगेत उभ्या असणाऱ्या व्हॅन्सकडे गेलं. सामन्याचं टीव्हीवर थेट प्रक्षेपण करणाऱ्या गाड्या इतक्या मोठ्या प्रमाणात सज्ज होत्या की, त्या पाहून मला आश्चर्याचा धक्का बसला. त्याच वेळी माझ्या लक्षात आलं की, आजचा प्रसंग खूपच वेगळा आहे. त्या दिवशी वेस्ट इंडीजचा कर्णधार

डॅरेन सॅमीने संधी मिळताच दुसरा नवीन बॉल घेतला. त्यामुळे फिडेल एडवर्ड्स आणि रवी रामपॉलचे चेंडू चांगलेच स्विंग होऊ लागले. चेंडू अधिक स्विंग न होऊ देण्यासाठी मी क्रीझच्या बाहेर उभा राहिलो. तसंच चेंडू स्विंग होत असेपर्यंत ऑफ स्टम्पबाहेर पडणाऱ्या चेंडूंचा पाठलाग न करण्यास मी स्वत:ला बजावलं. सकाळच्या सत्राची सुरुवात मी झोकात केली होती. रामपॉलच्या पहिल्याच षटकात मी चेंडू फ्लिक करत चौकार मारला होता. पाठोपाठ एडवर्ड्सचा एक चेंडू कव्हरमधून पंच करत मी दुसरा चौकार वसूल केला. त्यानंतर एडवर्ड्सच्याच आणखी एका चेंडूवर स्लिपमधील क्षेत्ररक्षकाच्या डोक्यावरून अप्पर कट मारत मी षटकार ठोकला. शतक पूर्ण होण्यासाठी फक्त ७ धावांची गरज होती.

इतक्यात माझं लक्ष धावफलकाकडे गेलं आणि मी कमालीचा अस्वस्थ झालो. माझे पाय अचानक इतके जड झाले की, पायातील सारी शक्तीच जणू नाहीशी झाली होती. मला काय होतंय हे माझं मलाच समजेना. इतकी बेचैनी मी माझ्या पहिल्या शतकाच्या वेळीही अनुभवली नव्हती. मी स्क्वेअर लेगच्या दिशेने चालत जात दोन-तीन दीर्घ श्वास घेतले. लक्ष जराही विचलित होऊ नये म्हणून मी जास्तीत जास्त खबरदारी घेत होतो. माझ्या मनावर एवढा ताण त्यापूर्वी कधीच आला नव्हता. मी डीप पॉइंटला शॉट मारून माझी ९४वी धाव पूर्ण केली. त्यानंतर रामपॉलच्या पुढच्या षटकातील शेवटचे तीन चेंडू मी खेळलो. त्या षटकातील तिसऱ्या चेंडूवर विराटने एक धाव घेतली. रामपॉलचा चौथा चेंडू खोल टप्प्याचा होता. चेंडूच्या टप्प्यापर्यंत जात मी तो कव्हरच्या दिशेने खेळलो. पुढचा चेंडू काहीसा वर उसळला. अतिशय हलक्या हाताने खेळत मी तो चेंडू खाली ठेवला. रामपॉल बाहेरच्या दिशेने चेंडू स्विंग करत होता. त्यामुळे मी सावध राहणं आवश्यक होतं. शेवटचा चेंडू मात्र बॅटवर झटकन आला आणि माझ्या अपेक्षेपेक्षा अधिक उंच उसळला. मी मारलेला फटका अतिशय वेगाने दुसऱ्या स्लिपमध्ये उभ्या असलेल्या डॅरेन सॅमीपाशी गेला. त्याने तो अवघड झेल अगदी सहज टिपला. सारं काही निमिषार्धात घडून गेलं. माझी नजर मागे जाताच मी बाद झाल्याचं माझ्या लक्षात आलं.

तो क्षण अत्यंत वेदनादायक होता. शतक पूर्ण करण्यासाठी फक्त एका शॉटची गरज होती. परंतु क्रिकेटमध्ये तुम्ही कोणतीच गोष्ट गृहीत धरू शकत नाही. हीच तर त्या खेळाची खरी गंमत आहे. मी सुन्न मनाने पॅव्हिलियनच्या दिशेने चालू लागलो. प्रेक्षक मात्र खुल्या दिलाने टाळ्या वाजवत माझं कौतुक करत होते. १००व्या शतकाच्या प्रतीक्षेचा काळ आणखीनच लांबत चालला होता. येणाऱ्या काळात दडपण अधिकच वाढणार होतं.

कसोटी मालिकेनंतर मी एकदिवसीय मालिकेत न खेळण्याचं ठरवलं. त्यावरून वेस्ट इंडीजविरुद्ध एकदिवसीय सामन्यात शतक काढण्याची माझी इच्छा नाही, असाही अंदाज बांधला गेला. तो तर्क अर्थातच पूर्णपणे निराधार होता. माझ्या पायाचं बोट मला पुन्हा त्रास देऊ लागलं होतं. धावताना चटकन वळणं मला अवघड जात होतं. त्यामुळे एकदिवसीय मालिकेतून मी बाहेर पडलो. आस्ट्रेलियातील कसोटी मालिका सुरू होण्याआधी मला त्यावर उपचार करणं गरजेचं होतं.

भारताचा आस्ट्रेलिया दौरा, डिसेंबर, २०११ ते फेब्रुवारी, २०१२

आस्ट्रेलिया दौऱ्यातील पहिला कसोटी सामना बॉक्सिंग डेला सुरू होणार होता. आस्ट्रेलियातील वातावरणाशी नीट जुळवून घेण्यासाठी मी ८ डिसेंबरलाच आस्ट्रेलियात पोचलो. माझी दुखापत पूर्ण बरी झाली नव्हती. म्हणून मी पायांच्या तज्ज्ञ डॉक्टरकडे माझे दुखावलेले बोट पुन्हा एकदा तपासून घेण्यासाठी गेलो. त्यानंतर डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार मी बुटांमध्ये नवीन इनसोल वापरून पाहिले, पण त्यामुळे माझ्या वेदना अधिकच वाढल्या. मला पुन्हा माझे जुनेच इनसोल वापरणं भाग पडलं. त्याच वेळी माझ्या डोक्यात कॉर्नकॅप्स वापरून पाहण्याची कल्पना आली. मी कॉर्नकॅप डोनटच्या आकारात (मध्ये भोक असलेल्या चकतीच्या आकारात) कापून घेतली. त्यात जेली भरून मी ती माझ्या दुखावलेल्या बोटाखाली ठेवली. त्यामुळे बुटांच्या स्पाइक्सचा (बूट घसरू नये म्हणून तळव्याला लावलेले खिळे) बोटावर पडणारा भार शोषला जाऊन कमी होणार होता. त्या कॉर्नकॅप्सचा मला थोडाफार उपयोग झाला. आता ही पट्टी दिवसभर एकाच ठिकाणी कशी टिकून राहील, याचा विचार करायचा होता. त्यामुळे पहिल्या वेळेस या सर्व तयारीला मला पाऊण तास लागला. आठवडाभरातच मी ते काम २० मिनिटांत पूर्ण करू लागलो. हळूहळू मला स्वत:च्या रूममध्येच ती पट्टी बांधता येऊ लागली. फिजिओची मदत घेणं मी बंद केलं. कसोटी सामन्यांच्या वेळी दर रात्री मी ती पट्टी मला हव्या त्या आकारात आधीच कापून ठेवायचो. त्यामुळे दुसऱ्या

दिवशी सकाळी मी अधिक निवांतपणे पट्टी बांधण्याचं काम करू शकायचो.

मेलबोर्नच्या पहिल्या कसोटीत आम्ही दमदार सुरुवात केली. आस्ट्रेलियाचा पहिला डाव ३३३ धावांवर आटोपल्यानंतर ९७ धावा २ गडी बाद, अशा स्थितीत मी फलंदाजीला सुरुवात केली. सुरुवातीपासूनच माझ्या हालचाली अगदी सहज होत होत्या. त्या डावात मी सर्व प्रकारचे शॉट्स लीलया मारत होतो. पीटर सिडल हा त्यांचा आघाडीचा गोलंदाज होता. चहापानानंतरच्या त्याच्या पहिल्याच षटकातील पहिल्याच चेंडूवर मी थर्ड मॅनवरून षटकार मारला. दुसऱ्याच चेंडूवर मी फ्लिक करत तीन धावा घेतल्या. इनिंग्जच्या ३५व्या षटकात मी त्याच्या गोलंदाजीवर पुन्हा दोन चौकार मारले. दुसरा चौकार तर अजूनही माझ्या लक्षात आहे. चेंडू ऑफ स्टम्पच्या किंचित बाहेर पडला होता. मी मारलेल्या खणखणीत शॉटमुळे तो पाहता पाहता सीमारेषेपार गेला.

मी आक्रमक फलंदाजी करत होतो. सिडलला कव्हर ड्राइव्ह मारल्यानंतर मी बेन हायल्फेनहॉसलाही तसाच शॉट खेळलो. आपल्या चुकीची दुरुस्ती करण्यासाठी त्याने पुढचा चेंडू खोल टप्प्याचा टाकला. त्यावर मी मिड ऑनच्या जवळून सरळ रेषेत चौकार मारला. केवळ २९ चेंडूंत माझ्या ३२ धावा झाल्या. इनिंग्जची सुरुवात अगदी माझ्या मनासारखी झाली होती. तीच धावगती कायम ठेवत मी ५५ चेंडूंत माझं अर्धशतक पूर्ण केलं. सामन्याचं पारडं हळूहळू आमच्या बाजूने झुकू लागलं.

आज जेव्हा मी त्या इनिंग्जचा विचार करतो तेव्हा मला ती माझ्या सर्वोत्कृष्ट खेळींपैकी एक वाटते. दुसऱ्या दिवसाचं अखेरचं षटक जर मी नीट खेळून काढलं असतं, तर कदाचित त्या मालिकेचा निकालच खूप वेगळा लागला असता. परंतु मी ७३ धावा काढून बाद झालो. सिडलचा तो चेंडू टप्पा पडल्यावर खूप उशिरा स्विंग झाला. त्या चेंडूवर सिडलने मला शरीरापासून दूर अंतरावर खेळणं भाग पाडलं. माझी विकेट मिळाल्यावर आस्ट्रेलियाने तिसऱ्या दिवशी सकाळी आमचा डाव लवकरच गुंडाळला.

अंजली व मुलं त्या वेळी मेलबोर्नला आली होती. त्यांच्यासमोर १००वं शतक पूर्ण करता आलं असतं, तर मला विलक्षण आनंद झाला असता. मी बाद झाल्यावर आमचा डाव गडगडला. दुसऱ्या दिवशी सकाळी पहिल्याच षटकात राहुल बाद झाला. त्यानंतर लवकरच आम्ही लक्ष्मण व धोनीच्याही विकेट्स गमावल्या. आस्ट्रेलियाने हळूहळू त्या सामन्यावर नियंत्रण मिळवलं. त्या रात्री अंजली, अंजलीची आई व मुलांना घेऊन मी रात्रीच्या जेवणासाठी एका रेस्टॉरंटमध्ये गेलो. फलंदाजीच्या ऐन भरात असताना अचानक बाद झाल्याचं दु:ख मनाला सलत होतं. निराशेतून सुटका मिळवण्यासाठी त्या रात्री मी नेहमीपेक्षा दुप्पट जेवलो. झालेला त्रास जणू कमीच होता म्हणून की काय, त्या रात्री मी माझं क्रेडिट कार्डही हरवून बसलो.

दुसऱ्या डावात आम्ही आस्ट्रेलियाला पुन्हा एकदा अडचणीत आणलं. उमेश यादवने घेतलेल्या तीन विकेट्समुळे आस्ट्रेलियाची एक वेळ २७ धावांवर ४ गडी बाद, अशी स्थिती झाली. मात्र त्यानंतर पॉंटिंग आणि मायकेल हसीने केलेल्या ११५ धावांच्या दमदार भागीदारीमुळे आस्ट्रेलियाचा डाव सावरला गेला. चौथ्या दिवशी सकाळी हसी ८९ धावांवर बाद झाल्यानंतर आम्हाला विजयाची अखेरची संधी मिळाली होती. त्या वेळी आस्ट्रेलियाचे ९ गडी १९७ धावांत बाद झाले होते. त्यांच्यापाशी २५० धावांहूनही कमी आघाडी होती. मात्र हायल्फेनहॉस व पॅटिसन ह्या अखेरच्या जोडीने ४३ धावांची भागीदारी करून आपल्या संघाला सुस्थितीत नेलं. आस्ट्रेलियाने अखेर तो सामना जिंकून मालिकेत १-० अशी आघाडी घेतली.

सिडनीच्या कसोटीत तर आमची कामगिरी अधिकच खराब झाली. खेळपट्टीवर भरपूर गवत होतं. आस्ट्रेलियाने नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षण स्वीकारलं. मायदेशात सहसा असा निर्णय एखादा संघ घेत नाही. आस्ट्रेलियन गोलंदाजांनी मात्र वातावरणाचा पूर्ण फायदा उठवत आमचा पहिला डाव १९१ धावांत गुंडाळला. मी ४१ धावा काढल्या. जेम्स पॅटिसनचा एक चेंडू माझ्या बॅटची आतली कड घेऊन स्टम्पवर आदळला. आस्ट्रेलियाच्या तीन विकेट्स झटपट घेत आमच्या गोलंदाजांनी सुरुवात चांगली केली. त्यानंतर मात्र आमचे गोलंदाज निष्प्रभ ठरले. कर्णधार मायकेल क्लार्कच्या त्रिशतकामुळे आस्ट्रेलियाने

६५९ धावांचा डोंगर रचला. पराभव टाळण्यासाठी आम्हाला दोन दिवस फलंदाजी करणं भाग होतं.

दोन दिवस फलंदाजी करणं अवघड असलं तरी अशक्य नव्हतं. तिसऱ्या दिवसअखेर मी ४० चेंडू खेळून ८ धावांवर नाबाद होतो. ऑफ स्टम्पबाहेर पडलेला प्रत्येक चेंडू सोडून देत मी मनात ठरवलेल्या योजनेप्रमाणे खेळत होतो. त्या संध्याकाळी आकाशही अभ्राच्छादित झालं होतं. बेन हायल्फेनहॉस आणि पीटर सिडल वातावरणाचा फायदा उठवत प्रभावी गोलंदाजी करत होते. शेवटचा एक तास मनासारखा खेळून काढता आल्याने खेळ संपवून पॅव्हिलियनमध्ये परतताना मी समाधानी होतो.

चौथ्या दिवशी सकाळी फलंदाजीसाठी निघताना अमित शहाने मला खास शुभेच्छा दिल्या. ''दोन दिवस बॅटिंग करायची तयारी ठेव,'' असंही तो मला म्हणाला. तसं झालं असतं, तर आम्ही सामना नक्कीच वाचवू शकलो असतो. दरम्यान माझं १००वं शतकही पूर्ण झालं असतं. त्या डावातही मी उत्तम फलंदाजी करत होतो. मी मोठी खेळी करू शकलो असतो. मात्र पुन्हा एकदा मी कमनशिबी ठरलो. मायकेल क्लार्कच्या गोलंदाजीवर मी ८० धावा काढून बाद झालो. चौथ्या दिवशी खेळपट्टीवर काही ठिकाणी भेगा पडल्या होत्या. क्लार्कचा तो चेंडू ऑफ स्टम्पवर पडला. तो चेंडू मी बॅटने अडवून खाली ठेवण्याचा प्रयत्न केला. मात्र तो माझ्या बॅटच्या कडेला अलगद स्पर्श करून हॅडिनच्या मांडीवर आपटला आणि उडून स्लिपमध्ये उभ्या असलेल्या हसीच्या हातात गेला.

क्लार्क हा आस्ट्रेलियाचा नियमित गोलंदाज नव्हता. त्याच्या एका साध्या चेंडूवर बाद झाल्याने मी अधिक संतापलो होतो. खरंतर क्लार्कवर आक्रमण करण्यापूर्वी त्याचं केवळ एकच षटक शांतपणे खेळून काढायचं, असं मी ठरवलं होतं. त्याने अर्धवट बचावात्मक क्षेत्ररक्षण लावलं होतं. त्या वेळी मैदानावर वाराही प्रचंड वेगाने वाहत होता. वाऱ्याचा वेग कमी झाल्यावर मी त्याला पुढे येऊन मिड ऑफच्या वरून मारायचं ठरवलं होतं. परंतु तसं घडू शकलं नाही. तुम्ही तुमच्या खेळावर सतत नियंत्रण ठेवू शकत नाही. काही क्षण सहज तुमच्या हातातून निसटून जातात. म्हणून तर क्रिकेट हा सर्वांत आव्हानात्मक खेळ समजला जातो.

त्या कसोटी मालिकेतल्या पहिल्या चार इनिंग्जमध्ये मी अनुक्रमे ७३, ३२, ४१ आणि ८० अशा धावा काढल्या होत्या. तरीही मी अपयशी ठरल्याच्या चर्चा पुन्हा सुरू झाल्या. मी १००व्या शतकाचा खूप विचार करत असल्यामुळेच मी ते पूर्ण करू शकत नाही, यावर सर्वांचं एकमत होतं. अनेकदा अशी टीका सहन करणं फार कठीण असतं. मी देशापुढे माझ्या वैयक्तिक कामगिरीचा कधीही विचार केला नव्हता. टीकाकारांच्या मताचा मी नेहमीच आदर करत आलो आहे. परंतु मी ज्या अडचणीतून जात होतो, त्यात ते कधीच सापडले नव्हते. माझ्या मनातल्या भावना त्यांना समजणं अशक्य होतं.

सिडनी कसोटीनंतर पर्थ व ॲडलेडच्या कसोटी सामन्यात आमची कामगिरी खालावत गेली. परदेशात आम्ही लागोपाठ आठ कसोटी सामने हरलो. भारतीय संघासाठी ही नक्कीच नामुश्कीची गोष्ट होती. आम्ही आमच्या क्षमतेला न्याय दिला नव्हता. आस्ट्रेलियाने आम्हाला सर्व बाजूंनी चीतपट केलं होतं. भारतीय क्रिकेटसाठी तो अत्यंत कसोटीचा काळ होता.

माझ्या पायाच्या बोटातील वेदना कमी होत नव्हत्या. त्या दुखापतीने मी हैराण होऊन गेलो. त्याच वेळी एका तज्ज्ञ डॉक्टरने मला दोन्ही सेसामॉइड हाडांवर शस्त्रक्रिया करून घेण्याचा सल्ला दिला. त्या निराश मन:स्थितीत मी शस्त्रक्रियेसाठी तयारही झालो. चार महिने मला कुबड्यांच्या आधारावर चालावं लागणार होतं. अंजलीने मात्र माझा हा विचार हाणून पाडला. तिने लंडनमधील प्रख्यात प्रोफेसर कॅथी स्पीड यांचा सल्ला घेतला. 'शस्त्रक्रिया शक्यतो टाळावी,' असं त्यांचं मत पडलं. अंजली त्यानंतर मुद्दाम आस्ट्रेलियाला येऊन माझ्यासोबत दोन दिवस राहिली. मी शस्त्रक्रिया करण्याचा घाईघाईने निर्णय घेईन अशी तिला भीती वाटली. त्या वेळी तिचं म्हणणं ऐकल्याचा मला निश्चितच फायदा झाला.

कसोटी मालिका संपल्यानंतर भारत, आस्ट्रेलिया व श्रीलंका या तीन संघांत तिरंगी एकदिवसीय मालिका सुरू होणार होती. त्या वेळी एका नवीन चर्चेला सुरुवात झाली. माझं १००वं शतक पूर्ण व्हावं म्हणूनच केवळ मी तिरंगी मालिकेत खेळायला तयार झालो, असं अनेकांचं म्हणणं होतं. ती चर्चा पूर्णपणे निराधार होती. मी त्या मालिकेत खेळण्याचं कारण सर्वस्वी वेगळंच होतं. एमएस धोनीने मला त्या मालिकेत खेळण्याची विनंती केली. तो मला म्हणाला, ''आप रुक जाओ।

आप रहोगे तो अच्छा होगा। आप अगर सब मॅच ना भी खेलते हो फिर भी आप रुक जाओ।'' आपल्या देशासाठी सर्वोत्तम कामगिरी करण्याची एखाद्या खेळाडूमध्ये किती आत्यंतिक कळकळ असू शकते, हे इतरांना समजणं खूप अवघड असतं; परंतु त्याच एका गोष्टीमुळे मी क्रिकेट खेळण्याचा अखंड ध्यास घेतला होता.

तिरंगी मालिकेतल्या काही सामन्यांत आमची कामगिरी चांगली झाली. तरीही आम्ही अंतिम फेरी गाठू शकलो नाही. भारतीय संघाभोवती हळूहळू नकारात्मक वातावरण निर्माण होऊ लागलं. चाहत्यांचा संघावरचा विश्वास ढासळत होता. तो विश्वास परत मिळवून देण्याची जबाबदारी आमच्यावर होती.

मार्च, २०१२मध्ये बांगलादेशात 'आशिया कप' स्पर्धेला सुरुवात होणार होती. आमच्यासाठी ती नामी संधी होती.

प्रयत्नांना पर्याय नाही

१३ मार्च, २०१२ रोजी आशिया कप स्पर्धेला सुरुवात झाली. ढाक्यामध्ये झालेल्या पहिल्याच सामन्यात आम्ही श्रीलंकेवर ५० धावांनी विजय मिळवला. त्यात मी फक्त सहा धावा काढून बाद झालो. त्याबरोबरच, 'सचिन पुन्हा अपयशी ठरल्याची' ओरड सुरू झाली. सुदैवाने ती चर्चा माझ्या कानावर आली नव्हती. मला नंतर समजलं की, वर्तमानपत्रात छापून आलेलं वृत्त माझ्या घरच्यांनी व मित्रांनी माझ्यापासून शिकस्तीने लपवून ठेवलं होतं.

१६ मार्चला पुढचा सामना बांगलादेशविरुद्ध होता. श्रीलंकेविरुद्ध आम्ही ज्या खेळपट्टीवर खेळलो होतो, त्यापेक्षा या खेळपट्टीवर चेंडू काहीसा मंदगतीने येत होता. अशा खेळपट्टीवर संयमाने खेळून मोठी धावसंख्या उभारणं आवश्यक होतं. विराटने व मी एकेरी धावा काढण्यावर अधिक भर दिला. धावगती मात्र षटकामागे पाचच्या आसपास राहील याची आम्ही दक्षता घेतली. २८०-२९० धावसंख्येपर्यंत पोचण्याचं आम्ही उद्दिष्ट ठेवलं होतं. त्या दृष्टीने आम्ही योग्य वाटचाल करत होतो.

माझ्या वैयक्तिक ८० धावा झाल्यानंतर माझ्यावर शतकाचं दडपण यायला पुन्हा सुरुवात झाली. शतकाचा विचार मनातून काढून टाकायचा मी शर्थीने प्रयत्न करत होतो, परंतु मला ते शक्य होत नव्हतं. मनावरचा ताण क्षणाक्षणाला वाढतच चालला होता. मशरफ मूर्तझाने त्या वेळेस टाकलेलं एक षटक मला अजूनही आठवतं. त्या षटकातल्या तीन चेंडूवर मी अप्रतिम शॉट्स मारले होते. तीनही चेंडू सीमारेषेपार जायला हवे होते. मात्र चपळ क्षेत्ररक्षकांमुळे मला एकही धाव मिळू शकली नाही.

९० धावांवर असताना मी एक चौकार लगावला आणि माझ्या मनावरचं दडपण थोडंसं कमी झालं. विराट बाद झाल्यानंतर सुरेश रैना माझ्या साथीला आला. त्याच्या बॅटमधून चौकारांची बरसात होत असल्यामुळे आमची धावगतीही वाढली होती. मी ९४ धावांवर होतो. त्या षटकात मी आणखी एक धाव काढली. वर्षभरातल्या माझ्या सर्वोच्च धावसंख्येवर मी पोचलो होतो.

४१व्या षटकात मी तीन एकेरी धावा काढल्या. शतक पूर्ण करण्यासाठी आता मला फक्त दोन धावांची गरज होती. माझ्या कारकिर्दीतील मी काढलेल्या त्या दोन सर्वांत कठीण धावा होत्या. ९९ शतकं काढूनही यापूर्वी मी इतका अस्वस्थ कधीही झालो नव्हतो. माझी मन:स्थिती खूपच विचित्र झाली होती. यशस्वी होण्याचा निश्चय, शतकाची चिंता आणि त्या दडपणातून मुक्त होण्याची तीव्र इच्छा अशा तीन भावना एकाच वेळी मनात एकवटल्या होत्या. 'प्रत्येक चेंडू जसा येईल त्याप्रमाणे खेळ' असं स्वत:ला बजावत मी माझं संपूर्ण लक्ष खेळावर केंद्रित करण्याचा प्रयत्न करत होतो.

शकिब-अल-हसनचा एक चेंडू लाँग ऑफला ड्राइव्ह करत मी ९९वर पोचलो. मी पुन्हा स्वत:ला शांत राहण्याच्या सूचना दिल्या. शकिबचे चेंडू खूपच वळत होते. पुढचा चेंडू मी क्रीझबाहेर येत स्क्वेअर लेगच्या दिशेने मारला आणि माझं आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधलं १००वं शतक साजरं केलं.

दुसऱ्याच क्षणी मला एकदम थकून गेल्यासारखं वाटलं. मी हेल्मेट काढून त्यावरच्या तिरंगी झेंड्याकडे बोट दाखवलं. माझ्या देशासाठी मी ती कामगिरी केली होती. त्यानंतर मी बॅटकडे पाहिलं. 'क्रिकेटवर माझी अपरिमित निष्ठा असतानाही या शतकासाठी तू मला इतकी वाट का पाहायला लावलीस' – असा प्रश्न त्या क्षणी मला परमेश्वराला विचारावासा वाटला. एका मोठ्या दडपणातून मुक्त झाल्याची भावना मनात उमटली होती. हेल्मेटवरच्या तिरंगी झेंड्याला मी बॅटने हळुवार थोपटलं. माझं

मन समाधानाने भरून गेलं होतं. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये प्रथमच १०० शतकं झळकवण्याचा मान एका भारतीय क्रिकेटपटूला मिळाला, ही खरोखरच एक सुखद भावना होती.

'१००वं शतक पूर्ण झाल्यावरही तू फारच सौम्यपणे आनंद व्यक्त केलास,' असं माझे मित्र मला नेहमी म्हणत असतात. मी त्यांना सांगतो की, गेली २० वर्षं मी याच पद्धतीने माझ्या भावना व्यक्त करत आलो आहे. एक-दोन अपवाद वगळता मी नेहमीच माझ्या भावनांना आवर घातला आहे. याचा अर्थ असा नव्हे, की मला माझ्या कामगिरीचा कधी अभिमानच वाटला नाही. माझ्या प्रत्येक शतकाचा मला नक्कीच अभिमान वाटला आहे. परंतु १०० शतकं काढू शकेन, अशी मी कधी कल्पनाही केली नव्हती. इतकंच काय; १९८९मध्ये मी जेव्हा पाकिस्तानविरुद्ध पहिला कसोटी सामना खेळलो, तेव्हा २०१२ सालापर्यंत मी भारतातर्फे खेळू शकेन, असा विचारही माझ्या मनात कधी आला नव्हता.

दुर्दैवाने त्या सामन्यात बांगलादेशने आमचा पराभव केला. तमिम इक्बाल, जहुरुल इस्लाम आणि नासीर हुसेन यांनी काढलेल्या अर्धशतकांमुळे व त्यांना शकिब-अल-हसन आणि मुशफिकर रहिमची मोलाची साथ मिळाल्यामुळे बांगलादेश संघाने २८९ धावांचं लक्ष्य सहज पार केलं. काही जणांच्या मते आम्ही आणखी थोड्या धावा काढायचा प्रयत्न करायला हवा होता. मला त्यांचं म्हणणं मुळीच पटलं नव्हतं. माझ्या मते २८९ ही धावसंख्या नक्कीच आव्हानात्मक होती. काही दिवसांपूर्वीच आम्ही श्रीलंकेला २५४ धावांचं लक्ष्यही गाठू दिलं नव्हतं. काही वेळा तुम्हाला तुमच्या प्रतिस्पर्ध्यांना विजयाचं श्रेय द्यावं लागतं. बांगलादेशचा संघ त्या दिवशी निर्विवादपणे सरस ठरला होता.

सामना हरल्याचं दु:ख झालं असलं तरी मी काढलेल्या १००व्या शतकावर मात्र संघातील माझे सर्व सहकारी कमालीचे खूश होते. भारतीय संघात आनंदाचं वातावरण पसरलं होतं. आपल्या संघातील सहकाऱ्यांचं प्रेम आणि कौतुक मिळावं हीच प्रत्येक खेळाडूच्या मनात दडलेली इच्छा असते. ड्रेसिंग रूममध्ये माझ्या कामगिरीचं ते कौतुक ऐकून मी भारावून गेलो.

बराच वेळ लांबलेल्या पत्रकार परिषदेनंतर मी, अंजली व मुलांशी बोलायला अधीर झालो होतो. मुलांना सुट्टी असल्यामुळे सर्व जण गोव्यात मजा करत होते. मी फोन केला तेव्हा ते माझ्या आवडत्या 'मार्टिन्स' या रेस्टॉरंटमध्ये जेवत होते. माझ्या शतकाची बातमी त्यांना आधीच समजली होती. त्यांना झालेला आनंद त्यांच्या बोलण्यातून जाणवत होता. त्यांच्याही मनावरचा ताण हलका झाला होता. १००वं शतक मी अर्थातच अजितला अर्पण केलं. मी उत्तम क्रिकेटपटू व्हावं, यासाठी त्याने स्वत:चं आयुष्य वेचलं होतं. माझी आई मुंबईला होती. माझं शतक पूर्ण होताना तिने टीव्हीवर प्रत्यक्ष पाहिलं होतं. माझ्याशी बोलताना तिचा आवाज आनंदाने कापत होता. माझ्या आईला मी त्या क्षणी प्रत्यक्ष पाहू शकत नसलो, तरी तिच्या मनातल्या भावना मला न पाहताही जाणवत होत्या. तिला झालेला आनंद पाहून माझं मन समाधानाने भरून गेलं. तिचा मुलगा असल्याचा मला त्या क्षणी सार्थ अभिमान वाटला.

भारतात परतल्यावर माझं प्रचंड स्वागत करण्यात आलं. त्या कौतुकाने मी खूपच गहिवरून गेलो. माझ्या सर्व हितचिंतकांविषयी माझ्या मनात कायम कृतज्ञतेची भावना राहील, हे मुद्दाम या ठिकाणी मला नमूद करावंसं वाटतं. 'मुंबई इंडियन्स' संघाचे मालक मुकेश व नीता अंबानी यांनी माझं अभिनंदन करण्यासाठी फार मोठ्या समारंभाचं आयोजन केलं. त्या समारंभात भारताची महान गायिका लता मंगेशकर यांनी खास माझ्यासाठी म्हटलेलं गाणं हा माझ्या आयुष्यातील अविस्मरणीय क्षण ठरला. अशा क्षणांमध्ये विलक्षण ताकद असते. वर्षभर अनुभवलेला खडतर काळ मी त्या एका क्षणात विसरून गेलो!

५० किलोंचं ओझं उतरलं

त्यानंतर काही दिवसांनी आशिया कप स्पर्धेत आमचा सामना पाकिस्तानशी होणार होता. पाकिस्तानविरुद्ध फलंदाजी करताना मला प्रत्येक वेळी एक वेगळंच स्फुरण येतं.

सामन्याच्या आधी पाकिस्तानचा माजी कर्णधार रमीझ रझाने माझी मुलाखत घेतली. ''मला माझं वजन ५० किलोंनी कमी झाल्यासारखं वाटतंय,'' असं मी त्याला म्हटलं. खरंतर त्याहूनही अधिक हलकं झाल्यासारखं मला वाटत होतं. मनातील

बेचैनी आणि अस्वस्थता आता नाहीशी झाली होती. आता मी माझ्या फलंदाजीचा आनंद मुक्तपणे लुटू शकणार होतो. आयुष्य पुन्हा सुरळीत झालं होतं. ''१००व्या शतकानंतर तुझ्या मनात नेमकी कोणती भावना होती?'' असा प्रश्न मला अनेक पत्रकारांनी विचारला. मी त्यांना थट्टेत म्हणाली, ''१००वं शतक काढण्यापूर्वी मी ९९ शतकं काढली होती. त्या शतकांचा मात्र सर्वांनाच विसर पडला होता. कारण मी १००वं शतक कसं काढावं याचा जो तो मला सल्ला देत होता.'' त्यानंतर एका पत्रकाराने मला विचारलं, ''१९९० साली जेव्हा तू पहिलं शतक काढलंस, तेव्हा तुझ्या मनात कोणता विचार आला होता?'' मी म्हटलं, ''त्या वेळी मी उरलेल्या ९९ शतकांची चिंता करत होतो!''

पाकिस्तानविरुद्ध झालेला सामना चांगलाच रंगला. पाकिस्तानने आमच्यासमोर ३२९ धावांचं अवघड लक्ष्य ठेवलं. परंतु एवढ्या मोठ्या धावसंख्येचा पाठलाग करतानाही माझ्या मनावर जरासुद्धा दडपण आलं नव्हतं. पहिल्याच षटकात आम्ही गौतम गंभीरची विकेट गमावली. त्यानंतर विराटने व मी षटकामागे सात धावा काढत १३३ धावांची भागीदारी केली. मी ५२ धावा काढून बाद झालो. त्यानंतर विराट व रोहितने भारताला मोठ्या झोकात विजय मिळवून दिला. विराटने त्या सामन्यात १८३ धावा काढल्या.

माझ्या १००व्या शतकाची प्रतीक्षा किती कष्टाची होती आणि मी किती दडपणातून गेलो होतो, हे पाकिस्तानविरुद्ध खेळताना मला नीट उमगलं. तोपर्यंत १००व्या शतकाचा विचार काही केल्या माझ्या मनातून जात नव्हता. अखेर मी सर्व दडपणातून मुक्त झालो. मुख्य म्हणजे प्रसारमाध्यमांची हौस एकदाची फिटली होती. आता फलंदाजीवरचं माझं लक्ष कोणीही विचलित करू शकणार नव्हतं. बऱ्याच कालावधीनंतर माझ्या मनाला शांतता आणि स्वस्थता लाभत होती. त्या सुखाच्या क्षणांचा मला तितक्याच शांतपणे अनुभव घ्यायचा होता.

भारताचा इंग्लंड दौरा, २०११ – पतौडी करंडक

पहिली कसोटी. लॉर्ड्स – २१ ते २५ जुलै, २०११

इंग्लंड ४७४-८ घोषित (केपी पीटरसन २०२*, एमजे प्रायर ७१, आयएलजे ट्रॉट ७०; पी कुमार ५-१०६) व २६९-६ घोषित (एमजे प्रायर १०३*, एससीजे ब्रॉड ७४; आय शर्मा ४-५९)

भारत २८६ (आर द्रविड १०३, ए मुकुंद ४९, **एसआर तेंडुलकर** ३४; एससीजे ब्रॉड ४-३७, सीटी ट्रेमलेट ३-८०) व २६१ (एसके रैना ७८, व्हीव्हीएस लक्ष्मण ५६, **एसआर तेंडुलकर** १२; जेएम अँडरसन ५-६५, एससीजे ब्रॉड ३-५७)

इंग्लंड १९६ धावांनी विजयी

दुसरी कसोटी. नॉटिंगहॅम – २९ जुलै ते १ ऑगस्ट, २०११

इंग्लंड २२१ (एमसीजे ब्रॉड ६४; पी कुमार ३-४५, आय शर्मा ३-६६, एस श्रीशांत ३-७७) व ५४४ (आयआर बेल १५९, टीटी ब्रेसनन ९०, एमजे प्रायर ७३, इजेजी मॉर्गन ७०, केपी पिअरसन ६३; पी कुमार ४-१२४)

भारत २८८ (आर द्रविड ११७, युवराज सिंग ६२, व्हीव्हीएस लक्ष्मण ५४, **एसआर तेंडुलकर** १६; एससीजे ब्रॉड ६-४६) व १५८ (**एसआर तेंडुलकर** ५६, एच सिंग ४६; टीटी ब्रेसनन ५-४८, जेएम अँडरसन ३-५१)

इंग्लंड ३१९ धावांनी विजयी

तिसरी कसोटी. बर्मिंगहॅम – १० ते १३ ऑगस्ट, २०११

भारत २२४ (एमएस धोनी ७७, **एसआर तेंडुलकर** १; एससीजे ब्रॉड ४-५३, टीटी ब्रेसनन ४-६२) व २४४ (एमएस धोनी ७४*, **एसआर तेंडुलकर** ४०, पी कुमार ४०; जेएम अँडरसन ४-८५, एससीजे ब्रॉड २-२८, जीपी स्वान २-८८)

इंग्लंड ७१०-७ घोषित (एएन कुक २९४, इजेजी मॉर्गन १०४, एजे स्ट्रॉस ८७, केपी पीटरसन ६३, टीटी ब्रेसनन ५३*; ए मिश्रा ३-१५०, पी कुमार २-९८)

इंग्लंड एक डाव व २४२ धावांनी विजयी

चौथी कसोटी. द ओव्हल – १८ ते २२ ऑगस्ट, २०११

इंग्लंड ५९१-६ घोषित (आयआर बेल २३५, केपी पीटरसन १७५, आरएस बोपारा ४४; एस श्रीशांत ३-१२३, एसके रैना २-५८)

भारत ३०० (आर द्रविड १४६*, ए मिश्रा ४३, **एसआर तेंडुलकर** २३; टीटी ब्रेसनन ३-५४, जीपी स्वान ३-१०२) व २८३ (फॉलो-ऑन) (**एसआर तेंडुलकर** ९१, ए. मिश्रा ८४; जीपी स्वान ६-१०६, एससीजे ब्रॉड २-४४)

इंग्लंड एक डाव व ८ धावांनी विजयी

इंग्लंड मालिकेत ४-० विजयी

वेस्ट इंडीजचा भारत दौरा, २०११

पहिली कसोटी. दिल्ली – ६ ते ९ नोव्हेंबर, २०११

वेस्ट इंडीज ३०४ (एस चंदरपॉल ११८, केसी ब्रेथवाइट ६३; पीपी ओझा ६-७२, आर अश्विन ३-८१) व १८० (एस चंदरपॉल ४७; आर अश्विन ६-४७, युटी यादव २-३६)

भारत २०९ (व्ही सेहवाग ५५, आर द्रविड ५४, **एसआर तेंडुलकर** ७; डीजेजी सॅमी ३-३५, आर रामपॉल २-४४, डी बिशू २-५५) व २७६-५ (**एसआर तेंडुलकर** ७६, व्हीव्हीएस लक्ष्मण ५८*, व्ही सेहवाग ५५; डीजेजी सॅमी २-५६)

भारत ५ गडी राखून विजयी

दुसरी कसोटी. कोलकाता – १४ ते १७ नोव्हेंबर, २०११

भारत ६३१-७ घोषित (व्हीव्हीएस लक्ष्मण १७६*, एमएस धोनी १४४, आर द्रविड ११९, जी गंभीर ६५, **एसआर तेंडुलकर** ३८; केएजे रोश २-१०६, डीजेजी सॅमी २-१३२)

वेस्ट इंडीज १५३ (डीएम ब्राव्हो ३०; पीपी ओझा ४-६४, युटी यादव ३-२३) व ४६३ (फॉलो-ऑन) (डीएम ब्राव्हो १३६, एमएन सॅम्युअल्स ८४, एबी बराथ ६२, केए एडवर्ड्स ६०, एस चंदरपॉल ४७; युटी यादव ४-८०)

भारत एक डाव व १५ धावांनी विजयी

तिसरी कसोटी. मुंबई – २२ ते २६ नोव्हेंबर, २०११

वेस्ट इंडीज ५९० (डीएम ब्राव्हो १६६, केए एडवर्ड्स ८६, केओए पॉवेल ८१, केसी ब्रेथवाइट ६८, एबी बराथ ६२, एमएन सॅम्युअल्स ६१; आर अश्विन ५-१५६, व्हीआर एरॉन ३-१०६) व १३४ (डीएम ब्राव्हो ४८; पीपी ओझा ६-४७, आर अश्विन ४-३४)

भारत ४८२ (आर अश्विन १०३, **एसआर तेंडुलकर** ९४, आर द्रविड ८२, जी गंभीर ५५, व्ही कोहली ५२; एमएन सॅम्युअल्स ३-७४, आर रामपॉल ३-९५) व २४२-९ (व्ही कोहली ६३, व्ही सेहवाग ६०, **एसआर तेंडुलकर** ३; आर रामपॉल ३-५६)

सामना अनिर्णित

भारत मालिकेत २-० विजयी

भारताचा आस्ट्रेलिया दौरा, २०११-१२ – बॉर्डर-गावस्कर करंडक

पहिली कसोटी. मेलबोर्न – २६ ते २९ डिसेंबर, २०११

आस्ट्रेलिया ३३३ (इजेएम कोवन ६८, आरटी पॉंटिंग ६२; झेड खान ४-७७, आर अश्विन ३-८१, युटी यादव ३-१०६) व २४० (एमइके हसी ८९, आरटी पॉंटिंग ६०; युटी यादव ४-७०, झेड खान ३-५३)

भारत २८२ (**एसआर तेंडुलकर** ७३, आर द्रविड ६८, व्ही सेहवाग ६७; बीडब्ल्यू हायल्फेनहॉस ५-७५, पीएम सिडल

३-६३) व १६९ (**एसआर तेंडुलकर** ३२; जेएल पॅटिसन ४-५३, पीएम सिडल ३-४२)

आस्ट्रेलिया १२२ धावांनी विजयी

दुसरी कसोटी. सिडनी – ३ ते ६ जानेवारी ,२०१२

भारत १९१ (एमएस धोनी ५७*, **एसआर तेंडुलकर** ४१; जेएल पॅटिसन ४-४३, बीडब्ल्यू हायल्फेनहॉस ३-५१, पीएम सिडल ३-५५) व ४०० (जी गंभीर ८३, **एसआर तेंडुलकर** ८०, व्हीव्हीएस लक्ष्मण ६६, आर अश्विन ६२; बीडब्ल्यू हायल्फेनहॉस ५-१०६, पीएम सिडल २-८८)

आस्ट्रेलिया ६५९-४ घोषित (एमजे क्लार्क ३२९*, एमइके हसी १५०*, आरटी पॉंटिंग १३४; झेड खान ३-१२२)

आस्ट्रेलिया एक डाव व ६८ धावांनी विजयी

तिसरी कसोटी. पर्थ – १३ ते १५ जानेवारी, २०१२

भारत १६१ (व्ही कोहली ४४, **एसआर तेंडुलकर** १५; बीडब्ल्यू हायल्फेनहॉस ४-४३, पीएम सिडल ३-४२) व १७१ (व्ही कोहली ७५, आर द्रविड ४७, **एसआर तेंडुलकर** ८; बीडब्ल्यू हायल्फेनहॉस ४-५४, पीएम सिडल ३-४३)

आस्ट्रेलिया ३६९ (डीए वॉर्नर १८०, इजेएम कोवन ७४; युटी यादव ५-६३)

आस्ट्रेलिया एक डाव व ३७ धावांनी विजयी

चौथी कसोटी. ॲडलेड – २४ ते २८ जानेवारी, २०१२

आस्ट्रेलिया ६०४-७ घोषित (आरटी पॉंटिंग २२१, एमजे क्लार्क २१०, बीजे हॅडिन ४२*; आर अश्विन ३-१९४) व १६७-५ घोषित (आरटी पॉंटिंग ६०*; आर अश्विन २-७३)

भारत २७२ (व्ही कोहली ११६, डब्ल्यूपी साहा ३५, **एसआर तेंडुलकर** २५; पीएम सिडल ५-४९, बीडब्ल्यू हायल्फेनहॉस ३-६२) व २०१ (व्ही सेहवाग ६२, **एसआर तेंडुलकर** १३; एनएम लिऑन ४-६३, आरजे हॅरिस ३-४१)

आस्ट्रेलिया २९८ धावांनी विजयी

आस्ट्रेलिया मालिकेत ४-० विजयी

२५.
अखेरचा क्रिकेट हंगाम

१००व्या शतकाचा अडथळा दूर झाल्यावर, सुरू होणाऱ्या नव्या हंगामात खेळायला मी उत्सुक होतो. २०१२-१३चे क्रिकेट वेळापत्रकही पुन्हा भरगच्च होते. फक्त त्या वर्षात भारतीय संघ एकही परदेश दौरा करणार नव्हता. न्यूझीलंड, इंग्लंड आणि आस्ट्रेलिया हे तीन संघ कसोटी मालिका खेळण्यासाठी भारतात येणार होते. मायदेशात सलग १० कसोटी सामने खेळण्याची संधी क्वचितच मिळते. नव्या हंगामासाठी मी चांगली तयारी केली होती. मात्र माझ्यासाठी तो हंगाम फारसा यशस्वी ठरला नाही. हंगाम सुरू होण्याआधी पायाच्या बोटाची दुखापत मला पुन्हा त्रास देऊ लागली. तो त्रास इतका वाढला की, आयपीएलच्या पाचव्या हंगामाच्या दरम्यान मी त्यावर सल्ला घेण्यासाठी योगमहर्षी बी.के.एस. अय्यंगार यांना भेटलो. झहीर त्या वेळी माझ्यासोबत होता. १९९९मध्ये मला पाठीच्या दुखण्याचा खूप त्रास झाला होता. त्या वेळी किरण मोरेने मला गुरुजींशी ओळख करून दिली होती. मी गुरुजींबरोबर तेव्हा एक आठवडा पुण्याला राहिलो होतो. जून, २०१२मध्ये मी खास बूट बनवून घेण्यासाठी जर्मनीतल्या 'आदिदास कंपनी'तही जाऊन आलो. त्या वेळी प्रोफेसर कॅथी स्पीड माझ्यासाठी लंडनहून जर्मनीला आले होते.

ऑगस्ट, २०१२मध्ये न्यूझीलंडविरुद्ध दोन कसोटी सामन्यांची मालिका सुरू झाली. दोन्ही कसोटीत आम्ही न्यूझीलंड संघावर दणदणीत विजय मिळवला. रवीचंद्रन अश्विन आणि प्रग्यान ओझा यांच्या फिरकीसमोर न्यूझीलंडचे फलंदाज टिकाव धरू शकले नाहीत. मालिकेतच्या तीन इनिंग्जमध्ये मी चांगली सुरुवात करूनही प्रत्येक वेळी माझा त्रिफळा उडाला, यावरून एका नव्या चर्चेला तोंड फुटलं. माझ्या हालचाली पूर्वीपेक्षा मंद झाल्या आहेत आणि माझ्यामध्ये पूर्वीचा जोम राहिलेला नाही, असं बोललं जाऊ लागलं. मला मात्र तसं मुळीच वाटत नव्हतं. मागच्या हंगामानंतरच्या विश्रांतीच्या काळात मी बंदिस्त जागेत (इनडोअर्स) क्रिकेटचा खूप सराव केला होता. तिथे जास्त उसळून येणारे चेंडू खेळण्याची मला सवय झाली होती. हैदराबादच्या पहिल्या कसोटीत मी ट्रेंट बोल्टच्या गोलंदाजीवर १९ धावा काढून बाद झालो.

बंगळुरूच्या दुसऱ्या कसोटीत मात्र मी एक मोठी इनिंग्ज खेळायचा निर्धार केला. परंतु तिथेही १७ धावांवर माझा त्रिफळा उडाला. द्रुतगती गोलंदाज डग ब्रेसवेलचा चेंडू स्विंग होईल या अपेक्षेने मी खेळलो. मात्र तो चेंडू स्विंग न होता सरळ आला. दुसऱ्या डावात खेळपट्टीचा नीट अंदाज येईपर्यंत मी आक्रमण न करता संयमाने खेळायचं ठरवलं. खेळपट्टीवर काही वेळ टिकून राहिल्यानंतर मी मोठी खेळी करू शकेन, असं मला वाटलं. त्या डावात मी काही चांगले चौकारही मारले. मात्र टीम साउदीचा एक चेंडू स्विंग होऊन खूपच आत आला आणि मी २७ धावांवर बाद झालो.

न्यूझीलंड मालिकेतलं अपयश विसरण्याचा प्रयत्न करत मी माझं लक्ष येणाऱ्या इंग्लंडच्या मालिकेवर केंद्रित केलं. इंग्लिश संघ नोव्हेंबर, २०१२मध्ये भारतात येणार होता. मालिकेआधी सराव करण्यासाठी मी रणजी करंडक स्पर्धेतील मुंबई विरुद्ध रेल्वे या सामन्यात खेळायचं ठरवलं. २ नोव्हेंबरला झालेल्या त्या सामन्याआधी अन्नातून झालेल्या विषबाधेमुळे मला खूपच त्रास झाला. मला इतका थकवा जाणवत होता की, मी रोहित शर्माला माझ्याआधी फलंदाजी करायला पाठवलं. मी फलंदाजीसाठी उतरलो तेव्हा माझा त्रास कमी झाला होता. त्या डावात मी १३७ धावा काढल्या. काही वेळापूर्वी मी खेळण्याच्या परिस्थितीत नव्हतो हे कुणाला सांगूनही खरं वाटलं नसतं. मैदानात उतरल्यावर मला उत्साह वाटू लागला आणि मी मोकळेपणाने फलंदाजी करू शकलो.

इंग्लंडचा भारत दौरा, नोव्हेंबर-डिसेंबर, २०१२

१५ नोव्हेंबरला अहमदाबादमध्ये इंग्लंडविरुद्ध पहिला कसोटी सामना सुरू झाला. त्या सामन्यात फलंदाजीला सुरुवात केल्यापासूनच मला छान लय सापडली होती. प्रत्येक शॉट मारताना माझ्या शरीराची स्थिती आणि तोल अचूक साधला जात होता. त्या डावात मी काही जबरदस्त शॉट्स मारले. स्वानला मिड विकेटवरून उंच मारलेला फटका मला अजूनही आठवतो. त्या दिवशी मी बचावात्मक पवित्रा न घेता मुक्तपणे फलंदाजी करण्याचं ठरवलं होती. रणजी स्पर्धेतही मी आक्रमक फलंदाजी करत शतक झळकवलं होतं. मी मिड विकेटवरून शॉट मारतो आहे, हे पाहून स्वानने मिड विकेटला उभ्या असलेल्या क्षेत्ररक्षकाला मागे जाण्यास सांगितलं. त्यामुळे मी पुढचा चेंडू मिड ऑनवरून मारायचा ठरवलं. मात्र स्वानचा पुढचा चेंडू हवेत जास्त वळला आणि मी डीप मिड विकेटला झेल देऊन १३ धावांवर बाद झालो. चांगल्या फॉर्ममध्ये असतानाही इतकी सहज विकेट बहाल केल्याबद्दल मी स्वत:वर खूपच चिडलो होतो.

माझ्या अपयशाचा संघावर फारसा परिणाम झाला नाही. त्या सामन्यामध्ये सेहवागने ११७ धावा काढल्या, तर चेतेश्वर पुजाराने द्विशतक झळकवलं. पुजारा हा गुणी क्रिकेटपटू आहे. दर्जेदार कसोटी फलंदाज होण्यासाठी आवश्यक असलेलं मानसिक स्थैर्य व चिकाटी त्याच्यापाशी आहे. तो सर्व प्रकारचे शॉट्स खेळू शकतो. २०१०मध्ये त्याने आस्ट्रेलियाविरुद्ध कसोटी पदार्पण केलं. त्यानंतर त्याच्यात खूपच सुधारणा झाली आहे. प्रग्यान ओझा आणि रवी अश्विनने इंग्लिश संघाला दोनदा गुंडाळून भारताला विजय मिळवून दिला.

२३ नोव्हेंबरला मुंबईमध्ये दुसऱ्या कसोटी सामन्याला सुरुवात झाली. इंग्लंडने त्या कसोटीत मात्र पहिल्याच दिवशी सामन्यावर वर्चस्व मिळवलं. सामन्याच्या आदल्या दिवशीच मी खेळपट्टी पाहून डंकन फ्लेचर यांच्यापाशी चिंता व्यक्त केली होती. खेळपट्टीवर चेंडू वेगाने येऊन जास्त उसळणार होता. त्याचा फायदा भारतीय गोलंदाजांपेक्षा इंग्लिश गोलंदाजांना अधिक होणार होता. २००६मध्ये अशाच खेळपट्टीवर इंग्लंडने भारताला हरवलं होतं. माझ्या मते आपण फलंदाजीला अनुकूल ठरणारी खेळपट्टी बनवायला हवी होती.

माँटी पानेसरचा समावेश झाल्यामुळे इंग्लिश गोलंदाजीला आणखीनच धार आली. पहिल्या दिवशी उपाहाराच्या आधीच मी माँटीच्या गोलंदाजीवर ८ धावा काढून बाद झालो. त्याने लेग स्टम्पवर टाकलेला चेंडू एवढा वळला की, तो माझ्या ऑफ स्टम्पवरची बेल उडवून गेला. वानखेडे स्टेडियमवरील कसोटीत पहिल्याच दिवशी उपाहाराच्या आधी एखादा चेंडू ९० अंशात वळेल अशी कोणाचीच अपेक्षा नसते. त्या वेळी माझ्या साथीला चेतेश्वर पुजारा होता. माँटीची गोलंदाजी खेळायच्या आधी मी पुजाराबरोबर बोललो होतो. चेंडू मुळीच वळत नाहीये, असं त्याने मला सांगितलं होतं. माँटीच्या त्या चेंडूवर मी जो शॉट मारण्याचा प्रयत्न केला, त्या शॉटवर आजपर्यंत मी हजारो धावा काढल्या होत्या. चेंडू जेव्हा वळत नसतो तेव्हा तुम्ही तो स्क्वेअर लेगला खेळून एक धाव मिळवू शकता, पण चेंडू वळत असेल तेव्हा मात्र तो शॉट खेळणं चुकीचं ठरतं. माझ्या दुर्दैवाने त्या दिवशी एवढा वळणारा तो पहिलाच चेंडू ठरला. घरच्या प्रेक्षकांसमोर मला हताश होऊन परतावं लागलं.

माँटीने त्याआधी सेहवागची विकेटही मिळवली होती. मी बाद झाल्यानंतर आमचा डाव कोसळत गेला. एकट्या पुजाराने इंग्लिश गोलंदाजांना धैर्याने तोंड दिलं. त्याने काढलेल्या १३५ धावांमुळे आमच्या धावसंख्येला थोडा तरी आकार आला. मात्र नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी स्वीकारल्याचा आम्ही काहीच फायदा उठवू शकलो नाही.

त्यानंतर इंग्लिश संघाने दमदार फलंदाजी केली. कर्णधार ॲलिस्टर कुक आणि केविन पीटरसनने प्रतिकूल खेळपट्टीवर सुरेख फलंदाजी केली. कुकच्या १२२ आणि पीटरसनच्या १८६ धावांमुळे इंग्लंडला ८६ धावांची महत्त्वपूर्ण आघाडी मिळाली. ॲलिस्टर कुकने अतिशय संयमाने फलंदाजी केली. अलीकडच्या काळात भारतात आलेल्या बहुतेक परदेशी फलंदाजांपेक्षा तो संपूर्ण दौऱ्यात फिरकी गोलंदाजी चांगला खेळला.

दुसऱ्या डावातही मी माँटी पानेसरच्या गोलंदाजीवर बाद झालो. या खेपेस चेंडू वळेल या अपेक्षेने मी खेळलो. मात्र चेंडू जराही न वळता सरळ रेषेत आला. त्या वेळी गौतम गंभीर माझ्यासोबत फलंदाजी करत होता. मी पॅव्हिलियनमध्ये परतत असताना माँटी गौतमला म्हणाला, ''बॉल अपने आप सीधा निकल गया!'' गौतमने ही गोष्ट त्या दिवशी खेळ संपल्यावर मला

सांगितली. याचा अर्थ केवळ माझाच अंदाज चुकला नव्हता, तो चेंडू न वळलेला पाहून माँटीही चकित झाला होता. दुर्दैवाचा पुन्हा एकदा मला फटका बसला होता. त्या कसोटी सामन्यात इंग्लंडने आमचा चौथ्याच दिवशी पराभव केला. घरच्या प्रेक्षकांसमोर असा नामुश्कीचा पराभव पचवणं आम्हाला खूपच अवघड गेलं.

काही वेळ तरी आपण क्रिकेटचा विचार करणं थांबवायला हवं, असं मला प्रकर्षाने जाणवलं. तिसरी कसोटी कोलकात्याला होती. कोलकात्याला हॉटेलमध्ये पोचल्यावर, युवी, भज्जी आणि झहीरला मी माझ्या रूममध्ये बोलावलं. आपण चौघांनी मिळून एखादा हिंदी चित्रपट पाहू या, असं मी त्यांना सुचवलं. त्या वेळी गाजत असलेला 'बर्फी' हा चित्रपट मी आधीच पाहिला होता. एका मूकबधिर मुलाभोवती गुंफलेला तो चित्रपट मला खूपच आवडला होता. तो चित्रपट पुन्हा पाहायची माझी तयारी होती. भज्जीने मात्र त्या चित्रपटाची रेवडी उडवली. चित्रपट सुरू झाल्यानंतर पाऊण तासाने भज्जी वैतागून म्हणाला,''पाजी, ये लोग कुछ बोलेंगे की फिल्म ऐसेही चलता रहेगा?'' भज्जीच्या बोलण्यावर मात्र आमची हसून हसून मुरकुंडी वळली.

५ डिसेंबर, २०१२ला कोलकात्याला तिसऱ्या कसोटी सामन्याला सुरुवात झाली. फलंदाजीत सातत्याने येणारं अपयश मला अस्वस्थ करत होतं. मी माझा दृष्टिकोन बदलायचं ठरवलं. सुरुवातीपासून आक्रमक पवित्रा न घेता, संयमाने व चिकाटीने खेळपट्टीवर टिकून राहणं मला अधिक महत्त्वाचं वाटलं. त्यामुळे एक तोटा नक्कीच झाला. ज्या चेंडूवर मी एरवी चौकार लगावले असते, ते चेंडू मला शांतपणे सोडून द्यावे लागले. मात्र २००३-०४मध्ये आस्ट्रेलियात खेळताना हीच पद्धत अवलंबून मी द्विशतक काढलं होतं. या खेपेस मी ७६ धावा काढू शकलो. जेम्स अँडरसनच्या एका अप्रतिम चेंडूवर मी बाद झालो. त्या मालिकेत अँडरसनची गोलंदाजी अतिशय प्रभावी ठरली. रिव्हर्सस्विंगचा छान उपयोग करत अनेक महत्त्वाच्या क्षणी त्याने आपल्या संघाला बळी मिळवून दिले.

कोलकाता कसोटीतही आम्ही अनेक संधी वाया दवडून पहिल्या डावात केवळ ३१६ धावा करू शकलो. इंग्लंडने आमच्यावर २०७ धावांची आघाडी मिळवून तिसऱ्या कसोटीत पुन्हा एकदा वर्चस्व मिळवलं. ॲलिस्टर कुकने त्या डावात १९० धावा काढल्या. कर्णधाराची कामगिरी जर उत्तम होत असली, तर संघाला त्याचा खूपच फायदा होतो. दुसऱ्या डावातही आमची फलंदाजी ढेपाळली. मी ग्रॅम स्वानच्या गोलंदाजीवर स्लिपमध्ये झेल देत केवळ पाच धावा काढून बाद झालो. इतरही फलंदाज फारशी चमक दाखवू शकले नाहीत. इंग्लंडने तीही कसोटी चौथ्या दिवशीच जिंकली.

१३ डिसेंबर, २०१२ला नागपूरमध्ये चौथा कसोटी सामना सुरू झाला. मालिकेत बरोबरी साधण्यासाठी अखेरचा सामना जिंकणं आवश्यक होतं. विराट कोहलीने त्या सामन्यात शतक झळकवलं, तर धोनी ९९ धावा काढून धावबाद झाला. माझी अपयशाची मालिका संपलेली नव्हती. जेम्स अँडरसनने माझा त्रिफळा उडवला. मी केवळ दोन धावा काढू शकलो. एकही गोष्ट माझ्या मनासारखी घडत नव्हती. मी फलंदाजीला येताच मला माँटी पानेसरचे पडलेले पहिले दोन्ही चेंडू कमालीचे वळले. आश्चर्य म्हणजे त्याआधी दिवसभरात एकही चेंडू वळला नव्हता. जेव्हा तुम्ही सातत्याने अपयशी ठरत असता तेव्हा दैव सर्व बाजूंनी तुमची कसोटी पाहत असतं. ट्रॉटने इंग्लंडच्या दुसऱ्या डावात काढलेल्या शतकामुळे सामना अनिर्णित अवस्थेत संपला. अखेर मायदेशातल्या मालिकेत आम्हाला २-१ अशी हार पत्करावी लागली.

इंग्लिश संघ त्या मालिकेत निर्विवादपणे आमच्यापेक्षा वरचढ ठरला. चार कसोटीतील सहा इनिंग्जमध्ये मला आलेल्या अपयशामुळे मी खूपच निराश झालो होतो. माझी खचलेली मानसिक स्थिती पाहून अंजली माझ्याबरोबर राहण्यासाठी नागपूरला आली. अंजलीला माझ्याबरोबर पाहून मी नागपूरला कसोटीअखेर निवृत्ती जाहीर करणार, असा पत्रकारांचा समज झाला. त्याच वेळी मलाही माझ्या निवृत्तीच्या संदर्भात एकदा नीट, स्पष्टपणे विचार करावासा वाटत होता. त्याच हेतूने मी रवी शास्त्रीला रूमवर डिनरसाठी बोलावलं. रवी हा माझा जुना मित्र होता आणि त्याच्या मतांचा मी नेहमीच आदर करत असे. रवीबरोबर झालेल्या चर्चेनंतर माझ्या मनातला गोंधळ नाहीसा झाला. 'थोड्याशा अपयशामुळे तू स्वत:च्या क्षमतेविषयी मुळीच शंका घेऊ नकोस,' असं त्याने मला पुन्हा पुन्हा बजावलं.

बदलाला सामोरं जाताना

इंग्लंडची मालिका संपल्यावर मी स्वत:साठी काही वेळ राखून ठेवायचं ठरवलं. मनातील सर्व किल्मिषं मला दूर करायची होती. माझ्या एकूण कारकिर्दीचा आणि निवृत्तीचा मला शांतपणे आणि साकल्याने विचार करायचा होता. विचारांती माझ्या लक्षात आलं की, क्रिकेट खेळण्याची माझ्यात अजूनही पूर्वीइतकीच जिद्द आहे आणि माझी धावा काढण्याची भूकही अजून शमलेली नाही. इंग्लंड मालिकेत मी फारशा धावा काढू शकलो नव्हतो. मात्र माझ्या फलंदाजीबद्दल मी नक्कीच समाधानी होतो. त्याच आत्मविश्वासाने मी कसोटी क्रिकेट खेळत राहण्याचा निर्णय घेतला.

एकदिवसीय क्रिकेटची गोष्ट मात्र वेगळी होती. २०१२च्या अखेरीस भारतीय संघ पाकिस्तानविरुद्ध तीन एकदिवसीय सामन्यांची मालिका खेळणार होता. मी जवळजवळ मार्चपासून डिसेंबरपर्यंत मर्यादित षटकांचा एकही सामना खेळलो नव्हतो. २०१५च्या विश्वचषक स्पर्धेत मी खरंच खेळू शकणार आहे का, हा माझ्यासमोरचा मुख्य प्रश्न होता. जर मी त्या स्पर्धेत खेळणार नसलो, तर एकदिवसीय सामन्यांत खेळण्यासाठी माझ्यापाशी दुसरा कोणता उद्देशच उरलेला नव्हता. २०१५च्या विश्वचषक स्पर्धेत आपण खेळू शकणार नाही, ही गोष्ट स्वीकारणं मला भाग होतं. त्यामुळे केवळ निरोपाची मालिका म्हणून पाकिस्तानविरुद्ध खेळण्यात मला काही अर्थ वाटत नव्हता. त्यापेक्षा येणाऱ्या आस्ट्रेलिया कसोटी मालिकेवर पूर्ण लक्ष केंद्रित करणं मला जास्त महत्त्वाचं वाटलं.

एकदिवसीय क्रिकेटमधून निवृत्ती घेत असल्याचा निर्णय मी बीसीसीआयला, निवडसमितीच्या अध्यक्षांना आणि आमचे प्रशिक्षक डंकन फ्लेचर यांना लगेच कळवून टाकला. एक मोठा निर्णय घेतल्यामुळे माझ्या मनावरचा ताण हलका झाला. काही दिवस मी शांतपणे मसुरीला जाऊन राहायचं ठरवलं. मसुरी हे माझं अतिशय आवडतं ठिकाण होतं. मसुरीला जाण्यासाठी मी डेहराडूनच्या विमानात बसलो. विमान दिल्लीला पोचण्यापूर्वीच माझ्या निवृत्तीची बातमी प्रसारमाध्यमांतून जाहीर झाली. दिल्ली विमानतळावर पोचताच मला अनेक जणांचे शुभेच्छा संदेश आले. आम्ही ज्या विमानात बसलो होतो तेच विमान पुढे डेहराडूनला जाणार होतं. विमानात चढणारे प्रवासी मला पाहताच माझ्यावर प्रश्नांची सरबत्ती करणार, हे मला ठाऊक होतं. ती टाळण्यासाठी मी अंजलीला सांगून कॉकपिटमध्ये कॅप्टनच्या शेजारी जाऊन बसलो.

कॉकपिटमध्ये जाण्यापूर्वी, ''माझ्या निवृत्तीची बातमी हळुवारपणे अर्जुनच्या कानावर घाल,'' असंही मी अंजलीला सांगितलं. ती बातमी ऐकून अर्जुनला चांगलाच धक्का बसणार याची मला कल्पना होती. ''अर्जुनला ती बातमी सांगताच त्याचा रडवेला झालेला चेहरा पाहून मीच गलबलून गेले,'' असं अंजली मला नंतर म्हणाली. मी इतक्या लवकर का निवृत्त होतोय, हे अर्जुनला समजेना. त्याच्या मते मी अजून खूप वर्षं खेळायला हवं होतं. अखेर, मी निवृत्त होण्याचा पक्का निर्णय घेतलाय, हे अंजलीने त्याला नीट समजावून सांगितलं. ते ऐकताच तो बाजूच्या खिडकीला डोकं टेकवून बसला आणि हळूहळू त्याच्या गालावरून अश्रू ओघळू लागले. अंजलीने ही हकिकत मला सांगताच आम्ही दोघेही गहिवरून गेलो. सारा वयाने थोडी मोठी असल्यामुळे तिने माझ्या निवृत्तीचा निर्णय समजूतदारपणे स्वीकारला. फक्त आता, मला एकदिवसीय सामन्यात खेळताना, पुन्हा कधीच पाहता येणार नाही, याचं मात्र तिला खूप वाईट वाटलं. माझी मुलं झपाट्याने मोठी होत चालली होती. अशा नाजूक प्रसंगी ती माझ्याबरोबर असली की, माझ्या मनाला दिलासा मिळत असे. मुलांच्या सहवासात माझा जीव शांत होऊन जाई.

मसुरीमधील वास्तव्याचा माझ्यावर अतिशय योग्य परिणाम झाला. अंजली, मुलं आणि काही जिवलग मित्र असे सर्व प्रियजन माझ्यासोबत होते. माझ्या भविष्यासंबंधी नीट विचार करायला, हवा असलेला निवांत वेळ मला तिथे मिळाला. पत्रकार आणि चाहत्यांच्या गराड्यातून मी काही दिवस दूर राहू शकलो. त्या काळातही रणजी स्पर्धेतील मुंबई संघाच्या प्रगतीवर मी नजर ठेवून होतो. त्यापलीकडे क्रिकेटचा कोणताही विचार मी मनात येऊ दिला नाही. तिथे मी टेबल टेनिस खेळलो, भरपूर भटकलो आणि हवी तेवढी विश्रांती घेतली. मसुरीत येऊन पुन्हा एकदा मला उत्साही आणि ताजंतवानं वाटलं. क्रिकेटचा सराव करण्याची ऊर्मी ज्या क्षणी माझ्या मनात आली, त्याच क्षणी मी मुंबईला परतायचं ठरवलं.

आस्ट्रेलियाचा भारत दौरा, फेब्रुवारी-मार्च, २०१३

आस्ट्रेलियाबरोबर होणाऱ्या मालिकेत खेळण्यासाठी मी नेहमीप्रमाणे तयारी सुरू केली. रोज सकाळी सात वाजता मी सराव करण्यासाठी वानखेडे स्टेडियमवर पोचत असे. त्या वेळी तिथे मी एकटा असायचो. कधीतरी प्रशिक्षक राहुल पटवर्धन माझ्यासोबत यायचा. हिरव्यागार गवतावर पहाटेच्या दवाचा सडा पडलेला असायचा. धावण्याचा सराव करताना गवताचा ओलसरपणा पायांना जाणवे. त्या शांत वातावरणात मन प्रसन्न होऊन जायचं. समोरच्या मोकळ्या स्टेडियमकडे पाहताना माझा ऊर भरून येत असे. स्टेडियम हेच माझं एकमेव कर्मक्षेत्र होतं. माझा खरा आसरा तोच होता.

मैदानावरील कर्मचारी येण्याआधी मी प्रथम जॉगिंग करायचो. त्यानंतर थोडा वेळ धावण्याचा सराव करून मग शारीरिक व्यायामाला सुरुवात करत असे. मुंबई संघातील खेळाडू ८.३० वाजेपर्यंत मैदानात पोचत. त्या वेळी मी ड्रेसिंग रूममध्ये विश्रांती घेत बसलेला असायचो. नंतर रणजी करंडक स्पर्धेच्या तयारीसाठी मी सर्वांबरोबर नेट प्रॅक्टिसला सुरुवात करत असे. इतकी वर्षं आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळत असताना मी सरावाच्या बाबतीत कधीच कुचराई केली नाही किंवा कधी कुठला शॉर्टकट वापरला नाही. २०१३ सालीही माझी सरावाची पद्धत तीच राहिली होती.

रणजी स्पर्धेत अंतिम फेरी गाठण्यापूर्वी आम्ही बडोद्याला आणि सर्व्हिसेसच्या संघाला हरवलं. अंतिम फेरीच्या काहीशा एकतर्फी झालेल्या सामन्यात आम्ही सौराष्ट्राचा एक डाव आणि १२५ धावांनी पराभव केला. त्यानंतर इराणी करंडक स्पर्धेत आमचा मुकाबला शेष भारत संघाविरुद्ध झाला. त्या सामन्यात मी शतक झळकवलं. इराणी करंडक स्पर्धेतील त्या इनिंग्जने आस्ट्रेलियाविरुद्ध खेळण्यासाठी मला खूप समाधान आणि आत्मविश्वास मिळवून दिला.

फेब्रुवारी, २०१३मध्ये चार कसोटी सामन्यांची मालिका खेळण्यासाठी आस्ट्रेलियन संघ भारतात आला. २२ फेब्रुवारीला चेन्नईच्या चेपॉक मैदानावर पहिल्या कसोटीला सुरुवात झाली. चेपॉक हे माझं लाडकं मैदान आहे. आस्ट्रेलियाने त्या सामन्यात चांगली सुरुवात करून पहिल्या डावात ३८० धावा केल्या. कर्णधार मायकेल क्लार्कने शतक झळकवलं. आमची सुरुवात खराब झाली. केवळ १२ धावांतच आम्ही आमच्या पहिल्या दोन विकेट्स गमावल्या. मी फलंदाजीसाठी मैदानात उतरलो तेव्हा आम्हाला एका चांगल्या भागीदारीची आवश्यकता होती.

त्या वेळी जेम्स पॅटिसन खूपच वेगात गोलंदाजी करत होता. मी त्याच्यासमोर मुद्दाम आक्रमक पवित्रा घेतला. त्याचा पहिला चेंडू ऑफ स्टम्पच्या काहीसा बाहेर पडला. मी बॅट चेंडूच्या रेषेत आणत आणि सरळ ठेवत फारसा जोर न लावता तो चेंडू खेळलो. चेंडू मात्र क्षेत्ररक्षकाच्या बाजूने वेगात सीमारेषेच्या पार गेला. दुसरा चेंडूही तसाच खेळत मी आणखी एक चौकार मारला. त्याच्या षटकातला शेवटचा चेंडू आखूड टप्प्याचा होता. चेंडूच्या रेषेच्या आत येत मी फाइन लेगला फ्लिक करत आणखी एक चौकार वसूल केला. चार चेंडूत तीन चौकार मारल्यामुळे मनावरचं दडपण निघून गेलं होतं. माझ्या पुनरागमनाची सुरुवात चांगली झाली होती.

त्या डावात चेतेश्वर पुजाराने मला उत्तम साथ देत ४४ धावा काढल्या. दुसऱ्या दिवसाचा खेळ संपला तेव्हा मी ७१ धावा काढून नाबाद होतो. मनासारखी फलंदाजी झाल्यामुळे दुसऱ्या दिवशी जाऊन शतक झळकवण्याचा मला आत्मविश्वास आला होता. दुर्दैवाने तसं घडू शकलं नाही. मी ८१ धावांवर असताना ऑफ स्पिनर नॅथन लिऑनच्या गोलंदाजीवर माझा त्रिफळा उडाला. माझ्या अपेक्षेपेक्षा चेंडूचा टप्पा अधिक खोल होता. मात्र मी आधीच चेंडूच्या टप्प्यापर्यंत पुढे जाऊन तो मिड विकेट आणि लाँग ऑनच्या मधून मारायचा असं ठरवलं होतं. चेंडूचा टप्पा खोल आहे हे लक्षात आल्यावर मी शॉटमध्ये बदल करण्याचा प्रयत्न केला. परंतु तोपर्यंत खूपच उशीर झाला होता.

मी बाद झाल्यामुळे संघावर काहीच परिणाम झाला नाही. विराटने आपल्या नेहमीच्या शैलीत शतक काढलं. धोनीने मात्र तुफानी फटकेबाजी करत द्विशतक झळकवलं. धोनीने मारलेले काही शॉट्स डोळ्यांचं पारणं फेडणारे होते. चेपॉक मैदानावर मी पाहिलेल्या काही सर्वोत्कृष्ट खेळींपैकी ती एक होती. पहिल्या डावात आम्ही आस्ट्रेलियावर १९२ धावांची मोठी आघाडी घेतली. त्यानंतर आस्ट्रेलियाचा दुसरा डाव केवळ २४१ धावांत गुंडाळण्यामध्ये अश्विनचा महत्त्वाचा वाटा होता. विजयासाठी

आम्हाला फक्त ५० धावांची गरज होती. आमच्या दुसऱ्या डावात लिऑनच्या पहिल्या दोन चेंडूवर मी लागोपाठ षटकार ठोकले. जो शॉट मारताना मी पहिल्या डावात चकलो होतो, तोच शॉट मी पुन्हा खेळलो. या वेळेस मात्र दोन्ही वेळा चेंडू मिड विकेट आणि लाँग ऑनच्या वरून प्रेक्षकात जाऊन पडला. त्यानंतर थोड्याच वेळात आम्ही सामना जिंकला.

२ मार्चला हैदराबादमध्ये दुसऱ्या कसोटीला आरंभ झाला. आस्ट्रेलियाचा पहिला डाव केवळ २३७ धावांत गडगडला. त्यानंतर आम्ही दमदार फलंदाजी करत ५०३ धावा काढल्या. मुरली विजयने शतक तर चेतेश्वर पुजाराने द्विशतक काढत दुसऱ्या विकेटसाठी ३७० धावांची मोठी भागीदारी केली. आमच्या गोलंदाजांनी दुसऱ्या डावातही आस्ट्रेलियाला झटपट गुंडाळल्यामुळे आम्हाला दुसऱ्यांदा फलंदाजी करावीच लागली नाही.

मी जेम्स पॅटिसनच्या गोलंदाजीवर सात धावा काढून बाद झालो. लेग स्टम्पच्या बाहेर जाणाऱ्या चेंडूला माझ्या बॅटचा अगदी निसटता स्पर्श झाला. पंचांनी आधी मला नाबाद ठरवलं. मात्र आश्चर्य म्हणजे त्यानंतर बराच वेळ विचार करून त्यांनी फेरनिर्णयासाठी तिसऱ्या पंचांची मदत मागितली. त्या मालिकेत दोन्ही संघांना फेरनिर्णयासाठी अपील करण्याची मुभा (डीआरएस) देण्यात आलेली नव्हती. असं असताना एकदा नाबाद ठरल्यावर पंचांनी तो निर्णय तिसऱ्या पंचांकडे सोपवण्याचं काहीच कारण नव्हतं. जर त्यांनी चेंडू बॅटला स्पर्श होताना पाहिला नसेल किंवा तो आवाज त्यांनी ऐकला नसेल, तर त्यावरूनच त्यांनी अंतिम निर्णय घ्यायला हवा होता. तिसऱ्या पंचांची मदत घेण्याचा निर्णय मला तरी खूपच विचित्र वाटला.

भारताने 'डीआरएस'ला (डिसिजन रिव्ह्यू सिस्टिम) आजपर्यंत ठामपणे विरोध केला आहे. कारण ते तंत्र पूर्णपणे निर्दोष शाबीत झालेलं नाही. २०११-१२च्या इंग्लंड दौऱ्यात त्याच तंत्रज्ञानाच्या मदतीने दिलेले निर्णय किती चुकीचे होते, याचा आम्ही प्रत्यक्ष अनुभव घेतला होता. आमचा तंत्रज्ञानाला मुळीच विरोध नाही. परंतु ते १०० टक्के अचूक असल्याशिवाय त्याला मान्यता देणं आम्हाला चुकीचं वाटतं. आम्ही घेतलेला पवित्रा मला अतिशय सयुक्तिक वाटतो. ज्या वेळेस तंत्रज्ञानामध्ये पूर्ण सुधारणा होईल त्या वेळी आम्ही जरूर त्यावर फेरविचार करू. दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे सर्व देशांनी एकाच प्रकारच्या तंत्रज्ञान पद्धतीचा अवलंब करायला हवा. तरच निर्णयामध्ये सुसंगतता येऊ शकेल.

हैदराबादच्या कसोटीत आम्ही आस्ट्रेलियावर सहज विजय मिळवला. मालिकेमध्येही आम्ही हळूहळू वर्चस्व प्रस्थापित करत होतो. आस्ट्रेलियाचा त्यापूर्वी आम्ही कधीच ४-० असा पराभव केला नव्हता. या खेपेस मात्र तशी दाट शक्यता निर्माण झाली होती.

१४ मार्चला मोहालीमध्ये तिसरी कसोटी सुरू झाली. आस्ट्रेलियाने पहिल्या डावात ४०८ धावा काढत मोठी धावसंख्या उभारली. त्यात नवव्या क्रमांकावर आलेल्या मिशेल स्टार्कचं ९९ धावांचं महत्त्वाचं योगदान होतं. आम्हीही आस्ट्रेलियाला चोख उत्तर दिलं. शिखर धवन आणि मुरली विजय यांनी पहिल्या विकेटसाठी २८९ धावांची भागीदारी केली. शिखर धवनने कसोटी पदार्पणातच १८७ धावा काढल्या. मुरली विजयने लागोपाठ दुसरं शतक झळकवलं. मीही त्या इनिंग्जमध्ये आत्मविश्वासाने खेळत होतो. कसोटी सामन्यात क्वचितच गोलंदाजी करणाऱ्या लेग स्पिनर स्टीव्ह स्मिथच्या हाती चेंडू सोपवला गेला. स्टीव्ह स्मिथची गोलंदाजी मी त्यापूर्वी कधीच खेळलो नव्हतो. ''स्मिथचे चेंडू खूप वळतायत का?'' असं मी विजयला जाऊन विचारलं. विजय म्हणाला की, तो चेंडू टाकताना चेंडूला जोरात झटका देतो. त्यामुळे चेंडू वळणार आहे हे गृहीत धरून मी खेळावं. स्मिथचा पहिलाच चेंडू अगदी सरळ रेषेत आला. तो इंचभरदेखील वळला नाही. माझ्या बॅट आणि पॅडला लागून तो फॉरवर्ड शॉर्ट लेगला उभ्या असलेल्या क्षेत्ररक्षकाच्या हातात गेला. मी ३७ धावा काढून बाद झालो.

मोहाली कसोटीतल्या शेवटच्या दिवशी आम्हाला जिंकण्यासाठी १३३ धावा हव्या होत्या. आमची दोन गडी बाद ७० अशी स्थिती होती. ऑस्ट्रेलियाच्या गोलंदाजांनी अचूक गोलंदाजी करत आम्हाला जखडून ठेवलं होतं. त्यामुळे अखेरच्या २५ चेंडूत २४ धावा काढण्याची परिस्थिती आमच्यावर ओढवली. दडपण घालवण्यासाठी आक्रमक पवित्रा घेणं आवश्यक होतं. मी तेच केलं. मिशेल स्टार्कच्या एका चेंडूवर मी मिड ऑफवरून चौकार मारला. पीटर सिडलच्या पुढच्या षटकातील एक आत येणारा चेंडू माझ्या बॅटवर बसला नाही. चेंडू पॅडवर आदळला. चेंडू पॉइंटच्या दिशेने गेला आहे असं समजून मी धावायला सुरुवात केली. चेंडू मात्र जवळच शॉर्ट कव्हरला गेला होता. डेव्हिड वॉर्नरने झेप घेत तो चेंडू स्टम्पवर मारला. मी

वेळेत क्रीझमध्ये परतू शकलो नाही. वॉर्नच्या चपळ क्षेत्ररक्षणाचा तो एक अप्रतिम नमुना होता. मला निराश मनाने पॅव्हिलियनमध्ये परतावं लागलं. माझं अर्धवट राहिलेलं काम धोनी आणि रवींद्र जडेजाने पूर्ण केलं. आम्ही आस्ट्रेलियावर ३-० आघाडी घेतली. चौथी कसोटीही जिंकून आस्ट्रेलियाचा पार धुव्वा उडवण्याच्या इराद्याने आम्ही दिल्लीला पोचलो.

दिल्लीची खेळपट्टी पाहून, ती पहिल्या दिवसापासूनच फिरकी गोलंदाजांना साथ देणार हे आम्हाला कळून चुकलं. सामना पाच दिवस चालणार नाही, त्याआधीच मी घरी पोचलेलो असेन असं मी अंजलीला सांगून टाकलं. अजितपाशीही मी तोच अंदाज व्यक्त केला. अजित तो सामना पाहण्यासाठी दिल्लीला आला होता. माझा अंदाज खरा ठरला. फिरकी गोलंदाजांनी पहिल्या दिवसापासूनच आपला प्रभाव दाखवायला सुरुवात केली. त्या सामन्यात दोन्ही संघ फारशा धावा काढू शकले नाहीत. आस्ट्रेलियाच्या पहिल्या डावातील २६२ धावसंख्येला आम्ही २७२ धावा काढून प्रत्युत्तर दिलं.

दुसऱ्या डावात आमच्या फिरकी गोलंदाजांना खेळताना आस्ट्रेलियन फलंदाजांची तारांबळ उडाली. रवींद्र जडेजाने पाच बळी घेतले. अश्विन व जडेजाने त्या मालिकेत सुरेख गोलंदाजी केली. आस्ट्रेलियाचा कर्णधार मायकेल क्लार्कला तर जडेजाने त्या मालिकेत अनेक वेळा बाद केलं. त्यामुळे जडेजाची गोलंदाजी खेळताना क्लार्कच्या मनावर दडपण येऊ लागलं. पहिल्या तिन्ही कसोटी सामन्यांत जडेजाचे त्याला पडलेले काही चेंडू अप्रतिम होते. (चौथ्या कसोटीत क्लार्क जखमी झाला होता.) जडेजाचा चेंडू लेग स्टम्पवर पडून क्लार्कच्या बॅटेसमोरून जवळजवळ काटकोनात वळायचा आणि प्रत्येक वेळी त्याचा ऑफ स्टम्प उडवायचा.

अखेर तो सामनाही आम्ही जिंकलो. त्याचं मुख्य श्रेय चेतेश्वर पुजाराला द्यावं लागेल. बोटाला दुखापत झालेली असतानाही त्याने नाबाद ८२ धावा काढल्या. त्याने दाखवलेल्या धैर्याचं खरोखरच कौतुक करावं लागेल. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील त्याचं भवितव्य उज्ज्वल आहे, याबद्दल माझ्या मनात तरी काहीच शंका नाही.

भारतीय क्रिकेटच्या इतिहासात आम्ही प्रथमच आस्ट्रेलियावर ४-० असा विजय मिळवला. भारतीय संघाला अशा दणदणीत विजयाची त्या वेळी नितांत आवश्यकता होती. इंग्लंडच्या हातून मायदेशात झालेल्या पराभवाच्या आठवणीही त्यामुळे पुसल्या गेल्या. संघामध्ये पुन्हा नवी उमेद निर्माण झाली.

वैयक्तिकदृष्ट्या मी चेन्नईच्या कसोटीत चांगली सुरुवात केली होती. माझ्या काही इनिंग्जनी मला खरोखरच समाधान मिळवून दिलं होतं. मात्र किमान तीन वेळा चांगली सुरुवात करूनही मी विनाकारण माझी विकेट गमवली होती. २०१२-१३च्या हंगामात मी एकही शतक काढू शकलो नव्हतो. येणाऱ्या हंगामात ती कसर भरून काढायचा मी निर्धार केला.

न्यूझीलंडचा भारत दौरा, २०१२

पहिली कसोटी. हैदराबाद (डेक्कन) – २३ ते २६ ऑगस्ट, २०१२

भारत ४३८ (सीए पुजारा १५९, एमएस धोनी ७३, व्ही कोहली ५८, व्ही सेहवाग ४७, **एसआर तेंडुलकर** १९; जेएस पटेल ४-१००, टीए बोल्ट ३-९३)

न्यूझीलंड १५९ (जेईसी फ्रँकलिन ४३*, आर अश्विन ६-३१, पीपी ओझा ३-४४) व १६४ (फॉलो-ऑन) (केएस विल्यमसन ५२, बीबी मॅकलम ४२; आर अश्विन ६-५४ व पीपी ओझा ३-४८)

भारत एक डाव व ११५ धावांनी विजयी

दुसरी कसोटी. बंगळुरू – ३१ ऑगस्ट ते ३ सप्टेंबर, २०१२

न्यूझीलंड ३६५ (एलआरपीएल टेलर ११३, सीएफके व्हॅन विक ७१, एमजे गुप्टिल ५३; पीपी ओझा ५-९९) व २४८ (जेईसी फ्रँकलिन ४१; आर अश्विन ५-६९, पीपी ओझा २-४९, युटी यादव २-६८)

भारत ३५३ (व्ही कोहली १०३, एमएस धोनी ६२, एसके रैना ५५, **एसआर तेंडुलकर** १७; टीजी साउदी ७-६४) व २६२-५ (व्ही कोहली ५१*, सीएस पुजारा ४८, **एसआर तेंडुलकर** २७, जेएस पटेल ३-६८)

भारत ५ गडी राखून विजयी

भारत मालिकेत २-० विजयी

इंग्लंडचा भारत दौरा, २०१२

पहिली कसोटी. अहमदाबाद – १५ ते १९ नोव्हेंबर, २०१२

भारत ५२१-८ घोषित (सीए पुजारा २०६*, व्ही सेहवाग ११७, वाय सिंग ७४, **एसआर तेंडुलकर** १३; जीपी स्वान ५-१४४) व ८०-१ (सीए पुजारा ४१)*

इंग्लंड १९१ (एमजे प्रायर ४८; पीपी ओझा ५-४५, आर अश्विन ३-८०) व ४०६ (फॉलो-ऑन) (एएन कुक १७६, एमजे प्रायर ९१; पीपी ओझा ४-१२०, युटी यादव ३-७०, झेड खान २-५९)

भारत ९ गडी राखून विजयी

दुसरी कसोटी. मुंबई – २३ ते २६ नोव्हेंबर, २०१२

भारत ३२७ (सीए पुजारा १३५, आर अश्विन ६८, **एसआर तेंडुलकर** ८; एमएस पानेसर ५-१२९, जीपी स्वान ४-७०) व १४२ (जी गंभीर ६५, **एसआर तेंडुलकर** ८; एमएस पानेसर ६-८१, जीपी स्वान ४-४३)

इंग्लंड ४१३ (केपी पीटरसन १८६, एएन कुक १२२; पीपी ओझा ५-१४३, एच सिंग २-७४, आर अश्विन २-१४५) व ५८-०

इंग्लंड १० गडी राखून विजयी

तिसरी कसोटी. कोलकाता – ५ ते ९ डिसेंबर, २०१२

भारत ३१६ (**एसआर तेंडुलकर** ७६, जी गंभीर ६०, एमएस धोनी ५२; एमएस पानेसर ४-९०, जेएम अँडरसन ३-८९) व २४७ (आर अश्विन ९१*, व्ही सेहवाग ४९, **एसआर तेंडुलकर** ५; जेएम अँडरसन ३-३८, एसटी फिन ३-४५)

इंग्लंड ५२३ (एएन कुक १९०, आयजेएल ट्रॉट ८७, एनआरडी कॉम्प्टन ५७, केपी पीटरसन ५४; पीपी ओझा ४-१४२, आर अश्विन ३-१८३) व ४१-३ (आर अश्विन २-३१)

इंग्लंड ७ गडी राखून विजयी

चौथी कसोटी. नागपूर – १३ ते १७ डिसेंबर, २०१२

इंग्लंड ३३० (केपी पीटरसन ७३; जेई रुट ७३, एमजे प्रायर ५७, जीपी स्वान ५६; पीपी ओझा ४-६९, आय शर्मा ३-४९) व ३५२-४ घोषित (आयएलजे ट्रॉट १४३, आयआर बेल ११६*, आर अश्विन २-९९)

भारत ३२६-९ घोषित (व्ही कोहली १०३, एमएस धोनी ९९, **एसआर तेंडुलकर** २; जेएम अँडरसन ४-८१, जीपी स्वान ३-७६)

सामना अनिर्णित

इंग्लंड मालिकेत २-१ विजयी

आस्ट्रेलियाचा भारत दौरा, २०१३ – बॉर्डर-गावसकर करंडक

पहिली कसोटी. चेन्नई – २२ ते २६ फेब्रुवारी, २०१३

आस्ट्रेलिया ३८० (एमजे क्लार्क १३०, एमसी हेनरिकस ६८, डीए वॉर्नर ५९; आर अश्विन ७-१०३) व २४१ (एमसी हेनरिकस ८१*; आर अश्विन ५-९५, आरए जडेजा ३-७२)

भारत ५७२ (एमएस धोनी २२४, व्ही कोहली १०७, **एसआर तेंडुलकर** ८१; जेएल पॅटिसन ५-९६) व ५०-२ (व्ही सेहवाग १९, **एसआर तेंडुलकर** १३)

भारत ८ गडी राखून विजयी

दुसरी कसोटी. हैदराबाद (डेक्कन) – २ ते ५ मार्च, २०१३

आस्ट्रेलिया २३७-९ घोषित (एमजे क्लार्क ९१, एमएस वेड ६२; आरए जडेजा ३-३३, बी कुमार ३-५३) व १३१ (इजेएम कॉवन ४४; आर अश्विन ५-६३, आरए जडेजा ३-३३)

भारत ५०३ (सीए पुजारा २०४, एम विजय १६७, **एसआर तेंडुलकर** ७; जीजे मॅक्सवेल ४-१२७, एक्सजे डोहर्टी ३-१३१)

भारत एक डाव व १३५ धावांनी विजयी

तिसरी कसोटी. मोहाली – १४ ते १८ मार्च, २०१३

आस्ट्रेलिया ४०८, (एमए स्टार्क ९९, एसपीडी स्मिथ ९२, इजेएम कॉवन ८६, डीए वॉर्नर ७१; आय शर्मा ३-७२, आरए जडेजा ३-७७) व २२३ (पीजे ह्यूज ६९; बी कुमार ३-३१, आरए जडेजा ३-३५)

भारत ४९९ (एस धवन १८७, एम विजय १५३, व्ही कोहली ६७*, **एसआर तेंडुलकर** ३७; पीएम सिडल ५-७१) व १३६-४ (व्ही कोहली ३४, **एसआर तेंडुलकर** २१)

भारत ६ गडी राखून विजयी

चौथी कसोटी. दिल्ली – २२ ते २४ मार्च, २०१३

आस्ट्रेलिया २६२ (पी सिडल ५१, एसपीडी स्मिथ ४६, पीजे ह्यूज ४५; आर अश्विन ५-५७) व १६४ (पी सिडल ५०; आरए जडेजा ५-५८, पीपी ओझा २-१९, आर अश्विन २-५५)

भारत २७२ (एम विजय ५७, सीए पुजारा ५२, **एसआर तेंडुलकर** ३२; एनएम लिऑन ७-९४) व १५८-४ (सीए पुजारा ८२*, व्ही कोहली ४१, **एसआर तेंडुलकर** १; जीजे मॅक्सवेल २-५४)

भारत ६ गडी राखून विजयी

भारत मालिकेत ४-० विजयी

२६.
निवृत्तीच्या उंबरठ्यावर

२०१३च्या जुलै महिन्यात, लंडनमध्ये माझ्या डाव्या हातावर शस्त्रक्रिया करण्यात आली. त्यातून बरा होण्यासाठी मला खूपच प्रयत्न करावे लागले. शस्त्रक्रियेनंतरचा काळ जितका वेदनादायक होता, तितकाच वेळ खाणाराही होता. ऑगस्टअखेरीस जेव्हा मी प्रत्यक्ष क्रिकेट सरावाला सुरुवात केली तेव्हा सुटकेचा नि:श्वास सोडला. चॅम्पियनशिप लीग टी-२० सुरू होण्यासाठी काही आठवड्यांचाच अवधी उरला होता. शस्त्रक्रियेनंतरचा काळ थोडासा लांबलेला असला, तरी मला तो कधीच कंटाळवाणा वाटला नाही. इंग्लंडहून परतल्यावर मी हृदयाच्या (कार्डिओ) व्यायामाचा एक भाग म्हणून सायकलिंग करायला सुरुवात केली. माझ्याबरोबर माझे मित्र अतुल रानडे आणि फैजल मोमेनही होते. अतुल स्वत:ला फिट ठेवण्यासाठी आधीपासूनच एक आड एक दिवस सायकल चालवत होता. फैजलही आमच्याबरोबर यायला तयार झाला. त्यामुळे सायकलिंग करायला मजा येऊ लागली. पहिल्याच दिवशी सकाळी ४० मिनिटं सायकल चालवल्यावर आम्ही थेट बांद्र्याच्या माउंट मेरी चर्चपर्यंत सायकलने जायचं ठरवलं. चर्चकडे जाण्यासाठी उभ्या चढावाचा रस्ता होता. ती मोठी चढण पाहूनच फैजलने यायला नकार दिला. अतुल आणि मी मात्र जिद्दीने चर्चपर्यंत पोचलो. त्या चढणीवरून सायकल चालवणं अवघड होतं. वर पोचलो तेव्हा दोघेही धापा टाकत होतो. तरीही मी अतुलला म्हटलं, ''आपण पुन्हा एकदा प्रयत्न करू या.'' दुसऱ्या प्रयत्नात मी अर्ध्या रस्त्यावर अतुलला मागे टाकलं. वर पोचल्यावर मात्र मला भोवळ आल्यासारखं वाटू लागलं. मी पाणी पिऊन काही शरीर ताणण्याचे व्यायाम करून पाहिले, पण त्याचा काहीच उपयोग झाला नाही. डोळ्यांसमोर अंधारी येऊ लागली. मी रस्त्याच्या विभाजकावर हात लांब पसरून बसलो. तोपर्यंत अतुलही वर येऊन पोचला. माझी अवस्था पाहून अतुल खूपच घाबरला. जवळच्या एका झाडाचं मोठं पान तोडून त्याने मला वारा घालण्याचाही प्रयत्न केला. त्याचाही काही उपयोग झाला नाही. तेवढ्यात माझ्या लक्षात आलं की, मेंदूला नीट रक्तपुरवठा होण्यासाठी मला आडवं पडून राहणं गरजेचं आहे. ही गोष्ट मी अतुलला सांगितली. अतुलला चर्चजवळ उभी असलेली एक उघडी जीप दिसली. त्याने मला जीपमध्ये झोपायला सांगितलं. तेवढ्यात माझं लक्ष एका रिक्षाकडे गेलं. मी अतुलला म्हटलं, ''मी थोडा वेळ रिक्षामध्ये मागच्या बाजूला झोपतो. तू जरा रिक्षावाल्याला पटव.'' मला त्या अवस्थेत पाहून रिक्षावाल्याला चांगलाच धक्का बसला. अतुल रिक्षाचालकाला घडलेली हकिगत सांगू लागला. तोपर्यंत साधारण पाच मिनिटं मी रिक्षाच्या मागच्या सीटवर आडवा पडून राहिलो. सकाळी सहा वाजता घरापासून काही मिनिटांच्या अंतरावर मी एका रिक्षाच्या मागच्या सीटवर झोपलेला असेन, अशी मी आयुष्यात कधी कल्पनाही केली नव्हती. थोडं बरं वाटल्यावर मी रिक्षातून बाहेर आलो. रिक्षाचालकाच्या हातावर १०० रुपये ठेवले आणि त्याचे आभार मानत हळूहळू सायकलवरून खाली उतरू लागलो. आम्हाला परत यायला एवढा वेळ लागलेला पाहून खाली थांबलेला फैजल चांगलाच अस्वस्थ झाला होता. त्याला वाटलं, आम्ही वर चहा पीत बसलेलो असणार. आम्ही सांगितलेली हकिगत ऐकून तो चक्रावून गेला. एवढा मोठा किस्सा घडूनही त्यानंतर माझ्या सरावात किंवा व्यायामात जराही खंड पडला नाही. मात्र, त्या वेळी काही महिन्यांनी मी आंतरराष्ट्रीय क्रिकेटचा निरोप घेणार आहे, ही गोष्ट मलाही ठाऊक नव्हती.

मे, २०१३मध्ये मी आयपीएलमधून निवृत्ती जाहीर केली होती. त्यामुळे चॅम्पियन लीगमध्येही मी यानंतर खेळणार नव्हतो. आनंदाची गोष्ट म्हणजे मुंबई इंडियन्सनी अंतिम सामन्यात राजस्थान रॉयल्सचा पराभव करून चॅम्पियन लीग जिंकली. माझ्या अखेरच्या हंगामात माझ्या संघाने आयपीएल आणि चॅम्पियन लीग स्पर्धा जिंकून मला आगळीवेगळी भेट दिली.

रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली संघामध्ये अतिशय खेळकर आणि सौहार्दाचं वातावरण निर्माण झालं होतं.

चॅम्पियन लीग स्पर्धेच्या दरम्यान मला प्रथमच थोडा निरुत्साह जाणवू लागला. जिममध्ये जाताना आपण स्वत:वर थोडी जबरदस्ती करतो आहे, असं मला वाटू लागलं. नेट प्रॅक्टिसच्या एखाद्या सत्राला जाता आलं नाही, तरी त्याचं मला विशेष वाईट वाटत नव्हतं. हा अनुभव मात्र मला स्वत:लाच नवा होता. जिममध्ये मी काही रोज नेमाने जात नसे. काही दिवस सलग जिममध्ये जाऊन मी भरपूर व्यायाम करायचो. मग थोडे दिवस जिमकडे फिरकायचोही नाही. मात्र इच्छा नसताना नाइलाजाने जिममध्ये जाण्याचा अनुभव मी प्रथमच घेत होतो. शिवाय अनेक छोट्या-मोठ्या कुरबुरी सुरू झाल्या होत्या. साध्या दुखापतीमधून बरं व्हायलाही मला बराच वेळ लागत होता. अंगदुखीचा त्रासही मला जाणवू लागला होता.

भारतीय संघ डिसेंबर, २०१३मध्ये दक्षिण आफ्रिकेच्या दौऱ्यावर जाणार होता. त्या दौऱ्यात मी माझ्या कारकिर्दीतील २००वा कसोटी सामना खेळणार होतो. त्यानंतर २०१४च्या सुरुवातीला आम्ही न्यूझीलंडला जाणार होतो. दोन्ही दौऱ्यांत खेळण्यासाठी मी उत्सुक होतो. माझ्या २००व्या कसोटी सामन्याला हजर राहण्यासाठी दक्षिण आफ्रिकेला जायचा बेत माझ्या अनेक मित्रांनी आधीपासून आखला होता. मी अजितलाही 'वेळेत विमानाचं तिकीट बुक करून ठेव', अशी आठवण करत होतो. तेवढ्यात नोव्हेंबर, २०१३मध्ये वेस्ट इंडीजचा संघ दोन कसोटी सामन्यांची मालिका खेळण्यासाठी भारतात येत असल्याची घोषणा बीसीसीआयने केली. त्यानंतर मात्र माझ्या डोक्यात वेगळीच चक्रं फिरू लागली. मला आता नेमका दिवस आठवत नाही, पण त्याच दरम्यान क्रिकेटमधून निवृत्त होण्याचा विचार पहिल्यांदाच माझ्या मनात आला. वेस्ट इंडीजविरुद्धचे दोन कसोटी सामने हे माझ्या कारकिर्दीतील अखेरचे सामने ठरू शकतील का, यावर मी गंभीरपणे विचार करू लागलो होतो.

एक दिवस अंजली आणि अजितसमोर मी तो विषय काढला. ''वेस्ट इंडीज मालिकेनंतर मला निवृत्त व्हावंसं वाटतंय,'' असं मी त्यांना सांगितलं. त्या मालिकेतला दुसरा सामना हा माझा २००वा कसोटी सामना ठरणार होता. त्यानंतर २०१४च्या अखेरपर्यंत पुन्हा भारतात खेळण्याची संधी मला मिळणार नव्हती. सतत होणाऱ्या दुखापतींशी लढण्याची ताकद तोपर्यंत माझ्यात उरली असेल का, याची खातरी मला वाटत नव्हती. मनाला उभारी वाटत नसताना उगाचच शरीरावर बळजबरी करण्यात काहीच अर्थ नव्हता, असं मला वाटलं.

दोघांनाही माझं म्हणणं पटलं. अंजली तर म्हणाली, ''तू काहीही निर्णय घेतलास तरी मला तो मान्य असेल. फक्त एकदा निर्णय घेतल्यावर काही महिन्यांनी तू त्याबद्दल पश्चात्ताप मात्र करून घेऊ नकोस.'' अजितच्याही मते मी योग्य वेळी निवृत्तीचा निर्णय घेत होतो. मी अखेरचा सामना भारतात खेळणार होतो, हे त्याच्या दृष्टीने जास्त महत्त्वाचं होतं. मीही तोच विचार केला होता. कारण माझ्या कारकिर्दीतील अखेरचा सामना मी जर परदेशात खेळलो असतो, तर ती गोष्ट कोणालाच रुचली नसती.

निवृत्त होण्याचा निर्णय घेतल्यानंतर, 'वेस्ट इंडीज मालिकेतील दुसरा सामना मुंबईत खेळवता येईल का,' अशी विचारणा मी बीसीसीआयकडे केली. शेवटचा सामना जर मी माझ्या घरच्या प्रेक्षकांसमोर खेळू शकलो, तर त्यासारखी समाधानाची दुसरी गोष्ट नव्हती. त्याहून महत्त्वाचं म्हणजे मी माझ्या आईला स्टेडियममध्ये आणू शकलो असतो. माझ्या आईने मला प्रत्यक्ष मैदानावर खेळताना कधीही पाहिलं नव्हतं. १९८७मध्ये मी माझ्या प्रथम श्रेणीच्या क्रिकेट कारकिर्दीला मुंबईमध्येच सुरुवात केली होती. माझा अखेरचा कसोटी सामना मी जर मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर खेळू शकलो असतो, तर एक वर्तुळ पूर्ण झालं असतं. मला परमेश्वराचे आभार मानावेसे वाटले. माझ्या आवडत्या खेळाबद्दल माझ्या घरच्या प्रेक्षकांसमोर कृतज्ञता व्यक्त करण्याची संधीच जणू विधाता मला देत होता.

मित्र आणि व्यवस्थापक विनोद नायडू आणि अंजलीची व माझी जिवलग मैत्रीण अपर्णा संथानम यांच्याबरोबरही मी माझ्या निवृत्तीच्या निर्णयासंबंधी सविस्तर चर्चा केली. त्या दोघांच्या सहवासातील ती संध्याकाळ माझ्या कायम लक्षात राहील. क्रिकेट हा महान खेळ मला इतकी वर्षं खेळता आला, याचा आनंद व्यक्त करण्यासाठी त्या संध्याकाळी मी खास शॅम्पेन आणली होती. निराशा, हताशपणा किंवा आता सगळं संपलं आहे, अशा भावनांचा लवलेशही त्या वेळी माझ्या मनात नव्हता. उलट माझं मन आनंद, समाधान आणि कृतकृत्यतेच्या भावनेने भरून गेलं होतं. माझ्या २४ वर्षांच्या क्रिकेटच्या

आठवणींना त्या संध्याकाळी पुन्हा एकदा उजाळा मिळाला. येणाऱ्या मालिकेबद्दल आम्ही दिलखुलासपणे गप्पा मारल्या. ती खरोखरच एक मंतरलेली संध्याकाळ होती. त्या दोघांशी बोलल्यावर मी योग्य निर्णय घेतला आहे, याची मला पुन्हा एकदा खातरी पटली. निर्णयाची वेळ अचूक होती. मी माझ्या हृदयातील हाकेला प्रतिसाद दिला होता. तो निर्णय घेताना मी माझ्या मेंदूला मात्र त्यात ढवळाढवळ करू दिली नव्हती. कारण माझ्या मेंदूला प्रत्येक निर्णयाच्या क्षणी अडचणीचे प्रश्न विचारण्याची वाईट सवय होती. निवृत्तीनंतर काय करायचं, याचाही मी मुळीच विचार केला नव्हता. थांबण्यासाठी हीच योग्य वेळ आहे, एवढी एकच गोष्ट माझ्या मनाला पटली होती.

त्यानंतर दुसऱ्या दिवशी, १० ऑक्टोबर, २०१३ला सकाळी मी बीसीसीआयचे अध्यक्ष एन. श्रीनिवासन यांना फोन करून माझ्या निवृत्तीचा निर्णय कळवला. ते मला म्हणाले, ''तुझी इच्छा असेपर्यंत तू क्रिकेट खेळत राहावंस असं आम्हा सर्वांना वाटतं. तू जो काही निर्णय घेशील त्याला बीसीसीआयचा पूर्ण पाठिंबा असेल. निवृत्तीचा निर्णय घेण्याचा अंतिम अधिकार मात्र तुझ्या एकट्याचाच असेल. त्यात कोणीही हस्तक्षेप करणार नाही.'' त्यानंतर मी त्यांना वेस्ट इंडीज मालिकेतील दुसरा सामना मुंबईला खेळवण्याची विनंती केली. आपण त्याबद्दल जरूर प्रयत्न करू, असं त्यांनी मला आश्वासन दिलं. केवळ एका खेळाडूच्या विनंतीवरून एका विशिष्ट शहरात कसोटी सामना खेळवला जावा, ही क्वचितच घडणारी आणि माझ्यासाठी तर अतिशय हृदयस्पर्शी घटना होती.

बीसीसीआयच्या अध्यक्षांना फोन करण्यापूर्वी मी माझ्या निवृत्तीचा निर्णय माझ्या मुलांना सांगितला. सारा खूपच अस्वस्थ झाली. ''म्हणजे तू क्रिकेटच्या सर्वच प्रकारातून निवृत्त होणार का?'' असा प्रश्न तिने मला विचारला. तिचे डोळे पाण्याने भरले होते. मात्र तिने आपल्या मनातल्या भावना मला जाणवू दिल्या नाहीत. अर्जुन त्या वेळी दक्षिण आफ्रिकेत होता. त्याला ही गोष्ट कळवणं म्हणजे माझी खरी कसोटी होती. माझ्या क्रिकेटच्या बाबतीत तो कमालीचा हळवा होता. माझ्या निवृत्तीच्या विषयावरून आम्ही नेहमीच एकमेकांची मस्करी करायचो. प्रत्येक नवी मालिका सुरू झाली की, मी त्याला चेष्टेने म्हणायचो, ''अरे बाबा, ही माझी शेवटीच मालिका असणार बरं का! आता मी खूप म्हातारा होत चाललोय.'' आज मात्र मी त्याच्याबरोबर मस्करी करू शकणार नव्हतो.

१० ऑक्टोबरला सकाळी मी अर्जुनला फोन केला. त्याला म्हणालो, ''जर तू कुठे बाहेर असलास तर थोडा वेळ आपल्या खोलीत जा. मला तुझ्याशी एका महत्त्वाच्या विषयावर बोलायचंय.'' त्यानंतर १० मिनिटांनी मी त्याला फोन केला. ''नोव्हेंबरमध्ये वेस्ट इंडीजविरुद्ध खेळले जाणारे दोन कसोटी सामने हे माझे अखेरचे सामने असतील,'' असं मी त्याला सांगितलं. त्यावर पलीकडून मला एक शब्दही ऐकू आला नाही. बराच वेळ तो काही बोललाच नाही. ''तू ऐकतोयस ना?'' असं अखेरीस मला विचारावं लागलं. त्याने फक्त 'हो' असं उत्तर दिलं. त्यापलीकडे त्याच्या तोंडून एकही शब्द निघाला नाही. त्याने फोन ठेवून दिला होता. तो रडत असणार, हे मी ओळखलं. माझ्याही गळ्यात हुंदका दाटून आला. त्यातून सावरायला मला बराच वेळ लागला. १० मिनिटांनी अर्जुनचा फोन आला. तो तिथल्या हकिगती मला सांगू लागला. माझ्या निवृत्तीचा मात्र त्याने उल्लेखही केला नाही. धक्का सहन करण्याची ती त्याची अनोखी पद्धत होती.

त्या दिवशी दुपारीच माझ्या निवृत्तीचा निर्णय प्रसारमाध्यमांनी जाहीर केला. माझ्या कुटुंबीयांसाठी ती फारच भावस्पर्शी घटना होती. मी मात्र अगदी शांत होतो. मी योग्य वेळी योग्य निर्णय घेतल्याची मला पूर्ण खातरी होती. ती बातमी जाहीर झाल्यावर, अंजली मला सांगून साराला शाळेतून घेऊन येण्यासाठी बाहेर पडली. घरी परतताना अंजलीने तिच्या मोबाइलवर आलेला एक संदेश साराला वाचून दाखवला. तुझ्या बाबांबद्दल सर्व जगाला किती आदर आणि कौतुक वाटतंय हे साराच्या लक्षात यावं, असं तिला वाटत होतं. सारा घरी आल्यावर धावत माझ्यापाशी आली. एक शब्दही न बोलता तिने मला घट्ट मिठी मारली. त्या क्षणी मात्र माझ्याही डोळ्यांत पाणी आलं. एका समाधानी पित्याच्या डोळ्यांतील ते आनंदाश्रू होते. माझ्या मुलांइतकं प्यारं मला दुनियेत दुसरं कोणीही नव्हतं. माझ्या कर्तृत्वाचा त्यांनाही अभिमान वाटतो आहे, हे पाहून माझं मन भरून आलं होतं. त्यांच्या वाढत्या वयात मी त्यांच्याबरोबर राहू शकलो नव्हतो. त्यामागचं खरं कारण आज त्यांच्या लक्षात आलं होतं.

एव्हाना आमच्या इमारतीभोवती लोकांनी गर्दी करायला सुरुवात केली होती. त्यांच्या अलोट प्रेमाने मी भारावून गेलो. मला अनेक फोन कॉल्स आणि असंख्य संदेश आले. मीसुद्धा अनेकांशी फोनवरून बोललो. माझं आयुष्य घडवणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचे मी आभार मानण्याचा प्रयत्न केला. मात्र तरीही मी सर्वांशीच संपर्क साधू शकलो नाही त्याबद्दल त्यांचा गैरसमज होणार नाही, याची मला खातरी आहे. मला त्या प्रत्येकाविषयी किती आदर वाटतो, याची त्यांनाही कल्पना आहे.

त्या रात्री खूप उशिरापर्यंत मी प्रत्येकाला उत्तर पाठवत राहिलो. मला रात्री झोपही छान लागली. माझं मन शांत होऊन गेलं होतं. निवृत्तीचा निर्णय घेतला असला, तरी अजूनही मी सक्रिय खेळाडू होतो. लगेच दुसऱ्या दिवसापासून मी काही निवृत्त क्रिकेटपटूचं जीवन जगायला सुरुवात करणार नव्हतो. उलट, उद्या सकाळी उठून मला क्रिकेटचा सराव करायचा होता. उरलेल्या काही महिन्यांत मुंबई आणि भारतीय संघाला विजय मिळवून देण्यासाठी प्रयत्नांची शिकस्त करायची होती.

वेस्ट इंडीज मालिकेसाठी तयार होताना

निवृत्तीचा निर्णय जाहीर केल्यानंतर मला क्रिकेटच्या सरावात एक वेगळीच मजा येऊ लागली. दुसऱ्याच दिवशी सकाळी मी मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या बांद्र्याच्या मैदानात सरावासाठी गेलो. मला पाहताच मैदानावर काम करणारे सर्व कर्मचारी माझ्यापाशी आले. माझ्या क्रिकेटमधील योगदानाबद्दल त्यांनी माझे आभार मानले. खरंतर मी त्यांचे आभार मानायला हवे होते. क्रिकेट खेळताना मला कोणत्याही गोष्टींची अडचण जाणवू नये, यासाठी त्या सर्वांनी अपार कष्ट घेतले होते. त्यांच्यापैकी काही जणांना तर आपले अश्रू आवरता आले नाहीत. ''आता उद्यापासून तुम्ही सरावाला येणार नाही. आम्हाला कायम तुमची उणीव भासणार,'' असंही काही जण म्हणाले. मी म्हटलं, ''अजून मी निवृत्त झालेलो नाही आणि मी निवृत्तीनंतरही तुम्हाला छळत राहणार आहे. क्रिकेटमधून निवृत्त झालो, तरी मी सरावासाठी येतच राहणार.''

एमसीएमधील माझ्या सरावाच्या अखेरच्या सत्राच्या आदल्या दिवशी मी व्यवस्थापक अजय देसाईंना भेटलो. दुसऱ्या दिवशी सकाळी मला मैदानात काम करणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांची वैयक्तिक भेट घ्यायची आहे, असा निरोप मी त्यांना दिला. दुसऱ्या दिवशी मी मैदानात पोचलो, तेव्हा सर्व जण माझी आतुरतेने वाटत पाहत होते. मी प्रत्येकाला छोटीशी भेटवस्तू दिली आणि सर्वांचे आभार मानले. काही जणांनी मला प्रेमाने मिठी मारली. सर्वांचेच डोळे पाण्यांनी भरलेले होते. तो अतिशय हेलावून टाकणारा प्रसंग होता. मीही गहिवरून गेलो. त्यांनी मला अजूनही एक सुखद धक्का द्यायचं ठरवलं होता. निरोप समारंभाचा कार्यक्रम झाल्यावर मला वाटलं की, ते आपापल्या कामाला निघून जातील. मात्र त्या दिवशी त्यांना प्रत्येक क्षण माझ्यासोबत राहायचं होतं. मी माझ्या नेहमीच्या सरावाला सुरुवात केली तरी सर्व जण तिथेच उभे होते. त्या सर्वांना मी बरीच वर्षं ओळखत होतो. त्यांनी माझ्यावर मुलासारखी माया केली होती.

वानखेडे स्टेडियममधील कर्मचाऱ्यांच्या बाबतीतही मला तोच अनुभव आला. त्यांच्याशीही माझा अनेक वर्षांचा स्नेहसंबंध होता. माझ्या क्रिकेट कारकिर्दीतील अनेक भल्याबुऱ्या क्षणांचे ते साक्षी होते. त्यांच्यासाठीही मी भेटवस्तू आणल्या. सर्वांबरोबर मी एक फोटोही काढला. त्यांनी दिलेली प्रेमळ वागणूक मी कधीही विसरू शकणार नाही.

वानखेडे स्टेडियमवरील त्या सरावाच्या काळात, मी एक दिवस मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांची मुद्दाम भेट घेतली. माझ्या आईला स्टेडियममध्ये आणण्यासाठी मला एका रॅम्पची (उतरंड) गरज होती. मी त्यांना रॅम्प मिळवून द्यायची विनंती केली. आईला स्टेडियममध्ये येताना थोडाही त्रास होऊ नये, यासाठी मी अतिशय जागरूक होतो. एमसीएने माझ्या कुटुंबीयांसाठी स्टेडियममध्ये एक बॉक्स (बसण्याची जागा) राखून ठेवला होता. मी तिथेही जाऊन आलो. मला ती जागा थोडी गैरसोयीची वाटली. माझ्या आईची तब्येत फारशी चांगली नव्हती. त्या बॉक्सपर्यंत तिला घेऊन येणं मला अवघड वाटलं. त्याऐवजी अध्यक्षांसाठी राखीव असलेल्या बॉक्समध्ये तिने बसणं अधिक सोयीचं आणि सुरक्षित आहे, असं आम्हाला सर्वांनाच वाटलं. सामना पाहताना तिला कदाचित थकव्यामुळे विश्रांतीची गरज भासण्याची शक्यता होती. तिच्यासाठी मी गरवारे पॅव्हिलियनमधील एक रूमही बुक केली.

कारमधून उतरल्यापासून अध्यक्षांच्या बॉक्सपर्यंत जाण्यासाठी व्हीलचेअरच्या मार्गात कुठे कुठे रॅम्पची गरज लागेल, ते

मी पुन्हा एकदा बारकाईने पाहून घेतलं. सर्व व्यवस्था चोख होऊ शकेल याची पक्की खातरी पटल्यावर मी स्वत: आईला सामन्याला यायचं निमंत्रण दिलं. माझ्या अखेरच्या सामन्याला आई उपस्थित राहणार, ही माझ्यासाठी मोठ्या गौरवाची गोष्ट होती.

अखेरचा रणजी सामना

निवृत्ती जाहीर केल्यानंतर मी प्रथमच जेव्हा माझ्या मुंबई संघातील सहकाऱ्यांना भेटलो, तेव्हा बऱ्याच जणांनी माझ्या निवृत्तीबद्दल आश्चर्य व्यक्त केलं. त्यांच्या मते मी अजून काही काळ खेळायला हवं होतं. त्यांची प्रतिक्रिया निश्चितच प्रोत्साहन देणारी होती. त्यांचा माझ्यावर असलेला गाढ विश्वास पाहून मला खूपच समाधान वाटलं.

मी माझा अखेरचा रणजी सामना हरियाणाविरुद्ध लाहलीला खेळलो. लाहली हे शहर दिल्लीच्या उत्तरेला आहे. माझा शेवटचा रणजी सामना हा माझ्यासाठी एक अविस्मरणीय अनुभव होता. लाहलीला जाण्यापूर्वी हरियाणा क्रिकेट असोसिएशनच्या अनिरुद्ध चौधरीशी माझं फोनवरून बोलणं झालं होतं. २०११च्या इंग्लंड दौऱ्यात अनिरुद्ध चौधरी भारतीय संघाचा व्यवस्थापक होता. त्याचे वडील, रणबीर सिंग महिंद्र हेही १९९१-९२च्या आस्ट्रेलिया दौऱ्यात व्यवस्थापक होते. अनिरुद्धने आमच्यापैकी काही जणांची व्यवस्था मुख्यमंत्र्यासाठी राखीव असलेल्या विश्रामगृहात केली होती. त्याच्या मते ते अतिशय शांत आणि नयनरम्य ठिकाण होतं. त्यांनी आमच्यासाठी खास सुरक्षाव्यवस्थाही ठेवली होती.

आम्ही दिल्लीमार्गे लाहलीला जाणार होतो. दिल्ली विमानतळावर पोचताच मला अनिरुद्धचा फोन आला. त्याने दिल्लीच्या 'आयटीसी मौर्य' हॉटेलात आमच्या दुपारच्या जेवणाची व्यवस्था केली होती. हॉटेलात पोचताच मला एक सुखद धक्का बसला. हॉटेलच्या लॉबीमधील दिवे अचानक मंद झाले. हॉटेलचे जनरल मॅनेजर अनिल चढ्ढा ह्यांनी माझं स्वागत केलं. माझ्या स्वागतासाठी हॉटेलमध्ये खास लाल गालिचा अंथरलेला होता. हॉटेलच्या कर्मचाऱ्यांनी माझ्यावर गुलाब पाकळ्यांचा वर्षाव केला. त्या स्वागताने मी भारावून गेलो.

जेवण झाल्यावर आम्ही लाहलीला जायला निघालो. गाडीने लाहलीच्या विश्रामगृहात पोचण्यासाठी आम्हाला अडीच तास लागले. मात्र दिल्ली ते लाहली या मार्गावर माझ्या स्वागतासाठी लोक हातात विविध फलक घेऊन दुतर्फा उभे होते. त्यामुळे तो प्रवास माझ्या कायमच्या आठवणीत राहिला. विश्रामगृहात पोचताच दिल्लीमध्ये माझ्यासोबत असलेल्या बटलरला (खास नेमलेला सेवक) पाहून मी चकित झालो. आमच्या आधीच तो तिथे पोचला होता. ''अनिरुद्धसाहेबांच्या विनंतीवरून आम्ही चौघे जण खास आपल्या सरबराईसाठी इथे आलो आहोत,'' असं त्याने मला सांगितलं.

विश्रामगृहात असताना एक दिवस मी तिथल्या व्यवस्थापकाला, 'लाहलीची खासियत असलेले काही पदार्थ आम्हाला खिलव', असं सांगितलं. त्यावर तो काही न बोलता चटकन माझ्या रूममधून निघून गेला. मला काहीच समजेना. नंतर झहीरपाशी जाऊन त्याने माफी मागितली. अनिरुद्धने आमच्या खाण्यापिण्याच्या बाबतीत त्याला कडक सूचना दिल्या होत्या. आमचा ब्रेकफास्ट, स्नॅक्स आणि रात्रीचं जेवण रोज दिल्लीच्या आयटीसी मौर्य हॉटेलमधून मागवलं जात होतं. इतर कुठूनही पदार्थ मागवण्याची त्याने मनाई केली होती. अनिरुद्धने आमची एखाद्या महाराजासारखी बडदास्त ठेवली होती. हरियाणा क्रिकेट असोसिएशनने लाहलीच्या वास्तव्यात आमचे खूपच लाड केले.

विश्रामगृहापासून स्टेडियम ४० मिनिटांच्या अंतरावर होतं. रस्ते मोकळे असल्यामुळे आम्ही सकाळी वेळेत मैदानात पोचत असू. स्टेडियममधलं वातावरण फारच सुरेख होतं. तिथली खेळपट्टी तर जणू द्रुतगती गोलंदाजांसाठीच खास तयार केली होती. मैदान काहीसं ओलसर होतं. अशा मऊ जमिनीवर धावताना पोटऱ्यांवर आणि मांडीच्या मागच्या स्नायूंवर जास्त ताण पडतो. वेस्ट इंडीज मालिका तोंडावर आलेली असताना लाहलीच्या मैदानावर माझ्या फिटनेसची चांगलीच परीक्षा घेतली जाणार होती. त्यात मी पास झालो असतो तर ईडन गार्डन्स आणि वानखेडे स्टेडियमवरील कसोटी सामन्यांत मी निर्धास्तपणे खेळू शकणार होतो.

लाहलीतला तो सामना चांगलाच रंगतदार झाला. मुंबई संघाचा त्या हंगामातील तो पहिलाच रणजी सामना असला तरी

माझा तो अखेरचा सामना होता. प्रसारमाध्यमांनी त्या सामन्याबद्दल चांगलीच हवा निर्माण केली होती. केवळ भारतातल्याच नव्हे, तर परदेशी प्रसारमाध्यमांतील प्रतिनिधींनीही सामन्याच्या आदल्या दिवसापासून लाहलीसारख्या छोट्या शहरात तळ ठोकला होता. स्टेडियम प्रेक्षकांनी खच्चून भरलं होतं. त्या सर्वांवर नियंत्रण ठेवण्यासाठी पोलीस बंदोबस्त वाढवावा लागला. माझी प्रत्येक हालचाल टिपली जात आहे आणि माझ्या प्रत्येक सराव सत्राचंही चित्रीकरण केलं जातं आहे, ही गोष्ट क्षणाक्षणाला मला जाणवत होती.

पहिल्या डावात केवळ पाच धावांवर माझा त्रिफळा उडाला. चेंडू माझ्या अपेक्षेपेक्षा जास्त उसळला आणि आधी माझ्या कोपराला लागून मग तो स्टम्पवर गेला. माझी फलंदाजी पाहण्यासाठी आलेल्या प्रेक्षकांची निराशा झाली. लाहलीच्या खेळपट्टीवर आजपर्यंत कोणताही संघ फारशा धावा काढू शकला नव्हता. हरियाणा संघाच्या पहिल्या डावातील १३२ धावसंख्येला प्रत्युत्तर देताना आम्ही केवळ १३४ धावा काढू शकलो. सामना खूपच अटीतटीचा झाला. दुसऱ्या डावात सामना जिंकण्यासाठी आमच्यासमोर २४० धावांचं लक्ष्य होतं. लाहलीच्या मैदानात फलंदाजाने मारलेला चेंडू इतक्या संथ गतीने सीमारेषेपर्यंत जात असे, की आम्हाला जिंकण्यासाठी जणू २८० धावा काढायची तयारी ठेवणं आवश्यक होतं.

दुसरा डाव सुरू होण्याआधी मी माझ्या सहकाऱ्यांबरोबर थोडी चर्चा केली. मी त्यांना सांगितलं की, आपण चहापानाच्या आसपास आक्रमक फलंदाजीला सुरुवात करायला हवी. तोपर्यंत हरियाणा संघाने ५० षटकं टाकलेली असतील. त्या वेळी चेंडू जुना झालेला असेल आणि गोलंदाजही थकलेले असतील. थोडासा धोका पत्करून जास्तीत जास्त धावा काढण्याची तीच योग्य वेळ असेल. कारण दुसऱ्या दिवशी सकाळी ते नवा चेंडू घेऊ शकतील आणि त्यांचे गोलंदाजही सकाळी ताजेतवाने झालेले असतील.

त्या दिवशी संध्याकाळी धवल कुलकर्णीने व मी मिळून चांगली भागीदारी केली. धवल हा आमचा द्रुतगती गोलंदाज होता. मी त्याला सतत प्रोत्साहन देत होतो. ''काही झालं तरी तू टिकून राहायला हवंस,'' असं मी त्याला पुन्हा पुन्हा बजावत होतो. फलंदाजी करू शकणारा तो आमचा शेवटचा खेळाडू होता. त्यानंतर येणाऱ्या फलंदाजांचा हिरव्या खेळपट्टीवर टिकाव लागणं अवघड होतं. धवलने मात्र त्या दिवशी अतिशय जिगरबाजपणे फलंदाजी केली. एक-दोन वेळा चेंडू त्याच्या हेल्मेटला लागूनही तो डगमगला नाही. त्या दिवशीचा खेळ संपला तेव्हा जिंकण्यासाठी आम्हाला ३९ धावांची गरज होती आणि आमचे चार गडी शिल्लक होते.

शेवटच्या दिवशी सकाळी नऊ वाजता खेळ सुरू होणार होता. त्याआधी खेळपट्टीवर कोणता रोलर फिरवायचा याचा निर्णय घेणं महत्त्वाचं होतं. खेळपट्टीचं निरीक्षण केल्यावर मी कर्णधार झहीर खानला म्हटलं की, गवत वरून जरी सुकल्यासारखं दिसत असलं तरी तळाशी ते अजून ओलं आहे. ऊन आल्याशिवाय ते नीट सुकणार नाही. आपण जर खेळपट्टीवर जड रोलर फिरवला तर गवताच्या खाली असलेला ओलसरपणा वर येऊन पसरेल आणि सगळी खेळपट्टी ओलसर होऊन जाईल. त्यापेक्षा आपण खेळपट्टीवर जर रोलरच फिरवला नाही, तर ती आहे त्याच स्थितीत राहील. आम्हाला फक्त ३९ धावा हव्या होत्या आणि त्या काढण्यासाठी जेमतेम तासभर लागला असता.

दुसऱ्या दिवशीही धवलने टिच्चून फलंदाजी केली. एका तासाच्या आतच आम्ही आमचं लक्ष्य पूर्ण केलं. धवलने काढलेल्या १६ धावा संघासाठी खूपच मोलाच्या ठरल्या. धवल बाद झाला असता, तर उरलेले चार गडी आम्ही कदाचित १० धावांतही गमावू शकलो असतो. शेवटच्या रणजी सामन्यात मी ७९ धावांवर नाबाद राहिलो. मुंबई संघानेही रणजी हंगामाची सुरुवात धडाकेबाजपणे केली होती. सामना संपल्यानंतर हरियाणा संघाच्या खेळाडूंनी मला मानवंदना दिली. मुंबई संघातल्या माझ्या सहकाऱ्यांनी तर मला खांद्यावर उचलून पॅव्हिलियनमध्ये नेलं. त्यांच्या प्रेमाने मी नक्कीच भारावून गेलो होतो. मात्र त्याच वेळी मी खाली पडेन, अशी मला भीतीही वाटली होती. काही झालं तरी मला शेवटच्या दोन कसोटी सामन्यांसाठी पूर्ण तंदुरुस्त राहायचं होतं. ड्रेसिंग रूमच्या शेजारच्या खोलीत मुंबई संघाने माझ्यासाठी खास निरोप समारंभ आयोजित केला होता. मुंबई क्रिकेट असोसिएशनचे चिटणीस नितीन दलालही त्या वेळी हजर होते. माझ्या सन्मानार्थ केक कापण्यात आला. प्रत्येकाने छोटंसं भाषण केलं. काही जण बोलताना खूपच भावुक झाले. सगळयांच्याच डोळयांत पाणी

तरळत होतं. त्या प्रसंगाने मीही हेलावून गेलो होतो.

अनिरुद्ध चौधरीने त्या सामन्याच्या दरम्यान जणू मला अनेक आश्चर्याचे धक्के द्यायचं ठरवलं होतं. त्याने समीर दिघे, फैजल मोमेन आणि जगदीश चव्हाण या माझ्या जिवलग मित्रांना सामना पाहण्यासाठी खास निमंत्रण पाठवलं. त्यांच्या प्रवासाची व राहण्याचीही त्यानेच सोय केली. पहिल्या दिवसाचा खेळ संपल्यानंतर मी ड्रेसिंग रूममध्ये बसलो होतो. तिथल्या मॅनेजरने मला सांगितलं, ''बाहेर काही जण तुमच्याबरोबर फोटो काढण्यासाठी थांबलेत. ते तुमचा एक मिनिटापेक्षा जास्त वेळ घेणार नाहीत.'' मी फोटो काढण्यासाठी बाहेर आलो आणि समोर पाहतो, तर माझे तिघेही मित्र माझ्याकडे पाहून जोरजोरात हसत होते. त्यांना पाहून मी खूश झालो. माझ्या जिवलग मित्रांचा मला नेहमीच आधार वाटत आला आहे. माझ्या अनेक सुखदु:खाच्या प्रसंगात माझे मित्रच कायम माझ्या पाठीशी उभे राहिले होते. आजही माझा शेवटचा रणजी सामना पाहण्यासाठी ते खास मुंबईहून दिल्लीला आले होते. माझ्यासाठी तो खरंच एक गोड धक्का होता.

लाहलीचा रणजी सामना जिंकल्यामुळे एक वेगळंच समाधान मला मिळालं होतं. निवृत्त होण्यापूर्वी मी क्रिकेटमधील खेळलेला प्रत्येक प्रकारचा अंतिम सामना जिंकला होता. वेस्ट इंडीज विरुद्धच्या माझ्या अंतिम मालिकेतही मला तो विक्रम अबाधित ठेवायचा होता. लाहलीच्या सामन्यात मला फलंदाजीचा सराव करण्याची उत्तम संधी मिळाली होती. आता माझं लक्ष कोलकाता कसोटीकडे लागलं होतं. माझ्या कारकिर्दीतला तो उपांत्य सामना होता.

ईडन गार्डन्सला अखेरचा निरोप

लाहलीच्या सामन्यानंतर मी काही दिवस घरीच पूर्ण विश्रांती घेतली. नंतर मुंबई आणि गोव्यातल्या देवळात जाऊन देवाच्या पाया पडलो. ३ नोव्हेंबर, २०१३ला संध्याकाळी मी कोलकत्यात पोचलो. मालिकेआधी शुभेच्छा देण्यासाठी द्वारकानाथ आणि कल्पा संझगिरींनी मला नेहमीप्रमाणे लाडू पाठवले. विमानतळावर बंगाल क्रिकेट असोसिएशनने माझ्यासाठी छोटासा स्वागत समारंभ आयोजित केला होता. माझ्या स्वागतासाठी विमानतळावर खूपच गर्दी झाली होती. पोलिसांना लोकांवर नियंत्रण ठेवणं अवघड जात होतं. म्हणून मीच चटकन विमानतळावरच्या विश्रामगृहात जाऊन बसलो.

त्यानंतर अर्धा तास होऊन गेला तरी परिस्थिती सुधारण्याचं चिन्ह दिसेना. अखेर माझ्या लक्षात आलं की, मी जर आणखी काही वेळ तिथेच थांबलो तर आम्हाला विमानतळावरून बाहेर पडणं अवघड होऊन जाईल. ''मला ताबडतोब हॉटेलमध्ये जायचं आहे,'' असं मी पोलीस अधिकाऱ्यांना सांगितलं. पोलिसांच्या गराड्यातून गाडीपर्यंत पोचत असताना लोकांनी माझ्यावर गुलाब पाकळ्यांचा वर्षाव केला. लोकांच्या निर्व्याज प्रेमामुळे मी भारावून गेलो होतो. कोलकाता हे क्रिकेटवेड्यांचं शहर आहे. कोलकातावासीयांनी आजपर्यंत कायमच माझं भरभरून कौतुक केलं होतं. ईडन गार्डन्सएवढं मुग्ध करणारं वातावरण मी दुसरीकडे कुठेही अनुभवलेलं नाही. माझ्या कारकिर्दीतील १९९वा कसोटी सामना मी त्या मैदानावर खेळणार होतो, हा माझ्यासाठी फार मोठा सन्मान होता.

कोलकात्यात पोचल्यावर पहिले दोन दिवस पिंटूने (रघुनाथ बसक) मला रोज दोन तास मस्त मसाज केला. माझे मित्र समर पॉल खास माझ्यासाठी आपल्या घरून जेवण घेऊन येत. त्या मिष्टान्नाचा स्वाद घेण्यासाठी मी विराट, रोहित, अजिंक्य आणि प्रग्यान ओझालाही माझ्या रूममध्ये बोलावलं. १९९१ साली दिलीप वेंगसरकरांनी माझी समरदांशी ओळख करून दिली होती. त्यानंतरच्या माझ्या प्रत्येक कोलकाता भेटीत समरदा न चुकता माझ्यासाठी घरून जेवण घेऊन येत. पिंटूही १९९४पासून कोलकात्यात माझ्याबरोबर असायचा. रोज संध्याकाळी त्याने मला मसाज करायचा आणि मग माझ्या खोलीत आम्ही एकत्र जेवण करायचं, हा प्रघातच ठरून गेला होता. जॉयदीप मुखर्जीबरोबर कालीच्या देवळात जाणं हीसुद्धा कोलकाता भेटीतील माझी आणखी एक ठरलेली गोष्ट असायची.

४ नोव्हेंबरला सकाळी जेव्हा मी मैदानात पोचलो तेव्हा एक वेगळीच व्यक्ती माझ्या स्वागतासाठी ड्रेसिंग रूमबाहेर उभी होती. ती व्यक्ती म्हणजे, माझाच मेणाचा पुतळा होता. त्या अपूर्व भेटीमुळे मी खरोखरच चकित होऊन गेलो. ड्रेसिंग रूमच्या भिंतीवर माझ्या कारकिर्दीतील वेगवेगळ्या टप्प्यांवरचे माझे फोटो लावलेले होते.

मी प्रत्येक सामन्याच्या आधी नेहमी जसा सराव करायचो तसाच त्या वेळीही करण्याचा प्रयत्न केला. काही वेळ मी नेट्समध्ये फलंदाजी केली. मात्र फुटबॉल खेळताना मी खूप सावध होतो. सामन्याच्या आधी दुखापत होऊ नये यासाठी मी जास्तीत जास्त काळजी घेत होतो. त्यानंतर मी हॉटेलच्या जिममध्ये जाऊन थोडा व्यायाम केला आणि मग रूममध्ये येऊन चित्रपट पाहत व संगीत ऐकत निवांतपणे आराम केला. रात्री आम्ही सर्व जण एकत्र जेवलो. माझ्या दिनक्रमात काहीही फरक पडला नव्हता. मी अतिशय प्रसन्न मन:स्थितीत होतो.

माझ्या निवृत्तीच्या घोषणेनंतर प्रत्येक चॅनलवर माझ्या क्रिकेट कारकिर्दीविषयी चर्चा सुरू झाल्या होत्या. मी त्या सर्वांपासून जास्तीत जास्त अलिप्त राहण्याचा प्रयत्न करत होतो. काही वेळा मी चॅनल्सवरची ती दृश्य पाहायचो. ती पाहत असताना, मी क्रिकेट खेळायला सुरुवात केल्यापासून इतकी वर्षं कशी झर्रकन निघून गेली याचाच मी विचार करत राहायचो. मात्र इतिहासात फार वेळ रमण्यात अर्थ नव्हता. वर्तमानकाळाचं भान मला सुटू द्यायचं नव्हतं. अजून मला दोन कसोटी सामने खेळायचे होते. त्याआधीच मला मानसिक निवृत्ती घ्यायची नव्हती.

१९९वा कसोटी सामना

६ नोव्हेंबर, २०१३ला वेस्ट इंडीजने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी स्वीकारली. पहिल्याच दिवशी ईडन गार्डन्सवर प्रेक्षकांनी तोबा गर्दी केली होती. अंजलीनेही त्या दिवशी, इतकी वर्षं स्वत:वर घातलेलं बंधन तोडलं होतं. नेहमीप्रमाणे घरी बसून सामना न बघता ती अर्जुनला घेऊन चक्क ईडन गार्डन्सवर आली होती. त्या दोघांना स्टेडियममध्ये बसलेलं पाहून मला आश्चर्याचा धक्का बसला होता. सामन्याच्या आदल्या रात्री तिच्याबरोबर बोलताना, तिच्या मनात काहीतरी वेगळंच शिजत असल्याचा मला थोडासा संशय आला होता; पण त्याबद्दल मी तिला फारसं खोदून विचारलं नव्हतं. माझा मित्र आणि या पुस्तकाचा सहलेखक बोरिआ मजुमदार याच्याशी संपर्क साधून तिने अर्जुनसह कोलकात्यात यायचा बेत रचला. अंजली स्टेडियममध्ये उपस्थित असल्याची जेव्हा घोषणा करण्यात आली, तेव्हा ती आल्याचं मला समजलं. संध्याकाळी खेळ संपल्यावर त्या दोघांना प्रत्यक्ष पाहून मला खूपच आनंद झाला.

आम्ही पहिल्याच दिवशी वेस्ट इंडीज संघाला २३४ धावांत गुंडाळलं. दुसऱ्या दिवशी सकाळी मी मोठ्या उमेदीने फलंदाजीला उतरलो. काही चांगले शॉट्स मारल्यानंतर एका चेंडूवर पंचांनी मला पायचीत बाद ठरवलं. तो निर्णय मला फारसा रुचला नव्हता. ऑफ स्पिनर शेन शिलिंग फोर्डचा माझ्या पॅडवर बसलेला चेंडू नक्की स्टम्पवरून गेला असता, याची मला खातरी होती. माझा अंदाज बरोबर होता. चेंडू स्टम्पपासून किमान सहा इंचांवरून गेला असता असं रिप्लेमध्येही दाखवण्यात आलं. अर्थात, क्रिकेटमध्ये अशा गोष्टी घडतच असतात, त्यावर फारसा विचार करण्यात अर्थ नसतो.

झटपट विकेट्स गेल्यामुळे काही काळ आमच्यावर दडपण आलं होतं, मात्र रोहित शर्मा आणि अश्विनची जोडी जमली. रोहित आपल्या पदार्पणाच्या कसोटीत एखाद्या सराईत फलंदाजासारखा खेळला. अश्विनने त्याला उत्तम साथ दिली. दोघांनीही शतकं झळकवत २८० धावांची दमदार भागीदारी केली. त्या भागीदारीमुळे वेस्ट इंडीजच्या खेळाडूंचं अवसानच गळालं. महम्मद शमीचीही ती पहिलीच कसोटी होती. त्याने रिव्हर्सस्विंगचा योग्य उपयोग करत आपल्या क्षमतेची चुणूक दाखवली. तो चेंडू दोन्ही बाजूला स्विंग करू शकत होता. त्याने पहिल्याच कसोटी सामन्यात नऊ गडी बाद केले.

आम्ही केवळ तीन दिवसांत वेस्ट इंडीजचा एक डाव आणि ५१ धावांनी पराभव केला. सामन्यानंतरचा बक्षीस समारंभही कल्पकतेने आयोजित केला होता. माझ्या १९९व्या कसोटी सामन्याच्या आठवणीप्रीत्यर्थ हवेत तिरंगी फुगे सोडण्यात आले. त्या सामन्याच्या अनेक सुखद स्मृती मनाशी जपत मी ईडन गार्डन्सचा निरोप घेतला.

आत्मचिंतनाची वेळ

८ नोव्हेंबरला संध्याकाळीच मी मुंबईला परत जायचं ठरवलं. २००व्या कसोटीआधी मला घरी थोडा निवांत वेळ हवा होता. कोलकाता विमानतळावर पुन्हा एकदा गर्दी झाली होती. मी जिथे जाईन तिथे लोक माझ्या मागून येत होते. सुदैवाने

माझ्याबरोबर आठ कंमाडोज होते. नाहीतर परिस्थिती नियंत्रणाबाहेर जाऊ शकली असती. मी थोडासा बेचैन झालो होतो. जमलेल्या सर्वांबरोबर फोटो काढणं किंवा प्रत्येकाला स्वाक्षरी देणं मला शक्य झालं नसतं. ‘लवकरात लवकर आपण विश्रामकक्षात जाऊ या,’ असं मी तिथल्या व्यवस्थापकांना सुचवलं. आम्ही विश्रामकक्षात पोचल्यावर, तो सार्वजनिक विश्रामकक्ष असल्याचं माझ्या लक्षात आलं.

लोक सतत माझ्याजवळ येऊ पाहत होते. मला दुसऱ्या एखाद्या विश्रामकक्षात घेऊन जाण्याची मी विनंती केली. परंतु सिक्युरिटी चेकपॉइंटनंतर तो एकच विश्रामकक्ष उपलब्ध असल्याचं मला सांगण्यात आलं. लोकांचा त्रास होऊ नये म्हणून माझ्याभोवती सुरक्षारक्षकांचं कडं उभारण्याची त्यांनी तयारी दर्शवली. मी मात्र त्या गोष्टीला स्पष्ट नकार दिला. तसं केलं असतं, तर लोकांचा फार मोठा गैरसमज झाला असता. लोकांना टाळण्याची माझी मुळीच इच्छा नव्हती. प्रत्येकाला स्वाक्षरी देण्यात मला खूपच समाधान वाटलं असतं. मी आजपर्यंत माझ्या प्रत्येक चाहत्याला आवर्जून स्वाक्षरी देण्याचा प्रयत्न केला आहे. माझ्या कारकिर्दीत ज्यांनी मला कायम पाठिंबा दिला आहे त्या माझ्या चाहत्यांची प्रत्येक इच्छा पूर्ण करणं हे मला माझं कर्तव्यच वाटलं आहे. फक्त त्या वेळेस जर मी प्रत्येकाला स्वाक्षरी देत बसलो असतो किंवा प्रत्येकाबरोबर फोटो काढत बसलो असतो, तर सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असता.

एवढ्यात मला एक कल्पना सुचली. मी ड्यूटी मॅनेजरला सांगितलं की, मुंबईला जाणारं विमान जर तयार असेल, तर मी त्यात आधीच जाऊन बसतो. त्यावर विमानाच्या सफाईचं काम सुरू आहे, असं मला सांगण्यात आलं. समोर गर्दी केलेल्या माझ्या चाहत्यांना ताटकळत ठेवण्यापेक्षा विमानात जाऊन बसलेलं बरं, असा मी विचार केला. विमानात शिरून मी माझ्या सीटवर जाऊन बसलो. विमान नुकतंच कोलकात्याला येऊन पोचलं होतं. विमानातील आधीचे कर्मचारी अजूनही विमानाबाहेर पडले नव्हते. त्या सर्वांनी माझ्याबरोबर फोटो काढले. त्यानंतर त्यांच्या जागी नवीन कर्मचारिवर्ग आला. ते सर्व तयार होऊन आपापल्या जागी उभे राहिल्यावर मी त्यांना माझ्या जागेभोवती पडदा लावण्यास सांगितलं. विमानात शिरणाऱ्या प्रवाशांनी जर मला पाहिलं असतं, तर माझ्याबरोबर फोटो काढण्यासाठी त्यांनी गर्दी केली असती. मला ते टाळायचं होतं. विमानाच्या उड्डाणालाही त्यामुळे उशीर झाला असता. विमानाने उड्डाण केल्यावर मी प्रत्येकाला स्वाक्षरी देण्यास तयार होतो. कर्मचाऱ्यांना माझं म्हणणं पटलं. मीही शांतपणे माझ्या सीटवर बसून राहिलो.

माझ्या कारकिर्दीतला अखेरचा कसोटी सामना खेळायला मी निघालो आहे, हे त्या क्षणी मला प्रथमच तीव्रतेने जाणवलं. शेवट अगदी जवळ येऊन ठेपला होता. मी विचार करू लागलो. काही दिवसांतच तो अखेरचा कसोटी सामना संपलेला असेल. सामना संपल्यावर माझ्या हातात मायक्रोफोन दिला जाईल आणि मला माझं मनोगत व्यक्त करण्याची विनंती केली जाईल. माझ्या आजपर्यंतच्या कारकिर्दीत ज्या व्यक्तींनी आणि ज्या माझ्या असंख्य चाहत्यांनी प्रत्येक क्षणी मला भक्कम आधार दिला, मला मार्गदर्शन केलं, माझं कौतुक केलं आणि मला प्रोत्साहन दिलं, त्या सर्वांचे जाहीर आभार मानण्याची ती शेवटची संधी मला मिळणार होती. मी मात्र त्या वेळी नक्की काय बोलायचं, कोणाकोणाचे आभार मानायचे यावर काहीच विचार केला नव्हता. मला त्याबाबतीत बेसावध राहून चालणार नव्हतं. याआधीही एका प्रसंगी मला अशाच प्रकारचं भाषण करावं लागलं होतं. त्या वेळी भाषण करताना मी सर्वांचे आभार मानलेत, असा माझा समज झाला होता. मी भाषण थांबवणार इतक्यात हर्षा भोगले माझ्या कानात पुटपुटला की, मी अंजलीचेच आभार मानायला विसरलो आहे! त्या वेळी मला खूपच शरमल्यासारखं झालं होतं. तशी चूक मी पुन्हा होऊन देणार नव्हतो. मुंबईला पोचायला अजून दोन तास बाकी होते. त्या दोन तासांत माझ्याशी कुणीही बोलणार नव्हतं किंवा मला कोणाचा फोनही येऊ शकणार नव्हता. माझ्या भाषणावर शांतपणे विचार करायची हीच उत्तम वेळ होती. मी माझं आयपॅड बाहेर काढलं. ज्या व्यक्तींचे मला आभार मानायचे होते, त्यांची नावं लिहून काढायला मी सुरुवात केली.

एकीकडे भाषणाची तयारी करत असताना, मला अजूनही एक कसोटी सामना खेळायचा आहे, याची मी स्वत:ला आठवण करून देत होतो. माझ्या क्रिकेट कारकिर्दीतील शेवटचे १० दिवस बाकी होते. मैदानावरच्या प्रत्येक क्षणाचा मला आनंद लुटायचा होता. मला अजून दोन इनिंग्ज खेळायच्या होत्या. माझ्या चाहत्यांच्या दीर्घकाळ स्मरणात राहील अशी

कामगिरी मला माझ्या अखेरच्या दोन खेळींमध्ये करून दाखवायची होती. विमान मुंबईच्या विमानतळावर उतरत असताना गेल्या २४ वर्षांचा कालपट माझ्या डोळ्यांसमोरून सरकत होता. खरोखरच तो एक विलक्षण प्रवास होता.

२७.
अखेरचा कसोटी सामना

कोलकाता कसोटी लवकर संपल्यामुळे संघात सामील होण्यापूर्वी मी दोन दिवस निवांतपणे घरी राहू शकलो. येणारा आठवडा धामधुमीचा ठरणार होता. अखेरच्या कसोटीत भावनांचाही कल्लोळ उसळणार होता. त्यामुळे मिळालेल्या एकांताचा मी मानसिक तयारी करण्यासाठी उपयोग केला. त्या दोन दिवसांत मी फक्त अर्जुनबरोबर आमच्या इमारतीच्या मागच्या बाजूस क्रिकेट खेळलो. त्याने दोन-तीन आखूड टप्प्याचे चेंडू टाकून मला अचानक दचकवलं. अर्थात आम्ही टेनिस बॉलने खेळत होतो. अर्जुनबरोबर खेळता आल्याने मन हलकं झालं.

११ नोव्हेंबरला मी माझ्या संघातील सहकाऱ्यांना मुंबई सी-लिंकपाशी भेटलो. तिथून आम्ही सर्व जण कांदिवली जिमखान्याला गेलो. कांदिवली जिमखान्याला माझं नाव देण्याचा एक छोटा समारंभ मुंबई क्रिकेट असोसिएशनने आयोजित केला होता. माझ्यासाठी तो फारच मोठा सन्मान होता. जिमखान्यामध्ये असलेल्या अत्याधुनिक सुविधा पाहून मी खूपच प्रभावित झालो. त्या भागातील तरुण प्रतिभाशाली क्रिकेटपटू या संधीचा नक्कीच लाभ उठवतील, अशी मला आशा आहे.

त्यानंतर आम्ही जेव्हा ताज पॅलेस हॉटेलमध्ये पोचलो तेव्हा मला आश्चर्याचा सुखद धक्काच बसला. माझ्या स्वागतासाठी त्यांनी जय्यत तयारी केली होती. ताजच्या प्रत्येक लिफ्टमध्ये माझी मोठी छायाचित्रं लावली होती. खेळाडूंची व्यवस्था एकोणिसाव्या मजल्यावर केली होती. तिथल्या सर्व भिंतीही माझ्या छायाचित्रांनी सजल्या होत्या. माझी रूम तर सचिन तेंडुलकरमय होऊन गेली होती. खोलीत ठेवलेला साबण असो, शाम्पू असो किंवा उशांचे अभ्रे असोत, प्रत्येकावर माझं नाव लिहिलेलं होतं. रोज रात्री माझ्या खोलीत हॉटेलतर्फे चॉकलेट किंवा केक यासारखा एखादा गोड पदार्थ पाठवला जाई.

मी खोलीत तयारी करत असताना डंकन फ्लेचर यांचा मला फोन आला. ते म्हणाले, ''खास तुझ्या सन्मानार्थ सर्व खेळाडूंना सचिन तेंडुलकर २००वा कसोटी सामना असं लिहिलेले शर्ट वापरायची इच्छा आहे. त्याबद्दल तुझी काही हरकत नाही ना?'' मी म्हणालो, ''मला तर ही मोठी भाग्याची गोष्ट वाटते.'' माझ्या सहकारी-मित्रांनी माझा केलेला सन्मान पाहून माझं मन आनंदाने आणि कृतज्ञतेने भरून गेलं.

कसोटी सामना अभूतपूर्व ठरणार अशी चिन्हं आधीपासूनच दिसत होती. प्रसारमाध्यमांनीही त्या सामन्याला खूपच महत्त्व दिलं होतं. माध्यमांतील प्रतिनिधी प्रत्येक ठिकाणी हजर असायचे. आमच्या हॉटेलच्या बाहेर तर ते २४ तास ठिय्या मांडूनच बसलेले असायचे. सरावासाठी आम्ही बसमध्ये चढताना आणि उतरताना सतत आमच्यावर कॅमेरे रोखलेले असत. मी या सर्वांपासून जास्तीत जास्त अलिप्त राहण्याचा प्रयत्न करत होतो. प्रत्येक सामन्याच्या आधी करायचो तसाच याही वेळी मी नेट्समध्ये फलंदाजीचा भरपूर सराव केला. नेहमीप्रमाणेच सर्वांबरोबर फुटबॉलही खेळलो.

बॅटवर तिरंगा

नवीन स्टिकर्स आणि ग्रिप असलेल्या एका खास बॅटने खेळण्यासाठी मी अधीर झालो होतो. तिच्या डिझाइनमध्ये आपल्या तिरंगी झेंड्याच्या रंगसंगतीचा अंतर्भाव होता. माझी प्रायोजक 'आदिदास कंपनी' आणि माझा व्यवस्थापक मित्र विनोद नायडूबरोबर मी त्या डिझाइनमध्ये बारकाईने लक्ष घातलं होतं. ते स्टिकर्स फक्त माझ्या शेवटच्या सामन्यात वापरण्यासाठीच बनवले होते. बाजारातील इतर कोणत्याही बॅटसाठी ते कधीच उपलब्ध होणार नव्हते. माझ्या २००व्या आणि अखेरच्या कसोटी सामन्यात मी फलंदाजी करत असतानाच ते इतरांना दिसणार होते.

स्टिकर्स आणि ग्रिप्स सामन्याच्या आदल्या दिवशी माझ्या हातात पडले. दुसऱ्या दिवशी सकाळपर्यंत मी ते कुणाच्याही दृष्टीस पडू देणार नव्हतो. सर्व बॅट्स माझ्या खोलीत आणण्यासाठी मी रोहित शर्माकडून त्याची बॅग मागवून घेतली. बॅटवरचे स्टिकर्स आणि ग्रिप्स बदलण्याचं काम मी कितीतरी वेळ माझ्या खोलीत एकटाच करत बसलो होतो. माझ्या बॅटच्या छोट्या-मोठ्या दुरुस्तीचं काम स्वत: करणं, हा अनेक वर्षांपासूनचा माझा आवडता छंद होता. ते करण्यात मी तासन्तास रमून जात असे. माझ्या खेळासाठी लागणाऱ्या निरनिराळ्या हत्यारांमध्ये मला खूपच रस होता. मी कुठून कुठून ती मिळवत असे. त्याचा फायदा मात्र माझ्या संघातले खेळाडू उठवत असत. कुणालाही सँडपेपर, डिंक, बॅटची टेप, ग्रिप किंवा ग्रिपरची गरज लागली की, ते प्रथम माझ्याकडे धाव घेत.

बॅटचं नवीन रूप पाहून मी खूश झालो. लगेच बॅटचा फोटो काढून तो अंजलीला पाठवण्याचा मोह मी आवरू शकलो नाही. आपला तिरंगी झेंडा हा मला प्राणाहून प्रिय होता. त्याच्याबद्दल मला वाटणारा आदरच मी माझ्या बॅटमार्फत व्यक्त करणार होतो. दुसऱ्या दिवशी सकाळी ती बॅट वापरण्यासाठी मी अतिशय अधीर झालो होतो, पण माझ्या अधीरतेला दु:खाचीही एक किनार होती. माझी क्रिकेट कारकीर्द संपायला आता फक्त काही दिवसांचाच अवधी उरला होता.

१४ नोव्हेंबर, २०१३ : अखेरच्या कसोटी सामन्याचा पहिला दिवस

रात्री गाढ झोप घेतल्यानंतर सामन्याच्या पहिल्या दिवशी सकाळी मी नेहमीच्या वेळेवर उठलो. नेहमीप्रमाणे मी माझ्यासाठी चहा केला. अंघोळ आणि देवाची प्रार्थना करून मी हेडफोन्स लावत खाली उतरलो. बसभोवती किमान एक हजार लोक जमलेले होते.

मैदानात पोचल्यावर मी रोहितच्या बॅगमधून माझ्या बॅट्स अतिशय काळजीपूर्व ड्रेसिंग रूममध्ये घेऊन आलो. त्या बॅट्स हातात घेऊन जेव्हा मी सरावाला मैदानात उतरलो तेव्हा त्या सर्वांच्याच कौतुकाचा विषय ठरल्या. माझ्या कल्पकतेची प्रत्येक जण प्रशंसा करत होता. बॅट्समुळे त्या प्रसंगाला वेगळीच शोभा आली होती.

माझ्या अखेरच्या कसोटी सामन्यातील पहिल्या दिवशीची ती सकाळ अनेक कारणांमुळे अविस्मरणीय ठरली होती. माझ्या २००व्या कसोटी सामन्याप्रीत्यर्थ मुंबई क्रिकेट असोसिएशनने प्रथम माझा सत्कार केला. माझ्या कर्तृत्वाचा सन्मान करण्यासाठी भारत सरकारने त्याच दिवशी माझं छायाचित्र असलेला एक खास स्टॅम्प प्रसारित केला. जिवंत व्यक्तीच्या नावे स्टॅम्प प्रसारित होण्याची ती फक्त दुसरी वेळ होती, असं मला सांगण्यात आलं. मदर तेरेसा ह्या पहिल्या मानकरी होत्या. त्यानंतर हा सन्मान मला लाभला होता. याबद्दल मी काय बोलू शकत होतो? कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी माझ्यापाशी शब्द नव्हते.

अखेर प्रत्यक्ष क्रिकेट

स्टेडियममध्ये जमलेल्या प्रत्येकालाच माझी फलंदाजी पाहण्याची प्रचंड उत्सुकता होती. भारताने नाणेफेक जिंकली हे जाहीर होताच प्रेक्षकांनी त्याच अपेक्षेने जोरदार घोषणा देत स्टेडियम निनादून टाकलं. मात्र पुढच्याच क्षणाला त्यांची घोर निराशा झाली. एमएस धोनीने क्षेत्ररक्षण स्वीकारलं. सकाळच्या सत्रात खेळपट्टी द्रुतगती गोलंदाजांना मदत करेल, असा अंदाज होता. चेंडू चांगलाच उसळण्याची शक्यता होती. त्यानंतर दिवसभरात फिरकी गोलंदाजही आपली करामत दाखवू शकणार होते.

आम्ही ड्रेसिंग रूममधून बाहेर पडत असताना कर्णधार धोनीने मला मैदानावर संघ घेऊन जाण्याचा मान दिला. त्यानंतर सामना संपेपर्यंत कायम तो मान मला दिला गेला. त्या सामन्याच्या अशा कितीतरी आठवणी आता माझ्या मनात कायमच्या घर करून राहिल्या आहेत. मी मैदानावर उतरत असताना अखेरच्या सामन्याची आठवण म्हणून संघाने मला एक खास कॅप भेट दिली. सामना सुरू होण्यापूर्वी आम्ही सर्व जण नेहमीच गोलाकार एकत्र उभे राहतो. त्या वेळी बोलताना मी सर्वांना क्रिकेट खेळाबद्दलचं आपलं कर्तव्य आणि ते खेळण्यासाठी लागणारी मनोभूमिका यांची आठवण करून दिली. ''प्रत्येक पिढीतील

क्रिकेटपटूंनी पुढच्या पिढीला प्रेरणादायक ठरतील असे आदर्श त्यांच्यासमोर ठेवायला हवेत. ज्या खेळाने आपल्याला एक वेगळी ओळख मिळवून दिली, त्या खेळाचं ऋण फेडायचा प्रत्येकाने प्रयत्न करायला हवा,'' असं कळकळीचं आवाहन मी सर्वांना केलं.

माझी नजर स्टेडियमकडे गेली. माझ्या आईला तिथे बसलेली पाहून माझं मन समाधानाने भरून गेलं. माझ्या घरचे सर्वच जण आले होते. माझी पत्नी आणि मुलं, भाऊ, बहीण, तिचे यजमान स्टेडियमवर उपस्थित होते. त्या सर्वांच्या प्रेमाने आणि जमलेल्या प्रेक्षकांच्या उत्स्फूर्त पाठिंब्याने मी खूपच भारावून गेलो. कोणत्याही खेळाडूला हेवा वाटेल, असं भाग्य माझ्या वाट्याला आलं होतं. आता अखेरच्या सामन्यात उत्तम फलंदाजी करून माझ्या आवडत्या मैदानावर आपला शेवटचा ठसा उमटवावा एवढी एकच आस माझ्या मनी उरली होती.

आमच्या गोलंदाजांनी कमाल केली. दुपारी दोन वाजता, चहापानाच्या वेळी त्यांनी वेस्ट इंडीजचा पहिला डाव केवळ १८२ धावांत गुंडाळला. प्रग्यान ओझाने पाच, तर अश्विनने तीन गडी बाद केले. मला नंतर समजलं की, माझी आई चहापानाच्या वेळी घरी परत जायला निघाली होती. एवढ्यात माझा एक मित्र अंजलीपाशी गेला. भारताने झटपट दोन विकेट्स गमावल्या, तर मी आजच फलंदाजी करायला येण्याची शक्यता असल्याचं त्याने अंजलीला सांगितलं. अंजलीने आईला खेळ संपेपर्यंत थांबण्याचा आग्रह केला आणि आईनेही तिचं म्हणणं मान्य करत घरी जायचा बेत रद्द केला. आपल्या मुलाला प्रथमच प्रत्यक्ष खेळताना पाहायला मिळावं, या एकाच इच्छेने ती स्टेडियमवर आली होती.

देवाने तिची इच्छा पूर्ण केली. दुपारी साडेतीनच्या सुमारास ७७-२ अशा स्थितीत मी फलंदाजीसाठी मैदानात उतरलो. मी मैदानात पाऊल ठेवताच प्रेक्षकांनी 'सचिन... सचिन...' असा एकच जयघोष करायला सुरुवात केली. मी खेळपट्टीवर येत असताना वेस्ट इंडीज संघाने आणि मैदानावरील पंचांनी मला मानवंदना दिली. त्या कौतुकाने आणि सन्मानाने मी गलबलून गेलो होतो. क्षणभर मी माझं मन स्थिर केलं आणि फलंदाजीसाठी तयार झालो. पहिली धाव लगेच काढता आल्यामुळे माझ्या मनावरचं दडपण निघून गेलं. त्यानंतर मात्र मी फलंदाजीचा खरा आनंद लुटायला सुरुवात केली. मारलेल्या प्रत्येक चौकाराबरोबर माझा आत्मविश्वास वाढत गेला.

खेळ संपण्याआधीच्या शेवटच्या षटकात अचानक माझ्या आईला स्टेडियमवरच्या मोठ्या पडद्यावर दाखवण्यात आलं. ती पडद्यावर दिसताच सर्व प्रेक्षक उठून उभे राहिले. तिचा चेहरा पाहताच मीही एकदम भावुक झालो. आता मला एकाच वेळी दोन आघाड्यांवर लढणं भाग होतं. एका बाजूला मला माझ्या भावनांवर नियंत्रण ठेवायचं होतं, आणि दुसऱ्या बाजूला मला माझी विकेटही शाबूत ठेवायची होती. काही क्षणांतच मी स्वत:ला सावरलं आणि पुन्हा फलंदाजीसाठी तयार झालो.

दिवसाचं अवघं एक षटक बाकी असताना अचानक माझ्या आईला पडद्यावर दाखवण्याची कल्पना मला फारशी रुचली नव्हती. सामन्याचं प्रक्षेपण करणाऱ्यांनी त्या वेळी खरंतर तिला टेलिव्हिजनवर दाखवायला हवं होतं. दिवसाच्या अखेरीस नाबाद राहण्यासाठी मी लक्ष केंद्रित करून खेळत असताना तिला स्टेडियमवरच्या पडद्यावर दाखवणं मला अयोग्य आणि अनुचित वाटलं. आईला पडद्यावर दाखवण्यामागचा त्यांचा हेतू निश्चितच चांगला होता. तो दिवस लोकांच्या कायम आठवणीत राहावा अशी त्यांची इच्छा होती. त्याबद्दल मीही त्यांचा खूप आभारी होतो. मात्र त्यांना ती गोष्ट थोड्या वेगळ्या प्रकारे करता आली असती, असं मला वाटलं. ते फक्त माझ्या आईलाच पडद्यावर दाखवून थांबले नाहीत. त्यानंतर माझ्या घरातली प्रत्येक व्यक्ती पडद्यावर दिसू लागली. मी त्यामुळे किंचित नाराज झालो असलो, तरी प्रेक्षक नक्कीच खूश झाले होते.

विचलित झालेलं माझं लक्ष पुन्हा क्रिकेटवर केंद्रित करताना मला खूपच त्रास झाला. भोवताली घडणाऱ्या गोष्टींचा मला माझ्या फलंदाजीवर परिणाम होऊन द्यायचा नव्हता. शेवटच्या सामन्यात सर्वोत्तम कामगिरी करायचा निर्धार करून मी मैदानात उतरलो होतो. अखेर शेवटचं षटक संयमाने खेळत मी ३८ धावांवर नाबाद राहिलो. दुसरा दिवसही मनासारखा पार पडला होता. दीड तास खेळपट्टीवर टिकून राहता आल्यामुळे मला अतिशय समाधान वाटत होतं. मैदान सोडण्याआधी मी माझ्या कुटुंबीयांच्या दिशेने बॅट उंचावत माझा आनंद व्यक्त केला.

आज, त्या शेवटच्या सामन्याचा विचार करत असताना त्या सामन्यातले अनेक अद्भुत क्षण मला पुन्हा पुन्हा आठवत

राहतात. माझ्या आईने जेव्हा स्वत:ला प्रथमच मोठ्या पडद्यावर पाहिलं तेव्हा तिचा संकोचलेला चेहरा माझ्या चांगलाच लक्षात आहे. अतिशय लाजून तिने जीभ बाहेर काढली होती. प्रसिद्धीच्या झगमगाटाची तिला मुळीच सवय नव्हती. तिची ती निरागस प्रतिक्रिया पाहून माझ्या डोळ्यांत पाणी आलं होतं. प्रेक्षकांनी उभं राहून माझ्या आईचा सन्मान करताना एक मुलगा म्हणून माझाही ऊर अभिमानाने भरून आला होता. तिच्याबद्दल प्रेम आणि आदर प्रकट करणाऱ्या प्रत्येकाचा मी अतिशय आभारी आहे.

त्या सर्व भावनिक कल्लोळामध्ये अर्जुनला अचानक मैदानावर आलेला पाहून मी चकित झालो होतो. कारण त्या दिवशी तो एका सामन्यात खेळणार होता. त्याने वानखेडे स्टेडियमवर यावं की आपला सामना खेळावा, यावर आमची आधी चर्चाही झाली होती. त्याने त्याचा सामना खेळायला जावं, असं मी त्याला सुचवलं होतं. माझा २००वा कसोटी सामना पाहता येणार नाही म्हणून त्याला खूपच वाईट वाटलं होतं. युवराज सिंगला ही गोष्ट समजल्यावर त्याने अर्जुनला स्वत:च्या गाडीतून अर्जुनच्या सामन्याच्या ठिकाणी सोडलं होतं. युवराजला पाहून अर्जुनचे मित्र भलतेच खूश झाले. युवराजबरोबर येता आलं म्हणून अर्जुनलाही आनंद झाला. त्यानंतर प्रतिस्पर्धी संघ न आल्यामुळे अर्जुनच्या संघाला पुढे चाल (वॉक-ओव्हर) देण्यात आली. ते समजताच अर्जुनने दुसऱ्या क्षणाला टॅक्सी पकडत वानखेडे स्टेडियमकडे धाव घेतली. स्टेडियमच्या बाहेर उभ्या असलेल्या पोलीस अधिकाऱ्यांपाशी जाऊन त्याने आपली ओळख सांगितली आणि आत प्रवेश मिळवला. सीमारेषेबाहेर 'बॉल-बॉय'चं काम करत असताना त्याला जेव्हा मोठ्या पडद्यावर दाखवण्यात आलं, तेव्हा अर्जुन आल्याचं मला प्रथम समजलं.

खेळ संपल्यावर संध्याकाळी मी हॉटेलवर निवांत आराम केला. मी थकलो होतो. मात्र दिवसअखेर नाबाद राहिल्याचं मला समाधान वाटत होतं. दुसऱ्या दिवशी मनसोक्त फलंदाजी करायच्या इराद्याने मी जेवून लवकर झोपायचं ठरवलं.

१५ नोव्हेंबर, २०१३ : अखेरच्या कसोटी सामन्याचा दुसरा दिवस

दुसऱ्या दिवशी सकाळी मी माझ्या नेहमीच्या वेळेवर उठलो. सर्व तयारी झाल्यावर मी हेडफोन्स लावून शांतपणे संगीत ऐकू लागलो. हॉटेलच्या लॉबीमधून जात असताना आणि नंतर बसमध्ये चढत असताना अनेक जणांनी मला शुभेच्छा दिल्या. लोकांनी रस्त्यावरही दुतर्फा खूपच गर्दी केली होती. मी मात्र भोवताली घडणाऱ्या गोष्टींपासून स्वत:ला विचलित न होऊ देता संगीतावर लक्ष केंद्रित करण्याचा प्रयत्न करत होतो. त्या अभूतपूर्व प्रसंगाचं दडपण मला माझ्या मनावर येऊ द्यायचं नव्हतं. परंतु लोकांच्या उत्साहाला एवढं उधाण आलं होतं की, त्यापासून स्वत:ला अलिप्त ठेवणं मला अवघड जात होतं.

स्टेडियममध्ये पोचल्यावर मी माझ्या बॅट्स घेऊन सरावासाठी मैदानात उतरलो. त्या दिवशी आमची फलंदाजी असल्यामुळे खेळाडूंना आपापल्या मनासारखा सराव करण्याची मुभा होती. क्षेत्ररक्षण असेल त्या दिवशी मात्र अशी सवलत मिळत नसे. क्षेत्ररक्षणाच्या दिवशी खेळ सुरू होण्याआधी काही वेळ झेल घेण्याचा आणि क्षेत्ररक्षणाचा सराव करावा लागे. त्या दिवशी डंकन फ्लेचर यांनी प्रथम आमच्याकडून थोडा शारीरिक व्यायाम करून घेतला. त्यानंतर त्यांनी खेळाडूंना मोकळं सोडलं. काही वेळ थ्रो-डाउन्सवर फलंदाजीचा सराव करून मी ड्रेसिंग रूममध्ये परतलो.

दुसऱ्या दिवसाचा खेळ सुरू झाला तेव्हा मला माझ्यामध्ये एक वेगळाच उत्साह जाणवत होता. प्रत्येक वेळी मी जेव्हा फलंदाजीसाठी पवित्रा घ्यायचो तेव्हा माझं लक्ष बॅटवरील स्टिकरकडे जायचं आणि मला एक वेगळीच प्रेरणा मिळायची. आजपर्यंत मी माझ्या देशासाठी अभिमानाने क्रिकेट खेळलो होतो. त्या दिवशी माझी नजर जेव्हा खाली जायची तेव्हा बॅटवर मला माझा लाडका तिरंगा दिसायचा आणि माझा ऊर अभिमानाने भरून जायचा. माझा उत्साह वाढवणारी आणखीही एक गोष्ट होती. स्टेडियमवर माझी आई उपस्थित असल्यामुळे मला एक वेगळंच बळ प्राप्त झालं होतं.

टिनो बेस्ट सकाळच्या सत्रात जीव तोडून गोलंदाजी करत होता. तो जणू माझी परीक्षाच घेत होता. नंतर मला समजलं की, त्या दिवशी टिनोच्या मुलाचा वाढदिवस होता. माझी विकेट घेऊन तो आपल्या मुलाला वाढदिवसाची अनोखी भेट देणार होता. त्याच्या एका चेंडूवर जेव्हा मी थोडासा चकलो, तेव्हा त्याने अतिउत्साहाच्या भरात जोरदार अपील केलं. त्यावर मी

हसत त्याची चेष्टा केली. तो चेंडू स्टम्प्सपासून मैलभर अंतरावरून निघून गेला होता. पुढच्या षटकात तो बाउन्सर टाकणार याचा मला अंदाज होता. मी त्यासाठी तयारही होतो. अपेक्षेप्रमाणे त्याने टाकलेल्या बाउन्सरवर अप्पर कट मारण्यासाठी माझ्यापाशी पुरेसा वेळही होता. मात्र काही इंचांनी माझा तो शॉट हुकला. त्या दिवशी अनेकदा प्रयत्न करूनही माझा अप्पर कट लागतच नव्हता. अखेर टिनोच्या पुढच्या चेंडूवर मी कव्हर ड्राइव्ह मारला. चेंडू सीमारेषेपार जात असताना मी हवेत मूठ उगारली आणि टिनोला ठोसा मारल्याचा अभिनय केला. टिनोची मस्करी करत मी त्याला म्हटलं, ''लेका, आज नशीब तुझ्यावर फिदा आहे. नाहीतर आत्तापर्यंत माझे चार चौकार हुकले नसते.'' टिनो आणि मी मैदानावर कट्टर प्रतिस्पर्धी असलो, तरी मैदानाबाहेर चांगले दोस्तही होतो.

गोलंदाजाच्या मागे सरळ रेषेत चौकार मारत मी माझं अर्धशतक पूर्ण केलं आणि माझ्या आईच्या दिशेने बॅट उंचावली. आनंदाने बेहोष झालेल्या प्रेक्षकांनी 'सचिन... सचिन...' नावाचा जयघोष सुरू केला. त्या आवाजाने वातावरणात एक वेगळंच चैतन्य निर्माण झालं. मी प्रत्यक्ष फलंदाजी करत असो वा नसो, सतत माझ्याच नावाचा जप सुरू होता.

पहिल्या पेयपानाच्या विश्रांतीनंतर पाच मिनिटांनी वेस्ट इंडीजच्या कर्णधाराने नरसिंग देवनारायणच्या हातात चेंडू सोपवला. देवनारायण कसोटी सामन्यात क्वचित प्रसंगी ऑफ स्पिन गोलंदाजी करत असे. तो जास्तीत जास्त दोन किंवा तीन षटकं टाकणार हे मला ठाऊक होतं. थोड्या एकेरी धावा घेण्याखेरीज त्याच्या गोलंदाजीवर कुठलाही आततायी फटका मारायचा नाही, असं मी स्वत:लाच बजावत होतो.

ज्या चेंडूवर मी बाद झालो, तो चेंडू माझ्या अपेक्षेपेक्षा जास्त उसळला. चेंडू खोल टप्प्याचा होता आणि देवनारायणच्या इतर चेंडूंपेक्षा तो अधिक वेगाने आला. त्या चेंडूवर बॅकवर्ड पॉइंटच्या दिशेने कट करत चौकार मारावा, असं मला वाटलं. शिलिंगफोर्डच्या एका चेंडूवर मी त्याआधी तसाच शॉट मारला होता. या वेळेस मात्र माझा प्रयत्न फसला. सारं काही निमिषार्धात घडून गेलं. मला काही कळायच्या आत मी शॉट मारला आणि चेंडू स्लिपमध्ये उभ्या असलेल्या सॅमीच्या छातीवर आपटून त्याच्या हातात गेला. मी ७४ धावा काढून बाद झालो.

पॅव्हिलियनमध्ये परत जात असताना माझ्या मनात विचारांचं काहूर उठलं होतं. 'मला तो शॉट मारायची काय गरज होती? तो चेंडू कव्हरला मारून मी त्यावर सहज एक धाव घेऊ शकलो असतो किंवा तो चेंडू न खेळता मी सोडूनही देऊ शकलो असतो. कट शॉट मारायचा मोह मला का आवरता आला नाही?' आजपर्यंत प्रत्येक वेळी बाद झाल्यावर मी असेच प्रश्न विचारून स्वत:ला भंडावून सोडलं होतं. कारकिर्दीतील अखेरच्या सामन्यातही बाद झाल्यावर मी स्वत:ला माफ केलं नाही.

त्याच वेळी आणखीही एक विचार माझ्या मनात आला. मला अचानक जाणवलं की, 'हीच कदाचित माझी अखेरची इनिंग्ज ठरू शकेल. एक भारतीय फलंदाज म्हणून मैदानावरून परतण्याची ही शेवटची वेळ असू शकेल.' सामन्याच्या एकूण रागरंगावरून आम्ही पुन्हा फलंदाजी करण्याची शक्यता फारच धूसर दिसत होती. तो विचार मनात येताच मी जागच्या जागी थबकलो. ज्या प्रेक्षकांनी आजपर्यंत मला पाठिंबा आणि प्रोत्साहन दिलं होतं त्यांना बॅट उंचावत मी अभिवादन केलं. मात्र ड्रेसिंग रूमच्या पायऱ्या चढत असतानाही मी माझ्या मनातील निराशा लपवू शकत नव्हतो. एक मोठी इनिंग्ज खेळण्याची संधी मी गमावली होती.

कोलकात्याप्रमाणेच मुंबईच्या कसोटीतही रोहित शर्माने अप्रतिम फलंदाजी करत लागोपाठ दुसरं शतक झळकवलं. पुजाराने काढलेल्या ११३ धावांमुळेही आमच्या धावसंख्येत मोलाची भर पडली. ४९५ धावसंख्येवर जेव्हा आमचा पहिला डाव संपला तेव्हा आम्ही ३१३ धावांची मोठी आघाडी घेतली होती. दुसऱ्या डावातही वेस्ट इंडीजची आघाडीची फळी फारसा प्रतिकार न करता पुन्हा कोसळली. एक वेळ तर अशी आली की, ख्रिस गेलने जोरदार फलंदाजी करावी म्हणून प्रेक्षक त्याला प्रोत्साहन देऊ लागले. सामना अधिक काळ लांबला तर मला पुन्हा फलंदाजी करायची संधी मिळेल अशी त्यांना आशा वाटत होती. तो सर्व प्रकार फारच मजेशीर वाटत होता.

वेस्ट इंडीजवर आम्ही एका डावाने विजय मिळवणार ही गोष्ट दुसऱ्या दिवसअखेर स्पष्ट झाली. १६ नोव्हेंबर, २०१३ हा

दिवस भारतीय क्रिकेटपटू म्हणून माझ्या कारकिर्दीतील शेवटचा दिवस ठरणार होता.

१६ नोव्हेंबर, २०१३ : अखेरच्या कसोटी सामन्याचा तिसरा दिवस

वेस्ट इंडीजने ३ बाद ४३ या धावसंख्येवर तिसऱ्या दिवशी खेळायला सुरुवात केली. थोड्याच वेळात ८९ धावा आणि ६ गडी बाद, अशी त्यांची स्थिती झाली. वेस्ट इंडीजचा सातवा गडी बाद झाल्यावर आपल्या आवडत्या खेळाचा कायमचा निरोप घेण्याची मी मानसिक तयारी करू लागलो. पडणाऱ्या प्रत्येक विकेटबरोबर तो अंतिम क्षण जवळ सरकत होता. २४ वर्षांच्या दीर्घ प्रवासाला आता काही वेळातच पूर्णविराम मिळणार होता.

नववा गडी बाद झाल्यावर मी गोलंदाजाचं अभिनंदन करायला धावलो, तेव्हा धोनीने मला चटकन अडवलं. सर्व खेळाडू खेळपट्टीवर गोलाकार उभे राहून काहीतरी खास बेत आखत होते. मी स्क्वेअर लेगला उभ्या असलेल्या पंचांच्या शेजारी जाऊन उभा राहिलो. मला माझ्या भावनांवर नियंत्रण ठेवणं जड जाऊ लागलं. अंतिम क्षण इतक्या चटकन समोर येऊन उभा ठाकेल, याची मला कल्पना नव्हती.

अखेर काही षटकांनंतर तो क्षण आला. महमद शमीच्या एका खोल टप्प्याच्या चेंडूवर शेनॉन गॅब्रियलचा त्रिफळा उडाला. मी धावत जाऊन एक स्टम्प उचलला आणि माझ्या एका सहकाऱ्याला म्हटलं, *''यह स्टम्प तो मुझे चाहिए ही चाहिए।''* धोनीने पुन्हा मला अडवत दूर उभं राहण्यास सांगितलं.

सर्व खेळाडू आपापसात चर्चा करत असताना मी खेळपट्टीच्या दुसऱ्या टोकावर जाऊन उभा राहिलो. टेलिव्हिजन प्रक्षेपणासाठी रवी शास्त्री मैदानावर आला. माझ्या प्रदीर्घ क्रिकेट कारकिर्दीबद्दल माझं अभिनंदन करून क्रिकेटमधील माझ्या योगदानाबद्दल त्याने माझं भरभरून कौतुक केलं. मी कसाबसा स्वत:ला सावरण्याचा प्रयत्न करत होतो. तोच सर्व खेळाडू माझ्याभोवती गोळा झाले. मला मध्यभागी ठेवून सर्व जण खेळपट्टीच्या दोन्ही बाजूला रांगेत उभे राहिले. मी चालायला सुरुवात केल्यावर शेवटी उभे असलेले खेळाडू धावत सर्वांच्या पुढे जाऊन ती रांग सतत पुढे सरकवत राहिले. माझ्या संघाने मला सीमारेषेपर्यंत एक आगळीवेगळी मानवंदना दिली!

त्यानंतर मात्र मी माझे अश्रू रोखू शकलो नाही. माझ्या संघातील सहकाऱ्यांनी माझ्याबद्दल दाखवलेला जिव्हाळा आणि आदर माझ्या काळजाला स्पर्शून गेला होता. त्यांनी मला मैदानावर दिलेला अखेरचा निरोप मी कधीही विसरू शकणार नव्हतो. मैदानाबाहेर बाहेर पडताना मी उघडपणे रडू लागलो. कुणालाही नजर देणं मला अशक्य झालं. नजर खाली ठेवून मी वेस्ट इंडीज खेळाडूंशी हस्तांदोलन केलं. मी एखाद्या लहान मुलासारखा रडतो आहे, हे मला त्यांना दिसू द्यायचं नव्हतं. आमच्या सपोर्ट स्टाफला भेटतानाही मी तेच केलं. मला लवकरात लवकर एकांत हवा होता. झरझर जिना चढत मी ड्रेसिंग रूमच्या बाथरूममध्ये गेलो.

तिथे मात्र माझा बांध फुटला. १० मिनिटं मी ढसाढसा रडत होतो. त्यानंतर बराच वेळ चेहऱ्यावर पाणी मारत मी स्वत:ला सावरलं. डोक्याभोवती टॉवेल गुंडाळून मी ड्रेसिंग रूममध्ये आलो आणि माझ्या जागेवर एकटाच बसून राहिलो. माझ्या सहकाऱ्यांनीही समजूतदारपणे मला हवा असलेला एकांत मिळवून दिला. त्या वेळात कुणीही ड्रेसिंग रूममध्ये फिरकलं नाही. माझं लक्ष माझ्या किटबॅगकडे गेलं. आयुष्यभर तिने मला साथ दिली होती. मी तिचे आभार मानले.

हळूहळू त्या कठीण प्रसंगाला सामोरं जायची माझी मानसिक तयारी होत गेली. एवढ्यात कोणीतरी येऊन मला सांगितलं की, ब्रायन लारा आणि वेस्ट इंडीजचा संघ माझी वाट बघत बाहेर थांबले आहेत. ब्रायनने माझ्यासाठी एक छोटा समारंभ आखला होता. प्रतिस्पर्धी संघानेही माझ्याबद्दल आपुलकी दाखवावी याचं मला विशेष कौतुक वाटलं. माझा २००वा कसोटी सामना हा शिवनारायण चंदरपॉलचाही १५०वा कसोटी सामना होता. ब्रायनने आम्हा दोघांचं अभिनंदन केलं. ब्रायनशी माझी जुनी दोस्ती होती. त्याचे ते जिव्हाळ्याचे शब्द मी कधीही विसरणार नाही. मीही चंदरपॉल आणि वेस्ट इंडीज क्रिकेटबद्दल थोडा वेळ बोललो. वेस्ट इंडीज संघातील खेळाडूंनी माझ्यासोबत फोटो काढले.

मी पुन्हा ड्रेसिंग रूममध्ये येऊन बक्षीस समारंभाला जायची तयारी करत असताना स्टार स्पोर्ट्स चॅनलचा एक प्रतिनिधी

तिथे आला. बक्षीस समारंभाच्या वेळी रवी शास्त्रींनी तुमची मुलाखत घेतली तर चालेल का, असं त्याने मला विचारलं. मी त्याला म्हटलं की, मुलाखत देण्याऐवजी मला एकट्यालाच बोलायला आवडेल. माझं मनोगत थोडं लांबण्याचीही शक्यता असल्याचं मी त्याला सांगितलं. ही गोष्ट तुम्हाला मान्य असल्यास बक्षीस समारंभ संपल्यावर तुम्ही माझ्या हातात मायक्रोफोन द्यावा, असंही मी त्याला सुचवलं. माझं म्हणणं त्यांनी लगेच मान्य केलं. इच्छा असेल तितका वेळ मला बोलण्याची परवानगी देण्यात आली. सामना लवकर संपल्यामुळे त्यांच्यापाशीही भरपूर वेळ होता.

हृदयीचे बोल

बक्षीस समारंभानंतर माझ्या हातात मायक्रोफोन दिला गेला. मात्र मी बोलायला सुरुवात करण्याआधीच प्रेक्षकांनी पुन्हा 'सचिन... सचिन...' असा जयघोष करायला सुरुवात केली. सर्वांच्या प्रेमाने मी हरखून गेलो होतो. जयघोषाचा तो नाद आता आयुष्यभर माझ्या कानात गुंजत राहणार आहे, असं यापूर्वीही मी अनेकदा सांगितलं आहे. बराच वेळ झाला तरी प्रेक्षक थांबायलाच तयार नव्हते. मी सर्वांना शांत व्हायला सांगितलं. ''तुमच्या प्रेमाने माझं मन आधीच भरून गेलंय. तुम्ही जर मला अशीच साद घालत राहणार असलात, तर मला माझ्या भावनांना आवर घालणं शक्य होणार नाही,'' असं मी त्यांना म्हणालो. पाण्याची एक बाटली मी माझ्यासोबत ठेवली होती. बोलत असताना गळा दाटून येण्याची मला शक्यता वाटत होती.

मी माझ्या खिशातून एक कागद काढला. ज्यांच्याबद्दल मला मनापासून कृतज्ञता व्यक्त करावीशी वाटत होती, अशा व्यक्तींची नावं मी त्या कागदावर लिहिली होती. कोलकाता कसोटी संपवून विमानातून येत असताना मी ती यादी बनवली होती. त्या प्रत्येकाबद्दल काहीतरी वेगळं बोलणं हे आता माझ्या समोरचं खरं आव्हान होतं. त्या सर्वच व्यक्ती मला परमप्रिय होत्या. त्यांनी मला घडवलं होतं. कशी कोणास ठाऊक, पण त्या वेळी बोलताना मला शब्दांची अडचण जाणवलीच नाही. सर्वांसमोर मी नि:संकोचपणे माझं अंत:करण खुलं केलं.

जेव्हा त्यांनी सौरव, राहुल आणि लक्ष्मण या माझ्या जुन्या सहकाऱ्यांना पडद्यावर दाखवलं तेव्हा मी त्यांच्याबद्दल भरभरून बोललो. मी माझ्या पत्नीविषयी बोलत असताना तिलाही भावनावेग आवरता आला नाही. तिच्या डोळ्यांतून अश्रूधारा वाहू लागल्या. आपल्या आईचं ते हळवं रूप पाहून सारा आणि अर्जुन बावरून गेले. दोघांनीही तिला धीर देण्याचा प्रयत्न केला. अंजलीसारखी जोडीदार मिळणं हे माझं भाग्य होतं. तिचे कितीही आभार मानले असते तरी ते अपुरेच ठरले असते.

माझ्या चाहत्यांचे आणि भारतीय क्रिकेटच्या खंद्या समर्थकांचे मी मन:पूर्वक आभार मानले. ते माझे खरे आधारस्तंभ होते. मी शतक काढलं किंवा शून्यावर बाद झालो तरी त्यांना त्याचं कधीच वैषम्य वाटलं नाही. ते सतत माझ्यावर मायेचा वर्षाव करत राहिले. त्यांचा मिळालेला पाठिंबा आणि प्रोत्साहन हाच माझ्या शक्तीचा खरा स्रोत होता.

माझ्या चाहत्यांवर माझंही तितकंच प्रेम होतं. याबद्दलचा एक किस्सा मला इथे आवर्जून सांगावासा वाटतो. एकदा मी चेन्नईला सामना खेळण्यासाठी आलेलो असताना मला काही विशेष प्रकारच्या मुलांना भेटण्याचा योग आला. त्यांच्यासोबत आलेल्या शिक्षिकेने व्हीलचेअरवर बसलेल्या एका मुलाकडे बोट दाखवत म्हटलं, ''हा तुमचा जबरदस्त चाहता आहे. तुमची बॅट एकदा तरी हातात धरावी ही त्याची खूप दिवसांपासूनची इच्छा आहे.'' मी त्याला जवळ घेतलं आणि म्हटलं, ''चल, आपण थोडा वेळ क्रिकेट खेळू.'' कोणालातरी पाठवून मी माझी बॅट आणि काही टेनिसचे चेंडू आमच्या ड्रेसिंग रूममधून मागवले. आश्चर्य म्हणजे तो मुलगा उभा राहिला आणि चक्क तीन चेंडू खेळला. आपण एकटं उभं राहून खेळू शकलो, यावर त्याचाच विश्वास बसला नाही. त्याच्या चेहऱ्यावरचा आनंद ओसंडून वाहत होता. तो मुलगा आणि त्याच्या चेहऱ्यावरचं हास्य माझ्या कायम आठवणीत राहिलं आहे.

मी बराच वेळ बोलत होतो. काही वेळाने मी म्हटलं की, ''आता माझं भाषण संपवण्याची वेळ आली आहे.'' मी असं म्हणताच, ''नाऽऽऽऽही'' असा एकच आवाज प्रेक्षकांमधून उठला. मी अजूनही बोलत राहावं, अशी त्यांची इच्छा होती. अखेरीस मी २० मिनिटं बोललो. सलग एवढा वेळ एकट्याने बोलायचा तो माझा विक्रम होता! इतक्या अवघड आणि नाजूक

प्रसंगी मी कसा बोलू शकलो, हे माझं मलाच समजलं नाही. जणू कुणीतरी अज्ञात शक्ती माझ्या तोंडून वदवून घेत होती. त्या दिवशी एकदाही न अडखळता मी भाषण करू शकलो यामागे काहीतरी दैवी संकेत होता.

भाषण संपल्यावर आम्ही मैदानात एक विजयी फेरी मारली. माझ्या संघातील मित्रांनी मला खांद्यावर उचललं. वानखेडे स्टेडियममध्ये जमलेल्या एकाही माणसाने आपली जागा सोडलेली नव्हती. मी हात हलवत माझ्या चाहत्यांचे आभार मानत होतो. मी खेळलेला अखेरचा सामना जिंकून माझ्या क्रिकेट कारकिर्दीचा शेवट विजयाने व्हावा, अशी माझी फार इच्छा होती. जिंकण्यातली मजा काही औरच असते. आम्ही वेस्ट इंडीजचा दणदणीत पराभव करून मालिकाही झोकात जिंकली होती. रणजी ते कसोटी क्रिकेटच्या सर्व प्रकारातील मी खेळलेल्या माझ्या अखेरच्या सामन्यात मी विजयी झालो होतो.

विराट कोहलीने मला खेळपट्टीचे आभार मानण्याची आठवण केली. मी एकटाच खेळपट्टीपाशी चालत गेलो. क्रिकेटची शेवटची इनिंग्ज खेळल्यावर खेळपट्टीचे नम्रपणे आभार मानायचे, ही गोष्ट मी खूप आधीपासून ठरवली होती. माझ्यासाठी तो अतिशय भावपूर्ण क्षण होता. खेळपट्टीबरोबर माझं एक अतूट नातं निर्माण झालं होतं. २२ यार्डांचा तो पट्टाच जर अस्तित्वात नसता, तर मी माझं कर्तृत्व कसं दाखवू शकलो असतो? त्या खेळपट्टीने माझी आयुष्यभर काळजी घेतली होती. मी तिच्यासमोर नतमस्तक झालो. तिला नम्रपणे नमस्कार करून मी तिचा अखेरचा निरोप घेतला.

अखेरचा सलाम

ड्रेसिंग रूममध्ये मी एकटाच बसलेला असताना विराट पुन्हा माझ्यापाशी आला. त्याचे डोळे पाण्याने भरलेले होते. त्याच्या हातात गुंडाळलेला जाड दोरा होता. दैवाचं पाठबळ मिळावं म्हणून मनगटाभोवती अशा प्रकारचा गंडा बांधण्याची काही भारतीयांमध्ये पद्धत होती. त्याच्या वडिलांनी तो त्याला दिला होता. तो गंडा एखाद्या खास व्यक्तीकडे सोपवावा, अशी त्यांची इच्छा होती. माझ्या पायांना स्पर्श करत त्याने तो दोरा माझ्या हातात ठेवला. मी गहिवरून गेलो. त्याला घट्ट मिठी मारत मी म्हटलं, *''अरे, तू ये क्या कर रहा है? तुझे यहाँ नहीं, यहाँ होना चाहिये।''* त्यानंतर मात्र माझ्या तोंडून शब्द फुटेना. माझ्या गळ्यात हुंदका दाटून आला होता. नाइलाजाने मी विराटला बाहेर जायला सांगितलं. बोलण्याचा प्रयत्न केला असता तर पुन्हा मला रडू कोसळलं असतं. विराटने मला मी अमूल्य भेट देऊन माझा खूप मोठा गौरव केला होता. मी त्याला त्याच्या क्रिकेट कारकिर्दीसाठी मनापासून शुभेच्छा दिल्या.

थोड्या वेळाने मी ड्रेसिंग रूमच्या शेजारच्या खोलीत बसलेल्या अजिंक्य रहाणेला जाऊन भेटलो. अजिंक्य माझा मुंबई संघातील सहकारीही होता. मुंबईच्या कसोटीत त्याला भारतीय संघात स्थान मिळालं नव्हतं. रहाणेला मी बरीच वर्षं ओळखतो आहे. क्रिकेटवर त्याची अतूट श्रद्धा आहे. गेली काही वर्षं तो निष्ठेने आणि जबाबदारीने, खचून न जाता खेळतो आहे. जिद्दीने आणि चिकाटीने खेळत राहण्याचा मी त्याला सल्ला दिला. अजिंक्य अतिशय गुणी क्रिकेटपटू आहे. तो भविष्य काळात नक्की यशस्वी होणार, याची मला खातरी आहे.

अखेर स्टेडियम सोडायची वेळ आली. सामना संपून बराच वेळ झाला होता. सकाळपासून माझ्या पोटात मात्र अन्नाचा एक कणही गेला नव्हता. ताज हॉटेलच्या व्यवस्थापनाने माझ्यासाठी खास माझं आवडतं 'हलीम' पाठवलं होतं, पण ते पॅकेट मी अंजलीच्या हातात दिलं होतं. आम्ही सर्व जण स्टेडियमच्या बाहेर पडलो. मी बसमध्ये चढत असताना सौरव गांगुली माझा निरोप घ्यायला आला. बसमधून उतरून मी त्याला घट्ट आलिंगन दिलं. वयाच्या तेराव्या वर्षापासून आम्ही एकमेकांना ओळखत होतो. आमच्या दोघांच्याही क्रिकेट कारकिर्दीतील अनेक सुखदु:खाचे प्रसंग आम्ही एकत्र अनुभवले होते.

बसमधून हॉटेलच्या वाटेवर असताना मरीन ड्राइव्हला लोक रस्त्यावर दुतर्फा उभे राहून 'सचिन... सचिन...' असा नारा देत होते. त्यांना अखेरचा सलाम करण्यासाठी मी ड्रायव्हरच्या शेजारी जाऊन उभा राहिलो. तो प्रचंड जनसागर पाहून मी स्वप्नात तर नाही ना, असं क्षणभर मला वाटून गेलं. त्या प्रसंगाला जणू एका परीकथेचं रूप आलं होतं. 'लोकांनी माझ्यावर इतकं जीव ओतून प्रेम करण्याएवढं कर्तृत्व खरंच आपल्या हातून घडलंय का?' असा प्रश्न माझ्या मनात येत होता. मलाच माझ्या भाग्याचा हेवा वाटला. एका गोष्टीचं मात्र मला निश्चितच समाधान होतं. क्रिकेटचं हे जग सोडून जात असताना माझ्या

मनात खेदाची वा अतृप्तीची भावना नव्हती. मी कृतकृत्य होतो.

अनपेक्षित गौरव

ताज हॉटेलनेही एक छोटासा सत्कार समारंभ आयोजित केला होता. तो आटपून अंजली व मी जेव्हा आमच्या रूममध्ये आलो तेव्हा दुपारचे तीन वाजले होते. मी चटकन हलीमचं पॅकेट उघडलं. आम्ही दोघेही शॅम्पेनचे घुटके घेत हलीमचा स्वाद घेत असताना मला अचानक पंतप्रधानांच्या कार्यालयातून फोन आला. 'पंतप्रधान मनमोहन सिंग आपल्याबरोबर बोलू इच्छितात' असं मला सांगण्यात आलं. थोड्याच वेळात पंतप्रधान स्वत: माझ्याशी बोलू लागले. २४ वर्षं भारतीय क्रिकेटची शान वाढवल्याबद्दल सर्वप्रथम त्यांनी माझं अभिनंदन केलं. ते पुढे म्हणाले, ''भारतीय क्रीडा क्षेत्रात अतिशय महत्त्वाचं आणि मोलाचं योगदान दिल्याबद्दल भारत सरकारतर्फे 'भारतरत्न' हा देशाचा सर्वोच्च नागरी किताब देऊन आम्ही तुझा गौरव करत आहोत.''

फोन ठेवल्यावर मी अंजलीला घेऊन भिंतीच्या बाजूला असलेल्या टेबलापाशी आलो. टेबलावर मी देवदेवतांच्या तसबिरी ठेवल्या होत्या. माझ्याबरोबर अंजलीलाही मी देवासमोर हात जोडून उभं राहायला सांगितलं. अंजलीला काही समजेना. तेव्हा मी तिला म्हटलं, ''तू आता भारतरत्न सचिन तेंडुलकर समोर उभी आहेस.'' क्षणभर माझ्या बोलण्यावर तिचा विश्वासच बसेना. ती माझ्याकडे पाहतच राहिली. तिला इतका आनंद झाला की, त्या भरात तिने किंचाळत मला आवेगाने घट्ट मिठी मारली. काही वेळ आम्ही दोघंही तसेच नि:शब्द उभे होतो. त्या बातमीचा हळूहळू आम्हाला अर्थबोध होत होता. माझं प्रत्येक स्वप्न साकार झालं होतं. मी परमेश्वराचे अंत:करणपूर्वक आभार मानले. नंतर शॅम्पेनची आणखी एक बाटली उघडत आम्ही आनंद साजरा केला. खरं सांगायचं तर त्या क्षणापासून जसं आमचं मन आनंदाने भरून वाहत होतं, तशीच त्या दिवशी शॅम्पेनही अखंड वाहत राहिली.

त्या परमोच्च सन्मानाची बातमी समजल्यापासून आम्ही दोघेही अक्षरश: भारावून गेलो होतो. काही वेळ आम्ही उत्सुकतेने टीव्हीवरच्या बातम्या पाहिल्या. प्रत्येक चॅनलवरून तीच 'ब्रेकिंग न्यूज' दाखवली जात होती. 'भारतरत्न' हा किताब मिळवणारा मी देशातील पहिला खेळाडू ठरलो होतो. माझ्या आयुष्यातील तो सर्वोच्च सन्मान होता. क्रिकेटला अलविदा करत असताना तो सन्मान प्राप्त झाल्याने माझा आनंद शतपटीने वाढला होता. २०१२मध्ये भारतीय संसदेचं वरिष्ठ सभागृह असलेल्या राज्यसभेवर खासदार म्हणून माझी आधीच नियुक्ती झाली होती. आता भारत सरकारने 'भारतरत्न' देऊन माझा अपूर्व गौरव केला होता. भारतातील सर्व प्रकारच्या खेळांना आवश्यक असणाऱ्या सोयी व साधनसामग्री उपलब्ध व्हाव्यात, यासाठी एक खासदार म्हणून मी विशेष प्रयत्न करण्याचं ठरवलं होतं. तसंच क्रीडाक्षेत्र हे शिक्षणाचं एक अविभाज्य अंग होण्यासाठीही एक विशेष योजना कार्यान्वित करण्याचा मी प्रयत्न करणार होतो.

४ फेब्रुवारी, २०१४ रोजी राष्ट्रपती भवनातील अशोक हॉलमध्ये झालेल्या एका खास समारंभात मला भारतरत्न हा किताब प्रदान करण्यात आला. आम्ही हॉलमध्ये प्रवेश करताच सैनिकी बँडच्या घोषात माझं स्वागत करण्यात आलं. सन्मान स्वीकारण्यासाठी जेव्हा माझं नाव पुकारण्यात आलं तेव्हा माझ्या अंगावर रोमांच उठले होते. माझ्या जीवनातील तो एक अविस्मरणीय आणि अविश्वसनीय क्षण होता. तो सन्मान स्वीकारताना माझ्यासमवेत माझी पत्नी आणि मुलगी होती. (अर्जुनचा त्या दिवशी क्रिकेट सामना असल्यामुळे तो येऊ शकला नव्हता.) ''तुझ्या कर्तृत्वाचा देशाला आणि देशवासीयांना अतिशय अभिमान वाटतो'', हे राष्ट्रपतींचे उद्गार ऐकून माझं मन कृतकृत्यतेने भरून गेलं. माझ्या आयुष्यातील तो एक समाधानाचा व स्वप्नपूर्तीचा दिवस होता.

१९८९मध्ये मी जेव्हा पाकिस्तानविरुद्ध पहिला आंतरराष्ट्रीय कसोटी सामना खेळलो तेव्हा माझ्या क्रिकेट कारकिर्दीची कधी आणि कशी सांगता होणार आहे, याची मला काहीच कल्पना नव्हती. माझ्या संघाच्या यशासाठी मी सदैव प्रामाणिकपणे आणि कसोशीने प्रयत्न केले. अनेकदा मी अपयशी ठरलो. मात्र मी प्रयत्न करायचे कधीही थांबवले नाहीत. शिवाजी पार्कला आचरेकरसरांच्या कडक शिस्तीखाली जेव्हा मी क्रिकेट खेळायला सुरुवात केली, तेव्हा एक दिवस मला माझ्या देशासाठी

खेळायचं आहे, हे एकच ध्येय मी माझ्या मनाशी बाळगलं होतं.

त्या संघर्षाच्या काळात मी मेहनत आणि शिस्त या दोन बाबतींत कधीही तडजोड केली नाही. प्रत्येक वेळी मी माझ्या यशाचा आणि कर्तृत्वाचा दर्जा अधिकाधिक उंचावण्याचा प्रयत्न केला. माझ्या भारत देशाचं नाव उज्ज्वल करावं हे एकच स्वप्न मी कायम उरी बाळगलं होतं आणि त्या एकमेव स्वप्नाचा मी आयुष्यभर पाठपुरावा केला होता.

वर्तुळ पूर्ण

वानखेडे स्टेडियमवर केलेल्या भाषणात मी आचरेकरसरांचा उल्लेख करताना म्हटलं, ''मी कितीही चांगली बॅटिंग केली तरी सरांनी 'वा! छान कामगिरी केलीस' असे उद्गार कधीच काढले नाहीत. सरांकडून तशा प्रशंसेची मी खरंतर कधी अपेक्षाही केली नव्हती. ज्या ज्या वेळेला त्यांचा चेहरा आनंदाने फुलायचा, त्या वेळी आपण चांगली कामगिरी केली आहे, हे मी ओळखायचो.'' अखेरचा सामना खेळून झाल्यावर दुसऱ्याच दिवशी मी आचरेकरसरांना भेटायला गेलो. त्यांच्या मार्गदर्शनामुळे आणि त्यांनी माझ्यावर घेतलेल्या कठोर मेहनतीमुळेच मी यशस्वी होऊ शकलो होतो, याची मला पूर्ण जाणीव होती. त्यांचं ऋण मी कधीच फेडू शकणार नव्हतो. आचरेकरसरांसमोर नतमस्तक होताना एक वर्तुळ पूर्ण झाल्याचं समाधान मला वाटलं.

सर अलीकडे तर फारसं बोलतही नाहीत, पण त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद मला त्यांच्या मनातील भावना सांगून गेला.

अंजली आणि माझे मित्र संजय व रचना नारंग यांनी माझ्या निवृत्तीच्या दिवशी मुंबईतील 'वॉटरस्टोन्स क्लब'मध्ये एका भव्य पार्टीचं आयोजन केलं होतं. विश्वचषक जिंकल्यानंतरही अंजली व नारंग जोडप्याने ह्याच क्लबमध्ये मला पार्टी दिली होती. ती पार्टी देण्याचं मात्र रातोरात ठरल्यामुळे काही निवडक मित्रच त्या वेळी उपस्थित राहू शकले होते. या खेपेस मात्र तिघांनी अतिशय योजनाबद्ध बेत आखलेला होता. त्या रात्री माझे परदेशातीलही अनेक मित्र आणि हितचिंतक आवर्जून हजर राहिले होते. ती पार्टी इतकी रंगली की, माझे काही जिवलग मित्र दुसऱ्या दिवशी १० वाजता क्लबमधून बाहेर पडले. २४ वर्षांच्या माझ्या कारकिर्दीला त्या पार्टीमध्ये पुन्हा एकदा उजाळा मिळाला.

वेस्ट इंडीजचा भारत दौरा, २०१३

पहिली कसोटी. कोलकाता – ६ ते ८ नोव्हेंबर, २०१३

वेस्ट इंडीज २३४ (एमएन सॅम्युअल्स ६५; एम शमी ४-७१, आर अश्विन २-५२, **एसआर तेंडुलकर** १-५) व १६८ डीएम ब्राव्हो ३७, केओए पॉवेल ३६; एम शमी ५-४७, आर अश्विन ३-४६)

भारत ४५३ (आरजी शर्मा १७७, आर अश्विन १२४, **एसआर तेंडुलकर** १०; एस शिलिंगफोर्ड ६-१६७, व्ही परमॉल २-६७)

भारत एक डाव व ५१ धावांनी विजयी

दुसरी कसोटी. मुंबई – १४ ते १६ नोव्हेंबर, २०१३

वेस्ट इंडीज १८२ (केओए पॉवेल ४८; पीपी ओझा ५-४०, आर अश्विन ३-४५) व १८७ (डी रामदीन ५३*, एस चंदरपॉल ४१, पीपी ओझा ५-४९, आर अश्विन ४-८९)

भारत ४९५ (सीए पुजारा ११३, आरजी शर्मा १११*, **एसआर तेंडुलकर** ७४, व्ही कोहली ५७; एस शिलिंगफोर्ड ५-१७९, एन देवनारायण २-४५)

भारत एक डाव व १२६ धावांनी विजयी

भारत मालिकेत २-० विजयी

२८.

जाता जाता...

भारतीय क्रिकेटला तरुण आणि प्रतिभाशाली क्रिकेटपटूंच्या सुरक्षित हातांमध्ये सोपवून मी निवृत्त होतो आहे. आजच्या भारतीय संघाचा गाभा असलेल्या या तरुण खेळाडूंबरोबर मी खेळलो आहे. म्हणूनच भारतीय क्रिकेटच्या भविष्याबद्दल मी निश्चिंत आहे. फलंदाजी हेच भारतीय संघाचं यापुढेही बलस्थान ठरणार आहे. आज भारतीय संघात तरुण आणि अनुभवी फलंदाजांचा सुरेख मिलाफ झालेला दिसतो आहे. माझी खातरी आहे की, नव्या पिढीचे हे खेळाडू यापुढे अनेक वर्षं भारतीय संघातून खेळत राहून, देशासाठी भरीव कामगिरी करतील. गोलंदाजीबाबत मात्र चित्र थोडंसं वेगळं आहे. आज आपल्या संघातील काही गोलंदाज जरी चांगली कामगिरी करत असले, तरी आपल्याला अजूनही काही कुशल गोलंदाजांचा शोध घ्यावा लागेल. काही वर्षांपूर्वी आपल्याकडे उत्तम गोलंदाजांच्या जोड्या होत्या. आज मात्र भारतीय संघातून बरीच वर्षं सातत्याने खेळू शकेल, असा गोलंदाजांचा एक चांगला चमू तयार करायची अतिशय गरज आहे. हे खरंच मोठं आव्हान आहे. मात्र आपल्या देशातील विविध राज्यांमधून निरनिराळ्या स्तरांवर खेळत असलेले अनेक गुणी आणि होतकरू गोलंदाज आहेत. त्यांचा विचार करता आपण हे आव्हान समर्थपणे पेलू शकू, असा मला विश्वास वाटतो.

क्रिकेट हा अतिशय आकर्षक आणि चित्तवेधक खेळ आहे. क्रिकेटचं खास वैशिष्ट्य म्हणजे, त्यात तीन प्रकारचे सामने खेळवले जातात. त्यातील प्रत्येक प्रकाराला स्वत:चा असा खास प्रेक्षकवर्ग आहे. त्यातील कसोटी क्रिकेटच्या सर्वोच्च स्थानाला कधीही धक्का लागण्याची शक्यता नसली, तरी एकदिवसीय क्रिकेटनेही आता चांगलंच मूळ धरलं आहे, हे आपल्याला मान्य करावंच लागेल. चॅम्पियन्स ट्रॉफी आणि मर्यादित षटकांच्या विश्वचषक स्पर्धेला जगभरातून जबरदस्त प्रतिसाद मिळाला आहे. टी-२० क्रिकेटने तर तरुणांची मनं जिंकली आहेत. आयपीएल स्पर्धेची लोकप्रियता हे त्याचं जितंजागतं उदाहरण आहे.

निवृत्त झाल्यावर आता मी काय करणार, हा प्रश्न सध्या मला विचारला जात आहे. यापुढे मी नक्की काय करणार आहे, हे खरंच मलाही ठाऊक नाही. वयाच्या अकराव्या वर्षी जेव्हा मी क्रिकेट खेळायला सुरुवात केली, तेव्हा मी भारतातर्फे खेळणार आहे किंवा २०० कसोटी सामने खेळू शकणार आहे, हे मला तरी कुठे माहीत होतं? प्रत्येक क्षणी प्रयत्नांची शर्थ करत खेळाचा जास्तीत जास्त आनंद लुटायचा एवढी एकच गोष्ट मला ठाऊक होती. मी भूतकाळामध्येही कधी अडकून राहिलो नाही आणि भविष्यकाळाचीही कधी चिंता केली नाही. येईल त्या प्रसंगाला मात्र त्या त्या वेळी समर्थपणे तोंड देत राहिलो. आपल्या मुलांबरोबर मला कधी रस्त्यांवरून मजेत फिरता येणार नाही किंवा कधी मी त्यांना खरेदीसाठी दुकानात घेऊन जाऊ शकणार नाही, याची तरी मला कुठे कल्पना होती? घरच्यांसोबत चित्रपटगृहात जाण्यासाठी किंवा त्यांना बाहेर जेवायला घेऊन जाण्यासाठी मला आधीपासून काळजीपूर्वक तयारी करावी लागणार आहे, याचाही मी पूर्वी कधीच विचार केला नव्हता. मात्र याबद्दल मला जराही खेद वाटत नाही. कोट्यवधी भारतीय जनतेचं जे प्रेम आणि जो जिव्हाळा मला लाभला आहे, त्याच्या तुलनेने मला फारच कमी किंमत मोजावी लागली आहे.

माझी दुसरी इनिंग्ज सुरू करताना मी कोणतेही मोठे बेत आखलेले नाहीत. सध्या तरी मी माझ्या घरच्यांबरोबर जास्तीत जास्त वेळ राहतो आहे आणि अनेकदा तर दिवसभर काहीही न करता फक्त आराम करतो आहे. क्रिकेट खेळत असताना असा निवांतपणे वेळ काढणं मला शक्यच झालं नसतं. आज मात्र मी कुटुंबासाठी खास वेळ राखून, सर्वांबरोबर घरात एकत्र राहण्याची मजा अनुभवतो आहे. क्रिकेटमुळे आज बांद्रा (पश्चिम) येथे मी माझा स्वत:चा बंगला बांधू शकलो आहे. मी आणि

अंजलीने अगदी लहानसहान वस्तूसुद्धा काळजीपूर्वक आणि रसिकतेने निवडून आमचं घर सजवलं आहे. शिवाजी पार्कजवळ असलेल्या एका खोलीच्या घरात मी लहानाचा मोठा झालो. त्यानंतर १९९४ सालापर्यंत जिथे मी राहिलो, त्या घराच्या बैठकीच्या खोलीत मी आणि अजित रात्री झोपत असू. आज बांद्र्यामध्ये स्वत:च्या मालकीच्या बंगल्यात आम्ही राहतो आहोत. आपला स्वत:च्या मालकीचा बंगला असावा, हे माझं आयुष्यभराचं स्वप्न होतं. क्रिकेट अतिशय प्रामाणिकपणे, निष्ठेने आणि जीव ओतून खेळल्यामुळेच मी ते स्वप्न साकार करू शकलो.

माझ्या आई-वडिलांनी कायम माझ्यासोबत राहावं ही माझी आणखी एक इच्छा होती. ‘ला मेर्’ या आमच्या अपार्टमेंटमध्ये आम्ही २००० साली राहायला गेलो. त्याआधीच १९९९मध्ये दुर्दैवाने माझ्या वडिलांचं अचानक निधन झालं. त्यामुळे वडिलांना बरोबर घेऊन राहायचं माझं स्वप्न पूर्ण होऊ शकलं नाही. मात्र माझी आई आज माझ्याबरोबर राहते आहे, याचं माझ्या मनाला खूप मोठं समाधान आहे. २८ सप्टेंबर, २०११ रोजी जेव्हा आम्ही बांद्र्याच्या बंगल्यात राहायला गेलो, त्याच दिवशी सकाळी मी आईला माझ्या घरी घेऊन आलो. कोणाच्याही लक्षात येऊ नये म्हणून त्या दिवशी मी स्वत: तिला एका छोट्या गाडीतून आणलं. घरी आल्यानंतरही मी तिला व्हीलचेअरमध्ये बसवून सगळा बंगला दाखवला. आमच्या बंगल्यात प्रवेश करणारी ती पहिली व्यक्ती होती. माझ्या घरात पहिलं पाऊल माझ्या आईचं पडलं. मी धन्य झालो.

अकराव्या वर्षी ज्या पद्धतीने मी माझ्या पहिल्या इनिंग्जला सुरुवात केली होती, अगदी त्याच पद्धतीने आता मी माझ्या दुसऱ्या इनिंग्जला सुरुवात करणार आहे. मधल्या काळात माझ्या स्वभावात किंवा वृत्तीत काहीच फरक पडलेला नाही. प्रत्येक क्षणाचा पुरेपूर आनंद लुटणं हाच माझ्या जगण्याचा एकमेव हेतू होता आणि अजूनही तोच आहे. यापुढे माझं जीवन कसं घडणार आहे, मला माहीत नाही. त्याबद्दल मी काही अंदाजही बांधणार नाही. माझी पहिली खेळी मी ज्या पद्धतीने खेळलो, त्याच प्रमाणे गोष्टी जशा घडत जातील तसं मी जगत जाणार आहे. मात्र दोन इनिंग्जमध्ये एक मोठा फरक नक्कीच असणार आहे. मी स्वत:शी प्रामाणिक राहून माझ्या पद्धतीने माझ्या आयुष्याचं पहिलं पर्व खेळलो. त्याचंच फळ म्हणून मी माझ्या कामगिरीचा वारसा मागे ठेवून जात आहे. या सगळ्याचा मला नक्कीच अभिमान आणि समाधान आहे.

परिशिष्ट

निरोपाचं भाषण

मित्रहो... शांत राहा... मला बोलू द्या... नाहीतर मी अधिकाधिक भावुक होत जाईन... गेली २४ वर्षं माझं आयुष्य २२ यार्डांच्या खेळपट्टीशी जोडलेलं होतं. आज तो विलक्षण प्रवास संपलाय, यावर विश्वास ठेवणं खूप कठीण जातंय. माझ्या आयुष्यात ज्या व्यक्तींनी अतिशय महत्त्वाची भूमिका बजावली आहे, अशा सर्वांचे आज मला आभार मानायचे आहेत. त्यांपैकी एकाचंही नाव विसरू नये म्हणून मी प्रथमच माझ्यासोबत ही यादी आणली आहे. तुम्ही मला समजून घ्याल अशी आशा आहे... भावना व्यक्त करणं मला खूप अवघड जातंय... पण मी स्वत:ला सावरण्याचा प्रयत्न करेन.

माझ्या आयुष्यातील सर्वांत महत्त्वाची व्यक्ती म्हणजे माझे बाबा. १९९९पासून मला त्यांची फारच उणीव जाणवतेय. केवळ त्यांच्या मार्गदर्शनामुळेच आज मी तुमच्यासमोर उभा आहे. मी ११ वर्षांचा असतानाच त्यांनी मला पूर्ण स्वातंत्र्य दिलं. ते म्हणायचे, ''तू स्वत:च्या हिमतीवर तुझी स्वप्नं पूर्ण केली पाहिजेस. मात्र त्यासाठी कधीही जवळच्या मार्गाने जाण्याचा प्रयत्न करू नकोस. तुझी वाट बिकट असेल, पण माघार घेण्याचा विचारही कधी मनात आणू नकोस.'' त्यांचाच शब्द प्रमाण मानून आजपर्यंत मी वाटचाल केली आहे. 'सर्वांत आधी तू एक चांगला माणूस हो' – ही त्यांची शिकवण मी कधीही विसरू शकणार नाही. मी माझ्यातील माणुसकी जपण्याचा नेहमीच प्रयत्न केलाय. यशाच्या प्रत्येक क्षणी मी न चुकता बॅट उंचावून माझ्या वडिलांना अभिवादन केलंय. आजही मी त्यांच्या आठवणीने व्याकूळ झालोय.

दुसरी व्यक्ती म्हणजे माझी आई. माझ्यासारख्या व्रात्य आणि खोडकर मुलाला तिने कसं सांभाळलं असेल, याची मी कल्पनाही करू शकत नाही. माझ्या वागण्याचा तिला खूपच त्रास झाला असणार, पण ती कमालीची शांत आणि सोशीक आहे. आपला मुलगा सुदृढ, तंदुरुस्त आणि सुखरूप असावा अशीच प्रत्येक आईची इच्छा असते. माझ्या आईलाही याचबद्दल माझी काळजी असायची. भारतातर्फे गेली २४ वर्षं खेळताना तिने मला खूप जपलंय. त्याही आधीपासून, म्हणजे वयाच्या अकराव्या वर्षी मी क्रिकेट खेळायला सुरुवात केल्यापासून तिने माझ्या यशासाठी परमेश्वराजवळ कायम प्रार्थना केली आहे. तिच्या प्रार्थनेमुळे आणि तिच्या आशीर्वादांमुळेच मैदानावर चांगली कामगिरी करण्याची शक्ती मला मिळत गेली. आई, तू केलेल्या त्यागाला माझा प्रणाम.

माझी शाळा माझ्या घरापासून खूप दूर असल्यामुळे त्या काळात मी चार वर्षं माझ्या काका-काकूंसोबत राहिलो होतो. त्या दोघांनीही माझ्यावर स्वत:च्या मुलासारखं प्रेम केलं. दिवसभर खेळल्यामुळे मी संध्याकाळी थकून घरी यायचो. माझे डोळे अर्धवट मिटलेलेच असायचे. पण स्वत:च्या हाताने भरवल्याखेरीज काकूने मला कधी निजू दिलं नाही. त्यामुळेच मी दुसऱ्या दिवशी उठून उत्साहाने पुन्हा खेळायला जाऊ शकायचो. ते क्षण मी कधीही विसरू शकणार नाही. दोघांनीही माझ्यावर मुलासारखी माया केली. आजही आमच्यात तेच नातं टिकून आहे.

माझा मोठा भाऊ नितीन आणि त्याच्या कुटुंबाने मला नेहमीच प्रोत्साहन दिलंय. माझ्या मोठ्या भावाचा स्वभाव अबोल आहे. तो मला कायम म्हणतो, ''तू जे काही करशील ते जीव ओतून करशील, यावर माझा पूर्ण विश्वास आहे.'' त्याच्या शब्दांचा मला नेहमीच आधार वाटत आलाय. तीच गोष्ट माझी बहीण सविता आणि तिच्या कुटुंबाची. माझ्या आयुष्यातील पहिली बॅट मला सविताने दिली होती. ती काश्मीर विलो (वाळुंजाच्या लाकडाची) बॅट होती... त्या बॅटने मी माझ्या क्रिकेटच्या प्रवासाला सुरुवात केली होती. मी फलंदाजी करत असताना, उपवास करणाऱ्या अनेकांमध्ये सविताही असते. सविता, तुझे खूप खूप आभार.

माझा दुसरा भाऊ, अजित. त्याच्याबद्दल काय बोलावं हेच मला समजत नाही. माझं क्रिकेटचं हे स्वप्न आम्ही दोघं मिळून प्रत्यक्ष जगलोय. माझ्या क्रिकेटसाठी त्याने स्वत:च्या कारकिर्दीचा त्याग केलाय. त्याने प्रथम माझ्यातील गुणवत्ता

हेरली. मी ११ वर्षांचा असताना तो मला आचरेकरसरांकडे घेऊन गेला. तिथूनच माझं आयुष्य आरपार बदललं. एक गोष्ट सांगितली तर तुम्ही कदाचित त्यावर विश्वासही ठेवणार नाही. काल रात्री त्याने मला फोन केला आणि माझ्या शेवटच्या इनिंग्जमध्ये मी कसा बाद झालो, यावर बराच वेळ आम्ही चर्चा केली. दुसऱ्या डावात मला फलंदाजी करायला मिळण्याची फारशी शक्यता नाही, हे आम्हाला दोघांनाही ठाऊक होतं, पण तो आमच्या सवयीचाच एक भाग होता. माझ्या जन्मापासून आमच्या दोघांचे सूर जुळलेत. त्यात आता फरक पडूच शकत नाही. यापुढे मी क्रिकेट खेळत नसलो, तरी क्रिकेटच्या तंत्रावर आम्ही चर्चा करतच राहणार. माझ्या तंत्राबद्दल कधी आमच्यात एकमत व्हायचं, तर कधी मतभेदही व्हायचे. मात्र आज जेव्हा मी मागे वळून बघतो तेव्हा एक गोष्ट माझ्या लक्षात येते की, अजित नसता तर क्रिकेटमध्ये मी इतकी उंची गाठू शकलो नसतो.

१९९० साली माझ्या आयुष्यात एक सुंदर घटना घडली. मला अंजली भेटली. माझ्या आयुष्यातील तो अविस्मरणीय काळ आहे. अंजलीच्या सहवासातील गोडी त्यानंतर निरंतर वाढतच गेली आहे. अंजली डॉक्टर आहे. आमचं लग्न झालं तेव्हा ती एका मोठ्या, यशस्वी कारकिर्दीच्या उंबरठ्यावर होती. आमच्या कौटुंबिक स्थैर्याचा जेव्हा विषय निघाला तेव्हा अंजलीच पुढाकार घेत मला म्हणाली, ''तू तुझं पूर्ण लक्ष क्रिकेटवर ठेव, आपल्या कुटुंबावर मी लक्ष ठेवते.'' इतकी वर्षं मी कोणत्याही दडपणाशिवाय मुक्तपणे क्रिकेट खेळू शकलो याचं सर्व श्रेय अंजलीला आहे. अनेकदा मी घातलेला गोंधळ, माझी झालेली चिडचिड आणि चढ्या आवाजात मी केलेली बडबड तिने शांतपणे सहन केली आहे. माझ्या स्वभावतल्या या सर्व दोषांसकट तिने मला स्वीकारलंय. माझ्या चढत्या आणि उतरत्या काळात मला नेहमीच तिची भक्कम साथ मिळाली आहे. क्रिकेटच्या मैदानावर मी अनेक भागीदाऱ्या केल्या असतील, मात्र तुझ्याबरोबर जीवनात केलेली भागीदारीच मला सर्वोत्तम वाटते.

त्यानंतर मला उल्लेख करायचाय तो माझ्या आयुष्यात मला लाभलेल्या दोन अनमोल हिऱ्यांचा – सारा आणि अर्जुन. दोघंही आता मोठे झाले आहेत. सारा १६ वर्षांची तर अर्जुन १४ वर्षांचा आहे. काळ वेगाने पुढे सरकलाय. मला त्यांच्या वाढदिवसांना, त्यांच्या शाळांच्या वार्षिक दिनाला, क्रीडा दिनाला आवर्जून हजर राहण्याची इच्छा असायची. त्यांच्या शाळांना सुट्टी लागल्यावर त्यांना कुठेतरी दूर घेऊन जावंसं वाटायचं. पण मी तसं करू शकायचो नाही. तुम्ही दोघांनी मला समजून घेतलंत याबद्दल खरंच तुमचे आभार. तुमच्यावर माझा किती जीव आहे याची कदाचित तुम्हाला कल्पनाही नसेल. गेली १६ वर्षं... किंवा १४ वर्षं मी तुम्हाला पुरेसा वेळ देऊ शकलो नाही... पण आज मी तुम्हाला वचन देतो, यापुढची सोळाच काय, त्याहूनही खूप जास्त वर्षं मी फक्त तुमच्या सोबतच असेन.

माझे सासू-सासरे ॲनाबेल आणि आनंद मेहता. दोघंही अतिशय प्रेमळ आणि मायाळू आहेत. त्यांचा सतत मला पाठिंबा मिळालाय. अनेकदा आणि अनेक विषयांवर मी त्यांच्याशी चर्चा केली आहे. त्यांचा सल्ला घेतला आहे. तुम्हाला भक्कम आधार देणारं आणि तुम्हाला मार्गदर्शन करणारं एक समर्थ कुटुंब तुमच्या पाठीशी असणं खूप महत्त्वाचं असतं. थांबा, टाळ्या वाजवण्याआधी तुम्हाला एक महत्त्वाची गोष्ट सांगायची राहून गेली आहे. अंजलीशी लग्न करण्याची त्यांनी मला परवानगी दिली, हे त्यांचे माझ्यावरचे सर्वांत मोठे उपकार आहेत.

गेली २४ वर्षं मी भारतातर्फे खेळलो. या काळात मला अनेक नवीन मित्र मिळाले. त्यापूर्वी लहानपणीही माझे खूप दोस्त होते. माझ्या यशात माझ्या मित्रांचा प्रचंड मोठा वाटा आहे. मला नेटमध्ये गोलंदाजी करण्यासाठी त्यांना मी जेव्हा जेव्हा बोलवायचो तेव्हा हातातली कामं बाजूला सारून ते माझ्यासाठी धावत यायचे. काही वेळा माझं मानसिक स्वास्थ बिघडलेलं असायचं. काही वेळा माझ्या बॅटमधून धावा निघत नसायच्या. अशा वेळी मी मुंबई सोडून काही दिवस बाहेर जात असे. त्या वेळी क्रिकेटवर चर्चा करण्यासाठी, मला धीर आणि मोलाचा सल्ला देण्यासाठी ते माझ्या सोबत असायचे. दुखापतीच्या काळात अनेकदा मला पहाटेच जाग यायची. आपलं क्रिकेट आता संपणार की काय, या भीतीने मी अस्वस्थ होऊन जायचो. अशा वेळेस पहाटे तीन वाजताही मी माझ्या मित्रांना हक्काने उठवलंय. त्यांना घरी बोलावून मी त्या आडवेळी त्यांच्या गाडीतून भटकलोय. 'तुझी कारकीर्द अजून संपलेली नाही', या त्यांच्या शब्दांनी मला धीर यायचा. माझ्या मित्रांशिवाय माझं जीवन कधी पूर्णच होऊ शकलं नसतं. मला साथ दिल्याबद्दल तुमचा मी आभारी आहे.

वयाच्या अकराव्या वर्षी माझ्या क्रिकेट कारकिर्दीला सुरुवात झाली. माझा भाऊ मला आचरेकरसरांकडे घेऊन गेला. माझ्या कारकिर्दीला कलाटणी देणारा तो क्षण होता. आज त्यांना स्टेडियममध्ये बसलेलं पाहून मला खूप आनंद झाला. सहसा ते टीव्हीसमोर बसून मी खेळत असलेला प्रत्येक सामना पाहतात. ११-१२ वर्षांचा असताना, दिवसभरात दोन-दोन सराव सामने खेळण्याठी मी त्यांच्या स्कूटरवर मागे बसून मैदानांवर जायचो. सकाळी मी शिवाजी पार्कवर फलंदाजी करत असायचो, तर माझा दुपारचा सामना आझाद मैदानात असायचा. मी जास्तीत जास्त सराव सामने खेळावेत म्हणून सर मला मुंबईत कुठेही घेऊन जायला तयार असायचे.

एक मजेची गोष्ट तुम्हाला सांगतो. गेल्या २९ वर्षांत सरांनी मला एकदाही 'तू चांगला खेळलास' असं म्हटलेलं नाही. असं म्हटलं तर मी शेफारून जाईन आणि माझ्या खेळात सुधारणा करण्यासाठी मेहनत घ्यायचं थांबवीन, असं त्यांना वाटलं असावं. आज माझ्या कारकिर्दीची अखेर होत असताना आता तरी सर आपला नियम बाजूला ठेवून 'तू चांगला खेळलास' असं म्हणत माझं कौतुक करतील, अशी मला आशा आहे. यापुढे मी क्रिकेट खेळणार नसलो, तरी क्रिकेटचे सामने मात्र नक्कीच पाहणार आहे. क्रिकेटचं स्थान कायमच माझ्या हृदयापाशी असेल. सर, माझ्या आयुष्यात तुमचं फार मोठं आणि महत्त्वाचं योगदान आहे. मी तुमचा अंत:करणपूर्वक ऋणी आहे.

वानखेडे मैदानावरच मी मुंबई संघासाठी प्रथम खेळलो. 'मुंबई क्रिकेट असोसिएशन'शी आता माझे बरेच वर्षांचे जिव्हाळ्याचे संबंध आहेत. मला आठवतं, एकदा मी न्यूझीलंडहून पहाटे चार वाजता मुंबईत पोचूनही मुंबई संघातर्फे सामना खेळण्यासाठी सकाळी आठ वाजता याच मैदानात हजर होतो. सामन्यात खेळलंच पाहिजे, असा माझ्यावर कुणाचाच दबाव नव्हता. मुंबई क्रिकेट असोसिएशनचाही नव्हता किंवा अन्य कुणाचाही नव्हता. निव्वळ मुंबई संघावरील प्रेमापोटी मी त्या सामन्यात खेळलो. आज मुंबई क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्षही इथे उपस्थित आहेत. इतकी वर्षं अतिशय प्रेमाने मला व माझ्या क्रिकेटला काळजीपूर्वक सांभाळल्याबद्दल मी मुंबई संघाचे आणि अध्यक्षांचे विशेष आभार मानतो.

भारतासाठी क्रिकेट खेळणं हे अर्थातच माझं सर्वांत मोठं स्वप्न होतं. भारतीय संघात माझी निवड झाल्यावर बीसीसीआयशीही माझं आपोआपच नातं जोडलं गेलं. सुरुवातीपासूनच मला बीसीसीआयचा फार सुंदर अनुभव आला. त्यांनी माझ्या क्षमतेवर विश्वास ठेवून सोळाव्या वर्षी माझी भारतीय संघात निवड केली. त्यांनी फार मोठं धाडसी पाऊल उचललं होतं. माझ्यावर विश्वास दाखवल्याबद्दल मला त्या वेळच्या निवडसमितीचे मनापासून आभार मानावेसे वाटतात. इतक्या लहान वयात कसोटी क्रिकेट खेळण्याची संधी दिल्याबद्दल मी बीसीसीआयचाही ऋणी आहे. तुम्ही माझ्या पाठीशी उभे राहिला नसतात, तर वेगळंच काही घडलं असतं. माझ्या दुखापतीच्या काळातही बीसीसीआय सदैव माझ्याबरोबर होती. मला उत्तम वैद्यकीय उपचार मिळतील, याची विशेष काळजी घेतली गेली. त्यामुळेच मी लवकर तंदुरुस्त होऊन पुन्हा भारतासाठी खेळू शकलो.

२४ वर्षांचा प्रवास फारच सुंदर होता. अनेक अनुभवी खेळाडूंबरोबर खेळण्याची मला संधी मिळाली. त्याआधीही बऱ्याच ज्येष्ठ खेळाडूंना खेळताना मी टेलिव्हिजनवर पाहिलं होतं. या सर्वांकडून मला क्रिकेट खेळण्याची तर प्रेरणा मिळालीच; पण योग्य प्रकारे क्रिकेट कसं खेळावं हेही शिकता आलं. दुर्दैवाने त्यांच्याबरोबर क्रिकेट खेळण्याची मात्र कधीच संधी मिळू शकली नाही. त्यांच्या कर्तृत्वाबद्दल आणि भारतीय क्रिकेटक्षेत्रासाठी त्यांनी दिलेल्या योगदानाबद्दल माझ्या मनात अतिशय आदर आहे.

या क्षणी राहुल, लक्ष्मण आणि सौरव मला मोठ्या पडद्यावर दिसत आहेत. अनिल इथे नाही. माझ्या संघातले सर्व जणही माझ्यासमोर आहेत. घराबाहेरच्या मोठ्या जगातील तुम्ही सर्व माझे कुटुंबीय आहात. तुमच्याबरोबर मी कितीतरी सोन्याचे क्षण अनुभवलेले आहेत... आता मात्र ड्रेसिंग रूममधील जिव्हाळ्याच्या वातावरणाला मी मुकणार आहे. मला ते सहन करणं खूपच जड जाणार आहे. माझ्या सर्व प्रशिक्षकांनी मला केलेल्या अमूल्य मार्गदर्शनाबद्दल मी त्यांचे आभार मानतो. या कसोटी सामन्याच्या पहिल्या दिवशी एमएस धोनीने मला २००व्या कसोटीची कॅप भेट दिली. तेव्हा मी माझ्या संघाला उद्देशून एक छोटा संदेश दिला होता. मला तो पुन्हा सांगावासा वाटतो – आपण सगळे भारतीय संघाचा एक भाग आहोत, याचा

आपल्याला खूप अभिमान वाटतो. आपल्याला देशाची सेवा करण्याची संधी मिळाली हे आपलं भाग्य आहे. मित्रांनो, मी तुमच्या क्षमता जाणून आहे. उच्च मूल्यं सांभाळत आणि योग्य वृत्तीने खेळत तुम्ही आपल्या देशाची सेवा करत राहाल असा माझा विश्वास आहे. आपण नशीबवान आहोत. या सुंदर खेळाची सेवा करण्यासाठी परमेश्वराने आपली खास निवड केली आहे. आपलं कौशल्य पणाला लावून या खेळाला जपत तो असाच पुढे घेऊन जाण्याची संधी आपल्यासारख्या प्रत्येक पिढीला मिळत असते. अशा संधीचा लाभ घेऊन तुम्ही सतत आपल्या देशाची मान उंच ठेवाल, अशी माझी खातरी आहे. तुम्हाला माझ्या शुभेच्छा!

निरनिराळ्या दुखापतींना सतत तोंड दिलेल्या या माझ्या शरीराची काळजी घेणारे माझे डॉक्टर्स, फिजिओ आणि ट्रेनर्स यांचे मला आभार मानायलाच हवेत. त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली नाही, तर मी माझ्या कर्तव्यात कसूर केल्यासारखं होईल. या सर्वांनी वेळोवेळी उपचार करून मला मैदानात उतरण्यासाठी सज्ज केलं. माझ्या कारकिर्दीत मला इतक्या दुखापती झाल्या की, तुम्ही मला तंदुरुस्त कसे ठेवू शकलात याचं मला आश्चर्य वाटतं. अनेकदा अवेळीही मी माझ्या डॉक्टरांना मुंबईहून चेन्नईला किंवा दिल्लीला बोलावून घेतलं होतं. मी बोलावताच ही मंडळी आपलं काम बाजूला ठेवून, मिळेल त्या विमानाने माझ्यासाठी ताबडतोब निघून यायचे. त्यांनी केलेल्या उपचारांमुळेच मी इतकी वर्षं खेळू शकलो. या तिघांनाही मी खूप खूप धन्यवाद देतो.

माझा अतिशय जिवलग दोस्त, माझा पहिला व्यवस्थापक, मार्क मस्कारेन्हास याचं २००२मध्ये एका मोटार अपघातात दुर्दैवी निधन झालं. त्याचं क्रिकेटवर अपार प्रेम होतं. माझ्या क्रिकेटचा आणि विशेषत: भारतीय क्रिकेटचा तो जबरदस्त चाहता होता. क्रिकेटने त्याला झपाटून टाकलं होतं. देशासाठी खेळणं ही केवढी मोठी जबाबदारी असते, याची पूर्ण जाणीव मार्कला होती. प्रायोजक कंपन्यांनी कितीही मागणी केली, तरी एखादी विशिष्ट जाहिरात करण्यासाठी त्याने माझ्यावर कधीही दबाव आणला नाही. त्याने मला निवडीचं पूर्ण स्वातंत्र्य दिलं. आज

मला त्याची उणीव प्रकर्षाने भासतेय. मार्क, तुझ्या भरीव योगदानाबद्दल तुझे मन:पूर्वक आभार!

मार्कने जे काम केलं, तेच काम 'डब्ल्यूएसजी' हा माझा सध्याचा व्यवस्थापकीय संघ माझ्यासाठी करतोय. त्यांच्याशी करारबद्ध होताना माझ्या त्यांच्याकडून असलेल्या अपेक्षा आणि भारतीय संघातून खेळताना माझ्यावर असलेल्या जबाबदाऱ्या, या मी त्यांना स्पष्टपणे सांगितल्या होत्या. त्यांनी माझं म्हणणं नीट समजावून घेऊन माझ्या मतांचा पूर्ण आदर राखला. डब्ल्यूएसजी, तुमचे आभार.

गेली १४ वर्षं माझा व्यवस्थापक म्हणून विनोद नायडू माझ्यासोबत अतिशय निष्ठेने काम करतोय. मी तर त्याला माझ्या कुटुंबातलाच सदस्य मानतो. स्वत:च्या कुटुंबाला बाजूला ठेवून त्याने माझ्या कामासाठी स्वत:ला वाहून घेतलंय. विनोद, तुला माझ्याबरोबर इतका वेळ काम करू दिल्याबद्दल मी तुझ्या कुटुंबाचाही आभारी आहे.

शालेय काळात क्रिकेट खेळताना जेव्हा मी चांगली कामगिरी करायचो, तेव्हा प्रसारमाध्यमांनी माझं खूप कौतुक केलं होतं. त्या काळापासून ते आज सकाळपर्यंत त्यांचा मला सतत पाठिंबा मिळत राहिलाय. मला कायम उत्तेजन दिल्याबद्दल आणि माझ्या कामगिरीला दाद दिल्याबद्दल मी प्रसारमाध्यमांचे आभार मानतो. तुम्ही केलेल्या गौरवामुळे माझ्यावर नेहमीच सकारात्मक परिणाम झाला. माझ्या कारकिर्दीतील अनेक अविस्मरणीय क्षण आपल्या कॅमेऱ्यात अचूक पकडल्याबद्दल सर्व छायाचित्रकारांचे मी आभार मानतो. तुमच्या छायाचित्रांमुळे त्या क्षणांच्या स्मृती आता कायम माझ्यासोबत राहणार आहेत.

माझं भाषण फारच लांबतंय याची मला कल्पना आहे, पण आता एक अखेरची गोष्ट मला सांगायची आहे. केवळ माझा खेळ पाहण्यासाठी आणि मला प्रोत्साहन देण्यासाठी जगातील कानाकोपऱ्यातून येणाऱ्या माझ्या चाहत्यांचा मी खूप ऋणी आहे. तुम्ही माझ्यावर निरपेक्षपणे प्रेम केलंय. मी शतक काढलं किंवा शून्यावर बाद झालो, तरी तुम्ही मला कायम पाठिंबा दिलात. तुम्ही माझे खरे आधारस्तंभ आहात.

तुम्ही माझ्यासाठी खूप काही केलं आहे. मला यश मिळावं म्हणून उपवास करणाऱ्या, प्रार्थना करणाऱ्या आणि असं बरंच काही करणाऱ्या माझ्या चाहत्यांना मी अनेकदा भेटलोय. तुमच्याशिवाय आयुष्यात मी हे स्थान मिळवूच शकलो नसतो.

तुमचा मी अंत:करणपूर्वक ऋणी आहे. काळ कितीही वेगाने वाहून गेला असला, तरी तुमची आठवण माझ्या मनातून कधीच पुसली जाणार नाही. विशेषत: तुम्ही केलेला 'सचिन... सचिन...' हा जयघोष अखेरच्या श्वासापर्यंत माझ्या कानात घुमत राहील.

सर्वांचे खूप खूप आभार. माझ्या बोलण्यात जर काही गोष्टी राहून गेल्या असल्या किंवा काही जणांचे उल्लेख करायला मी विसरलो असलो, तर तुम्ही मला समजून घ्याल अशी मी आशा करतो. नमस्कार.

वानखेडे स्टेडियम, मुंबई
१६ नोव्हेंबर, २०१३

कारकिर्दीचा संख्यात्मक आढावा

कारकिर्दीचा संख्यात्मक आढावा

संकलक : बेनेडिक्ट बरमॅन्ज

कसोटी सामन्यांतील आकडेवारी

कसोटी सामन्यांतील फलंदाजी

	सामने	इनिंग्ज	नाबाद	धावा	सर्वोच्च	सरासरी	१००	५०	०
एकूण आकडेवारी	२००	३२९	३३	१५९२१	२४८*	५३.७८	५१	६८	१४

कसोटी कारकीर्द – मालिकेनुसार

	सामने	इनिंग्ज	नाबाद	धावा	सर्वोच्च	सरासरी	१००	५०	झेल
भारत पाकिस्तानमध्ये १९८९-९०	४	६	०	२१५	५९	३५.८३	०	२	१
भारत न्यूझीलंडमध्ये १९८९-९०	३	४	०	११७	८८	२९.२५	०	१	१
भारत इंग्लंडमध्ये १९९०	३	५	१	२४५	११९*	६१.२५	१	१	३
श्रीलंका भारतात १९९०-९१	१	१	०	११	११	११.००	०	०	०
भारत ऑस्ट्रेलियामध्ये १९९१-९२	५	९	१	३६८	१४८*	४६.००	२	०	५
भारत झिंबाब्वेमध्ये १९९२-९३	१	१	०	०	०	०.००	०	०	०
भारत दक्षिण आफ्रिकेमध्ये १९९२-९३	४	६	०	२०२	१११	३३.६६	१	१	४
इंग्लड भारतात १९९२-९३	३	४	१	३०२	१६५	१००.६६	१	२	४

झिंबाब्वे भारतात १९९२-९३	१	१	०	६२	६२	६२.००	०	१	०
भारत श्रीलंकेमध्ये १९९३-९४	३	३	१	२०३	१०४*	१०१.५०	१	१	३
श्रीलंका भारतात १९९३-९४	३	३	०	२४४	१४२	८१.३३	१	१	२
भारत न्यूझीलंडमध्ये १९९३-९४	१	२	१	५४	४३	५४.००	०	०	०
वेस्ट इंडीज भारतात १९९४-९५	३	६	०	४०२	१७९	६७.००	१	२	५
न्यूझीलंड भारतात १९९५-९६	३	४	२	५८	५२*	२९.००	०	१	३
भारत इंग्लंडमध्ये १९९६	३	५	०	४२८	१७७	८५.६०	२	१	२
ऑस्ट्रेलिया भारतात १९९६-९७	१	२	०	१०	१०	५.००	०	०	०
दक्षिण आफ्रिका भारतात १९९६-९७	३	६	०	१६६	६१	२७.६६	०	१	१
भारत दक्षिण आफ्रिकेत १९९६-९७	३	६	०	२४१	१६९	४०.१६	१	०	३
भारत वेस्ट इंडीजमध्ये १९९६-९७	५	६	१	२८९	९२	५७.८०	०	३	५
भारत श्रीलंकेमध्ये १९९७-९८	२	३	०	२९०	१४३	९६.६६	२	०	१
श्रीलंका भारतात १९९७-९८	३	४	०	१९९	१४८	४९.७५	१	०	२
ऑस्ट्रेलिया भारतात १९९७-९८	३	५	१	४४६	१७७	१११.५०	२	१	२
भारत झिंबाब्वेमध्ये १९९८-९९	१	२	०	४१	३४	२०.५०	०	०	०
भारत न्यूझीलंडमध्ये १९९८-९९	२	३	०	२२७	११३	७५.६६	१	१	१
पाकिस्तान भारतात १९९८-९९	२	४	०	१७१	१३६	४२.७५	१	०	०
आशिया कसोटी चॅम्पियनशिप ९८-९९	२	४	१	१८६	१२४*	६२.००	१	१	०
न्यूझीलंड भारतात १९९९-००	३	६	२	४३५	२१७	१०८.७५	२	०	२
भारत ऑस्ट्रेलियामध्ये १९९९-००	३	६	०	२७८	११६	४६.३३	१	२	०
दक्षिण आफ्रिका भारतात १९९९-००	२	४	०	१४६	९७	३६.५०	०	१	२
भारत बांगलादेशमध्ये २०००-०१	१	१	०	१८	१८	१८.००	०	०	०
झिंबाब्वे भारतात २०००-०१	२	३	१	३६२	२०१*	१८१.००	२	०	३

ऑस्ट्रेलिया भारतात २०००-०१	३	६	०	३०४	१२६	५०.६६	१	२	१
भारत झिंबाब्वेमध्ये २००१	२	४	१	१९९	७४	६६.३३	०	२	०
भारत दक्षिण आफ्रिकेमध्ये २००१-०२	२	४	१	१९३	१५५	६४.३३	१	०	०
इंग्लंड भारतात २००१-०२	३	४	०	३०७	१०३	७६.७५	१	२	४
झिंबाब्वे भारतात २००१-०२	२	३	०	२५४	१७६	८४.६६	१	०	२
भारत वेस्ट इंडीजमध्ये २००१-०२	५	८	०	३३१	११७	४१.३७	१	२	२
भारत इंग्लंडमध्ये २००२	४	६	०	४०१	१९३	६६.८३	१	२	१
वेस्ट इंडीज भारतात २००२-०३	३	५	१	३०६	१७६	७६.५०	१	०	२
भारत न्यूझीलंडमध्ये २००२-०३	२	४	०	१००	५१	२५.००	०	१	१
न्यूझीलंड भारतात २००३-०४	२	४	०	७१	५५	१७.७५	०	१	०
भारत ऑस्ट्रेलियामध्ये २००३-०४	४	७	२	३८३	२४१*	७६.६०	१	१	३
भारत पाकिस्तानमध्ये २००३-०४	३	४	१	२०५	१९४*	६८.३३	१	०	१
ऑस्ट्रेलिया भारतात २००४-०५	२	४	०	७०	५५	१७.५०	०	१	१
दक्षिण आफ्रिका भारतात २००४-०५	२	३	१	५५	३२*	२७.५०	०	०	०
भारत बांगलादेशमध्ये २००४-०५	२	२	१	२८४	२४८*	२८४.००	१	०	२
पाकिस्तान भारतात २००४-०५	३	५	०	२५५	९४	५१.००	०	३	२
श्रीलंका भारतात २००५-०६	३	५	०	१८९	१०९	३७.८०	१	०	०
भारत पाकिस्तानमध्ये २००५-०६	३	३	०	६३	२६	२१.००	०	०	४
इंग्लंड भारतात २००५-०६	३	५	१	८३	३४	२०.७५	०	०	१
भारत दक्षिण आफ्रिकेमध्ये २००६-०७	३	६	०	१९९	६४	३३.१६	०	२	३
भारत बांगलादेशमध्ये २००६-०७	२	३	१	२५४	१२२*	१२७.००	२	०	४
भारत इंग्लंडमध्ये २००७	३	६	०	२२८	९१	३८.००	०	२	४
पाकिस्तान भारतात २००७-०८	२	३	१	१३९	८२	६९.५०	०	२	०

भारत ऑस्ट्रेलियामध्ये २००७-०८	४	८	१	४९३	१५४*	७०.४२	२	२	५
दक्षिण आफ्रिका भारतात २००७-०८	१	१	०	०	०	०.००	०	०	०
भारत श्रीलंकेमध्ये २००८	३	६	०	९५	३१	१५.८३	०	०	०
ऑस्ट्रेलिया भारतात २००८-०९	४	८	१	३९६	१०९	५६.५७	१	२	२
इंग्लंड भारतात २००८-०९	२	४	१	१५६	१०३*	५२.००	१	०	०
भारत न्यूझीलंडमध्ये २००८-०९	३	५	०	३४४	१६०	६८.८०	१	२	२
श्रीलंका भारतात २००९-१०	३	४	१	१९७	१००*	६५.६६	१	१	२
भारत बांगलादेशमध्ये २००९-१०	२	३	१	२६४	१४३	१३२.००	२	०	०
दक्षिण आफ्रिका भारतात २००९-१०	२	३	०	२१३	१०६	७१.००	२	०	०
भारत श्रीलंकेमध्ये २०१०	३	५	०	३९०	२०३	७८.००	१	२	२
ऑस्ट्रेलिया भारतात २०१०-११	२	४	१	४०३	२१४	१३४.३३	१	२	०
न्यूझीलंड भारतात २०१०-११	३	४	०	१२६	६१	३१.५०	०	१	०
भारत दक्षिण आफ्रिकेमध्ये २०१०-११	३	६	२	३२६	१४६	८१.५०	२	०	०
भारत इंग्लंडमध्ये २०११	४	८	०	२७३	९१	३४.१२	०	२	२
वेस्ट इंडीज भारतात २०११-१२	३	५	०	२१८	९४	४३.६०	०	२	२
भारत ऑस्ट्रेलियामध्ये २०११-१२	४	८	०	२८७	८०	३५.८७	०	२	३
न्यूझीलंड भारतात २०१२	२	३	०	६३	२७	२१.००	०	०	०
इंग्लंड भारतात २०१२-१३	४	६	०	११२	७६	१८.६६	०	१	१
ऑस्ट्रेलिया भारतात २०१२-१३	४	७	१	१९२	८१	३२.००	०	१	१
वेस्ट इंडीज भारतात २०१३-१४	२	२	०	८४	७४	४२.००	०	१	०

कसोटी सामन्यांतील फलंदाजी – प्रतिस्पर्धी संघानुसार

	सामने	इनिंग्ज	नाबाद	धावा	सर्वोच्च	सरासरी	१००	५०	०
ऑस्ट्रेलिया	३९	७४	८	३६३०	२४१*	५५.००	११	१६	४
बांगलादेश	७	९	३	८२०	२४८*	१३६.६६	५	०	०
इंग्लंड	३२	५३	४	२५३५	१९३	५१.७३	७	१३	०
न्यूझीलंड	२४	३९	५	१५९५	२१७	४६.९१	४	८	१
पाकिस्तान	१८	२७	२	१०५७	१९४*	४२.२८	२	७	२
दक्षिण आफ्रिका	२५	४५	४	१७४१	१६९	४२.४६	७	५	३
श्रीलंका	२५	३६	३	१९९५	२०३	६०.४५	९	६	०
वेस्ट इंडीज	२१	३२	२	१६३०	१७९	५४.३३	३	१०	३
झिंबाब्वे	९	१४	२	९१८	२०१*	७६.५०	३	३	१

कसोटी सामन्यांतील फलंदाजी – देशानुसार

	सामने	इनिंग्ज	नाबाद	धावा	सर्वोच्च	सरासरी	१००	५०	०
ऑस्ट्रेलिया	२०	३८	४	१८०९	२४१*	५३.२०	६	७	३
बांगलादेश	७	९	३	८२०	२४८*	१३६.६६	५	०	०
इंग्लंड	१७	३०	१	१५७५	१९३	५४.३१	४	८	०
भारत	९४	१५३	१६	७२१६	२१७	५२.६७	२२	३२	४
न्यूझीलंड	११	१८	१	८४२	१६०	४९.५२	२	५	१
पाकिस्तान	१०	१३	१	४८३	१९४*	४०.२५	१	२	०
दक्षिण आफ्रिका	१५	२८	३	११६१	१६९	४६.४४	५	३	२
श्रीलंका	१२	१९	२	११५५	२०३	६७.९४	५	४	०
वेस्ट इंडीज	१०	१४	१	६२०	११७	४७.६९	१	५	३
झिंबाब्वे	४	७	१	२४०	७४	४०.००	०	२	१

कसोटी सामन्यांतील फलंदाजी – खंडानुसार

	सामने	इनिंग्ज	नाबाद	धावा	सर्वोच्च	सरासरी	१००	५०	०
आफ्रिका	१९	३५	४	१४०१	१६९	४५.१९	५	५	३
अमेरिका	१०	१४	१	६२०	११७	४७.६९	१	५	३
आशिया	१२३	१९४	२२	९६७४	२४८*	५६.२४	३३	३८	४
युरोप	१७	३०	१	१५७५	१९३	५४.३१	४	८	०
ओशनिया	३१	५६	५	२६५१	२४१*	५१.९८	८	१२	४

कसोटी सामन्यांतील फलंदाजी – मायदेश व परदेश

	सामने	इनिंग्ज	नाबाद	धावा	सर्वोच्च	सरासरी	१००	५०	०
मायदेशात	९४	१५३	१६	७२१६	२१७*	५२.६७	२२	३२	४
परदेशात	१०६	१७६	१७	८७०५	२४८*	५४.७४	२९	३६	१०

कसोटी सामन्यांतील फलंदाजी – वर्षानुसार

	सामने	इनिंग्ज	नाबाद	धावा	सर्वोच्च	सरासरी	१००	५०	०
१९८९	४	६	०	२१५	५९	३५.८३	०	२	०
१९९०	७	१०	१	३७३	११९*	४१.४४	१	२	१
१९९१	२	४	०	७८	४०	१९.५०	०	०	०
१९९२	७	११	१	४१९	१४८*	४१.९०	३	०	२
१९९३	८	९	२	६४०	१६५	९१.४२	२	५	०
१९९४	७	११	१	७००	१७९	७०.००	२	३	०
१९९५	३	४	२	५८	५२*	२९.००	०	१	०
१९९६	८	१५	०	६२३	१७७	४१.५३	२	२	१
१९९७	१२	१७	१	१०००	१६९	६२.५०	४	३	०

१९९८	५	९	१	६४७	१७७	८०.८७	३	१	०
१९९९	१०	१९	३	१०८८	२१७	६८.००	५	४	३
२०००	६	१०	१	५७५	२०१*	६३.८८	२	१	०
२००१	१०	१८	२	१००३	१५५	६२.६८	३	६	०
२००२	१६	२६	१	१३९२	१९३	५५.६८	४	५	३
२००३	५	९	०	१५३	५५	१७.००	०	१	२
२००४	१०	१५	५	९१५	२४८*	९१.५०	३	२	०
२००५	६	१०	०	४४४	१०९	४४.४०	१	३	०
२००६	८	१२	१	२६७	६३	२४.२७	०	१	१
२००७	९	१६	२	७७६	१२२*	५५.४२	२	६	०
२००८	१३	२५	३	१०६३	१५४*	४८.३१	४	३	१
२००९	६	९	१	५४१	१६०	६७.६२	२	३	०
२०१०	१४	२३	३	१५६२	२१४	७८.१०	७	५	०
२०११	९	१७	१	७५६	१४६	४७.२५	१	५	०
२०१२	९	१५	०	३५७	८०	२३.८०	०	२	०
२०१३	६	९	१	२७६	८१	३४.५०	०	२	०

कसोटी सामन्यांतील फलंदाजी – फलंदाजींच्या क्रमांकानुसार

	सामने	इनिंग्ज	नाबाद	धावा	सर्वोच्च	सरासरी	१००	५०	०
क्रमांक २	१	१	०	१५	१५	१५.००	०	०	०
क्रमांक ४	१७७	२७५	२७	१३४९२	२४८*	५४.४०	४४	५८	११
क्रमांक ५	२६	२९	३	१५५२	१६९	५९.६९	५	६	२
क्रमांक ६	१४	२०	३	७४५	१४८*	४३.८२	२	४	१
क्रमांक ७	३	४	०	११७	४१	२९.२५	०	०	०

कसोटी सामन्यांतील फलंदाजी – संघाच्या इनिंग्जनुसार

	सामने	इनिंग्ज	नाबाद	धावा	सर्वोच्च	सरासरी	१००	५०	०
संघाची पहिली इनिंग्ज	१९९	१९७	९	११३००	२४८*	६०.१०	३८	४६	९
संघाची दुसरी इनिंग्ज	१४७	१३२	२४	४६२१	१७६	४२.७८	१३	२२	५

कसोटी सामन्यांतील फलंदाजी – सामन्याच्या इनिंग्जनुसार

	सामने	इनिंग्ज	नाबाद	धावा	सर्वोच्च	सरासरी	१००	५०	०
पहिली इनिंग्ज	९१	९१	६	५६०८	२४१*	६५.९७	२०	२०	३
दुसरी इनिंग्ज	१०८	१०६	३	५६९२	२४८*	५५.२६	१८	२६	६
तिसरी इनिंग्ज	७३	७२	८	२९९६	१७६	४६.८१	१०	१५	२
चौथी इनिंग्ज	७४	६०	१६	१६२५	१३६	३६.९३	३	७	३

कसोटी सामन्यांतील फलंदाजी – निकालानुसार

	सामने	इनिंग्ज	नाबाद	धावा	सर्वोच्च	सरासरी	१००	५०	०
जिंकलेले सामने	७२	११३	१७	५९४६	२४८*	६१.९३	२०	२४	२
हरलेले सामने	५६	११२	२	४०८८	१७७	३७.१६	११	१८	८
अनिर्णित सामने	७२	१०४	१४	५८८७	२४१*	६५.४१	२०	२६	४

कसोटी सामन्यांतील फलंदाजी – मालिकेतील सामन्यांच्या टप्प्यानुसार

	सामने	इनिंग्ज	नाबाद	धावा	सर्वोच्च	सरासरी	१००	५०	०
एकच सामना असलेली मालिका	७	१०	१	१९६	६२	२१.७७	०	१	२
मालिकेतील पहिला सामना	६४	१०४	१५	५०१५	२४८*	५६.३४	१८	१८	५

मालिकेतील दुसरा सामना	६४	१०६	१२	५४८१	२१४	५८.३०	१९	२३	२
मालिकेतील तिसरा सामना	४६	७८	२	३६३७	२१७	४७.८५	९	१७	३
मालिकेतील चौथा सामना	१४	२२	२	१०७७	२४१*	५३.८५	३	६	१
मालिकेतील पाचवा सामना	३	५	०	३२९	११४	६५.८०	१	२	०

कसोटी सामन्यांतील फलंदाजी – कर्णधारानुसार

	सामने	इनिंग्ज	नाबाद	धावा	सर्वोच्च	सरासरी	१००	५०	०
एम अझरुद्दीन	४७	७२	९	३७६७	१७९	५९.७९	१५	१५	५
एमएस धोनी	४५	७५	७	३५९५	२१४	५२.८६	११	१७	०
आर द्रविड	२१	३५	३	१३०४	१९४*	४०.७५	४	६	१
एससी गांगुली	४२	६८	८	३७६८	२४८*	६२.८०	११	१५	५
ए कुंबळे	१२	२२	२	९०४	१५४*	४५.२०	२	५	१
व्ही सेहवाग	४	८	१	३१४	१०५*	४४.८५	१	१	०
के श्रीकांत	४	६	०	२१५	५९	३५.८३	०	२	०
एसआर तेंडुलकर	२५	४३	३	२०५४	२१७	५१.३५	७	७	२

कसोटी सामन्यांतील फलंदाजी – कर्णधार/खेळाडू असताना

	सामने	इनिंग्ज	नाबाद	धावा	सर्वोच्च	सरासरी	१००	५०	०
कर्णधार असताना	२५	४३	३	२०५४	२१७	५१.३५	७	७	२
खेळाडू असताना	१७५	२८६	३०	१३८६७	२४८*	५४.१६	४४	६१	१२

कसोटी शतकं

	प्रतिस्पर्धी	ठिकाण	मोसम
२४८*	बांगलादेश	ढाका	२००४-०५
२४१*	ऑस्ट्रेलिया	सिडनी	२००३-०४
२१७	न्यूझीलंड	अहमदाबाद	१९९९-००
२१४	ऑस्ट्रेलिया	बंगळुरू	२०१०-११
२०३	श्रीलंका	कोलंबो-एसएससी	२०१०
२०१*	झिंबाब्वे	नागपूर	२०००-०१
१९४*	पाकिस्तान	मुलतान	२००३-०४
१९३	इंग्लंड	लीड्स	२००२
१७९	वेस्ट इंडीज	नागपूर	१९९४-९५
१७७	इंग्लंड	नॉटिंगहॅम	१९९६
१७७	ऑस्ट्रेलिया	बंगळुरू	१९९७-९८
१७६	झिंबाब्वे	नागपूर	२००१-०२
१७६	वेस्ट इंडीज	कोलकाता	२००२-०३
१६९	दक्षिण आफ्रिका	केप टाउन	१९९६-९७
१६५	इंग्लंड	चेन्नई	१९९२-९३
१६०	न्यूझीलंड	हॅमिल्टन	२००८-०९
१५५*	ऑस्ट्रेलिया	चेन्नई	१९९७-९८
१५५	दक्षिण आफ्रिका	ब्लोएमफॉन्टेन	२००१-०२
१५४*	ऑस्ट्रेलिया	सिडनी	२००७-०८
१५३	ऑस्ट्रेलिया	ॲडलेड	२००७-०८
१४८*	ऑस्ट्रेलिया	सिडनी	१९९१-९२
१४८	श्रीलंका	मुंबई	१९९७-९८
१४६	दक्षिण आफ्रिका	केप टाउन	२०१०-११
१४३	श्रीलंका	कोलंबो-आरपीएस	१९९७-९८
१४३	बांगलादेश	मिरपूर	२००९-१०
१४२	श्रीलंका	लखनऊ	१९९३-९४
१३९	श्रीलंका	कोलंबो-एसएससी	१९९७-९८
१३६	पाकिस्तान	चेन्नई	१९९८-९९
१२६*	न्यूझीलंड	मोहाली	१९९९-००
१२६	ऑस्ट्रेलिया	चेन्नई	२०००-०१
१२४*	श्रीलंका	कोलंबो-एसएससी	१९९८-९९
१२२*	बांगलादेश	मिरपूर	२००६-०७
१२२	इंग्लंड	बर्मिंगहॅम	१९९६
१२२	झिंबाब्वे	दिल्ली	२०००-०१
११९*	इंग्लंड	मँचेस्टर	१९९०

११७	वेस्ट इंडीज	पोर्ट-ऑफ-स्पेन	२००१-०२
११६	ऑस्ट्रेलिया	मेलबोर्न	१९९९-००
११४	ऑस्ट्रेलिया	पर्थ	१९९१-९२
११३	न्यूझीलंड	वेलिंग्टन	१९९८-९९
१११*	दक्षिण आफ्रिका	सेंचुरियन	२०१०-११
१११	दक्षिण आफ्रिका	जोहान्सबर्ग	१९९२-९३
१०९	श्रीलंका	दिल्ली	२००५-०६
१०९	ऑस्ट्रेलिया	नागपूर-जे	२००८-०९
१०६	दक्षिण आफ्रिका	कोलकाता	२००९-१०
१०५*	बांगलादेश	चित्तगाँग-डी	२००९-१०
१०४*	श्रीलंका	कोलंबो-एसएससी	१९९३-९४
१०३*	इंग्लंड	चेन्नई	२००८-०९
१०३	इंग्लंड	अहमदाबाद	२००१-०२
१०१	बांगलादेश	चित्तगाँग-डी	२००६-०७
१००*	श्रीलंका	अहमदाबाद	२००९-१०
१००	दक्षिण आफ्रिका	नागपूर-जे	२००९-१०

कसोटी सामने – बाद होण्याची पद्धत

	वेळा	एकूण	टक्केवारी
त्रिफळाचीत	५४	२९६	१८.२४
झेल-यष्टिरक्षक	४२	२९६	१४.१९
झेल-क्षेत्ररक्षक	१२७	२९६	४२.९१
पायचीत	६३	२९६	२१.२८
धावबाद	९	२९६	३.०४
यष्टिचीत	१	२९६	०.३४

कसोटी सामने – अधिक वेळा बाद करणारे गोलंदाज

	वेळा	सामने
जेएम अँडरसन	९	१४
एम मुरलीधरन	८	१९
जेएन गिलेस्पी	६	८
जीडी मॅक्ग्रा	६	९
एए डोनाल्ड	५	११
डब्ल्यूजे क्रोनिए	५	११
बी ली	५	१२
डीएल व्हेटोरी	५	१५
एनएम लिऑन	४	६

सासी लेविस	४	८
एम न्टिनी	४	८
पीएम सीडल	४	९
जीपी स्वान	४	१०
एमएस पानेसर	४	११
एसएम पोलॉक	४	१२
आरडब्ल्यू प्राइस	३	२
केआर पुष्पकुमार	३	४
डीआर टफी	३	४
सकलेन मुश्ताक	३	४
आयआर बिशप	३	४
पीटी कॉलिन्स	३	५
एससीजे ब्रॉड	३	७
डीके मॉरिसन	३	७
सीएस मार्टिन	३	७
पीएल हॅरिस	३	७
डीडब्ल्यू स्टेन	३	८
शाहिद आफ्रिदी	३	८
डीजे नॅश	३	९
शोएब अख्तर	३	९
सीई कफी	३	९
बीएम मॅकमिलन	३	१०
एमजे हॉगार्ड	३	१०
डब्ल्यूपीयुजेसी वाझ	३	११
एमजी जॉन्सन	३	११
एसके वॉर्न	३	१२
जेएच कॅलिस	३	१४

कसोटी सामने – भागीदार फलंदाज

	इनिंग्ज	नाबाद	धावा	सर्वोच्च	सरासरी	१००	५०
आरएस द्रविड	१४३	६	६९०५	२४९	५०.४०	२०	२९
एससी गांगुली	७१	३	४१७३	२८१	६१.३६	१२	१६
व्हीव्हीएस लक्ष्मण	७२	४	३५१६	३५३	५१.७०	९	१९
एम अझरुद्दीन	४२	१	२३८५	२२२	५८.१७	९	५
व्ही सेहवाग	२३	०	१५६०	३३६	६७.८२	४	५
एनएस सिद्धू	१६	०	१२३९	१७७	७७.४३	६	३
एमएस धोनी	२४	२	९६९	१७२	४४.०४	२	६

जी गंभीर	२३	०	९५८	१७६	४१.६५	२	४
व्हीजी कांबळी	५	१	५८१	१९४	१४५.२५	३	१
एम विजय	६	०	५८१	३०८	९६.८३	१	३
युवराज सिंग	११	१	५३९	१६३*	५३.९०	२	२
एसके रैना	१०	०	५३०	२५६	५३.००	२	१
एम प्रभाकर	१२	२	५२६	१६०*	५२.६०	१	४
एसएस दास	१०	१	५१८	११८	५७.५५	१	५
एसव्ही मांजरेकर	१६	२	५०९	१४३	३६.३५	१	३
सीए पुजारा	१३	१	४९७	१४४	४१.४१	१	३
एनआर मोंगिया	११	०	३९५	१३५	३५.९०	१	२
ए कुंबळे	१६	०	३३२	५८	२०.७५	०	१
डब्ल्यू जाफर	६	०	३३१	१७५	५५.१६	१	१
हरभजन सिंग	८	०	३१३	१२९	३९.१२	१	२
आरजे शास्त्री	८	०	३०८	१९६	३८.५०	१	०
केएस मोरे	७	०	३०१	१२८	४३.००	१	१
कपिल देव	१४	०	२८१	७५	२०.०७	०	२
केडी कार्तिक	८	०	२६२	८५	३२.७५	०	२
एसबी बांगर	३	०	२६१	१७१	८७.००	१	०
व्ही कोहली	१०	०	२४७	९१	२४.७०	०	१
झेड खान	५	०	२३१	१३३	४६.२०	१	०
पीके आमरे	३	१	२०८	११८	१०४.००	१	०
ए मिश्रा	२	०	१७६	१४४	८८.००	१	०
एस रमेश	५	०	१७२	८०	३४.४०	०	२
पीए पटेल	२	०	१४१	१०१	७०.५०	१	०
एडी जडेजा	४	०	१२४	५१	३१.००	०	१
आयके पठाण	४	१	११४	४४	३८.००	०	०
एसबी जोशी	५	०	१११	३७	२२.२०	०	०
डीजे गांधी	२	१	८०	७६*	८०.००	०	१
एचएच कानिटकर	३	०	७९	३०	२६.३३	०	०
डीबी वेंगसरकर	३	०	७१	६२	२३.६६	०	१
एसएसके प्रसाद	४	०	६८	२९	१७.००	०	०
एसएलव्ही राजू	५	०	६६	४७	१३.२०	०	०
आय शर्मा	३	०	६५	३१	२१.६६	०	०
एबी आगरकर	५	०	५४	२९	१०.८०	०	०
डब्ल्यूव्ही रामन	२	०	५१	४६	२५.५०	०	०
जे श्रीनाथ	६	०	४६	२५	७.६६	०	०
एम कैफ	२	०	३५	२७	१७.५०	०	०

एनडी हिरवाणी	१	०	३१	३१	३१.००	०	०
आरपी सिंग	१	०	२७	२७	२७.००	०	०
एस ब्रदीनाथ	१	०	२६	२६	२६.००	०	०
सीएस पंडित	१	०	२४	२४	२४.००	०	०
बीकेव्ही प्रसाद	१	१	२३	२३*		०	०
एम कार्तिक	१	०	२०	२०	२०.००	०	०
डी गणेश	१	०	१९	१९	१९.००	०	०
एस श्रीशांत	२	०	१९	१३	९.५०	०	०
ए मुकुंद	१	०	१८	१८	१८.००	०	०
एएम रहाणे	१	०	१७	१७	१७.००	०	०
एसटी बॅनर्जी	१	०	१६	१६	१६.००	०	०
डीबी दासगुप्ता	२	०	१५	१३	७.५०	०	०
एसएस दिघे	१	०	१५	१५	१५.००	०	०
पीएल म्हांब्रे	१	०	१५	१५	१५.००	०	०
आर विजय भारद्वाज	१	०	१२	१२	१२.००	०	०
एआर कपूर	१	०	१०	१०	१०.००	०	०
व्ही दहिया	१	१	८	८*		०	०
एएस चोप्रा	२	०	६	६	३.००	०	०
जेडी उनाडकर	१	०	३	३	३.००	०	०
व्ही राठोड	१	०	१	१	१.००	०	०
ए नेहरा	१	०	०	०	०.००	०	०

कसोटी सामने – गोलंदाजी

	सामने	इनिंग्ज	षटकं	निर्धाव	धावा	बळी	सर्वोत्कृष्ट	सरासरी	धावा/ प्रतिषटक	स्ट्राइक रेट	५	१०
एकूण	२००	१४५	७०६.४	८३	२४९२	४६	३/१०	५४.१७	३.५२	९२.१	०	०

कसोटी सामने – सर्वोत्कृष्ट गोलंदाजीची आकडेवारी

	प्रतिस्पर्धी	ठिकाण	मोसम
३-१०	दक्षिण आफ्रिका	मुंबई	१९९९-००
३-३१	ऑस्ट्रेलिया	कोलकाता	२०००-०१
२-७	न्यूझीलंड	वेलिंग्टन	१९९८-९९
२-१०	ऑस्ट्रेलिया	ॲडलेड	१९९१-९२
२-३०	न्यूझीलंड	हॅमिल्टन	१९९८-९९
२-३५	पाकिस्तान	चेन्नई	१९९८-९९
२-३५	बांगलादेश	मिरपूर	२००६-०७

२-३६	ऑस्ट्रेलिया	ॲडलेड	२००३-०४
२-३६	पाकिस्तान	मुलतान	२००३-०४
२-४५	न्यूझीलंड	वेलिंग्टन	२००८-०९
२-१०७	वेस्ट इंडीज	सेंट जॉन्स	२००१-०२

कसोटी सामने – कशा पद्धतीने गडी बाद केले

	वेळा	एकूण गडी बाद	टक्केवारी
त्रिफळाचीत	११	४६	२३.९१
झेल-यष्टिरक्षक	२	४६	४.३५
झेल-क्षेत्ररक्षक	२१	४६	४५.६६
पायचीत	१०	४६	२१.७४
यष्टिचीत	१	४६	२.१७
स्वयंचीत	१	४६	२.१७

कसोटी सामने – कर्णधार असताना

	सामने	विजय	पराभव	अनिर्णित	नाणेफेक जिंकली	नाणेफेक हरली	नाणेफेक जिंकून फलंदाजी	नाणेफेक जिंकून गोलंदाजी	नाणेफेक हरून फलंदाजी	नाणेफेक हरून गोलंदाजी
एकूण	२५	४	९	१२	१५	१०	१०	५	८	२

कसोटी सामने – कर्णधार असताना सामन्यांचे निकाल

सामना सुरू झाल्याची तारीख	प्रतिस्पर्धी	ठिकाण	नाणेफेक	निर्णय	निकाल
१०/१०/१९९६	ऑस्ट्रेलिया	दिल्ली	हरली	फलंदाजी	विजय
२०/११/१९९६	दक्षिण आफ्रिका	अहमदाबाद	जिंकली	फलंदाजी	विजय
२७/११/१९९६	दक्षिण आफ्रिका	कोलकाता	हरली	फलंदाजी	पराभव
०८/१२/१९९६	दक्षिण आफ्रिका	कानपूर	जिंकली	फलंदाजी	विजय
२६/१२/१९९६	दक्षिण आफ्रिका	डर्बन	जिंकली	गोलंदाजी	पराभव
०२/०१/१९९७	दक्षिण आफ्रिका	केप टाउन	हरली	फलंदाजी	पराभव
१६/०१/१९९७	दक्षिण आफ्रिका	जोहान्सबर्ग	जिंकली	फलंदाजी	अनिर्णित
०६/०३/१९९७	वेस्ट इंडीज	किंगस्टन	हरली	फलंदाजी	अनिर्णित
१४/०३/१९९७	वेस्ट इंडीज	पोर्ट-ऑफ-स्पेन	हरली	फलंदाजी	अनिर्णित
२७/०३/१९९७	वेस्ट इंडीज	ब्रिजटाउन	जिंकली	गोलंदाजी	पराभव
०४/०४/१९९७	वेस्ट इंडीज	सेंट जॉन्स	हरली	फलंदाजी	अनिर्णित

१७/०४/१९९७	वेस्ट इंडीज	जॉर्ज-टाउन	जिंकली	फलंदाजी	अनिर्णित
०२/०८/१९९७	श्रीलंका	कोलंबो-आरपीएस	जिंकली	फलंदाजी	अनिर्णित
०९/०८/१९९७	श्रीलंका	कोलंबो-एसएससी	जिंकली	गोलंदाजी	अनिर्णित
१९/११/१९९७	श्रीलंका	मोहाली	जिंकली	गोलंदाजी	अनिर्णित
२६/११/१९९७	श्रीलंका	नागपूर	जिंकली	फलंदाजी	अनिर्णित
०३/१२/१९९७	श्रीलंका	मुंबई	हरली	गोलंदाजी	अनिर्णित
१०/१०/१९९९	न्यूझीलंड	मोहाली	हरली	गोलंदाजी	अनिर्णित
२२/१०/१९९९	न्यूझीलंड	कानपूर	हरली	फलंदाजी	विजय
२९/१०/१९९९	न्यूझीलंड	अहमदाबाद	जिंकली	फलंदाजी	अनिर्णित
१०/१२/१९९९	ऑस्ट्रेलिया	ॲडलेड	हरली	फलंदाजी	पराभव
२६/१२/१९९९	ऑस्ट्रेलिया	मेलबोर्न	जिंकली	गोलंदाजी	पराभव
०२/०१/२०००	ऑस्ट्रेलिया	सिडनी	जिंकली	फलंदाजी	पराभव
२४/०२/२०००	दक्षिण आफ्रिका	मुंबई	जिंकली	फलंदाजी	पराभव
०२/०३/२०००	दक्षिण आफ्रिका	बंगळुरू	जिंकली	फलंदाजी	पराभव

एकदिवसीय आंतरराष्ट्रीय सामन्यांची कारकीर्द

एकदिवसीय आंतरराष्ट्रीय सामन्यांतील फलंदाजी

	सामने	इनिंग्ज	नाबाद	धावा	सर्वोच्च	सरासरी	स्ट्राइक रेट	१००	५०	०
एकूण आकडेवारी	४६३	४५२	४१	१८४२६	२००*	४४.८३	८६.२३	४९	९६	२०

एकदिवसीय आंतरराष्ट्रीय सामने – मालिकेनुसार

	सामने	इनिंग्ज	नाबाद	धावा	सर्वोच्च	सरासरी	स्ट्राइक रेट	१००	५०	झेल
भारत पाकिस्तानमध्ये १९८९-९०	१	१	०	०	०	०.००	०.००	०	०	०
रॉथमन्स कप न्यूझीलंडमध्ये १९८९-९०	२	२	०	३६	३६	१८.००	८७.८०	०	०	०
ऑस्ट्रल-आशिया कप युएईमध्ये १९९०	२	२	०	३०	२०	१५.००	८१.०८	०	०	१
भारत इंग्लंडमध्ये १९९०	२	२	०	५०	३१	२५.००	८१.९६	०	०	०
श्रीलंका भारतात १९९०-९१	३	३	०	११९	५३	३९.६६	१२९.३४	०	१	२
आशिया कप भारतात १९९०-९१	३	२	०	५७	५३	२८.५०	७०.३७	०	१	०
विल्स ट्रॉफी युएईमध्ये १९९१-९२	५	५	२	१३४	५२*	४४.६६	१००.७५	०	१	१
दक्षिण आफ्रिका भारतात १९९१-९२	३	३	०	६७	६२	२२.३३	७९.७६	०	१	०
बेन्सन अँड हेजेस विश्वमालिका ऑस्ट्रेलियात९१-९२	१०	१०	१	४०१	७७	४४.५५	६२.४६	०	४	४
विश्वचषक ऑस्ट्रेलिया/न्यूझीलंडमध्ये९१-९२	८	७	१	२८३	८४	४७.१६	८४.७३	०	३	२
भारत झिंबाब्वेमध्ये १९९२-९३	१	१	०	३९	३९	३९.००	६९.६४	०	०	०
भारत दक्षिण आफ्रिकेत ९२-९३	७	७	०	१४४	३२	२०.५७	५५.३८	०	०	२
इंग्लंड भारतात १९९२-९३	६	६	१	१४९	८२*	२९.८०	९३.१२	०	१	२
झिंबाब्वे भारतात १९९२-९३	३	२	१	११	८*	११.००	७३.३३	०	०	०

भारत श्रीलंकेमध्ये १९९३	३	३	०	६१	२५	२०.३३	५६.४८	०	०	१
हिरो कप भारतात १९९३-९४	६	६	२	९८	२८*	२४.५०	६४.०५	०	०	१
श्रीलंका भारतात १९९३-९४	३	३	१	६४	५२	३२.००	७४.४१	०	१	२
भारत न्यूझीलंडमध्ये १९९३-९४	४	४	०	२००	८२	५०.००	११८.३४	०	२	०
ऑस्ट्रल-आशिया कप युएईमध्ये ९३-९४	४	४	०	१६६	७३	४१.५०	९५.४०	०	२	२
सिंगर विश्वमालिका श्रीलंकेत १९९४	४	४	१	१२७	११०	४२.३३	८३.००	१	०	०
वेस्ट इंडीज भारतात १९९४-९५	५	५	०	२४७	१०५	४९.४७	७७.६७	१	२	१
विल्स विश्वमालिका भारतात ९४-९५	५	५	०	२८५	११५	५७.००	८६.६२	१	२	३
न्यूझीलंड शतकमहोत्सवी स्पर्धा ९४-९५	३	३	०	९७	४७	३२.३३	९१.५०	०	०	१
पेप्सी आशिया कप युएईमध्ये ९४-९५	४	४	१	२०५	११२*	६८.३३	१०९.६२	१	०	३
न्यूझीलंड भारतात ९५-९६	५	५	०	१४२	६५	२८.४०	९७.९३	०	१	२
विश्वचषक भारत/पाकिस्तान/श्रीलंकेमध्ये९५-९६	७	७	१	५२३	१३७	८७.१६	८५.८७	२	३	२
सिंगर कप सिंगापूरमध्ये ९५-९६	२	२	०	१२८	१००	६४.००	९०.१४	१	०	०
पेप्सी शारजा कप युएईमध्ये ९५-९६	५	५	०	१९५	११८	३९.००	७५.८७	१	१	१
भारत इंग्लंडमध्ये १९९६	३	३	०	३७	३०	१२.३३	७५.५१	०	०	२
सिंगर विश्वमालिका श्रीलंकेमध्ये १९९६	३	३	०	१५७	११०	५२.३३	८०.५१	१	०	२
सहारा फ्रेंडशिप कप कॅनडामध्ये १९९६	५	५	१	१३७	८९*	३४.२५	७६.९६	०	१	३
टायटन कप भारतात १९९६-९७	६	६	०	३२०	८८	५३.३३	८०.४०	०	४	३
दक्षिण आफ्रिका भारतात १९९६-९७	१	१	०	११४	११४	११४.००	९०.४७	१	०	०
स्टँडर्ड बँक आंतरराष्ट्रीय मालिका द. आफ्रिकेत ९६-९७	८	८	०	२४३	१०४	३०.३७	९२.३९	१	०	१
भारत झिंबाब्वेमध्ये १९९६-९७	१	१	०	१३	१३	१३.००	८६.६६	०	०	०
भारत वेस्ट इंडीजमध्ये १९९६-९७	४	४	१	११९	६५*	३९.६६	८५.६१	०	१	०
पेप्सी इंडिपेन्डन्स कप भारतामध्ये १९९७	३	३	०	१२३	११७	४१.००	८३.१०	१	०	१

पेप्सी आशिया कप श्रीलंकेमध्ये १९९७	४	३	०	१०२	५३	३४.००	८७.९३	०	१	०
भारत श्रीलंकेमध्ये १९९७	४	४	०	९९	३९	२४.७५	१०२.०६	०	०	३
सहारा 'फ्रेंडशिप' कप कॅनडामध्ये १९९७	६	५	१	९९	५१	२४.७५	५५.००	०	१	५
भारत पाकिस्तानमध्ये १९९७-९८	३	३	०	३०	२१	१०.००	७५.००	०	०	३
अकाइ-सिंगर चॅम्पियन्स चषक युएईमध्ये ९७-९८	३	३	०	९५	९१	३१.६६	१०२.१५	०	१	१
श्रीलंका भारतात १९९७-९८	३	२	१	८८	८२*	८८.००	८८.८८	०	१	०
रौप्यमहोत्सवी इंडिपेन्डन्स कप बांगलादेशमध्ये ९७-९८	५	५	०	२५८	९५	५१.६०	११२.१७	०	३	६
पेप्सी तिरंगी मालिका भारतामध्ये १९९७-९८	५	५	०	१२९	१००	२५.८०	९०.२०	१	०	२
कोका-कोला कप युएईमध्ये ९७-९८	५	५	०	४३५	१४३	८७.००	१००.४६	२	१	०
कोका-कोला तिरंगी मालिका १९९८	३	३	१	१५१	१००*	७५.५०	९६.१७	१	०	०
सिंगर-अकाइ निदहास करंडक श्रीलंकेमध्ये १९९८	५	४	०	२६३	१२८	६५.७५	११२.८७	१	२	२
सहारा 'फ्रेंडशिप' कप कॅनडामध्ये १९९८	१	१	०	७७	७७	७७.००	७०.६४	०	१	०
भारत झिंबाब्वेमध्ये १९९८-९९	३	३	१	१५८	१२७*	७९.००	१००.६३	१	०	१
विल्स आंतरराष्ट्रीय कप बांगलादेशमध्ये ९८-९९	२	२	०	१४९	१४१	७४.५०	१०४.९२	१	०	२
कोका-कोला चॅम्पियन्स करंडक युएईमध्ये ९८-९९	५	५	२	२७४	१२४*	९१.३३	१०९.६०	२	०	१
भारत न्यूझीलंडमध्ये १९९८-९९	४	४	०	७३	४५	१८.२५	९३.५८	०	०	०
विश्वचषक इंग्लंड/आयर्लंड/नेदरलँड्स/ स्कॉटलंडमध्ये १९९९	७	७	१	२५३	१४०*	४२.१६	९०.०३	१	०	२
आयवा कप श्रीलंकेमध्ये १९९९	३	३	०	१७१	१२०	५७.००	७३.७०	१	०	०
कोका-कोला सिंगापूर चॅलेंज सिंगापूरमध्ये ९९	३	३	०	१२५	८५	४१.६६	८७.४१	०	१	०
न्यूझीलंड भारतात १९९९-००	५	५	१	२२१	१८६*	५५.२५	१०१.८४	१	०	२
कार्ल्टन अँड युनायटेड मालिका ऑस्ट्रेलियामध्ये ९९-००	८	८	०	१९८	९३	२४.७५	७६.१५	०	१	७

दक्षिण आफ्रिका भारतामध्ये १९९९-००	५	५	०	२७४	१२२	५४.८०	८८.१०	१	१	१
कोका-कोला कप युएईमध्ये १९९९-००	४	४	०	६५	३९	१६.२५	५३.२७	०	०	०
आशिया कप बांगलादेशमध्ये २०००	३	३	०	१५४	९३	५१.३३	१०२.६६	०	१	१
आयसीसी नॉकआउट केनियामध्ये २०००-०१	४	४	०	१७१	६९	४२.७५	८३.४१	०	१	१
कोकाकोला चॅम्पियन्स करंडक युएईमध्ये २००१-०१	५	५	०	१७९	१०१	३५.८०	७७.८२	१	१	०
झिंबाब्वे भारतामध्ये २०००-०१	५	५	०	२८७	१४६	५७.४०	८२.९४	१	१	१
ऑस्ट्रेलिया भारतामध्ये २०००-०१	५	५	०	२८०	१३९	५६.००	१२०.१७	१	१	२
कोका-कोला कप झिंबाब्वेमध्ये २००१	५	५	३	२८२	१२२*	१४१.००	८२.४५	१	२	०
स्टँडर्ड बँक स्पर्धा दक्षिण आफ्रिकेमध्ये २००१-०२	७	६	०	३४२	१४६	५७.००	८२.४०	२	०	१
इंग्लंड भारतामध्ये २००१-०२	६	६	१	२६६	८७*	५३.२०	९३.९९	०	२	३
भारत वेस्ट इंडीजमध्ये २००२	२	२	१	९९	६५	९९.००	८६.०८	०	१	०
नॅटवेस्ट मालिका इंग्लंडमध्ये २००२	७	७	१	३३७	११३	५६.१६	९३.०९	२	०	०
आयसीसी चॅम्पियन्स करंडक श्रीलंकेमध्ये २००२-०३	५	४	२	३९	१६	१९.५०	४४.८२	०	०	१
भारत न्यूझीलंडमध्ये २००२-०३	३	३	०	२	१	००.६६	६.८९	०	०	०
विश्वचषक केनिया/द. आफ्रिका/झिंबाब्वेमध्ये २००२-०३	११	११	०	६७३	१५२	६१.१८	८९.२५	१	६	४
टीव्हीएस कप भारतामध्ये २००३-०४	७	७	१	४६६	१०२	७७.६६	८९.१०	२	२	०
व्हीबी मालिका ऑस्ट्रेलियामध्ये २००३-०४	७	७	०	२३६	८६	३३.७१	७८.९२	०	२	२
भारत पाकिस्तानमध्ये २००३-०४	५	५	०	२१३	१४१	४२.६०	९०.२५	१	०	१
आशिया कप श्रीलंकेमध्ये २००४	६	६	१	२८१	८२*	५६.२०	७२.४२	०	३	१
बीसीसीआय अमृतमहोत्सवी सामना भारतामध्ये २००४-०५	१	१	०	१६	१६	१६.००	९४.११	०	०	०
भारत बांगलादेशमध्ये २००४-०५	२	२	०	६६	४७	३३.००	८९.१८	०	०	०
पाकिस्तान भारतामध्ये २००४-०५	६	६	०	१४५	१२३	२४.१६	८१.४६	१	०	३

श्रीलंका भारतामध्ये २००५-०६	६	६	१	२३१	९३	४६.२०	८७.१६	०	२	३
दक्षिण आफ्रिका भारतामध्ये २००५-०६	४	४	०	३६	३०	९.००	४०.००	०	०	०
भारत पाकिस्तानमध्ये २००५-०६	४	४	०	२३७	१००	५९.२५	९०.११	१	१	०
भारत श्रीलंकेमध्ये २००६	१	१	१	२	२*	-	६६.६६	०	०	-
डीएलएफ कप मलेशियामध्ये २००६-०७	४	४	१	२२२	१४१*	७४.००	८०.१४	१	१	१
आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी भारतामध्ये २००६-०७	३	३	०	७४	३५	२४.६६	६६.०७	०	०	२
भारत दक्षिण आफ्रिकेमध्ये २००६-०७	४	४	०	९३	५५	२३.२५	५८.१२	०	१	३
वेस्ट इंडीज भारतामध्ये २००६-०७	४	४	१	१९१	१००*	६३.६६	१०२.६८	१	१	०
श्रीलंका भारतामध्ये २००६-०७	३	२	०	५५	५४	२७.५०	७९.७१	०	१	२
आयसीसी विश्वचषक वेस्ट इंडीजमध्ये २००६-०७	३	३	१	६४	५७*	३२.००	११०.३४	०	१	०
भारत आयर्लंडमध्ये एकदिवसीय सामना २००७	१	१	०	४	४	४.००	१३३.३३	०	०	०
फ्यूचर कप आयर्लंडमध्ये २००७	३	३	०	२००	९९	६६.६६	७७.८२	०	२	१
भारत इंग्लंडमध्ये २००७	७	७	०	३७४	९९	५३.४२	८५.७७	०	४	०
ऑस्ट्रेलिया भारतामध्ये २००७-०८	७	७	०	२७८	७९	३९.७१	६९.१५	०	२	४
पाकिस्तान भारतामध्ये २००७-०८	५	५	०	२५९	९९	५१.८०	१०१.९६	०	२	०
कॉमनवेल्थ बँक मालिका ऑस्ट्रेलियामध्ये २००७-०८	१०	१०	१	३९९	११७*	४४.३३	८५.२५	१	२	२
इंग्लंड भारतामध्ये २००८-०९	२	२	०	६१	५०	३०.५०	७८.२०	०	१	४
भारत श्रीलंकेमध्ये २००८-०९	३	३	०	१८	७	६.००	४८.६४	०	०	२
भारत न्यूझीलंडमध्ये २००८-०९	३	३	१	२४४	१६३*	१२२.००	१०८.४४	१	१	१
कॉम्पॅक कप श्रीलंकेमध्ये २००९	३	३	०	२११	१३८	७०.३३	९५.४७	१	०	०
आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी द.आफ्रिकेमध्ये २००९-१०	२	१	०	८	८	८.००	५७.१४	०	०	१
ऑस्ट्रेलिया भारतामध्ये २००९-१०	६	६	०	२७५	१७५	४५.८३	८८.७०	१	०	२
श्रीलंका भारतामध्ये २००९-१०	४	४	१	२१६	९६*	७२.००	९५.१५	०	२	२

दक्षिण आफ्रिका भारतामध्ये २००९-१०	२	२	१	२०४	२००*	२०४.००	१३४.२१	१	०	०
भारत दक्षिण आफ्रिकेमध्ये २०१०-११	२	२	०	३१	२४	१५.५०	५६.३६	०	०	०
विश्वचषक बांगलादेश/भारत/श्रीलंकेमध्ये २०१०-११	९	९	०	४८२	१२०	५३.५५	९१.९८	२	२	२
कॉमनवेल्थ बँक मालिका ऑस्ट्रेलियामध्ये २०११-१२	७	७	०	१४३	४८	२०.४२	८२.६५	०	०	३
आशिया कप बांगलादेशमध्ये २०११-१२	३	३	०	१७२	११४	५७.३३	८०.३७	१	१	१

एकदिवसीय आंतरराष्ट्रीय सामन्यांतील फलंदाजी प्रतिस्पर्धी संघानुसार

	सामने	इनिंग्ज	नाबाद	धावा	सर्वोच्च	सरासरी	स्ट्राइक रेट	१००	५०	०
ऑस्ट्रेलिया	७१	७०	१	३०७७	१७५	४४.५९	८४.७४	९	१५	२
बांगलादेश	१२	११	१	४९६	११४	४९.६०	८५.०७	१	२	०
बर्म्युडा	१	१	१	५७	५७*	-	११६.५५	०	१	०
इंग्लंड	३७	३७	४	१४५५	१२०	४४.०९	८९.२०	२	१०	०
आयर्लंड	२	२	०	४२	३८	२१.००	७१.१८	०	०	०
केनिया	१०	९	३	६४७	१४६	१०७.८३	९७.००	४	१	०
नमिबिया	१	१	०	१५२	१५२	१५२.००	१००.६६	१	०	०
नेदरलँड्स	२	२	०	७९	५२	३९.५०	८४.०४	०	१	०
न्यूझीलंड	४२	४१	३	१७५०	१८६*	४६.०५	९५.३६	५	८	४
पाकिस्तान	६९	६७	४	२५२६	१४१	४०.०९	८७.४९	५	१६	५
दक्षिण आफ्रिका	५७	५७	१	२००१	२००*	३५.७३	७६.३१	५	८	१
श्रीलंका	८४	८०	९	३११३	१३८	४३.८४	८७.५४	८	१७	३
युएई	२	२	०	८१	६३	४०.५०	७९.४१	०	१	०
वेस्ट इंडीज	३९	३९	९	१५७३	१४१*	५२.४३	७८.०२	४	११	५
झिंबाब्वे	३४	३३	५	१३७७	१४६	४९.१७	९१.५५	५	५	०

एकदिवसीय आंतरराष्ट्रीय सामन्यांतील फलंदाजी देशानुसार

	सामने	इनिंग्ज	नाबाद	धावा	सर्वोच्च	सरासरी	स्ट्राइक रेट	१००	५०	०
ऑस्ट्रेलिया	४७	४६	३	१४९१	११७*	३४.६७	७५.२६	१	१०	१
बांगलादेश	१६	१६	०	८२७	१४१	५१.६८	९८.५६	२	५	०
कॅनडा	१२	११	२	३१३	८९*	३४.७७	६७.०२	०	३	१
इंग्लंड	२६	२६	२	१०५१	१४०*	४३.७९	८८.३९	३	४	१
भारत	१६४	१६०	१५	६९७६	२००*	४८.११	८८.४०	२०	३८	५
आयर्लंड	४	४	०	२०४	९९	५१.००	७८.४६	०	२	०
केनिया	४	४	०	१७१	६९	४२.७५	८३.४१	०	१	०
मलेशिया	४	४	१	२२२	१४१*	७४.००	८०.१४	१	१	०
न्यूझीलंड	२२	२२	१	८२१	१६३*	३९.०१	९७.३९	१	५	३
पाकिस्तान	१३	१३	०	४८०	१४१	३६.९२	८८.७२	२	१	३
सिंगापूर	५	५	०	२५३	१००	५०.६०	८८.७७	१	१	१
दक्षिण आफ्रिका	४०	३८	०	१४५३	१५२	३८.२३	७९.३९	४	६	१
श्रीलंका	४४	४१	५	१५३१	१३८	४२.५२	८१.८७	५	६	१
युएई	४२	४२	५	१७७८	१४३	४८.०५	९२.७९	७	७	१
वेस्ट इंडीज	९	९	३	२८२	६५*	४७.००	९०.३८	०	३	१
झिंबाब्वे	११	११	४	५७३	१२७*	८१.८५	८६.६८	२	३	१

एकदिवसीय आंतरराष्ट्रीय सामन्यांतील फलंदाजी : खंडानुसार

	सामने	इनिंग्ज	नाबाद	धावा	सर्वोच्च	सरासरी	स्ट्राइक रेट	१००	५०	०
आफ्रिका	५५	५३	४	२१९७	१५२	४४.८३	८१.४९	६	१०	२
अमेरिका	२१	२०	५	५९५	८९*	३९.६६	७६.३७	०	६	२
आशिया	२८८	२८१	२६	१२०६७	२००*	४७.३२	८८.६०	३८	५९	११
युरोप	३०	३०	२	१२५५	१४०*	४४.८२	८६.६१	३	६	१
ओशनिया	६९	६८	४	२३१२	१६३*	३६.१२	८१.८६	२	१५	४

एकदिवसीय आंतरराष्ट्रीय सामन्यांतील फलंदाजी – मायदेशात/परदेशात

	सामने	इनिंग्ज	नाबाद	धावा	सर्वोच्च	सरासरी	स्ट्राइक रेट	१००	५०	०
मायदेशात	१६४	१६०	१५	६९७६	२००*	४८.११	८८.४०	२०	३८	५
परदेशात	१४७	१४६	१०	५०६५	१६३*	३७.२४	८१.७३	१२	२४	८
त्रयस्थ ठिकाणी	१५२	१४६	१६	६३८५	१५२	४९.११	८७.७१	१७	३४	७

एकदिवसीय आंतरराष्ट्रीय सामन्यांतील फलंदाजी – वर्षानुसार

	सामने	इनिंग्ज	नाबाद	धावा	सर्वोच्च	सरासरी	स्ट्राइक रेट	१००	५०	०
१९८९	१	१	०	०	०	०.००	०.००	०	०	१
१९९०	११	१०	०	२३९	५३	२३.९०	९८.७६	०	१	१
१९९१	१४	१४	२	४१७	६२	३४.७५	७४.४६	०	४	१
१९९२	२१	२०	२	७०४	८४	३९.११	६९.०८	०	६	०

१९९३	१८	१७	४	३१९	८२*	२४.५३	७३.१६	०	१	०
१९९४	२५	२५	२	१०८९	११५	४७.३४	८८.६०	३	१	३
१९९५	१२	१२	१	४४४	११२*	४०.३६	१०१.३६	१	१	०
१९९६	३२	३२	२	१६११	१३७	५३.७०	८२.४४	६	१	०
१९९७	३९	३६	३	१०११	११७	३०.६३	८४.९५	२	५	२
१९९८	३४	३३	४	१८९४	१४३	६५.३१	१०२.१५	१	७	०
१९९९	२२	२२	२	८४३	१८६*	४२.१५	८८.६४	३	१	४
२०००	३४	३४	०	१३२८	१४६	३९.०५	८१.७७	३	६	०
२००१	१७	१६	३	९०४	१४६	६९.५३	९१.३१	४	३	१
२००२	२०	१९	५	७४१	११३	५२.९२	८७.४८	२	३	०
२००३	२१	२१	१	११४१	१५२	५७.०५	८७.३६	३	८	१
२००४	२१	२१	१	८१२	१४१	४०.६०	८०.०७	१	५	१
२००५	१६	१६	१	४१२	१२३	२७.४६	७७.२९	१	२	०
२००६	१६	१६	२	६२८	१४१*	४४.८५	७७.०५	२	३	१
२००७	३३	३२	२	१४२५	१००*	४७.५०	८५.५८	१	१३	३
२००८	१२	१२	१	४६०	११७*	४१.८१	८४.२४	१	३	१
२००९	२१	२०	२	९७२	१७५	५४.००	९४.००	३	३	०
२०१०	२	२	१	२०४	२००*	२०४.००	१३४.२१	१	०	०
२०११	११	११	०	५१३	१२०	४६.६३	८८.६०	२	२	०
२०१२	१०	१०	०	३१५	११४	३१.५०	८१.३९	१	१	०

एकदिवसीय आंतरराष्ट्रीय सामन्यांतील फलंदाजी – क्रमांकानुसार

	सामने	इनिंग्ज	नाबाद	धावा	सर्वोच्च	सरासरी	स्ट्राइक रेट	१००	५०	०
क्रमांक १	४७	४७	२	१६२५	१२०	३६.११	८२.८२	२	९	१
क्रमांक २	२९३	२९३	२१	१३६८५	२००*	५०.३१	८८.७१	४३	६६	११
क्रमांक ३	१०	१०	१	९२	३१	१०.२२	४८.१६	०	०	०
क्रमांक ४	६१	६१	८	२०५९	१४०*	३८.८४	७७.०८	४	१५	५
क्रमांक ५	३६	३६	८	७९७	८२*	२८.४६	८१.०७	०	५	३
क्रमांक ६	४	४	१	१४८	५७*	४९.३३	१३४.५४	०	१	०
क्रमांक ७	१	१	०	२०	२०	२०.००	८०.००	०	०	०

एकदिवसीय आंतरराष्ट्रीय सामन्यांतील फलंदाजी – संघाच्या इनिंग्जनुसार

	सामने	इनिंग्ज	नाबाद	धावा	सर्वोच्च	सरासरी	स्ट्राइक रेट	१००	५०	०
पहिली फलंदाजी	२२१	२२०	१५	९७०६	२००*	४७.३४	८४.३४	३२	४४	५
दुसरी फलंदाजी	२४२	२३२	२६	८७२०	१७५	४२.३३	८८.४४	१७	५२	१५

एकदिवसीय आंतरराष्ट्रीय सामन्यांतील फलंदाजी – निकालानुसार

	सामने	इनिंग्ज	नाबाद	धावा	सर्वोच्च	सरासरी	स्ट्राइक रेट	१००	५०	०
जिंकलेले सामने	२३४	२३१	३४	१११५७	२००*	५६.६३	९०.३१	३३	५९	८
हरलेले सामने	२००	२००	२	६५८५	१७५	३३.२५	७९.८६	१४	३५	११
बरोबरीत सुटलेले सामने	५	५	०	१६६	१२०	३३.२०	९६.५१	१	०	०
निकाल नाही	२४	१६	५	५१८	१०५*	४७.०९	८६.११	१	२	१

एकदिवसीय आंतरराष्ट्रीय सामन्यांतील फलंदाजी – स्पर्धेनुसार

	सामने	इनिंग्ज	नाबाद	धावा	सर्वोच्च	सरासरी	स्ट्राइक रेट	१००	५०	०
विश्वचषक	४५	४४	४	२२७८	१५२	५६.९५	८८.९८	६	१५	२
आशिया कप	२३	२१	२	९७१	११४	५१.१०	८५.४७	२	७	०
ऑस्ट्रेलिया तिरंगी मालिका (सीबी)	४२	४२	२	१३७७	११७*	३४.४२	७४.७५	१	९	१
आयसीसी चॅम्पियन्स करंडक	१६	१४	२	४४१	१४१	३६.७५	७८.७५	१	१	०

एकदिवसीय आंतरराष्ट्रीय सामन्यांतील फलंदाजी – स्पर्धेच्या टप्प्यानुसार

	सामने	इनिंग्ज	नाबाद	धावा	सर्वोच्च	सरासरी	स्ट्राइक रेट	१००	५०	०
अंतिम फेरीचे सामने	४०	३९	५	१८५१	१३८	५४.४४	८७.६८	६	१०	४
उपांत्य फेरीचे सामने	८	८	०	३१७	८५	३९.६२	७२.८७	०	३	०
उपउपांत्य फेरीचे सामने	४	४	०	२६३	१४१	६५.७५	९०.०६	१	१	०

एकदिवसीय आंतरराष्ट्रीय सामन्यांतील फलंदाजी – संघाच्या संख्येनुसार

	सामने	इनिंग्ज	नाबाद	धावा	सर्वोच्च	सरासरी	स्ट्राइक रेट	१००	५०	०
२ संघ	२००	१९६	१७	७२१५	२००*	४०.३०	८६.५७	१४	४०	११
३-४ संघ	१८४	१८०	१५	७९१७	१४६	४७.९८	८६.४२	२८	३५	७
५+ संघ	७९	७६	९	३२९४	१५२	४९.१६	८५.०७	७	२१	२

एकदिवसीय आंतरराष्ट्रीय सामन्यांतील फलंदाजी – दिवस/दिवस-रात्र सामन्यानुसार

	सामने	इनिंग्ज	नाबाद	धावा	सर्वोच्च	सरासरी	स्ट्राइक रेट	१००
दिवसाचा सामना	२५५	२४८	२४	९५९३	१८६*	४२.८२	८६.३१	२१
दिवस-रात्र सामना	२०८	२०४	१७	८८३३	२००*	४७.२३	८६.१५	२८

एकदिवसीय आंतरराष्ट्रीय सामन्यांतील फलंदाजी – मालिकेतील सामन्यांच्या टप्प्यानुसार

	सामने	इनिंग्ज	नाबाद	धावा	सर्वोच्च	सरासरी	स्ट्राइक रेट	१००
एकच सामना असलेली मालिका	४	४	०	१७३	११४	४३.२५	८५.६४	१
मालिकेतील पहिला सामना	४४	४३	४	१३२४	१२७*	३३.९४	८४.१७	२
मालिकेतील दुसरा सामना	४४	४३	८	१८१०	२००*	५१.७१	९४.२२	३
मालिकेतील तिसरा सामना	४२	४०	३	१३८५	१६३*	३७.४३	८६.४३	३
मालिकेतील चौथा सामना	२७	२७	२	१०४३	१२३	४१.७२	८४.११	३
मालिकेतील पाचवा सामना	२३	२३	०	१०८८	१७५	४७.३०	८४.२७	२
मालिकेतील सहावा सामना	१०	१०	०	२४६	९४	२४.६०	८३.३८	०
मालिकेतील सातवा सामना	६	६	०	१४६	३९	२४.३३	७१.५६	०

एकदिवसीय आंतरराष्ट्रीय सामन्यांतील फलंदाजी – कर्णधारानुसार

	सामने	इनिंग्ज	नाबाद	धावा	सर्वोच्च	सरासरी	स्ट्राइक रेट	१००
एम अझरुद्दीन	१६०	१५६	१७	६२७०	१४३	४५.१०	८७.६९	१८
एमएस धोनी	६५	६४	३	२८७५	२००*	४७.१३	८९.३१	८
आर द्रविड	५३	५२	६	२०२३	१४१*	४३.९७	८२.२०	४

एससी गांगुली	१०१	९९	९	४४९०	१५२	४९.८८	८६.२१	१३	२२	३
ए जडेजा	२	२	०	४४	३३	२२.००	१०७.३१	०	०	०
ए कुंबळे	१	१	०	६८	६८	६८.००	८६.०७	०	१	०
व्ही सेहवाग	६	६	१	२०१	९६*	४०.२०	७५.८४	०	२	०
आरजे शास्त्री	१	१	०	१	१	१.००	३३.३३	०	०	०
के श्रीकांत	१	१	०	०	०	०.००	०.००	०	०	१
एसआर तेंडुलकर	७३	७०	५	२४५४	१८६*	३७.७५	८३.४९	६	१२	४

एकदिवसीय आंतरराष्ट्रीय सामन्यांतील फलंदाजी – कर्णधार / खेळाडू असताना

	सामने	इनिंग्ज	नाबाद	धावा	सर्वोच्च	सरासरी	स्ट्राइक रेट	१००	५०	०
कर्णधार असताना	७३	७०	५	२४५४	१८६*	३७.७५	८३.४९	६	१२	४
खेळाडू असताना	३९०	३८२	३६	१५९७२	२००*	४६.१६	८६.६७	४३	८४	१६

१७५	ऑस्ट्रेलिया	हैदराबाद-आरजी	२००९-१०
१६३*	न्यूझीलंड	ख्राइस्टचर्च	२००८-०९
१५२	नमिबिया	पीटरमरीत्सबर्ग	२००२-०३
१४६	झिंबाब्वे	जोधपूर	२०००-०१
१४६	केनिया	पार्ल	२००१-०२
१४३	ऑस्ट्रेलिया	शारजा	१९९७-९८
१४१*	वेस्ट इंडीज	क्वालालंपूर	२००६-०७
१४१	ऑस्ट्रेलिया	ढाका	१९९८-९९
१४१	पाकिस्तान	रावळपिंडी	२००३-०४
१४०*	केनिया	ब्रिस्टॉल	१९९९
१३९	ऑस्ट्रेलिया	इंदूर	२०००-०१
१३८	श्रीलंका	कोलंबो-आरपीएस	२००९-१०
१३७	श्रीलंका	दिल्ली	१९९५-९६
१३४	ऑस्ट्रेलिया	शारजा	१९९७-९८
१२८	श्रीलंका	कोलंबो-आरपीएस	१९९७-९८
१२७*	केनिया	कटक	१९९५-९६
१२७*	झिंबाब्वे	बुलावायो	१९९८-९९
१२४*	झिंबाब्वे	शारजा	१९९८-९९
१२३	पाकिस्तान	अहमदाबाद	२००४-०५
१२२*	वेस्ट इंडीज	हरारे	२००१
१२२	दक्षिण आफ्रिका	वडोदरा	१९९९-००
१२०	श्रीलंका	कोलंबो-एसएससी	१९९९-००
१२०	इंग्लंड	बंगळुरू	२०१०-११
११८*	झिंबाब्वे	शारजा	१९९८-९९
११८	पाकिस्तान	शारजा	१९९५-९६
११७*	ऑस्ट्रेलिया	सिडनी	२००७-०८
११७	न्यूझीलंड	बंगळुरू	१९९६-९७
११५	न्यूझीलंड	वडोदरा	१९९४-९५
११४	दक्षिण आफ्रिका	मुंबई	१९९६-९७
११४	बांगलादेश	मिरपूर	२०११-१२
११३*	श्रीलंका	ब्रिस्टॉल	२००२
११२*	श्रीलंका	शारजा	१९९४-९५

१०४	झिंबाब्वे	बेनोनी	१९९६-९७
१०२	न्यूझीलंड	हैदराबाद	२००३-०४
१०१	श्रीलंका	शारजा	२०००-०१
१०१	दक्षिण आफ्रिका	जोहान्सबर्ग	२००१-०२
१००*	केनिया	कोलकाता	१९९७-९८
१००*	वेस्ट इंडीज	वडोदरा	२००६-०७
१००	पाकिस्तान	सिंगापूर-पी	१९९५-९६
१००	ऑस्ट्रेलिया	कानपूर	१९९७-९८
१००	ऑस्ट्रेलिया	ग्वाल्हेर	२००३-०४
१००	पाकिस्तान	पेशावर	२००५-०६

एकदिवसीय आंतरराष्ट्रीय सामन्यात त्याला अधिक वेळा बाद करणारे गोलंदाज

	वेळा	सामने
एसएम पोलॉक	९	२८
बी ली	९	३०
डब्ल्यूपीयुजेसी वास	९	४९
जीडी मॅक्ग्रा	७	२३
एचएच स्ट्रीक	७	२६
सीए वॉल्श	६	१६
अझर महमूद	६	२३
अब्दुल रझाक	६	२६
केएमडीएन कुलसेखरा	५	१६
डीएनटी झोयसा	५	१७
सीआरडी फर्नांडो	५	१७
शोएब अख्तर	५	१९
डीडब्ल्यू फ्लेमिंग	५	२०
एए डोनाल्ड	५	२६
आकिब जावेद	५	३०
एम मुरलीधरन	५	४७
एसटी जयसूर्या	५	७१
डीके मॉरीसन	४	१२

एसी कमिन्स	४	१४
टीएम मूडी	४	१५
एनडब्ल्यू ब्रॅकन	४	१७
पीएस डिव्हिलियर्स	४	१७
एसएल मलिंगा	४	१८
ए फ्लिंटॉफ	४	१९
वकार युनुस	४	२३
सीझेड हॅरिस	४	३०
जेएच कॅलिस	४	३२
डीआर टफी	३	७
टीजे फ्रेंड	३	९
जेएम अँडरसन	३	११
मोहमद सामी	३	१२
सीआर मॅथ्यूस	३	१२
एसए थॉम्पसन	३	१४
जीपी विक्रमसिंगे	३	१८
डीजे नॅश	३	१८
जीआर लार्सन	३	१९
डीएल व्हेटोरी	३	२०
एमजी जॉन्सन	३	२१
एल क्लुजनर	३	२१
शोएब मलिक	३	२४
वासिम अक्रम	३	२४
डब्ल्यूजे क्रोनिए	३	३२
एसआर वॉ	३	३३

एकदिवसीय आंतरराष्ट्रीय सामने – बाद होण्याची पद्धत

	वेळा	एकूण	टक्केवारी
त्रिफळाचीत	६८	४११	१६.५४
झेल-यष्टिरक्षक	७२	४११	१७.५२
झेल-क्षेत्ररक्षक	१८६	४११	४५.२६
पायचीत	३९	४११	९.४९
धावबाद	३४	४११	८.२७
यष्टिचीत	११	४११	२.६८
स्वयंचीत	१	४११	०.२४

एकदिवसीय आंतरराष्ट्रीय सामने – भागीदारी फलंदाज

	इनिंग्ज	नाबाद	धावा	सर्वोच्च	सरासरी	१००	५०
एससी गांगुली	१७६	३	८२२८	२५८	४७.५६	२६	२९
व्ही सेहवाग	११४	२	४३८६	१८२	३९.१६	१३	१८
आरएस द्रविड	९८	५	४११७	३३१	४४.२६	११	१४
एम अझरुद्दीन	७८	६	३५१४	१७५	४८.८०	८	१९
एडी जडेजा	४१	४	२१११	१७६	५७.०५	९	८
युवराज सिंग	४६	२	१५५८	१३८	३५.४०	३	९
जी गंभीर	५१	०	१५११	१७३	२९.६२	४	५
एसव्ही मांजरेकर	२५	०	११०९	१०२	४४.३६	१	८
एनएस सिद्धू	३६	०	११००	२३१	३०.५५	१	६
व्हीव्हीएस लक्ष्मण	२३	१	१०५६	१९९	४८.००	४	०
एम प्रभाकर	२५	२	९४२	१६१	४०.९५	२	४
एमएस धोनी	१९	४	९२८	१३५*	६१.८६	५	१
व्हीजी कांबळी	१९	२	७०४	१६४*	४१.४१	२	१
आयके पठाण	१२	०	६४७	१६४	५३.९१	२	४
व्ही कोहली	१०	०	६०३	१४८	६०.३०	२	३
डी मोंगिया	१२	१	५५६	९९	५०.५४	०	५
एसके रैना	५	०	३५४	१३७	७०.८०	१	२
एनआर मोंगिया	१३	१	३३१	८९	२७.५८	०	२
केडी कार्तिक	६	१	३२६	१९४	६५.२०	१	१
कपिल देव	१२	२	३२८	७६	३२.५०	०	२
एम कैफ	११	१	३१८	१०२	३१.८०	१	१
एचके बदानी	६	१	२८०	१३५*	५६.००	१	१
आरव्ही उथप्पा	७	०	२४२	९४	३४.५७	०	२
आरआर सिंग	७	०	२३४	१००	३३.४२	१	१
व्ही राठोड	७	०	१९५	५९	२७.८५	०	२
आरजे शास्त्री	५	०	१९५	७६	३९.००	०	२
एस रमेश	४	०	१५४	७५	३८.५०	०	१
पीके आमरे	६	०	१५२	५६	२५.३३	०	२
डब्ल्यूव्ही रामन	४	०	१४३	९०	३५.७५	०	१
जे श्रीनाथ	६	१	१२९	४१	२५.८०	०	०
आरजी शर्मा	१	०	१२३	१२३	१२३.००	१	०
के श्रीकांत	४	०	१२०	६२	३०.००	०	१
एसबी जोशी	४	०	९४	५७	२३.५०	०	१

वायके पठाण	२	०	९२	८१	४६.००	०	१
हरभजन सिंग	२	०	७९	७८	३९.५०	०	१
एचएच कानिटकर	१	०	६७	६७	६७.००	०	१
आरके चौहान	२	०	५९	४८	२९.५०	०	०
ए कुंबळे	७	१	५४	१९	९.००	०	०
एसबी सोमसुंदर	२	०	४९	३०	२४.५०	०	०
आरएस सोधी	२	१	३७	२३*	३७.००	०	०
जेपी यादव	१	०	३५	३५	३५.००	०	०
आरए जडेजा	१	०	३२	३२	३२.००	०	०
एस श्रीराम	२	०	३२	२२	१६.००	०	०
केएस मोरे	३	०	२४	१७	८.००	०	०
एम विजय	२	०	२४	२१	१२.००	०	०
एबी आगरकर	४	०	२३	९	५.७५	०	०
जेजे मार्टिन	१	०	२१	२१	२१.००	०	०
पीए पटेल	१	०	१६	१६	१६.००	०	०
व्ही यादव	२	०	१२	११	६.००	०	०
एसएस दास	१	०	८	८	८.००	०	०
व्ही दहिया	१	०	७	७	७.००	०	०
ए रात्रा	१	०	४	४	४.००	०	०
एसएस करीम	१	०	३	३	३.००	०	०
आरपी सिंग	१	०	१	१	१.००	०	०
डब्ल्यू जाफर	१	०	०	०	०.००	०	०

एकदिवसीय आंतरराष्ट्रीय सामन्यांतील गोलंदाजी

	सामने	षटकं	निर्धाव	धावा	बळी	सरासरी	धावा/प्रतिषटक	स्ट्राइक रेट	५
एकूण	४६३	१३४२.२	२४	६८५०	१५४	४४.४८	५.१०	५२.२०	२

एकदिवसीय आंतरराष्ट्रीय सामने – बळी कसे मिळवले

	वेळा	बळी	टक्केवारी
त्रिफळाचीत	३१	१५४	२०.१३
झेल-यष्टिरक्षक	१५	१५४	९.७४
झेल-क्षेत्ररक्षक	६९	१५४	४४.८०
पायचीत	१७	१५४	११.०४
यष्टिचीत	२२	१५४	१४.२९
स्वयंचीत	०	१५४	०.००

एकदिवसीय आंतरराष्ट्रीय सामने – सर्वोत्कृष्ट गोलंदाजी

	प्रतिस्पर्धी	ठिकाण	मोसम
५-३२	ऑस्ट्रेलिया	कोची	१९९७-९८
५-५०	पाकिस्तान	कोची	२००४-०५
४-३४	वेस्ट इंडीज	शारजा	१९९१-९२
४-३८	ऑस्ट्रेलिया	ढाका	१९९८-९९
४-५४	बांगलादेश	ढाका	२००४-०५
४-५६	दक्षिण आफ्रिका	फरिदाबाद	१९९९-००
३-२१	युएई	दम्बूला	२००४
३-२८	पाकिस्तान	कोलंबो-आरपीएस	२००४
३-३४	न्यूझीलंड	नेपियर	१९९८-९९
३-३५	ऑस्ट्रेलिया	मडगाव	२०००-०१
३-३५	बांगलादेश	कोलंबो-एसएससी	२००४
३-३६	वेस्ट इंडीज	चेन्नई	१९९४-९५
३-४३	श्रीलंका	राजकोट	१९९३-९४
३-४५	पाकिस्तान	ढाका	१९९७-९८
२-८	बांगलादेश	मुंबई	१९९७-९८
२-१०	दक्षिण आफ्रिका	बेलफास्ट	२००७
२-२४	बांगलादेश	ढाका	१९९९-००
२-२५	वेस्ट इंडीज	कटक	२००६-०७
२-२७	दक्षिण आफ्रिका	डर्बन	२००१-०२
२-२८	केनिया	डर्बन	२००२-०३
२-२९	न्यूझीलंड	दिल्ली	१९९४-९५
२-२९	वेस्ट इंडीज	ढाका	१९९८-९९
२-३१	वेस्ट इंडीज	कानपूर	१९९४-९५
२-३२	दक्षिण आफ्रिका	नैरोबी	२०००-०१
२-३२	पाकिस्तान	गुवाहाटी	२००७-०८
२-३४	श्रीलंका	कोलकाता	१९९५-९६
२-३९	श्रीलंका	पुणे	१९९०-९१
२-४०	पाकिस्तान	शारजा	१९९५-९६
२-४०	श्रीलंका	कोलंबो-आरपीएस	२००४
२-४१	झिंबाब्वे	कोलंबो-आरपीएस	२००२-०३
२-४४	श्रीलंका	ढाका	१९९९-००
२-४९	न्यूझीलंड	पुणे	१९९५-९६
२-६१	पाकिस्तान	चेन्नई	१९९६-९७

एकदिवसीय आंतरराष्ट्रीय सामने – कर्णधार असताना सामन्यांचे निकाल

सामना सुरू झाल्याची तारीख	प्रतिस्पर्धी	ठिकाण	नाणेफेक	निर्णय	निकाल
२८/०८/१९९६	श्रीलंका	कोलंबो-आरपीएस	जिंकली	फलंदाजी	पराभव
०१/०९/१९९६	झिंबाब्वे	कोलंबो-एसएससी	जिंकली	गोलंदाजी	विजय
०६/०९/१९९६	ऑस्ट्रेलिया	कोलंबो-एसएससी	हरली	गोलंदाजी	पराभव
१६/०९/१९९६	पाकिस्तान	टोरांटो	जिंकली	गोलंदाजी	विजय
१७/०९/१९९६	पाकिस्तान	टोरांटो	हरली	गोलंदाजी	पराभव
१८/०९/१९९६	पाकिस्तान	टोरांटो	जिंकली	फलंदाजी	विजय
२१/०९/१९९६	पाकिस्तान	टोरांटो	जिंकली	गोलंदाजी	पराभव
२३/०९/१९९६	पाकिस्तान	टोरांटो	हरली	फलंदाजी	पराभव
१७/१०/१९९६	दक्षिण आफ्रिका	हैदराबाद	हरली	फलंदाजी	पराभव
२१/१०/१९९६	ऑस्ट्रेलिया	बंगळुरू	हरली	फलंदाजी	विजय
२३/१०/१९९६	दक्षिण आफ्रिका	जयपूर	जिंकली	गोलंदाजी	पराभव
२९/१०/१९९६	दक्षिण आफ्रिका	राजकोट	जिंकली	फलंदाजी	पराभव
०३/११/१९९६	ऑस्ट्रेलिया	मोहाली	हरली	गोलंदाजी	विजय
०६/११/१९९६	दक्षिण आफ्रिका	मुंबई	जिंकली	फलंदाजी	विजय
१४/१२/१९९६	दक्षिण आफ्रिका	मुंबई	जिंकली	फलंदाजी	विजय
२३/०१/१९९७	दक्षिण आफ्रिका	ब्लोएमफॉन्टेन	हरली	फलंदाजी	पराभव
२७/०१/१९९७	झिंबाब्वे	पार्ल	हरली	फलंदाजी	बरोबरी
०२/०२/१९९७	दक्षिण आफ्रिका	पोर्ट एलिझाबेथ	जिंकली	फलंदाजी	पराभव
०४/०२/१९९७	दक्षिण आफ्रिका	ईस्ट लंडन	जिंकली	फलंदाजी	पराभव
०७/०२/१९९७	झिंबाब्वे	सेंच्यूरियन	जिंकली	फलंदाजी	पराभव
०९/०२/१९९७	झिंबाब्वे	बेनोनी	जिंकली	गोलंदाजी	विजय
१२/०२/१९९७	दक्षिण आफ्रिका	डर्बन	जिंकली	फलंदाजी	नि.नाही

२०/०७/१९९७	पाकिस्तान	कोलंबो-एसएससी	जिंकली	गोलंदाजी	नि.नाही
२४/०७/१९९७	बांगलादेश	कोलंबो-एसएससी	जिंकली	गोलंदाजी	विजय
२६/०७/१९९७	श्रीलंका	कोलंबो-आरपीएस	जिंकली	फलंदाजी	पराभव
१७/०८/१९९७	श्रीलंका	कोलंबो-आरपीएस	जिंकली	गोलंदाजी	पराभव
२०/०८/१९९७	श्रीलंका	कोलंबो-आरपीएस	हरली	गोलंदाजी	पराभव
२३/०८/१९९७	श्रीलंका	कोलंबो-एसएससी	हरली	गोलंदाजी	नि.नाही
२४/०८/१९९७	श्रीलंका	कोलंबो-एसएससी	जिंकली	गोलंदाजी	पराभव
१३/०९/१९९७	पाकिस्तान	टोरांटो	हरली	गोलंदाजी	विजय
१४/०९/१९९७	पाकिस्तान	टोरांटो	हरली	फलंदाजी	विजय
१७/०९/१९९७	पाकिस्तान	टोरांटो	जिंकली	गोलंदाजी	नि.नाही
१८/०९/१९९७	पाकिस्तान	टोरांटो	हरली	गोलंदाजी	विजय
२०/०९/१९९७	पाकिस्तान	टोरांटो	जिंकली	गोलंदाजी	विजय
२१/०९/१९९७	पाकिस्तान	टोरांटो	हरली	गोलंदाजी	पराभव
२८/०९/१९९७	पाकिस्तान	हैदराबाद	जिंकली	फलंदाजी	पराभव
३०/०९/१९९७	पाकिस्तान	कराची	हरली	फलंदाजी	विजय
०२/१०/१९९७	पाकिस्तान	लाहोर	हरली	गोलंदाजी	पराभव
११/१२/१९९७	इंग्लंड	शारजा	जिंकली	गोलंदाजी	पराभव
१४/१२/१९९७	पाकिस्तान	शारजा	जिंकली	फलंदाजी	पराभव
१६/१२/१९९७	वेस्ट इंडीज	शारजा	जिंकली	गोलंदाजी	पराभव
२२/१२/१९९७	श्रीलंका	गुवाहाटी	जिंकली	गोलंदाजी	विजय
२७/१२/१९९७	श्रीलंका	इंदूर	हरली	फलंदाजी	नि.नाही
२८/१२/१९९७	श्रीलंका	मडगाव	जिंकली	फलंदाजी	पराभव
२३/०८/१९९९	ऑस्ट्रेलिया	गॅले	जिंकली	फलंदाजी	पराभव
२५/०८/१९९९	श्रीलंका	कोलंबो-आरपीएस	जिंकली	फलंदाजी	पराभव
२९/०८/१९९९	श्रीलंका	कोलंबो-एसएससी	जिंकली	फलंदाजी	विजय
०४/०९/१९९९	झिंबाब्वे	सिंगापूर	हरली	गोलंदाजी	विजय
०७/०९/१९९९	वेस्ट इंडीज	सिंगापूर	जिंकली	फलंदाजी	नि.नाही

७/११/१९९९	न्यूझीलंड	दिल्ली	हरली	फलंदाजी	विज
०/०१/२०००	पाकिस्तान	ब्रिस्बेन	जिंकली	फलंदाजी	पराभ
२/०१/२०००	ऑस्ट्रेलिया	मेलबोर्न	हरली	फलंदाजी	पराभ
४/०१/२०००	ऑस्ट्रेलिया	सिडनी	जिंकली	फलंदाजी	पराभ
१/०१/२०००	पाकिस्तान	होबर्ट	जिंकली	गोलंदाजी	पराभ
५/०१/२०००	पाकिस्तान	ॲडलेड	जिंकली	फलंदाजी	विज
६/०१/२०००	ऑस्ट्रेलिया	ॲडलेड	हरली	फलंदाजी	पराभ
८/०१/२०००	पाकिस्तान	पर्थ	हरली	फलंदाजी	पराभ
०/०१/२०००	ऑस्ट्रेलिया	पर्थ	जिंकली	फलंदाजी	पराभ


मेहता पब्लिशिंग हाउस
www.mehtapublishinghouse.com
अनुवादित आत्मचरित्र
₹ 640
ISBN-
9788184987164
Follow us
e-Book
Available
hachette
INDIA